सत्यमेव जयते

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

राज्य दर्शनिका

महाराष्ट्र : भूमि व लोक

लेखक

डॉ. त्रि.ना. वाळंजकर, डॉ. सुधाताई काळदाते,
डॉ. कि.का.चौधरी, डॉ. वर्षा शिरगांवकर

डॉ. अरुणचंद्र शं. पाठक
कार्यकारी संपादक व सचिव
दर्शनिका विभाग

श्री. भूषण गगराणी
प्रधान सचिव
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

महाराष्ट्र शासन, मुंबई

महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र : भूमि व लोक

लेखक

डॉ.त्रि.ना. वाळुंजकर

डॉ. सुधाताई काळदाते

डॉ.कि.का.चौधरी

डॉ.वर्षा शिरगावकर

संपादक

डॉ.कि.का.चौधरी

मुंबई

दर्शनिका विभाग

सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन

१९९६

प्रस्तावना

महाराष्ट्र : भूमि व लोक हा ग्रंथ प्रकाशित करतांना मनस्वी आनंद होत आहे. अदमासे चार वर्षे केलेल्या परिश्रमांची फलश्रुती या ग्रंथाच्या रूपाने मी अभ्यासकांना सादर करीत आहे. खरे तर हा ग्रंथ महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास होय. या योगाने समग्र सांस्कृतिक व ऐतिहासिक संदर्भ साहित्यात बहुमोल भर पडणार आहे असा विश्वास वाटतो. वास्तविकपणे गॅझेटिअर-निर्मिती ही एक स्वतंत्र विद्याशाखा उत्क्रांत झालेली आहे. त्यामुळे गॅझेटिअरची संकल्पना स्थितीशील राहणे असंभव. गॅझेटियर म्हणजे केवळ प्राकृतिक भूस्वरूप, नद्या, वनसंपदा व स्थळांची भौगोलिक माहिती आणि लोकांच्या चालीरीती, राजघराण्यांचा इतिहास, अर्थव्यवस्था व प्रशासन आणि पुरावशेषांचा तपशील देणारा कोश नव्हे. मानवी संस्कृती, समाजमन आणि समाजव्यवस्था या विषयांचा इतिहास गॅझेटिअरमध्ये अंतर्भूत करण्याची नितांत गरज असल्याचे मान्य करावेच लागेल. लोकजीवनाच्या विविध पैलूंचे ऐतिहासिक दृष्टिकोनातून विहंग दर्शन घडविणेही आवश्यक होय. या वैचारिक धारणेनुसार विद्यमान ग्रंथ साकार करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी भाषेतून प्रकाशित करावयाच्या ''राज्य गॅझेटिअर '' मालिकेतील हे पहिलेच पुष्प.

महाराष्ट्राची संस्कृती, कला आणि समाजजीवन यांचे विहंग दर्शन घेताना हे आधिच स्पष्ट केले पाहिजे की, महाराष्ट्राची संस्कृती भारतीय संस्कृतीचाच अविभाज्य घटक होय. खरे तर महाराष्ट्रीय सांस्कृतिक आसमंताचा विचार भारतीय संस्कृतीच्या संदर्भातच करणे शक्य आहे. संस्कृतीकरणाच्या प्रातःकालापासून महाराष्ट्राने संस्कृति-संपर्काद्वारे परप्रांतीयांच्या विविध कला आणि सांस्कृतिक गुणविशेष संपादन करून त्यांचे संवर्धन केले. किंबहुना संस्कृति-संपर्काचे महाराष्ट्र हे भारतीय उपखंडातील सर्वोत्तम उदाहरण मानावे लागते. संस्कृत, प्राकृत, द्रविडिअन व मुंडरी या भाषा तसेच त्यांच्या व्युत्पन्न बोलीभाषा बोलणा-या लोकांच्या संपर्कातून येथील लोकांनी आपली संस्कृती व जीवन पध्दती घडविली. उत्तर, दक्षिण, पश्चिम तद्वतच पूर्व भारतातील लोकांशी येथील लोकांचा संपर्क आल्याने त्यांची जीवन पध्दती आणि कला महाराष्ट्रीय लोकांनी संपादन केल्या, स्वीकारल्या व त्यावर संस्करण करून आपले समाजजीवन व कला जीवन घडविले. प्राचीन काळापासून उत्तरापथाकडून दक्षिणापथाकडे संचार करण्याचे बहुतांश मार्ग येथूनच जात होते. वस्तुतः महाराष्ट्र ही उत्तरापथ आणि दक्षिणापथ यांच्यामधील एक विशेषतापूर्ण संयोगभूमी होय. यामुळे महाराष्ट्रातील कला आणि कला जीवनाला विशिष्ट स्वरूप प्राप्त झाले. महाराष्ट्रातील कला जीवन आणि समाजजीवन यांच्यात बरेच साधर्म्य दिसते ते यामुळेच.

मात्र संस्कृति-संपर्काचे आणि समग्र भारतीयत्वाचे तत्त्व स्वीकारून देखील हे मान्यच करावे लागते की, महाराष्ट्राला खास विशेषतापूर्ण सांस्कृतिक परंपरा आहे. महाराष्ट्राला स्वतःची अस्मिता आहे. सांस्कृतिक व सामाजिक परंपरामध्ये आगळेपणा आहे. महाराष्ट्राने संगीत, ललितकला व जीवन पध्दतीचा उत्तरापथाकडून तसेच दक्षिणापथाकडून स्वीकार केलेला असला, तरी संश्लेषणाद्वारे महाराष्ट्राने आपले सांस्कृतिक आगळेपण उत्क्रांत केलेले आहे. आगळे वेगळे असे सांस्कृतिक अधिष्ठान उभारले आहे. संस्कृतीचे मूल्यमापन केवळ भौतिक संचिताच्या आधारे न करता कला आणि विचारधनाच्या संचितावरूनही करावे लागते. समाजाचे तत्त्वज्ञान आणि कला समाजजीवनात अभिन्न असाव्या लागतात. कलाकार आपली चेतना व भावस्थिती कलाविष्कारातून व्यक्त करतो. मात्र त्याची भावस्थिती सांस्कृतिक चेतनांशी एकजीव झालेली असते. त्याचा भावनाशय सहकंपेने भारला जातो. आणि सहकंपा म्हणजे विश्वात्मवृत्ती. ही व्यक्तित्वाहून भिन्न असते. वस्तुतः कलेमुळेच समाजाच्या जीवनाला ''संस्कृति'' हे विशेषण नाम सार्थ ठरते. महाराष्ट्राने संस्कृतीची ही पातळी गाठलेली आहे, असे प्रतिपादन करता येते. भारतीय उपखंडाची महान संस्कृती आणि ललितकलांकडून महाराष्ट्राने मोलाचे संचित स्वीकारले, आणि त्यात आपल्या परीने भरही घातली. इतर सुधारणात्मक प्रेरणाबरोबरच महाराष्ट्राने ललितकला, दृश्य आणि संयुक्त व कनिष्ठ कला या समाजाच्या संस्कृतीचे स्वरूप घडविणा-या कलांमध्ये मोलाचे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्राने बुध्दिवादाची आणि समाजसुधारणेची प्रदीर्घ परंपरा जतन करून ठेवलेली आहे. भारतीय वैचारिक तसेच ललित साहित्यात या भूमीने मोठी भर घातलेली आहे. अभिजात शास्त्रोक्त संगीत आणि मराठी नाटय संगीत या दोन्हीही क्षेत्रांत महाराष्ट्राचे योगदान फार मोठे असल्याने विद्यमान ग्रंथात "कला व संस्कृति" यावर एक स्वतंत्र प्रकरण घालणे आवश्यक वाटले. त्यात कला व संस्कृतीचे परस्पर संबंध दाखवून संगीत, मराठी रंगभूमी, लोककला, लोकनाटयादी कलाविष्कारांचा परामर्श घेतलेला आहे. त्यातून महाराष्ट्राच्या कला संचिताचे विहंग दर्शन घडावे अशी अपेक्षा बाळगून आहे.

मराठी भाषिकांचा एकसंध प्रदेश म्हणजे सध्याचा महाराष्ट्र. या एकभाषिक प्रदेशास "महाराष्ट्र राज्य" असे नामाभिधान १ मे १९६० रोजी प्राप्त झाले. मध्यप्रदेश, गुजरात आणि कर्नाटकातील काही भागांमध्येही मराठी भाषा बोलली जाते. म्हणूनच त्या प्रदेशांचा बृहन्महाराष्ट्रात समावेश केला जातो. तथापि विद्यमान ग्रंथातील चर्चा मुख्यतः

सांप्रतच्या महाराष्ट्र राज्यापुरतीच मर्यादित केलेली आहे.

जगातील सर्वात जुने मानवी अवशेष आफ्रिका खंडातील टांझानिया, केनया, इथोपिया, या भूभागात मिळाले असून, मानवाच्या प्राचीनतेचा आणि उत्पत्तीचा काल आता वर्तमानपूर्व ४० ते ४२ लाख वर्षे इतका मागे गेलेला आहे. भारतात मात्र आदिमानवाच्या अस्तित्वाच्या खुणा वर्तमानपूर्व दोन लाख वर्षांपेक्षा मागे जात नाहीत. अद्ययावत ऐतिहासिक संशोधनानुसार महाराष्ट्रातील आदिमानवाच्या अस्तित्वाच्या खुणा वर्तमानपूर्व दीड लाख वर्षांपासून स्पष्ट झालेल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील मानव व मानवी वसाहतीकरणाच्या इतिहासाची रचना मागील कमीत कमी दीड लाख वर्षांपासून करणे शक्य झाले आहे. अश्मयुगाची व्याप्ती सहस्त्रावधी वर्षांची असल्याने इतिहासकारांनी त्याचे पुराश्मयुग, मध्याश्मयुग, नवाश्मयुग असे कालखंड निश्चित केलेले आहेत. ऐतिहासिक संशोधनाची साधनसामग्री वृध्दिंगत झाल्याने पुराश्मयुगाची विभागणी तीन उप-कालखंडामध्ये करणेही शक्य झाले आहे. या तीन उपखंडांना आद्य पुराश्मयुग (इ. स. पू. तीन लाख ते एक लाख), मध्य पुराश्मयुग (इ. स. पू. एक लाख ते तीस हजार), आणि उत्तर पुराश्मयुग (इ. स. पू.तीस हजार ते दहा हजार) अशा संज्ञा देण्यात आलेल्या आहेत. मध्याश्मयुगाचा कालखंड इ. स. पू. दहा हजार ते चार हजार आणि नवाश्मयुगाचा कालखंड त्यानंतरचा निश्चित करण्यात आलेला आहे. तथापि महाराष्ट्रात स्वतंत्र अशी नवाश्मयुगीन मानवी वसाहत मिळालेली नसल्याने ताम्रपाषाण युगाच्या संदर्भातच या अवशेषांचे मूल्यमापन करावे लागते. ताम्रपाषाण युगाचा कालखंड इ. स. पू. २,००० ते ८०० वर्षे असा निश्चित करण्यात आलेला आहे.

काही पुरातत्त्ववेत्त्याच्या मते आद्य पुराश्मयुगात म्हणजे दोन ते तीन लाख वर्षांपूर्वी महाराष्ट्रात प्रवरा, गोदावरी,घोड,भिमा आणि वैनगंगा या नद्यांच्या खो-यामधून आदिमानव भटक्या अवस्थेत जीवन जगत होता. त्याच्या २० ते ३० जणांच्या टोळया असत. शिकार व वन्यफळे आणि कंदमूळे गोळा करून मानव आपला उदरनिर्वाह करीत होता. आद्य पुराश्मयुगातील मानवनिर्मित दगडी हत्यारे आणि प्राण्यांचे अवशेष गंगापूर (जि. नाशिक), चिरकी-नेवासा (जि. अहमदनगर), भाडणे (जि. धुळे), पापामिया टेकडया, मानेगाव (जि. जळगांव), पाचाड (जि. रायगड), हातखंबा (जि.रत्नागिरी) येथे मिळालेले असल्याकारणाने तेथे आद्य पुराश्मयुगात मानव आपले जीवन कंठीत होता हे निश्चित. तसेच मानवी हत्यारांचे व प्राण्यांचे मध्य पुराश्मयुगातील अवशेष नांदूर मधमेश्वर व काळेगाव (जि. नाशिक), किवळा (जि. नांदेड), नेवासा (जि. अहमदनगर), टेंभू (जि. सातारा), वाळवे (जि. सांगली), इनामगाव (जि. पुणे), पवनी (जि. भंडारा), पापामिया टेकडया, दौंड (जि. पुणे), आणि पाटणे (जि. जळगांव) येथील उत्खननांमध्ये मिळालेले आहेत. तद्वतच पाटणे, नेवासा, ढवळपुरी (जि. अहमदनगर), इनामगाव, भोकर (जि. नांदेड), येथे उत्तर पुराश्मयुगीन अवशेष प्राप्त झालेले आहेत. आद्य पुराश्मयुगातील बेसॉल्टच्या किंवा क्वार्टझच्या हातकु-हाडी,फरशा इत्यादी हत्यारे ओबडधोबड होती. नंतरच्या कालखंडात मात्र लहान आकाराची व सुबक अशी हत्यारे अस्तित्वात येऊ लागली. चर्ट जातीच्या दगडापासून बनविलेली हत्यारे तर महाराष्ट्रात जवळ जवळ सर्वत्र आढळतात.

मानेगाव व पाटणे येथील उत्खननांमुळे तेथील मानवी जीवनावर बराच प्रकाश पडलेला आहे. मानेगावला चाल्सिडनीची सूक्ष्माश्म अस्त्रे प्राप्त झाली. अश्युलियन अवजारे देखील मिळाली. पाटणे उत्खनन्नात (१९७३) मध्य पुराश्म आणि उत्तर पुराश्म युगामधील शहामृगांच्या अंडयांचे शंभराहून अधिक अवशेष मिळाले. त्यातील तीन नमुने उत्तर पुराश्मयुगातील असून अंडयांच्या कवचावर मानवाने केलेली जाळीची नक्षी आहे. शिवाय शहामृगाच्या अंडयापासून बनविलेले तीन सुंदर चपटे मणी (disc–heads) आणि नदीमुखाजवळ आढळणारे शंखांचे मणी देखील सापडले आहेत. यावरून अनुमान काढणे क्रमप्राप्त आहे की, येथील उत्तर पुराश्मयुगातील मानव कलाप्रेमी असून अंडयावर कोरीव नक्षी काढण्याची व चपटे मणी बनविण्याची कला त्यास अवगत होती. त्या कलाप्रेमी मानवाने शंखापासून बनविलेले मणी निश्चितच नदीमुखाजवळील प्रदेशातून येथे आणले असावेत. कलाप्रेमाशिवाय हे असंभव. त्या युगातील ही कला भारतातील सर्वात जुनी असावी असे मानता येते. पाटणेच्या शहामृग अंडयावरील कलाकृती, कोरीव नक्षी, अंडयाचे मणी आणि दगडी घोटीव वस्तू व त्या करताना उरलेले अवशेष असे दर्शवितात की, या वस्तू येथेच बनविल्या असाव्यात. पाटणेच्या संशोधनामुळे आता बराच इतिहास प्रकाशात आलेला आहे. पाटणेची अश्युलियन अवजारे गंगापूरला मिळालेल्या उत्तर अश्युलियन अवजारांशी तुलना करण्याजोगी आहेत. पाटणेला मिळालेली सांस्कृतिक साधनसामग्री कालक्रमाने वर्तमानपूर्व ४०,००० ते ६,००० वर्षांपूर्वीची असून, तिचे तीन कालखंड पाडण्यात आलेले आहेत. पाटणे परिसरात उत्तर अश्युलियन काळापासून मानवी वसाहत असणार. समशितोष्ण हवामान, पाणी, शिकारीचे प्राणी, कंदमूळे, फळे, आणि अन्नधान्याच्या उपलब्धतेमुळे व सुरक्षित निवा-यामुळे येथे माणसाने कायम राहणे पसंत केले असावे. येथील पर्यावरण नजीकचे ऊर्ध्व गोदावरी खोरे व तापी-गिरणा खोरे या प्रमाणेच असावे. मात्र सर्व कालखंडांमधील मानवी जीवनाच्या परिस्थितीबाबत अनुमान काढण्यासाठी अधिक माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. [डॉ.कि.का.चौधरी (संपा.) **जळगांव जिल्हा गॅझेटिअर,** १९९४, पृ.५४].

डेक्कन कॉलेजमधील डॉ.शरद राजगुरू यांनी अश्मयुगीन पर्यावरणाचा अभ्यास करून काही महत्त्वाचे निष्कर्ष काढलेले आहेत. अनेक ठिकाणचे लाकडांचे व शिंपाचे नमुने गोळा करून रेडिओ कार्बन पध्दतीने त्यांचे कालही निश्चित केलेले आहेत. त्यांच्या मते दोन ते तीन लाख वर्षांपूर्वी म्हणजे आद्य पुराश्मयुगात नेवासाजवळील प्रवरा नदी अदमासे १० ते २० मीटर उंचीवरून वाहत होती. तिचे पात्र दगड-गोटयांनी भरल्याने उथळ झाले होते. त्यावेळी हवामान आजच्यापेक्षा अधिक शुष्क होते. पुढे म्हणजे वर्तमानपूर्व एक ते दीड लाख वर्षांपूर्वी भूकंपीय स्थित्यंतरांमुळे प्रवरा, कृष्णा, गोदावरी वगैरे नद्यांची पात्रे खोल होण्यास प्रारंभ झाला. त्यामुळे या नद्या सद्याच्या पातळीपेक्षा १५ ते २० मीटर खाली वाहत होत्या. त्याकाळी पावसाचे प्रमाण २५ ते ३० टक्क्यांनी वाढले होते. अनेक प्रकारचे वन्यप्राणी विपुल प्रमाणात होते. मध्य पुराश्मयुगात कोकणातही भूमिस्थित्यंतरे होऊन अरबी समुद्राची पातळी २० ते ३० मीटर खाली गेली. परिणामतः मोठा भूप्रदेश अस्तित्वात आला. पुराणात कथन केल्याप्रमाणे परशुरामाने कोकणातील समुद्र मागे हटवून तेथील भूमी वसाहतयोग्य केल्याची कथा आहे, तिचे शास्त्रीय स्पष्टीकरण यात आहे.

दहा हजार वर्षांपूर्वी प्रारंभ झालेल्या मध्याश्मयुगात हवामानामध्ये महत्त्वाचे बदल घडून आले. मान्सूनचा पाऊस विपुल प्रमाणात पडू लागला. त्यामुळे नद्यांची पात्रे खोल गेली आणि त्या हल्लीच्या पातळीवरून वाहू लागल्या. नदीकाठांवर मळीची जमीन तयार होवून ती अधिक सुपीक बनली. पशुपक्षांची विपुलता वाढली आणि माणसाला भरपूर अन्न मिळू लागले. हवामानातील अनुकूलता आणि लोकसंख्येची झपाट्याने झालेली वाढ यामुळे कृषिव्यवसायाचा ४,००० वर्षांपूवी प्रारंभ झाला. तरी देखील अन्य ठिकाणी मध्याश्मयुगीन टोळया राहत होत्या. जमिनीवर पडलेले बी पाऊस पडल्यावर पुन्हा उगवते, हे मानवाच्या नजरेत भरले असणारच. शेतीमधून अन्नधान्य उत्पादन करण्यास ४,००० वर्षांपूर्वी सुरुवात झाल्याचे तापी नदीच्या खो-यातील पुराव्यावरून म्हणता येते.

महाराष्ट्रात ख-या अर्थाने नवाश्मयुग न अवतरता ताम्रपाषाणयुग अवतरले. शेतीचे ज्ञान असणा-या आणि तांबे तसेच दगडाची हत्यारे वापरणा-या टोळ्या येथे स्थायिक झाल्या (इ.स.पू. २०००). महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये सावळदा संस्कृति (इ.स.पू. २०००-१८००),सिंधु संस्कृति (इ.स.पू. १८००-१६००), माळवा संस्कृति (इ.स.पू. १६००-१४००), व जोर्वे संस्कृति (इ.स.पू. १४००-१०००), हे कालक्रम इतिहासकारांनी निश्चित केलेले आहेत. नंदूरबार तालुक्यातील सावळदा येथे सावळदा संस्कृतीचे अवशेष प्रथम सापडले. तेथे रंगीत खापरांवर काढलेली जलचरांची चित्रे उपलब्ध झालेली आहेत. संपूर्ण गुजरातभर पसरलेली सिंधू संस्कृती विकलांग होत असतांना तेथील लोक तापीच्या खो-यातून महाराष्ट्रात आले. साकी तालुक्यातील कावठे आणि अहमदनगर जिल्हयातील दायमाबाद येथे त्या संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. विशिष्ट घाटाची खापरे व त्यावरील नक्षी ही या संस्कृतीची विशेषता होय. काही खापरांवर सिंधू लिपीतील अक्षरे रंगविलेली किंवा कोरलेली आहेत. इ.स.पू. सतराव्या शतकात माळव्यातील ताम्रपाषाणयुगीन शेतकरी खानदेशात येण्यास उद्युक्त झाला. खानदेशात अनेक गावे वसविल्यावर हे लोक पुढे बागलाण घाटातून गोदावरीच्या खो-यात आणि दक्षिणेकडे भिमेच्या खो-यातही पसरले. प्रकाशे, दायमाबाद आणि इनामगांव ही या संस्कृतीची अत्यंत महत्त्वाची वेंग्द्रे होती. महाराष्ट्रात अनेक ठिकाणी या लोकांनी स्थिर जीवनाचा प्रारंभ केला. गहू पेरण्याचा प्रारंभही याच लोकांनी केला असावा. या आप्रवाशांमुळे (immigrants) महाराष्ट्रातील सांस्कृतिक विकास घडविण्यास फार मोठी मदत झाली. या संस्कृतीतील भांडयांची घडण व त्यावरील नक्षीकाम विविधतापूर्ण असून त्यास भारतात इतरत्र तोड नाही. गृहोपयोगी भांड्यांखेरीज या मंडळींनी अत्यंत कलात्मक असे मद्याचे चषकही बनविले होते. तांब्याचे दागिने वापरात येवू लागले. संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथे "जोर्वे संस्कृति" चा शोध लागल्यानंतर (इ.स.१९५०) या संस्कृतीची कित्येक स्थळे उजेडात आली. कोकण आणि विदर्भाचा काही भाग सोडल्यास पूर्ण महाराष्ट्रात जोर्वे संस्कृती पसरलेली होती. माळव्यातील आप्रवाशांशी संघर्ष होऊन ही संस्कृती निर्माण झाली असावी. याचा अर्थ जोर्वे संस्कृतीचा उदय संस्कृती संघर्षातून झाला असावा. या काळात बरीच भरभराट झाली. शेतीसाठी जलसिंचनाचा प्रारंभ याच सुमारास झाला.

इ.स.पू. १००० च्या सुमारास पश्चिम भारतातील पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे वारंवार दुष्काळ पडू लागले. त्यामुळे तापी व गोदावरीच्या खो-यांमधील जोर्वे संस्कृतीच्या अनेक वसाहती उजाड पडल्या. परिणामतः लोकांना भटके जीवन जगण्याची पाळी आली.

इ.स.पू. च्या पहिल्या सहस्त्रकाच्या मध्यास लोहयुगीन संस्कृती परिपक्व होऊ लागली, व त्याबरोबर नागर संस्कृतीच्या पाऊलखुणा जाणवू लागल्या. लोखंडाचा उपयोग वाढून कृषी उत्पादन आणि कला व कारागिरीमध्ये प्रगती झाली. या घटकांचा परिणाम म्हणून आसपासच्या प्रदेशाबरोबर दळणवळण सुरू झाले. गौतम बुध्दाच्या काळी मुंबईजवळील शूर्पारक (सोपारा) या बंदरास हळूहळू परदेशांशी संपर्क साधण्याचे वेंग्द्र म्हणून महत्त्व प्राप्त होऊ लागले. परदेशी व्यापाराचे वेंग्द्र म्हणून सोपारा बंदर अत्यंत महत्त्वाचे बंदर होते. याच कारणामुळे सम्राट अशोकाने तेथे आपला स्तंभलेख उभारला होता. या सुमारास "अश्मक", "तगर" या

जनपदांचा उदय झाला. मौर्य साम्राज्यात समावेश झाल्यामुळे महाराष्ट्राचा उत्तर भारताशी संपर्क वाढला. सोपा-याहून नाशिक, पितळखोरे, अजिंठा, आणि महेश्वर या मार्गे एक मार्ग उज्जैनपर्यन्त, तर पैठणहून औरंगाबाद, भोकरदन, अजिंठा, घटोत्कच व महेश्वर या मार्गे उज्जैनपर्यत दुसरा मार्ग होता. महाराष्ट्रातील कोरीव लेणींमुळे या मार्गावरील स्थळांची कल्पना येते. पैठण ते कोल्हापूर हा मार्ग नेवासे, जुन्नर, शेलारवाडी, शिरवळ आणि कराड असा होता. सोपारा ते कोल्हापूर हा मार्ग कल्याण, महाड,खेड व कराड या गावांवरून जात होता. प्रागैतिहासिक काळातील कालनिश्चितीबाबत मतैक्य नसल्याने सदर प्रस्तावनेतील तारखा व डॉ. वाळुंजकरांनी दिलेल्या तारखा यात फरक दिसून येईल.

ज्यांचा इतिहास ज्ञात आहे असे सातवाहन सम्राट हे महाराष्ट्रातील पहिले राजघराणे होय. त्यांच्या काळातील कलाकृती,नाणी, कोरीव लेख, व वाङ्मय उपलब्ध आहे. सातवाहनांचा इतिहास सर्वश्रुत असल्याने त्याचे येथे कथन करण्याचे प्रयोजन नाही. इतके मात्र म्हणावेच लागते की, अंतर्गत आणि परदेशी व्यापारामुळे या काळात अपूर्व समृध्दी अवतरली. त्यामुळे पितळखोरे, अजिंठयाची प्रारंभीची लेणी, भाजे, कार्ले, नाशिक, जुन्नर यांसारखी शेकडो लेणी अस्तित्वात आली. यापैकी बहुतेक लेणी उत्तमोत्तम शिल्पांनी नटलेली आहेत. पाषाणात कोरलेली तत्कालीन शिल्पे विलक्षण सजीव वाटतात. गतकाळात बहुतांश गुंफा मनोरम चित्रांनी नटलेल्या होत्या. दगडी शिल्प आणि रंगचित्र शैली यांच्यातील विलक्षण जवळीक आस्वादकाच्या नजरेत भरते.

इ.स. २५० च्या सुमारास उदयास आलेल्या वाकाटकांची सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर महाराष्ट्रात हळूहळू अपूर्व समृध्दी अवतरली. उत्तरेकडील गुप्त सम्राटांचे समकालीन असलेल्या वाकाटकांच्या काळी शिल्पकला अधिकाधिक नटू लागली. अजिंठयाची बरीच लेणी याच काळातील होत. काही वाकाटक राजे कला आणि वाङ्मयाचे कलासक्त आश्रयदाते होते, त्यामुळेच अजिंठयाच्या अतुलनीय कलाकृतीचा जन्म झाला. पवनारला सापडलेले अवशेष याच काळातील होत. आर्थिक सुबत्ता आणि राजकीय शांतता यामुळे महाराष्ट्रात सुवर्णयुगाचे आगमण झाले. अजिंठा येथील विविधतापूर्ण भित्तिचित्रांमधून प्रतीत करण्यात आलेले ते हेच समृध्द जीवन. समाजजीवनात लक्षणीय सुधारणा होऊन उत्तुंग इमारती उभारण्यात आल्या. वस्त्रालंकारांचा उदय झाला. महाकवी कालिदासासारखे थोर कवी नाटककार याच काळातील होत. अजिंठा तर आपणास एका दूर स्वप्नवत, तथापि तरीही वास्तव जगतात घेऊन जाते. बदामीचे चालुक्य तद्वतच देवगिरीचे यादव यांच्या राजवटीत महाराष्ट्रात वास्तुशिल्प व ललितकला अधिकाधिक मोहरल्या, विकसित झाल्या. मुघलकालीन लघुचित्र शैली महाराष्ट्रात रुजली नाही, संगीत मात्र बहरले. उत्तर आणि दक्षिण भारतातून संगीत आले, आणि महाराष्ट्राने सावकाशपणे आपले कला संचित वृध्दिंगत केले. याची चर्चा " कला व संस्कृती " या प्रकरणात केलेली आहे.

महाराष्ट्र हा भारतातील एक सांस्कृतिक विभाग असून त्याचे सांस्कृतिक उपविभाग निर्माण झालेले आहेत.ऐतिहासिक तसेच भौगोलिक घटकांमुळे सांस्कृतिक उपविभाग उत्क्रांत झालेले आहेत. सर्वसाधारणपणे महाराष्ट्राचे पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाडा असे विभाग कल्पिले जातात. तथापि पश्चिम महाराष्ट्राचे कोकण व देश हे दोन स्वतंत्र उपविभाग निर्माण झालेले आहेत. याबाबतचे विवरण सांप्रत ग्रंथात दिलेले आहे. महाराष्ट्रात हिंदू धर्मीय सर्वाधिक असले, तरी इस्लाम, ख्रिस्ती, बौध्द, जैन, झोरोस्ट्रियन, शीख तसेच ज्यू धर्मीय देखील गुण्यागोविंदाने जीवन जगत आहेत. यादव काळामध्ये राजभाषा म्हणून मान्यता पावलेली मराठी ही सर्वाधिक लोकांची मातृभाषा होय. ही भाषा संस्कृत, प्राकृत, द्रविडियन भाषांमधून उत्क्रांत झालेली असली, तरी काही भागातील मराठीवर मुंडरी भाषेचाही प्रभाव दिसून येतो. कालांतराने मराठीने पर्शियन, अरेबिक, उर्दू, हिंदी व इंग्रजी शब्दही आपल्यात सामावून घेतले. उत्तर महाराष्ट्रात असलेले कोरकू लोक मुंडरी प्रवर्गातील बोलीभाषा बोलतात, तर आदिवासी जमातीपैकी भिल्ल लोकांची बोली संस्कृत भाषा प्रवर्गात मोडणारी आहे. संस्कृत प्रवर्गातील बोलीभाषा बोलणारे भिल्ल ही महाराष्ट्रातील एकमेव आदिम जमात असावी.

डॉ. इरावती कर्वे यांच्याकडून लिहून घेतलेल्या "महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस पिपल" या गॅझेटिअरची पहिली आवृत्ती (१९६८) आणि विद्यमान ग्रंथ यात बरीच भिन्नता आहे. इरावती कर्वेंच्या लेखनातील बराच भाग विद्यमान ग्रंथात समाविष्ट आहे, हे खरे. तथापि त्यातील ब-याच मजकुरात बदलही करावे लागलेले आहेत. कालबाह्य झालेली माहिती अथवा चुकीचा ठरलेला मजकूर नवनवीन संशोधनातून उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे दुरूस्त करण्यात आलेला आहे. क्रिया-प्रक्रियांच्या संस्करणातून महाराष्ट्रात उदयास आलेली आधुनिकता व प्रबोधनाच्या प्रेरणांचा इतिहास या सुधारित आवृत्तीत समाविष्ठ केलेला आहे.

या ग्रंथाच्या अभ्यासकाला पुढील दोन गोष्टी प्रकर्षाने दिसून येतील. पहिले असे की, "कला व संस्कृती" हे नवीनच प्रकरण या ग्रंथात घेतलेले आहे. या प्रकरणात संस्कृतीकरणाच्या प्रातःकालापासून महाराष्ट्राने संस्कृति-संपर्काद्वारे संपादन केलेल्या विविध कला व त्यांचे संवर्धन यांच्यावर ऐतिहासिक दृष्टिकोणातून चर्चा केलेली आहे.

कला व संस्कृती याबाबतची चर्चा गॅझेटिअर ग्रंथामध्ये करण्याची संकल्पना तशी नवीनच आहे. या विषयाचे सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्व ओळखून त्यावर सखोल विचार केला. हा अत्यंत महत्त्वाचा विषय गॅझेटियरमध्ये समाविष्ट असावा हा माझा आग्रह. त्यातूनच या विषयावर ऐतिहासिक दृष्टिकोनातून मी लेखन केलेले आहे. " कला व संस्कृति " या प्रकरणात कला व संस्कृतीचे परस्पर संबंध किती निकटचे आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे. वस्तुतः संगीत व प्रयोगित कला या व्यतिरिक्त दृश्य कला व साहित्य यांचाही समावेश करण्याची कल्पना होती. तथापि साहित्य या विषयावर गॅझेटिअर कार्यालयाने " लँग्वेज ॲण्ड लिटरेचर इन महाराष्ट्र " हा ५०० पृष्ठांचा स्वतंत्र ग्रंथ प्रकाशित केलेला असल्या कारणाने त्याचा येथे परामर्श घेण्यात आलेला नाही. दृश्य कलांच्या क्षेत्रात महाराष्ट्राचा जो विविधतेने नटलेला सांस्कृतिक वारसा व्यक्त होतो,त्याचा आढावा घेण्याचाही मानस होता. तथापि तो परिपूर्ण करता आला नाही.

कला व संस्कृतीचे परस्पर संबंध यावर चर्चा करून महाराष्ट्रातील संगीताचा इ.स. च्या पहिल्या शतकापासून १९७५ पर्यन्तचा सुसंगत इतिहास देण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातील संगीताच्या इतिहासाचा प्रारंभ वेदकाळापासून झाला हे खरे. सुसंगत इतिहास मात्र सातवाहन आणि वाकाटककालीन **गाथासप्तशती** या महाराष्ट्री प्राकृत काव्यसंग्रहापासून लिहिणे शक्य झाले. हा ग्रंथ म्हणजे या भूमीतील संगीताचा ठोस पुरावा होय. त्यात तत्कालीन समाजात संगीत व रसिकत्व याला किती महत्त्वाचे स्थान होते यावर प्रकाश टाकलेला आहे. समकालीन वाद्य संगीत आणि कंठ संगीत याबाबतचा अजिंठा लेण्यामधील शिल्प आणि रंग चित्रावरून सुस्पष्ट पुरावे उपलब्ध झालेले आहेत. संगीत व नृत्य या कला त्या काळात किती प्रगल्भ झालेल्या होत्या याचे दर्शन अजिंठा आणि वेरुळवरून घडते. कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा याने लिहिलेल्या **अभिलषितार्थचिंतामणि** या ग्रंथात महाराट्रातील संगीताविषयीची माहिती दिलेली आहे. यादव सम्राटांनी संगीत आणि कलेला दिलेला राजाश्रय आणि महाराष्ट्रातील समकालीन संगीत यांचे या प्रकरणात विवेचन केलेले आहे. देवगिरीचा गोपाळ नायक आणि अमीर खुस्रो यांच्या गायकींमधून "खयाल" हा नवीन गानप्रकार उत्क्रांत झाला. नामदेवाच्या ब-याच रचना **गुरुग्रंथसाहेब** या पवित्र शीख धर्मग्रंथातही समाविष्ट असून, त्यातील ६१ रचना १६ रागांमध्ये गायिल्या जातात. आदिम धृपद गायकी महाराष्ट्रात आली याचेही विवेचन केलेले आहे.

मागील शतकाच्या अंतापासून बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आणि विष्णु दिगंबर पलुस्कर यांनी महाराष्ट्रात अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रचार केला, आद्यप्रवर्तन केले. पलुस्कर यांनी तर संगीताविषयी आस्था निर्माण करणे, संगीत लोकाभिमुख करणे, सामाजिक प्रतिष्ठा मिळविणे, कलाकारांचे चारित्र्य संवर्धन करणे आणि संगीताचे ज्ञान प्रदान करणे या विशाल ध्येयपुर्तीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचले. ग्वाल्हेर घराण्याच्या गायकी पाठोपाठ आग्रा घराण्याची गाणप्रणाली महाराष्ट्रात अवतरली. या दोन्ही गानप्रणाली महाराष्ट्रात पूर्णपणे प्रस्थापित झाल्यावर जयपूर आणि किराणा घराण्यांनी महाराष्ट्रात आगळे आणि विविधतेने नटलेले अभिजात संगीत रुजविले. उस्ताद अलादियाखॉं आणि उस्ताद अब्दुल करीमखॉं या लोकोत्तर कलाकारांनी येथील संगीत जगतात निर्माण केलेले पर्व याची चर्चा सदर प्रकरणात केलेली आहे. संगीत परप्रांतातून महाराष्ट्रात आलेले असले, तरी ही कला मोहरली, फुलली आणि विकसित झाली येथेच. याचा सुसंगत इतिहास देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी रंगभूमि आणि नाटय संगीत यांना भारतात तोड नाही. महाराष्ट्राने भारताच्या कलाजगतात घातलेली ही मोलाची भर होय. तद्वतच लोकसंगीत, लोकनृत्य व लोककला यांचाही इतिहास सदर प्रकरणात दिलेला आहे.

दुसरे असे की, इरावती कर्वे यांचे लेखन आणि विद्यमान ग्रंथातील प्रकरण २ मध्ये दिलेली "महाराष्ट्रातील लोक" यावरील मानववंशशास्त्रीय माहिती यात बरीच भिन्नता आहे. जातिजमार्तींवरील विवेचन बहुतांश नव्याने करण्यात आलेले आहे. एन्थोवेन, रसेल आणि हिरालाल तसेच सईद सिराज-उल हसन यांचे अभ्यास सखोल व महत्त्वाचे हे खरे, तत्पूर्वी ते कोणीही केलेले नव्हते हेही खरे. तथापि त्यांच्या माहितीत ब-याच त्रुटी राहिल्या असल्याचे जाणवले. यास्तव गॅझेटिअर कार्यालयाने समक्ष सर्वेक्षणाद्वारे विपुल माहिती प्राप्त केली. अशी सुधारित माहिती प्रामुख्याने परभणी (१९८८), कोल्हापूर (१९८९), वर्धा (१९९२), रायगड (१९९३) व जळगांव (१९९४), तसेच सातारा व नागपूर (अप्रकाशित), जिल्हा गॅझेटिअर ग्रंथाच्या मराठी आवृत्तीत समाविष्ट केलेली आहे. या माहितीचा विद्यमान ग्रंथाच्या प्रकरण २ मध्ये मुक्तपणे उपयोग करण्यात आलेला आहे. महत्त्वाची माहिती परिशिष्टांमध्येही दिलेली आहे. जाती-जमार्तींविषयी अलीकडील काळात बरेच वाद निर्माण झालेले आहेत. त्यात न शिरता वस्तुस्थितीवर आधारित संक्षिप्त माहिती देण्याचा प्रयत्न आहे. मात्र हा प्रयत्न परिपूर्ण तर नाहीच नाही. खरे तर अधिक संशोधन व सर्वेक्षण करणे आवश्यक वाटते.

हा ग्रंथ मराठी तसेच इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये प्रकाशित करण्यात येत असला, तरी त्यात भाषांतर अभिप्रेत नाही. या दोन्ही आवृत्ती एकाच वेळी प्रकाशित करण्याचा मानस होता. तथापि नवनविन माहिती उपलब्ध होत असल्याकारणाने आणि ती इंग्रजी आवृत्तीत समाविष्ट करणे उचित वाटल्याने अल्पावधीत प्रकाशित होऊ घातलेल्या इंग्रजी आवृत्तीत

थोडी अधिक माहिती देण्याचा मानस आहे.

या ग्रंथासाठी लेखन करणारे डॉ. त्रि. ना. वाळुंजकर, डॉ. सुधाताई काळदाते, डॉ. कि. का. चौधरी, डॉ. वर्षा शिरगावकर यांचे मनःपूर्वक आभार मानणे अगत्याचे होय. डॉ. चौधरींना अगदी शेवटच्या टप्प्यात कला, संगीत आणि मराठी रंगभूमी यावरील लेखनाची जबाबदारी पत्करावी लागली. अल्पावधीत त्यांनी हे काम पूर्ण केलेले आहे. डॉ. सुधाताईंनी या ग्रंथाच्या पहिल्या सात प्रकरणांची छाननी व दुरुस्ती करून मला उपकृत केले, याचा निर्देश करणे आवश्यक आहे, खाँसाहेब उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान यांनी महाराष्ट्रातील अनेक संगीतकारांची माहिती देवून मला उपकृत केले आहे. विद्यमान ग्रंथाच्या प्रकाशन प्रकियेमध्ये मला सहाय्य करणारे डॉ. अ. शं. पाठक, सहसंपादक; श्री. प्र.नि.नारखेडे, उपसंपादक; श्री. नि.रा.पाटील, संशोधन अधिकारी; तसेच सौ. मा.सु. मोदीखाने, सर्वश्री. के.झिं. राऊत, ध.जि. नावडकर,रा.र. हनवतकर, अं.रा.पवार व शा. का. मर्गज या सहाय्यक संशोधन अधिका-यांचे आभार मानतो. लघुलेखक, टंकलेखक व इतर कर्मचा-यांनी केलेल्या मदतीचाही उल्लेख करणे आवश्यक आहे.

या ग्रंथाची छपाई उत्तम व शीघ्र गतीने करण्यासाठी श्री. प्र.शं.मोरे, संचालक व श्री. प्र. ल. पुरकर, उपसंचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, तसेच श्री. प.ज.गोसावी, व्यवस्थापक व श्री. ज. शं. आयरे, सहायक व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपुर व मुद्रणालयाचा सर्व कर्मचारीवृंद तद्वतच कला सौंदर्यात भर घालणारे श्री. आनंदा जाधव यांच्या कामगिरीबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानणे आवश्यक आहे. तसेच या ग्रंथासाठी पारदर्शिका व छायाचित्रे उपलब्ध करून दिल्याबद्दल महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, पुरात्तत्व संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालक, तसेच श्री. कृष्णचंद्र मोरेश्वर तथा दाजी भाटवडेकर आणि श्री. भालचंद्र पेंढारकर यांचा ऋणनिर्देश करणे आवश्यक होय. मुद्रण शोधनाचे काम अगदी शेवटच्या टप्प्यात असतांना कल्याणी पुराणिक व त्यांचे बंधु श्री. सुरेश कपिलेश्वरी यांनी दुर्मिळ छायाचित्रे तर दिलीच, शिवाय संगीत संशोधनाबाबत साधनसामग्री उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचाही मी ऋणी आहे.

हा ग्रंथ समाजशास्त्र, इतिहास आणि कला या विषयांचा अभ्यास करणा-या संशोधकांना आणि अभ्यासू नागरिकांना उपयुक्त वाटेल अशी आशा बाळगतो.

मुंबई :
१५ जानेवारी, १९९६.

डॉ. कि. का. चौधरी,
कार्यकारी संपादक व सचिव

Maharashtra State Gazetteers

प्रकरण १ : महाराष्ट्राची भूमि

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि. ना.वाळुंजकर यांनी केले आहे.)

सापेक्ष भौगोलिक स्वरूप

भारतीय समाजाच्या जडणघडणीत भाषिक प्रदेशांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. सूक्ष्म पातळीवरील ग्राम अथवा खेडे आणि विशाल पातळीवरील राष्ट्रीय समाज या दोहोंच्या मधील मध्यम व्याप्तीचा सामाजिक व सांस्कृतिक घटक म्हणून "प्रदेश" हा घटक ओळखला जातो. प्रदेश ही केवळ भौगोलिक संकल्पना नसून त्यात भौत्तिक, सामाजिक व सांस्कृतिक घटक हे एकरूप झाल्याचे आपणास दिसते. प्रदेशाचा पाया भौगोलिक घटकांत असतो. या पायावर प्रादेशिक पातळीवर समाजजीवनाची इमारत उभी आहे व संस्कृती ही या इमारतीचा कळस होय. भारतीय समाज हा अशा प्रादेशिक समाजाचा मिळून झाला आहे. म्हणून भारतीय समाजाचे सम्यक ज्ञान होण्यासाठी त्याचे घटक, जे भाषिक प्रादेशिक समाज आहेत त्यांचे योग्य ज्ञान होणे आवश्यक आहे. या दृष्टिकोनातून येथे महाराष्ट्राचा विचार करण्यात येत आहे.

भारताच्या २४ भाषिक प्रदेशांमध्ये महाराष्ट्राचे स्थान भौगोलिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने महत्त्वाचे आहे. संस्कृतोद्‌भव भाषा बोलणारे भारताचे जे प्रदेश आहेत त्यात महाराष्ट्र हा दक्षिणेतील शेवटचा प्रदेश होय. भौगोलिक दृष्टया हा भूप्रदेश १६° ४०‘ व २२° १०‘ उत्तर अक्षांश आणि ७२° ०६‘ व ८०° ०९‘ पूर्व रेखांश यामध्ये सीमित झालेला आहे. याची ८२५ कि.मी. लांबीची पश्चिम सीमा अरबी समुद्राला भिडते, ७५० कि.मी लांबीची पूर्व सीमा मध्यप्रदेशाला भिडते, १,८७५ कि.मी लांबीची दक्षिण सीमा आन्ध्र प्रदेश व कर्नाटक या अनुक्रमे तेलुगु आणि कन्नड भाषिक प्रदेशांना मिळते आणि १,७२५ कि.मी. लांबीची उत्तर सीमा गुजरात आणि मध्य प्रदेश या अनुक्रमे गुजराती आणि हिंदी भाषिक राज्यांना भिडते. भौगोलिक दृष्टया भारताच्या नकाशात महाराष्ट्राचे स्थान उत्तर आणि दक्षिण भारत यांच्या मध्यभागी आहे. याच गोष्टीचा प्रभाव महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व सामाजिक जडणघडणीवर पडल्याचे दिसते.

Maharashtra State Gazetteers

भूशास्त्रज्ञ भारताची विभागणी पाच विभागात करतात. पहिला हिमालय पर्वताचा विभाग ; दुसरा विभाग गंगेचे खोरे आणि त्याभोवतालचा भाग; तिसरा विभाग हा पंजाब, अरवली, विंध्य व राजमहाल डोंगर यांचा डोंगराळ पट्‌टा; चौथा विभाग डेक्कन ट्रॅप जो महाराष्ट्राचा भूप्रदेश आहे व पाचवा विभाग हा प्राचीन दगडांचा भाग जो कर्नाटक-आन्ध्रपासून रामेश्वरपर्यन्त पसरलेला आहे.[१] भूशास्त्रीय दृष्टया निसर्गाने महाराष्ट्राला डेक्कन ट्रॅपच्या रूपाने स्वतंत्र व्यक्तिमत्व दिले आहे. हे नैसर्गिक व्यक्तिमत्व भूकंपातून बाहेर पडणाऱ्या बेसाल्ट लाव्हा रसाच्या थरांतून निर्माण झाले आहे. सुमारे ७० लक्ष वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील बऱ्याच प्रमाणात सपाट असणाऱ्या भूभागास भूकंपामुळे मोठमोठया भेगा पडल्या व त्यातून तप्त लाव्हा रस वाहून तो जवळ जवळ पाच लक्ष चौरस किलोमीटरच्या परिसरात पसरला. काही सहस्त्र वर्षांनंतर या रसाचा स्तर थंड झाला. त्यावर पुन्हा भूकंपामुळे लाव्हा रसाचा दुसरा स्तर पसरला. अशा तऱ्हेने स्तरांवर स्तर चढून महाराष्ट्राचा भूभाग तयार झाला. हा भूभाग दख्खन लाव्हा अथवा डेक्कन ट्रॅप या नावाने ओळखला जातो. या भूशास्त्रीय घटनेमुळे पायऱ्या पायऱ्याने चढत जाणाऱ्या पर्वतराई निर्माण झाल्या. या पर्वतराईना छेदून अनेक नद्या महाराष्ट्रात वाहू लागल्या. या घटनेतून कोकण आणि देश अशी महाराष्ट्राची नैसर्गिक विभागणी झाली व यातूनच महाराष्ट्राचे नैसर्गिक व सांस्कृतिक उप-प्रदेश निर्माण झालेत.

निरनिराळया नद्या, पर्वतराई, डोंगर, समुद्र इत्यादी नैसर्गिक गोष्टींमुळे महाराष्ट्राला इतर प्रदेशापासून वेगळे अस्तित्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे अंतर्गत नैसर्गिक व सांस्कृतिक उप-प्रदेशांची निर्मिती झाली आहे. उत्तरेस दमणगंगा नदीपासून दक्षिणेस तेरेखोल खाडीपर्यन्त पसरलेल्या अरबी समुद्राच्या किनारपट्‌टीने पश्चिम सीमा तयार झाली आहे. सर्वसाधारणपणे सातपुड्याच्या रांगांनी उत्तर सीमा तयार झाली आहे. अमरकंटकच्या डोंगरामधून पश्चिमेला अरबी समुद्राकडे वाहणाऱ्या नर्मदा नदीमुळे महाराष्ट्राला उत्तर हिन्दुस्थानापासून वेगळे भौगोलिक अस्तित्व प्राप्त झाले आहे. नर्मदेच्या काही मैलांच्या प्रवाहामुळे महाराष्ट्राची वायव्य सीमा तयार झाली आहे. महाराष्ट्राची दक्षिण सीमा ही खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची दक्षिण-पूर्व सीमा होय. गडचिरोलीपासून गोव्यापर्यन्त ही सीमारेषा निमुळती होत गेली आहे. मात्र

ही सीमा नैसर्गिक अडथळयाने तयार झाली नसून भाषिक व सांस्कृतिक भिन्नतेमुळे तयार झाली आहे. महाराष्ट्राच्या पूर्वेला बस्तरचे जंगल आहे. ते ओरिसा आणि आंध्रच्या सीमेला भिडलेले आहे. महाराष्ट्राची पूर्व सीमा सर्वात लहान आहे.

वरील भौगोलिक वर्णनावरून एक गोष्ट लक्षात येते की, पर्वतराई आणि मोठया नद्या यांनी बनलेली उत्तरेकडील सीमा ओलांडून उत्तर हिंदुस्थानातून महाराष्ट्रात येणे ही तशी अवघड गोष्ट होती. परंतु या पर्वतांनी व्यापलेल्या भागात बरेच घाट रस्ते उपलब्ध असल्याने त्या मार्गाने महाराष्ट्रात प्रवेश करणे शक्य होते. महाराष्ट्रात उत्तरेकडून येणारा मुख्य मार्ग हंडिआ येथे नर्मदा नदी पार करून येतो. महाराष्ट्रावर उत्तरेतून ऐतिहासिक काळात जी आक्रमणे झाली ती याच मार्गाने झाली. या मार्गाने सरळ खानदेशात येता येते. व यापुढे अजिंठा व पैठण म्हणजेच इतिहासकालीन प्रतिष्ठान येथपर्यन्त जाता येते. याच मार्गाने दळणवळण चालत असे. या मार्गाचे रूपांतर दिल्लीवरून मथुरा, ग्वाल्हेर, झाशी, खांडवा मार्गे जळगांवपर्यंत येणाऱ्या मध्य रेल्वेच्या मार्गात झाले आहे.

महाराष्ट्राचे उप-प्रदेश : ज्याप्रमाणे सागर, नद्या, पर्वतराई, डोंगर यांच्यामुळे महाराष्ट्राला भारताच्या इतर भाषिक प्रदेशांपासून स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले आहे, त्याचप्रमाणे विविध प्रकारची जमीन, हवामान व पर्जन्याचे भिन्न प्रमाण या नैसर्गिक बाबींमुळेही महाराष्ट्रात स्वतःचे भौगोलिक, सामाजिक व सांस्कृतीक व्यक्तिमत्व असणारे उप-प्रदेश निर्माण झाले आहेत. या उप-प्रदेशाच्या स्वरूपाचा मागोवा थोडक्यात खाली घेतला आहे.

दक्षिणोत्तर पसरलेल्या सह्याद्रीमुळे महाराष्ट्राचे कोकण आणि देश हे दोन प्रमुख नैसर्गिक विभाग झाले आहेत. सह्याद्री हा महाराष्ट्राचा कणा आहे. हा पर्वत समुद्र किनाऱ्यापासून सुमारे ४५ ते ९० कि.मी वर असून त्यामधील भूमीला कोकणपट्टी म्हणतात. तो भारताच्या पश्चिम किनाऱ्याला समांतर असल्याने नैऋत्य मान्सून वारे अडवले जातात. सहयाद्रीच्या पूर्वेस विस्तृत पसरलेल्या प्रदेशाचा जवळजवळ नऊ दशांश पठारी भाग देश म्हणून ओळखला जातो. या पठाराची उंची पश्चिम भागात ६०० मीटर असून पूर्वेकडील सीमा भागात त्याची उंची सुमारे ३०० मीटर आहे. पठारावर उगम पावनाऱ्या पूर्ववाहिनी नद्या व त्यांच्या मुख्य उपनद्यांनी खननक्रिया करून दऱ्या निर्माण केल्या आहेत. त्यांना मावळ म्हणतात. दुआब क्षेत्रात त्यामानाने झीज कमी झाल्याने व मूळ खडकांच्या क्षितिज समांतर संरचनेमुळे तेथे पठारी प्रदेश निर्माण झाला आहे. सह्याद्री व त्याच्याशी काटकोन करून पूर्वेकडे गेलेल्या रांगांनी दक्षिण पठाराचे संरक्षण केलेले आहे. देशावर असलेल्या डोंगर आणि नद्यांमुळे देशाचे उप-प्रदेशात विभाजन झाले आहे. अशा तऱ्हेने महाराष्ट्राचे पाच नैसर्गिक उप-प्रदेश दिसतात. ते पुढीलप्रमाणे आहेत :- कोकण, तापी-पूर्णा खोरे, वर्धा-वैनगंगा खोरे, गोदावरीचे खोरे आणि कृष्णेचे खोरे. या उप-प्रदेशाची ठळक वैशिष्टये खाली थोडक्यात दिली आहेत.

कोकण : अरबी समुद्र व सह्याद्री या दरम्यान असलेला उत्तरेकडील दमणपासून दक्षिणेला तेरेखोल खाडीपर्यंतचा किनारपटटीचा, अंदाजे ४५ ते ९० कि.मी. रुंद व ७२० कि.मी. लांब, उतरणीचा प्रदेश प्राचीन काळापासून अपरान्त अथवा कोकण या नावाने ओळखला जातो. कालांतराने सावित्री नदीच्या उत्तरेकडील भाग म्हणजे रत्नागिरी जिल्हयाच्या उत्तरेपासून सुरत जिल्ह्याच्या दक्षिणेपर्यंतचा भाग उतर कोकण व सावित्री नदीपासून कारवार जिल्ह्याचा दक्षिण भाग यामधील प्रदेश म्हणजे दक्षिण कोकण असे भाग पडले. या भागात प्रतिवर्षी सरासरी २,६०० मिलिमीटर पर्जन्यवृष्टी होते. उत्तर कोकणास अपरान्त (पश्चिमेकडील शेवटचे टोक) असे ऐतिहासिक नाव आहे. हा प्रदेश अशोकाच्या साम्राज्यात मोडला जात होता हे त्याच्या सोपारा येथील कोरीव लेखावरून सिध्द होते. प्राचीन ग्रंथात इ. स. पू. चौथ्या शतकापासून कोकणचा उल्लेख आढळतो. रोमन इतिहासकार टॉलेमी याने (इ. स.१५०) गुजरात व उत्तर कोकणास लारिका व दक्षिण कोकणास आरिका म्हटले आहे. परंतु कोकण हे नाव कसे पडले याविषयी अनेक मते आहेत. परशुरामाची माता कुंकणा यावरून कोकण नाव पडले असावे असे एक मत आहे. इ. स. पू. पाचव्या शतकापासून बाबीलोन, रोम इत्यादींशी चौल, महाड, कल्याण व सोपारा बंदरांतून व्यापार चालत होता. भारतात दारू, काच आणि विविध चैनींच्या वस्तूंची रोमन साम्राज्यातून आयात केली जात होती.

तापी-पूर्णा-खोरे : महाराष्ट्राचा दुसरा उप-प्रदेश तापी आणि पूर्णा या नद्यांनी तयार झालेला आहे. तापीच्या खोऱ्यातील प्रदेश खानदेश या नावाने ओळखला जातो तर पूर्णेच्या खोऱ्यातील प्रदेश वऱ्हाड म्हणून ओळखला जातो. काळया सुपीक जमीनीमुळे हा भाग कापसाकरिता प्रसिध्द आहे. उत्तरेतून दक्षिण भारतात जाणारा रस्ता या भागातूनच बऱ्हाणपूरवरून जातो. बहाळ व सावळदा संस्कृती तापी नदीच्या खोऱ्यात उदयाला आली. महाराष्ट्रातील स्थिर जीवनाची सुरुवात या संस्कृतीबरोबर जोडलेली आहे. उत्तर सिंधु संस्कृतीच्याही खुणा येथे दिसतात. व्यापार मंदावल्यामुळे सिंधु संस्कृतीच्याा लोकांना सौराष्ट्रातून शेजारच्याच तापी खोऱ्यात स्थलांतर करणे भाग पडले असावे. तापीच्या खोऱ्यातील काळी जमीन हे प्रमुख आकर्षण झाले असावे.

वर्धा-वैनगंगा खोरे : महाराष्ट्राचा तिसरा नैसर्गिक उप-प्रदेश म्हणजे वर्धा-वैनगंगेचे खोरे होय. जवळजवळ प्रत्येक बाबतीत हा प्रदेश उर्वरीत महाराष्ट्राहून वेगळा आहे. पवनार उत्खननातून प्राप्त झालेल्या माहितीनुसार या परिसरात इ. स. पू. १००० ते इ. स. पू.८०० पासून मानवी वसाहत असावी. हा भाग वर्धा नदीच्या पूर्वेस येतो आणि नागपूर प्रदेश

म्हणून ओळखला जातो. पश्चिमेला वर्धा, उत्तर आणि पूर्वेला सातपुडा डोंगर आणि जंगल तसेच दक्षिणेला आंध्रातील वनसंपदा असलेला भाग या नागपूर विभागाच्या नैसर्गिक सीमा होत. दख्खन ट्रॅप प्रकारचा अग्निजन्य खडक असून ग्रॅनाईट, नीस व शिस्ट या प्रकारच्या खडकांना सुरुवात होते. तुमसरपासून थेट खाली वैनगंगा-गोदावरीच्या संगमापर्यंत वैनगंगेच्या मुख्य खोऱ्याचा पट्टा सुपीक असल्याने तसेच उंच सखल प्रदेश, मानवनिर्मित अनेक तळी व तलाव, मोहाची आणि पळसाची झाडे ही या भागाची वैशिष्टये आहेत. खनिज संपत्तीचे मोठे साठे असलेल्या या भागात आदिवासींची वस्तीही बरीच आहे. या भागात पावसाचे प्रमाण देशापेक्षा अधिक म्हणजे सरासरी १०१६-१२७० मि.मी. आहे.

गोदावरीचे खोरे : हा महाराष्ट्राचा चौथा उप-प्रदेश. गोदावरीला महाराष्ट्राची गंगा मानली जाते. महाराष्ट्रातील नागरी संस्कृतीचा जन्म प्राचीन काळी याच भागात झाला. गोदावरी नदी नाशिकवरून नांदेड व पुढे आंध्र प्रदेशात वाहत जाते. पैठण हे तीर्थस्थान या नदीच्या काठी वसलेले आहे. नैसर्गिकदृष्टया या प्रदेशाचे दोन उप-विभाग दिसतात. पश्चिमेकडील डोंगराळ विभागात नाशिक जिल्हयाचा समावेश होतो तर पूर्वेकडील वैराण पठारी विभागात अहमदनगर, औरंगाबाद, जालना, परभणी, नांदेड या जिल्ह्यांचा समावेश होतो. प्राचीन काळातील अश्मक व मूलक प्रदेशाचा या विभागात समावेश होता.

कृष्णेचे खोरे : सातारा, कोल्हापूर आणि सांगली या भागातून वाहणाऱ्या कृष्णा नदीने घडविलेला हा सुपीक जमीनीचा पट्टा असून त्यात विविध समृध्द पिके आढळतात. त्याचप्रमाणे नीरा व भीमा या नद्या असलेल्या पुणे जिल्हयाचा आणि सोलापूर जिल्हयाच्या काही भागाचा समावेश या भागात होतो. प्राचीन काळी वुंतल या नावाने ओळखला जाणारा प्रदेश याच भागात येतो. येथील पंढरपूर तीर्थक्षेत्र फार पूर्वीपासून प्रसिध्द आहे.

महाराष्ट्रातील मानवी वसाहत

अतिप्राचीन काळी महाराष्ट्राचा भाग अरण्याने व्यापलेला होता व येथे मानवी वसाहत नव्हती असा समज शास्त्रज्ञांमध्ये अनेक वर्षे होता. दण्डकारण्य या नावाने प्राचीन काळी ओळखल्या जाणाऱ्या या प्रदेशातून उत्तर भारत व दक्षिण भारत यांना जोडणारा एक मार्ग जात होता. हे अरण्य तोडून रामायण व महाभारत कालानंतर येथे मानवी वसाहत झाली असे मानले जात असे. तथापि अलीकडे पुरातत्वशास्त्राने जी प्रगती केली आहे त्यामुळे वरील समज चुकीचा असल्याचे सिध्द झाले आहे.

यासंबंधात गेल्या अर्धशतकात पुणे येथील डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागातील ह. धी. सांकलिया, शां. भा. देव, म. के. ढवळीकर, व र. सू. पप्पू यांनी महाराष्ट्रात नाशिक, अकोला, पुणे, खानदेश, वर्धा इत्यादी ठिकाणी केलेली उत्खनने, सर्वेक्षण व संशोधनाद्वारे येथे अश्मयुगीन मानवाचे अस्तित्व होते असे सिध्द केले आहे.[२] दख्खनच्या सर्व पठारावर कोकणसह आदिमानवाने वस्ती केली असावी यात शंका नाही. तसेच अलीकडील काळात प्राचीन हवामानातील बदलांचा क्रम निश्चित करण्याचे आणि त्यांची मानवी संस्कृतीच्या विविध टप्प्यांशी सांगड घालण्याचेही प्रयत्न झाले आहेत. महाराष्ट्रातील अतिप्राचीन मानवी वसाहतीचे नवीन संशोधनानुसार अश्मयुग, ताम्रपाषाणयुग व लोहयुग हे तीन प्रमुख कालखंड पाडता येतात.

अश्मयुगीन महाराष्ट्र : महाराष्ट्रातील अश्मयुगाचे (१) पुराश्मयुग [आद्य पुराश्मयुग (*Lower Palaeolithic period*) इ.स.पू. तीन लाख ते एक लाख वर्षे; मध्य पुराश्मयुग (*Middle Palaeolithic period*) इ.स.पू. एक लाख ते ३० हजार वर्षे; आणि उत्तर पुराश्मयुग (*Upper Palaeolithic period*) इ.स.पू. ३० हजार ते १० हजार वर्षे](२) मध्याश्मयुग (*Mesolithic period*) इ.स.पू. १० हजार ते चार हजार वर्षे आणि (३) ताम्रपाषाणयुग (*Chalcolithic Period*) इ.स.पू. चार हजार ते दोन हजार सातशे वर्षे असे उप-कालखंड पाडण्यात आलेले आहेत. महाराष्ट्रात नवाश्मयुगाचे (*Neolithic Period*) अवशेष ताम्रपाषाण संस्कृतीच्या बरोबर संमिश्र स्वरूपात आढळतात.

गोदावरी, प्रवरा, मूळा-मुठा, कृष्णा, भीमा, तापी, मांजरा, घोड, कुकडी, वैनगंगा, पैनगंगा, पूर्णा, वर्धा या नद्यांच्या खोऱ्यात केलेल्या सर्वेक्षणातून तसेच गोदावरीच्या काठी नांदूर-मधमेश्वर, पैठणजवळील मुंगी, नाशिकजवळील गंगापूर, नेवासे, जळगावमधील पाटणे, रायगडमधील धारापुरी व पाचाड, रत्नागिरीमधील हातखंबा व वर्धा जिल्ह्यातील पापामिया येथील उत्खननातून सापडलेली हत्यारे, प्राण्यांचे सांगाडे यावरून या संस्कृतीची माहिती मिळते. मानवाने वापरलेल्या हत्यारावरून त्या त्या समाजाच्या गरजा, तंत्रज्ञान व आर्थिक स्थिती कळून येते.

साधारणपणे इ. स. पू. दोन ते तीन लाख वर्षांपूर्वी प्राचीन मानव नद्यांच्या खोऱ्यातून भटक्या अवस्थेत, वीस ते तीस

जणांच्या टोळया करून जीवन जगत होता. शिकार व रानातील फळे, कंदमुळे गोळा करणे, हे त्याच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. त्यासाठी नद्यांच्या काठावर उदंड विखुरलेल्या गोटयापासून तो दगडी हत्यारे तयार करीत असे.

आद्य पुराश्मयुगातील हत्यारे सुरवातीच्या काळी लाव्हा रसापासून निर्माण झालेल्या थरातील दगड काढून बनविलेली दिसतात. या हत्यारांमध्ये विविध आकाराच्या कुऱ्हाडींचा उपयोग तोडण्यासाठी व कंदमुळे उकरण्यासाठी करीत. फरशीसारखी हत्यारे जनावरांची कातडी खरडून साफ करण्यात वापरत. कदाचित तासून टोकदार केलेल्या लाकडी काठया त्यांनी शिकारीसाठी वापरल्या असाव्यात. या कालखंडात रानबैल, सरळसोट लांब दात असलेले रानहत्ती, गेंडा (ऱ्हिनोसेरॉस), पाणघोडे, गवे इत्यादी वन्य प्राणी या काळात राहणाऱ्या मानवाच्या परिसरात वावरत असावेत. या प्राण्यांच्या अश्मास्थी नेवासे व गोदावरीची उपनदी मांजरा हिच्या काठावर वसलेल्या धनेगांव उस्मानाबाद जिल्हा येथे सापडल्या. या काळातील मानव शिकार करून आपली उपजिविका करीत असावा असे तो वापरत असलेल्या हत्याऱ्यांच्या स्वरूपावरून म्हणता येईल. चीरकी-नेवासे, भडणे व बोरी येथील हत्याऱ्यांच्या अवशेषावरून असे दिसते की, त्यांची कारागिरी निकृष्ट प्रतीची (*Lower Acheulian*) होती. ओबडधोबड सोहन हत्याराचे हळूहळू फरशी व हात कुऱ्हाडीत रुपांतर झाले. छिलके काढण्यासाठी दगडावर दगड आपटून छिलके काढण्याऐवजी लाकडी घणाचा (*Cylinder hammer*) वापर सुरू झाला. गंगापूर येथील अवशेषात उत्तम प्रतीच्या (*Upper Acheulian*) तंत्राचा वापर केलेला दिसतो. यासाठी त्यांनी बेसाल्ट दगडापैकी डोलराईट या कठीण दगडाचा उपयोग केला असावा.

त्यानंतरच्या कालखंडात म्हणजे मध्य पुराश्मयुगात (*Middle Palaeolithic period*) साधारण इ.स.पू. एक लाख वर्षांपूर्वी भिंतीच्या दगडाऐवजी गारगोटींच्या हत्याऱ्यांच्या निर्मितीसाठी वापर होऊ लागल्याचे दिसते. मालवण, वेंगुर्ला व कोल्हापूरमधील आजरे येथे गारगोटी व कलदगी (*Kaladgi*) चा वापर केलेला आढळतो. गारगोटींची हत्यारे तासण्या, पाती, टोच्या अशा तीन प्रकारात दिसतात. दगडी हत्याराचा आकार लहान झाला. ती बनविण्याचे वेगळे तंत्र अवलंबिण्यात आले. छिलके दाबतंत्राने काढण्याचे कसब मानव शिकला. त्याचप्रमाणे मानवाने तासणी (*Scrapers*) व अणी (*Points*) यासारखी हत्यारे घडविण्यास सुरुवात केली. ही हत्यारे चर्ट, जास्पर यासारख्या अत्यंत कठीण दगडांपासून बनवित.

या हत्यारांहून छोटी हत्यारे साधारणपणे इ.स.पू. ३०००० ते १०००० वर्षांपूर्वी उत्तर पुराश्मयुगात (*Upper Palaeolithic Period*) उपयोगात आलीत. यात गारगोटींच्या छिलक्यांपासून बनविलेली छोटी-छोटी पाती,टोचा हे हाड, लाकूड किंवा सांबराच्या शिंगामध्ये बसवून खरवडणे, भोक पाडणे या स्वरूपाच्या कामासाठी वापरली जात असावीत. चाळीसगावजवळील पाटणे येथे अशा प्रकारच्या हत्यारांचे सर्वच प्रकार मिळाले आहेत. साधारणपणे याच काळात मासेमारी करण्यास सुरुवात झाली.

महाराष्ट्रातील मध्यास्मयुग (*Middle Palaeolithic period*) ताम्रपाषाणयुग (*Chalcolithic period*) या संबंधीचे अंदाज गुजरातमधील मध्याश्मयुगीन संस्कृतीच्या व आन्ध्रप्रदेशाच्या नवाश्मयुगीन संस्कृतीच्या आधारे केलेले आहेत. अंदाजे इ.स.पू. १०००० ते इ.स.पू. ४००० वर्षांपूर्वी मध्याश्मयुग होवून गेले असे मानतात. या भूभागावरील घनदाड झाडीच्या आवरणामुळे महाराष्ट्रात काळी माती तयार झाली. वनस्पती व प्राणी या दोहोंच्या समृध्दीमुळे या काळातील मानवी जीवन पूर्वीपेक्षा सुखकर बनले. यामुळे लोकसंख्येत वाढ झाली. पाटणे, पाचाड, हातखंबा व इनामगाव येथील संशोधनावरून व बहुसंख्येने आढळणाऱ्या मध्याश्मयुगीन मानवी वस्तीच्या स्थानांवरून त्याला पुष्टी मिळते. या काळात हत्यारे लहान पण भौमितिक आकाराची झाली. त्यावरून त्यांच्या गरजांचे स्वरूप बदललेले दिसते. गारेच्या दगडापासून बनविलेली पाती इतस्ततः विखुरलेली आढळतात. कदाचित या काळात मानव निसर्गतः उगवणारे धान्य गोळा करीत असावा. त्यामुळे मानवी जीवनात ऋतुमानाच्या संदर्भात थोडीफार स्थिरता लाभली असावी. व त्यामुळे शेतीचा शोध लागला. तो लहान प्राण्यांची शिकार करीत असे व त्यासाठी पाळीव कुत्र्याची मदत घेई.

नवाश्मयुग हे अश्मयुगीन संस्कृतीचा शेवटचा टप्पा व मानवी संस्कृतीच्या इतिहासातील क्रांतीकारी पर्व मानले जाते. महाराष्ट्रात मात्र नवाश्मयुगीन अवशेष ताम्रपाषाणयुगीन कालखंडामध्ये सापडतात. या काळात मानव स्थिर जीवन जगू लागला. पाळीव प्राणी, भाजलेली मातीची भांडी, चाकाचा उपयोग आणि प्राथमिक स्वरूपाची शेती, घरे बांधून राहणे, चित्रकला व सुखकर जीवन ही ताम्रपाषाणयुगाची सांस्कृतिक विशेषता आहे. ताम्रपाषाणयुग हे इ. स. पू. ४००० ते इ. स. पू. २७०० च्या सुमारास आले असे तज्ञांनी प्रतिपादन केले आहे. महाराष्ट्रात शेतीद्वारा अन्नधान्याचे उत्पादन करण्यास साधारणतः चार हजार वर्षापूर्वी सुरुवात झाली असावी असे तापीच्या खोऱ्यातील धुळे (जिल्हा) पुराव्यावरून म्हणता येईल. महाराष्ट्रातील अश्मयुगाची अखेर ही प्रामुख्याने हवामानातील बदलामुळे झाली असावी, असे तज्ञांचे मत आहे.

ताम्रपाषाणयुगीन महाराष्ट्र : अश्मयुगाच्याऱ्हासानंतर महाराष्ट्रात ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीस सुरुवात झाली. या

काळातील मानव प्रथमच तांब्याचा वापर करू लागला. पाषाण व तांबे या दोन्हीपासून बनविलेली हत्यारे व तांब्याचे दागिने लोकांच्या वापरात आले. मात्र तांबे दुर्मिळ असल्याने त्याचा वापर जपूनच केला जाई. या संस्कृतीचा विकास महाराष्ट्रात इ. स. पू.२५०० ते इ. स. पू. १२०० या कालखंडात झाला असावा. अहमदनगर जिल्हयातील जोर्वे, नेवासे, व दायमाबाद, नाशिक, प्रकाश (धुळे जिल्हा,) बहाळ व टेकवाडे (जळगाव जिल्हा), सावळदा, चांदोरी (पुणे जिल्हा) सोनगाव व इनामगाव येथे जी उत्खनने झाली त्यावरून महाराष्ट्रातील या संस्कृतीवर खूप प्रकाश पडला आहे.

महाराष्ट्रातील या संस्कृतीच्या जडणघडणीत हडाप्पा संस्कृतीच्या लोकांचा, उत्तरेतील माळवा संस्कृतीचा तसेच दक्षिणेतील नवाश्मयुगीन संस्कृतीचा मिलाप झाला असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील ताम्रपाषाणयुगीन संस्कृती ही वर निर्देश केलेल्या तीन संस्कृतींच्या प्रवाहांची सरमिसळ नसून तिला स्वतंत्र व्यक्तिमत्व प्राप्त झाले आहे. महाराष्ट्रात ती साधारणपणे इ.स.पू. २५०० च्या सुमारास उदयास आली. अहमदनगर जिल्हयातील जोर्वे गावानजीक ही संस्कृती (इ.स.पू.१५००-९००) प्रथम उजेडात आली, म्हणून ती "जोर्वे" या नावाने ओळखली जाते[३]. त्यापूर्वी महाराष्ट्रात सावळदा (इ. स. पू. २५००-२२००), सिंधु (इ. स. पू. २२००-१९००), माळवा (इ. स. पू. १८००-१४००) इ. संस्कृती नांदल्या. या संस्कृतीच्या लोकांना महाराष्ट्रातील आद्य कृषीवल मानले जाते[४]. कोकणचा सागर किनारा व विदर्भातील काही प्रदेश सोडल्यास जोर्वे संस्कृतीच्या लोकांनी महाराष्ट्राभर आपल्या वसाहती स्थापन केल्याचे मानले जाते. शेती, पशुपालन, शिकार व मासेमारी यावर अवलंबून असलेली मिश्र अशी त्यांची अर्थव्यवस्था होती. पूर्वीच्या संस्कृतीप्रमाणे या संस्कृतीचे लोक स्वतःची विशेषतापूर्ण रंगीत भांडी, गारांची हत्यारे, तांब्याचे दागिने व हत्यारे वापरत असत.

या संस्कृतीतील लोक प्रामुख्याने शेती करीत होते. आजही काही आदिवासी जमातींमध्ये प्रचलित असलेल्या "झूम" या पध्दतीची ते शेती करीत. झाडेझुडूपे जाळून जमीन शेतीसाठी योग्य बनविली जात असे. सुरुवातीच्या कालखंडात जमिनीची नांगरट करण्याची पध्दती नव्हती कारण नांगर अस्तित्वात नव्हता, जमीनीत नैसर्गिक रीतीने पडलेल्या मोठया भेगांचा फायदा घेवून धान्य पेरले जात असे. नंतरच्या काळात लोहाचा शोध लागल्यावर कुदळीसारख्या साधनांचा जमीन खोदण्यासाठी लोक उपयोग करू लागले. या कालखंडातील लोक बार्ली, गहू, ज्वारी, तांदूळ आणि कडधान्याची पिके घेत. मानव मांसाहारी व मत्स्याहारी होता. अर्थात शेती पावसावर अवलंबून होती. मात्र इनामगावच्या उत्खननावरून दिसून येते की, या काळातील लोकांना जलसिंचनाच्या सोयी अल्प प्रमाणात का होईना पण उपलब्ध होत्या. कालव्याद्वारे पाणीपुरवठयाची सोय केलेली असल्यामुळे ते वर्षातून दोनदा पिके घेत.

शेतीखेरीज पशुपालन, मच्छीमारी आणि शिकार हेही व्यवसाय लोक करीत असत. शेळया, मेंढया, म्हशी, डुकरे हे प्राणी ते पाळीत असत. या काळामध्ये हत्ती, गेंडा, हरीण, नीलगाय, रानरेडे, चितळ, सांबर हे वन्य प्राणी होते.

जोर्वे संस्कृतीचे लोक मोठया चौकोनी आकाराच्या घरात राहत. घराच्या भिंती मातीच्या अथवा कुडाच्या असत व छप्पर गवताने शाकारलेले असे. चौकोनी घराखेरीज गोल आकाराची घरेही बांधत व त्यांचे छप्पर वासुदेवाच्या टोपीच्या आकाराचे निमुळते असे. लोक लहान खेड्यात राहत आणि प्रत्येक खेड्याची लोकसंख्या दोनशे ते सहाशेच्या दरम्यान असे[५].

काही गावाभोवतीच्या तटबंदीचे अवशेष आढळून आले आहेत. विशेष म्हणजे धान्याचे सार्वजनिक कोठारही आढळले आहे. दुष्काळात उपयोगी यावे म्हणून या कोठारात धान्य साठविले जाई. बहुधा हे धान्य लोकांकडून कर या स्वरूपात गोळा केलेले असावे. जोर्वे काळात महाराष्ट्राची भरभराट झाल्याची दिसते. शेतीमुळे लोकांचे जीवन समृध्द झाले होते. किंबहुना त्यामुळेच या काळातील वसाहतींना तटबंदीची जरूरी भासली असावी. इनामगाव येथील वसाहतीच्या भोवती भक्कम तटबंदी व खंदक होता. तसेच काही मातीच्या मूर्ती आणि दफनेही सापडली. या अवशेषांवरून तत्कालीन, सामाजिक आणि राजकीय जीवनाविषयी काही महत्त्वाचे अनुमान काढणे शक्य झाले आहे. काही खेड्यांचा मिळून झालेला प्रादेशिक गट असावा व त्यावर नियंत्रण ठेवणारा प्रमुख असावा. या वसाहतींचे नियंत्रण करणाऱ्या प्रमुख व्यक्ती इ.स.पू.१२०० च्या पुढे उदयास आल्यात. संरक्षणासाठी तटबंदी उभारणे, पाणीपुरवठा आणि सार्वजनिक कामाची त्यांच्यावर जबाबदारी असे. समाजजीवनात थोडया फार प्रमाणात स्तरीकरण असावे. कुटुंबसंस्था अस्तित्वात असून कुटुंबाचा आकार मोठा असावा. त्याचप्रमाणे बहुपत्नीत्वाची प्रथा मर्यादित प्रमाणात अस्तित्वात असावी[६].

चाकावर बनविलेली टणक, विटकरी अथवा तांबूस रंगाची आणि चांगली भाजलेली मातीची भांडी लोकांच्या वापरात होती. तांबडया भांडयावर काळया रंगाच्या विविध आकृत्या काढीत असत. त्यात गोल वाडगे, झाकण्या, रांजण, तोटीची भांडी, लहान बोळकी, माठ, उंच मानेच्या कळशा इत्यादी वस्तू अंतर्भूत होत्या. घरामध्ये कणग्या व बळदमधून धान्य साठवित. घरात हल्लीसारख्या चुलींवर अन्न शिजवित. घराबाहेरील अंगणात मोठा खड्डा करून त्यामध्ये जनावरांचे

मांस भाजीत.

महिलांच्या वापरात अकीक, गोमेद दगडाचे विविध मणी, मातीचे कंगवे व तांब्याची कडी होती. जोर्वे काळात सोने दुर्मिळ असले तरी त्याचा पूर्ण अभाव नव्हता. दायमाबाद येथे मिळालेली सोन्याची कर्णभूषणे व इनामगाव येथे मिळालेल्या मुशी व तांब्याच्या चिमट्यावरून दिसते की, तेव्हा सोनार असावेत.

या काळात वस्तू विनिमय पध्दती अस्तित्वात असावी असे अनुमान उत्खननात सापडलेल्या परंतु स्थानिक नसलेल्या वस्तूंवरून करता येते. या काळात वस्तू विनिमयाची वेंद्रे निर्माण झाली होती. मातीची भांडी व तांबे हा धातू विनिमयासाठी वापरीत असावा. धार्मिक जीवनात मातृका देवतेच्या पूजेला विशेष स्थान असावे असे उत्खननात सापडलेल्या मातीच्या स्त्री मूर्तीवरून दिसते. मात्र स्त्री मूर्तीच्या तुलनेत पुरुष मूर्ती कमी सापडल्या. ही मातृदेवता सुफलनाच्या संकल्पनेशी निगडित असावी. तसेच एक शिरोहीन देवता होती. तिचा संबंध कदाचित संततीच्या कल्याणाशी असावा. 'देवतेचे' वाहन ही कल्पनाही त्या काळात अस्तित्वात असावी. बैल आणि कासव यांना पवित्र मानत असावेत. तसेच अग्निपूजा प्रचलित असावी. मानवाचा पुनर्जन्मावर विश्वास असावा, असे उत्खननात सापडलेल्या मृतदेहांना पुरण्याच्या विशेषतापूर्ण पध्दतीवरून दिसते. मृतास स्वतःच्या घरातच जमिनीखाली पुरत. दफनविधी पूर्ण होण्याअगोदर मृत व्यक्तीची पावले घोटयापासून तोडली जात. कदाचित मृत व्यक्ती पळून जावून त्याचे भूत बनू नये ही यामागील अंधश्रध्दा असावी. लहान मुलांना दोन माठांमध्ये घालून ठेवून घरात जमिनीखाली पुरत असत. कलेवराबरोबर मृत व्यक्तीचे दागिने तसेच अन्न व पाणी भरलेली दोन मातीची लहान भांडी ठेवत असत.

महाराष्ट्रातील ही ताम्रपाषाणयुगीन संस्कृती दुष्काळामुळे इ.स.पू. १२०० च्या सुमारास लोप पावली. तसेच या संस्कृतीतील काही लोकांनी दुष्काळ व इतर कारणांसाठी इतर प्रदेशात स्थलांतर केले असावे. उत्तर जोर्वे संस्कृती काळात हवामानात विलक्षण बदल होऊन ते अधिकाधिक कोरडे व शुष्क झाले. केवळ यामुळेच तापी आणि गोदावरीच्या खोऱ्यातील आद्य वसाहती उजाड झाल्या. परंतु भीमेच्या खोऱ्यात हे लोक तग धरून राहिले. तेथे सापडलेल्या अवशेषावरून त्यांना निकृष्ट प्रतीचे जीवन जगावे लागले असावे. इनामगाव येथे ख्रिस्तपूर्व ९०० पर्यन्त लोक कसेबसे तग धरून होते. त्यांनी शेळयामेंढ्यांचे कळप घेवून भटके जीवन स्वीकारले. थोड्याच अवधीनंतर दक्षिणेकडून महाराष्ट्रात स्थलांतर केलेल्या महापाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांनी आधीच दुर्बल झालेल्या ताम्रपाषाणयुगीन स्थानिक भटक्या लोकांची उरली सुरली पाळेमुळे उखडून टाकली असावीत. त्याबरोबर ताम्रपाषाणयुगीन संस्कृती कायमची नामशेष झाली. त्याचे कारण महापाषाणयुगीन संस्कृतीच्या लोकांजवळ असलेली उत्तम प्रतीची लोखंडी हत्यारे, चपळ घोडे, व घोडेस्वार होय. ताम्रपाषाण युगानंतर पाच सहा शतके या भागात मानवी वसाहत नव्हती. हवामान अनुकूल झाल्यावर हा भाग पुन्हा घनदाट जंगलाने व्यापला गेला. यानंतर येथे लोहयुगीन संस्कृतीचा उगम झाला.

महापाषाणयुगीन महाराष्ट्र : दक्षिण भारतात महापाषाणीय स्मारके बहुधा लोहयुगीन संस्कृतीशी निगडित असून खिस्तपूर्व पहिल्या सहस्त्रकातील आहेत. महापाषाणयुगीन लोक दफनस्थळाच्या भोवती मोठमोठे दगड गोलाकार ठेवीत. म्हणूनच त्यांना महापाषाणयुगीन असे संबोधिले जाते. ही महापाषाणयुगीन संस्कृती महाराष्ट्रात साधारणपणे इ.स.पू. १०००-५०० या काळात नांदत होती. या स्मारकांचे संशोधन कार्य इ. स. १८२३ मध्ये सुरू झाले. महाराष्ट्रात फक्त विदर्भात, विशेषतः नागपूरजवळ, त्यांच्या अस्तित्वाच्या खूणा अधिक मिळतात. एकट्या खैरवाडे (जि.वर्धा) येथे १,४९६ स्मारकांची नोंद झाली आहे. तर इनामगांव उत्खननात या संस्कृतीची विशेषता मानली जाणारी काळी आणि तांबडी मृदभांडी मिळाली. हे महापाषाणीय लोक निम-भटके जीवन जगत असावेत. पावसाळयात ते आयताकृती किंवा गोल आकाराच्या घरातून राहत. उदरनिर्वाहासाठी ते पशुपालनावर अवलंबून होते. अन्नासाठी ते शिकार करीत आणि आवश्यकतेनुसार पाळीव प्राणी मारत व थोड्या प्रमाणात शेती करत.

इ. स. पहिल्या ते तिसऱ्या शतकातील हा मानव वसाहत करून राहू लागला. त्याची बरीचशी हत्यारे लोखंडाचीच असत. नैवुंड[७] येथे केलेल्या चाचणीनुसार लोखंडी धातूच्या शास्त्रीय विश्लेषणावरून व सापडलेल्या भट्ट्यांवरून महापाषाणीय लोक कुशल लोहार होते असे दिसते. ते भट्टीच्या एका आवर्तनात १० ते १२ किलोग्रॅम खनिज गाळून त्यापासून तीन किलोग्रॅम शुध्द लोखंड प्राप्त करून घेत असत. तांब्याचा उपयोग हत्यारापेक्षा अलंकारासाठीच अधिक होता. मृतदेहाला ते दागदागिन्यांनी श्रृंगारत असत. इतकेच नव्हे तर त्या व्यक्तीच्या घोड्यालाही सजवून बरोबर पुरत असत. याखेरीज बरीचशी लोखंडी अवजारे व हत्यारेही पुरण्यात येत. खापा व माहुरझरी येथील शिलावर्तुळांमधून प्राप्त झालेले घोडयाचे अलंकार अद्वितीय असून तसे अलंकार संपूर्ण भारतीय उपखंडात इतरत्र कोठेच मिळाले नाहीत. नखे कापण्याचे उपकरण, फणी, आरसा, इत्यादी वस्तू महापाषाणीय थडग्यांच्या उत्खननात मिळाल्या. महापाषाणीय स्मारके उभारणारे मूळचे लोक द्रविड भाषा बोलणारे होते.

लोहयुगीन महाराष्ट्र : ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीच्या ऱ्हासानंतर इ. स. पूर्व सातव्या-आठव्या शतकात लोखंड तयार करण्याचे तंत्रज्ञान जाणणाऱ्या लोकांनी महाराष्ट्रात वसाहत केली.[८] यात मुख्य बदल म्हणजे लोखंडाची हत्यारे वापरात

आली. हा मानव (महापाषाणीय) बहुधा दक्षिण भारतातून विदर्भात आला असावा. तथापि आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे उत्कृष्ट तंत्रज्ञ व धातुविद्येत कुशल असणाऱ्या या लोकांच्या स्थायी वसाहती सापडत नाहीत. बहुतेक ते भटक्या वृत्तीचे असल्यामुळे त्यांच्या वसाहतीचे अवशेष मिळाले नसावेत. मृतदेहाबरोबर पुरलेल्या अनेक वस्तूंवरून त्यांच्या संस्कृतीची कल्पना येते. या संस्कृतीच्या लोकांची मृतांना पुरण्याची खास पध्दत म्हणजे सुमारे १८ मीटर व्यासाच्या वर्तुळाच्या मध्यभागी मृत व्यक्तीला पुरत असत. ती व्यक्ती वापरत असलेला घोडा, दागिने व त्याच्या वापरातील इतर वस्तूही त्याच्याबरोबर पुरत असत. या वर्तुळाच्या परिघावर मोठाले दगड उभे केले जात याचा उल्लेख वर आलाच आहे. अशा तऱ्हेची वर्तुळे महाराष्ट्रासारख्या पूर्व भागात म्हणजे विदर्भात आढळतात. महाराष्ट्राच्या इतर भागात अशा वर्तुळाचा अभाव दिसतो. विदर्भातील टाकळघाट, माहुरझरी, खापा, नैवुंग्ड, भागीमाहारी, खैरवाडे येथे सापडलेल्या अशा वर्तुळांचे उत्खनन झालेले आहे. माहुरझरी येथे मृत व्यक्तीच्या शरीरावर व खड्ड्याच्या आसपास हेतुपुरस्सर लाल माती पसरलेली आढळली. उत्खननात सापडलेल्या सांगाड्यांवरून या संस्कृतीतील मानवाची उंची ५ फूट २ इंच ते ५ फूट ६ इंच असावी. तथापि माहुरझरीला सापडलेल्या २१ सांगाड्यांच्या आधारावरून काढलेल्या निष्कर्शाच्या मर्यादा आहेत. कारण हे सांगाडे सुस्थितीत नाहीत. इतके मात्र खरे की, तेथील मानवास लोहाच्या तंत्रज्ञानाप्रमाणे तांब्याचेही तंत्रज्ञान अवगत असावे. माहुरझरी येथे मिळालेल्या खंजीराची मूठ तांब्याची व पाते लोखंडाचे असल्याने हे सिध्द होते.

नागर संस्कृतीचा प्रारंभ

इ. स. पूर्व सातव्या-आठव्या शतकांपासून इ.स. पहिल्या-दुसऱ्या शतकांपर्यंत महाराष्ट्रातील मानवाच्या इतिहासात सातत्य व नेमकेपणा दिसून येत नाही. इ.स. पहिल्या ते तिसऱ्या शतकापर्यन्तच्या काळात हा मानव वसाहत करू लागला. लोहयुगीन संस्कृती परिपक्व झाली व भविष्यातील नागर संस्कृतीच्या पाऊलखुणा दिसू लागल्या. नैवुंग्ड येथे डेक्कन कॉलेज व राज्य पुरातत्त्व विभागाने केलेल्या उत्खननात तेथे लोखंड शुध्द करण्याच्या भट्टीचा पुरावा मिळाला आहे. याचा काळ इ.स.पू. सातवे शतक असून भारतात लोखंड गाळण्याचा हाच पहिला प्रत्यक्ष पुरावा आहे. लोखंडी छिन्नीसारख्या उपकरणाच्या सहाय्याने कोरलेल्या कान्हेरी, कुडा, कोल, पाले, ठाणाळे येथील बौध्द लेण्या लोहयुगीन कारागिरी व तत्कालीन पाथरवटांच्या कौशल्याची साक्ष देतात. या काळापर्यन्त कारागिरांची भटकी वृत्ती नाहिसी होवून ते वसाहती करून राहू लागले. महाराष्ट्राच्या काळया जमिनीत यशस्वी लागवड करणे केवळ लोखंडी नागरामुळे शक्य झाले. शेतीचे वाढते उत्पादन, लोखंडाचा अधिकाधिक उपयोग व प्रसाराबरोबरच भाजलेल्या विटांची घरे, खिळे ठोकून बसविलेली छपरे, व त्यावरील कौले, पाटा-वरवंटा व दळणाचे जाते, तटबंदीची शहरे, दर्यावर्दी व्यापार व बंदरे, नाण्यांचा वापर, लेखनकला व कारागिरांचे संघही या काळास उदयास आले. या सर्वांचा परिणाम म्हणून आसपासच्या प्रदेशाबरोबर दळणवळण सुरू झाले.

तत्कालीन संस्कृती ही मुख्यत्वे धातूंचे कसब जाणणाऱ्या लोकांची संस्कृती होती. नंदाच्या राजवटीत महाराष्ट्रात कशी परिस्थिती होती याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. मात्र महाराष्ट्राचा काही भाग अशोकाच्या (इ. स. पू. २७२-२३६) साम्राज्यात मोडला जात होता हे सोपारा येथील प्रस्तर लेखावरून कळून येते. बौध्दधर्माचा प्रचार करण्यासाठी अशोकाने धर्ममहामात्र नामक धर्मप्रसारकास अपरान्त म्हणजे उत्तर कोकणमध्ये पाठविले होते. त्याचप्रमाणे धम्मरख्खित (महाधर्मरक्षित) या दुसऱ्या धर्मप्रसारकास महाराष्ट्रात पाठविल्याचे अशोककालीन ऐतिहासिक पुराव्यावरून दिसते. पाश्चात्य जगाबरोबर व्यापारासाठी असलेले सोपारा हे फार महत्त्वाचे शहर असावे. कदाचित म्हणूनच अशोकाने त्याचा प्रस्तर लेख तेथे उभारला. चद्रंगुप्त मौर्य (इ. स. पू.३२३ ते ३००) हा जैनांच्या परम्परेप्रमाणे महाराष्ट्रातून कर्नाटक राज्यातील श्रवणबेळगोळ येथे गेला होता.

मौर्यांच्या राजकीय धोरणामुळे महाराष्ट्रात बौध्दधर्म प्रसाराबरोबरच व्यापारातही वृध्दी झाल्याचे दिसते. सोपारा, कल्याण, ठाणे, चोल, महाड, मांदाड, राजपुरी व घोडेगांव (गोरेगाव) ही बंदरे सह्याद्रीच्या पूर्वेकडील जुन्नर, नाशिक व पैठण यांसारख्या व्यापारी वेंग्द्रांशी नाणेघाट, बोरघाट, शेरघाट व थळघाट या घाटमार्गांनी जोडली गेली. व्यापारी मार्गावर बौध्द लेणी निर्माण होवून मोठया प्रमाणात बौध्द वसाहती निर्माण झाल्याचे कान्हेरी, कोंदिवटे (महाकाली), जोगेश्वरी, मंडपेश्वर, चौल, पाले, कोल व कुडा या ठिकाणच्या लेण्यांवरून स्पष्ट होते.

अशोकानंतर शुंग घराण्याच्या आधिपत्याखाली महाराष्ट्र गेला. परंतु त्याविषयीचे स्पष्ट चित्र उपलब्ध नाही. यानंतरच्या काळात महाराष्ट्राची सामाजिक व सांस्कृतिक जडणघडण सातवाहनांच्या काळात प्रकर्षाने झालेली आढळते. मौर्यानंतर व्यापाराकरिता लागणारी राजकीय स्थिरता व शांतता सातवाहन काळात (इ. स. पू.२३० ते इ. स. २३०) लाभलेली दिसते. इ. स.१५० च्या सुमारास सातवाहनांची सत्ता दक्षिणेत अधिक केन्द्रित झाली. या काळात संपूर्ण महाराष्ट्रभर वसाहती झाल्या. काळ्या जमिनीत शेती कसण्याचे तंत्र मानवाने आत्मसात केल्याने शेतीच्या उत्पादनात वाढ होवून समृध्द गृहपतींचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला. हवामानही अनुकूल असल्याने प्रगतीचा मार्ग खुला झाला. त्याचप्रमाणे व्यापारी व कारागिरांच्या श्रेणी निर्माण झाल्या. रोमन इतिहासकार प्लिनीच्या मते सातवाहनांच्या साम्राज्यात तटबंदी बांधलेली तीस शहरे होती. व्यापाराच्या अनेक वेंग्द्रांपैकी तगर (तेर) ही सर्वात मोठी बाजारपेठ

होती. अंतर्गत व्यापाराबरोबर परदेशांशी विशेषतः रोमन साम्राज्याशी मोठ्या प्रमाणात व्यापार सुरू होता. **पेरिप्लस ऑफ दि एरिथ्रिअन सी या** ग्रंथात येथून निर्यात होणाऱ्या व आयात केल्या जाणाऱ्या वस्तू, त्यासाठी देशातील विविध भागात उपलब्ध असलेल्या सुविधा व चलन या बाबींची तपशीलवार जंत्री मिळते. मसाल्याचे पदार्थ, हस्तिदंत, मलमल, औषधी जडीबुटी, अत्तरे, कमाविलेली कातडी, लाकूड यांची प्रचंड प्रमाणात निर्यात होत असे. रोमन मद्य, वाद्ये, काचसामान, चांदी, सातवाहनांचा दरबार व अंतःपुरासाठी गायनकलेत निपुण असणारी मुले व नर्तकी आयात केल्या जात. येथून निर्यात होणाऱ्या दुर्मिळ वस्तूंसाठी रोमन लोकांकडून लक्षावधी सोन्याची नाणी प्राप्त होत. महिला सुंदर नाण्यांच्या माळा गुंफून गळ्यात घालत. हा अलंकार पुतळ्याच्या माळेच्या रूपात आजतागायत टिकून आहे. समृध्दीमुळे बौध्द विहारांना उदारहस्ते दाने मिळू लागली. त्यामुळे पितळखोरे, अजिंठा (सुरवातीची काही लेणी), भाजे, कार्ले, नाशिक, जुन्नर इत्यादी उत्तमोत्तम शिल्पांनी नटलेली लेणींची निर्मिती झाली. **गाथासप्तशती** या प्रांकृत भाषेतील ग्रंथाची निर्मिती सातवाहन कालखंडात झाली व महाराष्ट्राचा वाङ्मयीन पाया घातला गेला. या ग्रंथात पुढील शतकांमध्येही बरीच भर पडली.

सातवाहनांच्या पूर्वी यवन व्यापारी भारतात येऊन पोहोचले होते. अशोकाने बुध्दाची शिकवणूक त्यांच्यामार्फत पोहोचविण्यासाठी खास यवन धर्मरक्षितांची नेमणूक केली होती. लेणींमधील कोरीव लेखांवरून बरेच यवन व्यापारी धेनुकाकट (बहुधा आजचे जुन्नर असावे) शहराचे रहिवासी होते.

सातवाहनांच्या ऱ्हासाच्या काळात त्यांच्या साम्राज्याचे हळूहळू विघटन झाले. कोल्हापूर-बेळगावचे चुटु, सागर किनाऱ्यावरचे मांदव यांसारखे मांडलिक राजे स्वतंत्र झाले. खानदेशात काही काळ आभीरांनी राज्य केले. इ. स. २५० च्या सुमारास सामर्थ्यशाली वाकाटकांची सत्ता उदयाला आली. मध्य भारतातील विंध्य शक्तीने वाकाटक घराण्याची स्थापना केली. ते उत्तरेकडील गुप्त सम्राटाचे समकालीन होते. समुद्रगुप्ताने जवळजवळ सर्व देश जिंकला तरी वाकाटक राजा प्रवरसेन याच्या अधिसत्तेखाली असलेल्याा या प्रदेशात पाय टाकण्याचे धैर्य त्याला झाले नाही. वाकाटक कारकिर्दीत आर्थिक सुबत्ता,राजकीय स्थैर्य व शांतता यामुळे महाराष्ट्रात सुवर्णयुगाचे आगमन झाले. लोकांचे दैनंदिन जीवन लक्षणीयरीत्या सुधारले. निवासासाठी पक्के बांधकाम असलेल्या उत्तुंग इमारती होत्या. लोक विविध प्रकारची शिवून तयार केलेली वस्त्रप्रावरणे व अलंकार वापरीत. वाकाटक महाराणी प्रभावती गुप्ताच्या (इ. स. ४०५-४२०) काळात कवी कालिदासाच्या **मेघदूत** खंडकाव्याची निर्मिती झाली. विष्णु व नृसिंहाची (रामटेक) मंदिरही बांधली गेली. महाराष्ट्रात इ.स. चौथ्या व पाचव्या शतकात बांधलेली अशी मंदिरे तेव्हा मोठ्या प्रमाणात पसरलेल्या वैष्णव संप्रदायाची निदर्शक होती. जोगेश्वरी, मंडपेश्वर, व वेरूळ येथील रामेश्वर गुफांवरून शैव संप्रदायासही तितकेच महत्त्वाचे स्थान होते असे दिसते.

वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेचा सर्वात प्रभावशाली राजा म्हणून द्वितीय रुद्रसेनाचीच (इ.स.४२०-४५०) गणना करावी लागेल. कालांतराने वाकाटक साम्राज्याचे विभाजन होवून एक शाखा प्रवरपूर व नंतर पदमपूर व दुसरी शाखा वत्सगुल्म (वाशिम) येथून राज्य चालवू लागल्या. वाशिमचा हरिषेण हा वाकाटकांचा शेवटचा ज्ञात राजा होय. तो कला व वाङ्मयाचा आश्रयदाता होता.

तथापि वाकाटकांनतर महाराष्ट्राचा भूप्रदेश इ.स.५५० ते ७६० व इ.स. ९७३ ते ११८९ या दोन कालखंडात कर्नाटकात उदयास आलेल्या अनुक्रमे बदामीचे चालुक्य व कल्याणीचे चालुक्य या दोन बलवान घराण्यांकडे होता. बदामीचे चालुक्य घराण्यातील दुसरा पुलकेशी या बलशाली सम्राटाने (इ.स. ६१० ते ६४२) त्रै-महाराष्ट्रिक (आताचे गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक) जिंकून घेतले. त्याने नाशिकला महत्त्वाचे ठाणे केले होते. बदामी तसेच कल्याणीचे चालुक्य राजे हिंदू धर्माचे अभिमानी होते. त्यांनी मंदिरे बांधण्याची मोठीच कामगिरी केली होती. चालुक्य वास्तुशैलीची बरीच मंदिरे महाराष्ट्रात आहेत.

अलीकडे झालेल्या संशोधनावरून इ.स. ७५३ ते ९७३ पर्यंत राष्ट्रकूट घराण्याची महाराष्ट्रातील बहुतांश प्रदेशांवर अधिसत्ता होती असे दिसते. वेरूळ येथील कैलास लेणे कृष्ण पहिला या राष्ट्रकूट राजाने (इ.स.७५७-७७२) कोरविले.

इ.स. ११८९ पर्यंत महाराष्ट्राच्या काही भागांवर कल्याणीच्या चालुक्याची सत्ता टिकली. तसेच गोव्याचे कदंब, कोकण व कोल्हापूरचे शिलाहार राजे हे चालुक्य व राष्ट्रकूटांचे मांडलिक म्हणून राज्य करीत होते. देवगिरीच्या यादवांनी त्या सर्वांची सत्ता संपुष्टात आणली व १२९६ पर्यंत महाराष्ट्रावर सार्वभौम राजे म्हणून राज्य केले. त्यांची सत्ता १३१८ मध्ये पूर्णपणे नष्ट झाली. यादवांनी धार्मिक सहिष्णुतेचे धोरण अवलंबिले होते. त्यांनी मराठी भाषेला राजाश्रय देऊन राजभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला. कला साहीत्य व वास्तुशिल्प कलेस उत्तेजन व आर्थिक सहाय्य दिले. यादवांचा प्रधान हेमाद्री तथा हेमाडपंत याने अनेक देवालये बांधली. त्याने बांधलेल्या देवालयांची बांधकामाची पध्दती हेमाडपंती पध्दती म्हणून प्रसिध्दीस आली. त्याने लिहिलेला भारताच्या आचारधर्मासंबंधीचा **चतुर्वर्गचिंतामणि** हा ग्रंथ आजही महत्त्वाचा मानला जातो. हेमाद्रीचा आश्रित बोपदेव याने संस्कृत व्याकरण, आयुर्वेद, तिथिनिर्णय, काव्य व

भागवत धर्मसंप्रदायावर अनेक ग्रंथ लिहिले. महाराष्ट्रातील भक्ती संप्रदायाचा उद्‌गाता व सर्वश्रेष्ठ संतकवी ज्ञानेश्वराने याच काळात **ज्ञानेश्वरी** हा मराठी ग्रंथ नेवासे येथे लिहिला. महानुभाव संप्रदायाचा प्रवर्तक चक्रधरस्वामी याने आपल्या तत्वज्ञानाचे प्रचार ग्रंथ मराठीतून लिहिले तर मुकुंदराज या विद्वान लेखकाने **विवेकसिंधु** आणि **परमामृत** हे ग्रंथ याचवेळी मराठीतून लिहिले.

यादवांच्या राजवटीनंतर महाराष्ट्रावर खलजी, तुघलक व बहमनी राजांची राजवट सुरू झाली. चौदाव्या शतकाच्या प्रारंभापासून संपूर्ण महाराष्ट्र मुसलमानी राजवटीखाली गेला. मराठेशाहीच्या उदयाआधी महाराष्ट्रावर मुघल आणि निजामशाही व आदिलशाहीची सत्ता होती. महाराष्ट्रातील समाजजीवन व संस्कृतीवर परकीय राजवटींचा प्रभाव पडणे स्वाभाविकच होते. मात्र याच विपन्नावस्थेतील महाराष्ट्रात महान संत निर्माण झाले व त्यांनी समाजास भक्तीमार्गाकडे नेण्याचे कार्य केले. शिवाजी राजेंच्या उदयानंतर महाराष्ट्रात एक विशिष्ट अस्मिता निर्माण झाली. शिवाजी, संभाजी व शाहू आणि पेशवे यांनी महाराष्ट्राला आपले वेगळेपण प्राप्त करून दिले. १८१८ मध्ये पेशवाईचा अंत होऊन इंग्रजांनी सत्ता काबीज केली व त्याचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या समाज जीवनावर घडून आले.

महाराष्ट्राला अशी भूवैज्ञानिक अथवा भौगोलिक आणि मानवी वसाहतीची बाजू आहे त्याचप्रमाणे या प्रदेशाच्या अस्तित्वाला सामाजिक-मानसिक बाजू आहे. ही सामाजिक-मानसिकता महाराष्ट्र या नावातून व्यक्त होते. महाराष्ट्र हा केवळ भारताचा एक भौगोलिक भाग नव्हे किंवा काही समूहांची वस्ती नव्हे, तर या सर्वांची मानसिक जाणीव या नावात अंतर्भूत आहे. या दृष्टीकोनातून महाराष्ट्र हा शब्द केव्हापासून व कसा वापरात आला असावा हे पहाणे उदबोधक ठरेल.

सामाजिक-मानसिक घडण

महाराष्ट्र हा शब्द या भूभागावर अस्तित्वात आलेल्या समाजाला उददेशून केव्हापासून व कोणत्या अर्थाने वापरला जाऊ लागला याचा इतिहास हा इतिहासकार व भाषाशास्त्रज्ञांच्या कुतूहलाचा विषय बनला आहे. या संबंधात दोन सिध्दांत आढळतात. पहिल्या सिध्दांतानुसार महाराष्ट्र हे नाव या प्रदेशात राहणाऱ्या अथवा या प्रदेशावर राज्य करणाऱ्या विशिष्ट लोकसमूहावरुन प्रचारात आले असावे. दुसऱ्या सिध्दांतानुसार महाराष्ट्र या नावाचा संबंध या भूप्रदेशाच्या विशेषतांशी जोडलेला आहे. या दोन प्रकारात मोडणाऱ्या काही प्रातिनिधिक सिध्दांताचे विवेचन खाली केले आहे.

Maharashtra State Gazetteers

डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या मतानुसार महाराष्ट्र हे नाव राष्ट्रिक किंवा रथिक या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लोकसमूहावरून आले असावे. हे लोक स्वतःला महारथी अथवा महाराट्ट या नावाने ओळखत असत. ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या मतानुसार महाराष्ट्र हा शब्द या प्रदेशातील पहिले रहिवासी महार आणि रट्ट यांच्यापासून तयार झाला असावा. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांनी याच सिध्दांताशी मिळताजुळता दुसरा सिध्दांत मांडला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार नर्मदेच्या पलीकडील प्रदेशात लोकसंख्या वाढल्याने द्रव्य, मनुष्य व अधिकार अशा त्रिविध शक्तींनी संपन्न असलेल्या रट्ट लोकांनी दण्डकारण्यात प्रवेश केला. हे वसाहतीकरण इ. स. पूर्व १००० ते इ. स. पूर्व ३०० पर्यंत चालले होते. या कालखंडात मानव्य, हैहय, भोज, यादव, कदंब, मौर्य, चालुक्य, इत्यादी गोत्रांचे रट्ट लोक दण्डकारण्यात वस्तीस आले. त्यांच्यापासून शहाण्णव कुळी मराठे बनले. या रट्ट लोकांवरून महाराष्ट्र हे नाव पडले.[९]

दुसऱ्या प्रकारच्या सिध्दांतामध्ये महामहोपाध्याय पांडुरंग वामन काणे यांनी मांडलेला सिध्दांत येतो. त्यांच्या मतानुसार दण्डकारण्य हा प्रदेश तेथील जंगल तोडून वसाहतीसाठी योग्य केल्यानंतर सातवाहनांच्या साम्राज्याच्या विस्ताराबरोबर महाराष्ट्र अस्तित्वात आला. काहींच्या मते महाराष्ट्र भूमी दण्डकारण्याप्रमाणेच वनभूमी होती व तिला 'महाकांतार' म्हणत. त्याचा अपभ्रंश म्हणजेच महाराष्ट्र होय असे ते मानतात. अनेक राष्ट्रांचे मिळून तयार झालेले राष्ट्र म्हणजे महाराष्ट्र होय. शं.बा.जोशी यांच्या मतानुसार महाराष्ट्र हा शब्द मरहट्ट या कन्नड शब्दावरून आला असावा. कन्नडमध्ये मर या शब्दाचा अर्थ झाडी व हट्ट या शब्दाचा अर्थ प्रदेश असा आहे. यावरून महाराष्ट्र म्हणजे जंगल प्रदेश असा होतो.

मात्र वरील सिध्दांत हे शास्त्रीयदृष्ट्या सिध्द झालेल्या माहितीवर आधारलेले आहेत असे म्हणता येणार नाही. ते फक्त सूचक आहेत. महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचे नाते अतूट आहे. मराठी भाषिकांचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र हे समीकरण सर्वमान्य आहे. मराठी ही महाराष्ट्री प्राकृत भाषेतून निर्माण झाली व तिच्या उत्पत्तीचा कालखंड दहावे अथवा

अकरावे शतक असावे असे डॉ. भांडारकर आणि डॉ. गुणे या संशोधकांचे मत आहे.[१०]

महाराष्ट्राच्या राजकीय सीमा जरी बदलत गेल्या तरी सांस्कृतीक सीमा मराठी भाषेने निर्घारित केलेल्या आहेत. जेथे मराठी बोलली जाते तो प्रदेश महाराष्ट्र. भारतावर ब्रिटिशांचे राज्य असताना ही सांस्कृतिक अस्मिता महाराष्ट्रातील लोकमानसात जागृत होती व त्याचाच परिपाक स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्र या मराठी भाषिक राज्याच्या निर्मितीत झाल्याचे दिसते.

आजचा महाराष्ट्र

स्वतंत्र भारताच्या सरकारने भाषावर प्रांतरचना करण्याचे धोरण स्वीकारले व या तत्त्वावर आधारित नवीन भाषिक राज्यांची निर्मिती झाली. महाराष्ट्र राज्य दिनांक १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. या राज्याचे क्षेत्रफळ ३,०७,६९० चौरस किलोमीटर आहे. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ६,२७,८४,१७१ होती. ही लोकसंख्या ३९,३५४ खेडयांमधून आणि ३०७ शहरे आणि शहर संकुलांमध्ये राहत होती. प्रशासनाच्या सोयीसाटी महाराष्ट्राची विभागणी ३१ जिल्हे आणि ३०३ तालुक्यांमध्ये झालेली आहे. महाराष्ट्रात एकूण लोकसंख्येत साक्षरांचे प्रमाण ४७.१८ टक्के आहे, त्यात पुरुषांच्या साक्षरतेचे प्रमाण ५८.७९ टक्के तर महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण ३४.७९ टक्के आहे. महाराष्ट्रातील जनता बहुधर्मीय आहे. त्यामध्ये हिंदुधर्मीय हे बहुसंख्य (५,११,०९,४५७) असून त्या खालोखाल मुसलमान (५८,०५,७८५), बौध्द (३९,४६,१४९), जैन (९,३९,३९२), ख्रिश्चन (७,९५,४६४), शिख (१,०७,२५५) व बाकीचे इतर धर्मीय होते. महाराष्ट्राच्या डोंगराळ भागात आदिवासी जमाती राहतात. त्यांची १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ५७,७२,०३८ होती व त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ९.१९ टक्के होते. त्याचप्रमाणे अनुसूचीत जातींची लोकसंख्या ४४,७९,७६३ व नवबौध्दांची लोकसंख्या २,०३,०७५ इतकी होती. त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण अनुक्रमे शेकडा ७.१४ व शेकडा ०.३२ आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार प्रमुख धार्मिक गटांची एकूण लोकसंख्या पुढील प्रमाणे होती :- हिंदू ६,४०,३३,२१३ (३,३०,९२,६८९ पु. ; ३,०९,४०,५२४ म.), मुसलमान ७६,२८,७५५ (४०,०८,९३४ पु. ; ३६,१९,८२१ म.), बौध्द ५०,४०,७८५ (२५,७०,७८९ पु. ; २४,६९,९९६ म.), जैन ९,६५,८४० (४९,९९,०२९ पु. ; ४,६६,१११ म.), ख्रिश्चन ८,८५,०३० (४,५०,६८८ पु. ; ४,३४,३४२ म.) आणि शिख १,६१,१८४ (८८,८४३ पु. ; ७२,३४१ म.).

महाराष्ट्र हे प्रामुख्याने मराठी भाषिकांचे राज्य म्हणून ओळखले जाते. मराठी भाषिकांची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार ४,५८,१६,७५३ होती. मात्र आजच्या महाराष्ट्रातील समाज बहुभाषिक आहे. मराठीच्या खालोखाल उर्दू (४३,१९,०६७), हिन्दी (४१,४७,१९९), गुजराती (१६,८४,३२३), तेलुगु (९,३६,९२८), कन्नड (९,२०,१०८), सिंधी (५,१७,८७४), मल्याळम् (२,२०,८७१), तामीळ (३,००,३४८) आणि पंजाबी (१,८४,०५३) या भाषिकांची लोकसंख्या महाराष्ट्रात आहे. बंगाली, ओरिया, काश्मिरी, आसामी या भाषा बोलणाऱ्या लोकांची संख्या महाराष्ट्रात कमी आहे.[११]

१९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या ७.८९ कोटी होती. १९८१-९१ या दशकांतील राज्याच्या लोकसंख्येतील वाढीचा दर २५.४३ टक्के (वार्षिक चक्रवाढ दर २.३२ टक्के) एवढा होता व तो भारताच्या लोकसंख्येच्या वृध्दीदरापेक्षा (२३.८५ टक्के) जास्त होता. १९७१-८१ ह्या आधीच्या दशकातील राज्याच्या लोकसंख्येच्या वृध्दीदराशी (२४.५४ टक्के) तुलना करतासुध्दा, १९८१-९१ या दशकातील वृध्दीदर जास्त होता. १९९५ सालाकरिता (१ ऑक्टोबर रोजी) राज्यातील अंदाजित लोकसंख्या ८.६३ कोटी असेल.

क्षेत्रफळ व लोकसंख्या या दोन्ही बाबतीत महाराष्ट्र भारतातील तिसऱ्या क्रमांकाचे मोठे राज्य आहे. महाराष्ट्राच्या लोकसंख्येबाबतची काही ठळक वैशिष्टये खालील तक्त्यात दर्शविली आहेत.

लोकसंख्या विषयक आकडेवारी, जनगणना १९९१

बाब		महाराष्ट्र
(१)		(२)
		लोकसंख्या (कोटीमध्ये)
पुरूष		४.०८
स्त्रिया		३.८१
	एकूण	७.८९
१९८१-९१ दशकाकरिता वृध्दीदर (टक्के)		२५.४३
नागरी लोकसंख्या (एकूण लोकसंख्येशी टक्केवारी)		३८.६९
स्त्री-पुरूष प्रमाण (दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या)		९३४
लोकसंख्येची घनता (दर चौरस कि.मी.मागे संख्या)		२५७
साक्षरतेची टक्केवारी (टक्के)		६४.९

नागरी लोकसंख्या १९९१: १९९१च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्या (३.०५ कोटी) एकूण लोकसंख्येच्या ३८.७ टक्के होती. ही टक्केवारी भारताच्या टक्केवारीपेक्षा (२५.७ टक्के) बरीच जास्त होती. याबाबतीत भारतातील सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राचा क्रमांक चौथा आहे. मागील तीन दशकांत नागरी लोकसंख्येचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. हे प्रमाण १९६१ मधील २८.२ टक्क्यांवरून १९७१ मध्ये ३१.२ टक्क्यांपर्यंत आणि १९८१ मधील ३५.० टक्क्यांवरून १९९१ मध्ये ३८.७ टक्क्यांपर्यंत वाढले. महाराष्ट्र राज्यातील शहरे व नगरांची संख्या १९८१ मधील ३०७ वरून १९९१ मध्ये ३३६ पर्यंत वाढली. राज्यातील बृहन्मुंबई (यात बृहन्मुंबई, कल्याण, ठाणे व नवी मुंबई ही महानगर क्षेत्रे आणि उल्हासनगर व मीरा-भाईंदर ही नगर परिषद क्षेत्रे समाविष्ट आहेत) या नागरी संकुलाचे वैशिष्ट्य म्हणजे ते देशातील सर्व नागरी संकुलांमध्ये सर्वात अधिक लोकसंख्या असलेले संकुल असून जगात त्याचा सहावा क्रमांक लागतो. लोकसंख्येंच्या गटानुसार राज्यातील शहरे व नगरांचे १९८१ व १९९१ च्या जनगणनेनुसार वर्गीकरण पुढील तक्त्यात दिले आहे.

जनगणना १९८१ व १९९१ नुसार राज्यातील शहरे व नगरांचे लोकसंख्येच्या गटानुसार वर्गीकरण

अनुक्रमांक	लोकसंख्येचा गट	शहरे व नगरे यांची संख्या	
		१९८१	१९९१
(१)	(२)	(३)	
१	एक लाख आणि त्यापेक्षा अधिक	२९	३३
		(९.४५)	(९.८२)
२	५०,००० ते ९९,९९९	२५	३०
		(८.१४)	(८.९३)
३	२०,००० ते ४९,९९९	८९	११४
		(२८.९९)	(३३.९३)
४	१०,००० ते १९,९९९	१००	१०२
		(३२.५७)	(३०.३६)
५	५,००० ते ९,९९९	४८	४६
		(१५.६४)	(१३.६९)
६	५,००० पेक्षा कमी	१६	११
		(५.२१)	(३.२७)
	सर्व गट	३०७	३३६
		(१००.००)	(१००.००)

टीप : कंसातील आकडे एकूण संख्येशी टक्केवारी दर्शवितात.

Maharashtra State Gazetteers

१९८१-९१ या दशकात २० हजार व त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांच्या व नगरांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. १० हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या नगरांच्या संख्येत घट झाली आहे.

ग्रामीण लोकसंख्या १९९१ : १९९१ च्या जनगणनेनुसार राज्यातील ग्रामीण लोकसंख्या (४.८४ कोटी) एकूण लोकसंख्येच्या ६१.३ टक्के होती. ही टक्केवारी भारताच्या टक्केवारीपेक्षा (७४.३ टक्के) बरीच कमी होती. १९८१-९१ या दशकात राज्याची ग्रामीण लोकसंख्या १८.६ टक्क्यांनी वाढली. महाराष्ट्रातील हा वृद्धीदर भारताच्या वृद्धीदरापेक्षा (२०.० टक्के) कमी होता. राज्यातील ग्रामीण लोकसंख्येचा १९८१-९१ या दशकातील वृद्धीदर हा मागील १९७१-८१ या दशकातील वृद्धीदरापेक्षा थोडा जास्त होता. राज्यातील गावांची संख्या १९८१ मधील ४१,८३३ वरून १९९१ मध्ये ४३,०२५ पर्यंत वाढली.

स्त्री-पुरूष प्रमाण : १९९१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात स्त्री-पुरूष प्रमाण (दर हजार पुरूषांमागे स्त्रियांची संख्या) ९३४ होते. भारतासाठी हे प्रमाण ९२७ होते. १९९१ मध्ये राज्याचे स्त्री-पुरूष प्रमाण १९८१ मधील प्रमाणापेक्षा (९३७) थोडे कमी होते. १९९१ मध्ये राज्याच्या ग्रामीण भागातील स्त्री-पुरूष प्रमाण ९७२ होते, तर नागरी भागात ते ८७५ इतके होते.

लोकसंख्येची घनता : महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता (दर चौरस कि.मी. मागे लोकसंख्या) १९८१ मधील २०४ वरून १९९१ मध्ये २५७ पर्यत वाढली. भारतातील लोकसंख्येच्या घनतेच्या (२६७) तुलनेत महाराष्ट्रातील लोकसंख्येची घनता कमी होती. १९९१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येच्या घनतेच्या बाबतीत भारतातील सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्र राज्याचा बारावा क्रमांक लागतो.

साक्षरतेचे प्रमाण : १९९१ च्या जनगणनेनुसार सात वर्षे व त्यापेक्षा अधिक वय असलेल्या लोकसंख्येच्या साक्षरतेचे महाराष्ट्रातील प्रमाण ६४.९ टक्के होते व ते भारताच्या (जम्मू व काश्मिर वगळून) साक्षरतेच्या प्रमाणापेक्षा (५२.२ टक्के) बरेच जास्त होते. १९८१ मध्ये राज्यात साक्षरतेचे प्रमाण ५५.८ टक्के इतके होते. १९९१ मध्ये साक्षरतेच्या टक्केवारीच्या बाबतीत भारतातील सर्व राज्यांमध्ये महाराष्ट्राचा पाचवा क्रमांक लागतो. १९९१ मध्ये पुरूष व स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे ७६.६ व ५२.३ टक्के इतके होते.

अनुसूचीत जातींची लोकसंख्या : १९९१ च्या जनगणनेनुसार राज्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या ८७.५८ लाख (पुरूष ४५.०५ लाख व स्त्रिया ४२.५३ लाख) होती.

अनुसूचित जमातींची लोकसंख्या : १९९१ च्या जनगणनेनुसार राज्यातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या ७३.१८ लाख (पुरूष ३७.१८ लाख व स्त्रिया ३६.०० लाख) होती.

स्थलांतर : १९९१ च्या जनगणनेची स्थलांतरविषयक आकडेवारी अजून उपलब्ध नाही. तथापि, आंतरगणना कालावधीतील वर्षनिहाय जन्म व मृत्यू दराच्या आधारावर निव्वळ स्थलांतराचे स्थूल अंदाज करणे शक्य आहे. त्यानुसार १९७१-८१ कालावधीसाठी निव्वळ स्थलांतराचा अंदाज (३१ लाख) १९८१ च्या जनगणनेनुसार प्रत्यक्ष असलेल्या निव्वळ स्थलांतर संख्येच्या (२७.६ लाख) जवळपास असल्याचे दिसून आले. याच कार्यपध्दतीनुसार १९८१-९१ ह्या दशकातील निव्वळ स्थलांतर २० लाख इतके असेल असा अंदाज आहे.

आजचा महाराष्ट्र बहुधर्मीय, बहुभाषिक व बहुवांशिक आहे. ही बहुविधता काही प्रमाणात ऐतिहासीक परंपरेने व काही प्रमाणात आधुनिकतेच्या प्रक्रियेतून निर्माण झाली आहे. अशा या प्रामुख्याने मराठी भाषिक समाजाच्या सामाजिक जीवनाची जडणघडण कशी झाली, त्याच्या विविध पैलूंचे स्वरूप कसे आहे, याचे विवेचन पुढील प्रकरणांमध्ये केले आहे.

तळटिपा

[१] ह. श्री. शेणोलीकर, प्र. न. देशपांडे, **महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास,** १९७९.

[२] आर. एस. पप्पू, "स्टोन एज कल्चर ऑफ महाराष्ट्र", एम. के. ढवळीकर, "मेगालिथिक कल्चर" व "चॅलकोलिथिक कल्चर," **महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : हिस्टरी : एन्शंट पिरिअड** (अप्रकाशीत).

[३] एस. बी. देव, "एन्शंट हिस्टरी ऑफ महाराष्ट्र," **महाराष्ट्र : अ प्रोफाईल,** कोल्हापूर, १९७७.

[४] एम. के. ढवळीकर, **दि फर्स्ट फार्मर्स ऑफ दि डेक्कन,१९८८.**

[५] देव, पूर्वोक्त.

[६] शेणोलीकर, देशपांडे, पूर्वोक्त.

[७] डेक्कन कॉलेज ॲण्ड पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इंस्टिटयूट, पुणे आणि महाराष्ट राज्य पुरातत्व विभाग यांनी नैवुंग्डला उत्खनन केले.

[८] देव, पूर्वोक्त.

[९] शेणोलीकर, देशपांडे, पूर्वोक्त.

[१०] पु. ग. सहस्त्रबुध्दे, **महाराष्ट्र संस्कृती,** १९७९.

[११] **महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी,** १९८८.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण २ : महाराष्ट्रातील लोक

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि. ना. वाळुंजकर यांनी केले आहे.)

वांशिक आणि सांस्कृतिक पैलू

उत्तर भारत आणि दक्षिण भारत या दरम्यान असलेल्या महाराष्ट्राच्या स्थानामुळे येथील लोकसमूहांच्या वांशिक आणि सांस्कृतिक जडणघडणीवर उत्तर भारताचा व दक्षिण भारताचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. मानववंशशास्त्रज्ञ वंश ही संकल्पना एखाद्या जनसमूहामध्ये दिसणाऱ्या काही शारीरिक लक्षणांच्या समुच्चयास उद्देशून वापरतात. कृष्णवर्ण, जाड ओठ व अतिकुरळे केस ही निग्रीटो वंशाची लक्षणे समजली जातात; तर गौरवर्ण, निळे डोळे, सरळ व रुंदीने लहान नाक आणि भुरे केस ही युरोपमधील नॉर्डिक वंशाची लक्षणे मानली जातात. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात यूरोपमधील काही राष्ट्रांनी वंश या संकल्पनेचा विकृत अर्थ लावला व काही वंश बौध्दिकदृष्ट्या प्रगत तर काही अप्रगत असतात, अशा तऱ्हेच्या विचारप्रणालीचा पुरस्कार केला. परंतु मानववंशशास्त्रज्ञांनी या वंशश्रेष्ठतेच्या कल्पनेतील फोलपणा उघड केला व वंश या संकल्पनेत फक्त काही शारीरिक लक्षणे अभिप्रेत आहेत हे स्पष्ट केले. खालील विवेचनात वंश हा शब्द या मानववंशशास्त्रीय अर्थानेच वापरला आहे.

भारतातील जनतेच्या वांशिक जडणघडणीकडे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न १८९१ मध्ये हरबर्ट रिसले यांनी केला. भारतातील जातींच्या वांशिक जडणघडणीत त्यांनी तीन वांशिक गटांचा प्रामुख्याने उल्लेख केला. हे तीन गट म्हणजे : इंडो-आर्य, द्रविड व मंगोल हे होत. या वांशिक गटांची प्रातिनिधिक शारीरिक लक्षणे भारताच्या काही निवडक भागातील जनसमूहांच्या मानवमितिशास्त्रीय (ॲन्थ्रापॉमेट्रिक) अध्ययनावरुन ठरविली गेली. इंडो-आर्यांची शारीरिक लक्षणे पंजाब व राजपूताना येथील जनसमूहांच्या अध्ययनावरुन निर्धारित करण्यात आली. या अध्ययनावरुन इंडा-आर्य म्हणजेच भारतीय आर्य या गटाची शारीरिक लक्षणे पुढीलप्रमाणे आहेत :- लांब डोके, सरळ नाक, सरासरी नासिका निर्देशांक ६५ ते ७५ व सरासरी कपाल निर्देशांक ७० ते ७५. द्रविड गटाची शारीरिक लक्षणे, रिसले यांच्या अध्ययनावर डॉ. जी. एस.घुर्ये यांनी केलेली समीक्षा व सुचविलेल्या दुरुस्त्या लक्षात घेऊन पुढीलप्रमाणे सांगता येतीलः-लांब डोके, कपाल निर्देशांक ७५, मध्यम रुंदीचे नाक, नासिका निर्देशांक ७७ हून कमी, सावळा वर्ण, गाल आणि छातीवर अत्यल्प केस किंवा केसांचा पूर्ण अभाव. तामीळनाडू व केरळमधील जनसमूहात हा प्रकार दिसतो. मंगोलवंशीय लोक नेपाळ, आसाम व हिमाचल प्रदेश या भागांत दिसतात. पीत वर्ण व बसके नाक याबरोबर डोळ्यावर भुवईच्या खाली व पापणीच्या मध्ये एक कातड्याची वळी (एपिकेन्थिक फोल्ड) ही या वंशाची लक्षणे आहेत[१].

रिसले यांच्या अध्ययनातील उणिवा नंतरच्या अभ्यासकांनी दाखवून दिल्या व त्यांनी केलेल्या वर्गवारीमध्ये सुधारणा सुचवून नवी वर्गवारी पुढे मांडली. यामध्ये हॅडन, हट्टण व गुहा या अभ्यासकांचा उल्लेख करावा लागेल[२]. हॅडनच्या मतानुसार भारतात द्रविड-पूर्व, द्रविड आणि आर्य हे प्रमुख वांशिक गट दिसतात. हटनच्या मतानुसार भारतात सर्व प्रथम निग्रीटो (निग्रो) वंशाचे अस्तित्व होते. नंतरच्या काळात हा वांशिक प्रकार जवळजवळ लुप्त झाला. त्यानंतर प्रोटो-ऑस्ट्रेलॉइड, मेडिटरेनियन, आर्मेनियन, मंगोलॉइड व शेवटी इंडो-आर्य आले. बी.एस.गुहा यानी भारतीय लोकसमूहाच्या जडणघडणीत सहा वांशिक गटांचा उल्लेख केला आहे. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- निग्रिटो, प्रोटो-ऑस्ट्रेलॉइड, मंगोलॉइड, मेडिटरेनियन, वेस्टर्न ब्रेची सेफाल्स आणि नॉर्डिक. गुहा यानी प्रतिपादिलेले वांशिक वर्गीकरण १९३१ च्या जनगणनेच्या वेळी त्यांनी घेतलेल्या विविध जातींच्या प्रातिनिधिक व्यक्तींच्या शारीरिक मापनावर आधारित आहे.

महाराष्ट्रातील विविध जाती व जमातींचे मानवमिती पध्दतीने इरावती कर्वे यानी अध्ययन केले[३]. त्यांच्या अध्ययनानंतर इतके व्यापक अध्ययन अद्याप झाल्याचे दिसत नाही. या दृष्टीने महाराष्ट्रातील विविध जातींच्या वांशिक जडणघडणीसंबंधी त्यांनी काढलेले निष्कर्ष विचारात घेणे संयुक्तीक ठरेल.

महाराष्ट्रातील जनसमूहामध्ये निग्रोवंशीय (निग्रॉइड) आणि मंगोलवंशीय (मंगोलॉइड) लक्षणे जवळजवळ दिसत नाहीत. कोकण विभागात काही ठिकाणी, विशेषतः मुरुड-जंजीरा या भागात, जाड ओठ अतिकुरळे केस ही निग्रोवंशीय लक्षणे असलेल्या व्यक्ती दिसतात. याचे कारण या भागात "हबशांची" (सीदी) सत्ता होती. मराठीत हबशी

हा शब्द निग्रोवंशीय लोकांना उद्देशून वापरला जातो. काही हबशी मुघल दरबारात गुलाम म्हणून होते. कोकणातील काही जहागिरींत हबशी लोकांना मजूर म्हणून आणण्यात आले होते व त्यांच्यापासून झालेल्या संततीमध्ये ही निग्रोवंशिय लक्षणे दिसतात.हा निग्रोवंशीय घटक अलीकडील काळात अत्यल्प प्रमाणात दिसत असल्यामुळे त्याची दखल घेण्याचे येथे कारण नाही. महाराष्ट्रातील जनसमूहात मंगोलवंशीय लक्षणे दिसत नाहीत. तेव्हा महाराष्ट्रातील जनसमूह प्रामुख्याने ऑस्ट्रेलॉइड-युरोपीय वांशिक गटात मोडणाऱ्या लोकांचा बनलेला आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकांच्या त्वचेचा रंग काळा ते गव्हाळ रंगापर्यंत असतो. डोळे काळे तपकिरी रंगाचे दिसून येतात. काही जातीत अल्प प्रमाणात घारे डोळे असणाऱ्या व्यक्ती दिसतात. केसांचा रंग प्रामुख्याने काळा, परंतु अत्यल्प प्रमाणात तांबूस पिंगटही दिसतो. बहुतेक पुरुषांची छाती आणि गालावर केस दिसून येतात. महाराष्ट्रातील जनता उंचीने बुटकी किंवा मध्यम उंचीची आहे. त्यांची उंची १.४८ मीटर ते १.६६ मीटर या दरम्यान असते. सर्व जातीत अल्प प्रमाणात १.८३ मीटर पर्यंत उंची असणाऱ्या व्यक्ती दिसून येतात. डोक्याचा आकार लघु कपालापासून मध्यम कपाल या दरम्यान असतो. बहुतांश लांबट अथवा बहुतांश रुंद डोक्याचे लोक महाराष्ट्रात दिसत नाहीत. नाकाचा आकार मध्यम ते मोठ्या आकाराच्या दरम्यान असतो. अरुंद आकाराचे नाक असलेल्या (नाकेल्या) व्यक्ती महाराष्ट्रात अत्यल्प प्रमाणात दिसतात.

जात ही एक समाजसंस्था असून महाराष्ट्रात किमान २५० जातिसमूह आहेत व त्यातील प्रत्येक समूहात अनेक जाती आहेत. इरावती कर्वे यांनी महाराष्ट्रात ५० विविध जातींतील व्यक्तींची मापे घेतली व त्यांची प्रादेशिक विभागणी खालीलप्रमाणे केली आहे:-

वऱ्हाड व मध्यप्रांत (पूर्णा, वर्धा व वैनगंगा नद्यांचे खोरे) :- (१) कुणबी :(तिरोळे, धनोजे, माना तथा मानवा व खैरे), (२) मराठा, (३) ब्राह्मण (चरक, माध्यंदिन), (४) गोवारी, (५) कोरकू, (६) कोष्टी, (७) हलबी, (८) पोवार, (९) बावने महार, (१०) कोहळी, (११) गोंड, (१२) धीवर व (१३) कोलाम.

खानदेश (तापीचे खोरे) :- (१) ब्राह्मण (माध्यंदिन, ऋग्वेदी देशस्थ), (२) वंजारी, (३) लेवा पाटीदार, (४) लेवा गुजर, (५) भिल्ल, मावची, तडवी इत्यादी, (६) अहीर सोनार, (७). बारी, (८) मराठा.

देश (गोदावरी व कृष्णेचे खोरे) :- (१) मराठा, (२) ब्राह्मण, (३) फुलमाळी, (४) महार, (५) कोळी, (६) चांभार, (७) तेली, (८) मांग, (९) शिंपी, (१०) साळी, (११) न्हावी, (१२) परीट, (१३) गुरव, (१४) बुरुड, (१५) आंध, (१६) सोनार, (१७) भावसार, (१८) धनगर (हाटकर व खुटेकर).

कोकण :- (१) मराठा, (२) वैश्यवाणी, (३) भंडारी, (४) ब्राह्मण (सारस्वत, कऱ्हाडे, चित्पावन), (५) सोनकोळी, (६) पाठारे प्रभु, (७) कायस्थ प्रभु, (८) दैवज्ञ ब्राह्मण, सोनार, (९) त्वष्टा कासार, (१०) पाठारे क्षत्रिय, (११) खत्री, (१२) सोमवंशी वाडवल, (१३) आगरी, (१४) ठाकूर, (१५) वारली, (१६) मल्हार कोळी. या प्रमुख जाती व जमातींची वांशिक अथवा शारीरिक वैशिष्ट्ये तसेच त्यांच्या सामाजिक व सांस्कृतीक परंपरा यांची माहिती थोडक्यात खाली दिली आहे. ही माहिती भारतातील जाती-जमातींचे अभ्यासक आर.ई.एन्थोव्हेन, आर.व्ही.रसेल, रायबहादूर पंडीत हिरालाल, सईद सिराज उल हसन, इरावती कर्वे व इतर मान्यवर अभ्यासक, त्याचप्रमाणे मुंबई इलाख्याचे व सी. पी. ॲण्ड बेरारचे १९०१, १९११ व १९३१ मधील जनगणना अहवाल व अगदी अलीकडे ॲन्थ्रॉपॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडिया या भारत सरकारच्या विभागातर्फे के. एस. सिंग यांनी संपादित केलेला **पीपल इन इंडिया** हा ग्रंथ तसेच जिल्हा गॅझेटिअर ग्रंथांमधील माहितीवर आधारीत आहे. विविध जाती-जमाती विषयीच्या माहितीत शक्यतो समानता आणण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु मोठी प्रादेशिक भिन्नता व उपलब्ध माहितीत अपूर्णता असल्यामुळे विविध जातींच्या पुढील वर्णनात पूर्ण समानता आलेली नाही हे प्रारंभिच मान्य करावे लागेल. तंतोतंत माहितीचा अभाव व स्थलसंकोच यांच्या मर्यादा मान्य करायलाच हव्यात.

प्रमुख जाती व जमाती

(१९३१ मधील मुंबई इलाख्याची लोकसंख्या सध्याच्या पश्चिम महाराष्ट्राची आहे.)

अहीर : अहीर हा शब्द संस्कृत आभीर शब्दाचा अपभ्रंश आहे. प्राचीन शिलालेख व ग्रंथांमध्ये अहीर जातीचा अनेक वेळा उल्लेख आढळतो. प्राचीन काळाचा इतिहास पाहता आभीर किंवा अहीर नावाचा बलाढय राजवंश इ.स.

च्या पहिल्या पाच शतकात होऊन गेल्याचे दिसते. वीरसेन तथा ईश्वरसेन या आभीर राजाची इ. स. ४१९ मध्ये खानदेशवर सत्ता होती असे नाशिकच्या शिलालेखावरुन दिसते. भारतात बिहार, ओरिसा, उत्तर प्रदेश, पंजाब, सौराष्ट्र व महाराष्ट्रात यांची वस्ती आढळते. प्रांतपरत्वे ते वेगवेगळ्या नावाने ओळखले जातात. रिसले यांच्या मते हे लोक ख्रिस्ती सनापूर्वी व ख्रिस्त सन सुरु झाल्याच्या सुमारास मध्य आशियातून भारतात आले असावेत. हे स्किथियन वंशाचे असावेत अशी आजवरची समजूत होती. पण संशोधनाअंती ते आर्यच असावेत असे मानले जाते.

अहीरांमध्ये प्रामुख्याने कच्छी अहीर व महाराष्ट्रीय अहीर असे दोन प्रमुख पोटभेद आहेत. महाराष्ट्रात अहीर, गवळी, गोंदन या नावाने ओळखली जाणारी ही जात परंपरेने दुग्धव्यवसाय, गोपालन व जनावरांची पैदास हे परस्परांशी निगडित असलेले व्यवसाय करते. १९३१ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाखा व विदर्भ मिळून या जातीची लोकसंख्या ८८,४३९ होती. या जातीची वस्ती जळगाव, धुळे, नाशिक, जालना, नांदेड व अमरावती जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने दिसून येते. रसेल व हिरालाल यांच्या मते अहीरांत जाती संकर झाल्याने व अन्य जातींच्या मिश्रणाने पोटजाती निर्माण झाल्यात. अहीरांमध्ये नंदवंशी, यादव, लिंगायत, रघुवंशी, गडारिया, गवळी, सूर्यवंशी व गडिया गवळी या आठ पोटजाती आहेत. हे लोक पोटजातीमध्येच विवाहसंबंध करतात. प्रत्येक पोटजातीची विभागणी बहिर्विवाही कुळात झालेली आहेत. या कुलनामांचा वापर आडनाव म्हणून केला जातो. समान कुळात विवाह होत नाही. बहुतांश अहीर शाकाहारी असले तरी काही मांसाहारी असून परंपरेने कुणबी, सोनार यासारख्या जातींशी रोटी व्यवहार करतात. ते हिंदूधर्मीय असून मुख्यत्वे कृष्णभक्त असले तरी सर्व हिंदू देवतांची पूजा करतात. ते गाईला पूज्य मानतात. त्यांच्यात विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा आहे. मृत व्यक्तीचा दहन संस्कार केला जातो. अलीकडील काळात अहीर जातीचे लोक पारंपरिक व्यवसायाखेरीज व्यापार, उदीम व इतर व्यवसाय करताना दिसतात.

आगरी : आगरी अथवा मीठ आगरी या नावाने ओळखली जाणारी ही जात महाराष्ट्रात ठाणे व रायगड जिल्ह्यांत त्याचप्रमाणे मुंबईच्या उपनगरी भागात वसलेली आहे. १९३१ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यातील या जातीची लोकसंख्या २,५८,६०५ होती. आगरी लोकांबद्दल बऱ्याच दंतकथा व मौखिक माहिती सांगितली जाते. त्यांची बागाईतदार म्हणून प्रसिध्दी आहे. नारळी-पोफळीच्या बागा असलेल्या गावासही आगर किंवा आगरी गाव म्हणतात. आगरी म्हणजे पोफळीच्या बागा मक्त्याने करणारा असाही अर्थ लावला जातो. सन १२८९ च्या नागावच्या शिलालेखात हा शब्द आढळतो. आगर म्हणजे मीठ तयार करण्याची जागा होय. मिठागारातील कामकरी असाही आगरींचा उल्लेख आढळतो. आगरी लोकांना खारकी, खारपाटे किंवा आगळे कुणबी अशीही नावे आहेत. त्यांच्या पूर्वजांच्या परंपरागत माहितीनुसार आगरी रावणाचे गायक-वादक होते. त्यांच्या कामगिरीबद्दल रावणाने त्यांना पश्चिम किनाऱ्यावरील जमीन बक्षीस म्हणून दिली. ढोल वाजविण्याच्या धंद्यावरुन पडलेले ढोल आगरी हे नाव या परंपरेचे सूचक आहे. अजूनही काही आगरी गायनवादनाचा धंदा करतात. सुमारे ६०० वर्षांपूर्वी मुंगी पैठणच्या बिंब राजाने दिल्लीच्या सुलतानाच्या सूचनेवरुन अलिबाग तालुक्यातील सागरगड येथिल मुसलमान सरदारास पकडून दिल्लीस पाठविले व तो स्वतः सागरगड येथे राहू लागला. त्याने शेजारची चौल व आवास ही हिंदू राज्येही जिंकली. शांततेच्या काळात पुरेसे सैन्य जवळ ठेवून बाकीच्यांना मिठागरे बांधून दिली व गावठाणे वसवून तिथे त्यांची वसाहत केली, असे काही आगरी सांगतात.

आगरी उंचीने थोडेफार बुटके व रंगाने काळेसावळे आणि मजबूत बांध्याचे असून त्यांच्या डोक्याचा आकार लांबट अथवा गोल आणि नाकाचा आकार अरुंद अथवा काहीसा पसरट असतो. आगऱ्यांमध्ये शुध्द आगरी व दास आगरी हे दोन अंतर्विवाही गट असल्याचा उल्लेख एन्थोव्हेनने केला आहे. शुध्द आगरी जातीच्या मीठ आगरी, दास आगरी व ढोल आगरी या तीन शाखा आहेत. दास आगरी पालघर व अलिबाग तालुक्यांत आढळतात. त्यांना कराड आगरीही म्हणतात. ते मीठ आगरींबरोबर रोटीबेटी व्यवहार करीत नाहीत. आगरींमध्ये वरप आगरी असाही एक पोटभेद आढळतो. मीठ आगरी स्वतःस उच्च समजत असल्याने वरप आगरींशी बेटीव्यवहार करीत नाहीत. आगरींमध्ये अनेक बहिर्विवाही कुल गट आहेत. कुल नावाचा वापर आडनाव म्हणून केला जातो. त्यांच्यात म्हात्रे, ठाकूर, मोरे, मोकल, पाटील, कर्वे, धुमाळ, दांडेकर, पिंगळे, थळे, राऊत, नाईक इत्यादी आडनावे आहेत. बऱ्याच गावांची पाटीलकी आगरींकडे आहे. मामेबहिणीशी विवाहाची प्रथा प्रचलित आहे. तसेच घटस्फोट व विधवा विवाहासही मान्यता आहे. परंतु असा पुनर्विवाह विधवेच्या मृत पतीच्या कुटुंबात करता येत नाही. मुलींची लग्ने १४ ते १८ वयात तर मुलांची १८ ते २५ वयात होतात. मार्गशीर्ष ते वैशाख महिन्यात लग्न करतात. कारण या दिवसात नवीन पिके तयार झालेली असल्याने त्यांच्या कणग्या धान्याने भरलेल्या असतात. साखरपुडयाने लग्नविधीस प्रारंभ होतो. लग्नात चाळीस विधी असतात. हे विधी धवलारीणीच्या म्हणजे स्त्रीपुरोहितेच्या देखरेखीखाली होतात. प्रत्येक विधीच्या वेळी ती त्या विधीचे गाणे म्हणते. त्या गाण्यांना धवळे म्हणतात. मंडप देवतेची प्रतिष्ठापना व माळ घालायला लावणे हे दोनच विधी ब्राह्मण पुरोहित करतो. गौरीपूजन करुन नववधूची सुपाच्या मिरवणुकीने सासरी बोळवण करणे यास 'ववसा' म्हणतात. पहिल्या बाळंतपणानंतर आगरी तरुणी सासरी जाते. तेव्हा तिचे थाटामाटात स्वागत होते.

त्यास 'पानवेत' म्हणतात. आगरीच्या वैवाहिक जीवनातील हे दोन आनंदाचे कार्यक्रम असतात.

आगरी प्रामुख्याने खंडोबा, बहिरी, भवानी, म्हसोबा आणि मारुतीला भजतात. त्यांचे उत्सव साजरे करतात. श्रावण महिन्यात **पांडवप्रताप** व **रामविजय** सारख्या धार्मिक ग्रंथांचे पारायण करतात. गणेशोत्सव व होळी हे त्यांचे महत्त्वाचे सण होत. ते अंधश्रद्धाळू असून भूतपिशाच्च्यावर त्यांचा विश्वास असतो. त्यामुळे मंत्रोपचार करण्याकडे त्यांचा कल दिसतो. त्यांच्यात अंत्यसंस्कार विधी इतर हिंदू समाजासारखेच असतात.

आगरी खेड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात फक्त आगरींचीच वस्ती असते. एका खेडयात ५० ते ६० घरे असतात. मोठ्या खेड्याचे पाडे (भाग) पाडलेले असतात. एका पाड्यात एकाच आडनावाची २५ ते ४० कुटुंबे राहतात. त्यांची घरे चौकोनी असून मातीच्या भिंती व गवतांचे छप्पर असते. आगरी आतिथ्यशील, काटक व कष्टाळू असतात. महिला घरातील कामाबरोबर हंगामाच्या दिवसात शेतातही कामे करतात. आगरी पुरुष धोतर, सदरा व महिला आखूड लुगडे गुडघ्यापर्यंत नेसतात. त्यांची लुगडे नेसण्याची पध्दती विशेषतापूर्ण असते. जुन्या वळणाच्या महिला घराबाहेर पडताना घोंगडीवजा असलेला खोंडा डोक्यावर घेतात. आगरी मांसाहारी असले तरी डाळ, भात, तांदळाची किंवा नागलीची भाकरी, मासळीची आमटी हे त्यांचे मुख्य अन्न होय. आगरी घरात व घराबाहेर मराठी भाषा बोलताना आढळतात. गणेश चतुर्थी, गौरी, दिवाळी, होळी यासारख्या सणांना ते मोदक व पुरणपोळीचे पक्वान्न करतात. गणेश नाच व होळी नाच हा त्यांचा सांस्कृतीक ठेवा आहे.

आगऱ्यांची जातपंचायत असून तिच्या प्रमुखास मुकादम म्हणतात. जातपंचायतीच्या नियमाविरुध्द वर्तन करणाऱ्यास समज दिली जाते अथवा दंड केला जातो. परंपरेने मीठ तयार करण्याच्या व्यवसायात आता फारच थोडे आगरी दिसतात. बहुसंख्य लोक शेती व शेतमजुरी करतात. खार जमिनीतही भाताचे पीक काढण्यात त्यांची कुशलता दिसून येते. शिक्षणाच्या प्रसारामुळे असंख्य आगरींनी पांढरपेशा वर्गात स्थान प्राप्त केले आहे[४].

आंध (अंध) : शेतमजूर अथवा अत्यल्प भूधारक असलेली आणि परंपरेने शेती व शिकार करुन उदरनिर्वाह करणारी ही जमात यवतमाळ, अकोला, बुलढाणा, नांदेड व परभणी जिल्ह्यांतील डोंगराळ भागात आढळते. रसेल यांच्या मते आंध लोक आंध्र किंवा तामीळ भागातील द्रविड लोकांपैकीच असावेत. आंध ही आंध्रपासूनची व्युत्पत्ती असावी. त्यांनी स्थलांतर केल्यावर हे नाव प्राप्त झाले असावे. १९३१ मध्ये विदर्भात आंध हिंदूंची लोकसंख्या ५८,५१९ होती. १९८१ च्या जनगणनेच्या वेळी या जमातीची महाराष्ट्रातील लोकसंख्या २,३१,८७१ होती. उंचीने ठेंगणे, वर्णाने सावळे, जाड ओठ, मध्यम कपालिक, पसरट नाक आणि रुंद चेहरेपट्टी ही या जमातीत दिसणारी शारीरिक लक्षणे आहेत. याबाबतीत त्यांचे गोंड जमातीशी बरेच साम्य दिसते.

या जमातीचे वरताती म्हणजे औरस व खालताती म्हणजे अनौरस हे दोन भेद असून त्यांच्यात परस्पर विवाह होत नाहीत. त्यांची बहुतांश आडनावे मराठीशी मिळती जुळती असून ती गाव, प्राणी, पक्षी व झाडांच्या नावांशी निगडित आढळतात. उदाहरणार्थ : माजीरीया, डुकरे, टिटवे, वाघमारे, उमरे इत्यादी.

विवाहाच्या संदर्भात समान आडनाव असणाऱ्या व्यक्तींचा गट हा बहिर्विवाही गट म्हणून ओळखला जातो व अशा गटातील स्त्री-पुरुषांचा विवाह होत नाही. आतेबहीण व मामेबहीण यांच्याशी विवाह करण्याची परंपरागत पध्दती लोकप्रिय आहे. घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाह रुढी संमत आहे. परंतु विधवेस स्वतःच्या दिराशी विवाह करता येत नाही. विवाहपूर्व दिवस गेलेल्या स्त्रीचा विवाह संबंधीत पुरुषाबरोबर लावण्याचा निर्णय जातपंचायत देते. ते हिंदु असून महादेव, खंडोबा, राम, कृष्ण इत्यादी देवतांची उपासना करतात. परंतु मारुतीची उपासना सर्व आंध करतात. आखाडी, गुढीपाडवा, नागपंचमी, पौहा, महाशिवरात्री, दसरा, होळी इत्यादी सण साजरे करतात.

ही जमात मांसाहारी असून डुकराचे मांस व पक्षांचे मांस खातात. काही ठिकाणचे आंध मांजर, उंदीर व ससाही खातात. परंतु आता या जमातीच्या सुधारलेल्या लोकांनी अशा आहाराचा त्याग केलेला दिसतो. ते बहुतांश शाकाही भोजन घेतात अथवा मासे, मटण खातात. या जमातीची जातपंचायत असून पंचायत प्रमुखास मोहतारीया व अधिकाऱ्यास फोपटिया अथवा डुकरीया म्हणून संबोधतात.

शेती हा त्यांचा प्रमुख परंपरागत व्यवसाय असून, शिकार आणि वनस्पती गोळा करणे हे दुय्यम व्यवसाय आहेत. अलीकडील काळात आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे व विविध विकास योजनांमुळे आंध जमातीच्या राहणीमानात सुधारणा होत आहे. या जमातीचा अंतर्भाव महाराष्ट्रात अनुसूचित जमातीमध्ये केला आहे. या जमातीत साक्षरतेचा प्रसार होऊ लागला आहे. १९८१ मध्ये या जमातीत साक्षरतेचे प्रमाण १८.८५ टक्के होते. शासकीय सेवेत लिपिक. शिक्षक व्यवसायात या जमातीचे लोक आता दिसू लागले आहेत.

कातकरी: कातकरी, काठोडी, काथोडी या नावांनी ओळखली जाणारी ही आदिवासी जमात पश्चिम महाराष्ट्रात सह्याद्री पर्वतराईत राहते. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे या जमातीची लोकसंख्या १,७४,६०२ होती. या जमातीला

कातकरी हे नाव खैर झाडाच्या चिकापासून कात करण्याच्या त्यांच्या व्यवसायावरुन पडलेले दिसते. काठोडी या शब्दाचाही अर्थ तोच म्हणजे कातवडी करणारे असा आहे. इतिहासकार वि. का. राजवाडे यांच्या मते "कृतीपट्टीन" (म्हणजे कातडे वापरणारा) या शब्दाचा अपभ्रंश होऊन कातवडी नाव पडले असावे. त्यांच्या मते कातकरी इ. स. पूर्व ५०००-६००० वर्षे सह्याद्रीच्या माचावर राहत असावेत व ते महाराष्ट्रातील आद्य रहिवासी असावेत. आपली उत्पत्ती रामाच्या वानरसेनेपासून झाली, असे कातकरी सांगतात. कातकरी ही जमात मूळात भिल्ल जमातीचा भाग होती. यांची सर्वाधिक वस्ती रायगड व ठाणे जिल्ह्यांत आढळते. ही जमात ढोर कातकरी, ढोर काथोडी, सोन काथोडी व सोन कातकरी या सजातीय गटांमध्ये विभागली असून त्यांच्यात रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. सोन कातकरी स्वतःला उच्च समजतात. ते प्रामुख्याने रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांत आढळतात. ढोर कातकरी मेलेल्या जनावरांचे मांस खातात म्हणून त्यांना ढोर कातकरी म्हणतात. ते विशेषतः ठाणे, नासीक जिल्ह्यांत आहेत. या सर्वांची गणना अनुसूचीत जमातीमध्ये करण्यात आली आहे.

कातकरी रंगाने काळे ठेंगणे, काटक, राकट, चपळ असतात. परंतु ते संशयी व भित्रे असतात. चालताना गुडघ्यात बाक देऊन चालतात. वृध्दापकाळापर्यंत बहुसंख्य कातकऱ्यांचे केस काळे असल्याचे आढळते. ते रान उंदीर, खार, माकड, मोर, यांचे मांस, मासे, कंदमूळे आणि नाचणी, वरी व हरिकची भाकरी खातात. त्यांना दारु फार प्रिय असते. धार्मीक विधीतही दारुचा उपयोग करतात. त्यांची उपजीविका मुख्यतः शेतमजुरीवर अवलंबून आहे.

कातकरी जमातीची विभागणी बहिर्विवाही कुलांमध्ये झाली आहे. त्यांच्यात एकूण ९३ कुळी आढळतात. एकाच कुळातील व्यक्तींचा विवाह होत नाही. कुळनामाचा वापर आडनावे म्हणून करण्यात येतो. झाडे, धंदा व प्राणी यावर आधारीत किंवा कुणबी, मराठा अथवा अल्पसंख्याकांच्या आडनावांप्रमाणेच आडनावे असतात. आदिवासी म्हणून कातकऱ्यांची स्वतःची अशी आडनावे आढळत नाहीत. आहीर, भोई, गायकवाड, कामडी, मोरे, मुकणे, शेलार, वाघमारे, हिलम, निकुले, राऊत, पाटील, शिंदवा, भगरे, भोये, बरफ, दिवा, गोडे, पवार, सांभार, वाघ, वळवी इत्यादी आडनावे आढळतात. मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा आहे. परंतु आतेबहीण आणि मावसबहीण यांच्याशी विवाह होत नाही. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटास कातकऱ्यांच्यात मान्यता आहे. घटस्फोट जातपंचायतीच्या परवानगीनेच घेतला जाते. मृत व्यक्तीचे दहन केले जाते. परंतु लोकांचा कल मृताचे दहन करण्याकडे अधिक दिसून येतो. दफन करताना प्रेताबरोबर तीरकमठा, कोयता, चिलीम इत्यादी वस्तू पुरतात. दात न आलेल्या व देवीच्या साथीत मृत होणाऱ्या व्यक्तीचे दफन केले जाते. कातकरी हिंदूधर्मीय आहेत. त्यांच्यात खंडोबा, भैरव, भवानी आणि कासारी या देवतांची उपासना अधिक लोकप्रिय आहे. वाघदेव हा त्यांचा प्रमुख देव आहे. त्यांचा भूतपिशाच्चावर विश्वास असून त्यापासून त्रास होऊ नये म्हणून ते वेताळ, जरीमरी, चेडा, मावळ्या यांना भजतात. पितरांना ते अतिशय पूज्य मानत असल्याने सर्वपित्री अमावस्येला त्यांना तांदळाची खीर, वडे व गोड पदार्थ अर्पण करतात. कातकऱ्यांची खास बोलीभाषा असली तरी मराठी ही त्यांची मातृभाषा असल्यासारखीच आहे. कातकऱ्यांचे तुंबडी वादन व नृत्य ही एक खास विशेषता आहे[५].

कोरकू (कोर्कू) : मुंडा व कोलारियन गटात मोडणाऱ्या या जमातीची वस्ती सातपुडा पर्वताच्या दोन्ही बाजूला म्हणजे मध्यप्रदेशातील निमार, बेतूल आणि छिंदवाडा जिल्ह्यांत व महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील मेळघाट तसेच अकोला व बुलढाणा जिल्ह्यांतही दिसते. विदर्भाच्या उत्तर डोंगरपठारावर मेळघाट ते महादेवाच्या डोंगरापर्यंत प्रामुख्याने या जमातीची वस्ती आढळते. या जमातीस एकांतवास आणि शांत जीवन अत्यंत प्रिय असल्याने यांची वस्ती डोंगरकपारी व घनदाट अरण्यात दिसते. १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात यांची लोकसंख्या १,१५,९७३ होती.

या जमातीच्या उत्पत्तीची कथा पुढीलप्रमाणे सांगितली जाते. रावणाने महादेवाला विंध्य आणि सातपुडयाच्या डोंगराळ भागात मनुष्यवस्ती निर्माण करण्याची विनंती केली असता महादेवाने तांबड्या मातीचे दोन पुतळे करुन त्यांना जिवंत केले व त्यांना मुला व मुलाई ही नावे दिली. हेच कोरकू जमातीचे पूर्वज मानले जातात. मेळघाटातील कोरकू स्वतःला रावणाचे वंशज मानतात. काहींच्या मते महाभारतकालीन कूर्मवंशी राजाचे ते वंशज असावेत.

रसेल यांच्या मते कोरु म्हणजे कोरकू भाषेत मनुष्य होय. कोरकू या शब्दांची व्युत्पत्ती लावताना कोरकू भाषेत कोरा म्हणजे वाट आणि कोरकू म्हणजे वाटसरु असाही अर्थ लावला जातो.[६] कोरकू लोकांच्या भटक्या व अस्थिर वास्तव्यावरुन ही व्युत्पत्ती बरोबर असावी असे वाटते. उच्च नीतिमत्ता व अत्यंत प्रामाणिकपणा यामुळे कोरकू भाषेत कोरकू या शब्दाला सभ्य सदाचारी गृहस्थ असाही अर्थ प्राप्त झाला आहे.

कोरकू जमातीची विभागणी माव्हसी (मोवासी), रुमा आणि बोंडोया या तीन प्रादेशिक गटांत झाली आहे. हेच गट प्रत्येक बत्तीस बहिर्विवाही गटांत विभागले गेले आहेत. पहिल्या दोन पोटजातींना राजकोरकू असेही म्हणतात. ते

मुख्यतः जमीनदार आहेत. मोवासी आपण नागवंशी असल्याचे सांगतात. त्यांची नावे झाडे, पशुपक्षी, प्राणी अथवा वस्तू यावरुन पडलेली दिसतात. रसेल यांच्या मते गोंड व कोरकू शतकानुशतके एकत्र राहील्याने त्यांच्या रितीभातीत पुष्कळ साम्य आले आहे. मात्र केवळ महाराष्ट्रात आढळणारे कोरकू स्वतःला उच्च समजतात.

एकांतवासामुळे त्यांची प्रगती होऊ शकली नाही. पुर्वी ही जमात एका ठिकाणी वास्तव्य करीत नसे. स्थायीक झाले तरी पक्क्या घरात राहणे ही गोष्ट निषिद्ध मानत असल्याने अजूनही ते पक्की घरे न बांधता झोपडीतच राहतात. शेती, पशुपालन, जंगलातील मजुरी त्याचप्रमाणे जंगलातील तेंदूची पाने, मध, कंदमुळे जमा करणे हे व्यववसाय कोरकू करतांना दिसतात. आता पूर्वीप्रमाणे ते शिकार करीत नाहीत. त्यांच्यात विवाहाचे मुलाचे वय १५ ते २० व मुलीचे वय १२ ते १७ च्या दरम्यान असते. विवाह न करताही स्त्री पुरुष एकत्र राहू शकतात. तसेच घरघुशी ही पध्दती देखील रुढ आहे. एखादी मुलगी आपल्या पसंतीच्या मुलाच्या घरात घुसते व कालांतराने तिचा स्वीकार पत्नी म्हणून होतो. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा आहे. विवाह समारंभ होळीच्या सुमारास होतात. लग्नात बोरीच्या झाडाचे महत्व फार असते. कन्यादानाबद्दल मुलीच्या वडिलांना मुलाचे वडील दक्षिणा देतात.

कोरकू हिंदू धर्म मानतात. ते मूर्तिपूजक असून त्यांची कुळे ही निरनिराळया देवतांची उपासक आहेत. प्रत्येक गावाला ग्रामदेवता व देव असतात. श्रीकृष्ण हा त्यांचा आवडता देव असून ते अर्जून व भिमालाही देव मानतात. तसेच ते रावणाचेही पूजक आहेत. डोंगरदेव, माता, तसेच वाघासारख्या जनावरांपासून संरक्षण करणाऱ्या देवतांची पूजा करतात. त्याचप्रमाणे सूर्य, चंद्र त्यांच्या मुख्य देवता होत. या तेजोगोलांना त्यांच्या भाषेत गोमज (Gomaj) म्हणतात. मंत्रतंत्र, जादूटोण्यावर त्यांचा विश्वास आहे. देव अंगात आणण्यासाठी "घुमण्या सिरींज" हे देव जागविण्याचे विशिष्ट गाणे म्हणतात. त्यांच्या धर्मगुरुस "भूमका" व मंत्रतंत्र करण्यास "पड्याळ" (Padyal) म्हणतात. मृत व्यक्तीचे ते दफन करतात.

या जमातीची स्वतःची बोलीभाषा आहे व तिचे छोटा नागपूरमधील कोल जमातीच्या बोलीभाषेशी साम्य आहे.या भाषेवर उर्दु प्रमाणेच वऱ्हाडी बोलीचा प्रभाव दिसतो. ते आपापसात कोरकू भाषेत व इतर लोकांशी मराठी अथवा हिंदीमध्ये बोलतात.

सर्वसाधारण कोरकू जमातीत डोक्याला फाटके मुंडासे आणि कमरेला लंगोटीवजा वस्त्र गुंडाळलेले आढळते. डोक्यावर काही नसणे अशुभ समजतात. स्त्रिया लुबू म्हणजे दहावारी रंगीत लुगडे व चुर्गी म्हणजे चोळी घालतात. पूर्व काही स्त्रिया चोळी घालत नसत. साडीचोळीमध्ये रंगसंगतीपेक्षा रंगातील विरोधच कोरकू महिलांना आवडतो. काही महिला पायात वजनाने हलक्या खास कोरकू वायना म्हणजे मागून बंद असलेल्या सँडल घालतात. वायना घातल्याशिवाय घराबाहेर जात नाहीत. गळ्यात पोवळे, कवड्या व रंगीत काचमण्यांच्या माळा घालतात. पितळ व चांदीचे दागिने वापरतात. त्यांना फुलांच्या माळा करण्याची फार हौस असते. निसर्गरम्य वातावरणातील गायन व नृत्य हीच त्यांची करमणूक असते. कोरकू स्त्री-पुरुष एकत्र नृत्य करीत नाहीत व त्यांचे नृत्य प्रकारही वेगळे आहेत. पुरुषांच्या नृत्याला "चुसुन" किंवा "सुसुन" आणि महिलांच्या नृत्याला "गाडुली" म्हणतात. भारताच्या राजधानीतील प्रजासत्ताक दिन सोहळयात कोरकू नृत्याला प्रथम पारितोषिकेही मिळाली आहेत. भावे हा वर्षारंभाचा सण वैशाख अमावस्येला साजरा करतात. भावे सणातच लहान मुलांचा गणमाय सण साजरा करतात. हा कोरकू बालक दिनच होय.

कोलाम : कोलाम ही महाराष्ट्रात द्रविडी गटात मोडणारी अनुसूचीत जमात असून पं. हिरालाल यांच्या मते कोलाम लोक मूळचे निलगिरी जिल्ह्यातील कोलंबाई टेकड्यांतील असावेत. कोलम, कोळम, कोलमा किंवा कोल्हमा, कोल्हाम व कोलामा या नावांनी ही जमात ओळखली जाते. परंतु या जातीचे खरे नाव कोलाम किंवा कोलावान असे असून ही उप-जमात नसलेली जमात आहे. कोलाम किंवा कोलावान नाव कसे पडले या विषयीची माहिती उपलब्ध नसली, तरी संस्कृतमध्ये "कोल" या शब्दाचा अर्थ वराह असा होतो. वराहाची शिकार करण्यात अतिशय वाकबगार असलेला हा कुशल शिकारीवर्ग कोलाम किंवा कोलावान या नावाने ओळखला गेला असावा. १९३१ च्या जनगणनेनुसार विदर्भात हिंदू व आदिवासी धर्मीय कोलामांची संख्या ५८,५१९ होती. १९८१ च्या जनगणनेनुसार या जमातीची महाराष्ट्रातील लोकसंख्या १,१८,०७३ होती. यांची वस्ती महाराष्ट्रात मुख्यत्वे विदर्भामध्ये अमरावती, यवतमाळ, वर्धा व चंद्रपूर आणि मराठवाड्यामध्ये नांदेड, बीड आणि परभणी या जिल्ह्यांमध्ये आहे. त्यातल्या त्यात यवतमाळ जिल्ह्यात त्यांची लोकसंख्या अधिक आढळते. हे लोक वऱ्हाडच्या चारही जिल्ह्यांत प्रथमपासून असावेत, मग ते इतरत्र पसरले असावेत.

कोलाम रंगाने काळे, धष्टपुष्ट बांध्याचे व इतर बाबतीत आंध आणि कुणबी यांच्यासारखे आहेत. गोंड जमातीशी त्यांचे बरेच साम्य आहे, पण गोंड आणि कोलाम यांच्यात विवाह संबंध होत नाहीत. गोंड स्थानीक राजे अथवा जमीनदार होते, तर कोलाम त्यांचे नोकर किंवा सेवक होते. कोलाम हे आपापसात कोलामी या त्यांच्या बोलीभाषेत

बोलतात. सुप्रसिध्द भाषाशास्त्रज्ञ ग्रीअरसन यांच्या म्हणण्याप्रमाणे कोलामी बोली ही गोंडी बोलीच्या जवळची आहे. काही बाबतीत या बोलीचे कन्नड, तामीळ आणि तेलुगु भाषांशीही साम्य आहे. डॉ. एम. बी. एमेन्यू, डॉ. केतकर व डॉ. इरावती कर्वे या अभ्यासकांनी संशोधनाअंती त्यांच्या भाषेला कोलामी असेच नाव दिले. महाराष्ट्रात राहत असल्यामुळे ते इतरांशी मराठी व हिंदीत बोलतात. काही कोलाम स्वभाषेपेक्षा मराठी अधिक चांगले बोलतात. इतकेच नव्हे तर त्यांच्यातील स्त्री-गीते मराठी भाषेतील असून काही कुलनावे मराठ्यांसारखी आहेत.

कोलाम जमातीचे प्रमुख व्यवसाय म्हणजे शिकार, शेती व शेतमजुरी होय. याखेरीज बांबूपासून टोपल्या, चटया तयार करण्याचा व्यवसायही करतात. ते मांसाहारी असले तरी मांस विकत घेऊन खात नाहीत, शिकार करुनच मांस भक्षण करतात. मात्र हनुमानावरील भक्तीमुळे वानर मारीत नाहीत. कुत्रा व मांजरासारख्या पाळीव प्राण्यांना मारणाऱ्या कोलामांना जातिबाह्य टाकण्यात येते.

कोलमांच्यामध्ये पोटजाती नाहीत. कुलदेवतांच्या पूजेवरुन चारदेवे, पाचदेवे, सहादेवे व सातदेवे असे चार बहिर्विवाही कुलगट पडले आहेत. एकाच कुलगटात विवाह निषिध्द मानतात. त्यांच्या असोळा, आनम, अर्जल, बोधे, भोसे, चांदेकर, दाढे, घुमटे, जुनघरे, इत्यादी कुळनावे आहेत. कोलमांच्यात अत्राम, अरधुने, आस्वले, कसार, कापरे, किनारे, किरीट, वुंभरे, वुंभेकर, कोंढेकर, कोमटी, कोल्हे, खडसे, गुजाराम, गुंजटे, घासाडे, घाटेकर, घुमटे, जांभे, चांदेकर, झेडगे, झोले, टेकाम, डेबरे, ढोबरे, तलवारे, ताडाम, दाढे, दाभे, दाभेकर, देवगडे, देवटकर, धोटे, पाठोले, नाईकवाडे, पाडसी, बोदे, बाडे, बोरकर, भिवईकर, भिवनकर, भोराडे, भोसे, भोसेकर, मडावी, मराठे, मसराम, मांगुर्ले, मादनी, मारेगाम, मुंजाळे, मोरे, मुंढेकर, मोवरे, येडसे, राऊत, राजूर, राजूरकर, रामगडे, रामपूरे, लुंगसे, लोणकर, लव्हाणे, वडे, वरझकर, वाढोडे, शिंदे, शिबले, सकरापूरे, सापोडे, सिवणकर, सुकली, सोरांबले, हिवरी, इत्यादी आडनावे आढळतात. विवाहाच्या वेळी मुलाचे वय १७ ते १९ व मुलीचे वय १२ ते १४ असते. मामेबहिणीशी लग्न करता येते, परंतु आतेबहीण व मावसबहिणीशी लग्न करता येत नाही. कोलामात "घरघुशी" हा विवाहाचा प्रकार आहे. मुलीला पळवून नेऊन लग्न करण्याची पध्दती पूर्वी कोलामात होती. आता ही प्रथा बंद पडली असली, तरी एक लाक्षणीक विधी म्हणून ही प्रथा आजही पाळली जाते. कोलाम जमातीतील "वेताळक" नामक व्यक्ती त्यांचा भटजी म्हणून विवाहाचे पौरोहित्य करतो. लग्नासाठी शनिवार व बुधवार जास्त शुभ तर सोमवार अशुभ समजतात. विधवा विवाहास जमातीची मान्यता आहे, परंतु विधवेला विधुराशीच विवाह करावा लागतो. दिराशी विधवेने विवाह करण्याची पध्दती नाही. तसेच पुरुषास पुनर्विवाहासाठी धाकटी मेहुणी जाती नियमान्वये चालत नाही. घटस्फोटास जमातीत मान्यता आहे.

कोलामांची देवदेवतांवर विलक्षण श्रध्दा असते. त्यांच्या देवदेवतांची नावे देवी, आया, बेक, कारायमेराय, माणकूबाई, लाळाबाई, भुताय, वाघाय, भोवानी, सावारी, भीमाय्याक, सानसुर्याक, पारध्याक, जयतुर, चाणखाण, कलासूर, चुराघाली (माट्या), दहीत, बहीस, सकोबा, म्हसोबा, भयरुप, मेटी दियाम, दियाम साटवन, मोराम, महादेव, मारुती, इत्यादी होत. त्यांच्या सणांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- फणमोडी (वर्ष प्रतिपदा), मोहडोंबरी (अक्षय तृतिया), गावबांधणी (वैशाख ते ज्येष्ठ महिन्यात केव्हाही), माट्या (उन्हाळ्यात), चैत (चैत्र पौर्णिमा), भीमायाकाला बी देणे (पाऊस येण्यापूर्वी २-३ दिवस किंवा पाऊस सुरु झाल्यावर २-३ दिवसांनी), भीमाय्याकाची आंघोळ (वैशाख), मोराम देवाचा उत्सव (नव्याने वस्ती वसवितांना, नंतर दर तीन वर्षांनी), वाघाईची पूजा (आषाढी पौर्णिमा), जयतूर देवाची पूजा (आषाढातील शेवटचे दोन-तीन दिवस किंवा श्रावणानंतर दोन-तीन दिवसांनी), फारगुल व काष्टापेंडी, नागपंची, फुलझडणी किंवा झाडपेरणी (नागपंचमी), पोका (पोळा), अतारी (पोळ्यानंतर), अखरपख (पितृमास अमावस्या), दसरा, दिवाळी, मोहरम, मेटी दियाम (हिवाळा), पेट्टा दियाम (पौष), आईची पूजा (माघ) आणि होळी.

त्यांच्या सामाजीक जीवनावर हिंदू चालीरीती आणि प्रथांचा मोठा प्रभाव पडल्याचे दिसते. कोणताही उत्सव नृत्याशिवाय पूर्ण होत नाही. "इतिहास" नावाच्या कार्यक्रमात कोलाम जनजीवनाचे संपूर्ण चित्र नृत्य गायनाच्या रुपाने साकार करण्यात येते. त्यांना औषधी वनस्पतींचे चांगले ज्ञान असते. अपराधी पुरुष व स्त्रियांना जात पंचायत वाळीत टाकते. जातीत पुन्हा प्रवेश घेण्यासाठी अपराध्याचे डोके नदीत बुडवून न्हावी त्याचे डोक्यावरचे केस कापतो. स्त्रियांच्या बाबतीतही हाच नियम लागू असतो. त्यांच्यात मृत व्यक्तीचे दफन केले जाते. कोलामांची खेडी ही योजनाबध्द व स्वच्छ असतात. ज्या जागेवर खेडे वसवायचे तेथे या जमातीचा पुजारी चारही दिशांना खुंट ठोकतो. अशा चौकोनी जमीनीच्या पट्टयावर ओळीत घरे बांधण्यात येतात. त्यांची घरे गवती छपराची असतात. वस्तीच्या मध्यभागी चावडी बांधतात. वाढत्या वस्तीला जागा अपुरी पडल्यास सीमा दाखविणारे खुंट उपटून पूजारी ते थोडे लांब ठोकतो[७].

कोहळी : कोहळी जातीची वस्ती भंडारा जिल्ह्यातील साकोली, अर्जुनी मोरगांव, लाखांदूर, मोहाडी, तुमसर, भंडारा, सडक-अर्जुनी, देवरी आणि चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर, मूल, नागभीड, व गडचिरोली जिल्ह्यातील

कुरखेड्यात प्रामुख्याने आढळते. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या जातीची लोकसंख्या २६,००० होती. ऐतिहासीक काळात या जातीचे लोक बाहेरुन महाराष्ट्रात आलेले दिसतात. त्यांच्या मूळ वसती स्थानाबद्दल दोन आख्यायिका प्रचलित आहेत. एका आख्यायिकेनुसार चंद्रपूरचा गोंड राजा ज्यावेळी बनारसला गेला होता त्यावेळी त्याने येतांना या जातीच्या काही लोकांना बरोबर आणले व त्यांनी आपल्या बांधवांचा महाराष्ट्रात विस्तार केला. भंडारा जिल्ह्यातील कोहळी लोकांच्या सांगण्यानुसार या जातीची पहिली वसाहत बालाघाटमधील लांजी या गावी होती. उत्तर हिंदुस्तानातील कोथरी ही फळभाज्यांच्या बागा करणारी जात व कोहळी जात एकच असल्याचा तर्क आहे. काही बाबतीत उत्तर हिंदुस्थानी संस्कृतीच्या खाणाखुणा या जातीत दिसतात. चंद्रपूर जिल्ह्यातील कोहळी हे आपण दक्षिण भारतातून आलो असे मानतात. या मतास काही मानववंश शास्त्रज्ञही पाठींबा देतात व कोहळी हे पश्चिम महाराष्ट्रातील कोळी जातीचे असावेत असे मत प्रतिपादन करतात. परंतु या मताला पुरावा नाही. कोहळी जात उत्तर हिंदुस्तानातून महाराष्ट्रात आली असण्याची जास्त शक्यता या जातीतील महिलांच्या पेहरावावरुन आणि बोलीभाषेवरुन वाटते.

भंडारा जिल्ह्यातील पूर्वीच्या साकोली तालुक्यात शेतीस उपयोगी पडणारे मोठमोठे जलाशय या जातीतील लोकांनी बांधल्याचे १९०८ च्या **भंडारा गॅझेटीअरमध्ये** नमूद केलेले आहे. यापैकी नवेगांव बांध व शिवनी बांध उल्लेखनीय आहेत. ते भाताबरोबर उसाची शेती करतात. इतरत्र गुळ तयार करण्याचे काम मोठ्या प्रमाणावर मजूर लावून केले जाते, परंतु कोहळी जातीचे लोक गूळ बनविण्याचा गृहोद्योग करतात. हा गूळ विक्रीसाठी ठेवण्यात येतो. या कामात घरातील लहान-थोरांपासून सर्वजण भाग घेतात. या व्यवसायात बरेच मनुष्यबळ लागत असल्याने कोहळी जातीत पूर्वी बहुभार्या पध्दती अस्तित्वात होती. आर्थीकदृष्ट्या पत्नी हा कुटुंबातील एक महत्त्वाचा घटक असल्याने तिच्या हातून वैवाहिक जीवनात काही चूक झाल्यास त्याकडे दुर्लक्ष केले जात असे. विधवा पुनर्विवाह संमत आहे, पण घटस्फोट क्वचितच घेतला जातो. दुसऱ्या पतीचे प्रतिक म्हणून विधवेचा विवाह तलवारीशी केला जातो. तिचा पती प्रत्यक्षात विधीला उपस्थित नसतो. या जातीत मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा आहे. अनेक गावांतील कोहळी जातीतील सर्व विवाह एकाच दिवशी एकत्र सामुदायीक विवाह पध्दतीने साजरे होतात. अल्पसंख्यांक असल्याने अशी पध्दती असावी. विवाहासारखे संस्कार पुरोहिताच्या उपस्थितीत होतात. विवाहप्रसंगी चांभाराकडे असलेली रापी, खुरपा यांच्या लाकडी प्रतिमा बनवितात, कारण या वस्तू चर्मकार व्यवसायाशी संबंधीत आहेत. लग्नाच्या दुसऱ्या दिवशी न्हावी व धोबी वधूवरांना उचलून गाणी म्हणतात व नाचतात, तर इतर लोक वधूवरांवर गुलाल उधळतात. कोहळी जातीत पोटजाती नाहीत. विवाहाच्या संदर्भात कूळ हा महत्त्वाचा घटक समजला जातो व एकाच कुळात विवाह होत नाहीत. ही कुळे देवक पध्दतींवर आधारलेली नाहीत हे त्यांच्यातील आडनावांचा विचार केल्यावर लक्षात येते. त्यांच्यातील काही आडनावे पुढील प्रमाणे आहेत :- हटवार, हटवादे, मुंगुसमारे, पुस्तोडे, लांजेवार, नाकाडे, मुंगमोडे, खुणे, कापगते, काशीवार, गहाणे, गोबाडे, लंजे, बोरकर, समरीत, शहारे, परशुरामकर, डोंगरवार, गोपाले, बुध्दे, हातझाडे, इत्यादी. जातीबाहेर विवाह करणाऱ्या व्यक्तीस वाळीत टाकले जाते. कोहळी लोक मांसाहारी आहेत, पण दारु पिणे निषिद्ध मानतात. मृतदेहाचे दहन करतात. अलीकडे शिक्षणाचा प्रचार झाल्याने काही व्यक्ती नोकरी पेशातही आढळतात.

कोळी : व्यावसायीक व सांस्कृतीकदृष्ट्या एकमेकापासून भिन्न असलेले कोळी हे सामान्य नाव असलेले लोक महाराष्ट्रात सोनकोळी, महादेव कोळी (डोंगरकोळी), मल्हार कोळी व ढोरकोळी या स्वतंत्र जातींमध्ये मोडतात. यापैकी सोनकोळी हे कोकणात पश्चिम किनारपट्टीवर मच्छीमारी करणारे होय. उर्वरित कोळींची वस्ती सह्याद्री व सातपुड्याच्या डोंगराळ भागात आढळते. महादेव कोळी, मल्हार कोळी व ढोरकोळी यांचा समावेश आदिवासी तथा अनुसूचित जमातीत आहे. १९८१ च्या जनगणनेत सोनकोळींचा समावेश महादेव कोळींमध्ये झाल्याने महादेव कोळीच्या संख्येत वाढ झालेली दिसते. पण ते सोनकोळ्यांहून संपूर्णतया भिन्न आहेत. त्यामुळे या चारही जातींची सामाजीक व सांस्कृतीक वैशिष्टये स्वतंत्ररीत्या दिली आहेत.

कोल या शब्दाचा अर्थ नौका, होडी असा होतो. यावरुन नौकेच्या सहाय्याने मच्छिमारी करणारे ते कोळी असा अर्थ असावा. मात्र संस्कृत शब्दकोशात कोल्हा हा शब्द डोंगरकोळी या जमातीला उद्देशून वापरला आहे व त्यांचे वर्णन डोंगर आणि जंगल भागातील लढाऊ जमात असे केले आहे.

महादेव कोळी : महाराष्ट्रात या जमातीची लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेप्रमाणे २,७४,२४४ होती. तर १९८१ मध्ये ७,८७,४४८ होती.[८] राष्ट्रपतींच्या आदेशात यांचा उल्लेख कोळी महादेव किंवा डोंगरकोळी असा केला आहे. त्यांना हे नाव महादेवाचे भक्त म्हणून अथवा त्यांचे मूळ स्थान महादेव डोंगरात होते यावरुन प्राप्त झाले असावे. परंतु आपण मल्हार कोळींपेक्षा निराळे आहोत असे ते मानतात. महादेव कोळी लोक प्रामुख्याने नाशिक, पुणे, अहमदनगर व ठाणे जिल्ह्यांत वस्ती करुन राहिलेले दिसतात. मॅकिन्टोशच्या मते त्यांचे मूळ वसती स्थान महादेव आणि बालाघाटच्या डोंगरांमध्ये होते व तेथून ते सध्याच्या ठिकाणी आले. ऐतिहासिक काळात महादेव कोळी हे लिंगायत

पंथी होते. विवाह आणि अंत्यसंस्काराच्या वेळी पुरोहित म्हणून ते रावळ गोसाव्यांना बोलावत असत. पेशवाईमध्ये महादेव कोळींनी हिंदू धर्माचा स्वीकार केला.

महादेव कोळी "कुल" हा बहिर्विवाही गट समजतात. समान कुल असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. कॅप्टन मॅकिन्टोशच्या मते या जमातीत २४ कुळे आणि २१८ पोटकुळे असावीत. त्यांच्यात १२ कुटुंबांचा एक गट असे अनेक गट आहेत. या गटांना गोत्रीभाऊ म्हणतात. हे सर्व बहिर्विवाही गट असल्यामुळे त्यांच्यात परस्पर लग्नसंबंध होत नाहीत. परंपरागत पध्दतीत विवाहाच्या वेळी मुलीचे वय ५ ते १० व मुलाचे वय १२ ते १६ असते. अलीकडे मुलगी वयात आल्यावर लग्न जमवितात. मुलीला देज आणि कपडे व धान्यही देतात. मामेबहिणीशी त्याचप्रमाणे बायकोच्या बहिणीशी विवाह करण्याची प्रथा या जमातीत आहे. परंतु आतेबहीण व मावसबहिणीशी विवाह होत नाही. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटास मान्यता आहे, परंतु घटस्फोटास प्रोत्साहन दिले जात नाही. लग्न वधू पक्षाकडे मांडवात होते. वधूवरास रुई अथवा चाफ्याच्या फुलांच्या मुंडावळ्या बांधतात. विवाह लागतेवेळी वधूवर समोरासमोर तोरणाखाली पत्रावळीवर उभे राहतात.

गरोदर महिलेचे ओटीभरण करीत नाहीत. पहिले बाळंतपण सासरी होते. बाळंतीण बाज न वापरता जमिनीवरच झोपते. मूल जन्माला आले की, त्याच्यावर गार पाणी ओततात. त्यास "ओपसावणी" म्हणतात. परंपरेने मृतदेहाचे दफन केले जाते. परंतु अलीकडील काळात दहनाची प्रथा रुढ होत आहे. दुखवटयाच्या कार्यक्रमाच्या वेळी मृताच्या उत्तराधिकाऱ्याला आणि त्याच्या गोत्री बांधवांना जवळचे नातेवाईक पांढरे पागोटे देतात. पागोटे बांधल्यावर त्यांचे अशौच संपते अशी समजूत आहे.

खंडोबा, भैरोबा, एकवीरा व भवानी देवी यांची पूजा महादेव कोळी करतात. परंतु महादेव कोळ्यांची वरसुबाई ही रोग निवारण करणारी विशेष देवता आहे. तसेच वाघदेव, मारुती, राम, शिव, कृष्ण, कळसूबाई, जाकुबाई, सतुबाई, रानाई, कमळजा यांनाही मानतात. ते अंधश्रध्दाळू असून त्यांचा नवस व मंत्रतंत्रावर फार विश्वास असतो.

महादेव कोळी वर्णाने काळे, ठेंगणे परंतु बळकट असतात. पुरुष लंगोटी अथवा धोतर नेसतात व महिला नऊवारी लुगडे व अंगात चोळी घालतात. प्रामुख्याने ते शेती, पशुपालन व शेतमजुरी करतात. ते मांसाहारी असून रोजच्या आहारात नागली व सावाची भाकरी आणि भाजीपाल्यांचा वापर करतात. परंपरेने मद्यपान निषिद्ध नाही.

मल्हार कोळी : मल्हार कोळी जमातीची लोकसंख्या १९६१ च्या जनगणनेनुसार ८९,०४७ व १९८१ मध्ये १,७७,३६८ होती. हे मल्हारीचे भक्त असल्यामुळे त्यांना हे नांव पडले असावे. ग्रामीण भागात या जमातीचे लोक पाणी भरण्याचा व्यवसाय करीत असल्यामुळे त्यांना "पाणीभरे कोळी" असेही म्हणतात. पाण्याचा हंडा डोक्यावर ठेवण्यास चुंबळ बांधत असल्यामुळे त्यांना चुमली कोळी अशी एक संज्ञा प्राप्त झाली. काही मल्हार कोळी कुणब्यांबरोबर राहत असल्याने त्यांना कुनाम कोळी असे म्हणतात. पाणभरे कोळी पूर्वी गडकरी असून गडाच्या संरक्षणाचे काम करीत. सिंहगड, तोरणा व राजगडाचे वंशपरंपरागत गडकरी मल्हार कोळीच होते. डोंगरी किल्ल्यावर जाणाऱ्या रस्त्यांची राखण मल्हार कोळी करीत असत. तसेच ग्रामीण भागात शेतकरी कुटुंबांच्या घरी पाणी भरणे, मेणा अथवा पालखी वाहून नेणे, शिकार करणे इत्यादी कामेही करीत असत. पाणी भरण्याच्या कामाबद्दल त्यांना बलुते दिले जाई. ब्रिटीश काळात ठाणे जिल्ह्यातील जमीनदारांकडे घरगडी म्हणून या जमातीचे लोक काम करतांना दिसत असत. १९६१ च्या जनगणनेनुसार या जमातीतील ६१ टक्के लोक शेती व ३० टक्के लोक शेतमजुरी करीत होते. मराठी भाषा बोलतात व स्वतःच्या जमातीचा उल्लेख मल्हार कोळी अथवा मल्हार कुणबी असा करतात.

या जमातीची विभागणी अनेक बहिर्विवाहीत कुळगटांत झाली आहे. ही कुळनावे आडनावे म्हणून वापरली जातात. तसेच जाधव, लांग, केरव, पोवार, होलार, वेखंडे ही आडनावे आढळतात. एकाच कुळात विवाह संबंध करीत नाहीत. मामेबहिणीशी व मेहुणीशी विवाह करण्याची परंपरा आहे. ब्राह्मण अथवा आपल्या जमातीतील उपाध्यायाकडून विवाह लावला जातो. वराकडून वधूला देज दिला जातो. विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोट या प्रथा संमत आहेत.

त्यांची बोलीभाषा, वेशभूषा, सण, रुढी व उत्सव महादेव कोळ्यांप्रमाणेच आढळतात. धार्मिक जीवनात वाघ्या, हिवरा आणि नारायणदेव या आदिवासी देवतांची पूजा केली जाते. वाघ्या हा गुरांचा रक्षणकर्ता मानला जातो. त्याची स्थापना गावाच्या सीमेवर अथवा उघडयावर चित्र अथवा मूर्तीच्या रुपात करण्यात येते. कार्तीक महिन्यात पूजा करतात तेव्हा बकरा व कोंबडयाचा नैवेद्य दाखवितात. हिवरा देव कुटुंबाचा रक्षक मानला जातो. तो रोगराई व अपघातापासून रक्षण करतो असा समज आहे. त्याचे प्रतीक म्हणून मोराच्या पिसाच्या गुच्छाची पूजा आश्वीन महिन्यात करतात. चवळी, घोसाळे, काकडीचा नैवेद्य दाखवितात.

नारायणदेव हा अचानक येणारे संकट व दुःखापासून रक्षण करतो असे मानतात. पितळेच्या ताटलीवर माणसाचे चित्र असलेले प्रतीक सर्वात वडील कुटुंब प्रमुखाकडे असते. नागपंचमी, गौरी, दिवाळी, होळी इत्यादी सण

उत्साहाने साजरे करतात. उत्सवप्रसंगी नाचगाण्याची प्रथा आहे. जात पंचामार्फत आपले तंटे सोडवतात. भात, तांदुळाची भाकरी हे त्यांचे प्रमुख अन्न होय.

ढोर कोळी : कोळी ढोर, टोकरे कोळी, कोलचा, कोलघा या नावांनी ओळखली जाणारी ही अनुसूचित जमात आहे. या जमातीचे लोक जंगलात मरुन पडलेल्या जनावरांचे मांस खात असल्यामुळे ढोर कोळी हे नाव पडले असावे. १९६१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रात या जमातीची लोकसंख्या १५,४६१ होती, तर १९८१ नुसार ७७,४३५ होती. या जमातीची सर्वाधिक वस्ती ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, कोल्हापूर, सोलापूर जिल्ह्यांत दिसते. त्यांची शारीरिक ठेवण संबंधित परिसरातील अन्य आदिवासी जमातींसारखीच आहे. ते मध्यम उंचीचे, सडपातळ व काळेसावळे असतात. ते मराठी भाषा बोलतात. या जमातीचे लोक शेती, शेतमजुरी व सर्वसामान्य मजुरी, जंगलातून कंदमुळे व वनोत्पादने गोळा करतांना दिसतात.

या जमातीचे विभाजन अनेक बहिर्विवाही कुळांत झाले आहे. ही कुळ नावे आडनावे म्हणून वापरण्यात येतात. काही कुळनावे पुढीलप्रमाणे आहेत :- अंबेकर, आरडे, गायकवाड, गवीट, घटाळ, बामणे, चौधरी इत्यादी. एकच कुळ असलेल्या व्यक्तींचा विवाह होत नाही. मामेबहीण, आतेबहीण व पत्नीच्या धाकटया बहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. परंपरेनुसार विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोटाची प्रथा आहे. मृतदेहावर अग्नी संस्कार केला जातो. परंतु लहान मुले आणि साथीच्या रोगात मरण पावणाऱ्या व्यक्तींना पुरण्यात येते. ढोर कोळी हे हिंदू धर्मीय आहेत. हिवरा, हिमानी, कांसारी या आदिवासी देवतांखेरीज खंडेराव, भैरव, ब्रह्मा आणि भवानी या प्रमुख देवतांची ते उपासना करतात. दिवाळी व होळी हे त्यांचे प्रमुख सण होत. अंगावर गोंदवून घेण्याची प्रथा आहे.

सोनकोळी : सोनकोळी या नावाबद्दल **शिवनिबंध** ग्रंथातील कथेनुसार परमेश्वराच्या सोहम् या ध्वनीपासून सोहं, सोम किंवा मयात या नावांनी ओळखला जाणारा एक मुलगा झाला. मयातच्या मुलीचा मुलगा मार्धन हिंसेकडे वळल्याने मयातने त्यास मासे मारुन उदरनिर्वाह करण्यास सांगीतले. त्याप्रमाणे तो मासेमारी करु लागल्यावर त्याला व त्याच्या वंशजांना सोन किंवा सोनकोळी हे नाव प्राप्त झाले. मच्छीमारीचा व्यवसाय करणारी ही जात प्रामुख्याने कोकणच्या किनारपट्टीवर रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे बंदरापासून ठाणे जिल्ह्यातील अर्नाळा बंदरापर्यंत दिसते. १९३१ च्या जनगणना अहवालानुसार मुंबई इलाख्यात या जातीची लोकसंख्या २२,८९१ होती. तथापी रायगड जिल्ह्यात यांची मूळ वस्ती होती. कोकणावर आंगरे प्रशासन असतांना सोनकोळी महिलांवर जोबनपट्टी अथवा चोळीपट्टी नावाचा कर आकारण्यात येत असे. महिलांनी अंगात चोळ्या न घालता अंगावरुन पदर घ्यावा व ज्या महिलांना चोळ्या घालावयाच्या असतील त्यांनी आंगरे प्रशासनास कर भरावा असे या कराचे स्वरुप होते. या जाचक नियमामुळे अलीबाग व थळ भागातील कोळ्यांनी स्थलांतर केले होते. मात्र कोळी स्वतःला थळकर सोनकोळी म्हणवितात. अलीबागला त्यांची मुख्य वस्ती होती. तेथे त्यांच्या सर-पाटलाचे किंवा जातीच्या प्रमुखाचे मुख्यालय होते. पूर्वी सोनकोळी मासेमारीव्यतिरिक्त सैनिक, किल्लेदार व लढाऊ जहाजांवर नाविक म्हणूनही काम करीत. तसेच शार्क माशाच्या पोटाचा काही भाग वाळवून ते चीनला निर्यात करीत असत. सधा मच्छीमारीव्यतिरिक्त मासे विक्री, जाळी विणणे, लहान मासे वाळवून त्यांचे खत बनविणे, तसेच शेती हे व्यवसाय करतात.

सोनकोळी सावळया रंगाचे गोल चेहऱ्याचे व हाडांनी मोठे तसेच वाकबगार दर्यावर्दी व कणखर असतात. तरुण महिला नाकाडोळ्यांनी नीटस, आकर्षक आणि बळकट बांध्याच्या असतात. मासे मारीचे काम पुरुष करतात, तर माशांची प्रतवारी करुन विक्री आणि मासे वाळविण्याचे काम महिला करतात. सोनकोळींचा पेहराव वैशिष्ट्यपूर्ण असतो. पुरुष कमरेभोवती पुढच्या बाजूस टोक सोडलेला मोठा रंगीत पंचा गुंडाळतात आणि अंगात कुडता व गळ्याभोवती किंवा खांद्यावर एक रंगीत रुमाल टाकतात. महिला गुडघ्यापर्यंत व अंगाशी घट्ट असे लुगडे नेसतात. लुगड्याचे एक टोक उजव्या खांद्यावरुन पाठीमागून घेऊन डाव्या अंगास पुढच्या बाजूला खोवतात. महिलांचे दागीने कलात्मक परंतु वजनाने जड असतात. सोनकोळी लग्न समारंभावर भरपूर खर्च करतात. भात, तांदुळाची भाकरी व मासे हे त्यांचे मुख्य अन्न होय. ते मेहनती, आर्थिकदृष्ट्या स्वयंनिर्भर, आतिथ्यशील आणि विश्वासू असतात. त्यांच्यात विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा रुढ आहे. मृताचा अग्नीसंस्कार करतात. परंतु देवीच्या आजाराने मृत पावलेल्या व्यक्तीचे दफन करतात. त्यांची गावपंचायत व संघपंचायत नामक संघटना असून त्याद्वारे न्यायनिवाडे केले जातात.

कोळ्यांची गीते व नाच विशेषतापूर्ण आहेत. जेजुरीचा खंडोबा व कार्ले येथील एकवीरा देवी ही त्यांची प्रमुख दैवते होत. होळी, माघ महिन्यातील पौर्णीमा, नारळी पौर्णिमा व नवरात्रात फार मोठा उत्सव करतात. नारळी पौर्णिमेस समुद्र पूजन व नारळ अर्पण केल्यानंतर ते मासे पकडण्याचा शुभारंभ करतात.

खत्री : खत्री किंवा क्षत्री या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या जातीचे वास्तव्य गुजरात, महाराष्ट्र आणि कर्नाटकात आढळते. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात खत्री जातीची लोकसंख्या ९९,५८३ होती. गुजरातमधील भडोच, सुरत व अहमदाबाद आणि महाराष्ट्रात प्रामुख्याने मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही शहरात खत्री

जातीचे वस्ती दिसून येते. खत्री लोक आपण ब्रह्म-क्षत्रिय आहोत, असे समजतात. एका दंतकथेनुसार त्यांची मूळ उत्पत्ती सोलार वंशाचा राजा रतनसेन (कोपिष्ट परशुरामापासून पळून दधिची ऋषीच्या आश्रयाला आलेला) याच्यापासून झाली असे मानतात. या जातीचे मूळ स्थान सिंध व पंजाब असून सोळाव्या व सतराव्या शतकांत त्यांच्या कापडाला युरोपात असलेल्या वाढत्या मागणीमुळे सिंध व पंजाबातून ते गुजरातमध्ये आले असे ते सांगतात. खत्री लोकांचा मुख्य व्यवसाय साडया व कापड विणणे व जरीचा धागा तयार करणे हा होय. अलीकडील काळात पारंपरिक व्यवसायाखेरीज खत्री जातीचे लोक कारकून, व्यापारी, शिक्षक, उच्च प्रशासकीय सेवा, डॉक्टर, वकील इत्यादी व्यावसायीक क्षेत्रांत दिसतात. अकबराचा सुप्रसिध्द मंत्री तोडरमल हा खत्री होता. तर शिखांचे महान गुरु नानक व गुरु गोविंद यांचे पूर्वज खत्री होते.

खत्रींमध्ये ब्रह्मखत्री यांच्याव्यतिरिक्त कपूर खत्री व खत्री किंवा पाटकर साळे या दोन पोटजाती आहेत. नावामध्ये साम्य असलेल्या या जातींचे कुलाचार व सामाजिक चालीरीती संपूर्णतया भिन्न आहेत. या तिन्ही जातींची वसाहत हैद्राबाद डेक्कनमध्ये आढळते. महाराष्ट्रातील खत्री मराठी बोलतात. मुंबई शहरात खत्रींचे वास्तव्य अठराव्या शतकापासून असावे.

खत्री लोक स्वतःला उच्चवर्णीय समजतात व मौजी बंधनाचा विधी करुन जानवे घालतात. विधवा पुनर्विवाहाची प्रथा निषिद्ध मानतात. त्यांना घटस्फोट मान्य नाही. मात्र गैरवर्तन करणाऱ्या स्त्रीला घराबाहेर अथवा जातीबाहेर काढतात. बहुपत्नीत्त्वाची पध्दती मान्य आहे. आते-मामे भावंडांच्या विवाहाची प्रथा या जातीत दिसत नाही. खत्री लोक परंपरेने शाकाहारी असून वैष्णव पंथी आहेत. तसेच सिंध प्रांतामधील हिंगलज देवीला ते पूज्य मानतात. वर्णाने गोरे, उंच व देखणे असून याबाबतीत पंजाबमधील खत्री या व्यापारी जातीशी ते साम्य दर्शवितात. परंतु आपण पंजाबमधून गुजरात व महाराष्ट्रात आलो अशी स्थलांतराची परंपरा ते सांगत नाहीत.

गुरव : महादेव आणि महादेवाचे अवतार म्हणून मानलेल्या इतर देवतांच्या मंदिरातील पुजारी म्हणून गुरव महाराष्ट्रात परिचित आहेत. दधिची ऋषीपासून गुरवांची उत्पत्ती झाल्याचे **शिवपुराणात** सांगितले आहे. मूळचे आपण ब्राह्मण असे सांगतात. आपल्या मूळ पुरुषाने शिवपूजेत अनास्था दाखविल्याने महादेवाने शाप दिला व उच्चवर्णापासून त्यांना च्यूत केले असे ते सांगतात. १९३१ मध्ये पश्चिम महाराष्ट्रात गुरवांची लोकसंख्या १०,५१३ होती.

गुरव जातीत शैव गुरव अथवा नगरी; कडू गुरव अथवा जुन्नरी; हुगार, जीर किंवा मलगार; लिंगायत गुरव आणि कोकणी गुरव किंवा भाविक या पाच पोटजाती आहेत. तसेच प्रदेशांवरुन पडलेल्या उपजाती आहेत. उदाहरणार्थ वराडे (वऱ्हाड), झाडे (जंगलात राहणारे), दक्षणे (दख्खन) याशिवाय अहीर ही शाखा आहे. शैव व निळकंठ गुरव जानवे घालतात तर लिंगायत गुरव गळ्यात लिंग बांधतात. पंधराव्या शतकांमध्ये अहमदनगर व विजापूर या दोन स्वतंत्र राजधान्या होत्या. त्यावेळी बहुधा नागरी व जुन्नरी या पोटजाती निर्माण झाल्या असाव्यात असे काही अभ्यासकांचे मत आहे. निरनिराळया राजसत्तेमुळे जातीचे पोटजातीत विभाजन कसे होऊ शकते याचे हे उदाहरण आहे.

गुरवांची सर्वसाधारणपणे प्रत्येक खेड्यात एक-दोन घरे असतात. वंशपरंपरागत पुजाऱ्यांना देवस्थान इनाम जमीनी दिलेल्या असतात. त्याला 'गुरवकी' म्हणतात. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बारा बलुतेदारांमध्ये गुरवांचा समावेश होतो. त्यानुसार सुगीच्या दिवसात गुरवांना धान्यरुपाने मोबदला मिळतो. देवापुढील दक्षिणाही त्यांना मिळते. गुरव देवळात चौघडा वाजवितात तसेच सवर्णांच्या लग्नात वाजंत्री वाजवतात. त्यांना घडशी म्हणतात. काही गुरव शिंग फुंकण्याचे काम करतात व द्रोण पत्रावळी तयार करतात, तर काही बाशिंग आणि मुकुट बनविण्याचा व्यवसाय करतात त्यांच्या तुतारी वाजविण्याच्या कलेमुळे मराठा सेनादलात त्यांची भरती झाल्याचे आढळते.

गुरव जातीत गोत्र अथवा बहिर्विवाही समूह नाहीत. तरीपण एकच आडनाव असलेल्यांशी विवाह करीत नाहीत. त्यांच्यामध्ये लोखंडे, फुलझरे, सोनटक्के, गायकवाड इत्यादी आडनावे आढळतात. ते सर्व सांखिआयन गोत्राचे आहेत असे मानतात. या जातीत मामेबहिणीशी विवाह करण्याची पध्दती आहे. विधवा पुनर्विवाह तसेच घटस्फोट मान्य आहे. मृत देहाचे दहन करतात. गुरव शाकाहारी आहेत.

गोवारी : गोवारी जातीची वस्ती ही पूर्वीच्या मध्यप्रांतातील मराठी भाषीक जिल्ह्यांमध्ये म्हणजे सध्याच्या विदर्भामध्ये दिसून येते. वर्धा, नागपूर, चंद्रपूर, व भंडारा जिल्ह्यांमध्ये बरेच गोवारी आढळतात. १९११ च्या जनगणनेनुसार या जातीची लोकसंख्या १,५०,००० होती. १९३१ मध्ये विदर्भात ती १,२८,२१५ झाली. (परिशिष्ट १ व ३ पहावे). प्रामुख्याने पशुपालनाचा व्यवसाय करणाऱ्या या जातीत सेंदरे, नेवारे, चौधरी, भोकरे, सहारे, राऊत, कोहळे, आंबेडारे, वाघाडे, सोनवाणे, गजबे, वगारे, चामलाटे, भास्करे, बोरजवाडे, मोकाशी, कुसराम, पदिले, बोटरे, येसनसूरे, नागोसे, काळसर्पे, मोगरे, इत्यादी कुळे आहेत, परंपरेनुसार एकाच कुळातील व्यक्तींचा विवाह होत नाही. तसेच मुलामुलीचे मामेकुळ एकच असल्यास विवाह निषिद्ध मानतात. विधवेचा विवाह दिराशी करण्याची

प्रथा आहे. काही कुळे भगीनीच्या नात्याने जुळलेली असतात व त्यांच्यात एकमेकांत विवाह होत नाहीत. मामे बहिणीशी विवाह होतो. परंतु मावस बहिणीशी विवाह होत नाही. या प्रथेला दूध पारखणे किंवा दूध पाळणे असे म्हणतात. बरेच पालक मुलांची सोयरीक लहानपणीच करतात. लग्नात मुलाकडून साडेबारा रुपये देज व थोडे धान्य घेण्याची पध्दती आहे. विवाहपूर्व दिनी देवादेवी (देवकारण) नामक विधी करुन देवतांना प्रसन्न करण्यासाठी बकरे, कोंबडे अथवा डुकरे यांचे बळी देऊन त्यांचे रक्त शिंपडतात व मांस शिजवून समाजातील लोकांना जेवण देतात. त्या दिवशी रात्री भोई लोक डाहाका वाजवितात. त्याप्रसंगी घरातील पूर्वजांच्या स्तुतीपर तालबध्द गाणी म्हणतात. तसेच त्या वर्षात त्या कुटुंबातील निधन झालेल्यांच्या नावाने पान उजवितात. चांदी किंवा पितळेचे पान सोनाराकडून तयार करुन विधिवत देव्हाऱ्यावर ठेवतात. हिंदू विवाहपध्दतीतील बरेच विधी व सप्तपदी देखील करीत नाहीत. लग्नानंतर गुलाल उधळण्याचा म्हणजे ढेंढा लावण्याचा कार्यक्रम होतो. नवीन लाल साडीवर ढेंढा लावतात. त्यावेळी नवरदेव वधूला कडेवर उचलून घेतो. इतरही पाच जोडपी त्यात सहभागी होतात. त्यानंतर मंडपात त्यांना आंघोळ घालतात. नवरीला ओल्या कपड्यानिशी उचलून नवरदेव देव्हाऱ्याजवळ नेतो व देवाला नमस्कार करतो. त्यानंतर वधू पक्षातील लोक तिची बोळवण करतात व निरोप प्रसंगी म्हणावयाची लोकगीते म्हणतात. स्वगृही आल्यावर वराची माता मंडपाबाहेर वधूवराचे पाय धूवून ओवाळते व भाताचे गोळे दोन्ही बाजूला फेकते. देव्हाऱ्याजवळ जावून नवविवाहीत आपल्या पूर्वजांची पूजा करतात. वरमाता मुलाचे लग्न लावण्यास जात नाही. त्यादिवशी ती उपवास करते. वरात घरी आल्यानंतर, सुनमुख पाहिल्यावर ती उपवास सोडते. नवरदेव पिठाच्या हरणाची धनुष्यबाणाने शिकार करतो. काही ठिकाणी नवरदेव घरापासून बाण मारीत तलाव किंवा नदीपर्यंत जातो. बाण जेथे पडेल तेथे नवरी अक्षदा टाकून नमस्कार करते. त्यानंतर पुन्हा त्यांना आंघोळ घालतात व गोत आंबील खाण्याचा कार्यक्रम होतो. विवाहविधी संपन्न झाल्यावर वधू माहेरी जाते व पुढील महिन्यातील शुक्ल पक्षात हिरवा चुडा भरण्यासाठी तिला सासरी आणले जाते.

एखाद्या व्यक्तीस मूल नसल्यास त्याची मालमत्ता वारसा हक्काने बहिणीच्या मुलाला मिळते. रसेलच्या मते ही प्रथा गोवारी जमातीत पूर्वी अस्तित्वात असलेल्या मातृ अधिकार पद्धतीचे द्योतक आहे.

गोवारी लोक जीवात्मवादी आहेत. मृत व्यक्तीचे दफन करतात. मृतदेह ठेवलेली गोधडी पुरण्याच्या जागी पेटवितात.

ते आपल्या पूर्वजांची तसेच मेघनाथ किंवा खोडे खोडवान या प्रमुख देवांची आणि वाघदेव, नारायण देव भिवसन, घाल व दुल्हादेव या देवतांची पूजा करतात. ढालीची पूजा करतात व ढालीसह दिवाळीत नाचतात. हिंदूचे सण साजरे करतात. दिवाळी हा त्यांचा मुख्य सण होय. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी सकाळी पळसाची फांदी घरी आणून तिची पूजा करतात. फांदीला गाईच्या गळयातील घंटा बांधून रात्रभर नाचतात. ही पूजा प्रमुख गायक्याकडे असते. गाई राखणाऱ्या गोवाऱ्यांना गायकी म्हणतात. दिवाळी गाई म्हशींची वाजतगाजत मिरवणूक काढतात या सणाला कोंबडा बळी देण्याची रुढी त्यांच्यात आहे.

गाईला गोवारी फार मानतात. वर्षाऋतूत मोरपिसांच्या रंगीबेरंगी माळा तयार करुन दिवाळीत गाईंना ते सजवितात. तसेच गोऱ्ह्याला सजवितात. गायक्याला पाटील व जास्त गुरे असलेल्या लोकांकडून वस्त्रे दान म्हणून दिली जातात. नवीन कपडे परिधान करुन तो गाईची पूजा करतो व तिला गोड घास खायला घालतो. गोवारी लोक बलिप्रतिपदेला प्रत्येक कळपातील एक गाय मारुतीच्या मंदिरात नेऊन गायक्याच्या मागोमाग पाच प्रदक्षिणा घालतात. त्याला गाई खेळविल्या असे म्हणतात.

पितृमोक्ष अमावस्येला ते पितरांची पूजा करतात. आखाडीच्या दिवशी ते सिवाऱ्या नामक देवाची पूजा करुन कोंबडा बळी देतात. हा देव गुरांना गावाच्या सीमेबाहेर जाऊ देत नाही व भटकलेल्या गुरांना गावाची वाट दाखवितो असा त्यांचा समज आहे. माघ महिन्याच्या शुक्ल पक्षात देव माई म्हणजेच कुलदैवतांची पूजा करतात. त्यांच्यात काही कुळांत सातदेव तर काही कुळांत सहादेव देवमाईच्या वेळी पूजतात. तसेच तीन वर्षानंतर तिजान हा विधी करतात.

अलीकडील काळात या जमातीतील लोक गुराखी असून ते शेती, शेतमजुरी व जंगलकाम करतांना दिसतात. गोवारी मराठी भाषा बोलतात. रोजच्या जेवणात भाकरी, चटणी व आंबील असते. मोहफूल अन्न म्हणून खातात. परंपरेने गोवारी मांसाहारी आहेत. पुरुष गुडघ्यापर्यंत धोतर, अंगात बंडी, डोक्याला फेटा, खांद्यावर घोंगडी, डाव्या हातात धातूचा कडा घालतात. हातात तेंदूची काठी असते. काठीची विधिवत पूजा केली जाते. जंगली भागातील महिला गोंडी पध्दतीप्रमाणे पण वेगळ्या प्रकारची लुगडी नेसतात. पूर्वी महिला चोळी घालीत नसत. अलीकडील काळात पोषाखात बरेच परिवर्तन झालेले आहे. या जमातीतील महिला उजव्या हातावर कोपराखाली आणि कपाळावर गोंदवून घेतात. तर पुरुष फक्त कपाळावर गोंदवून घेतात.

अजूनही खेडेगावात गोवारींची जातपंचायत टिकून आहे. वंशपरंपरागत जातपंचायतीच्या प्रमुखास 'शेंड्या' म्हणतात. नियमबाह्य व अनैतिक वर्तन करणाऱ्यास बहिष्कृत केले जाते. मात्र पंचायतीने ठोठावलेला दंड भरल्यानंतर

Maharashtra State Gazetteers

पुन्हा जातीत घेतले जाते[९].

गोंड : मेजर जनरल कनिंगहॅमच्या मते ही संज्ञा गौड प्रदेशावरुन (पूर्व बिहार व बंगाल) आली असावी. जबलपूर जवळील त्रिपूर किंवा तेवार येथील एका चेदी राजाच्या बनारस उत्कीर्ण लेखात म्हटले आहे की, तो हैह्य वंशीय आहे. या वंशाचे लोक नर्मदेच्या परिसरात राहतात. याच परिसरातील इतर तीन चार उत्कीर्ण लेखांत सुध्दा गौड राजांचा उल्लेख आढळतो. तथापि वर म्हटल्याप्रमाणे बंगालच्या भागाला गौड म्हणत असत. काही शंकास्पद उत्कीर्ण लेख सोडले तर मध्यप्रांताकरिता गौड संज्ञेचा वापर आढळत नाही. मेजर जनरल कनिंगहॅम मध्यप्रांताचा गौड असा उल्लेख करतो याचे मुख्य कारण असे की, इ. स. ६०५ मध्ये गौड राजा, कनौजविरुध्द (हर्षवर्धनाचा थोरला भाऊ) माळव्याच्या राजाच्या मदतीला धावून आला होता. या लढाईत कनौज मारला गेला. स्मिथ यांच्या मते वरील प्रसंगातील गौडचा संबंध मध्यप्रांताशी नसून बंगालशी आहे. यावरुन मेजर जनरल कनिंगहॅमचे मत विसंगत असून गोंड शब्दाची त्याने दिलेली व्युत्पत्ती कालबाहय वाटते. हिस्लॉप प्रतिपादन करतो की, गोंड हा शब्द 'कोंड' या शब्दाचे रुप आहे. खोंड जमातीचा उच्चारसुध्दा तो अशाच प्रकारे करतो. हिस्लॉप पुढे म्हणतो की, तेलुगु लोक खोंड या शब्दाचा गोंड किंवा कोड असा उच्चार करतात. कनिंगहॅमने दाखविले आहे की, मध्यप्रांतात गोंड शब्दाचा उच्चार साधारणतः गौड असा करतात. त्याचा गोड असा अर्थ ध्वनित होतो आणि ग व क च्या बदलाने कोड असा शब्द बनतो. अशा प्रकारे गोंड आणि कोड हे दोन्ही शब्द मध्यप्रांतातील गोंड आणि गोड या शब्दांप्रमाणे एकच आहेत. वस्तुतः गोंड ही संज्ञा तेलुगु लोकांनी प्रचलित केल्याची शक्यता जास्त आहे. गोंड लोक तामीळ, कन्नड आणि तेलुगु या कुळातील द्रविडी बोलीभाषा बोलतात. यावरुन असे वाटते की, गोंड हे दक्षिणेकडून मध्यप्रांतात आले असावेत. गोदावरी ओलांडून ते चंद्रपूर भागात आले असावेत. तेथून ते इंद्रावती पार करुन बस्तर आणि छत्तीसगडच्या दक्षिण व पूर्वेकडील डोंगराळ भागात पसरले आणि वर्धा व वैनगंगा नद्या ओलांडून सातपुडा भागात गेले. चंद्रपूरवर काही शतके गोंड वंशीय राजांनी राज्य केले. तेव्हा तेलुगु भाषिकांशी त्यांचा संबंध आला असावा आणि येथेच त्यांना गोंड हे नाव प्राप्त झाले असावे. गोंडांच्या उत्पत्ती बाबत अनेक आख्यायिका आहेत. तथापि त्यांना पुष्टीकारक पुरावे उपलब्ध नाहीत.

भारतात जंगलामध्ये राहणाऱ्या वन्य जमातींमध्ये गोंड ही संख्येने मोठी असलेली व महत्त्वाची जमात मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशात पसरलेली आहे. १९३१ मध्ये विदर्भातील हिंदू व आदिवासी धर्मीय गोंडांची संख्या ३,६५,५९६ होती. महाराष्ट्रातील गोंड जमातीची लोकसंख्या १९८१ च्या जनगणनेनुसार ११,६२,७३५ होती. पूर्व विदर्भात त्यांचे राज्य होते. पण मुघल आणि मराठ्यांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. इतके मात्र खरे की, सार्वभौम सत्ता जरी यादव, बहमनी, मुघल व भोसलेंनी उपभोगली, तरी गोंड वनावर गोंडांचीच खरी सत्ता होती. गोंड राणी दुर्गावतीने जबलपूरजवळील मदन महाल बांधविला. मोठमोठ्या भिंती, तलाव, नाना तऱ्हेच्या पाशाण मूर्ती आजही गोंडांच्या पूर्वीच्या राजधान्यांतून त्यांच्या एकेकाळच्या वैभवाची साक्ष देतात. गोंडांचे राज्य अस्तंगत झाल्यानंतर या जातीच्या सर्वसामान्य लोकांना पुन्हा एकदा जंगलाचा आश्रय घ्यावा लागल्याचे दिसते.

गोंड जमातीत अनेक पोटजमाती आहेत. यात गोंड किंवा राजगोंड, आरख, अराख, अगारीया, असूर, बडोमारिया, बडामारिया, भाटोला, भिम्मा, भूला, करोईलाभूता, कोईलाभूती, भार, बिसनहार्न मारिया, छोटा मारिया, दंडामी मारिया, धुरु, धुरवा, धोबा, धुलीया, डोरला, गायकी, गट्टा, गट्टी, गायता, गोंड गोवारी, हिल मारिया, कांदरा, कलंगा, खटोला, कोयतार, कोया, खिरवार, कुच मारिया, कुचकी मारिया, माडिया, मारिया, माना, मन्नेवार, मोघ्या, मुडीया, मुरीया, नागरची, नाईक पोड, नागवंशी, ओझा, राज, सोनझारी झरेका, थाटिया, थोट्या, वाडेमारिया, वडेमारिया, इत्यादी पोटजाती आढळतात. (महाराष्ट्र शासनाने प्रकाशीत केलेल्या १९९० च्या यादीनुसार). माना, चंद्रपूर, गडचिरोली आणि भंडारा जिल्ह्यांत राहतात. मन्नेवार जमातीची वस्ती चंद्रपूर, अमरावती, नागपूर, आणि भंडारा जिल्ह्यांमध्ये आहे. मारिया अथवा माडिया हे गडचिरोली जिल्ह्यातील इटापल्ली तहसीलमध्ये राहतात. तर राजगोंड जमातीची वस्ती गडचिरोली जिल्ह्यातील सिरोंचा तहसील आणि वर्धा जिल्ह्यात प्रामुख्याने दिसून येते. तसेच ते नागपूर, अमरावती, गडचिरोली या भागातील जंगल प्रदेशातही बहुसंख्येने आढळतात. राजगोंड हे राजपूत व गोंड यांच्या संकरातून निर्माण झाले असावेत. ते स्वतःस गोंडांचे वंशज म्हणवितात व गोंडी भाषा व संस्कृतीचे खरे प्रतिनिधी समजतात. बरेच राजगोंड शहरात राहू लागल्याने त्यांनी उच्चवर्णीय हिंदूंच्या चालीरीती आत्मसात केल्या आहेत. खटोला हे नाव बुंदेल खंडातील खतोला राज्यावरुन पडलेले आहे. खतोलावर एकेकाळी गोंड राजांचे राज्य असावे.

गोंडांच्या व्यवसायावरुन पडलेल्या अनेक पोटजमाती आढळतात. उदा. अगारिया (Agaria= Iron workers), ओझा (Ojha= Soothsayers) आणि कोईलाभूती (Koilabhuti= Dancers). या पोटजमाती गोंडांशी इतर कनिष्ठ जमातींच्या संकरातून निर्माण झालेल्या असाव्यात.

गोंड लोक स्वतःला कोयी किंवा कुयी म्हणवितात. आणि कोलाम या जमातीशी साम्य दर्शवितात. परिसरातील हिंदू लोक या जमातीला गोंड नावाने ओळखतात. ते प्रामुख्याने द्रविडी भाषाकुळातील गोंडी बोलीभाषा बोलतात. या

खेरीज आसपासच्या परिसरात बोलली जाणारी मराठी, हिंदी अथवा तेलुगु यापैकी एक अथवा दोन भाषा बोलतात. तसेच या भाषांच्या मिश्रणातून तयार झालेली मिश्रभाषाही ते बोलतात.

गोंड उपजमाती विशिष्ट देवतांच्या संख्येच्या आधारावर 'सगा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गटात विभागलेल्या असतात व या गटांची विभागणी 'कुल' (Clan) गटात झालेली असते. तीन ते सातदेव भजणाऱ्या कुळींची ही सकुलके आहेत. एका सकुलात अनेक कुळी असतात. या कुळींचे आपापसात विवाह होत नाहीत. कुळींची नावे आडनावे म्हणून लावतात. उदा. धुर्वे, मर्सकोले, नरोटे, हिचामी इत्यादी. गोंडांची आडनावे प्राणी व वनस्पतीच्या नावांप्रमाणेही आढळतात. उदा. तेकाम किंवा टेकाम (सागाचे झाड), मरकाम (आंब्याचे झाड), पुरकाम (भोपळा), गेडाम (लाकूड), इळपाते (मोहाचे झाड), मडावी (झाड), कोडापे (घोडा), नेताम किंवा नैताम (कुत्रा), आत्राम किंवा अत्राम (कुत्रा), मसराम (नाक), इत्यादी. सकुलक व कुळी प्रत्येक उपजमातीत वेगवेगळया असतात.

विशिष्ट गटांमध्येच विवाह होतात. मामेबहीण व आतेबहीण यांच्याशी विवाह करण्याची परंपरा गोंडांमध्ये आहे. मुलीला घरातून जबरदस्तीने पळवून नेऊन अथवा एकमेकांच्या संमतीने पळून जाऊन विवाह केले जातात. तसेच सेवा-विवाहाची पध्दतही आहे. विधवा पुनर्विवाह करण्याची प्रथा आहे. पुरुषास दुसरे लग्न करावयाचे झाल्यास धाकटया मेहुणीस प्राधान्य दिले जाते. माडिया जमातीत 'घोटुल' ही विषेतापूर्ण संस्था दिसते. घोटुल म्हणजे गोंड जमातीचे युवागृह. तरुणतरुणी तेथे एकमेकांस भेटतात व यातून ते आपले आयुष्याचे जोडीदार निवडतात. घोटुल हे केवळ युवकयुवती एकत्र येण्याचे ठिकाण नसून जमातीच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण करण्याचे महत्त्वपूर्ण सामाजिक माध्यम आहे. घोटुलमध्ये लैंगिक शिक्षणाशिवाय जमातीच्या आर्थिक, सामाजिक व धार्मिक अंगांचेही शिक्षण दिले जाते. चंद्रपूरमधील माडियात अजूनही सायकांळी मुले-मुली एकत्र रेला नृत्य करतात.

गोंड प्राणिपूजक व देवकवादी आहेत. ते जिवात्मवादी असले तरी महादेव व काली या देवतांची पूजा करतात. गोंडांच्या जानको, मानको, जंगो, लिंगो, राहूड मेऽयाल, कल्यासूर, भीमाल, डोंडेरा, सिपीसेळमा, बुरालपेन, पेरसापेन, डुवालपेन, निशानपेन, सतीक इत्यादी आराध्य देवता, तसेच हीरा-ज्योती, कोरेसुंगाल, नामदेव व नारायणदेव या कुलदेवतांची ते आराधना करतात. कोटापरदोली, धनेगाव पटाळ, देऊरकसा, कोयलीकचाळ, भैसागढ, ढगा आणि भीमगड ही गोंडी देवतांची तीर्थक्षेत्र होत.

गोंडांचा पेरसापेन हा प्रमुख देव होय. खिळा अथवा लोखंडाच्या साखळीच्या रुपात त्याला ते भजतात. हे खिळे फक्त माडिया बनवितात व बांबूच्या नळीत सुरक्षित ठेवतात. विश्वनिर्मीती पेरसापेनच्या इच्छेने होते असे ते मानतात. जंगोरायताड ही देवता गोंड लोकांच्या संपूर्ण जीवनात भिनलेली महत्त्वाची देवता होय. तसेच नागदेव व नारायण देवाची पूजा करतात. जून महिन्यात ते नागाला मारुन त्याचे डोके व शेपूट कापून नागदेवाला अर्पण करतात. त्यामुळे कोणत्याही विषारी पदार्थापासून त्यांचे रक्षण होते असा त्यांचा समज आहे. भीमालपेन ही त्यांची पर्जन्यदेवता होय. पाऊस पडण्यासाठी ते त्याची आराधना करतात.

जादुटोणा, मंत्रतंत्र, शकुन, अपशकुन तसेच भूतपिशाच्च्यावर गोंड लोकांचा खूपच विश्वास असल्याचे दिसून येते. रोगी वैद्यकीय उपचार न घेता मंत्रतंत्र जाणणाऱ्या भगताकडे जातात. साथीचे रोग पसरल्यास भूमक किंवा गावपुजारी 'गाव बांधणी' नामक विधी करतो. गावातील लोकांसमवेत डुकराचे पिल्लू गावाच्या सीमेभोवती फिरवून त्याचा बळी देण्यात येतो व त्याचे रक्त सर्व ग्रामदेवतांवर शिंपडतात आणि मांस भक्षण करतात. काटोळा हा भगत जादूमंत्र जाणणारा पुजारी आणि कुशल रोगनिवारक वैद्यही असावा लागतो.

गोंड अंधश्रद्धाळू असून गरोदर महिलेस हत्ती किंवा घोड्याजवळ जाऊ देत नाही. त्यांचा पूर्वजन्मावर विश्वास आहे. श्रावण अमावस्येला पोळा सणानिमीत्त बैलाची (कोनंदा) पूजा करतात.

गोंड वर्णाने काळे असून त्यांची शरीरयष्टी मध्यम परंतु काटक असते. शरीर रचनेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा चेहरा गोलाकार व पसरट असून नाक रुंद व बसके असते. दारु गोंड जनजीवनातील महत्त्वाचा पदार्थ आहे. तसेच उंदीर हा उत्कृष्ट खाद्यपदार्थ समजून त्यास पकडण्याकरिता खूप मेहनत घेतात. रोजच्या जेवणात ज्वारीची भाकरी, चटणी व आंबील असते. त्यांची जातपंचायत असून जातीच्या रुढींचा भंग करणाऱ्यास अथवा अनैतिक कृत्य करणाऱ्यास जातिबहिष्कृत केले जाते. तथापि दिलेली शिक्षा भोगल्यावर त्या व्यक्तीस पुन्हा जातीत घेतले जाते.

गोंड महिला काटक असून पायात काशाचे वाळे, हातात लाखेच्या किंवा निकृष्ट धातूच्या बांगड्या व गळ्यात पोवळ्यांच्या व मण्यांच्या माळा घालतात. गुडघ्याचे वरुन लुगडे नेसून पदर खांद्यावर घेतात. त्या पूर्वी चोळी घालत नसत. अंगावर माडियाकडून गोंदून घेण्याची प्रथा आहे. गोंदणे हे मृताबरोबर परलोकात जाते असा समज आहे. अलीकडे महिला वेशभूषा करु लागल्या आहेत. सुस्थितीतील महिला परंपरागत आभूषणांशिवाय किंमती अलंकार सुध्दा घालतात.

गोंड लोक उपजीविकेसाठी जंगलातील श्वापदांची शिकार करणे, वनस्पती गोळा करणे, डोंगराच्या उतरणीवर व सपाट जमिनीवर शेती करणे, शेतमजुरी इत्यादी व्यवसाय करतात. आता गोंड तरुण शिक्षणाकडे आकृष्ट होत आहेत. तरी गरिबीमुळे शिक्षणाचे प्रमाण अल्पच दिसते.[१०]

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू : मुंबई इलाख्यातील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू किंवा सी.के.पी. जातीची लोकसंख्या १९११ च्या जनगणनेनुसार २७,१२० होती. चांद्रसेनीय म्हणजे चंद्रसेन राजाचे वंशज. कायस्थ प्रभू लोक स्वतःला अयोध्येचा एक क्षत्रिय राजा चंद्रसेन याचे वंशज मानतात. परंतु जाणकारांच्या मते असा कोणताही ऐतिहासिक पुरावा नाही. फार पूर्वी अयोध्या प्रांतावर राज्य करीत असलेल्या सोमवंशीय हैह्य कुलोत्पन्न कार्तवीर्य सहस्त्रार्जुनाचा एक वंशज चंद्रसेन याचे वंशज म्हणून त्यांना चांद्रसेनीय नाव पडले असावे असेही मत आहे. परंतु केशव सीताराम तथा प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते चांद्रसेनीय हा शब्द अपभ्रंशाने प्रचारात आला असून या जातीचे आद्य पूर्वज काश्मीरमधील चिनाब (चंदा) नदीच्या खोऱ्यातून काय देशात म्हणजेच अयोध्या प्रांतात येऊन स्थायिक झाल्याने व त्यांच्या तेथील दीर्घकाळ वास्तव्यामुळे त्यांना चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हे नाव प्राप्त झाले. पुढे शिलाहारांच्या राजवटीत त्यांना प्रभू हे अधिकारपद मिळाले. प्रभू या शब्दाचा अर्थ स्वामी किंवा सत्ताधीश असा जरी होत असला, तरी प्रत्यक्षात त्याचा वापर शासकीय सेवेतील पदाच्या संदर्भात किताबाप्रमाणे होताना दिसतो.

कायस्थांचे मूळ स्थान व उत्पत्तीविषयी विद्वानांचे एकमत नाही. परंतु एका आख्यायिकेनुसार कायस्थांची उत्पत्ती ब्रह्मदेवाचा पुत्र चित्रगुप्तापासून झाली असे मानतात. संस्कृतमधील काया शब्दाचा अर्थ देह असून चित्रगुप्ताची उत्पत्ती ब्रह्मदेवाच्या शरीरातून झाली असल्याने कायस्थ नाव पडले असावे. कायस्थ म्हणजे लेखक असाही अर्थ होतो. चित्रगुप्त हा मृतांचा हिशेब व परलोकवासी आत्म्यांनी पूर्वी केलेल्या चांगल्या व वाईट कर्माचा तपशील लिहून ठेवण्याचे काम करतो, अशी अंधश्रध्दा आहे. कायस्थ हा शब्द संस्कृत वाङ्मयात, शिलालेखांत व ताम्रपटांत लेखक या अर्थी पुष्कळ ठिकाणी आढळतो. हिंदुस्थानात प्राचीन काळापासून कायस्थ लोक शिलालेख लिहिणे, खतपत्र लिहिणे वगैरे कामे करीत. त्यांचे अक्षर सुवाच्य असे. याची ग्वाही **मुद्राराक्षस** या संस्कृत नाटकात चाणक्याच्या तोंडून देववली आहे. या शब्दाचा वापर क्वचित प्रसंगी व्यापारी लोकांना उद्देशून होत असे. महाराष्ट्रातील कायस्थ राजदरबारी लेखणीनेच नव्हे तर शौर्याने व स्वामिभक्तीने गाजले. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांच्या मते काय म्हणजे धन व त्यावर उपजीविका करणारा तो कायस्थ होय. चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हे शुद्ध क्षत्रिय, त्रिकर्मी, वेदोक्त कर्माधिकारी आहेत.

महाराष्ट्रातील कायस्थ लोक बहुधा उत्तर हिंदुस्थानातील कायस्थ जातीची शाखा असावी व प्राचीन काळात ते महाराष्ट्रात आले असावेत. महाराष्ट्रात ते प्रामुख्याने ठाणे आणि रायगड जिल्ह्यांत राहताना दिसतात. ज्ञानकोशकार श्रीधर व्यंकटेश केतकरांच्या मते ते समुद्रमार्गे कराची व गुजरात या बाजूने सिंधू मुखाकडून कोकणात आले. शिलाहारांचे काळी दहाव्या शतकात गुजरात व माळवा भागातील कायस्थ कोकणात आले. त्यांनी कायस्थांना महसुलाचा हिशेब, पडीक भागातील वसाहती, दस्तऐवजांची नोंद इत्यादी कामावर देखरेख करण्यासंबंधी अनेक मुलकी अधिकार पदे दिली होती. ही कामे करणाऱ्यांना पुढे देशमुख हे आडनाव मिळाले. इ. स. १३०५ मध्ये अलाउद्दिन खलजीने माळव्यातील मांडवगड जिंकल्याने तेथील बहुसंख्य कायस्थ खंबायतवरुन समुद्रमार्गे कोकणात मांडवा, मुरुड, जंजिरा व मांदाड येथे आले. बहमनी काळ, शिवाजी महाराजांची कारकीर्द, पेशवाई व ब्रिटिश राजवटीतही कायस्थांनी विविध उच्चपदे भूषवून नावलौकिक मिळविला. त्यांच्यात लेखनक्षमता, मुत्सद्देगिरी व लष्करीबाणा हे गुण दिसतात. वीरपुरुष बाजी प्रभु देशपांडे, लेखणी बहाद्दूर बाळाजी आवजी चिटणीस ही त्याची उदाहरणे आहेत. बऱ्याच कायस्थ प्रभूंकडे पूर्वी शिलोत्री वतने होती. आता बहुतेकजण नोकरी करणारे पांढरपेशा वर्गाचे आहेत. परंतु मावळात काही शेती करताना आढळतात. ही शेती बहुतेक इनाम मिळालेली असते. त्यांच्यात पोतनीस, प्रधान, कारखानीस, देशमुख, देशपांडे, शिलोत्री, श्रोत्री, कुलकर्णी, फडणीस आदि व्यवसायावरुन पडलेली आडनावे जास्त आढळतात.

त्यांच्यात दवणे हा एक पोटभेद आहे. दमणचे ते दवणे होय. चांद्रसेनीय स्वतःला त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ समजत व पूर्वी त्यांच्यात बेटीव्यवहार होत नसे. दवणे यांच्यात नाचणे, शृंगारपुरे अशी आडनावे आढळतात.

चांद्रसेनीय कायस्थ प्रभूंची प्राचीन ऋषींच्या नावांनी ज्ञात असलेली २५ गोत्रे आहेत. सगोत्र विवाह निषिद्ध मानला आहे. आते-मामे भावंडांच्या विवाहाची प्रथा आहे. घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाहाची प्रथा नाही. विवाह संस्कार, इतर धार्मिक चालीरीती, पोशाख, राहणी याबाबतीत कायस्थ जातीचे ब्राह्मणांशी बरेच साम्य दिसून येते. त्यांच्यात उपनयन संस्कार करतात. खाद्यपदार्थांच्या बाबतीत रसिक असून त्यांच्या आहारात मासे आणि मटण प्रामुख्याने दिसून येतात. होळीला पुरणाची तेलपोळी, दिवाळीला खाजाचे कानोले, आवरणाला निनाव, संक्रांतीला खांडवी, शितलासप्तमीला सांजणी हे पदार्थ करण्यात त्यांचे कौशल्य दिसते.

कायस्थ प्रामुख्याने शैव आहेत. कार्ले येथील एकवीरा देवी ही अनेक कायस्थांची कुलस्वामिनी आहे. काही घराण्यांत अंबाबाई, रेणुका, अन्नपूर्णा, भवानी, मल्हारीमार्तंड, गणपती, सोनारीचा बहिरी व महादेव यांची उपासना करतात. रक्षणकर्ता म्हणून बापूजी देवास फार मानतात. शुभकार्य झाल्यावर कुलदेवतेला कोंबड्याचा बळी देतात. काही घराणी नवरात्रीच्या अष्टमीला बोकड बळी देतात. बहुतेक जण गणेशचतुर्थीला गणपतीची स्थापना करतात. गौरीपूजा व नवरात्रीतील घटस्थापना हा कायस्थांचा मोठा सण असतो.[११]

चांभार : महाराष्ट्रात ही जात चांभार किंवा चर्मकार या नावाने ओळखली जाते. चांभार हा जातिवाचक शब्द "चर्मकार" या संस्कृत शब्दांपासून आला आहे. ही जात पूर्वीच्या बारा बलुतेदारांपैकी एक असून तिचा स्वतंत्र पारंपारिक व्यवसाय आहे. विशेषतः शेती व्यवसायाला उपयुक्त असणारी चामड्याची अवजारे, मोट, बैलांच्या गळ्यातील पट्टे, पादत्राणे तयार करुन देण्याचे कामे ही जात करीत असे. त्यासाठी गाय, म्हैस, बैल, हरीण, मेंढी, बकरीचे कातडे वापरीत. या मोबदल्यात शेतकऱ्यांकडून वर्षाकाठी सुगीच्या हंगामात धान्य व प्रत्येक सणासुदीस "सण" मिळत असे. या मिळकतीवरच ते स्वतःची उपजीविका करीत असत. इतर प्रदेशात ही जात मोची, माचीगर (Machigar), चांभार, सामगार अथवा चामगार या नावाने ओळखली जाते. कन्नड भाषेत माची म्हणजे शूज अर्थ होतो. त्यांच्या वंशाच्या उत्पत्तीबद्दल विविध दंतकथा प्रसिध्द आहेत.

शिवाचे पुत्र व महाभक्त अरालय यांचे आपण वंशज आहोत असे चांभार मानतात. अरालयाने आपल्या कातड्यांचे जोडे करुन देवास नजर केल्यामुळे महादेवाची त्याजवर गैरमर्जी झाली व "जन्माचा तू चांभार होशील" असा त्यास महादेवाने शाप दिला अशी ते आपल्या जातीच्या उत्पत्तीची कथा सांगतात. परंतु चर्मकारांमध्ये हरळे वैष्णव, रोहिदासी आणि लिंगायत हे तीन प्रमुख पंथ असून स्वतःला विशिष्ट पंथाचे म्हणवून घेणाऱ्या लोकांची श्रद्धास्थाने वेगवेगळी आहेत व ते त्यांचे वंशज म्हणून मानतात. चर्मकार समाजातील बसवेश्वराचा शिष्य हरलय्याच्या स्मृतीतून हरळे वैष्णव, १४ व्या शतकाच्या अखेरीस उदयास आलेला महान धर्मसुधारक संत रोहिदास याला मानणारे रोहिदासी व महादेवाचे भक्त आणि गळ्यात लिंगायताप्रमाणे लिंग घालणारे ते लिंगायत पंथाचे होत. प्रत्येक पंथ इतरांपेक्षा स्वतःच्या पंथाला श्रेष्ठ समजतो. त्यामुळे आपापसात रोटी-बेटी व्यवहार करीत नाहीत.

या जातीत चेवली (कोकण), रोहीदास चांभार (रायगड), दाभोली (दाभोळ), डोहर (वर्धा), घाटी, कोकणी, अहीर इत्यादी प्रादेशिक स्वरुपाचे अंतर्विवाही गट आहेत, तर कुळनाव अथवा आडनावावर आधारित बहिर्विवाही गट आहेत. कुळनावाचा वापर आडनावासाठी होतो. एकच कुळनाव असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. चांभारांमध्ये लिंब, हरियाळी, पाचपालवी, वड, वासनवेल, उंबर, मोराचे पीस इत्यादी देवके असतात. एकच देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. मामेबहिणीबरोबर लग्न करण्याची प्रथा आहे, परंतु मावस व आतेबहिणीशी लग्न होत नाही. विधवा पुनर्विवाह व घटस्फोट मान्य आहे. रोहिदास चांभारांत भोईर, साळवी, गायकवाड, महाडिक, चांदोरकर, रोहेकर, इत्यादी आणि चेवली चांभारांत कदम, चव्हाण, आडविलकर, चिखलकर, व डोहर चांभारांत गिरडकर, सावरकर, हांडे, विजयकर ही आडनावे प्रचलित आहेत. बहुतेक चांभार कमविलेले कातडे विकत घेऊन त्यापासून वस्तू बनवितात. रोहिदास चांभार ढोर समाजातील लोकांकडून कातडे विकत घेऊन त्यापासून पादत्राणे किंवा इतर वस्तू बनवितात.

चांभार गौरवर्णीय व मध्यम उंचीचे असतात. ते मांसाहारी आहेत. त्यांचे पौरोहित्य ब्राह्मण करतात. त्यांच्यात मृताचे दहन करण्याची तसेच श्राद्ध करण्याची प्रथा आहे.

विवाह सर्वसाधारण हिंदू पद्धतीने केले जातात. वेगवेगळया प्रादेशिक पोटजातींमध्ये थोडाफार फरक आढळतो. वर्धा जिल्ह्यातील चांभारांत लग्नमंडपात एक खांब उभारुन त्याच्याभोवती सात फेरे घालणे हा लग्नातील मुख्य विधी आढळतो. तर रायगड जिल्ह्यातील चांभारांत वधूवरांस असाली नारळाचे दूध, हळद व सुगंधी द्रव्याचे उटणे हळदीच्या आधी लावतात. उटणे लावल्यापासून लग्न होईपर्यंत उपवास असतो. फक्त शिजवलेला कोरडा भात व गूळ खातात व दोघांनीही घराच्या भिंतीस किंवा कुडास टेकून बसावयाचे नसते. उटणे लावतात त्यावेळी वधूवरास गव्हाच्या व खोबऱ्याच्या लहान तुकड्यांच्या मुंडावळी बांधतात. हळदीच्या वेळी रुईच्या फुलांच्या मुंडावळ्या बांधतात.

चांभार सर्व हिंदू देवतांना भजतात. विशेषतः साथीच्या वेळी चांभार मरीअम्मा व शितळादेवीला पूजतात. योगीराज देवजीबाबा हे त्यांचे दैवत मानले जाते. पुण्याला त्यांचा मठ आहे. सातारा जिल्ह्यात शिंगणापुरास व कोल्हापुरातील जोतिबाच्या डोंगरास हे लोक यात्रेला जातात. मृत व्यक्तीचे दफन व क्वचित प्रसंगी दहन केले जाते. पुरण्यासाठी त्यांची स्वतंत्र दफनभूमी असते.

पूर्वी या जातीत लग्नसोहळा व तेराव्याच्या कार्याच्या वेळी, तसेच जातीचे पारंपारिक रीतीरिवाज आणि जाती अंतर्गत व्यवहार यामध्ये जातपंचायतीचे खूपच महत्त्व होते. कोळंब्यात मुरत ठेवलेल्या कातड्यामुळे तयार होणारे लाल रंगाचे पाणी भूतपिशाच्च असणाऱ्या जागेवर शिंपडल्यास भूताचा नाश होतो अशी अंधश्रद्धा आहे.

दुकानदारांशिवाय रस्त्याच्या कडेला बसून चप्पल दुरुस्तीचे किरकोळ काम करणाऱ्यांना गटई कामगार म्हणून ओळखले जाते. या समाजातील महिला चर्मकामासाठी पुरुषांना मदत करतात, काही चर्मकारांच्या दुकानात विक्रीचे काम करतात, काही भाजीपाला विक्रीचा धंदा करतात.

चांभार जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात १९११ च्या जनगणनेप्रमाणे ३,०६,४७८ होती. १९८१ मध्ये महाराष्ट्रात ८,६५,५०० लोकसंख्या होती. शासनाने या जातीची गणना अनुसूचित जातीत केली असून त्यांना मिळणाऱ्या शैक्षणिक सवलतींचा फायदा त्यांनी बऱ्याच प्रमाणात घेतला असल्याने ते उच्चपदावरही नोकरी करतांना दिसतात.[१२]

ठाकूर : सह्याद्री पर्वताच्या कुशीत राहणारी ही जमात फक्त महाराष्ट्रात दिसते. १९३१ च्या जनगणनेप्रमाणे या जमातीची लोकसंख्या १,०९,६६५ होती. ती १९६१ मध्ये १,५९,३७२ तर १९८१ मध्ये ३,२३,१९१ एवढी झाली. राष्ट्रपतींच्या अध्यादेशात या जमातीचा उल्लेख ठाकूर किंवा ठाकर असा आहे व त्यांचा समावेश अनुसूचित जमातीत करण्यात आला आहे. या जमातीची लोकसंख्या प्रामुख्याने ठाणे, रायगड, नाशिक, पुणे आणि अहमदनगर जिल्ह्यांत आहे. (धुळ्यातही आहेत). ठाकूर स्वतःला राजपूतवंशीय समजतात व आपले पूर्वज ऐतिहासिक काळात गुजरातमधून महमूद बेगडाच्या कारकिर्दीत (१४५९-१५११) आले असे सांगतात. ना. गो. चाफेकरांच्या मते या जमातीचे मूळ वसतिस्थान नाशिक असावे. त्यांच्या विवाहप्रसंगीच्या गाण्यात ते या प्रदेशातील नाशिक, त्रिंबकेश्वर, बोरली, तळेगाव, अंजनेरी येथील दैवतांना आळवणारी गाणी म्हणतात. तसेच बोरली येथे दरवर्षी पौष पौर्णिमेस भरणाऱ्या यात्रेवरुन असे वाटते की, ठाकूर थळघाटमार्गे बोरली येथून आले असावेत. त्याचप्रमाणे इगतपुरी येथील ठाकूराकडील ताम्रपटावरुन सातव्या शतकाच्या सुरुवातीस गोपराष्ट्र (नाशिक) जिल्ह्यातील बेलग्राम हे बल्लमा नावाच्या ठाकूरासाठी कपिलेश्वराची भक्ती करण्यास्तव चालुक्य राजाने बांधले. यावरुन ठाकुरांच्या मूळ वसतिस्थानाबद्दल दुजोरा मिळतो. परंतु ही ठिकाणे नाशिक जिल्ह्यात सध्या आढळत नाहीत. ठाकुरांमध्ये "क-ठाकूर" व "म-ठाकूर" असे दोन अंतर्विवाही गट आहेत. या शब्दांचा एक अर्थ कडू ठाकूर व मराठा ठाकूर असा सांगितला जातो. ना.गो. चाफेकर यांच्या मताप्रमाणे क-ठाकूर म्हणजे कोकणातून आलेले व म-ठाकूर म्हणजे महाल देशामधून आलेले. तसेच "म" म्हणजे मोठे आणि "क" म्हणजे कनिष्ठ याप्रमाणे काही जण स्पष्टीकरण देतात. ठाकुरांच्या बोलीत "म" आणि "क" हे वर्ण वारंवार येत असल्यामुळेच असे दोन भेद पडले असावेत असे या जमातीचे अभ्यासक ना. गो. चाफेकर यांचे मत आहे. क-ठाकूर आणि म-ठाकूर या गटांची विभागणी अनेक बहिर्विवाही कुलगटात झाली आहे. म-ठाकुरांची काही कुलनावे पुढीलप्रमाणे आहेतः- अवली, भस्म, ढोल्या, बंगारा, दरवडा, पारधी, सुतक, गिरे इत्यादी. क-ठाकुरांची काही कुळनावे पुढीलप्रमाणे आहेत :- भोगडे, दांगटे, धिंगा, जंगली, जाधव, भोरे इत्यादी. सामाजिक दर्जाच्या दृष्टीने म-ठाकूर स्वतःला उच्च व क-ठाकुरांना कनिष्ठ समजतात.

ठाकुरांच्या झोपड्यांच्या वसाहतीला ठाकूरवाडी म्हणतात. ठाकूरवाड्या इतरांपासून दूर व उंच ठिकाणी असतात. ठाकूरवाडीच्या प्रमुखास पाटील किंवा पडेखोत म्हणतात. त्यांची पाटीलकी वंशपरंपरागत असते. ठाकुरांची घरे एकमेकांपासून दूर असतात. त्यांची घरबांधणीची खास विशेषता आहेत. काळोख पडल्यावर ध्रुवतारा आकाशात दिसू लागल्यावर घराचा पाया खणतात व सूर्योदयाच्या वेळी पहिला खांब उभारतात आणि दुसऱ्या दिवशी पहाटे शुक्रतारा उगवतो तेव्हा घराचे काम पूर्ण करतात. अशा रीतीने बांधलेले घर संकटातून निभावते अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यांची घरे चौकोनी, एकखांबी व कारवीच्या कुडाच्या भिंती शेणाने लिंपलेल्या असतात. शेती, पशुपालन, जंगलातून जळाऊ लाकूड जमा करणे, तसेच कंदमुळे व फळे गोळा करणे हे ठाकूर जमातीचे परंपरागत व्यवसाय आहेत. १९६१ च्या जनगणनेप्रमाणे ७० टक्के लोक शेती व २३ टक्के शेतमजुरी करतात. ते मुख्यत्वे नागली व वरी पिकवितात. शेतीच्या कामास मंगळवारी प्रारंभ करीत नाहीत. क-ठाकूर पेरणीपूर्वी कोंबडा बळी देतात व त्याच्या रक्ताने माखलेल्या नागलीचे बी पेरतात. पेरणीच्या हंगामात केस कापणे व दळणे निषिध्द मानतात. भात व नाचणी हे त्यांचे मुख्य अन्न. त्याचप्रमाणे मांस, मासे, कोंबडी, अंडी यांचाही त्यांच्या आहारात अधूनमधून समावेश असतो. या जमातीत दारु पिण्याची सवय दिसून येते.

सर्वसाधारणपणे मुलीच्या विवाहाचे वय १२ ते १५ व मुलाचे २० ते २५ असते. एकाच कुलातील व्यक्तींचा तसेच मावसबहीण व भाचीशी विवाह होत नाही. मामेबहीण व आतेबहीण यांच्याशी विवाह होऊ शकतो, परंतु दोन कुटुंबात आधीच नातेसंबंध असल्यास असा विवाह करणे टाळण्यात येते. मुलाचे वडील प्रथम मागणी घालतात. मान्य झाल्यास जातीतील वडीलधाऱ्यांच्या बैठकीत मुलाला एक रुपया व काळया मण्यांची माळ देतात. त्यास 'सुपारी फोडणे' म्हणतात. वधूशुल्क देण्याची प्रथा आहे. शुल्क देण्यास असमर्थ मुलास भावी सासऱ्याकडे राहून काम करावे लागते. मंगलाष्टकांच्या वेळी वधूवराच्या तोंडात विडा ठेवतात व हातजुळणी करतात. उपस्थित लोक वधूवराच्या डोक्यावर काठ्या उभारुन धरतात. वधूवराची बाशिंगे ज्या दोरीने एकत्र बांधतात तिला मंगळसूत्र म्हणतात. नववधू ते वर्षभर गळयात घालते व नंतर वाहत्या पाण्यात सोडून देते.

विधवा पुनर्विवाह व घटस्फोट या दोन्ही प्रथा त्यांच्यात प्रचलित आहेत. जातपंचायतीच्या परवानगीने घटस्फोट घेता येतो. क-ठाकुरात मात्र पती-पत्नी या दोघांचीही संमती असेल तरच सोडचिठ्ठी दिली जाते. म-ठाकूरांमध्ये लग्न लावण्यासाठी ब्राह्मण पुरोहिताला बोलावले जाते, तर क-ठाकूरामध्ये स्त्री पुरोहिताकडून लग्न लावतात, तिला "धवलेकरीण" म्हणतात. विवाह हा अनिवार्य संस्कार मानला जातो. स्त्री-पुरुषांच्या विवाहपूर्व संबंधानंतर झालेल्या संततीच्या विवाहापूर्वी तरी लग्न करावेच लागते. त्याप्रसंगी जातपंचायतीस भोजन व दारु दिल्यानंतरच विवाहास सामाजिक मान्यता प्राप्त होते. ठाकूर लोक बाळंतपणाचे सुवेर पाळीत नाहीत.

ठाकूर मध्यम उंचीचे, तांबूस, पिंगट रंगाचे, कुरळया केसांचे व गालाची हाडे रुंद, मोठे ओठ व खोल डोळे असलेले असतात. पुरुष अंगात बंडी व लंगोटी घालतात. सुस्थितीतील पुरुष कमरेला चांदीचा करगोटा बांधतात व कानात सोन्याच्या बाळया घालतात. स्त्रिया कमरेभोवती गुडघ्यापर्यंत घट्ट लुगडे नेसतात व चोळी घालतात. गळेसर व जोडवी ही त्यांची सौभाग्य चिन्हे होत. म-ठाकूर महिलांचे दागिने चांदीचे अथवा सोन्याचे असतात तर क-ठाकूर महिलांचे दागिने तांबे अथवा पितळेचे असतात. बहुतेक महिला गाल, हात व कपाळावर गोंदून घेतात.

ठाकूर मराठी भाषिक असले तरी त्यांच्या शब्दोच्चार पद्धतीत भिन्नता आढळते. बहुमानार्थी ऐवजी एकेरी शब्दांचा अधिक उपयोग करतात. ते प्रामाणिक व विश्वासू असतात. औषधी वनस्पती व प्राण्यांविषयी त्यांना बरेच ज्ञान असते. धनुष्यबाणाने शिकार करतात. नृत्याची आवड असल्याने विषेशतः होळी, गोकुळाष्टमी, वाघबारस या दिवशी ते ढोलाच्या तालावर पहिल्या प्रहरी नाचतात.

ठाकूर महत्त्वाच्या हिंदू देवदेवतांना भजत असले तरी चेडा, हिरवरा, भवानी, सुपली, खंडोबा, कान्होबा, वाघ्या, मुंजा व वेताळास जास्त मानतात. पूर्वजांचे प्रतीक म्हणून वीरपूजाही करतात. देवतांच्या प्रतिमा चांदीच्या तुकडयावर उमटवून घरात ठेवतात. मात्र या सर्व देवदेवता शंकर व हनुमानापुढे निष्प्रभ ठरतात अशी त्यांची श्रध्दा आहे. ते गाईला पूज्य मानतात. वाघदेव त्यांचा देव असल्याने वाघाची शिकार करीत नाहीत. जादूटोणा. भूतपिशाच्च, चेटूक आदींवर त्याचा विश्वास असल्याने त्यावर भगतांकडून उपचार करुन घेतात. जातपंचायतीचे निर्णय ते श्रध्दाळूपणे पाळतात. सर्वसाधारणपणे ठाकूर मृतास पुरतात, क-ठाकूर मृताच्या इच्छेनुसार क्वचित अग्नीही देतात.[१३]

ढोर : महाराष्ट्रात प्रमुख अनुसूचित जातींमध्ये ढोर जातीची गणना केली जाते. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात ढोर जातीची लोकसंख्या १८,५०६ होती तर १९८१ मध्ये महाराष्ट्रात ६८,५०९ लोकसंख्या होती. महाराष्ट्रातील देश व कर्नाटक राज्यातील बेळगाव व विजापूरचा परिसर हे या जातीचे वसतिस्थान आहे. मेलेल्या जनावरांचे कातडे काढून ते कमावणे हा ढोर जातीचा परंपरागत व्यवसाय होय. ढोर ह्याचा अर्थ गुरे असून व्यवसायावरुन त्यांना ढोर हे नाव पडले असावे.

या जातीच्या निर्मितीविषयी अनेक लोककथा आहेत. शंकराच्या सांगण्यावरुन डोहाजवळ राहून कातडे कमविणारे म्हणून ते डोहोर या नावाने ओळखले जाऊ लागले. डोहोर शब्दाचा अपभ्रंश होऊन ढोर हे नाव कायम झाले असावे. आजही ते साक्षात शंकराचे पुत्र म्हणून स्वतःला डोहार म्हणवून घेतांना आढळतात. ढोर समाजात होऊन गेलेल्या कक्कय्या महापुरुषास धर्मगुरु मानणारे ढोर स्वतःला शैव कक्कय्या म्हणवितात. ते स्वतःला लिंगायत समजतात.

ग्रामव्यवस्थेतील बलुतेदारांत त्यांचा समावेश नव्हता. गावापासून दूर अंतरावर नदी-ओढ्याच्या काठी ते पारंपरिक पद्धतीने कातडी कमवित असत. चर्मकार स्वतःला ढोरांपेक्षा उच्च समजतात. पारंपरिक पद्धतीने कातडे कमावून पूर्णपणे तयार करण्यास किमान एक महिना अवधी लागे. अलीकडे कातडी कमविण्याची यंत्रे निर्माण झाल्याने कमी वेळात उत्तम निर्मिती शक्य झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षण, नोकरी व उद्योगधंद्याच्या निमित्ताने पुणे, कोल्हापूर, सातारा, अमरावती, अहमदनगर, फलटण, कऱ्हाड, सोलापूर आणि मुंबई शहरांमध्ये हा समाज अधिक संख्येने आढळतो. विशेषतः फलटण शहरात पारंपरिक देशी व्यवसाय आजही मोठ्या प्रमाणात केला जातो.

ढोर जातीमध्ये बुधेलकरी किंवा बुधलिगर, बुंदेलखंडी, हिंदुस्थानी, कंक्कय्या, कर्नाटकी, खेत्रफेडी (खेतरफेडी) इत्यादी पोटजाती आहेत. या पोटजातींची विभागणी आडनावाने ओळखल्या जाणाऱ्या बहिर्विवाही गटांत झाली आहे. उंबर, जांभूळ, मर्यादवेल, परशा, इत्यादी देवके असून एकच देवक असणाऱ्या गटातील व्यक्तींचा परस्परांशी विवाह होत नाही. आते-मामे भावंडांच्या लग्नाची प्रथा आहे. घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाह रुढी संमत आहे. लग्नानंतर वधूवरांनी कुलदैवताला जाण्याची प्रथा आहे. लग्नाच्या रात्री गोंधळ घालतात. धार्मिक विधी ब्राह्मण अथवा जंगम करतो. तुळजापूरची आणि कोंढणपूरची भवानी, जेजुरीची जनाई व खंडोबा, शिंगणापूरचा महादेव व पंढरपूरचा विठोबा यांची ते भक्ती करतात. श्रावणातील शेवटच्या सोमवारी करंजे (तालुका बारामती) येथील सोमेश्वराच्या यात्रेस बहुसंख्येने हा समाज उपस्थित असतो. ढोर जातीत मृतास बसलेल्या स्थितीत पुरतात. स्मशानातून परतल्यावर कडुनिंबाची पाने खातात. दहा दिवस सुतक पाळतात. वर्षश्राध्द करीत नाहीत. परंतु भाद्रपद कृष्ण पक्षात मृताच्या तिथीला महाळ करतात.

तेली : तैलिक किंवा तेल या संस्कृत शब्दांवरुन तेली हे नाव पडले आहे. या शब्दाची तिळीपासून व्युत्पत्ती झाली असावी. तेली लोक महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. परंतु नागपूर विभागात ते जास्त प्रमाणात आहेत. तेलबियांपासून तेल काढणाऱ्या जातीची लोकसंख्या १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यात ९४,०७९ होती. १९३१ च्या जनगणनेनुसार त्यांची महाराष्ट्र म्हणजे कोकण, देश, विदर्भ आणि मराठवाडा यातील एकत्रित संख्या ४,४६,०२२ होती. या जातीच्या उत्पत्तीविषयी अनेक दंतकथा प्रसिध्द आहेत. परंतु तेली जातीची निर्मिती शनी या ग्रहापासून झाली आहे असा या जातीचा समज आहे. तेली शेंगदाणा, तिळ, जवस, खोबरे, करडी, इत्यादी तेलबियांपासून तेल काढण्याचा व्यवसाय परंपरेने करतात. व्यवसायातील तांत्रिक भेदावरुन तसेच प्रादेशिक भेदावरुन महाराष्ट्रातील तेली जातीची विभागणी पुढील साडेबारा पोटजातींत झाली आहे. (१) पंचम किंवा लिंगायत, (२) कानडे, (३) लाड, (४) गुजर, (५) आयर, (६) कडू, (७) कांडी, (८) शनिवारे, (९) शुक्रवारे, (१०) राठोड, (११) परदेशी व (१२) तिळवण, सोमवारे किंवा मराठा तेली आणि गांधी ही अर्धी पोटजात. या साडेबारा पोटजातींपैकी महाराष्ट्रात तिळवण किंवा मराठा तेलींची लोकसंख्या सर्वाधिक आहे. नागपूर विभागात विशेषतः वर्धा जिल्ह्यात साव, एरंडे, घाण, गुल्हाणे या उपजाती आढळतात. घाण तेल्यांचे एक बैल व दोन बैल असे पोटभेद आहेत. वऱ्हाड नागपूर, व खानदेशमधील जातपंचायतीच्या नेत्याला चौधरी असे म्हणतात. यावरुन या भागातील तेली हे उत्तर हिंदुस्थानाकडून इकडे आले असावे असे वाटते.

वरील सर्व पोटजाती अंतर्विवाही गट आहेत. विवाह हे ज्या त्या पोटजातीत होतात. या सर्व पोटजाती विविध कुलांमध्ये विभागल्या गेल्या आहेत. ही कुले बहिर्विवाही गट आहे. एकाच कुलातील व्यक्तींचा विवाह होत नाही. कुलनामाचा वापर आडनावासाठी केला जातो. प्रत्येक कुलाचे देवक असते व समान देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. तेल्यांमध्ये पहार, घाणा, उंबर, आपटा, पाचपालवी, इत्यादी देवके असतात. मामेबहीण व आतेबहिणीशी विवाहाची चाल आहे. तसेच पुनर्विवाह आणि घटस्फोटाची प्रथा आहे.

विवाहविधी हिंदू पध्दतीप्रमाणे असतो. यात न्हानोरा, देवादेवी, डेळमाथन, उरभेट, भातक, सगुण-घागर, उसंगी, हाराडेरा इत्यादी विधी पार पाडतात. विधवेचा पुनर्विवाह करण्यापूर्वी तिच्या पहिल्या पतीच्या मृतात्म्याला शांत करण्यासाठी नवऱ्या मुलाच्या घरी बकऱ्याच्या रक्तात विधवेच्या पायाचा अंगठा भिजविला जातो. कुमारिकेचे लग्न विधुराशी करावयाचे झाल्यास प्रथम कृष्णाशी तिचे लग्न लावले जाते. मूल जन्मल्यानंतर भूतबाधा टाळण्यास्तव घराच्या प्रवेशद्वारावर टेंभूर्णीच्या झाडाची एक काठी आडवी ठेवतात. तेली समाजात अग्निसंस्कार तसेच मृतदेह पुरण्याचीही प्रथा आढळते. सर्व हिंदू सण व उत्सव ते साजरे करतात. या जातीतील संताजी नामक संतपुरुषाबद्दल नितांत भक्तिभाव दिसून येतो.

बहुतांश तेली गव्हाळ वर्णाचे, मध्यम बांधा व उंचीचे असून त्यांची राहणी, वेशभूषा कुणब्यांप्रमाणेच दिसून येते. ते प्रामुख्याने शाकाहारी असले तरी मांसाहार निषिद्ध मानत नाही. वर्धा जिल्ह्यातील बऱ्याच तेल्यांनी शेती व्यवसाय पत्करला आहे.[१४] शिक्षणाचा प्रसार झाल्याने शासकीय नोकरीतही या समाजातील लोक आढळतात.

त्वष्टा कासार : तांबे, पितळ, व कासे यापासून भांडी बनविण्याचा व्यवसाय करणाऱ्या या जातीला महाराष्ट्रात त्वष्टा कासार, कासार किंवा तांबट या नावाने ओळखले जाते. त्वष्टा कासारांनी बनविलेली भांडी विकण्याचे काम बोगार कासार करतात. या जातीतील मराठा व देशकर या उपजाती भांडी घडवत नाहीत परंतु विक्री करतात. काही कासार तांब्याचे दागिने व ब्राँझ धातूच्या शोभेच्या मूर्ती बनवितात. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात २५,९१३ होती.

कास्यकार या संस्कृत शब्दापासून कासार हा शब्द तयार झाला असावा. पद्मपुराणातील कालिका माहात्म्यात त्यांच्या उत्पत्तीविषयी कथा आहे. त्वष्टा कासार आपली उत्पत्ती देवांचा शिल्पकार विश्वकर्मापुत्र त्वष्टा याच्यापासून झाली असे समजतात. ते पूर्वी ब्राह्मण असल्याचा दावा करीत असत. त्यांचे रीतीरिवाज आणि राहणी ब्राह्मणांच्या सारखीच आहे. महाराष्ट्रात या जातीची वस्ती कोकण आणि देश या दोन्ही विभागांत व खास करुन मुंबई, पुणे आणि नाशिक या शहरांत अधिक आहे. त्यांच्यात अत्रि, भारव्दाज, काश्यप वगैरे गोत्रे असून सगोत्र विवाह होत नाही. इतर जातीत आढळणारी देवक प्रथाही दिसते. मुलाची मुंज करण्याची पध्दती आहे. आते-मामे भावंडाचा विवाह करण्याची प्रथा तसेच विधवाविवाह व घटस्फोटाची प्रथा जाती-संमत आहे. मृत व्यक्तीचे दहन करतात. त्वष्टा कासारांची महाकाली ही मुख्य देवता असून बहिरी, एकसीरा, महालक्ष्मी, खंडोबा या देवतांनाही ते भजतात. फाल्गुन महिन्यात भादो अमावस्येला देवीचा उत्सव साजरा करतात. उत्सवास बहुतेक सर्व कासार उपस्थित राहतात. पोळ्याला ते आपल्या आयुधांची पूजा करतात. ही जात मांसाहारी आहे. अलीकडील काळात या जातीतील लोक त्यांच्या पारंपरिक व्यवसायाखेरीज इतर व्यवसायांतही पडू लागले आहेत व अनेक जण सुखवस्तू आहेत. कासार महिला उजळ वर्णाच्या, आकर्षक व बांधेसूद असतात.

धनगर : धनगर हे महाराष्ट्रातील परंपरागत मेंढपाळ असून मेंढ्यांशिवाय ते शेळ्या व गाई-म्हशी पाळताना दिसतात. धनगरांची वस्ती महाराष्ट्रात सर्व भागात दिसत असली तरी प्रामुख्याने ते दक्षिण आणि मध्य महाराष्ट्रात अधिक आढळतात. १९११ च्या जनगणना अहवालानुसार मुंबई इलाख्यात त्यांची लोकसंख्या २,७१,७२० होती. धनगर या शब्दाची उत्पत्ती धेनु (गाय) या संस्कृत शब्दापासून अथवा धन (संपत्ती) या शब्दापासून झाली असावी. कन्नड भाषेत धनगरांना दनगार म्हणतात. दन म्हणजे गुरेढोरे, त्यावरुनही धनगर हा शब्द बनला असावा. जमीन नांगरतांना शेळ्या व मेंढ्या वारुळातून बाहेर येऊन शेतकऱ्यांच्या पिकांची नासधूस करु लागल्याने यातून सुटका होण्यासाठी त्यांनी महादेवाची प्रार्थना केली. शेळ्या-मेंढ्यांची निगा राखण्यासाठी महादेवाने पहिला धनगर निर्माण केला असा त्यांचा समज असल्याने ते दिवाळीच्या दिवशी वारुळाची भक्तिभावे पूजा करतात. तसेच शेळ्या-मेंढ्या हाकताना हरहर असा उद्‌गार काढतात. हरहर हे महादेवाचे नाव आहे.

धनगर हे महाराष्ट्रातील परंपरागत मेंढपाळ जरी असले तरी काही धनगर गुरांचा व्यापार करतात. काही शेळीचे दूध विकतात, काही धनगर घोंगड्या विणण्याचा व्यवसाय करतात. शेती व्यवसाय करणारे धनगर स्थायिक झालेले दिसतात. हवामानात होणारे फेरफार व जंगलातील औषधी वनस्पतींचीही त्यांना माहिती असते. त्यामुळे काही धनगर औषधी वनस्पती विकतात.

धनगर जातीत बऱ्याच पोटजाती आहेत. त्यातील तत्सम जातींची नावे पुढीलप्रमाणे आहेतः- अहीर, डांगे, गटरी, हंडे, तेलवर, हटकर, हाटकर, शेगर, खुटेकर, तेलंगी, तेल्लारी, कोकणी धनगर, कानडे, वऱ्हाडे धनगर, झाडे, झेंडे, कुरमार, माहुरे, लाडसे, सनगर, धनवर इत्यादी. खुटेकर धनगर महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. परंतु हटकर धनगर हे पूर्वीच्या हैदराबाद संस्थानात विशेषतः नांदेड व परभणी जिल्ह्यांमध्ये व विदर्भात दिसतात. त्यांना बारगी (बार्गी) धनगर या नावाने ओळखले जाते. मजबूत बांध्याचे आणि कृष्णवर्णी असलेले हे हटकर धनगर शिवाजीच्या सैन्यामध्ये मोठ्या संख्येने होते. ते मराठ्यांच्या राज्यात चांगले लढवय्ये म्हणून नावारुपास आले. नाईक किंवा राव हे उपपद हटकरांना लावण्यात येते. हटकरांचा दरारा होता. त्यांची भीती निजामालाही वाटत होती व त्यांचा बंदोबस्त करण्यासाठी निजामाने ब्रिटिश सैन्याची मदत घेतल्याचे इतिहासात नमूद आहे. इंदूरचा राजा मल्हारराव होळकर हटकर पोटजातीतील होता. हटकरांच्या मध्ये दाढी-मिशा न काढण्याची रुढी आहे. अलीकडील काळात तेही रुढी पाळताना दिसत नाही. १९३१ च्या जनगणनेनुसार मराठवाड्यातील हटकरांची लोकसंख्या ४०,१७७ होती. परभणी जिल्ह्यात बंडे धनगर व खुटेकर या उपजातींची संख्याही मोठ्या प्रमाणात आढळते. बंडे धनगर स्वतःस श्रेष्ठ समजतात. हातकाकणे धनगर नांदेड जिल्ह्यात अधिक आहेत. वराडी (वऱ्हाडातून आलेले) व कानोरे (कर्नाटकातून आलेले) धनगर वर्धा जिल्ह्यात जास्त आढळतात. विशेषतः आर्वी तालुक्यात यांची संख्या जास्त आढळते. डांगे व मेंढे धनगर कोल्हापूरमध्ये अधिक आढळतात. सह्याद्रीच्या डोंगराळ भागात जे गुरे चारतात त्यांना डांगे म्हणतात. ते गुरांचा व्यापारही करतात. मेंढरांचे कळप बाळगणाऱ्यांना मेंढे म्हणतात. ते बकऱ्या, मेंढ्या व लोकर विकतात. शेतात खतासाठी बकऱ्या व मेंढ्या बसवून त्याबद्दल ते शेतकऱ्यांकडून धान्य किंवा पैसे घेतात. यासाठी ते गावोगाव फिरत असतात. सातारा जिल्ह्यात फलटण येथे यांची वस्ती फार मोठ्या संख्येने आढळते. जावळी, पाटणच्या डोंगराळ भागातही बरेच धनगर आढळतात. येथे गावड धनगर आहेत. सोलापूर जिल्ह्यातही धनगरांची संख्या फार मोठी आहे. पुणे जिल्ह्यातील धनगर आपण सातारा जिल्ह्यातून आलो असे सांगतात. भंडारा जिल्ह्यात झाडे धनगर तर खानदेशात अहीर धनगरांची वस्ती प्रामुख्याने दिसते. ते चितोडहून आल्याचे सांगतात. अहमदनगर जिल्ह्यात मैदानात राहणारे काही धनगर अश्वपालन करतात. त्यांच्या उत्पत्तीविषयी अनेक दंतकथा प्रचलित आहेत. परंतु त्यांच्यात आढळून येणारे देवकांचे अवशेष, त्यांचा कृष्ण वर्ण व बळकट पण कृश अंगकाठी यावरुन त्यांच्यात येथील मूळ रहिवाशांचा काही तरी अंश असावा. रायगड जिल्ह्यात प्रामुख्याने म्हशी पाळणारे म्हणजे म्हसके किंवा म्हसकर धनगर असून, ते डोंगरमाथ्यावर लहान लहान पाड्यांत राहत असल्याने त्यांना डोंगरी धनगर असेही म्हणतात.

धनगरांच्या पोटजातीत एकच आडनाव लावणाऱ्या लोकांचे बहिर्विवाही गट आहेत. अशी पंधरा आडनावे असल्याचे दिसते. ही आडनावे पुढीलप्रमाणे आहेत :- हुलके, काळे, गायकवाड, कुलमुले, सोलंकर, सरक, पाटील, चवेर, भैरे, ढेरे, खांडेकर, खरात, खताळ, नाईक नवरे आणि शेंडगे. धनगरांची कुळे देवकांवर आधारलेली आहेत. सूर्यफूल, कमळ, पाचपालवी ही त्यांची देवके आहेत. धनगरांचा विवाह स्वतःच्या पोटजातीत व आडनाव भिन्न असणाऱ्या कुलात होतो. मामेबहिणीशी विवाह करण्याची पद्धती आहे. परंतु आते व मावसबहिणीशी लग्न होत नाही. त्याचप्रमाणे पत्नीचे निधन झाल्यास तिच्या धाकट्या बहिणीशी लग्न करण्याची पद्धती आहे. वधूमूल्य आणि वरदक्षिणा किंवा हुंडा देण्याची पद्धती आहे. घटस्फोट व पुनर्विवाहाला मान्यता आहे. असे विवाह बहुधा जातपंचायतीच्या संमतीने होतात. बहुतेक धनगर भटके जीवन जगून पावसाळ्यात घरी वास्तव्य करतात. त्यामुळे विवाह बहुधा पावसाळ्यात सप्टेबरपर्यंत करतात. लग्नाच्या आधी मुंजाचा डाक घालतात. हा विधी वुंभाराकडून केला जातो. त्यानंतर मुंज्याचे जेवण देतात. घराण्यातील मुलगी कौमार्यावस्थेत मरण पावलेली असल्यास तिच्या आत्म्यास शांती लाभावी म्हणून कुमारीकेस विशिष्ट जेवण घालतात. त्यास भुने जेवण म्हणतात. नंतर वाघ्या व मुरळी खंडोबाचे

जागरण घालतात. त्यानंतर वधूवरास हळद लावली जाते व इतर विवाहविधी पार पाडले जातात.

धनगर जातीची खास दैवते म्हणजे महादेव, खंडोबा, विरोबा आणि रानदेवी होत. याखेरीज ते विठोबा, मारुती, सटवाई, जनाई, म्हसोबा इत्यादी देवतांची उपासना करतात. कोल्हापूरजवळील वाशी येथे विरोबाचे प्रसिद्ध दैवत असून दरवर्षी मार्च-एप्रिलमध्ये भरणाऱ्या यात्रेत राज्यातून फार मोठ्या संख्येने धनगर जमतात. पुणे जिल्ह्यातील जेजुरीच्या खंडोबाला व सांगली जिल्ह्यातील आरेवाडी येथील दैवतांना ते फार मानतात. खंडोबाची एक बायको धनगर जातीची होती असे म्हणतात. हे लोक तिला दगडाच्या घडविलेल्या किंवा मातीच्या मेंढ्या अर्पण करतात. जेजुरीच्या देवळात अशा मेंढ्यांचा ढीग पडलेला असतो. वर्धा जिल्ह्यातील पुलगाव जवळील नाचणगावचा बहराम हा वर्धा धनगरांचे आराध्य दैवत असून त्यांच्या कळपांचा रक्षणकर्ता मानला जातो. माघ महिन्यातील शेवटच्या दिवशी ' धीमर ' हा धर्मगुरु देवपूजा करतो. ' गजो ' नावाच्या धार्मिक समारंभास फार महत्त्व असते. भाद्रपद व आश्विन महिन्यात विठोबाच्या स्तुतिपर लोकगीते म्हणतात व ढोलाच्या तालावर नृत्य करतात. देवतांच्या यात्रेच्या प्रसंगी देवाला बकरे बळी देण्याची पद्धती आहे. मृतदेहाचे दहन अथवा दफन करण्याची पद्धती दिसते.

धनगर काटक, कष्टाळू व आतिथ्यशील असतात. वर जाडसर अंगरखा व कमरेच्या पुढच्या बाजूस त्रिकोणी पडदा सोडलेली लंगोटी, डोक्याला पागोटे, हातात जाड काठी व पायात जाड वहाणा असा त्यांचा पोशाख असतो. भाकरी, चटणी, कांदा व डाळ हा त्यांचा आहार होय. काही पुरुष उजव्या हातात चांदीचे कडे व कानात बाळी घालतात. महिलाही बरेच चांदीचे दागिने घालतात.

धनगर लोक जरी प्रामुख्याने मेंढपाळीच्या व्यवसायात दिसत असले तरी अलीकडील काळात शेती, सावकारी व छोटे धंदे करतांना दिसतात. महाराष्ट्र शासनाने या समाजातील भटक्या लोकांची विमुक्त व भटक्या जमातीत गणना केली आहे. पूर्वी इतर मागासवर्गात गणना होती.

धीवर : महाराष्ट्रात धीवर, ढीवर, धीमर किंवा भोई या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या जातीची मुंबई इलाखा, विदर्भ व मराठवाडयातील लोकसंख्या १९३१ च्या जनगणनेच्या वेळी २,४४,१८९ होती. धीवर किंवा ढीवर जातीची वस्ती मुख्यतः वऱ्हाड व पूर्व महाराष्ट्रामध्ये दिसून येते. विदर्भ व पश्चिम महाराष्ट्रात या जातीला भोई या नावाने ओळखले जाते. वरील नावांखेरीज या जातीला पालेवार, मच्छींद्र, कहार, मल्हा या नावांनीही ओळखले जाते. धीवर हा संस्कृत शब्द असून त्याचा अर्थ कोळी अथवा मच्छीमार असा होतो. भोई हा शब्द दक्षिण भारतीय असून प्रामुख्याने पालखी अथवा मेणे वाहून नेणाऱ्यांना भोई म्हणत असावे. भोई हा शब्द जातिवाचक व धंदा वाचक आहे. त्यामुळे हा व्यवसाय करणाऱ्या अनेक जातींच्या लोकांना हे नाव मिळाले आहे. उदाहरणार्थ काही महार व कहार लोक आपल्याला भोई म्हणवून घेतात. **जातिविवेक** या ग्रंथात भोयांना पौष्टिक असे नाव दिले असून ब्राह्मण पिता पराशर याच्यापासून ही संतती असल्याचे सांगितले आहे.

धीवर लोक नद्या आणि तलावांमध्ये मच्छीमारीचा व्यवसाय करतात. शिवाय शिंगाडे. खरबूज, टरबूज, यांची शेती व विक्रीचा व्यवसाय करतात. तसेच ते मेणे व पालखी वाहणे, मशाल धरणे, पखालीतून पाणीपुरवठा करणे, लाह्या, चुरमुरे भाजणे व विकणे तसेच स्वयंपाकी व घरगड्याचे कामही करतांना दिसतात. महिला मासे विकण्याचा व्यवसाय करतात. रत्नागिरी जिल्ह्यातील धीवर फक्त पालख्या नेतात. त्यांना राजभोई म्हणतात. ते मासेमारी करीत नाहीत. दुसऱ्या भोयांबरोबर त्यांचा रोटी-बेटी व्यवहार होत नाही. खानदेशात ते मासे मारणे, पालख्या वाहणे, चणे भाजणे, नदीकाठी कलिंगडे व काकडया लावण्याचा व्यवसाय करतात. काही शेतावर मजुरी करतात तर कित्येक जण गाढवांवरुन गावोगाव धान्याची वाहतूक करतात. त्यांची मातृभाषा मराठी असून देवनागरी लिपीचा ते वापर करतात. खानदेशी भोई अहिराणी भाषाही बोलतात.

पुणे जिल्ह्यात भोई, वराधी आणि कडू असे तीन पोटभेद आहेत. अहमदनगर जिल्ह्यात मराठा आणि मल्हा (म्हळा), नाशिक जिल्ह्यात चांदोर किंवा सप्तशृंगी टेकडीच्या उत्तरेस आणि दक्षिणेस राहणारे, ठाणे जिल्ह्यात खारी म्हणजे खाऱ्या पाण्यात व गोडे म्हणजे गोडया पाण्यात मासे मारणारे असे दोन पोटभेद आहेत, यांच्यात बेटीव्यवहार होत नाही. रत्नागिरीत राजभोई, खानदेशात महारयर्ला, तरक्षा आणि धीमार किंवा धीवर असे तीन पोटभेद आहेत. यापैकी धीवर हे गुजरातमधून आलेले आहेत. मराठा भोयांशी त्यांचे सर्व बाबतीत साम्य आहे. वर्धा जिल्ह्यात मच्छींद्र, गाढव भोई, भणारी, झिंगा, धीवर या पोटजाती आढळतात, काही स्वतःला माया मच्छिंद्राचे, तर काही वाल्मिकी ऋषीचे वंशज समजतात. मच्छींद्र भोई नाथपंथीय आहेत. भणारी भोई फुटाणे भाजतात. त्यांना भडभुंजेही म्हणतात. गाढव बाळगणारे भोई रेती चुना वाहण्याचे काम करतात. मुसलमान भोयांना झिंगा भोई म्हणतात. महाराष्ट्रातील भोयांची राहणी मराठा-कुणब्यांसारखीच आहे.

धीवर जातीत दहा अंतर्विवाही पोटजाती आहेत. त्यापैकी बोंधैया, बेंदोरे, भोई, धुरिया, डिगोरे, कोएत, केरी, नध व सिंगाडी या नऊ पोटजातींची नोंद झाली आहे. त्यांच्यात आडनावाने ओळखली जाणारी व बहिर्विवाही अशी

तीस कुळे आहेत. त्यांची बरीच आडनावे व्यवसायावरुन वा गावावरुन पडलेली आढळतात. उदाहरणार्थ सिंगरिया, तुमसरे, नागपूरकर वगैरे. आते-मामे भावंडांचा विवाह प्रथेप्रमाणे होतो. घटस्फोट व पुनर्विवाहाची प्रथा आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील गरीब धीवरांमध्ये एखाद्या स्त्रीच्या कुटुंबीयांना थोडे पैसे देऊन तिच्याबरोबर बायकोप्रमाणे राहता येते व त्यांचा रीतसर विवाह पुढे केव्हा तरी होतो. आजोबा, मुलगा व नातू यांचे रीतसर विवाह एकाचवेळी होतानाही दिसतात. भाविक धीवर अन्नपूर्णा देवीची पूजा करतात. गोंड आणि मध्यप्रदेशातील आदिवासींमध्ये लोकप्रिय असलेल्या दुल्हादेव व नारायणदेव या देवांचीही पूजा करतात. काही धीवर डुकरे पाळतात व डुकरांचा बळी देतात. विदर्भातील धीवरांच्या काही चालीरीती त्यांची गोंडांबरोबर सामाजिक जवळीक दर्शवितात. मराठा भोई लोक महादेव, मारुती व विठोबाला भजतात. जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, बहिरोबा व म्हसोबा या त्यांच्या कुलदेवता होत. कानफाटे गोसावी हे त्यांचे धार्मिक गुरु होत. मंत्रतंत्रावर त्यांचा विश्वास असून भूताखेतांची पीडा घालविण्यासाठी देवऋषीला बोलावतात. मोरसाई, चावडमाता, मनसाई, रेणुका, एकवीरा या खानदेशी भोयांच्या कुलदेवता असून गोसावी त्यांचे धर्मगुरु असतात.

न्हावी : नापित या संस्कृत शब्दापासून न्हावी या नावाची व्युत्पत्ती झाली असावी. महाराष्ट्रात न्हाव्यांच्या उत्पत्तीसंबंधी प्रचलित असलेल्या एका दंतकथेनुसार शिवाच्या मानेला वेष्टून राहिलेल्या शेषापासून किंवा शिवाच्या नाभीपासून आपली उत्पत्ती झाली असे ते सांगतात. देशपरत्वे या जातीची अनेक नावे आहेत. केस कापणे, दाढी करणे, नखे काढणे, कान कोरणे व लहान शस्त्रक्रिया करुन गळू, फोड बरे करणे व जळवा लावून शरीराच्या दूषित भागातील रक्त काढणे हे व्यवसाय परंपरेने करणाऱ्या जातीला महाराष्ट्रात न्हावी म्हटले जाते. न्हावी महिला कुशल सुईण असते. सोलापूर व मराठवाडयात न्हाव्याला वारिक म्हणतात तर विदर्भात म्हाली या नावाने ओळखले जाते. पूर्वीच्या मुंबई इलाख्यात १९११ च्या जनगणनेप्रमाणे मराठी भाषिक न्हावी समाजाची लोकसंख्या १,०८,६८३ होती. गुजरातमध्ये न्हाव्याचा व्यवसाय करणाऱ्या जातीला हजाम या नावाने, तर उत्तर हिंदुस्थान व मध्यप्रदेशामध्ये नाई या नावाने ओळखले जाते व या जातीचे सामाजिक स्थान बरेच वरचे असते. महाराष्ट्रात न्हावी ही जात बलुतेदार म्हणून मानली जाते व त्यांचा दर्जा शेती करणाऱ्या जातींच्या बरोबरीचा मानला जातो.

मराठी भाषिक न्हावी जातीच्या दोन प्रादेशिक पोटजाती आहेत. मराठा अथवा देशी आणि कोकणी या दोन पोटजातीत रोटी-बेटी व्यवहार परंपरेने होत नाहीत. ठाणे जिल्ह्यात या दोन्ही पोटजातींतील लोक आढळतात. मराठा न्हावी पोटजातीत पुन्हा आठ उपगट आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे :- गंगातीरकर किंवा गोदावरी, घाटी, जुनारी, कुणबी, खानदेशी किंवा मशालजी, वैदेशी (वाईदेशी), वाजंत्री आणि येलमार. कोकणी न्हावी पोटजातीत शिंदे आणि बांदे असे दोन गट आहेत. पूर्वी वाईदेशींना श्रेष्ठ समजण्यात येत असे, तर जुनारी हे युरोपियन व मुसलमान जिवगर यांची हजामत करीत. त्यामुळे त्यांना कनिष्ठ मानले जात असे. कोकणी न्हाव्यांतील शिंदे हे अनौरस संततीचे म्हणून आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दक्षिण भागातील आणि सावंतवाडी संस्थानातील बंदेची सुंता करतात म्हणून परंपरेने हलके समजले जात. खानदेशी न्हाव्यांमध्ये अहीर आणि तायडे हे दोन पोटभेद आहेत. अहीर न्हावी सनई, बासरी, ढोल ही वाद्ये वाजवतात, तर तायडे न्हावी वरातीत पेटोमॅक्स बत्ती घेऊन चालतात. कोलहापूर जिल्ह्यात लिंगायत, मशाल न्हावी व मराठा न्हावी या पोटजाती आढळतात. मराठा न्हावी कपाळास गंध लावतात, परंतु लिंगायत न्हावी भस्म लावतात व गळयात किंवा दंडावर लिंग बांधतात. धार्मिक कार्यासाठी जंगम पुरोहितास बोलावतात. मराठा न्हाव्यांचे धार्मिक विधी ब्राह्मण करतात. काही न्हावी शेती व्यवसायही करतात.

देशी अथवा मराठा न्हावी यांची आडनावे, सामाजिक संघटना व धार्मिक रीतीरिवाज कुणब्यांप्रमाणे असतात. काही भागात उच्चकुलीन मराठा जातीच्या पंगतीत पाणी वाढण्याचे काम न्हावी करतो. काही भागात ते आचाऱ्याचे काम करतात. आते-मामे भावंडांचा विवाह करण्याची प्रथा न्हावी जातीत आहे. काही पोटजातीत विधवाविवाह आणि घटस्फोट रुढ आहे.

कोकणी न्हाव्यांत विधवाविवाहाच्या वेळी नवरा मुलगा आदल्या रात्री कासार, महार व काही विधवा महिलांसह वधूच्या घरी जातो व तिला साडीचोळी, दागिने व तीन काळे रेशमी गोंडे देतो. वधूवर एका पाटावर बसून त्यांचेसमोर केळीच्या पानावर ठेवलेले तांदूळ, दुधाचा पेला व घट यांची पूजा करतात. कासार वधूला चुडा भरतो व एक विधवा तिच्या कपाळी कुंकू लावते. नंतर शेष विधी होतो. त्यावेळी वर आपले पागोटे गुडघ्यावर काढून ठेवतो. विधवा महिला वराच्या गुडध्यास कुंकू व अक्षता लावते व वधूची ओटी भरते. रात्री वरात वरगृही जाण्यास निघते तेव्हा विधवेच्या मृत पतीच्या अंगणात धान्य, फळे, नारळ, तांदूळ वगैरे वस्तू ठेवतात.

व्यवसायामुळे न्हाव्याच्या सर्वांशी निकटचा संबंध येत असल्याने ही जात हुशार व सर्वांचे मर्म जाणणारी असल्याचा प्राचीन लौकीक आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी विवाह जमविण्याचे कामात त्यांचा इतरांना उपयोग होत असे. तसेच लग्न सोहळ्यात ब्राह्मणाचा मदतनीस म्हणून न्हावी काम करीत असे. कोल्हापूर जिल्ह्यात पालखी वाहून नेण्याचे, मराठवाडयात सार्वजनिक कार्यात मशाल धरण्याचे, खानदेशात लग्न प्रसंगी पाहुण्यांची सरबराई करणे, चवऱ्या

ढाळणे, बिछाईत घालणे, नागपुरात पत्रावळी लावणे, अक्षता वाटणे, पानसुपारी देणे, मराठ्यांच्या लग्नात लोकांच्या हातावर जेवणापूर्वी व नंतर पाणी घालणे ही कामे न्हावी करीत. आता शिक्षणाच्या प्रसारामुळे या पध्दती बऱ्याच प्रमाणात लोप पावत आहेत. मात्र अद्यापही मुलांचे जावळ काढणे, मुंजीत बटुचे मुंडन करणे व मृत व्यक्तीच्या मुलांचे केस कापणे अशा कामांसाठी न्हाव्यांना पाचारण करण्यात येते.

परीट : परीट व धोबी या नावाने ओळखली जाणारी ही जात परंपरेने कपडे धुण्याचा व्यवसाय करते. धोबी हे नाव धव म्हणजे धुणे या संस्कृत शब्दापासून पडलेले असावे. प्राचीन काळापासून बारा बलुतेदारांमध्ये धोबी समाजाचा समावेश आहे. मुंबई इलाख्यात या जातीची लोकसंख्या १९११ साली ६६,६२१ होती. महाराष्ट्रात ते सर्वत्र विखुरले आहेत. त्यांच्यात देशी परीट, कोकणी परीट, परदेशी व कामाठी या पोटजाती असून त्यांच्यात परंपरेने रोटीबेटी व्यवहार होत नाहीत. मात्र देवक बहिर्विवाह पद्धती आहे. एकच देवक असणाऱ्या मुला-मुलींचे विवाह होत नाहीत. आते-मामे भावंडांचा विवाह प्रथेप्रमाणे होतो. त्याचप्रमाणे घटस्फोट व विधवा पुनर्विवाहाची पद्धती आहे. विधवेला मयत पतीच्या कुळात विवाह करता येत नाही. त्यांचे धार्मिक आचार, पोशाख आणि जेवणाची पद्धती कुणबी जातीप्रमाणेच असते. स्थानिक ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

पोवार : पोवार, पवार, पनवार, पुवार आणि परमार राजपूत या नावांनी ओळखली जाणारी ही जात म्हणजे प्राचीन राजपूत अग्नी कुळांपैकी एक प्रसिध्द कुळ आहे. वर्धा जिल्ह्यात यांना भोयर असेही म्हणतात. नवव्या ते बाराव्या शतकातील माळव्याचे राजे या कुळातील होते. धार येथे त्यांची राजधानी होती. अजूनही सर्व पवार आपण मूळचे धारचे असल्याचे सांगतात. या वंशाच्या उत्पत्तीविषयी अनेक कथा आहेत. या वंशातील सिंधुराजाचा दरबारी कवी पद्मगुप्त परिमल याने आपल्या **नवसाहसांकचरित** नामक ग्रंथात सांगितलेल्या कुळकथेनुसार वसिष्ठ ऋषीची कामधेनू राजर्षी विश्वामित्राने पळवून नेली असता तिच्या मुक्तीसाठी वसिष्ठ ऋषीने अबू पर्वतावर यज्ञ आरंभिला. या यज्ञाच्या अग्निकुंडातून निर्माण झालेल्या वीरपुरुषाने कामधेनूला सोडवून आणले. त्याच्या या कामगिरीबद्दल वसिष्ठाने त्याला परमार म्हणजे शत्रूंचा नाश करणारा अशी पदवी दिली व राज्यपदही दिले. उपेंद्र हा परमार वंशातील पहिला ज्ञात पुरुष मानला जातो. इ. स. १०५० नंतरच्या परमार वंशाच्या एका अभिलेखात वरीलकथा आढळते. दहाव्या शतकाच्या प्रारंभीच्या परमार वंशाच्या हरसोल येथे मिळालेल्या दानपत्रावरुन या वंशाचा उदय राष्ट्रकूट वंशापासून झाला असे दिसते. इ.स. ८१२ च्या सुमारास राष्ट्रकूट राजा गोविंद तिसरा याने प्रतिहार राजा नागभट याचा पराभव करुन मालव प्रदेश जिंकला व आपल्या कुळातील उपेंद्र नामक पुरुषाला ते राज्य दिले. तो राष्टकूट्रांचा सामंत म्हणून राज्य करु लागला. धारानगरी त्याची राजधानी होती.

सन ११९० मध्ये शहाबुद्दीन घोरीकडून पराभव झाल्यानंतर धारचे पवार अधिपती हिंदुस्थान, मध्यभारत आणि महाराष्ट्रात पसरले. दख्खनमध्ये आलेल्या पवारांमध्ये प्रथम शिवाजी पवार या जमीनदार घराण्याचा उल्लेख केला जातो. त्याचे नातू संभाजी व काळोजी शिवाजीच्या सैन्यात सेनाप्रमुख होते. सन १७३४ मध्ये आनंदराव पवारची माळवा व गुजरातमधील मराठ्यांच्या महसुलाचा हिस्सा वसूल करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. अठराव्या शतकात भोसलेंचे नागपूरमध्ये राज्य स्थिरावले तेव्हा काही पवारांनी त्यांच्या अधिपत्याखाली सैनिकी पेशा स्वीकारला व भोसलेंबरोबर कंटकच्या मोहिमेत भाग घेतला. त्याबद्दल भोसलेंनी वैनगंगा खोऱ्यातील जमीनी इनाम म्हणून देऊन पोवारांचा गौरव केला. पोवारांनी येथे तलाव बांधून व भात शेतीला पाणीपुरवठा करुन, उत्तम शेतकरी म्हणून नावलौकिक मिळविला. कोहळी जातीप्रमाणे ते धरणे बांधण्यात वाकबगार होते. वैनगंगेच्या खोऱ्यात स्थायीक झालेल्या पवारांनी इतर जातीतील महिलांशी विशेषतः विधवांशी विवाह संबंध जोडले. त्यांच्या आडनावांतून त्याचे मिश्र स्वरुप स्पष्ट होते. तरी पण राजपूत वंशाची शारीरिक लक्षणे म्हणजे सरळ नाक, गोरा रंग व डोळयांचा खास रंग पोवार जातीत प्रकर्षाने दिसून येतात. मराठी भाषिकांमध्ये अनेक शतके राहिले असले तरी ते बघेली अथवा पूरबी हिंदीसारखी आपली बोलीच बोलतात.

शेतीच्या व्यवसायात महिलांचा उपयोग असल्यामुळे विधवाविवाहाला जातीत मान्यता आहे. विधवेला बरेच वधूमूल्य किंवा देज मिळते. महिलांच्या विवाहबाह्य संबंधाकडेही कानाडोळा करण्याकडे कल दिसून येतो. घटस्फोट संमत असला तरी क्वचितच घेतला जातो. इतर जमातीच्या स्त्रियांना अंगवस्त्र म्हणून ठेवले जाते. सेवा विवाहाची पद्धती या जातीत आहे. त्यांच्यात पोटजाती नसून बहिर्विवाही गट आहेत. हिंदू दैवतांना ते भजतात. परंतु त्यांचा प्रमुख देव दुल्हादेव होय. विवाहप्रसंगी व पहिल्या मुलाच्या जन्मानंतर दुल्हादेवाला बकरी समर्पित करतात. अलीकडील काळात शिक्षणाच्या प्रसारामुळे या जातीतील बरेच लोक शिक्षक, वकील व शासकीय सेवेत असल्याचे दिसून येते.

पाठारे प्रभू : पाठारे प्रभू ही एक छोटी जात असून १९११ च्या जनगणनेनुसार या जातीची लोकसंख्या ३,२९३ होती. पाठारे प्रभूंची वस्ती प्रामुख्याने मुंबईत दिसते. यांना पाताणे किंवा पैठणे प्रभू असेही म्हणतात. त्यांच्या मूळ वस्तीबद्दल दोन मतप्रवाह आहेत. एका मतानुसार ते अकराव्या-बाराव्या शतकात पैठण येथे गेले व तेथून १३००

साली मुंबईत आले. दुसऱ्या मतानुसार ते गुजरातमधून बिंबाच्या नेतृत्वाखाली मुंबईच्या किनापट्टीवर आले आणि तेथील वारली आणि कोळी प्रमुखांना बाजूस सारुन तेथे स्थायिक झाले. पळशे या शुक्ल अथवा गुजरात यजुर्वेदी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जातीशी पाठारेंचा संबंध जोडला जातो. त्यांची काही नावे व घरगुती वापराच्या वस्तू, फेटे आणि पादत्राणे गुजराती घाटणीची असल्यामुळे ते गुजरातमधून आले असावेत या मतास पुष्टी मिळते.

पी. बी. जोशींच्या मते पाठारे हे कनौज व राजस्थानातील प्रतिहारांचे वंशज होते. इ.स. १०१८ मध्ये गझनीच्या महमूदाने कनौजवर स्वारी करुन प्रतिहार घराण्यातील शेवटचा राजा राजपाल याचा पराभव केल्यानंतर प्रतिहार किंवा पाठारे प्रभू यांचे पूर्वज पैठणला राजाश्रयार्थ आलेत. पुढे ते भीमदेव किंवा बिंबदेवाबरोबर उत्तर कोकणात आले तेव्हा त्यांना पैठणे प्रभू किंवा पैठणकर प्रभू असे म्हणू लागले. पाताणे हे नाव पैठण या शब्दाचा अपभ्रंश होय असे जोशींचे म्हणणे आहे. दुसऱ्या एका अभ्यासानुसार पैठणहून २८, नागाबाजहून ९, चापनेरहून १३, पन्हाळ्याहून ७, चेरणेरहून ७, दौलताबादहून ३ व अनहिलवाडहून २ पाठारे प्रभू कुळे कोकणात आली. ही कुळे चौल, एकसर, कोंदिवटे, दहिसर, चेंबूर, गोरेगांव, शीव, पसपौली, चेदवली, कल्याण, केळवे, माहीम, ठाणे या ठिकाणी कायमची वतनदार झाली. याचा अर्थ ही कुळे गुजरात, राजस्थान व देश या भागातून इकडे आली व सोबत त्या त्या भागातील भाषा व चालीरीतीही घेऊन आली.

पाठारे प्रभू लोक स्वतःला क्षत्रिय समजतात. त्यांचे क्षत्रियत्व शृंगेरी मठाच्या शंकराचार्याने मान्य केले आहे. परंतु सह्याद्री खंडाच्या २८व्या अध्यायानुसार पाठारे प्रभूंचा आद्यपुरुष राणा अश्वपती हा पैठण क्षेत्रात जाऊन राहिला असता त्याने एकदा भृगु ऋषीचा अपमान केल्याने भृगूने अश्वपतीला "तुझे राज्य जाईल" असा शाप दिला. त्यावर राजाने त्याची क्षमा मागितली तेव्हा भृगूने "तू कारकूनी करुन उर्जितावस्थेत येशील" असा त्याला उःशाप दिला. व्यवसायाने लेखनिक असलेल्या या जातीच्या लोकांनी ब्रिटिश अमदानीच्या सुरुवातीच्या कालखंडात शासकीय नोकऱ्यांमध्ये जागा मिळविल्या होत्या व विशेषतः कारकुनीच्या व्यवसायात त्यांनी आपले वर्चस्व स्थापन केले. उच्च व्यवसाय व व्यापार या क्षेत्रातही त्यांनी प्रवेश केला. मुंबईतील पाठारे प्रभू हे मोठे जमीनमालक व सुखवस्तू आहेत.

पूर्वी साखरपुड्याऐवजी कुलदेवतेला बकरी बळी देत. लग्नात मंगलाष्टके झाल्यावर मुहूर्ताच्या वेळी वराच्या पित्याने वधूच्या गळ्यात काळी पोत बांधण्याची चाल होती. यांच्यात सगोत्र विवाह निषिद्ध मानला आहे. आते-मामे भावंडांचा विवाह होतो. विधवाविवाहास मान्यता नाही. त्यांच्यात जानवे घालण्याची परंपरा आहे. पाठारे प्रभू लोक स्मार्त संप्रदायाचे असून शृंगेरी मठाच्या विचारांचे आचरण करतात. प्रभावती अथवा प्रभादेवी ही त्यांची मुख्य कुलस्वामीनी आहे.

बंजारा : (पृष्ठ ९१ वर माहिती दिलेली आहे.)

बारी : पानवाले म्हणून ओळखली जाणारी ही जात महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यात वसई, केळवे-माहिम व डहाणू, जळगाव जिल्ह्यात यावल, शिरसोली व फेजपूर आणि नागपूरजवळ रामटेक येथे आढळते. एका आख्यायिकेनुसार यांचा मूळ वंशज ब्राह्मण होता. बारी हे नाव तांबोल्यासही लावले जाते. बारी लोक उंच व वर्णाने काळे असून ते कष्टाळू व सुव्यवस्थित असतात. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या जातीची लोकसंख्या ६,७२७ होती.

बारी लोक मूळात उत्तर भारतीय असावेत. उत्तर प्रदेश आणि बिहार राज्यात या जातीची मोठी संख्या आहे. महाराष्ट्रातील बारी उत्तर हिंदुस्थानातून गुजरातमार्गे व वऱ्हाडातून आले असावेत. मूळात उत्तर भारतीय असले तरी मराठी ही त्यांची मातृभाषा झालेली आहे. बारी जातीत गोलाईत, सूर्यवंशी, लुम्हार, डग, लिंगायत आणि गोंधळी हे पाच उपगट आहेत, एन्थोव्हेन यांनी बारी जातीत पुढील तीन अंतर्विवाही गट असल्याचा उल्लेख केला आहे :- देशी, नेमाडी आणि वसवाडे. एकच कुळ असलेल्या व्यक्तींचा विवाह होत नाही. तसेच आते-मामे व मावसभाऊ यांच्याशी विवाह करता येत नाही. मात्र सख्ख्या बहिणी सख्ख्या जावा होऊ शकतात. विधवा विवाहास मान्यता आहे. अविवाहित पुरुषाचा विधवेशी विवाह करण्यासाठी लाक्षणिकरीत्या रुईच्या झाडाशी प्रथम विवाह करण्याची प्रथा आहे. विधूराचा कुमारीकेशी विवाह करावयाचा असल्यास त्याच्या मृत पत्नीचा चांदीवर ठसा उमटवून त्याची पूजा करतात. घटस्फोट रुढीसंमत असला तरी क्वचितच घेतला जातो. घटस्फोटीत स्त्रियांचा पुनर्विवाह पूर्ण धार्मिक संस्काराने न करता गांधर्व पध्दतीने केला जातो. बारी लोकांचे पौरोहित्य देशस्थ ब्राम्हण करतात. तुळजापूरची भवानी व खंडोबा यांना बारी जातीचे लोक कुलदेवता मानतात. विदर्भातील बारी नागपंचमीला नागदेवतेची व नागवेलीची पूजा करतात. स्वातंत्र्यपूर्व काळात जातीवर नियंत्रण ठेवण्याचे काम जातपंचायत करीत असे अलीकडील काळात जातिसभा अस्तित्वात आल्या आहेत. उदाहरणार्थ चंद्रपूर जिल्ह्यातील बारी समाज ही संघटना कार्यरत आहे. विवाहित मृत व्यक्तीचे दहन व अविवाहित व्यक्तीचे दफन करण्याची प्रथा आहे.

बुरुड : बांबूच्या पट्टयांपासून सूप, टोपल्या, दुरडया, करंडी, चटया यासारख्या वस्तू विणण्याचे तसेच वेताच्या खुर्च्या, शिडया यासारख्या विविध वस्तू करण्याचे काम परंपरेने बुरुड जातीचे लोक करतात. बुरुडांच्या पारंपरिक

व्यवसायाच्या निर्मितीची कथा शंकर-पार्वतीशी निगडित असल्याने शंकरपार्वती ही या समाजाचे श्रध्दास्थान आहे. १९११ मध्ये या जातीची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या ११,७४५ तर १९३१ मध्ये ७,८२६ होती. चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, अमरावती, वर्धा, गडचिरोली व सांगोल्याच्या डोंगराळ भागात बुरुड समाज आढळतो. महाराष्ट्रातील बुरुड लोक हिंदूधर्मी व मराठी भाषिक आहेत. कर्नाटकात ही जात मेडर या नावाने ओळखली जाते. कन्नड भाषिक मेडर लोक धर्मगुरु बसवराजचे अनुयायी आहेत.

मराठी भाषिक बुरुड जातीची विभागणी अनेक बहिर्विवाही कुळांमध्ये झालेली आहे. ही कुळे आडनावांनी ओळखली जातात. प्रत्येक कुळाचे विशिष्ट देवक असून काही देवके पुढीलप्रमाणे आहेत :- मोरपंख, कोंबडा, डुक्कर, तरवड, रुई, खैर इत्यादी. विवाहाच्या वेळी देवक पाहिले जाते. समान देवक असणाऱ्यांमध्ये विवाह करता येत नाही. मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा या जातीत आहे. बायकोच्या बहिणीशी विवाह होऊ शकतो. तसेच एकाच कुटुंबातील दोन भावांचा दुसऱ्या कुटुंबातील दोन बहिणींशी विवाह करणे अनुज्ञेय आहे. पूर्वी जेव्हा बालविवाह करीत तेव्हा विवाहाच्या होमाच्या वेळी पंच मंडळी वधूवरांकडून काही रक्कम घेतात. त्यास विडापद्धती म्हणतात. या जातीत विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोट मान्य आहे. विधवा विवाहाला पाट लावणे म्हणतात. अमावस्येशिवाय वद्य पक्षातील कोणत्या रात्री पाट लावता येतो. त्यावेळी पुरोहित व विधवा महिला उपस्थित असतात. अशा विवाहप्रसंगी सवाष्ण महिलांनी जाऊ नये अशी प्रथा आहे. कन्नड भाषिक बुरुडांमध्ये लग्नाचे पौरोहित्य ब्राह्मणाने निवडलेली सुवासिनी करते. वधूच्या गळयात तिने मंगळसूत्र बांधणे हा लग्नातील मुख्य विधी होय. धार्मीक जीवनात खंडोबा, जोतिबा, बहिरोबा, भवानी, राम, मारुती, विठोबा या देव-देवतांची उपासना केली जाते. धार्मिक कार्यात ब्राह्मण पौरोहित्य करतात. मृत व्यक्तीचे दहन अथवा दफन केले जाते. अंत्यविधीचे पौरोहित्य जंगम करतो.

ब्राह्मण : वैदिक काळातील हा अग्रगण्य वर्ग. मंत्र किंवा स्तोत्र रचणारे व म्हणणारे ते ब्राह्मण होत. वेदाध्ययन, अध्यापन व यज्ञकर्म करणारे ब्राह्मण कृषी आणि व्यापारही करीत व क्षत्रिय धर्मही आचरत. वर्गभेद गुणकर्मावर अवलंबून असल्याने आंतरवर्गीय विवाहावर त्याकाळी बंधन नव्हते. सन पूर्व १००० च्या सुमारास जन्मावरुन वर्ण अथवा जात ठरविण्याची कल्पना उगम पावल्यावर आंतरवर्णीय विवाह व प्रत्येक वर्णाचे व्यवसाय यावर बंधने आली. वेदांच्या चार संहिता निर्माण झाल्यानंतर वेदाध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांचे ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी व अथर्ववेदी असे उपवर्ग झाले. त्यानंतर प्रत्येक वेदाच्या अनेक शाखा, उपशाखा होऊन ब्राह्मणांचे पोटभेद झाले. अकराव्या शतकापासून विंध्य पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेशात राहणारे ते पंचगौड व दक्षिणेकडील प्रदेशात राहणारे ते पंचद्रविड या ब्राह्मणांच्या पोटजाती झाल्या.

सन १९३१ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाखा, विदर्भ व मराठवाडा मिळून ब्राह्मण जातीची लोकसंख्या ७,८१,४४८ एवढी होती व त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण २.३९ प्रतिशत होते. महाराष्ट्रातील ब्राह्मणांमध्ये अनेक पोटजाती आहेत. मुंबई इलाख्याच्या १९११ च्या जनगणना अहवालामध्ये महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या १४ पोटजाती असल्याचे नमूद केले आहे. त्या पोटजाती पुढीलप्रमाणे आहेत :- चित्पावन, देशस्थ, देवरुखे, गोलक किंवा गोवर्धन, जावळ किंवा खोत, कण्व, कऱ्हाडे, कष्ट, कुवंत किंवा क्रमवंत, मैत्रायणी, पळशीकर, सामवेदी, सव्वाशे, तिरगुळ किंवा त्रिगर्थ. इरावती कर्वे यांनी कृष्ण यजुर्वेदी शाखेची चरक ब्राह्मण नावाची पोटजात नागपूरच्या आसपास असल्याची नोंद केली आहे. स्थूलमानाने या विविध पोटजातींचे वर्गीकरण देशस्थ, कोकणस्थ आणि कऱ्हाडे या तीन गटात केले जाते. यामध्ये पंचगौड गटातील सारस्वत ब्राह्मण या पोटजातीचा चौथा गट म्हणून समावेश केला जातो. सारस्वत ब्राह्मण परंपरेने मांसाहारी. विशेषतः मत्स्याहारी आहेत. इतर पोटजाती शाकाहारी आहेत. देवरुखे ब्राह्मण हे कोकणात राहणारे ब्राह्मणही कोकणात राहतात परंतु ते मूळचे देशस्थ असून ऐतिहासिक काळात पैठणहून त्यांनी या प्रदेशात स्थलांतर केले.

ब्राह्मणांच्या धार्मिक जीवनात संस्कारांचे स्थान फार महत्त्वाचे आहे. धर्मशास्त्राने ब्राह्मणांना पुढील संस्कार करण्यास सांगितले आहे :- (१) गर्भाधान (गर्भधारणेसाठी), (२) पुंसवन (पुत्र होण्यासाठी), (३) सीमन्तोन्नयन (गर्भधारणेनंतर सातव्या महिन्यात), (४) जातकर्म (जन्मल्याबरोबर), (५) नामकरण (नाव ठेवणे), (६) अन्नप्राशन (उष्टावण), (७) कर्णवेध (कान टोचणे), (८) चौलकर्म (जावळ काढणे), (९) उपनयन (मुंज), (१०) समावर्तन (सोडमुंज), (११) विवाह, (१२) अंत्येष्टी (अंत्यसंस्कार). या वैदिक संस्काराखेरीज पाचवी आणि सटवाई सारखे लोकसंस्कारही ब्राह्मण पाळतात. अलीकडील काळात आधुनिकीकरणाच्या प्रभावामुळे या संस्कारांचे महत्त्व कमी झाले आहे. तरीपण विवाह आणि अंत्येष्टी हे संस्कार उचित गांभीर्याने पाळले जाताना दिसतात.

ब्राह्मणांची राहणी साधी असली तरी ते बुद्धिमान, दूरदर्शी, मुत्सद्दी व चतुर असल्याने प्राचीन काळापासून विविध क्षेत्रात त्यांनी नावलौकिक प्राप्त केल्याचे दिसते. तथापि बहुतांशी ब्राह्मण हे भिक्षुकी व कुलकर्णीपणा हे व्यवसाय करीत होते. ब्रिटिश अमदानीत ब्राह्मणांनी काळाची पाऊले ओळखून इंग्रजी शिक्षण घेण्यास सुरुवात केली व काही सरकारी नोकरीत दाखल झाले. काहींनी वकीली, वैद्यकी व शिक्षण व्यवसायात कीर्ती व पैसा मिळविला. त्यांनी

महाराष्ट्रात समाजसुधारणा आंदोलनाचे नेतृत्व केले व ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीचे नेतृत्व विशेषतः १९३२ पर्यंतच्या कालखंडात केले. काहींनी कारखानदारी स्वीकारुन औद्योगिक क्षेत्रातही आपली कर्तबगारी दाखविली.

नित्य व नैमित्तिक संस्कार त्यांच्यात कमी अधिक प्रमाणात सारखेच असतात. ब्राह्मणांमध्ये आढळणाऱ्या पोटजातींमध्ये मूळ वसतिस्थान, शारीरिक लक्षणे, विवाह आणि नाते, प्रथा, धार्मिक प्रथा आणि रुढी इत्यादी बाबतीत फरक दिसतो. महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या प्रमुख पोटजातीत दिसणाऱ्या सामाजिक व सांस्कृतिक विविधतेचे ज्ञान महाराष्ट्रातील समाज व संस्कृतीची जडणघडण कशी झाली याचे आकलन होण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहे. या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या पोटजातींच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींचे वर्णन पुढे केले आहे.

कोकणस्थ ब्राह्मण : कोकणस्थ ब्राह्मण म्हणजे चित्पावन हे समीकरण महाराष्ट्रात सर्वमान्य झाले आहे. **सह्याद्री खंड** या पुराणानुसार परशुरामाने जहाज फुटून मृत पावलेल्या चौदा परदेशी व्यक्तींच्या शवांपासून चित्पावन जातीची निर्मिती केली. या परदेशी व्यक्ती इराणमधील असाव्यात. त्यांना शुद्ध करुन घेऊन त्यांची कोकण विभागात वसाहत स्थापन केली. दुसऱ्या एका सिद्धांतानुसार आर्य उत्तर भारतातून गुजरातमार्गे कोकणात आले आणि तेथे स्थायिक झाले. आणखी एका मतानुसार चित्पावनांचे मूळ वसतिस्थान मराठवाडा भागातील बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे गांव होय. १९३१ च्या जनगणना सर्वेक्षणाशी संबंधित असलेल्या बी. एस. गुहा यांनी कोकणस्थ ब्राह्मणांच्या परदेशी उत्पत्तीच्या सिध्दांतास फारसे महत्त्व दिले नाही. त्यांच्या मतानुसार चित्पावन हे कोकणात येण्यापूर्वी उत्तर हिंदुस्थानातच कोठेतरी राहत असावेत. त्यांना चित्पावन हे नाव त्यांच्या चिपळूण येथील वसाहतीमुळे प्राप्त झाले असावे. मुंबईपासून मालवणपर्यंतचा प्रदेश हे त्यांचे मूळ वसतिस्थान होय. इ.स. १७१५ पासून ते स्वतःला चित्पावन म्हणून संबोधू लागले. शिवाजी महाराजांच्या राजवटीत त्यांचे देशावर स्थलांतर सुरु झाले आणि पेशवाईच्या कालखंडात ते मोठ्या संख्येने तेथे स्थायिक होऊ लागले. देशाच्या तुलनेने त्यांची संख्या मराठवाडा आणि पूर्व विदर्भात कमी दिसते.

पेशवाई काळात चित्पावन ब्राह्मणांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धनचा बाळाजी विश्वनाथ भट चरितार्थासाठी १६८९ च्या सुमारास मराठा दरबारात आला आणि स्वकर्तबगारीवर छत्रपती शाहूचा पहिला पेशवा झाला (१७१३). त्याच्या वंशजांनी मराठेशाहीचा विस्तार केला. मूळचे कोकणातले म्हणून ते व त्यांचे जातिबांधव कोकणस्थ या नावानेच सुपरिचित झाले व समाजात त्यांना श्रेष्ठत्वही प्राप्त झाले. त्यांच्यापैकी काहींनी संस्कृत पंडित, ग्रंथकार, मुत्सद्दी, वकील, न्यायशास्त्री, देशभक्त, क्रांतिकारक, व्यापारी, सावकार, सुभेदार, सरदार, किल्लेदार इत्यादी क्षेत्रांत विशेष कामगिरी केली. स्वातंत्र्यपूर्व काळात यांच्यापैकी बरेच लोक मोठे जमीनदार किंवा खोत होते.

Maharashtra State Gazetteers

कोकणस्थांच्या पोटजाती नाहीत. मात्र ऋग्वेदीय व हिरण्यकेशीय असे दोन प्रकार आहेत. उदाहरणार्थ आठवले, परांजपे, फडके, वुंटे, टिळक, बर्वे, केळकर, काणे इत्यादी घराणी ऋग्वेदीय, आश्वलायन सूत्र शाकल शाखीय होत. त्याचप्रमाणे लिमये, बोडस, नेने, ओक, देवधर, साठे, खरे, जोग, मोडक, बापट, लेले इत्यादी घराणी कोकणस्थच, परंतु यजुर्वेदीय हिरण्यकेशी तैत्तरीय शाखीय होत, दोन्ही शाखांचे बेटीव्यवहार होतात. त्यांचे संस्कार समान असले तरी प्रयोग निराळे असतात. उदाहरणार्थ ऋग्वेदी ब्राह्मणात मौजीबंधन संस्कार मुंज लागल्यावर करतात तर हिरण्यकेशी ब्राह्मणात मुंजीचे अगोदर संस्कार व मग मुंज लावतात. बटुला मुंजेच्या वेळी द्यावयाचे आशीर्वादपर मंत्र निरनिराळे आहेत. ऋग्वेदीय ब्राह्मण मंत्र म्हणताना दीर्घ स्वीय मंत्र म्हणतात, तर हिरण्यकेशीय आपस्तंभीय ब्राह्मण ऱ्हस्वस्वरीय मंत्र म्हणतात. चित्पावनांची चौदा गोत्रे आहेत. त्यांची मूळ साठ आडनावे म्हणजे साठ कुळी असा समज होता. परंतु आता आडनावांची संख्या बरीच वाढली आहे.

चित्पावन मध्यम उंचीचे घाऱ्या डोळ्यांचे, गौरवर्णी व सर्वसाधारणपणे सुखवस्तू आहेत. पूर्वी चित्पावन ब्राह्मण पुरुषांचा पगडी, कोट, धोतर, उपरणे व जोडे आणि महिलांचा नऊवारी पातळ व चोळी असा पोशाख होता. आता यात फारच बदल झालेला असून पगडी, कोट, उपरणे व जोडे अभावानेच दिसतात. शुभकार्यात पूजा करताना पुरुष केशरी, लाल किंवा पिवळ्या रंगाचा रेशमी मुगटा (कद किंवा पितांबर) नेसतात. माहेराहून पांढरी खडी असलेली काळी साडी (चंद्रकळा) नवविवाहित मुलीस मकरसंक्रांतीस देतात.

जेवणाचे ताट वाढण्याविषयी तसेच ठराविक पदार्थ ठराविक प्रसंगी करण्याविषयी चित्पावन व अन्य ब्राह्मण अतिशय काटेकोर असतात, रोजच्या जेवणात ताटात प्रथम पांढरा भात व मीठ कधीही वाढत नाहीत. डाव्या बाजूस लिंबू, चटणी वगैरे तर उजव्या बाजूस भाजी, पातळ भाजी वाढतात. मधोमध भात, वरण, तूप वाढतात. पांढऱ्या भातावर वरण वाढल्याशिवाय तूप वाढत नाही. डोहाळे जेवण, नामकरण, केळवण, मुंज, विवाह इत्यादी शुभकार्यात गव्हल्याची खीर आवश्यक मानतात. नैवेद्याच्या ताटात मीठ वाढत नाही. केशवपन केलेल्या विधवेने केलेला प्रसाद चालतो. परंतु सकेशा विधवेने केलेला चालत नाही. घास घेण्यापूर्वी चित्राहुती घालतात. पंगत असेल तर यजमानाने

मंत्रोदक सोडल्यावर जेवण सुरु करतात. लग्नाचे रात्री आमटी भात किंवा कढी भात करण्याची पध्दती आहे. श्राध्द पक्ष घालतात तेव्हा अमसुलाची चटणी, भाताची खीर, डाळीचे तिखट वडे, कारल्याची भाजी, आवळयाचा पदार्थ, गवार व भोपळयाची भाजी हे पदार्थ करतात.

सगोत्र, सप्रवर व सपिंड विवाह होत नाहीत. मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा नाही. यांची बरीचशी कुलदैवते कोकणातच असून त्यात व्याडेश्वर, हरिहरेश्वर, व्याघ्रेश्वर, कोळेश्वर, सोमेश्वर इत्यादींचा समावेश होतो. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील जोगेश्वरी ही बऱ्याच चित्पावनांची कुलस्वामिनी आहे. पेशवे गणपतीचे उपासक होते. म्हणून चित्पावनांनी गणपतीचीही उपासना स्वीकारली. नवरात्रीतील महालक्ष्मीची पूजा विशेष असते. या दिवशी पिठाच्या उकडीची महालक्ष्मीची पूर्णाकृती तयार करुन तिला वस्त्रे व अलंकार घालतात व अष्टमीला घागरी पुंकतात. नवविवाहितेने पहिली पाच वर्षे घागरी पुंकायची असते. याशिवाय शुभकार्यानंतर बोडण भरण्याचा विधी प्रामुख्याने करतात. तो एक आवश्यक कुलाचार असून यथासांग केला जातो.[१५]

देशस्थ ब्राह्मण : महाराष्ट्रात संख्येने सर्वाधिक असलेली ब्राह्मण जात म्हणजे देशस्थ ब्राह्मण. त्यांची वस्ती देशातील सर्व भागात आहे. देशावर राहणारे म्हणून त्यांना देशस्थ ब्राह्मण हे नाव प्राप्त झाले असावे. देशस्थांमध्ये ऋग्वेदी व यजुर्वेदी हे गट आहेत. यजुर्वेदांमध्ये शुक्ल यजुर्वेदी व कृष्ण यजुर्वेदी या पोटशाखा आहेत. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण ही अतिप्राचीन पोटजात असून ती महाराष्ट्रात सर्वत्र, त्याचप्रमाणे निजामाच्या संस्थानातील मराठी भाषिक प्रदेश आणि वऱ्हाडमध्येही आहे. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांचे तेलुगु आणि कन्नड ब्राह्मणांशी विवाह होताना अनेक वेळा दिसते. मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा त्यांच्यामध्ये खूप लोकप्रिय आहे. मावसबहिणीशी विवाह क्वचित होतो व तो रुढीसंमत आहे. त्यांच्यामध्ये वैदिक ऋषींच्या नावाने ओळखली जाणारी बावन्न गोत्रे आहेत. काही गोत्र नावे पुढीलप्रमाणे आहेत :- अगस्त्य, अंगीरस, अत्रि, कपि, भृगू, काश्यप, वसिष्ठ, विश्वामित्र इत्यादी. ते शाकल शाखेचे असून त्यांचे धार्मिक जीवन आश्वलायन गुह्यसूत्राप्रमाणे होत असते. त्यांच्यामध्ये स्मार्त आणि वैष्णव असे दोन सांप्रदायिक भेद आहेत. अंबाबाई आणि खंडोबा ही त्यांच्यातील बहुतेकांची कुलदैवते आहेत. त्याचप्रमाणे नृसिंह देखील काही जणांचे कुलदैवते आहे. पौरोहित्य व कुलकर्णीपण हा त्यांचा पारंपरिक व्यवसाय होता. शारीरिकदृष्ट्या ते वर्णाने सावळे व मध्यम उंचीचे आहेत. मात्र बेळगाव-धारवाड-हुबळी भागातून स्थलांतर करुन महाराष्ट्रात आलेले देशस्थ गोरे असतात.

शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण देखील ऋग्वेदी ब्राह्मणांप्रमाणे देशावरील सर्व भागात दिसतात. त्यांची लोकसंख्या जवळजवळ ऋग्वेदी ब्राह्मणांएवढी आहे. त्यांच्यात विशिष्ट वैदिक ऋषींची परंपरा मानणाऱ्या व विशिष्ट प्रदेशाशी निगडित अशा बऱ्याच अंतर्विवाही पोटजाती आहेत. महाराष्ट्रात त्यापैकी दोन शाखा प्रामुख्याने दिसतात. त्या म्हणजे माध्यंदिन व कण्व. यातील कण्व हे अधिक पूर्वी स्थलांतरित झालेले असून त्यांची वस्ती दक्षिणेला कृष्णा नदीच्या पुढे पसरल्याचे दिसते. कण्वांमध्ये मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. कण्व ब्राह्मणांच्या तुलनेने माध्यंदिन ब्राह्मण हे महाराष्ट्रात उशिरा स्थलांतरित झालेले दिसतात व त्यांची वस्ती प्रामुख्याने विदर्भ व मराठवाड्यातील जिल्ह्यांत दिसते. माध्यंदिन ब्राह्मणांमध्ये मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा नाही. एवढेच नव्हे तर आईच्या गोत्रजांशी विवाह करणेही निषिद्ध मानले आहे. यावरुन माध्यंदिन ब्राह्मण हे मुळात उत्तर हिंदुस्थानातील असावेत असे अनुमान केले जाते. ते उत्तर प्रदेशातून जबलपूरमार्गे विदर्भात आले असावेत व पुढे गोदावरी नदीच्या आसमंतात स्थिर झाले असावेत. त्यांची १३० गोत्रे आहेत.

कऱ्हाडे ब्राह्मण : पश्चिम किनाऱ्यावरील मालवण आणि संगमेश्वर यामधील प्रदेश हे कऱ्हाड ब्राह्मणाचे मूळ वसतिस्थान होय. सातारा जिल्ह्यातील कराडला पूर्वी करहाटक म्हणत आणि तेथून जे ब्राह्मण कोकणात उतरले त्यांना कऱ्हाडे हे नाव मिळाले. त्यांची वस्ती मुख्यत्वे दक्षिण रत्नागिरी व सिंधूदुर्ग जिल्ह्यांत आढळते. शिलाहारांच्या काळापासून त्यांना कऱ्हाडे ब्राह्मण म्हणू लागले. पेशवाईच्या काळात बरेचसे कऱ्हाडे मध्यप्रदेशमध्ये सागर, ग्वाल्हेर तसेच उत्तर प्रदेशातही स्थायिक झालेले दिसतात. यांच्यात ऋग्वेदी शाकल शाखा ही एकच वेदशाखा आढळते. यांची एकूण २४ गोत्रे आहेत. मोघे, भडकमकर, पुरोहित, पाध्ये, सरवटे, गुणे, हळबे, गर्दे, कऱ्हाडे, भागवत, गुर्जर इत्यादी त्यांची आडनावे आहेत. कोल्हापूरची महालक्ष्मी ही बहुतेक कऱ्हाडे ब्राह्मणांची कुलदेवता आहे. पूर्वी कऱ्हाडे प्रामुख्याने खोत, इनामदार, सरदेसाई, सरदेशपांडे, देसाई, सरपोतदार, पोतदार, सबनीस, कारखानीस इत्यादी सरकारी हुद्देदार होते.

देवरुखे ब्राह्मण : ही पोटजात कोकणात राहत असली तरी मूळचे ते देशस्थ होत. कनिष्ठ जातीचे पौरोहित्य ते करीत असत. वि. का. राजवाडे यांच्या मतानुसार कराडच्या आग्नेयेस असलेल्या वुंडलच्या (ता. खानापूर) पूर्वेस सुमारे १० किलोमीटरवरील देवराष्ट्रे नावाचे खेडे पूर्वीच्या देवराष्ट्राच्या राजधानीचे शहर होते. तेथील कुबेर नामक राजाच्या आश्रयाने जे ब्राह्मण राहत असत तेच देवराष्ट्रीय अथवा देवरुखे ब्राह्मण होत. हे राज्य पाचव्या शतकाच्या अखेरीस नष्ट झाल्यानंतर राजाश्रयाच्या अभावी देवराष्ट्रीय ब्राह्मण कोकणात प्रथम संगमेश्वर तालुक्यातील

देवरुखच्या आसपास व जयगड खाडीलगतच्या दक्षिणेकडील भागात स्थायिक झालेत. पुढे त्यांचे रायगड जिल्ह्यात स्थलांतर झाले असावे. मात्र रत्नागिरी जिल्ह्यातील वस्तीला ते आपली मूळ वस्ती समजतात. आपण मूळचे देशस्थ, परंतु देवरुख भागात राहायला आल्यामुळे देवरुखे नाव प्राप्त झाले असे हे लोक मानतात. रायगड जिल्ह्यात कर्जत व दहिवली भागात त्यांची बरीच वस्ती आढळते. त्यांच्यात आरेकर, कारुळकर, काळे, असावकर, मुळे, तेरेदेसाई, पिंपुटकर, भोळे, भडसाकळे, भाटलेकर, कानडे, मुसळे इत्यादी आडनावे आढळतात. तथापि मुळे, जोशी, निमकर व कुलकर्णी ही चारच मूळनावे आहेत. देवरुखे व देशस्थांची गोत्रे बरीचशी समान असून ऋग्वेदी आश्वलायन व यजुर्वेदी हिरण्यकेशी या त्यांच्या शाखा आहेत. तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी आणि जेजुरीचा खंडोबा ही त्यांची मुख्य दैवते होत.[१६] कोकणात त्यांची वस्ती असल्याने कोकणस्थ ब्राह्मणांप्रमाणेच गणपतीला तांदुळाच्या पिठाचे उकडीचे मोदक करतात व बहुदा खड्याच्या गौरी आणतात.

क्रमवंत ब्राह्मण : क्रमवंत ब्राह्मण ऋग्वेदी आश्वलायन शाकलशाखीय देशस्थ असावेत. यांची वस्ती प्रामुख्याने कोकणात आढळते. इ.स.१३९६-१४०७ च्या दुर्गादेवीच्या पहिल्या दुष्काळात उदरनिर्वाहार्थ बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथून टिल्लू घराण्याचे जे चार आद्य पुरुष निघाले त्यापैकी एक अष्टागरात आला. तो क्रमात अध्ययन केलेला असल्याने त्यास क्रमवंत अशी बहुमान सूचक पदवी देण्यात आली होती. याच्याच वंशविस्तारास क्रमवंत ब्राह्मण म्हणतात. आंगरे घराण्याचे पौरोहित्य यांच्याकडे होते, तेव्हा त्यांना बरीच मानमान्यता होती. छत्रपती शिवाजी महाराजाचे राज्यारोहण प्रसंगी (१६७४) पंडित गागाभट्टाने वाराणशीला गेलेले बाळकृष्णभट्ट व रघुनाथभट्ट हे दोन क्रमवंत ब्राह्मण शिष्य आणले होते. अष्टागराहूनही रघुनाथ, वीरेश्वर व जनार्दन हे क्रमवंत राज्याभिषेक समारंभास गेले होते. छत्रपतीच्या दरबारातही वेदमूर्ती गोपाळभट्ट टिल्लू हा विद्वान पुरुष होता. अष्टागराशिवाय अनेक गावांचे उपाध्येपण त्यांच्याकडे होते. त्यावेळी अष्टागरातील इतर ब्राह्मण जातींशी त्यांचे लग्नव्यवहार होत असत. उपजीविकेसाठी त्यांनी पुणे, नाशिक, त्र्यंबकेश्वर, वाई, सातारा, अहमदनगर, खानदेश, इंदूर, उज्जैन, ग्वाल्हेर, प्रयाग, काशी इत्यादी ठिकाणी स्थलांतर केले.[१७]

सारस्वत ब्राह्मण : महाराष्ट्रातील पंचगौड ब्राह्मणांपैकी असलेली ही एक पोटजात आहे. त्यांचे मूळ वसतिस्थान हे गोमांतक असून चौदाव्या शतकात मुसलमानांच्या आणि सोळाव्या शतकापासून पोर्तुगीजांच्या छळामुळे त्यांनी महाराष्ट्रातील विविध जिल्हयांत स्थलांतर केले. मराठेशाही, पेशवाई तसेच ब्रिटीश राजवटीतही त्यांनी चरितार्थासाठी स्थलांतर केले. आता ते प्रामुख्याने मालवण पासून दक्षिण कर्नाटकापर्यंत, त्याचप्रमाणे गोवा आणि मुंबई येथे स्थायीक आहेत. त्यांच्या मूळ वसतिस्थानाबद्दल तज्ञांमध्ये मतभिन्नता आहे. एका मतानुसार त्यांचे मूळ वसतिस्थान उत्तरेत दक्षिण पंजाब प्रदेशातील सरस्वती नदीच्या लगतचा प्रदेश असून ते सारस्वत ऋषींचे वंशज आहेत. दुसऱ्या एका मतानुसार उत्तर हिंदुस्थानातील गौड हे सारस्वतांचे पूर्वज असून परशुरामाने त्यांना प्राचीन काळी गोमांचल या नावाने ओळखल्या जाणाऱ्या गोव्यात वसविले. गुहांच्या मतानुसार सारस्वत आणि बंगालमधील ब्राह्मण यांच्यामध्ये आडनावे आणि शांता दुर्गा यासारख्या देवता याबाबतीत बरेच साम्य आहे. काही तज्ञांच्या मते कोशलच्या उत्तरेकडील प्रदेशाला प्राचीन काळी गौड हे नाव होते. येथून त्यांचे सध्याच्या ठिकाणी स्थलांतर झाले. काहींच्या मते गौड द्रविड हा दिशावाचक शब्द असून त्याचा अर्थ उत्तर (गौड) आणि दक्षिण (द्रविड) असा आहे. त्यावरुन सारस्वत हे उत्तरेकडून आले असावेत. पूर्वी सारस्वत हे शेणवी ह्या नावाने ओळखले जात असत. या शब्दाचा तीन प्रकाराने अर्थ लावला जातो. सारस्वतांची मूळ वस्ती ९६ खेड्यांत होती म्हणून त्यांचे नाव शेणवी पडले असावे. दुसऱ्या मतानुसार परशुरामाने सारस्वतांच्या शहाण्णव कुटुंबांना गोमांचलात आणले म्हणून त्यांचे नाव शेणवी पडले असावे. आणखी एका मतानुसार शानबाग म्हणजे ग्राम-हिशेबनीस या शब्दापासून शेणवी हा शब्द आला असावा. अनेक सारस्वत ब्राह्मण हे ग्राम-हिशेबनींसाचा व्यवसाय करीत असत. शिक्षक अथवा विद्वान असाही शेणवी या शब्दाचा अर्थ सांगितला जातो. सारस्वत ब्राह्मण परंपरेने मासे व मांस खातात. काही संप्रदायाचे अनुयायी मात्र पूर्ण शाकाहारी आहेत.

सारस्वतांमध्ये प्रदेशावर आधारित सहा पोटजाती आहेत. तसेच त्यांच्यात सोळा बहिर्विवाही गोत्रे आहेत. ते सगोत्र आणि सपिंड विवाह निषिध्द मानतात. परंतु मामेबहिणीशी विवाह रुढीसंमत आहेत. पूर्वी सारस्वतांच्या विविध पोटजातीत विवाह होत नसत. परंतु आता हे नियम शिथील झाले आहेत. स्मार्त आणि वैष्णव असे त्यांच्यात दोन सांप्रदायिक भेद आहेत. कवळे येथील शांतादुर्गा, नार्वे येथील सप्तकोटेश्वर आणि प्रियोळ येथील मंगेश ही स्मार्तांची कुलदैवते. म्हारदोळ येथील म्हाळसा, रामनाथ आणि कामाक्षी तसेच बांदोडा येथील नवदुर्गा आणि महालक्ष्मी आणि मोशेल येथील देवकीकृष्ण ही वैष्णवांची कुलदैवते. नागेशी येथील नागेश या देवतेला दोन्ही गट आपले दैवत मानतात. सारस्वत आपला कुळधर्म आणि कुलाचार यांचे पालन धार्मिक श्रद्धेने करतात. त्यांचे नित्य आणि नैमित्तिक धार्मिक आचार इतर ब्राह्मणांप्रमाणेच आहेत. त्यांच्यात विवाहमंडपाचा पहिला खांब आंब्याचा, तर मुंजीच्या मंडपाचा उंबराचा असतो. जेवणात नारळ आणि तांदूळ यांचा जास्त वापर असतो. कऱ्हाडे ब्राह्मण हे त्यांचे पुरोहित होत.

भावसार : सूत अथवा कापड रंगविणे व त्यावर छपाई करण्याचा व्यवसाय वंशपरंपरेने करणाऱ्या या जातीचे आगमन गुजरातमधून महाराष्ट्रात तेराव्या शतकात झाले. पुणे व जळगाव जिल्ह्यात यांची वस्ती प्रामुख्याने आढळते. तसेच पूर्वी निजामाच्या आधिपत्याखाली असलेल्या प्रदेशात भावसार जातीचे लोक आढळतात. मराठा भावसार व गुजराती भावसार हे भावसारांचे दोन प्रांतिक पोटभेद आहेत. मात्र रंगारी व शिंपी या व्यावसायिक पोटजाती आहेत. गुजरातमध्ये त्यांना छीपा किंवा छापगार म्हणतात. ते स्वतःस क्षत्रिय समजतात. तेथील बहुसंख्य भावसार वाणी आहेत. मराठा भावसार हे गुजराती भावसारांची महाराष्ट्रात येऊन स्थायीक झालेली शाखा असावी. त्यांचे रीतीरिवाज महाराष्ट्रातील इतर जातींप्रमाणे झाले असले, तरी ते गुजराती भावसारांप्रमाणे काठेवाडमधील बालाजीस व सिंधमधील हिंगलज मातेस भजतात. त्यांच्यात बनछोड, लाले, लोखंडे, मोडगरे, पारपती इत्यादी आडनावे आढळतात. भावसार उंचीने कमी, परंतु बळकट, कष्टाळू, काटकसरी व सौम्य वृत्तीचे असतात. त्यांचा पोशाख मराठा-कुणब्यांप्रमाणेच असतो. ते मराठी भाषा बोलतात. मुलींची लग्ने पाळण्यात असतानाच लावण्याची प्रथा पूर्वी यांच्यात होती. पुरोहित ब्राह्मणांना त्यांच्या समाजात मोठा मान असतो. ते शाकाहारी आहेत. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटास मान्यता आहे. मृतास अग्नी संस्कार करतात.[१८]

भिल्ल : महाराष्ट्रात भिल्लांची वस्ती प्रामुख्याने जळगाव, धुळे, बुलढाणा, नाशिक, औरंगाबाद व अहमदनगर जिल्ह्यांत आढळते. मानवंश शास्त्रज्ञांच्या मते प्राचीन काळी मध्यपूर्वेतून आलेलया प्रोटो-ऑस्ट्रलॉईड लोकांचे भिल्ल हे वंशज होते. प्राचीन वाङ्मय व कथांमध्ये या जमातीचे पुष्कळ उल्लेख सापडतात. **रामायणात** शबरी नामक भिल्लीणीची कथा, **महाभारतात** भिल्लांचा वेष धारण करुन शंकराने अर्जनाशी युध्द केल्याची कथा, वगैरे बऱ्याच कथा परिचित आहेत. सहाव्या शतकात उदय पावलेल्या गुणाढय या ग्रंथकर्त्याने भिल्लांचा प्रमुख एका राजाशी युध्द करीत असल्याचे वर्णन केले आहे. संस्कृत वाङ्मयात विंध्य पर्वतात राहणारे, तर पराशर संहितेत ब्राह्मण स्त्री व धीवर पुरुष यांच्या संततीला भिल्ल म्हटले आहे. द्रविड भाषेत बिल्लू म्हणजे धनुष्य आणि धनुष्य हेच भिल्लांचे प्रमुख शस्त्र असल्याने त्यावरुनच त्यांना भिल्ल हे नाव पडले असावे. काही तामीळ काव्यांतही उत्तर भारतातील आदिवासींचा बिल्लुवर (धनुर्धर) असा उल्लेख आहे.

डोंगरदऱ्यात राहणाऱ्या या आदिवासी जमातीचे मूळ स्थान अबू व असीरगड होय. त्यांची बहुतांश वस्ती गुजरात व राजस्थान मध्येच होती. राजपूत व भिल्लांचे संबंध पूर्वी सलोख्याचे होते. राजपूत राजे विजयानंतर आपल्या भुवईला भिल्लाच्या अंगठयाचे रक्त लावीत असत, तसेच भिल्ल नायकांच्या मुलीशी विवाह करीत. पुढे त्यांच्यापासून झालेल्या संततीला भिलाल असे नाव पडले व ती एक स्वतंत्र जमात बनली. परंतु इ. स. १००० ते १४०० या काळात राजपूतांनी त्यांना हुसकून लावल्यानंतर त्यांनी महाराष्ट्रात स्थलांतर केले.

भिल्ल हे पूर्वीपासून लढाऊ प्रवृत्तीचे होते. सतराव्या-अठराव्या शतकांमध्ये त्यांचा मुसलमान, मराठे व इंग्रज राजकर्त्यांकडून खूप छळ झाला. काही मुस्लिम राज्यकर्त्यांनी त्यांच्याशी सलोख्यांचे धोरण स्वीकारले व त्यांना सहानुभूतीने वागविले. औरंगजेबाने त्यांच्या लढाऊ वृत्तीचा उपयोग करुन घेतला. त्या बदल्यात त्याने भिल्लांना उदारतेने जमिनी बक्षीस दिल्या. त्यामुळे मुघल काळात भिल्लांचे जीवन शांत व सचोटीचे होते. परंतु पेशवाईच्या काळात झालेल्या अतोनात छळामुळे ते बंड करुन उठले. मराठयांनी अनेक भिल्लांची क्रुरपणे हत्या केली. त्यामुळे भिल्ल डोंगरदऱ्यांच्या आश्रयास राहिले व संधी मिळताच सपाटीवरील प्रदेशात येऊन लुटालूट करु लागले. एकोणिसाव्या शतकात इंग्रजांना जेरीस आणणारे केजारसिंग, तुबिया नाईक व तंटया भिल्ल यांनी खानदेश व मध्यप्रदेशात खूप धुमाकूळ घातला होता. इंग्रजांनी भिल्लांशी सलोख्याचे संबंध जोडले. शरण आलेल्यांना माफी दिली. कसण्यासाठी त्यांना जमिनी, बियाणे व तगाई दिली. लेफ्टनंट जेम्स औट्राम याने मुंबई प्रांताचा गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन याच्या आदेशानुसार १८२५ मध्ये खानदेशात तीन भिल्ल पलटणी उभारल्या. त्यामुळे भिल्लांच्या शौर्यास वाव मिळाला व बहुतांश भिल्ल स्थायिक होऊन शेती करु लागले.

महाराष्ट्राच्या ट्रायबल रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूटनुसार गारसिया, ढोली, डुंगरी गारसिया, मेवासी, रावळ, भगालिया, तडवी, भिलाला, पावरा, वसावा, धानका हे भिल्लांचे पोटभेद आहेत. **क्रिमिनल क्लासेस इन दि बॉम्बे प्रेसिडेन्सी** या अहवालानुसार (पृ. ३७) पावरा आणि डांगची या जमातींचाही डोंगराळ भिल्लांमध्ये समावेश होतो. मावची भिल्ल प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील नवापूर तालुक्यात आढळतात. त्यांचे पूर्वज राणा प्रतापसिंहाच्या सेनेत होते, असा त्यांचा दावा आहे. तडवी भिल्ल जळगाव, धुळे आणि औरंगाबाद जिल्ह्यात आढळतात. ते इस्लाम धर्मीय[१९] असले तरी हिंदू देवदेवतांबद्दल त्यांना पूज्यभाव आहे. ते मारुती आणि मरीआईची पूजा करतात आणि दसरा, दिवाळी व संक्रांत हे सण साजरे करतात. वसावे भिल्ल लोक अहमदनगर, धुळे, नाशिक आणि जळगाव जिल्ह्यांत वस्ती करुन आहेत. बहुतांशी वसावे हे हिंदूधर्मीय आहेत व काही ख्रिस्ती आहेत. स्थलपरत्वे भिल्लांच्या वेशभूषेत फरक असल्याने स्थूलमानाने त्यांचे पोटिआवाल म्हणजे धोतर नेसणारे व लंगोटिया म्हणजे लंगोटी नेसणारे असे दोन भेद आहेत. खानदेशातील डोंगराळ भागात राहणारे भिल्ल लंगोटिया आहेत. खानदेशी भिल्लांचे

सपाट प्रदेशात राहणारे, डोंगराळ भागात राहणारे व इतरत्र मिश्र असे तीन प्रकार आहेत. सपाट प्रदेशात राहणाऱ्या भिल्लांना फक्त भिल्ल म्हणतात. ते डोंगराळ व मिश्र भिल्लांपेक्षा सुधारलेले आहेत. डोंगराळ भिल्लांमध्ये बर्डा, धानका, धोरेपी, गावीत, खोतील, मठवाडी किंवा पाणारी, मावची, नहाल यांचा समावेश आहे.[२०] मिश्र भिल्लांमध्ये भिलाला, तडवी व निर्धी या पोटभेदांचा समावेश होतो.

भिल्लांना गोत्र नसते. विवाहाच्या वेळी कुळ व देवकाला महत्त्व देतात. कुळ बहिर्विवाहाचा नियम पाळतात. घटस्फोट आणि विधवा पुनर्विवाह रुढीसंमत आहे. बहुपत्नीत्वाची चाल आहे. विवाहापूर्वी पंधरा दिवस वधूवरांना आपापल्या घरी सकाळ संध्याकाळ हळद लावतात. वरातीचे लोक वधूगृही जाताना वाटेत मारुतीचे दर्शन घेतात व तिथे घड्यातील पाणी पितात. वऱ्हाड गावाजवळ पोहचल्यावर वरावर कांदे व फळे यांचा मारा करतात. मांडवात सात सवाष्णी पाण्याचे घडे घेऊन व आरती ओवाळून वराचे स्वागत करतात. प्रत्येक पाण्याच्या घड्यात प्रथम तो नाणे टाकतो. पूर्वेकडे मुख करुन बसलेल्या वरासमोर वधू बसते. ब्राह्मण पुरोहित त्यांच्या भोवती सूतवेष्टन करतो व अंतरपाट धरतो. अंतरपाटाखालून वधूचे जोडलेले हात वराने आपल्या हातात धरल्यावर लग्न लागले असे समजतात. नंतर वरगृही वंकण सोडतात.

भिल्लांचा मुख्य देव महादेव आहे. चैत्र शुद्ध तृतियेला महादेव व इंद्राज यांना बळी देऊन संतुष्ट करतात. त्याचप्रमाणे ते डुंगऱ्यादेव (डोंगरदेव), शिवऱ्यादेव (सीमादेव), वाघदेव, नागदेव, म्हसोबा, खंडोबा, बहिरोबा, मरी, आसरा इत्यादी देवतांनाही भजतात. राजा पंड्या हा सर्वात बलाढ्य देव मानतात. कालिका त्यांचे रानातील हिंस्त्र पशू व भूताखेतांपासून रक्षण करते असा त्यांचा समज आहे. होळीचा सण या देवतेच्या प्रीत्यर्थ साजरा करतात. त्या रात्री स्त्री-पुरुष ढोलाच्या तालावर कालिकेची स्तुतिपर गाणी गातात व नाचतात. भिल्लांचा भूताखेतांवर विश्वास असतो. काही भूते चांगली व उपकारी, रक्षण करणारी असतात अशी त्यांची श्रद्धा आहे. भूताखेतांना ते मातीचे घोडे, मातीची मडकी व मधाच्या पोळ्याच्या आकाराची भांडी अर्पण करतात. प्राणिपूजेत घोड्याला मान देतात. नवस पावल्यास घोड्याची मातीची मूर्ती करुन देवाला वाहतात. संगमनेरजवळील हनमंत नाईकवाडी[२१] हे त्यांचे पवित्र ठिकाण होय. तिथे त्याचे दगडाचे स्मारक आहे. होळी, दसरा व दिवाळी हे त्यांचे मुख्य सण होत.

भिल्ल मनुष्य आसन्नमरण झाल्यास त्याचे नातेवाईक गोरगरिबांना दानधर्म करतात. ते मृताचे दफन करतात. अकराव्या दिवशी मृताचा उत्तराधिकारी पिठाची गाय करुन ती पानावर ठेवतो व पाण्यात सोडतो. बाराव्या किंवा पंचेचाळीसाव्या दिवशी कुंभाराला बोलावून सात पायऱ्याची शिडी भिंतीला लावतात. या शिडीच्या आधारे मृतात्मा स्वर्गात जातो अशी समजूत आहे.

भिल्ल मध्यम अथवा त्याहून कमी उंचीचे, रुंद चेहऱ्याचे व पसरट नाकाचे असून त्यांच्यात मध्यम कापालिक (मेझो सिफॅलिक) लक्षणे दिसतात. तडवी भिल्लांचा चेहरा अधिक निमुळता व लांबट दिसतो व त्यांच्या नाकाचा आकार देखील थोडा चांगला असतो. ते काटक व चपळ असतात. भिल्ल स्त्री-पुरुषांना दागिन्यांची फार आवड असते. पुरुष कानात बाळ्या व हातात चांदीची कडी घालतात. महिला गळ्यात हासली नामक चांदीचा किंवा कथलाचा हार घालतात. तसेच हातावर व चेहऱ्यावर गोंदवून घेतात. सणासुदीला मांसाहार करतात. भिल्ली या बोलीभाषेखेरीज महाराष्ट्रातील भिल्ल मराठी भाषा बोलतात. भिल्ली भाषेच्या मूळ स्वरुपावर मराठी, गुजराथी, राजस्थानी व निमाडी भाषांचा मोठा प्रभाव पडला आहे. बहुतांश भिल्ल शेती आणि शेतमजुरी करतात. शिवाय जंगल कामगार म्हणून काम करतात.

प्रत्येक गावाची गावपंचायत असून त्यातील मुख्याला वसावो म्हणतात. हे पद वंशपरंपरेने चालू असते. वसावोची पत्नी वसावी हिला देखील समाजात मान असतो. वधूला नवे कपडे नेसवणे व मंडपात नेण्याचा अधिकार तिचाच असतो. गावचा पुजारीच मांत्रिक व वैद्य असतो.

भोवतालच्या बदलत्या परिस्थितीचा त्यांच्यावर परिणाम झालेला दिसतो. काही घरांवर गवताच्या छपराऐवजी कौले दिसतात. ठिकठिकाणी शाळा सुरु झाल्याने १९८१ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण १२.३५ टक्के होते. भिल्ल सेवा मंडळ आणि भारत सेवक समाज यासारख्या संस्थांनी त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारण्यास प्रयत्न केले. भिल्ल लोकांना अनुसूचित जमातीला अनुज्ञेय असा सर्व सवलती प्राप्त झाल्यानेही त्यांच्यात सुधारणा झाल्या आहेत.[२२]

भंडारी : परंपरेने ताडी व माडी काढण्याचा व्यवसाय करणाऱ्या या जातीची वस्ती महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, ठाणे जिल्हा व मुंबई शहरात दिसते. गोव्यातही भंडारी आढळतात. भंडारी हा शब्द संस्कृत मंधारक म्हणजे दारु गाळणारा यावरुन आला असे एक मत आहे. परंतु भंडार म्हणजे खजिना या शब्दावरुन हे नाव पडल्याचे भंडारी सांगतात. पूर्वी यांची खजिन्याचे संरक्षक म्हणून नेमणूक करण्यात येई. यांना

भावगुण असेही म्हणतात. यांच्या उत्पत्तीबाबत एक दंतकथाही प्रचलित आहे. तिलकासूर नामक दैत्याला महादेवाने घाण्याला जुंपले असता महादेवाच्या कपाळावरुन गळालेल्या घर्मबिंदूतून उत्पन्न झालेला पुरुष भावगुण होय. असा एक समज आहे. तोच भंडाऱ्यांचा मूळ पुरुष होय. महादेवाला तहान लागली असता भावगुणाला त्याने पाणी आणण्यास सांगितले, परंतु पाणी कुठे मिळेना म्हणून महादेवाने एका माडाची उत्पत्ती केली. भावगुण त्यावर चढला व झाडावरील नारळाचे पाणी महादेवाला दिले. तेव्हा प्रसन्नचित्ताने महादेवाने भावगुणाला अलाकावतीच्या भांडारावर अधिकारी नेमले. तेव्हापासून लोक त्याला भंडारी म्हणू लागले. मात्र अशा दंतकथांना पुरावा नसतो. नौकानयनाशी भंडाऱ्यांचे नाव प्राचीन काळापासून निगडित आहे. यांच्यातील बौद्धकालीन महानायक ही नौकाध्यक्षाची उपाधी अपभ्रंशाने मायनाक झाली. पूर्वी हे लोक समुद्रावर चाचेगिरी करीत. शिवाजी महाराजांच्या नौदलाच्या अधिकाऱ्यांत मायनाक भंडारी, उदाजी पडवळ, सावळ्या तांडेल वगैरे शूर भंडारी होते.[२३] पुढे आरमार खाती बंद झाल्याने निरुपायाने या लोकांनी ताडीमाडी करण्याचा व्यवसाय सुरु केला. १६७२ ते १६८१ च्या दरम्यानच्या एका पत्रावरुन दिसते की, भंडारी लोक फिरंगी सरकारचे भोंगळी अर्थात शिंग वाजविणारे शिपाई होते. पूर्वी हे लोक माहीम येथे राहत आणि भीमराजाच्या हाताखाली साष्टीचा आणि कोकणातील काही गावांचा कारभार चालवीत. ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या सैन्यातही ते होते. इ.स. १८७७ मध्ये माडांवरील कर वाढल्याने बरेच लोक शेती, व्यापार व बागायती करु लागले.

भंडाऱ्यांचे कित्ते, भेर्ले, गावड, देवळी, तथा बंदे, काळण, थळे, शेषवंशी तथा शिंदे आणि किरपाल (क्रियापाल) असे आठ पोटभेद आहेत. भेर्ले भंडारी भेर्ला माडांची ताडी काढतात तर कित्ते भंडारी नारळाच्या झाडांची ताडी काढतात. किरपाल हे ठाणे जिल्ह्यात आढळतात. त्यांनी ख्रिस्ती धर्म स्वीकारला होता. तथापि त्यांचे हिंदू धर्मात पुनरागमन झाल्याने त्यांना क्रियापाल असे म्हणू लागले. ठाणे जिल्यात शिंदे व गावडे भंडारीही आढळतात. भंडारी जातीत रायगड आणि ठाणे जिल्ह्यांतील कित्ते भंडारी व रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील हेटकरी भंडारी हे दोन प्रादेशिक अंतर्विवाही गट आहेत. हे अंतर्विवाही गट पुन्हा बहिर्विवाही असलेल्या कुलांमध्ये विभागलेले आहेत. भंडारी जातीत गोत्रे आहेत. वसिष्ठ, अत्रि, कदंब, कालका आणि ध्रुव ही त्यापैकी काही गोत्रे होत. एकाच कुलातील व्यक्तींचा तसेच एकच गोत्र असलेल्या व्यक्तींचाही विवाह होत नाही. त्यांच्यात अनेक कुळे असून वड, पिंपळ, उंबर, आंबा इत्यादी देवके आहेत. विधवाविवाह व घटस्फोटास मान्यता आहे. रायगड आणि ठाणे जिल्ह्यांतील भंडारी मराठी बोलतात, तर रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि गोव्यातील भंडारी हे मराठी-कोकणी मिश्रित बोलीभाषा बोलतात. ते सशक्त, देखणे व धाडसी असतात.

हे लोक प्रामुख्याने शैव असून महादेव, रवळनाथ, नागनाथ, शिवनाथ, कालिका, चंडिका इत्यादी त्यांची कुलदैवते आहेत. सर्व धार्मिक विधी ब्राह्मण पुरोहिताकडून करतात. काही भंडारी नारळी पौर्णिमेला पोवते (यज्ञोपवीतसदृश दोरा) बांधतात. शैव भंडारी पडवळाची भाजी वर्ज्य मानतात.

मराठा-कुणबी: मराठा आणि कुणबी हा महाराष्ट्रातील परंपरेने शेतीचा व्यवसाय करणाऱ्या इतर जातींच्या तुलनेने सर्वाधिक लोकसंख्या असणारा जातिसमूह आहे. १९३१ च्या जनगणनेनुसार या संयुक्त जातीची लोकसंख्या महाराष्ट्रात म्हणजे सध्याच्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा यातील प्रदेशात ७७,१२,०३० होती. एकूण लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण २३.६३ प्रतिशत होते. मराठा आणि कुणबी या दोन अलग जाती न मानता संयुक्त जाती समुच्चयाच्या या दोन शाखा आहेत, असे मानणे हे सामाजिक वस्तुस्थितीशी अधिक सुसंगत असल्यामुळे त्यांचा विचार एकत्रितपणे येथे केला आहे.[२४]

महाराष्ट्र हे नाव महाराट्ट म्हणजेच मराठा या नावावरुन पडले असावे असे डॉ. रामकृष्ण गोपाल भांडारकर आदि संशोधकांचे मत आहे. यातील महारट्ट या शब्दाची व्युत्पत्ती दोन प्रकारांनी सांगितली जाते. महारट्ट या शब्दाचा एक अर्थ महारथी किंवा लढवय्ये असा केला आहे. या शब्दाचा दुसरा अर्थ असा की, रट्ट नावाची मोठी जमात. महारट्टांचा अथवा मराठ्यांचा देश तो महाराष्ट्र अशी व्युत्पत्ती लावली जाते. यावरुन मराठा जातीचे महाराष्ट्रातील मध्यवर्ती स्थान स्पष्ट होते. मराठा जातीची वस्ती प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात म्हणजे देश व कोकण या विभागात दिसून येते. मराठा हे स्वतःला क्षत्रिय वंशाचे मानतात. मात्र मराठा जातीत देवक पध्दतीही दिसून येते. मराठा जातीमधील आडनावे व इतर सामाजिक प्रथांचा विचार करता मराठा जातीमध्ये राजपूत जातीचे मिश्रण झाले असावे. मराठा जातीत सूर्य, सोम, ब्रह्म, व शेष अशा चार शाखा आहेत. त्यांची शहाण्णव कुळे आहेत, असेही मानण्यात येते व प्रत्येक कुळाचे स्वतंत्र देवक असते. काही देवके पुढीप्रमाणे आहेत :- वासण, वेल, रुई, हळवुंड, सुवर्ण, कळंब, मोरपीस, तलवारीचे पाते, पाचपालवी, शंख, वेळू इत्यादी. मराठ्यांमध्ये अस्सल अथवा क्षत्रिय मराठा आणि सामान्य मराठा असे दोन भाग आहेत. राजघराण्यांशी ज्यांचा रक्तसंबंध आहे ते स्वतःस अस्सल अथवा क्षत्रिय मराठा समजतात व आपणास क्षत्रिय वर्णास अनुज्ञेय असलेल्या वैदिक संस्कारांचा अधिकार आहे असे मानतात. सामान्य मराठे लोक प्रत्यक्ष शेती करताना दिसतात व कुणबी आणि माळी या जातींशी साम्य दाखवितात. कुणबी, सामान्य

मराठा व क्षत्रिय मराठा यांच्यात अनुलोम विवाह होताना दिसून येतात. श्रीमंत कुणबी घराण्यातील मुलगी गरीब मराठा अथवा क्षत्रिय कुटुंबात स्वीकारली जाते. मराठा जातीत देवक बहिर्विवाहाचा नियम पाळला जातो. समान देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. त्याचप्रमाणे मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा दिसून येते. परंतु मावस व आतेबहिणीशी विवाह होत नाहीत. विवाहाच्या वेळी सप्तपदीचा संस्कार केला जातो. अस्सल मराठयांमध्ये विधवाविवाहास मान्यता नाही. तसेच क्षत्रिय अथवा अस्सल मराठा पोटजातीत परंपरेनुसार घटस्फोटाची प्रथा नाही. मराठा समाजात शंकर, पार्वती तसेच खंडोबा, रोकडोबा, भैरव या लोकप्रिय देवता आहेत.

मराठे लढाऊ बाण्याचे व स्कुळाभिमानी असतात. ते कुणबी मराठ्यांपेक्षा वर्णाने उजळ, सुदृढ व देखणे असतात. डोक्यास पागोटे किंवा पटका, अंगात बाराबंदी किंवा सदरा, कमरेस धोतर आणि अंगावर उपरणे असा पूर्वी त्यांचा पोशाख असे. त्यांच्या बायका उंची लुगडे व चोळी घालत व पडद्यात राहत असत. आता ही पद्धती बंद झाली आहे. शहाण्णव कुळी मराठ्यांमध्ये भोसले, चव्हाण, घाटगे, कदम, मोहिते, पवार, नलावडे इत्यादी आडनावे आहेत. अगस्ती, अंगिरस, अत्री, काश्यप, वसिष्ठ, इत्यादी गोत्रे असतात व झाडे, पशू, पक्षी, विविध वस्तू त्यांची देवके असतात. त्यांच्या चालीरीती व लग्न पद्धती थोड्याफार ब्राह्मणांप्रमाणे असतात. पूर्वीच्या काळी मोठे जमीनदार व सावकार बहुभार्या पद्धतीचा अवलंब करीत. तथापि आता व्दिभार्या प्रतिबंधक कायद्यामुळे ही प्रथा बंद झाली. विधवाविवाह अद्यापही खानदानी मराठ्यांत निषिद्ध मानला जातो. खंडोबा कुलदैवत असलेले मराठा वीरपूजा करतात. वीरपूजा हा त्यांचा सांस्कृतिक गुणविशेष आहे. शूर पूर्वजांच्या स्मृतीस अभिवादन या दृष्टीने हा विधी करतात.

कुणबी : कुणबी हा प्रामुख्याने व्यवसायदर्शक शब्द असून व्यापक प्रमाणात शेती करणाऱ्या विविध प्रांतातील जातींच्या संदर्भात वापरला जातो. या शब्दाची व्युत्पत्ती कृषिवल अथवा कुटुंबिन या संस्कृत शब्दांपासून झाली असावी. एकाच ठिकाणी घर करुन राहून शेतीचा व्यवसाय व पशुपालन करणाऱ्या सामाजिक गटाला उद्देशून हा शब्द अथवा तत्सम शब्द भारतातील अनेक प्रांतात वापरला जातो. गुजरातमध्ये कणबी, उत्तर प्रदेश व बिहारमध्ये कुर्मी, दख्खनमध्ये कुणबी, कुळंबी, कुलवाडी या व्यवसायदर्शक शब्दांनी प्रमुख कृषिप्रधान जातीला ओळखण्यात येते. या व्यापक अर्थाने कुणबी हा परंपरेने शेतीचा व्यवसाय करणाऱ्या विविध जाती गटांना उद्देशून वापरला जात असलेला शब्द आहे. महाराष्ट्रातील कुणबी जातीत मराठा, कोकणी, खानदेशी व गुजर असे प्रमुख प्रादेशिक गट आहेत. त्यात पुन्हा पोटजाती आहेत. कोकणी कुणब्यांमध्ये (१) देताळे किंवा काळे व (२) तल्हेरी, तिलोरी असे गट आहेत. काळे कुणबी हे दक्षिण कोकणमध्ये जंगलाजवळील खेड्यांत राहतात. तर तल्हेरी हे ठाणे जिल्ह्यात राहतात. खानदेशी कुणबी गटात सात उपगट आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- घाटोळ, कुंभार, मद्राज, लोणी, पांजणा, तिरळे किंवा तिरोळे आणि वंजारी. या सर्व पोटजातीत रोटीव्यवहार होतो परंतु बेटीव्यवहार होत नाही. गुजर कुणबी ही खानदेशमध्ये आढळणारी पोटजात मुळात गुजराती कणबी जातीची शाखा असावी. त्यांच्यामध्ये अनला, डाळे, डोरे, गारी, कडवा, खापरा, बाड किंवा लोंडारी आणि लेवा (रेवा) असे सात उपगट आहेत. लेवा कुणबी, लेवा पाटीदार गुजरातमधून आलेले आहेत. राजस्थान आणि भरतपूरमधील जाट जमातीत असलेले चौधरी हे नाव लेवा कुणब्यांच्यामध्ये बऱ्याच कुटुंबात दिसते.[२५]

विदर्भामध्ये जो कुणबी समाज आहे त्यामध्ये परस्परांशी बेटीव्यवहार न करणाऱ्या अनेक पोटजाती आहेत. त्यात झाडे कुणबी सर्वप्रथम स्थायीक झाले असावे. तिरोळे कुणबी हे बहुसंख्य आहेत. तसेच चंद्रपूर जिल्ह्यात माना कुणबी, धनोजे कुणबी व भंडारा जिल्ह्यात खैरे कुणबी, झाडे कुणबी या पोटजाती दिसतात. नागपूरकर भोसल्यांच्या राजवटीत 'देशमुख वतन' सहसा मराठा अथवा प्रमुख कुणब्यांकडे असे.

कुणबी जातीत देवक पद्धती आहे. एकच देवक असणाऱ्या व्यक्तींचा विवाह होत नाही. विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोटाची प्रथा विविध पोटजातींत आढळते. परंतु अशा घटना उच्च मानल्या गेलेल्या पोटजातीत क्वचित दिसतात. आते-मामे भावंडांच्या विवाहाची प्रथा माना आणि खैरे कुणबी या दोन्ही पोटजातींत दिसत नाही. मराठा आणि कुणबी समाजातील पुरोगामी विचारांच्या नेत्यांनी या दोन जातींचे ऐक्य घडवून आणण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्व काळात व त्यानंतरच्या काळात बरेच प्रयत्न केले. त्यामुळे मराठा आणि कुणबी या दोन जाती नसून एकाच जातीची दोन भिन्न भिन्न नावे आहेत हा दृष्टीकोन प्रभावी ठरु लागला आहे व या दोन गटांत विवाह होऊ लागले आहेत.

महार : ही जात महाराष्ट्रात सर्वत्र असून या जातीची वस्ती नसलेले गाव अपवादानेच आढळेल. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रातील अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या जातींमध्ये महार लोक संख्येने सर्वाधिक होते. १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यात महार जातीची संख्या ६,६२,३१९ व मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये ११,६४,३८३ होती. हैदराबाद संस्थानामध्ये महार आणि माला या दोन जातींची एकत्रित संख्या ११,३७,५८९ एवढी होती. १९३१ मध्ये महाराष्ट्रातील कोकण, दख्खन, विदर्भ आणि मराठवाडा या चार प्रादेशिक विभागांत त्यांचे लोकसंख्येतील

प्रमाण अनुक्रमे ६.१, ७.६, १५.१ आणि १०,१६ असे होते. १९७१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्रात महारांची लोकसंख्या १०,७८,५७१ असून अनुसूचित जातीच्या लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण ३५.६५ होते. यांची १९८१ मधील लोकसंख्या १६,४८,२६९ असून वरील प्रमाणेच लोकसंख्येतील प्रमाण ३६.७९ होते. ब्रिटिश अमदानीत औद्योगीकरणानंतर खेड्यातील महार जातीचे लोक मोठ्या संख्येने मुंबई, पुणे, नागपूर इत्यादी मोठ्या शहरांत येऊन दाखल झाले. तसेच भंडारा, गोंदिया येथे बीडी कामगार व अहमदनगर जिल्ह्यात साखर कारखान्यांत मजूर म्हणून मोठ्या संख्येने दिसून येतात.

महार जातीमध्ये ५३ पोटजाती असल्याची नोंद १९११ च्या मुंबई इलाख्याच्या जनगणनेत केलेली आहे. कोसारे यांच्या मते महार जातीत साडेबारा पोटजाती आहेत. अर्धी जात ही निरनिराळ्या कारणांमुळे ज्यांना जातीबाहेर टाकले आहे अशा लोकांची झाली आहे. यातील काही पोटजातींची नावे पुढीलप्रमाणे आहेतः- बारके, लाडवन, बावने, सोमवंशी, कासरे, आंदवण, झाडेबावने इत्यादी. पूर्वी या पोटजातींची जातपंचायत असे.

बलुतेदारी पध्दतीत महार एक घटक होता. त्याचे प्रमुख काम म्हणजे 'गावकी' या शब्दात अंतर्भूत असलेली विविध कामे करणे. कामाबद्दल त्यांना शेती उत्पन्नातून थोडा मोबदला मिळत असे. मुसलमान व मराठा राजवटीत गावातील लोकांच्या चाकरीबद्दल महारांना काही हक्क प्राप्त झाले होते. होळीचा नैवेद्य, ओटीपट्टी म्हणजे कणसांच्या मळणीच्या वेळी महारणीच्या ओटीत घालण्यात येणारे धान्य, रानसोडवण म्हणजे शेते कापून उडवे रचताना मिळणारी कणसे, मढेपट्टी म्हणजे मृत जनावरे नेण्याचा मोबदला, वेशीत पहारा करण्यासाठी मिळणारे पायताण, स्मशानात लाकडे व गोवऱ्या नेण्याचे शुल्क यावर महारांचा हक्क होता. याशिवाय मांगली म्हणजे आषाढ व कार्तिक महिन्यांतील अमावस्येला खेड्याभोवती सूत गुंडाळण्याचा मोबदला, लग्नप्रसंगी वधू-वर बसलेल्या पाटावरील तांदूळ, लगीन टक्का म्हणजे मांडव घालते वेळेची देणगी व रुक्का म्हणजे लग्नाची देणगी इत्यादी हक्क होते. सरकारी नोकरांना दौऱ्यांवर असताना मार्ग दाखविणे, त्यांचे निरोप पोहचविणे, जमिनीच्या चतुःसीमांवर अतिक्रमण होऊ नये म्हणून नजर ठेवणे, सरकारी तिजोरीचे रक्षण करणे, ग्रामसफाई इत्यादी कामे करावी लागत. त्याबद्दल सरकारकडून थोडे पैसे व इनाम जमीन मिळे. विश्वासपात्र प्रामाणिक व कष्टाळू म्हणून त्यांचा लौकिक होता. आता उपरोक्त हक्क जवळजवळ नष्ट झाले आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जात व सेवा इनाम शासनाने नष्ट केले आहेत. सध्या त्यांच्या उपजीविकेच्या साधनात मजुरी, अल्पशी शेती, घरगडी, वाजंत्री, सरकारी सेवा इत्यादींचा समावेश होतो. शासनाने दिलेल्या विविध सवलतींमुळे त्यांच्यात बरीच प्रगती झाली आहे. मात्र अजुनही ग्रामीण भागात या समाजाची वस्ती गावाबाहेर आढळते. त्यांचे सणवार हिंदुप्रमाणेच असतात. मात्र धम्मचक्र प्रवर्तनानंतर ज्यांनी बौद्ध धर्म स्वीकारला त्यांचे कुलाचार व चालीरीती बौद्ध पद्धतीने केले जातात. त्यांत गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबतचा नितांत आदर व भक्ती प्रतित होते. ते मांसाहारी असून ज्वारी-बाजरीची भाकरी, डाळ, चटणी हे त्यांचे मुख्य अन्न होय. भैरोबा, खंडोबा, म्हसोबा, विठोबा वगैरे देवतांना ते पूजतात व पूर्वजांचे टाक करुन ते देव्हाऱ्यात ठेवतात. नागोबा, सटवाई व मरीआईची देवळे बऱ्याच महारवाड्यांत आढळतात. त्यांचे धर्मगुरु अथवा उपाध्ये बहुधा त्यांच्याच जातीचे असतात. संत नामदेव व संत तुकारामाच्या काळी बऱ्याच महारांनी भक्तिमार्गाचा वारकरी संप्रदाय स्वीकारला. महान संत चोखामेळाचे मंदिर पंढरपूरला आहे.

शारीरिकदृष्ट्या महार जातीचे स्वरुप संमिश्र दिसते. रंगाने उजळ ते काळे, उंच, राकट व दणकट असतात. त्यामुळे ते सैनिकी पेशातही दिसतात. निरनिराळ्या प्रदेशांमध्ये राहणारे महार त्याच भागात राहणाऱ्या इतर जातींशी शारीरिक दृष्ट्या बरेच साम्य दर्शवितात आणि ते इतर जातींपासून फक्त दारिद्र्य व पोशाख याखेरीज निराळे दिसून येत नाहीत. विवाहासाठी पोटजात हा अंतर्विवाही गट मानला जातो. महार जातीची आडनावे व कुळनावे मराठा आणि कुणबी जातीतील नावांशी साम्य दर्शवितात. एकच देवक असलेल्या कुळात विवाह होत नाहीत. आते-मामे भावंडांच्या विवाहाची, विधवा पुनर्विवाहाची तसेच घटस्फोटाची प्रथा आहे. मृताचे दफन अथवा दहन करतात. पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांवरील अन्याय दूर करण्यास्तव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर, १९५६ रोजी नागपूरला दीक्षा भूमीवर बौद्धधर्म स्वीकारला. त्याबरोबर बहुसंख्य महारांनी बौद्धधर्म स्वीकारला. बौद्धधर्मीय व्यक्ती जन्मसंस्कार, नामकरण, लग्नविधी, अंत्यविधी बौद्ध पद्धतीने करतात. ते बुद्ध जयंती व आंबेडकर जयंती साजरी करतात.

माळी : माळी हा शब्द संस्कृतमधील मालाकार म्हणजे फुलांचा हार करणारा याचे संक्षेप रुप आहे. मराठीत माळ या शब्दावरुन माळी हे नाव आले. प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्रात व उत्तर गुजरात आणि कोकण व कर्नाटकात थोड्या प्रमाणात त्यांची वस्ती आहे. महाराष्ट्रातील कुणबी समाजाप्रमाणेच माळी जातीचे लोक शेती व्यवसायात आहेत. विशेष करुन विहिरींच्या अथवा कालव्याच्या पाण्यावर निरनिराळ्या पिकांचे मळे करण्याकरिता हे लोक प्रसिध्द असून शेती, बागायती व शेतमजुरी करुन उदरनिर्वाह करतात. मूळात माळी हे कुणबी असावेत. शेतीतील खास तंत्रामुळे त्यांची जात अलग झाली असावी, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. माळी हे नाव व्यावसायिक असल्याने बागकाम करणाऱ्या इतर जातींच्या लोकांनाही लावले जाते. महाराष्ट्रातील मुसलमान माळयांना बागवान म्हणतात. महाराष्ट्रातील माळी

जातीत फुलमाळी, हळदेमाळी, बनकर किंवा कासमाळी, काचामाळी, कडूमाळी, बावनेमाळी, अधप्रभूमाळी, अघशेटीमाळी, जिरेमाळी, पाडेमाळी, उंडेमाळी आणि लिंगायत माळी या अंतर्विवाही पोटजाती आहेत. यातील फुलमाळी पोटजातीचा सामाजिक दर्जा इतरांपेक्षा उच्च मानला जातो. यांच्यात बहुसंख्य लोक फुलमाळी, हळदेमाळी, जिरेमाळी व काचामाळी जातीचे आहेत. विविध पोटजातींमध्ये स्वतःला फुलमाळी किंवा सावतामाळी म्हणवून घेण्याची प्रवृत्ती दिसते. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात माळी जातीची लोकसंख्या ३,०२,२०५ होती, तर १९३१ मध्ये ती ३,१३,२२१ होती, महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येशी १९३१ मधील त्याचे प्रमाण : कोकण ०.४९, देश १.६४, विदर्भ ५.०२ व मराठवाडा २.१४ टक्के होते.

माळी जातीत अनेक बहिर्विवाही कुळगट आहेत. समान कुळ व समान देवक असलेल्या व्यक्तींचा विवाह होत नाही. मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. विधवा पुनर्विवाह व घटस्फोट या प्रथा माळी जातीत आहेत. विवाह विधी मराठ्यांप्रमाणेच असतात. मात्र लग्न लावून वरपक्षाकडे परत आल्यावर हळद फेडणे म्हणजे वधूवराला जोडीने आंघोळ घालतात. त्यावेळी माती, फुले व फळझाडांचे महत्त्व सांगणारी गाणी म्हणतात. या गाण्यांना दाविडा म्हणतात. निसर्गाने वधूवरांना आशिर्वाद द्यावा हा यामागे उद्देश असतो. मृतदेहावर दहन संस्कार केला जातो. परंतु कबीर पंथ वा महानुभाव पंथ स्वीकारलेल्या माळ्याचा मृतदेह डोलीत बसवून स्मशानात नेऊन पुरतात.

त्यांच्या सामाजिक चालीरीती मराठा-कुणबी जातीसारख्याच आहेत. वणीची सप्तशृंगी देवी व खंडोबा ही त्यांची कुलदैवते आहेत. बहुसंख्य माळी वारकरी पंथाचे आहेत. अलीकडील काळात सहकारी साखर कारखानदारीच्या क्षेत्रात माळी समाज आघाडीवर असून त्यातून त्याने आर्थिक प्रगती करुन घेतली आहे. संत सावतामाळी, महात्मा ज्योतीबा फुले या महान व्यक्ती या जातीत होऊन गेल्या.

मांग : मांग ही जात महाराष्ट्रात सर्व भागात विखुरलेली दिसते. १९११ च्या जनगणनेनुसार मांग जातीची लोकसंख्या त्यावेळच्या मुंबई इलाख्यात २,७४,०३७ होती. या जातीचा अंतर्भाव अनुसूचीत जातींमध्ये केलेला असून लोकसंख्येच्या आधारावर दुसरा क्रम (म्हणजे महार जातीच्या खालोखाल) लागतो. १९७१ च्या जनगणनेप्रमाणे मांग जातीचे अनुसूचित जातीच्या लोकसंख्येतील प्रमाण ३०.२५ प्रतिशत होते व त्यांची एकूण लोकसंख्या ९,१५,५१८ होती. १९८१ मध्ये त्यांची लोकसंख्या १२,११,३३५ होती. ग्रामीण भागात मांग हा एक बलुतेदार गणला जातो. मांग जातीचा परंपरागत प्रमुख व्यवसाय म्हणजे वाखापासून दोर बनविणे होय. ते जनावरांना बांधण्यासाठी लागणारे दोर, कासरा, मोटेसाठी लागणारे नाडे, चाबूक, शिंदीच्या केरसुण्या, बांबूच्या टोपल्या, पडदे वगैरे वस्तू तयार करतात, याखेरीज विवाह व धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी वाजंत्री वाजविण्याचे काम मांग करतात. मांग-गारुडी या मांग जातीतील पोटजातीचा व्यवसाय म्हशी भादरणे व त्यांची खरेदीविक्री करणे हा आहे. इंग्रजांनी त्यांचा गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांमध्ये समावेश केला होता. तमाशा कलावंतांमध्ये बरेच मांग जातीचे लोक दिसतात. पूर्वी काही गावचे पहारेकरी मांग असत. या कामासाठी त्यांना इनाम जमीन मिळत असे.

मांग जातीचा उल्लेख संस्कृत साहित्यात मातंग या नावाने केलेला आढळतो. आपली जात जंब ऋषीपासून झाली असा मांग जातीचा समज आहे. परंतु त्यांची शारीरिक ठेवण आदिवासी जमातीशी अधिक साम्य दाखविते. पूर्वी त्यांना अस्पृश्य समजण्यात येत असे. मांग जात महाराष्ट्राप्रमाणे कर्नाटक व गुजरातमध्येही आढळते, परंतु त्यांच्यात परस्परात रोटीबेटी व्यवहार होत नाही. महाराष्ट्रातील मांग जातीची पुढील २४ अंतर्विवाही गटांमध्ये विभागणी झालेली आहे:- अस्सल किंवा मराठा मांग, बाळे, बुरुड, चपलसुंडे, दाबकर, देसूर, ढकलवार किंवा वाजंत्री मांग, ढोर, घडशी, होलगे किंवा होलार, जिनगर, जिराइत, काकर, कोकलवार, मानभाव, मांग-गारुडी, ताडे, मोर्चा, परीट, पेंड, शिवटे, तेलंगी, ढोकर कोडे आणि झरे. या गटांमध्ये परस्परात विवाहसंबंध होत नाहीत. शिवाय या गटांची आणखी विभागणी आडनावांनी ओळखल्या जाणाऱ्या बहिर्विवाही गटांमध्ये झालेली आहे. मांग जातीत मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. परंतु आतेबहिणी किंवा मावसबहिणीशी विवाह करता येत नाही. लग्नाच्या वेळी दोन टोपल्यात चामडे आणि दोर घालून त्यात वधूवरांना समोरासमोर बसवितात. विधवाविवाह व घटस्फोटाची प्रथा आढळते. विधवाविवाह कृष्णपक्षात रात्री गांधर्व विवाह पद्धतीने होतो. त्यास पाट लावणे म्हणतात. पूर्वी बालविवाह होत. आता ही प्रथा लोप पावली आहे. त्यांचे विवाह हिंदू विवाहपद्धतीनुसार कुणब्यांप्रमाणे होतात. उपाध्ये जंगम पौरोहित्य करतात. मरीआई व यल्लमा या देवतांखेरीज मांग बहिरोबा, खंडोबा, म्हसोबा, काळूबाई, अंबाबाई, विठोबा या देवतांचीही उपासना करतात. ते शैव असून महादेवाला भजतात. आळंदी, देहू, कोंढणपूर, शिंगणापूर, पंढरपूर इत्यादी क्षेत्रांच्या यात्रा करतात, मृतदेहाला पालथे पुरण्याची प्रथा मांग जातीत होती. मृताचा उत्तराधिकारी आपल्या पागोट्याचे टोक पाण्यात बुडवून ते मृताच्या तोंडात पिळतो व मोठ्याने बोंब मारतो. ते ऐकून देव मृतासाठी स्वर्गाचे दार उघडतील असा समज आहे. तेराव्या दिवशी उत्तराधिकारी स्मशानात तेरा द्रोण पाण्याचे भरुन ठेवतो व त्याच दिवशी आप्तेष्टांना जेवण देतो. मांग जातीत श्राध्द करण्याची प्रथा नाही. मांग लोक सर्वसाधारणपणे उंच, बळकट आणि ओबडधोबड असतात. मांग महिला लुगड्याचा कासोटा घालीत नाही. हातावर खूप गोंदवून घेतात.

ज्वारीची भाकरी, चटणी व वरण हे त्यांचे मुख्य अन्न होय. त्यांच्यात अदमाने, भिसे, भोडे, पारधी, जाधव, मोरे, दिवटे अशी आडनावे आढळतात.

वारली : महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने वारली जमातीचा चौथा क्रम लागतो. १९६१, १९७१ व१९८१ च्या जनगणनेप्रमाणे वारली जमातीची लोकसंख्या अनुक्रमे २,४३,९८०; २,९३,९३१ व ३,६१,२७३ असून राज्यातील अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येत त्यांचे प्रमाण अनुक्रमे १०.१८, ९.९५ व ६.२६ प्रतिशत होते. वारली जमात महाराष्ट्राच्या धरमपूर भागात फार पुरातन काळापासून राहत असावी असा बऱ्याच समाजशास्त्रज्ञांचा तर्क आहे. मेगॅस्थेनिसने आपल्या प्रवासर्णनात या भूप्रदेशाला 'वरलाट' असे संबोधिले असून येथे राहणाऱ्या वन्य जमातीस वारली म्हटले आहे. जव्हार तालुक्यात पूर्वी वारली अधिपतींचे राज्य होते असे एक मत आहे. त्याबाबतची कोळी जमातीचा मुकणे गावचा पौपेरा नामक कोळी व वारली राजाची दंतकथाही प्रसिद्ध आहे. वारली या शब्दाचा एक अर्थ उंचवट्यावरील प्रदेशात शेती करणारे असा सांगितला जातो. डोंगराळ प्रदेशातील लहान जमिनींच्या तुकड्यावर वारली शेती करतात. राब पद्धतीने शेताचा पृष्ठभाग जाळून जमीन पेरणीसाठी योग्य करतात. राब करण्यासाठी वापरलेल्या झुडपांना 'वरळ' म्हटले जाते व यामुळे वारली नाव पडले असे या जमातीचे लोक मानतात. वारलींची वसती प्रामुख्याने ठाणे व नाशिक जिल्ह्यांत दिसते. महाराष्ट्राबाहेर गुजरामध्ये सुरत जिल्ह्यातही वारली आहेत.

महाराष्ट्रातील वारल्यांमध्ये मुरडे, डावर,निहीर व शुध्द असे चार गट असल्याचे मुंबई इलाख्याच्या १९११ च्या जनगणना अहवालात नमूद केलेले आहेत. मुरडे आणि डावर हे ठाणे जिल्ह्यात उत्तरेकडील भागात, तर निहिरे वारलींची वस्ती पालघर, माहीम, जव्हार व वाडा भागात आहे. मुरडे व डावर वारलींमध्ये रोटी-बेटी व्यवहार होते. स्वतः वारली आपल्या जमातीत डोंगर वारली, पठार वारली, मल्हार वारली, कोकणी वारली, झांझरे वारली आणि पवार वारली हे प्रादेशिक गट असल्याचे सांगतात. या गटांमध्ये एकमेकात विवाह करणे वर्ज्य मानले नसले, तरी तसे मिश्रविवाह फार होत नाहीत. वारलींच्या विविध गटांची विभागणी निरनिराळ्या बहिर्विवाही कुलगटांमध्ये झालेली आहे. एकच कुळ असणाऱ्या मुलामुलींचा विवाह होत नाही. आते-मामे भावंडांचा विवाह होत नाही. विधवा पुनर्विवाहाची आणि घटस्फोटाची प्रथा संमत आहे.

पूर्वी बहुतेक वारली भूधारक होते. त्यातून ते पूर्वापार पध्दतीने उत्पन्न काढीत. परंतु पुढे सावकारांनी कर्जापोटी त्यांच्या जमिनी हस्तगत केल्याने ते त्यांच्याकडे शेतीवर अर्धेलीने कुळ म्हणून काम करु लागले. कर्जफेडीसाठी सावकाराकडे घरकाम करीत. आता बहुतेक वारली एकाच ठिकाणी स्थिर राहून शेती करतात. लहान लहान समुदाय करुन ते जंगलात वस्ती करतात व तेथील जमिनीवरील झाडी तोडून ती कसण्यास योग्य करुन भात, नाचणी यासारखी पिके घेतात. काही वारली गवत कापतात, तर काही जंगलातून लाकूड तोडणे, कोळशाच्या भट्ट्या, फळबागा व फुलबागांमध्ये मजुरी करताना आढळतात. त्यांच्या जेवणात भात, नाचणीची भाकरी, आमटी, उडीद अथवा हरभऱ्याच्या डाळीचा झुणका हे पदार्थ असतात. कधी कधी मासे आणि सणावारी काकडीच्या पानग्या हे त्यांचे पक्वान्न असते. मांसाहार करतात परंतु गोमांस खात नाहीत.

त्यांच्या पिढ्यान् पिढ्या चालत आलेल्या गीतांच्या व कहाण्यांच्या व्दारा वारलींची संस्कृती टिकून राहिली आहे. जीवनातील बहुतेक महत्त्वाच्या प्रसंगांना उद्देशून वारलींची गीते आहेत. मुलगी वयात आल्यावर त्यांचे विवाह होतात. वैशाख, माघ आणि फाल्गुन या तीन महिन्यांत विवाह करतात. जमातीतील पुरुष पुजारी (मेडिंगा) अथवा महिला पुजारी (धवलेरी) विवाह लावतात. मुलाकडील स्त्री-पुरुष मंडळी मुलगी पहायला जाताना बरोबर ताडी नेतात व सर्वजण पितात. याला ' बघवणी ' म्हणतात. त्यानंतर मुलीकडे लग्न ठरविण्याचा करार करतात त्याला 'बोल करणे' म्हणतात. बोल केल्यानंतर सहसा लग्न मोडत नाही. त्यांच्यात देज देण्याची प्रथा आहे. देज दिल्यानंतर लग्नतिथी निश्चित केली जाते. विवाहासाठी नऊ मेढीचा मांडव घालतात. पहिली मेढ रोवण्यापूर्वी खड्ड्यात थोडे तांदूळ, वुंकू, सुपारी व पैसे टाकतात. मांडवात मध्यभागी उंबराची फांदी रोवतात. त्यावेळी धवलेरी गाणे म्हणते. वरात वधूगृही संध्याकाळी जाते तेव्हा नवऱ्या मुलास सीमेबाहेर बसवून ठेवतात. त्या रात्री त्याने झोपायचे नसते. लग्नासाठी दुपारची बाराची वेळ शुभ समजतात. घरजावई करण्याची प्रथा आहे. मुलगा नसलेला वारली शेतीच्या कामासाठी गरीब तरुणाला आपल्या मोठ्या मुलीचा वर म्हणून घरात ठेवून घेतो. मूल झाल्यानंतरही विवाह लावण्यात येतो. गरीब युवक लग्नाचा खर्च करणे शक्य नसल्यास मुलीच्या बापाला थोडे पैसे देऊन मुलीला आपल्या घरी घेऊन जातो व तिच्याशी संसार करतो. अशा रीतीने आणलेल्या मुलीला 'कोरडयावर' आणली असे म्हणतात. कालांतराने दुसऱ्या नातेवाईकांच्या लग्नात त्यांचे लग्न लावले जाते.

वारली लोक वाघ्या, हिरवा, नारायणदेव, हिमाईवीर या देवतांची पूजा करतात. वाघ्या हा त्यांचा ग्रामदेव असून गावाच्या सीमेवर अथवा वडाच्या झाडाखाली लाकडी ओंडक्याला अथवा दगडाला शेंदूर फासून त्याची स्थापना करतात. दरवर्षी पीक आल्यावर हिरव्याची पूजा करतात. मोराचा पिसारा, बंदूकधारी शिकारी, घोडयावर स्वार

असलेला योद्धा अथवा वाघावर बसलेला पंचमुखी राक्षस हिरव्याचे प्रतीक म्हणून पूजतात. डहाणूजवळील महालक्ष्मीला ते अत्यंत पूज्य मानतात. चैत्री पौर्णिमेला महालक्ष्मीच्या जत्रेला जातात. भूतपिशाच्चांना घाबरतात. भगत हा त्यांचा पुरोहित, ज्योतिषी आणि वैद्य असतो. त्यांच्यात मृताचे दहन करतात. स्मशानात जातांना जेथे प्रथम आपट्याचे झाड लागेल तेथे झाडाभोवती प्रेत तीन किंवा पाच वेळा फिरवितात. मृताची पत्नी या ठिकाणी आपले मंगळसूत्र तोडून टाकते व बरोबर आलेल्या महिलांसमवेत घरी परतते. या ठिकाणास 'विसावा' म्हणतात. मृताचे श्राद्ध करतात.

वारली सर्वसाधारणपणे काळे पण काटक आणि मध्यम उंचीचे असतात. अंगात कुडता व कंबरेला लंगोटी हा पुरुषांचा नेहमीचा पोशाख असतो. बाहेर जाताना गुडघ्यापर्यंत लोंबता रुमाल कमरेभोवती तिरका बांधतात व डोक्यालाही रुमाल गुंडाळतात. बरेच पुरुष कानात काचेच्या मण्यांची कुडी व हातात चांदीचे गोल कडे घालतात. त्यांना फुलांची फार आवड असल्याने ते कानावर झेंडू, लिलीची फुले खोवतात. महिला गुडघ्यापर्यंत तोकडे व कमरेभोवती घट्ट असे लुगडे नेसतात व गाठीची चोळी घालतात. लग्न झाल्यानंतरच महिला लुगड्याचा पदर घेतात. मोठ्या केसांची आवड असल्याने गंगावन अथवा गोंडा लावून मोठा अंबाडा घालतात. वारली लोक रुढीप्रिय, दैववादी मनोवृत्तीचे, भोळे, निष्पाप व श्रध्दाळू असतात. लग्नप्रसंगी अथवा अन्य कारणामुळे झालेल्या कर्जाची परतफेड करुन घेण्यासाठी लग्न-गडी म्हणून बायकोसह सावकार अथवा जमीनदाराच्या घरी वा शेतावर कामासाठी राहण्याची पध्दत त्यांच्यामध्ये होती. अलीकडील काळात शासनाने ही पध्दत नष्ट केली आहे व अशा ऋणमुक्त मजुरांचे त्यांना जंगलात जमीन देऊन पुनर्वसन केले आहे. गेल्या १५० वर्षात जमीनदार व सावकारांनी वारलींचे बरेच शोषण केले.

वाणी : परंपरेने व्यापार करणारी महाराष्ट्रातील एक जात वाणी या नावाने ओळखली जाते. वाणी हा शब्द संस्कृतमधील वणिक किंवा वाणिज्य यावरुन आला. वाण्यांचे मराठा, गुजराती, मारवाडी आणि लिंगायत असे चार प्रमुख भेद आहेत. वाण्यांमध्ये हिंदू व जैन असेही दोन पोटभेद आहेत. हिंदू वाण्यांना मेश्री व जैन वाण्यांना श्रावक म्हणतात. १९११ च्या जनगणनेनुसार वाणिया किंवा वाणी जातीची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १,६२,८९९ होती. ती १९३१ साली १,९४,९१८ एवढी झाली.

मराठा वाणी जातीत कुडाळे, संगमेश्वरी, कुलुम किंवा कुणबी, पाटणे, बावकुळे, नेवे, कठार आणि खारोटे या पोटजाती आढळतात. या पोटजातीत रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. कुडाळे आणि संगमेश्वरी पोटजाती रत्नागिरी व सावंतवाडी भागात दिसतात. कुडाळेंना बांदेकर वाणी असेही म्हणतात. त्यांची वस्ती कुडाळ आणि बांदे परिसरात विशेष असल्याने त्यांना ही नावे पडली. कुलुम अथवा कुणबी व पाटणे हे दख्खन अथवा देशावर, वाबकुळे कर्नाटकात, तर नेवे, कठार आणि खारोटे हे खानदेशात आढळतात. याशिवाय हुंबड, वालांजू किंवा लाडशाखी वाणी जळगाव जिल्ह्यात दिसतात.

कुडाळे वाणी स्वत:ला आर्य वैश्य म्हणवून घेतात. त्यांच्यात ब्राह्मणांप्रमाणे गोत्रे आहेत. ते बहिर्विवाही आहेत. एकाच गोत्राच्या व्यक्तींचा विवाह होत नाही. मुलांचे मौंजीबंधन करीत नाहीत. लग्नाच्या वेळी विधी न करता जानवे घालतात. चित्पावन अथवा कऱ्हाडे ब्राम्हण त्यांचे उपाध्ये असतात. १८५० पर्यंत कुडाळे व मराठा वाणी यांच्यामध्ये रोटीव्यवहार होत. मात्र अल्प प्रमाणात मराठा वाणी मुलींशी कुडाळे मुलांचा विवाह होत असे. या जातीत विधवा पुनर्विवाहाची प्रथा नाही. कुडाळे हे मांसाहारी आहेत. संगमेश्वरी वाण्यात सप्तपदी करीत नाहीत. अविवाहितास विधवेशी लग्न करता येत नाही. बाकी सर्व बाबतीत कुडाळे वाण्यांशी साम्य आहे. पाटणे वाणी सातारा जिल्ह्यातील पाटण येथे विशेष आढळतात. त्यांचे रीतीरिवाज कुलुम वाण्यांप्रमाणेच आहेत. बावकुळे फक्त कारवारात आढळत असून ते कोकणी भाषा बोलतात. कारवारातील अंगडीचा शिवनाथ आणि गोव्यातील म्हार्दोळीची म्हाळसा या त्यांच्या कुलदेवता होत. ते मांसाहारी असून त्यांचे आचारविचार कुडाळेंप्रमाणेच आहेत. कुलुम अथवा कुणबी वाणी गट हा मराठा कुणबी जातीतील ज्या व्यक्तींनी व्यापारी हा व्यवसाय स्वीकारला आहे त्यांचा बनलेला असावा. सामाजिक व सांस्कृतिक चालीरीतींच्या दृष्टीने मराठा, कुणबी आणि वाणी यांच्यात बरेच साम्य आहे.

लाडशाखी वाण्यांची संख्या जळगाव जिल्ह्यात अधिक असून ते प्रामुख्याने अमळनेर, एरंडोल, पाचोरा, जळगाव, चाळीसगाव आणि पिंपळनेर येथे आढळतात. त्यांची भाषा, नावे, चालीरीती यावरुन ते गुजरातमधून आले असावेत. यांची सात गोत्रे व १०८ कुळे आहेत. यांची भाषा अहिराणी मिश्रित मराठी असून तिच्यात बरेच गुजराती शब्द आढळतात. त्यांच्यात विसा व दसा असे दोन पोटभेद आहेत. त्यांचे उपाध्ये खेडावाल ब्राह्मण असतात. ते मांसाहार व मद्यपान निषिध्द मानतात. विधवाविवाह व घटस्फोट निषिद्ध मानतात. यांच्या चालीरीती गुजराती वाण्यांप्रमाणे आहेत. ते वैष्णवपंथी असून त्यांचे कुलदैवत व्यंकटेश आहे. ते आपल्या घरात खंडेरावाची प्रतिमा ठेवतात व इतर हिंदू देवतानाही भजतात. पूर्वी 'शेठीया' नामक पंचायत जातीय निवाडा करीत असे.

कठार ही पोटजात जळगाव, नशिराबाद व यावलला आढळते. यांच्यात सगोत्र विवाह, विधवाविवाह निषिद्ध असून धार्मिक विधी व आचार स्थानिक कुणब्यांप्रमाणेच आहेत.

Maharashtra State Gazetteers

नेवे वाणी जळगाव जिल्ह्यात सावदे, नशिराबाद व रावेर तसेच नाशिक जिल्ह्यातही आहेत. यांच्या चालीरीती कठार वाण्यांप्रमाणेच आहेत. लाड वाणी सावद्यासही बरेच आहेत. गुजराती वाण्यांमध्ये पोरवाड, मोध, लाड, देसावल, शरोला, वायदा, नागर, खडायत आणि श्रीमाळी असे पोटभेद आढळतात. गुजराती वाण्यांची वस्ती जळगाव जिल्ह्यात आढळते. विशेषतः चोपडे तालुक्यात अधिक आहे. तसेच अमळनेर जवळील गांधली गावी गुजराती जैन श्रावक वाण्यांची वस्ती अधिक आहे. ते शाकाहारी असून कांदा, लसूनही वर्ज्य मानतात. पोरवाड व श्रीमाळी या जैन श्रावकांशिवाय बहुतेक गुजराती वाणी वैष्णव आहेत. यातील बहुतांश लोक डाकोरला रणछोड आणि व्दारकेला कृष्णाच्या दर्शनास जातात. यांची जातपंचायत असते.

मारवाडी वाण्यांत अगरवाल, मेश्री, ठाकूर, खंडेलवाल आणि ओसवाल हे पोटभेद आहेत. ते ब्रिटिश कालावधीत मारवाड, जयपूर, जोधपूर आणि उदेपूर येथून महाराष्ट्रात स्थलांतरित झाले. यांची मातृभाषा मारवाडी असली तरी ते गुजराती व मराठी देखील बोलतात. हिंदू मारवाडयांमध्ये गिरी व बालाजी ही मुख्य दैवते आहेत. श्रावक जैन मारवाडी दिगंबर पार्श्वनाथाची पूजा करतात. त्यांचे उपाध्याय जैन असतात. वैष्णव व माहेश्वरी मारवाडयांमध्ये उपाध्याय गौड ब्राह्मण असतात. वैष्णव व माहेश्वरी परस्परात रोटी-बेटी व्यवहार करतात. परंतु श्रावकांशी फक्त रोटीव्यवहार करतात. अगरवाल मारवाडी स्वतःला श्रेष्ठ समजतात. जाट मारवाडी स्वतःस क्षत्रिय समजतात. त्यांना मांसाहार निषिध्द नाही.

लिंगायत वाण्यांमध्ये पंचम, दिक्षीवंत, चिलीवंत आणि मेलवंत असे चार पोटभेद व १५ उपपोटभेद आहेत. त्यांच्यात परस्परांमध्ये रोटीव्यवहार चालतो. पंचम, दिक्षीवंत, चिलीवंत यांच्यात बेटीव्यवहारही चालतो. ते मराठी व कन्नड भाषा बोलतात. मांसाहार व मद्यपान निषिध्द मानतात. बसवेश्वराने ११५० मध्ये स्थापिलेल्या लिंगायत पंथाचे ते अनुयायी आहेत. सर्व लिंगायत अंगावर चांदीचे लिंग धारण करतात. गुलबर्गा येथील बसवेश्वर नंदी हे त्यांचे प्रमुख दैवत होय. काही खंडेरावाचीही पूजा करतात. यांच्या उपाध्यायाला जंगम म्हणतात.

वंजारी : पिढयान् पिढया स्थायी होऊन शेती करणारे या समाजातील लोक प्रामुख्याने अहमदनगर, नाशिक, पुणे, ठाणे जिल्हयांत आणि खानदेशात आढळतात. तसेच त्यांची वस्ती विदर्भ व मराठवाडयातही ब-याच प्रमाणात आढळते. बीड जिल्ह्यात त्यांची संख्या मोठी आहे. त्यांची राहणी व पोशाख मराठा कुणब्यांप्रमाणे आढळतो. ते देवपूजा, वृक्षपूजा करतात. विवाहसंस्कार वैदिक पध्दतीने करतात. महाराष्ट्रातील वंजारी समाज मराठी भाषिक आहे.

बंजारा : बंजारा व वंजारी हे समानार्थी शब्द नसून बंजारा ही स्वतंत्र जमात आहे. गॅझेटिअर ग्रंथांच्या पूर्वीच्या आवृतीत बंजारा व वंजारी या एकाच जमातीच्या पोटजाती असल्याचे म्हटले असले तरी ते वस्तुनिष्ठ नाही. बंजारा जातीतील लोकांमध्ये गुन्हेगारी प्रवृत्ती असल्याचे इंग्रजांच्या अहवालांमध्ये लिहिलेले आढळते. वंजारी मात्र कुणब्यांसारखी कास्तकार जात आहे. काही अभ्यासकांच्या मते पर्शियन शब्द ' बिरंजार ' म्हणजे तांदूळ वाहून नेणारा यावरुन बंजारा हे नाव पडले असावे.[२६] लदेणी म्हणजे लांबच्या मार्गाने मालाची ने-आण करणारा वाकबगार मानवी समाज. यालाच पुढे लभाण हे नामाभिधान पडले असावे. बंजारा हा भारत देशातील सर्वात मोठा जिप्सी समाज आहे. मूळचे ते रोम परीसरातील असावेत असे काही जण मानतात. पश्चिम जर्मनीमध्ये गोटिंगनला भरलेल्या तिस-या जागतिक रोमानो कॉंग्रेस परिषदेमध्ये जिप्सी व भारतीय बंजारा यांची ऐतिहासीक संस्कृती समान असल्याचे काहींनी प्रतिपादन केले. लमाणांचे तांडे रोम, काबूलमार्गे खैबर खिंडीतून जम्मूकडे आले असावेत. तेथून मथुरामार्गे दक्षिण भारत व गंगेचे खोरे, आणि फारसाहून बोलन खिंडीमार्गे सिंधू नदीच्या पश्चिम काठाने कराचीकडे व समुद्रमार्गे पश्चिम भारताच्या किना-यालगतच्या प्रदेशात आलेले आहेत. इ. स. पू. ६०० ते ३५० या कालावधीतील हे मार्ग असावेत.[२७]

या जमातीची भटक्या जीवनाची परंपरा असली तरी कालांतराने जमातीच्या काही गटांनी शेतीवर आधारित स्थिर जीवन स्वीकारले. लढाईच्या वेळी मुघल सैन्याला अन्नधान्याचा पुरवठा बंजारा करीत असत. या महत्त्वाच्या कामगिरीबद्दल त्यांना मुघल बादशहांकडून अनेक सवलती व देणग्या मिळत असत. सिकंदराने धोलपूरवर केलेल्या स्वारीच्या वर्णनात बंजारांचा उल्लेख आढळतो. ब्रिटिश काळात दळणवळण व वाहतुकीच्या साधनांत सुधारणा झाल्यामुळे या जमातीच्या परंपरागत व्यवसायास उतरती कळा लागली. काही लोक शेती, पशुपालन, मजुरी करु लागले. तर काही गुन्हेगारीकडे वळले.

राठोड वंशज अधिक प्रमाणात आहेत. चव्हाण कुलामध्ये सहा गोत्र तर पवार वंशामध्ये बारा गोत्र आहेत. तुरीमध्ये फक्त चार गोत्र आहेत. वडतीया गोत्र एकंदरीत बारा आहेत. त्यांना बारपाडा वडतीया असे म्हणतात. बंजारा जमात संपूर्ण भारतात आहे. ती सत्तावीस नावांनी ओळखली जाते, आणि सतरा उपजाती आहेत. केंद्र व राज्य शासनांनी मागासवर्गीय जाती-जमातींच्या यादीत वेळोवेळी समाविष्ट केलेली सर्व नावे त्यामध्ये अभिप्रेत आहेत.

सत्तावीस नावे : बंजारा, बंजडा, बनजारा, बनजारे, बंजारी, शिंगाडे (बंजारी), बालदिया, लमाण, लंबाडा, लंबाडी (सुगाली), लम्बाडे, लबान, लभान, लभाणी, लोभाना (लबना), लबाने, लधेणिया, कंधी, कांघसिंग, काघसिंगवाले, कंघेरा किंवा कनाडा, नट किंवा ओसरिया, सिरकी बंध किंवा सिरकीवाले, गोर, गमलिगा, गवारिया, गवारा.

सतरा उपजाती :- गोर बंजारा, चारण किंवा चारण बंजारा, मथुरा बंजारा, सनार बंजारा, नावी बंजारा, ढालीया बंजारा, सिंगाडीया बंजारा, मारु बंजारा, बामणीया बंजारा, बागोरा बंजारा, गिगोरा बंजारा, रोहिदास किंवा रविदास बंजारा, धनकुट्ट बंजारा, भाट बंजारा, जोगी किंवा भटावा बंजारा, ब्रिजवासी बंजारा, धाडी बंजारा. महाराष्ट्र शासनाने बंजारा, गोर बंजारा, लंबाडा अथवा लंबारा, लंभाणी, चरण बंजारा, लभाण, मथुरा लभाण, कचकीवाले बंजारा, लमान बंजारा, लमान अथवा लमाणी, लबान, धली अथवा धलीया, धाडी अथवा धरी, सिंगारी, जोगी बंजारा व नावी बंजारा या पोटजाती विमुक्त जातींचे फायदे देण्यासाठी अनुज्ञेय केलेल्या आहेत.

बंजारा जातीची प्रमुख देवता म्हणजे बालाजी होय. ते आपल्या झोपडीत बालाजीचा ध्वज उभारतात व त्याची पूजा करतात. सूतक, व्रतकार्य किंवा देवकार्याच्या वेळी हा ध्वज काढतात. ज्येष्ठ पौर्णिमेस व दिवाळीत नवीन ध्वज उभारतात. या खेरीज तुळजा भवानी, अंबाबाई व अन्य हिंदू देवतांची उपासना करतात. तसेच बलुचिस्तान सीमेनजीकच्या हिंगलज देवीलाही महत्त्वाचे स्थान आहे.

तांडा संस्कृती ही बंजारा लोकांची विशेषता असून त्यांनी ही संस्कृती जपून ठेवली आहे. तांडा नायकास नाईक म्हणतात. बंजारा लोकांची स्वतःची बोलीभाषा आहे. प्रादेशिक भाषांचा स्थलपरत्वे बोली भाषेवर प्रभाव पडलेला असला, तरी देशभर मूळ बोलीभाषेचे व्यक्तिमत्व ठळकपणे दिसते. महाराष्ट्रीय बंजारा बोलीभाषेत लोकसाहीत्य असून मौखिक परंपरेने त्याची जपणूक केलेली दिसते. बोलीभाषेतील बरेच शब्द मराठी, गुजराती, हिंदी, कन्नड, तेलुगु, तामीळ, ओरिया, मल्यालम, राजस्थानी, पंजाबी इत्यादी भाषांमध्येही समान असल्याचे दिसते. याचा अर्थ बंजारा कोणत्याही प्रदेशात असले तरी त्यांनी आपली बोलीभाषा जतन करुन ठेवली आहे. बंजारा महिला आकर्षक, बांधेसूद व गौरवर्णीय असतात. त्यांचा पोशाख खास पध्दतीचा असतो. महिला लेंगा, चोळी घालतात व वर ओढणी घेतात. त्यांना भडक रंगाचे कपडे प्रिय असतात. लेंग्यास फेटिया किंवा घागरा म्हणतात. पाठ उघडी असलेलया चोळीस काचळी म्हणतात. त्यावर वीणकाम करुन कवडया गुंफलेल्या असतात. ओढणीस छाय किवा टुकरी म्हणतात. मुलगी सहा-सात वर्षांची झाल्यावर तिच्या ओढणीच्या दोन्ही टोकांना तांदूळ, कवडया व सुपारीची पुरचुंडी बांधतात व ती खांद्यावरुन पुढे एक व मागे दुसरी सोडतात. ही अविवाहित मुलीची खूण आहे. लग्न झाल्यावर या पुरचुंडया कमरेस बांधतात. महिलांना दागिन्यांची मोठी हौस आहे. पतीच्या नावाने ' घुगरी ' नावाचा दागिना घालतात. विवाहित महिला माथ्यावर केस उंच बांधून त्यात फणी खोवतात. अविवाहित मुली घाग-याबरोबर कमरेपासून पायापर्यंत कवडयांचा हार गुंफतात. त्याला ' सडक ' म्हणतात.

या समाजातील विवाह विधीतील एक विशेषता म्हणजे लग्नाआधी वधूस रडण्याची तालीम देतात. त्याला बंजारा बोलीत ' ठणको मोडर ' किंवा ' डायलो ' म्हणतात. त्यांच्यात विवाहित मृतास जाळतात, तर अविवाहित मृतास पुरतात. बंजारा होळी, दिवाळी व कुमारीकांचा ' तीज ' हे सण उत्साहाने साजरे करतात.

शिंपी : परंपरेने शिवणकामाचा व्यवसाय करणा-या या जातीची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १९११ च्या जनगणनेप्रमाणे ५६,४५५ होती. शिवणकामाबरोबरच कापड रंगविण्याचे कामही या जातीचे लोक पूर्वी करीत असत. परंतु रंगविण्याचे काम हे गौण स्वरुपाचे आहे अशा समजुतीने हे काम करणे त्यांनी सोडून दिले व आता शिवणकाम हाच या जातीचा परंपरागत व्यवसाय राहिला आहे. शिंपी जातीचे लोक महाराष्ट्रातील सर्व भागात दिसतात. आपण क्षत्रिय वंशाचे आहोत असा शिंपी जातीत समज आहे. शिंपी जातीतील प्रसिध्द संत नामदेव हे आपल्या जातीचे संस्थापक आहेत, असे बहुतांशी शिंपी मानतात व स्वतःला नामदेव शिंपी म्हणवितात.

शिंपी जातीत बारा अंतर्विवाही पोटजाती आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- अहीर, भावसार, चतुर, कोकणी, मराठा, नागलिक, नामदेव, रंगारी, पंचम, शेतवाल, श्रावक अथवा जैन आणि एक टाके. शिंपी जातीमध्ये आडनावानुसार बहिर्विवाही गट आहेत. काही भागातील शिंपी जातीत गोत्रे दिसून येतात. जातीच्या परंपरेप्रमाणे मामेबहिणीशी विवाह होतो परंतु मावसबहिणीशी होत नाही. त्याचप्रमाणे विधवा पुनर्विवाहाची आणि घटस्फोटाची प्रथा आहे. मृत व्यक्तीचा दहन संस्कार केला जातो. धार्मिक कार्ये ब्राह्मण पुरोहिताकडून केली जातात. इतर बाबतीत शिंपी जातीच्या प्रथा मराठा, कुणबी जातींसारख्याच आहेत, या जातींबरोबर त्यांचा रोटीव्यवहार होतो, परंतु बेटीव्यवहार होत नाही.

साळी : सूती व रेशमी धाग्यापासून कापड विणण्याचा व्यवसाय परंपरेने करणा-या जातीला महाराष्ट्रात साळी, देवांग, हटगार, बेड, विणकर, नेकार, नेगार या विविध नावांनी ओळखण्यात येते. साळी ही एक व्यावसायिक जात आहे व या जातीत अनेक पोटजाती समाविष्ट झाल्या आहेत. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात कोष्टी

Maharashtra State Gazetteers

आणि साळी या दोन समुहांची एकत्रित लोकसंख्या १,४५,८७६ होती. १९३१ च्या जनगणनेप्रमाणे कोष्टी, देवांग, विणकर, हटगार, बेड, साळी आणि पद्मसाळी यांची एकत्रित लोकसंख्या महाराष्ट्रात २,४९,३१५ होती. साळी जातीचे लोक कोकण, देश, मराठवाडा आणि विदर्भ या चारही प्रादेशिक विभागांत दिसतात. महाराष्ट्रातील साळी जातीत अनेक पोटजाती आहेत. त्यातील काही पोटजातींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- अहीर, अरसिंग पटल, बांगड, देव, देवांग, मराठा सकुळ, पद्मसाळी, पट्टसाळी, सगुण अथवा समय साळी, शुभ्र साळी, शुध्द साळी, सत्साळी इत्यादी, एन्थोवेनच्या मतानुसार साळी जातीची निर्मिती घोंगडी विणणा-या हटकर धनगर जातीपासून झाली असावी. साळी जात तेलंगण, कर्नाटक व गुजरात प्रांतातही आढळते. साळी जातीच्या ब-याच पोटजाती मूळच्या कन्नड असाव्यात, तसेच काही पोटजाती आंध्र प्रदेशातून आल्या असाव्यात. या पोटजातींची विभागणी आडनावाने ओळखण्यात आलेल्या बहिर्विवाही गटांमध्ये झाली आहे. एकच आडनाव असणा-या व्यक्तींचा विवाह होत नाही. नाशिक भागातील मराठा साळी जातीमध्ये आडनावांखेरीज ब्राह्मणांच्या प्रमाणे गोत्रेही दिसतात. साळी जातीमध्ये आते व मामेबहिणीशी विवाह करण्याची प्रथा आहे. परंतु मावसबहिणीशी विवाह होत नाही. घटस्फोट व विधवा विवाहास मान्यता आहे. परंतु विधवेने नव-याच्या कुळात लग्न करु नये असा दंडक आहे. साळयांचे कुलदैवत शाकंभरी आहे. शाकंभरीचे मूळ स्थान कर्नाटकात आहे.

साळी जातीत पूज्य मानलेल्या देवतांमध्ये खंडोबा, बहिरोबा, जोतिबा, नरसोबा, भवानी, जोगाई इत्यादी देवतांचा समावेश होतो. मृत व्यक्तीचा दहन संस्कार अथवा दफन करण्याचीही पध्दती आहे. श्राध्द व महालय करतात.

सुतार : सुतार ही जात महाराष्ट्रात सर्वत्र आढळते. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या जातीची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १,९९,९६८ होती. १९३१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्राच्या प्रादेशिक विभागातील मुंबई इलाखा व मराठवाडयातील सुतार जातीची एकत्रित लोकसंख्या १,५९,४८१ होती. महाराष्टाच्या ग्रामीण भागात सुतार हा महत्त्वाचा बलुतेदार मानला जातो. बैलगाडी, नांगर आणि शेती व्यवसायास लागणारी इतर अवजारे तयार करणे व त्यांची दुरुस्ती करणे ही कामे बलुतेदार म्हणून सुतार परंपरेने करतो व त्यासाठी त्याला पिक काढतेवेळी धान्य रुपाने बलुते दिले जाते.

महाराष्ट्रातील सुतार स्वतःला पांचाळ म्हणवून घेतात व शिल्पशास्त्राचा जनक त्वष्टा नामक देवतेपासून आपल्या जातीची निर्मिती झाली आहे असे मानतात. तसेच आपण ब्राह्मणच आहोत असाही दावा या जातीचे लोक करतात. सुतार जातीत पाच अंतर्विवाही पोटजाती आहेत :- देशी, कोकणी, पांचाळ, आर्यक्षत्री आणि विदूर अथवा कडू. या पोटजातींची विभागणी अनेक कुलांत झालेली आहे. एकाच कुलातील लोकांचा विवाह होत नाही. देशी सुतारांमध्ये आडनाव हे कुलनिदर्शक असते. याखेरीज त्यांनी ब्राह्मणांप्रमाणे गोत्रही स्वीकारले आहे. सगोत्र विवाह केला जात नाही. समान देवक असल्यासही विवाह होत नाही. आते-मामे भावंडांचा विवाह होतो. तसेच काही भागात विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा आहे. रत्नागिरीच्या काही भागातील कोकणी सुतारास थवी अथवा वाडवे असेही म्हणतात. त्यांच्यात धवड सुतार किंवा दाभेळे हा एक पोटभेद आहे. ते दापोली तालुक्याच्या आसपास आढळतात. पोर्तुगिजांनी हिंदूंचा छळ आरंभिला तेव्हा कोकणी सुतार सोलापूर जिल्ह्यात जाऊन स्थायिक झाले. त्यांना तिथे शिव ब्राह्म सुतार म्हणतात. त्यांचा अजूनही गोवे आणि रत्नागिरी येथील जातिबांधवांशी रोटी-बेटी व्यवहार होतो. कोकणी सुतारामध्ये रत्नागिरी आणि सावंतवाडी भागांत एकाच खेडयात राहणा-याचा विवाह होत नाही. मात्र एकच देवक असलेल्यांचा विवाह होतो. विधवा पुनर्विवाह व घटस्फोटाची प्रथा काही भागातच दिसते. सुतार जातीतील सामाजिक प्रथा या मराठा जातीतील प्रथांसारख्याच आहेत.

सोनार : सुवर्णकार म्हणजे सोन्यापासून विविध प्रकारचे दागिने बनविणारे, तसेच चांदीपासून दागिने, गृहोपयोगी भांडी व इतर वस्तू तयार करणारे कारागीर. महाराष्ट्रात ही जात सोनार या नावाने ओळखली जाते. १९११ च्या जनगणनेनुसार त्यांची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १,०९,०७५ होती. तर त्यांची महाराष्ट्रातील सर्व विभागातील एकत्रित लोकसंख्या १९३१ च्या जनगणनेच्या वेळी २,२५,१२० होती. महाराष्ट्राच्या सर्व विभागात सोनार जातीची वस्ती आढळते. विश्वकर्म्यापासून आपली उत्पत्ती झाली असे सोनार मानतात व स्वतःला पांचाळ म्हणवून घेतात. त्याचप्रमाणे बरेच सोनार आपण ब्राह्मण आहेत असे मानतात.

सोनार जातीमध्ये पोटजाती असून यांतील बहुतांशी पोटजाती प्रादेशिक स्वरुपाच्या आहेत. या पोटजातींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- अहीर किंवा खानदेशी, अझरा, देवांगण, दैवज्ञ ब्राह्मण किंवा पांचाल, देशी किंवा मराठा, सोनार, कडू, कानडे, कोकणी किंवा दैवज्ञ, लाड, माळवी, परदेशी, साद, शिलवंत, वैश्य किंवा जैन सोनार. या पोटजातींमध्ये परंपरेने रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. रत्नागिरी जिल्ह्यातील कोकणी सोनार जातीच्या टाकसाळे व आगसाळे अशा दोन शाखा आहेत. मराठा कारकिर्दीत टाकसाळे हे धातूपासून नाणी तयार करीत, तर आगसाळे हे नाणी पारखत असत.

स्वतःस ब्राह्मण मानणा-या पोटजातीखेरीज इतर पोटजातीत आडनावानुसार बहिर्विवाही गट आहेत. स्वतःस

दैवज्ञ ब्राह्मण म्हणविणा-या पोटजातीत गोत्रे आहेत व त्यांच्यात सगोत्र विवाह होत नाहीत. अहीर, लाड, देशी, माळवी आणि कडू या पोटजातीत देवक बहिर्विवाहाचा नियम पाळला जातो व विधवा पुनर्विवाह रुढीसंमत आहे. दैवज्ञ ब्राह्मण म्हणविणा-या पोटजातीखेरीज इतरांच्यात घटस्फोटाची प्रथा आहे. देवांग, कानडे व वैश्य या पोटजाती शाकाहारी आहेत तर इतर मांसाहारी आहेत. मामेबहिणीशी विवाहाची पध्दती सोनार जातीत आहे.

सोमवंशी वाडवळ : मुंबई शहर आणि वसईपर्यंतच्या भागात या जातीतील लोकांची वस्ती आहे. एन्थोव्हेनने या जातीचा उल्लेख केला नाही. केळी आणि विडयांच्या पानांची लागवड करणे हा या जातीचा प्रमुख व्यवसाय आहे. केळीच्या बागा व पानमळयांची मालकी या जातीच्या लोकांकडे आहे. तथापि, काम करणारे शेतमजूर हे वारली आहेत. या जातीत विधवा पुनर्विवाह व मामेबहिणीशी लग्न करण्याची प्रथा आहे. मांसाहार अनुज्ञेय असला, तरी काही लोक पूर्णपणे शाकाहारी आहेत. १९११ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या १४,६५७ होती.

हलबा : आर. व्ही. रसेल आणि हिरालाल यांच्या मते "हलबा" हा शब्द कन्नड "हलबर" किंवा "हलबारु" या आदिम रहिवासी या अर्थाच्या शब्दांपासून आलेला आहे. त्यांच्या व्युत्पत्तीबाबत दंतकथाही प्रचलित आहेत. यांची वस्ती प्रामुख्याने भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्हयांत आढळते. त्यांच्यात "छत्तीसगडीया" आणि "बस्तरिया" असे दोन प्रादेशिक गट आढळतात. भंडारा जिल्ह्यातील साकोली, देवरी, गोंदिया तालुक्यांत गडचिरोली व भागात बहुसंख्येने आढळतात. मध्यप्रदेशातील रायपूर जिल्ह्यात १८९१ मध्ये त्यांची सर्वाधिक लोकसंख्या ४७,२७३ होती. त्याशिवाय काकेर व बस्तर या जिल्हयांमध्ये त्यांची वस्ती आढळते. स्वातंत्र्यपूर्व काळात ही जमात वन्य जमात, आदिम जमात, मागास जमात म्हणून ओळखली जात असे. १९५० पासून हलबांचा अनुसूचित जमातीत समावेश केला आहे. त्यांची विदर्भातील जिल्हयांमधील लोकसंख्या खाली दिली आहे.

	१८९१	१९११	१९२१	१९३१
वर्धा	१२९	७३४	१,०३८	१,२२७
नागपूर	७१	६८३	४०९	५२३
चांदा	७,१९९	२,४१९	२,६०४	३,२८०
भंडारा	१८,४२५	९,८३७	१८,२४०	१९२३३
अमरावती	--	२,२०१	२,०००	२,३२१
अकोला	--	४०३	४६८	४८२
बुलढाणा	--	२४	२६	२०
यवतमाळ	--	९७६	८९०	१,०६७
एकूण विदर्भ	२५,८२४	१७,२७७	२५,६७५	२८,१५३

Maharashtra State Gazetteers

उपरोक्त वर्षाच्या जनगणना अहवालांनुसार हलबा जमातीच्या धर्माची नोंद फक्त हिंदू आढळते. हलबा लोक पूर्वी रतनपूरच्या राज्यात शिपाई म्हणून काम करीत. पुढे त्यांनी बस्तर राज्यात जमिनी मिळविल्या. चांद्याच्या गोंड राजांकडे सैनिक म्हणून ते काम करीत. ही जमात अनेक देवक गटांत विभागली आहे. त्यांच्यात "पुरायतित" आणि "सुरायतित" हे दोन "बेटीबंद" वर्ग आढळतात. त्यांच्यात अलोणे, अमले, काम्बे, चौधरी, मानकर, नाईक, कोटबार, वाघमारे, बेलसरे इत्यादी आडनावे आढळतात. सुप्रसिध्द भाषाशास्त्रज्ञ ग्रीअरसन यांच्या मते हलबी बोलीभाषा म्हणजे उडिया, छत्तिसगडी व मराठी या भाषांचे विचित्र मिश्रण होय. प्रदेशानुसार स्थानिक भाषेचा प्रभाव पडतो. भंडारा जिल्ह्यात तिला हलबी बोली म्हणतात. भात हे मुख्य अन्न असून ते मांसाहारी आहेत. विवाह करतेवेळी कुल बहिर्विवाहाचा नियम पाळला जातो. मामेबहिणीशी लग्न होते. परंतु आतेबहीण व मावसबहिणीशी लग्न होत नाही. भंडारा जिल्ह्यातील हलबा लोक इतर हलबा पोटजातीच्या मुली विवाहामध्ये स्वीकारतात परंतु आपल्या त्यांना देत नाहीत. साटे लोटे करण्याची पध्दती त्यांच्यात आहे. विधवा पुनर्विवाह आणि घटस्फोटाची प्रथा या जमातीत आढळते. मृत व्यक्तींचा दहन संस्कार केला जातो, परंतु गरीब लोक दफनही करतात. त्यांच्या पंचायतीच्या प्रमुखास मुखिया किंवा कुर्शा म्हणतात. तो परंपरागत असतो. त्याची निवड कोटबार किंवा नाईक या कुलातून होते. ते पोहे तयार करुन विकण्याच्या परंपरागत व्यवसायाशिवाय जंगलकाम, शेती व शेतमजुरीही करतात. विदर्भातील कोष्टी जातीच्या लोकांनी स्वतःला "हलबा" म्हणवून तशी नोंद केल्यामुळे हलबा जमातीच्या लोकसंख्येत १९७१ ते १९८१ या दशकात ३,३९९.३४ टक्के एवढी अनैसर्गिक वाढ झालेली आहे.

कोष्टी : विणकरांच्या या जातीला मराठीत कोष्टी व तेलुगुमध्ये सालेवार म्हणतात. हे प्रामुख्याने विदर्भातील नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, अमरावती जिल्हयांत व विशेषतः नागपूर परिसरात अधिक आढळतात. त्यांची विदर्भाच्या जिल्हयांतील लोकसंख्या खाली दिली आहे.

	१८७२	१९११	१९२१	१८३१
वर्धा	५,७८४	७,२२७	६,४०१	७,४८७
नागपूर	३१,७९७	४२,२७१	४०,००८	४७,१४९
चांदा	९,२४४	६,७८९	६,८४२	१३,५६६
भंडारा	१७,५८०	२४,११०	१४,९०९	१८,७५२
अमरावती	--	७,९८१	७,४८९	६,७७२
अकोला	--	१,७८३	२,०७५	१,९५६
बुलढाणा	--	७१९	१,२६५	५३५
यवतमाळ	--	३,३४४	३,०१८	३,०३८
एकूण विदर्भ	६४,४०५	९४,२२४	८२,००७	९९,२५५

सन १९३१ नंतरची कोष्टी जातीची स्वतंत्र लोकसंख्या उपलब्ध नाही. पण १९११, १९२१ व १९३१ च्या जनगणना अहवालांनुसार त्यांची नोंद "हिंदू" अशी आहे. सी. पी. ॲण्ड बेरारच्या शिक्षण विभागाने ४ डिसेंबर १९४१ पासून शैक्षणिक सवलतीसाठी जाहीर केलेल्या आदिम जमातींच्या यादीमध्ये तसेच सी. पी. ॲण्ड बेरार लोकल गव्हर्नमेंट ॲक्ट, १९४८ नुसार कोष्टी जातीचा मागास जमातीमध्ये समावेश केलेला नाही. कोष्टी स्वतःला मार्कंडेय ऋषीचे वंशज समजतात मार्कंडेयाने कमळ पुष्पाच्या धाग्यापासून देवांकरिता कापड बनविल्याची आख्यायिका आहे. त्यामुळे देव प्रसन्न होऊन सूर्यकन्येशी त्याचा विवाह करण्यात आला. विवाहाप्रित्यर्थ भवानी नावाचा राक्षस व एक वाघ त्याला आंदण मिळाले. परंतु राक्षस आज्ञाभंग करु लागल्यामुळे मार्कंडेयाने त्याला ठार केले व त्याच्या हाडापासून पहिला हातमाग बनविला. वाघ त्यांना त्रास देत नाही असा समज असल्याने कोष्टी वाघाला ठार करीत नाहीत.[२८] कोष्टयांच्या लाड, गढेवाल, देशकर, देवांग इत्यादी साडेबारा पोटजाती आहेत.[२९] तसेच काही जैन कोष्टी असून ते जैन धर्माचरण करतात. सालेवारांचे सुतसाले, पद्मसाले, सगुणसाले असे तीन प्रकार आढळतात. पूर्वी पोटजातींमध्ये विवाह होत नसत. कोष्टी जातींमध्ये वुंभारे, डेकाटे, बारापात्रे, धकाते, सोरते, निमजे, निपाने, निनावे, नंदनवार, पवनीकर, हेडावू, सोनकुसरे, गोटेफोडे, रंभाड, माताघरे, शेलुकर, सिंदेकर, बोरीकर, देवघरे, मौदेकर, सिर्सिकर, नागपूरकर, दलाल इत्यादी आडनांवे आहेत. एकाच कुळात लग्ने होत नाहीत. ते हिंदू देवदेवतांची पूजा व सण साजरे करतात. गणपती हे मुख्य दैवत असल्याने गणेशोत्सव उत्साहाने साजरा करतात. तसेच राखी बंधनाच्या सणाला विशेष महत्त्व देतात. काही कोष्टी लिंगायत, कबीरपंथी तर काही गुरुमुखी पंथाचे आहेत. त्याशिवाय नारायणदेव, बाळराजा, आंबागडया अशी त्यांच्या देवतांची नावे आहेत. कळमेश्वर जवळील धापेवाडयाच्या कोळीबाबाचे (कोलबास्वामी) ते शिष्य असून गुरुच्या नावाने घरी नारळाची पूजा करतात. विणकामाच्या उपकरणांना ते पवित्र मानतात. ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतो. ते मांसाहारी असले तरी लाड, जैन व हातघर कोष्टी शाकाहारी आहेत. कोष्टी पंचायतीच्या प्रमुखास महाजन किंवा शेटे महाजन म्हणतात. त्यांच्या बोलीभाषेला "कोष्टाळू" बोली म्हणतात. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या मते कोष्टी लोक काही दिवसांपूर्वी हलबा कोष्टी म्हणवून घेत, तथापि आता फक्त हलबा म्हणवून घेऊ लागले आहेत.

परधान : परधान नाव प्रधान या शब्दापासून आले असून पूर्वी परधान हे गोंडांचे पुरोहित व भाट हाते. मध्ययुगात ते गोंड राजांच्या दरबारात वंशावळी ठेवण्याचे काम करीत असे म्हणतात. काही लोक गीतरुपाने इतिहास कथन व कथाकथन करुन चरितार्थ चालवित. गोंड राजांच्या अस्तानंतर ही कामे आपोआप बंद पडली व ते मोलमजुरी करु लागले. १९३१ च्या जनगणनेनुसार मध्यप्रांत व व-हाडात परधानांचा हिंदूधर्मीय आणि आदिवासी धर्मीय असा उल्लेख असून त्यांची लोकसंख्या अनुक्रमे ६३,७४३ व ५८,८११ म्हणजे १,२२,५५४ होती. १९८१ च्या जनगणनेनुसार त्यांची लोकसंख्या ९८,६८५ होती. परधान प्रामुख्याने यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा व नागपूर जिल्हयांत आढळतात. परधानात पाथरी आणि सरोटी या पोटजाती आहेत. त्यांची आडनावे देवांवरुन पडलेली असून ती पुढीलप्रमाणे आहेतः- **सातदेवे** :- पंधराम (पंधरे), मडावी, कुलसंगे, मसराम, धुर्वे, करनाके, कन्नाके, जुमनाके, जुगनाके, सयाम व पुरकाम; **सहादेवे** :- चिडाम, सीराम, पेंदाम गेडाम, पेंदोर, श्रीरामे, उईके, कुळमेथे, मराफे, आत्रम, कुसराम, परतेकी; **पाचदेवे** :- किन्नाके, येटे, वुंभरे, सुरपाम, कोरचे आणि **चारदेवे** :-

पोयाम, सिडाम, मडकाम, कोवे, आडे, टेकाम व घोडाम. मुले-मुली वयात आल्यानंतर विवाह होतात. समरक्त गटातही ते विवाह करतात. त्यानुसार आतेबहीण मामेबहिणीशी विवाह होऊ शकतो. पण त्यासाठी मुलामुलीची पसंती लक्षात घेतली जाते. पूर्वी मुलीस देज देण्याची प्रथा होती. पूर्वी लग्न वराकडे उकीरडयावर लागत असे परंतु आता लग्न मुलीकडे लागते. काळी पोत घातली म्हणजे ती पत्नी झाली असे समजतात. परधान लोक सर्व सण व उत्सव विशेषतापूर्वक साजरे करतात. आषाढी एकादशी, जीवती, पोवती, नागपंचमी, दिवाळी, महाशिवरात्री आणि फाग (शिमगा) हे सण साजरे करतात. भीम ही परधानांची ज्येष्ठ देवता आहे. ते चेतनवादी व प्राणिपूजक आहेत. मांसाहारी असून दारुचा मुक्तपणे उपयोग करतात. रोजच्या जेवणात ज्वारीची भाकरी, भाजी, चटणी व आंबील असते. प्रेत पुरण्याची किंवा जाळण्याची पध्दती आहे. मृताचा मुलगा विशिष्टपणे अग्निसंस्कार करतो. दहाव्या दिवशी स्त्रिया रक्षा गोळा करतात. सहा महिन्यानंतर किंवा वर्षाने श्राध्द करतात. वर्षानंतर मृताच्या नावाने वुंडनामक एक विधी करतात.

कोकणा : कोकणी व कुकना याही नावाने ओळखली जाणारी ही अनुसूचित जमात प्रामुख्याने नाशिक जिल्ह्यातील पेठ, सुरगाना, दिंडोरी, कळवण व बागलाण तालुके; धुळे जिल्ह्यातील नंदूरबार, नवापूर साक्री तालुके आणि ठाणे जिल्ह्यातील जव्हार तालुक्यातही आढळते. ही जमात राजस्थान, गुजरात, कर्नाटक या राज्यांत व दादरा व नगर हवेली या वेंद्रशासित प्रदेशातही अनुसूचित जमात म्हणून ओळखली जाते. हे लोक १३९६-१४०७ या दुर्गादेवीच्या दुष्काळात कोकणातून सध्याच्या प्रदेशात स्थलांतरीत झाले असावे. १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ३,५२,९३२ होती. या जमातीत पोटजमाती नसून अनेक बहिर्विवाही कुळे पुढीप्रमाणे आहेत :- बागुल, भोयेर, आवारी, धोम, गावीत, खंबाईत, गवळी, गायकवाड, महाले, राऊत, ठाकरे, गांगुर्डे, पवार, सुर्वे, चौधरी, कडू, इत्यादी. ते कुलनामेच आडनांवे म्हणून वापरतात.

हे लोक एकाच कुळात लग्ने करीत नाहीत. आतेबहीण, मावसबहीण, पुतणी, भाची व मोठ्या भावाच्या विधवेशी लग्न निषिध्द मानतात. मात्र मामेबहीण किंवा धाकटया मेहुणीशी लग्न करणे पसंत करतात. विधवाविवाह संमत आहे. मुलीच्या वडिलांना देज देऊन लग्न ठरल्यावर मोठी पेन कार्यक्रम करतात. मुलीच्या धरी विशेषतः संध्याकाळी लग्न लावतात. लग्नानंतर मुलगी नव-याकडे वेगळा संसार थाटते. क्वचितच ते सासू-सास-यांबरोबर राहतात. त्यांच्यात पितृसत्ताक पध्दती असून परंपरेने थोरल्या मुलाकडेच धार्मिक कृत्यांची जबाबदारी असते. प्रथम बाळंतपणाच्या वेळी काही कार्यक्रम करीत नाहीत.

कोकणा लोक शेतीच्या जवळ वेगवेगळया पाडयांमध्ये इतर जाती/जमातींच्या लोकांबरोबर राहतात. घरांच्या भिंती कारवीपासून तयार करुन शेणामातीने लिंपतात, छप्पर कौलारु असते. घरे बिनाखिडक्यांची पण २-३ दरवाज्यांची असतात. पूर्वी या जमातीची मराठी, गुजराथी, वारली व अहिराणी भाषांमिश्रित कोकणी बोली होती. परंतु हल्ली ते मराठीच बोलतात.

कोकणा लोक कष्टाळू असून उत्तम शेतकरी म्हणून प्रसिध्द आहेत. ते कणसारी, डोंगरदेव, मौली, गावदेव, असरा, वीर, सुपली, हिरवा व वाघ्या इत्यादी दैवतांची पूजा, तसेच हिंदू सण साजरे करतात. कोकणा जमातीत "महालकरी, देशमुख, पाटील, कारभारी" अशी व्यवस्था होती. ही व्यवस्था आता लोप पावत आहे.

पारधी : पारध म्हणजे शिकार या व्यवसायावरुन या जातीला पारधी हे नामाभिधान प्राप्त झाले. या आदिवासी जमातीचे गाव पारधी व फासे पारधी असे प्रमुख दोन पोटभेद असून त्यातही फांसपारधी, फासेपारधी, चितापारधी, लंगोटीपारधी, बहेलिया बहेल्लिया, शिकारी, आडवी चिंचेर, टाकिया असे प्रकार आहेत. यांच्यात गुजराती, मराठा व टाकणकर (टाकारी) असेही प्रकार आहेत. पारध्यांमध्ये चव्हाण, पवार, साळूंके, गायकवाड, मोरे अशी कुळे आहेत. १९३१ च्या जनगणनेनुसार (राजपारधी व फासेपारधी) पारध्यांची मुंबई प्रांतातील लोकसंख्या ५,३९५ इतकी, तर १९८१ मध्ये सर्व पारधी अनुसूचित जमातींची महाराष्ट्रातील लोकसंख्या ९५,११५ होती.

वडार : महाराष्ट्र शासनाने विमुक्त जमातीत समावेश केलेल्या या जमातीत गाडी वडार, जाती वडार, माती वडार व पाथरवट या पोटजाती आहेत. हे दहा-पंधरा पिढयांपूर्वी आंध्र प्रदेशातून महाराष्ट्रात आले असावेत. माती वडार व जाती वडार आपापसांत रोटी व्यवहार करतात. मात्र बेटीव्यवहार करीत नाहीत. वडारांत धोत्रे, जाधव, गुंजाळ, पवार, रणसुरे ही प्रमुख कुळे असून कुळे म्हणजेच आडनावे समजतात. १९३१ च्या जनगणनेनुसार यांची मुंबई प्रांतातील लोकसंख्या १,०९,५१८ इतकी होती.

गोसावी : महाराष्ट्रात सर्वत्र आढळणारा हिंदू जातींचा हा एक वर्ग असून तो गोसाई, गुसाई व गोस्वामी अशाही नावांनी ओळखला जातो. ही नावे गोस्वामीन् या संस्कृत शब्दापासून आली आहेत. इंद्रियांवर ज्याचे स्वामित्व तो गोसावी हा अर्थ येथे आला आहे. यांच्यात गिरी गोसावी, सरस्वती पर्बत, सागर, भारती गोसावी, बावा, बैरागी, तीर्थ आश्रम, अरण्य धरभारी, भारती, संन्यासी, नाथपंथी गोसावी आणि बान किंवा वान अशा पोटजाती आहेत. ही भटकी

जमात आपली उत्पत्ती कपिल ऋषीपासून झाल्याचे सांगते. गोसाव्यांची जातपंचायत आहे. त्यांच्यात शैव व वैष्णव असे दोन भेद आहेत. त्यांच्यात थोडयाफार फरकाने साडेबारा पंथ आढळतात. महाराष्ट्रातील गोसावी आपले मूळ स्थान गुजरात राज्यातील असल्याचे सांगतात.

या ग्रंथातील प्रकरण ९ - उपसंहार नंतर परिशिष्ट क्रमांक १ मध्ये मध्यप्रांत व व-हाड शासनाच्या शिक्षण विभागाने प्रसारित केलेली विदर्भातील मागासवर्गांची १९४१ ची यादी, परिशिष्ट क्रमांक ३ मध्ये विदर्भातील वन्य जमातींची १९११ व १९२१ ची लोकसंख्या तर परिशिष्ट क्रमांक २ मध्ये ९ ऑगष्ट १९९५ च्या शा. नि. नुसार जाहीर केलेल्या मुस्लीम मागासवर्गीयांची यादी दिलेली आहे.

वांशिक लक्षणे

शारीरिक लक्षणांच्या दृष्टीने विचार करता महाराष्ट्रातील काही जातींचे जवळच्या गुजरात, कर्नाटक आणि ओरिसा या भाषिक प्रदेशांतील जातींशी साम्य जाणवते. ऐतिहासिक काळात महाराष्ट्रात झालेल्या वसाहतीकरणाची प्रक्रिया समजावून घेण्याच्या दृष्टीने अशा जाती-जमातींची नोंद घेणे उद्‌बोधक ठरेल. या दृष्टीने गुजरातमधील पुढील जातींचा उल्लेख करता येईलः- औदिच ब्राह्मण, नागर ब्राह्मण, भिल्ल आणि त्यांच्यातील विविध पोटजमाती, भाटिया, भंगी, कोळी, कुणबी, पाटीदार, गुजरातच्या किनारपट्‌टीवर मिठाचा व्यापार करणारी आणि नाविक व्यवसाय करणारी मच्छी खरवा ही जात, व्यापार करणा-या लुहाणा आणि ओसवाल जैन या जाती, गाई, म्हशी, शेळया, उंट पाळणारी रबारी ही जात, मेहेर ही गुजरात आणि काठेवाडमधील लढाऊ जात, वाघेर ही काहीशी हिंदू व काहीशी मुसलमान असणारी व काही प्रमाणात गुन्हेगारीवर उपजीविका करणारी जात, मियाना ही भटकी व थोडीफार गुन्हेगारी करणारी मुसलमान जमात व राजपूत ही लढाऊ आणि राज्यकर्ती जात. याखेरीज मुसलमानधर्मीय सुन्नी, बोरा, मेमन, खोजा या व्यापार करणाऱ्या जमाती, भाडेला ही दर्यावर्दी सुन्नी पंथीय मुसलमान जमात व पार्शी यांचा उल्लेख करावा लागेल.

ओरिसामधील जातींत पुढील जाती समाविष्ट आहेतः- अगारिया, बिंझयाल, भात्रा, भुइया , ब्राह्मण (आरण्यक व सामवेदी), डोरा, गदबा, गोंड, ग्वाला, जुआंग, खोंड, करण, केऊत, खाडीया, खंडायत, कोया, कोलता (कुलता), कुंहार (कुंभार), मेहेर, मुंडा, पानो किवा पाना, पोर्जा, बोंडो, सावरा, भंगी आणि ओरान किंवा उराव. यातील भात्रा, खंडायत, कोलता व पोर्जा (प्रजा) या शेती करणा-या जाती, ग्वाला ही नावाप्रमाणे गाई पाहणारी जात, मेहेर ही विणकाम करणारी जात, करण ही कायस्थ जात, कुंहार (कुंभार) व ब्राह्मण या आपल्या जातीचा परंपरागत व्यवसाय करणा-या जाती व भंगी आणि पानो या दलित जाती. या खेरीज इतर सर्व आदिवासी जमाती आहेत.

कर्नाटक राज्यातील ज्या जातींचा विचार करणे आवश्यक आहे त्यात विविध स्तरांवरील जातींचा अंतर्भाव आहे. शेती व्यवसाय करणा-या जातींमध्ये गंगादिकार वोक्कलिगा, गौडा, हलक्की वोक्कल, कुंचितिगा, कोडुगू, नामधारी, नंदवरा, पालेगर, कुडा वोक्कलिगा, सदारु व पंचमसाळी ही शेतमजुरी व काही प्रमाणत कुळ या नात्याने शेती करणारी जात यांचा अंतर्भाव होतो. या खेरीज जेनू कुरुबा, बेट्टे कुरुबा व कुरुबा या मेंढपाळीचा व्यवसाय करणा-या व हट्‌टीककण कुरुबा ही लोकरीपासून घोंगडी बनविणारी आणि मेंढपाळाचा व्यवसाय करणा-या जातीतील पोटजात यांचा अंतर्भाव झाला आहे. इतर व्यवसाय करणा-या जातीत बानाजिगा किंवा शेट्‌टी ही व्यापार करणारी जात, देवांग ही विणकाम करणारी जात, गणिगा किंवा सज्जन ही तेली जात, अगासा किंवा माडिवाल ही धोबीकाम करणारी जात, पांचाल सोनार किंवा विश्वकर्मा, बोगर ही तांब्या, पितळेची भांडी तयार करण्याचा व्यवसाय करणारी जात, गंगेमाता ही नदीत मासेमारी करणारी व हरकांटा ही समुद्रात मासेमारी करणारी जात या जाती अंतर्भूत आहेत. ब्राह्मणांच्या पोटजातीतील बब्बूर कम्मे आणि ऋग्वेदी ब्राह्मण ही महाराष्ट्रात उगम पावलेली जात यांचा अंतर्भाव आहे. होयसला कर्नाटक, हविग याखेरीज अन्य पोटजातीही आहेत. तसेच जंगम ही लिंगायत पंथातील पुरोहिताची जात, दलित जातीतील आगेर, होलर आदि कर्नाटक व चांभाराचा व्यवसाय करणारी समगर किंवा मडिगा या जाती आहेत. अन्य जातींमधील मुक्री ही गावापासून दूर राहणारी कनिष्ठ दर्जाची जात, वाल्मिकी ही गावात रखवालदार म्हणून काम करणारी जात व शोलेगा ही जमात यांचा अंतर्भाव आहे.

या प्रकरणात वर्णन केलेल्या महाराष्ट्रातील जाती-जमातींपैकी बहुतेकांचे इरावती कर्वे यांनी मानवमिती पध्दतीने अध्ययन केले आहे. तसेच त्यांची तुलना त्यांनी स्वतः केलेल्या कर्नाटक आणि ओरिसामधील वर उल्लेख केलेल्या

जाती-जमातींच्या अध्ययनाशी केली आहे. त्याचप्रमाणे गुजरातमधील जाती-जमातींच्या डी. एन. मजुमदार यांच्या अध्ययनाशी देखील त्यांनी तुलना केली आहे. या चार प्रदेशांतील जाती-जमातीत प्रगट होत असलेली समान वांशिक लक्षणे इरावती कर्वेनी प्रकाशात आणली. या अध्ययनात डोके व नाक यांची मानवमिती पध्दतीने मापे घेतली आहेत व त्या आधारावर त्यांची वर्गवारी करुन तुलना केलेली आहे. डोक्याची लांबी व रुंदी मोजून त्यांच्या प्रतिशत प्रमाणावर आधारित असलेला निर्देशांक म्हणजे कपालांक (सिफॅलिक इंडेक्स) होय. या कपालांकावर आधारित डोक्याचे तीन प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे आहेत :- (१) लंब कपाल (dolichocephalic), (२) मध्यम कपाल (mesocephalic) आणि (३) पृथु कपाल (brachycephalic). सामान्य भाषेत हे तीन प्रकार म्हणजे लांब आकाराचे डोके व मोटया आकाराचे डोके असे आहेत. या तीन प्रकारांचा कपालांक पुढीलप्रमाणे आहे:- लंब कपाल ७७, मध्यम कपाल ७७-८२ आणि पृथु कपाल ८२. कपालांक ७७ पेक्षा कमी असल्यास त्याला अति लंब कपाल, व ८५ पेक्षा अधिक असल्यास अति पृथु कपाल म्हटले जाते. याचप्रमाणे नाकाचे तीन प्रकार पडतात. नाकाच्या लांबीच्या प्रतिशत प्रमाणातील नाकाच्या रुंदीचे प्रमाण काढल्यास आपल्याला नासिकांक (nasal index) मिळतो. नासिकांवर आधारित नाकाचे तीन प्रकार व त्यांचे नासिकांक पुढीलप्रमाणे आहेत :- अरुंद नाक (leptorrhine) - नासिकांक ५५-७०, (२) मध्यम नाक (mesorrhine) -नासिकांक ७०-८५ आणि (३) पसरट नाक (chamaerrhine) -नासिकांक ८५-१००. त्याचप्रमाणे डोक्याचा परीघ ढोबळमानाने डोक्याच्या आकारातील फरक दाखवितो. डोक्याचा परिघ ५१८.७२ मि.मी. ते ५४६.२० मि.मी. या दरम्यान असल्याचे दिसते. या मापनावर आधारित डोक्याचे दोन प्रकार पाडले आहेतः-(१) लहान परिघाचे डोके-५१८-५३२ मि.मी. (२) मोठ्या परिघाचे डोके-५३२ मि.मी. व त्याहून अधिक. ही तिन्ही परिमाणे विचारात घेता जनसमूहांची विभागणी दहा शरीर-प्रकारात करता येते. या प्रकरणाच्या शेवटी दिलेल्या तक्ता क्रमांक १ मध्ये हे दहा शरीर-प्रकार दाखविलेले आहेत व या प्रकारात चार भाषिक प्रदेशांतील जाती-जमातींचे वर्गीकरण केले आहे.

सदर तक्त्यात दिलेल्या माहितीच्या आधारावर महाराष्ट्रातील प्रमुख जनसमूहांच्या आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या वांशिक जडणघडणीची वैशिष्टये स्पष्ट करता येतील. प्रथम महाराष्ट्रातील आदिवासी जमातीच्या शारीरिक वैशिष्टयांविषयी :- लांबट डोके व पसरट नाक हे महाराष्ट्रातील आदिवासींचे वैशिष्टयपूर्ण लक्षण आहे. यामध्ये पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासी आणि पूर्व महाराष्ट्रातील आदिवासी यांच्यात फरक दिसतो. पूर्व महाराष्ट्रातील अदिवासींच्या तुलनेने पश्चिम महाराष्ट्रतील आदीवासींच्या डोक्याचा आकार लहान आहे. पश्चिम महाराष्ट्रातील आदिवासी हे वेद्दा (श्रीलंकामधील आदिवासी जमात) ऑस्टलॉईड या वांशिक गटाचे व पूर्व महाराष्ट्रातील आदिवासी प्री अथवा प्रोटो मंगोलॉइड या गटाचे प्रातिनिधिक असावेत. आदिवासींचा गट हा आदिवासी नसलेल्या गटांपेक्षा शारीरिक लक्षणांच्या दृष्टीने वेगळा असला तरी काही थोडे आदिवासी गट हे बिगर आदिवासींसारखे आहेत. त्याचप्रमाणे काही बिगर आदिवासी गट आदिवासींसारखे आहेत. तसेच वरिष्ठ जातींमध्येही काही व्यक्ती आदिवासींसारख्या असतात.

लंब कपाल गटातील मध्यम नाक व मध्यम डोक्याचा आकार असणारा मोठा जनसमूह ओरिसा आणि संपूर्ण महाराष्ट्रात दिसून येतो. यामध्ये सर्व स्तरांवरील जातींतील व जवळपास आदिवासी असलेल्या गटातील लोक अंतर्भूत होतात. या गटात जर मध्यम कपाल गटातील कमी कपालांक असलेलया लोकांचा गट मिळविला तर दक्षिण भारतातील मूलवासी लोकांचा गट तयार होतो. मध्यम कपाल गटातील जास्त कपालांक असलेल्या जनसमूहाचे वास्तव्य बहुतांशी कर्नाटक, गुजरात आणि महाराष्ट्रामध्ये किनारपट्टीवर दिसते. संख्येने थोडे असलेले पृथु कपाल जनसमूह गुजरात आणि कर्नाटकामध्ये दिसतात. महाराष्ट्राच्या लोकसंख्येतील हा घटक भारताच्या वायव्य भागातून सिंध प्रांतमार्गे महाराष्टाच्या पश्चिम किना-यावर आला असावा व येथून कर्नाटकातील पठारी प्रदेशातून कुर्गमध्ये गेला असावा. लोकसंख्येतील हा घटक पश्चिम-मध्य आशियातील पशुपालन जमातींचा असावा व "शक" या नावाने ओळखले जाणारे लोक ते हेच असावेत अशी एक शक्यता वर्तविली जाते.

पृथु कपाल लोकसमूह तीन भाषिक गटांत मोडतात. यावरुन अशी एक शक्यता दिसते की, हे स्थलांतरित समूह आधुनिक भारतीय भाषा विकसीत होण्यापूर्वी या तीन भाषिक प्रदेशांत आले असावेत व नंतर त्या त्या प्रदेशात विकसित झालेली भाषा बोलू लागले असावेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की, महाराष्ट्रातील जनता बव्हंशी ऑस्ट्रलॉईड-युरोपीय वांशिक गटातील आहे.[३०]

रक्तगट हा एक महत्वाचा आनुवंशिक जैविक घटक आहे व त्याच्या लोकसमूहातील स्वरुपावरुन त्या समूहाच्या वांशिक जडणघडणीवर अधिक प्रकाश पडू शकतो. महाराष्ट्रात "ओ" हा रक्तगट मोटया प्रमाणात आढळतो. "ओ" रक्तगटाच्या खालोखाल "बी" हा रक्तगट येथील जनतेत आढळतो. सर्वात कमी प्रमाण म्हणजे २० टक्के लोक "ए" रक्तगटाचे आहेत. "ए" हा रक्तगट आधुनिक कालखंडात पश्चिम युरोपीय राष्ट्रांत मोठ्या प्रमाणांत दिसतो. तसेच

या रक्तगटाचे अस्तित्व ऑस्ट्रेलियामधील आदिवासी सादृश काही आदिवासी गटांतही दिसते. भारतामध्ये "बी" रक्तगट अधिक प्रमाणात आढळतो. "ओ" रक्तगट दक्षिण भारतातील आदिवासी जमातींत अधिक प्रमाणात आढळतो. रक्तगटाच्या अध्ययनाव्दारा महाराष्ट्राच्या लोकसमूहाची जडणघडण कशी झाली आहे याविषयी निश्चित विधान करणे अध्ययन सामग्रीतील अपूर्णतेमुळे शक्य दिसत नाही. एकूण असे म्हणता येईल की, शारीरिकदृष्टया महाराष्ट्रातील लोकसमूहांचे स्थान उत्तर आणि दक्षिण भारत यांच्यामध्ये आहे.

सांस्कृतिकदृष्टया महाराष्ट्रातील जाती-जमातीत विविधतेमध्ये एकता दिसून येते. सीमावर्ती प्रदेशांतून ज्या जाती महाराष्ट्रात स्थलांतरित झाल्या त्यांनी आपल्या सांस्कृतिक परंपरा अद्याप जपून ठेवल्याचे दिसते. परंतु हे करीत असताना एतद्देशीय जातिसमूहाच्या धार्मिक-सांस्कृतिक चालीरीतींचाही त्यांनी स्विकार केल्याचे दिसते. या संदर्भात देवक प्रथा, आते-मामे भावंडांच्या विवाहाची प्रथा आणि खंडोबा, महादेव व देवी या हिंदू देवतांच्या उपासनेची प्रथा यांचा उल्लेख करता येईल. महाराष्ट्रातील बहुतांश जातींमध्ये या प्रथा अस्तित्वात असल्याचे दिसते. त्याचप्रमाणे मराठी भाषेचा अंगिकार हाही विविध जाती व जमातींचे प्रादेशिक पातळीवर ऐक्य दृढतर करण्यातील एक महत्वाचा घटक आहे. या सर्वांमुळे महाराष्ट्रातील विविध जातीत परस्परात सांस्कृतिक भेद असूनसुध्दा त्यांच्यात प्रादेशिक एकात्मता दिसून येते. हे ऐक्य प्रस्थापित करण्यात मराठा-कुणबी या जाती गटाने महत्त्वपूर्ण ऐतिहासिक कामगिरी बजावल्याचे दिसते. ग्रामीण समाज व्यवस्थेतील कुणबी-मराठा जातीच्या महत्त्वपूर्ण आणि मध्यवर्ती स्थानामुळे या गटाच्या सामाजिक व सांस्कृतिक परंपरांचा प्रभाव समाजातील अन्य जातींवर पडल्याचेही दिसते.[३१]

तक्ता क्रमांक -१

चार भाषिक प्रदेशांतील जाती जमातींचे शरीरप्रकारानुसार वर्गीकरण

शरीरप्रकार	गुजरात	ओरिसा	कर्नाटक	महाराष्ट्र
(१)	(२)	(३)	(४)	(५)
गट-अ : लंब कपाल (कपालांक :७७)				
उपगट १: मध्यम नाक(नासिकांक:७०-८५) लहान परिघाचे डोके(५१८-५३२)	भिल्ल, भंगी, भिल्ल व इतर.	--	वाल्मिकी, मुक्री.	महार, बावने, कोहळी, खैरे, आगरी, गोंड, गोवारी, माना, धीवर, वारली.
उपगट २ : पसरट नाक (नासिकांक : ८०+) लहान परिघाचे डोके(५१८-५३२)	--	ओरान (उराव).	जेनू कुरुबा, बेट्टे करुबा,शोलेगा, मुक्री.	भिल्ल, महादेव कोळी, वारली, कातकरी, हलबी, माना, धीवर, गोंड, गोवारी.
उपगट ३ : पसरट नाक (नासिकांक :८०+) मोठ्या परिघाचे डोके (५३२+)	--	बिंझाल, कोया,उत्तरी, भुईया, बोंडो, पोर्जा, खोंड, कुलटा, खंडायत, कुंहार (कुंभार), गोंड, सावरा, डोरा, जुआंग, भात्रा, मोंदा, गदबा, खारीया, पोर्जा.	आगेर, हलक्की वोक्कल.	--
उपगट ४ : मध्यम नाक विविध गट. (नासिकांक : ७०-८५) मोठ्या परिघाचे डोके (५३२+)		मेहेर, अगारिया, करण, अरण्यक,ब्राह्मण, खोंड, खंडायत, कुंहार (कुंभार)	नडवरा बुंट, हल्लकी वोक्कल.	लेवा, गुजर, पोवार, क-हाडे, ब्राह्मण, कोळी,

Maharashtra State Gazetteers

गट-ब मध्यम कपाल (कपालांक : ७०-७९.४).				
उपगट १ : मध्यम नाक (नासिकांक :७०-८५) लहान परिघाचे डोके (५१८-५३२)	कोळी	भंगी	अगासा, समगर, होलर, गंगेमाता	चरक यजुर्वेदी, अहीर सोनार, शिंपी, चांभार, धनगर खुटेकर, बंजारा, वंजारी, भावसार, मांग, नावी, बारी, गोलाईत, ठाकूर, तडवी भिल्ल, तेली, सोनार, आंध
उपगट २ : मध्यम ते पसरट नाक (ना.७९.५-९१) लहान परिघाचे डोके (५१८-५३२)	--	भंगी	गंगेमाता, होलर.	सोनार, तेली, तडवी भिल्ल, मचवी भिल्ल (मानवी भिल्ल), ठाकूर, कोरकू, आंध, चांभार
उपगट ३: मध्यम ते पसरट नाक. (ना.७९.५-९१) मोठ्या परिघाचे डोके (५३२+)	--	केवट (keut), भुइया, पानो किंवा पाना.	आदिकर्नाटका.	महार, कोष्टी, धनोजे (danoje).
उपगट ४ : मध्यम नाक (ना. ७०-८५) मोटया परिघाचे डोके (५३२+)	मच्छी खरवा, वाघेर, कुणबी, पाटीदार, औदिच ब्राम्हण, लुहाणा, मेहेर, आर्टिसन, विविध गट	सामवेदी, ग्वाला, वैष्णव, पानो किंवा पाना.	हरकांत्रा, हट्टीकंकण, कुरुबा, कुडावक्कलिगा, बोगार, साळी, पांचाल सोनार, ऋग्वेदी, जंगम, बबूरकम्मे, गणिगा, होयसला (Hoyasal), बानाजिगा, नामधारी, इतर ब्राह्मण.	भावसार, माळी, माध्यंदिन ब्राह्मण, मराठा, तिलोरे, वाडवळ, सोमवंशी, ऋग्वेदी ब्राह्मण, हटकर धनगर, चां. का. प्रभु, चित्पावन, वैश्य वाणी, त्वष्टा कासार, सारस्वत, धनोजे, कोष्टी, महार, चरक यजुर्वेदी
गट-क : मध्यम ते पृथु कपाल (कपालांक : ७९.४-८२)				
उपगट १: मध्यम नाक (नासिकांक ७०-८५) लहान परिघाचे डोके (५१८-५३२)	--	--	पालेगर, पट्टसाळी, गौडा.	परीट, साळी, गुरव
उपगट २ : मध्यम नाक (नासिकांक ७०-८५) मोठ्या परिघाचे डोके (५३२+)	ओसवाल जैन, रबारी, मियाना, सुन्नी, बोरा, नागर, ब्राह्मण, खोजा, भाडेला, भाटिया.	--	गंगादिकारा, देवांग, कुरुबा, वुंचितिगा, हविग्, सदारु, कोडुगू	बुरुड, भंडारी, सोनकोळी, दैवज्ञ, सोनार, पाठारे क्षत्रिय, खत्री, पाठारे प्रभू

Maharashtra State Gazetteers

तळटिपा

[१] जी. एस. घुर्ये, **कास्ट ॲण्ड रेस इन इंडिया,** ५ वी आवृत्ती, मुंबई, १९६९.

[२] योगेश अटल, **आदिवासी भारत,** राजकमल प्रकाशन, १९६५.

[३] इरावती कर्वे ॲण्ड व्ही. एम. दांडेकर, **अँथ्रॉपॅमेट्रीक मेजरमेंटस् ऑफ महाराष्ट्र,** पुणे, १९५१.

[४] **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ, २२५-२७, यात अधिक माहिती दिलेली आहे.

[५] कित्ता. पृ, २३७-४०.

[६] सरोजिनी बाबर, **आदिवासींचे सण-उत्वस,** पृ. ४८.

[७] **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ, १४०-४४, यात अधिक माहिती दिलेली आहे.

[८] १९८१ च्या जनगणनेत सोनकोळींची संख्या समाविष्ट झाली असल्याने महादेव कोळींच्या संख्येत वाढ दिसते.

[९] **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृष्ठ १३६-३९, सर्वेक्षणावर आधारित अधिक माहिती या ग्रंथात दिलेली आहे. (२३ नोव्हेंबर १९९४ रोजी नागपूरात ११४ गोवारी बळी पडले.)

[१०] कित्ता, पृ.१४५-४८.

[११] रायगड **गॅझेटिअर,** १९९३, पृ. २२२-२५, यात अधिक माहिती दिलेली आहे.

[१२] अधिक माहितीसाठी **कोल्हापूर गॅझेटिअर** १९८९, पृ, १६६-६७; **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ. २४४-४६; **वर्धा गॅझेटिअर** १९९२, पृ, १५५-५६ पहावे.

[१३] रायगड **गॅझेटिअर,** १९९३, पृ. २४०-४३ पहावे.

[१४] वर्धा **गॅझेटिअर,** १९९२, पृ. १३३-३५.

[१५] रायगड **गॅझेटिअर,** १९९३, पृ. २१७-१९.

[१६] कित्ता, पृ, २२०-२१.

[१७] कित्ता, पृ. २२१.

[१८] सईद सिराज-उल हसन, **दि कास्ट ॲंड ट्राइब्स ऑफ एच. इ.एच.दि नायझाम्स डोमिनियन,** पृ ६०.

[१९] पंधराव्या ते सतराव्या शतकांमध्ये गुजरातमध्ये सुलतानांचा अंमल असताना अनेक भिल्लांनी इस्लाम धर्म स्वीकारला. खानदेशात त्यांना तडवी भिल्ल असे नाव आहे. भोकरदन तालुक्यातील तडवी हे औरंगजेबाच्या कारकिर्दीतील (१६५८-१७०७) मुसलमान सैनिक व भिल्ल महिलांचे वंशज असावेत.

[२०] क्रिमिनल **क्लासेस इन दि बॉम्बे प्रेसिडेन्सी,** या अहवालात पावरा व डांगची जमातीचा डोंगराळ भिल्लांमध्ये समावेश केला आहे.

[२१] या टिकाणी शत्रूशी लढतांना हनमंत नाईक हुतात्मा झाला.

[२२] जळगाव **गॅझेटिअर**, १९९४, पृ. २०३ ते २०९ यात अधिक माहिती दिलेली आहे.

[२३] भारतीय **संस्कृतिकोश**, खंड ६, पृ. ३४५-४७; **मुंबई इलाख्यात जाती** गो. म. कालेलकर, पृ. १७७.

[२४] "मराठा" हा शब्द इतिहासाच्या दृष्टीने जातिवाचक नसून त्यात महाराष्ट्रातील मराठी भाषिकांचा प्रामुख्याने समावेश होतो. मराठयांचा सर्व प्रथम उल्लेख इ.स.पू.१०० मधील नाणेघाटातील उत्कीर्ण लेखात आढळतो.

[२५] लेवा पाटीदार तथा लेवा कुणबी यांची माहिती स्वतंत्रपणे दिली आहे.

Maharashtra State Gazetteers

[२६] बंजारा लोक परंपरेने तांडयाने एका ठिकाणावरुन दुसरीकडे वस्ती करणारे असून विमुक्त व भटक्या जमातीत मोडतात. वंजारी हे स्थायिक असून कुणब्यांसारखे असतात व शेती करतात. वंजारी व बंजारा हे एकच आहेत किंवा कसे यासाठी शासनाने खास समितीची नियुक्ती केलेली असून याबाबतचा निर्णय न्यायालयाधीन आहे.

[२७] रिपोर्ट **ऑफ ऑल इंडिया बंजारा स्टडी टीम,** १९६७.

[२८] वर्धा **गॅझेटिअर,** १९९२, पृ.१३५.

[२९] आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, तुलनादर्शक यादी. २४ एप्रील १९८५ चा शा. नि., पृ. ३२.

[३०] महाराष्ट्र **स्टेट गॅझेटिअर : महाराष्ट : लॅंड ॲंड इटस पीपल, महाराष्ट शासन,** मुंबई, १९६८, पृ. १२-१४, ४७-५२ अधिक माहितीसाठी पहावे.

[३१] कित्ता, पृ. ५२-५४ मध्ये अधिक माहिती दिलेली आहे.

Maharashtra State Gazetteers

प्रकारण ३ : महाराष्ट्राचे सांस्कृतिक उपविभाग

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि. ना. वाळुंजकर यांनी केले आहे.)

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या जडणघडणीत त्याच्या प्रादेशिक उप-विभागांची महत्वपूर्ण भूमिका आहे. हे सांस्कृतिक उप-विभाग पर्वत, नद्या, वनराई, जमिनीचा प्रकार, पावसाचे प्रमाण इत्यादी भौतिक घटकांनी घडविलेल्या नैसर्गिक विभागांच्या पायावर निर्माण झाले आहेत. सहयाद्री पर्वताने पश्चिम महाराष्ट्राची विभागणी कोकण आणि देश या स्थूल नैसर्गिक विभागांत केलेली आहे. देश प्रदेशाच्या भूमीमधून वाहणा-या तापी, वैनगंगा, गोदावरी आणि कृष्णा या नद्यांनी चार खो-यांचे प्रदेश निर्मिले आहेत. अशा त-हेने महाराष्ट्राचे कोकण, तापी-पूर्णा खोरे, वर्धा-वैनगंगा खोरे, गोदावरी-प्रवरा खोरे आणि कृष्णा खोरे असे प्रमुख पाच नैसर्गिक विभाग आहेत. या नैसर्गिक विभागांत उपलब्ध असलेल्या निसर्ग संपदेच्या पायावर महाराष्ट्रातील जनजीवन विकसित झाले व त्यातून प्रत्येक विभागाने आपापली सामाजिक व सांस्कृतिक विशेषता निर्माण केली व जोपासली. या उप-विभागांतील संस्कृतीच्या देवाण-घेवाणीतून महाराष्ट्राची संस्कृती तयार झाली. या उप-विभागांच्या संस्कृतींचा विकास कसा होत गेला व त्यांच्या योगदानातून महाराष्ट्राच्या संस्कृतीची जडणघडण कशी झाली याचा थोडक्यात ऐतिहासिक आढावा घेणे उद्‌बोधक ठरेल.

इतर सजीव प्राण्यांच्या तुलनेने मानवी जीवनात सहजप्रवृत्तींचे (इन्स्टिंक्ट) स्थान गौण आहे. मानवाला ग्रहणशक्तीचे मोठे वरदान मिळाले आहे. या नैसर्गिक देणगीतूनच संस्कृतीचा जन्म झाला. खाणे, पिणे, चालणे, प्रजोत्पादन, बालसंगोपन, स्वसंरक्षण या सर्व गोष्टी कशा करावयाच्या हे मानवाला शिकावे लागते. ही शिक्षणाची प्रक्रिया कुटुंब, समूह, मित्रमंडळी, शाळा इत्यादी विविध प्रकारच्या अनौपचारिक व औपचारिक गटांतून होत असते. अशा त-हेने मानवाला ग्रहणशक्तीव्दारा प्राप्त होणा-या सर्व बाबींना संस्कृती या नावाने ओळखले जाते. यात नीति-नियम, रूढी, धर्म, कला, ज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी सर्व गोष्टींचा समावेश होतो. संस्कृती ही सामूहिक जीवनाच्या प्रक्रियेतून निर्माण होते व तिचे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरण होते. मानवाचे प्राथमिक अवस्थेतील सामाजिक जीवन हे टोळी-प्रधान होते व या अवस्थेत प्रामुख्याने शिकार करणे, फळफळावळ गोळा करणे या क्रियांवर ते निर्भर होते. कालांतराने शेती करण्याच्या पध्दतीचा शोध लागला व त्यातून कृषी संस्कृतीचा उदय होऊन मानव खेडी निर्माण करून त्यामध्ये स्थिर जीवन जगू लागला. कृषी तंत्र जसजसे प्रगत होऊ लागले तसतसे शेतीचे उत्पादन वाढून ते शिल्लक राहू लागले. यातून शेती खेरीज व्यापार व अन्य व्यवसाय करणा-या लोकांचा वर्ग तयार होऊ लागला, नगरे अस्तित्वात आली आणि राजकीय संस्था जन्मास आल्या. काही खेडयांचे मिळून प्रादेशिक गट निर्माण झाले व त्यात राजसत्तेचा उदय झाला. हळूहळू राष्ट्र व साम्राज्य या संकल्पना उदयास आल्या. दळणवळणांच्या साधनांचा या काळात विकास न झाल्यामुळे अशा प्रादेशिक गटांच्या वाढीवर डोंगर, नद्या, अरण्य यांसारख्या भौगोलिक घटकांनी मर्यादा घातल्या. अशा प्रदेशातील जनतेचे समाज जीवन हे बहुतांशी आपल्या खेडयात व काही प्रमाणात परिसरातील नगरात उपलब्ध असलेल्या सेवा संस्थांवर निर्भर असे. अशा प्रादेशिक समूहातील जनतेच्या सामाजिक आंतरक्रियेतून प्रादेशिक संस्कृतीचा उदय झाला.

महाराष्ट्राच्या भूमीवर कृषिप्रधान संस्कृतीचा जन्म ताम्रपाषाणयुगात (इ. स. पूर्व २५०० ते इ.स. पूर्व १०००) झाला व नागरी जीवनाची सुरुवात इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या पूर्वीच झाली. या प्राचीन कालखंडातील नगरे ही ग्रामीण समाजाभिमुख होती. ग्रामीण जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजांची पूर्ती करणारे कारागीर, कलाकार व तज्ञ लोकांचे गट अशा नगरात वस्ती करून राहत असत. त्याचप्रमाणे प्रादेशिक पातळीवर सामाजिक व राजकीय नियंत्रण ठेवणा-या शासनकर्त्या शिष्टजनांची अशा नगरांत वस्ती असे. या शासनकर्त्या गटांना जीवनाच्या विविध गरजा पुरविण्यासाठी अधिकाधिक संपत्तीची गरज असे. ही गरज भागविण्यासाठी आपल्या आधिपत्याखालील जनतेवर विविध कर बसविणे व त्यातून मिळणारे उत्पन्न अपुरे वाटू लागल्यास नवीन प्रदेश आपल्या अंमलाखाली आणणे हे मार्ग चोखाळावे लागत असत. या राज्यविस्ताराच्या प्रक्रियेतून निरनिराळया प्रादेशिक गटांच्या संस्कृतीचे एकमेकात अभिसरण होण्याच्या प्रक्रियेला चालना मिळत असे. अशा त-हेने विस्तृत झालेल्या प्रदेशाचे राजकीयदृष्टया नियंत्रण करण्याच्या उद्‌देशातून राज्यकर्त्यांनी निर्माण केलेले विविध आकाराचे प्रादेशिक शासकीय गट अस्तित्वात आले. असे शासकीय गट निसर्गनिर्मित प्रादेशिक शासकीय गटांच्या स्वरूपांशी मिळते जुळते असत. शासनकर्ता वर्ग स्थानिक जनतेपेक्षा सामाजिक व सांस्कृतिकदृष्टया भिन्न प्रदेशातील असल्यास स्थानिक लोकांच्या जनसंस्कृतीचा संपर्क शासनकर्त्यांच्या शिष्टजन संस्कृतिशी येऊन त्यातून संमिश्र संस्कृति अस्तिवात येत असे. या दृष्टीने प्रादेशिक संस्कृतीच्या विकासामध्ये शासनकर्ते व प्रजाजन यांच्यामधील ऐतिहासिक काळात झालेल्या राजकीय प्रक्रीयेची व

सांस्कृतिक देवाणघेवाणीची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या दृष्टिकोनातून महाराष्ट्राच्या भूमीवर विविध शासनकर्त्यांनी त्यांच्या आधिपत्याखाली असलेल्या प्रदेशाच्या शासन व्यवस्थेचे विविध प्रादेशिक घटक कोणते होते याचा ऐतिहासिक आढावा पुढील परिच्छेदांत घेतला आहे.

प्रादेशिक गटांच्या विकासाचा ऐतिहासिक आढावा

प्राचीन काळी महाराष्ट्राच्या मूळ रहिवासी नसलेल्या जनतेच्या सामाजिक जाणिवेमध्ये महाराष्ट्राचा भूभाग कसा साकार होत गेला याचा विचार करण्यासाठी आपणास **ऋग्वेद** काळात जावे लागते. ऋग्वेदामध्ये भारताच्या दक्षिणेकडील भागात दक्षिणापथ ही संज्ञा वापरली आहे. या काळात आर्यांचा दक्षिण भारताशी फारसा संपर्क नसल्यामुळे बहुधा या प्रदेशाचा उल्लेख दक्षिणापथ म्हणजे दक्षिणेकडील प्रदेश या सर्वसमावेशक नावाने केला असावा. पुराण वाङ्मयात (इ. स. पूर्व ६०० ते इ. स. ३००) महाराष्ट्रातील काही प्रादेशिक विभागांचा निरनिराळ्या संदर्भात उल्लेख आल्याचे आढळते. **रामायणात** महाराष्ट्राचा उल्लेख दण्डकारण्य असा केलेला आहे. **महाभारतात** विदर्भ, अश्मक, अपरान्त व कोकण या महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागांचा उल्लेख येतो. तसेच अगस्ती ऋषीने विदर्भातील राजकन्या लोपमुद्रा हिच्याशी विवाह करून महाराष्ट्रात आर्यांची वसाहत केल्याचा उल्लेख आहे.[१] इंदुमती, दमयंती व रुक्मिणी या विदर्भ राजकन्यांचे विवावही उत्तर भारतातील राजपुत्रांशी झाल्याचे पुराणात वर्णन आहे. थोडक्यात या प्राचीन कालखंडात वसाहतीसाठी योग्य प्रदेश अशा दृष्टिकोनातून उत्तर भारतातील राजघराणी व शिष्टजन महाराष्ट्राकडे पहात होते व या उद्देशाने महाराष्ट्राच्या विविध भागांशी राजकीय संबंध प्रस्थापित करीत होते अथवा आपल्या आधिपत्याखाली आणण्यासाठी प्रयत्नशील होते.

सम्राट अशोक मौर्य राजाने बौध्द धर्माच्या प्रसारासाठी अपरान्त म्हणजे कोकणात धर्मप्रचारक पाठविल्याचे सोपारा व देवटेक येथील अशोकाच्या धर्म महामात्राच्या शिलालेखांमधील उल्लेखावरून दिसते. मौर्य सम्राटांच्या आधी नंद राजांचीही राजवट महाराष्ट्राच्या गोदावरी काठच्या काही प्रदेशावर असावी असे काही इतिहासकारांनी केलेल्या दाव्यावरून वाटते. नवनंद डेरा हा भाग नंदांच्या राज्यामध्ये असून तो नांदेडजवळ असावा असे काही इतिहासकार सांगतात. शिलालेखातील उल्लेखावरून नंदांचे राज्य कुंतल देशावर म्हणजे दक्षिण महाराष्ट्राचा काही भाग व उत्तर कर्नाटकाचा भाग यावर होते असे दिसते.[२]

सम्राट अशोकाच्या साम्राज्याची विभागणी उत्तरापथ, अवंतीरथ्थ, दक्षिणापथ, कलिंग आणि प्राच्य अशा पाच प्रांतांमध्ये अथवा राष्ट्रामध्ये झाली होती व त्यातील दक्षिणापथाची राजधानी सुवर्ण नगरी ही होती असे उपलब्ध पुरावे दर्शवितात. अपरान्त म्हणजे कोकणच्या उल्लेखाखेरीज महाराष्ट्रातील इतर प्रदेशाचा उल्लेख या काळच्या शिलालेखांत येत नाही. कोकणचे त्या काळातील सागरी व्यापारातील स्थान लक्षात घेऊन अशोकाने या प्रदेशाशी दृढ संबंध जोडले असावेत. या कालखंडात बौध्द धर्माचा प्रसार महाराष्ट्राच्या विविध भागांत मोठया प्रमाणावर झाल्याचे महाराष्ट्रातील बौध्द लेणींवरून दिसते. ज्ञात असलेल्या १२०० बौध्द लेणींपैकी जवळपास ८०० लेणी महाराष्टात आहेत.[३] या काळातील पाटलीपुत्र, उज्जैनी, भरुकच्छ, शुरपारक, प्रतिष्ठान आणि तगर या नगरांना जोडणा-या सुप्रसिध्द व्यापारी मार्गामुळे महाराष्ट्रातील सांस्कृतिक संपर्क उत्तर भारताशी आला, तसेच काही प्रमाणात आर्थिक सुबत्ताही निर्माण झाली. उत्तर हिंदुस्थानात राजकीय उलथापालथ या काळात होत होती त्याचा राजकीय प्रभाव महाराष्ट्राच्या काही भागांवर या काळापासून पडत असल्याचे दिसून येते. मौर्याचा पाडाव करून शुंग घराण्याने आपल्या आधिपत्याखाली उत्तर हिंदुस्थानातील प्रदेशच आणला असे नसून महाराष्ट्रातील विदर्भावर आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला हे कालिदासाच्या **मालविकाग्निमित्रम्** या संस्कृत नाटकावरून दिसते.

सातवाहनांनी (इ. स. पूर्व २३० ते इ. स. २३०) दख्ख्नमध्ये प्रभावी राजवट स्थापन केली. सातवाहन राजे स्वतःला "त्रिसमुद्रतोयपतिवाहन" म्हणजे ज्यांच्या अश्वांनी तिन्ही समुद्राचे पाणी चाखले आहे असे म्हणत असत. त्यामुळे ते सकल दक्षिणापंथाचे अधिपती होते असे म्हणता येईल. इसवी सनाच्या पहिल्या शतकातील सातवाहन राजा हाल याने संकलित केलेला माहाराष्ट्री प्राकृत भाषेतील **गाथासप्तशती** हा काव्यसंग्रह सातवाहनांकडून माहाराष्ट्री प्राकृत भाषेला मिळालेला एक अमोल ठेवा असून महाराष्ट्राच्या मानवी जीवनाचे यथार्थ व मोहक वर्णन करणारे एक ऐतिहासिक साधन आहे. यातून तत्कालीन सागरी व्यापार, नाविक हालचाली, बौध्द भिक्षु व हिंदू पुरोहित यांचा ढोंगीपणा, लोकप्रिय सण इत्यादीबाबत माहिती देऊन समाज जीवनाचे वर्णन केलेले आहे. परंपरागत जनजीवनाबाबतही त्यात वर्णन केलेले आहे. या काळातील वासिष्ठपुत्र पुळुमावीच्या नाशिक येथील शिलालेखात ज्या प्रदेशाचा उल्लेख आहे त्यात असिक (कृष्णा खो-याचा मध्यवर्ती भाग), मूलक (पैठणच्या भोवतालचा प्रदेश), असक (गोदावरीचा मध्यवर्ती भाग) आणि अपरान्त

(उत्तर कोकण) हे प्रदेश समाविष्ट आहेत. याखेरीज मामलहार म्हणजे मावळ आणि सोपारकाहर (ठाणे जिल्हा) यांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे काही नगरांचाही या काळातील शिलालेखात आणि वाङ्मयात उल्लेख मिळतो. या नगरांमध्ये भोगवर्धन (भोकरदन), पतित्थान (प्रतिष्ठान, पैठण), करहाटक (कराड), शूरपारक (सोपारा), कल्लिएना (कल्याण), कृष्णागिरी (कान्हेरी), चेमूल (चौल) ही नगरे समाविष्ट आहेत.[४] लोकभाषेला या काळात योग्य ते स्थान मिळत होते हे पतित्थान या प्रतिष्ठान प्राकृत रूपावरून दिसते. या कालखंडातील शासनकर्त्यांची सांस्कृतिक नाळ एतद्देशियांशी जुळणारी असावी असे या शिलालेखातील प्राकृत शब्दांच्या वापरावरून दिसते. या काळात महाराष्ट्राच्या विविध भागात व्यापारानिमित्ताने स्थायिक झालेल्या यवनांचे येथील प्रादेशिक समाजास समावेशन होऊ लागले होते हे विविध बौध्दधर्मीय स्थळांना देणगी देणा-या यवन देणगीदारांच्या चंद्र, चिते, धम्म, इंद्राग्निदत्त, सिंहध्वज या नावांवरून दिसते. थोडक्यात या कालखंडात महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील स्थानिक जनतेची संस्कृती शासनकर्त्या व व्यापार उदीम करणा-या शिष्टजनांच्या सांस्कृतिक परंपरेच्या संपर्कात येत होती.

सातवाहनांच्या राजवटीनंतर महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक विकासात ज्या राजवटींनी योगदान केले त्यात वाकाटक राजवटीचे महत्त्वाचे स्थान आहे. ही राजवट इ. स. २५० ते ५५० पर्यंत अस्तित्वात होती. प्रारंभी यांची राजधानी नगरधन तथा नंदिवर्धन (रामटेक जवळ) येथे असून नंतर प्रवरपूर (पवनार) येथे स्थलांतरित झाली. पवनार आश्रम परिसरात बरेच अवशेष मिळाले आहेत. त्यांचा राज्यविस्तार उत्तरेस माळव्यापासून दक्षिणेस वुंâतल देशापर्यंत आणि पश्चिमेस कोकणपासून पूर्वेस आंध्र प्रदेशापर्यंत होता. अजिंठयाचे सोळा क्रमांकाचे लेणे हरिषेणचा मंत्री वाहदेव याने करविले. वाकाटक हे वैदिक धर्मीय ब्राह्मण राज्यकर्ते होते. वाकाटकांच्या उत्तरकाळात या राजघराण्याचे विभाजन होऊन एक शाखा वत्सगुल्म म्हणजे आताच्या वाशिम येथून राज्य करीत होती.

वाकाटक घराण्यानंतर इ. स. ६ व्या शतकात बदामीच्या चालुक्यांची राजवट येण्यापूर्वी काही लहान राजधराण्यांनी महाराष्ट्राच्या विविध भागांवर राज्य केले. त्यात अभीर, वल्ख, त्रैकूटक व राष्टकूट या राजवटींचा समावेश होतो. राष्ट्रकूटांची राजवट महाराष्ट्रातील प्रादेशिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होती. राष्टकूटांचे राज्य दक्षिण व मध्य गुजरात, मध्यप्रदेशाचा मराठी भाषिक प्रदेश, संपूर्ण महाराष्ट्र, कर्नाटक, हैद्राबाद आणि म्हैसूर संस्थान आणि मद्रास प्रांताच्या म्हणजे तामीळनाडूच्या काही भागावर पसरलेले असावे. प्रशासनाच्या दृष्टीने मंडल, देश, नाड, राष्ट विषय, भुक्ती आणि शेवटी ग्राम असे आकाराने लहान होत जाणारे प्रादेशिक घटक होते. महाराष्ट्रातील ज्या विषयी या प्रादेशिक गटांचा उल्लेख शिलालेख, ताम्रपट इत्यादी पुराभिलेखात येतात त्यामध्ये अचलपूर (एलिचपूर), अलकटक (कोल्हापूर संस्थानातील आळता), बहुल (बहुलावाड, पाचोरा तालुका), करहाटक (कराड), कोळी-महार (कोळी आणि महार यांच्या वसाहती), मुरूंबा (अकोला जिल्हयातील मुरूंबी), नागपूर नंदिवर्धन (नागपूर आणि वर्धा तहसील मधील नांदोरा) आणि पुनक (पुणे) हे विषय समाविष्ट आहेत.[५]

कर्नाटकातील बदामीच्या चालुक्यांची महाराष्ट्रावर २०० वर्षे राजवट होती. बेल्लारी जवळील बदामी हे त्यांच्या राजधानीचे ठिकाण. बागलकोट (विजापूर) जिल्हयातील ऐहोळे येथिल शिलालेखात या घराण्यातील दुस-या पुलकेशीचा उल्लेख ९९,००० गावे असलेल्या तीन महाराष्ट्रांचा स्वामी असा केला आहे. या काळातील शिलालेखात क-हाटक आणि मिरिंज (मिरज) या महाराष्ट्रातील दोन प्रादेशिक घटकांचा उल्लेख आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासाच्या प्राचीन कालखंडाचा शेवट यादव घराण्याच्या कारकिर्दीने झाला. या घराण्याने प्रारंभी मांडलिक राजे म्हणून आणि नंतर सम्राट म्हणून १२९६ पर्यंत महाराष्ट्रावर राज्य केले. महाराष्ट्राची सांस्कृतिक अस्मिता यादवांच्या राजवटीत आकारास आली. यादवांचे साम्राज्य मध्यप्रदेशचा दक्षिणेकडील भाग, व-हाड, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, कर्नाटक, हैदराबाद आणि म्हैसूर संस्थानातील काही भाग, बेल्लारी, अनंतपूर आणि कुर्नुल जिल्हे वगैरे भागावर पसरले होते. देश हा प्रशासन व्यवस्थेचा महत्त्वाचा घटक होता. महाराष्ट्रातील ज्या सहा देशांचा समावेश यादवांच्या साम्राज्यात झाला ते पुढीलप्रमाणे होते :-

(१) **कान्हेरी देश** :- या विभागात चाळीसगाव तालुका, औरंगाबाद आणि बीड जिल्हे यांचा समावेश होता.

(२) **क-हाड देश** :- यात क-हाड, विटे आणि तासगाव हे सातारा जिल्हयाचे तालुके तसेच मिरज आणि सांगली ही संस्थाने आणि बेळगाव जिल्हयातील अथणी तालुका यांचा समावेश होता.

(३) **कोल्हापूर देश** :- कोल्हापूर भोवतालचा परिसर यात समाविष्ट होता.

(४) **माण देश** :- सातारा जिल्हयातील माण नदीच्या भोवतालचा परिसर यात समाविष्ट होता.

(५) **मिरिंज देश** :- मिरज आणि करुंदवाड संस्थाने यात समाविष्ट होती.

(६) **सेऊण देश** :- यात अहमदनगर जिल्हयाचा उत्तरेकडील भाग, नाशिक जिल्हयातील सिन्नर तालुका, खानदेशचा बराच भाग आणि औरंगाबाद जिल्हयाचा पश्चिमेकडील भाग यांचा समावेश होता.

Maharashtra State Gazetteers

देवगिरी म्हणजे आजचे दौलताबाद ही यादवांची राजधानी. यादवांनी आपल्या राजवटीची सुरुवात चालुक्य आणि कलचुरींचे मांडलिक राजे म्हणून सेऊण देशावर राज्य प्रस्थापित करून केली. महाराष्ट्राच्या पठारी भागावर ज्यावेळी यादवांचे राज्य प्रस्थापित होण्याच्या मार्गावर होते त्या कालखंडात उत्तर आणि दक्षिण कोकणावर शिलाहारांची राजवट होती. उत्तर कोकण राज्यात ठाणे, कुलाबा, रत्नागिरीचा काही भाग आणि साष्टी (सालसेट) बेट यांचा अंतर्भाव होता. हे प्रदेश पुरी कोकण मंडलात समाविष्ट झाले होते. आधीच्या राजवटीवरून शिलाहारांनी आपली प्रशासन व्यवस्था तयार केली होती हे या व्यवस्थेत असलेल्या मंडळ, देश, विषय आणि ग्राम या घटकांवरून स्पष्ट होते. पुरी कोकण मंडलात पुढील विषय समाविष्ट झाले होते:-

(१) **चिखलदा विषय** :- पश्चिम कुलाबा जिल्हा.

(२) **महिरीहर विषय** :- भिवंडी आणि मुरबाड तालुक्यांचे भाग.

(३) **पणद विषय** :- पेण तालुका.

(४) **सातसाठी विषय** :- साष्टी (सालसेट) बेट.

कोल्हापूरच्या शिलाहारांच्या राज्यात कोल्हापूर, कुरुंदवाड आणि मिरज संस्थाने तसेच बेळगाव आणि सातारा जिल्हयाचा काही भाग समाविष्ट होता. देश, नाड, विषय आणि कंपन हे त्यांच्या प्रशासन व्यवस्थेचे घटक होते.

आतापर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासाच्या प्राचीन कालखंडात विविध राजवटींनी जे प्रशासकीय विभाग पाडले होते त्यांचा आढावा घेतला. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, या कालखंडात विविध प्रादेशिक गट अस्तित्वात असून त्यांची संख्या अर्वाचीन काळातील गटांच्या तुलनेने अधिक होती. याचे प्रमुख कारण म्हणजे प्राचीन काळात वाहतूक साधनांच्या अभावी तसेच नदी, नाले, डोंगर, पर्वत अशा नैसर्गिक अडथळयांमुळे जनतेच्या दळणवळणावर पडलेल्या मर्यादा हे होय. निसर्गाने निर्माण केलेल्या डोंगर, पर्वत, नद्या इत्यादी बाबींचा प्रशासकीय घटकांच्या निर्मितीवर प्रभाव पडला होता. देशावर दोन नद्यांमधील प्रदेशाला प्रशासकीय घटक म्हणून मान्यता देण्यात येते असे. याचे उदाहरण म्हणजे कृष्णा आणि वारणा या दोन नद्यांमधील प्रदेशाला करहाट विषय म्हणून मान्यता देण्यात आली होती.[६]

यादवांच्या अस्तानंतर महाराष्ट्रावर मुसलमानी राजवटींचा अंमल सुरू झाला. इ.स. १३४७ साली बहमनी राजवटीचा उदय झाला आणि १४८९ पासून १५१० या कालावधीत तिचा अस्त होऊन तिची पाच शकले होऊन अहमदनगरच्या निजामशाहीची सत्ता महाराष्टाच्या मोठया भागावर प्रस्थापित झाली. निजामशाही राजवट महाराष्ट्राच्या काही भागावर १५९६ पर्यंत टिकली होती. अकबर बादशहाने १५९६ मध्ये चांदबिबीचा पराभव करून तो भाग हस्तगत केला. मुघलांनी ग्रामीण व्यवस्थेमधील पाटील, देशमुख यांचे अधिकार मान्य करून मराठे सरदारांच्या मदतीने महाराष्ट्रावर राज्य केले. या कालखंडात सुभा हा महत्त्वाचा प्रादेशिक घटक असून तो नैसर्गिक विभागाशी सुसंगत होता. इ. स. १८१८ साली पेशवाईचा अस्त झाला आणि ब्रिटिश राजवटीची सुरुवात झाली. ब्रिटिशांनी हिंदुस्तानची विभागणी प्रांत अथवा इलाखा यामध्ये केली. हे करत असताना ब्रिटिशांनी भाषा, सांस्कृतिक साम्य वगैरे विचारात न घेता केवळ प्रशासकीय सोय महत्त्वाची मानली. अशा त-हेने खानदेश, मुंबई, ठाणे, कुलाबा, रत्नागिरी, नाशिक, अहमदनगर, पुणे, सोलापूर, सातारा हे जिल्हे, त्याचप्रमाणे कर्नाटकातील काही जिल्हे, तसेच सिंध आणि गुजरातचा भाग मिळून मुंबई इलाख्याची निर्मिती केली. व-हाड आणि नागपूरचा भाग असलेले पूर्णा-वर्धा-वैनगंगा खोरे हे मध्यप्रांत आणि व-हाड (सी. पी. ॲण्ड बेरार) यामध्ये समाविष्ट झाले आणि मराठवाडा हैदराबादच्या निजाम संस्थानात राहिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावार प्रांतरचनेचे धोरण अमलात आले आणि १९६० साली सांस्कृतिकदृष्टया एकजिनसी असलेल्या महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली.

ब्रिटिश सरकारने १८५३ मध्ये रेल्वे सुरू केल्यापासून दळणवळणाची क्रांतिकारी साधने वापरात येऊ लागली. फेब्रुवारी १८५४ मध्ये मुंबईला पहिली कापड गिरणी सुरू झाल्यानंतर यांत्रिकी कारखानदारीचा विकास झाला. त्यामुळे आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेस गती मिळाली. या सर्व परिवर्तनांचे मुंबई हे अत्यंत महत्त्वाचे वेंद्र झाल्यामुळे महाराष्ट्रात औद्योगिक संस्कृतीचा उदय होऊन कृषिप्रधान ग्रामीण संस्कृतीच्या -हासास सुरुवात झाली. त्यामुळे महाराष्ट्राच्या लहान लहान प्रादेशिक गटांमध्ये नांदत असलेली सांस्कृतिक विविधता कमी होऊन त्या जागी सांस्कृतिक एकता येऊ लागली. प्राचीन काळापासून पेशवाईपर्यंत चालत आलेल्या निरनिराळया भाषिक, वांशिक आणि धार्मिक राजवटींची प्रशासन व्यवस्था आणि एतद्देशिय जनतेची संस्कृती यांच्या मिलापातून महाराष्ट्रात कोकण, देश, खानदेश, विदर्भ आणि मराठवाडा या पाच सांस्कृतिक उपविभागांची निर्मिती झाल्याचे वर लिहिले आहेच. या उपविभागांची पाळेमुळे नद्या, पर्वत, डोंगर, पर्जन्यमान, जमिनीचा प्रकार या भौगोलिक घटकांच्या पृष्ठभूमीत रुजली आहेत. प्राचीन काळापासून अर्वाचीन काळापर्यंत चालू असलेल्या राजकीय प्रक्रियेतून समाजातील विविध वर्गांची जडणघडण झाली आणि या वर्गातील जनतेच्या समाजिक जीवनाच्या प्रक्रियेतून त्या त्या प्रदेशांची सांस्कृतिक वैशिष्टये तयार झाली. महाराष्ट्राची संस्कृती ही या प्रादेशिक संस्कृतींच्या आणि राज्यकर्त्यांच्या शिष्टजन संस्कृतीच्या मिलापातून उत्क्रांत

झाली आहे. शिवाजीच्या काळापासून पेशवाईच्या अस्तापर्यंत महाराष्ट्राचे राज्यकर्ते बहुतांशी सातारा, पुणे भागात स्थायिक झाल्यामुळे या प्रदेशातील म्हणजे देशावरील संस्कृतीला अन्य चार प्रादेशिक संस्कृतींच्या तुलनेने महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. या प्रदेशातील शिष्टजन बोलत असलेल्या मराठी भाषेला प्रमाण भाषेचा दर्जा प्राप्त झाला व ही भाषा वाङ्मय निर्मितीची भाषा म्हणून राज्य स्तरावर स्वीकृत झाली. महाराष्ट्राच्या इतर चार प्रादेशिक उप-विभागांतील जनसामान्य बोलत असलेल्या मराठीला काहीसा बोली भाषेचा दर्जा प्राप्त झाला.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला आणि याचा एक राजकीय परिणाम म्हणजे सामान्य जनतेला मताधिकाराच्या रूपाने राजकीय महत्त्व प्राप्त झाले. यातून सामान्य जनतेच्या राजकीय अस्मिता जागृत झाल्या आणि प्रस्थापित अशा रूढीगत, सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या भावनेस आव्हान दिले जाऊ लागले. प्रथितयश साहित्यिकांच्या साहित्य कृतीत प्रादेशिक संस्कृतीचा आविष्कार होऊ लागला व प्रादेशिक साहित्याचे नवे दालन अस्तित्वात आले. शासकीय स्तरावरही या बदलत्या सामाजिक जाणिवांची दखल घेण्यात आली व प्रादेशिक संस्कृतीच्या अभिव्यक्तीस प्रोत्साहन मिळू लागले. प्रादेशिक साहित्य संमेलने, कला महोत्सव यांना अलीकडील काळात जे महत्त्व प्राप्त होत आहे ते याच सामाजिक परिवर्तनाचे द्योतक आहे. अलीकडील काळात दूरदर्शन, दूरध्वनी, संगणक, उपग्रह या अतिप्रगत प्रसार माध्यमांच्या सामाजिक व्यवहारातील वाढत्या वापरामुळे प्रदेशाप्रदेशातील संपर्कावर मर्यादा आणणारे भौगोलिक अडथळे दूर होऊ लागले आहेत. याबरोबर जनसामान्यांच्या अस्मितेशी निगडीत असलेल्या प्रादेशिक संस्कृतीच्या विशेषतापूर्ण परंपरा जतन करून त्यांना महाराष्ट्राच्या मुख्य सांस्कृतिक प्रवाहात सामील करून घेण्याचे प्रयत्न चालू आहेत. या दृष्टीने प्रादेशिक संस्कृतीच्या विशेषतांची दखल घेणे आजच्या काळातही अगत्याचे आहे. या दृष्टिकोनातून महाराष्ट्राच्या प्रादेशिक उप-विभागांच्या सांस्कृतिक विशेषतांचे वर्णन पुढे केले आहे.

महाराष्ट्राच्या प्रादेशिक विभागांची सांस्कृतिक वैशिष्टये

कोकण : अरबी समुद्र व सहयाद्री या दरम्यान असलेल्या उत्तरेकडील दमणपासून दक्षिणेकडील गोव्यापर्यंतचा किनारपट्टीचा, अंदाजे ४५ ते ९० किलोमीटर रुंद व ७२० किलोंमीटर लांब, उतरणीचा प्रदेश प्राचीन काळापासून कोकण या नावाने ओळखला जातो. कालांतराने त्याचे उत्तर व दक्षिण कोकण असे भाग पडले. सुरत जिल्हयाच्या दक्षिणेपासून रत्नागिरी जिल्हयाच्या उत्तरेपर्यंतचा प्रदेश उत्तर कोकणात मोडतो. रत्नागिरी जिल्हयाचा उत्तर भाग व कारवार जिल्हयाचा दक्षिण भाग यामधील प्रदेशास दक्षिण कोकण असे संबोधिले जाते. उत्तर कोकणास अपरान्त (पश्चिमेकडील शेवटचे टोक) असे ऐतिहासिक नाव आहे. महामहोपाध्याय मिराशीच्या मते सम्राट अशोकाच्या आज्ञापत्रात अपरान्तचा ऐतिहासिक उल्लेख सर्वप्रथम आला. अपरान्त म्हणजे कोकण असे इतिहासकार शेजवलकरांनीही मान्य केले आहे.

इतिहासाचार्य राजवाडे यांच्या मते तल, रसातल, महितल, पाताल इत्यादी सप्तपाताले म्हणजेच समद्रकाठचा कोकण. म्हणजे प्राचीन काळी एक सलग कोकण नव्हताच. तेथे पूर्वी अनेक राज्ये होती व नंतरही ती अनेक वर्षे राहिली. तथापि, कोकण या प्रदेशास अतिप्राचीन काळी अपरान्त म्हणून संबोधिले जात असे ही गोष्ट राजवाडयांच्या लक्षात आली नसावी. कोकण हा किना-याचा प्रांत असल्यामुळे सप्तपाताले ही बहुधा सप्तबंदरे असावीत. कालिदासाच्या **रघुवंशा**तील अपरान्ताचा उल्लेख करताना टीकाकार वल्लभ त्यास "कोकण" असे दुसरे नाव देतो. आरंभी येथे नाग लोकांची वस्ती होती आणि वुंकण नावाच्या एका नागकुलाने आपले अधिराज्य प्रस्थापिल्यामुळे या प्रदेशाला सप्तपाताल ऐवजी सप्तवुंकण म्हणजे कोकण हे नाव प्राप्त झाले. गुजरातमधील नागर ब्राह्मण स्वतःला आजही वुंकण ब्राह्मण म्हणवितात. प्राचीन ग्रंथात इ.स.पू. चौथ्या शतकापासून कोकणचा उल्लेख आढळतो. **महाभारत, हरिवंश, विष्णुपुराण, बृहत्संहिता, राजतरंगिणी, पेरिप्लस** इत्यादी ग्रंथ, चालुक्यांचे शिलालेख, प्लिनी, टॉलेमी, स्ट्रॅबो, हयुएनत्संग, इब्न बतूता, अल्-बीरुनी यांच्या वृत्तांतामध्ये कोकणचा उल्लेख आहे. टॉलेमीने गुजरात व उत्तर कोकण यास 'लारिका' व दक्षिण कोकणास 'आरिका' म्हटले आहे. इ.स.पू. पाचव्या शतकापासून बॅबिलोन, रोम इत्यादींशी भडोच, चौल, वनवासी, नवसारी, सोपारा, बालेयपट्टण, चंद्रपूर, कल्याण या व्यापारी वेंद्रांचा संबंध होता. कोकण हे नाव कसे पडले या विषयी अनेक मते आहेत. परशुरामाची माता वुंकणा यावरून कोकण नाव पडले असावे असेही एक मत आहे.[७]

कोकणावर राज्य केलेल्या ज्ञात राजवटी पुढीलप्रमाणे आहेत. -- मौर्य, क्षत्रप, सातवाहन, त्रैकूटक, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि शिलाहार.[८] यादवांच्या अंतानंतर कोकणाचा काही भाग १३७७ पर्यंत विजयनगरच्या हिंदू राजवटीखाली होता. दरम्यानच्या काळात या प्रदेशावर स्थानिक सत्ताधारी अधिकार चालवित असावेत. सन १३९० च्या सुमारास बहमनी राजांनी कोकणातील ब-याच बंदरांवर ताबा मिळविला. त्यांनी कोकण किनारा १४२९ मध्ये जिंकला.

बहमनींनी कोकणवर स्वा-या करूनही ते कोकणचा ताबा पूर्णपणे मिळविण्यात यशस्वी झाले नाहीत. बहमनींचा सुप्रसिध्द वजीर महमुद गावान यालाही सर्व प्रदेश मिळविणे शक्य झाले नाही. बहमनींच्या अंतकाळी म्हणजे १४८९ च्या सुमारास कोकणचा उत्तरेकडील काही भाग गुजरातच्या सुलतानाकडे तर दक्षिणेकडील बराच भाग बहमनींकडे होता. त्यानंतर अहमदनगरची निजामशाही आली. निजामशाहीच्या अनुमतीने पोर्तुगीजांनी चौल व रेवदंडा येथे व्यापारी वखार स्थापन केल्यावर (१५१६) आपले स्थान बळकट केले. कोकणचा काही भाग विजापूरच्या आदिलशाही राजांकडे होता.

या कालखंडात कोकणच्या भवितव्यावर परिणाम करणा-या मुसलमानी राजवटींव्यतिरिक्त पोर्तुगीजांचाही उल्लेख करणे आवश्यक आहे. तथापि पोर्तुगीजांपूर्वीच साधारणपणे १५ व्या शतकाच्या मध्यकाळी (१४३७) ॲबिसिनिया आणि इतर पूर्व आफ्रिकेतील लोक मोठया प्रमाणात पश्चिम भारतात येऊ लागले. ईशान्य आफ्रिकेतून अरब-अल-हबीश येथून येणारे हे लोक "हबशी" म्हणून ओळखले जात. त्यांना सीदी असेही म्हणत. ओर्म (Orme) या इतिहासकाराच्या मते भारतात स्थिर झालेल्या ॲबिसिनियातील हबशी लोकांनी आपल्या देशातील खूप लोकंाना आमंत्रित करून अथवा गुलाम म्हणून विकत घेऊन सोबत आणले. तसेच आफ्रिकेतील निग्रो लोकांनाही गुलाम म्हणून आणले. हबशी व निग्रो लोकांनी परस्परांमध्ये विवाह केल्यामुळे त्यांची प्रजोत्पत्ती झाली. शिवाय त्यांच्याशी स्थानिक लोकांचा विवाह अथवा अन्य प्रकारे शरीर संबंध आल्याने मूळच्या मुसलमानांपेक्षा शरिराचा बांधा, वर्ण आणि व्यक्तिमत्व या बाबतीत अगदी निराळी दिसणारी एक स्वतंत्र जमात निर्माण झाली. या जमातीतील लोकांना हबशी अथवा सीदी या नावानी ओळखले जाते. पोर्तुगीजांनी आमिषे दाखवून अथवा बळाचा उपयोग करून हजारो हिंदू लोकांना ख्रिश्चन बनविणे याचा अर्थ असा की, स्थानिक हिंदू लोकांव्यतिरिक्त सुलतानी राज्यकर्त्यांनी येथे बाहेरून आणलेले अथवा धर्मांतर करून घेतलेले मुसलमान, हबशी आणि ख्रिश्चन यांची लोकसंख्येत भर पडली. याचे सांस्कृतिक व सामाजिक परिणाम होणे अपरिहार्य होते.[९]

कोकणच्या वसाहतीकरणाची प्रक्रिया प्राचीन काळापासून सुरू झाली असावी. परशुरामाने प्राचीन काळी चिपळूणजवळ चित्पावन ब्राह्मणांची वसाहत स्थापन केल्याची पौराणिक कथा सुपरिचित आहे. सागरी व्यापारामुळे परदेशी लोकांची आवक जावक कोकणात फार पूर्वीपासून चालू होती. त्यातील बरेच परदेशी लोक कोकणात स्थायिक झाले. त्यात यवन म्हणजे आयोनियामधील ग्रीक लोकांचा उल्लेख करता येईल. गुलाम म्हणून आणलेले ॲबिसिनियातील लोक व अन्य जमातींचे लोकही कोकणात स्थायिक झाले. मोठया संख्येने दिसणा-या या परदेशी नागरिकांमध्ये बौध्द धर्माचा प्रचार करण्यासाठी सम्राट अशोकाने आपले धर्मप्रसारक कोकणात पाठविले होते याचा उल्लेख यापूर्वी आलाच आहे. या धर्मप्रसारकांच्या प्रयत्नांमुळे छत्तीस हजार लोकांनी बौध्द धर्माचा स्वीकार केल्याचा उल्लेख "सामंत पासदिक" या ग्रंथात आहे. या ऐतिहासिक काळात विविध देशांचा आणि वांशिक गटांचा प्रभाव कोकणातील लोकसंख्येच्या स्वरूपावर पडलेला दिसतो. हबशी लोकांची शारीरिक लक्षणे कोकणातील काही मुसलमान तसेच कातकरी आणि ठाकूर या जमातींमध्ये दिसून येतात. कातक-यांच्यामध्ये सीदी कातकरी असा एक उप-गट आहे. काही ठाकूर लोकांत अतिकुरळे केस दिसून येतात.[१०]

ऐतिहासीक काळात कोकणची अर्थव्यवस्था ही सागरी व्यापार आणि त्यांच्याशी संबंधित पूरक उद्योग, तसेच नारळ, पोफळी, काजू, आंबे, फणस, आमसूल, वरी, नाचणी, भात यांच्या शेतीवर अवलंबून होती. या व्यवसायांमध्ये कोकणातील जनतेला रोजगार मिळत असे, परंतु इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीमुळे शिडांची गलबते कालबाहय होऊन त्यांची जागा वाफेवर चालणा-या आगबोटींनी घेतली आणि समुद्रमार्गे होणारी मालाची वाहतूक मोठया प्रमाणात आणि जलदगतीने होऊ लागली. दळणवळणातील क्रांतीमुळे मुंबई हे पश्चिम किना-यावरील महत्त्वाचे बंदर म्हणून उदयास आले आणि कोकणातील ऐतिहासिक चौल, दाभोळ, राजपुरी, महाड इत्यादी बंदरे ओस पडू लागली. ब्रिटिश राजवटीत कोकणातील पारंपरिक शेती व्यवसायास उतरती कळा आली. याच काळात मुंबईचे आंतरराष्ट्रीय बंदर म्हणून आणि एक प्रमुख औद्योगिक शहर म्हणून महत्त्व वाढले आणि रोजगार प्राप्तीचे ते एक प्रमुख वेंद्र बनले. या सर्व बदलांचा परिपाक कोकणातील रोजगारक्षम जनतेचे मुंबईला मोठया प्रमाणावर स्थलांतर होण्यात झाला. वृध्द माणसे, मुले व स्त्रिया हे प्रामुख्याने कोकणात राहिले व ते आपल्या उपजीविकेसाठी मुंबईहून येणा-या आप्तांच्या मनीऑर्डरवर विसंबून राहू लागले. अलीकडील काळात कोकण रेल्वे व इतर औद्योगिक प्रकल्प कोकणच्या भूमीवर आकारास येऊ लागले आहेत व त्यामुळे कोकणास आपले गतवैभव पुन्हा प्राप्त होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

कोकणातील लोक मराठी भाषा बोलतात. कोकणी या नावाने ओळखली जाणारी मराठीची बोलीभाषा अथवा पोटभाषा दक्षिण कोकण व गोवा या प्रदेशात बोलली जाते. अनुनासिकांचा वापर आणि हेल काढून शब्दोच्चार करण्याची पध्दती ही कोकणात बोलल्या जाणा-या मराठीचे वैशिष्टये आहेत. कोकणातील जनसंस्कृतीच्या जडणघडणीत तेथील आगरी, कुणबी, माळी, ठाकूर, सोनकोळी, भंडारी इत्यादी जातींचा महत्त्वाचा वाटा आहे. निसर्गाच्या कृपेवर अवलंबून असणारे शेती, मासेमारी आणि वन व्यवसाय करणा-या या जातींच्या सामाजिक जीवनात धर्म आणि अंधश्रध्दा यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. कोकणातील सामान्य जनता भूताखेतांवर विश्वास ठेवणारी आहे. वेताळ, समंध, मुंजा, खवीस, जखीण,

लांबसट इत्यादी भूत पिशाच्यांच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास असतो. धार्मिक जीवनात ग्रामदेवतेला मोठे स्थान आहे. यात मारुती, कालिका, अंबा, वाघोबा, चेडोबा, म्हसोबा, बहिरोबा, गणेश, बहिरी, भूतनाथ, रवळनाथ, वाघजाई इत्यादी देवतांचा अंतर्भाव होतो. यातील बहुतांशी देवता जनदेवता आहे. ग्रामदेवतांची वर्षातून एकदा भरणारी जत्रा ही ग्रामीण जनतेच्या जीवनातील सांस्कृतिक आनंद घेण्याची मोठी पर्वणी असते. विविध प्रकारच्या लोककलांचे प्रदर्शन या जत्रेतून होत असते. जनदेवतेच्या जत्रेप्रमाणे शिष्टजनांच्या पौराणिक देवतांच्या यात्रा आणि उत्सवातही सर्व स्तरातील जनता उत्साहाने सहभागी होत असते. आधुनिक करमणुकीच्या साधनांच्या काळातही या जत्रा आणि यात्रा यांचे महत्त्व लोकजीवनात टिकून आहे. १९६१ च्या जनगणना अहवालानुसार कोकणात दरवर्षी १,६२९ यात्रा भरत होत्या व त्यातील १,४०९ यात्रा ग्रामीण परिसरात भरत होत्या.

कोकणातील कलाजीवन धार्मिक जीवनात आधाराने विकसित झाले आहे. कोकणातील विशेषतापूर्ण लोकनृत्यात सोनकोळयांचे कोळी नृत्य, ठाकूर जमातीमधील गोविंदा आणि वाघ्या नृत्य, आगरी-कुणबी लोकांचा गौरी-गणपतीचा नाच हे प्रमुख नृत्य प्रकार दिसून येतात. तसेच काठयांच्या सहाय्याने केला जाणारा काटखेळ हे नृत्य आणि नवरात्रातील घागर पुंकण्याचा धार्मिक नृत्य प्रकार ही कोकणची विशेषता आहे. दशावतारी खेळ हा पुराणातील प्रसंगांच्या आधारे उत्स्फूर्तपणे विकसित होत जाणारा जननाटय प्रकार हेही कोकणच्या प्रादेशिक संस्कृतीचे एक वैशिष्टय आहे.

खानदेश : तापी-पूर्णा खो-यात खानदेश हा महाराष्ट्राचा महत्त्वपूर्ण सांस्कृतिक प्रदेश सामावलेला आहे. उत्तरेला सातपुडा पर्वत आणि दक्षिण व नैऋत्येकडे अजिंठा-सातमाळा डोंगर आणि सहयाद्रीच्या टेकडया यामध्ये खानदेशचा प्रदेश आहे. खनदेश बरोबर पश्चिम विदर्भाचा काही भागही या खो-यात समाविष्ट झाला आहे. प्राचीन काळी हा प्रदेश असिक किंवा ऋषीक या नावाने ओळखला जात असे व तो अश्मक, विदर्भ आणि अनूप या नर्मदा नदीच्या भोवतालच्या प्रदेशाला जोडून होता. **रामायण** आणि **महाभारत** या दोन्ही महाकाव्यांमध्ये या प्रदेशाचा ऋषीक या नावाने उल्लेख आढळतो.

हा प्रदेश मौर्य साम्राज्याचा भाग होता व त्या काळात या भागात हीनयान बौध्द धर्माचा प्रसार झाला होता हे अजिंठयातील १० आणि १२ क्रमांकाच्या लेणींवरून दिसते. मौर्याच्या नंतर हा प्रदेश सातवाहनांच्या आधिपत्याखाली आला. स्थूलमानाने पूर्वकालीन सातवाहनांचा प्रारंभ इ. स. पूर्व २३० च्या सुमारास अथवा इ.स. पूर्व दुस-या शतकाच्या शेवटी झाला. उत्तरकालीन सातवाहनांनी इ. स. च्या दुस-या शतकापासून ते इ. स. तिस-या शतकाच्या २३० पर्यंत दख्खनवर राज्य केले. या प्रदेशावर कुषाणांनी राज्य केल्याचेही ऋषभदत्ताच्या नाशिक येथील शिलालेखावरून दिसते. नंतर आभीर अथवा अहीर राजांचेही राज्य या प्रदेशावर होते. असे नाशिक येथे सापडलेल्या ईश्वरसेन या आभीर राजाच्या शिलालेखावरून स्पष्ट होते. खानदेशच्या जडणघडणीत आभीर अथवा अहीर रांजांचे फार मोठे योगदान आहे. या घराण्याचे राज्य संपल्यानंतरही काही लोक आपल्या नावामागे अहीर हे नाव जोडत. खानदेशमधील मराठा आणि ब्राह्मण यांच्यासह विविध जातींमध्ये अहीर वंशाचा अंश दिसतो. या भागात बोलली जाणारी अहिराणी ही बोलीभाषा अहीर जनसमूहीची बोलीभाषा होय.[११] अहीर घराण्यानंतर वाकाटक, बदामीचे चालूक्य, सेंद्रक, राष्ट्रकूट आणि यादव घराण्यांचे या प्रदेशावर राज्य होते. यादवांचा मांडलिक निवुंभ वंश खानदेशच्या काही भागावर राज्य करीत होता. पाटणे व बहाळचे सुप्रसिद्ध शिलालेख सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. या कालखंडात गणित आणि खगोलशास्त्राची मोठी प्रगती झालेली दिसते. भारतातील थोर गणिततज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य पाटणेचा असून **सिध्दान्तशिरोमणी** हा त्याचा ग्रंथ खगोलशास्त्रावरील महान भाष्य म्हणून मान्यता पावलेला आहे (इ.स. ११५०). यादव काळात १२२२ चे सुमारास महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधरस्वामी याने या भागात धर्मजागृती करण्यासाठी भ्रमण केले. त्यामुळे या भागात महानुभाव पंथाचा बराच प्रसार झाला. तेव्हापासून आजतागायत येथे महानुभाव संप्रदायाची परंपरा टिकून आहे.[१२]

हिंदू राजघराण्याच्या अमलानंतर दख्खनवर बहमनी घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली. तथापि नंदुरबार व सुलतानपूर वगळता खानदेशचा कोणताही भाग बहमनींना मिळवता आला नाही. मलिक अहमद फारुकी अथवा मलिक राजा याला १३७० मध्ये त्याच्या राजकीय कर्तबगारीबद्दल फिरोजशहा तुघलक या दिल्लीच्या सुलतानाने थाळनेर भागाची जहागीर दिली. जहागिरीच्या आसपासचे प्रदेश जिंकून घेऊन मलिक राजाने आपल्या आधिपत्याखालील प्रदेशाची वाढ केली. हाच प्रदेश खानदेश या नावाने ओळखला जाऊ लागला. फारुकीच्या प्रदीर्घ राजवटीनंतर खानदेश दिल्लीच्या मुघल बादशहाच्या राजवटीखाली जानेवारी १६०१ मध्ये आला.

मराठयांनी खानदेशवर आपली सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न केला पण त्यात त्यांना फारसे यश आले नाही. हैदराबादचा निजाम-उल-मुल्क प्रबळ होऊन त्याने बराच मुघल प्रांत बळकावल्यापासून म्हणजे १७१३ पासून १७५२ पर्यंत पूर्णतः निजामाकडे होता. सन १७५२ मध्ये भालकीच्या तहानुसार काही भाग पेशव्याने हस्तगत केला. मात्र १७६० मध्ये संपूर्ण खानदेश मराठयांनी निजामाकडून मिळविला. इ.स. १८१८ साली बहुतांश खानदेश ब्रिटिश

सत्तेखाली आला.

खानदेशमधील मानवी संस्कृतीच्या जडणघडणीत उत्तर हडाप्पा संस्कृती, गुजरातमधील रंगपूर संस्कृती आणि मध्यप्रदेशमधील माळवा संस्कृती यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. या संस्कृतींच्या लोकांनी खानदेशात वसाहती केल्या. गुजरात आणि खानदेश यांची सांस्कृतिक देवाण-घेवाण ऐतिहासिक काळापासून चालू आहे. गुजरातमधून लेवा पाटीदार खानदेशात आले व तेथे स्थायिक होऊन लेवा पाटीदार म्हणून ओळखले जाऊ लागले. तसेच राजस्थानमधून भिल्ल मोठया संख्येने खानदेशात आले आणि त्यांनी या प्रदेशात आपल्या वसाहती स्थापन केल्या. खानदेशच्या काही भागावर भिल्लांनी राज्य केले. महानुभाव पंथाचा संस्थापक चक्रधरस्वामी गुजराती ब्राह्मण होता. त्याने खानदेशमधील अनेक ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. आभीर अथवा अहिर लोकांचा खानदेशच्या लोकांच्या जडणघडणीवर मोठा प्रभाव पडल्याचा उल्लेख या आधी आलाच आहे. या विविध संस्कृतींच्या प्रभावामुळे खानदेशची संस्कृती संमिश्र स्वरूपाची झाली आहे. याचे उत्तम उदाहरण खानदेशच्या काही भागाची बोली भाषा अहिराणी ही होय.

अहिराणी ही जळगाव जिल्हयाचा पश्चिम भाग, धुळे जिल्हा व नाशिक जिल्हयाच्या काही भागातील ग्रामीण जनतेची बोली भाषा होय. मराठी, गुजराती, हिंदी या बरोबरच प्राचीन मागधी, सौराष्ट्री, सौरसेनी, लाटी, महाराष्ट्री प्राकृत, पैशाची या भाषांच्या मिश्रणातून अहिराणी तयार झाली आहे. अहिराणी बोलीचे एक वैशिष्टय म्हणजे शब्दोच्चारात "ळ" ऐवजी "य" वापरला जातो. उदाहरणार्थ "काळा" या शब्दाचा उच्चार "काया" असा केला जातो. महानुभावाच्या वाङ्:मयात अहिराणी शब्द ब-याच प्रमाणात आढळतात.

खानदेशातील सामाजिक आणि धार्मिक जीवन हे विविध भागांतून येऊन या प्रदेशात स्थायिक झालेल्या जातीजमातींच्या प्रभावाने घडले आहे. गुजराती आणि मारवाडी समाजाने बांधलेली लक्ष्मी-नारायणाची मंदिरे अनेक ठिकाणी दिसतात. विठोबा आणि राम ही खानदेशातील लोकप्रिय दैवते आहेत. त्या खालोखाल भवानी, मारुती, म्हसोबा, भैरव, खंडोबा या देवताही लोकप्रिय आहेत. ग्रामीण समाजात भैरव, भवानी, बहिरोबा, जाखाई, जनाई, जोखाई, कालकाई, खंडोबा, मारुती, म्हसोबा, मुकाई, नवलाई, फिरंगाई, सटवी, तुकाई, वाघोबा आणि वेताळ या जनदेवतांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. तसेच रोटपूजा आणि चक्रपूजा या नावाने ओळखले जाणारे धर्मविधीही खानदेशमध्ये लोकप्रिय आहेत. रोटपूजा ही खानदेशाने विदर्भाकडून घेतली आहे. या प्रथेचा जन्मही विदर्भात झाला. नागपंचमीनंतर येणा-या पहिल्या रविवारी ही पूजा काजूबाई या देवतेच्या सन्मानार्थ केली जाते. चक्रपूजा हा विधी देखील खानदेशच्या जनतेत लोकप्रिय आहे. राणूबाई या देवतेच्या सन्मानार्थ ही पूजा केली जाते. १९६१ सालच्या जनगणना अहवालानुसार खानदेशमध्ये साज-या होणा-या एकूण ७२३ यात्रापैकी ६८९ यात्रा ग्रामीण परिसरात भरत होत्या. त्या स्थानिक जनदेवतांच्या सन्मानार्थ असतात. खानदेशी जनता आदरातिथ्याकरिता प्रसिद्ध आहे. खानदेशातील बहुसंख्य हिंदू लोक वारकरी पंथीय म्हणजे भागवत धर्माचे आचरण करणारे आहेत. याशिवाय येथे महानुभाव व स्वामीनारायण पंथीयांचीही संख्या बरीच आहे.

विदर्भ : विदर्भ, नाग-विदर्भ, व-हाड या नावांनी ओळखला जाणारा हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक उपविभाग वर्धा-वैनगंगा आणि पूर्णा नद्यांच्या खों-यात वसलेला आहे. उंच सखल प्रदेश, कृत्रिम तळी आणि घनदाट जंगले असलेल्या या प्रदेशात खनिज संपत्ती मोठया प्रमाणावर उपलब्ध आहे. येथील जंगलामध्ये आदिवासींची संख्या मोठया प्रमाणावर आहे. या प्रदेशाची सरहद्द मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेश यांच्याशी जोडलेली आहे. त्यामुळे या प्रदेशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर या अमराठी संस्कृतिचा प्रभाव पडला आहे.

विदर्भाच्या प्राचीन संस्कृतीचा मागोवा घेऊ लागल्यास आपण महाभारत कालात येतो. श्रीकृष्णाने विदर्भ राजकन्या रुक्मिणी हिच्याशी लग्न केल्याची कथा महाभारतात आहे. त्याचप्रामणे दमयंतीचा विवाह नल राजाशी झाल्याची कथाही महाभारतात आहे. महाराष्ट्रतील लोहयुगाचे आद्यप्रवर्तक म्हणून मानल्या गेलेल्या व मृतांच्या दफनासाठी शिलावर्तुळे करणा-या दक्षिण भारतातून आलेल्या जमातीने या भागात अनेक ठिकाणी वसाहती केल्या होत्या. वाकाटकांनी इ. स. २५० ते ५५० पर्यंत या प्रदेशावर राज्य केले. चौथ्या शतकात गुप्त घराण्यातील चंद्रगुप्त व्दितीय याची मुलगी प्रभावती या राजकन्येचे वाकाटक राजपुत्र रुद्रसेन व्दितीय याच्याशी लग्न झाले होते. वाकाटक राजांनी संस्कृत व प्राकृत कवींना उदार आश्रय दिला. त्या काळातल्या विदर्भातील वाङ्:मय निर्मितीमध्ये वैदर्भी आणि वच्छोमी रीतींना मानाचे स्थान प्राप्त होऊन कालिदासासारख्या महाकवींना त्याच प्रमाणे काव्यरचना करण्याची स्फूर्ती मिळाली. स्वत:च काही वाकाटक राजांनी काव्य निर्मिती केलेली असून त्यांच्या काव्याचा बाण व दण्डी यासारख्या महान संस्कृत कवींनी व कुन्तक आणि हेमचंद्र यासारख्या लेखकांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. वाकाटक राजा सर्वसेन हा सुप्रसिध्द प्राकृत काव्य **हरिविजय** याचा लेखक मानला जातो. या काव्याची इतर अनेक कवी व साहित्य समीक्षकांनी प्रशंसा केली आहे. इतकेच नव्हे तर नंतरच्या काळामध्ये कालिदास व प्रवरसेन दुसरा यांनी निर्माण केलेल्या साहित्यनिर्मितीवर देखील सर्वसेनच्या शैलीचा प्रभाव पडलेला दिसतो. वाकाटकांनी उत्तुंग देवालये बांधल्याचे दिसते. ती देवालये आज पूर्णरूपाने अस्तित्वात नसली तरी त्यांच्या अवशेषांवरून ती उत्कृष्ट कलाकृतीपूर्ण असावीत. अजिंठा व गुलवाडा येथील काही

विहार व चैत्य लेणी त्यांच्या काळात कोरली गेली. वाकाटक काळात संस्कृत भाषा व संस्कृत वाङ्मयाचा विलक्षण विकास झालेला दिसतो. दुर्दैवाने वाकाटककालीन विपुल साहित्यनिर्मितीपैकी फारच थोडे साहित्य सध्या उपलब्ध आहे. कालिदासाचे मेघदूत नामक खंडकाव्य आणि प्रवरसेनाचे सेतुबंध हे प्राकृत काव्य विशेष उल्लेखनीय आहे. कालिदासाची इतर काव्ये व नाटके विदर्भाबाहेर माळवा प्रांतात लिहिली गेली. त्यामुळे त्यातील वर्णन विदर्भाला लागू पडेलच असे म्हणता येत नाही.[१३]

वाकाटकानंतर विदर्भावर कलचुरी, राष्ट्रकुट, कल्याणीचे चालुक्य, यादव, बहमनी, इमादशाही, गोंड, मुघल, नागपूरचे भोसले, हैदराबादचा निजाम इत्यादींनी राज्य केले. दिनांक १३ मार्च १८५४ पासून भोसलेंचे राज्य खालसा करून ब्रिटिशांनी सत्ताग्रहण केले.[१४] व-हाडचा प्रांत मात्र १९०२-०३ पर्यंत निजामाकडेच होता. प्राचीन काळी झाडिमंडळ म्हणून ज्ञात असलेल्या या प्रदेशात प्रचंड घनदाट अरण्य असल्याने व येथे गोंड राजांचे आधिपत्य असल्याने येथे आदिवासी जमातींचे प्रमाण फार मोठे आहे. याबाबी तसेच विविध संस्कृतींच्या राजांनी येथे राज्य केल्याने येथील सांस्कृतिक जीवनात काही विशेषता आलेल्या दिसतात.

विदर्भातील लोकसंख्येच्या जडणघडणीत सीमावर्ती भागांचा बराच प्रभाव पडला आहे. ऐतिहासिक काळात उत्तर हिंदुस्थान व आंध्र या भागातून विविध जातींचे लोक या भागात आले व येथे स्थायिक झाले. या भागात आदिवासी जमातीही मोठया प्रमाणावर वस्ती करून आहेत व त्यातील गोंड राजांचे राज्य या भागावर बराच काळ असल्याचे वर म्हटलेच आहे. त्यामुळे या भागाला गोंडवन या नावानेही ओळखले जाते. अठराव्या शतकात भोसल्यांनी आपल्या राज्याची नागपूर ही राजधानी केली त्यामुळे येथील मराठी संस्कृतीचा पाया अधिक मजबूत झाला. या भागात बोलल्या जाणा-या मराठीला व-हाडी मराठी या नावानेही ओळखले जाते व तिच्या स्वरूपावर हिंदी तसेच येथील आदिवासी जनतेच्या बोली भाषांचा प्रभाव पडलेला दिसतो. येथील आदिवासी जनता आपल्या जमातीत बोलतांना स्वतःच्या बोली भाषेचा वापर करते व अन्य लोकांशी व्यवहार करतांना मराठीचा वापर करते. ब्रिटिश राजवटीत विविध शासकीय सेवेत नोकरी करण्याच्या निमित्ताने अनेक बंगाली लोक या भागात आले व येथे स्थायिक झाले. त्यांच्या संस्कृतीची छाप विदर्भातील सांस्कृतिक जीवनावर पडली आहे.

धार्मिक जीवनामध्ये राम हे दैवत विदर्भात बरेच लोकप्रिय आहे. रामटेक येथील इतिहासकालीन राम मंदिर या भागात प्रसिध्द आहे. आंध्र प्रदेशातील तिरुपतीचा बालाजी हे काही जातींचे कुलदैवत असून बालाजीची मंदिरेही विदर्भात दिसतात. शिव, गणपती, अंबाबाई, या देवताही लोकप्रिय आहेत. परंतु महाराष्ट्राचे सामान्यजनांचे दैवत म्हणून मान्य पावलेल्या विठोबाची लोकप्रियता या भागात कमी दिसते. तरी देखील वारकरी पंथाच्या जनसामान्यात झालेल्या प्रसारामुळे विठोबा हे दैवत लोकप्रिय आहे. खंडोबा हे दैवत या भागात कमी लोकप्रिय दिसते. ऐतिहासिक काळात या भागात महानुभाव पंथाचा बराच प्रसार झाला. या पंथाचे एक प्रमुख क्षेत्र ऋध्दिपूर हे अमरावती जिल्हयात आहे. या सांस्कृतिक वैशिष्टयामुळे मराठी संस्कृतीच्या चौकटीत विदर्भाचे वेगळेपण दिसून येते.

मराठवाडा : गोदावरी नदीच्या खो-यामध्ये मराठवाडा हा सांस्कृतिक उप-विभाग साकार झाला आहे. महाराष्ट्राच्या नागरी संस्कृतीचा जन्म या भागात झाला. ज्यांचा इतिहास ज्ञात आहे असे महाराष्ट्रातील पहिले राजघराणे सातवाहन यांची प्रतिष्ठान म्हणजे आजचे पैठण येथे राजधानी होती. सातवाहन घराणे हे संस्कृत भाषिक नव्हते. हे या घराण्यातील एका राजासंबंधीच्या दंतकथेवरून म्हटले जाते. मात्र यास ऐतिहासिक पुरावा नाही. सातवाहन राजांची भाषा माहाराष्ट्री या नावाने ओळखली जाणारी प्राकृत भाषा होती. सातवाहनांचे बहुतांशी शिलालेख प्राकृत भाषेत होते. गाथासप्तशती हा माहाराष्ट्री प्राकृत भाषेतील ग्रंथ या घराण्यातील हाल या राजाने लिहून घेतला. या काव्यसंग्रहात स्वतः हाल राजाने ४४ पद्यांची रचना केली. सातवाहन राजांनी प्रतिष्ठान ते जुन्नर व पुढे नाणेघाटातून कल्याण पर्यंत व्यापारी मार्ग तयार केला. सातवाहनांच्या कारकिर्दीत मराठवाडयाची व पर्यायाने महाराष्ट्राची संस्कृती आकार घेऊ लागली आणि यादवांच्या कालखंडात तिला पूर्ण बहर आला. ज्ञानेश्वराने भगवद् गीतेवर **भावार्थ दीपिका** अथवा **ज्ञानेश्वरी** हा महान टीका ग्रंथ लिहून संस्कृत भाषेतील सांस्कृतिक प्रवाहाचे मराठीकरण अथवा प्राकृतीकरण केले. देवगिरीच्या यादवांनी दिलेल्या राजाश्रयामुळे मराठी भाषा समृध्द होऊन संपूर्ण महाराष्ट्राची भाषा म्हणून मान्यता पावली. इ. स. १३१८ साली झालेल्या यादवांच्या अस्तानंतर येथे मुसलमान सुलतानांची सत्ता आली. खलजी, तुघलक, मुघल आणि नंतर हैदराबादच्या निजामाच्या राजवटीखाली मराठवाडा आला. भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत मराठवाडा या राजवटीत राहिला. या कालखंडात मराठवाडयाचा सांस्कृतिक विकास थांबला. उर्वरित महाराष्ट्रात मराठयांचे राज्य होते. मराठा काळात मराठी अस्मिता विकसित झाली, पण मराठवाडा निजामाच्या राजवटीमुळे या परिवर्तनापासून वंचित राहिला. निजामाने अतिशय जाचक धार्मिक धोरण अंमलात आणून गांजणूक करणारी जमीन महसूल पध्दती लादली. त्यामुळे एकेकाळी शांततापिय अशा प्रजेमध्ये बंडखोरीचे वातावरण पसरले व सर्वत्र अशांती निर्माण झाली.[१५]

टिपू सुलतानचा पराभव करण्यासाठी निजामाने इंग्रजांबरोबर हातमिळवणी केली आणि त्याचे पारितोषिक म्हणून

म्हैसूर राज्याचा काही भाग निजामाला प्राप्त झाला. परंतु हा भाग ब्रिटिशांनी १८०० साली निजामाशी केलेल्या करारानुसार परत काढून घेऊन आपल्याकडे ठेवला. त्यामुळे निजामाने आपल्या जनतेला ब्रिटिश राजवटीविरुद्ध उठाव करण्यास गुप्तपणे उत्तेजन देण्याचे धोरण आखले. याचा परिणाम हटकर धनगरांनी नवसाजी नाईक याच्या नेतृत्वाखाली १८०३ साली बंड करण्यात झाला. तसेच बीड जिल्ह्यात धर्माजी प्रतापराव याच्या नेतृत्वाखाली बंड झाले. इ. स. १८१८ मध्ये मराठयांचा पराभव झाल्यानंतर कन्नड आणि वैजापूर हे औरंगाबाद जिल्ह्यातील दोन तालुके ब्रिटिशांनी निजामाला दिले. या भागात भिल्लांची वस्ती बरीच आहे. निजामाकडून मिळालेल्या अप्रत्यक्ष प्रोत्साहनामुळे चिल नाईक आणि इतर नेत्यांच्या नेतृत्वाखाली १८२० पासून १८४० पर्यंत भिल्लांनी ब्रिटिशांविरुद्ध बंड केले. ही सर्व बंडे ब्रिटिशांनी चिरडून टाकली. ब्रिटिश राजवटीत मराठवाडयात कापसाला नगदी पीक म्हणून महत्त्व प्राप्त झाले व त्याबरोबरच या भागात सावकारशाही शिरली. मराठवाडयातील जनतेला निजामाच्या जुलमी राजवटीविरुध्द संघर्ष करावा लागल्यामुळे या भागात आर्य समाज आणि लोकमान्य टिळकांच्या राजकीय मोहिमेला लोकप्रियता मिळाली.

भारत स्वातंत्र्यप्राप्तीच्या उंबरठयावर उभा असताना (१९४६) संकल्पित भारतीय संघराज्यात विलीन व्हावयाचे नाही असे निजामाने ठरविले. हैदराबाद संस्थान स्वतंत्र सार्वभौम असे राज्य ठेवण्यास्तव निजामाने उघड प्रयत्न सुरू केले. आपली सार्वभौम सत्ता व मुसलमानांचे हितसंबंध कायम ठेवण्यासाठी कासीम रझवीच्या नेतृत्वाखाली "इत्तेहाद-उल-मुसलमीन" नामक अतिरेकी, आक्रमक व लढाऊ संघटना निजामाच्या मदतीने उदयास आली. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलनास जातीय स्वरूप प्राप्त होऊन "सिव्हील वॉर" सारखा लढा सुरू झाला. एकूण मराठवाडयातील जनतेला ब्रिटिश, निजाम व मुसलमान हितसंबंधीयांविरुध्द लढावे लागले. याचे सांस्कृतिक व सामाजिक जीवनावर परिणाम झाल्यावाचून राहिले नाही. या सर्व भयानक संघर्षाचा शेवट करण्यासाठी वल्लभभाई पटेलांच्या धोरणानुसार भारत सरकारने हैदराबाद संस्थानावर सेनादल पाठवून निजाम व इत्तेहाद-उल-मुसलमीनचा समाचार घेतला. अखेरीस १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान व त्यातील मराठवाडयाची जुलूमातून मुक्तता झाली. त्यानंतरच तेथील प्रजाजनांना धार्मिक स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठवाडा प्रथम हैदराबाद राज्यात व नंतर १९५६ मध्ये मुंबई राज्यात आला. मराठी भाषिक महाराष्ट्र राज्याची १ मे १९६० रोजी निर्मिती झाल्यावर मराठी भाषिकांचा मराठवाडा महाराष्ट्राचा अविभाज्य घटक बनला. मराठवाडयाच्या शैक्षणिक व सामाजिक स्थितीतील मागासलेपणाची कारणे येथील ऐतिहासिक पार्श्वभूमीत शोधावी लागतात.

मराठवाडयातील समाजरचनेचे एक महत्त्वाचे वैशिष्ट म्हणजे त्यात दिसणा-या महार, मांग, चांभार इत्यादी मागासवर्गीय जातींचे लोकसंख्येतील जास्त प्रमाण. याचे एक कारण म्हणजे मराठवाडयात नागरी संस्कृतीची सुरुवात ऐतिहासिक काळात महाराष्ट्रातील इतर विभागांच्या तुलनेत सर्वप्रथम झाली. तसेच मराठवाडयात एकोणीसाव्या शतकात स्वतः शेती न कसता कुळांकडून व शेतमजुरांकडून शेती करणा-या जमीनदारांची संख्या जास्त होती. त्यामुळे शेतमजुरांना बरीच मागणी होती. म्हणून इतर भागांतूनही मराठवाडयात शेतमजूर स्थलांतरित झाले. यात दलितांचे प्रमाण जास्त होते. १९३१ च्या जनगणनेनुसार मराठवाडयात दलित जातींची लोकसंख्या एकूण लोकसंख्योच्या १७ प्रतिशत होती. त्यातील ९० टक्के दलित जनता ग्रामीण भागात राहत होती व यातील ७४ टक्के लोक शेतमजूर होते. हा दलित जातींच्या संख्याबलाचा फरक सोडल्यास मराठवाडयातील जातिव्यवस्था ही पश्चिम महाराष्ट्राशी मिळती जुळती आहे.[१६]

निजामाच्या अंमलाखाली मराठवाडयाची आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक प्रगती ठप्प झाली होती. १९५१ मध्ये मराठवाडयातील एकूण रस्त्यांची लांबी २,१६४ कि. मी. होती. ती १९७४ मध्ये ७,९४४ कि. मी. झाली. १९५४ साली एकाही खेडयात वीजपुरवठा नव्हता आणि वीज असलेल्या नगरांची संख्या फक्त पाच होती. वीजपुरवठा असणा-या खेडयांची आणि नगरांची एकूण संख्या १९७३-७४ साली ३,२४७ झाली. १९२१ साली मराठवाडयात शिक्षितांचे प्रमाण पुरूषांत पाच टक्के व स्त्रियात अर्धा टक्क्याहूनही कमी होते, ते १९५१ साली अनुक्रमे १५.७ व २.३ प्रतिशत झाले. १९५० पर्यंत मराठवाडयामध्ये पदवी पातळीचे शिक्षण देणारे एकही महाविद्यालय नव्हते. आता मराठवाडयामध्ये दोन विद्यापीठे, एक कृषि विद्यापीठ आणि अनेक महाविद्यालये आहेत.

यादव काळात मराठवाडयात मराठी भाषेचा विकास झाला व मराठीत अनेक ग्रंथ लिहिले गेले. मात्र मुसलमानी राजवटीत महाराष्ट्राच्या इतर विभागांशी मराठवाडयाचे सांस्कृतिक संबंध कमी राहिल्यामुळे येथील बोली भाषेत काही प्रादेशिक लकबी आल्या. या कालखंडात पश्चिम महाराष्ट्र प्रगतिपथावर राहिल्यामुळे तेथील मराठी ही ग्रंथ रचनेची भाषा झाली.

धार्मिकदृष्टया मराठवाडा महाराष्ट्रात आपले ऐतिहासिक महत्त्व टिकवून आहे. येथील संत परंपरेने महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायास बळकटी प्राप्त झाली. महाराष्ट्राचे आद्य दैवत तुळजा भवानी हिचे स्थान तुळजापूर हे मराठवाडयात आहे. भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी तीन ज्योतिलिंगे मराठवाडयात आहेत. औंढा नागनाथ, घृष्णेश्वर आणि परळी वैजनाथ येथील ज्योतिर्लिंग महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात प्रसिध्द आहेत. त्याचप्रमाणे अंबाजोगाई येथील जोगेश्वरी

ही महाराष्ट्रात प्रसिध्द असून अनेक कोकणस्थ ब्राह्मणांची कुलस्वामीनी आहे. अध्यात्म आणि सामान्य जनतेची करमणुकीची गरज यांची सांगड घालण्याची आवश्यकता या भागातील संत कवींनी ओळखली व त्या प्रकारची वाङ्‌मय निर्मितीही केली. एकनाथांचे भजनी, भारूड व गवळणी यांची लोकप्रियता संपूर्ण महाराष्ट्रात आहे. कलगी तुरा हा आध्यात्मिक लावणीचा प्रकार महत्त्वपूर्ण आहे. यात्रा हाही धार्मिक श्रध्दा व करमणूक यांना एकत्र आणणारा एक सांस्कृतिक प्रकार आहे व मराठवाडयातील ग्रामीण भागात याची लोकप्रियता बरीच आहे. नागरी भागात भरणा-या यात्रा उप-प्रादेशिक व प्रादेशिक संस्कृतीच्या निर्मितीच्या व ऐक्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. अशा यात्रांना मोठया संख्येने जनसमुदाय जात असतो व त्यात इतर प्रदेशातील जनतेचाही अंतर्भाव असतो. १९६१ च्या जनगणना अहवालानुसार एक लाखाहून अधिक संख्येने ज्या यात्रांना लोक येतात त्यात पैठणची नाथषष्ठी यात्रा, नांदेड जिल्हयातील मालेगाव येथील खंडोबाची यात्रा, उस्मानाबाद जिल्हयातील तुळजापूर येथील तुळजा भवानीची यात्रा तसेच लातूर येथील सिध्देश्वराची यात्रा प्रसिध्द आहेत.

देश अथवा दख्खन : कृष्णा व तिच्या उपनद्या घोड, मूळा-मुठा, नीरा, भीमा, कोयना यांनी तयार झालेल्या प्रदेशाचा अंतर्भाव देश अथवा दख्ख्न या विभागात होतो. यात पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर हे जिल्हे येतात. कृष्णा नदी वाहत असलेला सातारा जिल्हयाचा पश्चिम भाग, सांगली आणि कोल्हापूर या जिल्हयात येणारा प्रदेश अतिशय सुपीक आहे.

यादवांच्या काळात या भागाची विभागणी प्रामुख्याने क-हाड देश, माण देश, कोल्हापूर देश आणि मिरिंज देश अशा चार भागांत झाली होती. या प्रदेशावर सातवाहन, विष्णुकुण्डिल, बदामीचे चालुक्य, राष्ट्रकूट, कल्याणीचे चालुक्य, शिलाहार, यादव, दिल्लीचे सुलतान, बहमनी, विजापूरची आदिलशाही, मुघल, मराठे वगैरे राजघराण्यांचे राज्य होते. बहमनी, आदिलशाही व मुघल काळात बरेच मराठा सरदार राज्यकारभार चालवित. या राजसत्तांशी निष्ठा बाळगणारे हे मराठा सरदार आपापसात भांडणे करीत. त्यांच्यापासून जनतेला ब-याच वेळा त्रास होत असे. काही प्रसंगी अराजकासारखी स्थिती निर्माण होई. अशा पार्श्वभूमीवर शिवाजीचा उदय झाला. शिवाजी महाराजांनी समाजात व आपल्या सरदारांमध्ये स्वाभिमान, स्वामिनिष्ठा, धर्मनिष्ठा, स्वराज्य या प्रेरणा निर्माण केल्या. स्वराज्य स्थापून त्याचा विस्तार केला. शासनयंत्रणा सुधारून न्यायदानाची व्यवस्था लावून दिली. प्रागतिक मंडळींना उत्तेजन दिले. १७१३ पासून पेशवे प्रबळ झाल्यावर मराठी सत्तेचे वेंद्रस्थान पुण्याला गेले. पेशव्यांनी पुण्याला आपले मुख्यालय ठेवल्याने कर्तबगार ब्राह्मण व मराठे पुण्याला स्थायिक झाले. सत्तास्थान येताच बुध्दिजिवी ब्राह्मण व सारस्वत पुण्यात येऊ लागले. अल्पावधीत पुणे नगर सत्ता, विद्यादान, अध्ययन व धर्मकार्याचे वेंद्र बनले. त्याबरोबरच शिक्षणाची प्रगती झाल्याने ते महाराष्ट्राचे सांस्कृतिक वेंद्रही बनले. या परिवर्तनाचा या प्रादेशिक उपविभागाच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर मोठाच प्रभाव पडला. राजाश्रयामुळे या भागातील संस्कृती महाराष्ट्राच्या वेंद्रस्थानी झाली व महाराष्ट्राची सांस्कृतिक एकात्मता निर्माण करण्यात तिने महत्त्वाची भूमिका बजावली.

या प्रदेशाच्या ग्रामीण कृषिव्यवस्थेमध्ये मराठा जमीनदारांचा प्रभावी वर्ग निर्माण होऊन त्याचा प्रभाव सामाजिक व्यवस्थेवरही पडला. मराठा ही जात आर्थिक, सामाजिक आणि राजकीयदृष्टया प्रभावी जात म्हणून उदयास आली व तिच्या सामाजिक चालीरीतींचा प्रथा अन्य जातींवरही पडल्याचे दिसून येते. भोसलेंची कुलस्वामीनी भवानी ही सर्व महाराष्ट्राची कुलस्वामीनी झाली. मराठा जातीत राज्यकर्ता वर्ग तयार झाल्यामुळे या जातीत अंतर्गत अधिक्रमव्यवस्था निर्माण झाली व त्यातून पंचकुळी, शहाण्णवकुळी व सामान्य मराठे असे भेद निर्माण झाले. परंतु या जातीत असलेल्या विवाहाच्या अनुलोम पध्दतीमुळे हे विविध पोटगट नात्याच्या सामाजिक बंधनाने एकत्र बांधले गेले. ही प्रक्रिया केवळ याच प्रादेशिक विभागात घडली असे नसून महाराष्ट्राच्या अन्य प्रादेशिक विभागांमध्येही चालू राहिली व हे विभाग परस्परांशी जोडले गेले. अशा त-हेने महाराष्ट्रातील विविध उप-प्रदेशांच्या सांस्कृतिक ऐक्यात मराठा जातीची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. पेशवाईच्या उदयामुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणांना विशेषतः चित्पावन ब्राह्मणनांना राजाश्रय मिळाला व त्याचा परिणाम त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यात झाला. पुणे हे विविध प्रदेशांतील ब्राह्मणांचे आश्रयस्थान झाले व यातून मोरोपंतासारखे पंडित कवी निर्माण झाले. पुण्यातील ब्राह्मणांमध्ये प्रचलित असलेल्या मराठी भाषेत वाङ्‌मय निर्मिती होऊ लागली व ती संपूर्ण महाराष्ट्रात वाङ्‌मय निर्मितीची भाषा म्हणून मान्य पावली. तसेच पंडित कवींच्या काव्याने संपन्न झालेला हरदासी कीर्तन प्रकार शिष्टसंमत होऊन त्याचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात झाला. गणपती हे पेशव्यांचे कुलदैवत. त्यामुळे पेशवाईत या विभागात म्हणजे पश्चिम महाराष्ट्रात गणेशभक्तीला लोकप्रियता प्राप्त झाली व एकेकाळी अज्ञात असलेली या भागातील गणेश मंदिरे अष्टविनायकाची स्थाने म्हणून प्रसिद्धीस आली. या भागातील ब्राह्मणांपासून दलितांपर्यंत सर्व जातींना एकत्र आणारी देवता म्हणजे खंडोबा, जेजुरी, पाली यासारखी खंडोबाची महत्त्वाची क्षेत्रे या भागात आहेत.

ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्रात ज्या सामाजिक, राजकीय व धार्मिक चळवळी व सुधारणा आंदोलने झाली त्याची उगमस्थाने या भागातील पुणे, कोल्हापूर, सातारा, सोलापूर ही शहरे होती. मराठेशाही व पेशवाईत सर्वसामान्य जनतेत

लोकप्रिय झालेला करमणुकीचा प्रकार म्हणजे तमाशा. या कला प्रकाराचा उगम याच भागात मराठे सैनिकांच्या छावणीत झाला व नंतर मिळालेल्या राजाश्रयामुळे व लोकाश्रयामुळे याचा प्रसार या विभागात सर्वत्र झाला. कालांतराने ही लोककला महाराष्ट्राच्या इतर विभागांमध्येही परिचित झाली. तुकाराम आणि रामदास हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे दोन शिल्पकार शिवशाहीतच उदयास आले. रामदासाने मराठा तितुका मेळवावा व महाराष्ट्र धर्म हे मंत्र महाराष्टास देऊन महाराष्ट देशाच्या इमारतीचा आध्यात्मिक व सांस्कृतिक पाया घातला. या सर्व घटनांचा परिणाम येथील जनतेत सांस्कृतिक श्रेष्ठत्वाच्या भावनेच्या निर्मितीत झाला. त्यामुळे अन्य प्रादेशिक विभागाची संस्कृती गौण मानण्याकडे कल निर्माण झाला. परंतु स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लोकशाहीच्या प्रक्रियेमध्ये सर्व विभागातील जनतेला समान राजकीय अधिकार प्राप्त झाल्यामुळेही पश्चिम महाराष्ट्रातील जनतेत दिसणारी सांस्कृतिक श्रेष्टत्वाची भावना अन्य प्रादेशिक विभागांतील जनतेला (विशेषतः तेथील शिष्टजनांना) बोचू लागली व त्यातून प्रादेशिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची चळवळ महाराष्ट्रात सुरू झाली. मराठीतील अनेक नामवंत लेखकांनी महाराष्ट्राच्या विविध प्रदेशांतील सामाजिक जीवनाचे व संस्कृतीचे दर्शन आपल्या वाङ्मयीन कलाकृतींतून घडविले व प्रादेशीक संस्कृतीला केंद्रस्थानी आणले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्य संमेलनाबरोबर प्रादेशिक साहित्य संमेलनांनाही बरीच लोकप्रियता मिळत आहे. हे या बदलत्या सामाजिक व सांस्कृतिक जाणीवांचे द्योतक आहे. कलेल्या क्षेत्रातही आता प्रादेशिक कलांना मानाचे स्थान मिळत आहे. ऐतिहासिक परंपरेने चालत आलेली व विशिष्ट प्रदेशात दिसणारी सांस्कृतिक श्रेष्ठत्वाची भावना आता क्षीण झालेली दिसते. तिची जागा विविध प्रादेशिक संस्कृतीची समानता घेत आहे.

महाराष्ट्रातील ग्रामनामे आणि सांस्कृतिक उपविभाग

महाराष्ट्राचा मराठी प्रदेश या नात्याने झालेल्या जडणघडणीचा तसेच महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उप-विभागांची निसर्गाच्या आणि इतिहासाच्या मुशीतून निर्माण झालेली सामाजिक आणि सांस्कृतिक वैशिष्टये यांचा ठसा या राज्यातील ग्राम नामांवर पडलेला आहे. काही मर्यादेत ग्रामनामे आपल्याला महाराष्ट्राच्या आणि त्यातील उप-विभागांच्या सांस्कृतिक इतिहासाचे दर्शन घडवितात. या दृष्टिकोनातून महाराष्ट्रातील ग्राम नामांचे अध्ययन म्हणजे येथील सांस्कृतिक इतिहास जाणून घेण्याचे महत्त्वाचे साधन आहे.

महाराष्ट्रातील गावांच्या आणि शहरांच्या नावांकडे दृष्टिक्षेप टाकला असता दिसते की, ही नावे दोन प्रकारात मोडतात. एक प्रकार म्हणजे मूळ शब्दाला प्रत्यय लावून झालेली नावे व दुसरा प्रकार म्हणजे प्रत्यय नसलेली नावे. वडगाव, पंढरपूर, कोल्हापूर, नरसोबाची वाडी ही पहिल्या प्रकारच्या नावांची उदाहरणे आहेत.तर पूणे, नाशिक, चिपळूण, वेल्हे, नीरा ही दुस-या प्रकारच्या नावांची उदाहरणे. स्थूलमानाने असे म्हणता येईल की, महाराष्ट्रात प्रत्यय लावून तयार झालेली गावांची नावे संख्येने अधिक आहेत. ही नावे त्या त्या प्रदेशाचा इतिहास, निसर्ग, संस्कृती यांचे दर्शन घडवितात. महाराष्ट्रातील ग्रामनामांमध्ये अधिक प्रमाणात वापरले जाणारे प्रत्यय पुढीलप्रमाणे आहेत. गाव, पूर, वाडी, खेड, बली, ओली, वाडा, डर, घर आणि पुरी यापैकी "गाव" या प्रत्ययाचा वापर सर्वाधिक होतो. गाव हा शब्द ग्राम या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे. ग्राम हा शब्द ऋग्वेदात आहे व त्याचा अर्थ शेतीवर असलेले खेडे असा आहे. ग्राम या शब्दाप्रमाणे पूर हा शब्दही तटबंदी असलेल्या गावाला उद्देशून ऋग्वेदात वापरला आहे. बली, ओली, हे शब्दही पल्ली या संस्कृत शब्दापासून आले आहेत व त्यांचा अर्थ डोंगरातील अथवा पर्वतातील गाव असा आहे. महाराष्ट्रातील ग्राम नामांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून विचार करता दिसते की इसवी सनाच्या पाचव्या शतकाच्या आधीची ग्रामनामे मुख्यत्वे प्राकृतमध्ये आहेत. मात्र त्यानंतरची ग्रामनामे संस्कृतमध्ये किंवा प्राकृत नावांचे संस्कृतीकरण केलेली आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे पाचव्या शतकानंतर उत्तर भारतातील संस्कृत भाषिक लोकांकडे येथील समाजाचे नेतृत्व आले. बाराव्या शतकानंतर यादव काळात मराठी ग्रामनामांचा आणि प्रत्ययांचा वापर अधिक प्रमाणात होऊ लागला. महाराष्ट्रावर मुसलमानी राजवट सुरू झाल्यावर मात्र पर्शिअन व अरबी शब्दांचा प्रभाव ग्रामनामांवर पडू लागला. "आबाद" हा प्रत्यय प्रसिध्द पुरुषांच्या नावापुढे लावून या काळात काही नगरांची नावे अस्तित्वात आली. याची उदाहरणे म्हणजे औरंगाबाद, दौलताबाद, एदलाबाद, ममुराबाद, उस्मानाबाद ही नावे होत. ज्याप्रमाणे आबाद हा उर्दू प्रत्यय लावून काही नगरांची नावे अस्तित्वात आली त्याचप्रमाणे पूर व नगर हे संस्कृत प्रत्यय उर्दु नावापुढे लागून काही नावे तयार झाली. उदाहरणार्थ अहमदनगर, रहिमतपूर, इस्लामपूर, निजामपूर, फैजपूर.

पाचव्या शतकानंतर महाराष्ट्रात प्राकृत नावांचे संस्कृतीकरण करण्याची प्रक्रिया चालू झाली असावी. या नावांचा वापर शासन व्यवहारात व शिष्टजनांच्या व्यवहारात झाला असावा. प्राचीन शिलालेख,ताम्रपट यामध्ये उल्लेख आलेल्या काही संस्कृत ग्रामनामांची आधुनिक रूपे काय आहेत हे खालील उदाहणांवरून दिसून येईल :-

प्राचीन संस्कृत नाव	आधुनिक मराठी रूप
बालेग्राम	बाळेगाव
आलंदिग्राम	आळंदी
खांबग्राम	खामगाव
कुरेग्राम	कोरेगाव
श्रीनिलय	शिरवळ

ज्याप्रमाणे प्राकृत नावांचे संस्कृतीकरण झाले त्याचप्रमाणे संस्कृत नावे अथवा प्रत्यय यांचेही प्राकृतीकरण होत होते. याचे उदाहरण म्हणजे पूर या प्रत्ययाचे नवव्या शतकानंतर "वुर" असे रूपांतर झाले व सिरिपूर या संस्कृत नावाचे सिरुर हे आधुनिक रूपांतर झाले.

ज्याप्रमाणे ग्राम नामांतून इतिहासाच्या पाऊलखुणा दिसतात त्याचप्रमाणे त्यांतून महाराष्ट्रातील सांस्कृतिक उप-विभागांना लाभलेल्या निसर्गाच्या, इतिहासाच्या व समाज आणि संस्कृतीच्या विशेषतांचे दर्शनही होते. या दृष्टीने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक उप-विभागांतील ग्रामनामांची वैशिष्टये खाली दाखविली आहेत.

प्राचीन महाराष्ट्रात संस्कृतीचा उदय आणि विकास प्रामुख्याने गोदावरीच्या खो-यात तसेच पूर्णा आणि वर्धा-वैनगंगेच्या खो-यात म्हणजेच स्थूलमानाने मराठवाडा आणि विदर्भ विभागात झाला. या भागात सातवाहन, वाकाटक व यादव यांची साम्राज्ये उदयास आली आणि त्यांनी येथे संस्कृतीचा विकास घडवून आणण्यात मोठे योगदान दिले. उत्तर भारतातील संस्कृत भाषिकांच्या आर्य संस्कृतीचा प्रसार यांच्या कारकिर्दीत झाला. या गोष्टीचा प्रभाव या भागातील ग्राम नामांवर पडले दिसतो. संस्कृत ग्राम या नावापासून झालेले गाव हेरूप वापरून झालेली गावांची नावे या भागात सर्वात अधिक आहेत. इरावती कर्वे यांनी ग्रामनामांच्या केलेल्या विश्लेषणानुसार गाव हा प्रत्यय असलेल्या १,१३० ग्रामनामांपैकी ४४९ गावे गोदावरीच्या खो-यात व ३८१ गावे पूर्णा व वर्धा-वैनगंगेच्या खो-यात आहेत. १८० गावे कृष्णा -भीमेच्या खो-यात, तर कोकणात ६१ व खानदेशात ५९ आहेत. यावरून स्पष्ट दिसते की, कमी अधिक प्रमाणात महाराष्ट्रातील सर्व उप-विभागांवर संस्कृतोद्भव संस्कृतीचा प्रभाव असला तरी तो गोदावरीच्या खो-यात सर्वाधिक दिसतो.[१७]

गाव या प्रत्ययाप्रमाणेच पूर आणि पूरी हेही संस्कृत प्रत्यय होत व ते विशिष्ट प्रकारच्या गावासाठीच म्हणजे तटबंदी असलेल्या गावांसाठी वापरले जात. या प्रत्ययांचाही वापर गोदावरीच्या खो-यात तसेच पूर्णा-वर्धा-वैनगंगेच्या खो-यात अधिक झालेला दिसतो. पूर या प्रत्ययाचा वापर ज्या ५५५ गावांच्या संदर्भात झाला आहे त्यातील २७२ गावे विदर्भात म्हणजे पूर्णा-वर्धा-वैनगंगेच्या खो-यात आहेत व त्या खालोखाल १९२ गावे गोदावरीच्या खो-यात आहेत. त्याचप्रमाणे पूरी हा प्रत्यय लावलेल्या ५१ गावांपैकी ३१गावे गोदावरीच्या खो-यात व १२ गावे विदर्भात आहेत.

वाडी हा प्रत्यय असलेली गावे विशेषकरून गोदावरी खो-यात व त्यानंतर कृष्णा-भीमेच्या खो-यात दिसतात. हा प्रत्यय असलेल्या ३६१ गावांपैकी १९५ गावे गोदावरीच्या खो-यात व ९९ गावे कृष्णा-भीमेच्या खो-यात आहेत.

कोकण विभागाची खास भौगोलिक विशेषता म्हणजे तेथील डोंगराळ प्रदेश. यामुळे या प्रदेशातील गावांची रचना ही इतर प्रदेशांपेक्षा निराळी आहे. वली व ओली हे प्रत्यय कोकणचे नैसर्गिक वैशिष्टये दाखवितात. पल्ली या संस्कृत शब्दांपासून हे प्रत्यय आले आहेत व त्याचा अर्थ डोंगरातील अथवा पर्वतातील गाव असा आहे. वली हा प्रत्यय असलेल्या ११४ गावांपैकी ९१ गावे कोकण विभागातील आहेत. ओली हा प्रत्यय असलेल्या ११० गावांपैकी २३ गावे कोकणातील आहेत. कोकणातील भूमी उंच सखल असून देशावरील केंद्रित पध्दतीची म्हणजे बहुसंख्य वस्ती एकत्र असलेली खेडी येथे दिसत नाहीत. विकेंद्री पध्दतीची खेडी या भागात सर्वसामान्यपणे दिसतात. हे वैशिष्टय घर या प्रत्ययातून स्पष्ट होते. हा प्रत्यय असलेल्या ५६ गावांपैकी ३६ गावे कोकणातील आहेत. तसेच वाडे हा प्रत्यय असलेल्या ४६ गावापैकी २१ गावे कोकणातील आहेत.

वाडी हा ग्रामीण वस्तीचा प्रकार वेंगद्रित पध्दतीच्या खेडयांशी संलग्न आहे. अशा खेडयांच्या विस्तारित वस्तीला वाडी हे नाव मिळते व कालांतराने त्याचे रूपांतर स्वतंत्र खेडयात होते. अशी विस्ताराची प्रक्रिया सलग प्रदेशातच होऊ शकते. त्यामुळे वाडी हा प्रत्यय असलेली गावे कोकणात क्वचित दिसतात. वाडी प्रत्यय असलेल्या ३६१ गावापैकी फक्त ८ गावे कोकणात होती, तर १९५ गावे गोदावरीच्या खो-यात, ९९ कृष्णा-भिमेच्या खो-यात, १४ खानदेशामध्ये आणि ४५ पूर्णा-वर्धा-वैनगंगा खो-यात होती.

खानदेश हा महाराष्ट्राचा उत्तर सीमावर्ती प्रदेश. खानदेशची काही सीमा गुजरात राज्याला भिडली असून या प्रदेशावर गुजराती संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. याचा उल्लेख यापूर्वी आला आहे. हा प्रभाव ग्रामनामांतूनही दिसतो. वड, ओड आणि डे हे प्रत्यय असलेल्या एकूण ४७ गावांपैकी ३७ गावे खानदेशमध्ये आहेत. हे प्रत्यय असलेली गावे गुजरातमध्ये मोठया संख्येने आहेत.

ज्याप्रमाणे खानदेशवर गुजरातचा प्रभाव दिसतो त्याचप्रमाणे दक्षिण या महाराष्ट्रातील सांगली, मिरज, कोल्हापूर या भागावर कन्नड भाषेचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. या भागातील बरीच ग्रामनामे कन्नड प्रत्यय लावून झालेली आहेत.

वरील विवेचनावरून महाराष्ट्रात तसेच येथील प्रादेशिक उप-विभागांची सामाजिक व सांस्कृतिक जडणघडण प्राचीन कालखंडापासून आधूनिक कालखंडापर्यंत कशी होत गेली ते स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या प्रादेशिक उपविभागांना जी भौगोलिक विविधता लाभली त्याच्या पायावर पुढील सामाजिक आणि सांस्कृतिक विकास होत गेला. भौगोलिक विविधतेच्या पायावर महाराष्ट्राच्या प्राचीन काळापासून अर्वाचीन कालखंडापर्यंत घडलेल्या राजकीय इतिहासाने पुढील सामाजिक आणि सांस्कृतिक विकासाची दिशा ठरविली. प्राचीन कालखंडात हा इतिहास घडविण्यात महाराष्ट्राबाहेरील राजघराण्यांनी योगदान दिले व हळूहळू याचा वेंग्द्रबिंदू महाराष्ट्रात आला. मराठी सत्तेच्या उदयापासून स्वयंशासनाच्या दिशेने मराठी जनतेची वाटचाल सुरू झाली व स्वातंन्त्र्य प्राप्तीनंतर ही प्रक्रिया एका महत्त्वाच्या टप्प्यावर येऊन पोहेाचली. महाराष्ट्र आणि त्याचे उप-विभाग यांच्या सांस्कृतिक विकासामध्ये सांस्कृतिक देवाणघेवाणीचा महत्त्वाचा वाटा आहे. या प्रक्रियेत राजकीय सत्तेचेही महत्त्वाचे योगदान राहिले आहे. राजकीयदृष्टया प्रबल असलेल्या विभागाची संस्कृती काही प्रमाणात इतर विभागांनी आत्मसात केली, तर उप-विभागांचे काही सांस्कृतिक पैलू महाराष्ट्राच्या विशाल सांस्कृतिक प्रवाहात सामील झाले. ही विशाल सांस्कृतिक परंपरा व लघु सांस्कृतिक परंपरा यामधील देवाणघेवाणीची प्रक्रीया आजच्या काळातही चालू असल्याचे दिसते.

Maharashtra State Gazetteers

तळटिपा

[१] द. ह. अग्निहोत्री, महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान, सूविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, पुणे, १९७७.

[२] एस. बी. देव, "दि जेनेसिस ऑफ महाराष्ट्र हिस्टरी ॲण्ड कल्चर," **बुलेटिन ऑफ डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिटयूट,** खंड ४३, पुणे, १९८४.

[३] कित्ता.

[४] कित्ता.

[५] सुमती मुळे, **स्टडीज इन हिस्टॉरिकल ॲंड कल्चरल जिऑग्राफी ॲंड एथ्नोग्रॅफी ऑफ दि डेक्कन** (बेस्ड एंटायरली ऑन दि इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि डेक्कन फ्रॉम फर्स्ट टु थर्टिन्थ सेंच्युरी ए. डी.), डेक्कन कॉलेज, पुणे, १९७२.

[६] कित्ता.

[७] कि. का. चौधरी (संपा.), **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ. ९४-९५ यात सविस्तर इतिहास दिलेला आहे.

[८] कित्ता, पृ. ९७-१२०.

[९] कित्ता, पृ. १२१-२२.

[१०] **कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** १९६४.

[११] कि. का. चौधरी, "संस्कृति" **जळगाव गॅझेटिअर,** १९९४,पृ. ७३८-३९.

[१२] याबाबत आणि या परिसरातील सांस्कृतिक आसमंत, साहित्य निर्मिती, वास्तुकला याबाबत कि. का. चौधरी यांनी "इतिहास" व "संस्कृति" **जळगाव गॅझेटिअर,** १९९४ यात अत्यंत सखोल माहिती दिलेली आहे.

[१३] कि. का. चौधरी (संपा.), **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ,३९-४०.

[१४] कित्ता, पृ.४२-५९.

[१५] सुलभा ब्रह्मे, अशोक उपाध्याय, **क्रिटिकल ॲनॅलिसिस ऑफ दि सोशल फॉर्मेशन ॲड पेझेंट रेझिस्टन्स इन महाराष्ट्र,** खंड ३, पुणे, १९७९.

[१६] कित्ता.

[१७] इरावती कर्वे, **महाराष्ट्र लॅड ॲण्ड इटस् पीपल, महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअरे** १९६८.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ४ : सामाजिक संघटना

जात, जमात आणि धार्मिक गट

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि. ना. वाळुंजकर यांनी केले आहे.)

श्रमविभाजन आणि त्या अनुषंगाने निर्माण होणारे सामाजिक विभेदन हे मानवी समाजाचे व्यवच्छेदक लक्षण आहे. कोणताही मानवी समाज असा नाही की, तेथे श्रमविभाजनाचे तत्त्व अमलात आले नाही. शिकार आणि कंदमुळे व फळे यावर गुजराण करणा-या आदिम समाजातही प्राथमिक अवस्थेतील लिंगभेद आणि वयावर आधारलेले श्रमविभाजन अस्तित्वात असल्याचे आपणास दिसते. याचे प्रमुख कारण म्हणजे श्रमविभाजन हे मानवाच्या भौतिक व अभौतिक गरजांच्या पूर्तीसाठी आवश्यक आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा होत. जसजसा समाज विकसित होत जातो तसतसा प्राथमिक गरजांबरोबर सामाजिक व सांस्कृतिक गरजांचाही विकास होतो व या गरजांच्या पूर्तीसाठी श्रमविभाजनाच्या पध्दतीचा विकास होऊ लागतो व श्रमविभाजन अधिक सूक्ष्म होऊन विशेष कौशल्य व ज्ञान यावर ते आधारले जाऊ लागते. मानवी समाजाच्या प्राथमिक अवस्थेत मानवाची बहुतेक शक्ती व वेळ प्राथमिक गरजांच्या पूर्तीसाठी खर्च होत असे. ज्यावेळी मानवाला शेतीची कला अवगत झाली व शेतीच्या तंत्रामध्ये जसजसा विकास होत गेला तसतसा समाजातील काही लोकांना आपला वेळ शेतीच्या कामात खर्च न करता सामाजिक व सांस्कृतिक गरजांच्या पूर्तीसाठी खर्च करणे शक्य होऊ लागले. यातून समाजात या गरजांच्या पूर्ती करणा-या विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविणा-या व्यक्तींचे प्रशासक, कलाकार, संगीतकार, शिक्षण तज्ञ, पुरोहित, विचारवंत, शास्त्रज्ञ असे विविध सामाजिक वर्ग तयार होऊ लागले. अशा त-हेने श्रमविभाजनाशी संबंधित सामाजिक विभेदनाच्या प्रक्रीयेचा विकास होत गेला.

ऋग्वेदातील वर्णनावरून दिसते की, वेद काळात भारतामध्ये कृषिप्रधान समाजरचना अस्तित्वात आली.[१] महाराष्ट्रात कृषिप्रधान संस्कृतीची सुरुवात इ.स. पूर्व १००० अथवा त्याहून आधी झाली असावी असे विविध उत्खननांतील पुराव्यांवरून दिसते.[२] या काळातील खेडयांमध्ये व्यवसायाप्रमाणे वसाहती असल्याचे दिसते. यादव काळामध्ये म्हणजे सुमारे अकराव्या शतकात व्यावसायिक गटाच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे दिसते. अशा गटांच्या श्रेणी अस्तित्वात आल्या व त्यांची वाटचाल आत्मनिर्भरतेकडे होऊ लागली. व्यापा-यांच्या श्रेणींचे स्वतंत्र सैन्यही असे.[३] ही कृषिप्रधान समाजरचना भारताप्रमाणे महाराष्ट्रात मध्ययुगीन कालखंडात पूर्णपणे विकसित झाली व तिने आपले अस्तित्व आधुनिक कालखंडाच्या सुरुवातीपर्यंत म्हणजे एकोणिसाच्या शतकापर्यंत टिकवून ठेवले. ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर महाराष्ट्रात यंत्रयुगाची सुरुवात झाली व औद्योगिक संस्कृतीचा उदय झाला.

महाराष्ट्रातील कृषिप्रधान समाजव्यवस्थेत व्यावसायिक भिन्नतेचे स्वरूप कसे होते हे तत्कालीन वाङ्मयावरून दिसून येते. परंतु या वर्णनातून विविध व्यावसायिक गटांचे संख्याबल कसे होते हे फारसे समजू शकत नाही. संपूर्ण भारत ब्रिटिश शासनाखाली आल्यावर दर दहा वर्षाने भारताची जनगणना करण्याची पध्दती शासनाने सुरू केली. पहिली व्यवस्थित जनगणना १८७२ मध्ये व दुसरी जनगणना १८८१ मध्ये करण्यात आली. यानंतर दर दहा वर्षांनी संपूर्ण देशाची जनगणना होऊ लागली. या जनगणनांव्दारा देशाविषयी भौगोलिक, लोकसंख्याविषयक, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक माहिती शासनाला व जनतेला उपलब्ध होऊ लागली. भारतातील परंपरागत समाजव्यवस्था पहिल्या महायुध्दाच्या प्रारंभापर्यंत ब-याच प्रमाणात आपले मूळ स्वरूप टिकवून होती, हे मान्य केल्यास १९११ पर्यंत झालेल्या जनगणनेव्दारा जी माहिती उपलब्ध झाली आहे त्या आधारे परंपरागत समाजव्यवस्थेचे चित्र तयार करता येते.

महाराष्ट्रातील पारंपरिक समाजाचे असे चित्र तयार करावयाचे झाल्यास काही अडचणींना तोंड द्यावे लागते. यातील प्रमुख अडचण म्हणजे ज्या भूभागाला आज महाराष्ट्र राज्य म्हणून ओळखले जाते त्याचे स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९६० पर्यंत तीन प्रशासकीय प्रांतांमध्ये विभाजन आणले होते. हे तीन प्रांत म्हणजे मुंबई इलाखा, मध्यप्रांत आणि व-हाड आणि हैदराबाद संस्थान होय. मुंबई इलाख्यामध्ये कोंकण व दख्ख्नचे पठार अथवा देश हा मराठी भाषिक भूभाग समाविष्ट होता. त्याचप्रमाणे मध्यप्रांत आणि व-हाड यामध्ये मराठी भाषिक विदर्भ समाविष्ट होता,

आणि हैदराबाद संस्थानामध्ये मराठी भाषिक मराठवाडा होता. हे सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र करून १९६० मध्ये मराठी भाषिक महाराष्ट्राची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे १९६० पूर्वी झालेल्या जनगणनांच्या अहवालांमधून महाराष्ट्राचे एकसंघ चित्र मिळत नाही. हे चित्र वर उल्लेखिलेल्या तीन प्रांतांच्या जनगणनांच्या अहवालांवरून तयार करावे लागते. अशाप्रकारे प्राप्त झालेले चित्र हे सत्य परिस्थितीशी पूर्णांशाने मिळतेजुळते जरी नसले तरी ब-याच प्रमाणात ते सत्य परिस्थितीच्या जवळ जाते. ही गोष्ट लक्षात घेऊन महाराष्ट्राच्या सामाजिक संघटनेचे विवेचन पुढील परिच्छेदांमध्ये केले आहे.

व्यवसाय

भारतीय समाज व पर्यायाने महाराष्ट्रातील समाजाचे परंपरागत स्वरूप कृषिप्रधान समाजाचे आहे. अशा समाजात कृषी व्यवसायाला महत्त्वपूर्ण स्थान असते. संपूर्ण सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर कृषी व्यवसायाचा प्रभाव पडल्याचे दिसते. समाजातील बहुसंख्य लोक कृषी व्यवसायावर अवलंबून असतात. इतर व्यवसायांचा विकासही अशा समाजात कृषी व्यवसायाभोवती होतो. १९११ च्या या जनगणनेच्या वेळी विविध व्यवसायांचे समाजधारणेच्या दृष्टीने महाराष्ट्राशी संबंधित असलेल्या तीन प्रांतांत स्थान कसे होते हे तक्ता क्रमांक १ मध्ये दाखविले आहे.

तक्ता क्रमांक १

लोकसंख्येचे विविध व्यवसायांत असलेले प्रतिसहस्त्र प्रमाण (१९११)

व्यवसाय गट	मुंबई इलाखा	मध्यप्रांत आणि व-हाड	हैदराबाद संस्थान
कृषी, मासेमारी, पशुपालन	६८४	७८५	६२७
खनिज उत्पादन	२	२	१
उद्योग	१२५	१०४	१४०
वाहतूक	३१	१४	१०
व्यापार	६२	४१	८५
लोक संरक्षक दल	७	११	१२
लोक प्रशासन	१८	७	२६
व्यवसाय	१९	१६	१६
स्वतःच्या उत्पन्नावर अवलंबून	४	१	२
घरगुती सेवा	१७	१०	३२
अनिश्चित स्वरूपाचछ	१९	२	२९
अनुत्पादक	१३	७	२०

तक्ता क्रमांक २

मुंबई शहर, कोकण आणि देश या विभागातील लोकसंख्येचे प्रमुख व्यवसायगटांत असलेले प्रतिसहस्त्र प्रमाण (१९११)

व्यवसाय गट	मुंबई शहर	कोकण	देश
कृषी	१२	७४७	७०४
उद्योग	३३१	६८	११९
वाहतूक आणि व्यापार	२८९	६३	६०
व्यवसाय	३६	१३	१६

कृषी व्यवसायावर अवलंबून असणा-या लोकांचे दर हजारी प्रमाण मुंबई इलाख्यात ६८४, मध्यप्रांत व व-हाडमध्ये ७८५ आणि हैदराबादमध्ये ६२७ होते. अन्नोत्पादन व्यवसायानंतर दुसरा महत्वपूर्ण व्यवसायांचा गट म्हणजे विविध

प्रकारच्या कच्च्या मालापासून निरनिराळया उद्योगांव्दारे पक्का माल अथवा व्यवहारोपयोगी वस्तू बनविणे, त्याची निरनिराळया ठिकाणी वाहतूक करून पुरवठा करणे व त्याची विक्री करणे याच्याशी संबंधित उद्योग, वाहतूक व व्यापार हे व्यवसाय अंतर्भूत असणारा गट. या व्यावसायिक गटावर अवलंबून असणा-या लोकांची संख्या दर हजारी मुंबई इलाख्यात २१६, मध्यप्रांत व व-हाडमध्ये १५९ व हैदराबाद संस्थानमध्ये २३५ होती. लोक संरक्षक दल या व्यावसायिक गटात सैन्यदल, नाविक दल आणि पोलीस या तीन सेवांचा अंतर्भाव केला आहे. लोक संरक्षक दलावर अवलंबून असणा-या लोकांची संख्या दर हजारी मुंबई इलाख्यात ७, मध्यप्रांत आणि व-हाडात ११ आणि हैदराबादमध्ये १२ होती. लोक प्रशासन सेवेवर अवलंबून असणा-या लोकांची संख्या दर हजारी मुंबई इलाख्यात १८, मध्यप्रांत आणि व-हाडात ७ तर हैदराबादमध्ये २६ होती. डॉक्टर, वकील, शिक्षक, पुरोहित इत्यादी व्यवसाय करण्यासाठी दीर्घकाळ शिक्षणाची आवश्यकता असते. त्यामुळे त्यांच्या संदर्भात धंदा हा शब्द न वापरता व्यवसाय हा शब्दप्रयोग केला जातो. अशा व्यवसायांवर अवलंबून असणा-या या लोकांचे दर हजारी प्रमाण मुंबई इलाख्यात १९, मध्यप्रांत व व-हाडमध्ये १६ व हैदराबादमध्येही १६ होते. घरगुती सेवेवर अवलंबून असणा-या लोकांचे प्रमाण दर हजारी मुंबई इलाख्यात १७, मध्यप्रदेश व व-हाडमध्ये १० तर हैदराबादमध्ये ३२ होते. वरील विवेचनावरून कृषिप्रधान समाजरचनेत विविध व्यवसायांत लोकसंख्येची विभागणी कशाप्रकारे होते याची कल्पना येते.

महाराष्ट्राचे कोकण, दख्खन अथवा देश, विदर्भ आणि मराठवाडा हे जे चार प्रादेशिक विभाग आहेत त्यातील कोकण आणि दख्खन या विभागांतील लोकसंख्येची विभागणी १९११ च्या जनगणनेच्या वेळी विविध व्यवसायांमध्ये कशी झाली होती हे तक्ता क्रमांक २ मध्ये दाखविले आहे. त्यामध्ये मुंबई शहरातील लोकसंख्येची प्रमुख व्यवसायांत झालेली विभागणी स्वतंत्रपणे दाखविली आहे.

तक्ता क्रमांक २ वरून कोकण आणि देश विभागांचे कृषिप्रधान स्वरूप लक्षात येते. कोकण अधिक कृषिप्रधान होता. शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे दर हजारी प्रमाण कोकणात ७४७, तर देशावर ७०४ होते. मात्र मुंबई शहरात शेतीवर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण फक्त १२ होते. मुंबईचे देशातील प्रमुख औद्योगिक व व्यापारी शहर असे स्वरूप उद्योग आणि व्यापार यावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणातून स्पष्ट होते. मुंबईत उद्योगांवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ३३१ व व्यापारावर अवलंबून असणा-यांचे प्रमाण २८९ प्रतिसहस्त्र होते. दख्खनच्या तुलनेने कोकणचा औद्योगिक विकास कमी प्रमाणात झाला होता हे या क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण पहाता स्पष्ट होते. थोडक्यात १९११ साली महाराष्ट्राच्या प्रमुख प्रादेशिक विभागांत प्रथम क्रमांकावर शेती, दुसऱ्या क्रमांकावर उद्योग व तिसऱ्या क्रमांकावर व्यापार होता. अशीच परिस्थिती विदर्भ आणि मराठवाड्यात असावी असे मध्यप्रांत आणि वऱ्हाड, व हैदराबाद या प्रांतांच्या आकडेवारीवरून दिसून येते.

व्यवसायांच्या क्षेत्रात भारतीय समाजाचे नजरेत भरणारे आणि जगातील इतर पारंपारिक कृषिप्रधान समाजात न दिसणारे वैशिष्ट्य म्हणजे व्यवसायाची जातीवर आधारलेली व्यवस्था किंवा जातिनिष्ठ उत्पादन पद्धती. भारतातील हिंदू समाज हा विविध जातींमध्ये विभागला गेला आहे व परंपरेने प्रत्येक जातीला एक विशिष्ट व्यवसाय नेमून दिला आहे. हा व्यवसाय करण्याचा हक्क व बंधन हे त्या जातीत जन्मलेल्या व्यक्तींवर आहे या तत्त्वाच्या आधारावरच भारतातील परंपरागत कृषी अर्थव्यवस्थेची उभारणी झाली आहे. भारतातील सर्व प्रादेशिक समाजात या पद्धतीचा अवलंब होत आला आहे. महाराष्ट्रातील समाजही या तत्त्वाला अपवाद नाही. विविध व्यवसाय आणि हे व्यवसाय करण्याची परंपरा असलेल्या जाती यांचे समीकरण महाराष्ट्रातील परंपरागत समाजात बऱ्याच प्रमाणात अस्तित्वात असल्याचे दिसते. १९११ च्या जनगणनेच्या वेळी जात आणि व्यवसाय यांचे संबंध महाराष्ट्रात कसे होते याचे विवेचन पुढील परिच्छेदांमध्ये केले आहे. हे विवेचन करताना मुंबई इलाखा, मध्यप्रांत व वऱ्हाड, आणि हैदराबाद संस्थान या प्रांतात विभागल्या गेलेल्या मराठी भाषिक जातींचाच, किंवा ज्या जाती महाराष्ट्रातील जाती म्हणून परंपरेने मानल्या आहेत, अशा जातींचाच विचार केला आहे.

कृषि व्यवसाय : परंपरेने शेती व्यवसाय करणाऱ्या महाराष्ट्रातील जातींमध्ये कुणबी व मराठा या प्रमुख जाती होत. १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यात कुणबी जातीची लोकसंख्या २४,८९,२३० होती व यातील शेतीचे काम करणाऱ्यांचे दर हजारी प्रमाण ६१६ होते व शेतमजूर म्हणून काम करणाऱ्यांची संख्या दर हजारी २९३ होती. शेतमजूर म्हणजे मालकी हक्क नसलेले शेतकरी ही वस्तुस्थिती जर मान्य केली तर कुणबी जातीतील काम करणाऱ्या व्यक्तींपैकी ९१ टक्के लोक कृषी क्षेत्रात काम करीत होते हे स्पष्ट दिसते. कुणबी जातीप्रमाणे शेतीची परंपरा मानणारी दुसरी जात म्हणजे मराठा. मराठा जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात ३२,७९,४९६ होती. मराठा आणि कुणबी या दोन जातींमध्ये व्यवसायाच्या दृष्टीने प्रमुख फरक म्हणजे सैनिकी पेशा. मुंबई इलाख्याच्या १९११ च्या जनगणनेप्रमाणे मराठा जातीतील एकूण काम करणाऱ्या लोकसंख्येतील ५४.६ टक्के लोक प्रत्यक्ष शेती करीत होते, १४.९ टक्के लोक शेतमजूर होते आणि १.६ टक्के लोक प्रत्यक्ष शेती न करता शेतीचा खंड घेत होते. या सर्वांची एकूण टक्केवारी ७१.१ होती.

ऐतिहासिक काळामध्ये निरनिराळ्या जातीतील लोकांना त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून इनाम जमीन देण्याची पद्धती होती. परंतु अशी जमीन स्वतः न कसता परंपरेने शेतकरी असलेल्या जातीतील लोकांच्याकडून बटाई अथवा इतर पद्धतीने कसून घेत असत. अशा जातींचेही शेतीच्या क्षेत्रात हितसंबंध गुंतलेले असत व शेती हे आपल्या उपजिविकेचे साधन असल्याचे अशा जातीतील लोक मानत असत. परंतु शेती हा त्यांचा परंपरागत व्यवसाय म्हणून मानला जात नसे.

मराठा आणि कुणबी या परंपरेने शेती करणाऱ्या जातींखेरीज महाराष्ट्रात आदिवासी जमातीत गणना होणाऱ्या काही जमाती कृषी व्यवसायात बहुसंख्येने असल्याचे दिसून येते. त्यात ठाकूर यांचा उल्लेख करता येईल. १९११ च्या मुंबई इलाख्याच्या जनगणनेनुसार आगरी जातीतील ७६ टक्के लोक शेतीचा व्यवसाय करीत व १४ प्रतिशत लोक शेतमजूर होते. ठाकुरांच्यामध्ये शेती करणारे ६१ प्रतिशत तर शेतमजूर म्हणून काम करणारे ३२ प्रतिशत होते. याखेरीज महाराष्ट्रातील वंजारी जातीतील लोकही शेती व्यवसायात मोठ्या संख्येने आहेत. १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यातील वंजारी जातीतील दर हजारामध्ये ५३२ लोक शेती करीत व ३७२ शेतमजुरी करीत.

पशुपालन : अन्नोत्पादक व्यवसायांच्या वर्गामध्ये शेतीबरोबर पशुपालन व मासेमारी या व्यवसायांचाही समावेश होतो. बहुतेक शेती करणाऱ्या जाती दुय्यम व्यवसाय म्हणून गाई, म्हशी इत्यादी जनावरे पाळण्याचाही व्यवसाय करतात. परंतु महाराष्ट्रातील अहीर जात पशुपालन हा आपला परंपरागत धंदा आहे असे मानते. १९११ मध्ये अहीर जातीची मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १,८३,९१९ होती. अहीर लोक गाई पाळण्याचा व्यवसाय परंपरेने करतात. परंतु १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यात अहीर जातीतील काम करणाऱ्या दर हजार व्यक्तींमध्ये १८८ लोक शेती करीत, ३३४ शेतमजूर म्हणून काम करीत व ३७१ लोक उद्योगाच्या क्षेत्रात आणि १०७ लोक इतर व्यवसायात काम करीत होते. याचा अर्थ पशुपालन हा अहीरांचा दुय्यम व्यवसाय झालेला आहे.

पशुपालनामध्ये मोडणारा दुसरा धंदा म्हणजे मेंढ्या पालनाचा. महाराष्ट्रातील धनगर जात परंपरागत मेंढपाळ म्हणून प्रसिद्ध आहे. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात धनगरांची लोकसंख्या ३,१८,२१५ होती. मराठवाड्यात १९०१ साली धनगरांची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ६ टक्के होती.[४] मेंढपाळ म्हणून धनगरांतील किती लोक १९११ च्या जनगणनेच्या वेळी काम करीत होते याचा स्वतंत्र आकडा उपलब्ध नाही. धनगर, गुजरातमधील भरवाड, व कर्नाटकातील कुरुबा या तीन जाती पारंपारिक मेंढपाळ म्हणून गणल्या गेल्यात. या तिन्ही जातींच्या एकत्रित लोकसंख्येतील दर हजारातील ३९८ लोक शेती करीत होते, ३३८ लोक शेतमजुरी करीत, व १३२ लोक मेंढपाळी करत होते. यावरून निव्वळ मेंढपाळीवर उपजीविका करणाऱ्यांची संख्या परंपरेने मेंढपाळीचा व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये कमी होती. मेंढपाळीच्या जोडीला शेती करण्याचा कलही धनगरांच्यामध्ये मोठया प्रमाणावर दिसतो.[५] मेंढपाळीबरोबर लोकरीपासून सूत काढणे व त्याच्या घोंगड्या तयार करण्याचे काम तसेच लोकरीचे खेड्यात वापरले जाणारे जाजम ह्लएक प्रकारचा ओबडधोबड गालिचाश्र तयार करण्याचे कामही धनगर करतात. परंतु काही भागांमध्ये ह्लउदा. सातारा जिल्ह्यातील माण तालुकाश्र सनगर ही जात घोंगडी विणण्याचे काम करते.

वरील विवेचनावरून एक गोष्ट लक्षात येते की, केवळ पशुपालन करणाऱ्या जाती महाराष्ट्रात अत्यल्प आहेत. त्याचप्रमाणे फक्त पशुपालन हा प्रमुख धंदा करणाऱ्यांची लोकसंख्या कमी आहे.

मासेमारी : मासेमारी हा परंपरागत व्यवसाय करणाऱ्या कोळी व भोई या दोन भिन्न जाती आहेत. कोळी लोक समुद्रात मासेमारी करतात आणि त्यांची वस्ती मुंबई आणि कोकणच्या किनारपट्टीवर आहे. भोई लोक नद्या व तलावांमध्ये मासेमारी करतात. १९११ मध्ये मुंबई इलाख्यात भोई जातीची लोकसंख्या ६३,७२२ होती व त्यांच्यापैकी दर हजारामध्ये ११९ लोक मासेमारीचा व्यवसाय करीत होते. कोळ्यांच्याबद्दल निश्चित आकडेवारी उपलब्ध नाही.

शेती, पशुपालन व मासेमारी या तीन अन्नोपादक व्यवसायांचा विचार करता असे दिसते की, बहुसंख्य लोक शेतीचा व्यवसाय करीत आहेत, तर पशुपालन व मासेमारी या व्यवसायांमध्ये थोडे लोक काम करीत आहेत.

उद्योगधंदे : अन्नोत्पादक व्यवसायांच्या खालोखाल उद्योगाच्या क्षेत्रात बरेच लोक काम करीत होते. उद्योगधंदे या व्यवसायवर्गात वस्त्रोद्योग, लाकुडकाम, धातू उद्योग, खाद्य पदार्थ तयार करण्याशी संबंधित व्यवसाय, कपडे व प्रसाधने तयार करण्याशी संबंधित उद्योग, आणि इतर व्यवसायांचा समावेश होतो. या विविध व्यवसायांशी परंपरेने संबंधित असणाऱ्या जातींचे विवेचन पुढील परिच्छेदांमध्ये केले आहे.

वस्त्रोद्योग : परंपरेने हा उद्योग करणाऱ्या कोष्टी आणि साळी या दोन जाती आहेत. मुंबई इलाख्यात १९११ मध्ये कोष्टी जातीची लोकसंख्या ८८,११३ व साळी जातीची संख्या ५७,७६३ होती. परंपरेने कोष्टी लोक सूती कापड व साड्या तयार करतात, तर साळी रेशमी वस्त्रे तयार करतात. १९११ मध्ये मुंबई इलाख्यातील कोष्टी जातीतील ८६.५ प्रतिशत लोक विणकाम व्यवसायामध्ये होते, मध्यप्रांत आणि वऱ्हाडमधील मराठी विभागातून ८२.२, व हैदराबाद संस्थानातील भागांतून ६१.४ टक्के कोष्टी विणकामाचा परंपरागत व्यवसाय करीत होते.

धातू उद्योग : धातू उद्योगामध्ये सोने, चांदी, तांबे, पितळ, आणि लोखंड या धातू उद्योगांचा समावेश होतो. सोनार, पांचाळ आणि लोहार या जाती परंपरेने या उद्योगांशी निगडित आहेत. सोनार ही जात सोने व चांदी या धातूंची दागिने आणि चांदीची भांडी तयार करण्याचा व्यवसाय करते. १९११ मध्ये सोनार जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात १,०९,०७५, मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये १,२६,८६४ आणि हैदराबाद संस्थानात ८८,०३७ होती. हा परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रतिशत प्रमाण मुंबई इलाख्यात ५६.७, मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये ५२.६ आणि हैदराबाद संस्थानात ७६.३ होते.

तांबे आणि पितळेची भांडी बनविणारी जात म्हणजे पांचाळ अथवा तांबट, १९११ मध्ये या जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात ८१,०८३ आणि हैदराबाद संस्थानमध्ये १,१७,७१० होती. या जातीतील परंपरागत व्यवसायांत असणाऱ्यांचे एकूण काम करणाऱ्या लोकांतील प्रतिशत प्रमाण मुंबई इलाख्यात ७१.२ व हैदराबाद संस्थानात ७७.५ होते. मध्यप्रांत आणि वऱ्हाडमधील मराठी विभागात हे प्रमाण ४८.३ होते.

लोखंडापासून शेतीसाठी व इतर व्यवसायांत उपयुक्त असणारी अवजारे व गृहोपयोगी वस्तू परंपरेने बनविणारी लोहार ही जात आहे. यांची १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यातील लोकसंख्या १,११,७७३, मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये १,८१,३११ होती. परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रतिशत प्रमाण मुंबई इलाख्यात ८१.९ आणि मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये ४५.६ टक्के होते. हैदराबाद संस्थानामध्ये हे प्रमाण ५९.४ होते.

लाकुडकाम : लाकडापासून विविध वस्तू बनविणारी महाराष्ट्रातील परंपरागत जात म्हणजे सुतार. १९११ च्या जनगणनेप्रमाणे सुतार जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात १,८५,२६५ होती आणि परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण ५६.५ टक्के होते. हैदराबाद संस्थानामध्ये हे प्रमाण ७६.३ टक्के होते.

कपडे शिवणे : महाराष्ट्रातील शिंपी जात परंपरेने कपडे शिवण्याचे काम करते. संत नामदेव हा शिंपी समाजामधील महान संत होऊन गेला. शिंपी जातीची लोकसंख्या मुंबई इलाख्यात ७६,२१५ होती. शिलाईचा परंपरागत व्यवसाय करणाऱ्या शिंपी जातीतील लोकांचे प्रमाण १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात ७१.८ टक्के होते. मराठवाड्यामध्ये १९३१ साली शिंपी समाजाची लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ०.३५ टक्के होती.

हलवाई : मिठाई व अन्य खाद्यपदार्थ परंपरेने तयार करणाऱ्या जाती, तसेच प्रसाधने तयार करणाऱ्या जाती महाराष्ट्रात अल्प आहेत. या क्षेत्राात काम करणाऱ्या जाती या बाहेरील प्रांतातून आल्याचे दिसते.

वरील उद्योगांत समाविष्ट न झालेले जे उद्योग आहेत त्यात मातीपासून भांडी तयार करण्याच्या व्यवसायात कुंभार आणि तेलबियांपासून तेल काढण्याचा व्यवसाय करणारे तेली हे सुपरिचित आहेत. १९११ मध्ये मुंबई इलाख्यात कुंभारांची लोकसंख्या २,४७,५०१ व तेल्यांची ९४,०७९ होती. मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये कुंभार जातीची लोकसंख्या १,१८,५०१ तर तेली जातीची ८,६९,३३६ होती.

परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रतिशत प्रमाण मुंबई इलाख्यात कुंभारांमध्ये ४३.७,तर तेली जातीत १९.७ टक्के होते. मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये हे प्रमाण कुंभारांच्यामध्ये ७३.२ होते तर तेल्यांच्यामध्ये ७.५ टक्के होते. हैदराबाद संस्थानामध्ये पारंपरिक व्यवसायात ६६.३ टक्के कुंभार होते, आणि ५८.८ टक्के तेली होते. कातड्यापासून पादत्राणे व शेती व्यवसायात आवश्यक वस्तू तयार करण्याचा उद्योग परंपरेने करणारी महाराष्ट्रातील जात म्हणजे चांभार. १९११ मध्ये मुंबई इलाख्यात त्यांची लोकसंख्या ३,०६,४७८ होती. मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये ही जात चमार या नावाने ओळखली जाते व त्यांची लोकसंख्या ९,०१,५२२ होती. या जातीतील परंपरागत व्यवसाय करणाऱ्यांचे प्रतिशत प्रमाण मुंबई इलाख्यात ५५.९, मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये ११.२ आणि हैदराबाद संस्थानमध्ये ४७.८ टक्के होते.

व्यापार : व्यापाराच्या क्षेत्रात महाराष्ट्रात महत्त्वाची एतद्देशीय अशी जात नाही. ऐतिहासिक काळात माध्यंदिन देशस्थ ब्राह्मण व्यापाराच्या क्षेत्रात होते. परंतु व्यापार हा ब्राह्मणांचा परंपरागत व्यवसाय मानला जात नाही. व्यापाराच्या क्षेत्रात कर्नाटकातून येऊन महाराष्ट्रात स्थायिक झालेले लिंगायत वाणी प्रमुख आहेत. मुंबई इलाख्यात हिंदू वाण्यांची लोकसंख्या १९११ साली ३,३७,२३२ आणि त्याच्यांत परंपरागत व्यापाराचा व्यवसाय करणाऱ्यांचे प्रमाण ६९.८ टक्के होते. महाराष्ट्रात व्यापाराच्या क्षेत्रात लिंगायत वाण्यांच्या खेरीज गुजरात आणि राजस्थानमधून आलेल्या जैन, ओसवाल आणि श्रीमाळी या जाती आहेत.

व्यवसाय : औपचारिक शिक्षणावर आधारित धंद्यांना व्यवसाय म्हणून संबोधिले जाते. यात धर्मगुरू अथवा पुरोहित, कायदेपंडित, डॉक्टर, प्राध्यापक इत्यादी व्यवसायांचा समावेश होतो. हे व्यवसाय करण्याकरिता प्रदीर्घ औपचारिक शिक्षणाची आवश्यकता असते. परंपरागत काळात पुरोहितांच्या व्यवसायासाठी शिक्षणाची आवश्यकता होती आणि हा व्यवसाय ब्राह्मणांनाच करण्याची मुभा होती. महाराष्ट्रात चित्पावन आणि देशस्थ ब्राह्मण हे पुरोहिताचा व्यवसाय परंपरेने करतात. १९११ च्या जनगणनेप्रमाणे मुंबई इलाख्यात चित्पावन ब्राह्मणांची लोकसंख्या १,१०,७१२ व देशस्थ ब्राह्मणांची लोकसंख्या २,९६,९२७ होती. परंपरागत पुरोहिताचा व्यवसाय करण्याचे प्रमाण चित्पावन ब्राह्मणांच्या दर

हजारात १२३ होते आणि देशस्थ ब्राह्मणांमध्ये ११९ होते. औपचारिक शिक्षणाची परंपरा या जातीत असल्यामुळे ब्रिटिश अमदानीत निरनिराळ्या शासकीय सेवेत तसेच वकील, डॉक्टर, प्राध्यापक, शिक्षक इत्यादी व्यवसायांत मोठ्या संख्येने या जातींनी स्थान मिळविले.

प्रमुख व्यवसाय वर्गांचे त्यांच्याशी संबंधित असलेल्या परंपरागत जातींचे विवेचन वर केलेले आहे. याखेरीज महाराष्ट्राच्या परंपरागत समाजव्यवस्थेत असे अनेक व्यवसाय होते की, त्यांच्याशी कोणतीतरी जात परंपरेने निगडित झालेली असे. यामध्ये न्हावी, परीट, गुरव, मांग, ढोर, महार, बुरूड, घडशी इत्यादी जातींचा अंतर्भाव होतो. त्याचप्रमाणे गुन्हेगारी, वेश्यावृत्ती, भिक्षा मागणे हेही काही जातींचे परंपरागत व्यवसाय होते. पश्चिम महाराष्ट्रातील रामोशी जातीचा परंपरागत व्यवसाय हा रखवालदारी आणि गुन्हेगारी असल्याची नोंद १९११ च्या जनगणनेमध्ये झाली होती व या जातीची लोकसंख्या ५९,९१४ होती.

महाराष्ट्रातील व्यवसायावर आधारित विविध जाती गटांचे सदर विवेचन हिंदू समाजापुरते मर्यादित आहे. महाराष्ट्रात हिंदूधर्मीयांखेरीज अन्य धर्मीय समाजही ऐतिहासिक काळापासून नांदत असून प्रत्येकाने व्यावसायिक क्षेत्रात आपापले स्थान निश्चित केले आहे. या अल्पसंख्य धार्मिक गटांत मुसलमान, ख्रिश्चन, ज्यू, झोरोष्ट्रियन अथवा पारसी, शिख, जैन, आणि जीवात्मवादी ह्लॲनिमिस्टश्र यांचा अंतर्भाव होतो. १९११ च्या जनगणनेनुसार विविध धर्मीयांचे महाराष्ट्रातील चार विभागांच्या लोकसंख्येत असलेले प्रमाण तक्ता क्रमांक ३ मध्ये दाखविले आहे.

तक्ता क्रमांक ३#

महाराष्ट्राच्या चार नैसर्गिक विभागांतील विविध धर्मीयांचे लोकसंख्येतील प्रमाण, १९११

धार्मिक गट	दर १०,००० लोकसंख्येतील प्रमाण			
	कोकण	देश	मध्यप्रांत व वऱ्हाड	मराठवाडा
हिंदू	९,१३४	९,०७९	८,५८६	८,७७१
मुसलमान	५९४	५७५	५३५	१,१३६
ख्रिश्चन	२२०	७५	१७	१५
पारसी	१८	८	२	१
ज्यू	८	२	--	--
शिख	--	१	१	४
जैन	२४	१११	४३	३०
जीवात्मवादी	--	१४९	८१५	४३

#आधार : (१) सेन्सस ऑफ इंडिया, १९११, व्हॉ. ७, बॉम्बे प्रॉव्हिन्स.
(२) सेन्सस ऑफ इंडिया, १९२१, व्हॉ.११, सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार : पार्ट १ : रिपोर्टे (१९११ च्या जनगणनेची संख्या)
(३) सेन्सस ऑफ इंडिया, १९२१, व्हॉ. २१, हैदराबाद स्टेट : पार्ट १ : रिपोर्टे (१९११ च्या जनगणनेची संख्या)

महाराष्ट्रात हिंदूंच्या नंतर संख्येने येणारे म्हणजे मुसलमान, ख्रिश्चन, जैन, पारसी, व ज्यू होत. जीवात्मवादी गटात हिंदू धर्माच्या प्रवाहात १९११ पर्यंत सामील न झालेले आदिवासी गट येतात. नंतरच्या काळात यातील बऱ्याच आदिवासी जमातींची गणना हिंदू धर्मीयांमध्ये झाल्याचे दिसून येते. व्यवसायाच्या क्षेत्रामध्ये अल्पसंख्य धर्मीयांनी परंपरेने आपले संबंध काही व्यवसायांशी निगडित केले आहेत. या व्यावसायिक संबंधाच्या स्वरूपाचे विवेचन खालील परिच्छेदांत केले आहे.

महाराष्ट्रात हिंदूच्या खालोखाल मुसलमानांची लोकसंख्या आहे. मुसलमानांमध्ये विविध वांशिक आणि धार्मिक भेदांवर आधारलेले सामाजिक गट आहेत. त्यातील बोहोरा, खोजा, मेमन हा मूळ गुजरातेतून महाराष्ट्रात आलेल्या मुसलमानांचा गट आहे. प्रामुख्याने मुंबई आणि इतर नागरी भागांमध्ये स्थायिक झालेला हा समाज महाराष्ट्रात व्यापार आणि उद्योग या क्षेत्रात आपले खास स्थान टिकवून आहे. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या गटातील दर हजारातून २०२ व्यक्ती व्यापारामध्ये आणि ६७ व्यक्ती उद्योगांमध्ये होत्या. तसेच शेख आणि पठाण या दुसऱ्या गटातून उद्योगाच्या क्षेत्रात दर हजारी २२३ व्यक्ती होत्या, तर अन्य गटांतून १३८ व्यक्ती व्यापारात होत्या आणि ४०२ व्यक्ती उद्योगांत

Maharashtra State Gazetteers

होत्या.

भारतीय ख्रिस्ती गटातील बहुसंख्य लोक कृषी क्षेत्रावरच अवलंबून असल्याचे मुंबई इलाख्याच्या १९११ च्या जनगणनेच्या आकडेवारीवरून दिसते. दर हजारातून ३७१ व्यक्ती शेती करीत होत्या आणि २०६ व्यक्ती शेतमजूर म्हणून काम करीत होत्या. उद्योगाच्या क्षेत्रात १२४ व्यक्ती होत्या.

पारसी समाज महाराष्ट्रात उद्योगाच्या क्षेत्रात आघाडीवर असलेला समाज म्हणून ओळखला जातो. १९११ च्या जनगणनेप्रमाणे या समाजातील दर हजारातून २१७ व्यक्ती व्यापारात होत्या आणि १२२ उद्योगांत होत्या.

ज्यू हा संख्येने अत्यल्प असलेला धार्मिक गट आहे. ज्यू लोक महाराष्ट्रात कोकण, मुंबई आणि पुणे येथे दिसतात. या समाजातील बरेच लोक व्यापारी क्षेत्रात होते. हिंदुस्थानच्या फाळणीनंतर महाराष्ट्रात आलेले सिंधी आणि शिख यांनीही व्यापार आणि उद्योगाच्या क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले आहे.

जात

सन १९११ च्या जनगणनेत उमटलेले व बऱ्याच प्रमाणात परंपरागत समाजाच्या स्वरूपाशी मिळतेजुळते असलेले श्रमविभाजनाचे स्वरूप आणि त्याच्याशी निगडित असलेले विविध सामाजिक गट, म्हणजेच विविध प्रकारच्या जातींच्या व्यावसायिक बाजूचे स्वरूप वर कथन केलेले आहे. परंतु जात हा घटक केवळ व्यवसायाशी निगडित नसून समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांवर त्याचा प्रभाव पडल्याचे दिसते. परंपरागत भारतीय समाजरचनेत जातीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या दृष्टीने जातीचा सर्वांगीण विचार होणे आवश्यक आहे.

भारतीय समाजात ज्या वेळेला जात हा शब्द सामाजिक व्यवहारामध्ये वापरला जातो त्या वेळेला काही विशिष्ट सामाजिक लक्षणे असणारे हिंदू समाजातील विविध मानवी गट असा होतो. या जाती गटांचे स्वरूप स्पष्ट होण्यासाठी जातीची वैशिष्ट्यपूर्ण लक्षणे कोणती आहेत याचा विचार करणे अगत्याचे ठरते.

जन्माच्या आधारावर हिंदू समाजाचे अनेक लहान मोठ्या गटांमध्ये विभाजन झाले आहे. प्रत्येक गटाला जात या नावाने ओळखले जाते. जातीचे पहिले लक्षण म्हणजे विवाहावर निर्बंध. हिंदू समाजामध्ये प्रत्येक व्यक्तीने आपल्या जातीतच विवाह केला पाहिजे असे सामाजिक बंधन आहे. एवढेच नव्हे तर जातीत जर पोटजाती असतील तर स्वतःच्या पोटजातीतच विवाह करण्याचे बंधन व्यक्तीवर आहे.

जातीचे दुसरे लक्षण म्हणजे परंपरागत व्यवसाय. प्रत्येक जातीला एक व क्वचित प्रसंगी दोन अथवा तीन व्यवसाय परंपरेने नेमून दिलेले असतात व हेच व्यवसाय करण्याचे बंधन जातीतील व्यक्तींच्यावर असते.

जातीचे तिसरे लक्षण म्हणजे दर्जा. विविध जातींच्या सामाजिक स्थानामध्ये समानता नसते. काही जाती श्रेष्ठ मानल्या जातात तर काही कनिष्ठ मानल्या जातात. म्हणजेच हिंदू समाजात जातींची अधिक्रम व्यवस्था आहे व या व्यवस्थेत प्रत्येक जातीला परंपरेने विशिष्ट दर्जा प्राप्त झालेला असतो. हा दर्जा प्रत्येक व्यक्तीला त्याच्या विशिष्ट जातीतील जन्माबरोबरच प्राप्त होतो व वैयक्तिक कर्तबगारीमुळे त्यामध्ये कोणताही फरक होत नाही. या दर्जाचा आधार कोणत्याही ऐहिक बाबीशी निगडित नसून तो जन्मजात पाप आणि पुण्य यापासून प्राप्त होणाऱ्या पावित्र्याच्या धार्मिक श्रद्धेत आहे.

प्रत्येक जातीचा प्रादेशिक विस्तार असतो व तो जातीच्या संख्याबलाप्रमाणे कमी अधिक असतो. प्रादेशिक विस्ताराची अंतिम सीमा भाषेच्या प्रादेशिक विस्ताराच्या सीमेने ठरविलेली असते. याचाच अर्थ जाती विशिष्ट भाषिक प्रदेशात मर्यादित असतात. मराठी भाषिक महाराष्ट्रातील जाती इतर भाषिक प्रदेशात दिसणार नाहीत. उदाहरणार्थ मराठा, कुणबी, सुतार, चांभार, कोष्टी या जाती महाराष्ट्रातच आहेत. इतर प्रांतात या जातींचा व्यवसाय करणाऱ्यांना वेगवेगळी नावे असतील अथवा हा व्यवसाय करणाऱ्या अन्य जाती दिसतील. पण त्या जाती आणि महाराष्ट्रातील जाती वेगवेगळ्या आहेत. विवाह ज्या त्या जातीत आणि भाषिक प्रदेशाच्या सीमेच्या आतच होतात.

जात हा बहुधा एकसंघ गट नसतो. त्यात निरनिराळे उपगट असतात. यांनाच पोटजाती असे म्हणतात. इतर जातींच्या संदर्भात एखाद्या विशिष्ट जातीतील सर्व पोटजातींचा सामाजिक दर्जा समान असतो. त्याचप्रमाणे सर्व पोटजाती समान व्यवसाय करीत असतात. विविध नागरी आणि धार्मिक हक्क सर्व पोटजातींचे समान असतात. परंतु इतर बाबींमध्ये पोटजाती या एकमेकांपासून भिन्न असतात. विवाह-संबंध, रोटीव्यवहार आणि व्यक्तींच्या सामाजिक

वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे काम या संदर्भात प्रत्येक पोटजात स्वतंत्र असते. बहुतेक पोटजातींची जातपंचायत असते व तिच्यामार्फत पोटजातीतील व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. थोडक्यात विवाह-संबंध व बऱ्याच वेळा खाण्यापिण्याचे संबंध हे स्वतःच्या पोटजातीत होतात. काही भाषिक प्रदेशांमध्ये पोटजातीत रोटीव्यवहारही होत नाहीत. परंतु महाराष्ट्रात अशी परिस्थिती बऱ्याच जातींच्या पोटजातींमध्ये दिसून येत नाही. सामाजिक जीवनातील पोटजातीचे स्थान लक्षात घेता काही समाजशास्त्रज्ञांच्या मते पोटजात हीच प्रत्यक्ष व्यवहारात जात आहे.[६] परंतु हे मत सर्व समाजशास्त्रज्ञांना मान्य नाही व त्यांच्या मते जातीलाच हिंदू समाजव्यवस्थेच्या मूळ घटकाचे स्थान द्यावयास पाहिजे व पोटजात हा जातीच्या अंतर्गत असलेला भेद आहे.[७] जात आणि पोटजात या सामाजिक प्रवर्गांचा वापर व्यवहाराच्या संदर्भानुसार होताना दिसून येतो. विविध जातीतींल लोकांशी होणाऱ्या व्यावसायिक व्यवहारांत जात या प्रवर्गाचा वापर होतो, तर जातीच्या अंतर्गत होणाऱ्या रोटी-बेटी व्यवहाराच्या संदर्भात पोटजात या प्रवर्गाचा वापर होतो.

जातिव्यवस्था ही विशिष्ट भाषिक प्रदेशात मर्यादित असते या गोष्टीचा उल्लेख वर आला आहेच. प्रत्येक भाषिक प्रदेशामध्ये जातींची संख्या ५० पासून २०० पर्यंत असते व पोटजातींची संख्याही बरीच असते. महाराष्ट्रात असलेल्या विविध जातींची संख्याही शंभरच्या आसपास असावी.

जातीचे व्यवसायाशी असलेल्या घनिष्ठ संबंधाकडे बऱ्याच समाजशास्त्रज्ञांचे लक्ष वेधले गेले. व्यवसायावर आधारलेली वर्ग रचना हे आधुनिक समाजाचे लक्षण मानले जाते. परंतु आधुनिक समाज आणि जातीवर आधारित परंपरागत भारतीय समाज यात सर्वात मोठा फरक म्हणजे जाती व्यवस्थेत व्यक्तीला स्वतःचा व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नसते, जे आधुनिक समाजात दिसते. अर्थात जाती व्यवस्थेमध्येही शेती, सैनिकी व्यवसाय, व्यापार यासारखे व्यवसाय हे सर्व जातींना खुले मानले जात होते. महाराष्ट्रात माध्यंदिन ब्राह्मण हे व्यापाराच्या क्षेत्रात होते. मराठेशाहीत आणि पेशवाईत बरेच ब्राह्मण सैन्यातही होते. तसेच आपत्कालात कनिष्ठ जातींचा व्यवसाय करण्याचीही मुभा असे. परंतु अशा व्यवसायाचा परिणाम जातीतील सामाजिक दर्जा घसरण्यावर होत असे. जातीच्या परंपरागत व्यवसायाखेरीज अन्य व्यवसाय करणारांची संख्या परंपरागत काळात एकूण कमीच होती. महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात जात आणि व्यवसाय यांचे परस्पर संबंध नियंत्रित करण्याचे महत्त्वपूर्ण काम बलुतापद्धती नामक व्यवस्था करीत होती. प्रत्येक जातीने ग्रामीण समाजात करावयाची कामे व त्याबद्दल त्यांना मिळणारा मोबदला बलुता पद्धतीद्वारे ठरविला जात असे. प्राचीन काळापासून या व्यवस्थेचा संपूर्ण भारतात विकास होत गेला आणि हिला निरनिराळ्या भाषिक प्रदेशांत निरनिराळ्या नावाने ओळखण्यात येते. या व्यवस्थेमध्ये बारा जातींच्या सेवेला महत्त्वपूर्ण मानले गेले होते म्हणून या व्यवस्थेला बारा बलुतेदारी पद्धती असे नाव पडले. या व्यवस्थेमध्ये खेड्यातील विविध जातींमध्ये विभागलेल्या समाजाची दोन गटांत विभागणी होत असे. हे दोन गट म्हणजे शेतकरी आणि बलुतेदार किंवा कारू आणि नारू. बलुतेदाराने केलेल्या कामाबद्दल त्याला प्रत्येक शेतकरी कुटुंबाकडून सुगीच्या वेळी धान्याच्या रूपाने व सणाच्या वेळी अन्नाच्या रूपाने मोबदला म्हणजेच बलुते मिळत असे. याखेरीज काही बलुतेदारांना त्यांच्या सेवेबद्दल जमिनीच्या रूपाने संपूर्ण ग्रामीण समाज मोबदला देत असे. या मोबदल्यास वतन या नावाने संबोधण्यात येत असे. ज्यावेळी जमीन मुबलक प्रमाणात उपलब्ध होती, त्यावेळी या वतन संस्थेचा उदय व विकास झाला. देशातील राजा आपल्या सरदारांना आणि इतर सेवकांना त्यांच्या निर्वाहासाठी जमीन इनाम देत असे. हेच तत्त्व गाव पातळीवर गावचा पाटील व शेतकरी समाज लागू करीत असे व यातून विविध बलुतेदारांना इनाम जमीन देण्याची प्रथा सुरू झाली. या वतन पद्धतीच्या मुळाशी जे तत्त्व दिसते ते म्हणजे व्यावसायिक संबंध हे तात्कालिक स्वरूपाचे न ठेवता कायम स्वरूपाचे पिढ्यान्पिढ्या चालणारे ठेवणे. विशिष्ट जातींना विशिष्ट गावामध्ये ठराविक व्यवसाय करण्याचा हक्क देणे हाही या वतनाच्या तत्त्वाचा आविष्कार होता.

बलुता पद्धतीमध्ये निरनिराळ्या जातींनी करण्याची कामेही केवळ व्यवसायाच्या क्षेत्रापुरती मर्यादित नव्हती, तर त्यांना कुटुंबात पाळल्या जाणाऱ्या विविध धार्मिक सणात व जन्म, मृत्यू, विवाह यासारख्या धार्मिक संस्कारांच्या प्रसंगी विशिष्ट व्यावसायिक सेवा करावी लागत असे. त्यामुळे विविध जातींमधील व्यावसायिक संबंध हे केवळ आर्थिक स्वरूपाचे न राहता त्यांना सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक स्वरूप प्राप्त झाले. जाती व्यवस्थेच्या स्थैर्यामध्ये याबाबीचाही मोठा वाटा आहे.

व्यवसाय आणि जात यांचा परस्पर संबंध व्यवसाय तिथे जात, आणि जात तिथे व्यवसाय या वर्णनाने स्पष्ट करता येईल. नवीन व्यवसाय करणारा लोकांचा वर्ग त्या व्यवसायावरून ओळखला जातो व त्यालाच जातीचे स्वरूप प्राप्त होते. एवढेच नव्हे तर एखाद्या व्यवसायात कौशल्याचे विशेषीकरण झाल्यास त्याचा परिणाम नवीन जातीच्या निर्मितीत होतो. याचे उदाहरण विणकरांच्या व्यवसायाचे देता येईल. महाराष्ट्रात साळी आणि कोष्टी या विणकरांच्या दोन जाती आहेत. त्यातील साळी लोक रेशमी वस्त्र विणणारे तर कोष्टी सुती वस्त्र विणणारे म्हणून ओळखले जातात. व्यवसाय करण्याच्या तांत्रिक भेदाचाही भिन्न जातींच्या अथवा पोटजातींच्या निर्मितीशी संबंध असल्याचे दिसते. याचे उदाहरण म्हणजे वुंभारांच्या मधील थोरचाके वुंभार व लहानचाके वुंभार या पोटजातींचे देता येईल. तसेच तेल्यांच्यामध्ये असलेल्या

एक-बैले व दोन-बैले तेली या पोटजाती, किंवा माळ्यांच्यामध्ये असलेल्या फुलमाळी व जिरेमाळी या पोटजाती आणि अशी इतर उदाहरणे व्यवसाय आणि जात यांच्या परस्पर संबंधांची साक्ष देतात.[८]

व्यवसाय आणि जात यांच्या परस्पर संबंधाचे नाते हे आर्यांच्या वर्णव्यवस्थेशी जोडले जाते. आर्यांनी भारतात वर्णव्यवस्था आणली व एतद्देशीय समाजव्यवस्थेवर तिचे आरोपण केले. वेदात वर्णव्यवस्थेचे जे सुरुवातीच्या काळातील वर्णन आले आहे त्यात तीन वर्णांचा उल्लेख आहे. हे तीन वर्ण म्हणजे ब्राह्मण, राजन्य आणि वैश्य. नंतरच्या काळात या मूळच्या तीन वर्णांत आणखी एक वर्णाची भर पडून ते चार झाले. चार वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे होत. ब्राह्मण हे या विराट पुरुषाचे तोंड, क्षत्रिय हे बाहू, वैश्य हे त्याचे पोट आणि शूद्र हे त्याचे पाय. अलंकारिक अर्थाने हे प्रत्येक वर्णाने करावयाच्या व्यवसायाचे वर्णन आहे. वेदपठण म्हणजे पौरोहित्य करणे, हा ब्राह्मणांचा व्यवसाय, राज्याचे संरक्षण करणे व त्याचा विस्तार करणे हा क्षत्रियांचा व्यवसाय, जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणे म्हणजेच व्यापार करणे हा वैश्यांचा व्यवसाय व वरील तीन वर्णांची सेवा करणे म्हणजेच श्रम करणे हा शूद्रांचा व्यवसाय होय. सुरुवातीच्या काळात वर्ण हे पूर्णतः व्यवसायावर अवलंबून होते. पुरोहिताचे कार्य जो करीत असेल तो ब्राह्मण, संरक्षण व राज्य शासन यांची जबाबदारी घेणारा तो क्षत्रिय, व्यापार करणारा वैश्य आणि श्रमाची कामे करणारा तो शूद्र असे मानले जात असे व प्रत्येक व्यक्तीस व्यवसायाची निवड करण्याचे स्वातंत्र्य होते. परंतु नंतरच्या काळामध्ये हे व्यवसाय निवडण्याचे स्वातंत्र्य नष्ट झाले आणि वर्ण हे बंद गट झाले. ज्या त्या वर्णातील व्यक्तीने आपल्या वर्णाचाच व्यवसाय करावयाचा असे बंधन निर्माण झाले. या बंधनाचीच तार्किक परिणती झाली ती आंतरवर्णीय विवाह निषिद्ध मानण्यात. परंतु या बंधनांचे पालन सर्वांच्याकडून होत नव्हते ते यातून वर्णसंकर होऊन नवीन सामाजिक गट जन्मास येत होते. यातूनच आज दिसणाऱ्या अनेक जाती निर्माण झाल्या. मनू, वसिष्ठ, बौद्धायन, गौतम या धर्मशास्त्रकारांनी या तऱ्हेचा जातिसंस्थेच्या विकासाचा युक्तिवाद प्रतिपादिला आहे. या तार्किक प्रणालीच्या आधाराने मूळ चार वर्णांतून अनुलोम आणि प्रतिलोम प्रकारांच्या विवाहातून १३४ जातींची निर्मिती कशी होऊ शकते हे विल्सन यांनी दाखविले आहे.[९]

वरील विवेचनावरून जातींची उत्पत्ती कशी झाली असावी असा सैद्धांतिक प्रश्न निर्माण होतो. सर्वसामान्यपणे हिंदू समाजात मूळ चार वर्णांतून वर्णसंकरामुळे विविध जाती निर्माण झाल्या असाव्यात असे मानण्याकडे सर्वसामान्य लोकांचा कल असल्याचे दिसून येते. या सिद्धांताला विभाजनाचा सिद्धांत (फिशन थिअरी) म्हणता येईल. परंतु अलीकडील काळात समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ यांनी भारतात अनुभवजन्य, प्रत्यक्ष पहाणीच्या आधारे जे संशोधन केले आहे व त्यातून जी जातिसंस्थेविषयी नवीन माहिती उपलब्ध झाली आहे त्या संदर्भात विभाजनाच्या सिद्धांताची अपूर्णता दिसून येते. एकच व्यवसाय करणारे परंतु वांशिक व सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न असणारे सामाजिक गट एकाच जातीत समाविष्ट झाल्याचे दिसते. याचे उदाहरण म्हणजे महाराष्ट्रातील मराठा ही जात आणि त्याचप्रमाणे राजपूत ही जात. या जातींत सांस्कृतिकदृष्ट्या भिन्न सामाजिक गट सामावल्याचे दिसते. या गटांना पोटजातीचा दर्जा प्राप्त झाला आहे. तथापि या पोटजाती मूळ मराठा जातीच्या विभाजनाच्या प्रक्रियेतून निर्माण झाल्या नसून त्या एकत्र येऊन व्यवसायसाधर्म्यामुळे त्यांचा एकाच जातीत समावेश झाल्याचे दिसून येते. हीच गोष्ट महाराष्ट्रातील कोष्टी, सोनार, गवळी इत्यादी व्यावसायिक जातींच्या संदर्भातही दिसून येते. यादृष्टीने विचार करता पोटजात हीच खरी जात असून, ज्याला आपण आज जात मानतो त्या घटकाला 'जाती समुच्चय' मानावे असा विचार या संदर्भात इरावती कर्वे यांनी मांडला आहे.[१०] परंतु ही सूचना सर्व समाजशास्त्रज्ञांना मान्य नाही. त्यांच्या मते जात या प्रवर्गाचा वापर हा सामाजिक व्यवहाराच्या संदर्भाप्रमाणे होतो व त्यामध्ये बरीच लवचिकता आहे.[११] यातून एकच निष्कर्ष निघू शकतो आणि तो म्हणजे जाती आणि उपजातींच्या निर्मितीत केवळ कोणतीही एकच प्रक्रिया, म्हणजे विभाजन आणि संमीलन, महत्त्वाची नसून दोन्हीही जाती आणि उपजातींच्या निर्मितीला सहाय्यक ठरतात.

वर्णव्यवस्थेचे जसे व्यवसायाशी नाते आहे तसेच व्यवसायाच्या आणि तो व्यवसाय करणाऱ्या वर्णाच्या सामाजिक दर्जाशीही घनिष्ठ नाते आहे. चार वर्णात ब्राह्मण हे श्रेष्ठ, त्यांच्या खालोखाल दुसऱ्या स्थानावर क्षत्रिय, तिसऱ्या स्थानावर वैश्य आणि चौथ्या स्थानावर शूद्र असा वर्णांचा अधिक्रम आहे. ब्रह्मणांचे श्रेष्ठत्त्व हे त्यांच्या व्यवसायाच्या पावित्र्याशी संबंधित आहे. क्षत्रियांच्या व्यवसायात हिंसा ही अनिवार्य बाब आहे, परंतु ती बाब ब्राह्मणांचे आणि समाजाचे संरक्षण आणि वर्णाश्रम धर्माचे संरक्षण करण्याच्या क्षत्रियांच्या कर्तव्याशी संबंधित असल्यामुळे ती निषिद्ध नाही. म्हणून क्षत्रियांचे सामाजिक स्थान ब्राह्मणांच्या खालोखाल मानले गेले आहे. वैश्यांचे स्थान तिसरे व शुद्रांचे चौथे मानले गेले आहे. शुद्रांच्या व्यवसायात हत्या व हिंसा होत असल्यामुळे त्यांचे स्थान शेवटचे मानले गेले आहे. हा अधिक्रम सत्तेच्या बळावरून समाजात प्रस्थापित झाला असावा, असे प्राचीन इतिहासातील पुराव्यांवरून दिसते. सुरुवातीच्या काळात ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामध्ये सत्तेसाठी संघर्ष होत होते हे विविध पौराणिक कथांवरून दिसते. परशुरामाने केलेला क्षत्रियांचा संहार हा पुराणात प्रसिद्ध आहे. ब्राह्मण आणि क्षत्रिय यांच्यामध्ये एक प्रकारचा समझोता होऊन या संघर्षाचा शेवट झाला. या समझोत्याचे स्वरूप सत्तेच्या विभाजनात दिसते. ब्राह्मणांच्या हातात धर्मसत्ता आणि क्षत्रियांच्या हातात

राजसत्ता अशी सत्तेची विभागणी केली गेली. वर्णाश्रम धर्माचे संरक्षण करणे हे क्षत्रियांचे कर्तव्य झाले आणि अशा धार्मिक प्रयोजनासाठी वापरल्या जाणाऱ्या क्षत्रियांच्या सत्तेला धर्माची मान्यता देण्याचे काम ब्राह्मण करू लागले. जगातील बहुतेक मध्ययुगीन कृषिप्रधान समाजामध्ये धर्मगुरूंचा स्वतंत्र वर्ग आणि राज्यकर्त्यांचा निराळा वर्ग अस्तित्वात असल्याचे दिसते. परंतु भारतीय समाजातील वर्णव्यवस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे हे वर्ण जन्माधिष्ठित बंदिस्त वर्ग झाले. वैश्य आणि शूद्र यांचे वर्णव्यवस्थेतील सामाजिक स्थान अनुक्रमे तिसरे व चौथे झाले. वैश्य वर्णाचे हितसंबंध आर्थिक सत्तेशी निगडित होते, त्यादृष्टीने या वर्णातील लोकांना आर्थिक क्षेत्रातील स्थैर्य अधिक प्रिय होते. राजसत्ता हे वैश्य वर्णाच्या दृष्टीने आर्थिक क्षेत्रात स्थैर्य टिकविण्याचे एक साधन होते व ते क्षत्रिय वर्णात प्रवेश करण्यास उत्सुक नव्हते. चतुर्थ स्थानावर असलेला शूद्र वर्ण आपल्या दुर्बलतेमुळे कनिष्ठ स्थानावर राहिला. परंतु योग्य संधी मिळाल्यास क्षत्रिय वर्णात प्रवेश करण्याची इच्छा बाळगून राहिला. असे यशस्वी प्रयत्न शूद्र वर्णातील लोकांनी इतिहास काळात केल्याचे अनेक दाखल्यांवरून दिसते. अर्थात वर्णव्यवस्थेचा एकूण रोख हा प्रत्येक वर्णाचे समाजातील स्थान हे पूर्व निर्धारित आणि अपरिवर्तनीय असे मानण्याकडेच होता.

वर्णव्यवस्थेमधून जातिव्यवस्थेमध्ये जाती-जातींतील दर्जाविषयीची असमानता निर्माण झाली व ही असमानताही वर्णांप्रमाणेच अपरिवर्तनीय आहे, असे सर्वसाधारणपणे मानले जाते. परंतु हा समज सामाजिक वास्तवाशी सुसंगत नाही, हे अलीकडे भारतातील विविध भागात झालेल्या समाजशास्त्रीय संशोधनांवरून स्पष्ट झाले आहे. वर्ण चार आहेत तर जाती अनेक आहेत. त्यातील पहिल्या तीन वर्णात मोडणाऱ्या जाती संख्येने अतिशय कमी आहेत, तर चौथ्या शूद्र वर्णात मोडणाऱ्या अनेकविध जातीत कोणती जात श्रेष्ठ व कोणती कनिष्ठ हे ठरविणे सोपे नाही व याबाबतीत वर्णव्यवस्थेतील अधिक्रमाचे तत्त्व मार्गदर्शक ठरू शकत नाही. प्रत्यक्षात असे दिसते की, स्थानिक पातळीवर निरनिराळ्या जातींचा अधिक्रम त्यांच्या सामाजिक वर्तनाच्या मुळाशी असलेल्या निर्धारक तत्त्वांचा साकल्याने विचार करून ठरविला जातो. याला अधिक्रमाची जनप्रणाली म्हणता येईल. अखिल भारतीय पातळीवर वापरली जात असलेली वर्णाधिष्ठित अधिक्रमप्रणाली व प्रादेशिक पातळीवर वापरली जात असलेली अधिक्रमाची जनप्रणाली अशा दोन प्रणालींच्या अस्तित्वाची दखल आपणास घ्यावयास पाहिजे. शूद्र वर्णात समाविष्ट झालेल्या बहुसंख्य जातींचा दर्जा हा जनप्रणालीच्या आधारानेच ठरतो.

जनप्रणालीमध्ये अधिक्रमाचे काही व्यावहारिक निकष लक्षात घेतले जातात. यात जातीचा आहार, जातीत असणारी विवाहाची परंपरा या गोष्टी विचारात घेतल्या जातात. शाकाहार हा मांसाहारापेक्षा धार्मिकदृष्ट्या श्रेष्ठ मानला जातो, म्हणून शाकाहारी जाती श्रेष्ठ मानल्या जातात. तसेच मांसाहार करणाऱ्या जातींमध्ये कोणत्या प्रकारचा मांसाहार घेतला जातो यावर जातीची श्रेष्ठता ठरविली जाते. मांसाहारात सर्वात गौणस्थान गोमांसाला आहे, त्याच्यापेक्षा वरचे स्थान हे डुकराच्या मांसाला, पण त्यापेक्षा वरचे स्थान बकऱ्याच्या मांसाला आहे. पहिल्या महायुद्धात मराठा सैनिकांना बकऱ्याचे मांस न देता निषिद्ध प्राण्यांचे मांस जेवणात देण्यात येते असा संशय आल्यामुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाल्याची हकीकत प्रसिद्ध आहे. तसेच धातूंच्या संबंधित व्यवसाय करणारे सोनार, तांबट, कासार आणि लोहार यांचा दर्जा या धातूंच्या धर्मविधीतील दर्जाशी संबंधित आहे. सोने हा सर्वात पवित्र धातू. त्याखालोखाल चांदी, तांबे, पितळ व शेवटी लोखंड येते. त्यामुळे लोहाराचा दर्जा सर्वात कनिष्ठ तर सोनाराचा दर्जा धातुव्यावसायिकांमध्ये सर्वात श्रेष्ठ समजला जातो.[१२] त्याचप्रमाणे ज्या जातीत विधवाविवाह होत नाही ती जात विधवाविवाह होत असलेल्या जातींपेक्षा श्रेष्ठ मानली जाते. स्थानिक पातळीवर वरील निकषांच्या आधारावर विविध जातींचे सामाजिक स्थान ठरते व त्याप्रमाणे पिढयान्पिढ्या सामाजिक व्यवहार होताना दिसतात. परंतु काही कारणाने एखाद्या जातीने स्थलांतर केले, तर अशा स्थलांतरित जातीच्या सामाजिक रूढींची स्थानिक जनतेला पूर्ण माहिती नसल्यामुळे अशा जातींना श्रेष्ठ मानल्या गेलेल्या जातीच्या रूढी आचरणात आणून आपणही श्रेष्ठ आहोत असा दावा करणे शक्य होते. ही संस्कृतीकरणाची प्रक्रिया ऐतिहासिक कालात तसेच आधुनिक कालात देखील चालू असल्याचे दिसते. १९११ च्या जनगणनेच्या वेळी महाराष्ट्रातील सोनार जातीने आपला दर्जा ब्राह्मणांच्या समान आहे असा दावा केला असल्याची जनगणना अहवालात नोंद आहे. मुंबईतील पळशीकर मंडळींशी इतर ब्राह्मणांचा रोटी-बेटी व्यवहार होत नसे. परंतु मध्यप्रांतांतील देशस्थ ब्राह्मणांशी विवाह संबंध प्रस्थापित करून, आपण शुक्ल यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण आहोत या दाव्यास इतर ब्राह्मणांकडून मान्यता मिळविली असल्याची नोंद या जनगणना अहवालात आहे.

आपल्या जातीचा अथवा पोटजातीचा दर्जा वाढविण्यासाठी तीन मार्गाने प्रयत्न केला जात असे. यातील पहिला मार्ग म्हणजे आपल्या समाजात कमी प्रतीचा मानलेला व्यवसाय टाकून प्रतिष्ठित व्यवसाय स्वीकारणे. दुसरा मार्ग म्हणजे मांसाहार टाकून शाकाहार स्वीकारणे किंवा मांसाहारामध्ये धार्मिकदृष्ट्या निषिद्ध मानलेले गोमांस व डुक्कराचे मांस वर्ज्य करणे आणि तिसरा मार्ग आपले विवाह संबंध वरिष्ठ मानल्या गेलेल्या पोटजातीत आपली मुलगी देऊन प्रस्थापित करणे. अशा तऱ्हेच्या विवाहास अनुलोम विवाह म्हटले जाते. महाराष्ट्रातील मराठा जातीत अनुलोम विवाह पद्धती प्रचलित आहे. शहाण्णव कुळी किंवा खानदानी मराठा घराण्यात आपली मुलगी देऊन आपले जाती व्यवस्थेतील कनिष्ठ

स्थान उंचावण्याचे अनेक यशस्वी प्रयत्न झाले आहेत.

थोडक्यात, जाती व्यवस्थेतील अधिक्रमाबाबत असे दिसते की, वर्णव्यवस्थेत प्रत्येक जातीचा निश्चित सामाजिक दर्जा मानला गेला असला, तरी व्यावहारिक पातळीवर अधिक्रमाची जी जनप्रणाली प्रचलित आहे त्यामध्ये बरीच लवचिकता दिसून येते व मर्यादित प्रमाणात जातीच्या दर्जात परिवर्तन घडून येण्याची शक्यताही दिसते. आपल्या सामाजिक रिवाजांचे संस्कृतीकरण करून जातिव्यवस्थेत एखाद्या गटाला आपले पारंपरिक स्थान बदलण्याचा प्रयत्न यशस्वीपणे करता येतो. ऐतिहासिक काळात भारतात एकवेंद्री सत्तेच्या अभावामुळे प्रादेशिक आणि स्थानिक पातळीवर जातींच्या दर्जात आणि कार्यात लवचिकता असे व बदलत्या परिस्थितीनुसार आवश्यक ते परिवर्तन घडून येणे शक्य होते.

जातिव्यवस्थेतील सामाजिक दर्जाबाबतची लवचिकता ही मध्यमस्तरीय जातींच्या संदर्भात प्रामुख्याने दिसून येते. परंतु सर्वात निम्नस्तरावरील जातींच्या स्थानात ही लवचिकता दिसून येत नाही. हा वर्ग अस्पृश्य म्हणून मानलेल्या जातींचा वर्ग. या जातींना चातुर्वर्ण्य स्थान नाही. प्राचीन वाङ्मयात या वर्गाला अंत्यवासिन्, चांडाळ या नावाने संबोधिले आहे. सुरुवातीच्या काळात शूद्र वर्णातीलच हीन मानलेला हा वर्ण नंतरच्या काळात चातुर्वर्ण्याच्या बाहेर फेकला गेला. या वर्गातील लोकांचा स्पर्शही अपवित्र मानला गेला, व त्यामुळे या गटाला गावात वस्ती करण्याची परवानगी न मिळता वेशीबाहेर जावे लागले. दक्षिण भारतात या वर्गाला पंचम म्हणून संबोधिले जाते. अस्पृश्यतेच्या रूढीमुळे या वर्गातील लोकांना संस्कृतीकरणाद्वारा आपल्या जातीचे स्थान उंचावण्याची संधी पूर्णपणे नाकारण्यात आली होती.

अस्पृश्यतेच्या रूढीची सुरुवात खरे तर वेद काळापासून झाली. त्याकाळी सामाजिकदृष्ट्या शूद्र हा ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य वर्णासमान मानला गेला असला, तरी धार्मिक विधीमध्ये त्याचा सहभाग अथवा वावर निषिद्ध मानला जात होता. यज्ञयाग यासारख्या धार्मिक विधी करणाऱ्या व्यक्तीने स्नान करून पवित्र झाल्यावर शूद्र नोकरास स्पर्श करू नये. त्याच्याशी बोलू नये, त्याला धार्मिक विधी चालू असलेल्या ठिकाणी प्रवेश करू देऊ नये, व शूद्र व्यक्तीचे बोलणेही कानावर पडू देऊ नये अशा तऱ्हेचा आदेश वेद वाङ्मयात आढळतो. ही सुरुवातीच्या काळात धार्मिक जीवनात पाळली जाणारी अस्पृश्यता नंतरच्या काळात संपूर्ण सामाजिक जीवनात पसरली, व अस्पृश्यांचा इतर वर्गातील लोकांपासून अलग असणारा वर्ग समाजात निर्माण झाला. स्त्रियांची मासिक पाळी, प्रसूती व मृत्यू या प्रसंगी वरिष्ठ वर्णातील लोकही ठराविक कालापर्यंत धार्मिक आणि सामाजिक व्यवहारात अस्पृश्य अथवा अपवित्र मानले जातात व ते या क्षेत्रात सहभागी होण्यास अपात्र ठरतात. परंतु ही अपवित्रता ठराविक कालानंतर संपुष्टात येते व योग्य धार्मिक विधी करून पूर्वीच्या पवित्र अवस्थेत अशी व्यक्ती प्रवेश करू शकते. परंतु अस्पृश्य वर्गाच्या बाबतीत अशी शक्यता उपलब्ध नाही. अस्पृश्य व्यक्ती जन्मापासून मृत्यूपर्यंत अपवित्रच मानली गेली. प्रत्येक जातीला जन्मतःच पावित्र्याची ठराविक मात्रा प्राप्त झाली आहे व ही टिकविण्यासाठी प्रत्येक जातीने व धर्माने घालून दिलेले पावित्र्य टिकविण्याचे नियम व विधी पाळणे आवश्यक आहे. परंतु अस्पृश्य जातींना जन्मतः प्राप्त झालेली पावित्र्याची मात्रा ही शून्य असून त्यामुळे त्यांना सदैव अस्पृश्य म्हणूनच गणले गेले आहे. त्यामुळे अस्पृश्याने आपल्या जीवनात चांगले वागून व चांगला व्यवसाय करून राहण्याचा प्रयत्न केला तरी परंपरागत समजुतीप्रमाणे तो सदैव अस्पृश्यच राहतो असे मानले गेले. या जन्मजात कायम स्वरूपाच्या सवर्णांमध्ये आणि अस्पृश्यांमध्ये असलेल्या अस्पृश्यतेच्या रेषेमुळे संस्कृतीकरणातून आपल्या जातीचे स्थान उंचावण्याचे मार्ग या वर्गाला बंद झाले आहेत असे दिसते.[१३]

महाराष्ट्रात ज्या जातींना अस्पृश्य म्हणून मानण्यात येत होते त्यात महार, मांग, चांभार व भंगी या प्रमुख आहेत. मुंबई इलाख्यात १९११ च्या जनगणनेच्यावेळी या जातींची असलेली लोकसंख्या तक्ता क्रमांक ४ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक ४

काही प्रमुख अनुसूचित जातींची लोकसंख्या, १९११

जात		मुंबई इलाखा	मध्यप्रांत व वऱ्हाड	हैदराबाद
महार	--	६,६२,३१९	११,६४,३८३	११,३७,५८९ (महार आणि माला)
मांग	--	२,७४,०३७	--	११,४५,३५२ (मडिगा आणि मांग)
चांभार	--	१,९९,९२२	९,०१,५२२	--
भंगी	--	९३,६९१	--	--

महाराष्ट्रातील दलित जातींमध्ये लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात मोठी जात म्हणजे महार. महार लोक महाराष्ट्रातील सर्व भागात व सर्व खेड्यात दिसतात. त्यांच्या खालोखाल मांग आणि चांभार या जाती येतात. गावगाड्यामध्ये महार जातीला विशिष्ट कौशल्याचा व्यवसाय नाही. मांग लोक प्रामुख्याने वाखापासून दोर तयार करून शेतकऱ्यांना पुरवितात, चांभार कातड्यापासून पादत्राणे व शेतीसाठी वापरात येणारी कातड्याची मोट, वादी इत्यादी तयार करतात, तर ढोर लोक जनावरांची कातडी कमावतात. पूर्व विदर्भामध्ये ढोर ही स्वतंत्र जात नसून चांभार लोकच कातडी कमावण्याचे काम करतात. महारांच्याकडे गावसफाई, सरकारी निरोप पोहोचविणे, गावात दवंडी पिटणे, पाटील, तलाठी आणि इतर सरकारी अधिकारी सांगतील ती कामे करणे, मयत झाल्यास मयताच्या नातेवाईकांना निरोप पोहोचविणे, स्मशानात लाकूड पुरविणे आणि शेतकऱ्यांच्याकडे शेतमजुरीची कामे करणे इत्यादी कामे पूर्वी सोपविण्यात आली होती. सर्वसाधारणपणे असे दिसते की, अस्पृश्य जातींकडे अपवित्र व घाणीशी संबंधित कामे सोपविली गेली. अस्पृश्य जातींनी ही कामे केली तरच सवर्ण जातींना आपले पावित्र्य टिकविता येते. या दृष्टीने अस्पृश्य जाती या उपेक्षित आणि अवमानित राहिल्यात.

अस्पृश्यता ही केवळ धार्मिक क्षेत्रातील बाब नसून धार्मिक श्रद्धेच्या आधारावर समाजातील अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या वर्गांना मूलभूत सामाजिक व आर्थिक हक्कापासून वंचित करण्यात आले. अस्पृश्यता मानलेल्या जातींना पूर्वी सार्वजनिक सुविधा उदा. रस्ते, विहिरी, शाळा इत्यादी बाबींचा मुक्तपणे वापर करता येत नव्हता. तसेच मंदिर प्रवेशही करता येत नव्हता. न्हावी, धोबी यांच्या सेवेचा लाभ घेता येत नव्हता. सोने, चांदी, उच्चवर्णीय लोक करतात तसा पोशाख, इत्यादी गोष्टींचा वापर करण्याची मुभा अस्पृश्य जातींना नव्हती. पेशवाईत अस्पृश्यांना दिवसा सवर्णांच्या वस्तीतून फिरण्यावर विविध बंधने होती. यावरून अस्पृश्यतेच्या रूढीचा दुष्परिणाम सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रांवर झाल्याचे स्पष्ट होते.

जमात

हिंदू समाजातील पवित्र व अपवित्र या धार्मिक कल्पनेमुळे अस्पृश्य जाती निर्माण झाल्या व श्रमविभाजनाच्या संदर्भात त्यांना विशिष्ट प्रकारचे व्यवसाय करणे भाग पडले. तसेच हिंदू धर्मातील वर्णाश्रम धर्मप्रणालीपेक्षा वेगळ्या जीवनप्रणालीचे आचरण करीत असल्यामुळे, तसेच जीवात्मवादी पूजा पद्धतीचे आचरण करीत असल्यामुळे आणि प्रचलित ग्रामीण समाज व्यवस्थेतील श्रमविभाजन पद्धतीत सहभागी न झाल्यामुळे आदिवासी जमातींचा एक वर्ग भारतीय समाजात अस्तित्वात आला. या आदिवासी जमाती डोंगराळ व जंगल विभागात राहतात. महाराष्ट्रातील सह्याद्री व सातपुडा पर्वत क्षेत्रांमध्ये त्याचप्रमाणे चंद्रपूर, गडचिरोली व इतर जंगल क्षेत्रांमध्ये या आदिवासी जमाती प्रामुख्याने आढळून येतात. भिल्ल, गोंड, वारली, कातकरी, महादेव आणि मल्हार कोळी, कोरकू, कोलाम या महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील काही प्रमुख जमाती शिकार करणे, जंगलातील वनस्पती, मध व फळे गोळा करणे हे परंपरागत व्यवसाय करून आपली उपजीविका करतात. जंगलातून गोळा केलेले पदार्थ विकण्यासाठी ते परिसरातील ग्रामीण व नागरी जनतेच्या संपर्कात येतात. सामाजिक जीवनामध्ये त्यांच्या स्वतंत्र रूढी आणि जीवनप्रणालीचे आचरण करीत असतात. बऱ्याच जमाती गोमांस निषिद्ध मानत नाहीत. त्यामुळे हिंदू समाजाच्या दृष्टिकोनातून या जमाती वर्णव्यवस्थेच्या बाहेरच्या मानल्या होत्या.

या जमाती जसजशा हिंदू समाजाच्या संपर्कात येऊ लागल्या तसतसे त्यांचे नकळत हिंदूकरण होऊ लागले. यातील प्रमुख पायऱ्या म्हणजे गाईला पवित्र मानणे, हिंदू देवतांना पवित्र मानणे, आणि ब्राह्मणांचे धार्मिक श्रेष्ठत्व मान्य करणे या होत. या पद्धतीने या जमातींना जातिव्यवस्थेत विशिष्ट स्थान प्राप्त होते व त्यांना ठराविक व्यवसाय करण्याची मुभा मिळते. बऱ्याच वेळेला हे स्थान कनिष्ठ अस्पृश्य जातीत मोडणारे असते. परंतु ऐतिहासिक काळातील काही राज्यकर्त्या व लढवैय्या जमातींनी, उदाहरणार्थ गोंड जमातीने, जातिव्यवस्थेत क्षत्रिय वर्णातील स्थान मिळविल्याचे दिसते. त्याचप्रमाणे बरेच आदिवासी शेतीच्या व्यवसायात स्थिर झाल्याचे आढळते. १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यातील काही आदिवासी जमातीतील लोकांचे शेती व शेतमजूर या व्यवसायातील प्रतिशत प्रमाण पुढीलप्रमाणे होते.

तक्ता क्रमांक ५

शेती व्यवसायातील प्रमुख आदिवासी जमातींचे प्रमाण (१९११)

जमात	स्वतः शेती न करता त्यावर राहणारे	स्वतः शेती करणारे	शेतमजूर
कोळी (महादेव आणि मल्हार)	०.९	५६.३	८.२
भिल्ल	०.१	३७.१	५१.१
वारली	०.२	४८.०	४०.७
कातकरी	०.१	६.३	७२.०
ठाकूर	--	६०.६	३२.४

दलित जातींप्रमाणेच आदिवासी लोक मागासलेले आहेत. परंतु आदिवासी जमातींच्या समस्यांचे आणि मागासलेपणाचे स्वरूप निराळे आहेत. प्रगत समाजाकडून विशेषतः व्यापारी वर्गाकडून होणारी आर्थिक फसवणूक, शेतमजूर म्हणून होणारी पिळवणूक व सामाजिक रूढी यामुळे आदिवासी जमाती मागासलेल्या राहिल्यात. जमिनीचे मोठ्या प्रमाणात होणारे हस्तांतरण, कर्जबाजारीपणा, व्यसनाधीनता या आदिवासींच्या प्रमुख सामाजिक व आर्थिक समस्या आहेत. आदिवासींचे प्रगत समाजाकडून होणारे आर्थिक शोषण थांबविण्याच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी अनेक कायदेशीर तरतुदी केल्या.

महाराष्ट्रातील आदिवासी जमाती पुढील तीन भौगोलिक-सांस्कृतिक गटांमध्ये समाविष्ट आहेत :- (अ) सह्याद्री, (ब) सातपुडा आणि (क) गोंडवन. हे गट केवळ भौगोलिकच नव्हे तर सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण आहेत. त्यांत समाविष्ट झालेल्या काही प्रमुख जमातींची नावे खाली दिलेली आहेत :-

(अ) **सह्याद्री गट** :- (१) महादेव कोळी, (२) मल्हार कोळी, (३) ढोर कोळी, (४) वारली, (५) कोकणा, (६) ठाकूर, (७) काथोडी, (८) धोडिया, (९) दुबला.

(ब) **सातपुडा गट** :- (१) भिल्ल, (२) गामित, (३) कोरकू, (४) धानका, (५) पारधी, (६) नाइकडा, (७) राठवा.

(क) **गोंडवन गट** :- (१) गोंड, (२) आंध, (३) कोलाम, (४) परधान, (५) हलबा, (६) कवर.

सह्याद्री गटात मोडणाऱ्या आदिवासी जमातींची सर्वात जास्त वस्ती नाशिक, ठाणे आणि रायगड जिल्ह्यांत आढळते. या गटातील बहुसंख्य जमाती मराठी भाषा बोलतात. दुबला आणि धोडिया या जमाती फक्त गुजराती बोलतात. सातपुडा गटातील आदिवासी जमातींची सर्वात जास्त वस्ती धुळे, जळगाव, अमरावती व सोलापूर जिल्ह्यांत आढळते. या गटातील बहुसंख्य आदिवासी भिल्ली, कोरकू, लमाणी या आदिवासी बोलीभाषा बोलतात. भिल्ली ही भाषा भिल्लांच्या खेरीज गामित, धानका आणि नाइकडा या जमाती बोलतात. राठवा हे लमाणी भाषा बोलतात तर कोरकू हे त्याच नावाची बोलीभाषा बोलतात. भिल्ली आणि कोरकू या दोन्ही भाषा "मुंडारी" भाषिक गटात मोडतात. गोंडवन गटातील बहुसंख्य जमाती चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ आणि परभणी जिल्ह्यांत राहतात. या गटात समाविष्ट झालेल्या जमाती मराठी, तसेच गोंडी, कोलामी, छत्तिसगढी या बोलीभाषा बोलतात. या बोलीभाषांचे साम्य द्राविडी भाषिक गटात मोडणाऱ्या तेलुगु आणि कानडी यांच्याशी बऱ्याच प्रमाणात दिसते.

साक्षरता

जातिव्यवस्थेतील सामाजिक दर्जा संबंधीच्या असमानतेच्या तत्त्वावर आधारलेल्या अधिक्रम व्यवस्थेमुळे हिंदू समाजात सवर्ण हिंदू, दलित वर्ग आणि आदिवासी वर्ग हे सामाजिक स्तर निर्माण झाले. आदिवासींचे सामाजिक स्थान दलित जातींपेक्षा वरचे मानले जाते आणि ऐतिहासिक काळात राज्यसत्ता हाती असलेल्या काही आदिवासी जमाती आपण क्षत्रिय वर्णातील आहोत असाही दावा यशस्वीरीत्या करू लागल्या आहेत. उच्च सामाजिक दर्जा प्राप्त झालेल्या जातींना जे हक्क प्राप्त झाले आहेत त्यात शिक्षणाचा हक्क हा एक महत्त्वाचा आहे. प्राचीन काळी गुरुकुलात राहून शिक्षण घेण्याचा हक्क पहिल्या तीन वर्णांनाच होता. शुद्र वर्णाला शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आला होता. कालांतराने

कलियुगात क्षत्रिय वर्ण नष्ट झाला आहे अशी समजूत दृढमूल झाल्यामुळे ब्राह्मणांना व व्यवसायाच्या दृष्टीने आवश्यक म्हणून व्यवहारापूरता वैश्यांना शिक्षणाचा हक्क आहे असे मानले जाऊ लागले. शिक्षणाकडे पाहण्याचा परंपरागत दृष्टिकोन धार्मिक होता. ज्ञान हे धार्मिकदृष्ट्या पवित्र मानले गेले होते, व त्यामुळे ते अपवित्र मानल्या गेलेल्या जातींना नाकारण्यात आले होते. ब्रिटिश राजवट भारतावर सुरू झाल्यानंतर ब्रिटिश शासनाने इहवादी, विज्ञाननिष्ठ व समतेच्या तत्त्वावर आधारलेली नवी शिक्षण प्रणाली भारतात सुरू केली. परंतु विविध जातीत परंपरेने चालत आलेल्या शैक्षणिक असमानतेमुळे हे नवीन पद्धतीचे इहवादी शिक्षण घेणे काही उच्चवर्णीय जातींनाच शक्य झाले. यादृष्टीने परंपरेच्या जवळ असलेल्या १९११ सालच्या महाराष्ट्रातील साक्षरतेचे सामाजिक स्वरूप कसे होते हे पाहणे उद्‌बोधक ठरेल. तक्ता क्रमांक ६ मध्ये साक्षरतेच्या बाबतीत विविध जातींची स्थिती काय होती हे दाखविले आहे.

तक्ता क्रमांक ६

विविध जातीतील साक्षरांचे प्रतिसहस्त्र प्रमाण, १९११

जात	साक्षरतेचे प्रतिसहस्त्र प्रमाण		
	मुंबई इलाखा	मध्यप्रांत व वऱ्हाड	मराठवाडा
(१)	(२)	(३)	(४)
(१) ब्राह्मण	२५५	२७७	३१०
(अ) चित्पावन	३५५	--	--
(ब) देशस्थ	३३४	--	--
(अ) गौड सारस्वत	३२६	--	--
(२) अहीर	५९	९	--
(३) मराठा	२४	८७	१४
(४) कुणबी	४९	३६	--
(५) राजपूत	७१	--	८७
(६) कोळी	२७	--	--
(७) धनगर, भरवाड, कुरुब	९	--	४
(८) भंडारी	६१	--	--
(९) भोईं	६	--	३
(१०) कोष्टी, देवांग	८९	--	३०
(११) शिंपी, दर्जी	१४१	--	--
(१२) धोबी, परीट, अगासी	२०	--	४
(१३) गुरव	९	--	--
(१४) सोनार	११५	१४७	७९
(१५) सुतार, बडिग	५७	--	१९
(१६) कुंभार	२०	--	२६
(१७) माळी	२१	२०	६
(१८) पांचाळ	१४९	--	४७
(१९) तेली, घांची	७९	२७	२७
(२०) वाणी	--	२७९	--
(२१) वाणी-श्रीमाळी	३९०	--	--
(२२) वाणी-ओसवाल	४४४	--	--
(२३) लोहार, कम्मार	८९	२३	१८
(२४) लिंगायत	--	--	५१
(२५) कोमटी	--	--	२०७
(२६) न्हावी, हजाम	२१	३४	--

Maharashtra State Gazetteers

(२७) कलाल	--		--		२०	
(२८) रामोशी	५		--		--	
(२९) भिल्ल	१		--		--	
(३०) कातकरी	३		--		--	
(३१) ठाकूर	८		--		--	
(३२) वारली	३		--		--	
(३३) वडार	४		--		३	
(३४) भंगी	११		--		--	
(३५) महार	४		१०		४	
(३६) मांग	१		--		--	
(३७) चांभार, मोची, सोची	२३		३		१	
(३८) आगरी	२०		--		--	
(३९) वंजारी	--		--		९	
(४०) बेरड	३		--		--	

तक्ता क्रमांक ६ मध्ये महाराष्ट्रातील परंपरागत समाजात ज्यांचा समावेश होतो अशा जातींतील साक्षरतेचे प्रतिसहस्त्र प्रमाण दाखविले आहे. सर्वात अधिक साक्षरतेचे प्रमाण ओसवाल वाणी आणि श्रीमाळी या राजस्थानमधून आलेल्या जातीच्यामध्ये दिसते. परंतु या जातींना रूढार्थाने महाराष्ट्रातील जाती म्हणून मानले जात नाही. त्यांच्या खालोखाल ब्राह्मणांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक दिसते. हे प्रमाण मुंबई इलाख्यात प्रतिसहस्त्र २५५ होते. त्यामध्येही महाराष्ट्रातील ब्राह्मण जाती म्हणून ज्यांना समजले जाते त्या चित्पावन, देशस्थ आणि गौड सारस्वत जातींमध्ये साक्षरतेचे प्रमाण जास्त म्हणजे अनुक्रमे ३५५, ३३४ आणि ३२६ दिसते. मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये वाणी जातीत सर्वाधिक साक्षर दिसतात (२७९), तर त्यांच्या खालोखाल ते ब्राह्मणांच्यामध्ये दिसतात (२७७). तसेच मराठवाडयातील ब्राह्मणांच्यामध्ये साक्षरांचे प्रमाण ३१० आहे, तरे कोमटी या व्यापाराच्या क्षेत्रात असणाऱ्या जातीत हे प्रमाण २०७ आहे. महाराष्ट्राशी संबंधित असलेल्या या तिन्ही विभागांत साक्षरतेच्या क्षेत्रात वाणी आणि ब्राह्मण या जाती अग्रेसर आहेत. इतर जातीत असलेले साक्षरतेचे कमी प्रमाण पाहिले तर असे स्पष्ट होते की, व्यवसायाची गरज आणि जातिव्यवस्थेत असलेल वरिष्ठ स्थान याच्याशी साक्षरता संबंधित आहे. वर्णव्यवस्थेत ब्राह्मणांचे स्थान सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे व या स्थानाशी सुसंबद्ध मानला गेलेला व्यवसाय म्हणजे वेदाध्ययन हे वेंद्रस्थानी असलेल्या पुरोहिताचा. वाणी व कोमटी या वैश्य वर्णातील जाती होत. त्यामुळे त्यांना परंपरागत समाजात शिक्षणाचा हक्क दिला गेला. त्यामुळे वाण्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण ब्राह्मणांच्या तुलनेने अधिक दिसते. व्यापारासाठी लिहिता वाचता येणे, हिशोब करणे व लिहिणे या गोष्टी महत्त्वाच्या मानल्या गेल्या आहेत.

ब्राह्मण आणि वाणी या जातीनंतर शंभराच्यावर साक्षरांचे प्रमाण असणाऱ्या जातींमध्ये पांचाळ, सोनार आणि शिंपी या जाती येतात. मुंबई इलाख्यात साक्षरतेच्या दृष्टीने पांचाळ (१४९), शिंपी (१४१) आणि सोनार (११५) असा क्रम लावता येतो. मध्यप्रांत आणि वऱ्हाडमध्ये साक्षरतेच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकावर असलेली जात म्हणजे सोनार. या जातीत साक्षरांचे प्रमाण १४७ असून सोनार आणि पांचाळ या जाती आपला सामाजिक दर्जा ब्राह्मणांच्या बरोबरीचा आहे असा दावा करतात, हे मुंबई इलाख्याच्या १९११ च्या जनगणना अहवालात नमूद केले आहे.[१४]

मराठा आणि राजपूत या परंपरेने राज्यकर्त्या म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व आपण क्षात्रवर्णात मोडतो असा दावा करणाऱ्या जाती होत. या दोहोंमध्ये मराठा ही महाराष्ट्रातील प्रमुख जात. या जातीतील साक्षरतेचे प्रमाण मुंबई इलाख्यात प्रतिसहस्त्र २४, मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये ८७ व मराठवाड्यात १४ होते. राजपुतांच्यामध्ये साक्षरांचे प्रमाण मुंबई इलाख्यात ७१ तर मराठवाड्यात ८७ होते. या दोन्ही जातींचा सैनिकी पेशाच्या जोडीने शेती हा परंपरागत व्यवसाय मानला आहे. कुणबी आणि माळी या महाराष्ट्रातील परंपरेने शेतीचा व्यवसाय करणाऱ्या महत्त्वपूर्ण जाती असून कुणब्यांच्यामध्ये साक्षरतेचे प्रमाण मुंबई इलाख्यात ४९ आणि मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये ३६ होते. माळी जातीतील साक्षरतेचे प्रमाण मुंबई इलाख्यात २१, मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये २० आणि मराठवाड्यामध्ये ६ होते.

ज्या इतर जातीत साक्षरतेचे प्रमाण हे ५० ते ९० च्या दरम्यान होते, त्यामध्ये मुंबई इलाख्यात भंडारी (६१), सुतार (५७), तेली (७९), लोहार (८९), कोष्टी (८९) या जाती होत्या. वरील विवेचनावरून दिसून येते की, जातीचा दर्जा आणि त्याला परंपरेने करावा लागणारा व्यवसाय यांचा प्रभाव साक्षरतेच्या प्रमाणावर, म्हणजेच पर्यायाने जातीच्या

शैक्षणिक स्थानावर पडला.

ज्याप्रमाणे विविध जातीत शैक्षणिक असमानता दिसून येते त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील समाजातील विविध धार्मिक गटांमध्येही साक्षरतेच्या संदर्भात असमानता दिसून येते. तक्ता क्रमांक ७ मध्ये मुंबई इलाख्यातील मुंबई शहर, कोकण आणि देश (दख्खन) या भागांतील विविध धार्मिक गटांतील १९११ च्या जनगणनेप्रमाणे असलेले साक्षरांचे प्रमाण दाखविले आहे. या तक्त्यावरून लक्षात येते की, पारसी समाजात साक्षरतेचे प्रमाण तिन्ही प्रादेशिक विभागांत इतर धार्मिक गटांच्या तुलनेने सर्वाधिक दिसते. त्याचप्रमाणे जैन समाजातही साक्षरतेचे प्रमाण तिन्ही विभागात इतर धार्मिक गटांच्या तुलनेने अधिक आहे. या दृष्टीने जैन समाजाचे स्थान दुसऱ्या क्रमांकाचे आहे. तिसऱ्या क्रमांकावर ख्रिस्ती गट आहे. मुंबई विभागात मुसलमानांच्या तुलनेने हिंदूच्यात साक्षरतेचे प्रमाण अधिक आहे, तर कोकण आणि दख्खन या प्रादेशिक विभागात मुसलमानांच्यामध्ये हिंदूच्या तुलनेने साक्षरांचे प्रमाण अधिक दिसते. तसेच स्त्री आणि पुरुष साक्षरतेच्या संदर्भातही विविध धार्मिक गटांत निराळी परिस्थिती दिसते. पारसी आणि ख्रिस्ती यांच्यामधील स्त्री आणि पुरुष यांच्यातील साक्षरतेच्या प्रमाणातील विषमता हिंदू, जैन आणि मुसलमान या धार्मिक गटांच्या तुलनेने कमी दिसते. हिंदू धर्मात स्त्रियांना शूद्राचा दर्जा दिला असल्याने तिला ज्ञान मिळविण्याच्या अधिकारापासून वंचित केले होते. पारसी समाजात साक्षर स्त्रियांचे प्रमाण सर्वात अधिक दिसते, तर हिंदूच्यामध्ये ते सर्वात कमी दिसते.

तक्ता क्रमांक ७

विविध धार्मिक गटांतील साक्षरतेचे दर हजारामधील प्रमाण, १९११

धर्म		मुंबई शहर		कोकण		दख्खन	
		पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री
हिंदू	--	२३६	५९	९४	६	७९	४
जैन	--	७०२	१६३	५६३	३३	५३२	२२
मुसलमान	--	२२६	४४	१७४	१६	१३१	८
ख्रिस्ती	--	५३८	४१३	१८१	६५	४८४	३३९
पारसी	--	८०२	६६२	७५२	२१०	७९६	६५३

ग्रामीण कृषिप्रधान अर्थव्यवस्था आणि जातिव्यवस्था यांचे घनिष्ठ संबंध आहेत. परंपरागत कृषिप्रधान समाज व्यवस्थेत प्रत्यक्ष शेतीच्या उद्योगामध्ये काम करणाऱ्या लोकांची संख्या इतर व्यावसायिकांच्या मानाने अधिक असणार हे स्पष्ट आहे. महाराष्ट्रात परंपरेने शेती करणाऱ्या ज्या दोन प्रमुख जाती आहेत त्या म्हणजे मराठा आणि कुणबी. १९११ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यात या जातींची लोकसंख्या अनुक्रमे ३२,७९,४९६ (मराठा) व २४,८९,२३० (कुणबी) अशी होती. लोकसंख्येच्या दृष्टीने इतर जातींचा क्रम या दोन जातींच्या नंतर लागतो. हैदराबाद संस्थानमध्ये मराठा जातीची लोकसंख्या १५,३८,८७४ होती. लोकसंख्येच्या दृष्टीने ही जात सर्वात मोठी होती. त्याचप्रमाणे मध्यप्रांत व वऱ्हाडमध्ये कुणबी ही सर्वाधिक लोकसंख्या असलेली जात होती. या जातीची लोकसंख्या १३,४२,००० तर मराठा जातीची लोकसंख्या ९३,८७९ होती. महाराष्ट्रात ऐतिहासिक काळात राज्यसत्ता हाती असलेली जात म्हणून मराठा जात ओळखली जाते. कुणबी लोक राज्यकर्ते नसले तरी आपला दर्जा मराठा जातीच्या समान आहे असे ते मानतात. शेतजमिनीचा फार मोठा भाग मराठा व कुणबी या जातींच्या मालकीचा आहे. ग्रामीण समाजरचनेत या जातींना मानाचे स्थान आहे व पाटील हे विशेषण याचे द्योतक आहे. प्रभावी जातींची प्रा. श्रीनिवास यांनी स्पष्ट केलेली लक्षणे, म्हणजे लोकसंख्येतील प्राबल्य, कृषिक्षेत्रातील प्राबल्य व वरिष्ठ सामाजिक दर्जा, ही या जातींना लागू पडतात.[१५] या जातींचा महाराष्ट्रातील सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर प्राचीन काळापासून मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. आधुनिक काळातही या जातींचा महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनावरील प्रभाव टिकून आहे.

जातींचे लोकसंख्येतील स्थान : १९३१

महाराष्ट्राच्या परंपरागत सामाजिक संघटनेचे स्वरूप १९११ च्या जनगणनेच्या संदर्भाने वर स्पष्ट केलेले आहे. जाती, जमाती आणि विविध धार्मिक गट यांचे लोकसंख्येच्या दृष्टीने असलेले स्थान, त्याचप्रमाणे या घटकांचे व्यवसाय, साक्षरता, सामाजिक दर्जा या क्षेत्रातील स्थान याचा आढावा वर घेतला आहे. जनगणना करताना जाती,

जमाती, धर्म यांची नोंद करण्याची पद्धती सुरुवातीच्या काळात अवलंबिल्यामुळे ही माहिती उपलब्ध होऊ शकली. जातीनिहाय लोकसंख्येची नोंद करण्याची पद्धती १९३१ च्या जनगणनेपर्यंत चालू राहिली. परंतु जातिव्यवस्था प्रतिगामी असल्यामुळे व या व्यवस्थेत सर्वांना समान न्यायाचे तत्त्व लावले जात नसल्यामुळे जातीची दखल जनगणना करण्याच्या वेळी घेतली जाऊ नये असा विचार समाज धुरीणांमध्ये व राज्यकर्त्यांमध्ये प्रभावी होऊ लागला होता. जनगणना अहवालात होणाऱ्या जातीच्या नोंदीचा फायदा घेऊन अनेक जाती आपला सामाजिक दर्जा वरिष्ठ असल्याचा दावा करू लागल्या व त्यातून सामाजिक कलह वाढू लागल्याचे राज्यकर्त्यांच्या लक्षात आले. समानतेचा पुरस्कार करणाऱ्या ख्रिश्चन धर्माच्या ब्रिटिश शासकांनी जातीची नोंद घेणे अयोग्य आहे असेही मत प्रभावी होऊ लागले व जातीची नोंद जनगणना करताना घेऊ नये असा ठराव लेजिस्लेटिव्ह असेंब्लीत मांडण्यात आला.[१६] या सर्वांचा परिपाक १९३१ च्या जनगणनेनंतर मागासलेल्या दलित जाती आणि आदिवासी जमाती यांचा अपवाद वगळता इतर जातींची नोंद न करण्याच्या निर्णयात झाला. या दृष्टीने १९३१ ची जनगणना ही जातीविषयक माहिती उपलब्ध करून देणारी शेवटची ठरली. या जनगणनेच्या वेळी महाराष्ट्रातील विविध जातींचे लोकसंख्येतील स्थान काय होते याची माहिती तक्ता क्रमांक ८ मध्ये दिली आहे. १९३१ साली सध्याच्या महाराष्ट्र राज्याचे प्रदेश ज्या ज्या राज्यात समाविष्ट झाले होते त्या त्या राज्यांच्या जनगणना अहवालातील संबंधित आकडेवारी एकत्र करून महाराष्ट्राची लोकसंख्येची आकडेवारी दिलेली आहे.

तक्ता क्रमांक ८

महाराष्ट्राच्या प्रादेशिक विभागांतील काही मोठ्या जाती, जमातींची १९३१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या

जात/जमात	पश्चिम महाराष्ट्र	विदर्भ	मराठवाडा	एकूण
(१)	(२)	(३)	(४)	(५)
ब्राह्मण	४,६७,१९६	१,७२,६८०	१,४१,५७२	७,८१,४४८
कायस्थ प्रभू	३०,३२७	४,४३७	--	३४,७६४
पाठारे प्रभू	४,६५६	--	--	४,६५६
राजपूत	७७,५६६	१,४८,९०१	३३,२८३	२,५९,७५०
वाणी/मारवाडी	१,९४,९१८	९९,५६६	३६,०३०	३,३०,५१४
कोमटी	१०,९५७	११,६३१	५२,९३३	७५,५२१
आगरी	२,५८,६०५	--	--	२,५८,६०५
अहीर	५१,८६०	३६,५७९	--	८८,४३९
मराठा	३८,७३,२९५	२,५०,१८०	११,९०,३९७	५३,१३,८७२
कुणबी	११,९२,४२४	११,५१,२१३	५४,५२१	२३,९८,१५८
माळी	३,१३,२२१	३,२८,७६१	८८,८१७	७,३०,७९९
धनगर/हटकर/कुरुब	३,९०,८५८	--	४०,१७७	४,३१,०३५
भोई	३५,५८१	१,५७,८०८	५०,८००	२,४४,१८९
कोळी	२४५६९०	३९३६३	४०,१८१	३,२५,२३४
हलबा	--	२८१५३	--	२८,१५३
वंजारी	१,३७,२४५	४८,८६०	२६,९३५	२,१३,०४०
यादव/(अहीर/गवळी/ धनगर व गोल्ला)	--	--	१,८०,६८२	१,८०,६८२
गोवारी	--	१,२८,२१५	--	१,२८,२१५
तेली	९६,३२७	३,१७,६०९	३२,०८६	४,४६,०२२
कोष्टी/देवांग/हुटगार	४८,६३४	९९,२५५	४१,०५८	१,८८,९४७
साळी/पद्मसाळी	६०,३६८	--	--	६०,३६८
न्हावी/हजाम/मडिग	१,१७,७३१	७३,८१५	--	१,९१,५४६
लिंगायत	--	--	२१५१४४	२१५१४४

Maharashtra State Gazetteers

कुंभार	८१,२७६	३७,१४९	३८,८५९	१,५७,२८४
पांचाळ	--	--	२९,७८३	२९,७८३
कासार	--	--	१२,७७७	१२,७७७
सोनार	१,२१,६९३	६८,३७९	३५,०४८	२,२५,१२०
माना	--	५७,४७३	--	५७,४७३
शिंपी/दर्जी/साई	७७,२०३	२६,२९५	१३,५५०	१,१७,०४८
सुतार	१,४३,८४८	--	१५,६३३	१,५९,४८१
लोहार	३८,३७०	६४,३६७	१७,७२०	१,२०,४५७
धोबी/परीट	५६,९४७	५३,२४२	२०,८५४	१,३१,०४३
बुरूड	७,८२६	--	७,८८७	१५,७१३
बेलदार	१०,३१५	१८,२४८	२३,८३२	५२,३९५
कलार	--	६८,२२२	--	६८,२२२
रंगारी	--	--	९,६४४	९,६४४
बेरड/बेडर	२९,८७३	१,०४५	६,१५१	३७,०६९
रामोशी	५८,४४०	--	--	५८,४४०
वडार	३६,७३३	१३,१६०	१७,९६८	६७,८६१
खाटिक/कसाब	--	--	१०,८३३	१०,८३३
कलाल	--	--	१९,८१९	१९,८१९
महार/होलिया	९,७१,३७३	--	३,९०,६३०	१३,६२,००३
मांग/मादिगा	१,९३,४७८	९४,१६७	२,४७,९१२*	५,३५,५५७
चांभार/मोची/सोची	२,०३,०१४	६२,९१०	--	२,६५,९२४
ढोर	१४,०५४	६,६१६	--	२०,६७०
मेहतर	--	११,६६०	--	११,६६०
भंगी	१७,४७४	--	--	१७,४७४

*यात चांभारांच्या लोकसंख्येचा समावेश आहे

आधार (१) सेन्सस् ऑफ इंडिया, १९३१, खंड ८ : **बॉंबे प्रेसिडेंन्सी,** भाग १ आणि २.

(२) सेन्सस् ऑफ इंडिया, १९३१, खंड १२ : **सेंट्रल प्रॉव्हिन्सेस अँड बेरार,** भाग २ : टेबल्स

(३) सेन्सस् ऑफ इंडिया, १९३१, खंड २३ : **एच.इ.एच. दि निझाम्स डोमिनियन्स,** (हैदराबाद स्टेट), भाग २ : टेबल्स.

उपलब्ध असलेल्या आधार साहित्यातील अंगभूत मर्यादा लक्षात घेऊन तक्ता क्रमांक ८ मध्ये दाखविलेल्या महाराष्ट्राशी संबंधित असलेल्या तिन्ही विभागांतील विविध जातींच्या एकत्रित लोकसंख्येच्या आधारे महाराष्ट्रातील प्रमुख जातींच्या संख्याबलासंबंधी स्थूलमानाने काही निष्कर्ष काढता येतील. मराठा ही महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकसंख्या असलेली जात आहे हे तक्त्यात दिलेल्या लोकसंख्येच्या आकड्यांवरून दिसून येते. या जातीची लोकसंख्या ५३ लाखाच्या पुढे होती. दहा लाखाच्या पुढे लोकसंख्या असलेल्या जातींमध्ये मराठा, महार आणि कुणबी या जाती येतात. पाच लाख ते दहा लाख लोकसंख्या असलेल्या जातींच्या गटात ब्राह्मण, माळी आणि मांग या जाती येतात. एक लाख ते पाच लाख लोकसंख्येच्या गटात चांभार, सोनार, शिंपी, सुतार, यादव, तेली, कोष्टी, न्हावी, कुंभार, राजपूत, आगरी, धोबी, वंजारी, वाणी, धनगर, कोळी, लोहार, लिंगायत आणि गोवारी या जाती येतात. बाकीच्या सर्व जातींची लोकसंख्या एक लाखाहून कमी आहे.

आतापर्यंत रेखाटलेले विविध जातींच्या महाराष्ट्रातील संख्याबलाचे चित्र स्थूलमानाने जरी सर्व भागांना लागू पडत असले, तरी कोकण, देश, विदर्भ आणि मराठवाडा या प्रादेशिक उपोंविभागांची असलेली काही वैशिष्ट्ये तक्ता क्रमांक ९ वरून स्पष्ट होतील. यातील आकडेवारी १९३१ साली सध्याच्या महाराष्ट्र राज्याचे प्रादेशिक उप-विभाग ज्या ज्या राज्यात समाविष्ट होते त्या त्या राज्यांच्या जनगणना अहवालातील संबंधित आकडेवारी एकत्र करून महाराष्ट्राची

लोकसंख्या दिली आहे. तक्त्यातील आकडेवारीवरून पहिली गोष्ट लक्षात येते की, मराठा-कुणबी यांचे लोकसंख्येतील एकत्रित प्रमाण कोकण आणि मराठवाडा या भागात जेवढे आहछ (३३.८७ व २९.९३) तेवढे ते विदर्भ (२१.४२) आणि देश (२०.६९) या भागात नव्हते. देश उप-विभागातील या जातींचे लोकसंख्येतील प्रमाण इतर तीन विभागांच्या तुलनेने सर्वात कमी होते. दुसरी गोष्टी म्हणजे कोकण आणि देश यांच्या तुलनेने विदर्भ आणि मराठवाड्यात महार जातीचे लोकसंख्येतील प्रमाण तुलनेने अधिक होते. तसेच महार मांग आणि चांभार या दलित वर्गातील तीन प्रमुख जातींचे एकत्रित लोकसंख्येतील प्रमाण कोकण आणि देश या विभांगापेक्षा तुलनेने अधिक होते. ब्रह्मे आणि उपाध्याय यांच्या मतानुसार याचे कारण या भागातील जमीन अधिक सुपीक आहे व या भागात संस्कृतीचा विकास खूप आधीपासून म्हणजे ख्रिस्तपूर्व ३०० पासून झाला हे असावे.[१७] वाणी, मारवाडी, कोमटी आणि लिंगायत या परंपरेने व्यापार करणाऱ्या जातींचे प्रमाणही मराठवाड्यात इतर विभागांच्या तुलनेने अधिक होते (७.३१). याचेही कारण या भागात नागरी संस्कृतीचा उदय खूप लवकर झाला व या प्रदेशातून जगातील इतर देशांशी व्यापारही फार प्राचीन काळापासून सुरू आहे हे असावे.

तक्ता क्रमांक ९

महाराष्ट्रातील प्रादेशिक विभागांमध्ये असलेले विविध जातींचे लोकसंख्येतील प्रमाण : १९३१

जात/जमात	प्रादेशिक विभागातील एकूण लोकसंख्येतील प्रतिशत प्रमाण			
	कोकण	देश (दख्खन)	विदर्भ	मराठवाडा
ब्राह्मण	४.००	१.००	२.६३	४.००
वाणी/मारवाडी	२.४५	०.५३	१.५२	०.८७
कोमटी	०.२६	--	--	१.२७
लिंगायत	--	--	--	५.१७
राजपूत	०.११	०.४१	२.२७	०.८०
मराठा-कुणबी	३३.८७	२०.६९	२१.४२	२९.९३
माळी	०.४९	१.६४	५.२	२.१४
धनगर	०.५२	२.०७	--	०.९७
कोळी	२.२२	०.८७	०.६०	०.९७
हटकर	--	--	--	०.९७
भोई	०.१९	०.१६	२.४१	१.२२
शिंपी	०.३७	०.३५	०.४०	०.३३
परीट (धोबी)	०.२८	०.३५	०.८१	०.५०
न्हावी	०.५७	०.५३	१.१३	--
कोष्टी	०.३१	०.५४	१.५२	०.९९
सुतार	०.८५	०.४२	--	०.३८
लोहार	०.२२	०.१६	०.९८	०.४३
तेली	०.६७	०.३९	४.८५	०.७७
रंगारी	--	--	--	०.२३
महार	६.०२	४.०६	--	९.३९
मांग	०.१५	१.०५	१.४४	५.९६
चांभार	१.२३	०.८६	०.९६	

सन १९११ च्या जनगणनेतून महाराष्ट्रातील समाजाचे स्थूलमानाने जे चित्र दिसते त्याची प्रमुख वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. जवळजवळ ७० प्रतिशत लोक कृषि, मासेमारी, पशुपालन इत्यादी अन्नोत्पादक व्यवसायात होते. त्याखालोखाल विविध उद्योगांत जवळजवळ १२ प्रतिशत लोक काम करीत होते. व्यापाराच्या क्षेत्रात जवळजवळ ६ टक्के लोक होते. याखेरीज इतर क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांचे प्रमाण अतिशय कमी, म्हणजे २ प्रतिशतपेक्षा कमी

होते. हे आकडे इरावती कर्वे यांनी कृषक समाज या नात्याने महाराष्ट्रातील समाजाची व्यावसायिकदृष्ट्या जी वैशिष्ट्ये सांगितली आहेत त्याच्याशी मिळते जुळते आहेत.[१८] दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे हे विविध व्यवसाय करण्याची जातिव्यवस्थेवर आधारलेली पद्धतीही समाजात प्रभावी होती व परंपरागत व्यवसाय करण्याचे तत्त्व बऱ्याच प्रमाणात अमलात येत होते. परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण मराठा व कुणबी या कृषक जाती, तसेच कोष्टी, सोनार, लोहार, पांचाळ इत्यादी कसबी जतींमध्ये अधिक होते. जातिव्यवस्थेतील दर्जामधील असमानतेच्या तत्त्वाचा आविष्कार विविध जातींच्या असमान प्रगतीत दिसून येतो. वाणी आणि ब्राह्मण या उच्चवर्णीय जातींमध्ये साक्षरांचे प्रमाण अधिक होते, तर ते परंपरागत कृषक मराठा व कुणबी या जातीत अत्यल्प होते.

दिनांक १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आले. मुंबई इलाखा, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, व हैदराबाद संस्थान या ब्रिटिश काळात अस्तित्वात असलेल्या प्रशासकीय विभागांत समाविष्ट असलेले मराठी भाषिक विभाग एकत्र जोडून महाराष्ट्र राज्य निर्माण करण्यात आले. त्यामुळे प्रथमच प्रशासकीय पातळीवर काही अपवाद वगळता सर्व मराठी भाषिक समाज एकत्र आला. अशा अखंड मराठी भाषिक समाजाचे राज्य असलेल्या महाराष्ट्राचे आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक चित्र १९६१ च्या महाराष्ट्राच्या जनगणना अहवालात रेखाटले असल्याचे आपणास दिसते. या चित्राचे ठळक स्वरूप कसे होते ते पाहणे बोधप्रद ठरेल.

सन १९६१ च्या जनगणनेच्या संदर्भात पहिली गोष्ट नजरेस येते की, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती याखेरीज इतर समाजातील जातींची नोंद घेतली गेली नाही. त्यामुळे स्थूलमानाने या अहवालातून महाराष्ट्रातील विविध धार्मिक गट, सवर्ण, हिंदू, अनुसूचित जाती व या प्रवर्गात येणाऱ्या विविध जमाती यांच्याविषयी सांख्यिकीय माहिती मिळते. महाराष्ट्रातील समाजाच्या धार्मिक जडणघडणीत विविध धर्मीयांचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते : हिंदू (८२.२४ प्रतिशत), मुसलमान (७.७० प्रतिशत), ख्रिश्चन (१.४२ प्रतिशत), जैन (१.२३ प्रतिशत), बौद्ध (७.०५ प्रतिशत), आणि अन्य धर्मीय (०.३६ प्रतिशत). विविध धर्मीयांचे प्रमाण पाहता एक प्रमुख गोष्ट नजरेत भरते ती म्हणजे बौद्ध धर्मीयांच्या लोकसंख्येत झालेली लक्षणीय वाढ. १९११ साली मुंबई इलाख्यात बौद्ध धर्मीयांची लोकसंख्या ६९२ होती, त्यात १९६१ साली लक्षणीय वाढ होऊन त्यांचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण हे ७.०५ प्रतिशत झाले. या वाढीचे प्रमुख कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हजारो दलितांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर घेतलेली बुद्ध धर्माची दीक्षा हे होय.

महाराष्ट्राच्या १९६१ च्या एकूण लोकसंख्येत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांची एकत्रित लोकसंख्या ५५,९०,००० होती व त्यांचे लोकसंख्येतील एकत्रित प्रमाण ११.६९ होते. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांमध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे जिल्ह्याच्या लोकसंख्येतील प्रतिशत प्रमाण तक्ता क्रमांक १० मध्ये दाखविले आहे. या तक्त्यावरून अनुसूचित जातींच्या संदर्भात एक गोष्ट लक्षात येते की, बीड जिल्ह्यात अनुसूचित जातींचे लोकसंख्येतील प्रमाण सर्वात अधिक म्हणजे १३.५१ प्रतिशत होते, तर रायगड (कुलाबा) जिल्ह्यात ते सर्वात कमी होते. विभागवार विचार केल्यास दिसून येते की, औरंगाबाद विभागात म्हणजे मराठवाड्यात अनुसूचित जातींचे लोकसंख्येतील प्रमाण सर्वात अधिक म्हणजे ९.९८ होते व मुंबई विभागात ते सर्वात कमी म्हणजे २.७५ टक्के होते.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींचे एकूण लोकसंख्येतील प्रमाण ६.०६ प्रतिशत होते. तसेच विभागवार विचार केल्यास असे दिसते की, अनुसूचित जमातींचे सर्वात अधिक प्रमाण मुंबई विभागात (१२.३५ प्रतिशत) होते तर सर्वात कमी (१.६३ प्रतिशत) प्रमाण औरंगाबाद विभागात होते. जिल्ह्याच्या स्तरावर विचार करता असे दिसते की, धुळे जिल्ह्यात अनुसूचित जमातींच्या लोकसंख्येचे प्रमाण सर्वाधिक (३७.९९ प्रतिशत) होते, तर नागपूर विभागातील बुलढाणा, अकोला, वर्धा, नागपूर, आणि भंडारा या जिल्ह्यांत हे प्रमाण सर्वात कमी होते. अनुसूचित जमातींची सर्वाधिक वस्ती असलेले जिल्हे म्हणून धुळे, ठाणे आणि नाशिक यांचा उल्लेख करता येईल.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्या लोकसंख्येतील प्रमाणांचा एकत्रित विचार केल्यास सर्वसाधारणपणे असे दिसते की, ज्या जिल्ह्यात अनुसूचित जातींचे प्रमाण अधिक आहे तेथे अनुसूचित जमातींचे प्रमाण कमी आहे, व जेथे अनुसूचित जमातींचे प्रमाण अधिक आहे तेथे अनुसूचित जातींचे प्रमाण कमी आहे. मात्र तसे असण्याचे कारण काय हा सखोल व स्वतंत्र अभ्यासाचा विषय असल्याकारणाने त्याचे येथे विवेचन करणे किंवा त्याबाबत अनुमान काढणे शक्य झाले नाही.

अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती म्हणजे भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या सामाजिक-वैधानिक संकल्पना आहेत. स्वातंत्र्यपूर्वकाळात अस्पृश्य म्हणून गणल्या गेलेल्या, व त्यामुळे ज्यांना विशेष शासकीय सहाय्याची जरूरी आहे, अशा जातींना राष्ट्रपतींनी एका यादीत अथवा अनुसूचीत समाविष्ट केलेत आहे. अशा जातींना अनुसूचित जाती म्हणून मानले जाते. हीच पद्धती जास्त मागासलेपण असलेल्या आदिवासी जमातींच्या संदर्भात वापरून त्यांचीही अनुसूची तयार केली व या अनुसूचीत समाविष्ट असलेल्या जमातींना अनुसूचित जमाती म्हणून ओळखण्यात येते.

अशा जाती अथवा जमातींचे मागासलेपण विशिष्ट भू-प्रदेशाशी निगडित असल्यामुळे या भू-प्रदेशाचाही अंतर्भाव जाती अथवा जमातीच्या नावाबरोबर अनुसूचीमध्ये केला जातो. महाराष्ट्रात विविध अनुसूचित जाती कोणत्या आहेत व त्या कोणकोणत्या विभागात आहेत हे तक्ता क्रमांक ११ मध्ये दाखविले आहे. अशाच तऱ्हेची अनुसूचित जमातींची माहिती तक्ता क्रमांक १२ मध्ये दिली आहे.

अनुसूचित जातींच्या वर्गात महार, मांग, चांभार, भंगी, ढोर आणि होलारा या प्रमुख जाती आहेत. सर्वाधिक लोकसंख्या असलेली जात म्हणजे महार. महाराष्ट्रातील सर्व विभागात या जातीची वस्ती आहे. महार, मांग आणि चांभार या जाती महाराष्ट्रातील सर्व विभागांत दिसून येतात हे तक्ता क्रमांक ११ मधील माहितीवरून दिसते. भंगी मुंबई, पुणे, नागपूर या विभागांत दिसतात तर ढोर लोक सोलापूर, उस्मानाबाद आणि बृहन्मुंबई या जिल्ह्यांत प्रामुख्याने दिसतात. होलार ही जात पुणे विभागात दिसते. चांभारांप्रमाणे होलार हेही चर्मोद्योगात आहेत. सन १९६१ च्या जनगणनेनुसार या सहा जातींची लोकसंख्या वीस हजारांवर असून मादगी, खाटिक व माह्यावंशींची संख्या दहा हजारांवर असल्याचे नोंदण्यात आले.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १०

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचे
एकूण लोकसंख्येतील प्रमाण : १९६१

विभाग/जिल्हा	एकूण लोकसंख्येतील प्रतिशत प्रमाण	
	अनुसूचित जाती	अनुसूचित जमाती
(१)	(२)	(३)
महाराष्ट्र	५.६३	६.०६
मुंबई विभाग	२.७५	१२.३५
१. बृहन्मुंबई	२.९८	०.५४
२. ठाणे	१.३७	३०.२९
३. कुलाबा	१.३१	९.०१
४. रत्नागिरी	२.०८	०.१७
५. नाशिक	३.६६	२४.४५
६. धुळे	३.५६	३७.९९
७. जळगाव	३.४७	५.५९
पुणे विभाग	८.४६	२.०६
८. अहमदनगर	८.८७	६.१८
९. पुणे	४.९१	३.६४
१०. सातारा	५.२४	०.१७
११. सांगली	८.२९	०.०५
१२. कोल्हापूर	११.३९	०.१०
१३. सोलापूर	१२.८४	०.४९
औरंगाबाद विभाग	९.९८	१.६३
१४. औरंगाबाद	६.०५	१.६०
१५. परभणी	६.९६	२.८९
१६. बीड	१३.५१	०.२४
१७. नांदेड	११.०१	३.७६
१८. उस्मानाबाद	१३.३९	३.०३
नागपूर विभाग	३.७५	४.२७
१९. बुलढाणा	५.३०	०.००
२०. अकोला	४.७०	०.००
२१. अमरावती	३.९५	४.४५
२२. यवतमाळ	३.८७	१४.१७
२३. वर्धा	२.३९	०.००
२४. नागपूर	३.६०	०.००
२५. भंडारा	२.४५	०.००
२६. चंद्रपूर	३.४४	१४.८२

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक ११

महाराष्ट्रातील अनुसूचित जाती, १९६१

जात (१)	लोकसंख्या (२)	जातीची वस्ती असलेला विभाग (३)
१. महार	७,८२,००८	सर्व विभाग
२. मांग	७,२७,००६	सर्व विभाग
३. चांभार	४,९१,३२६	सर्व विभाग
४. भंगी	६१,९७९	मुंबई, पुणे आणि नागपूर
५. ढोर	३६,७४७	सोलापूर, उस्मानाबाद आणि बृहन्मुंबई
६. होलार	२७,६०२	पुणे विभाग
७. मादगी	१५,४७१	नागपूर विभाग
८. खाटिक	१३,५८४	नागपूर विभाग
९. माह्यावंशी	११,९९९	मुंबई विभाग
१०. मेघवाल	९,०३१	मुंबई विभाग
११. बसोर	७,५५४	नागपूर विभाग
१२. डोहोर	४,७४१	नागपूर विभाग
१३. होलेया	४,३४३	औरंगाबाद विभाग
१४. अगेर	३,८९७	मुंबई विभाग
१५. बलाही	२,८७२	अमरावती जिल्हा
१६. मादिगा	२,३५०	औरंगाबाद विभाग, व चंद्रपूर जिल्हा
१७. होलिया	२,३०२	भंडारा जिल्हा
१८. डोम	२,१२३	नागपूर विभाग
१९. कैकाडी	१,९४६	नागपूर विभाग
२०. होलाया	१,७८१	पुणे विभाग, बृहन्मुंबई
२१. पासी	१,३५४	बृहन्मुंबई
२२. येल्लमलवार	५१४	औरंगाबाद विभाग
२३. कोरी	४५७	नागपूर विभाग
२४. चलवादी	३४९	सोलापूर आणि ठाणे
२५. बेरड	३३९	नागपूर विभाग
२६. कटिया	३२८	नागपूर विभाग
२७. शेणबा	३२१	बृहन्मुंबई,रत्नागिरी आणि पुणे
२८. मालाजंगम	३१८	औरंगाबाद विभाग
२९. मुक्री	३०१	बृहन्मुंबई
३०. गंडा	२७५	नागपूर विभाग
३१. तुरी	२६८	बृहन्मुंबई,नाशिक आणि सांगली
३२. बाकड	२५०	मुंबई आणि सोलापूर
३३. माला	२३४	चंद्रपूर जिल्हा आणि औरंगाबाद विभाग

Maharashtra State Gazetteers

३४. कोलुपूल-वंडळु	२२२	उस्मानाबाद आणि चंद्रपूर
३५. गरोडा	२०९	बृहन्मुंबई आणि सांगली
३६. हल्लीर	२०१	बृहन्मुंबई आणि सांगली
३७. चेन्नेदासर	१४१	पुणे विभाग
३८. नाडिया	१३३	बृहन्मुंबई आणि रत्नागिरी विभाग
३९. घासी	१२५	भंडारा जिल्हा
४०. मन्ने	१२२	नांदेड, परभणी, चंद्रपूर

अतिशय कमी म्हणजे १ ते १०७ लोकसंख्या असलेल्या जाती :- (१) डक्कल, (२) बेडा जंगम, (३) होलेया दसारी, (४) आरेमाळा, (५) माला संन्याशी, (६) माला दासरी, (७) अनमुक, (८) बिंदला, (९) मस्ती, (१०) ब्यागारा. या सर्व जातींचे वसतिस्थान औरंगाबाद विभागात आहे.

नागपूर विभाग :- (१) बहना, (२) सांसी, (३) खंगार, (४) माला साले.

बृहन्मुंबई, धुळे व नाशिक जिल्हे :- तिरगार.

बृहन्मुंबई, धुळे व कोल्हापूर :- हलसार.

बृहन्मुंबई, धुळे आणि सोलापूर :- लिंगडेर.

एकूण ५७ अनुसूचित जातींपैकी (नगण्य) हजाराहून कमी पण शंभराहून अधिक लोकसंख्या असणाऱ्या वीस जाती आहेत. याखेरीज अगदी नगण्य लोकसंख्या असलेल्या सोळा जाती आहेत.

तक्ता क्रमांक १२

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या, १९६१

जमात	लोकसंख्या	अनुसूचित जमातीमधील प्रतिशत प्रमाण	वसतिस्थान
(१)	(२)	(३)	(४)
१. भिल्ल	५,७५,०२२	२३.९९	जळगाव, धुळे, नाशिक, अहमदनगर व औरंगाबाद जिल्हे
२. कोळी महादेव	२,७४,२४४	११.४४	नाशिक, पुणे, अहमदनगर, ठाणे,रायगड
३. गोंड	२,७२,५६४	११.३७	नागपूर,चंद्रपूर, नांदेड व अमरावती जिल्हे
४. वारली	२,४३,९८०	१०.१८	ठाणे, नाशिक, बृहन्मुंबई
५. कोकणा	२,१२,८३६	८.८८	नाशिक, धुळे, ठाणे
६. ठाकूर	१,५९,३७२	६.६५	ठाणे,रायगड,नाशिक,पुणे,अहमदनगर
७. काथोडी	१,४०,६७२	५.८७	रायगड,ठाणे, रत्नागिरी, पुणे, नाशिक, सातारा
८. गामित	१,०२ ३२१	४.२७	धुळे, ठाणे
९. कोळी मल्हार	८९,०४७	३.७१	ठाणे
१०. आंध	६०,२६१	२.५१	परभणी, नांदेड, यवतमाळ
११. कोरकू	५०,२७९	२.१०	अमरावती
१२. धानका	४८,०८९	२.०१	धुळे, जळगाव
१३. कोलाम	४३,७८८	१.८३	यवतमाळ, चंद्रपूर, नांदेड
१४. परधान	३२,२३७	१.३४	यवतमाळ, चंद्रपूर, नांदेड
१५. पारधी	२१,४१७	०.८९	जळगाव, धुळे, नाशिक, पुणे, अहमदनगर,सोलापूर,यवतमाळ
			जळगाव, धुळे, बृहन्मुंबई, ठाणे,नाशिक,

Maharashtra State Gazetteers

१६. कोळी ढोर	१५,४६१	०.६४	कोल्हापूर, सोलापूर
१७. दुबळा	१३,६३०	०.५७	बृहन्मुंबई, ठाणे, रायगड, धुळे
१८. धोडिया	१२,०३७	०.५०	बृहन्मुंबई, ठाणे, धुळे
१९. नाइकडा	११,७३१	०.४९	बृहन्मुंबई, ठाणे, धुळे
२०. हलबा	५,४३०	०.२३	चंद्रपूर, यवतमाळ
२१. कवर	२,९१५	०.१२	चंद्रपूर, यवतमाळ
२२. राठवा	२,८७४	०.१२	सोलापूर
२३. बेरडा	९१८	नगण्य	जळगाव, धुळे, नाशिक
२४. विटोलिया	८९८	–"–	धुळे, नाशिक
२५. खैरवार	२७५	–"–	चंद्रपूर
२६. पोमला	२६३	–"–	सोलापूर, बृहन्मुंबई, धुळे
२७. पटेलिया	१८०	–"–	बृहन्मुंबई, ठाणे, धुळे, रायगड
२८. चौधरा	१५७	–"–	सोलापूर, धुळे
२९. थोटी	१०९	–"–	नांदेड, चंद्रपूर
३०. बावचा	९४	–"–	नाशिक, पुणे, बृहन्मुंबई
३१. कोल	५३	–"–	यवतमाळ
३२. धनवार	४०	–"–	यवतमाळ
३३. कोया	३३	–"–	चंद्रपूर, उस्मानाबाद, परभणी
३४. नगेसिया	२८	–"–	चंद्रपूर
३५. बिंझवार	२४	–"–	चंद्रपूर, अमरावती, यवतमाळ
३६. बिरहुल	२२	–"–	यवतमाळ
३७. भैना	१२	–"–	यवतमाळ
३८. भुंजिया	६	–"–	अमरावती
३९. भात्रा	३	–"–	यवतमाळ
४०. ओरांव	१	–"–	यवतमाळ
४१. इतर	३,८३६	०.१६	--

तक्ता क्रमांक १२ मध्ये अनुसूचित जमातींची माहिती दिली आहे. लोकसंख्येच्या दृष्टीने पहिल्या पाच जातींमध्ये भिल्ल, महादेव कोळी, गोंड, वारली व कोकणा यांचा समावेश होतो. कोरकू, कोलाम, परधानआणि हलबा या विदर्भातील सुपरिचित जमाती होत. ठाकूर, काथोडी आणि गामित या जमातींची लोकसंख्या एक लाख ते दोन लाखाच्या दरम्यान होती. मल्हार कोळी, आंध, कोरकू, धानका, कोलाम, परधानआणि पारधी या जमातींची लोकसंख्या प्रत्येकी वीस हजार ते एक लाखाच्या दरम्यान होती. ढोर कोळी, दुबळा, धोडिया, नाइकडा, हलबा, कवर आणि राठवा यांची लोकसंख्या एक हजार ते वीस हजार या दरम्यान होती. याखेरीज अन्य जमातींची लोकसंख्या एक हजाराहून कमी होती. यामध्ये जमातींची लोकसंख्या १२० ते १,००० च्या दरम्यान होती. अत्यल्प लोकसंख्या असणाऱ्या म्हणजे १ ते १०९ पर्यंत लोकसंख्या असणाऱ्या जमातींची संख्या १२ होती व यामधील सर्वात अधिक म्हणजे दहा जमाती औरंगाबाद विभागातील होत्या.

तक्ता क्रमांक १३ व १४ मध्ये १९८१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्रातील अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींची लोकसंख्या दिली आहे.

१९९१ च्या जनगणनेनुसार राज्यातील अनुसूचित जातींची लोकसंख्या ८७.५८ लाख (पुरुष ४५.०५ लाख व स्त्रिया ४२.५३ लाख) होती, तर अनुसूचित जमातींची लोकसंख्या ७३.१८ लाख (पुरुष ३७.१८ लाख व स्त्रिया

Maharashtra State Gazetteers

३६.०० लाख) इतकी होती. त्यांचे राज्यातील एकूण लोकसंख्येशी प्रमाण अनुक्रमे ११.१ व ९.३ टक्के होते. राज्यात अनुसूचित जातीचे सर्वाधिक प्रमाण (१९.०६ टक्के) लातूर जिल्ह्यात होते, तर सर्वात कमी (१.७७ टक्के) रत्नागिरी जिल्ह्यात आढळले. त्याचप्रमाणे राज्यात सर्वाधिक अनुसूचित जमातींचे प्रमाण धुळे जिल्ह्यात (४०.८८ टक्के) व सर्वात कमी (०.४७ टक्के) सिंधुदुर्ग जिल्ह्यात होते.

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती हे भारतीय समाजातील मागासलेले गट आहेत, व त्यांचे मागासलेपण शासकीय सहाय्याशिवाय नाहीसे होण्यासारखे नसल्यामुळे वेंद्र सरकारने तसेच राज्य शासनाने विशेष प्रशासकांची नियुक्ती करून खास प्रशासकीय विभागाची स्थापना केली आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती या दोन्ही गटांत समाविष्ट न झालेल्या परंतु आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या जवळजवळ तेवढ्याच मागासलेल्या अशा काही थोड्या जमाती आहेत. एकेकाळच्या या आदिवासी जमाती होत. ब्रिटिश राजवटीत यांना "गुन्हेगार जमाती" म्हणून संबोधण्यात येत असे. स्वातंत्र्यपूर्व काळात या जमातींमधील लोकांवर बरीच बंधने लादण्यात आली होती. यांच्या वसाहती मुख्य नागरी वस्तीपासून अलग असावयाच्या. ही बंधने सामाजिक समतेच्या तत्त्वाविरुद्ध असल्यामुळे ती स्वातंत्र्योत्तर काळामध्ये काढून टाकण्यात आली व त्यांना विमुक्त जाती म्हणून संबोधण्यात येऊ लागले. पूर्वीच्या मुंबई इलाख्यातील गुन्हेगार जमातींच्या यादीत पुढील जमातींचा अंतर्भाव केलेला हाता :- बंजारा, बेरड, भामटा, छप्परबंद, कैकाडी, कातकरी, कोळी, मांग, मांग गारुडी, मियान, पारधी, रामोशी, वाघरी आणि वडार.[१९] यापैकी मियान व वाघरी या गुजरातमधील दोन जमाती सोडल्यास बाकीच्या जमाती महाराष्ट्रातील आहेत. यामध्ये रामोशी, बेरड आणि पारधी या प्रमुख जमाती आहेत. रामोशी ही जमात कर्नाटकातील बेडर किंवा बेरड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जमातीची एक शाखा असावी. महाराष्ट्रात रामोशांना बेरड या नावाने ओळखले जाते. खरे तर इमानी परंतु बदलत्या समाजव्यवस्थेत अन्यायाने वागविल्यामुळे गुन्हेगारी व दरोडे याकडे वळलेली ही जात जेजुरीच्या खंडोबाला आपले दैवत मानते. ग्रामीण भागात रामोशी ही जात बलुता व्यवस्थेत समाविष्ट झाली आहे. त्यांच्याकडे रखवालीचे काम दिले आहे. गावातील पिकांची तसेच गावकऱ्यांच्या स्थावर मालमत्तेची राखण करण्याची जबाबदारी रामोशांवर असते. सरकारी खजिन्याच्या संरक्षणासाठी रामोशी रखवालदाराला बरोबर जावे लागत असे. रामोशांना बलुता पद्धतीत सामावून घेतले असले तरी या जातीतील लोक आसपासच्या परिसरात लहान मोठ्या चोऱ्या करीत असत. शेतातील पिके तसेच शेळ्या, मेंढ्या यांच्या चोऱ्या ते करीत असत. मात्र रामोशी स्वतःच्या गावात सहसा चोरी करीत नसल्यामुळे परिसरातील कोणाकडून चोरी झाली असेल याचा रामोशांना साधारण अंदाज करता येत असे व त्या अनुषंगाने ते चोरीचा शोध घेत असत. त्यामुळे ग्रामीण भागातील गुन्हेगारीवर अनौपचारिक नियंत्रण राहत असे.[२०] गुन्हा झाल्यानंतर गावातील रामोशांना जबाबदार धरण्याची ही परंपरागत पद्धती ब्रिटिश काळातही पोलीस खात्यातर्फे वापरली जात असल्याचे अधूनमधून निदर्शनास येते.

Maharashtra State Gazetteers

समाजव्यवस्थेतील परिवर्तन

महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाने १९ फेब्रुवारी १९८६ रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार महाराष्ट्रात २८ भटक्या जमाती व १४ विमुक्त जाती आहेत. विमुक्त जातींमध्ये पुढील जातींचा समावेश करण्यात आला आहे. (१) बेरड, (२) बेस्तर, (३) भामटा, (४) कैकाडी, (५) कंजारभाट, (६) कटाबू, (७) बंजारा, (८) पालपारधी, (९) राजपारधी, (१०) राजपूत भामटा, (११) रामोशी, (१२) वडार, (१३) वाघरी व (१४) छप्परबंद. या प्रमुख जातींच्या अनेक पोटजाती आहेत. त्याचप्रमाणे २८ प्रमुख जातींचा समावेश भटक्या जमातींच्या यादीत केला आहे. यातील काही जमातींची नावे पुढीलप्रमाणे आहेत : गोसावी, बेलदार, भराडी, भुते, चित्रकथी, गारुडी, घिसाडी, गोंधळी, गोपाल, जोशी, कोल्हाटी, नंदीवाले, पांगूळ, वासुदेव व बहुरुपी. भटक्या आणि विमुक्त जमातींच्या गटातील प्रमुख जाती व पोटजातींची संख्या दोनशेच्या आसपास आहे.[२१] परंपरागत काळात हिंदू धर्मातील धार्मिक रूढी व श्रद्धा जिवंत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य काही भटक्या जमाती करीत होत्या. त्यामध्ये गोंधळी, वाघ्यामुरळी, आराधीजोगती, वासुदेव, जोशी या जातींचा अंतर्भाव होतो. प्रामुख्याने करमणुक करणाऱ्या जमातींमध्ये कोल्हाटी, बहुरुपी, डोंबारी, सापगारुडी या जाती सुपरिचित आहेत. काही जाती पशुपालक, काही शिकारी, तर काही कृषि समाजास उपयुक्त असे व्यवसाय करतात.

भटक्या-विमुक्त जमातींच्या जीवनात जात पंचायतीला महत्त्वाचे स्थान आहे. या पंचायती बहुधा कोणत्यातरी यात्रेच्या वेळी भरतात व त्यावेळी विविध ठिकाणी विखुरले गेलेले जमातींचे लोक एकत्र येतात. अशा पंचायती ज्या गावी भरतात त्यामध्ये माळेगाव, जेजुरी, सोनारी, बार्शी, आळंदी, चिखली, बारामती, चाळीसगाव, पाथर्डी ही गावे प्रमुख

आहेत.

पेशवाईच्या अस्ताबरोबर आणि ब्रिटिश राजवटीच्या आगमनाबरोबर महाराष्ट्राच्या परंपरागत समाजव्यवस्थेमध्ये परिवर्तन घडून येण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाली. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या शंभर वर्षांच्या कालखंडात (१८१२ ते १९११) सरकारने तांत्रिकी व औद्योगिक क्षेत्रात तसेच कृषि अर्थव्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल केले. या कालखंडात ब्रिटिशांनी महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक जीवनात हस्तक्षेप न करण्याचे धोरण अवलंबिले होते. त्यामुळे सामाजिक क्षेत्रातील परिवर्तनाची गती अतिशय मंद होती. परंतु १९११ नंतर ब्रिटिशांनी आपल्या तटस्थतेच्या धोरणात हळूहळू बदल करावयास सुरुवात केली व त्यामुळे सामाजिक व राजकीय क्षेत्रातील परिवर्तनाची गती वाढू लागली.

वसाहतवादी धोरणाचा एक भाग म्हणून ब्रिटिश राज्यकर्त्यांनी १८५३ पासून महाराष्ट्रात रेल्वेमार्ग टाकण्यास प्रारंभ केला. त्यामुळे मुंबई शहर देशावरील भागाशी जोडले गेले. खानदेश व विदर्भातील कापूस पिकविणारा प्रदेशही मुंबईशी रेल्वेने जोडला. सुएझ कालव्याच्या निर्मितीमुळे (१८६९) मुंबईचे व्यापारी व औद्योगिक शहर म्हणून महत्त्व वाढले. १८६० साली मुंबईत सहा कापड गिरण्यांची स्थापना केली. १८९० पर्यंत मुंबईतील कापड गिरण्यांची संख्या ७० झाली. या बदलामुळे मुंबई हे केवळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारतातील सागरी व्यापाराच्या क्षेत्रात व वस्त्रोद्योगाच्या क्षेत्रात अग्रगण्य शहर म्हणून ओळखले जाऊ लागले व विविध प्रांतातील लोक मोठ्या संख्येने कामधंद्याच्या शोधात येथे येऊ लागले. व्यापाराच्या आणि उद्योगाच्या क्षेत्रात लिपिक व इतर व्यक्तींची जसजशी गरज भासू लागली तसतसे लोकांना आधुनिक शिक्षणाचे महत्त्व पटू लागले व मिशनरी आणि महाराष्ट्रातील सेवाभावी संस्थांच्या तर्फे अनेक शैक्षणिक संस्था स्थापन करण्यात आल्या. या शिक्षण संस्थांमध्ये सर्व जातींना व धर्मीयांना प्रवेश खुला होता. या परिवर्तनाबरोबरच कृषि क्षेत्रामध्येही महत्त्वपूर्ण बदल करण्यात आले. महाराष्ट्राच्या बऱ्याच भागात रयतवारी जमीन महसूल पद्धती सुरू करण्यात आली आणि ग्रामीण भागातील पाटील व कुलकर्णी यांचा परंपरागत वतनदार अधिकारी हा दर्जा नष्ट करून त्यांना शासनाचे पगारी नोकर असा दर्जा देण्यात आला. जुन्या काळात सावकार शेतकऱ्यांना पाटलाच्या तर्फे कर्ज देत असे व कर्ज फेडीत शेतकऱ्यांना अडचण आल्यास मध्यस्थ या नात्याने तो शेतकऱ्यांना संरक्षण देत असे. कर्ज फेडीसाठी सहसा जमिनीचा लिलाव केला जात नसे. शेतसारा ठरावितानाही पाटील स्थानिक परिस्थितीच्या संदर्भात शासनाशी मध्यस्थी करून शेतकऱ्याच्या हिताच्या दृष्टीने महत्त्वाची भूमिका बजावीत असे. परंतु रयतवारी पद्धतीमुळे शेतकरी आणि शासन यांच्यामध्ये प्रत्यक्ष कराराच्या स्वरूपाचे संबंध निर्माण झाले व शेतकऱ्यास मिळणारा ग्रामीण समूहाचा सामूहिक आधार नष्ट झाला. नगदी पिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मागणी वाढल्यामुळे शेतकरी नगदी पिके मोठ्या प्रमाणात घेऊ लागले व त्यामुळे जमिनीच्या किंमतीतही वाढ झाली. महसुलाचे उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने जमीन महसुलात वाढ झाली. यामुळे अनेक शेतकऱ्यांना शेतसारा भरण्यासाठी कर्ज घेणे भाग पडू लागले व हे कर्ज फेडणे अशक्य झाल्यामुळे त्यांच्या जमिनी सावकारांकडे जाऊ लागल्या. १८६८ ते १८७३ या कालखंडात शेतकऱ्यांच्या जमिनीच्या जप्तीच्या अर्जांची संख्या बारा हजारांपासून अट्ठावीस हजारांवर गेली.[२२] जमिनीच्या हस्तांतरणाची प्रक्रिया श्रीमंत मराठा शेतकऱ्यांना सर्वसाधारणपणे फायद्याची ठरली, परंतु गरीब कुणबी भूमिहीन होऊ लागले व त्यामुळे त्यांचे शहराकडे स्थलांतर होऊ लागले.[२३] तांत्रिकी, औद्योगिक आणि कृषि क्षेत्रांमधील सुधारणांबरोबरच महाराष्ट्रात नवीन वैचारिक वारे वाहू लागले. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रचारकार्यामुळे महाराष्ट्रात मानवतावादी व समतावादी तत्त्वांचा प्रसार झाला. तसेच स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व, व्यक्तिस्वातंत्र्य या मूल्यांची ओळख महाराष्ट्रातील विचारवंतांना झाली. बेथॅम, मिल इत्यादी राजकीय आणि सामाजिक विचारवंतांच्या उदारमतवादी तत्त्तज्ञानाचा प्रभाव महाराष्ट्रातील विचारवंतांवर इंग्लिश विद्येच्या प्रसारामुळे पडला. या सर्व क्षेत्रांत होत असलेल्या परिवर्तनामुळे महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेचे पर्व सुरू झाले. धार्मिक क्षेत्रातील पुरोहितशाहीविरुद्ध महात्मा जोतिबा फुल यांनी बंडाचा झेंडा उभारून शूद्रातिशूद्रांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षमता प्राप्त करून देण्याच्या उद्देशाने २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. जोतिबा फुले यांनी वर्णाश्रम व्यवस्थेवर प्रखर प्रहार करून जाती जातीतील व स्त्री-पुरुषातील असमानता, तसेच अस्पृश्यता या रूढी नष्ट करण्यासाठी महाराष्ट्रात वैचारिक, सामाजिक व राजकीय आंदोलन सुरू केले. तसेच ब्राह्मणेतर व दलित वर्गात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून पुण्यात शाळा स्थापन केली. जोतिबांच्या मृत्युनंतर (१८९०) या आंदोलनाची सूत्रे कोल्हापूरचे शाहू महाराज यांनी आपल्याकडे घेतली व महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळ प्रभावी केली. १९२० नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सक्रिय राजकारणात भाग घ्यावयाचे ठरवून २० जुलै १९२४ साली बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली व अस्पृश्यतेविरुद्ध संघर्षात्मक चळवळ सुरू केली. या सर्व घडामोडींचा परिणाम महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेवर होणे अपरिहार्य होते. या सर्व घटकांमुळे महाराष्ट्रातील जातिव्यवस्थेत काय बदल झाले याचा आढावा पुढील परिच्छेदांमध्ये घेतला आहे.

महाराष्ट्रात विसाव्या शतकात परंपरागत जातिव्यवस्थेत जे परिवर्तन होत आहे त्याचे संपूर्ण महाराष्ट्राच्या पातळीवर

अध्ययन करण्याच्या मार्गातील प्रमुख अडचण म्हणजे १९३१ नंतरच्या जनगणनेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांचा अपवाद वगळता अन्य जातींचा निर्देश न करण्याच्या शासकीय निर्णयामुळे जनगणना अहवालात जातीविषयी माहिती मिळत नाही. त्यामुळे इतर अभ्यासकांच्या अध्ययनावर अवलंबून राहवे लागते. हा अभ्यास बहुतांशी स्थल, काल आणि उद्दिष्ट यांच्या दृष्टीने मर्यादित स्वरूपाचा आहे. त्यामुळे त्या आधारावर परिवर्तनासंबंधी काढावयाचे निष्कर्ष मर्यादित स्वरूपाचे असतील व त्यातून महाराष्ट्रातील जाती व्यवस्थेतील परिवर्तनाची दिशा स्थूलमानाने समजू शकेल. या अध्ययनाच्या जोडीने निरीक्षणाचाही आधार घ्यावा लागेल.

जातिव्यवस्थेमध्ये परिवर्तन होत आहे किंवा नाही व होत असल्यास त्याचे स्वरूप काय आहे हे पाहण्याच्या दृष्टीने जातीचा विशिष्ट भूप्रदेशाशी असलेला संबंध, व्यवसाय, सामाजिक दर्जा आणि त्यामुळे प्राप्त होणाऱ्या भौतिक व अभौतिक साधनांचा वापर करण्याचे अधिकार, आणि विवाहावरील बंधने या पैलूंचा विचार करावा लागेल. प्रथम जातीचा विशिष्ट भूप्रदेशाशी असलेल्या संबंधाचा विचार करू. परंपरागत कालखंडात प्रत्येक जातीचे व त्यातील पोटजातीचे विशिष्ट भूप्रदेशाशी घनिष्ठ नाते होते. मराठा, कुणबी व महार या जातींची वसाहत महाराष्ट्रातील फार मोठ्या भूभागावर आहे. परंतु अन्य जातींची वस्ती विशिष्ट मर्यादित भूप्रदेशावरच आहे. उदाहरणार्थ, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण यांची वस्ती प्रामुख्याने पश्चिम महाराष्ट्रात देश या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भूप्रदेशावर आहे. देवरुखे, चित्पावन आणि कऱ्हाडे या ब्राह्मणांतील पोटजातींचे वसतिस्थान कोकण आहे. सनगर ही लोकरीपासून घोंगडी विणणारी जात प्रामुख्याने सातारा, सोलापूर, पुणे, कोल्हापूर या भागात दिसते. तसेच पाठारे प्रभूंचे परंपरागत वसतिस्थान मुंबई व आसपासचा परिसर होय. हे विशिष्ट भूप्रदेशाचे विशिष्ट जातीशी अथवा पोटजातीशी असलेले घनिष्ठ नाते टिकवून ठेवण्याच्या कामी जे घटक जबाबदार असल्याचे दिसते, त्यामध्ये पूर्वीच्या काळात असलेला दळणवळणाच्या साधनांचा अभाव, परंपरागत कृषिप्रधान अर्थव्यवस्था व त्यात महत्त्वाची भूमिका बजावणारी बलुता पद्धती व वतनोंवृत्ती हे प्रमुख आहेत. तसेच परंपरागत काळात शेतीची विक्री होत नसे व त्याची मालकी बहुतांशी सामूहिक स्वरूपाची असे. या सर्व कारणांमुळे परंपरागत कालखंडात समाजातील बहुतांशी जातीचे नाते विशिष्ट भूप्रदेशाशी शतकानुशतकाच्या वास्तव्यामुळे जोडले गेले होते. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीबरोबर या परिस्थितीत बदल होऊ लागला. जमीन ही विक्री होऊ शकणारी वस्तू झाली. दळणवळणाची प्रगत साधने वापरात आली व मोठ्या शहरांत यंत्रावर चालणाऱ्या उद्योगांची वाढ होऊ लागली. याच्या जोडीला ब्रिटिशांच्या पक्षपाती धोरणामुळे ग्रामीण भागातील परंपरागत लघु उद्योग मोडकळीस येऊ लागले व त्याचा परिणाम कारागीर जातीमध्ये बेकारी वाढण्यात होऊ लागला. स्वातंत्र्योत्तर काळातही देशात औद्योगीकरणास व आधुनिकीकरणास प्रोत्साहन देण्याच्या धोरणामुळे या प्रक्रियेत वाढच झाली. या सर्व घटकांच्या परिणामामुळे जात आणि जातीच्या वसाहतीचे विशिष्ट भूप्रदेशाशी असलेल्या पारंपारिक नाते संबंधात बदल होऊ लागला. विविध जातीचे लोक आपले मूळ वसतिस्थान सोडून केवळ महाराष्ट्राच्या विविध भागातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेरही नोकरी धंद्याच्या निमित्ताने जाऊ लागलेत व कालांतराने तिथेच स्थायिकही होऊ लागलेत.

ही स्थलांतराची प्रक्रिया नागरी भागात असलेल्या शेतीच्या व्यवसायाखेरीज अन्य व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये अधिक प्रमाणात दिसते. ग्रामीण भागात परंपरागत शेतीचा व्यवसाय करणाऱ्या मराठा व कुणबी या जातींमध्ये कायम स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण फार कमी आहे. याचे कारण म्हणजे गावाशी बांधून ठेवणारा जमिनीचा दुवा. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात कुळकायदा संमत झाला व त्याची अंमलबजावणीही इतर प्रांतांच्या तुलनेने अधिक परिणामकारक झाली. प्रत्यक्ष शेती न करणाऱ्या जमीन मालकांच्या संख्येत घट झाली आहे. यामुळे अशा जातीत स्थलांतराचे प्रमाण अधिक असावे असे सर्वसाधारण निरीक्षणावरून वाटते. याचे उदाहरण देशस्थ ब्राह्मणांचे देता येईल. स्वातंत्र्यपूर्व काळात बहुतेकांची ग्रामीण भागात जमीन असल्यामुळे या जातीची लोकसंख्या ग्रामीण भागात जास्त असे. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात कुळकायद्याच्या अंमलबजावणीमुळे बहुतेक ब्राह्मणांचे नोकरी धंद्याच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या विविध नागरी भागात स्थलांतर झाले आहे. हीच प्रक्रिया इतर व्यावसायिक जातींमध्ये चालू असल्याचे दिसते. सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, शेती व पशुपालन हे ग्रामीण व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये तसेच या व्यवसायाशी बलुता पद्धतीतील जे अत्यावश्यक व्यवसाय घनिष्ठरीत्या जोडले आहेत असे व्यवसाय करणाऱ्या जातींमध्ये कायम स्वरूपाच्या स्थलांतराचे प्रमाण कमी आहे. मात्र जे व्यावसायिक लोक ग्रामीण भागातील बलुता पद्धतीत शेती व्यवसायासाठी आवश्यक म्हणून मानले नाहीत व ज्या जाती शेतीखेरीज इतर व्यवसाय करणाऱ्या आहेत अशा जातींमध्ये स्थलांतराचे प्रमाण अधिक आढळून येते. थोडक्यात ज्यांचे जमिनीशी व्यावसायिक स्वरूपाचे नाते आहे अशा जातींचे परंपरागत प्रादेशिक नाते बऱ्याच प्रमाणात टिकून आहे.

परंपरागत व्यवसाय म्हणजे जाती व्यवस्थेतील परिवर्तनाबाबतचा महत्त्वाचा दुसरा निकष होय. पूर्वीच्या काळात प्रत्येक जातीचा एक अथवा दोन परंपरागत व्यवसाय असावयाचे व हे व्यवसाय जातीतील बहुतांशी लोक करीत होते. व्यापार, शेती, सैन्यात नोकरी असे काही व्यवसाय मुक्त स्वरूपाचे होते व ते कोणत्याही जातीतील लोकांना करता येत असत. उच्च जातीतील लोकांना कनिष्ठ जातीचा व्यवसाय करण्याची आपद्धर्म म्हणून मुभा असे, परंतु अशा बदलाचा कालांतराने त्यांच्या जाती व्यवस्थेतील दर्जावरही परिणाम होत असे. कनिष्ठ जातींना मात्र उच्चवर्णीयांचा व्यवसाय

करता येत नसे. परंपरागत व्यवसाय करण्याच्या तत्त्वाची अंमलबजावणी बलुता पद्धती, जातपंचायत व गावपंचायत यांच्यातर्फे होत असे. या चित्रात ब्रिटिश राजवटीच्या आगमनापासून बदल होऊ लागला. हा बदल उच्चवर्णीय पांढरपेशा जातीत, म्हणजे ब्राह्मण आणि प्रभू यांच्यामध्ये इतर जातींच्या तुलनेने जास्त प्रमाणात होऊ लागला. मुंबई इलाख्याच्या १९०१ च्या जनगणना अहवालानुसार काही जातींमधील परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण तक्ता क्रमांक १५ मध्ये दाखविले आहे. (पुढील सर्व तक्ते प्रकरणाच्या शेवटी दिले आहेत.). ब्राह्मण आणि प्रभू यांच्यामध्ये परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण अनुक्रमे २७ आणि २८ प्रतिशत होते, तर मराठा, मराठा-कुणबी, तसेच कोष्टी यांच्यामध्ये हे प्रमाण ९० टक्के अथवा त्याहून अधिक होते. १९११ च्या जनगणनेच्या वेळी मुंबई इलाखा, मध्यप्रांत आणि वऱ्हाड, आणि हैदराबाद संस्थान यामध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील म्हणून ओळखल्या गेलेल्या जातींमध्ये परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण तक्ता क्रमांक १६ मध्ये दाखविले आहे. त्यावरून लक्षात येईल की, ब्राह्मणांमध्ये हे प्रमाण अल्प आहे. तसेच दलित गटातील महार, मांग, भंगी या जातींमध्येही हे प्रमाण अल्प आहे. परंतु चांभारांच्यामध्ये हे प्रमाण तुलनेने अधिक आढळते. याचे कारण चर्मकला हा कौशल्यप्रधान व्यवसाय आहे. सवर्ण जातींमध्येही कौशल्यप्रधान व्यवसाय करणाऱ्यांमध्ये परंपरागत व्यावसायिकांचे प्रमाण अधिक आढळते. कृषी हा परंपरागत व्यवसाय असणाऱ्या जातींमध्ये म्हणजे मराठा, कुणबी यांच्यातही परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रमाण अधिक आहे. सर्वसाधारनपणे असे दिसते की, ब्रिटिशांनी घडवून आणलेल्या औद्योगिक व तंत्र विषयक सुधारणांमुळे, तसेच इकडे आधुनिक शिक्षण प्रणालीची सुरुवात केल्यामुळे जनतेला अपारंपरिक व्यवयास हळूहळू उपलब्ध होऊ लागले. कापड गिरण्या व आधुनिक कारखान्यांच्या वाढीमुळे ग्रामीण भागातील सर्व जातींच्या लोकांना नागरी भागात रोजगार मिळू लागले. हे व्यवसाय प्रामुख्याने अकुशल व अल्पकुशल मजुराच्या स्वरूपाचे होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेतून जे लोक बाहेर फेकले जात होते अशांचे प्रमाण या व्यवसायांत अधिक होते. यामध्ये महार जातीतील लोकांचे प्रमाण जास्त राहिले आहे.

आधुनिक गिरण्या व कारखाने यांच्या वाढीखेरीज विविध प्रकारच्या प्रशासकीय नोकऱ्या, तसेच डॉक्टर, वकील, प्राध्यापक, शिक्षक यांसारखे प्रदीर्घ शिक्षणाची आवश्यकता असणारे व्यवसाय यामध्येही हळूहळू वाढ होऊ लागली. हे व्यावसायिक क्षेत्रही तत्त्वतः सर्वांना मुक्त होते, परंतु या क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता असल्यामुळे परंपरागत जाती व्यवस्थेत ज्या जातींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता अशा जातीतील, म्हणजे प्रामुख्याने ब्राह्मण, कायस्थ प्रभू व वाणी या जातींतील लोक सुरुवातीच्या कालखंडात आघाडीवर राहिले. १९११ नंतरच्या कालखंडामध्ये ब्रिटिश शासनाच्या जाती-धर्म निरपेक्ष शिक्षण प्रसाराच्या धोरणामुळे तसेच महात्मा जोतिबा फुले यांच्या कार्यामुळे आणि त्यापुढील कालखंडात कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील बहुजनसमाजात केलेल्या शिक्षण प्रसारामुळे, आणि महाराष्ट्रातील अनेक समाजसेवकांनी केलेल्या शैक्षणिक प्रसाराच्या कार्यामुळे शैक्षणिक परंपरा नसलेल्या जातींनाही या क्षेत्रात प्रवेश मिळू लागला. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये शिक्षण प्रसाराच्या कार्याला अधिक चालना मिळाली, आणि त्यामुळे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शिक्षण क्षेत्रात व शासकीय सेवेत उच्चवर्णीयांचे जे प्राबल्य होते त्यामध्ये या शतकाच्या उत्तरार्धात लक्षणीय बदल घडून आल्याचे चित्र दिसते आहे. सवर्ण जातींच्या संदर्भात सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, विशिष्ट जात व त्याचा विशिष्ट व्यवसाय हे पारंपारिक समीकरण आता नष्ट झाले असून तत्त्वतः कोणत्याही जातीला कोणताही व्यवसाय करणे शक्य झाले आहे. पुरोहिताचा व्यवसाय व मंदिरातील पुजारी हे याला अपवाद म्हणून मानता येतील. हे व्यवसाय अद्यापही ब्राह्मण आणि गुरव या जातीतील लोकच करताना दिसतात.

परंपरेने दलित जातींना हीन व्यवसाय नेमून दिले होते. यातील काही व्यवसायांना विशेष कौशल्य लागते. यात चांभाराच्या व्यवसायाचा निर्देश करता येईल. चांभार बनवीत असलेली पादत्राणे व इतर कातड्याच्या वस्तूंना समाजात मागणी असल्यामुळे दलित वर्गात चांभार हा आर्थिक आणि सामाजिक दृष्ट्या बऱ्यापैकी स्थितीमध्ये असल्याचे दिसते. परंतु अन्य दलित जातींची स्थिती अशी नाही. आर्थिक आणि सामाजिक दृष्टीने हीन म्हणून गणलेले व्यवसाय त्यांच्यावर परंपरेने लादले गेले होते व यात परिवर्तन घडून येणे परंपरागत कालखंडात जवळजवळ अशक्य होते. परंतु ब्रिटिश राजवटीत झालेल्या औद्योगिकीकरणामुळे कापड गिरण्या व अन्य कारखान्यांमध्ये मजूर म्हणून काम करण्याची संधी उपलब्ध झाली. याचा सर्वाधिक लाभ महार जातीला मिळाला. ग्रामीण भागातून मुंबईमध्ये आलेल्या स्थलांतरित मराठी भाषिक कामगारांत महार जातीतील लोकांचे प्रमाण सर्वात अधिक म्हणजे ४४.३६ टक्के होते, असे युनेस्कोने प्रसिद्ध केलेल्या एका अभ्यासात नमूद करण्यात आले आहे.[२४]

महाराष्ट्र राज्य अस्तित्वात आल्यानंतर झालेल्या १९६१ च्या पहिल्या जनगणनेच्या वेळी अनुसूचित जातींची व्यावसायिक स्थिती कशी होती हे तक्ता क्रमांक १७ मध्ये दाखविले आहे. अनुसूचित जातींमध्ये महार, मांग, चांभार आणि भंगी या ज्या चार प्रमुख जाती आहेत, त्यातील व्यक्तींची व्यवसायाच्या आधारावर ग्रामीण आणि नागरी क्षेत्रात कशी विभागणी झाली होती हे तक्ता क्रमांक १८ मध्ये दाखविले आहे. तक्ता क्रमांक १७ वरून दिसते की, दर हजारी ४७९ लोक निरनिराळ्या धंद्यात आहेत व ५२१ लोक कोणत्याही व्यवसायात नाहीत. यात स्त्रिया आणि पुरुष समाविष्ट आहेत. पुरुषांमध्ये दर हजारामध्ये ५७० पुरुष काम करणारे आहेत तर स्त्रियांमध्ये हे प्रमाण ३८१ आहे. कामगारांची

विविध व्यवसायांत झालेल्या विभागणीच्या आकडेवारीवरून दिसते की, शेती व्यवसायात २२१ व शेत मजुरीमध्ये ११४ लोक आहेत. या दोन्ही संख्या एकत्र केल्या तर दिसते की, ४७९ मधील ३३५ कामगार शेतीच्या क्षेत्रावर उपजीविकेसाठी अवलंबून होते. व्यापाराच्या क्षेत्रात २२ व्यक्ती होत्या, घरगुती उद्योगात २१, व घरगुतीखेरीज अन्य उद्योगांत ३३ व्यक्ती होत्या. अनुसूचित जातींच्या गटामध्ये मांग वाखापासून दोर विणतात, तर चांभार पादत्राणे, शेतीच्या कामी जनावरांच्यासाठी उपयोगी पडणाऱ्या कातड्याच्या वस्तू, आणि काही ठिकाणी कातड्याच्या मोटा बनविण्याचा व्यवसाय करतात. या जातींमधील व्यक्तींची विविध व्यावसायिक गटांमध्ये विभागणी कशी झाली हे तक्ता क्रमांक १८ वरून दिसून येईल. या सारिणीमध्ये महार, मांग, चांभार आणि भंगी या जातीतील, ग्रामीण आणि नागरी विभागातील काम करणाऱ्या व्यक्तींची विविध व्यावसायिक गटांमध्ये विभागणी कशी झाली ते दाखविले आहे. प्रथम महार जातीची व्यावसायिक स्थिती कशी आहे ते पाहू. ग्रामीण भागात परंपरेने महार ॲगावकीचीश्र कामे करीत असत. यात प्रामुख्याने गावातील रस्ते साफ करणे, मेलेली जनावरे ओढून नेणे या कामांचा अंतर्भाव होता. परंतु १९५६ मध्ये डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या संख्येने दलितांनी बौद्ध धर्मात प्रवेश करून हीन व्यवसाय करण्याचे बंधन झुगारून दिले. धर्मांतर करताना आपण परंपरेने आलेली गावकीची कामे करणार नाही व मृत जनावरांचे मांस खाणार नाही अशी महार जातीतील लोकांनी शपथ घेतली व याचे पालन बहुसंख्य लोक करीत आहेत. याचा परिणाम आपल्याला ग्रामीण व नागरी भागात महारांच्या व्यवसायावर पडल्याचे दिसत आहे. गावसफाई करणारांचे प्रमाण हे ग्रामीण भागात व नागरी भागात नगण्य आहे.

"इतर सेवा" या वर्गामध्ये शासकीय व निमशासकीय कनिष्ठ नोकऱ्यांचा समावेश होतो. यामध्ये नागरी भागात सर्वाधिक प्रमाण भंगी जातीचे आहे. शौचालये व स्वच्छतागृहे साफ करण्याचे काम भंगीच करताना दिसतात. ग्रामीण भागातही जेथे भंगी उपलब्ध असतील तेथे हे काम भंगी जातीतील लोकांवरच सोपविले जाते. पादत्राणांची निर्मिती चांभार करतात. हे काम ते घरामध्ये छोट्या प्रमाणात करतात किंवा मोठ्या प्रमाणात दुकाने टाकून व इतर चांभारांना नोकरीला ठेऊन करतात.

सर्वसाधारणपणे १९६१ साली महाराष्ट्रातील विविध जाती करीत असलेल्या व्यवसायांबद्दल असे म्हणता येईल की, परंपरागत व्यवसाय करण्याचे सामाजिक बंधन बऱ्याच प्रमाणात शिथिल झाले होते. अपरंपरागत व्यवसायाच्या क्षेत्रामध्ये औद्योगीकरण, नागरीकरण व आधुनिक व्यवसायांच्या, म्हणजे डॉक्टर, वकील, स्थापत्यशास्त्रज्ञ, शिक्षक व प्राध्यापक यासारख्या प्रदीर्घ शिक्षणावर आधारित असलेल्या व्यवसायांच्या वाढीमुळे, एक जातिनिरपेक्ष क्षेत्र सर्वांसाठी उपलब्ध झाले व त्यामुळे परंपरागत व्यवसायात बदल करण्याची संधी सर्व जातींना तत्त्वतः उपलब्ध झाली. परंतु जाती व्यवस्थेत अंतर्भूत असलेल्या शैक्षणिक असमानतेमुळे आधुनिक व्यावसायिक क्षेत्रात प्रवेश करण्याची संधी विविध जातींना समान नव्हती. स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने समाजाच्या मागासलेल्या भागात शैक्षणिक व सामाजिक प्रगती घडवून आणण्यासाठी ज्या विविध योजना हाती घेतल्या, त्यामुळे या चित्रात हळूहळू बदल पडत गेल्याचे दिसते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने समाजाच्या मागासलेल्या भागात शैक्षणिक व सामाजिक प्रगती घडवून आणण्यासाठी ज्या विविध योजना हाती घेतल्या, त्यामुळे या चित्रात हळूहळू बदल पडत गेल्याचे दिसते. त्याचप्रमाणे स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगीकरणाचा वेगही अधिक वाढला व या क्षेत्रातील रोजगाराच्या संधीमध्येही वाढ झाली. १९८२-८३ सालात संपूर्ण भारतातील कारखान्यांच्या ११.२ टक्के कारखाने महाराष्ट्रात होते, आणि १७ टक्के रोजगार उपलब्ध होता.[२५] या सर्व बदलामुळे जात आणि व्यवसाय यांच्या परंपरागत समीकरणात बरेच परिवर्तन झाले आहे. शासकीय सेवेत अनुसूचित जातींच्याकरिता जागा राखीव ठेवण्याच्या धोरणामुळे दलित समाजातही शासकीय सेवेत असणारांचे प्रमाण वाढत आहे. तसेच अलीकडील काळात सफाई कामगारांनी मैला वाहून नेण्यास शासनाने बंदी घातल्यामुळे त्यांच्या व्यावसायिक जीवनात परिवर्तन घडून येत आहे. या सर्वावरून असे म्हणता येईल की, जात आणि त्याचा परंपरागत व्यवसाय हे समीकरण आता जवळजवळ संपुष्टात येत चालले आहे.

जातींच्या अधिक्रम व्यवस्थेमध्येही परिवर्तन घडून येत आहे. प्रत्येक जातीला समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ या अनुमापात विशिष्ट दर्जा असतो व हा दर्जा जन्मजात प्राप्त झालेल्या धार्मिक पावित्र्याच्या कल्पनेवर आधारलेला असतो. वेदात वर्णन केलेला चार वर्णांच्या सामाजिक दर्जाचा सिद्धांत या व्यवस्थेचा धार्मिक व वैचारिक आधार आहे. या विचारप्रणालीत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असा अधिक्रम सांगितला आहे. वर्ण जरी चार असले तरी जाती अनेक आहेत. प्रादेशिक स्तरावर ब्राह्मण वर्णात येणाऱ्या जाती कोणत्या याविषयी समाजात एकवाक्यता दिसते. मात्र क्षत्रिय व वैश्य यांचा दर्जा कोणत्या जातींना द्यावयाचा याविषयी एकवाक्यता दिसत नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे वेदकालात अस्तित्वात असलेले क्षत्रिय व वैश्य हे वर्ण कालांतराने नष्ट झाले अशी समजूत भारतीय समाजात मध्ययुगीन कालखंडात फार मोठ्या प्रमाणावर पसरली होती हे होय. त्यामुळे खरे क्षत्रिय कोण व खरे वैश्य कोण हे ठरविणे समाजात नेहमीच वादाचे विषय झाले आहेत.

महाराष्ट्रामध्ये मराठा कोणास म्हणावे, मराठा आणि कुणबी या दोन निरनिराळ्या जाती आहेत का दोन निराळ्या

नावाने ओळखली जाणारी एकच जात आहे याविषयीही समाजात मतैक्य नाही. मराठ्यांच्या क्षत्रियत्वाविषयीचा वाद शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या वेळी ज्वलंत होता. काशीचे पंडित गागाभट्ट यांनी शिवाजीचे घराणे हे उदेपूरच्या शिसोदिया या राजपूत राजघराण्याची शाखा आहे या संबंधीचा पुरावा सादर करून शिवाजी राजांचे क्षत्रियत्व सिद्ध केले व त्यांना समारंभपूर्वक राज्याभिषेक करून या वादावर पडदा टाकला. तेव्हापासून ज्या मराठा घराण्यांनी आपल्या घराण्यांचा संबंध राजपूत राजघराण्यांशी जोडला ते स्वतःला अस्सल मराठा मानू लागले व आपले स्थान क्षत्रियाचे आहे असा दावा करू लागले. ज्यांच्या राजपूत घराण्यांशी संबंध नाही अशांना कुणबी मानले जाऊ लागले. हा सामाजिक श्रेष्ठ-कनिष्ठतेचा अधिक्रम जरी धार्मिक तत्त्वाच्या आधारावर ठरला होता तरी त्याचा पाया शिवकालात मराठा जातीचा राजसत्तेशी असलेला घनिष्ठ संबंध हा होता. ही सत्ता पेशवाईच्या सुरुवातीच्या कालखंडापर्यंत सर्वमान्य होती, परंतु पेशवाईच्या उत्तरार्धात या स्थितीत बदल होऊ लागला. राजकीय क्षेत्रात पेशवे अधिक प्रभावी झाले व त्यांच्या तुलनेत सातारच्या छत्रपतींना परिस्थितीनुरूप राजेपण स्वीकारावे लागले. या राज्य सत्तेतील बदलामुळे पेशवे राजकीय दृष्ट्या व धार्मिक दृष्ट्या प्रबळ झाले. समाजातील विविध जातींचे जाती व्यवस्थेतील पारंपरिक स्थान टिकविणे हे प्रत्येक जातीच्या सामाजिक व धार्मिक रूढी व रिवाजांची अंमलबजावणी करणे ही आपली जबाबदारी आहे, असे पेशव्यांनी मानल्यामुळे याबाबतीत त्यांचे सल्लागार असलेले ब्राह्मण, शास्त्री, पंडित यांच्या मताला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. दुसऱ्या बाजीरावानंतर माऊंटस्टुअर्स एल्फिन्स्टन याने दुसऱ्या शाहूचा मुलगा प्रतापसिंह याला सातारच्या गादीवर बसवून त्याला छत्रपती पदाचे अधिकार बहाल केले (५ एप्रिल १८२२). त्यानंतर पुणे आणि सांगली येथील चित्पावन ब्राह्मण पंडितांनी प्राचीन काळी क्षत्रिय वर्ण नष्ट झाल्यामुळे कलियुगात खरे क्षत्रिय अस्तित्वात नाहीत व त्यामुळे वैदिक संस्कारांचा अधिकार फक्त ब्राह्मण वर्णापुरताच मर्यादित असून मराठा जातीला हा अधिकार नाही, अशा तऱ्हेची चळवळ सुरू केली. या विवादाची परिणती १८३० साली सातारा येथील संस्कृत पाठशाळेत दोन्ही बाजूंच्या पंडितांमध्ये जाहीर वादविवाद होऊन प्रतापसिंह भोसले यांचे घराणे क्षत्रियांचे आहे, आणि त्याचप्रमाणे सातारा, तंजावर, नागपूर आणि कोल्हापूर येथील भोसले घराणी एकाच वंशाची आहेत व ते क्षत्रिय असल्यमुळे त्यांना वेदोक्त संस्कार करण्याचा अधिकार आहे या निर्णयात झाला.[२६] या निर्णयानंतर प्रतापसिंहाने विद्वान शास्त्री पंडितांना निमंत्रित करून स्वतःस राज्याभिषेक करवून घेतला. भोसले यांच्याप्रमाणे मराठा जातीतील उच्चकुलीन समजल्या जाणाऱ्या घराण्यांनी २७ जुलै १८२८ रोजी "क्षत्रिय मराठा मंडळाची" सभा घेऊन मराठ्यांच्या क्षत्रियत्वाबाबत ब्राह्मण मंडळींनी जो वाद निर्माण केला होता त्याची योग्य ती दखल घेण्याची मुंबई सरकारकडे मागणी केली होती.

सातारच्या भोसल्यांप्रमाणेच बडोद्याचे गायकवाड यांनीही आपण क्षत्रिय असून आपल्याला वेदोक्त संस्कार करण्याचा अधिकार असल्याचा दावा केला व तो तेथील ब्राह्मण, शास्त्री, पंडितांकडून मान्य करून घेतला. क्षत्रियत्वाचा दावा करून आपले वर्ण व्यवस्थेतील स्थान उंचावण्याचा प्रयत्न ज्याप्रमाणे सातारच्या उच्चकुलीन मराठ्यांनी केला त्याचप्रमाणे सातारा, पुणे आणि बडोदा येथील चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांनीही केला. आपण क्षत्रिय वर्णाचे असून आपणास वेदोक्त संस्काराचा अधिकार आहे असा कायस्थ प्रभूंचा दावा होता. तसेच दैवज्ञ सोनार या जातीतर्फेही वेदोक्त संस्काराचा अधिकार असल्याचा १८२२ साली दावा करण्यात आला.[२७] अशाच तऱ्हेची मागणी वाणी, तेली आणि शिंपी यांच्याकडून आपण वैश्य वर्णांचे असल्याच्या दाव्याच्या आधारावर करण्यात येत होती असा उल्लेख तुकाराम तात्या पडवळ यांच्या **ए क्रिटीक ऑफ कास्ट डिव्हिजन्स** या १८६१ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात केला आहे.[२८] या विविध जातींनी आपण उच्चवर्णाचे असल्याचे व त्यामुळे आपणास वेदोक्त संस्कारांचा अधिकार असल्याचे केलेले दावे ब्राह्मणांमधील कर्मठ विचारांच्या शास्त्री पंडितांना अमान्य असल्यामुळे महाराष्ट्रातील हिंदू समाजाची विभागणी ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर अशा दोन गटात झाल्याचे चित्र दिसू लागले. ब्राह्मण पंडितांनी दावा केला की, अस्सल क्षत्रिय व वैश्य हे आता अस्तित्वात नसल्यामुळे समाजात ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वात आहेत व वेदोक्त संस्काराचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे. या वैचारिक भूमिकेमुळे ब्राह्मणेतर जातींमध्ये आपण उच्चवर्णाचे आहोत व आपणास वेदोक्त संस्कारांचा अधिकार आहे अशा मागण्यांच्या चळवळी सुरू झाल्या व या मागण्या मान्य करून घेण्याच्या दृष्टीने जाती सभा अस्तित्वात येऊ लागल्या. सुरुवातीच्या काळात या चळवळींचा भर संस्कृतीकरणाद्वारा धार्मिक क्षेत्रात वरचे स्थान प्राप्त करून घेणे हा होता. जानवे घालणे, विधवाविवाह वर्ज्य मानणे, पुराणातील सुप्रसिद्ध वंशाशी आपल्या जातीचा संबंध प्रस्थापित करणे इत्यादी पावले उचलून दर्जा उंचावण्याचा सामुहिक प्रयत्न करणे हा संस्कृतीकरणाचा गाभा होता. वर्णव्यवस्थेची पारंपरिक चौकट मान्य करून त्यात आपल्या जातीचे स्थान बरेच आहे असा दावा केला जात असे व अशा पद्धतीने आपल्या जातीला उच्च स्थान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला जात असे. काही समाजसुधारकांच्या या संस्कृतीकरणाच्या मार्गाच्या मर्यादा लक्षात आल्या व त्यांनी सामाजिक समतेच्या व्यापक वैश्विक मूल्यांच्या पायावर सामाजिक समतेची चळवळ उभारण्याचा प्रयत्न केला. याचे प्रमुख प्रणेते महात्मा जोतिराव फुले होते. त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना (१८७३) करून सर्व जातींना धार्मिक क्षेत्रात समानता प्राप्त करून देण्याच्या दृष्टीने पुरोहितशाही व ब्राह्मण्याविरुद्ध सामाजिक आंदोलन उभारले. जोतिराव फुले यांच्या निधनानंतर सामाजिक समतेच्या वैश्विक मूल्यांवर आधारलेली ही सत्यशोधक चळवळ क्षीण झाली. कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी या

चळवळीस पाठिंबा दिला व ही चळवळ ब्राह्मणेतर चळवळ म्हणून उदयास आली. शाहू महाराज जातिभेदाच्या विरुद्ध होते, परंतु गुणकर्मावर आधारलेली चातुर्वर्ण्य व्यवस्था त्यांना मान्य होती. गुणकर्माने क्षत्रिय व वैश्य असणारांच्या घरी ब्राह्मणांनी वेदोक्त कर्मे करावी यासाठी त्यांनी वेदोक्त आंदोलन सुरू केले.[२९]

एकोणिसाव्या शतकात वर्णव्यवस्थेच्या चौकटीत आपल्या जातीचे स्थान उंचावण्याचे जे प्रयत्न झाले त्याचे प्रमुख उद्दिष्ट धार्मिक क्षेत्रात उच्चवर्णीयांच्या बरोबरीचे स्थान मिळविणे हे होते. त्याचबरोबर ब्रिटिश राजवटीच्या आगमनाबरोबर विविध शासकीय सेवांमध्ये आधुनिक व्यवसाय, सैन्य व तत्सत क्षेत्रात जाऊन आपले भवितव्य सुधारण्याची संधी सर्व जातींना प्राप्त झाली होती. त्याचा जास्तीत जास्त फायदा आपल्या जातीतील लोकांना मिळावा व त्यामुळे आपल्या जातीचा सामाजिक दर्जा वाढावा यासाठी नागरी भागात निरनिराळ्या जातीची मंडळे अथवा सभा स्थापण्यात येऊ लागल्या. दिनांक २२ जानेवारी १८८८ ला मुंबईत ब्राह्मण सभेची स्थापना झाली. या सभेतर्फे ब्राह्मण जातीतील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अर्थसहाय्य करणे, परदेश गमनास धार्मिक मान्यता मिळविणे, निरनिराळ्या साथीत त्यांना औषधोपचाराची मदत करणे इत्यादी कार्यक्रम हाती घेतले जात असत.[३०] क्षत्रिय मराठा मंडळ, सोमवंशीय हितचिंतक मित्र समाज हे महार जातीतील लोकांच्या प्रगतीसाठी स्थापलेले मंडळ, मातंग समाज, रोहिदास ज्ञानदेव समाज, व अशी अन्य जातींची मंडळे एकोणिसाव्या व विसाव्या शतकात अस्तित्वात आल्याचे दिसते. या मंडळांच्यातर्फे समान धार्मिक अधिकारांच्या मागणीबरोबरच, ज्ञातिबांधवांची शैक्षणिक प्रगती, सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा, राजकीय संस्थांमध्ये प्रतिनिधित्व इत्यादी ऐहिक उत्कर्षाशी संबधित मागण्यांचाही अंतर्भाव असे.

संस्कृतीकरणाच्या मार्गाने वर्णव्यवस्थेच्या चौकटीत आपले सामाजिक स्थान उंचावणे काही सवर्ण जातींना शक्य झाले, मात्र दलित जातींना हा मार्ग फलदायी नव्हता. दलितांना मंदिर प्रवेश करता येत नव्हता. त्याचप्रमाणे शाळा, दवाखाना, सार्वजनिक पाणवठा, न्हाव्याकडून केस कापणे, इत्यादी नागरी सुविधांचा वापर करता येत नव्हता. डॉ. आंबेडकरांचा महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह व नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन म्हणजे क्रांतिकारक घटना होत्या. वर्णव्यवस्थेच्या चौकटीत राहून सर्व जातींना आपला सामाजिक दर्जा उंचावता येईल हा आशावाद एक भ्रम ठरला व त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली हजारो दलितांनी हिंदू धर्माचा त्याग करून बौद्ध धर्मात प्रवेश केला व आपल्या पारंपारिक सामाजिक दर्जात क्रांतिकारी बदल घडवून आणला. धर्मांतरामुळे अस्पृश्यतेबरोबर आलेली नागरी सुविधा आणि सेवा यांचा लाभ घेण्यातील निर्बंध पूर्णपणे नाहीसे झाले नसले तरी त्यात बराच फरक पडला आहे. डॉ. गोविंद गारे आणि शिरुभाऊ लिमये यांनी १९७० मध्ये केलेल्या महाराष्ट्रातील दलित समाजाच्या पाहणीत असे दिसून आले की, बौद्ध धर्मात धर्मांतर केल्यामुळे सुमारे ७० टक्के कुटुंबांनी त्यांच्यात मानसिक, सामाजिक व व्यावहारिक बदल झाल्याचे मान्य केले. तसेच ४० टक्के कुटुंबांनी स्पृश्य समाजात पूर्वीपेक्षा बऱ्यापैकी स्थान मिळते असे सांगितले.[३१] बौद्ध धर्मात प्रवेश केल्यामुळे पूर्वाश्रमीच्या महार जातीमध्ये मानसिक क्रांती घडून आली व आपण स्पृश्य जातींच्या बरोबरीचे आहोत असा आत्मविश्वास निर्माण झाला. स्वातंत्र्योत्तर काळात दलित जातींच्या सामाजिक उत्थानाच्या दृष्टीने ज्या योजना शासनाने राबविल्या त्याचा दृश्य परिणाम दलितांच्या वाढत्या आशाआकांक्षांच्या रूपाने दिसून येतो. महाराष्ट्रातील माध्यमिक शाळांत शिकणाऱ्या अनुसूचित जाती आणि जमातींच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांच्या १९७४ साली केलेल्या पाहणीतील काही निष्कर्ष बोलके आहेत. अनुसूचित जातीतील १९६ विद्यार्थ्यांपैकी ३९ विद्यार्थ्यांना एम. बी. बी. एस., ३३ विद्यार्थ्यांना बी.ई.,बी. टेक. व्हावे असे वाटत होते. कला, वाणिज्य, आणि शास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घ्यावे असे ३६ विद्यार्थ्यांना वाटत होते, तर याच विद्याशाखांमध्ये पदवीपर्यंतचे शिक्षण घ्यावे असे ४७ विद्यार्थ्यांना वाटत होते. बहुसंख्य विद्यार्थ्यांना डॉक्टर, इंजिनीयर, प्राध्यापक, उच्चशासकीय सेवा यांचे आकर्षण होते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये दलितांना ज्या विविध सवलती शासनाने व सेवाभावी संस्थांनी प्राप्त करून दिल्या त्यामुळे त्यांच्यामध्ये सामाजिक चलनशीलता वाढली व दलितांच्या सामाजिक दर्जाविषयीची प्रतिमा चांगली झाली. वर उल्लेखिलेल्या दलित विद्यार्थ्यांच्या अध्ययनातून ही गोष्ट स्पष्ट होते. एकूण १९६ विद्यार्थ्यांपैकी १२० विद्यार्थ्यांना (६१.२३ प्रतिशत) दलित जातींच्या सामाजिक दर्जामध्ये सुधारणा झाली आहे असे वाटत होते.[३२]

पारंपरिक जातिव्यवस्थेमध्ये जातीचा सामाजिक दर्जा जन्मावर आधारलेला होता. जन्मजात प्राप्त झालेले धार्मिक पावित्र्य हाच त्याचा निकष होता. परंतु एकोणिसाव्या व विसाव्या शतकात वेदोक्त आंदोलन, सत्यशोधक चळवळ यासारख्या ज्या चळवळी झाल्या त्यामुळे या सामाजिक दर्जाच्या जाती व्यवस्थेतील पारंपरिक निकषांना आव्हान दिले गेले. हे धार्मिक पावित्र्य देखील प्रयत्नसाध्य आहे व ते केवळ जन्मावर अवलंबून नाही ही कल्पना जनमानसात रुजविण्यातून पहिले परिवर्तन घडून आले. संस्कृतीकरणाची तार्किक परिणती ही जन्माधिष्ठित सामाजिक दर्जा हे तत्त्व नाकारण्यात होते. सुरुवातीच्या काळात या आंदोलनांचा उद्देश जरी उच्चवर्णीयांसारखे धार्मिक अधिकार प्राप्त करून घेणे हा असला, तरी नंतरच्या काळात आर्थिक व राजकीय सत्ता प्राप्त करून देणाऱ्या साधनांवर अधिकार प्रस्थापित करणे हा झाला. स्वातंत्र्योत्तर काळात, विशेषतः डॉ आंबेडकरांच्या धर्मांतराच्या आंदोलनानंतर जातींचे

स्थान ठरविण्यातील धार्मिक पावित्र्याचा निकष निष्प्रभ झाला व त्याची जागा आर्थिक निकषाने घेतली. स्वतःच्या जातीची गणना अनुसूचित जातीत व्हावी यासाठी अलीकडील काळात पुढे येत असलेल्या विविध जातींच्या मागण्या ही गोष्ट सिद्ध करतात.

जाती संस्थेतील परिवर्तनाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचा निकष म्हणजे स्वतःच्या जातीतच विवाह करण्याचे बंधन अथवा जाती-अंतर्गट विवाह पद्धती होय. पारंपरिक काळात प्रत्येक पोटजात किंवा त्यात असलेला प्रादेशिक उपगट हा परिणामस्वरूप अंतर्गट होता. प्रत्येक व्यक्तीने आपल्या पोटजातीतच विवाह करावा असा दंडक असे. दळणवळणाची उपलब्ध असलेली अप्रगत साधने, आर्थिक क्षेत्रात असलेली वतन-वृत्ती व पोटजातीचे विशिष्ट भूप्रदेशाशी असलेले नाते यामुळे विवाहाची ही पद्धती ऐतिहासिक काळात चालू राहिली. परंतु भारताने व पर्यायाने महाराष्ट्राने आधुनिक कालखंडात प्रवेश केल्यानंतर या परिस्थितीत बदल होऊ लागला. ग्रामीण अर्थव्यवस्था विघटित झाल्यामुळे ग्रामीण भागातून अनेक लोक शहरी भागात कामधंद्याच्या शोधात येऊ लागले व त्यांना शहरात विविध धर्मांच्या व जातींच्या सान्निध्यात राहणे भाग पडू लागले. रेल्वे, मोटर या दळणवळणाच्या आधुनिक साधनांमुळे स्वतःच्या जातीचा पारंपरिक प्रदेश सोडून इतरत्र जाणे शक्य होऊ लागले, व परिस्थितीच्या दबावामुळे भाग पडू लागले. त्याचप्रमाणे पारंपरिक व्यवसायच करण्याचा नियम आता जवळजवळ कालबाह्य होऊ लागल्यामुळे एकच व्यवसाय निरनिराळ्या जातीचे लोक करू लागले आहेत. या सर्व बदलांमुळे स्वतःच्या जातीत अथवा पोटजातीत विवाह करण्याच्या पद्धतीवर मोठ्या प्रमाणात ताण पडत आहे व त्याचा परिणाम विवाहाचा हा नियम थोडा शिथिल होण्यात होऊ लागला आहे.

महाराष्ट्राच्या नागरी भागात पारंपरिक विवाह पद्धतीत काही बदल होऊ लागले आहेत. एकाच जातीच्या निरनिराळ्या पोटजातीत विवाह होऊ लागल्याचे दिसते. त्याचप्रमाणे आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहही आता होऊ लागले आहेत. शासनाकडून व सेवाभावी समाजकार्य करणाऱ्या संस्थांकडून मिळणाऱ्या प्रसिद्धीमुळे अशा विवाहांना आता कमी विरोध होऊ लागल्याचे दिसते. अजूनही बहुतांशी विवाह स्वतःच्या जातीत होत असले तरी आंतरजातीय विवाह होऊ लागले आहेत. १९५५-५६ सालात पुणे शहर आणि सभोवतीची तालुक्यांची गावे येथे नोंदणी झालेल्या विवाहांचा मोकाशी यांनी केलेल्या अभ्यासात आंतरजातीय विवाहाचे प्रमाण ३.६ टक्के होते.[३३] अलीकडील काळात अशा विवाहांच्या प्रमाणात वाढ झाली असण्याची शक्यता आहे. आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करणारांचे प्रमाण हे समाजात उच्च मानलेल्या जातीत अधिक आहे असे अलीकडील मुंबई शहरातील अशा विवाहांच्या अभ्यासातून दिसून आले आहे. १९७२ मध्ये मुंबई शहरातील आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाहांच्या केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, एकूण ३३३ व्यक्तींनी अशा तऱ्हेचा आंतरजातीय अथवा आंतरधर्मीय विवाह केला होता. त्यातील ५४ व्यक्ती (१६.२ प्रतिशत) ब्राह्मण, ४६ (१३.८ प्रतिशत) मराठा, व ३४ (१०.२ प्रतिशत) गौड सारस्वत होत्या. बाकीच्या जातीतील व्यक्तींची संख्या प्रत्येक जातीत १५ पेक्षा कमी होती.[३४] यावरून असे म्हणता येईल की,जातिव्यवस्थेच्या अंतर्विवाही लक्षणांमध्येही बदल होऊ लागला आहे.

महाराष्ट्राच्या पारंपरिक समाज व्यवस्थेमध्ये मराठा-कुणबी या जातीचे अथवा जाती समूहाचे प्रभावी स्थान आहे. हे स्थान या जातीला छत्रपती शिवाजी महाराजांनी मुसलमानी सत्तेचा पराभव करून स्वराज्य प्रस्थापित केल्यापासून प्राप्त झाले. आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रांमध्ये मराठा जातीला प्रभावी स्थान प्राप्त झाले. पेशवाईच्या कालखंडात ब्राह्मणांना आर्थिक व राजकीय क्षेत्रात अधिक महत्त्व प्राप्त झाल्यामुळे मराठा जातीच्या या पारंपरिक स्थानास हादरे बसले होते. विविध जातींच्या न्यायनिवाड्यांमध्ये ब्राह्मण शास्त्री-पंडित यांना पेशवाईत व ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकिर्दीत महत्त्व प्राप्त झाले. तसेच पेशव्यांनी महसूल व्यवस्थेत मामलेदाराच्या पदाची निर्मिती करून त्यावर ब्राह्मण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याची पद्धती सुरू केल्यामुळे पाटील आणि देशमुख यांच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेतील परंपरागत प्रभावास धक्का दिला. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील शासकीय धोरण पाटील-देशमुख यांच्या ग्रामीण व्यवस्थेतील परंपरागत प्रभावास मारकच होते. त्यामुळे या कालखंडात मराठा जातीचा प्रभाव काहीसा क्षीण झाला होता. परंतु १८७५ च्या दख्खनमधील दंगलीनंतर ब्रिटिश शासनाने शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने जी पावले उचलली त्याचा फायदा मराठा-कुणबी, विशेषतः या जातीतील सधन वर्गाला झाला. त्यामुळे या वर्गाचा ब्रिटिशांकडे पाहण्याचा दृष्टिकोन काहीसा सहकार्याचा झाला. सावकारांकडून शेतकरी वर्गाची होणारी फसवणूक व शोषण थांबविण्याच्या दृष्टीने ब्रिटिश शासनाने १८७९ साली डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस रिलीफ ॲक्ट मंजूर केला व शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने तगाई देण्याची पद्धती सुरू केली. त्याचप्रमाणे सहकारी तत्त्वावर पतपुरवठा करणाऱ्या संस्थांच्या स्थापनेसाठी १९०४ साली कायदा करून प्रोत्साहन दिले. तसेच या कालखंडात शासनाने हाती घेतलेल्या बांधकामांचे ठेकेही बऱ्याच मराठा-कुणबी लोकांना मिळाले. शेतकी क्षेत्रात झालेली तांत्रिक सुधारणा, नगदी पिकांना मिळालेले प्रोत्साहन या सर्वांचा फायदा धनिक मराठा-कुणबी वर्गाला मिळाला.[३५] राजसत्तेत आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्यासाठी मराठा-कुणबी जाती समूहात निर्माण झालेले क्षत्रिय मराठा, मराठा-कुणबी हे सामाजिक दर्जावर व क्षत्रियत्त्वाच्या कल्पनेवर आधारलेले भेद नष्ट करून सर्वांची एकजूट करण्याची आवश्यकता जाणवल्यामुळे या

जातीतील अभिजनांनी या सर्व पोटजातींचछ "मराठा" या जातीत समावेश करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली व सर्व पोटजातींची सामाजिक समानता मान्य करून निर्णायक संख्याबल प्राप्त केले.[३६] राजसत्तेत ब्राह्मणांचे महत्त्व कमी करून मराठा जातीचे प्रभुत्व प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे महत्त्व लक्षात घेऊन १९३० ते १९४७ च्या दरम्यान मराठा अभिजनांनी मोठ्या संख्येने काँग्रेसमध्ये प्रवेश केला व महाराष्ट्रातील राजकारणावर आपली पकड बसविली.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठा जातीचे महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात प्रभुत्व प्रस्थापित झाले. या प्रक्रियेस मराठ्यांचे राजकीय नेतृत्त्व सहाय्यभूत ठरले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, सहकारी साखर कारखान्यांच्या स्थापनेस प्रोत्साहन, उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांवर नियंत्रण व तांत्रिक व वैद्यकीय शिक्षणाच्या क्षेत्रात नव्या शिक्षण संस्थांची निर्मिती या घटना देखील सहाय्यभूत बनल्यात. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात सहकारी संस्थांचा विकास फार झपाट्याने झाला. १९६१ ते १९८७ या कालखंडात सहकारी संस्थांच्या संख्येत अडीच पटीहून अधिक वाढ झाली, तर सभासदांच्या संख्येत पाच पटीने वाढ झाली. १९६१ साली महाराष्ट्रात सहकारी संस्थांची संख्या ३१,५६५ व एकूण सभासदांची संख्या ४२ लक्ष होती, तर १९८७ मध्ये ही संख्या ८३,४६० व २१० लक्ष झाली. १९९२-९३ मध्ये या संख्येत लक्षणीय वाढ होऊन ती अनुक्रमे १,१८,४५७ आणि ३,१३,००,००० इतकी झाली. सहकारी क्षेत्रामध्ये साखर कारखाने व दूध संस्थांनी उल्लेखनीय प्रगती केली. देशातील एकूण साखरेच्या उत्पादनाच्या ३५ प्रतिशत उत्पादन महाराष्ट्रातील ८४ सहकारी साखर कारखाने करतात. या सर्व विकास प्रक्रियेचा सर्वाधिक लाभ श्रीमंत मराठा शेतकऱ्यांना मिळत असल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांचा प्रभाव वाढला आहे.[३७]

स्वातंत्र्यपूर्व काळात वकील, प्राध्यापक, डॉक्टर, अभियंते यासारख्या समाजात मानमरातब मिळणाऱ्या व्यवसायांच्या क्षेत्रात ब्राह्मण जातीने आपले प्रभुत्त्व प्रस्थापित केले होते. ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या काळात आपल्या व्यावसायिक परंपरेमुळे जी शैक्षणिक आघाडी प्राप्त झाली होती त्यामुळे हे प्रभुत्त्व मिळविता आले. परंतु बहुजनसमाजातील कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी वि.रा. शिंदे, पंजाबराव देशमुख इत्यादी नेत्यांच्या प्रयत्नांमुळे या परिस्थितीत बदल होण्यास स्वातंत्र्यपूर्व काळातच सुरुवात झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात हाती असलेल्या राजकीय सत्तेचा उपयोग करून समाजाच्या सर्व भागात उच्च शिक्षणाचा प्रसार होण्यासाठी नवीन विद्यापीठे तसेच महाविद्यालयांच्या स्थापनेस प्रोत्साहन प्राप्त झाले. त्याचप्रमाणे विनाअनुदान तत्त्वावर वैद्यकीय आणि अभियांत्रिकी महाविद्यालये स्थापण्यास प्रोत्साहन मिळाले. या सर्व घडामोडींमुळे मराठा जातीला व्यावसायिक क्षेत्रातही आले प्रभुत्व स्थापणे शक्य झाले आहे.

वरील विवेचनावरून गोष्ट स्पष्ट होते की, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात जातिसंस्थेचा धार्मिक विचारप्रणालीचा आधार जरी ढासळला, तरी जातीवर आधारित उत्पादनप्रणालीने निर्माण केलेले सत्ता व संपत्तीच्या क्षेत्रातील मराठा-कुणबी जातीचे प्रभुत्त्व वैश्विक मानवी समतेच्या तत्त्वावर आधारलेल्या वर्ग व्यवस्थेच्या विचारप्रणालीच्या आघातास तोंड देऊन ठामपणे टिकून आहे. परंतु यामुळे मानवी समतेच्या तत्त्वावर महाराष्ट्रात नवसमाज निर्मिती करण्याचे भक्तिसंप्रदायाच्या उषःकालापासून बाळगलेले ध्येय अद्याप दूर राहिले आहे.

तक्ता क्रमांक १३

महाराष्ट्रातील अनुसूचित जातींची लोकसंख्या, १९८१.

अनुसूचित जाती			एकूण	
		पुरुष	स्त्रिया	एकूण
एकूण	ग्रामीण	१५,५६,१२९	१५,०९,८०९	३०,६५,९३८
	नागरी	७,४२,९६९	६,७०,८५६	१४,१३,८२५
१) अगेर	ग्रामीण	५२२	५२०	१,०४२
	नागरी	१,४८८	१,३१६	२,८०४
२) अनमुक	ग्रामीण	२३	२४	४७
	नागरी	३६	३३	६९
३) आरेमाला	ग्रामीण	१५	१३	२८
	नागरी	११६	८८	२०४
४) आरवा माला	ग्रामीण	३७	४५	८२
	नागरी	९५	६४	१५९

५) बहना, बहाना	ग्रामीण	९४	७९	१७३
	नागरी	७१	५९	१३०
६) बाकड, बंट	ग्रामीण	३०	१८	४८
	नागरी	४७१	२१७	६८८
७) बलाही, बलाई	ग्रामीण	३,४७३	३,४८७	६,९६०
	नागरी	९३८	७७४	१,७१२
८) बसोर, बुरूड, बांसोर, बासोडी	ग्रामीण	६,७२६	६,७६५	१३,४९१
	नागरी	१०,६१३	१०,१०२	२०,७१५
९) बेडा जंगम, बुडगा जंगम	ग्रामीण	१०,०१७	९,८८६	१९,९०३
	नागरी	४,३०६	३,७८५	८,०९१
१०) बेडर	ग्रामीण	१०,८०६	१०,०७९	२०,८८५
	नागरी	२,२३४	२,०२०	४,२५४
११) भांबी, भांभी, असादरू	ग्रामीण	२,५८,८४६	२,५२,२४७	५,११,०९३
	नागरी	१,८७,८२६	१,६६,५८१	३,५४,४०७
१२) भंगी, मेहतर, ओलगाना	ग्रामीण	७,२४४	६,५९७	१३,८४१
	नागरी	६३,२६०	५६,२८५	१,१९,५४५
१३) बिंदला	ग्रामीण	१६	६	२२
	नागरी	१८८	९३	२८१
१४) ब्यागारा	ग्रामीण	३३	१९	५२
	नागरी	१५३	१५१	३०४
१५) चलवादी, चन्नय्या	ग्रामीण	९५	९९	१९४
	नागरी	७६९	७५५	१,५२४
१६) चेन्नदासर, होलयादासर	ग्रामीण	१४५	१५१	२९६
	नागरी	१८३	१३४	३१७
१७) डक्कल, डोक्कलवार	ग्रामीण	१२४	११५	२३९
	नागरी	५६	४७	१०३
१८) ढोर, कक्कय्या, कंकय्या, डोहोर	ग्रामीण	१२,८८८	१२,४५०	२५,३३८
	नागरी	२२,४१८	२०,७५३	४३,१७१
१९) डोम, डुमार	ग्रामीण	१८९	२०६	३९५
	नागरी	२,८९६	२,७७९	५,६७५
२०) येल्लमलवार, येल्लमलवंडलू	ग्रामीण	५,५७८	५,४२८	११,००६
	नागरी	८००	६७८	१,४७८
२१) गंडा, गंडी	ग्रामीण	१६८	१६२	३३०
	नागरी	१५८	१२७	२८५
२२) गरोडा, गारी	ग्रामीण	४४	४२	८६
	नागरी	१५९	१०७	२६६

Maharashtra State Gazetteers

२३) घासी, घासीया	ग्रामीण	६०२	५९९	१,२०१
	नागरी	४०१	३८१	७८२
२४) हल्लीर	ग्रामीण	५६	५६	११२
	नागरी	६८	६१	१२९
२५) हलसार, हसलार, हुलसवार, हलसवार	ग्रामीण	२५	२८	५३
	नागरी	४९	२१	७०
२६) होलार, व्हलार	ग्रामीण	२१,६९८	२०,६४५	४२,३४३
	नागरी	५,१९७	४,६६३	९,८६०
२७) होलय, होलेर, होलेया, होलिया	ग्रामीण	६,८०७	६,८८०	१३,६८७
	नागरी	६७७	५६३	१,२४०
२८) कैकाडी (अकोला, बुलढाणा)	ग्रामीण	८८३	८३४	१,७१७
	नागरी	५०७	४५४	९६१
२९) कटिया, पथरिया	ग्रामीण	१,०८५	१,०४९	२,१३४
	नागरी	५९३	४८०	१,०७३
३०) खंगार, कनेरा, मिरधा	ग्रामीण	४८	४४	९२
	नागरी	४१२	३५४	७६६
३१) खाटिक, चिकवा, चिकवी	ग्रामीण	१२,२४६	११,६०६	२३,८५२
	नागरी	१६,२०९	१४,९७५	३१,१८४
३२) कोलुपूलोंवंडलु	ग्रामीण	१७८	१७१	३४९
	नागरी	८१	८७	१६८
३३) कोरी	ग्रामीण	५,२८७	५,०९२	१०,३७९
	नागरी	४,३६५	२,७६२	७,१२७
३४) लिंगडेर	ग्रामीण	२६,३०७	२५,३८२	५१,६८९
	नागरी	७,०६६	६,३२०	१३,३८६
३५) मादगी	ग्रामीण	१३,७७७	१३,७८३	२७,५६०
	नागरी	३,५८९	३,३९५	६,९८४
३६) मादिगा	ग्रामीण	३२३	३१३	६३६
	नागरी	१,५८२	१,५५४	३,१३६
३७) महार, मेहरा, तराळ, घेगू-मेगू	ग्रामीण	६,५६,६८४	६,३७,४१०	१२,९४,०९४
	नागरी	१,८५,६७४	१,६८,५०१	३,५४,१७५
३८) माह्यावंशी, धेड वणकर	ग्रामीण	१,२५२	१,५३५	२,७८७
	नागरी	५,९८०	४,७८८	१०,७६८
३९) माला	ग्रामीण	२,६७०	२,४६४	५,१३४
	नागरी	३,७५८	२,९९८	६,७५६
४०) माला दासरी	ग्रामीण	४४०	४२१	८६१
	नागरी	८४	६६	१५०
४१) माला हन्नाई	ग्रामीण	३३	१९	५२

Maharashtra State Gazetteers

	नागरी	६	१२	१८
४२) माला जंगम	ग्रामीण	६,५९४	६,२७७	१२,८७१
	नागरी	२,५०३	२,२२१	४,७२४
४३) माला मस्ती	ग्रामीण	१६	१८	३४
	नागरी	१३	१३	२६
४४) माला साले, नेटकानी	ग्रामीण	१९६	१८५	३८१
	नागरी	२१	३५	५६
४५) माला सन्यासी	ग्रामीण	२७२	२६२	५३४
	नागरी	१४०	९५	२३५
४६) मांग, मातंग, मिनिमादिग	ग्रामीण	४,६२,१००	४,४८,०३७	९,१०,१३७
	नागरी	१,५४,५५८	१,४६,६४०	३,०१,१९८
४७) मांग-गारोडी, मांग-गारुडी	ग्रामीण	४,६१३	४,३१६	८,९२९
	नागरी	५,१४७	५,१०७	१०,२५४
४८) मन्न	ग्रामीण	२८१	२२७	५०८
	नागरी	६२७	६१७	१,२४४
४९) मस्ती	ग्रामीण	१७	१४	३१
	नागरी	४३	३३	७६
५०) मेघवाल, मेंघवार	ग्रामीण	९	९	१८
	नागरी	१४,८००	१४,४९२	२९,२९२
५१) मिठा अयलवार	ग्रामीण	२८	३७	६५
	नागरी	७६	६०	१३६
५२) मुक्री	ग्रामीण	२६	३३	५९
	नागरी	६	६	१५
५३) नाडिया, हादी	ग्रामीण	९	१३	२२
	नागरी	१३८	८९	२२७
५४) पासी	ग्रामीण	१,१२७	८५०	१,९७७
	नागरी	६,८४२	३,१७६	१०,०१८
५५) सांसी	ग्रामीण	१५	१९	३४
	नागरी	२४९	२४३	४९२
५६) शेणवा, चेणवा, सेडमा, रावत	ग्रामीण	१७७	१६८	३४५
	नागरी	८३	७३	१५६
५७) सिंधोल्लू, चिंदोल्लू	ग्रामीण	३३	३१	६४
	नागरी	५९	५८	११७
५८) तिरगार, तिरबंदा	ग्रामीण	३४५	३१५	६६०
	नागरी	२५०	२४४	४९४
५९) तुरी	ग्रामीण	५१	६७	११८
	नागरी	८९	६८	१५७

आधार : जनगणना अहवाल, १९८१ सिरीज-१२, पार्ट-IX (I) : शासनाने मागासवर्गीयांची केलेली यादी, १९९०.

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १४

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींची लोकसंख्या, १९८१

अनुसूचित जमाती		पुरुष	एकूण	
			स्त्रिया	एकूण
एकूण	ग्रामीण	२६,०९,३२२	२५,६०,७७४	५१,७०,०९६
	नागरी	३,१४,६३३	२,८७,३०९	६,०१,९४२
१) आंध	ग्रामीण	१,१४,८५१	१,११,८४२	२,२६,६९३
	नागरी	२,८१६	२,३६२	५,१७८
२) बैगा	ग्रामीण	२३८	१५४	३९२
	नागरी	८०	७४	१५४
३) बेरडा	ग्रामीण	४,८०६	४,८०३	९,६०९
	नागरी	३७१	३१२	६८३
४) बावचा, बामचा	ग्रामीण	६४	५७	१२१
	नागरी	१२५	९०	२१५
५) भैना	ग्रामीण	४१६	५४१	९५७
	नागरी	१९६	१४०	३३६
६) भारिया,भूमिया	ग्रामीण	२४०	१८२	४२२
	नागरी	३४९	२५१	६००
७) भात्रा	ग्रामीण	२३	२०	४३
	नागरी	३७	४४	८१
८) भिल, भिल्ल-गरासिआ, ढोली भिल्ल	ग्रामीण	४,७८,६८३	४,७२,४१३	९,५१,०९६
	नागरी	२१,३८१	२०,५९१	४१,९७२
९) भुंजिया	ग्रामीण	४५९	४२६	८८५
	नागरी	५५१	५०४	१,०५५
१०) बिंझवार	ग्रामीण	२,४८९	२,६२१	५,११०
	नागरी	५४६	५६०	१,१०६
११) बिरहुल, बिरहोर	ग्रामीण	७८	८१	१५९
	नागरी	३०	२३	५३
१२) चौधरा	ग्रामीण	१५	८	२३
	नागरी	१०५	५१	१५६
१३) धाणका, तडवी, तेतारिया, वळवी	ग्रामीण	२६,३०६	२६,६९६	५३,००२
	नागरी	१,५५४	१,३२५	२,८७९
१४) धनवार	ग्रामीण	३१,९५६	३०,००७	६१,९६३
	नागरी	४,१६७	३,६७९	७,८४६
१५) धोडिया	ग्रामीण	२,४०३	२,३५२	४,७५५
	नागरी	३,२६३	२,९६२	६,२२५
१६) दुबळा,तलाविया, हलपती	ग्रामीण	४,८५८	४,२५०	९,१०८
	नागरी	३,५१७	३,३९४	६,९११

Maharashtra State Gazetteers

१७) गमित, गामटा, गवित, मावची, पाडवी	ग्रामीण	५१,५२२	५१,६४५	१,०३,१६७
	नागरी	३,९९२	३,६६९	७,६६१
१८) गोंड, राजगोंड, आरख	ग्रामीण	५,२९,५४२	५,२१,४७५	१०,५१,०१७
	नागरी	५८,२७४	५३,४४४	१,११,७१८
१९) हलबा, हलबी	ग्रामीण	५०,८५६	५०,४६५	१,०१,३२१
	नागरी	७२,६०२	६८,८९६	१४१,४९८
२०) कमार	ग्रामीण	१,८२९	१,७२४	३,५५३
	नागरी	१,२९३	१,०९४	२,३८७
२१) काथोडी, कातकरी	ग्रामीण	८५,५८४	८१,३९३	१,६६,९७७
	नागरी	३,९४५	३,६८०	७,६२५
२२) कवर, कांवर कोर	ग्रामीण	७,९१५	७,८२३	१५,७३८
	नागरी	२,४७६	२,१०७	४,५८३
२३) खैरवार	ग्रामीण	९३३	८३०	१,७६३
	नागरी	३०९	२७३	५८२
२४) खरिया	ग्रामीण	५,०६२	४,७७७	९,८३९
	नागरी	८९९	६७४	१,५७३
२५) कोकणा, कोकणी कुकना	ग्रामीण	१,७२,२७०	१,७०,८०४	३,४३,०७४
	नागरी	५,४२१	४,४३७	९,८५८
२६) कोल	ग्रामीण	१,७५१	१,७२९	३,४८०
	नागरी	३८७	३२०	७०७
२७) कोलाम, मन्नेवारलु	ग्रामीण	५२,८४८	५२,६३०	१,०५,४७८
	नागरी	६,४५३	६,१४२	१२,५९५
२८) कोळी, ढोर, टोकरे कोळी	ग्रामीण	३५,२७६	३४,३२०	६९,५९६
	नागरी	४,१६२	३,६७७	७,८३९
२९) कोळी, महादेव, डोंगर कोळी	ग्रामीण	३,४१,१५०	३,३४,१७१	६,७५,३२१
	नागरी	५९,१७५	५२,९५२	१,१२,१२७
३०) कोळी मल्हार	ग्रामीण	८३,५६०	८१,३८०	१,६४,९४०
	नागरी	६,४५९	५,९६९	१२,४२८
३१) कोंध, खोंड, कांध	ग्रामीण	९४	६१	१५५
	नागरी	१३५	११६	२५१
३२) कोरकू, बोपची, णोवासी	ग्रामीण	५८,०४५	५६,७८६	१,१४,८३१
	नागरी	६२९	५१३	१,१४२
३३) कोया, भिनेकोया राजकोया	ग्रामीण	९९	१०४	२०३
	नागरी	१२६	११३	२३९
३४) नगेसिया, नगासिया	ग्रामीण	१९	३३	५२
	नागरी	३५	३७	७२
३५) नाइकडा, नायका	ग्रामीण	१६,९९९	१६,०९६	३३,०९५
	नागरी	१,०४८	९१०	१,९५८

Maharashtra State Gazetteers

३६) ओरांव, धनगड	ग्रामीण	३२,५१९	३१,०१०	६३,५२९
	नागरी	३,९३७	३,५१७	७,४५४
३७) परधान, पाथरी, सरोटी	ग्रामीण	४६,२४८	४५,६७२	९१,९२०
	नागरी	३,४७८	३,२८७	६,७६५
३८) पारधी, आडवीचिंचेर	ग्रामीण	४१,०५०	३९,७४७	८०,७९७
	नागरी	७,३६०	६,९५८	१४,३१८
३९) परजा	ग्रामीण	२३४	२०८	४४२
	नागरी	२१८	१४६	३६४
४०) पटेलीया	ग्रामीण	१९२	१५१	३४३
	नागरी	४०६	२९६	७०२
४१) पोमला	ग्रामीण	६३	६०	१२३
	नागरी	४८	४८	९६
४२) राठवा	ग्रामीण	४४३	४५४	८९७
	नागरी	६३	४९	११२
४३) सवर, सवरा	ग्रामीण	९७	८४	१८१
	नागरी	६६	५४	१२०
४४) ठाकूर, ठाकर	ग्रामीण	१,४५,७९४	१,४१,०४७	२,८६,८४१
	नागरी	१९,७७७	१६,५७३	३६,३५०
४५) थोटी	ग्रामीण	१०१	१००	२०१
	नागरी	४	४	८
४६) वारली	ग्रामीण	१,७२,७३३	१,७१,२३८	३,४३,९७१
	नागरी	९,०१८	८,२८४	१७,३०२
४७) विटोलीया, काटवालीया,बारोडीया	ग्रामीण	४४८	४५९	९०७
	नागरी	५९	४७	१०६

आधार: सेन्सस ऑफ इंडिया, १९८१, सिरीज -१२ , पार्ट ९ (३) : शासनाने मागासवर्गीयांची केलेली यादी, १९९०.

तक्ता क्रमांक १५

१९०१ च्या जनगणनेनुसार मुंबई इलाख्यातील काही जातींमधील परंपरागत व अपंपरागत व्यवसाय करणाऱ्यांचे प्रतिशत प्रमाण

जात	काम करणाऱ्या व्यक्तींचे प्रतिशत प्रमाण	
	परंपरागत व्यवसाय	अपरंपरागत व्यवसाय
ब्राह्मण (दख्खनी)	२७	७३
मराठा (क्षत्रिय)	९२ (शेती)	८
मराठा (दख्खनी)	८९ (शेती)	११
मराठा - कुणबी	९६	४
प्रभू	२८	७२
कोष्टी (दख्खनी)	९०	१०
महार	१० (शासकीय काम)	९०

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १६

काही जातींतील परंपरागत व्यवसाय करणारांचे प्रतिशत प्रमाण, १९९१

जात	मुंबई इलाखा		मध्यप्रांत आणि वऱ्हाड		हैदराबाद संस्थान	
	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री	पुरुष	स्त्री
(१)	(२)		(३)		(४)	
ब्राह्मण	--	--	८.६	१.३	३०.३	०.०
चित्पावन	१८.७	०.३	--	--	--	--
देशस्थ	१८.२	०.६	--	--	--	--
मराठा	४३.२	२०.५	२.४	०.०	३७.२	१९.७
कायस्थ	--	--	२६.१	०.०	--	--
वाणी	६५.७	४.१	--	--	--	--
माळी	३९.५	१५.२	३.७	४.२	३२.७	१९.५
कुणबी	३८.९	२२.६	३३.२	१६.५	--	--
सोनार	५४.६	२.१	५०.१	२.५	५९.४	१२.८
सुतार	५३.९	२.६	--	--	५२.८	२३.५
कोष्टी	४९.७	३६.८	४४.४	३७.८	४३.५	१७.९
साळी	५६.०	३५.९	३१.७	३०.१	४५.६	२८.३
लोहार	६०.८	६.४	३५.५	१०.१	४७.३	१२.१
पांचाळ	६८.६	२.६	३७.०	११.३	६०.१	१७.४
कुंभार	२७.९	१५.८	३९.६	३३.६	४१.१	२५.२
तेली	१४.४	५.३	३.६	३.९	३८.२	२०.६
शिंपी, दर्जी	४८.९	२२.९	४७.४	२४.१	--	--
धोबी	२४.४	१७.५	२०.०	२१.३	३३.०	२६.८
न्हावी	४०.९	०.०	४४.९	०.०	४४.०	८.८
भंडारी	६.०	२.९	--	--	--	--
महार, होलया धेड	२७.२	१८.८	६.५	४.८	२५.५	१४.४
चांभार	४२.८	१३.१	८.५	२.७	३४.६	१३.२
भंगी	१४.६	१०.९	--	--	--	--
मांग, मादिग	९.२	२.८	१४.८	०.७	२८.६	१३.३
कोळी	--	--	२.९	०.६	४०.९	१५.१
धनगर	--	--	२१.५	७.६	३२.४	१२.२
भोई	--	--	--	--	२४.१	१६.०

Maharashtra State Gazetteers

तक्ता क्रमांक १७

अनुसूचित जातीतील काम करणाऱ्या व्यक्तींचे विविध व्यवसायांतील दर हजारी प्रमाण, १९६१

व्यवसाय गट	पुरुष	स्त्री	एकूण
(१)	(२)	(३)	(४)
शेती	२३२	२०९	२२१
शेतमजूर	१०३	१२५	११४
खाणकाम, पशुसंवर्धन, जंगलकाम, मच्छीमारी,शिकार, फळबाग इ.	१७	३	१०
घरगुती उद्योग	२७	१४	२१
घरगुती धंद्याखेरीज इतर निर्मिती उद्योगधंदे	५८	६	३३
बांधकाम	१०	२	६
व्यापार	३८	५	२२
परिवहन, साठवण व दळणवळण	२१	१	११
नोकरी व इतर व्यवसाय	६४	१६	४१
एकूण	५७०	३८१	४७९
व्यवसाय न करणारे	४३०	६१९	५२१

तक्ता क्रमांक १८

प्रमुख अनुसूचित जातींचे विविध व्यवसायांतील प्रतिशत प्रमाण, १९६१

व्यवसाय गट		महार		मांग		चांभार		भंगी	
		नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण	नागरी	ग्रामीण
(१)		(२)		(३)		(४)		(५)	
शेती	पुरुष	२.६	१४.८	१.०	६.३	१.५	१७.५	०.०७	५.५
	स्त्री	१.५	११.३	०.६	४.२	१.३	१६.४	०.०३	३.१
शेतमजूर	पुरुष	६.३	२८.०	६.४	३०.२	२.५	१३.६	०.२	४.२
	स्त्री	७.९	३०.५	८.५	३३.१	५.२	२३.१	०.१	८.०
घरगुती उद्योगधंदे	पुरुष	--	--	६.७	८.३	१५.३	१९.७	--	--
	स्त्री	--	--	७.८	६.५	२.५	२.३	--	--
नोकरी व इतर सेवा	पुरुष	२६.५	४.१	२३.४	४.२	--	--	४८.६	३३.८
	स्त्री	१०.९	१.६	११.२	१.६	--	--	३०.७	२३.३
सफाई	पुरुष	२.७	०.०६	१.९	०.०५	--	--	२७.७	२४.६
	स्त्री	१.९	०.०४	३.५	०.०७	--	--	२१.२	१८.५
चर्मोद्योग	पुरुष	०.०३	०.०१	०.०४	०.०४	२.५	२.४	--	--
	स्त्री	०.०१	०.००२	०.०१	०.००९	०.१	०.१	--	--
घरगुती धंद्याखेरीज इतर निर्मिती उद्योग	पुरुष	१२.४	०.९	१०.२	०.६	४०.३	१.४	०.६	३.३
	स्त्री	३.९	०.१	२.३	०.२	५.९	०.१	०.९	३.१

Maharashtra State Gazetteers

तळटिपा

[१] एच.डी. मालवीय, "व्हिलेज कम्युनिटिज इन इंडिया : ए हिस्टॉरिकल आऊटलाईन," ए.आर. देसाई (संपा.) **रूरल सोशिऑलॉजी इन इंडिया,** तिसरी आवृत्ती, १९६१.

[२] एम.के. ढवळीकर, **दि फर्स्ट फार्मर्स ऑफ दि डेक्कन,** १९८८.

[३] ह.श्री. शेणोलीकर; प्र.न. देशपांडे, **महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास,** १९७२.

[४] सुलभा ब्रह्मे : अशोक उपाध्याय, **ए क्रिटिकल ॲनालिसिस ऑफ दि सोशल फॉर्मेशन अँड पेझन्ट रेझिस्टंस इन महाराष्ट्र,** खंड ३, १९७९.

[५] टी.एन. वाळुंजकर, **सोशल ऑर्गनाइझेशन, मायग्रेशन अँड चेंज इन ए व्हिलेज कम्युनिटी,** १९६६, पृ. ६.

[६] घुर्ये आणि इरावती कर्वे यांनी असे मत मांडले आहे. घुर्ये यांच्या मते समाजशास्त्रीय आकलनाच्या दृष्टीने पोटजात हीच जात आहे असे मानणे उपयुक्त ठरेल. मात्र इरावती कर्वे यांनी यापुढे एक पाऊल टाकून पोटजात हीच जात आहे व ज्याला सामान्यपणे जात म्हणून मानले जाते तो घटक हा जाती समूह म्हणून मानले पाहिजेत असे प्रतिपादन केले आहे. पहा : जी. एस.घुर्ये, **कास्ट अँड रेस इन इंडिया** (५ वी आवृत्ती) , १९६९, पृ. २०; इरावती कर्वे, हिंदू सोसायटी : ॲन इंटरप्रिटेशन.

[७] लुई डुमाँ, **होमो हाइरार्किकस,** १९७०, पृ. ६२.

[८] घुर्ये, पूर्वोक्त.

[९] जे. एच. हट्टन, **कास्ट इन इंडिया** (४ थी आवृत्ती), १९६३.

[१०] इरावती कर्वे, **हिंदू सोसायटी : ॲन इंटरप्रिटेशन.**

[११] लुई डुमाँ, पूर्वोक्त.

[१२] एम. एन. श्रीनिवास, "दि सोशल सिस्टिम ऑफ ए म्हैसूर व्हिलेज," मॅकिम मॅरिऑट (संपा.), **व्हिलेज इंडिया,** १९५५.

[१३] एफ. जी. बेली, **कास्ट अँड इकॉनॉमिक फ्रॉंटिअर.**

[१४] **सेन्सस ऑफ इंडिया,** १९११, खंड ७, पार्ट १, बॉम्बे प्रेसिडेन्सी.

[१५] एम. एन. श्रीनिवास, पूर्वोक्त.

[१६] **सेन्सस ऑफ इंडिया,** १९२१, खंड २१, हैदराबाद स्टेट,पार्ट १, रिपोर्ट,

[१७] ब्रह्मे ; उपाध्याय, पूर्वोक्त.

[१८] इरावती कर्वे यांनी कृषक समाज या नात्याने महाराष्ट्रातील समाजात विविध व्यावसायिकांचे प्रमाण पुढीलप्रमाणे होते असे स्पष्ट केले आहे :-

(१) ७० टक्के जनता अन्नोत्पादक व्यवसायात होती. (२) ८ टक्के पुरोहित होते, (३) जवळजवळ तेवढेच जमीनदार होते, (४) १० ते १२ टक्के कारागीर, (५) ४ टक्के व्यापारी, (६) थोडे मनोरंजनाच्या क्षेत्रात, (७) थोडे फार कृषक समाजाशी जुळवून घेऊ न शकलेले. पहा - **महाराष्ट्र : लँड अँड इटस् पिपल, पृ.** ८२.

[१९]. एम. केनेडी, **नोटस ऑन क्रिमिनल क्लासेस इन बॉम्बे प्रेसिडेन्सी,**१९०८.

[२०] वाळुंजकर, पूर्वोक्त.

Maharashtra State Gazetteers

[२१] रामनाथ चव्हाण, **भटक्या विमुक्तांचे अंतरंग,** १९८९.

[२२] नलिनी पंडित, **महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास,** १९७२.

[२३] जयंत लेले, "कास्ट, क्लास अँड डॉमिनन्स : पोलिटिकल मोबिलायझेशन इन महाराष्ट्र," फ्रॅन्सिन फँकेल ; एम. एस. ए. राव (संपा.), **डॉमिनन्स अँड पोलिटिकल पॉवर इन मॉडर्न इंडिया,** खंड २.

[२४] पी.एन. प्रभु, "ए स्टडी ऑन दि सोशल इफेक्टस ऑफ अर्बनायझेशन ऑन इंडस्ट्रियल वर्कस मायग्रेटिंग फ्रॉम रुरल एरिआज टु दि सिटी ऑफ बॉम्बे," **सोशल इंप्लिकेशन्स ऑफ इंडस्ट्रिअलायझेशन अँड अर्बनायझेशन,** १९५६.

[२५] विनय हर्डीकर : दास्ताने, **महाराष्ट्र,** १९८४.

[२६] रोझलिंड ओ हॅनलॉन, **कास्ट कॉंफ्लिक्टस अँड आयडिऑलॉजी,** १९८५.

[२७] नरेंद्र वागळे, "ए डिस्प्युट बिटवीन दि पांचाल, दैवज्ञ सोनार अँड दि ब्राह्मिण ऑफ पुणे रिगार्डींग सोशल रँक अँड रिच्युअल प्रिव्हिलेजेस : ए केस स्टडी ऑफ ब्रिटिश ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दि जाती लॉ इन महाराष्ट्र : १८२२-१८२५," एन. के. वागळे (संपा.), **इमेजेस ऑफ महाराष्ट्र : ए रिजनल प्रोफाईल ऑफ इंडिया,** १९८० ; "रिच्युअल अँड चेंज इन अर्ली नाईनटिन्थ सेंच्युरी सोसायटी इन महाराष्ट्र : वेदोक्त डिस्प्युट इन बरोडा, पुणे अँड सातारा, १८२४-१८३३," मिल्टन इझरेल, एन.के. वागळे (संपा.), **रिलिजन अँड सोसायटी इन महाराष्ट्र,** १९८७.

[२८] रोझलिंड ओ ' हॅनलॉन, पूर्वोक्त.

[२९] लक्ष्मणशास्त्री जोशी, "महाराष्ट्रातील धर्म सुधारणेचे आंदोलन," भीमराव कुलकर्णी (संपा.), **अस्मिता महाराष्ट्राची,** १९७१.

[३०] वामन रामचंद्र गुळवणे, **ब्राह्मण सभेची गेली साठ वर्षे,** १९४९.

[३१] गोविंद गारे ; शिरुभाऊ लिमये, **महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध,** १९७३.

[३२] टी. एन. वाळुंजकर, **एज्युकेशनल प्रॉब्लेमस ऑफ दि शेड्युल्ड कास्टस अँड शेड्युल्ड ट्राईब्ज सेकंडरी स्कूल स्टुडंटस इन महाराष्ट्र,** १९७५ (चक्रमुद्रित).

[३३] पी. आर. मोकाशी, "सम सोशल आस्पेक्ट ऑफ मॅरेजेस इन पुणे डिस्ट्रिक्ट, १९५५-५६", पीएच.डी. थिसिस, युनिव्हर्सिटी ऑफ पुना, १९६३.

[३४] पी. आर. मोकाशी; जे.एस. रणदिवे; आर.डी. नाईक, **मेट सिलेक्शन इन इंटरमॅरेजेस इन बॉम्बे,** पृ. ३७.

[३५] जयंत लेले, पूर्वोक्त.

[३६] गेल ऑमवेट, **कल्चरल रिव्होल्ट इन ए कलोनिअल सोसायटी : दि नॉन-ब्राह्मिण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया,** १९७६.

[३७] म. द. पाध्ये, "महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे यशापयश," पन्नालाल सुराणा; किशोर बेडकीहाळ (संपा.), **आजचा महाराष्ट्र,** १९८८.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ५ : विवाह, कुटुंब आणि नातेव्यवस्था

विवाह

(या प्रकरणाचे लेखन डॉ. सुधाताई काळदाते यांनी केलेले आहे.)

विवाह म्हणजे समाजमान्य पद्धतीने प्रस्थापित होणारे स्त्री-पुरुषांचे पवित्र भावनेने जुळलेले शारीरिक व कौटुंबिक संबंध होय. विवाह कोणत्या स्त्री-पुरुषांत होऊ शकतात अथवा होऊ शकत नाहीत याबाबत प्रत्येक समाजात काही नियम असतात. या विवाहांचे कालानुरूप व सामाजिक परिस्थितीनुसार विविध प्रकार असतात. तसेच ते विवाह संपन्न करण्याबाबतच्या विविध चालीरीती आढळतात. विवाह संस्थेचा अभ्यास करताना (१) विवाह प्रकार, (२) देज व हुंडा, (३) विवाहाच्या वेळचे वय, (४) घटस्फोट, (५) पुनर्विवाह, (६) विवाहाशी संबंधित चालीरीती, (७) पाश्चात्यीकरणाचा विवाह संबंधावरील परिणाम या संबंधित बाबींचा अभ्यास करणे आवश्यक असते.

विवाह प्रकारः अन्य सामाजिक संस्थांप्रमाणेच विवाह ही महाराष्ट्राच्या संस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. महाराष्ट्राची संस्कृती प्रादेशिक असून तिच्यावर उत्तर आणि दक्षिण भारतीय संस्कृतीचा प्रभाव पडलेला आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्र भारताच्या मध्यभागी, तसेच पश्चिमेकडे समद्र किनारपट्टीपर्यंत पसरलेला आहे. त्यामुळे प्राचीन काळापासून उत्तरेकडून दक्षिणेकडे जाताना तसेच देशाबाहेरून पश्चिमेकडून आत येताना महाराष्ट्रातून जावे लागे. त्यातूनच झालेल्या आर्थिक व सामाजिक स्थित्यंतराबरोबरच विवाहाचे दक्षिणोत्तर रूढ असलेले प्रकार येथे आलेत. विवाहाच्या चालीरीतींमध्ये सांस्कृतिक विविधता आढळते. यापैकी काही रूढी व पद्धती भिन्न भिन्न संस्कृतीमधील साहचर्यातून तर काही संघर्षामधून उचलल्या गेल्या आहेत.

विवाह प्रकारांची ओळख करून घेताना जातिव्यवस्था, भाषिक विभाग आणि कुटुंबव्यवस्था यांची माहिती असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त नाते संबंधाचा विवाह प्रकारांशी घनिष्ट संबंध आहे. जातींमध्ये जसा समाज विभागला गेलेला आहे तसाच पूर्वीपासून "कुल", "उपजाती", काही ठिकाणी "गाव", कुटुंबांमध्ये "गोत्र", "प्रवर", आणि "देवक" अशा लहान व मर्यादित समूहांमध्ये विभागला गेला आहे. हे छोटे समूह म्हणजे छोटे छोटे अंतर्विवाह गट (Endogamous groups) असतात. अशा सर्व अंतर्विवाह गटांना त्यांच्यापेक्षा भिन्न असणारे बहिर्विवाह गट (Exagamous groups) असतात. अंतर्विवाह गट आणि बहिर्विवाह गट विविध आर्थिक व सांस्कृतिक व्यवहारांसाठी संदर्भ बदलत असतात. त्यामुळे कधी कधी अनेक छोट्या छोट्या बहिर्विवाह गटांचा मिळून एक मोठा अंतर्विवाह गट दुसऱ्या एखाद्या मोठ्या बहिर्विवाह गटासाठी तयार होतो. विवाहाचे प्रकार गटा-गटातील वैवाहिक नाते जोडण्यावरून पडलेले असतात. विवाहाचे अंतर्विवाह व बहिर्विवाह असे दोन प्रमुख प्रकार आहेत.

अंतर्विवाह : या प्रकाराचा नियम विवाह करणाऱ्या दोन व्यक्तींना जातीच्या निकषावरून लावला जातो. एकाच जातीतील स्त्री-पुरुषांना त्या जाती अंतर्गत किंवा एकाच जातीच्या उपजातींमधील स्त्री-पुरुषांना उपजाती अंतर्गतच विवाहाचा जोडीदार शोधता येतो. म्हणजेच विवाहाचा जोडीदार आपल्या स्वतःच्या उपजातीबाहेरील दुसऱ्या उपजातीचा निवडता येत नाही. जात, जातीतील उपजात हे अंतर्विवाही गट आहेत. महाराष्ट्रात ब्राह्मण जातीत कऱ्हाडे, देशस्थ, कोकणस्थ, देवरुखे, सारस्वत इत्यादी उपजाती आहेत. काही उपजातीत यजुर्वेदी व ऋग्वेदी अशा पोटजाती आहेत. अंतर्विवाहाच्या नियमाप्रमाणे देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण हा अंतर्विवाह गट बनतो व विवाहासाठी याच अंतर्विवाही गटातील वर किंवा वधू निवडण्याचे बंधन असते. अंतर्विवाही प्रकाराच्या या नियमाचे उल्लंघन करणाऱ्यांना पूर्वीच्या काळी बहिष्कृत करण्यात येई वा त्यांची संतती शूद्र समजण्यात येई. अंतर्विवाह प्रकाराचे नियम मोडल्यामुळे जाती-उपजातींमध्ये संकर झाल्याने नवनवीन जाती-उपजाती निर्माण झाल्या आणि पुन्हा विवाहासाठी अशा प्रत्येक जातीला अंतर्विवाहाचा हाच नियम आजपावेतो लागू राहिला.

भारतात अंतर्विवाहाच्या या नियमामुळे जातींचे वेगवेगळे अस्तित्व शेकडो वर्षे टिकून राहिले आणि येथे ब्रिटिशांचे आगमन झाल्यानंतर झालेल्या सामाजिक सुधारणांच्या प्रक्रियेमध्ये जातिनिर्मूलन होण्याचे जे प्रयत्न झाले त्यामध्ये हा अंतर्विवाहाचा नियम मोडण्याचे प्रयत्न झाले. जात, उपजात किंवा पोटजातीबाहेर असलेली दुसरी जात-उपजात-पोटजात या गटातील व्यक्तींची विवाहाचे जोडीदार म्हणून निवड केली जाऊ लागली. आंतरजातीय विवाह व्हावेत अशा दृष्टीने प्रचार केला जात आहे, काही ठिकाणी जाणीवपूर्वक विवाह घडवून आणले जात आहेत, तरीही अंतर्विवाहाचे नियम मोडून विवाह करण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. वर्षानुवर्षे चाललेली प्रथा चालूच आहे. अंतर्विवाहाचा नियम हिंदू

धर्मग्रंथामध्ये जाती व पोटजाती यांच्याबाबतीत कडक होता तसा धर्माच्या बाबतीतही होता, असे म्हणावयास लेखी पुरावे सापडत नाहीत. परंतु व्यवहारामध्ये मात्र मुसलमानांच्या स्वाऱ्यांबरोबर आलेली परधर्मीय मंडळी येथे नंतर शेकडो वर्षे राहिली, तरीही हिंदू-मुसलमान यांच्यामधील धार्मिक तेढ कायमच राहिली. त्यामुळे हिंदूनी नकळत अंतर्विवाहाचा नियम धर्माच्या गटालाही लागू केला आणि भारतात आंतरधर्मीय विवाह करणे हे विपथगामी वर्तन मानले गेले. औद्योगीकरण आल्यानंतर आणि आधुनिक विचारांच्या स्वीकारानंतरही आतापर्यंत आंतरधर्मीय विवाहांचे प्रमाण नगण्य आहे. बहुजिनसी नागरी समाजामध्ये तरुण स्त्री-पुरुष अन्य कारणांमुळे म्हणजे व्यवसाय, समान मूल्ये, शारीरिक आकर्षण, सहवास, भावनिक एकात्मता यामुळे एकमेकाच्या समीप आल्याने "आंतरधर्मीय विवाह करू नये" या अंतर्विवाह नियमांचे उल्लंघन करण्याची तयारी ते दाखवितात.[१] तथापि आंतरजातीय अथवा आंतरधर्मीय विवाह करणारी जोडपीही शोधणे अवघड असते. रजिस्ट्रार ऑफ मॅरेज याने निवडलेल्या २६५ जोडप्यापैकी ११४ (दोन्ही हिंदू), ४१ (वधू हिंदू), ६४ (वर हिंदू) आणि ४६ (दोन्ही बिगर हिंदू) होती.[२]

महाराष्ट्रात अदमासे चाळीस टक्क्यांपर्यन्त लोक मराठा आणि कुणबी जातींचे आहेत. पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाड्यात मराठा व विदर्भात कुणबी लोक संपत्ती, प्रतिष्ठा आणि वरचे सत्तास्थान मिळवून आहेत. हे दोन्ही गट स्वतःला क्षत्रिय समजतात, आजही गावाचे "पाटील" गावप्रमुख म्हणून त्यांचे गावरहाटीवर वर्चस्व आहे. मराठा ही एक जात आणि त्यामधील विविध उपजाती याही अंतर्विवाही गट आहेत. अंतर्विवाह प्रकाराच्या नियमानुसार मराठा जातीय मंडळी मराठा जातीतच बेटीव्यवहार करतात.

महाराष्ट्रातील मुसलमान लोकांमध्येही अंतर्विवाही गट आहेत व त्यांच्यामध्ये अंतर्विवाह प्रकाराचेच नियम पाळले जातात. त्यांच्यात शिया व सुन्नी असे दोन पंथ आहेत. या दोन पंथांमधील व्यक्ती एकमेकांशी विवाह करू शकत नाहीत. सुन्नींमध्ये बोहोरा हा अंतर्विवाही गट आहे. तसेच सय्यद, शेख, पठाण आणि मुघल हे अंतर्विवाही गट असून ते आपापल्या गटांमधील व्यक्तींशीच विवाह करतात. महाराष्ट्रात मुसलमान राजवटीत हिंदूंनी स्वच्छेने किंवा सक्तीमुळे धर्मांतर केले. असे धर्मांतरित लोक जरी मुसलमान असलेत तरी काही आचारांमध्ये त्यांच्यावर हिंदू संस्कृतीचा प्रभाव दिसून येतो. तसेच हिंदू असतानाच्या उपजाती-पोटजाती याच अद्यापही विवाहासाठी जोडीदार निवडताना अंतर्विवाही गट म्हणून मानण्यात येतात. धर्मांतर करूनही त्यांची मूळ जात विसरली गेली नाही.

महाराष्ट्रातील शीख लोकांमध्येही अंतर्विवाहाचाच प्रकार रूढ आहे. भाई आणि निहंग अशा दोन अंतर्विवाही गटांमध्येच विवाहसंबंध जोडले जातात. या गटांबाहेर असणाऱ्या व्यक्तींशी विवाह करण्यावर या प्रकरामुळे बंधन येते.

बर्हिविवाह : विशिष्ट गटातून जोडीदार निवडण्याविषयी दंडक असतो, तसेच तो विशिष्ट गट याकरिता वगळावेत म्हणूनही असतो. जवळच्या रक्तसंबंधीयांमध्ये विवाह होणे हे निषिद्ध मानले जाते. या रक्तसंबंधाच्या संकल्पनेचा विस्तार होऊन रक्तसंबंधीय म्हणून समजण्यात येणाऱ्या सपिंड, सगोत्र आणि सप्रवर गटांना वैवाहिक संबंधाच्या कक्षेतून वगळण्यात आले आहे.

जाती हे फार मोठे व्यापक समूह असले तरी प्रत्येक व्यक्तीचा दररोजच्या जीवनात संबंध येतो तो कुटुंबाशी. आजची कुटुंबपद्धती प्राचीन भारतीय कुटुंबपद्धतीतूनच उत्क्रांत झालेली आहे. उत्तर भारतातील कुटुंबपद्धतीवर आधारलेली महाराष्ट्रातील कुटुंबपद्धती पितृप्रधान आहे, तर दक्षिणेकडील कुटुंबे मातृवंशीय आहेत. विवाहाने नात्याचे झालेले कुटुंबीय व रक्ताच्या नात्याचे कुटुंबीय यांचे दोन गट पडतात. तसेच कुटुंबाचा "कुळ" अथवा "कुल" असा गट असतो. या कुळाला नाव असते आणि प्रत्येक कुळाचे स्वतंत्र देवक असते. कुळ, देवक आणि पूर्वजांच्या नावावरून पडलेले गोत्र हे कुटुंबातील बहिर्विवाही समूह आहेत. बहिर्विवाही प्रकाराच्या नियमानुसार एका बहिर्विवाही गटातील व्यक्ती त्याच्याच गटातील व्यक्तीशी विवाह करू शकत नाही. समान देवक असलेल्या कुळांमध्ये लग्न होत नाही.

एका कुलनामाच्या लोकांचे साधारणपणे एक देवक असते. काही आडनावे देवकांवरून पडलेली आहेत. महाराष्ट्रात पितृप्रधान कुटुंबे असल्यामुळे एकाच कुळात लग्न न करणे म्हणजे पितृकुळात लग्न न करणे असे होय. काही पूर्ण गावे बहिर्विवाही गट असल्यामुळे त्या गावातील मुलगी दुसऱ्याच गावामध्ये द्यावी लागते. ब्राह्मणांमध्ये गोत्र हा बहिर्विवाही गट असतो.

"वंश" म्हणजे उदग्र वाढणारी आणि वारस कोण ते सांगणारी, तर "कुल" म्हणजे पितापुत्र यांचा संबंध दाखवून वारस सांगणारी व्यवस्था होय. अनेक कुळांचा संदर्भ इंग्रजीतील, क्लॅन या संज्ञेशी अधिक जुळतो. महाभारत काळात उत्तर भारतात "गोत्र" पद्धती ब्राह्मणांनी स्वीकारली. गोत्र म्हणजे पित्याच्या घराण्याचा मूळ पुरुष असून त्याचेच नाव नंतरच्या पिढीतील अपत्यांचे गोत्र समजले जाते. गोत्र नाम हे कुटुंबनाम, कुळनाम किंवा आडनावासारखे वापरीत असावे. श्रेष्ठ ऋषींचे वंशज त्या ऋषींच्या नावाने ओळखले जात असत. हे ऋषी स्वतंत्र विद्याशाखेचे (School of Learning) प्रवर्तक म्हणूनही त्यास महत्त्व आले असावे. गोत्रपद्धती प्रामुख्याने ब्राह्मणांपुरतीच निर्माण झाली, पुढे ही

ब्राह्मणी पद्धती म्हणूनच टिकली. उत्तरेकडील अन्य जातींवर तिचा फारसा प्रभाव पडलेला दिसत नाही. ब्राह्मणांजवळ असलेले ज्ञान आणि विद्या प्रसार करण्याची भूमिका बजावण्याच्या प्रयत्नात ते एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात फिरत राहिले. अनेक राजांना त्यांनी सल्ला देण्याचे काम केले. ज्ञान अबाधित आणि सुरक्षित राहावे यासाठी त्यांना कुटुंबाच्या आडवानाच्या आधाराची गरज भासली. त्यातूनच गोत्रांचे महत्त्व वाढत गेले. गोत्र म्हणजे कर्त्या पुरुष प्रमुखाचे नाव, गोत्र म्हणजे सुप्रसिद्ध वंश पुरुषाचे नाव होय.

इसवी सन सुरू होण्यापूर्वी काही शतके गोत्राचे रूपांतर बहिर्विवाही कुळांमध्ये झाले. बौद्धायनाने प्रथमतः गोत्राचा वेगळा अर्थ लावला. "गोत्र म्हणजे एकाच पुरुषापासून निर्माण होत गेलेल्या सर्व पिढ्यांच्या सर्व व्यक्तींचा समूह." असे पुरुष सात असून आठवा अगस्ति मानला जातो. एकाच गोत्राच्या व्यक्तींना विवाह करता येत नाही. गोत्र म्हणजे सुरुवातीच्या कुटुंब प्रमुखापैकी आठ ऋषी पहिले पुरुष म्हणून मानले जातात. छंदोग्योपनिषदात आठ मूळ पुरुषांची भारद्वाज, गौतम, वसिष्ठ, अत्रि, काश्यप, विश्वामित्र, जमदग्नि आणि अगस्ति ही नावे सांगितली आहेत. यातूनच पुढे गोत्र सादृशावरून रक्तसंबंध किंवा आनुवंशिकता प्रस्थापित करण्याची पद्धती रूढ झाली असावी. जी. एस. घुर्ये यांच्या मते ही प्रक्रिया अदमासे इ. स. पूर्व ८०० च्या सुमारास पूर्ण झाली. ब्राह्मण ग्रंथांच्या आणि उपनिषदांच्या काळात यज्ञयात्रादि कर्मकांडाकरिता किंवा विद्याशाखेचे निर्देशक म्हणून उदयास आलेल्या गोत्रांचा संबंध सुत्रकाळात आनुवंशिकतेशी जोडण्यात आला. कत्यायन श्रौत-जन आणि समानजन असा भेद करण्यात आला आहे. जन म्हणजे ज्याच्या मुलीबरोबर विवाह करणे शक्य आहे तो आणि ज्यांच्याशी विवाहसंबंध होऊ शकत नाही तो समानजन होय. समानजन म्हणजे सगोत्रीय असा अर्थ आहे. यावरून सूत्रांच्या आधीपासून गोत्राचा संबंध विवाहाशी जोडला गेला होता असे दिसते. तेव्हापासून आजतागायत महाराष्ट्रात ब्राह्मण जातींमध्ये विवाहसंबंध जुळविताना वर आणि वधू एकाच गोत्राचे असून चालत नाही. जन्माच्या वेळेवरून आणि ठिकाणावरून व्यक्तींची जन्मकुंडली बनविलेली असते. त्या कुंडलीच्या कागदांमध्ये गोत्र कोणते ते लिहिलेले असते. अगदी आजही बहुसंख्य ब्राह्मण कुटुंबांमध्ये अंतर्विवाहाचे आणि बहिर्विवाहाचे निर्बंध पाळले जातात. अंतर्विवाह निर्बंधानुसार ब्राह्मण जातीतील पोटजातीतच वधूवरांची निवड केली जाते आणि असे करताना बहिर्विवाही निर्बंधानुसार गोत्राबाहेरील व्यक्तीची निवड करण्यात येते.

प्रवर : ब्राह्मणांमध्ये गोत्रांबरोबरच "प्रवर" नावानेही बहिर्विवाही गट आहेत. एकाच गोत्रातील ज्या कुटुंबांमध्ये पूर्वजांचे नामस्मरण करून प्रार्थना केली जाते आणि ज्या पूर्वजाने म्हणजेच ऋषीने यज्ञामध्ये आराधना केलेली असते, त्या मूळ ऋषीचे नामोच्चरण व पुण्यस्मरण करणारी कुटुंबे म्हणजे प्रवर. एकूण ४९ प्रवरे आहेत. प्रवरे फक्त ब्राह्मणांमध्येच आहेत. क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांना परंपरेने प्रवरे नाहीत. सप्रवरांमध्ये अतिशय जवळचा गट म्हणून विवाहसंबंध जोडता येत नाही.

पिंड : पिंड म्हणजे भाताची मूद. सपिंड म्हणजे जवळचे नातेवाईक. चित्पावन ब्राह्मणांमध्ये आईच्या बाजूने पाच पिढ्यांपर्यंत आणि वडिलांच्या बाजूने सात पिढ्यांपर्यंतचे नातेवाईक हा बहिर्विवाही गट असतो. हे जवळचे नातेवाईक मृत व्यक्तीला पिंडदान करीत असतात, म्हणून ते सपिंड समजले जातात. सपिंड विवाह होऊ न देण्यामागे केवळ भावनात्मक जवळीक हा आधार नसून प्रजनन शास्त्राचाही आधार आहे. समान रक्ताच्या एकत्रित संपर्काद्वारे गुणवत्ता कमी होते. अशी संतती सदोष असण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्रात ब्राह्मणांव्यतिरिक्त मराठा ही सुद्धा महत्त्वाची मोठी जात आहे. म्हणून मराठा जातीतील कुळांच्या संदर्भातील विवाह निर्बंध अभ्यासणे आवश्यक आहे. मराठ्यांमधील कुळ-संघटना ही राजपुतांच्या कुळ-संघटनेशी मिळती जुळती आहे. या कुळांची निर्मिती प्राचीन काळापासून झाली असावी. पुढे आठव्या शतकापासून अनेक राजघराण्यांच्या नावावरून कुळांची नावे पडलेली दिसतात. उदाहरणार्थ, शेलार (कोकणातील शिलाहार), कदम (दक्षिण कोकणातील कदंब), शिंदे (सिंद-सिन्नर, नाशिक जिल्हा), चाळके (चालुक्य), मोरे (मौर्य), ही आडनावे कुळांची कुलनामे म्हणून रूढ झालेली दिसतात. तसेच राजपुतांमधील चौहानपासून चव्हाण, परमारपासून पवार, सोळंकीपासून साळुंके ही कुळे मराठ्यांमध्ये दिसतात. याशिवाय काही कुळे त्यांच्या पूर्वजांनी मानलेल्या कुलचिन्हांवरून ओळखली जातात. कुलचिन्हे म्हणजे देवके. देवकोत्थापनेनंतर विवाहाच्या विविध विधींना सुरुवात होते. प्राणी, पक्षी, वस्तू, शारीरिक अवयव, फळे, वतन किंवा व्यवसाय यांच्या नावांवरून देवक स्वीकारलेले असते. त्यावरून कुलनामे पडतात. उदा. वाघ, मोरे, कुदळे, पांढरे, काळे, फणसे, मोगरे, कुंभार इत्यादी आडनावांचा देवकांशी संबंध आहे असे आढळते. काही गावांमध्ये एकच "देवक" असल्याने तेथे एकाच आडनावाची कुटुंबे आढळतात. त्यांच्यात एकाच गावातील कुटुंबामध्ये लग्न होत नाही. उत्तरेकडील प्रथांचा हा परिणाम महाराष्ट्रात क्वचितच दिसतो. या देवक कुटुंबांचे गट विवाहसंबंधासाठी बहिर्विवाही गट बनतात. उत्तर भारतात देवके नसल्याने एका गावाची कल्पना अस्तित्वात आली.

महाराष्ट्रात एकाच मातापित्यांपासून जन्मलेल्या जवळच्या भावंडांमध्ये रक्तसंबंध असल्यामुळे विवाह निषिद्ध मानला आहे. मावस वा चुलत भावंडांमध्ये सर्रास विवाह होत नाहीत. तसेच आतेबहिणीशी विवाह निषिद्ध असला तरी काही

जातींमध्ये मामेबहिणीशी विवाह निषिद्ध नाही. दक्षिण भारतात मामेबहिणींशी अधिक विवाह होतात.

मराठा जातींमध्ये उत्तरेकडील खत्री व राजपुतांप्रमाणे चांद्रसेनीय, सूर्यवंशीय राजपूत अशा शाखा आढळतात. त्या ९६ कुळांपैकी असल्या तरी इतरांपेक्षा वेगळे समजून एक अंतर्विवाही गट असतात.

९६ कुळे : स्वतःस ९६ कुळी मानणाऱ्या मराठ्यांचा अंतर्विवाही गट आहे. परंतु त्यांच्यातील सात कुळांचा एक गट आणि पाच कुळांचा दुसरा गट यांच्यातील विवाहसंबंधाबातचे निर्बंध वेगळे आहेत.[३]

५ कुळी : यांच्यात आपापसात विवाह होतो. वधू म्हणून आपल्या मुलीला बाहेरील कुळांमध्ये देत नाहीत. मात्र बाहेच्यांची मुलगी सून म्हणून घरात आणतात. या पंचकुळींमध्ये जाधव, मोरे, शिर्के, पवार इत्यादींचा समावेश असतो.

७ कुळी : ५ कुळे सोडून अन्य कुळांतील मुली सुना करून आणतात. ही कुळांची व्यवस्था स्वतःच्या घरच्या मुली देण्याच्या बाबतीत अंतर्विवाही गट, तर कुळाबाहेरील मुली सुना करून आणण्याच्या बाबतीत बहिर्विवाही आणि अंतर्विवाही हे दोन्ही गट, अशी आहेत. ग्रामीण महाराष्ट्रात मामेबहीण-आतेभाऊ यांचा विवाह होऊ शकतो. पिढ्यान्पिढ्या संबंध कायम टिकून राहावेत हा उद्देश यामागे दिसून येतो. विशेषकरून स्त्रियांना आपल्या भावाची मुलगी सून करून घेण्याची इच्छा असते. असे करण्यामुळे दोन कुटुंबांचा दर्जा समान म्हणजेच "मुलगी देणारे" आणि "त्यांची मुलगी सून करून घेणारे" अशांचा एकाच पातळीवर संबंध प्रथापित होतो. काही जाती वगळल्यास इतर जातींत मामेबहिणीशी लग्न करण्याची पद्धती आहे. आतेच्या मुलीशी मात्र परत वंशवेल या नात्याने लग्न करता येत नाही.

मात्र अशा प्रकारच्या प्रथांमुळे अलीकडे तरुण मुलामुलींवर जाचक बंधने पडतात. शिकून स्वतःच्या पायावर उभे राहिल्यानंतर नात्यातील मुलगी करून घेण्याची बऱ्याच मुलांची तयारी नसते. तसेच ज्याला "आतेभाऊ" म्हणून लहानपणापासून पाहिले त्याला पती म्हणून स्वीकारण्याची मुलींची इच्छा नसते. अजूनही बहुसंख्य विवाह वडीलधारी मंडळी जुळवून आणीत असल्यामुळे कित्येकदा मुलामुलींची इच्छा विचारात घेतली जात नाही व पूर्वापार चालत आलेल्या प्रथा आणि अंतर्विवाहाचे नियम यांचे प्राबल्य दिसून येते. काही विवाहविषयक संशोधन प्रबंधांचा मागोवा घेतला असता आढळून आले की, ९५ ते ९७ टक्के विवाह वडीलधाऱ्या मंडळींनी जुळविलेले असतात. आंतरजातीय प्रेमविवाह किंवा सहवासोत्तर विवाह इत्यादी प्रकारांचे प्रमाण अत्यल्प आहे. इच्छा असूनही विवाहपूर्व परिचय असलेल्यांमध्ये विवाह जुळत नाहीत याचे कारण अद्यापही अंतर्विवाह, बहिर्विवाह आणि इतर पारंपरिक बंधने पाळली जात आहेत. महाराष्ट्रात काही स्वयंसेवी संस्था विवाहपूर्व परिचय मेळावे भरवितात. या संस्था बालविवाह प्रतिबंधक कायदा, पुनर्विवाह, घटस्फोट इत्यादींबाबत प्रबोधनाद्वारे तरुणांना व पालकांना जागृत करतात. तसेच क्वचित प्रसंगी मुलामुलीतील दोष, कुटुंबांचा इतिहास आणि विकृत उद्दिष्टे यांची आगाऊ माहिती मिळाल्यास साखरपुडा, रुपया-नारळ, टिळा-बुंक्कू यासारखे विधी रद्द करण्यात येतात व विवाह होण्याआधीच मोडतात.

उत्तरेकडे रूढ असलेल्या अनुलोम विवाह प्रकाराचा पगडा महाराष्ट्रातील अभिवृत्तीवर पडलेला दिसतो. वर उच्च जातीचा किंवा उच्च कुळातील असावा आणि वधूची जात कनिष्ठ असावी ही भावना पितृप्रधान संस्कृतीमुळे अधिक रूढ झाली आणि ती केवळ अनुलोम विवाहांपुरतीच राहिली नाही, तर ती अंतर्विवाही गटांमध्येही एकाच जातीत लग्न जमणाऱ्या वरपक्ष-वधूपक्ष यांच्याबाबतीतही लागू झाली. प्राचीन काळी रूढ असणारे विवाहाचे आठ प्रकार आज मूळ स्वरूपात प्रचलित नसले तरी त्यांचा प्रभाव काही प्रमाणात दिसतो. **महाभारत** ग्रंथात आठ प्रकारांपैकी ब्राह्मण (कन्येचे सालंकृत कन्यादान पित्याने करणे), दैव (पिता गुरूला कन्येचे दान करतो), आर्ष (ऋषिला मुलगी दिली जाते) आणि प्रजापत्य (प्रजानिर्मितीसाठी विवाहाचा पतिपत्नींना संदेश दिला जातो) असे चार विवाह प्रकार उच्चवर्णीयांसाठी विहित केलेले आहेत. शेकडो वर्षानंतरही ब्राह्मण जातींमध्ये आणि अलीकडे अन्य उच्च समजल्या जाणाऱ्या जातींनीही ब्राह्मण विवाहाची परंपरा चालू ठेवलेली दिसते. पित्याने देव, देवक आणि ब्राह्मण यांच्या समक्ष कन्यादान करणे, दागदागिन्यांनी सजवून कन्या वराच्या स्वाधीन करणे आणि वराने अग्नीच्या समक्ष वधूचा शपथपूर्व स्वीकार करणे हे नियम पाळले जातात. क्षत्रिय जातींसाठी गांधर्व (स्वेच्छेने वर-वधूंनी एकमेकांचा स्वीकार करणे), राक्षस (वधूला तिच्या घरी जाऊन पळवून आणून विवाह करणे), पैशाच (कनिष्ठ जातींमधील काहीसा राक्षस विवाहाचा प्रकार) आणि आसुर (दोन कुटुंबात पैशांचा करार करून घडवून आणलेला कनिष्ठ जाती यांमधील विवाह), हे पारंपरिक विवाह प्रकार थोड्याफार फरकाने आजही आढळतात. विविध आदिवासी जमाती आणि भटक्या विमुक्त जाती यांच्यामध्ये त्यांच्या त्यांच्या जातपंचायतींच्या स्थानिक निर्बंधानुसार सेवाविवाह, घरघुशी-विवाह, पलायन-विवाह इत्यादि प्रकार दिसून येतात. महाराष्ट्रातील आदिवासींमध्ये साटेलोटे पध्दतीचे विवाह किंवा विनिमय विवाह रूढ आहेत. मराठीतील मेहुणा हा शब्द बहिणीच्या नवऱ्याप्रमाणेच पत्नीच्या भावासाठीही वापरतात याचे कारण या पद्धतीत दडलेले आहे.[४] प्राचीन काळच्या या सर्व प्रकारांचे पालन प्रत्यक्ष व्यवहारात सर्वांमध्ये रूढ नसले तरी काही प्रकारांनी आधुनिक रूप धारण केले आहे असे दिसून येते. सेवाविवाहाच्या प्रकाराची उदाहरणे गावोगाव दिसतात. सर्वेक्षणाच्या अभावी त्यासाठी मोठा संख्यात्मक पुरावा देता आला नाही तरी उदाहरणे देता येतील. (१) काही कुटुंबातील वातावरण शिक्षणाला पोषक असते. एखाद्या

Maharashtra State Gazetteers

गरीब युवकाला अशा घरी आश्रय दिला जातो; त्याचे शिक्षण पूर्ण होते, त्याला नोकरी मिळते आणि कालांतराने घरातील एखाद्या उपवर मुलीचे त्याच्याशी लग्न लावून दिले जाते. (२) कधी कधी युवक ज्या कार्यालयात नोकरीला असतो आणि तो त्याच्या प्रमुख व्यवस्थापकाशी सेवावृत्तीने वागतो, या सेवेचे फलित म्हणून प्रमुख व्यवस्थापकाची मुलगी अथवा बहीण यांचेशी या युवकाचा विवाह होतो. पूर्वीच्या काळापासून रूढ असलेले हे विवाहांचे प्रकार विशिष्ट व्यवहारांना सामाजिक मान्यता देण्याच्या उद्देशाने स्वीकारले होते. ते जुने म्हणून टाकाऊ झालेले नाहीत तर त्यामागील तत्त्वे आजही लागू होण्यासाठी आहेत. त्यावरून त्या त्या काळात विवाह प्रकारांचे किती महत्त्व होत याची कल्पना येते.[५]

अंतर्विवाह आणि बहिर्विवाह गटांच्या नियमांप्रमाणेच विवाहसंबंध किती व्यक्तींशी जोडावा यावरूनही विवाहाचे काही प्रकार रूढ झाले. सर्व जातींमध्ये ते त्या त्या समाजातील पुरुष-महिलांचे प्रमाण तसेच तत्कालीन राजकीय आणि सामाजिक परिस्थितीनुरूप सोयीच्या दृष्टीने रूढ झाले. सोय पाहताना कुटुंबातील मंडळींची, विशेषतः स्त्रिया आणि मुलांची सुरक्षितता, आर्थिकदृष्ट्या काटकसर आणि एकत्रित उत्पन्नाचा फायदा, कामाची विभागणी आणि कार्यक्षमता, स्त्री-पुरुष समानता आणि व्यक्तिस्वातंत्र्य इत्यादी बाबी विचारात घेतल्या गेल्या. यादृष्टीने बहुपतित्वाची किंवा बहुपत्नीत्वाची पद्धती त्याकाळी स्वीकारलेली असावी. उत्तर भारतातील खास जमातीमध्ये आणि दक्षिणेकडील नायर समाज आणि तोडा जमातीमध्ये बहुपतित्वाची चाल रूढ होती. आज या प्रकारांमध्ये परिवर्तन झाल्याने ते पूर्वीसारखे मूळ स्वरूपात पहावयास मिळत नाहीत. महाराष्ट्रात अशा प्रकारची विवाहपद्धती पूर्वीही नव्हती व आताही नाही. बहुपत्नीत्वाची पद्धती भारतातील इतर सर्व प्रदेशांमध्ये व सर्व जाती-जमातींमध्ये रूढ होती. बहुपत्नीत्वाचा विवाह प्रकार अनेक दृष्टींनी अव्यवहार्य होत गेला. कृषिप्रधान समाजात अधिक बायका करणे सोयीचे होते. पहिल्या बायकोला मूल होत नसल्यास वंशाला दिवा राहावा म्हणून दुसरी बायको करीत. अधिक बायका असणे प्रतिष्ठेचे आणि श्रीमंतीचे लक्षण मानले जाई. परंतु श्रीमंत कुटुंबे सोडली तर इतरांना ते अवघड होते. बहुसंख्य कुटुंबांमध्ये एकपतित्व किंवा एकपत्नीत्व याच प्रकाराचा स्वीकार झालेला दिसतो. वैचारिक जागृती आणि स्त्रीच्या व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनांचा स्वीकार यामुळे विसाव्या शतकात १९४६ मध्ये द्विभार्या प्रतिबंधक कायदा लागू झाला. १९५५ सालच्या हिंदू विवाह कायद्यानुसार पतीला किंवा पत्नीला पत्नी किंवा पती जिवंत असेपर्यंत दुसरा विवाह करण्यास परवानगी नाही. तसेच पहिला विवाहसंबंध कायदेशीर कारवाई होऊन मोडला असल्याशिवाय दुसरा विवाह करणे बेकायदेशीर आहे. महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी या कायद्याबद्दल अज्ञान आहे. त्यामुळे लग्न न करता अंगवस्त्र, रखेली ठेवण्याची काही उदाहरणे आढळतात. पहिली बायको जिवंत असताना व तिला मुले असतानाही दुसरा विवाह केल्याची अनेक उदाहरणे दिसतात. संशोधनात उस्मानाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागात "सामाजिक कायद्या" बाबतचे अज्ञान आढळून आले. बालविवाह प्रतिबंध कायदा, पुनर्विवाहाचा आणि घटस्फोटाचा कायदा तसेच द्विभार्या प्रतिबंधक कायदा यांची माहिती, त्यांचे उद्देश आणि त्यांची कार्यवाही व अंमलबजावणी याबाबत उदासीनता आढळली.[६] मुसलमान कुटुंबांमध्येही गरिबीमुळे आणि **कुराण** पवित्र ग्रंथातील "सर्व पत्नींना समानतेने वागविले पाहिजे" अशा आशयाच्या कलमांच्या अटींमुळे मुसलमान पुरुष देखील एकाच वेळी एकापेक्षा अधिक बायका करीत नाहीत. महाराष्ट्रात मुसलमानांमध्ये बहुभार्यांचे प्रमाण क्वचित आढळते.

१९५४ साली मंजूर झालेला नोंदणी पद्धतीचा विवाह हाच प्रकार आता कायदेशीर आहे. मात्र या विवाह प्रकाराची बहुसंख्य कुटुंबांना माहिती नाही. तसेच व्यक्ती व समाजावरील पूर्वापार चालीरीती, धार्मिक समजूतीची बंधने यांचा अद्यापही पगडा असल्याने महाराष्ट्रातील विवाह प्रकारांचे स्वरूप बहुतांश जुनेच आहे.

शिक्षणामुळे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागृत केलेल्या स्वाभिमानी वृत्तीमुळे बौद्ध धर्म स्वीकारलेल्या महार मंडळींमध्ये परिवर्तन दिसून येते. एका संशोधनात असे आढळले की, आंतरजातीय वा आंतरधर्मीय विवाह करण्यास बहुसंख्यांची मान्यता आहे. बौद्ध धर्मातील वराला वरिष्ठ जातीतील हिंदू वधू मिळू शकते, असे अनुभव वारंवार येत आहेत.[७]

मराठवाडा विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाने केलेल्या संशोधनामध्ये असे आढळले की, मल्लाह या आर्थिकदृष्ट्या गरीब, उत्तरेकडून स्थलांतर केलेल्या व गंगेतील नावाड्यांचा व्यवसाय सोडून राजस्थान, मध्यप्रदेश मार्गे महाराष्ट्रात आलेल्या जमातीला आंतरजातीय विवाह पूर्णांशाने अमान्य आहे.

देज आणि हुंडा : अंतर्विवाह आणि बहिर्विवाह प्रकारांचे नियम आणि त्यानुसार पिढ्यान्पिढ्या प्रस्थापित झालेले विवाहसंबंध गुंतागुंतीचे आहेत. या गुंतागुंतीच्या विवाहसंबंधाबाबतच्या नियमांचे पालन करताना पालकांना काही मुला-मुलींसाठी योग्य वधूवरांची निवड करता येत नाही. अशा परिस्थितीत आर्थिक तत्त्वानुसार विवाहसंबंध जुळविणे हाही एक व्यवहार बनला. हुंडा म्हणजे मुलीच्या वडिलांनी वराला देण्याची रक्कम (वरमूल्य) आणि देज म्हणजे मुलाच्या वडिलांनी वधूला देण्याची रक्कम (वधूमूल्य). वरमूल्य किंवा वधूमूल्याच्या आर्थिक आकर्षणाने दोन कुटुंबांमध्ये

विवाहसंबंध जुळविले जातात.

हुंडा व देज यांचा अधिकृत इतिहास उपलब्ध नाही. तरी प्राचीन काळापासून रूढ असलेल्या ब्राह्म, आर्ष तसेच आसूर, क्रय इत्यादी प्रकारच्या विवाहांमधून आणि भिन्न भिन्न संस्कृती जोपासणाऱ्या टोळ्यांमध्ये रूढ असलेल्या विवाह प्रकारांमधून यांचे प्राबल्य वाढत गेलेले दिसते. मध्ययुगात राजस्थानात राजपूत टोळ्यांमध्ये प्रथम ही पद्धती सुरू झाली. आते-मामे भावंडांच्या विवाह प्रकारात एखाद्या कुटुंबात आपली मुलगी दिली तर त्या घराची एखादी मुलगी करून घ्यावी अशी परंपरा होती. त्याचे स्वरूप बदलून त्या जागी कुटुंबांमध्ये देवघेवीचे व्यवहार ठरवून लग्नसंबंध जोडावे अशा परंपरांमधून हुंड्याची चाल आली असावी. आपल्या कन्येला सुशिक्षित, आर्थिकदृष्टया संपन्न पती मिळावा अशी पालकांची प्रवृत्ती वाढू लागल्याने हुंडा पद्धतीस विशेष जोर चढला. कालांतराने वरपित्याच्या हुंडा घेण्याविषयीच्या आकांक्षा वाढल्या. आपला पिता हुंडयामुळे कर्जात बूडू नये म्हणून कन्या आत्महत्या करू लागल्या. बऱ्याच मुली अविवाहित राहू लागल्या व काही अनीतीच्या मार्गास लागल्या. या सर्व सामाजिक दुष्परिणामांवर आळा घालण्यासाठी १९६१ मध्ये हुंडा प्रतिबंधक कायदा केला. तरीही हुंड्याची प्रथा बंद झाली नाही. या उलट केवळ लग्नाच्या वेळी नव्हे तर लग्नानंतर सणांच्या निमित्याने, बारशाचे वेळी, प्रत्येक विवाह समारंभाच्या वेळी अहेराच्या रूपाने आर्थिक स्वरूपात मौल्यवान भेटवस्तू, दाग-दागिने, जमीन, घर आणि अलीकडच्या काळात स्कूटर, मोटारगाडी, परदेशची सफर, उच्च शिक्षण, धंद्यासाठी भांडवल यासाठी हुंडा मागितला जातो. हुंडा मिळाला नाही तर मुलीचा सासरी छळ केला जातो. इतकेच नव्हे तर तिला जिवानिशी मारले जाते किंवा आत्महत्या करण्याला भाग पाडले जाते. प्रभाकर मांडे यांच्या **गावगाड्याबाहेर** या ग्रंथामध्ये वधूमूल्य वा देज ही प्रथा असणाऱ्या समुहांची माहिती पुढीलप्रमाणे दिली आहे[८] :-

१) **मांग** : वधूमूल्य आणि लग्नाचा खर्च मुलाकडील लोक करतात.

२) **रायरंद कलावंतांची भटकी जात** : मुलींची लग्न १२-१३ व्या वर्षी होतात. नवरीच्या बापाला देज २०० रूपये द्यायचा हे जातपंचायतीने ठरविलेले असते. स्त्रियांना अत्यंत कनिष्ठ स्थान असते.

३) **गोपाळः** मामेबहिणीशी लग्न होते. मुलीला देज द्यावा लागतो. मुलगी दिल्याबद्दल मुलीचा बाप आठशे ते हजार रुपये मानाचे घेतो. गरीब असला तरी किमान ४८ रुपये घेतो, म्हणजे मुलाला मुलगी फुकट दिली जात नाही.

४) **कोल्हाटी** : कोल्हाटी जातीत देज देण्याची रूढी आहे. देज देण्याची प्रथा वाढतच आहे (१ ते ३ हजार रुपये).

५) **कैकाडी** : मध्यप्रदेश, महाराष्ट्र व तामीळनाडूत आढळतात. त्यांना तामीळनाडूत कुरणा, कोरवा, कोरजा, कोरम अशी नावे आहेत. मुलीचा बाप पैसे मिळाल्याशिवाय मुलीचे लग्न होऊ देत नाही.

६) **वैदू** : एकदा ठराव केल्यानंतर मुलीचे दुसरीकडे लग्न करता येत नाही. वैदूमध्ये देजची प्रथा आहे. "तुझी मुलगी आम्ही धरली" असे मुलाचा बाप मुलीकडे येऊन तीन वेळा म्हणतो, मुलीचा बाप उत्तरादाखल "तुझा मुलगा धरला" असे म्हणतो. आनंद व्यक्त करण्यासाठी तेथे हजर असणारे "जी ऽऽऽ म्" असे ओरडतात. मुलीच्या बापाला देज दिला जातो आणि पंचाला खुशालीची रक्कम दिली जाते.[९]

देज देण्याची रूढी सर्व भटक्या जमातीत आढळते. मध्यप्रदेशातून आणि गुजरातमधून आलेल्या व येथे स्थायिक झालेल्या अनेक जमाती आणि पोटजमातींमध्ये देज प्रथा पाळतात. वराकडून पैसे घेणे प्रतिष्ठेचे मानले जाते. मुलीचे सौंदर्य, तिच्या अंगचे गुण आणि गोत, कुळी यावरून देजची रक्कम ठरत असते. या व्यवहारात जातपंचायत महत्त्वाची भूमिका बजावते. जातपंचायतीच्या निर्णयाविरुद्ध कोणी जात नाही. सामाजिक एकात्मतेच्या दृष्टीने जातपंचायतींचा अडसर राहिला आहे.

विवाहाच्या वेळचे वय : विवाहसमयी वधूवराचे वय किती असावे याबाबत ऋग्वेद ग्रंथात स्पष्ट उल्लेख नसला तरी **ऋग्वेद व अथर्ववेद** यातील मंत्रांवरून वैदिककाळी वधूवर प्रौढ असत. वयात आल्यावर मुलींचा विवाह होत असे. तरुण युवकास एखादी तरुणी आवडल्यास तो तिला मागणी घाली आणि ती तरुणी स्वतःच्या इच्छेनुसार त्या मागणीस संमती वा नकार देई (ऋ. १०.८५; अथर्व. १४.१.२). लहान मुलामुलीत ही गोष्ट असंभवनीय ठरते. वैदिक काळात कन्येचा विवाह ती वयात आल्यानंतर म्हणजेच तिच्या ठिकाणी प्रजोत्पादनाची क्षमता आल्यावर होत असे. **रामायण** व **महाभारत** यातील कैकयी, सीता, दमयंती, सावित्री, कुंती, द्रौपदी, सुभद्रा इत्यादी अनेक तरुणी प्रौढपणीच विवाहबद्ध झाल्याचे दिसते. धर्मसूत्र काळातही विवाह प्रौढपणीच होत. परंतु त्यात मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा कमी करण्याची प्रवृत्ती सूचित होते. अमुकच वर्षी विवाह करावा असे निश्चित कोठेही सांगितले नसले तरी नवव्या शतकापूर्वी सामान्यतः वयाच्या १५-१६ व्या वर्षी मुलीची लग्ने होत असत असे दिसते. ऋतुप्राप्तीनंतर कन्येने तीन वर्षे आपला पिता आपले लग्न करतो किंवा काय याची वाट पहावी. त्यानंतर पित्याने लग्न न केल्यास तिने स्वतः आपला पती निवडावा. त्यात पाप नाही, असे मनूने सांगितले आहे.

पण अविवाहित रजस्वला कन्येला रजोदर्शन घडल्यास मातापिता, वडील बंधू यांना नरक प्राप्ती होते असे प्रतिपादन केल्याने (पराशर **स्मृति**) वयोमर्यादा संकुचित होऊन आठ वर्षावर आली. पुरुषांना विवाह मर्यादा स्पष्टपणे सांगितलेली नसली तरी आठव्या वर्षी उपनयन व पुढे बारा वर्षे वेदाध्ययन व ब्रह्मचर्य ही दोन्ही जमेस धरली असता पुरुषाच्या विवाहाचे वय वीसपासून पुढे होते असे दिसते. असे जरी असले तरी विवाहाचे वय कमी होण्यास मुलगी यौवनात येण्याआधी आपल्या जबाबदारीतून मुक्त होण्याची मुलीच्या पित्याची उत्सुकता, मुलगी मोठी होऊन स्वखुषीने पती निवड करण्याची शक्यता असल्याने पुरुषप्रधान कुटुंबपद्धतीत पित्याच्या इच्छेला ती प्रतिकार करण्यास समर्थ व्हावयाच्या आत तिचा विवाह करणे इत्यादी कारणांमुळे विवाह लहान वयात करण्याकडे समाजाचा कल होता.

वरील कारणांमुळे व्यवहारात रूढ झालेली ही पद्धती १९ व्या शतकापर्यंत कायम होती. लहान वयात मुलींची लग्न करण्याची पद्धती विशेष करून पांढरपेशा वर्गात, क्वचित श्रीमंत लोकांत व उच्च जातीयांत अधिक प्रचारात होती. ब्राह्मण समाजातही बालवयात विवाह होत असल्याचे दिसते. मात्र क्षत्रिय अथवा वैश्यांच्या बाबतीत रजोदर्शन होऊन गेलेल्या मुलीबरोबर विवाह करण्यास प्रतिबंध नसल्याचे संस्कार प्रकाशात (१७ वे शतक) स्पष्टपणे सांगितले आहे.[१०]

शिक्षणाबरोबर पाश्चिमात्यांच्या आचारविचारांचा सुशिक्षितांवर झालेला परिणाम, वैचारिक क्षेत्रातील स्वातंत्र्य आणि बालविवाहाविरुद्ध सुधारकांनी केलेला तीव्र लढा यामुळे मुलीची विवाह मर्यादा ८ वर्षापासून १३ वर्षापर्यंत गेली. तथापि चालू शतक सुरू होईपर्यंत मुलीच्या विवाहाचे वय ऋतुप्राप्तीपर्यंत वाढविण्याची प्रवृत्ती झाली नाही. सन १८९० मध्ये मुलीचे विवाह समयीचे वय १२ ते १३ वर्ष आणि मुलाचे २० होते. विशेष म्हणजे बालविवाह करणाऱ्यांमध्ये ब्राह्मणांप्रमाणेच अस्पृश्यही होते. १९३१ च्या जनगणनेत ब्राह्मणांपेक्षा अस्पृश्यांमध्ये मुलींच्या बालविवाहाचे प्रमाण अधिक दिसून आले. राजा राममोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्यासारख्या समाजसुधारकांनी बालविवाहविरुद्ध दंड थोपटल्याने सरकारला बालविवाहाच्या दुष्परिणामांची जाणीव झाली. त्यामुळे सरकारने विवाहाच्या वयोमर्यादेबाबत कायदे केले. यापैकी १९२९ च्या शारदा कायद्यानुसार मुलीचे वय १४ व मुलाचे वय १८ करण्यात आले. मात्र १९५५ च्या हिंदू मॅरेज ॲक्टनुसार मुलीचे वय १५ ठरविण्यात आले. तथापि हिंदू मॅरेज ॲक्ट १९५६ अन्वये मुलीचे विवाहाचे वय १८ व मुलाचे २१ ठरविण्यात आले आहे.

यापुढील काळात कुटुंबपद्धतीचे बदलते स्वरूप, स्त्रियांचा शिक्षणाकडे वाढलेला कल, आर्थिक स्वातंत्र्य, स्त्री-पुरुष समानता यामुळे विवाह उशिरा करण्याकडे कल दिसतो. महाराष्ट्रातील सुशिक्षित समाजात मुलींची लग्ने अठरा वर्षापूर्वी लावण्यात येत नाहीत. मात्र अद्यापही अशिक्षित, गरीब व कनिष्ठ जातींमध्ये मुलींचे विवाह लवकर लावण्यात येतात.

घटस्फोट : विवाह हा पवित्र संस्कार मानून हिंदूंनी वरिष्ठ व कित्येक कनिष्ठ जातीय स्त्रियांवर "पती हाच परमेश्वर" मानून मरेपर्यंत त्याच पतीबरोबर संसार करण्याचे बंधन घातलेले होते. विवाहाचे बंधन इतके कडक होते की, नवरा व्यसनी व क्रूर असला तरी त्याच्याबरोबर संसार करावा लागे. असे असले तरी काही विशेष बाबतीत विवाहाचे बंधन तोडण्याची तरतूद होती. **पराशर स्मृति** मध्ये पती संतती निर्मितीस असमर्थ असेल, सोडून गेला असेल, मारला गेला अथवा मृत्यू पावला असेल, संन्यासी झाला अथवा त्याचे अधःपतन झाले असेल तर झालेला विवाह मोडण्याचा अधिकार पत्नीस राहील, अशी तरतूद केली होती. कौटिल्यानेही पतिपत्नींमध्ये वैमनस्य असेल अथवा शत्रुत्व निर्माण झाले असेल तर विवाहसंबंध मोडण्यास व विवाहापासून मुक्ती मिळविण्याची तरतूद ठेवली होती. मात्र त्यानंतर स्मृतिकाळ व पुढील काळात विवाह विघटनाची सवलत काढून घेण्यात आली व विधवाविवाहास पूर्णपणे बंदी घालण्यात आली. मध्ययुगीन काळात मुलींचे विवाह लहानपणीच होऊ लागले आणि पती लहानपणीच मृत्यू पावला असेल तरीही त्या विधवेला पुन्हा विवाह करण्याची मुभा ठेवली नाही. ब्रिटिश काळ आणि स्वातंत्र्यानंतरच्या काळात पाश्चात्य विचारांच्या प्रभावामुळे, विवाहविषयक दृष्टिकोन बदलला. विवाहविच्छेदनासाठी कायद्याने संमती दिली.

सन १९५५ च्या विवाहविषयक अधिनियमाच्या तेराव्या कलमानुसार पतिपत्नीपैकी कोणीही न्यायालयात याचिका दाखल करून विवाहविच्छेद करू शकतो. हा कायदा हिंदू स्त्री-पुरुषांना लागू असल्यामुळे धर्मांतर, व्यभिचार, मनोविकृती, नपुंसकत्व, वांझपणा, दूर्धर व्याधी असेल, पती अथवा पत्नी सात वर्षापासून जिवंत असण्याची बातमी आप्तेष्टांना नसेल तर यासारख्या बाबींसाठी घटस्फोट मिळू शकतो. वैवाहिक अधिकारांच्या पुनःस्थापनेच्या न्यायालयीन आदेशानुसार नंतरही दुसऱ्या पक्षाने दोन वर्षानंतर न्यायालयीन आदेशांचे पालन केले नसेल तर विवाहविच्छेद घेता येतो. हा अधिनियम लागू होण्यापूर्वी पतीने दुसरा विवाह केला असेल, प्रतिज्ञापत्र सादर करतेवेळी त्याची पहिली पत्नी जिवंत असेल, तसेच पतीच्या लैंगिक विकृतीमुळेही पत्नी विवाहविच्छेद घेऊ शकते. विवाहविच्छेदनासाठी अर्ज केल्यानंतरही दोन्ही बाजूंना काही निर्बंध पाळावे लागतात. चौदाच्या कलमानुसार विवाहानंतर तीन वर्षापर्यन्त कोणत्याही पक्षास याचिका दाखल करता येत नाही, आणि पंधराव्या कलमानुसार न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतरही फेरयाचिका दाखल करण्यास्तव एक वर्षापर्यन्त पुनर्विवाह करता येत नाही. या कायद्यामुळे ज्या जोडप्यांना वैवाहिक आयुष्य एकत्रित जगणे कठिण अथवा अशक्य झाले आहे त्यांना विभक्त होण्यास

खूप मदत झाली आहे. मात्र या कायद्याच्या अटी व विलंबामुळे घटस्फोट मिळणे तितकेसे सोपे नसल्यामुळे बऱ्याच कुटुंबांमध्ये या कायदेशीर तरतुदीचा फायदा घेतला जात नाही. पुष्कळशी प्रकरणे कोर्टात पडून आहेत. काही प्रकरणांमध्ये न्यायालयीन निकाल लागण्याआधीच दुसरे लग्न करून घेतले जाते अथवा तडजोड करून आपसात प्रकरण मिटविली जातात.

भारतभर गाजलेल्या शहाबानो प्रकरणानंतर मुसलमान स्त्रियांच्या बाबतीत १९८६ साली वेंग्द्र सरकारने केलेल्या कायद्यातील बदलामुळे मुस्लीम स्त्रियांचे फार हाल झाले आहेत. लग्न मशिदीत लागते. लग्न लागल्याचे रजिस्टर मशिदीत असते. त्याची सरकारी दरबारी नोंद नसते. मुस्लीम स्त्रीला पोटगी मागण्याचा अधिकार मिळाला असला तरी लग्न झाल्याचा उतारा मशिदीतून मिळाल्याशिवाय पुढे प्रकरण सरकत नाही. महिला सल्ला वेंग्द्रे तलाकपिडित स्त्रियांना नव्या कायद्याने उद्‌भवलेल्या परिस्थितीमुळे त्यांना न्यायालयात जाण्याऐवजी आपसात वाद मिटवून रूढीच्या मार्गाने नाईलाजास्तव "तलाक मिळवा" असा सल्ला देतात व लग्नासाठी केलेला खर्च मिळवून देण्याचा प्रयत्न करतात.[११]

पुनर्विवाह : पहिल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर किंवा घटस्फोटानंतर पुन्हा विवाह करणे म्हणजे पुनर्विवाह होय. काही जाती-जमातींमध्ये त्यास पाट लावणे किंवा मोहतूर असे म्हणतात. मुसलमानांमध्ये "मेहर" मधील रक्कम पूर्णपणे वधूला परत केल्यावरच पुरुषाला तलाक मिळतो. त्यानंतर काही काळ थांबून तिला पुनर्विवाह करता येतो.

स्मृतिकाळात विधवा विवाहास बंदी घालण्यात आली तेव्हापासून १८५६ साली ब्रिटिश सरकारने पुनर्विवाहाचा कायदा लागू करेपर्यन्त विधवा स्त्रियांची स्थिती फार दयनीय होती. उच्च जातींमध्ये पुनर्विवाह प्रथा नव्हती, परंतु ब्राह्मणेतर जातींमध्ये फार पूर्वीपासून पुनर्विवाह प्रथा आहे. काही जातीत विधवेने विधुराशीच लग्न करावे असे आहे. ब्राह्मणांमध्ये विधवेला व तिच्या मुलांना अस्पृश्यासारखेच वागवले जाई.

प्राचीन काळापासून पहिल्या लग्नाला विवाह, लग्न, मंगल, कल्याण, मदुबे असे शब्द आढळतात तर दुसऱ्या लग्नाला पाट, मोहतूर, सगाई, नांतरा, उडिके, माडू असे शब्द आहेत. प्राचीन काळी उत्तरेत "कुले कन्या प्रदान" असे, त्यामुळे एकदा मोठ्या भावाशी लग्न झाले व तो मृत पावल्यास विधवेला क्रमप्राप्त दीर मिळतच असे व म्हणून तेथे विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न येत नसावा. महाराष्ट्रात मात्र (नागपूर, भंडारा सोडल्यास) विधवेने दीराशीच काय पण नवऱ्याच्या कुळातील इतर कोणाशीही पाट लावता कामा नये इतका कडक नियम होता.

बऱ्याचशा भटक्या जमातींमध्ये घटस्फोटित महिलेचे पुन्हा लग्न होत नाही, परंतु विधवेचा मथुर (मोहतूर-कुडगाढ) लावला जातो. मल्लाह जमातीत पुरुषाला तीन वेळा लग्न करता येते, त्यामुळे पुरुषच घटस्फोट घेण्यात पुढाकार घेतो आणि एखाद्या विधवेशीही मोहतूर लावतो. मुलीकडच्यांनी घटस्फोट मागितल्यास मानहानीस्तव त्यांना "गाढवे" देण्याची शिक्षा दिली जाते. या उलट रायरंद या जमातीत फारकत घेतलेली स्त्री किंवा विधवा स्त्री पुन्हा लग्न करू शकते. अशा लग्नाला "मोहतूर" किंवा "गंधर्व" म्हणतात. गंधर्वाचा कार्यक्रम फार छोटा असतो. संध्याकाळी दोघांना पाटावर बसवून त्यांच्या उत्तरीयाची (उपरण्याची) गाठ मारण्यात येते व फुले वाहतात, दोघे परस्परांना माळ घालतात. नवरीच्या बापाने नवरदेवाला पोशाख आणि आलेल्यांना जेवण द्यावयाचे असते. "कुंकाच बोट मोडून शेणाच लावल" असे या स्त्रीविषयी म्हटले जाते.[१२]

पुनर्विवाह हा समाजमान्य विवाहसंबंधाचा प्रकार असून त्यामुळे स्त्रीला नैसर्गिकदृष्टया आणि कायद्याने मातृत्व, पत्नीत्व आणि वैवाहिक स्त्रीचा दर्जा मिळतो. समाजात विधवेकडे बघण्याचा दृष्टिकोन विकृत असतो. महाराष्ट्रात विधवाविवाह व स्त्री शिक्षणासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यासारख्या समाजसुधारकांच्या प्रयत्नांमुळे बऱ्याच स्त्रियांचे पुनर्विवाह होऊन संसार उभे राहिले.

विवाहाशी संबंधित सांस्कृतिक चालीरीती : विविधता असूनही जवळपास प्रत्येक जातीत, जमातीत आणि कुटुंबात काही चालीरीती समान असतात व त्या प्राचीन काळापासून आजतागायत चालू आहेत. वधूवरांना हळद लावणे व कुळाचे देव-देवक बसविणे याव्यतिरिक्त कन्यादान, विवाह होम, पाणिग्रहण, लाजा होम, इत्यादी विधी करतात. सप्तपदीशिवाय विवाहसंस्कार पूर्ण होत नाही. विवाह वेदीभोवती पती-पत्नी उत्तरेकडून पूर्वेकडे अशी सात पावले ती अनुक्रमे आयुष्यमानाकरिता जीवनसामर्थ्याकरिता, संपत्तीकरिता, सुखप्राप्तीकरिता, संततीकरिता, वैवाहिक आयुष्याकरिता आणि पत्नीचा स्वीकार करण्याकरिता चालतात. भटजी विवाहविधी पार पाडतो. मंगलाष्टके म्हणून आणि अक्षता टाकून मंगलवाद्य व टाळ्यांच्या गजरात विवाह संपन्न होतो. वधूवर एकमेकांना फुलांच्या वरमाला घालतात.

पाश्चात्यीकरणाचा विवाहसंबंधावरील परिणाम : ब्रिटिश अमदानीत पाश्चात्यीकरणाला सुरुवात झाली. व्यक्तिस्वातंत्र्य, बुद्धिप्रामाण्यवाद, वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशास्त्रीय विश्लेषण, समता आणि सामाजिक न्याय इत्यादी विचारांचा प्रभाव येथील सुशिक्षित आणि प्रशासनाशी संबंध आलेल्या अभिजनांवर पडला. पतीच्या मृत्यूनंतर सती जाण्याची अन्यायकारक रूढी बंद करण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले आणि सतीबंदीचा कायदा १८२९ मध्ये झाला.

त्यानंतर बालविवाहाच्या रूढीमुळे होणाऱ्या दुष्परिणामांपासून मुलींना व विधवांना मुक्त करण्याची चळवळ उभी राहिली. यातूनच १८५६ चा पुनर्विवाहाचा कायदा पास झाला. धोंडो केशव कर्वे यांच्या हिंगणे येथील संस्थेने विधवांना शिक्षण देऊन स्वावलंबी करण्याचा व त्यांना पुन्हा वैवाहिक जीवन जगता यावे म्हणून पुनर्विवाह मंडळ स्थापण्याचा उपक्रम सुरू केला. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या समाजकार्यामुळे जाती-जमातींमध्ये असलेल्या भेदाभेदांची आणि सामाजिक अन्यायाची जाणीव निर्माण झाली. जातिनिर्मुलन व अस्पृश्यतेचे उच्चाटन करायचे असेल तर अंतर्विवाही नियमांचे बंधन झुगारून आंतरजातीय विवाहांना सुरुवात झाली पाहिजे हा विचार पुढे आला.

विवाहाच्या वेळचे वय, संमतीवयाचा कायदा व त्यासाठी जागृती करणाऱ्या समाजसुधारकांच्या कार्याचा येथे आढावा घेणे आवश्यक आहे.

व्यवहारात ज्याचा फारच थोडा उपयोग झाला परंतु चर्चेने जो सर्वात गाजला तो म्हणजे संमतीवयाचा कायदा. सन १८६० च्या इंडियन पीनल कोडमधील ३७५ व्या कलमानुसार जबरी संभोग हा गुन्हा असून त्यास काळ्या पाण्याच्या शिक्षेची तरतूद होती. कलम ३७५(५) नुसार पतीने दहा वर्षाहून लहान असलेल्या पत्नीशी तिच्या संमतीने शरीरसंभोग केला तरी तो गुन्हा समजला जाई. दहा वर्षाची पत्नी शरीरसंभोगासाठी संमती देण्याइतकी सुजाण मानली जात नाही हा मुख्य मुद्दा होता. हा मुद्दा आतापावेतोच्या हिंदू अथवा मुसलमानी कायद्यांमध्ये तसेच इंग्लंडच्या कायद्यातही नव्हता. असे असताना तो ब्रिटिश सरकारच्या नवीन पीनल कोडमध्ये आला, याचे कारण १८४६ साली नेमलेल्या लॉ कमिशनने विवाहबाह्य संबंधाबरोबरच विवाहित पत्नीचे बाबतीतही दहा वर्षाची मर्यादा घातली. या कायद्यातील कलम कायम असूनही १८९० पर्यन्त त्याची अंमलबजावणी झाली नाही. मात्र १८९० साली बंगाल प्रांतात "फुलमणी खटला" गाजला त्यानिमित्ताने "संमतीवयाच्या" प्रश्नावर विचारमंथन सुरू झाले. हरिमोहन या तीस वर्षाच्या पतीने फुलमणी नावाच्या अल्पवयीन पत्नीवर केलेल्या शरीरसंभोगामुळे ती मृत्यू पावली. त्याला वरिष्ठ कोर्टातून फक्त एक वर्षाची सक्तमजुरीची शिक्षा झाली, कारण प्रत्यक्ष खटल्याच्या वेळी मुलीचे वय दहापेक्षा जास्त होते व त्यामुळे ३७५ कलम लागू पडू शकले नाही. या खटल्याच्या निमित्ताने ३७५ कलमात घातलेली मर्यादाही वाढवली पाहिजे असे सरकारला वाटू लागले. १८९१ साली संमतीवयाचा कायदा पास होऊन वयाची मर्यादा १० वरून १२ वर्षे करण्यात आली. या कायद्यावर झालेल्या उलटसुलट प्रतिक्रियांमधून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर प्रकाश पडतो. घरातील खाजगी व्यवहारात पोलिसांची ढवळाढवळ होईल व या कायद्याचा प्रत्यक्षात फारसा उपयोग होणार नाही अशी टीका या अधिनियमावर करण्यात आली. सध्याचा फौजदारी कायदा पुरेसा आहे आणि धर्मशास्त्रानुसार ऋतुप्राप्तीपूर्वीच लग्न झाले पाहिजे असेही प्रतिपादन करण्यात आले. काही डॉक्टर मंडळींनी विविध देशातील हवामान, वंशभेद, चालीरीती इत्यादींचा अभ्यास करून इंग्लंडमध्ये ऋतूप्राप्तीचे वय १४ वर्षाचे असले तरी भारतात ते १२ वर्षे आहे अशी भूमिका मांडली. यानंतर संमतीवयाचे बाबतीत १९१९ नंतर कायदे कौन्सिलांमार्फत सरकारने लक्ष घातले.

महाराष्ट्रात चिपळूणकरांची **निबंधमाला, केसरी व मराठा** यासारखी वर्तमानपत्रे, न्या. रानडे, न्या. तेलंग यांची भाषणे, सामाजिक परिषदेची अधिवेशने, काँग्रेसची संघटनात्मक पावले, डॉ. भांडारकर, बहिरामजी मलबारी, वि.ना. मंडलिक, गो.ग. आगरकर, सी.ग. देवधर इत्यादींच्या प्रयत्नांमधून उलटसुलट विचारांचे लोण पसरत होते. ही चळवळ बंगालइतकीच महाराष्ट्रातही चालू राहिली. वास्तविक संमतीवय वाढविण्याचा विचार पटणे हे अवघड नव्हते. परंतु पवित्र लग्नसंस्काराच्या पगड्यामुळे प्रत्यक्ष कायदा अमलात आणणे कठीण होते. ज्याचेबरोबर जन्मभर संसार करायचा त्या नवऱ्याविरुद्धच तक्रार करून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला तोंड देणे महिलांना अवघड वाटत होते. प्रथम राजकीय सुधारणा वा सामाजिक सुधारणा हा वाद देखील निर्माण झाला. मात्र या सर्व घटनांमधून विचारमंथन सुरू झाले.

सन १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा ही मोठी क्रांतिकारक बाब घडली. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी बंगालमध्ये पुनर्विवाह घडवून आणून ते मोठ्या थाटामाटात करायचे प्रयत्न केले. त्यांनी अपले पूर्ण जीवन याच कार्यात खर्ची घातले. महाराष्ट्रात १८४०-१८४२ साली विष्णुशास्त्री बापट आणि लोकहितवादी यांनी पुनर्विवाहाबाबत अनुकूल लिहिले होते. बाळशास्त्री जांभेकर यांनी या विषयावर पुस्तक लिहिले. विष्णु परशराम पंडित शास्त्री यांनी पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या पुस्तकाचे भाषांतर करून या प्रश्नावर जागृती केली. त्यांनीही महाराष्ट्रात पुनर्विवाह घडवून आणले, पुनर्विवाहोत्तेजक मंडळी ही संस्था काढून गावोगावी प्रसार करणे, पुनर्विवाह आयोजित करणे, वधूवरांना आर्थिक मदत देणे इत्यादी कार्य केले. यातून घडलेल्या परांजपे-करमरकर या जोडप्याच्या गाजलेल्या पुनर्विवाहापासून प्रेरित होऊन धोंडो केशव कर्वे यांनी १८६९ पासून वयाच्या अवघ्या अकरा वर्षापासून या कार्याला वाहून घेतले. १८९३ मध्ये त्यांनी स्वतः पुनर्विवाह केला व १८१४ मध्ये विधवाविवाह प्रतिबंध निवारक सभा सुरू केली. पुनर्विवाहितांना कायद्याच्या अडचणीपेक्षा अन्य सामाजिक अडचणी येत असत, त्यासाठी त्यांनी पुनर्विवाहितांची संमेलने भरवली. तरी देखील १८६९ ते १८८९ पर्यन्तच्या वीस वर्षांमध्ये महाराष्ट्रात काही मोजकेच पुनर्विवाह झाले. पुनर्विवाहाच्या कायद्याचा फायदा घेण्यासाठी शंभर वर्षाहून अधिक काळ लागला.[१३]

कुटुंब

महाराष्ट्रात पूर्वीपासून पितृप्रधान संयुक्त कुटुंबपद्धती आहे. येथे वारसाहक्काचा नियम रूढ होता. तो मिताक्षर पद्धतीनुसार होता. या नियमानुसार मालमत्ता पितृप्रधान कुटुंबातील प्रमुख पुरुषाकडून त्याच्या पुरुष वारसदारांकडे हस्तांतरित केली जाते. एका पुरुषाला जितके मुलगे असतील त्यांच्यामध्ये मालमत्ता वाटली जाई. वडिलांच्या हयातीत कुटुंबाची मालमत्ता एकत्र असे. कौटुंबिक स्थावर मालमत्ता कागदोपत्री वेगवेगळ्या भावांच्या नावावर राही व त्याचा उपभोग बहुतकरून प्रत्यक्ष मालमत्ता सांभाळणारा घेई. जंगम मालमत्तेवर मात्र प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार असे. एकाच कुटुंबातील आजोबा, पिता, मुलगे व नातवंडे सर्वजण कौटुंबिक स्थावर मालमत्तेचे हिश्यानुसार वारसदार असत. मिताक्षर पद्धतीनुसार मुलगा नसल्यास मुलीच्या मुलाला दत्तक घेण्याचा सर्वसाधारण नियम आहे. तसा दत्तक कोणालाही घेता येई, परंतु मुलीच्या मुलालाच प्राधान्य मिळे.

विधवा आणि कुमारिकांनाही जीवनवेतन मिळण्याची तरतूद होती. उत्तरेकडील वारसाहक्काच्या दायाभाग पद्धतीमध्ये या तरतुदी नव्हत्या. महाराष्ट्रात मात्र वारसाहक्कासाठी स्त्रियांचा विचार केलेला दिसतो.

स्वातंत्र्यानंतर हिंदू कोड बिलामध्ये वारसाहक्क नियमांमध्ये बदल सुचविण्यात आले. त्यानुसार स्वतः मिळविलेल्या मालमत्तेचा विनियोग पुरुषाला त्याच्या इच्छेनुसार करता येतो. परंतु वडिलोपार्जित मालमत्तेबाबत तसे करता येत नाही. नवीन हिंदू कोड बिलाप्रमाणे मालमत्तेच्या वाटणीमध्ये भावांबरोबरच विधवाआई व विधवा वहिनी, बहिणी आणि मुली यांचाही समान अधिकार असतो. या कायद्यानुसार बहिणीस व मुलीस वारसाहक्क प्राप्त झाल्याने कुटुंबांमध्ये भांडणे होण्याची आणि कुटुंबे मोडण्याची शक्यता अधिक असल्याची भिती व्यक्त केली होती. मात्र सर्व भारतभर हिंदू कोड बिल लागू झाल्याने प्रादेशिक वारसाहक्कांची पूर्वीची परंपरा मोडीत निघाली.

मुलींना मालमत्ता देण्यासाठी हक्कदार समजावे ही कायदेशीर तरतूद असली तरी प्रत्यक्षामध्ये अजूनही मालमत्तेच्या संदर्भातही मुलांनाच महत्त्व आहे. मालमत्ता वडिलांकडून मुलांकडे जावी असा पूर्वीपासून आजपावेतो प्रयत्न होत राहिला. मुलाकडेच मालमत्ता राहिल्यास कुटुंबाला आर्थिक सुरक्षितता मिळते व वृद्धापकाली मुलाचाच आधार मिळतो हे गृहीत धरले जाते. मुलाला कुटुंबामध्ये दिलेले महत्त्वाचे स्थान लक्षात घेता मुलीचा दर्जा मालमत्तेच्या हक्काच्या बाबतीत गौण मानला जातो. बहुतांश मुली वडिलांच्या मालमत्तेवरील हक्क सोडून देत असल्याचे दिसते.

महाराष्ट्रीय कुटुंबाचे बदलते स्वरूप : एकत्र कुटुंब पद्धतीचे विघटन होत असल्याने कुटुंबसंस्था अस्थिर होत आहे. वृद्ध, अपंग, बेकार, विधवा आणि दुर्बल नातेवाईकांना पूर्वीप्रमाणे कुटुंबात आसरा मिळत नाही. भावी कुटुंबाचे स्वरूप कसे असेल हे जाणण्याचे प्रयत्न समाजशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते करीत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर कुटुंबसंस्थेचा विचार करणारी इंटरनॅशनल युनियन ऑफ फॅमिली ऑर्गनायझेशन ही एक संस्था असून दिल्लीत १९७८ मध्ये भरलेल्या तिच्या परिषदेत "मानवी कल्याणासाठी कुटुंब पद्धती दृढ करून त्या आधारावरच आर्थिक योजना आखल्या पाहिजेत." असे विचार मांडले गेले.[१४] कुटुंबसंस्था विश्वस्वरूपी आहे, कुटुंबसंस्था पूर्वीपासून अस्तित्वात असून माणसाची नैसर्गिक गरज आहे. प्रजोत्पादन, बालसंगोपन, शारीरिक व मानसिक समाधान आणि भावनिक, आर्थिक आणि जिव्हाळ्याचा आधार देणारी संस्था म्हणजे कुटुंब होय. व्यक्तीचा सर्वांगीण विकास कुटुंबातच होतो. कुटुंबाचे बदलते स्वरूप या संकल्पनेला साहजिकच मर्यादा आहे. कुटुंब हे राहणारच आणि वर उल्लेखिलेली महत्त्वाची कार्ये कुटुंबात होत राहणार. त्यामुळे जरी कुटुंबाचे स्वरूप बदलून आकार लहान अथवा मोठा झाला, सभासदांच्या श्रमविभागणीत बदल झाले, नातेसंबंध शिथिल किंवा परिदृढ झाले, कुटुंबातील व्यक्तींची दिनचर्या बदलली, कुटुंबातील कार्ये पार पाडण्यासाठी बाहेरील संस्थांची मदत घ्यावी लागली, तरी कोणीही कुटुंब मोडणार नाही. कुटुंबापासून बाहेर राहणाऱ्या व्यक्ती कुटुंबविघटनाच्या बळी म्हणून समस्याग्रस्त आणि विपथगामी असतील. मात्र सर्वसामान्यतः आबालवृद्ध स्त्री-पुरुष विवाहाच्या आणि रक्ताच्या नात्यांनी एकमेकांशी बांधलेले असल्याने ते भविष्यातही कुटुंबामध्येच राहतील. आजच्या महाराष्ट्रात एकत्र, विभक्त व एक व्यक्ती असलेली कुटुंबे दिसून येतात.

औद्योगीकरण आणि कौटुंबिक परिवर्तन : पहिल्या महायुद्धानंतर औद्योगीकरणाला गती आली. मागील शतकाच्या उत्तरार्धात, मुंबई, सोलापूर, नागपूर तसेच काही शहरांमध्ये कापडाच्या गिरण्या व अन्य उद्योग सुरू झाल्याने तेथे शहरी संस्कृती निर्माण होऊ लागली होती. रेल्वे, रस्ते आणि व्यापार यामुळे शहरी संस्कृतीत विविधता आली. मुंबई शहरात तर देशातील सर्वच कोपऱ्यातून कामधंद्याच्या निमित्ताने लोक येत राहिले. मुंबईस येणारे कामगार व घरगडी प्रामुख्याने कोकण व पश्चिम महाराष्ट्र या प्रदेशातून आले. काही आदिवासी कुटुंबेही (भिल्ल, महादेव कोळी) आलीत.

इतर राज्यांमधूनही कुटुंबे येत आहेत. सोलापूर, नागपूर या शहरांमध्ये देखील जवळच्या ग्रामीण भागामधून कारखान्यांमध्ये व गिरण्यांमध्ये कामासाठी तरुण येत राहिले. औद्योगीकरणाचा पसारा मुंबई व पुणे परिसरात वाढल्याने तेथे हजारो कुटुंबे आलीत व उपनगरांमध्ये जागा मिळेल तेथे कच्ची, पक्की घरे, पाले आणि झोपड्या बांधून राहिली. औद्योगीकरणामुळे महानगरांमधील कुटुंबाची संख्या भरमसाट वाढली, परंतु तेवढी घरे वाढली नाहीत. एकेका घरात १० ते १५ जणांना राहावे लागते तर कित्येक कुटुंबे बेघर आहेत. त्यातूनच गलिच्छ वस्त्या वाढल्या. अशा गलिच्छ वस्त्यांमधून बालसंगोपनाकडे दुर्लक्ष, रोगराईचा प्रादुर्भाव, अनैतिकता व गुन्हेगारीमुळे शहरातील कौटुंबिक जीवन असुरक्षित झाले आहे. आई-वडिलांना नोकरीसाठी बराच वेळ घराबाहेर राहावे लागत असल्यामुळे बालसंगोपन योग्यप्रकारे होऊ शकत नाही. शाळा अपुऱ्या आहेत, शाळेतील शिक्षकांची संख्या आणि साधनसामग्री अपुरी आहे. बहुसंख्य शाळा शैक्षणिकदृष्ट्या चांगल्या स्थितीत नाहीत. मुंबई शहरातील औद्योगीकरण येथील कौटुंबिक जीवनाचा दर्जा सुधारण्यात अपयशी ठरले. त्यामुळे १९७० नंतरच्या काळात नाशिक, पुणे, औरंगाबाद, जालना, नांदेड, कोल्हापूर, अकोला, जळगाव, अमरावती इत्यादी शहरांमधून औद्योगीकरण वाढविण्यात आले. त्यामुळे त्या शहरांच्या आसपासच्या ग्रामीण भागांतून शेकडो कुटुंबे तेथे आली. नागरीकरणामुळे निवासव्यवस्था, सार्वजनिक आरोग्य व निरामय जीवनास मोठी बाधा आलेली आहे. शहरांमध्ये बकालपणा वाढला आहे. गुन्हेगारीचे प्रमाणही वाढत आहे. ग्रामीण भागात काही संयुक्त कुटुंबे आजही टिकून आहेत, परंतु नव्या पिढीबाबत फार आग्रहाची भूमिका वडिलधारी मंडळी घेऊ शकत नसल्याचे जाणवते.

नातेव्यवस्था

इतर सामाजिक संस्थांप्रमाणेच महाराष्ट्रातील नातेव्यवस्थेतही उत्तर-दक्षिण नाते परिभाषेचा संगम आहे. नावांमध्ये मराठी भाषेमुळे जो काही फरक दिसत असेल तो सोडला, तर महाराष्ट्राची म्हणून वेगळी अशी नातेव्यवस्था आहे असे म्हणता येणार नाही. उत्तरेकडील नातेसंस्थेचेच अनुकरण प्रामुख्याने दिसते. काही नावे संस्कृत भाषेतून उचललेली आहेत तर काही दक्षिणेकडील नावांवरून घेतलेली आहेत.

उत्तर महाराष्ट्रात मोठा दीर, धाकटा दीर यांच्यामध्ये आणि मोठी मेहुणी, धाकटी मेहुणी यांच्यातही फरक मानला जातो. उत्तर महाराष्ट्रात आजही दियेरबटूंची चाल आहे. ती उत्तरेकडील संस्कृतीचा प्रभाव आहे. मात्र मध्य महाराष्ट्रात कर्नाटकी रिवाजाप्रमाणे मामा-भाचीचे लग्न होते. नातेवाचक शब्दसंग्रह बहुतेक संस्कृतोद्भव आहे आणि काही शब्दसंग्रहात कन्नड भाषेचा अंश आहे. शब्दसंग्रहाची पीठिका साटेलोटे व आतेमामे भावंडांचे लग्न अशी आहे. प्रत्यक्षात आतेच्या मुलीशी लग्न होत नाही. महाराष्ट्रात पितृप्रधान पद्धती असून पितृ, पुत्र, पोत्र अशी वंशपरंपरेने संपत्ती बापाकडून मुलाकडे जाते.

कुटुंबामध्ये रक्तसंबंधाने कोण कोण व्यक्ती एकमेकांशी संबंधित असतात ते नातेसंस्था सांगते. उदा. आई, वडील, मुलगा, मुलगी, आजी, आजोबा, काका, मावशी , आत्या हे रक्ताचे नातेवाईक आहेत. पाश्चात्य देशांमधील कुटुंबे सुटसुटीत असून त्यामध्ये फक्त मुले व बहीण, भाऊ एवढेच नातेवाईक एकत्र राहताना दिसतात. मुलांची लग्ने झाल्यानंतर ती आई-वडिलांकडे राहात नाहीत. ते आपापली बिऱ्हाडे करून राहतात. त्यामुळे पाश्चात्य कुटुंबपद्धतीमध्ये नाती व नातेवाचक शब्द कमी आढळतात. बाई लग्नानंतर पुरुषाचे आडनाव लावते, मुले बापाचे आडनाव लावतात. लग्नाने जडलेल्या नात्यांचे शब्द मूळच्या आई, बाप, भाऊ वगैरे शब्दांपासून पुढे "इन लॉ" (कायद्याने) असा प्रत्यय लावतात. उदाहरणार्थ सून (डॉटर-इन-लॉ), जावई (सन-इन-लॉ), सासरा (फादर-इन-लॉ), भावाची बायको, नवऱ्याच्या भावाची बायको, बायकोची बहीण व नवऱ्याची बहीण (सिस्टर-इन-लॉ), बहिणीचा नवरा, बायकोचा भाऊ व नवऱ्याचा भाऊ (ब्रदर-इन-लॉ). पाश्चात्यांमध्ये नात्यांपेक्षा नातेवाचक शब्द कमी असून नात्यांच्या माणसांचे गट केलेले असतात व एकेका गटाला मिळून एक शब्द असतो. हे गट करण्याच्या पद्धती निरनिराळ्या समाजात भिन्न भिन्न असतात. निरनिराळ्या पिढ्यांप्रमाणे गट पडतात. पितरांची पिढी, स्त्री नातेवाईक व पुरुष नातेवाईक यातही काही भाषांमध्ये वेगळी नावे असतात, तर आँट, कझीन, नीस, नेफ्यू असे काही शब्द लांबच्या अनेक नातेवाईकासाठी वापरतात.

नातेवाचक शब्दांशिवाय कित्येक शब्द मराठी भाषेत टोपणनावे म्हणून रूढ होतात. महाराष्ट्रात अशी नावे आदरास पात्र ठरलेल्या अशा व्यक्तींना वापरली जातात. दादा, नाना, अण्णा, तात्या याशिवाय नावाला राव, रावजी, साहेब यासारखी उपपदे जोडून काकासाहेब, आबासाहेब, आप्पासाहेब, बाबूराव, बापूसाहेब, अशी नावे लोकप्रिय झाली आहेत. या व्यतिरिक्त कुटुंबातील मानाच्या नातेवाईकांनाही यापैकी काही नावे वापरतात. उदाहरणार्थ : बापू म्हणडे वडील, अण्णा म्हणजे (कन्नड, तामीळमध्ये) मोठा भाऊ, नाना म्हणजे आईचे वडील, बाबूजी (बंगाली भाषेत वडील), बाळ

(लहानगा भाऊ, मूल), दाजी (नवऱ्याचा मोठा भाऊ), भाऊजी (धाकटा दीर), अक्का (मोठी बहीण तामीळमध्ये), माई (संस्कृत भाषेतील आईसाठी), माय (ग्रामीण भाषेत आईसाठी), ताई (संस्कृत ताता-ताय मोठ्या बहिणीसाठी), बेबी (इंग्रजी भाषेतून लहान मुलीसाठी), सोयरा (श्वसूर-संस्कृत भाषेत सासऱ्यासाठी) अशा विविध नात्यांसाठी विविध भाषांमधून आणि प्रदेशांमधून नातेवाचक नावे मराठीत आलेली आहेत. याशिवाय मराठी भाषेतून रूढ झालेली नावे आहेतच. मावशीला खेड्यात मावळण (मामीलाही) म्हणतात. मावशीच्या नवऱ्यास मावसोबा व आत्याच्या नवऱ्यास आतोबा असेही म्हणतात.

कोणत्या व्यक्तींचे लग्नसंबंध जुळू शकतात, कोणते नातेवाईक लग्नसंबंध न जुळण्याइतके दूरचे आहेत हे नातेसंस्था सांगते. कुटुंबाची व कुटुंबातील व्यक्तींची मालमत्ता त्यांच्या मृत्यूनंतर कोणाला मिळू शकते हे नातेसंस्था सांगते. त्याचप्रमाणे लग्नविधी, अंत्यविधी आणि अन्य महत्त्वाचे कौटुंबिक समारंभ पार पाडताना कोणत्या नातेवाईकांचा अधिकार असतो हेही नातेव्यवथेमुळे स्पष्ट होते. महाराष्ट्रातील कुटुंबसंस्थेत फारसे मूलभूत परिवर्तन झाले नाही. तसेच नातेव्यवस्था बऱ्याच अंशी होती तशीच टिकून राहिली.

महाराष्ट्राचा संबंध गुजरात (गुजराथी भाषा), आंध्र प्रदेश (तेलगु भाषा) आणि कर्नाटक (कन्नड भाषा) या तीन प्रदेशांशी अधिक जवळचा येत असल्याने तेथील भाषांतील नातेवाचक शब्दांचा मराठीवर प्रभाव पडलेला दिसतो. इरावती कर्वे यांच्या **किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया** या पुस्तकात विविध प्रदेशांतील विविध भाषांतील नातेवाचक शब्दांची यादी दिली आहे. त्यावरून संपूर्ण देशातील नातेवाचक शब्दांची कल्पना येते.

सर्व नाती स्वतः (self) व्यक्ती "मी" असे धरून स्वतःच्या नातेवाईकांसाठी असलेल्या शब्दांची सूची

अ.क्र.	नाते	मराठी	गुजराथी	हिंदी	कन्नड	तेलगु
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)
१.	वडील	बाप	बापू,बापा	पिता,बाप,बाबू	अप्पा, अय्या, तांडे	तंद्री,नैन्ना, नन्ना, अय्या
२.	वडिलांचे वडील	आजा	दादा	दादा,बाबा	अज्जा, हेट्टप्पा, मुत्-ताता	ताता,तत्तैय्या
३.	वडिलांच्या वडिलांचे वडील	पणजा	--	पर-दादा	मुत्ताज्जा, मुत्ताप्पा, मुत्ताय्या	मुत्ताता, तत्तैया
४.	आईचे वडील	आजा	नाना, आजा	नाना	अज्जा, हेट्टप्पा	तत्ता, तत्तय्या
५.	आईच्या वडिलांचे वडील	पणजा	--	परनाना	मुत्ताज्जा	मुत्ताता, ततैय्या
६.	वडिलांचे भाऊ	--	--	--	--	--
	थोरले	चुलता	मोटा बापू	पितिया,ताऊ	दोड्डाप्पा	पेद्दनन्ना, पेत्तंद्री
	धाकटे	काका	काका	काका	चिक्काप्पा	चिन्नन्ना, पीनतंद्री
७.	आईचे भाऊ	मामा,मावळा	मामा	मामा,मामू	मामा, सोदरमावा	मामा,मामय्या
८.	आई	आई	मा,बा	माँ,माता,माई	अब्बे, अम्मा, अव्वा, ताई	अम्मा,तल्ली
९.	आईची आई	आजी	नानी मा,नानी बा	नानी	आज्जी, हेत्तम्मा	अम्माम्मा
१०.	आईच्या वडिलांची आई	पणजी	--	परनानी	मुत्ताज्जी, मुत्ताव्वा, मुत्ताई	तात्तम्मा,अव्वा
११.	वडिलांची आई	आजी	दादी	दादी	अज्जी	नान्नम्मा, अय्यम्मा
१२.	वडिलांच्या वडिलांची आई	पणजी	--	परदादी	मुत्ताज्जी	तात्तम्मा, मत्तार
१३.	वडिलांची बहीण	आत्या,मावळण	फई, फुई	फुफी	सोदार-अत्ते,अत्ते	अत्ता
	थोरली	--	--	फूफू, फुवा	--	पेड्डा (मेनत्ता)
	धाकटी	--	--	दिदी, बुवा	--	चिना

१४.	आईची बहीण	मावशी	मासी	मौसी, खाला, मासी	दोड्डताई	पिन्नी, पिन्नम्मा
	थोरली	--	--	--	दोड्डम्मा, दोड्डाव्वा	पेदम्मा
	धाकटी	--	--	--	चिक्कम्मा, चिक्कव्वा चिगव्वा.	पिन्नी, चिन्नम्मा
१५.	भाऊ	भाऊ	भाई,विरा	भाई, बिर	अण्णा	अण्णा
	थोरला	--	--	--	अण्णा	अण्णा
	धाकटा	--	--	--	तम्मा	तम्मडु
१६.	वडिलांच्या भावाचा मुलगा	चुलत भाऊ	पित्रेय-भाई	चचेराभाई	--	--
	थोरला	--	--	--	--	अण्णा
	धाकटा	--	--	--	तम्मा	तम्मडु
१७.	वडिलांच्या बहिणीचा मुलगा	आतेभाऊ	फुझ्झयात भाई	फुफेरा भाई	भावा, मैदून,मेईदा, मेईवन	बाव,मरडी,बा मरडी, अत्त, पिल्ल
१८.	आईच्या भावाचा मुलगा	मामे भाऊ	मोळई भाई	ममेरा भाई	बावा मेईदुन, मेईदा,मेईदन	बावमरडी, बामरडी, मामपिल्ला
१९.	आईच्या बहिणीचा मुलगा	मावस भाऊ	मासियात भाई	मौसेरा भाई	अण्णा, तम्मा	अण्णा, तम्मडु
२०.	बहीण थोरली धाकट	बहीण	बेन,बोना बेनी,बो	बहन,बहिन जिज	अक्का तड्.ग	अक्का सेल्ली सेल्लेल
२१.	वडिलांच्या भावाची मुलगी	चुलत बहीण	पित्रेय बेन	चचेरी बहन	अक्त,तड्गी	अक्का, सेल्लेलू, सेल्ली
२२.	वडिलांच्या बहिणीची मुलगी	आतेबहीण	फुइयात बेन	फुफेरी बहन	अत्तिगी, नादिनी	वोडीने, मरडलू
२३.	आईच्या भावाची मुलगी	मामेबहीण	मोलाई बेन	ममेरी बहन	अत्तिगो, अत्तिगी, नादिनी	वोडिने, मरडलू
२४.	आईच्या बहिणीची मुलगी थोरली	मावसबहीण	मासियाई बेन	मौसेरी बहन	अक्का	अक्का
	धाकटी	--	--	खालाजादा बहन	तड्गी	सेल्ली, सेल्लेलू
२५.	मुलगा	ल्योक,पुता,मुलगा	डिक्रो,गगा	पुत्र, लडका, बेटा	मगा	कोडुकू, कन्ना
२६.	भावाचामुलगा	पुतण्या	भत्रिजो	भतीजा	मगा	कोडुकू
२७.	भावाचा मुलगा (स्वतः स्त्रीचा)	भाचा	भात्रिजो	भतीजा	अळीया,सोदर-अळिया	मैनाल्लुडू,अल्लुडू
२८.	बहिणीचा मुलगा (स्वतः पुरुषाचा)	भाचा	भाणेज,भाणका	भांजा	अळिया,सोदर-अळिया	मैनाल्लुडू,अल्लुडू
२९.	बहिणीचा मुलगा (स्वतः स्त्रीच्या)	भाचा	भाणेज,भाणका	भांजा	मगा	कोडुकू
३०.	मुलाचा मुलगा	नातू	डिक्रोनो डिक्रो,पोट्रो	पोता	मम्मगा	मुनिमुडू

३१.	मुलाच्या मुलाचा मुलगा	पणतू	--	पर-पोता	मरिमगा	मुमिमनुमडू
३२.	मुलीचा मुलगा	नातू	डिक्रिनो,डिक्रो, भाण	दोहिता, नाती, नवासा	मम्मगा	मनुमडू
३३.	मुलीच्या मुलाचा मुलगा	पणतू	--	--	मरिमगा	मुनिमनुमडू
३४.	मुलगी	लेक, मुलगी	डिक्री	धी,धिया, बेटी, लडकी, पुत्री	मागळू	कुथूरु, बीड्डा, कूटु
३५.	भावाची मुलगी (स्वतः पुरुषाच्या)	पुतणी,द्वाडी	भत्रिजी	भतीजी	मागळू	कुथूरु, बीड्डा
३६.	भावाची मुलगी (स्वतः स्त्रीच्या)	भाची	भत्रिजी	भतीजी	सोदर-सोसे,सोसे	मेनकोडलू
३७.	बहिणीची मुलगी (पुरुषाच्या)	भाची	भांजी,भांणकी	भांजी	सोदर-सोसे,सोसे	--
३८.	बहिणीची मुलगी (स्त्रीच्या)	भाची,लेक	भाणजी,भांणकी	भांजी	मगळू	कुथूरु,बीड्डा
३९.	मुलीची मुलगी	नात	डिक्रिनी डिक्रि,भाणी	दोहीती,नातिन	मम्मागळू	मनुमरलू
४०.	मुलीच्या मुलीची मुलगी	पणती	--	पर, दोहिती	मरिमागळू	मुनीमनुमरलू
४१.	मुलाची मुलगी	नात	डिक्रानी डिक्रि	पोती	मम्मगाळू	मनुमरलू
४२.	मुलाच्या मुलाची मुलगी	पणती	--	पर पोती	मरिमगळू	मुनीमनुमरलू
४३.	वडिलांच्या बहिणीचा नवरा	आतोबा	--	फुफा	मावा	मामा
४४.	नवऱ्याचे वडील	सासरा,मामंजी	--	ससुर	मावा	मामा
४५.	बायकोचे वडील	सासरा, मामा	--	ससुर	मावा	मामा
४६.	आईच्या बहिणीचा नवरा	मवसा	--	मौसा, खालू	दोड्डप्पा	बाबैय्या, चिन्नन्ना
४७.	आईच्या भावाची बायको	ममी	मामी	मामी	अत्ते, सोदर-अत्ते	अत्ता
४८.	वडिलांच्या भावाची बायको	काकू,काकी, चुलती	काकी	ताई,चाची, काकी	दोड्डोताई, दोड्डम्मा, दोडव्वा	दोडम्मा,पिन्नी
४९.	नवऱ्याची आई	सासू,मावळण	सासू, हाऊ, फुई	सास	अत्ते	अत्ता
५०.	बायकोची आई	सासू,मामी	सासू, मामी, हाऊ	सास	अत्ते	अत्ता
५१.	नवरा	नवरा, पती, कारभारी	पती,माणस	भतार, पती, बन्रा (नवरदेव)	गंडा, मनेयाता, यजमांदरु	पुरुरूाडू, मोगुडू
५२.	नवऱ्याचा भाऊ-					
	१) थोरला	भावोजी, भावा, भाओजी, दीर	जेठ	देवर, जेठ	बावा	बावा
	२) धाकटा	नाव + भाओजी	देर,दियार	देवर	मईदा	मरडी
५३.	बायकोचा भाऊ	साला, मेहुणा	साळा,हाळो	साडा, साला	बाबा, मईदुन, मईदा, मेहदून (मामा)	बाबा,मरडी

५४.	बहिणीचा नवरा	मेहुणा,बानेवी	बनेवी	बहनेऊ,बहनोई	बावा,मईदून	--
	थोरल्या बहिणीचा नवरा	--	--	--	बावा	बावा
	धाकट्या बहिणीचा नवरा	--	--	--	मईदून	मरडी
५५.	नवऱ्याच्या बहिणीचा नवरा	नन्दोई, नन्ददा	नन्दोई	नन्दोई,नन्दोसी	चिक्कप्पा, अण्णा, तम्मा	
५६.	बायकोच्या बहिणीचा नवरा	साडू, साड भाऊ	सादू भाई	सादू	सडुका	शट्टरग, तोडुअल्लुडू
५७.	मुलाच्या पत्नीचे वडील	व्याही	वेवाही	समधी	बिगरु	बिय्यनकुडू
५८.	मुलीच्या नवऱ्याचे वडील	व्याही	वेवाही	समधी	बिगरु	बिय्यनकडू
५९.	बायको,पत्नी	बायको, कारभारीण	वाहू, बैरी	जोरु, घरानी, जाऊजा	हेंडती, मनेयती, भरयाई, तरम्, भारिया	पेंदलामू
६०.	नवऱ्याची बहीण	नणंद, वन्स	नणंद	न्ननंद	अत्तिगे, अत्तिगि, नादिनी, नादनी	कोलुंथ्डयल, आडूबिड्डा, वोदिने, मरडलू
६१.	बायकोची बहीण	अक्कड सासू (मोठी),मेहुणी (धाकटी)	साळी,मोठी पाटला सासू,लहान साली	साली	अत्तिगे, अत्तिगि, नादिनी नादनी	कोलुंडियाल, मरडलू, वोदिने
६२.	भावाची बायको					
	मोठी	भावजय, वहिनी	मोठी भोजाई, भाभी	भावज, भाभी	अत्तिगे,अत्तिगी	वदिने, मरडालू
	लहान	नाव+ वहिनी	बहू,भाभी	बहू,बहायू	नादिनी,नादनी	
६३.	नवऱ्याच्या भावाची बायको					
	थोरली	जाऊ	जेठाणी	जेठाणी	ओरगटट्टी, ओरगिटट्टी, नेगेन्नी, नेगे-हेन्यू	यरनालू, एरालू, तोडुकोडलू,
	धाकटी	बाई	देराणी	देवराणी	--	चेल्लेलू
६४.	बायकोच्या भावाची बायको	सलई,साळकाई	साळाएली	--	अक्का, तंड्गी	अक्का, चेळ्लेलूचेल्लेलू
६५.	मुलाच्या बायकोची आई	विहीण	वेवाण	समधिन	बिगीति,बिगती	अक्का, वोदीने, चेल्लेलू
६६.	मुलीच्या नवऱ्याची आई	विहीण	वेवाण	समधिन	बिगीति,बिगति	अक्का, वोदीने, चेल्लेलू
६७.	मुलीचा नवरा	जावई	जमाई (अन्वर)	जमाई,पाहुणा	अळिया	अल्लुडू
६८.	नवऱ्याच्या भावाचा मुलगा	पुतण्या	भत्रिजो	जेठाऊटा, देराठा	मगा	कोडुकू
६९.	नवऱ्याच्या बहिणीचा मुलगा	भाचा	भाणेज	नंदौत	अळिया, सोदरळिया	अल्लुड
७०.	बायकोच्या भावाचा मुलगा	भाचा	भत्रिजो	शालोत	अळिया, सोदरळिया	अल्लुड
७१.	बायकोच्या बहिणीचा मुलगा	भाचा	भाणो	सालोत	मगा	कोडुकू

Maharashtra State Gazetteers

७२.	मुलाची बायको	सून	बहू	बहू,पातोहू	सोसे	कोडलू
७३.	नवऱ्याच्या भावाची मुलगी	पुतणी	भत्रिजी	जेठौती, देरौती	मगळू	कुथूरु,बिड्डा
७४.	नवऱ्याच्या बहिणीची मुलगी	भाची	भांणजी	नंदोती	शोसे,सोदर-सोसे	कोडलू
७५.	बायकोच्या भावाची मुलगी	भाची	--	सालोती	शोसे,सोदर,सोसे	कोडलू
७६.	बायकोच्या बहिणीची मुलगी	भाची	--	--	मगळू	कुथूरु, बिड्डा
७७.	स्वतःच्या आई शिवाय वडिलांची दुसरी बायको	सावत्र आई, मावशी सावकी, मा	सौतेली माँ	--	मलताई, सवतीमाई	चवितीताल्ली
७८.	स्वतःच्या वडिलांशिवाय आईचा दुसरा नवरा	सावत्र बाप	--	--	मल-तांडे	--
७९.	नवऱ्याची दुसरी बायको	सवत	सोक्या	सौत, सौतिन, सौक	--	--
८०.	दुसरा नवरा (सावत्र नवरा)	--	--	--	सवती	सवतालू

नातेवाचक संज्ञांवरून असे दिसते की, मराठी भाषेवर उत्तरेकडील संस्कृत भाषेचा प्रभाव असला तरी तिच्यावर दक्षिणेकडील भाषांचाही प्रभाव दिसतो. काही संज्ञा केवळ ब्राह्मण जातीमध्ये रूढ असून त्या संस्कृत आहेत. उदाहरणार्थ, सासरा ऐवजी श्वसूर, व्याही-विहीण. ब्राह्मण आणि ब्राह्मणेत्तरांमध्ये रूढ असलेली काही नामे दक्षिणेकडील आढळतात. उदाहरणार्थ अण्णा, मामा-इत्यादी. काही नातेवाईकांसाठी दुहेरी नामे असल्यामुळे मराठी भाषेमध्ये उत्तर-दक्षिण अशा दोन्ही प्रदेशातील नावांपेक्षा अधिक विविधता आढळते. उदा. लेक, पुत्र, पुत्री, सासरा, मामंजी, मामा, भावजय आणि वहिनी, नणंद आणि वन्स (वहिनी हा शब्द भावाच्या बायकोला वापरतात आणि वन्स नवऱ्याच्या बहिणीला). वहिनी आणि वन्स त्यामुळे एकच शब्द असावेत व ते दोन नात्यांना वापरले गेले. अशा जोड्या द्रविडीयन भाषांमध्ये अधिक आढळतात. वहिनी आणि वन्स एक आहे याची जाणीव मराठी माणसांना नसावी. वहिनी शब्द वधू + अन्नी (मोठया भावाची बायको) असा झाला आहे. म्हणून जी मुलगी लग्नानंतर मोठ्या भावाची बायको म्हणून घरात येते ती वहिनी. तिला घरात प्रतिष्ठा असते व सासूनंतर तिलाच (ज्येष्ठ सून म्हणून) मान आजही दिला जातो. मात्र येथे प्रत्येक घरातील वहिनी ही वेगवेगळ्या कुटुंबातून आलेली असते. त्यामुळे ती त्याच घरातल्या वन्स पेक्षा वेगळी असते. महाराष्ट्रात वहिनी-वन्स किंवा भावजय-नणंद यांच्यात क्वचितच प्रेमाचे व सलोख्याचे नातेसंबंध आढळतात.

महाराष्ट्रात नातेवाचक शब्द पुल्लिंगी अथवा स्त्रिलिंगी असतात. उदाहरणार्थ मावसभाऊ-मावसबहीण, मुलगा-मुलगी, पुतण्या-पुतणी, भाचा-भाची, भतीजा-भतीजी, साला-साली. इत्यादी. महाराष्ट्रातील मराठी भाषेमुळे अनेक नातेवाचक शब्द वेगळेच वाटतात हे वरील यादीवरून स्पष्ट होते. आईच्या घराला माहेर, मैका (हिंदी प्रदेशात) आणि आईच्या वडिलांच्या घराला आजोळ, पतीकडील घराला सासर. माहेरवाशीण आणि सासुरवाशीण हे शब्द एकाच मुलीला वापरले जातात, कारण प्रत्येक मुलगी आपल्या वडिलांच्या घरून नवऱ्याच्या व त्याच्या वडिलांच्या घरी जाते. लग्नानंतर ती त्याच घरची समजली जाते. भारतात ज्या प्रदेशांमध्ये पितृसत्ताक कुटुंबे आहेत तेथे अशाच स्वरूपाचे नातेसंबंध आढळतात.

महाराष्ट्रात कुटुंबसंस्था अद्यापही संरचनात्मक दृष्ट्या एकत्रच आहे असे म्हणावयास हरकत नाही. दोनोंतीन पिढ्यांतील व्यक्ती एकमेकांना जवळचे समजून राहताना दिसतात. केवळ जवळचेच नव्हे तर दूरचे नातेवाईकही "सगे" (लग्नसंबंधाने जुळलेले नसलेले) आणि "सोयरे" (लग्नसंबंधातून जवळचे झालेले) समारंभामध्ये तसेच अडीअडचणींच्या वेळी एकमेकांच्या मदतीला येतात.

तळटिपा

[१] पी. आर. मोकाशी, **मेट सिलेक्शन इन इंटरमॅरेजेस इन बॉम्बे,** १९८० पृ. २८, १४९-५०.

[२] कित्ता.

[३] इरावती कर्वे, **किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया,** एशिया प्रकाशन, १९६८,पृ.१७८.

[४] प्रभाकर मांडे, **गावगाड्याबाहेर,** १९८३, पृ. ३०९.

[५] सुधा काळदाते, **भारतीय समाजरचना,** १९७६, पृ. ३२.

[६] सुनील मायी, "सामाजिक कायद्यांचा मराठवाड्यातील ग्रामीण कुटुंबावर झालेला परिणाम," अप्रकाशित पी. एच. डी., प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, १९८३, पृ. १३०.

[७] ज्ञानेश धोंडगे, "महार-बौद्ध समाजाची धर्मांतरानंतरच्या सामाजिक जीवनाची पहाणी : एक समाजशास्त्रीय अभ्यास" अप्रकाशित एम.फिल. प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, १९८९, पृ. ६३-६६.

[८] प्रभाकर मांडे, **पूर्वोक्त,** पृ. २५, ६०, ८०, ९८, १३२, १४२.

[९] वसंत वैद्य, स्टडी ऑफ वैदू कम्युनिटी फ्रॉम इंटरॲक्शनिष्ट ॲप्रोच, अप्रकाशित पीएच.डी.,प्रबंध, मराठवाडा विद्यापीठ, १९९०.

[१०] एस.जी.कुळकर्णी, **भारतीय समाजव्यवस्था,** १९७५, पृ. २०१.

[११] हुसेन जमादार, "मुस्लीम महिलांचे ललाटलेख," **साधना** : स्त्री समस्या विशेषांक, मे १९९०.

[१२] प्रभाकर मांडे, **पूर्वोक्त,** पृ. ६२.

[१३] कमलाबाई देशपांडे, **स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल,** १९६०.

[१४] पद्मजा ब्रह्मे, **कुटुंब व समाज,** १९७८, पृ. ४३.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ६ : प्रादेशिक समूह

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि.ना. वाळुंजकर यांनी केलेले आहे.)

खेडे, गाव आणि नगर

महाराष्ट्राच्या समाजजीवनाची जडणघडण कृषिप्रधान संस्कृतीच्या वातावरणात झाली आहे. या संस्कृतीची सुरुवात येथे इ. स. पूर्व १५०० पासून अथवा त्याहून आधी झाली. या संस्कृतीचा विकास ब्रिटिश राजवटीच्या आगमनापर्यंत होत राहिला. महाराष्ट्रातील समाज हा प्रामुख्याने ग्रामीण समाज आहे. ब्रिटिश राजवटीच्या आगमनाच्या वेळी महाराष्ट्रातील ९० टक्के जनता खेड्यांमध्ये राहत होती. ब्रिटिशांच्या आगमनाबरोबर येथे औद्योगिक नागरी संस्कृतीचा विकास होऊ लागला व परिणामतः ग्रामीण समाज संकोच पावू लागला. असे जरी असले तरी अजूनही येथील बहुसंख्य जनता खेड्यांमध्येच राहते. या दृष्टीने पहाता खेडे हा महाराष्ट्राच्या समाजजीवनाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. या कारणास्तव येथील खेड्यांचे परंपरागत स्वरूप जाणून घेणे अगत्याचे ठरते.

पारंपरिक कृषिप्रधान समाजात जसे खेड्यांना मध्यवर्ती स्थान असते तसे अशा समाजातील लोकांच्या काही भौतिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजांच्या पूर्तीसाठी मर्यादित प्रमाणात नगरांचाही विशिष्ट प्रकारे विकास होत असतो व त्यांचीही समाजजीवनात महत्त्वपूर्ण भूमिका असते. म्हणून महाराष्ट्राच्या समाजजीवनाचे आकलन होण्यासाठी येथील खेड्यांचे स्वरूप पाहणे जसे महत्त्वाचे ठरते त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील पारंपरिक नगरांचे व नागरी जीवनाचे स्वरूप पाहणे अगत्याचे ठरते.

खेडी

Maharashtra State Gazetteers

महाराष्ट्रातील खेडी एकाच प्रकारची नाहीत, तर त्यात काही ठळक प्रकार दिसतात. या विभिन्नतेच्या निर्मितीत भौगोलिक, ऐतिहासिक व सामाजिक घटकांचे महत्त्वाचे योगदान आहे. भौगोलिकदृष्ट्या महाराष्ट्राचे स्थूलमानाने तीन नैसर्गिक विभाग पडतात. हे तीन विभाग म्हणजे कोकण, डोंगराळ प्रदेश व देश अथवा दख्खनचा मैदानी प्रदेश. या तीन विभागांत असलेली भौगोलिक परिस्थिती भिन्न आहे व या भौगोलिक भिन्नतेचा प्रभाव त्या त्या विभागातील खेड्यांच्या रचनेवर, घरांच्या रचनेवर, तेथील शेतीच्या पद्धतीवर व एकूण सामाजिक जीवनावर पडल्याचे दिसते. या तीन विभागांतील खेड्यांची रचना व त्यातून राहणाऱ्या लोकांच्या समाजजीवनाची ठळक वैशिष्ट्ये यांचा स्थूल आढावा खालील परिच्छेदांमध्ये घेतला आहे.[१]

अरबी समुद्राचा किनारा व त्याच्या पूर्वेला असलेला सह्याद्री पर्वत यांच्यामध्ये जो चिंचोळा भूप्रदेश मानवी वस्तीला व शेतीसाठी उपलब्ध आहे त्यावर कोकणातील समाज वसला आहे. दक्षिणोत्तर पसरलेल्या सह्याद्री पर्वताच्या डोंगररांगा थेट अरबी समुद्रापर्यन्त भिडल्या आहेत. यामुळे व सह्याद्रीत उगम पावून अरबी समुद्राला मिळणाऱ्या अनेक नद्या आणि ओढ्यांमुळे या एरवी सलग असणाऱ्या भूप्रदेशाचे लहान लहान भूभागात विभाजन झाले आहे. त्याचप्रमाणे कोकणच्या भूप्रदेशाचे आणखी एक उत्तर-दक्षिण विभाजन समुद्रालगतचा सखल भूप्रदेश व पर्वतराईला लागून असलेला उंचसखल डोंगराळ भूप्रदेश, अशा दोन भूप्रदेशात झाले आहे. या भौगोलिक वैशिष्ट्यांचा परिणाम या प्रदेशातील ग्रामरचनेवर झाल्याचे दिसते. या परिसरात दोन प्रकारची खेडी दिसतात.[२] समुद्रकिनाऱ्यालगतच्या सखल भूप्रदेशावरील म्हणजे खलाटी भागातील खेडी ही उत्तर-दक्षिण रेखाकृती दिसतात. भूप्रदेशाचा विस्तार प्रामुख्याने उत्तर-दक्षिण लांबीच्या बाजूनेच असल्यामुळे गावातील प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा घरे दिसतात.घराभोवती मोठे आवार असते व घरे एकमेकांना जोडून क्वचितच दिसतात. एका गावाची सीमा दुसऱ्या गावाच्या वस्तीला मिळालेली असते. त्यामुळे एका गावाची सीमा केव्हा संपते व दुसरे गाव कोठे सुरू होते हे नवख्या माणसाला समजणे कठीणच. काही नैसर्गिक अडथळ्यांचा,

उदाहरणार्थ डोंगर, ओढा इत्यादींचा उपयोग सीमा ओळखण्यासाठी केला जातो. अशा प्रमुख रस्त्याच्या दुतर्फा वसलेल्या गावांखेरीज एकाच नात्याच्या किंवा एकाच जातीच्या दोन-चार घरांच्या वस्त्याही अशा खेड्यात दिसतात. अशा वस्त्यांना पाडा, पडाळ इत्यादी नावांनी ओळखले जाते.

हा भाग जास्त पावसाचा असून येथे अदमासे ४,००० मि. मी. पाऊस पडतो. पावसाळ्याची सुरुवात जूनच्या प्रारंभापासून होते व सप्टेंबर अखेरपर्यन्त पावसाळा असतो. याचा परिणाम येथील घरबांधणीवर झाल्याचे दिसून येते. घराचे छप्पर उतरते व कौलारू अथवा नारळी-पोफळीच्या पानांनी शाकारलेले असते. भोवती मोकळे आवार व त्यात नारळी-पोफळीच्या बागा दिसतात.

कोकणातील कृषी अर्थव्यवस्था कुटुंबप्रधान आहे. शेतीची सर्व कामे कुटुंबातील लोक करीत असतात. एक घर दुसऱ्या घरापासून सुटे असल्यामुळे बहुतेक कुटुंबे आत्मनिर्भर असतात. सधन शेतकऱ्यांकडे कामाला गडी माणसे दिसतात व ती मालकाच्या शेतात अथवा घराजवळ स्वतंत्र घर करून राहतात.येथील शेतकऱ्यांना कुशल कारागिरांची गरज कमी भासते व त्यामुळे या भागात देशावरील भागासारखी बलुता पद्धती विकसित झालेली दिसत नाही. त्याचप्रमाणे पाटीलकीही या भागात विकसित झाली नाही. त्याऐवजी खोती पद्धती होती. अनेक खोत ब्राह्मण होते. परंतु गावात खोताला पाटलासारखा मान नसतो.

खलाटी भागातील खेडी एखाद्या ओळीसारखी दिसतात, तर पर्वतराईनजीकचा उंचसखल भूप्रदेश असलेल्या भागातील म्हणजे वलाटीतील खेडी निराळ्या प्रकारची असतात. या भागात सपाट जमीन फारशी उपलब्ध नसल्यामुळे घरे बऱ्याच प्रमाणात विखुरलेली दिसतात व काही ठिकाणी ती एकत्र पुंजक्यानेही दिसतात. डोंगराळ भागामुळे शेतीसाठी मोठ्या प्रमाणात सलग जमीन उपलब्ध होत नाही तर लहान लहान जमिनीचे तुकडे लागवडीखाली आणले जातात.

महाराष्ट्रात पर्वतराईंनी डोंगराळ प्रदेश निर्माण केला आहे. या भागात प्रामुख्याने भिल्ल, कोळी, वारली, ठाकूर, कातकरी इत्यादी आदिवासी अथवा आदिवासीसादृश जमाती राहतात. या भागातही फारशी सलग जमीन उपलब्ध नसल्यामुळे येथील खेड्यातील घरे विखुरलेल्या स्वरूपात दिसतात व एकूण खेड्याच्या वस्तीला विस्कळित स्वरूप प्राप्त होते. अशा तऱ्हेची विखुरलेली खेडी सह्याद्री, सातपुडा या पर्वतराईत दिसतात, त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील जंगल भागांमध्येही दिसतात. या जंगल भागात एकाच ठिकाणी घरबांधणी शक्य नसल्यामुळे पुंजक्या पुंजक्यांनी घरे बांधल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील तिसरा नैसर्गिक विभाग देश अथवा दख्खनचे पठार यातील भूप्रदेश असून तो सखल असल्यामुळे येथे सलग घरबांधणी शक्य होते. त्यामुळे या भागातील खेडी वेंद्रित पद्धतीची असतात. यास खेड्यांचे स्वरूप मध्यभागी लोकवस्ती व सभोवती पसरलेली शेती असे असते. गाव वसवीत असताना लोक काही गोष्टींना प्राधान्य देत असत व त्यातूनच काही परंपरा निर्माण झाल्या. गाव वसविण्यासाठी जागेची निवड करताना जवळ नदी अथवा ओढा आहे किंवा नाही हे पहात असत. महाराष्ट्रातील बहुतेक खेडी नदी अथवा ओढ्याजवळ वसल्याचे दिसते. त्याचप्रमाणे शेतीसाठी शक्यतो चांगली जमीन असावी व बरड, मुरमाड जमीन गाव वसविण्याकरिता वापरावी असा संकेत असे. अशा बरड जमिनीचा रंग पांढरट असल्यामुळे गावाच्या वस्तीला "गाव पांढरी" अथवा "पांढरी" हा शब्द वापरला जाऊ लागला व शेत जमिनीला काळी हा शब्द वापरला जाऊ लागला. त्यामुळे खेडेगावाच्या वस्तीचा उल्लेख पांढरी व गावठाण या शब्दाने होऊ लागला. समाजजीवनाच्या दृष्टीने गावाची वस्ती व शेती या एकाच रूपाच्या दोन बाजू असल्यामुळे या दोहोंना म्हणजे काळी आणि पांढरीला, मिळून "देह" ही संज्ञा जुन्या कागदपत्रांत वापरली जात असे.[३]

परंपरागत पद्धतीनुसार महाराष्ट्रातील खेड्यांचा "मौजा अथवा मौजे" व "कसबा" असे दोन प्रकार केले जातात. संपूर्णपणे कृषिप्रधान खेड्यांना "मौजे" ही संज्ञा वापरली जात असे. अशा खेड्यातील एकूण लोकसंख्येपैकी जवळ जवळ ८० टक्के अथवा त्याहून अधिक लोकसंख्या प्रत्यक्ष शेती कसणारांची असे व बाकीचे लोक शेतीसाठी आणि शेतकऱ्यांच्या सामाजिक व धार्मिक जीवनात आवश्यक असणाऱ्या सेवा पुरविणाऱ्या जातीतील असत. या जाती बलुतेदार म्हणून ओळखल्या जातात. त्यात सुतार, लोहार, सोनार, न्हावी, धोबी, जोशी, गुरव, कुंभार, रामोशी, मुलाणी, मांग, चांभार या जातींचा समावेश असतो. "कसबा" हे कारागीर, व्यापारी यांचे वस्ती असलेले गाव. कसब अथवा काही कलाकौशल्य असणाऱ्या लोकांच्या वस्तीचे ठिकाण म्हणजे कसबा. अशा गावामध्ये सभोवतीच्या खेड्यांतील शेतकऱ्यांच्या व्यावसायिक गरजा तसेच प्रामुख्याने इतर आर्थिक, सामाजिक व धार्मिक गरजा भागविणाऱ्या व्यावसायिकांची वस्ती असल्याचे दिसते. अशा गावांची लोकसंख्या कृषिप्रधान "मौजे" पेक्षा सर्वसाधारणपणे जास्त असते. त्यामुळे परंपरागत काळात अशा "कसबा" प्रकारात मोडणाऱ्या गावातील सामाजिक जीवन कृषिसंस्कृतीशी पूर्णपणे निगडित असे व गावातील वातावरणही ग्रामीण स्वरूपाचे असे. थोडक्यात "मौजे" आणि "कसबा" हे कृषिप्रधान संस्कृतीचे अविभाज्य व परस्पर पूरक घटक होते.

देशावरील काही खेडी एकमेकांच्या जवळ तीन-चार मैलांच्या अंतरावर वसल्याचे दिसून येते. ही एकाच नावाने ओळखली जाणारी जोडखेडी होत. यातील लहान खेड्याच्या नावापुढछ "खुर्द" व मोठ्या खेड्याच्या नावापुढे "बुद्रुक" हे विशेषण लावले जाते. उदाहरणार्थ, सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यात गोंदवले या नावाची एकमेकांजवळ असलेली दोन गावे आहेत. त्यातील मोठ्या गावाला गोंदवले बुद्रुक व लहान गावाला गोंदवले खुर्द या नावाने ओळखले जाते.या दोन्ही गावांच्यामध्ये नदी आहे. अशा तऱ्हेने नदीमुळे अथवा डोंगरामुळे अलग झालेल्या एकाच नावाच्या दोन गावांना बुद्रुक व खुर्द ही विशेषणे लावण्याचा प्रघात देशावर दिसून येतो. डॉ. घुर्ये यांनी पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील खेड्यांचा जो अभ्यास केला त्यात त्यांना अशी चौदा गावे आढळली.[४]

देशावरील केंद्रित पद्धतीच्या खेड्यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या खेड्यांच्या कक्षेतच असलेल्या परंतु गावठाणापासून काही अंतरावर असणाऱ्या शेतकऱ्यांच्या अथवा इतर जमातींच्या वस्त्या बऱ्याच खेड्यांच्या हद्दीत दिसतात. अशा तऱ्हेच्या वस्त्या २-३ घरांपासून ५०-६० अथवा त्याहूनही अधिक घरांच्या बनलेल्या दिसतात. अशा वस्त्यांना त्यांच्या आकारानुसार वस्ती, गोठा, वाडा, पाडा, वाडी या नावाने ओळखतात. अशा वस्त्या बहुतांशी एकाच जातीच्या लोकांच्या असतात व त्यांचे आपापसात नाते संबंधही असतात. या वस्त्या अथवा वाड्या त्यात राहणाऱ्या प्रमुख आप्तगटांच्या नावाने अथवा जातीच्या नावाने ओळखल्या जातात. बनगरवाडी, इरकरवाडी, माळवाडी, शेलारवाडी ही त्यांची उदाहरणे होत. वाडीमध्ये एकापेक्षा अधिक जातींतील लोकांची वस्ती सहसा दिसत नाही. आर्थिक, सामाजिक व राजकीयदृष्ट्या वाडी ही गांव पांढरीवर अवलंबून असते. वाडीचे स्वतःचे असे सामाजिक व्यक्तिमत्व असले तरी ती गावाचा एक अविभाज्य घटक असते.

गावाठाणाखेरीज वस्ती आणि वाडी निर्माण होण्यास प्रामुख्याने दोन कारणे जबाबदार असल्याचे दिसते. पहिले कारण म्हणजे गावठाणात राहणाऱ्या काही शेतकरी कुटुंबानाच व्यवसायाच्या सोयीच्या दृष्टीने त्यांची शेती जेथे आहे तेथे घर बांधून राहणे सोयीचे वाटते व अशा तऱ्हेने काही कुटुंबे आपल्या नोकरांबरोबर शेतांमध्ये राहू लागतात. यालाच "वस्ती" या नावाने संबोधले जाते. या वस्तीचा कालांतराने विस्तार झाला म्हणजे त्यांना "वाडी" संबोधले जाते. दुसरे कारण म्हणजे गाव पांढरीत असणाऱ्या प्रमुख शेती करणाऱ्या जातीखेरीज दुसऱ्या जाती ज्या वेळेला शेती करण्यासाठी अथवा मेंढपाळीसारखा व्यवसाय करण्यासाठी गावात राहावयास येतात त्यावेळेला ते शक्य असल्यास गावाच्या अधिकाराखालीच स्वतंत्र वसाहत करून राहू लागतात. अशा वसाहतीतून वाड्यांची निर्मिती होते. वाड्या जरी सर्व बाबतीत गाव पांढरीसारख्या आत्मनिर्भर नसल्या तरी अनुकूल परिस्थिती प्राप्त झाल्यास त्यांची आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने धडपड चालू असते व कालांतराने ते आपले स्वतंत्र गावात रूपांतर घडवून आणतात. अशा वेळी मूळ गावातील बलुतेदार या वाड्यांवरही आपला व्यवसाय करण्याचा हक्क प्रस्थापित करतात व तेथे राहू लागतात आणि कालांतराने अशा वाड्यांना स्वतंत्र गावाचा दर्जा मिळतो.[५]

ऐतिहासिक काळात सैन्यात अथवा राज्य शासनात उपयुक्त कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना जमीन देणगी देण्याची पद्धती होती. हीच पद्धती इतर जातींच्या बाबतीतही गरजेनुसार अमलात आणली जात असे. यातूनच वतनांचा उदय झाला. वतन दिलेल्या जमिनींना मिराशी व सरकारच्या ताब्यात असलेल्या मुक्त जमीनींना खालसा जमीन असा उल्लेख करण्याचा प्रघात असे.[६] ब्रिटिश राजवटीत रयतवारी पद्धती अमलात आल्यामुळे ही विभागणी नष्ट झाली. परंतु याच्यातून शेतकरी समाजात निर्माण झालेला सामाजिक भेद चालू राहिला. ज्यांच्याकडे वंशपरांपरागत पद्धतीने इनामी जमीन चालत आली आहे ते मिरासदार व ज्यांच्याकडे अशी जमीन नाही व ज्यांना पट्ट्याने सालिना जमीन कसण्यासाठी घ्यावी लागते ते उपरी असे मराठा व कुणबी या परंपरेने शेती करणाऱ्या समाजात भेद निर्माण झाले. मिरासदारांच्या तुलनेने उपऱ्यांचे स्थान गौण मानण्यात येते. त्यांना गावात "पाहुणे" म्हणून संबोधण्यात येते. हे उपरे बहुतांशी स्थानिक जातीत नातेसंबंध प्रस्थापित करून गावात राहावयास आलेले असतात. परंपरागत शेती करणाऱ्या जातींखेरीज काही महत्त्वपूर्ण सेवा करणाऱ्या जातींनाही त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून इनाम जमीन देण्याची पद्धती होती यातून महार वतन निर्माण झाले. या जमिनीवर गावातील मृत जनावरे टाकत असल्यामुळे या जमिनीचा उल्लेख हाडकी, हाडोळा असा करण्यात येत असे. महार वतनाखेरीज कुलकर्णी व पाटील यांनाही इनाम जमीन देण्यात येत असे.[७]

खेड्यांच्या अंतर्गत रचनेवर काही धार्मिक व सांस्कृतिक श्रद्धांचा व जाती व्यवस्थेचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. खेड्याच्या वेशीजवळ खेड्याच्या रक्षणकर्त्या देवतेचे देऊळ दिसते. ही देवता बहुधा बहिरोबा, विरोबा, म्हसोबा यासारख्या ग्रामदेवता असतात अथवा मारुतीसारखी पुराणातील देवता असते. गावातील लोकांचे रोगराईपासून, विशेषतः साथीच्या रोगांपासून रक्षण करणारी मरीआई व लहान मुलांच्या आरोग्याचे रक्षण करणारी सटवाई यांचेही छोटे देऊळ खेडेगावात असल्याचे दिसते. हे देऊळ बहुधा महार अथवा मांग यांच्या वस्तीपासून जवळ असते. याखेरीज गावातील लोकांच्या श्रद्धेनुसार विठोबा, राम, शिव इत्यादी पुराणातील देव, तसेच अंबाबाई, भवानी, जोगुबाई इत्यादी देवतांचीही देवळे दिसतात. बऱ्याच खेड्यांत गावाच्या सुरुवातीलाच गावातील प्रमुख देऊळ असते. खेड्यातील

Maharashtra State Gazetteers

बहुतेक देवळे साध्या घरांच्या आकाराचीच असतात. डॉ. घुर्ये यांनी पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील खेड्यांचे १९५४ ते १९६० च्या दरम्यान जे सर्वेक्षण केले त्यात त्यांना बहुतेक खेड्यांत पाच ते सहा देवळे असल्याचे आढळले. किमान देवळांची संख्या एक तरी असतेच. एका खेड्यात २१ देवळे आढळली. मारुतीचे देऊळ सात खेड्यांचा अपवाद वगळता बाकीच्या सर्व म्हणजे ११२ खेड्यांमध्ये आढळले.[८]

गावाच्या सार्वजनिक वास्तूंमध्ये चावडीचा उल्लेख करता येईल. सर्व सरकारी कामे करण्याचे ठिकाण म्हणजे चावडी. अनेक ठिकाणी गावातील देऊळ व चावडी एकमेकांच्या जवळ असल्याचे दिसते.

गावातील लोकवस्ती निरनिराळ्या जातींच्या मोहोल्ल्यात अथवा आळीत विभागलेली असते. सर्वसाधारणपणे गावातील सवर्णांची वस्ती पश्चिमेच्या बाजूला व दलितांची वस्ती गावाच्या पूर्वेच्या बाजूला दिसते व या दोन वर्गांच्या वस्त्यांमधून रस्ता गेलेला असतो. खेड्यांमध्ये मराठा, कुणबी अथवा तत्सम पारंपरिक शेती करणाऱ्या लोकांची संख्या जास्त व इतर व्यवसाय करणाऱ्या स्पृश्य जातींची संख्या कमी दिसते. अशा वेळी जेथे आपल्या जातीतील लोकांच्या घराजवळ घर बांधणे शक्य होत नाही त्यावेळी निरनिराळ्या स्पृश्य जाती एकमेकांजवळ घरे बांधून राहताना दिसतात. अशी परिस्थिती विविध दलित जातींत दिसून येत नाही. प्रत्येक दलित जातीचा वाडा दुसऱ्या दलित जातीच्या वस्तीपासून अलग दिसतो. याचे एक कारण म्हणजे व्यावसायिक गरजा हे असू शकेल. गावात अंतर्गत व्यवहारासाठी रस्त्याच्या ऐवजी नागमोडी वळणाने गेलेले बोळ दिसतात. हे बोळ गावातील रहदारी सुकर करतात आणि जातींच्या वस्त्यांचे पृथकत्व दाखवितात.

खेड्यात राहणाऱ्या समाजात बहुसंख्य वस्ती परंपरेने शेती करणाऱ्या जातींची असते. देशावर या जाती म्हणजे मराठा व कुणबी. काही खेड्यांत वंजारी, लोणारी या जातीही परंपरेने कृषी व्यवसाय करताना आढळतात. असे जरी असले तरी बहुतांशी खेड्यांमध्ये परंपरेने शेती करणारी एकच जात लोकसंख्येच्या दृष्टीने व त्याचप्रमाणे आर्थिक, राजकीय व सामाजिक क्षेत्रात प्रबळ असते. गावातील पारंपरिक ग्रामपंचायतीमध्ये अशा प्रबळ जातीला महत्त्वाचे स्थान असे.[९] पाटीलकी याच जातीतील ज्येष्ठ घराण्यातील व्यक्तीकडे असे. बऱ्याच खेड्यांमध्ये अशा प्रबळ जातींमध्येही एकाच कुळाचे अथवा वंशाचे लोक हे त्या जातीत सर्वाधिक दिसतात. उदाहरणार्थ काही गावांमध्ये सावंत, काहीत पवार, काहीत माने या आडनावाचे लोक बहुसंख्य दिसतात. अशीच परिस्थिती अन्य जातीतही थोड्याफार प्रमाणात दिसते.

शेती करणाऱ्या जातींखेरीज ज्या इतर जातींची लोकसंख्या खेड्यात दिसते त्यामध्ये बलुतेदार प्रमुख होत. बलुता पद्धती पारंपरिक ग्रामीण व्यवस्थेचे अविभाज्य अंग असून ही ऐतिहासिक परंपरा जवळ जवळ दोन हजार वर्षांची आहे. महाराष्ट्रात ही परंपरा मराठेशाहीत व नंतर पेशवाईत अधिक सुसंघटीत व स्थिर झाली. पेशवाईत महत्त्वपूर्ण बलुतेदारांच्या यादीत बारा कारागीर व तत्सम जातींचा समावेश करण्यात आला म्हणून या पद्धतीला "बारा बलुतेदारी" पद्धती असेही म्हटले जाते. शेतकऱ्यांच्या व्यवसायाच्या दृष्टीने कमी महत्त्वाचा व्यवसाय करणाऱ्या जातींचा "अलुतेदार" असेही संबोधले जाते. बलुतेदार आपल्या व्यवसायाकडे वतनाच्या दृष्टिकोनातून बघतात व आपल्या व्यावसायिक हक्काचे जागरुकतेने जतन करतात. मालमत्तेचे जसे कुटुंबात विभाजन होते त्याच पद्धतीने बलुतेदारीच्या हक्काचेही कुटुंबातील सर्व वारसदारांमध्ये विभाजन होते.

देशावरील बहुतेक खेड्यांमध्ये बलुतेदारांच्या यादीत सुतार, लोहार, चांभार,मांग, न्हावी, परीट, जोशी, गुरव, सोनार, कुंभार, रामोशी, मुलाणी या जातींचा समावेश असतो. इस्लाम धर्मी मुलाणी हा महाराष्ट्रातील विशेषतः देशावरील ग्रामीण समाजाचा अविभाज्य घटक झाला आहे. देवाला बळी द्यावयाचे बकरे मुलाण्यानेच मारायचे अशी प्रथा आहे. बलुतेदारांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून खळ्यावर ठराविक प्रमाणात धान्य दिले जाते. त्याखेरीज सर्व सणांना त्यांना घरात शिजविलेले अन्न वाढण्याची परंपरागत पद्धती आहे.

बलुतेदार जाती गावात अथवा परिसरातील मोठ्या गावात म्हणजे कसब्यात राहून आपला व्यवसाय करतात. पण याखेरीज वर्षातून ठराविक मोसमात येऊन खेड्यात काही काळ पाले ठोकून आपला परंपरागत व्यवसाय करून खेडुतांच्या गरजा भागविणाऱ्या कैकाडी, वडार, वुंचेवाले, कोल्हाटी, फासेपारधी यासारख्या भटक्या अथवा "बिछायती" म्हणजे परठिकाणाहून येणाऱ्या जातींही ग्रामीण समाजाचे महत्त्वाचे घटक आहेत. यातील काही परंपरेने ठराविक मोसमात ठराविक क्षेत्रात खेड्यात जातात. अशा जाती स्वतःला वतनदार समजतात. केव्हाही कोणत्याही खेड्यात जाणाऱ्या जाती या "उपलाणी" जाती होत.[१०] या जातींखेरीज शेतमालाची आणि खेड्यात निर्माण होणाऱ्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी नियमाने फिरस्ते व्यापारी खेड्यात येत असतात.

अशा तऱ्हेने खेड्यातील जनतेच्या जीवनावश्यक गरजा खेड्यातच सामाजिक व्यवस्थेच्या चौकटीत भागविल्या जात असल्या, तरी काही गरजांच्या पूर्तीसाठी खेड्यातील जनता कसबी कारगिरांचे वेंद्र असलेल्या "कसबा" शहरावर

अवलंबून असे. ही ग्रामीण नगरे पारंपरिक ग्रामीण समाजाचे अविभाज्य घटक होती. म्हणून या ग्रामीण नगरांचे पारंपरिक स्वरूप विचारात घेणे आवश्यक ठरते.

कसबा

"कसबा" म्हणजे कसबी अथवा कारागीरांचे वसतिस्थान. एखाद्या गावाचा कसबा असा उल्लेख शासकीय कागदोपत्रीच आढळतो. एरवी लोकांच्या बोलीभाषेत अशा वसतिस्थानाचा उल्लेख गाव असाच होतो. खेड्यापेक्षा या गावची लोकसंख्या जास्त असते, परंतु लोकसंख्या हा कसबा आणि मौजे यांच्यातील फरक दाखविणारा प्रमुख निकष नसतो तर यांचे समाजजीवनातील कार्य हे महत्त्वाचे समजले जाते. कसबा हे जरी नगर असले तरी याची सामाजिक व आर्थिक अभिमुखता ग्रामीण असते. या दृष्टीने या परंपरागत कसबा पद्धतीच्या गावाला ग्रामीण नगर मानणे अधिक वस्तुनिष्ठ ठरते. अशा गावातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरण ग्रामीणच असते. विवेचनाच्या सोयीच्या दृष्टीने कसब्याचा उल्लेख गाव म्हणून केला आहे.

ऐतिहासिक काळात शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी गावाच्या भोवती बुरूज व तटबंदी असे. अजूनही तटबंदीचे अवशेष देशावरील काही गावांमध्ये पाहवयास मिळतात. गावाची वास्तुरचना पारंपरिक जाती व वर्ण व्यवस्थेच्या तत्त्वावरच आधारलेली असे. बहुधा गावाच्या मध्यभागी गाव ज्यांनी वसविले अशा सरदार अथवा देशमुख घराण्याचा वाडा असे. वाड्याभोवतीही तटबंदी असे. गावात प्रमुख ग्रामदेवतेचे मोठे मंदिरही पाहवयास मिळते. अशा मंदिरात दीपमाळ, उंचशिखर व यात्रेकरूंना उतरण्यासाठी ओवऱ्या बांधल्याचे अनेक ठिकाणी दिसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे असे देऊळ केवळ स्थानिक जनतेच्या उपयोगासाठी बांधलेले नसून ते परिसरातील ग्रामीण जनतेचेही श्रद्धास्थान असते. प्रमुख मंदिराखेरीज पौराणिक व स्थानिक देवदेवतांची मंदिरेही अशा गावात दिसतात. हिंदू देवतांच्या मंदिरांखेरीज ज्या ज्या ठिकाणी जैन लोक आहेत अशा गावी जैन मंदिरेही असल्याचे दिसते. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व गावी कमी अधिक प्रमाणात मुसलमान वस्ती आढळते. त्यामुळे बहुतेक गावी एखादी मशीद असल्याचे दिसते. बाहेरगावाहून आलेल्या वाटसरूंना उतरण्यासाठी धर्मशाळा व चावडी या परंपरागत वास्तूही गावात दिसतात.

ब्रिटिश अमदानीत अशा पारंपरिक ग्रामीण नगरांचे ग्रामीण परिसरातील मध्यवर्ती स्थान लक्षात घेऊन ब्रिटिशांनी अशा गावात ॲलोपॅथीचे औषधोपचार उपलब्ध करून देणारा दवाखाना, जनावरांच्या औषधोपचारासाठी गुरांचा दवाखाना, पोस्ट ऑफिस, पोलीस कचेरी या सोयी उपलब्ध करून दिल्या.

गावाच्या वास्तुरचनेवर जाती व वर्णव्यवस्थेचा व पारंपरिक अधिकार व्यवस्थेचा प्रभाव पडल्याचे दिसते. जातीनिहाय घरांची रचना दिसते. एकाच जातीतील लोकांच्या वस्तीला आळी हा शब्द प्रचलित आहे. ब्राह्मण आळी, गुरव आळी, कासार आळी, माळी आळी इत्यादी जातीनिहाय घरांचे समूह दिसतात. आळीच्या ऐवजी वाडा, वाडी असाही शब्दप्रयोग केला जातो. गावात मध्यभागी बाजारपेठ असते व त्यातून प्रमुख रस्ता जातो. बहुधा गावामध्ये उत्तर-दक्षिण व पूर्व-पश्चिम असे किमान दोन प्रमुख रस्ते दिसतात. बाकीचे रस्ते लहान असतात. अगदी लहान व नागमोडी रस्त्यांना बोळ म्हणतात.

गावातील पारंपरिक पद्धतीची घरे स्थानिक हवामान व साधनसामग्री यांच्याशी जास्त मिळतीजुळती असत. देशावर ज्या भागात पावसाचे प्रमाण कमी असे त्या भागातील घरे मातीच्या विटा उन्हात वाळवून त्यांच्यापासून बांधलेली असत व घराचे छत लाकडी खांबावर लाकडाच्या तुळ्या टाकून दोन तुळ्यांमधील जागा लाकडाच्या लहान पट्ट्या टाकून झाकून घेतलेले असे. अशा दोन तुळ्यांमधील चौरसाला "खण" असे संबोधले जाते व घराचा आकार मोजण्याचे ते एक पारंपरिक मापन होते. घराच्या आकाराचे वर्णन करताना चारखणी, सहाखणी, सातखणी असे वर्णन करण्याची पद्धती होती. लाकडी पट्ट्या टाकून छत झाकून घेतल्यानंतर त्यावर माती टाकली जात असे. यालाच "माळवदी" घर संबोधले जाते. ज्या भागात पाऊस जास्त असे त्या भागात कौलारू घरे बांधत असत. गावातील सर्वात मोठे घर हे बहुधा देशमुख वा जहागीरदाराचे असे. या घराण्याला त्यांच्या ऐतिहासिक काळातील सैन्यातील कामगिरीबद्दल मुघल काळात अथवा मराठा काळात ही जहागीर मिळालेली असे. देशमुखाचा वाडा चौसोपी, एकापेक्षा अधिक चौक असलेला दिसतो. आर्थिक व सामाजिक दर्जानुसार वाडे लहान मोठे असतात. पारंपरिक वाड्याला मुख्य दरवाजा असून सुरुवातीला अंगण, अंगणापासून एक दीड फूट उंचीवर सोपा. हा घराचा दर्शनी भाग असतो. सोप्याच्या दरवाज्यातून आत गेल्यावर माजघर व माजघरातून आत गेल्यावर स्वयंपाकघर व त्यामागे परस अथवा परसू आणि अंगणात अथवा परसात

जनावरांचा गोठा व तुळशीवृंदावन असते.

ज्याप्रमाणे "मौजे" पद्धतीच्या खेड्याच्या वाड्या असतात त्याचप्रमाणे कसबा पद्धतीच्या गावाच्याही वाड्या असल्याचे दिसते व यांची संख्या जास्त दिसते. या वाड्यांमध्ये गावाच्या हद्दीत येणारी शेती करणारी कुटुंबे प्रामुख्याने दिसतात. गावात विविध कारागीर जाती, व्यापारी व इतर हुन्नर असलेले लोक प्रामुख्याने राहताना दिसतात. विविध कारागीर जातींच्या वास्तव्यामुळे "गाव" हे परिसरातील ग्रामीण जनतेच्या विविध गरजांची पूर्तता करणारे महत्त्वपूर्ण वेंद्र मानले जाते. सणावाराची, लग्न प्रसंगाची कापड खरेदी, दागिन्यांची खरेदी, भांडीकुंडी इत्यादी गोष्टींसाठी गावातील बाजार पेठेचाच उपयोग होतो. या खेरीज गावामध्ये दर आठवड्यातून एका ठराविक दिवशी बाजार भरविण्याचीही प्रथा आहे. अशा बाजारामध्ये गावाच्या परिसरातील ग्रामीण जनता आपला शेतमाल विक्रीला घेऊन येते. जनावरांची खरेदी-विक्रीही अशा बाजारात होत असते. यामुळे परिसरातील ग्रामीण जनताही गावातील आर्थिक व्यवहाराचा महत्त्वपूर्ण घटक बनते. खेड्यातील जनतेला विविध कारणासाठी सावकाराकडून कर्ज काढण्याची आवश्यकता भासते. केवळ आर्थिक संबंधानेच खेड्यातील लोक गावाशी जोडले जातात असे नसून धार्मिक व सांस्कृतिक बंधनांनीही ते गावाशी जोडलेले असतात. गावातील प्रमुख देवतेला परिसरातील ग्रामीण लोक मानाचे स्थान देतात व या देवतेच्या यात्रेत मोठ्या उत्साहाने भाग घेतात. ग्रामीण जनता आणि "गाव" यांच्यातील या सर्व परस्पर संबंधांचा विचार करता पारंपरिक गाव अथवा कसबा ग्रामीण समाजाचा महत्त्वपूर्ण घटक आहे ही गोष्ट आपल्या लक्षात येते.

नगरे

गाव आणि त्याभोवतीचा ग्रामीण परिसर यांचा मिळून बनलेला समाजघटक काही प्रमाणात स्वयंपूर्ण असला तरी तो सर्व बाबतीत स्वयंपूर्ण नसतो. शासकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या तो एका प्रादेशिक राज्याचा भाग असतो. मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रातील विविध प्रादेशिक भागांवर हिंदू अथवा मुसलमान राजांनी नियुक्त केलेल्या हिंदू सरदारांची सत्ता होती. त्यानंतरच्या काळात शिवाजी महाराजांनी महाराष्ट्राचा बराच भाग मराठी अमलाखाली आणला व या भागावर मराठे सरदारांचा अंमल सुरू झाला. पेशवाईत ही प्रक्रिया आणखी वाढीस लागली व त्यातून विविध सरदारांच्या आधिपत्याखालील प्रदेशाचे मिळून एक संघराज्य तयार झाले.[११] या संघराज्यसादृश घटकावर परकीय आक्रमणाचे संकट आल्यास सर्व सरदार आपापल्या जवळील सैन्य घेऊन लढाईत जात. अशा तऱ्हेने महाराष्ट्राच्या पारंपरिक समाजात सरदारांच्या आधिपत्याखालील प्रदेश हा एक महत्त्वपूर्ण सामाजिक, राजकीय घटक तयार झाला. अशा प्रादेशिक घटकांचा अधिपती या प्रदेशातील लोकांचा राजा म्हणून गणला जाऊ लागला व त्याचे राहण्याचे व राज्यकारभार चालविण्याचे नगर म्हणून राजधानी निर्माण झाली. राज्याच्या आकाराप्रमाणे राजधान्यांचा विस्तार झाला. सांगली, कोल्हापूर, सावंतवाडी, सातारा, मिरज, भोर, औंध, फलटण, जव्हार, नागपूर ही ऐतिहासिक काळात राजधानी म्हणून विकास झालेली महाराष्ट्रातील काही नगरे होत. पुणे येथे पेशव्यांच्या संपूर्ण संघराज्याची राजधानी होती. या राजधानी नगरांची वास्तुशास्त्रीय, तसेच सामाजिक जडणघडण यावरही प्रशासनिक कार्याच्या गरजा, या कार्यासाठी नगरात वसविलेल्या विविध जातींच्या समाजाच्या गरजा, तसेच राजघराण्याच्या सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक परंपरा यांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.

मोठ्या प्रदेशावर राज्य करणाऱ्या राजाला प्रजेवर राज्य करताना नाते व जात यापेक्षा व्यापक आधार देण्याची आवश्यकता भासे व हा आधार त्याला वर्णाश्रम धर्माच्या मूल्यातून मिळत असे.[१२] राज्य करणे हा क्षत्रियांचा धर्म ही धार्मिक व सामाजिक श्रद्धा त्याला आधारभूत वाटे व राज्यकारभार करताना आपल्यापुढे तो क्षत्रियधर्मीय राजाचा आदर्श ठेवी. वर्णाश्रम धर्माचे रक्षण करणे ही राजाची जबाबदारी आहे, असे तो मानू लागे व त्याप्रमाणे आपले लोकव्यवहार करत असे. याचा दृश्यपरिणाम म्हणजे पुराणोक्त देवदेवतांना राजधानीतील धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. राजघराण्यातील कुलदैवत म्हणून राम, शिव, गणपती, अंबाबाई, भवानी यासारख्या पुराणोक्त देवताच मान्यता पावल्या. एखाद्या जनदेवतेला हे स्थान क्वचितच देण्यात येई व असे झाल्यास अशा जनदेवतेचे संस्कृतीकरण झाल्याचे आपणास दिसते. राजधानीतील सर्वात मोठे मंदिर हे एखाद्या पुराणोक्त देवतेचे असल्याचे दिसते.

राजधानीच्या नगरात राजवाडा, प्रमुख देवतेचे मंदिर, शासकीय कार्यालयांच्या इमारती या वास्तू उठून दिसतात. राजधानीत मोठे रस्ते, सांडपाण्याची व्यवस्था व विविध जातींचे मोहल्ले दिसून येतात. लोकवस्तीमध्ये केवळ उपयुक्त सेवा करणाऱ्या जातींचेच नव्हे तर चित्रकार, संगीतकार यासारखे कलावंतही राजाश्रयाने आपल्या कलेची साधना करीत असत. आज राजाश्रय नसला तरी लोकाश्रयावर कलावंत कार्यरत आहेत.

छोट्या नगरांच्या तुलनेने राजधानी असलेल्या नगरातील घरांची रचना तसेच एकूण नगररचना वैशिष्ट्यपूर्ण होती. राजधानी व त्यासारखी मोठी शहरे यांना परकीय आक्रमणाचा धोका अधिक असल्यामुळे तेथील घरे व वाडे यांची रचना अंतर्मुख असे. घरांच्या व वाडयाच्या रचनेत तळघरे व भुयारे यांना महत्त्वाचे स्थान होत. नगराभोवती कोट असत. त्याचप्रमाणे धर्मशाळा, तलाव, घाट, पुष्करिणी, छत्र्या, समाध्या बांधल्या जात असत.[१३]

ऐतिहासिक काळात महाराष्ट्रावर उत्तरेतून व दक्षिणेतून नेहमीच आक्रमणे होत असत. या आक्रमणांपासून बचाव करण्यासाठी येथील राज्यकर्त्यांची दृष्टी पर्वतराईकडे गेली व यातील सुयोग्य डोंगरांवर किल्ले बांधून तेथे संरक्षणाच्या दृष्टीने छोटी नगरे निर्माण करण्यात आली. अशा किल्ल्यांवर राजा व त्याच्या परिवाराला राहण्यासाठी वाडे, सैनिकांच्या छावण्या व इतर अत्यावश्यक कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी घरे असत. गडावरील लोकांच्या विविध गरजा पुरविण्याच्या दृष्टीने गडाच्या पायथ्याला तसेच गडाच्या वाटेच्या मध्यावर जेथे थोडी सपाटीची जागा अस्तित्वात असे अशा ठिकाणीही वस्ती असल्याचे दिसते. अशा वस्त्यांच्या नावापाठीमागे "मेट" हा उपसर्ग लावण्याची पद्धत आहे. पेट-गोतड, मेट-तळे ही प्रतापगडला जाताना लागणारी खेडी डोंगरचढणीच्या मध्यावर वसल्याचे दिसते.

यादव काळात देवगिरी म्हणजेच औरंगाबादजवळील दौलताबादचा किल्ला हा महाराष्ट्रातील एक सुप्रसिद्ध किल्ला. अनेक नव्या किल्ल्यांची बांधणी व अस्तित्वात असलेल्या किल्ल्यांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम स्वराज्याच्या स्थापनेच्या वेळी शिवाजी महाराजांनी हाती घेतला होता. त्यावेळी त्यांनी तीनशे गड बांधले अथवा दुरुस्त केले असे इतिहासातील पुराव्यांवरून दिसते. इरावती कर्वे यांनी तीन ग्रंथांच्या पुराव्यांच्या आधारे महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील एकूण २३५ किल्ल्यांची आकडेवारी तयार केली आहे. ही माहिती तक्ता क्रमांक १ मध्ये दिली आहे. या तक्त्यावरून दिसते की, कोकणातील जिल्ह्यांत सर्वात जास्त म्हणजे १११ किल्ले आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील नाशिक, पुणे, व सातारा या तीन जिल्ह्यांत मिळून ७७ किल्ले आहेत. सर्वात कमी संख्या उस्मानाबाद, औरंगाबाद, नागपूर या जिल्ह्यांत दिसते. तक्त्यात दिलेल्या १४ जिल्ह्यांखेरीज महाराष्ट्रातील बाकीच्या जिल्ह्यांत डोंगरी किल्ले आढळत नाहीत.[१४] अलिकडे होत असलेल्या गवेषणातून महाराष्ट्रातील अनेक किल्ल्यांची माहिती स्पष्ट होत आहे.

तक्ता क्रमांक १

महाराष्ट्रातील किल्ले

जिल्हा	किल्ल्यांची संख्या	जिल्हा	किल्ल्यांची संख्या
अ) किनारपट्टीवरील जिल्हे :		ब) पश्चिमी डोंगराळ जिल्हे :	
ठाणे	४०	नाशिक	३७
रत्नागिरी	४०	पुणे	१३
रायगड	३१	सातारा	२७
एकूण	१११	एकूण	७७
क) दक्षिण महाराष्ट्रातील जिल्हे		ड) इतर जिल्हे :	
कोल्हापूर	१३	अहमदनगर	१०
सिंधुदुर्ग	७	सोलापूर	४
सांगली	७	उस्मानाबाद	१
		औरंगाबाद	३
		नागपूर	२
एकूण	२७	एकूणं	२०
		एकूणं	२३५

डोंगरावर किल्ले बांधण्याचा उद्देश परकीय आक्रमणापासून प्रदेशाचे रक्षण करणे हा होता. महाराष्ट्रातील डोंगरातून सुंदर शैलगृहे अथवा लेणींच्या रूपाने बौद्ध, हिंदू व जैन धर्मातील धार्मिक श्रद्धांना मूर्तरूपही देण्यात आले. या लेणींमध्ये राहून बौद्ध भिक्षू, साधू, संन्यायी धर्मचिंतन व अध्ययन करीत असत. धार्मिक कार्याखेरीज लेणी महत्त्वाचे आर्थिक कार्यही करीत असत. निवाऱ्याची सोय, माल ठेवण्यासाठी जागा आणि व्यापाऱ्यांच्या तांड्यासाठी पतपेढी या सोयी लेणी उपलब्ध करून देत असत.१५ पांथस्थांना निवारा म्हणून देखील अशा लेणींजवळ सोय केलेली असे. तसेच प्रवाशांना व जनावरांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था असे. महाराष्ट्रातील पहिल्या शैलगृहांची निर्मिती इ.स. पूर्व दुसऱ्या शतकात झाली. बौद्धधर्मीयांच्या पावलावर पाऊल टाकून जैन व हिंदूंनीही शैलगृहांची निर्मिती केली. शेवटच्या शैलगृहांची निर्मिती राष्ट्रकूट घराण्यातील कृष्ण या राजाच्या आश्रयाखाली इ. स. ७५० ते ८५० या कालखंडात झाली.

Maharashtra State Gazetteers

यानंतरच्या कालखंडात शैलगृहांची निर्मिती थांबली. भारतातील एकूण १,२०० कोरीव लेणीपैकी, म्हणजेच शैलगृहांपैकी, १,१०० लेणी महाराष्ट्रात आहेत. यातील बरीचशी शैलगृहे ऐतिहासिककालीन व्यापारी मार्गानजीक निर्मिल्याचे दिसते.

या शैलगृहांचे वास्तुशिल्पाविषयी वास्तुशिल्पज्ञ माधव अचवल लिहितात : "अगदी प्रारंभीच्या काळात खोदली गेलेली लेणी त्या त्या डोंगराच्या पायथ्याशी सापडतात. ती अतिशय साधी, लहान, ओबडधोबड अशी होती. त्यांच्यातील खोदलेले खांब हे साधे चौकोनी व वरच्या प्रचंड दगडाचा भार सहन करण्याकरिता तिरके असलेले आढळतात. नंतरच्या काळातील लेणी क्रमशः डोंगराच्या वरच्या भागात व अखेरीस टोकाजवळ कोरलेली असत. या लेणींमध्ये खांबाच्या रांगा असलेले विस्तृत सभामंडप, विहार व चैत्यगृह असत. आतल्या अवकाशाला प्रमाणबद्धता यावी यासाठी उंचीही अधिक असे व त्या मंडपाचे छत सपाट किंवा "शैलगुहाकार" असून कोरलेले असे. खांब व तुळ्या देखील अधिक सौष्ठवपूर्ण असत आणि सभामंडपाच्या भिंती शिल्पपटल अथवा चित्रांनी सुशोभित केलेल्या असत. आतल्या भागात प्रकाश यावा यासाठी काही लेणींमध्ये प्रवेशद्वाराच्या खांबावर ठेवलेल्या दगडी तुळईवर एक पिंपळाच्या पानाच्या आकाराचे भव्य गवाक्ष असे. त्याचा आकार कमानीचा होता. पण ती रचलेली कमान नव्हती. एकसंघ शिलेतून कोरलेली कमान होती.[१६] यादव काळात मोठ्या प्रमाणात मंदिरांची निर्मिती झाली.

तेराव्या शतकानंतर महाराष्ट्रावर मुसलमानी सत्तेचे आक्रमण झाले व तेव्हापासून नवीन शैलगृहांची निर्मिती जवळ जवळ बंद झाली. अस्तित्वात असलेल्या शैलगृहांवर माती जमा होऊन त्यावर झाडाझुडपांची वाढ झाल्यामुळे ती अज्ञातात गेली. ब्रिटिश काळात त्यांचा शोध लागला. इंग्लिश पुरातत्त्वशास्त्रज्ञ जेम्स फर्ग्युसन आणि जेम्स बर्जेस यांनी काही शैलगृहांचा शोध लावला व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे हे महत्त्वाचे दालन पुन्हा समाजजीवनात प्रविष्ट झाले.

ऐतिहासिक काळात शैलगृहांद्वारा पारंपरिक धार्मिक श्रद्धांची अभिव्यक्ती सौंदर्य कल्पनांच्या माध्यमातून झाली. त्याचप्रमाणे काही विशिष्ट प्रकारच्या नगरांतून धार्मिक श्रध्दांची अभिव्यक्ती झाली व ही नगरे जनतेच्या धार्मिक जीवनाचे महत्त्वपूर्ण घटक बनलीत. तीर्थक्षेत्रे अथवा धार्मिक क्षेत्रे या नावाने ही नगरे ओळखली जातात व ती पारंपरिक नागरी संस्कृतीचे महत्त्वपूर्ण पैलू आहेत. या धार्मिक नगरांची वास्तुरचना व अशा नगरांची सामाजिक जडणघडण इतर नगरांपेक्षा वैशिष्ट्यपूर्ण व निराळी असते. अशा नगरांच्या वास्तुशिल्पावर धार्मिक श्रद्धांचाही प्रभाव पडल्याचे दिसते. ही नगरे लोकसंख्येच्या दृष्टीने दोन-तीन हजार लोकसंख्येइतक्या लहान आकारापासून मोठ्या म्हणजे २५ ते ५० हजारांच्या आसपास लोकसंख्या असलेली होती. या धार्मिक नगरांचे वर्गीकरण निरनिराळ्या दृष्टिकोनातून करता येईल. हिंदू धार्मिक जीवनाचे प्रदेशाच्या व्याप्तीवर अथवा विस्तारावर चार स्तर दिसतात. : अखिल भारतीय, द्वीपकल्पी, प्रादेशिक व उप-प्रादेशिक. अखिल भारतीय स्तरावर शिव, विष्णू, राम, कृष्ण या देवतांना मान्यता मिळाली आहे. द्वीपकल्पीस्तर म्हणजे दक्षिण भारतातील प्रदेशात मान्यता प्राप्त झालेल्या देवतांचा स्तर. प्रादेशिक स्तर म्हणजे संपूर्ण महाराष्ट्रात मान्यता प्राप्त झालेल्या देवताचा स्तर व उप-प्रादेशिक स्तर म्हणजे महाराष्ट्रातील विशिष्ट प्रदेशातच मान्यता असलेल्या देवतांचा स्तर होय.१७ महाराष्ट्रात या चार स्तरांवरील देवतांशी निगडित नगरे आढळतात. अखिल भारतीय स्तरावर मान्यता प्राप्त झालेले महाराष्ट्रातील एकमेव धार्मिक नगर म्हणजे नाशिक. रामाच्या वनवासातील जीवनाशी संबंधित असलेले हे नगर. द्वीपकल्पी स्तरावर आंध्र, कर्नाटक या प्रदेशांतही मान्यता पावलेली देवता म्हणजे विठ्ठल व विठ्ठलाचे नगर ते पंढरपूर. संपूर्ण महाराष्ट्राच्या स्तरावर मान्यता असलेली नगरे म्हणजे तुळजापूर (भवानी), जेजुरी (खंडोबा) व वाई (दक्षिण काशी), उपोंप्रादेशिक स्तरावर अमरावती, आंबेजोगाई, कोल्हापूर, नांदेड जिल्ह्यातील माहूर या देवींच्या उपासनेभोवती निर्माण झालेल्या नगरांचा, तसेच कोकणातील परशुराम मंदिर असलेले चिपळूणजवळील पेढे, तसेच सातारा जिल्ह्यातील शिवाचे प्राचीन मंदिर असलेले शिखर शिंगणापूर इत्यादी नगरांचा अंतर्भाव करता येईल.

वर उल्लेखिलेल्या प्रमुख पौराणिक देवतांच्याभोवती तयार झालेल्या नगरांखेरीज प्रमुख संप्रदायांच्या उपास्यदेवतेभोवतीही काही नगरे तयार झाली आहेत. यातील काही प्रमुख नगरांचा उल्लेख संप्रदायानुसार खाली केला आहे.

दत्त संप्रदाय : औदुंबर, नरसोबावाडी, माहूर व कारंजे.

गणेश संप्रदाय : मोरगाव, सिद्धटेक, पाली, महड, थेऊर, लेण्याद्री, ओझर आणि रांजणगाव ही अष्टविनायकांची स्थाने. याखेरीज गणपतीपुळे व नागपूरजवळील अदासा.

महानुभाव संप्रदाय : फलटण, माहूर आणि ऋद्धिपूर.

भारतातील बारा पवित्र ज्योतिर्लिंगांपैकी पाच महाराष्ट्रात म्हणजे त्रिंबकेश्वर, घृष्णेश्वर, भीमा शंकर, औंढा नागनाथ व परळी वैजनाथ येथे आहेत. महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारतातून बरेच भाविक येथे येतात. महान शिख गुरू

गोविदसिंगजी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ नांदेडला गुरुद्वारा सचखंड श्री हुजुर अबचलनगर साहेब नामक गुरुद्वारा आहे. शिख धर्मीयांचे हे अखिल भारतीय पातळीवरील महान तीर्थक्षेत्र असून येथे सर्व देशातून भाविक जन येतात. मुख्य गुरुद्वाराव्यतिरिक्त नांदेडला सात लहान गुरुद्वारा आहेत. मुसलमान बांधवांची देखील बरीच प्रार्थनास्थळे महाराष्ट्रात आहेत.

सांप्रदायिक क्षेत्रे

तीर्थक्षेत्रांखेरीज विविध साधुसंतांच्या जीवनकार्यांशी संबंधित असलेल्या गावांचाही धार्मिक नगरात समावेश होतो. आळंदी, देहू, चाफळ, सज्जनगड, पैठण, मंगळवेढे, शेगाव, शिर्डी इत्यादी गावेही अशा क्षेत्रांची उदाहरणे आहेत.

धार्मिक नगरांच्या वास्तुरचनेवर तसेच लोकसंख्येच्या रचनेवर धार्मिक श्रध्दांचा प्रभाव पडल्याचे दिसते. मध्यवर्ती ठिकाणचे प्रमुख मंदिर व त्याकडे जाणारे गावातील मार्ग, प्रदक्षिणा मार्ग इत्यादी गोष्टी अशा नगरात पहावयास मिळतात. भाविकांच्या विविध धार्मिक विधींच्या गरजा भागविणारा वर्ग म्हणजे पुजारी, पुरोहित तसेच फुले, कुंकू, गुलाल इत्यादी पूजा साहित्य विकणारे आणि मिठाईवाले अशा नगरात बरेच असल्याचे दिसते. नगराच्या महत्त्वानुसार तांबे, पितळ यांची विशेषतापूर्ण घडणीची भांडी बनविणारे, तसेच सोन्याचांदीचे दागिने आणि चांदीची भांडी बनविणारा वर्गही मोठ्या धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी दिसतो. भाविक जनतेला पवित्र स्नान करता यावे यासाठी नद्यांना ठिकठिकाणी घाट बांधलेले आहेत. वाई हे तीर्थक्षेत्र तेथील घाटांसाठी प्रसिद्ध आहे. तीर्थक्षेत्री अस्थिविसर्जन, श्राद्ध यासारखे अंत्यविधी केल्याने पितरांना स्वर्ग मिळतो अशी श्रद्धा असल्यामुळे या कार्यांशी संबंधित असलेल्या पुरोहितांचा वर्ग तसेच केशवपनासाठी नापितांचा वर्ग नाशिक व त्रिंबकेश्वरसारख्या तीर्थक्षेत्री असल्याचे दिसते.

नाशिक हे अखिल भारतीय स्तरावर मान्यता प्राप्त झालेले महाराष्ट्रातील एकमेव हिंदू तीर्थक्षेत्र होय. नाशिकच्या जडणघडणीत वर वर्णन केलेली बरीच वैशिष्ट्ये पाहावयास मिळतात. दर बारा वर्षानंतर येणाऱ्या सिंहस्थ पर्वणीच्या वेळी नाशिक व जवळच्या त्रिंबकेश्वरला कुंभमेळा भरविण्यात येतो व त्यावेळी भारताच्या कानाकोपऱ्यातून यात्रेकरू नाशिकला येत असतात. कुंभमेळ्याची प्रथा अनेक शतके चालू असल्याचे दिसते. ब्रिटिश राजवटीत दळणवळणाची साधने अधिक सुकर झाल्यामुळे कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे खाली दिलेल्या आकडेवाडीवरून दिसते :-

कुंभमेळ्याचे वर्ष	यात्रेकरूंची संख्या
१८८४-८५	१,५०,०००
१९०८-०९	४,२६,०००
१९२०-२१	४,९५,४८९
१९३१-३२	११,१९३
१९५६-५७	५,९८,७६९

१९३१-३२ साली आर्थिक मंदीमुळे यात्रकरूंच्या संख्येत मोठी घट झाली होती.[१८] इ. स. १४७० पासून नाशिकला राजस्थान, पंजाब, मध्यप्रदेश आणि वऱ्हाड येथील संस्थानिकांचा व धनिकांचा तसेच मुंबईच्या भाटियांचा आश्रय मिळू लागल्याचे ऐतिहासिक पुराव्यांवरून दिसते. या आश्रयामुळेही तीर्थक्षेत्र म्हणून नाशिकचा ऐतिहासिक काळापासून विकास होत असल्याचे दिसते. नाशिकोंत्रिंबकेश्वरला १९६७-६८, १९७९-८० व १४ ऑगस्ट १९९१ ते ११ ऑगस्ट १९९२ या काळात कुंभमेळा भरला होता.

नाशिकला १८ मोठी व अनेक छोटी मंदिरे आहेत. यातील काळारामाचे मंदिर व सुंदर नारायणाचे मंदिर सर्वात जुने आहे. रामाच्या वास्तव्याने पवित्र झालेल्या भूमीचे दर्शन घेण्याकरिता, तसेच श्राद्ध, अस्थिविसर्जन आणि अन्त्यक्रिया करण्यासाठी भाविक जनता नाशिकला मोठ्या संख्येने येत असते. त्यामुळे धार्मिक विधीसाठी लागणारा पुरोहित वर्ग, तसेच न्हावी व धर्मकार्यात लागणाऱ्या विविध वस्तूंचे उत्पादन व विक्री करणारा वर्ग नाशिकमध्ये स्थायिक झाला आहे. पुरोहितांमध्ये चार प्रकारचे पुरोहित दिसतात :- सर्वसाधारणपणे नेहमी करावे लागणारे धार्मिक विधींचे पौरोहित्य करणारे क्षेत्रोपाध्याय, फक्त श्राद्ध विधी करणारे पुरोहित, देवालयात विविध सेवा करणारे पुरोहित आणि कौटुंबिक धार्मिक विधी करणारे पुरोहित. १८८३ साली नाशिक येथे पुरोहिताचा व्यवसाय करणारी १,३०० ब्राह्मण कुटुंबे होती. यामध्ये शुक्ल यजुर्वेदी, माध्यंदिन ब्राह्मणांची ५०० कुटुंबे होती. ही माध्यंदिन ब्राह्मण कुटुंबे गुजरातमधून नाशिकला

आली असावीत. माध्यंदिन ब्राह्मणांखेरीज कोकणस्थ व देशस्थ ऋग्वेशी ब्राह्मणही पुरोहिताच्या व्यवसायामध्ये होते.

धार्मिक आचरणाच्या अंगाने काही कारागिरीच्या व्यवसायांचाही नाशिकमध्ये विकास झाला. नाशिकला येणारे यात्रेकरू आपल्याबरोबर गोदावरीचे पवित्र पाणी तांब्याच्या गडूत व तत्सम आकाराच्या भांड्यामध्ये घेऊन जातात. यातून तांबटांच्या व्यवसायाचा तेथे विकास झाला. गंगेच्या गडूबरोबर इतरही वैशिष्ट्यपूर्ण घडणीची तांब्याोंपितळेची भांडी हे कारागीर बनवू लागले व यांनाही यात्रेकरूंकडून मागणी चालू राहिली. नाशिकला येणाऱ्या श्रीमंत व सरदार घराण्यांतील यात्रेकरूंकडून सोन्याचे दागिने व चांदीच्या भांड्यांना मागणी असते. तांबट आणि सोनार यांच्याशिवाय निरनिराळे पूजासाहित्य तयार करून विकणाऱ्या लोकांनाही नाशिकच्या परंपरागत आर्थिक क्षेत्रात स्थान मिळाले. अशा सर्व बाजूंनी स्वातंत्र्यपूर्व काळात नाशिकचा भारतातील एक प्रमुख धार्मिक नगर म्हणून विकास झाला. स्वातंत्र्योत्तर काळात या विकासाच्या प्रक्रियेत आधुनिक उद्योगांच्या वाढीने भर घातली.

महाराष्ट्रात ज्याप्रमाणे राजधानीचा व धार्मिक नगरांचा विकास झाला त्याचप्रमाणे काही व्यापारी बंदरांचा व औद्योगिक नगरांचाही ऐतिहासिक काळात विकास झाल्याचे दिसते. सतराव्या शतकात कोकणात चौल, दाभोळ, दंडोंराजपुरी, राजापूर आणि वेंगुर्ला ही नगरे प्रमुख व्यापारी बंदरे म्हणून मान्यता पावली होती.[१९] चौल आणि दाभोळ येथील व्यापारी विविध प्रकारचे कापड व मसाल्याचे पदार्थ विक्रीसाठी एडनला घेऊन जात असे ऐतिहासिक पुराव्यावरून दिसते. १६७४ मध्ये चौल नगरात आग लागली. त्यामुळे या नगरातील कारागिरांनी मुंबईला स्थलांतर केले. वेंगुर्ला हे रंग व्यवसाय आणि मसाल्याच्या पदार्थांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होते. त्याप्रमाणे उत्पादन वेंग्द्र म्हणून कोल्हापूर, सोलापूर, संगमेश्वर, खारेपाटण, नंदुरबार आणि धरणगाव या नगरांचा विकास झाला होता. परंपरागत काळातील महाराष्ट्रातील व्यापार दख्खनी आणि परदेशी मुसलमान, गुजराती व्यापारी आणि युरोपियन यांच्या हातात होता. महाराष्ट्रातील कुठलीही एतद्देशीय जात पूर्वी व्यापारी क्षेत्रात नव्हती. त्यामुळे व्यापारी व उद्योगप्रधान नगरांची वाढ परंपरागत काळात महाराष्ट्रात फारशी झाली नाही.[२०]

परंपरागत नागरी जीवनाचा विकास लक्षात घेता असे म्हणावे लागते की, महाराष्ट्रात मर्यादित प्रमाणातच नागरी जीवनाचा विकास झाला व येथील समाजजीवनाची एकूण प्रकृती ग्रामीण स्वरूपाची राहिली. सतत एक हजार वर्षे अस्तित्व असलेली आणि सतत एक लाख लोकवस्ती असलेली नगरे महाराष्ट्रात दिसत नाहीत.[२१] महाराष्ट्राची राजधानी असलेले व जगातील प्रमुख महानगरांमध्ये गणना होत असलेले मुंबई या महानगराच्या जडणघडणीत महाराष्ट्राच्या सुरुवातीला पोर्तुगीज व त्यानंतरच्या कालखंडात ब्रिटिश राज्यसत्ता व संस्कृतीचा फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील परंपरागत ग्रामीण आणि नागरी समुहांच्या आतापर्यंत केलेल्या विवेचनावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, येथे परंपरागत कालखंडात नागरी जीवन जरी विकसित झाले होते तरी ग्रामीण समाजच वेंग्द्रस्थानी होता. ग्रामीण समाजाच्या विविध गरजांच्या पूर्तीच्या अनुषंगाने निरनिराळ्या प्रकारच्या नगरांचा विकास झाला व कृषिप्रधान आर्थिक व सामाजिक जीवन हाच एकूण समाजव्यवस्थेचा पाया राहिला. जमीन महसुलाच्या रूपाने ग्रामीण क्षेत्रातून मिळणारे उत्पन्न हे एकूण राज्याच्या उत्पन्नाचा महत्त्वाचा भाग असे व हे उत्पन्न निर्वेधपणे व नियमितपणे मिळावे याची काळची राज्यकर्ते आपापल्या जमीन महसूल पद्धतीच्या परिणामकारक अंमलबजावणीने करीत असत. यातून ग्रामीण व नागरी समूहांना एकत्र जोडणारे प्रशासनिक अनुबंध तयार झाले व त्यामुळे ग्रामीण व नागरी समूह एकमेकांपासून पूर्णपणे अलग न राहता त्यांचे मर्यादित प्रमाणात परस्परांशी संबंध प्रस्थापित झाले. यादृष्टीने परंपरागत कालखंडात जमीन महसूल व्यवस्था कशा प्रकारची होती याचा थोडक्यात आढावा घेणे उचित आहे.

महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाच्या प्रशासन व्यवस्थेची सुरूवात प्राचीन कालखंडात झाल्याचे दिसते. सुरुवातीच्या काळात महाराष्ट्रावर हिंदू राजांचा अंमल होता. सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव ही प्रमुख राजघराणी होती. शेवटच्या यादव घराण्याच्या कारकिर्दीत महाराष्ट्रातील संस्कृतीच्या बऱ्याच अंगांचा विकास होऊ लागल्याचे दिसते. यादवकालीन महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाविषयी व त्याच्या प्रशासनाविषयीची थोडीफार माहिती मिळते. यादव काळात (इ. स. ९७३-१३१८) गावाच्या पाटलासाठी ग्रामकूट चौधरी व चौगुला हे शब्द वापरत असत. ग्रामसमिती या नावाने ग्रामपंचायत अस्तित्वात होती व तिच्या सदस्यांना महत्तर म्हणत असत. या कालखंडात बलुतेदारांची संख्या १८ पर्यंत गेल्याचे दिसते. ग्राम व पूर, भक्ती, मंडल, विषय व राष्ट्र असे चढत्या श्रेणीचे प्रादेशिक घटक होते. अलाउद्दीन खलजी याने रामदेवराव याचा पराभव केल्यानंतर हरपालदेव गादीवर आला व त्याचाही वध झाल्यानंतर महाराष्ट्रावर इ. स. १३१८ मध्ये उत्तरेतील खलजी सुलतानांची रावजट सुरू झाली.

बहमनी राजवटीत (१३४७ मध्ये प्रारंभ) खेडी स्वयंपूर्ण होती. बहमनी सुलतानांनी पाटील व देशमुख यांचे अधिकार व वतने यास मान्यता दिली होती. इ. स. १४९० साली बहमनी सत्ता नष्ट होऊन त्याचे पाच तुकडे झाले व त्यातील गोवळकोंडा विभागावर कुतुबशाही, अहमदनगर विभागावर निझामशाही, वऱ्हाडवर इमादशाही, बिदर विभागावर

बरिदशाही व विजापूर विभागावर आदिलशाही या राजवटी राज्य करू लागल्या.[२२] दक्षिण मुसलमानी राज्यात तालुका, महाल, समंत, कर्यात, परगणा हे प्रशासकीय घटक अस्तित्वात होते. मुसलमानी अमलाआधी बेवारशी जमीन कोणीही कसावयास घेऊ शकत असे, परंतु मुसलमानी राजवटीपासून ती राजांच्या ताब्यात आली.

मराठेशाहीच्या कालखंडात महाल (१५० ते २०० गावे), सुभा (दोन अथवा तीन महाल) व प्रांत हे प्रशासकीय घटक होते. त्यावर महालकरी व सुभेदार हे अधिकारी नेमले असत. जमीन महसूल गोळा करण्याची संपूर्ण जबाबदारी पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे या परंपरागत अधिकाऱ्यांच्यावर न सोपविता प्रामुख्याने महालकरी व सुभेदार यांच्यावर सोपविली.[२३] पेशवाईमध्ये मामलेदार व सरसुभेदार ही प्रशासकीय पदे अस्तित्वात होती. मामलेदाराची नेमणूक मध्यवर्ती सरकारद्वारा होत असे. पाटील हा खेड्यातील जनतेच्या हिताचे रक्षण करणारा स्थानिक अधिकारी तर मामलेदार केंद्र शासनाचे हितसंबंध जपणारा अधिकारी होता. या दोघांच्यामध्ये देशमुख आपली भूमिका बजावीत असे. गावातील जमिनीची विक्री पाटलाच्या संमतीवाचून होत नसे व असा निर्णय ग्रामपंचायतीमध्ये सर्वांच्या संमतीनेच होत असे.[२४] शेतकऱ्यांमध्ये मिरासदार व उपरी असे दोन प्रकार होते. ज्यांच्याकडे वंशपरंपरेने मिळालेली जमीन आहे त्यांना मिरासदार व जे मिरासदारांकडून सालिना पट्ट्याने जमीन कसण्यासाठी घेत त्यांना उपरी म्हणत. जमीनधारा देण्याच्या संदर्भात "जथा" हा घटक महत्त्वपूर्ण मानला जात असे. जथा हा काही मिरासदार कुटुंबांचा समूह असे. प्रत्येक जथ्याला रिवाजाप्रमाणे सरकारकडे जमीन महसूल भरावा लागत असे. काही अडचणीमुळे शेतसारा देणे थकल्यास पाटील मध्यस्थी करीत असे व वेळ पडल्यास सावकाराकडून कर्ज मिळवून जमीन महसूल भरण्याची व्यवस्था करीत असे. पाटलाच्या मध्यस्थीने कर्ज मिळत असल्यामुळे कर्जफेडीसाठी जमिनीची विक्री होत नसे. शेतसाऱ्याची रक्कम जरी केंद्र सरकारने ठरविलेली असली तरी त्यात लवचिकता असे. दुष्काळ व परकीय आक्रमणाचे संकट आल्यास शेतसाऱ्याची रक्कम कमी अथवा माफही केली जात असे. त्यामुळे शेतकऱ्यांवर परागंदा होण्याची वेळ सहसा येत नसे. पेशवाईच्या अखेरीस मात्र दुसऱ्या बाजीराव पेशव्याने लिलाव पद्धतीचा वापर सुरू केल्यामुळे शेतकऱ्यांची परिस्थिती खडतर झाल्याचे चित्र दिसते.

पेशवाई संपून महाराष्ट्र ब्रिटिश शासनाखाली आल्यावर पारंपरिक जमीन महसूल व्यवस्थेची जागा "रयतवारी" पद्धतीने घेतली व त्यामुळे शेतकरी आणि सरकार यांचे जमीन महसूल देण्याच्या व्यवहारात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाले. यामुळे परंपरागत पद्धतीमधील पाटलाची रयत आणि सरकार यांच्यामधील मध्यस्थाची भूमिका जशी संपुष्टात आली तसेच पाटलाचे रयतेला सावकारांपासून मिळणारे संरक्षणही संपुष्टात आले. नवीन परिस्थितीत जमीन विक्री होऊ लागली व त्यामुळे शेतकऱ्यांच्या भोवतीचा सावकारी पाश वाढू लागला. ब्रिटिश सरकारचे जमीन महसुली धोरण ताठर झाल्यामुळे दुष्काळ व विविध संकटाच्या प्रसंगीही शेतसारा भरण्यात कुठल्याही प्रकारची सुट शेतकऱ्याला शासन देत नसे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनी हळूहळू सावकारांच्या ताब्यात जाऊ लागल्या व अनेक शेतकऱ्यांना उपजीविकेसाठी शहरांत जाणे भाग पडू लागले.

ब्रिटिश अमदानीत खेडे हा जमीन महसुलाच्या संदर्भात प्रशासकीय घटक म्हणून मानण्यात येऊ लागला. प्रशासकीय कार्यासाठी मुलकी पाटील व पोलीस पाटील अशी दोन पदे निर्माण करण्यात आली. मुलकी पाटलाकडे जमीन महसुलांसबंधीची तर पोलीस पाटलाकडे कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सोपविण्यात आली व त्यांना त्यांच्या सेबेबद्दल पगार ठरविण्यात आला. पाटलाप्रमाणे गावच्या दप्तराचे सर्व काम बघणारा कुलकर्णी वेतनी नोकर झाला. अनेक खेड्यांचा तालुका हा प्रशासकीय घटक तयार करण्यात आला व त्यावर मामलेदार हा प्रशासकीय अधिकारी नेमण्यात आला. तालुक्याच्या प्रशासकीय कचेऱ्या तालुक्यातील मध्यवर्ती गावांत उभारण्यात आल्या व त्यामुळे अशा गावांची नगराच्या दिशेने वाढ होऊ लागली. तालुक्यापेक्षा थोडा लहान प्रशासकीय घटक म्हणजे पेटा अथवा महाल व यावरील अधिकाऱ्यास महालकरी म्हणण्यात येत असे. काही जिल्ह्यांचा इलाखा हे प्रशासकीय घटक अस्तित्वात आले. संपूर्ण भारताची विभागणी निरनिराळ्या इलाख्यात अथवा प्रांतामध्ये करण्यात आली. आजच्या महाराष्ट्रातील बराच प्रदेश मुंबई इलाख्यात समाविष्ट होता. मराठी भाषिक प्रदेशाखेरीज गुजराती, सिंधी व कन्नड भाषिक प्रदेशांतील काही भाग मुंबई इलाख्यात समाविष्ट होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भाषावर प्रांत तयार करण्याचे धोरण आले. जिल्ह्याचे प्रशासकीय केंद्र असलेल्या गावाचे रूपांतर आता नगरात झाले. इलाख्याची राजधानी म्हणून मुंबईची निवड करण्यात आली व स्वातंत्र्योत्तर काळातही महाराष्ट्राची राजधानी म्हणून मुंबईचा दर्जा कायम राहिला. पेशवाईत मात्र हा मान पुण्याला मिळाला होता.

नागरीकरण

प्राचीन काळापासून इंग्रजांच्या आगमनापर्यंत महाराष्ट्राची संपूर्ण समाजरचना कृषिप्रधान व ग्रामप्रधान होती. परंतु ब्रिटिश राजवटीपासून या स्वरूपामध्ये बदल घडून येऊ लागले. अधिक महसूल मिळविण्याच्या उद्देशाने ब्रिटिश शासनाने अमलात आणलेली रयतवारी जमीनधारा पद्धती, सावकार व शेतकरी यांच्या संबंधीची बदललेली कायद्याची चौकट, कापड गिरण्या तसेच आधुनिक कारखानदारीची वाढ, रेल्वे व्यवस्था, टपाल व्यवस्था इत्यादी कारणांमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण समाज व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडून येऊ लागले.

रेल्वे अस्तित्वात आल्यामुळे (१८५३) नागरीकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. भौतिक सुधारणांचा परिणाम महाराष्ट्रातील ग्रामीण समाजाच्या अवनतीत व नागरी समाजाच्या विकासात झाल्याचे दिसते. या संदर्भात विल्यम डिम्बी यांच्या **प्रॉस्परस ब्रिटिश इंडिया** या प्रकाशित झालेल्या पुस्तकात (१९०१) संपूर्ण भारताच्या नागरीकरणाबाबत जे उद्‌गार काढले आहेत ते तत्कालीन महाराष्ट्राला पूर्णपणे लागू पडतात. ते म्हणतात की, भारत (देश) एक नसून दोन आहेत. एक म्हणजे प्रेसीडेन्सीमध्ये समाविष्ट झालेला व दुसरा प्रांतातील प्रमुख नगरे, रेल्वे व्यवस्था आणि थंड हवेची ठिकाणे यात समाविष्ट झालेला. एक अँग्लोस्तान ज्यावर इंग्लिश राज्यकर्त्यांचे विशेष नियंत्रण आहे व ज्यामध्ये त्यांनी भांडवल गुंतविलेले आहे आणि दुसरा रेल्वेमार्गाच्या दोन्ही बाजूंनी पन्नास मैलाच्या अंतरावर असलेला हिंदुस्थान.[२५] ब्रिटिश अमदानीत नगरात राहणाऱ्या लोकांच्या संख्येत व तसेच एकूण नगरांच्या संख्येत वाढ झाली आणि ग्रामीण लोकसंख्येत व खेड्यांच्या संख्येत तुलनात्मकदृष्ट्या घट झाली.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी व औद्योगिक केंद्र तसेच आधुनिक काळातील भारताची औद्योगिक व व्यापारी राजधानी, तर पुणे ही ऐतिहासिक परंपरा लाभलेली महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी होय. या दोन्हीही नगरांच्या विकासाची प्रक्रिया वेगळी आहे. पुणे शहराची परंपरा राष्ट्रकूटांच्या काळापर्यंत जाते. तत्कालीन ताम्रपटातील उल्लेखावरून पुण्याचा उल्लेख पुनकवाडी असा केला जात असल्याचे दिसते.[२६] ऐतिहासिक काळात पुण्याचा उल्लेख पुनेवाडी असाही केला जात असे. पहिला बाजीराव पेशवा याने मराठी राज्याची राजधानी पुण्याला केली (इ. स. १७२०) व पुण्याच्या भरभराटीचे युग सुरू झाले. परंतु पेशवाईच्या अस्तानंतर म्हणजे १८१८ पासून पुण्याच्या लोकसंख्येला जवळ जवळ १८५१ पर्यंत ओहोटी लागल्याचे दिसते. १८०४ चा दुष्काळ व पेशवाईच्या शेवटच्या दिवसात पुण्यात निर्माण झालेली अंदाधुंदीची परिस्थिती यामुळे बऱ्याच कुटुंबांनी पुण्यातून स्थलांतरकेले. ऐतिहासिक काळात पुणे लष्करीदृष्ट्या महत्त्वाचे नगर मानले जात होते. पेशवाईमध्ये राजाश्रयामुळे ब्राह्मणांची मोठी वस्ती पुण्यात निर्माण झाली व त्यामुळे पुणे हे ब्राह्मण परंपरेचे महत्त्वपूर्ण सांस्कृतिक व शैक्षणिक केंद्र झाले. ब्रिटिश अमदानीत पुण्याच्या या परंपरेनेच जतन होण्यास ब्रिटिश शासनाच्या धार्मिक बाबीत ढवळाढवळ न करण्याच्या धोरणामुळे मदतच झाली. तसेच १८५१ ते १८९१ या कालखंडामध्ये पुणे शहर मुंबईशी व दक्षिण महाराष्ट्राशी रेल्वेने जोडले गेले व मर्यादित प्रमाणात तेथे कारखानदारी वाढली. त्यामुळे पुण्याच्या लोकसंख्येत हळूहळू वाढ होऊ लागल्याचे दिसते. जशी पश्चिम महाराष्ट्रात पुण्याची वाढ झाली तशी मध्यप्रांताची व तत्पूर्वी नागपूर भोसल्यांची राजधानी असलेल्या नागपूर शहराची वाढ झाली.

मे १९६० मध्ये पूर्वीचे मुंबई राज्य हा शासकीय घटक विसर्जित करून त्या जागी भाषेच्या तत्वावर महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली आणि त्यामुळे ग्रामीण आणि नागरी समाजाच्या परिवर्तनाची प्रक्रिया अधिक गतिमान आणि सामाजिक उद्दिष्टाभिमुख झाली. स्वातंत्र्योत्तर काळात ग्रामीण भागात समाजपरिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांत आणखी दोन नव्या घटकांची भर पडली आणि ते म्हणजे नवीन धरणांची निर्मिती आणि सहकारी साखर कारखान्यांची वाढ. स्वातंत्र्यपूर्व काळात पश्चिम महाराष्ट्रात मुंबईच्या उद्योगांना वीजपुरवठा करण्याच्या उद्देशाने व त्याचप्रमाणे शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यासाठी मर्यादित प्रमाणात धरणांची निर्मिती झाली होती. परंतु या धरणांच्या संख्येत स्वातंत्र्योत्तर काळात लक्षणीय वाढ झाली. स्वातंत्र्योत्तर काळात बांधलेले कोयना धरण सर्वाधिक महत्त्वाचे होय. यामुळे ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासास मोठी चालना मिळाली. प्रवरा, भीमा, मुठा इत्यादी नद्यांवरील धरणांमुळे बरीच शेतजमीन जलसिंचनाखाली आली आणि एकेकाळवा दुष्काळी प्रदेश आता ऊसाच्या शेतीने व सारखर कारखान्यांनी समृद्ध झाला आहे. ऊसाबरोबर इतर नगदी पिकांच्या उत्पन्नासही यामुळे चालना मिळाली. या सर्वांचा परिणाम ग्रामीण भागात उद्योगधंद्याच्या वाढीवर झाल्याचे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी संस्थांचा विकास मोठ्या प्रमाणावर झाला. विशेषतः सहकारी साखर कारखान्यांच्या क्षेत्रात महाराष्ट्र भारतात अग्रेसर आहे. १९८३ मध्ये महाराष्ट्रात ८८ सहकारी साखर कारखाने होते. त्यातील पश्चिम महाराष्ट्रामध्ये ६७, मराठवाड्यामध्ये १८, विदर्भात दोन व कोकणात एक असे होते. याखेरीज १४ नवीन कारखान्यांची

उभारणी चालू होती. त्यातील ११ पश्चिम महाराष्ट्रात व मराठवाडयात ३ आहेत.[२७] याखेरीज दुग्धविकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास योजना इत्यादी योजनांमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण विभागात आर्थिक व सामाजिक विकासाची प्रक्रिया अधिक गतिमान झाली आहे. या विकासाच्या प्रक्रियेतील आवश्यक घटक म्हणजे दळणवळणाच्या साधनांचा विकास. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात प्रवासी मोटार वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण होऊन महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाची स्थापना झाली. परिवहन मंडळाच्या बस सेवेचे जाळे ग्रामीण भागात फार दूरवर पसरले आहे. गाव तिथे एस.टी. हे ध्येय ठेवून महाराष्ट्राच्या बहुतेक खेड्यांना नागरी विभागाशी महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बस सेवेने जोडले आहे. तसेच भाजीपाला, दूध व इतर शेतमालाची ग्रामीण भागातून रोजच्या रोज रेल्वे व खाजगी ट्रक वाहतुकीद्वारा नागरी भागात विक्री करण्यात येत असते. त्यामुळे पारंपरिक काळातील खेडेगावांची स्वयंपूर्णता नष्ट होऊन त्यांचे बाजारपेठप्रधान नागरी अर्थव्यवस्थेमध्ये एकात्मीकरण होत आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात ग्रामीण समूहांचे महत्त्व कमी होऊन नागरी समूहांचे महत्त्व वाढत चालले आहे. या प्रक्रियांची निष्पत्ती १९६० नंतर ग्रामीण व नागरी समूहांच्या बदलत्या संख्येवरून व त्यांच्या महत्त्वावरून दिसून येते. या दृष्टीने १९६० ते १९८० या दोन दशकांत महाराष्ट्रातील खेड्यांत व नगरांत झालेल्या संख्यात्मक बदलांची माहिती खालील परिच्छेदांत दिली आहे.

सन १९६१ च्या जनगणनेनुसार भारतामधील सर्वाधिक नागरीकरण झाले महाराष्ट्र राज्यात, मात्र सर्वात कमी जम्मू काश्मीरमध्ये. एकूण लोकसंख्येच्या २८.२२ टक्के लोक नागरी विभागामध्ये राहत होते. एक लाख अथवा त्याहून अधिक वस्तीच्या शहरांमधून १७.०७ टक्के लोक राहत होते, तर वीस हजार अथवा त्याहून अधिक वस्तीच्या नगरांमधून २३.३३ टक्के लोक राहत होते. महाराष्ट्रात एकूण २६६ नगरे होती. त्यातील एक लाख वा त्याहून अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांची संख्या १२ होती. ही बारा शहरे पुढिलप्रमाणे होती :-बृहन्मुंबई (४१,५२ हजार), पुणे (७,२१ हजार), नागपूर (६,४३ हजार), सोलापूर (३,३८ हजार), कोल्हापूर (१,८७ हजार), अमरावती (१,३८ हजार), नाशिक (१,३१ हजार), मालेगाव (१,२१ हजार), अहमदनगर (१,१९ हजार), अकोला (१,१६ हजार), उल्हासनगर (१,०८ हजार) आणि ठाणे (१,०१ हजार) (कंसात लोकसंख्या). एकूण लोकसंख्येच्या ७१.७८ प्रतिशत लोकसंख्या ग्रामीण भागात राहत होती व वस्ती असलेल्या, ओसाड व वनग्राम खेड्यांची संख्या ३९,४०१ होती.

१९६१-७१ या दशकात महाराष्ट्रातील नागरीकरणाचा वेग आणखी वाढल्याचे दिसते. १९७१ च्या जनगणनेच्या वेळी महाराष्ट्रातील नागरी लोकसंख्येचे प्रमाण ३१.२० टक्के होते तर ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण ६८.८३ टक्के होते. एक लाख वा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांपैकी सहा शहरांतील लोकसंख्येची वाढ द्रुतगतीने (म्हणजे ५० प्रतिशतपेक्षा अधिक) झाल्याचे दिसते. ही सहा शहरे मालेगाव, ठाणे, उल्हासनगर, औरंगाबाद, नांदेड आणि सांगली ही होती. या दशकातील बृहन्मुंबईचा वाढीचा दर ४४ प्रतिशत होता.[२८]

सन १९८१ च्या जनगणनेच्या वेळी महाराष्ट्राची नागरी लोकसंख्या ३५.०३ प्रतिशत होती तर संपूर्ण भारताची २०.५ प्रतिशत होती. राज्यातील नगरांची संख्या २७६ वर गेली. यापैकी दहा लाख व त्याहून अधिक लोकसंख्या असलेली तीन महानगरे होती, तर एक ते दहा लाखापर्यंतची लोकसंख्या असलेली २२ नगरे होती. एकूण २७६ नगरांचे निरनिराळ्या लोकसंख्येच्या गटातील वर्गीकरण, नगरांच्या प्रत्येक गटात समाविष्ट झालेली लोकसंख्या व या लोकसंख्येचे एकूण नागरी लोकसंख्येशी असलेले शेकडा प्रमाण ही माहिती तक्ता क्रमांक २ मध्ये दिली आहे.

तक्ता क्रमांक २

शहरांच्या लोकसंख्या गटाप्रमाणे नागरी लोकसंख्या, १९८१

लोकसंख्येचा गट	नगरे व शहर संकुले	नागरी लोकसंख्या	एकूण शहरी लोकसंख्येशी शेकडा प्रमाण
(१)	(२)	(३)	(४)
५,००० हून कमी	१६	५४,७५२	०.२
५,००० ते ९,९९९	४२	३,३८,०२३	१.५
१०,००० ते १९,९९९	९१	१३,३०,६२०	६.१
२०,००० ते ४९,९९९	८२	२४,१०,९३७	११.०
५०,००० ते ९९,९९९	२०	१३,०६,२२६	५.९
१,००,००० आणि अधिक	२५	१,६५,५३,०३६	७५.३

तक्ता क्रमांक ३

वस्ती असलेल्या खेड्यांचे लोकसंख्येनुसार वर्गीकरण, १९८१

लोकसंख्येचा गट	खेड्यांची संख्या	ग्रामीण लोकसंख्या	एकूण ग्रामीण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण
(१)	(२)	(३)	(४)
२०० पेक्षा कमी	४,५२३	४,६०,१२४	१.१
२०० ते ४९९	९,२४८	३२,६८,०९३	८.०
५०० ते ९९९	१२,३३०	८८,९१,३०८	२१.८
१,००० ते १,९९९	८,९५४	१,२३,५७,०४७	३०.३
२,००० ते ४,९९९	३,६०४	१,०४,७१,१६०	२५.७
५,००० ते ९,९९९	५७९	३८,३७,०५६	९.४
१०,००० आणि त्याहून अधिक	११६	१५,०५,७८९	३.७

सर्वसाधारणपणे एक लाख व त्याहून अधिक लोकवस्ती असलेल्या नगरांत नागरी सांस्कृतिक साधनांची उपलब्धता जास्त असते असे जर गृहीत धरले तर असे म्हणता येईल की, महाराष्ट्रातील एकूण नागरी लोकसंख्येच्या ७५ टक्के अधिक लोक केवळ लोकसंख्येच्या दृष्टीने नव्हे तर सांस्कृतिकदृष्ट्या नागरी असलेल्या शहरांतून राहत होते.[२९]

१९८१ मध्ये महाराष्ट्रात वस्ती असलेली ३९,३५४ खेडी असून तेथे ६४.९७ टक्के लोक राहत होते. ही लोकसंख्या विविध आकारांच्या खेड्यांमध्ये कशी विभागली होती याची माहिती तक्ता क्रमांक ३ मध्ये दिली आहे. यावरून दिसून येईल की, ६९.१ टक्के ग्रामीण लोकसंख्या एक हजार वा त्याहून अधिक लोकवस्ती असलेल्या खेड्यांमध्ये होती.

१९०१ च्या तुलनेत १९८१ मध्ये महाराष्ट्रातील समाज जास्त प्रमाणात नागरी झाला आहे. १९०१ मध्ये महाराष्ट्रातील नगरांची संख्या २१९ होती ती १९८१ मध्ये २७६ झाली. १९०१ मध्ये नागरी लोकसंख्येचे प्रमाण २३.५ टक्के आणि १९८१ मध्ये ३५.०३ टक्के प्रतिशतवर गेले. या प्रक्रियेत काही खेड्यांचे रूपांतर लहान नगरांत व लहान नगरांचे रूपांतर मोठ्या नगरांत झाले आहे. संपूर्णपणे नव्याने अस्तित्वात आलेली नगरे संख्येने अल्प आहेत. या प्रक्रियेत परंपरागत काळात जी खेडी अथवा गावे कसबा या प्रकारात मोडणारी होती त्यांचाच पुढे नगरांत विस्तार झाला. या गावांना बाजार गाव म्हणूनही ओळखतात व परिसरातील खेड्यांतील लोक तेथे उपलब्ध असलेल्या सुविधांचा व तांत्रिक कौशल्य असणाऱ्या जातींच्या सेवांचा उपयोग करून घेण्यासाठी अशा गावी येत असतात. बऱ्याच खेड्यांतील बलुतेदार जातीही अशा मध्यवर्ती गावात राहून परिसरातील खेड्यांशी बलुत्याचे संबंध ठेवणे पसंत करतात. अशा मध्यवर्ती बाजाराच्या गावी शासनही धान्य साठविण्यासाठी गुदामे, मार्केट यार्ड अशासारख्या सोयी उपलब्ध करून देत असल्यामुळे या गावांचे ग्रामीण जनतेच्या दृष्टीने महत्त्व वाढले आहे. अलीकडील काळात अशा गावांमध्ये शेतीच्या व्यवसायाशी निगडित असणाऱ्या लघु उद्योगांमध्येही वाढ झाली आहे. कोल्हापूर, फलटण, सांगली, जळगाव इत्यादी नगरांत अशा तऱ्हेचे परिवर्तन घडून येत असल्याचे अभ्यासकांच्या निदर्शनास आले आहे. या संबंधात इरावती कर्वे आणि रणदिवे यांनी केलेल्या सातारा जिल्ह्यातील फलटणच्या विकासाच्या अभ्यासाचा उल्लेख करता येईल.[३०] फलटणच्या लोकसंख्येत कारागिरांची संख्या तेवढ्याच लोकवस्तीच्या खेड्यांच्या तुलनेने अधिक असल्याचे दिसून आले. या विविध कारणांमुळे महाराष्ट्रातील खेड्यांचे पारंपरिक बहुजातीय बहुव्यवसायी लोक समूह हे स्वरूप बदलून ते आता व्यवसायाच्या दृष्टीने व सामाजिक विविधतेच्या दृष्टीने अधिक संकुचित होऊ लागले आहेत.

परंपरागत बलुतेदारीचा व्यवसाय करणाऱ्या जातींमध्येच नगरांमध्ये राहण्याचा ओढा दिसतो असे नसून अनुसूचित जाती, विशेषतः बौद्ध व इतर अल्पसंख्यांक जमातींमध्येही दिसतो. नागरी भागामध्ये विविध व्यवसाय करण्याची मिळत असलेली संधी, गटाने राहण्याची मिळत असलेली संधी, आपल्यापेक्षा भिन्न सामाजिक व धार्मिक आचरण करणाऱ्या गटांविषयी जोपासला जाणारा सामाजिक सहिष्णुतेचा दृष्टिकोन इत्यादी कारणांमुळे अल्पसंख्यांकाचा ओढा नागरी भागाकडे अधिक असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित समाजात घडवून आणलेल्या जागृतीमुळे आणि बौद्ध धर्मात केलेल्या सामूहिक प्रवेशामुळे नवबौद्धांमध्ये नागरी भागात राहण्याचा जास्त कल दिसून येतो. त्यामुळे महाराष्ट्रातील काही शहरांत नवबौद्धांची वस्ती जास्त प्रमाणात दिसते. त्यामध्ये नागपूर (१४.९ टक्के), औरंगाबाद (१३.९), नांदेड (१३.१), चंद्रपूर (१२.१), अकोला (९.८), परभणी (९.२), भुसावळ (८.३), लातूर (७.१),

गोंदिया (७.०), पुणे (६.९), मुंबई (५.७) आणि अमरावती (५.७) या बारा शहरांचा प्रामुख्याने अंतर्भाव होतो. कंसातील आकडे एकूण लोकसंख्येमध्ये नवबौद्धांच्या लोकसंख्येचे प्रमाण किती आहे ते दर्शवितात.[३१]

नवबौद्धांप्रमाणेच महाराष्ट्रातील काही शहरांत मुसलमान लोकवस्तीचे नगरांच्या एकूण लोकसंख्येत लक्षणीय प्रमाण दिसते. यात मालेगाव (६७.५ टक्के), भिवंडी (५२.२), परभणी (३७.६), औरंगाबाद (३१.३), जालना (२६.२), लातूर (२४.१), अकोला (२३.६) आणि धुळे (२३.२) या शहरांचा अंतर्भाव होतो.[३२]

महाराष्ट्रातील ग्रामीण आणि नागरी समूहांचे परंपरागत स्वरूप व त्यामध्ये एकोणिसाव्या शतकापासून घडून येत असलेले परिवर्तन यांचा जो आढावा वर घेतला आहे त्यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील परंपरागत ग्रामीण समाज आता लोप पावू लागला आहे व त्या जागी आधुनिक औद्योगिक नागरी समाज हळूहळू निर्माण होऊ लागला आहे. ग्रामीण समाजाचे परंपरागत काळात असलेले स्वयंपूर्णत्व नष्ट होऊन तो आता नागरी समाजाशी आर्थिक, राजकीय व सामाजिकदृष्ट्या घट्टपणे जोडला जाऊ लागला आहे. याचे पडसाद सांस्कृतिक जीवनावरही उमटलेले आहेत.

तळटिपा

[१] इरावती कर्वे, "दि इंडियन व्हिलेज", ए.आर. देसाई (संपा.) : रूरल सोशिऑलॉजी एन इंडिया, बॉम्बे, १९६१ ; **महाराष्ट्र : लँड अँड इटस पीपल,** १९६८ आणि त्रिं.ना आत्रे, गाव गाडा, १९८९.

[२] इरावती कर्वे, **महाराष्ट्र : लँड अँड इटस् पीपल,** १९६८.

[३] त्रिं. ना. आत्रे, पूर्वोक्त.

[४] जी. एस. घुर्ये, :ॲनॅटमी **ऑफ ए रूबीन कम्युनिटी,** १९६३.

[५] टी. एन. वाळुंजकर, **सोशल ऑर्गनायझेशन मायग्रेशन अँड चेंज इन व्हिलेज कम्युनिटी,** १९६६.

[६] त्रिं. ना. आत्रे, पूर्वोक्त.

[७] आपल्या इंदापूर गावाच्या ऐतिहासिक अभ्यासात अ.रा. कुलकर्णी यांनी इनाम जमिनीचे सनदी आणि गावनिसबत हे दोन प्रकार नमूद केले आहेत. सनदी इनाम ब्राह्मण, मुसलमान गणिका आणि लिंगायत जंगम यांना देण्यात येत असे, तर गावनिसबत इनाम हे पाटील, कुलकर्णी, देशपांडे, नाडगौडा आणि महार (हाडोळा) याना देण्यात येत असे. पहा : ए.आर.कुलकर्णी, "टोवर्डस् ए हिस्टरी ऑफ इंदापूर", डी.डब्ल्यू. ॲटवुड, एम्. इझरेल, अँड एन.के. वागळे (संपा.) : **सिटी, कंट्रीसाइड अँड सोसायटी इन महाराष्ट्र,** १९८८.

[८] जी. एस. घुर्ये, पूर्वोक्त.

[९] एम. एन. श्रीनिवास, "दि सोशल सिस्टिम ऑफ ए म्हैसूर व्हिलेज", **व्हिलेज इंडिया,** मॅकिम मॅरिऑट (संपा.) : ए.ए.ए. मेम्वार नं. ८७, १९५५.

[१०] त्रिं. ना. आत्रे, पूर्वोक्त.

[११] महादेव गोविंद रानडे, **राइझ ऑफ दि मराठा पॉवर,** १९७४.

[१२] जयंत लेले, "कास्ट क्लास अँड डॉमिनन्स : पोलिटिकल मोबिलायझेशन इन महाराष्ट्र", फ्रॉन्सिन् आर. फ्रँकेल ॲण्ड एम्.एस.ए. राव (एडिटर्स), **डॉमिनन्स अँड पोलिटिकल पॉवर इन मॉडर्न इंडिया,** व्हॉल्यूम २, १९९०.

[१३] माधव अचवल, "वास्तुशिल्प", डॉ. भीमराव कुलकर्णी (संपा.) : **अस्मिता महाराष्ट्राची,** १९७१.

[१४] इरावती कर्वे, **महाराष्ट्र : लँड अँड इटस पीपल,** १९६८, पृ. १३५.

[१५] मीरा कोसाम्बी, "इंडिजिनस अँड कलोनिअल अर्बन डेव्हलपमेंट इन वेस्टर्न महाराष्ट्र", डी.डब्ल्यू. ॲटवुड, मिल्टन् इझरेल आणि एन.के. वागळे (संपा) : **सिटी, कंट्रिसाईड अँड सोसायटी इन महाराष्ट्र,** १९८८.

[१६] माधव अचवल, पूर्वोक्त.

[१७] एम. एन. श्रीनिवास, **रिलिजन अँड सोसायटी अमंग दि कुर्ग्ज ऑफ साऊथ इंडिया,** १९७८.

[१८] हेमलता आचार्य, "चेंजिंग रोल ऑफ रिलिजस् स्पेशालिस्टस् इन नासिक : ए पिल्ग्रिम सिटी" एम्. एस्. ए. राव (संपा.) : **अर्बन सोशिऑलॉजी इन इंडिया,** १९७४.

[१९] गोविंद बाळकृष्ण गोखले, "सम अर्बन कमर्शिअल सेंटर्स ऑफ दि वेस्टर्न डेक्कन इन दि सेवंटिन्थ सेंच्युरी", **इमेजेस ऑफ इंडिया,** एन. के. वागळे (संपा.), १९८०.

[२०] गोविद बाळकृष्ण गोखले, पूर्वोक्त.

[२१] रामचंद्रन् आर., **अर्बनायझेशन अँड अर्बन सिस्टिम्स इन इंडिया,१९८९.**

[२२] एच. एस. शेणोलीकर, अँड पी. एन. देशपांडे, **महाराष्ट्र संस्कृती - घडण व विकास,** १९७२.

[२३] महादेव गोविंद रानडे, पूर्वोक्त.

[२४] रविंदर कुमार, **वेस्टर्न इंडिया इन दि नाइन्टिन्थ सेंच्युरी, ए स्टडी इन सोशल हिस्टरी ऑफ महाराष्ट्र,** १९६८, पृ. १९६.

[२५] अशिष बोस, "सिक्स् डिकेडस् ऑफ अर्बनायझेशन इन इंडिया", एम्. एस्. ए. राव (संपा.) : **अर्बन सोशिऑलॉजी इन इंडिया,** १९७४.

[२६] डी. आर. गाडगीळ, **पूना-ए-सोशिओ**-इकॉनॉमिक सर्व्हे, पार्ट-१, इकॉ**नॉमिक,** १९४३, पृ. ३.

[२७] जयंत लेले,पूर्वोक्त.

[२८] अशिष बोस, पूर्वोक्त.

[२९] अर्थ व सांख्यिकी संचालनालय : **महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी,** १९८८. १९८१ च्या महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी लोकसंख्येच्या व लोकसमूहांच्या परिस्थितीचे विवरण हे या पुस्तिकेच्या आधारे केले आहे.

[३०] इरावती कर्वे आणि जे.एस्. रणदिवे, **दि सोशल डायनॉमिक्स ऑफ ए ग्रोअिंग टाऊन अँड इटस् सराउंडिंग एरिया,** १९६१.

[३१] आर. रामचंद्रन्, **अर्बनायझेशन अँड अर्बन सिस्टिम्स इन इंडिया,** १९८९.

[३२] आर. रामचंद्रन्, पूर्वोक्त.

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ७ : धर्म

(या प्रकरणाचे लेखन डॉ. त्रि. ना. वाळुंजकर यांनी केले आहे.)

मानवी लोकसमूहांच्या धार्मिक जीवनाचा अभ्यास करताना निदर्शनास येते की, विविध लोकसमूहांचे धार्मिक जीवन जरी भिन्न भिन्न आणि विविधतापूर्ण असले तरी सर्व प्रकारच्या धार्मिक जीवनाच्या मुळाशी एक मूलगामी संकल्पना आहे व ती म्हणजे पावित्र्य. ही पावित्र्याची संकल्पना विविध मूर्त व अमूर्त स्वरूपांत प्रकट होत असते. देवदेवता, मंदिरे व पूजास्थाने, नद्या, सरोवरे, वृक्ष, प्राणी यासारख्या नैसर्गिक गोष्टी, विशिष्ट शब्दोच्चार, विशिष्ट वेळ, दिवस, महिना, वर्ष इत्यादी गोष्टींमधून ही पवित्रतेची कल्पना प्रकट होत असते व त्यामुळे त्यांच्याभोवती धार्मिक जीवनाची गुंफण होत असते.

महाराष्ट्रातील धार्मिक जीवन अशाच पवित्र मानलेल्या मूर्त व अमूर्त वस्तू या घटनांभोवती गुंफलेले आहे. त्यात (१) देवता व मंदिरे, (२) इतर पूजा अथवा श्रद्धास्थाने, (३) पवित्र तीर्थक्षेत्रे, (४) पवित्र नद्या, वृक्ष, सरोवरे व प्राणी, (५) पवित्र दिवस, महिना इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. या सर्व बाबी विशिष्ट धार्मिक विचारप्रणालीच्या संदर्भात पवित्र मानल्या जातात. या पवित्र बाबींच्या संदर्भात विविध धर्मविधी (Religious Rites) तयार होतात व यातून लोकांच्या धार्मिक जीवनाची जडणघडण होते. या सर्व बाबींमधून झालेल्या महाराष्ट्रातील धार्मिक जीवनाच्या आविष्काराचे विवेचन खालील परिच्छेदांमध्ये केले आहे.

देव आणि देवता

हिंदू धर्माने अनेक देवतांचे अस्तित्व व मूर्तिपूजा या दोन बाबी मान्य केल्या आहेत. त्यामुळे हिंदूंच्या धार्मिक जीवनामध्ये अनेक देवतांना स्थान आहे. या बहुविध देवता समाज संरचनेतील विविध घटकांशी, म्हणजे कुटुंब, जात, ग्राम, देश आणि राष्ट्र यांच्याशी जोडल्या गेलेल्या आहेत. महाराष्ट्रामध्ये सर्वसाधारणपणे व्यक्तीच्या धार्मिक जीवनात तीन प्रकारच्या देवतांना विशेष स्थान असते. या देवता कुलदेवता, ग्रामदेवता आणि इष्टदेवता होत. कोणत्याही मंगलकार्याची सुरुवात या तीन देवतांना अभिवादन करून होत असते. कुलदेवता ही कुटुंबाशी निगडित असलेली देवता. हिला कुटुंबाची रक्षणकर्ती देवता म्हणून मानली जाते. बहुतांशी कुलदेवता एक नसून दोन असतात व त्यातील एक पुल्लिंगी देव असतो व दुसरी स्त्रिलिंगी देवता असते. बहुतेक लोक अंबाबाई अथवा तिच्या प्रादेशिक अवताराला कुलदेवता म्हणून मानतात व शंकर आणि खंडोबा यांच्यापैकी एकाला कुलस्वामी अथवा कुलदैवत म्हणून मानतात. शिव आणि खंडोबा या देवतांखेरीज इतरही देवतांना कुलदैवत म्हणून मानतात. इरावती कर्वे आणि रणदिवे यांनी केलेल्या अध्ययनात पुढील देवतांचा कुलदैवत म्हणून निर्देश केला आहे.[१] खंडोबा (२८४), जितोबा, जिंतोबा (१५९), सिद्धनाथ, बहिरोबा, ढवळोबा (२१५), शिव (६१), देवी स्वतंत्रपणे अथवा शिवाशी संबंधित (२०७), मरीआई (१४), गणपती (७), दत्त (१०), विष्णु आणि त्याचे अवतार (५४), मारूती (३), आणि नागोबा (१). (कंसातील आकडे उत्तरदात्यांचे आहेत).

वरील यादीत सर्वात अधिक उत्तरदात्यांनी निर्देश केलेली तीन दैवते म्हणजे खंडोबा, सिद्धनाथ व देवी. या यादीतील जितोबा, जिंतोबा आणि जोतिबा ही एकच दैवते होत. ही यादी एका गावातील सर्वेक्षणावर आधारलेली आहे. महाराष्ट्राच्या इतर भागातील लोकांच्या कुलदैवतांचा मागोवा घेतला तर यात आणखी काही प्रादेशिक दैवतांची भर पडेल. अखिल भारतीय स्तरावर अस्तित्वात असलेल्या वैदिक प्रथेमध्ये ब्रह्मा, विष्णु-लक्ष्मी, शिव-पार्वती या प्रमुख देवता मानल्या आहेत. तसेच, रामोंसीमा, कृष्ण यांचाही अखिल भारतीय पातळीवरील देवता म्हणून उल्लेख होतो. याखेरीज असलेल्या देवतांचे अस्तित्व विशिष्ट प्रदेश अथवा उप-प्रदेश यांच्यापुरते मर्यादित आहे. या देवतांचे अस्तित्व मर्यादित प्रदेशापुरते असल्यामुळे यांना दुय्यम देवता म्हणता येईल. कुलदैवतांच्या यादितील सर्वाधिक लोकांनी ज्या देवतांचा कुलदेवता म्हणून उल्लेख केला आहे त्या अशा दुय्यम देवता आहेत. यातील बहुतेक देव हे शिवाची स्वरूपे आहेत व देवता या पार्वतीचे अवतार आहेत असे मानले जाते. यातील बहुतांशी देवांना, उदा. म्हसोबा, बहिरोबा, धुळोबा, नागोबा यांना बकरे बळी देण्याची प्रथा आहे. यावरून महाराष्ट्रातील कुलदैवतांवर दक्षिण भारतातील शैव

पंथाचा प्रभाव पडला असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील धार्मिक जीवनाच्या इतिहासाकडे नजर टाकली असता दिसते की, महाराष्ट्रात स्थानिक अथवा प्रादेशिक देवतांना कुलदैवत म्हणून मानण्याची प्रथा यादव काळापासून प्रस्थापित झाली.[२] राष्ट्रकूटांनी पुरस्कारिलेल्या पौराणिक देवतांपेक्षा स्थानिक देवतांचे महात्म्य यादवांनी वाढविले. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोक ज्या देवतांना कुलदैवत मानतात त्यात जेजुरीचा खंडोबा व तुळजापूरची भवानी ही प्रमुख दैवते आहेत. त्यानंतर कोल्हापूर व अमरावती येथील महालक्ष्मी, माहूरची रेणुका, कोकणातील परशुराम, नाशिक जिल्ह्यातील सप्तशृंग गडावरील सप्तशृंगी, यांचा उल्लेख करावा लागेल.

कुलदेवतेप्रमाणे ग्रामदेवतेलाही महाराष्ट्रातील धार्मिक जीवनात महत्त्व आहे. काही ग्रामदेवतांची नावे पुढीलप्रमाणे आहेत :- जनाई, मनाई, गावदेवी, पद्मावती, सुकाई, बागलाई, सदाई, जोगेश्वरी, देवलाई, कालकाई, वाघजाई, झोलाई, महाकाली, चंडिका अथवा चाणकाई, कलाश्री, नवलाई, वाघूबाई, बजूवाई, विट्ठलाई, मावळा देवी, भवानी, ढवळाई, बहिरी, कलूबाई इत्यादी. त्याचप्रमाणे देवांच्यामध्ये जोतिबा, बहिरोबा, विठोबा, राम, नारायण, शंकर, लवेश्वर, घृष्णेश्वर, व्याघ्रेश्वर, सिद्धनाथ, भैरवनाथ, खडकेश्वर इत्यादी नावांचा ग्रामदैवतांत समावेश होतो.

कुलदैवतांचा संबंध कुळाशी अथवा वंशाशी असतो. एकाच कुलात अनेक कुटुंबे असतात व या सर्वांचे कुलदैवत एकच असते. जातीनुसार देखील कुलदैवतांमध्ये फरक पडतो. परंतु महाराष्ट्रामध्ये खंडोबा हे कुलदैवत ब्राह्मणांपासून दलितांपर्यंत अनेक जातींत आहे.

पारंपरिक पद्धतीनुसार प्रत्येक कुटुंबातील देवघरात कुलदेवतेची धातूची मूर्ती अथवा चांदीच्या पत्र्यावर प्रतिमा असते. वर्षातील एक दिवस कुलदेवतेच्या उत्सवाचा म्हणून मानला जातो व कुलदेवतेची खास पूजा करून नैवेद्य दाखविला जातो. या प्रसंगी कुटुंबातील सर्व लोक सहभागी होतात. या धार्मिक कार्यक्रमास कुलधर्म म्हणतात. अलीकडील काळात कुटुंबातील लोक नोकरी धंद्यानिमित्ताने निरनिराळ्या ठिकाणी राहत असतात. पण अशा कार्यक्रमासाठी बरेच लोक आवर्जून मूळ गावी जाताना दिसतात.

कुलदेवता कुलाशी तर ग्रामदेवता संपूर्ण गावाशी संबंधित देवता असते. एकाच गावात राहणाऱ्या सर्व जाता-जमातींची, उच्चवर्णीयांपासून अस्पृश्य जातींपर्यंत सर्व जातींची ही देवता. ग्रामदेवतेशी गावातील प्रबल जातीचा अधिक संबंध असतो असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल. ग्रामदेवतेचे जे विविध उत्सव साजरे होतात त्यांचे यजमानपद प्रबल जातीतील ज्येष्ठ घराण्याकडे असते. याच घराण्यात पारंपरिक पद्धतीनुसार पाटीलकी अथवा देशमुखी चालत आलेली असते. बऱ्याच बाबतीत ग्रामदेवता अशा जातीची कुलदेवताही असल्याचे दिसते. गाव वसविण्यामध्ये याच जातीची महत्त्वाची भूमिका असते. विविध बलुतेदार जाती याच जातीच्या संमतीने गावात स्थायिक होतात व आपापले व्यवसाय करीत असतात. अशा तऱ्हेने प्रबल जातीने प्रस्थापित केलेली ग्रामदेवता ही सर्वांचीच ग्रामदेवता बनते. खेडेगावी वर्षातून एकदा शेतातील पिके निघाल्यावर ग्रामदेवतेचा उत्सव साजरा करतात व त्यावेळी गावातील सर्व लोकांना सामूहिक जेवण देतात. या उत्सवाला भंडारा म्हणतात.

ऐतिहासिक काळात ज्यावेळी खेडी वसली ती तत्कालीन शासकीय व राजकीय संरचनेच्या चौकटीत वसली. शासन व्यवस्थेत पाटील आणि देशमुख हे दोन महत्त्वाचे अधिकारी होते. पाटील हा गावचा प्रमुख तर देशमुख त्याच्या आधिपत्याखाली येणाऱ्या अनेक गावांचा प्रमुख. त्याने वसविलेले गाव हे परिसरातील महत्त्वाचे वेंद्र. अशा गावाभोवती बहुधा तटबंदी घातलेली असे. या गावात परिसरातील ग्रामीण जनतेच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक गरजा भागविणाऱ्या कसबी कारागिरांची वस्ती व बाजारपेठही असे. या गावास कसबा म्हणत असत. देशमुखी असलेल्या घराण्याची कुलदेवताच अशा गावाची ग्रामदेवता असते. या देवतेला परिसरातील ग्रामीण लोकही मानाचा मुजरा करतात. या देवतेच्या उत्सवाप्रसंगी केवळ त्या गावचे लोकच सहभागी होतात असे नसून परिसरातील सर्व ग्रामीण जनता सहभागी होते.

कुलदेवता, ग्रामदेवता आणि पंचक्रोशीतील अथवा परिसरातील देशमुख राहत असलेल्या गावचा देव यांना महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेच्या जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. या देवता बहुधा स्थानिक अथवा प्रादेशिक पातळीवरच्या असतात व त्यांचा संबंध शिव, विष्णु, राम, कृष्ण, पार्वती, लक्ष्मी इत्यादी देवतांशी जोडलेला असतो. या सांस्कृतिक प्रक्रियेला संस्कृतीकरण असे म्हटले जाते. संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेने स्थानिक पातळीवरील देवदेवता अखिल भारतीय पातळीवरच्या देवदेवतांशी जोडल्याचे दिसते.

महाराष्ट्रातील धार्मिक जीवनात स्थानिक, प्रादेशिक आणि अखिल भारतीय असे तीन स्तर दिसतात. प्रादेशिक स्तरावर पंढरपूरचा विठोबा व जेजुरीचा खंडोबा यांचा उल्लेख करावा लागेल. तसेच तुळजापूरची भवानी हिचाही उल्लेख करावा लागेल. विठोबा हे दैवत महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक अस्मितेशी एकरूप झाले आहे. धार्मिक क्षेत्रात समतेचा पुरस्कार करणाऱ्या वारकरी संप्रदायाचे विट्ठल हे आराध्य दैवत आहे. विट्ठल हे दैवत ऐतिहासिक

काळात कर्नाटकातून महाराष्ट्रात आले.[३] "कानडा विट्ठलु कर्नाटकु" असे विट्ठलाचे वर्णन ज्ञानेश्वराने केले आहे. विष्णु या संस्कृत शब्दाचे विठू अथवा विट्ठल हे कन्नड रूपांतर. पुष्पदंताच्या **हरिवंश** पुराणामध्ये विट्ठल हा शब्द आलेला आहे आणि त्याचा काही ठिकाणी विष्णु असा अर्थ होतो, तर काही ठिकाणी कृष्ण असा अर्थ होतो. महाराष्ट्राचे दैवत म्हणून महाराष्ट्रातील सर्व लोक पांथिक भेद बाजूस सारून या दैवताला मानतात आणि आषाढी व कार्तिकी एकादशींच्या दिवशी उपवास करतात.

विट्ठल ही काम्य देवता नाही. आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी या देवतेला नवस बोलण्याची प्रथा नाही. केवळ पारमार्थिक सुखासाठी लोक या देवतेची आराधना करतात. पंढरपूरचे मंदिर हे विट्ठलाचे मुख्य मंदिर, परंतु महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पंढरपूरच्या मंदिराच्या धर्तीवर विठोबाची छोटी-मोठी मंदिरे भाविकांनी बांधली आहेत. वारकरी संप्रदाय महाराष्ट्राच्या सर्व भागांमध्ये खास करून बहुजन समाजामध्ये पसरला आहे व आयुष्यात एकदा तरी पंढरपूरला जाऊन चंद्रभागेत स्नान करावे आणि विट्ठलाचे दर्शन घ्यावे अशी मनोमनी सर्वांची इच्छा असते. अशा तऱ्हेने महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य प्रस्थापित करण्यात विट्ठल या दैवताचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

विट्ठलाप्रमाणे खंडोबा हे महाराष्ट्राचे प्रादेशिक दैवत आहे. महाराष्ट्रातील ब्राह्मणांपासून दलितांपर्यंतच्या बहुसंख्य लोकांचे खंडोबा हे कुलदैवत असून विठोबा हे इष्ट दैवत आहे. खंडोबाची भक्ती सकाम भक्ती मानली जाते, तर विट्ठल भक्ती निष्काम म्हणून उच्च दर्जाची मानली जाते.[४] खंडोबाच्या उपासनेला जसे जातीचे बंधन नाही तसे धर्माचेही नाही. खंडोबाच्या भक्तांमध्ये मुसलमानही सामील आहेत. खंडोबाची जी विविध नावे आहेत, उदा. मल्लारी, मैलार, मैराल, मार्तंड, मल्हारी-मार्तंड, म्हाळसाकांत, खळदेव, एळकोटी इत्यादी. त्यात मल्लुखान, अजमतखान ही नावे देखील आहेत. ही नावे मुसलमान भक्तांनी दिलेली असणार यात शंका नाही. त्याचप्रमाणे जेजुरीला धार्मिक विधी म्हणून जो जोगवा मागितला जातो त्याला मल्लुखानाची गदा म्हणतात. यावरून खंडोबाच्या उपासनेला जातीचे अथवा धर्माचे बंधन नाही हे स्पष्ट होते.

महाराष्ट्राचे दक्षिण भारतीय संस्कृतीशी असलेले दृढ संबंध खंडोबा या देवतेच्या महत्त्वपूर्ण स्थानाने स्पष्ट होतात. खंडोबा ही देवता कर्नाटकातून महाराष्ट्रात आली असावी असे काही संशोधकांचे मत आहे.[५] कर्नाटकामध्ये खंडोबाला मैलार, मैलप्पा या नावांनी ओळखतात, तर आंध्र प्रदेशमध्ये खंडोबाला मल्लय्या नावाने ओळखतात. मैलार ही आंध्र प्रदेशामधील काकतीय राजघराण्याची कुलदेवता आहे.[६] महाराष्ट्राचे दक्षिण भारताशी विशेषतः कर्नाटकांशी असलेले सांस्कृतिक नाते यावरून स्पष्ट होते.

खंडोबा या देवतेचा इतिहास पाहिला तर असे दिसते की, मूळातील ही ऐतद्देशियांची जनदेवता (Folk Deity) होती. या देवतेचे संस्कृतीकरण होऊन ती सनातन वैदिक-पुराणिक परंपरेत समाविष्ट झाली. वेदामध्ये रूद्र ही जनदेवता आहे. खंडोबाला रूद्राचा अवतार मानतात व रूद्राला पर्वतांचा राजा असेही म्हणतात. "मल्लारी महात्म्य" मध्ये मणी आणि मल्ल या दोन दैत्यांचा नाश करून ब्राह्मणांचे, त्यांच्या आश्रमांचे आणि यज्ञाचे संरक्षण देवाने मल्हारीचा अवतार घेऊन केले, असे वर्णन आले आहे.

खंडोबाची महाराष्ट्रात सहा व कर्नाटकात पाच अशी अकरा प्रसिद्ध स्थाने आहेत. ही स्थाने पुढीलप्रमाणे आहेत : महाराष्ट्रात जेजुरी, निमगाव (जि. पुणे), शेंगुड (जि. अहमदनगर), सातारा (जि. औरंगाबाद), नळदुर्ग (जि. उस्मानाबाद) आणि पाली (जि. सातारा). यात सर्वात प्रसिद्ध स्थान म्हणजे जेजुरी, कर्नाटकात मंगतूळी (जि. बेळगाव), मैलार सिंग (जि. धारवाड), मैलेर देव गुड्डु (जि. धारवाड), मैलार (जि. बेल्लारी) आणि मैलारपूर (जि. बिदर) ही पाच स्थाने आहेत. महाराष्ट्रातील खंडोबाची बहुसंख्य देवळे दक्षिण महाराष्ट्रात आहेत.

स्कंद ही देवता आणि खंडोबा यांचा काही संबंध नाही असे रा. चिं. ढेरे, शं. बा. जोशी आणि ग. ह. खरे या अभ्यासकांचे मत आहे. खंडोबाच्या रूपात शिव, भैरव आणि सूर्य या तीन देवतांचे मिश्रण आहे व या देवतेचे जन्मस्थान दक्षिणापथात कोठेतरी असले पाहिजे असे ग.ह. खरे यांचे मत आहे.[७] खंडोबा हा मूळचा कर्नाटकातील देव असून मैलार या नावाने ओळखला जातो. महाराष्ट्रात क्षेत्रपाळ-भैरव या देवतेशी तो एकरूप झाला आणि खंडोबा या नावाने लोकप्रिय झाला. म्हाळसा आणि बाणाई या खंडोबाच्या दोन बायका. त्यापैकी म्हाळसा ही देवी कर्नाटकात माळबा या नावाने ओळखली जाते. एका हातात खड्ग व दुसऱ्या हातात धनुष्यबाण घेतलेली ही देवता युद्धदेवता असल्याचे मानतात. खंडोबाचे वाहन घोडा किंवा नंदी हे आहे व त्याच्याभोवती कुत्र्यांचा परिवार असतो. वैदिक प्रथेप्रमाणे कुत्रा हा अपवित्र प्राणी आहे, परंतु खंडोबाचे आणि कुत्र्याचे निकटचे संबंध आहेत. यावरून ही देवता अनार्य जनदेवता असावी या मतास पुष्टी मिळते.

खंडोबा नवसाला पावणारा देव म्हणून ओळखला जातो. विशेषतः ज्यांना मूल होत नाही असे लोक त्यांना मूल झाल्यास पहिले मूल खंडोबाला वाहण्याचा नवस करीत असत. अशी नवसाला वाहिलेली मुले वाघ्या व मुरळी होऊन

संपूर्ण आयुष्य खंडोबाच्या सेवेत व्यतीत करतात. मुरळीचे लग्न खंडोबाशी होते. त्यामुळे मुरळी तिच्या संपूर्ण आयुष्यात लौकिक अर्थाने लग्न करीत नाही व तिच्याशीही हिंदू धर्मीय व्यक्ती खंडोबाच्या प्रकोपाच्या भीतीने लग्न करण्यास तयार होत नसे. या श्रद्धेचा पगडा दलित समाजावर मोठ्या प्रमाणावर होता व अजूनही तो संपूर्ण नाहीसा झालेला नाही. या प्रथेविरूद्ध महार समाजातील आद्य कार्यकर्ते शिवराम जानबा कांबळे यांनी जेजुरीला १ एप्रिल १९०९ रोजी भरलेल्या सोमवंशीय परिषदेत आपला आवाज उठविला व महार समाजातील कोण्याही माणसाने स्वतःच्या मुलीला मुरळी करू नये असा बंधनकारक ठराव केला. आता मुरळी प्रथा कायद्याने बंद केली आहे.

खंडोबा नवसाला पावला असता विविध प्रकारे नवस फेडला जातो. त्यात जोगवा अथवा वारी मागणे, खंडोबाची वारी करणे, देवाला पाण्याच्या कावडी घालणे, अग्नीवरून चालणे, मानेस किंवा कमरेस गळ टोचून घेऊन देवापुढे टांगून घेणे म्हणजेच बगाड घेणे इत्यादी उपचार समाविष्ट आहेत. मार्गशीर्ष महिन्यातील पहिल्या पंधरवड्यातील षष्टी (चंपाषष्टी) हा खंडोबाचा महत्त्वाचा वार्षिक उत्सवाचा दिवस. त्यावेळी प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत नवरात्र पाळतात व चंपाषष्टीला नवरात्र उठवतात. त्या दिवशी कुळधर्म केला जातो. खंडोबाला भरीत, रोडग्याचा नैवेद्य दाखवितात आणि दिवटी व बुधली घेऊन खंडोबाच्या दर्शनाला जातात आणि खंडोबावरून भंडारा व खोबरे उधळतात. घरातील आरतीच्या वेळीही दिवटी व बुधली घेऊन आरती करावी लागते व येळकोट येळकोट घे असे म्हणत तीनदा तळी उचलतात. खंडोबाला मांसाहाराचाही नैवेद्य चालतो.

थोडक्यात असे म्हणता येईल की, दक्षिण भारतीय अनार्य परंपरेत निर्माण झालेले हे दैवत महाराष्ट्राचे आद्यदैवत म्हणून गणले जाऊ लागले. ऐतिहासिक काळात या दैवताला सनातन वैदिक परंपरेत समाविष्ट केले व त्याचे संस्कृतीकरण झाले.

महाराष्ट्राचे तिसरे महत्त्वाचे प्रादेशिक दैवत म्हणजे आदिमाता, भवानी, अंबाबाई, महालक्ष्मी इत्यादी नावांनी परिचित असलेली देवी. ऐतिहासिक काळात महाराष्ट्रात शाक्तपंथाचा प्रभाव होता. देवीच्या रूपाने शक्तीची उपासना करणे हे शाक्तपंथाचे वैशिष्ट्य आहे. हा प्रवाह सनातन वैदिक परंपरेत समाविष्ट झाला आणि देवीच्या उपासनेला महाराष्ट्राच्या धार्मिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले. यादव काळात महाराष्ट्रात आदिमातेची साडेतीन पीठे महत्त्वपूर्ण म्हणून मानली होती. त्यात तुळजापूर, मातापूर (माहूर, जि. नांदेड) आणि कोल्हापूर ही प्रमुख तीन पीठे व नाशिक जिल्ह्यातील वणी गावाजवळील सप्तशृंग गडावरील सप्तशृंगी हे अर्धे पीठ होय. तुळजापूर येथील तुळजा भवानी ही शिवाजी महाराजांची प्रेरणाशक्ती व भोसले राजघराण्याची कुलस्वामिनी. त्यामुळे तुळजा भवानीला संपूर्ण महाराष्ट्राची कुलदेवता म्हणून मान्यता मिळाली आहे. माहूरची रेणुका ही यल्लम्मा व यमाई या नावांनी ओळखली जाते. कोल्हापूरची महालक्ष्मी ही शिलाहार व गोव्याचे कदंब यांची उपास्य देवता होती. महालक्ष्मीला शैव-शाक्त ऐक्याचे प्रतीक मानतात. महालक्ष्मी उच्चवर्णीयांची कुलदेवता आहे. अंबाजोगाई येथील जोगेश्वरी ही देवता अनेकांचे विशेषतः कोकणस्थ ब्राह्मणांचे कुलदैवत आहे.

Maharashtra State Gazetteers

राम आणि कृष्ण हे विष्णुचे अवतार. मात्र शिव हे अखिल भारतीय सनातन वैदिक परंपरेत अत्युच्च स्थान असलेले दैवत होय. रामाचे वास्तव्य नाशिक येथील पंचवटीला झाले असल्याची **रामायणात** कथा आहे. त्यामुळे नाशिक येथील राम मंदिराला भारताच्या सर्व भागातील हिंदू पवित्र मानतात. विदर्भातील रामटेक येथील राममंदिर महाराष्ट्रातील रामाचे महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. महाराष्ट्राच्या इतर विभागांच्या तुलनेत विदर्भामध्ये श्रीरामाचे महात्म्य जास्त असल्याचे आढळते.

परशुराम हा विष्णुचा अवतार असून कोकणातील हजारोंचे परशुराम हे कुलदैवत आहे. कोकणची वसाहत परशुरामाने स्थापन केली असा समज आहे. त्यामुळे कोकणातील समाजात परशुराम या देवतेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. चिपळूणजवळील पेढे येथील परशुरामाचे स्थान प्रसिद्ध आहे.

विष्णुच्या दशावतारांपैकी नरसिंह हा एक अवतार होय. अनेक देशस्थ ब्राह्मणांचे हे कुलदैवत आहे. महाराष्ट्रात नरसिंहाची दोन महत्त्वाची स्थाने आहेत. त्यापैकी एक नीरा नरसिंहपूर हे नीरा आणि भीमा नद्यांच्या संगमावर, तर दुसरे बहेनरसिंगपूर (ता. वाळवा, जि. सांगली) हे आहे. आंध्र, कर्नाटक आणि महाराष्ट्र यामध्ये मुलांचे नाव नरसिंह ठेवल्याचे आढळते. श्रीधर व्यंकटेश केतकर यांच्या मते प्राचीन काळी नरसिंह नावाचा राजा महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटकाच्या काही प्रदेशावर राज्य करीत होता. नरसिंहाचा संबंध आंध्र प्रदेशातील चेंचू या जमातीच्या दंतकथेत असल्याचेही दिसते. यातून महाराष्ट्राचे आंध्र व कर्नाटकाशी असलेले जवळचे सांस्कृतिक संबंध स्पष्ट होतात.

सनातन वैदिक परंपरेतील शिव हे तिसरे महत्त्वाचे दैवत. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व गावी शंकराचे मंदिर असते. ज्या ठिकाणी एखादेच देऊळ असते त्या ठिकाणी इतर देवतांबरोबर शंकराची पिंड आणि नंदी असतात. महाराष्ट्रातील शिवशक्तीची परंपरा प्राचीन आहे. भारतातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पुढील पाच ज्योतिर्लिंगांची स्थाने महाराष्ट्रात आहेत :-त्रिंबकेश्वर (जि. नाशिक), घृष्णेश्वर (वेरूळ, जि. औरंगाबाद), औंढा नागनाथ (जि. परभणी), परळी

वैजनाथ (जि. बीड) आणि भीमाशंकर (जि. पुणे). शिवाचे पुजारी प्रामुख्याने गुरव असतात. सोमवार हा शंकराचा पवित्र दिवस. या दिवशी उपवास करणारे लोक महाराष्ट्रात बरेच दिसतात. श्रावण महिन्यातील सोमवार धार्मिकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे मानले जातात. या दिवशी मोठ्या संख्येने लोक शिवदर्शनाला जातात.

ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांचे एकात्मिक रूप म्हणजे दत्तात्रेय होय. महाराष्ट्रात दत्तात्रेयाची उपासना लोकप्रिय आहे. दत्तोपासनेत सोवळे पाळणे महत्त्वाचे मानले जाते. **गुरूचरित्राची** पारायणे करण्याची पद्धती ब्राह्मण वर्गात खास करून आढळते. महाराष्ट्रात त्रिमुखी व सहा हात असलेली दत्तमूर्ती प्रचलित आहे. तसेच काही ठिकाणी मूर्तीऐवजी चौकोनी दगडावर पादुकांची स्थापना केल्याचे आढळते. भारतातील इतर प्रदेशांच्या तुलनेत महाराष्ट्रात दत्त संप्रदायाचा प्रसार अधिक असल्याचे दिसते.

महाराष्ट्रात सर्व स्तरांमध्ये गणेश लोकप्रिय आहे. कोणत्याही शुभकार्याची सुरुवात गणेश पुजेने होते. तमाशा व नाटकांचा प्रारंभ देखील गणेश स्तवनानेच होतो. महाराष्ट्रातील इतर भागांच्या मानाने कोकणात गणेशाची लोकप्रियता अधिक दिसते. गणपतीची आठ पवित्र स्थाने अष्टविनायक या नावाने ओळखली जातात. हे अष्टविनायक पुढील ठिकाणी आहेत : मोरगाव (मयुरेश्वर), सिद्धटेक (सिद्धिविनायक), पाली (बल्लाळेश्वर), महड (वरदविनायक), थेऊर (चिंतामणी), लेण्याद्री (गिरजात्मक), ओझर (विघ्नहर) आणि रांजणगाव (महागणपती). या आठ स्थानांखेरीज कोकणातील गणपतीपुळे हे स्थानही तेथील गणेश मंदिराकरिता प्रसिद्ध आहे. वरील सर्व स्थाने पश्चिम महाराष्ट्रात आहेत.

विदर्भात तीन प्रसिद्ध ऐतिहासिक गणेशस्थाने आहेत. पहिले स्थान यवतमाळ तालुक्यातील कळंब अथवा ऐतिहासिक कदमपूर हे होय. दुसरे स्थान नागपूरजवळील आदासा अथवा गणेशपूर हे आहे. येथील गणेश मंदिर तेराव्या शतकातील हेमाडपंती पद्धतीचे आहे. तिसरे ठिकाण भंडारा जिल्ह्यातील आमगाव अथवा गणेशटोला हे होय. ऐतिहासिक काळात या स्थानांना महत्त्व प्राप्त झाले. पेशवाईमध्ये गणेश हे पेशव्यांचे कुलदैवत असल्यामुळे गणेश मंदिरांना राजाश्रय व राजमान्यता मिळाली. त्यामुळे पुण्याजवळील चिंचवडशी संबंधित असलेल्या अष्टविनायकांचे महाराष्ट्राच्या स्तरावर महत्त्व वाढले व विदर्भातील मंदिरांचे महत्त्व कमी झाले.[८]

गणेशभक्तांच्या दृष्टीने संकष्टी आणि विनायकी चतुर्थी हे दोन महत्त्वाचे दिवस होत. या दिवशी उपवास करून रात्री चंद्रोदयानंतर जेवण्याची गणेशभक्तांची पद्धती आहे. सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने भाद्रपद महिन्यात येणारी गणेशचतुर्थी आणि त्याचबरोबर सुरू होणारा गणेश उत्सव हे अधिक महत्त्वपूर्ण आहेत. प्रत्येक घराण्याच्या आणि प्रदेशाच्या प्रथेप्रमाणे हा उत्सव दीड दिवस, पाच दिवस अथवा दहा दिवस पाळला जातो. अनंत चतुर्दशी हा गणेशोत्सवातील शेवटचा दिवस. गणेशचतुर्थीच्या दिवशी गणेशाच्या शाडूच्या मूर्तीची प्रतिष्ठापना घरोघरी केली जाते. उत्सवाचा काल संपल्यानंतर गणेश मूर्तीचे समारंभपूर्वक विसर्जन केले जाते.

गणेशोत्सव हा कौटुंबिक उत्सव म्हणून साजरा होत असतो. परंतु लोकमान्य टिळकांनी या उत्सवाला सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप दिले व याचा उपयोग राजकीय आणि सामाजिक जागृतीसाठी करण्याचा पायंडा पाडला. तेव्हापासून महाराष्ट्रात या उत्सवाला सार्वजनिक उत्सवाचे स्वरूप प्राप्त झाले. धार्मिक रूढीबरोबरच लोकांमधील कलागुणांना प्रोत्साहन देण्याच्या कामी या उत्सवाचे भरीव योगदान आहे.

संप्रदाय

ज्या वेळेला धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होऊ लागतो त्यावेळेला त्याच्या मूलभूत शिकवणुकीत आणि बदलत्या सामाजिक परिस्थितीत अंतर्गत विरोध निर्माण होतो. ज्या सामाजिक संस्थांचा धर्माने पुरस्कार केलेला असतो त्यांच्याबद्दल समाजातील काही वर्गांमध्ये असंतोष निर्माण होतो. त्याचप्रमाणे समाजाच्या पर्यावरणातील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक बदलांमुळे समाजातील प्रस्थापित धर्मापुढे नवी आव्हाने उभी राहतात. या सर्वांचा परिणाम प्रस्थापित धर्माअंतर्गत संप्रदायांच्या उदयात होतो. ऐतिहासिक काळात महाराष्ट्रातही सनातन वैदिक धर्मपरंपरेला ज्या विविध अंतर्गत आणि बहिर्गत आव्हानांना तोंड द्यावे लागले त्याचाच परिपाक विविध संप्रदायांच्या उदयात झाल्याचे दिसते. धर्माचरणांच्या संदर्भात समाजातील विविध वर्गांना जाणविणारी विषमता, मुसलमांनांचे आक्रमण आणि त्यातून इस्लामी राज्यकर्त्यांना प्राप्त झालेले हिंदू समाजावरील राजकीय वर्चस्व या घटनांमुळे महाराष्ट्रातही विविध धार्मिक संप्रदायांचा उदय झाला. यात नाथ संप्रदाय, दत्त संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वीरशैव संप्रदाय, वारकरी संप्रदाय व समर्थ संप्रदाय हे प्रमुख संप्रदाय होत. या संप्रदायांचा उदय व विकास महाराष्ट्रात इ. स. १२०० ते १६०० या

कालखंडात झाला. या कालखंडात महाराष्ट्रावर मुसलमानी राजवट आली होती. आद्य शंकराचार्यांनी बौद्ध धर्माची लाट परतवून लावल्यानंतर हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनाची चळवळ जोर धरू लागली होती.[९] या परिस्थितीतून विविध संप्रदायांच्या निर्मितीस पोषक वातावरण तयार होऊन उपरोक्त संप्रदायांचा उदय व प्रसार झाला. या संप्रदायांच्या प्रमुख वैशिष्ट्यांचे विवेचन खालील परिच्छेदांमध्ये केले आहे.

१. नाथसंप्रदाय : नाथसंप्रदायाला महाराष्ट्रातील आद्य संप्रदाय मानता येईल. महानुभाव, लिंगायत, दत्त, वारकरी या संप्रदायांवर नाथंपंथाचा बराच प्रभाव पडलेला आहे.[१०] या पंथांची गुरुपरंपरा नाथपंथातूनच निर्माण झाली आहे. अभ्यासकांच्या मते प्राचीन शैव संप्रदाय व उत्तरकालीन बौद्ध पंथ यांच्या संयोगातून नाथपंथ निर्माण झाला आहे. भगवान शंकरालाच या पंथाचे मूळ उपदेशक "आदिनाथ" मानतात. मच्छिंद्रनाथाने आदिनाथापासून पंथाची दीक्षा घेतली. मच्छिंद्रनाथाला विष्णुचा अवतार मानतात. अशा तऱ्हेने या पंथात हरिहराचे ऐक्य घडवून आणले आहे. नाथपंथ प्रथम काश्मीरमध्ये उदयास आला व त्याचा प्रसार उत्तर भारतात व वायव्येकडील प्रांतातही झाला. मच्छिंद्रनाथाचा शिष्य गोरखनाथ अथवा गोरक्षनाथ म्हणूनही ओळखला जातो. याने मध्ययुगीन भारतात पंथाच्या प्रसाराचे फार मोठे कार्य केले. त्याने भारतभर भ्रमण केले. नाथसंप्रदायात मच्छिंद्रनाथ, गोरखनाथ, जालंधरनाथ, कानीफनाथ, चर्पटीनाथ, रेवणनाथ, चौरंगीनाथ, गहिनीनाथ इत्यादी ८४ सिद्धपुरुषांची नावे सांगितली जातात.

शक्तियुक्त शिव हेच एकमेव अंतिम तत्त्व होय. पिंड-ब्रह्मांडाच्या गाभ्यात वास करणाऱ्या शिवाशी समरसता प्राप्त करून घेणे हे प्रत्येक साधकाचे साध्य होय. हे साध्य प्राप्त करण्यासाठी योगी व्यक्तीला समाधी लावावी लागते व त्याकरिता हठयोगाची साधना आवश्यक असते अशी नाथपंथाची प्रमुख शिकवण आहे. तसेच शिष्याने ज्ञाननिष्ठा व कडक ब्रह्मचर्य पाळावे असा नाथगुरूचा आदेश आहे. उपवास, यात्रा, अग्निहोत्र,संन्यास इत्यादी रूढ आचारांना या पंथात महत्त्व नाही. तसेच जातिभेदालाही या पंथामध्ये महत्त्व नाही. खालच्या थरातील अनेक लोकांना नाथगुरुंनी संप्रदायाची दीक्षा दिली व परमार्थाचा मार्ग खुला केला.

या पंथीयांच्या वेषामध्ये किंगरी, मेखला, जानवे, शृंगी, कंथा, दंडा, खापरी, अधारी या गोष्टींचा समावेश असतो. **हठयोग प्रदीपिका, सिद्धसिद्धांत संग्रह, गोरक्षसिद्धांत संग्रह** हे या पंथाचे प्रमुख ग्रंथ होत. प्रयाग, हरिद्वार, बद्रिनाथ, केदारनाथ, वृंदावन, पुष्कर, रामेश्वर, अमरनाथ, पशुपतिनाथ, हिंगलज, त्रिंबकेश्वर ही या पंथीयांची तीर्थक्षेत्रे होत. महाराष्ट्रातील पैठण, आळंदी, चंद्रगिरी आताचे चांदगिरी, डुडुलगाव, वेंन्दूर, आंभोरे, गोव्यातील चंद्रनाथ व मंगेशनाथ, इत्यादी ठिकाणे या पंथाशी निगडित आहेत.

महाराष्ट्रात नाथपंथातील जोगी अजून आहेत. परंतु बहुजनसमाजाच्या धार्मिक जीवनावर या पंथाचा फारसा प्रभाव पडल्याचे दिसत नाही. अप्रत्यक्षरीत्या या पंथाचा प्रभाव, महानुभाव, वारकरी संप्रदाय व दत्तसंप्रदाय यांच्या विचारसरणीवर पडल्याचे दिसते.

२. वीरशैव तथा लिंगायत संप्रदाय : वीरशैव पंथाचा उदय बाराव्या शतकात झाला. दक्षिण भारतात बौद्ध धर्माचा ऱ्हास होऊन जैन धर्माचा प्रसार झाला होता. दिगंबरोंजैन पंथीयांचे वर्चस्व कर्नाटकात व श्वेतांबर जैन पंथीयांचे वर्चस्व गुजरातमध्ये अनेक शतके होते. त्यामुळे कर्नाटकाला लागून असलेल्या दक्षिण महाराष्ट्राचा भाग श्वेतांबर जैन पंथीयांचे कार्यक्षेत्र झाले होते. बाराव्या शतकाच्या मध्यावर बिज्जल कलचुरींच्या कारकिर्दीत बसवेश्वराने वीरशैव पंथाची संघटना बांधली. तेव्हापासून कर्नाटकात वीरशैव मताचे प्राबल्य वाढत जाऊन लिंगायतानी जैन मंडळीवर जोराचा हल्ला चढविला.[११] दक्षिण महाराष्ट्राचा जितका भाग जैनांनी व्यापला होता तितक्याच भागात वीरशैव धर्म प्रवक्त्यांचे कार्य चालू होते. दिगंबर जैन धर्मपंथ व लिंगायत पंथ या दोन्हीचे प्रसार माध्यम कन्नड भाषा असल्यामुळे लिंगायतांना आपले वर्चस्व स्थापन करणे शक्य झाले.

अल्लम प्रभू याला वीरशैव पंथाचे प्रणेते मानतात. गोरक्षनाथ आणि अल्लम प्रभू हे गुरुबंधू होत. परंतु नाथपंथामध्ये हठयोगावर जो अवास्तव भर दिला तो अल्लम प्रभूला मान्य नव्हता व त्याने आपले वेगळे तत्त्वज्ञान तयार केले. जिवाशिवाचे ऐक्य साधणे हे वीरशैव पंथाचे ध्येय होय. अल्लम प्रभूने निर्माण केलेल्या शिष्यपरंपरेत रेवणसिद्ध, मरूल सिद्ध, बसवेश्वर इत्यादी शिष्य येतात. इ. स. ११६० च्या सुमारास बसवेश्वराने वीरशैव तथा लिंगायत पंथाला संघटित स्वरूप दिले.

वीरशैव पंथाला शंकराचार्याचा मायावाद मान्य नाही. शिवनिर्मित सृष्टीला ते माया मानत नाहीत. वीरशैव साधकाला शिवाशी ऐक्य संपादन करण्याच्या मार्गात गुरुची अत्यंत आवश्यकता असते. त्यासाठी जंगमाचा पुरोहित वर्ग निर्माण झाला. शिवभक्ती आणि नैतिक आचरण या मार्गाने प्रत्येकाने समाजात राहून आत्महित साधावे अशी बसवाची शिकवण आहे.

सामाजिकदृष्ट्या लिंगायत क्रांतिकारी पंथ होता. सनातन वैदिक परंपरेविरुद्ध ते एक उघड बंड होते. धर्मज्ञान ही

कोण्या एका जातीची मक्तेदारी नाही, असे प्रतिपादन करून त्यांनी ब्राह्मणांच्या धार्मिक क्षेत्रातील वर्चस्वाला शह दिला. लोकशिक्षणासाठी त्यांनी कन्नड या लोकभाषेचा अवलंब केला. संन्यास व तप या बाबी आध्यात्मिक उन्नतीसाठी आवश्यक नाहीत असे प्रतिपादन केले. मूर्तिपूजा व तीर्थयात्रा यावर टीका करून जंगमालाच जगदीश्वर मानले. जातिभेद, अस्पृश्यता, पंचसुतक, अग्निपूजा, प्रेतसंस्कार इत्यादी गोष्टी लिंगायत पंथ मानत नाही. हिंदू कर्मकांड व संस्कार यांनाही लिंगायत पंथात स्थान नाही. चातुर्वर्ण्य, स्त्री-पुरुष विषमता या गोष्टींना पंथाचा विरोध आहे. कोल्हापूर, सांगली, सोलापूर भागात लिंगायतांची संख्या बरीच आहे. महाराष्ट्रातील बरेच वाणी लिंगायत पंथी आहेत.

३. दत्तसंप्रदाय : दत्तात्रेयाच्या उपासनेला महाराष्ट्रात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. तेराव्या शतकापासून महाराष्ट्रावर तसेच दक्षिणेत जे मुसलमानाचे आक्रमण झाले त्याचा परिणाम एतद्देशीय समाजरचना व धार्मिक जीवन यांचे विघटन होण्यामध्ये होऊ लागला. इ. स. १२९६ मध्ये अलाउद्दिन खलजीची दक्षिणेतील पहिली स्वारी झाल्यापासून या भागातील हिंदू समाजाला मुसलमानांच्या राजकीय आक्रमणांना व सूफी पंथी साधूंच्या इस्लामच्या वैचारिक प्रसाराला तोंड द्यावे लागले. दक्षिणेतील हिंदू राजवटींनी व आक्रमणाला आपल्या ताकदीप्रमाणे तोंड देण्याचा प्रयत्न केला. परंतु हे प्रयत्न यशस्वी झाले नाहीत. दक्षिणेतील हिंदू सत्ता एकापाठोपाठ कोसळल्यात. विजयनगरचे हिंदू साम्राज्य १५६५ साली लयाला गेले. महाराष्ट्रातील देवगिरीच्या यादवांची सत्ता १३१८ मध्ये नष्ट झाली व १३४७ साली बहमनी राजवट स्थापन झाली. ही परिस्थिती महाराष्ट्रात दत्तसंप्रदायाच्या विकासास कारणीभूत झाली. वर्णाश्रम धर्माचा पुरस्कार करणारा पुररुज्जीवनवादी संप्रदाय म्हणून दत्तसंप्रदाय महाराष्ट्रात विकसित झाला.

दत्तात्रेय ही पौराणिक देवता आहे. **महाभारता** मध्ये दत्तात्रेयाचा उल्लेख अत्रि वंशातील असा आहे. **ब्रह्मपुराणामध्ये** दत्तात्रेयाने वेदांना प्रतिष्ठा मिळवून दिली, यज्ञसंस्थेचे पुनरुज्जीवन केले, चातुर्वर्ण्यातील शैथिल्य दूर केले, अधर्म आणि असत्य यांचा उच्छेद केला आणि क्षीण होत चाललेल्या प्रजेत सामर्थ्य निर्माण केले, असे वर्णन आले आहे.[१२] **मार्कंडेय पुराणा** तही दत्तात्रेयाचे वर्णन आले आहे. दत्तात्रेयाचा जन्म ब्रह्मा, विष्णु आणि महेश यांच्या युतीतून अत्रि ऋषीची पत्नी अनसुया हिच्या पोटी झाला ही जन्मकथा दत्तभक्तांना मान्य आहे. अशा तऱ्हेने दत्तात्रेय या देवतेचे अस्तित्व जरी पुराणकालापासून असले तरी या देवतेच्या भोवती संप्रदायाची निर्मिती ही इ.स. पंधराव्या शतकात नरसिंह सरस्वतीच्या कार्यामुळे झाली.

नरसिंह सरस्वतीला दत्तोपासनेचे महान संजीवक आणि दत्तसंप्रदायाचे अप्रत्यक्ष प्रवर्तक मानले जाते. त्याचा जन्म १३७८ साली व निर्वाण १४५८ साली झाले. वयाच्या सातव्या वर्षी त्याची मुंज झाली, आठव्या वर्षी त्याने गृहत्याग केला, आणि दहाव्या वर्षी संन्यास घेतला. त्यानंतर तीस वर्षे त्याने उत्तर भारतात यात्रा केली व नंतर तो महाराष्ट्रात आला. महाराष्ट्रातील सनातन वैदिक धर्म, संस्कृती व भाषा मुसलमानांच्या आक्रमणांमुळे धोक्यात आल्याचे त्याला दिसले व हे संकट टाळण्यासाठी समाजाचा अध्वर्यू जो ब्राह्मण वर्ग त्याला आपल्या स्वकर्तव्याची जाणीव करून देणे व त्यांच्यामध्ये असलेला दंभ व वृथाभिमान दूर करून त्यांना धर्मरक्षणासाठी निर्भय बनविणे आवश्यक वाटू लागले. ब्राह्मण वर्गाच्या अधःपतनामुळे धर्माचा ऱ्हास होत असल्याचे त्याने प्रतिपादन केले. म्हणून ब्राह्मण वर्गात स्वकर्तव्याबद्दल जागृती निर्माण करण्यावर त्याने भर दिला.

बहमनी काळात नरसिंह सरस्वतीने केलेल्या वैदिक धर्मरक्षण कार्यात काही मुसलमान सत्ताधाऱ्यांनीही मदत केली. **गुरुचरित्र** ग्रंथात अलाउद्दिन अहमद दुसरा (१४३६-५८) याचे औदार्य, मनाची विशालता व धर्मसहिष्णुतेबाबत त्याची प्रशंसा केलेली आहे. तो ब्राह्मणांचा आदर करून त्यांच्याकडे भक्तिभावाने बघत असे. तो पवित्र वेदांवर ब्राह्मण पंडितांबरोबर चर्चा करीत असल्याचाही **गुरुचरित्रा** मध्ये उल्लेख आहे. इतकेच नव्हे तर त्याच्या धर्मविषयक उदार आचारविचारांमुळे काही सनातनी ब्राह्मण व मुसलमान क्रुद्ध झाल्याची स्पष्टोक्ती या ग्रंथात केलेली आहे.[१३]

दत्तसंप्रदाय हा सगुणवादी संप्रदाय आहे. त्यात मूर्तिपूजा व पादुकांची पूजा करण्याची पद्धती आहे. महाराष्ट्रातील दत्तमंदिरात बहुधा त्रिमुखी दत्तमूर्ती दिसून येते. मूर्तिपूजेऐवजी काही ठिकाणी पादुकांची पूजा करण्याची पद्धती आहे. औदुंबर, नरसोबाची वाडी आणि गाणगापूर ही दत्तात्रेयाची प्रसिद्ध क्षेत्रे मानली जातात. या तिन्ही ठिकाणी मूर्तीऐवजी पादुकांच्या पूजेची पद्धती आहे. मुसलमानांच्या आक्रमणापासून मूर्तिभंजनांचे प्रसंग ओढवल्यामुळे चौकोनी दगडावरील पादुकांच्या पूजेची प्रथा रूढ झाली असावी.

दत्तसंप्रदायात **गुरुचरित्र** हा प्रमुख ग्रंथ मानला जातो. हा ग्रंथ म्हणजे संप्रदायाचा वेद होय. नरसिंह सरस्वतीचा शिष्य सायंदेव याचा पाचवा वंशज सरस्वती गंगाधर याने हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात दत्तावतार चरित्र, श्रीपाद श्रीवल्लभ याचे अवतार चरित्र व नरसिंह सरस्वतीचे अवतार चरित्र हे प्रमुख विषय आहेत. या ग्रंथाखेरीज **दत्तप्रबोध, दत्तमहात्म्य आणि गुरुलीलामृत** या ग्रंथांना संप्रदायात विशेष मान्यता आहे. दत्तोपासकांमध्ये **गुरूचरित्रा** चे पारायण करण्याची प्रथा आहे. एखादे ऐहिक उद्दिष्ट प्राप्त करून घेण्यासाठीही ही पारायणे केली जातात. या पारायणासाठी सोवळ्याचे नियम कडकपणे पाळावे लागतात. परंपरेने फक्त ब्राह्मणांना **गुरुचरित्र** वाचण्याचा अधिकार आहे.

महाराष्ट्रात दत्तसंप्रदायाची चार तीर्थक्षेत्रे माहूर, कारंजे, औदुंबर व नरसोबाची वाडी येथे असून महाराष्ट्राबाहेर पाचवे कर्नाटकात गाणगापूर व सहावे तीर्थक्षेत्र सौराष्ट्रात गिरनार येथे आहे. माहूर हे गाव नांदेड जिल्ह्यात किनवट तालुक्यात आहे. पुराणात त्याचे वर्णन दत्तात्रेयाचे शयनस्थान म्हणून झाले आहे. कारंजे हे गाव अकोला जिल्ह्यात असून ते लाड कारंजे म्हणून ओळखले जाते. नरसिंह सरस्वतीचा जन्म या गावी झाला. औदुंबर हे गाव सांगली जिल्ह्यात कृष्णेकाठी भिलवडीजवळ आहे. नरसिंह सरस्वतीने या ठिकाणी चातुर्मास केला म्हणून हे स्थान तीर्थक्षेत्र झाले. नरसोबाची वाडी हे गाव कोल्हापूरजवळील कृष्णा-पंचगंगा संगमावर आहे. औदुंबरचा चातुर्मास संपवून नरसिंह सरस्वती या गावी आले व येथे त्यांनी बारा वर्षे मुक्काम केला. गाणगापूर हे स्थान कर्नाटक राज्यातील गुलबर्गा जिल्ह्यात भीमा-अमरजेच्या संगमावर आहे. येथे नरसिंह सरस्वतीचे नरसोबाच्या वाडीहून आल्यानंतर तेवीस वर्षे वास्तव्य होते. त्यांचे जीवनकार्य येथेच घडले. सौराष्ट्रातील जुनागडजवळ गिरनार हे एक दत्तोपासनेचे प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. गिरनार पर्वताच्या एका शिखरावर दत्तमंदिर आहे. याच पर्वतावर एक जैन मंदिर, एक पीराचा दर्गा, गोरखनाथ मंदिर, शिवमंदिर, दोन देवीची मंदिरे आहेत. म्हणून या स्थानाला संस्कृती-संगमाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. याखेरीज नेपाळमधील भटगाव हेही एक प्रसिद्ध स्थान आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की, मध्ययुगीन महाराष्ट्रात सनातन वैदिक धर्माला ज्या अंतर्गत व बहिर्जन्य संकटांना तोंड द्यावे लागले त्यांचा प्रभाव या संप्रदायाच्या जडणघडणीवर पडल्याचे दिसते. या संकटाला तोंड देण्यासाठी जे विविध पर्याय उपलब्ध होते त्यातील ब्राह्मण वर्णाला केंद्रस्थानी मानणाऱ्या पुनरुज्जीवनवादी पर्यायाचा स्वीकार या संप्रदायाने केला. त्यामुळे या संप्रदायाचा प्रभाव बहुजनसमाजावर फार पडू शकला नाही. मुसलमानी आक्रमणाचा सांस्कृतिक पातळीवर सामना करण्याच्या दृष्टीने इस्लाम उपासना प्रणालीतील काही प्रतीकांचा या संप्रदायाने स्वीकार केल्याचे दिसते. इस्लाम धर्मात पैगंबर हा प्रेषित. शुक्रवार हा पवित्र दिवस आणि चिराग व पीर पंजा या पवित्र गोष्टी आहेत, तर दत्तसंप्रदायात दत्त हा गुरू, गुरुवार हा पवित्र दिवस, निरंजन व पादुका या पवित्र गोष्टी आहेत.[१४] फकीर आणि अवधूत जोगी हे आणखी एक साम्यस्थल आहे. ब्राह्मण्याचे व वर्णाश्रम धर्मांचे संरक्षण हे संकुचित उद्दिष्ट ठेवल्यामुळे या संप्रदायाच्या सामाजिक प्रभावाला मर्यादा पडल्या.[१५]

४. महानुभाव संप्रदाय : महाराष्ट्रात महानुभाव संप्रदायाचा उदय तेराव्या शतकात झाला. या पंथाचा संस्थापक चक्रधर होय. तो भडोचच्या विशाल देव नावाच्या गुजराती ब्राह्मण प्रधानाचा पुत्र होता. महाराष्ट्रात मुसलमानी आक्रमणांनी निर्माण केलेली सामाजिक, राजकीय व धार्मिक दुरावस्था, त्याचप्रमाणे वैदिक कर्मकांड व चातुर्वर्ण्य व्यवस्थेविरुद्ध सर्वत्र उफाळून येत असलेला सामाजिक व धार्मिक असंतोष या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात महानुभाव पंथाचा उदय व प्रसार झाला.

चक्रधराचा परमगुरू चांगदेव राऊळ याला प्रत्यक्ष दत्तात्रेयाने वाघाच्या रूपाने एक पंजा मस्तकावर ठेवून पर आणि अवर शक्ती प्रदान करून बोध दिला अशी संप्रदायात कथा आहे. त्यामुळे दत्तात्रेयाला महानुभाव पंथाचे आदिकारण मानतात. चांगदेव राऊळाचा परमशिष्य ऋद्धिपूरचा गुंडम राऊळ अथवा गोविंद प्रभू, आणि गुंडम राऊळचा शिष्य चक्रधर अशी परंपरा आहे. चक्रधर हा चांगदेव राऊळाचा अवतार आहे असे संप्रदायात मानले जाते. संप्रदायाबद्दल ॐया मार्गासी श्री दत्तात्रेय प्रभू आदिकारणश्र असे चक्रधर म्हणतो.[१६]

महानुभाव लोक द्वैती तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते आहेत. ब्रह्मा, विष्णु, महेश या गौण देवता मानल्या आहेत. त्यांच्या कल्पनेनुसार दत्तात्रेय, श्रीकृष्ण, चक्रपाणी (चांगदेव राऊळ), गोविंद प्रभू (गुंडम राऊळ) आणि चक्रधर हे पाच ईश्वराचे अवतार होत. यांनाच संप्रदायात पंचकृष्ण असे मानतात. श्रीकृष्ण हे या पंथाचे आदि दैवत, परब्रह्माचा साक्षात अवतार. महानुभाव संप्रदायाचे जीवन तत्त्वज्ञान थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे : महानुभावांच्या मताप्रमाणे अंतिम पदार्थ चार आहेत. जीव, देवता,प्रपंच व परमेश्वर हे चार पदार्थ स्वतंत्र असून अनादि व अनंत आहेत. यातील प्रत्येक पदार्थ जातित्वाने एक असून त्यात अनेकांचा अंतर्भाव आहे ..... जीव हा बद्धमुक्त आहे. याचा अर्थ तो अनादिकालापासून अधिद्येने बद्ध असला तरी तो मुक्त होऊ शकतो व ईश्वराचा आनंद उपभोगू शकतो. ईश्वराचे ठिकाणी विरुद्ध धार्मित्व आहे, म्हणून तो अविक्रीय असून सर्वकर्ता आहे, निर्गुण असून मायासंबंधाने सगुण होतो. जीवाचे ध्येय अच्युत-पद प्राप्ती हे आहे. ती प्राप्ती म्हणजे ईश्वर सन्निधानात जीवाने अखंड आनंद उपभोगीत चिरकाल राहणे.[१७]

गृहस्थाश्रमात राहून आश्रम धर्माचे योग्य पालन केल्यास स्वर्गप्राप्ती होते, परंतु मुक्ती मिळत नाही. प्रपंचाचे अनियत्त्व ओळखून पूर्णपणे संन्यास घेणाराच मुक्त होतो. साधकाने शारीरिक कष्ट व मानसिक दुःख भोगणे आवश्यक आहे. संन्याशाने कसे वागावे याबद्दलचे काटेकोर नियम संप्रदायात आहेत. या सर्वांचे सार म्हणजे संन्याशाने संपूर्ण निःसंग, विस्क, अनासक्त आयुष्य जगले पाहिजे. पुरुषाच्या बरोबर स्त्रियांनाही संन्यास दीक्षा घेता येते. महानुभाव पंथात संन्यासी जीवनाची अतिरेकी कल्पना आहे. ज्या ज्या गोष्टीमुळे इंद्रियसुख प्राप्त होत असेल त्या सर्व गोष्टी

टाळाव्यात. संगीत ऐकणे, चवीने जेवण जेवणे, नवीन कपडे घालणे हे वर्ज्य करावयास सांगितले आहे. थोडक्यात जिवंत असताना मृतासारखे राहणे, ॐजीतेनी मृताच्या धर्मी वर्तावश्र हा आदर्श मानला आहे.

विविध देवतांच्या उपासना, तीर्थयात्रा, स्पृश्यास्पृश्यता, हिंसा, स्त्रियांचा विटाळशीपणातील विटाळ मानणे या गोष्टी संप्रदायाने निषिद्ध मानल्या आहेत. महानुभावांच्या मंदिरात मूर्तीच्या ऐवजी चौरस आकाराच्या ओट्यांना पवित्र मानून त्यांची पूजा करतात. त्याचप्रमाणे साधक भगवी वस्त्रे टाकून "शाह पोष" म्हणून काळ्या रंगाचा पोशाख करतात. मरणोत्तर प्रेताचे दहन न करता ते पुरण्याची पद्धती आहे. महानुभाव पंथावर इस्लामी धर्माचा प्रभाव पडल्याचे वरील गोष्टीवरून दिसून येते. या सर्व पद्धतींमुळे इस्लामी राजवटीत महानुभाव पंथीयांचा धार्मिक छळ होत नसे.

चक्रधरस्वामीच्या वचनांचा संग्रह असलेला केसोबासकृत **सिद्धांत पाठ सूत्र** हा या पंथाचा प्रमाण ग्रंथ आहे. याखेरीज **भगवत् गीता** आणि **भागवत** यांनाही प्रमाण ग्रंथ म्हणून पंथात मानले जाते. याखेरीज चक्रधराचे चरित्र असलेला ग्रंथ **लीळाचरित्र, दृष्टांत पाठ, शिशुपालवध, एकादशस्कंध, ज्ञान प्रबोध,** आणि श्रीकृष्ण लीलेचे वर्णन असलेला महदंबाकृत ढवळे हे या पंथाचे धार्मिक ग्रंथ आहेत. हे ग्रंथ अनेक शतके अंधारातच होते आणि याचे कारण हे सर्व धार्मिक वाङ्मय महानुभाव पंथाच्या आचार्यांनी परकीय आक्रमणापासून सुरक्षित राहावे म्हणून गुप्त लिपीत लिहून ठेवले होते. परंतु अलीकडील काळात नेने, य.खु. देशपांडे व वि. भि. कोलते या महानुभाव पंथाच्या अभ्यासकांनी केलेल्या अपार प्रयत्नांमुळे हे वाङ्मय मराठी वाचकांना उपलब्ध झाले आहे.[१८]

महानुभाव संप्रदायाच्या प्रमुख तीर्थक्षेत्रांमध्ये फलटण, माहूर आणि ऋद्धिपूर यांचा समावेश होतो. सातारा जिल्ह्यातील फलटण हे चांगदेव राऊळाचे जन्मस्थान, माहूर वास्तव्यस्थान व ऋद्धिपूर ही कर्मभूमी, म्हणून ही तिन्ही ठिकाणे संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे मानली जातात. याखेरीज पैठण, डोंबेगाव आणि बेलापूर या गावांचाही चक्रधराच्या जीवनाशी संबंध आला होता म्हणून याही स्थानांची पंथाच्या प्रमुख तीर्थक्षेत्रांत गणता होते.[१९]

५. वारकरी संप्रदाय : महाराष्ट्रातील सर्व धार्मिक संप्रदायांमध्ये वारकरी संप्रदायाला मध्यवर्ती स्थान आहे. तेराव्या शतकात महाराष्ट्रात प्रसार पावलेल्या या संप्रदायाची सुरुवात इ.स. च्या सहाव्या शतकापासून झाली असावी असे तज्ञांचे मत आहे. संप्रदायाच्या परंपरेप्रमाणे वारकरी संप्रदायाचा पाया संत ज्ञानदेवाने घातला असे मानले जात असले तरी त्याचा अर्थ या संप्रदायांचा प्रवर्तक ज्ञानदेव नव्हता, तर त्याने संप्रदायात वैचारिक अधिष्ठान देऊन व्यवस्थित स्वरूप दिले. ज्ञानदेवाच्या आधीदेखील हा संप्रदाय अस्तित्वात असून पुंडलिकास संप्रदायाचा प्रवर्तक मानले जाते. पुंडलिकाचा काल इ.स. ५०० च्या पुढे असावा असे अभ्यासकांचे मत आहे.[२०] पुंडलिकाने आपल्या भक्तीने विठ्ठलास पंढरपूरला आणले आणि वारकरी संप्रदायाची स्थापना केली अशी कथा आहे. इ. स. ६ ते १३ वे शतक या कालावधीत विठ्ठलाचे व पंढरपूरचे महत्त्व वाढत गेले, व त्याला राजमान्यता मिळाल्याचे वाङ्मयीन व तत्कालीन शिलालेखांवरून दिसते. या काळात पंढरपूरखेरीज इतरत्रही विठ्ठलाच्या मूर्तींची स्थापना झाली असल्याचे ऐतिहासिक पुरावे आहेत.[२१] यावरून स्पष्ट होते की, ज्ञानेश्वरपूर्व काळात विठ्ठल हे दैवत लोकप्रिय झालेले होते.

वारकरी संप्रदायात पंढरपूरची वारी करण्याला महत्त्व आहे. वारी याचा अर्थ पवित्र स्थळाच्या यात्रेस दरवर्षी अथवा दर महिन्याला नियमितपणे जाण्याची प्रथा. महाराष्ट्रात वारकरी याचा अर्थ दर महिन्याच्या शुद्ध एकादशीस अथवा आषाढी, कार्तिकी, चैत्री व माघी यापैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो तो असा सर्वसाधारपणे मानला जातो. पुंडलिकाने या संप्रदायाची स्थापना केली. ज्ञानेश्वराने संप्रदायाचा वैचारिक पाया घातला व नामदेवाने त्याचा विस्तार केला, एकनाथाने भागवताच्या रूपाने खांबासारखा आधार दिला आणि तुकारामाने गाथा रचून कळस चढविला अशी या संप्रदायाच्या विकासाची परंपरा आहे. वारकरी संप्रदाय हा शुद्ध भक्तिमार्गी संप्रदाय आहे. ज्ञानेश्वराच्या चिद्विलासवादी अद्वैत तत्त्वज्ञानाने या संप्रदायाची तात्त्विक बैठक तयार झाली आहे. परमात्मा हा सच्चित्तानंदरूप आहे. सत् म्हणजे त्याचे अस्तित्व स्वयंसिद्ध आहे. चित् म्हणजे तो जड नाही, व आनंद म्हणजे तो आनंदरूप आहे. हे जग परमेश्वराचा आविष्कार, क्रीडा अगर विलास आहे. शंकराचार्याचा मायावाद ज्ञानेश्वराला मान्य नाही. त्याच्या मते माया म्हणजे परमात्म्याची इच्छा. परमात्म्याचा चिन्मय अंश म्हणजे जीव. परमात्म्यास स्वतःच्या प्रेमाची प्रतीती हे त्याचे प्रयोजन होय. ज्ञानेश्वराने आपल्या तत्त्वज्ञानात भक्तीला महत्त्वपूर्ण स्थान दिले. भक्तीला तो पाचवा पुरुषार्थ मानतो. मुक्तीपेक्षा भक्ती श्रेष्ठ असून ती जीवनाचे अंतिम साध्य आहे. "भक्तीच्या श्रेष्ठ अनुभवात परमात्म्याच्या ऐक्यानुभवाबरोबर त्याच्या वेगळेपणाने राहून प्रेमसुखाचा आस्वाद चालतो. या आस्वादाशी मन, बुद्धी व सर्व इंद्रिये सहभागी होतात. यामुळे भक्तीस पंचम पुरुषार्थ म्हणण्यात आले आहे."[२२] **भगवद्गीते** तही भक्ती सर्वश्रेष्ठ मानली आहे. अद्वैतानुभवाचा व भक्तीचा विरोध नाही. पूर्ण अद्वैतानुभवाचे पर्यवसान भक्तीतच होते.

संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात त्याची आचारप्रणाली घडते. वारकरी संप्रदायाचा आचारधर्म एका तात्त्विक बैठकीवर आधारलेला आहे. पंढरपूरचा पांडुरंग अथवा विठ्ठल हे संप्रदायाचे एकमेव दैवत आहे. ही सर्व विश्वाची व

देवतांची मूलभूत देवता असून ती वारकरी संप्रदायाची प्राणभूत देवता होय. इतर देवतांची पूजा अंतिमतः विट्ठलाचीच पूजा असते, परंतु ती त्याच्या मूळ स्वरूपाची नसते. परमेश्वराची पूजा त्याच्या मूळ स्वरूपातच करावी अशी ज्ञानेश्वरादींची शिकवण आहे.

वारकरी संप्रदायातील साधकाला "रामकृष्ण हरी" हा मंत्र गुरूने दिलेला असतो. "राम म्हणजे हृदयास रमविणारा, कृष्ण आकर्षण करणारा व हरी म्हणजे ऐक्यरूप असणारा परमात्मा. त्याचप्रमाणे राम व कृष्ण हे रामकृष्ण अवतांराचे वाचक व हरी हा तो एकरूप असणारा रामकृष्ण विटेवर विट्ठलाच्या रूपाने असणारा. या मंत्रास सोवळ-ओवळे, स्थळ-काळ, जात-वित्त-कुळाचा प्रतिबंध नाही."[२३]

वारकरी संप्रदायातील व्यक्तीची मुख्य बाह्य लक्षणे पुढे दिली आहेत : गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर गोपीचंदनाच्या मुद्रा व बुक्का आणि वारीस जाताना खांद्यावर पताका. कोणाही वारकरी व्यक्तीकडून माळ घेता येते व माळ घेताना काही नियम पाळण्याची शपथ घेतात. ते नियम पुढीलप्रमाणे आहेत : (१) सत्य बोलणे, (२) परस्त्रीला मातेसमान मानणे, (३) काही अपराध घडल्यास क्षमा करण्याबद्दल भगवंताची कळकळीने प्रार्थना करणे, (४) शाकाहारी आहार घेणे, (५) वर्षातून निदान एकदा पंढरीची व आळंदीची वारी करणे व एकादशीव्रत पाळणे, (६) "रामकृष्ण हरी" या मंत्राचा १०८ वेळा माळेचे मणी ओढून दररोज जप करणे, (७) **ज्ञानेश्वरी** तील काही ओव्यांचे नियमित वाचन करणे व **हरिपाठाचे** अभंग म्हणणे आणि (८) नित्य प्रापंचिक कामे विट्ठलाचे स्मरण करून प्रामाणिकपणे पार पाडणे.

वारकरी संप्रदायाच्या भक्तिसाधनेत भजन, नामस्मरण व कीर्तन यांना महत्त्वाचे स्थान आहे. वारकरी कीर्तनास निरुपण म्हणतात. त्यात हरिदासी कीर्तनासारखे पूर्वरंग, उत्तरंग असे भाग नसून, कीर्तनासाठी घेतलेल्या मुख्य अभंगाचे विवरण असते. या विवरणात सांप्रदायिक संतांच्या अभंग आणि ओव्या, संत चरित्रे इत्यादींचा विषय खुलविण्यासाठी वापर करण्याची पद्धती आहे.

संप्रदायाचे प्रमाणभूत ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत :-**ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकारामाची गाथा** यांना या संप्रदायाची प्रस्थानत्रयी म्हणतात. त्याखेरीज संप्रदायातील संतांचे साहित्य प्रमाणभूत मानतात. वेद उपनिषदे, **भगवद्गीता, भागवत, रामायण, महाभारत** इत्यादी ग्रंथही संप्रदायात पूज्य मानतात. पण वेदातील कर्मकांड व उपनिषदातील केवळ ज्ञानसाधना या गोष्टींना पंथात मान्यता नाही.

वारकरी संप्रदायात फड, दिंडी आणि पालख्या यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. फड म्हणजे गुरुस्थानी असलेली वारकरी संप्रदायातील व्यक्ती व अशा व्यक्तीकडून ज्यांनी माळ घेऊन संप्रदायाची दीक्षा घेतली आहे अशा व्यक्तींचा संघटित समूह. गावोगावच्या शिष्य मंडळींचा समूह म्हणजे दिंडी. वारीच्या वेळी वारकरी आपापल्या फडावर जाऊन कीर्तन व भजन कार्यक्रमात भाग घेतात. नामदेव, तुकाराम यांच्या शिष्यपरंपरेतील मराठवाड्यातील मल्लाप्पा, वासकर व तुकारामाच्या वंशजांनी स्थापन केलेला देहूकर फड, हे तीन प्रमुख फड मानले जातात. याखेरीज अजरेकर, बेलापूरकर, ठाकूरबोवा, गंगूकाका शिरवळकर, धोंडोपंतदादा अत्रे, कऱ्हाडकर इत्यादींचे फड आहेत. शिवाय पंढरपूरला संप्रदायातील अनेक अग्रणी संतांनी मठ बांधले आहेत. तसेच वारकरी पंथामधील प्रसिद्ध संतांच्या नावाने पालख्या आहेत. त्यातून संतांच्या पादुका आषाढी वारीच्या वेळी मिरवणुकीने भक्तगण पंढरपूरला पायी घेऊन जातात. या पालख्यांमध्ये ज्ञानेश्वराच्या पालखीला अग्रस्थान आहे. त्यानंतर तुकारामाची पालखी, एकनाथ, निवृत्तीनाथ, सोपान, मुक्ताबाई, जनार्दनस्वामी, बाळाजी चैतन्य, जयराम स्वामी वडगावकर, बलभीम महाराज, भुतेश्वर महाराज, वटेश्वर महाराज, गोरखनाथ, मच्छिंद्रनाथ, दादामहाराज सातारकर, श्रीशंकर महाराज, ज्ञानोबा महाराज, शेकोजीबुवा, घाडगेबुवा, रुक्मिणी, शेषनारायण यांच्या पालख्या आषाढीच्या वेळी पंढरपूरला जात असतात. याखेरीज महाराष्ट्रातील अनेक गावांहून दिंड्या येत असतात.

वारकरी संप्रदायाचे आद्यक्षेत्र पंढरपूर हे पांडुरंगाचे निवासस्थान आहे. इ. स. चौथ्या व पाचव्या शतकात पंढरपूर पांडुरंगपल्ली या नावाने ओळखले जात होते व त्यावेळी ते लहान खेडे होते. यादव कालात त्याचा विस्तार झाला व पल्लीचे पूर झाले. या क्षेत्राची ख्याती महाराष्ट्राबाहेर पंजाबपर्यंत पसरली. पांडुरंगाच्या जुन्या मंदिराची मोडतोड झाल्यामुळे त्याची दुरुस्ती चांगा मुधेश याने चौदाव्या शतकात केल्याचे दिसते. मुसलमानी आक्रमणाच्या धोक्यामुळे पांडुरंगाच्या मूर्तीचे स्थलांतर पंधराव्या शतकात विजयानगरला झाल्याची परंपरागत कथा आहे. त्यानंतर मूर्तीच्या स्थलांतराच्या घटना अधूनमधून सतराव्या शतकापर्यंत घडतच होत्या. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर पंढरपूरचा विकास होऊ लागला व पेशवाईत मंदिराचा बराच विस्तार झाला. १९०४ साली पंढरपुरास लोहमार्ग झाला व ते इतर भागांशी जोडले गेले.

पांडुरंगाची मूर्ती हरिहर ऐक्याचे प्रतीक असल्याचे मानले जाते. डोक्यावरील मुकुटाच्या जागी शंकराची पिंड आहे असे भक्तजन मानतात. पांडुरंगाची मूर्ती मुळात बौद्ध अथवा जैन मूर्ती असावी अशी काहींची समजूत आहे. परंतु ही समजूत चुकीची असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.[२४]

आधुनिक कालातही पंढरपूरचे महत्त्व वाढतच आहे. दरवर्षी हजारो लोक यात्रेस जात असतात. पंढरपूर क्षेत्राचे समाजातील महत्त्व लक्षात घेऊन या नगराचा पद्धतशीर विकास घडवून आणण्याची योजना शासनाने आखली आहे.

संप्रदायातील इतर महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये पंढरपूरखेरीज आळंदी, पैठण, देहू, पिंपळनेर, त्रिंबकेश्वर, सासवड, एदलाबाद, अरण, तेर, मंगळवेढे व नेवासे ही आहेत. ही सर्व क्षेत्रे वारकरी संप्रदायातील संतांच्या जीवनकार्यांशी कोणत्या ना कोणत्या तरी रूपाने निगडित आहेत.

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी व बहुजनसमाजातील लोक फार मोठ्या प्रमाणावर वारकरी संप्रदायात सामील झाले आहेत. आषाढी वारी व इतर प्रमुख वाऱ्यांच्या निमित्ताने महाराष्ट्रातील लक्षावधी लोक पंढरपूरला जात असतात. त्यामुळे सांस्कृतिक देवाणघेवाणीची एक अभूतपूर्व संधी त्यांना अशा प्रसंगी मिळत असते. महाराष्ट्राचे सांस्कृतिक ऐक्य घडविण्यात व टिकविण्यात या संप्रदायासचे योगदान फार महत्त्वपूर्ण आहे. त्याचप्रमाणे धर्मातील अर्थशून्य कर्मकांडाला फाटा देऊन ग्रामीण जनतेच्या भ्रामक समजुतींमधील फोलपणा दाखवून विशुद्ध धार्मिक जीवनाचे महत्त्व पटवून देण्यातही संप्रदायाचे फार मोठे काम आहे.

६. समर्थ संप्रदाय : ज्यावेळी महाराष्ट्रात संत तुकारामाने वारकरी संप्रदायाच्या मंदिरावर आपल्या अभंगवाणीने कळस चढविला त्याचवेळी येथे एका नव्या धार्मिक पुनरुज्जीवनवादी विजिगीषू संप्रदायाची स्थापना रामदासस्वामीने केली. रामदासाचा जीवनकाल इ. स. १६०८ ते १६८२ हा होय. तुकाराम आणि समर्थ रामदासस्वामी हे समकालीन आणि दोघांचाही शिवछत्रपतींशी संबंध आल्याचे दिसते.

महाराष्ट्रावर सतत चालू असलेले मुसलमानी सत्तेचे आक्रमण आणि त्यामुळे समाजात पसरलेले नैराश्य आणि निवृत्तीवादी वृत्ती व इस्लामी आक्रमणाला प्रथमच उघड आव्हान देणाऱ्या शिवछत्रपतींचा उदय आणि त्यांनी रोवलेली स्वराज्याची मुहूर्तमेढ या राजकीय आणि सामाजिक पार्श्वभूमीवर रामदासाच्या कार्याने आकार घेतला. रामदासस्वामीने ज्याप्रमाणे रामदासी संप्रदायाच्या रूपाने विशिष्ट पूजा प्रणालीचा समाजात प्रसार केला, त्याचप्रमाणछ "महाराष्ट्र धर्मै" या नावाने ओळखली जाणारी जीवनविषयक विचारप्रणाली महाराष्ट्राला दिली, आणि त्याद्वारा शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या कार्यास पोषक असे वातावरण तयार केले.

मध्ययुगीन कालखंडातील महाराष्ट्रातील समाज परकीय राजवटीमुळे जर्जर झाला होता. लोकांमध्ये नैराश्याची भावना पसरली होती. या परिस्थितीत समर्थ रामदासस्वामीने समाजात "महाराष्ट्र धर्माची शिकवण" रूजविण्यास सुरुवात केली. महाराष्ट्र धर्म हा शब्दप्रयोग रामदासाच्या आधी अस्तित्त्वात आला होता, पण त्याचा अर्थ निराळा होता. **महिकावतीच्या बखरीत** (इ.स. १३७०) प्रथम महाराष्ट्र धर्माचा उल्लेख आला, परंतु त्यात कुळाचार, वंशाचार, देशाचार, वेदशास्त्राचार, स्नान, संध्या, जप, उपासना, व्रते, सण, उत्सव, सोळा संस्कार या बाबींचा समावेश होता. **गुरुचरित्रा** तही महाराष्ट्र धर्माचा उल्लेख आला आहे. यात वेदप्रामाण्यवाद, वर्णाश्रम, धर्म, सदाचार, व्रत-वैकल्ये इतकाच मर्यादित अर्थ आहे. रामदासाच्या महाराष्ट्र धर्म या शब्दप्रयोगामध्ये वैदिक धर्मपरंपरेवर आधारलेला, राजकीय अस्मिता असलेला इहवादी समाज निर्मिण्यास आवश्यक असलेले मानसिक गुण अथवा मनोवृत्ती असा अर्थ अभिप्रेत आहे. रामदास प्रणीत महाराष्ट्र धर्मात कोणत्या गोष्टींचा अथवा प्रवृत्तींचा अंतर्भाव आहे याचा निर्देश खाली थोडक्यात केला आहे.

रामदासाच्या महाराष्ट्र धर्माची प्रमुख सहा लक्षणे आहेत.[२५] ऐश्वर्याकांक्षा, प्रपंच, लोकजागृती, शक्ती, यत्नदेव, आणि स्वराज्य व स्वधर्म ही ती सहा लक्षणे होत. या लक्षणांचा थोडा विस्ताराने अर्थ पाहू. पहिले लक्षण ऐश्वर्याकांक्षा, इहवादी विचारसरणी राष्ट्रवादास पोषक आहे अशी त्याची धारणा होती. प्राचीन काळी ही वृत्ती भारतीय समाजात मोठ्या प्रमाणात दिसत होती व त्याचाच परिपाक हिंदू धर्मीय राजाच्या उदयात झाल्याचे दिसते. या कालखंडात भारताने कला, शास्त्र, वास्तुशिल्प, व्यापार, नौकानयन इत्यादी क्षेत्रांमध्ये अग्रेसर स्थान मिळविले होते. परंतु त्यानंतरच्या काळात आद्यशंकराचार्य प्रणीत निवृत्तीवादी विचारसरणीच्या प्रभावामुळे व कुमारिल भट्टाच्या शब्दप्रामाण्य आणि कर्मकांडप्रधान धार्मिक विचारसरणीच्या प्रभावामुळे इहवादी विचारसरणी समाजातून लुप्त झाली होती व परिणामी परकीय राजवट स्थापन झाली होती. ही परिस्थिती पालटण्यासाठी रामदासाने लोकांमध्ये ऐश्वर्याकांक्षेचा पुरस्कार केला. लोकांनी नाना विद्या प्राप्त करून म्हणजेच सद्विद्या प्राप्त करून वैभवसंपन्न व्हावे असा त्याने लोकांना उपदेश केला. "जे गुणसंपन्न आहेत ते भाग्यश्री भोगिती, अवगुणासी दारिद्र्य प्राप्ती, यदर्थी संदेह नाही" असे रामदास म्हणतो. ऐश्वर्याकांक्षेखेरीज स्वराष्ट्र निर्मिती होणार नाही हे त्याने लोकांच्या मनावर बिंबविले.

प्रपंच हे महाराष्ट्र धर्माचे दुसरे महत्त्वाचे लक्षण. राष्ट्र उभारणीस निवृत्तिवादी विचारसरणी मारक आहे. हिंदू धर्मात अंतर्भूत झालेल्या संन्यासमार्गामुळे जनसामान्यांमध्ये प्रपंच आणि मोक्ष या परस्पर विरोधी गोष्टी आहेत अशी ठाम कल्पना प्रचलित झाली होती व त्याचाच परिपाक समाजमानसात निवृत्तिवादी विचारसरणी प्रभावी होण्यात झाली होती. रामदासाच्या मते ही विचारसरणी स्वराष्ट्र उभारणीस विघातक आहे. म्हणून तो म्हणतो, "आधी प्रपंच करावा नेटका,

मग घ्यावे परमार्थ विवेका."ज्यांनी प्रपंच सोडून परमार्थ करावयाचा प्रयत्न केला त्यांची अन्नान्न दशा झाली. म्हणून महाराष्ट्र धर्मात आधी प्रपंच करण्याला महत्त्वाचे स्थान दिले आहे. चारही आश्रमांत गृहस्थाश्रम सर्वश्रेष्ठ आहे. देव, ऋषी, मुनी, तपस्वी हे या आश्रमातूनच निर्माण झाले व त्या आधारेच ते जगतात असे रामदासाने प्रतिपादन केले.

लोकजागृती हे महाराष्ट्र धर्माचे तिसरे लक्षण. लोकजागृती, लोकसंघटन व लोकशक्तीची उपासना या गोष्टी रामदासाने राष्ट्र उभारणीसाठी महत्त्वाच्या मानल्या. लोकांना शिकवणे, त्यांना जाणते करणे आणि मग त्यांना एकजीव करून दृढकट्टबंधात ठेवणे, संघटित ठेवणे हा समर्थाचा महामंत्र आहे.

शक्ती हे महाराष्ट्र धर्माचे चौथे लक्षण. राष्ट्रनिर्मितीसाठी शक्तीला महत्त्वाचे स्थान दिले आहे. अशक्ताला कोणी विचारत नाही. "शक्तीने मिळती राज्ये, युक्तीने यत्न होतसे. शक्ती युक्ति जये ठायी, तेथे श्रीमंत नांदती," असे शक्तीचे महत्त्व रामदासाने विशद केले. समर्थ संप्रदायामध्ये श्रीराम व हनुमान यांच्या उपासनेला यामुळेच महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. हनुमान ही शक्तीची देवता समजली जाते.

यत्नदेव किंवा प्रयत्नवाद हे पाचवे लक्षण. "यत्न तो देव जाणावा, यत्नाचा लोक भाग्याचा. यत्नेवीण दरिद्रता" ही समर्थ वचने प्रयत्नाचे महत्त्व स्पष्ट करतात. हिंदू समाजात असलेला प्रारब्धवाद निपटून काढण्यासाठी रामदासाने यत्नाला देव मानले. प्रयत्नाने कर्मरेखा पुसत येते हे त्याने आपल्या शिकवणुकीद्वारा जनमानसावर बिंबविण्याचा प्रयत्न केला.

स्वराज्य आणि स्वधर्म हे महाराष्ट्र धर्माचे सहावे लक्षण व उद्दिष्ट होत. स्वराज्य हे साध्य, तर स्वधर्म हे ते गाठण्याचे साधन. समाजातील चार वर्णांचे लोक स्वधर्म विसरले म्हणून समाजामध्ये अनावस्था झाली. मराठे सरदार व ब्राह्मण यवनांकडे नोकरी करण्यात धन्यता मानू लागले व आपल्या स्वधर्मास विसरले. त्यामुळे देश अधोगतीस गेला. ही स्थिती बदलून देशास उन्नतवस्था प्राप्त करून देण्यासाठी स्वधर्माचे पालन करणे, विशेषतः ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णियांकडून, अगत्याचे आहे. या दृष्टीने रामदासस्वामीने राजधर्म, क्षात्रधर्म, ब्राह्मणधर्म आणि सेवकधर्म यांचे विवेचन केले आहे. जिवाची पर्वा न करता शत्रूच्या सैन्यावर तुटून पडणे हा क्षत्रियांचा धर्म. ब्राह्मणांचा धर्म म्हणजे विद्याव्यासंग, श्रुतिस्मृती पुराणांचा अभ्यास आणि त्या आधारे लोकांना धर्मोपदेश करणे हा होय. ब्राह्मण तरुणांनी महंत होऊन समाजात जनजागृती करावी यासाठी रामदासाने आवाहन केले.

रामदासाच्या महाराष्ट्र धर्मांमध्ये केवळ धर्मकारण नाही तर धर्मकारण आणि राजकारण हे एकरूप झाले आहेत. ही विचारप्रणाली समाजात रूजविण्यासाठी त्याने समाजात विशिष्ट आचारप्रणालीचा प्रसार केला व आपल्या संप्रदायाची स्थापना केली. संप्रदायाला संघटित स्वरूप प्राप्त करून देण्यासाठी रामदासाने महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेर मठांचे जाळे तयार केले. त्याने महाराष्ट्रात ११० मठ स्थापन केले. महाराष्ट्राबाहेरही अनेक मठ स्थापन केले. या मध्ये सुरत, काशी, कांची, हरिद्वार, अयोध्या येथील मठांचा समावेश होतो. प्रत्येक मठाचे प्रमुखपद महंताकडे देण्यात आले. ब्राह्मण वर्गातील बुद्धिमान व चलाख मुलांमधून महंतांची निवड जाणीवपूर्वक करण्यात आली. लोकशिक्षणाद्वारा समाजात जनजागृती करून त्यांना धार्मिक व राजकीय दृष्ट्या जागृत करणे हे महंतांचे प्रमुख कर्तव्य होते.

राम, मारुती आणि तुळजाभवानी ही रामदासी संप्रदायाची उपास्य दैवते. रामदासाने महाराष्ट्रात गावोगावी मारुतीची देवळे उभारली आणि रामनवमीचा उत्सव सुरू केला. परकीय अमलामुळे हा उपक्रम करताना बरीच गुप्तता पाळावी लागत असे. महंताने लोकांना केवळ उपदेश करून न थांबता त्यांचे दुःखनिवारण करावे, त्यांची सेवा करावी व जगन्मित्र व्हावे असे रामदास सांगतो. महंताच्या ठिकाणी निस्पृहता असणे आवश्यक आहे. द्रव्यासाठी कीर्तन करू नये, राजद्वारीचा सेवेकरी होऊ नये, कोणी इनाम दिले तर घेऊ नये असे तो महंतांना उपदेश करतो. महंताने आपला निर्वाह भिक्षेवर करावा. पण एका घरातून जास्त भिक्षा मिळाली असली तरी फक्त एकच मूठ स्वीकारावी. भिक्षेच्या निमित्ताने त्याने समाज परिस्थितीचे अवलोकन करावे. राष्ट्रधर्माचा प्रसार करण्याचे काम ब्राह्मण तरुणांचे आहे. म्हणून त्याने ब्राह्मण तरुणांना समाज जागृती करण्याची आवाहन केले.

समाजात प्रचलित असलेल्या हीन देवतेची पूजा ज्याप्रमाणे वारकरी संप्रदायातील संत त्याज्य मानीत होते तसे रामदास मानत नव्हता. देवतांच्या बाबतीत त्याचा दृष्टिकोन सर्वसमावेशक होता. कुलदेवता, ग्रामदेवता, विविध प्रकारच्या हीन देवता यांचीही पूजा करावी असे तो सांगतो. या दृष्टीने विचार करता या संप्रदायाचे स्वरूप परंपरावादी व पुनरुज्जीवनवादी होते असे दिसते.

दासबोध हा रामदासी संप्रदायाचा प्रमाण ग्रंथ आहे. हा ग्रंथ वीस दशकांचा असून प्रत्येक दशकात दहा दहा समास विविध विषयांवर लिहिले आहेत. याखेरीज त्याने लिहिलेली करुणाष्टके, आध्यात्मिक प्रकरणे, आणि **रामायण** हे ग्रंथ संप्रदायात महत्त्वपूर्ण मानले जातात. याखेरीज संप्रदायातील मान्यवर शिष्यांचे ग्रंथही महत्त्वाचे मानले जातात. यात गिरिधरकृत "समर्थ प्रताप," कल्याणस्वामीच्या कुळातील भिमाजीबुवा याचा "भक्त लीलामृत," आत्माराम स्वामी

एक्केहाळीकर याचा "दासविश्रामधाम"या ग्रंथांचा उल्लेख करता येईल.[२६]

समर्थ संप्रदायाच्या पवित्र स्थानांमध्ये सातारा जिल्ह्यातील चाफळ व परळी ही दोन ठिकाणे महत्त्वपूर्ण मानली जातात. चाफळ येथे त्याने पहिला मठ स्थापन करून आपल्या कार्यास सुरुवात केली, महणून याला संप्रदायाचे आदिपीठ मानतात. त्याचप्रमाणे परळी येथील सज्जनगडावर रामदासाने आपल्या आयुष्याची शेवटची वर्षे घालविली व आपला देहही तेथेच ठेवला असल्याने हे स्थानही पवित्र मानण्यात येते. याखेरीज त्याचे जन्मगाव औरंगाबाद जिल्ह्यातील जांब, त्याने स्थापन केलेल्या अकरा मारुतीपैकी एक मंदिर असलेले शिंगणवाडी, **दासबोधा** ची रचना जेथे केली ती शिवथरघळ, तसेच परभणी जिल्ह्यातील दहिफळ, नाशिकजवळील टाकळी या गावांना संप्रदायात तीर्थक्षेत्रांचे महत्त्व प्राप्त झाले आहे. तसेच पंचवटी, अयोध्या व रामेश्वर ही स्थानेही संप्रदायात पवित्र मानली जातात.

समर्थ संप्रदायात ब्रह्मचारी व गृहस्थाश्रमी असा भेद आहे. काखेत कुबडी, गळ्यात भिक्षेची झोळी, हातात चिपळया, अंगात भगव्या रंगाची कौपीन, कपाळावर राममुद्रा असा महंतांचा वेश असतो. सांप्रदायिकांच्या दैनंदिन आचारात स्नानसंध्या, देवपूजा, **दासबोधा** तील निदान दोन समास, **मनोबोधा** तील अकरा श्लोक व दोन करुणाष्टके यांचे वाचन, **ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत** इत्यादी आध्यात्मिक ग्रंथांचे वाचन या बाबींचा समावेश होतो.

महाराष्ट्रातील सहा प्रमुख संप्रदायांचे स्वरूप व आचारविचारांचे विवेचन वर केले आहे. हे संप्रदाय काही बाबतीत सनातन वैदिक धर्मापासून निराळे जीवन दृष्टिकोन प्रतिपादणारे व निराळ्या आचारधर्माचा पुरस्कार करणारे असल्याचे दिसते. हे संप्रदाय स्थूलमानाने क्रांतिकारी, सुधारणावादी व पुनरुज्जीवनवादी अशा तीन प्रकारांत मोडतात. वीरशैव व महानुभाव संप्रदाय यांना क्रांतिकारी विचारसरणीचे संप्रदाय मानता येईल. सनातन वैदिक धर्मापासून हे संप्रदाय अधिक प्रमाणात दूरीभूत झाल्याचेही दिसते. वारकरी संप्रदायाला सुधारणावादी संप्रदाय मानता येईल. सनातन वैदिक धर्माची आचारविचारांची चौकट मोडून न टाकता त्यात अधिकाधिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न या संप्रदायाने केल्याचे दिसते. दत्त संप्रदाय व समर्थ संप्रदाय हे पुनरुज्जीवनवादी संप्रदाय होत. वर्णाश्रमधर्माचे शुद्ध स्वरूप पुन्हा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न या संप्रदायांनी प्रामुख्याने केल्याचे दिसते. परंतु हेही संप्रदाय परंपरागत सनातन वैदिक संप्रदायापासून काही बाबतीत आपले निराळेपण टिकविणारे होते. सामाजिक पातळीवर हिंदू आणि मुसलमान या दोन समाजांना एकमेकांच्या जवळ आणण्याचे प्रयत्न दत्त संप्रदायाने केल्याचे त्यातील विविध सांस्कृतिक व धार्मिक प्रतीकांवरून दिसते. समर्थ संप्रदायाने परंपरागत सनातन वैदिक धर्मात असणारी ऐहिक जीवनाविषयीची उदासीनता आणि कर्मवादी विचारसरणी या विरुद्ध एक प्रकारचा वैचारिक उठाव केल्याचे दिसून येते. नाथ संप्रदायाचा प्रमुख रोख हा जीवनाच्या उच्चपातळीवर असलेल्या साधकांवर होता व या पातळीवर त्यांनी जातपातीची बंधने अमान्य केल्याचे दिसते. एकूण सर्व संप्रदायांचा उद्देश परंपरागत सनातन वैदिक धर्म व तत्कालीन हिंदू समाज यांच्यामध्ये परिस्थितीतील परिवर्तनामुळे निर्माण झालेला विसंवाद व त्यातून निर्माण झालेल्या विविध भौतिक व आध्यात्मिक समस्या यांचे योग्य तऱ्हेने निराकरण करणे हा होता. ही समस्या सोडविण्यात कोणत्याही संप्रदायाला पूर्णपणे यश मिळाल्याचे दिसत नसले तरी वारकरी संप्रदायाने याबाबतीत महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण कार्य केल्याचे मान्य करावे लागते. महाराष्ट्रातील विविध जाती, जमाती आणि संस्कृतीच्या भिन्न स्तरांवर असणाऱ्या गटांच्या धार्मिक जीवनात एकात्मतेचे बीज रुजविण्याचे महत्त्वाचे कार्य वारकरी संप्रदायातील ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम आदि संत कवींनी केल्याचे दिसते. या संतांनी असहिष्णु आचरण अथवा जबरदस्ती न करता निरनिराळ्या जाती जमातींमध्ये प्रचलित असलेला हीन पूजा संप्रदाय व अप्रगत धार्मिक विचारसरणी यावर टीका करून त्यांना प्रगत अशी वारकरी संप्रदायाची पूजाप्रणाली उपलब्ध करून दिली व महाराष्ट्रीय समाजातील धार्मिक जीवनाची उत्क्रांती घडवून आणण्यास चालना दिली. विट्ठलभक्तीच्या रूपाने महाराष्ट्रातील विविध सामाजिक गटांत प्रादेशिक पातळीवर धार्मिक ऐक्याचा दुवा निर्माण केला. धर्माच्या नावावर जे अर्थहीन कर्मकांड समाजामध्ये फोफावले होते, त्यावर कठोर टीका करून शुद्ध धार्मिक प्रेरणेचे महत्त्व जनमानसावर संतांनी बिंबविले.

मध्ययुगीन शास्त्री पंडितांनी धार्मिक क्षेत्रात जो जाती व वर्णावर आधारित विषमतेचा पुरस्कार केला होता, त्याविरुद्ध संतांनी बंड पुकारले. नामस्मरणासारखा सुटसुटीत आचारधर्माचा पुरस्कार करून धार्मिक जीवनातील कर्मकांडाचे महत्त्व कमी केले व सर्वसामान्य जनतेला धार्मिक जीवनात समान अधिकार उपलब्ध करून दिले. विट्ठल हाच एकमेव देव असून सर्वांनी त्याचीच उपासना करावी, अशी दृढ मानसिक धारणा असूनही समाजातल्या निरनिराळ्या गटांत प्रचलित असलेल्या विविध पूजा पद्धतींविषयी उदार व सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारून सर्व संप्रदायांना वारकरी संप्रदायाच्या झेंड्याखाली एकत्र आणले. अशा तऱ्हेने विविध जाती आणि जमातींच्या व प्रादेशिक गटांच्या धार्मिक जीवनात विभिन्नता असतानाही सर्वांना एकत्र गुंफणारा असा विट्ठलभक्तीचा धागा निर्माण करून महाराष्ट्रीय समाजाचा धार्मिक पाया तयार केला.[२७]

मध्ययुगीन काळात महाराष्ट्रातील समाजापुढे इस्लाम धर्म व मुसलमानी राजवटीच्या आक्रमणाचे आव्हान होते. हे

आव्हान पेलण्याच्या प्रयत्नातून विविध संप्रदायांची निर्मिती झाली. अठराव्या शतकापासून ख्रिश्चन धर्माच्या प्रसारामुळे व या धर्माच्या तात्त्विक बैठकीमुळे या आव्हानाचे स्वरूप व तपशील बदलू लागल्याचे दिसते. या कालखंडात धार्मिक क्षेत्रातील परिवर्तनाबरोबरच आर्थिक, शासकीय व तांत्रिक क्षेत्रातही दूरगामी बदल घडून आलेत व या सर्वांचा परिणाम महाराष्ट्रात प्रार्थनासमाज व सत्यशोधक समाज यांच्या स्थापनेत झाल्याचे दिसून येते. या धार्मिक आंदोलनाची सुरुवात १८४० साली परमहंस सभेच्या स्थापनेने झाली. या सभेची स्थापना करण्यात दादोबा पांडुरंग, राम बाळकृष्ण, मोरोबा विनोबा, आत्माराम पांडुरंग, तुकाराम तात्या, बाळाभाऊ शिंत्रे, सखारामशास्त्री हळबे, भिकोबा लक्ष्मण, सखाराम लक्ष्मण चव्हाण या समाजधुरिणांनी पुढाकार घेतला होता, व याबाबतीत यांना पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्याकडून प्रोत्साहन मिळाले होते. रामकृष्ण बाळकृष्ण जयकर हे या सभेचे अध्यक्ष होते. या समाजाची स्थापना प्रथम मुंबईत झाली व त्यानंतर याच्या शाखा अहमदनगर, सातारा, बेळगाव, रत्नागिरी इत्यादी ठिकाणी स्थापण्यात आल्या. परंतु महाराष्ट्रातील पांढरपेशा समाजातील विरोधामुळे या सभेचा लवकर अंत झाला.[२८] यानंतर १८६५ साली वेद समाजाच्या स्थापनेचा प्रयत्न झाला व याचीच परिणती ३१ मार्च १८६७ साली प्रार्थनासमाजाच्या स्थापनेत झाली. या कार्यात ब्राह्मोसमाजातील थोर विचारवंत केशवचंद्रसेन, डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या व्याख्यानाने प्रोत्साहन मिळाले. या समाजात वेद समाजाचे पुरस्कर्ते सामील झाले, व याचे नेतृत्व आत्माराम पांडुरंग, परमानंद, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगेश वागळे, महादेव गोविंद रानडे इत्यादी मान्यवर व्यक्तींनी जाहीरपणे केले. या समाजाने प्रार्थना हे ईश्वरोपासनेचे मुख्य साधन मानले. प्रार्थनेमध्ये भक्तिमार्गातील संतांच्या अभंगांचा वापरही होत असे. परंतु या समाजाचे आकर्षण नागरी सुशिक्षित, उच्च व मध्य वर्गापुरतेच मर्यादित राहिले. बहुजनसमाज प्रार्थना समाजापासून दूरच राहिला. त्यामुळे कालांतराने या समाजाचा प्रभाव क्षीण झाला व आता हा समाज मृतवत् असल्यासारखाच आहे.

राजा राममोहन रॉय यांच्या विश्वधर्माच्या कल्पनेस महाराष्ट्रात मूर्तस्वरूप देण्याचा प्रयत्न महात्मा जोतिबा फुले यांनी आपल्या सत्यशोधक समाजाच्या चळवळीतून देण्याचा प्रयत्न केला. **सार्वजनिक सत्यधर्म** या ग्रंथात फुलेंनी आपले धर्मविषयक विचार मांडले आहेत. फुलेंनी ईश्वराला "निर्मिक" हा कोणतीही उपासना अभिप्रेत नसलेला शब्द वापरलेला आहे. शुद्ध नैतिक जीवनाला ईश्वराचे अधिष्ठान आवश्यक आहे असे फुले यांचे मत होते. ईश्वराचे ज्ञान होण्यासाठी धर्मग्रंथ अथवा गुरूची आवश्यकता नाही असे त्यांचे मत होते. सत्यशोधक समाजात जातिभेद, स्त्रीोंपुरुषभेद या भेदांना स्थान नव्हते. १८९० मध्ये जोतिबा फुले यांचे निधन झाले व त्याबरोबर सत्यशोधक चळवळीचा ऱ्हास झाला. या चळवळीचे पुनरुज्जीवन करून कोल्हापूरच्या शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना केली. शाहूंनी ब्राह्मणेतर पक्षास राजकीय व सामाजिक चळवळीचे स्वरूप दिले. मात्र आपण सत्यशोधक नसल्याचे शाहू राजेंनी नंतर जाहीर केले. महाराष्ट्रातील वेदोक्त आंदोलन ही या चळवळीतील महत्त्वपूर्ण घटना होती. साताऱ्याचे भास्करराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळ महाराष्ट्रात प्रबल झाली व यामध्ये बहुजनसमाज मोठ्या संख्येने सामील झाला. परंतु कालांतराने फुलेंचा स्वातंत्र्य, समता व मानवी बंधुत्व यांच्यावर आधारलेला विश्वधर्म दृष्टिआड झाला.

Maharashtra State Gazetteers

अहिंदू समाजाचे धार्मिक जीवन

महाराष्ट्रातील मुसलमान, ख्रिश्चन, जैन, बौद्ध, पारसी, ज्यू आणि शिख लोकांचा अहिंदू धार्मिक लोकसमूह म्हणून उल्लेख करता येईल. या समूहांचे धार्मिक जीवन आपापल्या धर्मप्रथेप्रमाणे घडत असते. या गटांच्या धार्मिक जीवनाच्या काही ठळक वैशिष्ट्यांचे वर्णन खालील परिच्छेदांमध्ये केले आहे.

जैन : जैन धर्म हा वेदप्रामाण्य न मानणारा धर्मप्रवाह प्राचीन काळी सनातन वैदिक परंपरेपासून अलग झाला व आपले स्वतंत्र अस्तित्व जपू लागला. हिंदू संस्कृतीचाच एक प्रवाह असणाऱ्या या धर्माच्या अनुयायींची महाराष्ट्रात १९८१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या ९,३९,३९२ होती. ऋषभदेव किंवा आदिनाथ हा या धर्माचा पहिला तीर्थंकर अथवा धर्म प्रकट करणारा, व वर्धमान महावीर हा चोवीसावा तीर्थंकर होय. तीर्थंकरांनाच पूज्य मानले आहे. वर्धमान महावीराला धर्माचा प्रवर्तक मानतात. अहिंसापालन आणि शुद्ध नैतिक आचरण यांना मध्यवर्ती स्थान आहे. क्षमा, मार्दव, आर्जव, शुचिता, सत्य, संयम, तप, अकिंचन्य अथवा आसक्तीचा अभाव, ब्रह्मचर्य यांचे उत्तम प्रकारे पालन करणे याला धार्मिक जीवनात महत्त्वाचे स्थान आहे. संन्यास मार्गाला महत्त्व दिले आहे व ही दीक्षा पुरुष आणि स्त्री या दोघांनाही घेता येते. पुरुष संन्यासी साधू, श्रमण किंवा मुनी या नावांनी ओळखला जातो तर स्त्री संन्यासी साध्वी अथवा श्रमणी या नावाने ओळखली जाते. जे लोक गृहस्थाश्रमी जीवन जगतात व संन्यासी वर्गाला पोसतात त्यांना उपासक म्हणतात.[२९] वर्षातील पावसाळ्याचे चार महिने सोडून बाकीचा सर्व काळ जैन साधू व साध्वी एका ठिकाणी न राहता भ्रमंती करीत

असतात. जैन धर्मात श्वेतांबर व दिगंबर हे दोन पंथ आहेत. दिगंबर पंथी जैन दक्षिण महाराष्ट्रात, तर श्वेतांबर जैन उत्तर महाराष्ट्रात प्रामुख्याने दिसतात.

पारसी : झोरोष्ट्राने स्थापन केलेल्या झोरोष्ट्रीयन धर्माचे पारसी हे अनुयायी होत. हे भारतात प्रामुख्याने गुजरातच्या किनारपट्टीजवळील भागात, ठाणे जिल्ह्याच्या किनारपट्टीजवळील भागात व मुंबईत दिसतात. महाराष्ट्रामध्ये या समाजाची वस्ती मुख्यतः मुंबई, पुणे, नागपूर या शहरांमध्ये व मुंबईलगतच्या भागात दिसते. अग्निपूजा हे या धर्माचे वैशिष्ट्य. अग्यारी या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मंदिरात पवित्र अग्नी असतो व या ठिकाणी नवज्योत, विवाह इत्यादी संस्कार होत असतात. नवज्योत हा संस्कार धार्मिक जीवनाचे आचरण करता यावे म्हणून पुरुष व स्त्री या दोघांनाही आवश्यक मानला आहे. पारसी समाजाची अंत्यसंस्काराची प्रथा वैशिष्ट्यपूर्ण असून त्याचे मूळ त्यांच्या धार्मिक श्रद्धेत आहे. अग्नी, पृथ्वी आणि पाणी हे या धर्मात पवित्र मानले असल्यामुळे मृत व्यक्तीच्या प्रेताचे दहन करणे, जमिनीत पुरणे अथवा पाण्यात टाकणे हे निषिद्ध मानले आहे. त्यामुळे प्रेत डोंगरावर अथवा माळावर गिधाडांना खाण्याकरिता ठेवतात. ज्या ठिकाणी हे शक्य होत नाही त्या ठिकाणी टॉवर ऑफ सायलेन्स या नावाने ओळखल्या जाणाऱ्या खोल कोरड्या विहिरीत दगडावर मृतदेह ठेवतात. झोरोष्ट्र धर्माचे ऋग्वेदकालीन आर्यांच्या धर्माशी बरेच साम्य असल्याचे आढळते.

ख्रिश्चन : ख्रिस्ती समाज महाराष्ट्रात सर्वत्र आढळतो. मात्र या समाजाची वस्ती प्रामुख्याने नागरी भागात दिसते. १९८१ या जनगणनेनुसार ख्रिस्ती समाजाची लोकसंख्या ७,९५,५६४ होती. ख्रिस्ती समाजाची वाढ प्रामुख्याने ब्रिटिश अमदानीत झाली. या समाजाचे धार्मिक जीवन निरनिराळ्या चर्चच्या धर्मविधी प्रणालीप्रमाणे असते. बाप्तिस्मा व विवाह हे समारंभ परंपरेने चर्चमध्ये होतात. प्रार्थना हा धार्मिक जीवनातील महत्त्वाचा भाग असून दर रविवारी चर्चमध्ये सामुदायिक प्रार्थना व त्यानंतर धर्मगुरूचे धर्मोपदेशपर भाषण होत असते. हे कार्यक्रम मराठीत होतात. मानवतेची सेवा हा या धर्माचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे महाराष्ट्रात अनेक ठिकाणी चर्चद्वारा रुग्णालये, शैक्षणिका संस्था व अनाथालये चालविल्याचे दिसते. या सेवांचा लाभ महाराष्ट्रातील सर्व धर्माचे अनुयायी घेताना दिसतात.

ज्यू : भारतातील ज्यू धर्मीयांपैकी बहुसंख्य लोक महाराष्ट्रात दिसतात. ज्यू लोक प्रामुख्याने मुंबई, पुणे ही शहरे व रायगड जिल्ह्यात दिसतात. इझ्राइलच्या निर्मितीनंतर महाराष्ट्रातील बऱ्याच ज्यूंनी त्या देशात स्थलांतर केले. ज्यूंचे धार्मिक जीवन त्यांच्या समुहापुरते मर्यादित राहिल्यामुळे त्यांचा महाराष्ट्राच्या लोकजीवनावर प्रभाव पडल्याचे दिसत नाही.

बौद्ध : प्राचीन काळी महाराष्ट्रात बौद्धधर्मीय होते हे निरनिराळ्या ठिकाणी सापडलेल्या बौद्ध लेणींवरून व इतर ऐतिहासिक पुराव्यांवरून दिसते. कालांतराने महाराष्ट्रातून बौद्ध धर्म लुप्त झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी नागपूर येथील दीक्षाभूमीवर १४ ऑक्टोबर १९५६ रोजी दसऱ्याच्या दिवशी पूर्वाश्रमीच्या महार आणि इतर दलित अनुयायांसह बौद्ध धर्मात प्रवेश केला. डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा देताना काही शपथाही घ्यावयास लावल्या. त्यात हिंदू देवतांची पूजा न करण्याची तसेच मेलेल्या जनावरांचे मांस न खाण्याच्या शपथांचा अंतर्भाव आहे. या धम्मपरिवर्तनामुळे मुरळी, पोतराज इत्यादी प्रथांच्या विरुद्ध जनमत तयार करणे सुलभ झाले व त्यामुळे दलित समाजाचे धार्मिक जीवन अधिक विशुद्ध झाले.

हा समाज दसऱ्याचा दिवस धम्मपरिवर्तन दिन म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करतो. त्या दिवशी नागपूर येथील दीक्षाभूमीवर मोठ्या संख्येने नवबौद्ध जनता तेथील धार्मिक, सामाजिक आणि राजकीय जागृतीच्या कार्यक्रमात भाग घेत असते.

मुसलमान : महाराष्ट्रातील मुसलमान लोक प्रामुख्याने धर्मांतरित आहेत. या समाजाची वस्ती खेडोपाड्यात व नागरी भागात दिसते. चौदाव्या शतकापासून बऱ्याच हिंदूंचे इस्लाममध्ये धर्मांतर झाले. त्याचप्रमाणे ऐतिहासिक काळात व्यापाराच्या निमित्ताने अरबांचे कोकणात आगमन झाले. तसेच काही हिंदू सरदार आपल्याजवळ अरबांचे भाडोत्री सैन्य ठेवीत असत. या सर्व प्रक्रियेतून महाराष्ट्रातील मुसलमान समाजाची जडणघडण झाली. स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रातील मुसलमान इस्लामी धर्माबरोबर काही हिंदू धार्मिक रूढीही पाळीत असत. काही देवतांचे उपास, नवरात्र, हिंदूच्या स्थानिक मंदिरात काठी धरण्याचा मान असणे इत्यादी गोष्टी काही मुसलमान घराण्यांत परंपरेने पाळल्या जात होत्या. परंतु अखिल भारतीय पातळीवर हिंदू आणि मुसलमान यांच्या धार्मिक जीवनाचे जसजसे ध्रुवीकरण होऊ लागले तसतशा या गोष्टी लुप्त होऊ लागल्या.

महाराष्ट्रात सुन्नी पंथीय मुसलमान अधिक आहेत. शिया पंथीय प्रामुख्याने नागरी भागात दिसतात. इस्लाम धर्मात मूर्तिपूजा नाही, पण दर्गा आणि पीर यांनी विभूतिपूजेची जागा घेतली आहे. भारतीय पातळीवर मान्यता पावलेली मशीद अथवा दर्गा महाराष्ट्रात नाही. परंतु स्थानिक पातळीवरील काही दर्गे अलीकडे प्रसिद्धी पावले आहेत. त्यामध्ये मुंबई, मिरज व नागपूर येथील दर्ग्यांचा उल्लेख करता येईल.

तळटिपा

[१] इरावती कर्वे, जे. एस. रणदिवे, **दि सोशल डायनॅमिक्स ऑफ ए ग्रोअिंग टाऊन अँड इटस् सराउंडिंग एरिया.**

[२] ह.श्री. शेणोलीकर, प्र.न. देशपांडे, **महाराष्ट्र संस्कृती : घडण व विकास.**

[३] कित्ता.

[४] जॉन एम. स्टॅन्ले, "निष्काम अँड सकामभक्ती," **रलिजन अँड सोसायटी इन महाराष्ट्र,** एन. के. वागळे, मिल्टन इझरेल (संपा.).

[५] रामचंद्र चिंतामण ढेरे, **खंडोबा.**

[६] गुंथर डी सोंथायमर, "रूद्र अँड खंडोबा : कंटीन्युइटी इन फोक रिलिजन," एन. के. वागळे, मिल्टन इझरेल (संपा.).

[७] ग.इ. खरे, **महाराष्ट्राची चार दैवते.**

[८] लॉरेन्स डब्ल्यू, प्रेस्टन, "सब-रीजनल रिलिजन्स सेंटर्स," **दि हिस्टरी ऑफ महाराष्ट्र,** एन. के. वागळे, मिल्टन इझरेल (संपा.) : पूर्वोक्त.

[९] हेमाद्री, **चतुर्वर्गचिंतामणि** या कर्मकांडप्रधान ग्रंथात ही प्रवृत्ती प्रकर्षाने प्रकट झाल्याचे दिसते.

[१०] या विवेचनात संप्रदाय आणि पंथ हे शब्द समान अर्थाने वापरले आहेत.

[११] मु. ग. पानसे, **यादव कालीन महाराष्ट्र.**

[१२] रामचंद्र चिंतामण ढेरे, **दत्त संप्रदायाचा इतिहास.**

[१३] कि. का. चौधरी, "इतिहास : मध्ययुगीन काळ," **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ५०-५१.

[१४] भवानी शंकर पंडित, **महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्य व संस्कृतीवर झालेला परिणाम.**

[१५] गं. बा. सरदार, **संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती.**

[१६] रामचंद्र चिंतामण ढेरे, पूर्वोक्त.

[१७] भालचंद्र पंढरीनाथ बहिरट, ज्ञानेश्वर पद्माकर भालेराव, **वारकरी संप्रदाय.**

[१८] महानुभाव संतांनी लिहिलेल्या गद्य आणि पद्य वाङ्मयामध्ये खालील ग्रंथ प्रमुख आहेत.

(१) भास्करभट बोरीकर, **शिशुपालवध.**

(२) भास्करभट बोरीकर, **उद्धवगीता.**

(३) दामोदर पंडित, **वच्छाहरण.**

(४) नरेंद्र, **रुक्मिणी स्वयंवर.**

(५) राघवो पाध्ये तथा खळोव्यास, **सैहाद्र वर्णन.**

(६) नारायण बास, **ऋद्धिपुरवर्णन,** १४१८.

(७) माहिम भट, **लीळाचरित्र.**

(८) केशिराज बास, **दृष्टांत पाठ.**

(९) गोपाळ पंडित, अनेरज बास : **चक्रधर सिद्ध.**

(१०) नागदेवाचार्य, **स्मृतिस्थळ.**

१९ र. रा. गोसावी, **पाच भक्तिसंप्रदाय.**

२० भा.पं. बहिरट, ज्ञा.प. भालेराव, पूर्वोक्त.

२१ कित्ता.

२२ कित्ता, पृ. ९१.

२३ कित्ता, पृ. १०७.

२४ कित्ता, पृ. १७३.

२५ पु. ग. सहस्त्रबुद्धे, **महाराष्ट्र संस्कृती.**

२६ र. रा. गोसावी, पूर्वोक्त.

२७ रविंदर कुमार, **वेस्टर्न इंडिया इन दि** नाईनटिंथ सेंच्युरी : ए स्टडी इन **दि हिस्टरी ऑफ महाराष्ट्र.**

२८ लक्ष्मणशास्त्री जोशी, "महाराष्ट्रातील धर्म सुधारणेचे आंदोलन," **अस्मिता महाराष्ट्राची,** भीमराव कुलकर्णी (संपा.), पृ. ५४३.

२९ विलास आदिनाथ संगवे, **जैन कम्युनिटी** : ए **सोशल सर्व्हे.**

Maharashtra State Gazetteers

प्रकरण ८ : कला व संस्कृति

कला व संस्कृतिचे परस्पर संबंध

(या प्रकरणातील (१) **कला व संस्कृतिचे परस्पर संबंध, (२) संगीत, आणि (३) मराठी रंगभूमी** या विषयांवरील लेखन डॉ. कि.का. चौधरी यांनी केलेले आहे.) (४) **प्रयोगित कला** यावरील लेखन डॉ. वर्षा शिरगावकर, रुईया महाविद्यालय, यांनी केलेले आहे.

संस्कृतीकरणाच्या प्रातःकालापासून महाराष्ट्राचे संस्कृति-संपर्काद्वारे (culture contact) विविध कला संपादन करून त्यांचे संवर्धन केले. किंबहुना संस्कृतिोंसंपर्काचे महाराष्ट्र हे भारतीय उपखंडातील उत्तम उदाहरण मानावे लागते. संस्कृत, प्राकृत, द्रविडिअन व मुंडरी भाषा तसेच त्यांच्या व्युत्पन्न (derived) भाषा बोलणाऱ्या लोकांच्या संपर्कातून येथील लोकांनी आपली संस्कृती व जीवन पद्धती घडविली. उत्तर, दक्षिण, पश्चिम व पूर्व भारतातील लोकांशी येथील लोकांचा संपर्क आल्याने त्यांच्या कला महाराष्ट्रीय लोकांनी संपादन केल्या (acquire), स्वीकारल्या व त्यावर स्वतःचे रोपण केले. यामुळे महाराष्ट्रातील कला आणि कला जीवनाला विशिष्ट (peculiar) स्वरूप प्राप्त झाले. महाराष्ट्रातील कला व कलाविष्कार आणि भारतीय कला व कलाविष्कार यांच्यात बरेच साधर्म्य आहे ते यामुळेच. महाराष्ट्राने संगीत व ललितकलांचा स्वीकार केला तो प्रामुख्याने उत्तर व दक्षिण भारताकडून. प्राचीन काळापासून उत्तरापथाकडून दक्षिणापथाकडे जाण्याचे मार्ग प्रामुख्याने येथूनच असल्याने तसे घडणे स्वाभाविकही होते. भारतातील सर्वाधिक पुरातत्वीय शिल्पे, गुंफा व भित्तिचित्रे (fresco) महाराष्ट्रात आहेत. येथील सूक्ष्म जनमानस (societal psyche), निसर्गचित्र व लोकाश्रय यामुळे हा शिल्प आणि रंगचित्रांचा महान भारतीय वारसा महाराष्ट्रात अवतरला असेल. मात्र स्थानिक प्रतिभा असणारच. तथापि ती कला निर्माण करणारा कलाकारांचा वर्ग कोणता होता याचा उलगडा होत नाही. हिंदुस्थानी कला संगीतातील महान घराणी उत्तरपथातील असली, तरी त्यांचे घराणदार संगीत, बहरले, मोहरले महाराष्ट्रात. येथील गायक-वादकांनी उत्तरेकडील संगीत अधिक अंगीकारले, पण त्याबरोबरच दक्षिण भारतीय संगीतही स्वीकारले. इतकेच नव्हे तर या दोन्ही गानप्रणालींचे संश्लेषण करून नवनिर्मितीचाही प्रयत्न केला. महाराष्ट्राने या दोन्ही प्रणाली संग्रथित (consolidate) करण्यात मोठा हातभार लावला, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे संपूर्ण भारतीय उपखंडात अभिजात कला संगीताचा प्रसार केला.

वास्तविकपणे हिंदुस्थानी कला संगीताचा स्वीकार व पुरस्कार महाराष्ट्राच्या रसिकतेने जितका केला तितका भारताच्या इतर प्रदेशांनी केलेला नाही. महाराष्ट्रात रसिकता नांदत असल्याने मागील १५० वर्षांच्या काळात अनेक प्रांतांमधील गायक आणि वादक महाराष्ट्राकडे आकर्षित झाले, आणि त्यांनी येथे आपली कला फुलविली व येथून पसरवली. इतकेच नव्हे तर परप्रांतीय कलाकारांनी महाराष्ट्रात विशिष्ट गायन प्रणालींची परंपरा निर्माण केली. तद्वतच मराठी संगीत साधकांनी इतर प्रदेशांमधील संगीत आत्मसात (assimilate) करून कला संगीत विश्वात मोठे नाव मिळविले. साधना व कलाविष्कार या व्यतिरिक्त महाराष्ट्रातील गायकांनी आणि अभ्यासकांनी संगीताची विद्याशाखा उत्क्रांत करण्यात, तिचा प्रसार करण्यात व समीक्षण करण्यात महान योगदान दिले. पंडित विष्णू दिगंबर पलुसकर या महाराष्ट्रातील विभूतिवत कलाकाराने लाहोरला संगीत महाविद्यालय काढले, आणि या महान भारतीय कलेची हयातभर सेवा केली. याबाबतचा स्फूर्तिदायक इतिहास नंतर देण्यात येईल.

सामूहिक चेतनाशक्तीवर व भावविश्वावर प्रभाव पाडणाऱ्या विविध सुधारणात्मक प्रेरणांचा एकूण परिणाम म्हणजे समाजाची समकालीन संस्कृती होय. इतर सुधारणात्मक प्रेरणांबरोबरच ललितकला, दृश्य कला आणि संयुक्त व कनिष्ठ कला समाजाच्या संस्कृतीचे स्वरूप घडविण्याचे कार्य करीत असतात. म्हणूनच समाजमनाचा गुणात्मक दर्जा जाणून घेण्यासाठी सर्व कलांचा संयुक्तपणे अभ्यास करावा लागतो. याच कारणासाठी सांस्कृतिक गतिमानतेच्या अभ्यासासाठी विविध कलांचे परस्पर संबंध जाणून घेणे आवश्यक आहे.

संस्कृतीच्या अधिष्ठानामुळेच कोणत्याही कलाकृतीला जातिवंत आशय लाभतो. मूळ जीवनकलहातून कलेला चैतन्य प्राप्त होते आणि संस्कृतीमध्ये त्याचे स्वरूप ठरते. आशयाची बहुविध अंगांनी होणारी कलेतील समृद्धता संस्कृतीमुळे मिळते, हे संस्कृतीचे कलेमधील महत्त्व होय. सांस्कृतिक अंगाचा कलेतील कार्यभार फार महत्त्वाचा ठरतो. कलेतील आशयाला आलेले अनन्यसाधारण रूप संस्कृतीमधून लाभत असते. संस्कृतीच्या संदर्भाशिवाय कलेला

आशय येऊ शकत नाही. मात्र हे देखील मान्य करावे लागेल की, कलेतील काही भाग संस्कृतिनिरपेक्ष असतो. आशयाला कलापद लाभते, म्हणूनच संस्कृतीतून आकारित होणारी कलाकृती त्या त्या संस्कृतीमधील भेदाभेदांच्या मर्यादा ओलांडून पलीकडे जाते आणि सर्व रसिकांना सर्व काळी आस्वाद्य होते. संस्कृतीची वैशिष्ट्ये कलाकृतीमध्ये संपृक्त झालेली असतात, तथापि संस्कृतिदर्शनाच्या मुद्यावर कोणतीही कलाकृती ग्राह्य अथवा अग्राह्य ठरत नाही. काही कलाविष्कार व कलाकृती अशा असतात की, त्यांचे मोठेपण वैश्विक (universal) राहते.

कलाविष्कार आणि कलाकृतीच्या ललित अंगांवर देखील सांस्कृतिक प्रवृत्तींचा ठसा उमटतो. संस्कृतीच्या विजिगीषू प्रकृतीचे दर्शन बऱ्याच कलाकृतींमधून आणि कलाविष्कारांतून होत असते. याचे उदाहरण सांगायचे म्हणजे वाकाटक कालीन अजिंठा व वेरूळचे शिल्प आणि रंगचित्रणामधून संस्कृतीच्या विजिगीषू प्रकृतीचे दर्शन घडते. धर्म आणि संस्कृती यामधील श्रद्धा, देवकल्पना, आचार व भावप्रतीकांचे कलेमधून विविध प्रकारे दर्शन घडते. गौतम बुद्ध, शिव, विष्णु, गणपती, सरस्वती, पार्वती, लक्ष्मी इत्यादी देवदेवतांच्या प्रतिमा व त्यांच्याबद्दलच्या सामाजिक जाणिवा विविध कलांमध्ये वेगवेगळ्या कलावंतांनी विविध मनोभूमिकांमधून अभिव्यक्त केल्याचे दिसते. यावरून कलेतील हे विशाल संस्कृतिदर्शन थक्क करून सोडते.[१]

विशुद्ध आनंदासाठी वाहिलेल्या ललितकलांच्या व्यतिरिक्त, दैनंदिन जीवनातील इतर कलाविष्कारांचाही वाटा फार मोठा आहे. कनिष्ठ कला, उपयोजित कला, कारागिरी, हस्तव्यवसाय असे अनेक कलात्मक प्रकार मानवी जीवनात आवश्यक असतात. खरे तर संस्कृतीचे आद्य प्रतिबिंब मानवाच्या कनिष्ठ कलांमध्ये अधिक स्पष्ट दिसते. कनिष्ठ कलांमध्ये संस्कृतीची विविधता अधिक स्पष्ट दिसते. संस्कृतीचे मूलभूत रूप कनिष्ठ कलांमधून प्रतिबिंबित होते. तथापि कला प्रकारांचा एकूण प्रांत अत्यंत विशाल असल्याकारणाने त्याचा आढावा येथे घेणे अनावश्यक होय.

संस्कृतीच्या प्रातःकाली जीवनव्यवहार आणि कलाव्यवहार हे जरी वेगळेपणाने जाणवले, तरी ते एकमेकांशी निगडित होते. तुलनेने प्रगल्भ ठरलेल्या संस्कृतींना उत्तरोत्तर जीवन जाणिवांमधील व त्यांच्या प्रकट व्यवहार स्वरूपांमधील बारकावे आणि गुणात्मक भिन्नता जाणवत गेली. आणि त्या प्रमाणात कलाव्यवहाराचे जीवनातील वेगळे व विशेषतापूर्ण स्थान स्पष्ट होत गेले.

कला या पदात मानवी कौशल्य, हस्तकला, जादूटोणा, कारस्थान कुशलता, प्रतिभा, लालित्य व अभिव्यक्ती कुशलता समाविष्ट आहेत. यातील ढोबळपणा घालविण्यासाठी ललितकला हा शब्दप्रयोग वापरावा लागतो. ललितकलांमध्ये संगीत, प्रयोगित कला आणि दृश्य कलांचा समावेश करण्यात येतो. संगीत या कलाप्रकारात कंठ संगीत व वाद्य संगीताचा समावेश होतो. प्रयोगित कलांमध्ये नृत्य व नाट्य या कलांचा, तर दृश्य कलांमध्ये चित्र, शिल्प, वास्तू आणि तदानुषंगिक कला शाखांचा समावेश करण्यात आला.

भारतात भरताच्या **नाट्यशास्त्राने** (इ. स. ३००) कला विषयक भूमिकेचा पाया रचना. मात्र भरताच्या विचारसूत्रांमधून काव्यशास्त्राची उत्क्रांती होण्यास बराच काळ जावा लागला. एक गोष्ट नमूद करणे आवश्यक आहे की, एकोणिसाव्या शतकाच्या अंतापर्यंत बहुतेक सर्व कला क्षेत्रांवर साहित्यिक विचारांचे वर्चस्व होते. बौद्ध धर्माच्या प्रसाराबरोबर बौद्ध व हिंदू धर्मांच्या स्पर्धेमुळे सातवाहन आणि वाकाटक काळात चित्र, शिल्प, वास्तू, वाङ्मय, नृत्य व संगीत या कलांचा उत्कर्ष झाला. अजिंठा व वेरूळ यासारखी गुंफा शिल्पचित्रे आणि रामटेक परिसरात निवास केलेला कालिदास यांच्यासारखे सर्वश्रेष्ठ नाटककार व कवी महाराष्ट्रात उदयास आले. वाकाटक कालीन विदर्भातील वाङ्मय निर्मितीमधील वैदर्भी आणि वच्छोमी रीतींना अखिल भारतात मानाचे स्थान प्राप्त झाले. कालिदासासारख्या महाकवीने या रीतींमध्ये काव्यरचना केली, यात त्या रीतींचे मोठेपण दिसते.

तथापि मध्ययुगीन काळात कला व कलावंत यांना दुरावस्था आली होती. प्रथम राजकीय व सामाजिक ऱ्हास झाला, आणि नंतर कला शाखांचाही मंदगतीने, पण सातत्याने ऱ्हास होत गेला. मुघल काळात राजाश्रयाने रंजनप्रधान अशी राजविलासी चित्रशैली निर्माण झाली. मात्र जैन कला सोडल्यास कलेला समाजाचा आश्रय नव्हता. या काळात सगळ्याच समाजाचा आर्थिक व सांस्कृतिक तोल हळूहळू बिघडत होता. राजे व धनिकांचा कलेला क्वचित् आश्रय लाभे. तथापि कारागिरीच्या पातळीवरील कनिष्ठ कलांचा अपवाद सोडता समाजाची कला विषयक जागरुकता लोप पावत चालल्याने अभिजात कलांना सामाजिक आश्रय उरला नाही. राजकीय विकलांगतेनंतर राजाश्रय देखील संपुष्टात आला. हे देखील कलेचे दुर्दैव होय.

कार्ले, भाजे, कोंडाणे, कान्हेरी, अजिंठा, वेरूळ, एलिफंटा ही महाराष्ट्रातील कला परंपरेची अजरामर लेणी होत. येथील कलाकृतीला जगात तोड नाही. तथापि त्यानंतरच्या काळात अशा कलाकृती निर्माण होऊ शकल्या नाहीत. यानंतर मंदिर वास्तुशैलीचे युग उदयास आले. बदामीच्या चालुक्य वास्तुशैलीतील बरीच मंदिरे महाराष्ट्रात उभारण्यात आली. या प्रदेशाने ही शैली स्वीकारली, अंगीकारली. तथापि ही वास्तुशैली खास महाराष्ट्राची म्हणून मानता येणार नाही. हेमाडपंती वास्तुशैली महाराष्ट्रात विकसित झाली. महाराष्ट्राबाहेरही पसरली, तीची काही खास विशेषताही आहे.

तथापि हेमाडपंती शैलीवर देखील बदामीच्या चालुक्य शैलीचा प्रभाव आहेच. खरे तर नंतरच्या मुघल काळात भारतभर प्रसार पावलेल्या लघुचित्रांचा बहर महाराष्ट्रात यावयास हवा होता. तथापि ही परंपरा उत्तरेकडून थेट दक्षिणेपर्यंत पसरताना महाराष्ट्र ओलांडून तंजावरच्या भोसल्यांपर्यन्त जाऊन पोहोचली. यातून महाराष्ट्र मात्र सुटला. तंजावरच्या मराठा वंशाने आपल्या राज्यात कलांचे तीर्थक्षेत्र बनविले, कलावैभव वाढविले. मात्र महाराष्ट्रातील मराठेशाहीने यातून प्रेरणा घेतल्या नाहीत, अनुकरणही केले नाही.

महाराष्ट्रातील लोककला आणि कारागिरीच्या परंपरा दैनंदिन जीवन संस्कृतीमध्ये एकजीव होऊन राहिल्या होत्या. पाषाण व लाकडावरील कोरीव काम करण्याची परंपरा असलेली काही घराणी महाराष्ट्रात होती. कुडाळ परिसरातील आकेरी येथे दगडावर काम करणाऱ्यांची काही घराणी आहेत. शिवाय पोथ्यांच्या हस्तलिखितांमध्ये चित्र काढण्याची प्रथा होती. **रामायण-महाभारता** वरील चित्रमालिकांचा उपयोग करून आख्याने देणाऱ्या घराण्यांची परंपरा कुडाळ जवळच्या पिंगुळी गावी होती. त्या काळी लोककला वैभवसंपन्न असाव्यात. पैठणी तयार करणारे उत्तम कारागीर पैठणला होते. इंग्रज येईपर्यन्त या व अशा अनेक कला टिकून होत्या. मात्र इंग्रजांबरोबर यंत्रयुग आले, पश्चिमी पद्धतीचे इंग्रजी शिक्षण आणि पाठोपाठ कला शिक्षण आले. नवसुशिक्षित समाजाची अभिरुची बदलू लागली आणि लोककला आणि कारागिरीच्या परंपरा विकल झाल्या. तरी देखील संस्कृतीत मुरलेल्या लोककला आणि कारागिरीच्या परंपरा जतन करण्याची आठवण समाजधुरीणांना राहिली नाही. कलेशिवाय संस्कृती संभवत नाही, याचे भान विचारवंतांना राहिले नाही. अस्सल महाराष्ट्रीय वस्त्रालंकारातील सौंदर्याकडे देखील दुर्लक्ष झाले. यंत्रयुगामुळे एकूण कारागिरी, कनिष्ठ कला आणि हस्तकलांचा वारसा क्षीण होऊ लागला.

सर जमशेटची जीजीभाय बाटलीवाला आणि जगन्नाथ शंकरशेट यासारख्या लोकप्रिय धनिकांचे लक्ष या दुःस्थितीकडे गेले. कला व कारागिरी जगविण्यासाठी त्यांनी ब्रिटिश शासनाच्या मदतीने मुंबईत सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट ॲण्ड क्राफ्ट ही कला संस्था निर्माण केली (१८५७). या संस्थेच्या आकृतिबंधानुरूप मद्रासमध्येही कला संस्था निघाली. या दोन्ही संस्थांनी भारतीय दृश्य कलांची जोपासना केली. सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ॲण्ड क्राफ्ट या संस्थेसाठी लाखांची देणगी देणाऱ्या सर जमशेटची जीजीभाय यांचा उद्देश वस्तुतः वेगळा होता. मरणासन्न झालेल्या कारागिरी परंपरांचे जतन करून विकास करणे हा खरा उद्देश होता. काही काळ तो पाळला गेला. तथापि इंग्रजी शिक्षण घेतलेल्या युवकांची अभिरुची बदलली. इंग्रज कलावंतांना भारतीय लोककलांबद्दल आत्मीयता नसल्याने त्यांनी पाश्चात्य रंगचित्र शैली, रंगलेपन पद्धती आणि रेखाटनाच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. पाश्चात्य पद्धतीची ओढ समकालीन भारतीयांनाही लागल्यामुळे जे.जे. स्कूलमधून मुख्यतः पाश्चात्य पद्धतीच्या कला शिक्षणावर भर देण्यात आला. इतके मात्र खरे की, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट ॲण्ड क्राफ्टमुळे महाराष्ट्रात अगदी नवीन कला परंपरा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या दृश्य कला परंपरेला "बॉम्बे स्कूल" असे नाव मिळाले, आणि जे.जे. स्कूल म्हणजेच बॉम्बे स्कूल असे समीकरण रूढ झाले. अर्वाचीन भारतीय कला विश्वाला महाराष्ट्राला काल परवापर्यन्त अग्रमान होता. आजही येथील कलाविश्व अत्यंत समृद्ध व काही बाबतीत अजोड आहे. बॉम्बे आर्ट सोसायटी, आर्ट सोसायटी ऑफ इंडिया, आर्टिस्ट सेन्टर, नाशिक कला निकेतन या कलावंतांच्या संस्था उपक्रमशील आहेत. मात्र कलाविश्वाचा व्याप जितका वाढला त्या मानाने समाजाच्या रसिकतेचा प्रतिसाद बराच तोकडा राहिला. अर्थात हा तोकडेपणा आर्थिक कारणांनी निर्माण झालेला आहे. रसिक व रसिकता वाढली, तथापि कलेबद्दल उदासीन असलेल्या मराठी भाषिक समाजात महाग कलाकृती विकत घेणारा वर्ग मर्यादितच राहिला. कलेचे आश्रयदाते वाढले, परंतु ते धनिकवर्गातील. समाजाची रसिकता वाढविण्याचे प्रयत्न दृश्य कलांमध्ये आजवर झालेच नाहीत.

दृश्य कलांच्या शिक्षणाला इंग्रजांनी वळण दिले. त्यांनी पाश्चात्य कलेचे शिक्षण देण्यास मुंबईत प्रारंभ केला. मात्र मूळ भारतीय दृश्य कलांकडे आणि स्थानिक लोककलांकडे दुर्लक्ष केले. त्यामुळेही मूळ भारतीय कलांचे नुकसान झाले.[२]

सुदैवाने संगीत कला क्षेत्र व संगीत शिक्षणाला मात्र इंग्रजांनी हात लावला नाही, ढवळाढवळ केली नाही. भारतीय संगीतावर पाश्चात्य संगीताचे रोपण करण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला नाही. भारतीय संगीत आणि पाश्चात्य संगीत यांच्या प्रकृती पूर्णपणे भिन्न असल्याने इंग्रजांना हे शक्य नसावे. त्यामुळे भारतीयत्व या विषयाचा प्रश्न संगीत क्षेत्रात निर्माण झाला नाही. शिवाय इंग्रज येथे आले त्यावेळी संगीताचा ऱ्हास अजिबात झालेला नव्हता, दृश्य कलांचा झालेला होता. संगीताची परंपरा अखंड चालूच होती. संगीताची रसिकता वाढविण्याच्या प्रक्रियेमध्ये अडचण निर्माण झाली नाही. अभिजात संगीताच्या क्षेत्रात पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पं. विष्णू दिगंबर पलुसकर, पं. विष्णू नारायण भातखंडे, उस्ताद अब्दुल करीम खाँ, उस्ताद अलादियाखाँ, पंडिता केसरबाई केरकर, पंडिता मोगूबाई कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर इत्यादी महान गायक-गायिकांनी अविश्रान्त परिश्रम करून समाजाची आस्वादकता प्रगल्भ केली. काही मराठी संस्थानिकांनीही संगीताला फार मोठा आश्रय दिला. तिकीट विकत घेऊन गाणे ऐकण्याची सवय विष्णू दिगंबर पलुसकरांनी समाजाला लावलेली होती. त्यामुळे सामान्य आर्थिक स्थितीच्या रसिकाने आश्रय देऊन संगीत

कला जिवंत ठेवली. संस्थानिकांच्या अंताबरोबर राजाश्रय संपला, तथापि संगीताला महाराष्ट्रात रसिकांचा फार मोठा आश्रय प्राप्त झालेला आहे. दृश्य कलांच्या बाबतीत जे घडले नाही, ते संगीताच्या बाबतीत घडले. संगीताला प्रतिष्ठाही मिळाली आणि लोकाश्रय देखील मिळाला.

संगीत, दृश्य कला, प्रयोगित कला आणि साहित्य यांच्या अभिव्यक्तीतून महाराष्ट्रातील सांस्कृतिक जीवनाची आणि चेतनांची अभिव्यक्ती झालेली आहे. मात्र साहित्याचा सांस्कृतिक जीवनातील आणि चेतनांमधील सहभाग आणि त्यांचा परस्पर संबंध हा स्वतंत्र अभ्यासाचा विस्तृत विषय असल्याने येथे साहित्याचा परामर्श घेतलेला नाही. शिवाय गॅझेटिअर कार्यालयाने **लँग्वेज ॲण्ड लिटरेचर इन महाराष्ट्र** या विषयावर अदामासे पाचशे पृष्ठांचा स्वतंत्र **गॅझेटिअर** ग्रंथ प्रकाशित केलेला (१९७१) असल्याकारणाने त्या विषयाचा येथे परामर्श घेण्याची गरजही नाही. अभ्यासकांनी हा ग्रंथ अवश्य पहावा. महाराष्ट्रातील अभिजात कला, संगीत, रंगभूमी, लोक संगीत, प्रयोगित कला इत्यादी कलांच्या परंपरांमधून महाराष्ट्राचा जो समृद्ध व विविधतेने नटलेला सांस्कृतिक वारसा व्यक्त होतो त्याचा खाली आढावा घेतलेला आहे.

येथे नमूद करणे आवश्यक वाटते की, साहित्यिक व ललित लेखकांना असलेले स्वातंत्र्य इतिहासकाराला नसते. इतिहासकाराला सर्व घटकांचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून अर्थ लावावा लागतो. त्यानुसार सांप्रत लेखनात इतिहासाने मान्य केलेल्या घटना आणि अद्ययावत तारखा नमूद केलेल्या आहेत.

संगीत

सर्वच ललितकलांचे परस्पर संबंध असून एकमेकांच्या संस्करणाने त्या बहरतात, मोहरतात. उदाहरणार्थ, वाङ्मय व संगीत मध्ययुगात निकट होते. भक्तिसंगीत आणि संतकवी निकटतम होते. त्यांचे योगदान महान आहे. तसेच मागील शतकात नाटक व संगीत यांच्यात जवळीक तर होती,पण नाट्य संगीताने नाटकशास्त्र आणि संगीतात मोठी भर टाकली. ललितकला, प्रयोगित कला व संगीत या कलांच्या तिहेरी वर्गीकरणातून हेच स्पष्ट होते की, या प्रवर्गातील सर्वच कलांचे परस्पर संबंध आहेत. संगीत वाद्ये आणि हस्तकौशल्य, संगीत आणि नृत्य, संगीत आणि नाटक या कला परस्परपर्शी आहेत. संगीत वाद्ये या तर मानवी हस्तकौशल्याने घडविलेल्या कलावस्तू असल्याने संगीताच्या विकासासाठी त्या वस्तू बनविण्याची हस्तकला देखील प्रगत होणे आवश्यक होते. म्हणजे अशा प्रकारची हस्तकला इतिहासाच्या त्या त्या काळी अस्तित्वात असली पाहिजे. ज्याअर्थी **ऋग्वेद** या महान ग्रंथात वीणा या वाद्याचा उल्लेख आहे, त्याअर्थी तेव्हा वीणा घडविण्याचे कौशल्य असले पाहिजे.

गाथासप्तशती (गाथासत्तसई प्राकृत शीर्षक) या इ.स. पहिले शतक ते सहावे शतक या कालावधीत निर्माण झालेल्या महाराष्ट्री प्राकृत काव्यात संगीत व वाद्यांचे संदर्भ आलेले आहेत. या ग्रंथात मृदंग, दुंदुभी, पटह (पडघमसारखे जुने वाद्य), नगारा, वेणू (मुरली), वीणा आणि घंटा या वाद्यांचा उल्लेख साथसंगतीची वाद्ये म्हणून करण्यात आलेला आहे. त्यावरून अनुमान काढणे स्वाभाविक आहे की, **गाथासप्तशती** च्या काळी संगीताबरोबर वाद्ये बनविण्याचे हस्तकौशल्य अस्तित्वात होते, अजिंठा लेण्यात हातात वीणा घेतलेल्या गंधर्वाचे सुंदर रंगचित्र रंगविलेले आहे.[३] त्यावरून जेव्हा अजिंठा लेणींची निर्मिती झाली, त्या वाकाटक काळात (इ. स. २५० ते ५५०) वीणा बनविण्याचे हस्तकौशल्य महाराष्ट्रात असणारच. शिवाय वीणा वादनाचे कार्यक्रम प्रार्थनास्थळे आणि अधिकारी वर्गाच्या वाडयांमध्ये होत असले पाहिजेत.

महाराष्ट्रातील अनेक प्राचीन कोरीव लेणी आणि शिल्पांमध्ये नटराज शिव नृत्य करीत असलेल्या शिल्पप्रतिमा असल्यावरून प्राचीन महाराष्ट्रामध्ये संगीत आणि नृत्य या अभिजात कला प्रचलित असणारच. भगवान शिव म्हणजे गायन, वादन, नर्तन, नाट्य यांची अधिष्ठात्री देवता होय. त्याने दोन प्रकारचे नृत्य केले असे मानतात. सर्जनाच्या नृत्याला लास्य म्हणतात आणि संहार नृत्याला तांडव म्हणतात. एलिफंटा लेणीमध्ये शिव नृत्याचा सुंदर शिल्पपट आहे.[४] वेरूळच्या जगप्रसिद्ध लेणींमध्ये देखील नर्तन करीत असलेल्या शिवाचे बरेच शिल्पपट कोरलेले आहेत. महाराष्ट्रातील अंबरनाथ, सिन्नर, बलसाणे, झोडगे, अंजनेरी, मार्कन्डी, मेथी, अकोला, भांदक, मुखेड, होट्टल इत्यादी ठिकाणच्या जुन्या मंदिरांमध्ये नटेश्वर शिवाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. मार्कन्डी, मुखेड, होट्टल येथे नृत्यगणेशाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.[५] सौंदर्याच्या दृष्टीने वेरूळ खालोखाल एलिफंटा येथील शिल्प चांगले आहे. नंतरच्या काळात नर्तन करणाऱ्या अनेक देवदेवतांच्या कोरीव मूर्ती मंदिरांमध्ये बसविलेल्या दिसतात. यावरून महाराष्ट्रात संगीत आणि नृत्य या कला प्राचीन काळापासून परस्परस्पर्शी होत्या, असे अनुमान काढणे क्रमप्राप्त आहे.

ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास इत्यादी श्रेष्ठ संतांनी व त्यांच्या शिष्यगणांनी गायन, वादन, नृत्य आणि भक्तिपर प्रवचन यांचे संमीलन असलेल्या कीर्तन या प्रकाराचा महाराष्ट्रात मोठा प्रचार केला. कीर्तन म्हणजे परमेश्वर व संतांच्या स्तुतिपर केलेले प्रवचन, मात्र संगीत व अभिनयाने भारलेले. या सांगीतिक प्रकाराची एक खास परंपरा निर्माण झाली. ही प्रवचनात्मक अशी संयुक्त कला असून संगीताने इतकी संपृक्त झालेली आहे की, त्यामधून शतकानुशतके संगीताचा परिणामकारक प्रसार झाला. विस्तृत प्रभाव आणि निवडक सांगीतिक अभिव्यक्ती करणाऱ्या कीर्तनाच्या प्रदीर्घ परंपरेने अभिजात संगीत लोकांपर्यंत पोहचविले. संगीताचा संदेश देणे, हे कीर्तनाचे मूळ ध्येय नसले, तरी त्यातून तेही साध्य झाले. ज्ञानेश्वर (जन्म १२७५), नामदेव (१२७०-१३५०), एकनाथ (१५४८-१५९९), तुकाराम (१५९८-१६४९), निळोबा, रामदास (१६०८-१६८१), श्रीधर, माध्वामुनिश्वर, अमृतराय, मापतीबुवा ताहराबादकर आणि मोरोपंत या मराठी रचनाकारांचे विपुल भांडार तसेच सूरदास, मीरा, तुलसीदास आणि नरसी मेहिता या परप्रांतीयांच्याही रचना कीर्तनात म्हणतात. कीर्तनाच्या वारकरी आणि नारदीय या दोन स्वतंत्र परंपरा असून संत नामदेव वारकरी पद्धतीचा जनक होय. संत नामदेवाला महाराष्ट्राचा आद्य कीर्तनकार मानले जाते. कीर्तन हा गानप्रकार दक्षिणेतून महाराष्ट्रात आला असला तरी, येथे त्याची पाळेमुळे खोलवर रुजून कीर्तन ही एक सांस्कृतिक संस्था उदयास आली. येथील कीर्तन संस्था विशिष्ट प्रकारची आहे.[६]

ललितकलांच्या परस्पर संबंधाचे उत्तम उदाहरण सांगायचे म्हणजे ज्ञानेश्वरापासून पुढील काळापर्यंत महाराष्ट्रात साहित्य व संगीत एकमेकांच्या स्पर्शाने मोहरले. संतकवी आणि भक्तिपर संगीत एकमेकांच्या निकट आले. संतकवींनी काव्य व संगीताला महान योगदान दिले. कीर्तन, अभंग, ओवी व पसायदानाच्या रूपाने भक्तिकाव्य व संगीत यांची जवळीक निर्माण झाली. अभंग म्हणजे भक्तिपर साहित्य आणि संगीत यांच्या माध्यमातून पारंपरिक पद्धतीने व्यक्त केलेली प्रासादिक अभिव्यक्ती होय. महाराष्ट्रात अभंगाचा प्रसार वारकरी पंथातील संतांनी मोठ्या प्रमाणात केला. येथील संतकवींनी ओवी हा गेय काव्यप्रकार देखील फुलविला. त्याचप्रमाणे या भूमीत पसायदानाचा पुष्कळ प्रसार झाला. कीर्तन, अभंग, ओवी व पसायदान हे गानप्रकार राग संगीतात म्हणण्याची प्रदीर्घ परंपरा महाराष्ट्रात निर्माण झाली. या प्रकारांमधून भक्तिभावाबरोबर संगीताचा देखील खूप प्रसार झाला. त्यांच्याबद्दलची अधिक माहिती या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीत दिलेली आहे.

नृत्याभिनयासह पारंपरिक पद्धतीने गायिलेल्या खास महाराष्ट्रीय लोकसंगीतास लावणी म्हणतात. त्यात शृंगाराचा आविष्कार बराच असतो. सतराव्या शतकात मुघलांचे सेनादल महाराष्ट्रात ठिकठिकाणी तळ देऊन राहिले असता, सेनादलातील अधिकारी व सैनिकांच्या करमणुकीसाठी लावणी गायन व नर्तनाचे कार्यक्रम छावण्यांमध्ये आयोजित करण्यात येत असत. मात्र तत्कालीन लावणी आजच्या इतकी विप्रलंभ नसून तिच्यात भक्तिभावाचाही आशय होता. पेशवाईतील धामधूम व लढ्यांमुळे वीरश्री आणि विरहशृंगाराचा आविष्कार करणारे पोवाडा व लावणी हे गानप्रकार महाराष्ट्रात प्रसिद्धी पावले. पेशवा दुसरा बाजीराव याच्या काळात ठुमरीच्या वळणाची बैठकीची लावणी उदयास येऊन बरीच रुजली. या वेळी लावणी व पोवाडे रचणारे प्रतिभावंत रचनाकार निर्माण झाले. पोवाड्यांमधील रांगडी भाषा आणि भावनांचा उठाव होण्याकरिता शब्दांवर दिलेले समर्पक आघात या कारणांमुळे पोवाडे शास्त्रीय गायकीच्या ढंगाने म्हणणे शक्य नव्हते. मात्र महाराष्ट्राचे खास वैशिष्ट्य ठरलेल्या लावणी या गानप्रकारात माफक प्रमाणात रागदारीचा उपयोग करण्यात येई. लावणीला सुगम राग संगीतावर आधारित सुंदर चाली दिलेल्या असत. बऱ्याच लावण्या काही ठराविक राग अथवा मिश्र रागांमध्ये बसविलेल्या असत, आणि त्यांना वाद्यांची साथसंगत केली जात असे. तथापि लावणी देखील शास्त्रोक्त कला संगीतापासून बरीच दूर राहिली, आणि कालांतराने या दोन्हीमधील अंतर वाढतच गेले.

दुसऱ्या बाजीरावाने कलागुणांना बराच आश्रय दिला. मोरोपंत कवीला त्याचा आश्रय लाभला नसला, तरी मोरोपंतांचे अनुकरण करणारे कित्येक रचनाकार महाराष्ट्रात निपजले. मुख्यतः पोवाडे रचणाऱ्या शाहिरांची निर्मिती संस्मरणीय बनली. बाजीरावाच्या कारकिर्दीत शाहिरी वाङ्मयास विशेष बहर आला. बाजीराव रंगेल वृत्तीचा असल्यामुळे लावणीस खूप महत्त्व आले. या रचनाकारांचे पोवाडे, लावण्या व पदे मराठी भाषेचे चिरंतन अलंकार बनले आहेत. प्रभाकर दातार हा मुरुडचा कोकणस्थ ब्राह्मण (१७६९-१८४३), राम जोशी (१७५८-१८१२), मुस्लिम शाहीर सगनभाऊ (१७७८-१८४०), अनंद फंदी (१७४४-१८१९) व होनाजी-बाळा (१८०९) असे अनेक नामांकित शाहीर बाजीरावाचे अमदानीत उदयास आले. अनंत फंदीचा उत्कर्ष तर बाजीरावामुळेच झाला. मात्र तो पुढे बडोद्यास जाऊन राहिला.[७]

संत ज्ञानेश्वराच्या काळातही भक्तिभावपर गीत या स्वरूपात लावणी हा गानप्रकार प्रचलित होता. तेव्हा लावणीचा आशय परमेश्वर भावभक्तीचा होता. तथापि तेव्हाही सुसंस्कृत समाज लावणी श्रवण हे अपकीर्तीचे लक्षण मानत असे. मुघल काळामध्ये भक्तिभावाबरोबर शृंगार व करमणूक करण्याचे गुणधर्म लावणीत प्रविष्ट झाले. मात्र दुसऱ्या बाजीरावाच्या काळात या गानप्रकाराला शृंगारिक रूप येण्यास चालना मिळाली. पेशवाईनंतरच्या कालावधीत मात्र लावणीतील बहुतांश भक्तिभाव नाहीसा होऊन, तिला अधिकाधिक शृंगारिक रूप येऊ लागले. तरी देखील बहुतांश लावणी राग संगीताच्या ढंगाने म्हटली जात होती. विशेष म्हणजे एकोणिसाव्या शतकात बदललेल्या स्वरूपात देखील

लावणीचा मराठी संगीत नाटकाने वेगळ्या स्वरूपात अंगीकार केला. संगीत **शाकुंतल, सौभद्र, शारदा, मानापमान, मृच्छकटिक, विक्रमोर्वशीय, शापसंभ्रम, विद्याहरण, संशयकल्लोळ** इत्यादी सुप्रसिद्ध संगीत नाटकांमधील पदांच्या चाली लावणी, नारदीय कीर्तन, होरी, चैती, ठुमरी, दादरा, टप्पा यांसारख्या गानप्रकारांच्या ढंगात होत्या.

संगीत आणि नाटक यामधील परस्पर संबंध महाराष्ट्रात १८८० पासून निकटतम झाले. या कालावधीत भारतात कोठेही तोड नसलेला नाट्य संगीत हा जोमदार व समर्थ असा सांगीतिक प्रकार उदयास आला. शास्त्रीय आणि रंजक संगीताचे अनोखे मिश्रण असलेला हा स्वतंत्र गानप्रकार होय. भाऊराव कोल्हटकर, बालगंधर्व, केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ मंगेशकर आणि अशाच कित्येक गायक नटांमुळे हा गानप्रकार विलक्षण रसिकप्रिय झाला. मराठी संगीत नाटक व नाट्य संगीताने नाट्याशास्त्र (dramatics) तसेच निमशास्त्रीय संगीताच्या विकासात फार मोलाची भर घातली. हा स्वतंत्र संगीत कला प्रकार असल्याकारणाने या बाबतचा आढावा स्वतंत्ररीत्या घेण्यात येईल.

संगीत आणि रंगचित्र कला यांच्यामध्ये देखील परस्पर संबंध आहेत. सोळाव्या शतकात श्राव्य आणि दृश्य या दोन्ही परिणामांची अभिव्यक्ती करणारी रागमाला लघुचित्र शैली उदयास आली. समकालीन सरंजामदारांना संगीत, चित्रकला व विलासी जीवनाचे आकर्षण असल्याने संगीत आणि चित्रकलेचा संयोग घडविणाऱ्या रंगचित्रांविषयी प्रेम वाटू लागले. संगीतातील विशिष्ट राग विषयक कल्पनेच्या आधारे त्या रागाला अनुरूप अशा विषयाचे चित्रण करण्याचा हा प्रकार होय. उदा. बसंत राग चित्रात मोहरलेला आम्रवृक्ष आणि वसंत ऋतूतील वनश्री चित्रित केलेली असते. अहमदनगरला १५९५ च्या सुमारास काढलेले नमुनेदार रागमाला चित्र नवी दिल्लीच्या राष्ट्रीय संग्रहालयात ठेवलेले आहे. या चित्रात राजपुत्र सपत्निक झोपाळ्यावर बसलेला असून बहरलेले आम्रवृक्ष चित्रित केलेला आहे. विजापूरचा सुलतान दुसरा इब्राहिम आदिलशहा याने रागमाला चित्रांना उत्तेजन दिले होते. या चित्रांना सरंजामदार व धनिकांकडून मागणी असल्याने रंग व रचनेत थोडेफार फरक करून त्यांच्या अनेक प्रतिकृती करण्यात येत. सांप्रत काळात एम. एफ. हुसेन यांच्यासारख्या कलाकारांनी या कलेत प्राविण्य दाखविले.

महाराष्ट्रातील संगीताचा इतिहास

महाराष्ट्रातील संगीताच्या इतिहासाचा प्रारंभ वेद काळापासून झाला असल्याचे मानता येईल. सामवेदापासून इ. स. पू. तिसऱ्या शतकापर्यन्त संगीत केवळ परमेश्वर भक्तीच्या अभिव्यक्तीचे माध्यम म्हणून वापरले जात होते. मात्र इ. स. पू. तिसऱ्या शतकापासून संगीत परमेश्वर भक्तीकडून इतर भावनांच्या आविष्काराकडे परिवर्तीत (divert) होऊ लागले. तरी देखील परमेश्वर भक्ती हा त्यातील प्रभावी भाव आपले स्थान टिकवून होता. मात्र सातवाहन काळात संगीत अधिकाधिक राजदरबाराकडे ओढले जाऊ लागले आणि त्यात लौकिकता (secularisation) येऊ लागली. भारताच्या उत्तरापथातील गुप्त सम्राट व त्यांचे महाराष्ट्रातील समकालीन वाकाटक सम्राट यांच्या काळात संगीत आणि नाटकाचा विषय (drama theme) यामध्ये भक्ती रस आणि दरबारीपणा यांच्यात सीमा रेषा आखली गेली. संगीतातील लौकिकतेची प्रक्रिया इ. स. च्या सहाव्या शतकात पूर्णत्वाला पोहोचली. कालिदासाची नाटके व काव्य विषय, आणि विशेषतः रामटेकला जन्मलेले **मेघदूत** हे खंडकाव्य पूर्णतः सौंदर्यलक्षी असून लौकिकतेने भरलेले आहे. **नाट्यशास्त्र** हा महान ग्रंथ लिहून भरताने संगीत, नृत्य, नाट्य इत्यादी कलांबाबतचा सिद्धांत सूत्रबद्ध करून या कलांना शास्त्रीय स्वरूप दिले. काही लेखक **नाट्यशास्त्रा** चा कालावधी इ. स. पू. २०० ते इ.स. २०० असा मानतात. तथापि पहिल्या-दुसऱ्या शतकातील संस्कृत नाटककार भास याला भरताचे **नाट्यशास्त्र** माहीत नव्हते. त्यामुळे भरताची निर्मिती भासानंतरची म्हणजे तिसऱ्या शतकातील असावी, असे प्रस्तुत लेखकास वाटते. या ग्रंथाने विहित केलेली सूत्रबद्धता आणि घडवून आणलेली क्रांती महाराष्ट्रात अवतरणे स्वाभाविकच होते.

सातवाहनांचा दरबार व अंत:पुरातील महिला यांच्या करमणुकीसाठी गायन कलेत निपुण असणारी मुले व नर्तकी तसेच रोमन वाद्ये युरोपातून आयात केली जात असत.

मात्र सातवाहन आणि वाकटक कालीन महाराष्ट्रातील संगीताचा ठोस पुरावा **गाथासप्तशती (गाथासत्तसई)** या महाराष्ट्री प्राकृत काव्यसंग्रहाद्वारे उपलब्ध झालेला आहे. हाल नामक सातवाहन सम्राटाने हजारो गाथांमधून सातशे गाथांची निवड करून इ.स. च्या पहिल्या शतकात हा काव्यसंग्रह निर्माण केला. हा प्राकृत काव्यसंग्रह म्हणजे तत्कालीन जनजीवनावर प्रकाश पाडणाऱ्या लौकिक व काहीशा शृंगारिक कवनांचा संग्रह होय. मात्र **गाथासप्तशती** च्या निर्मितीचे श्रेय हाल सातवाहन याला दिले गेले असले, तरी इतर अनेक कवी आणि दोन वाकाटक सम्राटांनी यात नवीन गाथांची भर घातली व त्यातील जुन्या गाथा वगळून ग्रंथाचे स्वरूप वेळोवेळी बदललेले आहे. हालाप्रमाणेच वाकाटक सम्राट प्रवरसेन दुसरा आणि रुद्रसेन पहिला (सर्वसेन) यांनी देखील रचलेल्या गाथा **गाथासप्तशती** मध्ये समाविष्ट केलेल्या आहेत.[८] डॉ. ए.एस. आळतेकर यांच्या मते सध्याच्या स्वरूपातील **गाथासप्तशती** बहुतांशी चौथ्या शतकातील संस्कर (redaction) असून, नंतरच्याही काळामध्ये त्यातील गाथा बदलल्या आहेत. मात्र या ग्रंथाचा गाभा (kernel) पहिल्या शतकातीलच होय.[९] या ग्रंथात सातवाहन आणि वाकाटक कालीन संगीत व वाद्यांचे संदर्भ आलेले आहेत.

त्यात मृदंग, दुंदुभी, पटह, नगारा, वेणू (मुरली, बासरी), वीणा आणि घंटा या वाद्यांचा उल्लेख असल्याचे वर नमूद केलेले आहेच. या काव्यसंग्रहातील एका गाथेत मृदृंगाच्या दोन तोंडांची आणि त्यावरील मुखलेपनाची उपमा दुष्ट पुरुषाच्या वागणुकीला दिलेली आहे. प्रियकर वाद्य वाजवित असून त्याची प्रेयसी वाद्याच्या बोलांवर नृत्य करीत असल्याचे गाथा क्रमांक ३०४ मध्ये म्हटलेले आहे. भूतापुढे बासरी वाजवून उपयोग झाला नाही, अशी तक्रार दुसऱ्या एका गाथेत मांडलेली आहे. ज्या व्यक्तीला संगीत व कवितांची आवड नाही आणि गायिकेच्या स्वरातील माधुर्य रुचत नाही. त्याला त्याचे अरसिकत्व हीच शिक्षा होय, असा अभिप्राय देखील एका गाथेत आहे. यावरून तत्कालीन समाजात संगीत व रसिकत्व याला महत्त्वाचे स्थान असले पाहिजे. एका गायिकेला तिच्या पतीने संगीतसाथ केल्याचाही उल्लेख आहे. त्याकाळी गायक, गायिका, नट, नटी आणि नर्तकांची पथके गावोगावी कार्यक्रम करून उपजीविका करीत व त्यांचे कार्यक्रम नगरांप्रमाणेच खेड्यांतूनही होत असत. ग्रामीण जीवनातील प्राकृत गाणी समूहाने म्हणण्याची पद्धती देखील त्या काळी रूढ होती.

गाथासप्तशती मधील वाद्यांची विविधता, एकल (solo) वादन आणि साथसंगतीसाठी वाद्यांचा केलेला उपयोग, गायकांचा सामाजिक दर्जा, संगीत जलशांच्या प्रसंगांचे स्वरूप, आणि अशाच इतर बाबींवरून सातवाहन-वाकाटक कालीन संस्कृतीमधील संगीताचे स्थान दिसून येते. समकालीन समाजात करमणूक व रिकामपणाचा सदुपयोग म्हणून संगीताकडे पाहिले जात असे. धार्मिक सोहळ्यांच्या प्रसंगी गायन-वादन करण्याची प्रथा असल्याचेही स्पष्ट दिसते. वाद्य निर्मितीसाठी पुरेसे हस्तकौशल्यही तेव्हा असावे, असे वर म्हटलेच आहे. गाथांच्या प्रचारावरून समकालीन संस्कृतीतील संगीताचे स्थान लक्षात येते. गाथांची सांगीतिक क्षमता (innate musicality) व त्यांचा घाट (mould) यामुळे बऱ्याच संस्कृत नाटककारांनी या प्रकाराचा उपयोग करून घेतला. गाथांमधील अंतर्भूत लयबद्धतेची क्षमता (intrinsic conduciveness to rhythm) आणि नाद वाहकता यामुळे त्या प्रचारात आल्यात, आणि त्याचे प्रतिबिंब त्यांच्या उपयोगातील विविधतेत पडलेले दिसते. गाथांमध्ये विरल लय व स्पष्ट शब्दोच्चारांना उचित स्थान दिलेले होते. त्यांच्या रचनेतील लवचिकपणामुळे त्यांचा नृत्याच्या साथसंगतीसाठी देखील उपयोग करण्यात येई. याबरोबर भारतीय संगीतात नवीन नवीन संकल्पना येण्यास चालना मिळाली.

गाथांमध्ये संगीताची गुणात्मकता केवळ अभिप्रेतच (implied) नव्हती, तर त्यांचे प्रस्तुतीकरण मोठ्या प्रमाणात होत असे. गाथांच्या सांगीतिकतेमुळे त्या समकालीन संस्कृत श्लोकांपेक्षा भिन्न वाटतात. आणि म्हणूनच त्या अधिक रसिकप्रिय झाल्या. अनुनासिकतेमुळे (nasal consonants) कंठ संगीतात गाथा अधिक सांगीतिक परिणाम निर्माण करतात.

अजिंठा लेण्यांमधील शिल्प आणि रंगचित्रांवरून स्पष्ट दिसते की, त्या काळी संगीत, नर्तकींचे नर्तन आणि गारुड्याचा खेळ ही करमणुकीची साधने होती. महिला कलाकार गिटारसारखे दिसणारे भारतीय तंतू वाद्य, एकतारा, दो तारा, वीणा आणि झांज अथवा टाळ वाजवित, तर पुरुष वेणू (बासरी), नगारा, मृदंग, ढोलक, शंख व तुतारी वाजवित. अजिंठ्याच्या लेणे क्रमांक एक मधील (इ. स. ५५०) शिल्पात पुरुष व महिला वादक कलाकार विविध संगीत वाद्ये वाजवित असल्याचे शिल्प आहे. तंतू वाद्ये वाजविणाऱ्या पुरुषांची बरीच दृश्ये त्यात आहेत. त्यावरून तेव्हा संगीत हे करमणकीचे आवडते साधन असावे असे वाटते.[१०] वेरूळच्या लेणे क्रमांक चौदामध्ये तांडव नृत्य करीत असलेला भगवान शिव व त्याला मृदंग, डमरू व वेणूची साथसंगत करणारे वादक यांचा सुंदर शिल्पपट आहे. लेणे क्रमांक पंधरामध्येही शिव तांडवाचे शिल्प आहे. वेरूळच्या जगप्रसिद्ध "रामेश्वर" लेण्यात चार वादकांच्या साथसंगतीने नृत्य करणारा शिव शिल्पांकित केलेला आहे. "कैलास" या दुसऱ्या विश्वविख्यात लेण्यात नारदाच्या वीणा साथसंगतीसह भगवान शिव तांडव नृत्य करीत असल्याचा अप्रतिम सुदंर शिल्पपट आहे.[११]

अजिंठ्याच्या बौद्ध लेण्यांतील शिल्पे आणि रंगचित्रे व वेरूळच्या उपरोक्त चार ब्राह्मणी लेण्यांमधील शिल्पांचा विचार करता, अनुमान काढणे क्रमप्राप्त आहे की, इसवी सनाच्या तिसऱ्या ते सातव्या-आठव्या शतकांमध्ये महाराष्ट्रात गायन व वादनाची फार मोठी परंपरा होती. वाद्यांचा गायनाव्यतिरिक्त नृत्याच्या साथसंगतीसाठी देखील हमखास उपयोग करण्यात येई.

सर्वसाधारणपणे वाद्य संगीत पुढील प्रसंगी सादर करण्यात येई :– मान्यवर उपासक (votaries) स्तूपाकडे येत असताना, राजा दानधर्म करीत असताना, राज्यारोहण सोहळा,भाट अथवा गवयांचे गायन आणि अप्सरांचे नृत्य. वाद्यवृंदाचेही निश्चित स्वरूप त्या काळी साकार झाले असावे. वीणेसारखे धीरगंभीर, कलापूर्ण व गुंतागुंतीचे वाद्य इ. स. ५०० पर्यन्त पुष्कळ विकसित झालेले होते. देवलोकांचे (celestial) संगीत कलाकार म्हणून किन्नर व अप्सरांचे अजिंठ्यातील चित्रण अत्यंत सूचक मानावे लागते. वाकाटककालीन वाद्यांचे विविध प्रकार व विशेषता यांचा इतिहास या प्रकरणातील वाद्यांबाबत कथन करताना पुढे दिलेला आहे.

नर्तक व मिथुन शिल्पांमधून जीवन विषयक विपुल पुरातत्त्वीय पुरावा उपलब्ध झालेला आहे. मानवी जीवनातील

अशाच एका प्रसंगाच्या चित्रीकरणाचा आद्य पुरावा कोंडाणे लेण्यात असून त्यात पुरुष एका महिलेचा केशसांभार धरून ओढत असल्याचे चित्रण आहे. तथापि खऱ्या नृत्य कलाकारांचे शिल्पांकन प्रथम सहाव्या-सातव्या शतकात झालेले दिसते. औरंगाबादच्या लेणे क्रमांक सात मधील संगीत जलसा (musical concert) हा त्याचा उत्तम नमुना होय. या बाबत पुरातत्त्ववेत्ते आणि कला समीक्षकांनी असेच अभिप्राय दिलेले आहेत. भरताच्या **नाट्यशास्त्रा** मध्ये निर्देश केलेल्या रमणीय नृत्य मुद्रांसारखे चित्रीकरण खिद्रापूरच्या कोप्पेश्वर मंदिरात आणि यवतच्या भुलेश्वर मंदिरात केलेले आहे. नुत्याला हमखास संगीताची साथसंगत केली जात असे. वेरूळचे "दशावतार" नामक लेणे आणि खिद्रापूरचे कोप्पेश्वर मंदिर येथे मृदंग, वेणू, वीणा, झांज इत्यादी वाद्ये शिल्पांकित करून ठेवल्याने महत्त्वाचा ऐतिहासिक पुरावा जतन करून ठेवलेला आहे. अनेक गुंफांमध्ये शिवाच्या विविध नृत्यमुद्रांचे शिल्पांकन विराजमान आहे. तरीही कैलास लेणे आणि एलिफन्टा येथे शिवशिल्पांचे केवळ मनोहारी पूर्णदर्शनच नव्हे, तर त्यातून कलादृष्ट्या विलक्षण सौंदर्याविष्कार घडतो. एलिफन्टाचा महान सदाशिव, कल्याणसुंदर व गंगाधर म्हणजे अप्रतिम कलाकृती. शिल्पांकन व सौंदर्याविष्काराच्या निकषांवरून ही जगातील उत्तम कलाकृतींमधील उदाहरणे होत.[१२] वर कथन केल्याप्रमाणे गायन वादनाचे अनेक पुरातत्त्वीय पुरावे उपलब्ध असले, तरी रसिक श्रोतृवर्गासमोर सादर केलेल्या कार्यक्रमाचा पहिला पुरातत्त्वीय पुरावा तेराव्या शतकातील होय. गुरसाळेच्या (सातारा जिल्हा) रामलिंग मंदिरातील एका शिल्पात उंची पोशाख परिधान केलेले पुरुष व महिलांचा श्रोतृवर्ग संगीतोंनृत्याच्या कार्यक्रमात रममाण झालेला दाखविला आहे. अशा प्रकारचे हे पहिले चित्रण होय. याचा अर्थ असा की, या काळात संगीत समाजापर्यंत पोहोचलेले होते आणि संगीतात अधिकाधिक लौकिकता (secularism) आलेली होती.

प्राचीन महाराष्ट्रातील मंदिरांपैकी मार्कन्डी मंदिर समूहात भगवान शिवाची नृत्यमूर्ती आणि नृत्यगणेश शिल्पांकित केलेला आहे. अकराव्या शतकातील गडचिरोली जिल्ह्यातील या मंदिर शिल्पांमध्ये वीणा वादनात मग्न असलेली सरस्वती, आणि वीणा, वेणू, दुसरे तंतू वाद्य व टाळ वाजवित असलेल्या चार सुरसुंदरी यांचा समावेश आहे. ही शिल्पे समकालीन एकल वादन पद्धती आणि वाद्यवृंदाची परंपरा दर्शवितात.[१३] मार्कन्डीच्या नृत्य शैलीबाबत निश्चित निष्कर्ष काढणे शक्य नसले, तरी त्यावर खजुराहोच्या शिल्पांतील नृत्य शैलीचा प्रभाव आहे, असे अनुमान काढणे स्वाभाविक वाटते. असेच आणखी एक शिल्प वाघळीच्या कृष्ण मंदिराच्या (जळगाव जिल्हा, इ.स. १०६९) गोलाकार छतावर विराजमान आहे. भगवान कृष्ण वेणू वादन करीत असता मुग्ध झालेल्या आ" गोपिका त्याच्या भोवती नर्तन करीत असल्याचे येथे चित्रित केलेले आहे. अशा शिल्पाकृतींवरून अनुमान काढणे शक्य आहे की, तत्कालीन मंदिर या संस्थेशी नृत्य आणि संगीतासारख्या कला निगडित असून त्यांना लोकजीवनात मोठे स्थान होते.

बाराव्या शतकाच्या पूर्वार्धातील महाराष्ट्रातील संगीत व संस्कृतीच्या इतिहासासाठी कल्याणीचा चालुक्य राजा सोमेश्वर तिसरा (इ. स. ११२७-११३७) याने लिहिलेल्या **अभिलषितार्थचिंतामणि** तथा **मानसोल्लास** या महान संस्कृत ग्रंथाचा आधार घ्यावा लागतो. इ. स. ११३०-३१ मध्ये लिहिलेल्या या ग्रंथात तिसऱ्या सोमेश्वराने संगीताव्यतिरिक्त काव्य, रंगचित्र कला, खगोलशास्त्र आणि राजनीतीवर विपुल लेखन करून ठेवले आहे. समकालीन सांस्कृतिक जीवनाच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ म्हणजे एक खजिना मानला जातो.१४ सोमेश्वराने "ओवी" आणि "धवळा" हे काव्यसंगीत प्रकार खास महाराष्ट्राचे असल्याचे प्रतिपादन केले आहे. त्यांच्या गुणात्मक स्वरूपावरही त्याने प्रकाशझोत टाकला आहे. आज देखील हे दोन्ही प्रकार महाराष्ट्रातील भक्तिसंगीत आणि लोकसंगीताच्या विपुल कॉर्पसमध्ये आपले स्थान भूषवित आहेत. सोमेश्वर तिसऱ्याच्या काळी विविध प्रकारची वाद्ये प्रचलित होती. वाद्यांच्या उपयोगानुसार त्यांचे वर्गीकरण करून कंठ संगीताच्या साथसंगतीची, नृत्याच्या साथसंगतीची, एकल वादन करण्याची आणि युद्ध अथवा उत्सव प्रसंगी वाजविण्याची वाद्ये त्याने नमूद करून ठेवली आहेत.

बंगाल, माळवा, गुजरात, आंध्र, वऱ्हाड या प्रांत नामांवरून पडलेल्या राग नामांचा आणि त्यांच्या आविष्काराचा अभ्यास करून संगीताचे प्रांतिक धृवीकरण होत असल्याचे सोमेश्वराने सुचित केले आहे. प्रत्येक प्रांताचा एखादा तरी खास राग असतो, असे तो म्हणतो. भारतीय शास्त्रोक्त संगीतात सोमेश्वरानंतरच्या काळात घडून आलेल्या हिंदुस्थानी आणि कर्नाटिक संगीत या विभागणीची ही नांदीच म्हणावी लागेल.

देवगिरीच्या यादव सम्राटांच्या राजवटीत विविध विद्या आणि कलांबरोबरच संगीताला उत्तेजन लाभले व या कलेचा अधिक प्रसार झाला. यादव सम्राट सिंघण (१२१०-१२४७) यासचा "श्री करणाग्रणी" (मुख्य सचिव) सोढल हा काश्मिरी पंडित स्वतः प्रसिद्ध संगीतज्ञ होता. सोढलाचा मुलगा शारंगदेव हा तर विद्वान संगीतकार होता. करणाग्रणी होण्यापूर्वी तो यादवांचा दरबार गायक होता. सिंघणाचा श्री करणाग्रणी असताना शारंगदेवाने **संगीतरत्नाकर** नामक ग्रंथ लिहून भारतीय संगीताला महान योगदान दिले. एका लेखकाने या ग्रंथावर भाष्य लिहून ठेवले आहे.१५ शारंगदेवापूर्वीच्या त्याच्या दोन पिढ्या महाराष्ट्रात स्थायिक झालेल्या असल्याने, त्याने येथील कला व संस्कृतीचे ज्ञान आत्मसात केलेले होते. **संगीतरत्नाकर** ग्रंथात त्याने समकालीन अनेक गानप्रकारांचे सखोल विवेचन केलेले आहे. प्राचीन "प्रबंध" नामक गानप्रकारास त्याने प्रमुख स्थान दिले. त्याने संगीतातील प्रचलित शब्दांना पारिभाषिक संज्ञांची

प्रतिष्ठा प्राप्त करून दिली व शास्त्रीय संगीताचा पाया मजबूत केला. जुने गानप्रकार व राग कालबाह्य होऊन नवीन राग प्रचारात येत असल्याची शारंगदेवाला जाणीव होती, हे त्याने जुन्या रागांना "पूर्वप्रसिद्ध" आणि नवीन रागांना "अधुनाप्रसिद्ध" असे संबोधल्यावरून स्पष्ट होते. संगीतातील नवीन आविष्कारांनुरूप त्याने घडविलेल्या नवीन वाद्यांपैकी निःशंक वीणा एक महत्त्वाचे वाद्य होय. भरताच्या **नाट्यशास्त्र** या ग्रंथानंतर उत्तर व दक्षिण भारतीय परंपरांमध्ये **संगीतरत्नाकर** हाच आदर्श ग्रंथ मान्यता पावला.[१६]

शारंगदेव आणि पार्श्वदेवाने आपल्या संस्कृत ग्रंथांमध्ये वापरलेल्या मराठी संज्ञांवरून अनुमान काढणे स्वाभाविक आहे की, समकालीन महाराष्ट्रात संगीताचा बराच प्रसार झालेला होता. महाराष्ट्रातील गायक-वादकांनी यादवांच्या आणि विजयनगरच्या राजाश्रयाने ही कला समृद्ध केली होती. शारंगदेवाच्या काळात हिंदुस्थानी व कर्नाटिक शैली असा भेद प्रचलित झालेला नसला, तरी त्याला या संभाव्य परिवर्तनाची कल्पना आलेली होती.

यादव काळात राजदरबार व राजधानी या व्यतिरिक्त काही मोठ्या शहरांमध्ये गीतशाळांमधून संगीताचे पाठ देण्याची सुविधा होती. राजधानी देवगिरीत तर भव्य शामियाने उभारून त्यात संगीताची उपासना सतत चालू असे. यादव राजे देखील संगीताचा आस्वाद घेण्यास्तव शामियान्यांत विराजमान होत असत, असे इब्न-इ-बतूता (१३४२-४३) या समकालीन अरब प्रवासी इतिहासकाराने लिहून ठेवले आहे. तो असेही म्हणतो की, दर गुरुवारी दरबार गायकाच्या उपस्थितीत संगीत मैफली होत असून यादव राजे मधून मधून हजेरी लावत. राजधानीत गायक-गायिकांच्या निवासाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आल्याचेही इब्न-इ-बतूता लिहितो. गोपाळ नायक हा शारंगदेवप्रणित "प्रबंध" गायकीचा कलाकार यादव सम्राट रामदेवराव याचा दरबारी गायक होता.

सन १२९६ मध्ये अलाउद्दिन खलजीने रामदेवराव यादवाचा पराभव करून देवगिरीची प्रचंड लयलूट केली. येथील प्रचंड धनसंपत्ती लुटून नेत असताना अमीर खुस्रोच्या आग्रहास्तव अलाउद्दिनने गोपाळ नायकाचेही हरण केले. हा अमीर खुस्रो (१२५३-१३२५) मोठा संगीतज्ञ, कवी, सूफीपंथीय आणि मुत्सद्दी असून तो देवगिरीच्या स्वारीत अलाउद्दिनबरोबर आलेला होता. देवगिरीमधील २५ दिवसांच्या अल्पकालीन तथापि भयानक लुटालूट करण्याच्या काळातही अमीर खुस्रो गोपाळ नायकाच्या गानकौशल्याने प्रभावित झाला. त्याला उत्तरेत नेल्यावर अमीर खुस्रोने गोपाळ नायकाची गायकी आत्मसात करून महाराष्ट्रातील संगीताचे ज्ञान मिळविले. त्याची मुस्लिम गायकी आणि गोपाळ नायकाची भारतीय गायकी यातूनच ख्याल नामक नवीन गानप्रणाली निर्माण झाली, असा एक दावा करण्यात येतो. अशी एक कथा आहे की, खुस्रोने गोपाळ नायकाचे गायन चोरून सतत सहा दिवस ऐकल्यावर, त्याची नक्कल करून दाखविली, आणि आपण जिंकल्याचा दावा केला. त्यातून पर्शियन गायकी व हिंदू गायकीचे संमिश्रण होऊन खयाल गायकी जन्मास आली. ही कथा सत्य असल्यास खयाल गायकीचे जनकत्व अमीर खुस्रोबरोबर गोपाळ नायकालाही देणे आवश्यक आहे. मात्र काही अभ्यासक या गायकीचे श्रेय खुस्रोनंतर २०० वर्षांनी जन्मलेल्या जौनपूरच्या सुलतान हुसेन शर्की (१४५७-१४७६) याला देतात. ख्याल या अरबी शब्दाचा अर्थ "कल्पना." ख्याल म्हणजे हिंदुस्थानी शास्त्रोक्त कंठ संगीतातील असा गानप्रकार की ज्यातील रचना एका विशिष्ट रागात आणि तालात गायन करण्यासाठी स्वरबद्ध केलेली असते. खयाल तथा ख्याल गायकी सर्वश्रेष्ठ गानप्रकार म्हणून बहरली, मोहरली आणि स्थिरावली आहे. संगीतानुभव आणि जीवनानुभव देणाऱ्या या गानप्रकाराचे स्थान चिरशाश्वत राहील हे निश्चित.

चौदाव्या शतकाच्या प्रारंभापासून महाराष्ट्रावर उत्तरेकडील सुलतानांचे राजकीय आक्रमण सुरू झाले. राजकीय आक्रमणाबरोबर सांस्कृतिक जीवनावर देखील मुसलमानी संस्कृतीचा प्रभाव पडणे स्वाभविक होते. दिल्लीकडून मोठ्या संख्येने सूफी धर्मप्रचारक दक्षिणेत आलेत. इ.स. १३०९ च्या सुमारास सातशे सूफी संत महाराष्ट्र व दक्षिणेत विखुरलेले होते.[१७] या सर्व बाबींचा सांस्कृतिक जीवन आणि कलांवर प्रभाव पडणे अपरिहार्य होते. इतिहासाच्या या संधिकालात संत नामदेवाने कीर्तन या संगीतमय प्रवचनाला (genre of musico–religious discourse) आगळे स्वरूप दिले. महाराष्ट्रात प्रचलित असलेल्या नारदीय आणि वारकरी या दोन कीर्तन परंपरांपैकी वारकरी पद्धती रूढ करण्याचे श्रेय नामदेवाला द्यावे लागते. नामदेवाने कीर्तनाद्वारे भागवत धर्माबरोबरच संगीताचीही सेवा केली हे विशेष. नामदेवाच्या रचना विविध रागांमधून सादर केल्या जात असत आणि आजही केल्या जातात. **गुरुग्रंथसाहेब** या शीख धर्मग्रंथातही नामदेवाच्या बऱ्याच रचना समाविष्ट असून, त्यातील ६१ रचना १६ रागांमध्ये गायिल्या जातात.[१८] या काळात उदयास आलेल्या कीर्तन या रोचक संगीत प्रकाराला शास्त्रोक्त संगीताएवढे महत्त्व नसले, तरी त्याला संगीताच्या इतिहासात स्थान देणे क्रमप्राप्तच होय. नामदेवानंतर संत एकनाथाने कीर्तन आणि अभंगाव्यतिरिक्त भारूड हा काव्योंसंगीताचा नवीन प्रकार रूढ केला. त्याबरोबर महाराष्ट्रातील भक्तिसंगीतामध्ये बरेच काही घडून आले. मात्र चौदाव्योंपंधराव्या शतकांच्या या धामधूमीच्या काळात कला संगीताचा विकास कसा झाला याबाबतची माहिती उपलब्ध नाही. इतके मात्र खरे की, या काळात कीर्तन, अभंग आणि भारूडांच्या रूपाने भक्तिसंगीत बरेच समृद्ध झाले.

धृपद म्हणजे राग आणि संवादी पद्धतीच्या नियमांप्रमाणे परमेश्वराच्या स्तुतिपर बांधलेली स्वररचना होय. परमेश्वर

आणि पंचमहाभूतांविषयीच्या मानवी भाव-विश्वाचा त्यात ठाव असल्याने व या गानप्रकाराला प्रदीर्घ ऐतिहासिक परंपरा असल्याने धृपद गायकीला मानाचे स्थान प्राप्त झाले. पंधराव्या शतकाच्या अखेरीस उत्तर हिंदुस्थानात धृपद गायकी प्रचारात आली. तिला महाराष्ट्रातही राजमान्यता मिळाली. महाराष्ट्राच्या काही भागांवर राज्य करणारा विजापूरचा सुलतान दुसरा इब्राहीम आदिलशहा (१५८०-१६२७) हा स्वतः एक विद्याविभूषित गायक, कवी, चित्रकार व साहित्यिक होता.[१९] त्याने दखनी भाषेत लिहिलेल्या **किताब-इ-नौरस** या ग्रंथात चांगल्यापैकी गीते आहेत. त्याच्या दरबारात गुणी गायक-वादक, कवी, भाट, चित्रकार, धर्मज्ञानी आणि इतिहासकार होते. स्वतः धृपद रचनाकार आणि प्रथितयश गायक असलेल्या या सुलतानाने अदमासे चार हजार गायकांना आपल्या दरबारात आश्रय दिल्याचे **किताब-इ-नौरस** वरून दिसते. त्याच्या दरबारात महाराष्ट्रातील बरेच गायक असण्याची शक्यता आहे. इब्राहीम आदिलशहाच्या बऱ्याच धृपद रचनांमध्ये मराठी वाक्यप्रचार आढळतात. याचे कारण असे की, त्या काळी विजापूर हा महाराष्ट्राचाच भाग होता. काही समकालीन रंगचित्रांमध्ये इब्राहीम आदिलशहाला संगीततज्ञ म्हणून चित्रित केलेला आहे. त्याच्या ग्रंथातील बहुसंख्य गीते हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील विविध रागांमध्ये बसविण्यात आली होती. इतके त्याला संगीताचे ज्ञान होते. विशेष म्हणजे एक संगीतकार म्हणून त्याने संगीताची अधिष्ठात्री देवता सरस्वती आणि विद्येची देवता गणपती यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त केलेला आहे.[२०] आदिलशहाच्या काळातच उत्तर हिंदुस्थानी धृपद गानपद्धतीचा महाराष्ट्राने प्रथम स्वीकार केला असावा. इब्राहीम आदिलशहाच्या संगीत विषयक कामगिरीबाबत कथन करताना त्याने उत्तेजन दिलेल्या "रागमाला" रंगचित्रांचाही उल्लेख करणे अपरिहार्य आहे. इब्राहीम आदिलशहाच्या काळानंतर महाराष्ट्रात मुख्यत्वे धृपद धमार, कीर्तन, अभंग, भारूड हे गान प्रकार प्रचलित होते. मात्र तत्कालीन शास्त्रोक्त कला संगीताबाबत काहीच माहिती मिळत नाही.

बऱ्याच कालावधीनंतर म्हणजे पेशवे काळात संगीताला थोडेफार महत्व प्राप्त झाले. बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवा याच्या दरबारात संगीताला प्रतिष्ठा मिळू लागली. नानासाहेब पेशव्याच्या पदरी नारो अप्पाजी भावे हा सतारवादक आणि खुशालखाँ हा धृपद गायक होता. रघुनाथरावाचा आश्रित बाळाजीपंत हा विख्यात सतारवादक होता. त्यानंतर पेश्वाईच्या अंतापर्यंत पावा भीमराव, राणू शिंपी, विठू गुरव, त्र्यंबक आत्माराम, विठोबा पारनेरकर, दाबलखान, मेंढू सेन, बिलासबरसखान आणि चिंतामणी मिश्र यासारखे अनेक धृपद गायक संगीताची उपासना करीत होते. तानसेनचा वंशज बिलासबरसखान, दावलखान, मेहंदी हुसेन, दरकदार नगरकर हे कलाकार पेशवा दुसरा बाजीराव याच्या पदरी असल्याची माहिती मिळते.[२१] शिवाय त्याच्याकडे देवीदास हा सतारवादक, बहिर्जी आणि नागू गुरव हे पखवाजी होते. या कालावधीत धृपद धमार, ख्याल, टप्पा यासारखे संगीत गानप्रकार आणि सारंगी, सतार व पखवाज यासारखी वाद्ये प्रचारात होती. पेशवाईत लावणी व पोवाडा हे गानप्रकार महाराष्ट्रात उदयास आले. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात ठुमरीच्या वळणाची "बैठकीची लावणी" उदयास आल्याचा उल्लेख वर आलेलाच आहे. महाराष्ट्राची खास विशेषता ठरलेली लावणी काही ठराविक सुगम रागांमध्ये म्हटली जात असे. तथापि लावणी अभिजात शास्त्रोक्त संगीतापासून बरीच दूर राहिली. काळाच्या ओघात कला संगीत आणि लावणी या दोन्हीमधील अंतर वाढतच गेले, आणि लावणी शृंगारिक व उथळ होत गेली.

बाजीरावाच्या कारकिर्दीत शाहिरी काव्याला विशेष बहर आला. प्रभाकर दातार, रामजोशी, सगनभाऊ, अनंत फंदी, होनाजी-बाळा, हैबती असे अनेक नामांकित शाहीर उदयास आले. बाजीराव रंगेल वृत्तीचा असल्यामुळे या विषयास बरेच महत्त्व आले. या रचनाकारांचे पोवाडे, लावण्या व पदे मराठी भाषेचे चिरंतन अलंकार बनले आहेत. त्यामुळे लावणी गानप्रकाराला खास वळणही लागले. सत्तासमाप्तीनंतर बाजीराव बिठूर तथा ब्रह्मावर्त येथे राहत असताना त्याच्या भोवती गुणी गवई, बीनकार, शाहीर, पहीलवान, बहुरुपी इत्यादी मंडळी जमली होती. चिंतामणी मिश्र हा सुप्रसिद्ध धृपद रचनाकार आणि गायक बाजीरावाकडे ब्रह्मावर्तासही होता. दुसऱ्या बाजीरावाच्या अंतानंतर संगीताचा राजाश्रय संपला. त्यामुळे कलाकारांच्या कलागुणांना काही काळ तरी वाव मिळाला नाही.

साठ-सत्तर वर्षानंतर मात्र कोल्हापूर, मिरज, सांगली, औंध, कुरुंदवाड, इचलकरंजी, जत, बावडा, जमखिंडी या मराठी भाषिक संस्थानांमध्ये तसेच ग्वाल्हेर, इंदूर, देवास आणि बडोदा या बृहन्महाराष्ट्रातील संस्थानांमध्ये संगीताला पुन्हा राजाश्रय मिळाला. या संस्थानिकांनी अनेक गायक-वादकांना दरबारात मानाचे स्थान तर दिलेच, शिवाय गायकीची परंपरा पुढे चालू राहावी यासाठी व्यवस्था केली. त्याबरोबर पुन्हा रसिकांचा एक वर्ग निर्माण झाला.

संगीताला लोकाश्रय मिळवून देण्याचे कार्य पुण्यापेक्षा मुंबईत प्रथम सुरू झाले. के. एन. काब्राजी यांनी १८७० मध्ये मुंबईत "गायनोत्तेजक मंडळी" ही संस्था स्थापन केल्याने संगीत शिक्षण, जलसे व संगीतावरील व्याख्याने यांच्या उपक्रमाचा प्रारंभ झाला. या संस्थेने कार्यक्रमांद्वारे संगीताला लोकाश्रय मिळवून देण्याचे कार्य केले. साधारणपणे १८८० पासून नवीन गृहस्थी आश्रयदाता वर्ग निर्माण झाल्याने संगीताचे समाजातील स्थान उंचावले. कदाचित याच कारणांमुळे बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आणि विष्णू दिगंबर पलुसकर यांनी मुंबई हेच आपले कार्यक्षेत्र निवडले.

बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर (१८४९-१९२६) यांचे ग्वाल्हेरहून महाराष्ट्रात आगमन होईपर्यंत येथे धृपद गायकीचा प्रभाव होता. ग्वाल्हेर घराण्याच्या खयाल गायकीमध्ये निष्णात असलेल्या या गवयाने येथे खयाल युग सुरू केले. त्यांच्यापूर्वी येथे खयाल गायक नव्हते असे नव्हे. तथापि त्यांचा प्रभाव मर्यादित असून त्यांनी बाळकृष्णबुवांना केवळ वाट मोकळी करून दिली. ग्वाल्हेरच्या परिसरातून खयाल गायकीचे प्रवर्तन करणाऱ्या या कलाकाराने मूळच्या नागाव येथील वासुदेवबुवा जोशी यांचेकडून सहा वर्षे ग्वाल्हेर येथे तालीम घेतलेली होती. तेव्हा ग्वाल्हेर हे संगीताचे माहेरघर असून तेथील राजे जिवाजीराव शिंदे यांची बाळकृष्णबुवांवर मर्जी बसली. मात्र वासुदेवबुवा जोशींच्या निधनानंतर बाळकृष्णबुवांच्या गायकीवर थोर कलाकार महम्मद खान यांनी परिष्करण कार्यै (finishing touches) केले व तिची गुणवत्ता वाढविली. बाळकृष्णबुवांचे मोठेपण यात आहे की, त्यांनी महाराष्ट्रात खयाल गायकीच्या उपचारवादी आकृतिबंधाचा पाया घातला. त्यांच्या काळापासून ज्या अनेक गायकांनी खयाल गायकीत रंग भरून अलंकरण केले, त्यांच्या योगदानाचे स्वरूप निश्चित करून त्यांचे मूल्यामापन करता येते. एका परीने बाळकृष्णबुवांनी संगीतामध्ये उपचारवादाचे (formalism) युग सुरू केले. ग्वाल्हेर सोडून बुवा प्रथम मुंबईला आल्यावर त्याना सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर, न्या. काशिनाथ त्रिंबक तेलंग, विश्वनाथ नारायण मंडलिक आणि शांताराम नारायण यांच्यासारखे चाहते लाभले. शिवाय बऱ्याच कलाकारांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. याच सुमारास त्यांनी संगीताला वाहून घेतलेले **संगीतदर्पण** (१८८३) नावाचे मासिक दोन वर्ष चालविले. हा महाराष्ट्रातीलच नव्हे तर सर्व भारतातील पहिला अभिनव प्रयत्न होता. हयातीची अखेरची ३० वर्षे त्यांनी मिरज व इचलकरंजी येथे घालविली. ते मिरजेच्या पटवर्धनांचे दरबार गायक बनले ग्वाल्हेर परंपरेच्या गायकीचा महाराष्ट्रात जो प्रसार झाला, त्याचे श्रेय बाळकृष्णबुवांना द्यावे लागते. पुढील काळात आपल्या स्वतंत्र कर्तबगारीने संगीताला सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त करून देणारे विष्णू दिगंबर, पलुसकर, अनंत मनोहर जोशी, मिराशीबुवा, नीळकंठबुवा, गुंडुबुवा इंगळे आणि चिरंजीव अण्णाबुवा इचलकरंजीकर यांनी अनेक वर्षे बाळकृष्णबुवांकडून शिक्षण घेतले. यातील प्रत्येकाला बाळकृष्णबुवांकडून तालीम व प्रेरणा मिळाल्याने संगीत क्षेत्रात सिद्धी प्राप्त झाली. त्यामुळेच त्यांना संगीतातील भीष्माचार्य म्हणून ओळखले जाते. सन १९२६ मध्ये निधन होईपर्यंत बाळकृष्णबुवांनी संगीत शिक्षणाचे कार्य चालू ठेवले.[२२]

ज्या काळामध्ये महाराष्ट्रात अभिजात संगीताचे शिक्षण देण्याची सुविधा नव्हती, त्या काळात बाळकृष्णबुवांनी केलेले संगीत प्रसाराचे कार्य बहुमोल होते. नमूद करणे आवश्यक आहे की, त्या काळी संगीताला समाजामध्ये फार मोठी प्रतिष्ठा नव्हती. संगीतकारांना मिळणारी प्राप्तीही आकर्षक नव्हती. श्रोत्यांची संख्या अत्यंत मर्यादित होती. शिवाय समकालीन रसिकांच्या मनावर धृपद गायकीचा प्रभाव होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत नवीन गायकीचा प्रसार करणे हे कठीण कार्य होते. या शिवाय बाळकृष्णबुवांनी महाराष्ट्राला दिलेले आणखी एक योगदान म्हणजे नाटकांमधील पदांना त्यांनी दिलेल्या चाली होय. डोंगरे संगीत मंडळीच्या (१८८१) नाटकांमधील पदांना राग संगीतावर आधारित अशा त्यांच्या चाली अत्यंत लोकप्रिय झाल्या. त्याबरोबर नाट्य संगीत हा नवीन गानप्रकार उदयास आला. या गानप्रकाराने महाराष्ट्रातील रसिक वर्गाला मोहून टाकले आहे. या विषयीचे विवेचन स्वतंत्ररीत्या केलेले आहे.

ग्वाल्हेर गायकीच्या मराठी पुरस्कर्त्यांमध्ये बाळकृष्णबुवांव्यतिरिक्त थोर पंडित विष्णू दिगंबर पलुसकर, वासुदेवबुवा जोशी, सखारामबुवा अलवारकर, कृष्णशास्त्री शुक्ल, बाबा दीक्षित, बाळागुरुजी, शंकर पंडित, विष्णुपंत छत्रे, राजाभय्या पूछवाले, कृष्णराव पंडित आणि बाळाभाऊ उमडेकर या नामवंत गायकांचा समावेश करण्यात येतो. कृष्णराव पंडितांच्या शिष्य परंपरेतील शरदचंद्र आरोळकर (मुंबई) यानीही बरेच नाव मिळविले. ख्याल गायकीचा प्रारंभीच्या काळातील प्रसार आणि पुरस्कार करणाऱ्या गायकांमध्ये सातारला राहिलेले वारिसअली खान (१८६०-१८७५), बाळाजीबुवा आणि मिरजला स्थायिक झालेले झैन-उल-आबेदिन तसेच मालवणचे विठोबा अण्णा हडप यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. बाळकृष्णबुवांची सर्वाधिक महत्त्वाची कामगिरी म्हणजे खयालाची संकल्पना आणि प्रस्तुतीकरणाला त्यानी दिलेले उपचारवादी संकल्पचित्राचे तंत्र. गायनातील आपल्या संकल्पनेचा विस्तार उठावदार उच्चारणाद्वारे करून ख्याल एखाद्या वठलेल्या वृक्षासारखा वाढविणाऱ्या महाराष्ट्रीय गायकांपैकी ते पहिलेच होत. त्यांच्या नंतर उदयास आलेल्या अनेक गायकांनी खयालातील अंगभूत रचनेला विविध आकार, रंग, मूलभूत संकल्पचित्रण, आणि अलंकरणाने सजविण्याचे मोठे कसब विकसित केले. तथापि सांगीतिक संकल्पचित्र काढण्याच्या कल्पनेचे प्रकटीकरण (express articulation of the idea of musical design) करणारे अत्यल्पच होत. काही महनीय कलाकारांनी आपल्या व्यक्तिगत संकल्पनांचा आकृतिबंध (individual conception of a pattern) आपल्या गायनातून साकार केला, अधिकतर सौंदर्यदृष्टीनछ (aesthetic sense) आविष्कार केला, अधिकतम अलंकरण केले. तथापि बाळकृष्णबुवांचे मोठेपण केवळ बाह्य स्वरूप आणि संकल्पन यातच सामावलेले नसून, त्यांचे उच्चाराद्वारे प्रकटीकरण करण्यातही आहे. खरे तर विष्णू दिगंबरांनी नंतरच्या काळात जे महत् कार्य प्रचंड प्रमाणात केले, त्याची प्रेरणा त्यांना बाळकृष्णबुवांनी केलेल्या माफक प्रारंभातून झाली होती, असे म्हणावे लागते. वस्तुतः हिंदुस्थानी संगीतातील विद्याव्यासंगी आणि कलात्मक अंगांच्या उपचारवादी आकृतिबंधाचा पाया (foundation of the formalistic pattern of scholastic and artistic pursuit) या दोघा

महनीयांनी रचला. त्यातूनच नवीन युग अवतरले.

अवतरत असलेल्या उपचारवादी आकृतिबंधाच्या पार्श्वभूमीवर पुढील सांगीतिक विवेचनाचे सम्यक आकलन होण्यास्तव हिंदुस्थानी संगीतातील काही आधारभूत संकल्पना आणि पारिभाषिक वाक्प्रचारांचा आशय येथे स्पष्ट करणे उपयुक्त वाटते. त्याद्वारे संगीत विद्याशाखेचा अभ्यास नसलेल्या अभ्यासकांना संगीताच्या संक्षिप्त इतिहासाचे यथार्थ आकलन होण्यास मदत होईल.

गंधर्व हे परंपरेनुसार स्वर्गीय गायन-वादन पटू (celestial musicians) असून देवादिकांसाठी गायन किंवा वादन करणारे उपोंदेव म्हणून ख्यातकीर्त होते. प्राचीन भारतात ते इंद्राचे दरबारी संगीतकार मानले जात. नारी-सुलभ असा अत्यंत मधुर आवाज आणि आलापदारीचे गायन करण्यात त्यांचे कसब अप्रतिम असल्याचे मानले जाते. भारतीय सांगीतिक परंपरा तसेच आपल्या पुराकथाशास्त्रीय भावविश्वाचा ते एक अविभाज्य भाग बनलेले आहेत. पुढे मध्ययुगीन तसेच आधुनिक काळात ही गुणदर्शक संज्ञा प्राचीन अथवा समकालीन गायन आणि वादनाचे कसब असलेल्या कलाकारांचे बाबतीत वापरली जाऊ लागली. आज गंधर्व हा सन्मानदर्शक किताब म्हणून त्याला खास अर्थ प्राप्त झालेला असून, सुमधुर कंठ आणि अप्रतिम कला यांची देणगी असलेल्या महनीय कलाकारांना तो बहाल करण्यात येतो. उत्तम गायनोंवादनाची आपली दीर्घकालीन परंपरा रसिकमान्य करणाऱ्या थोर कलाकारासाठी **बुजुर्ग** ही सन्मानदर्शक संज्ञा रूढ आहे. मूलतः हा पर्शियन शब्द असून वंदनीय व्यक्ती असा त्याचा आशय होय. भारतीय संगीत परंपरेनुसार **गुरू** म्हणजे इतकी मोठी विभुती की, ज्यात परमेश्वर आणि माता-पित्यांचाही अंश समाविष्ट होतो. ब्रह्मा, विष्णु व मातापित्या समवेत शिष्याच्या जीवनात गुरूचे स्थान मानले जाते.

भारतीय संगीतकाराच्या यशात रसिक श्रोत्यांचा सहभाग तर अमूल्य असतो. **रसिकवृंद** म्हणजे आश्रयदाता, सहभागी, स्फूर्तिदाता आणि समीक्षक यांचे संमिश्रण होय. भारतीय संगीतातील मौखिक परंपरेच्या स्वरूपामुळे व दृक-श्राव्य परिणामामुळे रसिकवृंदाला बैठकीच्या कार्यक्रमात वरचे स्थान प्राप्त झाले आहे. कलाकार मान्यच करीतो की, समोरील आस्वादकांच्या गुणवत्तेवर त्याच्या कलाविष्काराची गुणवत्ता अवलंबून असते. गायन-वादनाच्या प्रक्रियेत श्रोतृ समुदाय सजीवपणे सहभागी होतो. तसेच त्याला निश्चित भूमिका करावयाची असते आणि अनुकूल आचार संहिता पाळावयाची असते. **मैफल** अथवा **बैठक** म्हणजे असा सोहळा की, जिथे संगीत अथवा नर्तनाचे सुबद्ध व शास्त्रोक्त सादरीकरण (presentation) केले जात आहे. सूफी नामक मुसलमान गूढवादी (mystics) या संपूर्ण विश्वाला एक महान **मेहफिल** म्हणून संबोधित असत. हिंदुस्थानी संगीतात सूफी तत्त्वज्ञान व गूढवादावर आधारित अशा असंख्य रचनांचा समावेश आहे. हे केवढे अर्थपूर्ण आहे की, सर्वश्रेष्ठ नाटककार विल्यम शेक्सपियर याने देखील या विश्वाची रंगभूमीशी तुलना केलेली आहे, आणि सूफींनी त्याचे चित्रीकरण करण्यास्तव संगीताचे माध्यम निवडले ! अभिजात संगीताला मंदिर तसेच राजदरबारातून मुक्त करून त्यात मानवी जीवनातील लौकिकता (secularism) आणण्यासाठी भव्य महोत्सव म्हणून **संगीत परिषद** हे माध्यम खुले करण्यात आले. त्याद्वारे तिकीट विकत घेऊन संगीताचा आस्वाद घेण्याची आस्वादकांना संधी उपलब्ध करण्यात आली. निदान विसाव्या शतकाच्या प्रातःकालापर्यंत तिकीट विकून आयोजित केलेल्या मैफली अथवा परिषदा रूढ झालेल्या नव्हत्या. पंडित पलुसकर आणि विष्णू नारायण भातखंडे यांनी विविध गायक आणि वादकांना एकत्र आणून हा महत्वपूर्ण उपक्रम सुरू केला. त्याबरोबर अभिजात संगीताचे लोकशाहीकरण (शुद्ध अर्थाने) करण्याचा प्रतीकात्मक चमत्कार घडवून आणला.

घराना ही हिंदुस्थानी अभिजात संगीतामधील खास संज्ञा असून घराना म्हणजे सर्वसमावेशक अशा संगीत सौंदर्यशास्त्र विषयक समान प्रणालीचे शिस्तपालन करणाऱ्या गायक व वादकांचे स्कूल ऑफ आयडियॉलॉजी होय. प्रत्येक घराण्याचा सौंदर्यशास्त्र विषयक व दृष्टिकोन व संकेत स्वतंत्र असतात. पूर्वीच्या काळी वंशपरंपरेने संगीत साधना करणाऱ्या संगीतकारांच्या मूळ गावांवरून घराण्यांची नावे पडली. म्हणूनच ग्वाल्हेर, आग्रा, जयपूर (अत्रौली), किराना, पटियाला, इंदोर, मेवती, रामपूर, साहसवान, भेंडीबजार, बिष्णुपूर इत्यादी स्थलनामांवरून त्या त्या घराण्यांची नावे रूढ झाली. मात्र इतर काही घराण्यांची नावे विशिष्ट शैलीच्या आद्यप्रवर्तकांवरून पडलेली आहेत. "Now gharanas are being interpreted on the basis of their implicit or explicit musical ideology, and distinct styles of interpretatiion and presentation of any set of ragas. They preserve their respective musical or regional identities. A gharana is indeed a particular school of music with an exclusive and coherent point of view, which governs the reinterpretation of the elements of music, their interrelationship and the derived details within the system" (या ग्रंथाच्या इंग्रजी आवृत्तीवरून). गुरु-शिष्य परंपरेनुसार करावयाचा **गंडाबंधन** विधी म्हणजे असा विधी की, तेव्हा गुरू आपल्या पसंतीच्या संगीतकाराचा शिष्य म्हणून स्वीकार करतो. उपनयन तथा मौंजीबंधन (thread–girding) या सारख्या गंडाबंधन संस्कारानंतर गुरूची विद्या अधिकृतरीत्या संपादन करण्याचा शिष्याला अधिकार प्राप्त होतो. या

विधीच्या वेळी गुरू शिष्याच्या मनगटावर काळा गंडा बांधतो, मिठाई वाटली जाते. आदरभाव म्हणून गुरुदक्षिणा दिली जाते, पण ते शिक्षण शुल्क नव्हे. घराण्याचा मुख्य गुरू पूर्वी आपला वारस अथवा उत्तराधिकारी नियुक्त करीत असे. या वारसदाराला घराण्याचा **खलिफा** हा किताब बहाल करीत असे. ही प्रथा प्रामुख्याने मुसलमान संगीतकारांमध्ये प्रचलित आहे. या बाबी म्हणजे संगीत विद्याशाखेतील समाजशास्त्रीय व सांस्कृतिक अंगांचे प्रतीक होत.

भारतीय संगीताच्या संचयागारात (repertoire) अत्यंत समृद्ध व विपुल रागांचा संचय आहे. राग या संस्कृत संज्ञेचा अर्थ रंग, स्वर, प्रवृत्ती असा आहे. "The raga as understood today is a result of processing the scale to create generative, basic and melodic frameworks." (इंग्रजी आवृत्तीवरून). सांप्रत काळातील राग सर्वसाधारपणे बारा स्वरांवर आधारित असतात. संगीतशास्त्र.-परंपरेने राग संचयाचे राग आणि रागिण्यांमध्ये वर्गीकरण केलेले असून, त्यातून संगीतातील पुरुषोंस्त्री हे तत्व व्यक्त केलेले दिसते. वर्षातील सहा ऋतूंशी सहा राग निगडित केलेले आहेत. मात्र संगीतशास्त्रात शेकडो मूळ राग, नवीन राग आणि रागिण्या सांगितलेल्या आहेत. **चीज** म्हणजे शास्त्रोक्त कंठ संगीतातील रचना होय. विशिष्ट राग संरचना आणि संकल्पन या अनुसार उच्चारलेले बोल, आणि विशिष्ट ताल यांच्या संगतीने चीज गायिली जाते. चीज या पार्शियन शब्दाचा मूळ अर्थ सुंदर गीत असा होय. **बंदिश** म्हणजे सुव्यवस्थितपणे बांधणी केलेली रचना होय. अंगीभूत परिपूर्णता (inherent completeness) आणि संपूर्ण सांगीतिक विकासातील रेखीवपणा (graphicness) या विशेषतांमुळे संगीतशास्त्राने बंदिशीला चिजेपेक्षा अधिक वरचे स्थान दिलेले आहे.

धृपद म्हणजे परमेश्वर भक्ती आणि पंचमहाभूते यांच्या स्तुतिप्रीत्यर्थ विशुद्ध भारतीय अभिजात संगीताच्या शिस्तीनुसार गायिलेली रचना होय. संकेतमान्य (conventional) धृपद गायन पौरुषयुक्त (virile) आणि जोरकस असल्याने, महिला धृपद गायिका क्वचितच आढळते. या संज्ञेची व्युत्पत्ती "ध्रुव" आणि "पद" या संस्कृत शब्दांपासून झालेली आहे. धमार तालात गायिलेल्या धृपदाला **धृपद धमार** अशी संज्ञा असून, तो धृपदापेक्षा अधिक द्रुत गतीने सादर करण्यात येतो. समकालीन भारतात अत्यल्प धृपद धमार गायक असून त्यांच्यात डागर बंधू व त्यांच्या शिष्यगणांचा प्रामुख्याने समावेश होतो.

खयाल गानप्रणलीचा उगम जरी पूर्णपणे भारतीय असला, तरी त्यात हिंदू आणि पर्शियन शैलींच्या कंठ संगीताचे संमिश्रण आणि बेमालूम मिलाफ आहे. याचा उल्लेख अमीर खुस्रो व गोपाल नायकाच्या संदर्भात वर आलेला असून ख्यालाच्या जनकत्वाची चर्चा केलेली आहेच. खयाल या पर्शियनोंअरेबिक शब्दाचा अर्थ कल्पना, वृत्ती असा आहे. "Khayal as a genre can be defined as a form of Hindusthani vocal music in which a cheese or bandish is intently composed in a particular raga to be recited to the accompaniment of a particular tala". (इंग्रजी आवृत्तीवरून). बादशहा मोहम्मद शाह (१७१९-१७४८) याच्या दरबारातील सदारंग न्यामत खान या बुजुर्ग गायकास ही एक अभिजात गानप्रणाली म्हणून तिला निश्चित स्वरूप देण्याचे श्रेय देणे आवश्यक होय.

ठुमकत ठुमकत पदलालित्यासह चालताना पैंजणांचा निघणारा मंजूळ ध्वनी या अर्थाच्या "ठुमकना" या अरेबिक शब्दापासून ठुमरी या गानप्रणालीची कल्पना उद्‌भवलेली दिसते. **ठुमरी** ही हिंदुस्थानी कंठ संगीतातील एक निम-शास्त्रीय गानप्रणाली असून तिचा नृत्य, नाट्यमय मुद्रा, विप्रलंभ भाव (a form of amorous passion in which separation intensifies emotions), आवाहनात्मक प्रेमकाव्य आणि उत्तर प्रदेशातील लोकगीतांशी निकटचा संबंध आहे. ठुमरीच्या शोधाचे श्रेय लखनौच्या वाजिद अली शाह (१८२२-१८८७) याला परंपरेने देण्यात येते. **गझल** या गानप्रकाराचा मूळ पर्शियन अर्थ प्रेमगीत असा होय. नंतरच्या कालावधीत गझलच्या विषयाची कक्षा वाढवून तिच्यात इतर भावनांचाही समावेश करण्यात आला. या गानप्रकाराच्या गुंफणात परमेश्वर प्रेमाचे धागेदोर, (strands) देखील संमिश्रित करण्यात आलेत. प्रथम सूफी संतांनी या स्वरूपात गझल लोकप्रिय केली. मात्र साप्रंत काळात ठुमरी अधिक राग-अभिमुख आणि संगीत-प्रधान झालेली आहे. मराठी संगीत नाटकांतील गाणी **नाट्यगीत** या नावाने एक स्वतंत्र गानप्रकार म्हणून महाराष्ट्रात विकसित झालीत. **नाटय संगीत** विशेषतापूर्ण रीतीने आणि सांगीतिक संकल्पनांच्या अनुषंगाने शुद्ध अथवा मिश्र रागांमध्ये गायिली जातात. या खास महाराष्ट्रीय गानप्रकाराने विपुल लोकप्रियता तर संपादन केलीच, पण शिवाय अभिजात संगीताचा आस्वाद घेण्याचे येथील रसिकांना शिकविले. त्यामुळे अनेक खयाल गायक देखील आपल्या मैफलीत एखादे नाट्यगीत गातात.[२३]

वर कथन केलेल्या **कीर्तनांच्या** दोन प्रकारांपैकी नारदीय कीर्तनाने रागदारी संगीत तसेच नाट्य संगीताचा भरघोस उपयोग करून साथसंगतीसाठी इतर वाद्यांसह व्हायोलिनचाही विपुल वापर करून घेतला. त्याउलट वारकरी कीर्तन मात्र अतिशय साधे व कर्मठ राहिले. नाट्य संगीत आणि नारदीय कीर्तन यांच्यातील मूलभूत सौंदर्यदृष्टी पाहता या दोन्ही बाबी बहुतांश सजातीय (cognate entities) मानण्याजोग्या आहेत. या दोन्ही गान प्रकारांमधील अंतर्गत

जवळीक या कारणाने प्रारंभीच्या काळात नाट्य संगीताने आपल्या पालनपोषणासाठी नारदीय कीर्तनाची रचना व गानपद्धतीचा आधार घेतला. बरेच लावणी कलाकार नारदीय कीर्तनाकडे वळलेत, तर पुष्कळ कीर्तनकारांनी लावणी गाण्यातही प्राविण्य मिळविले.

कला संगीताला समाजात उच्च स्थान प्राप्त करून देणे, कलावंतांना प्रतिष्ठा मिळवून देणे, कलास्वाद घेण्यासाठी लोकांना उत्तेजन देणे आणि संगीत शिक्षण देण्याचे कार्य करणारे पंडित विष्णू दिगंबर पलुसकर (गाडगीळ) याना महाराष्ट्रातील संगीताच्या इतिहासात अत्युच्च स्थान आहे. कल्पकता, दूरदृष्टी, उद्योगशीलता आणि संघटना चातुर्याने त्यांनी महान यश संपादन केले. कुरुंदवाड येथे १८ ऑगस्ट १८७२ रोजी जन्म घेतलेल्या पलुसकरांनी बुजुर्ग गायक बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांच्याकडून संगीत विद्या संपादन केली. मिरज आणि महाराष्ट्राच्या बाहेर पडून विष्णू दिगंबरांनी १८९६ पासून पुढे अदमासे पाच वर्षे बडोदा, राजकोट, ग्वाल्हेर, मथुरा आणि दिल्ली परिसरात संगीत सादर केले. आपल्या गायनाचे जाहीर कार्यक्रम करून त्यांनी मंदिर आणि दिवाणखान्यातील संगीताच्या मैफलीला प्रथमच सार्वजनिक स्वरूप दिले. राजकोट, ग्वाल्हेर, मथुरा, जालंदर आणि पंजाबमध्ये त्यांनी एक श्रेष्ठ बुजुर्ग गायक म्हणून लोकप्रियता मिळविली. लोकांमध्ये संगीताविषयी आस्था निर्माण करणे, आस्वादक घडविणे, संगीत लोकाभिमुख करणे, सामाजिक प्रतिष्ठा मिळविणे, कलावंताचे चारित्र्य संवर्धन करणे आणि होतकरू कलावंतांना संगीताचे ज्ञान प्रदान करणे या ध्येयांचा त्यांनी ध्यास घेतला. या ध्येयपूर्तीसाठी पंडित विष्णू दिगंबरांनी लाहोर येथे ५ मे १९०१ रोजी गांधर्व महाविद्यालय नामक संगीत महाविद्यालय स्थापन केले. संगीताचा ध्यास घेऊन निस्वार्थीपणे अध्यापन कार्य करणाऱ्यांची पिढी घडविणे हेच ध्येय. ही महान संस्था लोकाश्रयावर चालवून आत्मनिर्भर केली. एक आदर्श संस्था चालविण्याचा त्यांनी ध्यास घेतला. त्या काळी संगीत वाङ्मय किंवा स्वरलेखन पद्धती प्रचलित नसल्याने त्यांनी स्वतःच वेगवेगळ्या रागांमधील चिजा स्वरलिपीत बांधल्या. संगीतावर पुस्तके तयार केली. संगीताचा शिक्षणक्रम तयार केला आणि शिक्षक वर्गाची निर्मिती केली. पदवीदानाची प्रथा पाडली. खरे म्हणजे पलुसकरांनी मिशनरी वृत्तीने संगीताचा प्रसार केला.

महान गायक म्हणून नंतर कीर्ती मिळविणारे पंडित ओंकारनाथ ठाकूर, विनायकराव पटवर्धन, गणेश व्यास, शंकरराव व्यास, वामनराव पाध्ये, शंकरराव पाठक (व्हायोलिन वादक), बाबूराव गोखले यांचा पलुसकरांच्या पहिल्या शिष्यगणांमध्ये समावेश होतो. पंडितजींचे काही शिष्य बनारस, अलाहाबाद, साबरमती इत्यादी ठिकाणी अध्यापन कार्य करू लागले. महात्मा गांधींजींच्या इच्छेनुसार नारायणराव खरे याना साबरमती आश्रमात संगीत विभागाचे प्रमुख म्हणून पाठविले. काँग्रेस अधिवेशनांच्या प्रसंगी पलुसकरांना गायन करण्याचा अग्रमान दिला जाई तो त्यांच्या पुरोगामी आचार धर्मामुळे. बी.आर. देवधरांचे स्कूल ऑफ इंडियन म्युझिक अनेक दशकांपासून विद्यादान करीत आहे. संगीताला लोकमान्यता प्राप्त व्हावी याकरिता संगीत शिक्षणांमध्ये आवश्यक गुण निर्माण करण्याकरिताही प्रयत्न केला.

लाहोराच्या गांधर्व महाविद्यालयास १९०१ ते १९०८ या काळात यश मिळाल्यावर पंडितजींनी महाविद्यालयाची शाखा मुंबईला १९०८ मध्ये स्थापन केली. त्यानंतर पुणे व नागपूरलाही स्वतंत्र शाखा काढल्या. त्या पाठीमागे उद्देश होता संगीत प्रसारात सुसूत्रता आणि स्थायी स्वरूप आणून देण्याचा. सन १९०८ पासून १९२४ पर्यंत गांधर्व महाविद्यालयाच्या मुंबई शाखेने मोठी प्रगती केली. तथापि पंडितजींच्या उतार वयात या संस्थेला आर्थिक अडचणी निर्माण झाल्यामुळे आपले कार्य चालू ठेवणे शक्य झाले नाही. अदमासे ६० वर्षांच्या हयातीमध्ये संगीत विषयक चळवळीला पंडितजींनी सुरुवात करून दिली, आणि यशही मिळविले. मात्र या अतिमहत्त्वाकांक्षी उपक्रमास कर्जबाजारीपणामुळे दुःस्थिती आल्याने सावकारांनी १९२४ मध्ये इमारतीचा लिलाव केला. महान यज्ञाचा असा अंत झाला. दिनांक २१ ऑगस्ट १९३१ रोजी मिरज येथे पंडितजींचे निधन झाले. अनेक अडचणीतही गांधर्व महाविद्यालय पुढे चालू ठेवण्याचे त्यांचे स्वप्न साकार झाले नसले, तरी त्यांनी आपल्या ध्येयानुसार कार्य करणाऱ्या संगीतकारांची, शिक्षकांची आणि महान गायक कलाकारांची मालिका तयार केली. त्यांचे शिष्य बी. आर. देवधर, सुपुत्र दत्तात्रय विष्णू पलुसकर, पंडित ओंकारनाथ ठाकूर, विनायकराव पटवर्धन, नारायणराव व शंकरराव व्यास बंधू इत्यादींनी विष्णू दिगंबरांचे कार्य पुढे चालू ठेवले. ओंकारनाथ ठाकूर व नारायणराव व्यास ही नावे एके काळी फार गाजली. पलुसकरांची आठवण रसिकांसमोर ताजी ठेवणारे त्यांचे तीन शिष्य होऊन गेले - ओंकारनाथ ठाकूर, विनायकराव पटवर्धन व नारायणराव व्यास. त्यांनी पलुसकरांची गायकी जतन करून ठेवली, वाढविली आणि प्रसारित केली. कलाकाराचे चारित्र्य कसे असावे याचा आदर्श या कलाकारांनी आपल्या शिष्यगणांपर्यंत पोहोचविला. व्यास संगीत विद्यालय म्हणजे या आदर्शाची साक्ष होय.

महाराष्ट्रातील रसिकांनी अभिजात हिंदुस्थानी संगीताचा केवळ स्वीकारच केला नाही, तर येथील अधिकाधिक कलाकारांनी ही कला आत्मसात केली, तिला नवीन दिशा दिली. अभिजात संगीत ऐकताना रसिकांच्या भाववृत्ती उचंबळून येतात, मनःचक्षुपुढे काही प्रतिमा साकार होतात, स्फूर्ती जागृत होतात, मनाला स्वास्थ्य लाभून एक निरामय आनंद निर्माण होतो. आणि संगीतानुभव हा रसिकांच्या दृष्टीने जीवनानुभव होऊ शकतो. तरी देखील मुघल व

मराठेशाहीच्या अंतानंतर संगीताला राजाश्रय न मिळाल्यामुळे काही काळ तरी या कलेचा ऱ्हास झाला होता. या काळात संगीताची जपणूक केली केवळ देवालये आणि गणिकांनी. त्यानंतरच्या काळात संगीताला राजाश्रय मिळाला तो संस्थानिकांकडून. याचा उल्लेख वर आलेलाच आहे. साधारणपणे १८७५ च्या सुमारास महाराष्ट्रातील रसिकांनी ख्याल गायकीचा स्वीकार केला. या संक्रमण काळात बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर आणि पंडित विष्णू दिगंबर पलुसकर या बुजुर्गांनी संगीत प्रचारासाठी महान कामगिरी करून दाखविली. त्याचाही वर उल्लेख केलेलाच आहे. इतके मात्र खरे की, या दोन्ही कलाकारांना यासाठी फार मोठे परिश्रम करावे लागले. संगीत कलेला रसिकाभिमुख आणि रसिकांना मर्मज्ञ करण्यासाठी त्यांना फार प्रयत्न करावे लागले. समाजाच्या विविध स्तरांमधील लोकांना कलेची अभिरुची असल्याखेरीज केवळ कलावंत घडवून चालणार नव्हते. शिक्षणामधील कष्टप्रद भाग कमी करावयाचा होता. कला विषयक गूढता दूर करावयाची होती. समाजजीवनात होणाऱ्या बदलांना अनुसरून शिक्षणक्रमाची आखणी करावयाची होती. संगीत हे लोकजीवनाचे महत्त्वाचे अंग बनवून या कलेबाबतची अभिरुची वाढवावयाची होती. जनतेमध्ये संगीतास प्रतिष्ठेचे स्थान मिळवावयाचे होते. यासाठी कलाकारांनी आपले चारित्र्य निर्मळ ठेवून संगीताचा आस्वाद देण्याची गरज होती.

कलाकाराला केवळ मराठीच नव्हे तर संस्कृत आणि हिंदी वाङ्मयाचीही तोंड ओळख असणे आवश्यक आहे, असे विष्णू दिगंबर पलुसकरांनी प्रतिपादन केले. कलावंताची व्यसनाधिनता, लहरीपणा आणि हातचे राखून विद्यादान करण्याची वृत्ती यामध्ये सुधारणा केली. आस्वादक आणि समाज यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला. संगीताला लोकमान्यता मिळविण्यासाठी पलुसकरांनी महात्मा गांधी, डॉ. ॲनी बेझंट, शंकराचार्य, डॉ. कुर्तकोटी, मुंबई इलाख्याचे गव्हर्नर लॉर्ड सिडनहॅम, लॉर्ड विलिंग्डन, लॉर्ड लॉइड जॉर्ज, बॅ. एम. आर. जयकर इत्यादी विशेष मान्यवरांचीही मदत मिळविली. तथापि पंडित पलुसकरांना संगीत शिक्षणाच्या कामी फार मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागले. याचे कारण होते उदार लोकाश्रयाचा अभाव. त्यांनी गांधर्व महाविद्यालयासाठी बांधलेली इमारत कर्जाच्या ओझ्यामुळे लिलावात निघाली. १९२४ मध्ये पंडितजींच्या गैरहजेरीत या इमारतीचा ताबा धनकोंनी घेऊन तिचा लिलाव करून टाकला. एका महान यज्ञाचा पैशाच्या अभावाने बळी घेतला. या आघातामुळे पंडितजींना आपले उर्वरित जीवन विरक्त अवस्थेत व्यतीत करावे लागले. म्हणूनच महाराष्ट्रातील पहिल्या दहा कर्तबगार व्यक्तींच्या मालिकेत विष्णू दिगंबर पलुसकरांचा इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांनी जो समावेश केला आहे, तो सर्व दृष्टींनी यथायोग्य ठरतो.

ग्वाल्हेर गायकीतून व्युत्पन्न झालेली आग्रा गानप्रणाली महाराष्ट्रातही प्रभाव पाडू लागली. आग्रा शैलीने धृपद गायकीच्या इतर अंगांपेक्षा त्यातील ताल व लयीवर भर दिला, निदान या अंगांचा पुरस्कार तरी केला. धृपद शैलीचा समृद्ध वारसा प्राप्त केलेल्या आग्रा कलाकारांनी आपल्या खयाल गान पद्धतीत धृपदाच्या या गुणविशेषांचा जितका अंगीकार केला, तितका इतर घराण्यांनी केला नाही. खरे तर अपवादात्मक असे गायन कसब, स्वरमिलाफाची रुंदी व आकारमान, आणि त्यातून व्यक्त होणारा आक्रमकपणा व परिणामाची तीव्रता हे आग्रा घराण्याचे योगदान होय. कीर्तिमंत खाँसाहेब नथ्थनखाँ हे तर महाराष्ट्रातील आग्रा गायकीचे आद्यप्रवर्तक होत. आपल्या निधनापर्यंत (१९०१) त्यांनी मुंबईत वास्तव्य केले. त्यांचे तेजस्वी सुपुत्र खाँसाहेब विलायत हुसेनखाँ यानाही मुंबई हे सुखद आश्रयस्थान (haven) वाटल्याने दिवंगत होईपर्यंत ते येथेच होते. मात्र आग्रा गानप्रणालीतील संकल्पना अधिक समृद्ध करण्यात खाँसाहेब फैयाझखाँ यानी स्वतंत्ररीत्या योगदान दिले. विशेष म्हणजे अष्टपैलू प्रतिभा (versatile genius), रुंद, जोमदार व निनादी (sonorous) आवाज या गुणविशेषांमुळे फैयाझखाँ महाराष्ट्रातील आस्वादकांचे काही काळ एक दैवत बनले होते. तथापि महाराष्ट्र आणि विशेषतः मुंबईतील आग्रा गायकीच्या लोकप्रियतेचे श्रेय केवळ फैयाझखाँ यांचे भव्य गायन, समृद्ध प्रतिध्वनिजनक आवाजातील जोमदारपणा आणि रंगछटा या गुणांनाच नव्हते. तर घराण्याच्या रसिकप्रियतेचे श्रेय विलायत हुसेनखाँ यांची कीर्ती आणि गायक व अध्यापक म्हणून त्यांनी संपादन केलेल्या सद्गुणांनाही देय आहे. लयकारी वरील त्यांच्या प्रभुत्वाची बरोबरी फार थोड्यांनी केली. खादिम हुसेनखान यांनी देखील सखोल ज्ञानसंपदेने वाहवा मिळविली. विलायत हुसेनखाँ यांचे शिष्य जगन्नाथबुवा पुरोहित तथा गुणीदास यांनी तर महाराष्ट्रातील अनेक उदयोन्मुख कलाकारांना ज्ञानदान केले.

ग्वाल्हेर व आग्रा घराण्याचे कलाकार महाराष्ट्रातील अभिजात संगीताचा स्वतंत्र रीतीने विकास करीत असताना या दोनही गानप्रणालींचा कलात्मक समन्वय भास्करबुवा बखले यांनी केला. आपल्या बावीस वर्षांच्या सांगीतिक कारकिर्दीत (१९००-१९२२) भास्करबुवा बखले यांनी महाराष्ट्रातीलच नव्हे तर अखिल भारतातील रसिकांना रिझविले. गरिबीच्या परिस्थितीमुळे लहान वयात भास्करबुवांना किर्लोस्कर नाटक कंपनीत प्रवेश घ्यावा लागला होता. कंपनीच्या नाटकांमध्ये त्यांनी स्त्री भूमिका करून यश संपादन केले होते. तथापि तारुण्यावस्थेत त्यांचा आवाज फाटल्यामुळे कंपनीने भास्करबुवांना काढून टाकले. अशा परिस्थितीत अभिजात संगीताची साधना करण्यासाठी त्यांना न्यायमूर्ती तेलंग यांनी मदत केली. घोर तपश्चर्या करून बखलेबुवांनी ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर या तिनही घराण्यांची गायकी अनुक्रमे फैझ महम्मदखाँ, नथ्थनखाँ आणि अलादियाखाँ यांचेकडून आत्मसात करून स्वतःची एक वेगळी पद्धती तयार केली. "He marked a transition from the linear to the subtle, complex and

highly evolved musical conception, which could be described as a curvilinear conception of music. Again he blended his style with the highly complex, involved and yet balanced *gayaki* of Aladiya Khan, and added beauty to is own..... While Ichalkaranjikar and Paluskar brought classical music to Maharashtra from outside, Bakhale took it to other parts of India." (इंग्रजी आवृत्तीवरून). त्यांच्या अभिजात गायकीची स्वतंत्र परंपरा निर्माण झाली नाही, हे खरे,. परंतु महाराष्ट्रातील रसिकांच्या मनावर त्यांचा प्रभाव अनेक वर्षे टिकून राहिला. शिवाय बखलेबुवांनी गुजरात, सिंध, पंजाब, काश्मिर व म्हैसूरमध्येही लौकिक मिळविला. नारायणराव राजहंस तथा बालगंधर्व, यशवंत ठाकूरदास आणि मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर या कलारत्नांना घडविले भास्करबुवा बखलेंनी.

भास्करबुवा बखले यांची महाराष्ट्राला लाभलेली अमोल देणगी म्हणजे नाट्य संगीत होय. गंधर्व संगीत मंडळीच्या (१९१३) नाटकांमधील पदांना रागदारीवर आधारित सुरेल चाली दिल्या भास्कररराव बखलेंनी. रंगभूमीचा त्याग केल्यावर त्यांनी अभिजात संगीत व नाट्य संगीत यांना निकट आणले आणि अभिजात संगीताला सर्वसाधारण समाजापर्यंत पोहचविले. एका बाजूने त्यांनी अभिजात संगीत सर्वसाधारण समाजापर्यंत पोहचविले, तर दुसऱ्या बाजूने नाट्य संगीताला अभिजाततेची पातळी प्राप्त करून दिली. मैफलींमध्ये नाटकातील रागदारीतील पदे गाऊन त्यांनी पदांना अभिजाततेची प्रतिष्ठा मिळवून दिली. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांच्या **विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी** वगैरे नाटकांमधील पदांना रागदारीतील चाली देऊन नाट्य संगीतात क्रांती तर घडवून आणलीच, पण शिवाय कलात्मकतेचा आविष्कार वाढविला व जुन्या सामान्य दर्जाच्या चाली कालबाह्य ठरविल्या. बखलेबुवांनी नााायणराव राजहंस तथा बालगंधर्व, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, गोविंदराव टेंबे, जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांचेसारखे रंगभूमी गाजविणारे गायक नट निर्माण केले. आकर्षक बांधणी, सुगम रागदारी व सौंदर्याविष्कार यामुळे भास्करबुवा बखले यांनी निर्माण केलेली नाट्य संगीताची परंपरा अदमासे ५० वर्षे सतत टिकून राहिली.

महाराष्ट्रातील अभिजात संगीताच्या इतिहासात पं. रामकृष्ण नरहर वझे (१८७१-१९४५) यानाही मानाचे स्थान आहे. ग्वाल्हेर घराण्याचे महान गायक उस्ताद निसार हुसेन खान यांच्यासकट एकूण १७ गुरूंकडून गान विद्या प्राप्त केलेला हा कलाकार अष्टपैलू प्रतिभेचा होता, प्रकांड पंडित होता. ख्याल गायनाव्यतिरिक्त ते धृपद, ठुमरी, दादरा आणि टप्पा गायन वजनदारपणे सादर करीत. रामकृष्णबुवांच्या शिष्यगणांत केशवराव भोसले, हरीभाऊ जोशींचा समावेश करण्यात येतो. वझेबुवांनी महाराष्ट्रातील संगीत विश्वाला दिलेले एक महत्त्वाचे योगदान म्हणजे 'ललितकलादर्श' (१९०८) आणि 'बळवंत संगीत मंडळीच्या' (१९१८) नाटकांमधील पदांना त्यांनी दिलेल्या चाली. त्यांच्या चाली आजवर महाराष्ट्रीय रसिकांच्या मनात घर करून आहेत.

महाराष्ट्रात ग्वाल्हेर व आग्रा गायकी पूर्णपणे प्रस्थापित झाल्यावर हिंदुस्थानी संगीताचा श्रवणानुभव समृद्ध करणारी जयपूर घराना गायकी एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात महाराष्ट्रात अवतरली. या घराण्यात संगीताची परंपरा चारशे वर्षांपेक्षाही अधिक जुनी असून मुघल काळात अनेक थोर गायक निर्माण झाले. मुघलांच्या अंतानंतर देखील बऱ्यास अधिपतींच्या राजवटीत बरेच गायक उदयास आले. या घराण्याचा मूळपुरुष हिंदू ब्राह्मण असून त्याच्या गायकीचा पुरस्कार करणारे कलावंत मथुरा, वृंदावन, डांकोर, खुर्जा, अत्रौली, सिकंदरपूर या परिसरातील होते. घराण्याच्या पुढील पिढींमध्ये विद्याभ्यास शुद्धाचार, प्रतिष्ठितपणा, सभ्य शालीनता यांची जपणूक करण्यात येई. असेच संस्कार अलादियाखाँ यांच्या मनावर बिंबले असावेत. कारण त्यांच्या वर्तणुकीत घराण्याचा अभिमान, पूर्वजांबद्दलची श्रद्धाभक्ती, धर्मपरायणता, मूळच्या ब्राह्मण्याची जपणूक आणि परंपरेवर निष्ठा हे गुण व्यक्त होत असत. खाँसाहेबांचे वडील अत्रौली सोडून जयपूरजवळ उनियारामध्ये आल्यावर येथेच १० ऑगस्ट १८५५ रोजी अलादियाखाँचा जन्म झाला. या घराण्याच्या मूळस्थानावरून त्यांच्या गायकीस अत्रौली तथा जयपूर गायकी असे नाव पडले. या घराण्यात धृपद धमार गायक होऊन गेलेले असून, त्यांतील गायक अनवट, अप्रचलित व मिश्र राग गाऊन दमदार व ढंगदार चिजा पेश करीत असत. अलादियाखाँ याना वडिलांचें चुलत भाऊ जहांगीरखाँ यांचेकडून तालीम लाभली, आणि ते घरंदाज ख्याल गायकीचे खंदे पुरस्कर्ते होऊन गेले. या घराण्याची डौलदार गायकी घेऊन हैदरखाँ यांच्यासमवेत अलादियाखाँ १८९३ मध्ये मुंबईत आले. ते महाराष्ट्रात येण्यापूर्वी पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, पं. विष्णू दिगंबर पलुसकर आणि रहिमतखाँ अशा नामवंत गायकांनी मराठी रसिकांना हिंदुस्थानी संगीताची गोडी लावलेली होती. या बुजुर्गांचा मराठी रसिकांवर पगडा होता. तथापि अलादियाखाँ आल्यापासून अगदी वेगळ्या ढंगाचे व रंगाचे संगीत रसिकांना ऐकावयास मिळाले. "The highly evolved and subtle form of the jaipur *gayaki* was further sophisticated into a newer form, richer in an aesthetic content than its parent form by Ustad Aladiya Khan. He reoriented the form through the inspiration, which he drew from Mubarak Ali of the Gwalior gharana. The merit of Aladiya Khan's *gayaki* lay not merely in its happy synthesis of the

variously developed strands, but in its keen sense of design and structure. He decorated the design and superstructure through a novel mode of *tal–avartan* and a modulation of *swara* and *laya*. Indeed Aladiya Khan's *gayaki* embellished the aesthetic contents of music, which was a new experience to connoisseurs. Ustad Aladiya's music was not for the ordinary listeners, it was indeed for the knowledgeable connoisseurs with a keen sense of aesthetics. When all is said and done, the Ustad pioneered a new era of a highly aesthetical *gayaki*, which perfected a harmony between *swara* and *laya*. The most impressive part of the form was its *tan–phirat* of unusual length, assiduously planned with the exquisitely conceived patterns to follow one another every few seconds, and to terminate with an unexpected twist before the sama i.e end of each time cycle". (इंग्रजी आवृत्तीवरून) त्यांनी सौंदर्यवादी आणि स्वर व लयीचा समन्वय साधणारी गायकी सादर करून नवीन पर्व निर्माण केले. स्वतःच्या डौलदार, भारदस्त व लालित्यपूर्ण शैलीने मूळच्या जयपूर गायकीस नवे वळण दिले, तिच्यात नवी रंगत भरली.[२४]

अशा या कलाकारास १८९५-९६ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूरचे दरबार गायक म्हणून आणले व त्यांचा सर्वतोपरी मानमरातब केला. वस्तुतः आपली गायकी रसिकांच्या मनात प्रस्थापित होण्यासाठी उस्ताद अलादियाखाँ याना पुष्कळ प्रतीक्षा करावी लागली. मात्र कोल्हापूरमध्ये आल्यावर त्यांच्या चाहत्यांचा एक वर्ग निर्माण झला. त्यांच्या गायनामुळे श्रोत्यांच्या संगीत ऐकण्याच्या दृष्टिकोनातूनही बदल होऊ लागला. संगीताचे श्रवण म्हणजे केवळ काही तासांचा विरंगुळा नसून तो एक गाढ अनुभव आहे, अशी श्रोत्यांची मनोभूमिका निर्माण होऊ लागली. यामुळे भास्करबुवा बखले त्यांना आदराने "अवघडदास" म्हणत, तर रामकृष्णबुवा वझे (त्यांचे शिष्यत्व न पत्करता देखील) अलादियाखाँ याना गुरुस्थानी मानत.[२५]

कोल्हापूरच्या वास्तव्यात त्यांनी मुख्यत्वे तानीबाई घोरपडे याना तालीम दिली. अलादियांच्या गायकीचा संप्रदाय टिकून ठेवण्याचे आणि वृध्दिंगत करण्याचे श्रेय ज्या केसरबाई केरकर आणि मोगूबाई कुर्डीकर यांच्याकडे विशेषत्वाने जाते त्या दोघींना अलादियाखाँ यांनी गाणे शिकविले. कोल्हापूरनंतरच मुंबईतील वास्तव्यात प्रथम केसरबाई व नंतर मोगूबाई आणि त्यांच्यानंतर मम्मूशेठ पास्ता, गुलाबभाई जसदनवाला, गोविंदबुवा शाळिग्राम, अझमत हुसेन हे त्यांचे शिष्य बनले. सारंगी वादक अब्दुल मजीदखाँ यांनीही खाँसाहेबांची गायकी सारंगीतून अभिव्यक्त केली. त्यांचे बंधू हैदरखाँ, सुपुत्र मंजीखाँ व भूर्जीखाँ आणि पुतणे नथ्थनखाँ या त्यांच्या परिवारातील कलाकारांनी अलादियाखाँच्या गायकीचे शिक्षण इतरांना देण्यासाठी खूप परिश्रम घेतले. परिवारातील या चारही गुरूंचे अकाली निधन झाल्यामुळे हिंदुस्थानी संगीताची अपरिमित हानी झाली. अलादियाखाँ यांची खास गायकी गाणाऱ्यांमध्ये केसरबाई केरकर, मोगूबाई कुर्डीकर, हैदरखाँ, मंजीखाँ आणि लीलाबाई शिरगावकर यांचा समावेश करण्यात येतो. यातील लीलाबाई या तर सर रामकृष्ण गोपाळ भांडारकरांच्या नात्यातील आहेत. मंजीखाँ आणि भूर्जीखाँ यांच्याकडे जातीने तालीम घेऊन आशयसंपन्न गायन करणाऱ्या कलाकारांपैकी मल्लिकार्जुन मन्सूर यांनी विशेषतापूर्ण ठसा उमटवून ठेवला आहे. या शिवाय निवृत्तीबुवा सरनाईक, वामनराव सडोलीकर आणि मोगूबाईंची सुकन्या किशोरी आमोणकर यांसारख्या कलावंतांनी बरेच नाव मिळविले. शिवाय कुलकर्णी, जमदग्नी, चौगुले, टेंबे यांनीही ही गायकी आत्मसात केली.[२६]

शाहू महाराजांचे १९२२ मध्ये निधन झाल्यावर अलादियाखाँ यांनी कोल्हापूर सोडून मुंबईत वास्तव्य केले, आणि वयाच्या ९१ व्या वर्षी १९४६ मध्ये ते निधन पावले. राजाश्रय संपुष्टात आल्यानंतर मुंबईत त्यांचे शिष्य आणि चाहते यांनी खाँसाहेबांना मानाने आणि आदराने सांभाळले. याचा अर्थ असा की, कला व कलाकारांना राजाश्रय नसला तरी रसिकांकडून आश्रय मिळण्याचा जमाना आलेला होता. मुंबई हे शहर कलाकारांना एक मोठे आशास्थान वाटू लागले व परप्रांतीय कलाकार मुंबईला वास्तव्यासाठी येऊ लागले. येथे राजाश्रय नव्हता, मात्र विपुल रसिकाश्रय होता.

अलादियाखाँ यांच्या पट्टशिष्या केसरबाई केरकर आणि मोगूबाई कुर्डीकर यांनी संगीत क्षेत्रातील आपल्या तपश्चर्येने हिंदुस्थानी संगीताची शान वाढविली. या दोन्हीही गायिका मूळच्या गोव्याच्या असल्या, तरी महाराष्ट्र हीच त्यांनी आपली कर्मभूमी निवडली. प्रारंभीच्या काळात केसरबाईंनी रामकृष्णबुवा वझे, असामान्य सितार वादक बर्कतउल्लाखाँ, अब्दुल करीमखाँ आणि भास्करबुवा बखलेंकडे शिक्षण घेतल्यानंतर बड्या बड्यांच्या मध्यस्थीने त्यांना अलादियाखाँ यांचे शिष्यत्व लाभले. संगीतनिष्ठा, गुरुनिष्ठा, अथक मेहनत आणि सवंग लोकप्रियतेची नावड इत्यादी अटींचे पालन करण्याच्या आश्वासनानंतर केसरबाईंना अलादियाखाँचे विधिवत शिष्यत्व प्राप्त झाले. गुरुशिष्य परंपरेचे १५ वर्षे शिस्तपालन करून व अपार श्रम करून त्यांनी मोठेपण मिळविले. प्रदीर्घ ज्ञानयज्ञातून बाहेर आल्यानंतर त्याना अखिल

भारतीय कीर्ती लाभली. म्हणूनच एप्रिल १९३८ मध्ये कलाप्रेमी रवींद्रनाथ टागोरांनी विश्वभारती या संस्थेतर्फे केसरबाईंना "सुरश्री" (स्वरश्री) हा किताब बहाल केला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्याना तसेच मोगूबाईंना संगीत अकादमी पुरस्कार तसेच पद्मभूषण पुरस्कार प्राप्त झाले. खानदानी अभिमानाची जपणूक करून केसरबाईंनी दोन पिढ्यांपुढे आपली कला सादर केली. मात्र लोकप्रियतेच्या नादी कधीच लागल्या नाहीत. अलादियाखाँची कला पूर्णतः त्यांच्यामार्फत व्यक्त झाली, आणि तिच्यात त्यांनी स्वतःची भर घातली.[२७]

केसरबाईंची गुरुभगीनी मोगूबाई तथा मोगाबाई यानाही अतिशय क्लेश सहन केल्यावर अलादियाखाँचे बंधू हैदरखाँ यांची तालीम मिळू लागली. हे हैदरखाँ देखील फार मोठे कलाकार असून, त्यांनी तालीम दिलेल्या लक्ष्मीबाई जाधव बडोद्याच्या राजगायिका झाल्या. मोगूबाईंचे गानकौशल्य पाहून त्याना स्वतः अलादियाखाँनी २६ वर्षे तालीम दिली. लवकरच संस्थानिकांतील गुणग्राहकता गेली, नंतर संस्थानिकही गेले व आकाशवाणी आली. मात्र आकाशवाणीने कलेची गुणग्राहकता दाखविली असे झाले नाही. याचा प्रत्यय आल्याचे मोगूबाईंनी रघुनाथ कृष्ण फडके याना लिहिलेल्या २० डिसेंबर १९४८ च्या पत्रात नमूद करून ठेवले आहे. त्यांनी असेही म्हटले आहे की, राजाश्रय संपला तरी सर्वसामान्य लोकांची अभिरुची निश्चितपणे वाढलेली आहे. सांस्कृतिक इतिहासाच्या दृष्टीने हे अर्थपूर्ण होय. मोगूबाई आज हयात असूनही दुर्दैवाने त्यांच्या ध्वनिमुद्रिका उपलब्ध नाहीत. मात्र सुपुत्री किशोरी आमोणकर यांच्या रूपाने त्यांनी संगीत रसिकांना एक किंमती भेट सादर केलेली आहे.

कलाप्रेमी शाहू महाराज कलाकारांना मोठे आश्रयस्थान वाटे. दरबार गायकांव्यतिरिक्त शाहू महाराजांनी अनेक कलाकाराची कदर केली. अंजनीबाई मालपेकर या महान गायिकेचा त्यांत समावेश होता. अत्युत्कृष्ट गायकीमुळे अंजनीबाई मालपेकरांनी विद्यमान शतकाच्या प्रारंभ काळातील रसिकवृंदाला मोहित केले होते. अंजनीबाई या केसरबाई-मोगूबाई यांच्यापेक्षा कुठल्याही बाबतीत कमी नव्हत्या. किंबहुना लालित्याच्या बाबतीत अंजनीबाई अधिक उजव्या. अंजनीबाईंच्या गानकौशल्यावर जसे शाहू राजे खूश होते, तसे अखिल भारतातील रसिक देखील. त्यांचे वास्तव्य बहुतांशी मुंबईलाच पं. पलुसकर चौकावरील साध्या इमारतीत होते. शाहूंच्या दरबारातील आणखी एक रत्न म्हणजे सारंगी वादक हैदरबक्ष. सारंगी वादन करणारे हैदरबक्ष म्हैसूरच्या ख्यातनाम गायिका गुलाबबाई याना साथ करण्यासाठी १९१० मध्ये कोल्हापूरला आले असता त्यांच्या सारंगीवर खूश होऊन महाराजांनी हैदरबक्ष साहेबांना आपल्याकडेच ठेवून घेतले. अतुलनीय हार्मोनियम वादक, गायक व नट गोविंदराव टेंबे हे कोल्हापुरातील आणखी एक रत्न होते. भारतातील हार्मोनियम वादनात गोविंदरावांनी मौलिक भर घातली. त्यांच्यावर शाहू राजेंची फार कृपादृष्टी होती. कोल्हापूरचे सुप्रसिद्ध गायक गोविंदबुवा शाळिग्राम याना अलादियाखाँ यांच्याकडून तालीम मिळाली. हैदरखाँ यांनी लक्ष्मीबाई जाधव यांना दीर्घकाळ तालीम दिली. त्या मोठ्या गायिका बनून बडोदा संस्थानच्या दरबार गायिकेचा मान त्यांनी मिळविला. लक्ष्मीबाई जाधव आणि केसरबाई यांची तालीम घेतलेल्या धोंडुताई कुलकर्णी आजही जयपूर गायकी अधिकारवाणीने सादर करीत आहेत. महाराष्ट्राला अभिमान वाटायला हवा की, अलादियाखाँ यांच्या घराण्याने कोल्हापुरात विस्तृत शिष्यपरंपरा निर्माण केली. निवृत्तीबुवा सरनाईक, जगन्नाथबुवा पुरोहित, अझमबाई, सरदारबाई कारदगेकर, वामनबुवा पाध्ये, तानीबाई घोरपडे, सकवारबाई, बाळाबाई बांदोडकर, मेनकाबाई शिरोडकर, गजाननबुवा जोशी, तबलानवाज कामता प्रसाद, पखवाजपटू साधलेबुवा, गायिका साहेबजान व सोपीजान इत्यादी कलावंत कोल्हापूरमध्ये काही काळ कलाविष्कार करून राहिले होते. वामनबुवा पाध्येंनी १९२२ मध्ये गांधर्व महाविद्यालयाची कोल्हापूर शाखा स्थापन करून विष्णू दिगंबर पलुसकर यांचे कार्य आपल्या हयातभर केले. कोल्हापुरातील गांधर्व महाविद्यालया व्यतिरिक्त करवीर गायन समाज (१८८३) आणि देवल क्लब (१८९३) या संस्थांनी देखील संगीत क्षेत्रात बरेच कार्य केले.[२८]

राजाश्रयाबरोबर रसिकांचा आश्रय वाढविण्यासाठी आणि रसिकता वृद्धिगंत करण्यासाठी म्युझिक सर्कल ही संस्था मागील शतकाच्या अखेरच्या १६-१७ वर्षापासून उदयास आली. जुन्या ट्रिनिटी क्लबच्या धर्तीवर स्थापन झालेले बॉम्बे म्युझिक सर्कल आणि गंधर्व म्युझिक सर्कल मुंबईमध्ये अस्तित्वात आले. गांधर्व महाविद्यालयाच्या शाखा मोठ्या शहरांमध्ये उदयास आल्या. नागपूरला ७ सप्टेंबर १९१३ रोजी या महाविद्यालयाची शाखा स्थापन झाल्यावर कोल्हापूरला १९२२ मध्ये आणखी एक शाखा अस्तित्वात आली. १९३० नंतर म्युझिक सर्कल स्वरूपाच्या संस्थांची वाढ होऊ लागली. पुणे गायन समाज (१८७५) भास्करबुवा बखलेंच्या गायन समाजात विलीन झाल्यावर त्याचे कार्य बरेच वाढले. मात्र विद्यमान शतकाच्या प्रारंभीच्या काळातील संगीत शिक्षण व प्रसार या बाबी महत्त्वाच्या असल्या कारणाने त्यांचा अधिक सखोल इतिहास लिहिणे आवश्यक होय.

विष्णू दिगंबर पलुसकर व अब्दुल करीमखाँ याएकाच वर्षी जन्मलेल्या थोर कलाकारांनी संगीत शिक्षणाच्याकामी जे महान कार्य केले त्यास तोड नव्हती. मिरजेच्या ब्राह्मणाने रावी नदीच्या काठी लाहोर येथे ५ मे १९०१ रोजी गांधर्व महाविद्यालय स्थापन केल्याचा उल्लेख वर आलेला आहे. लाहोरच्या महाविद्यालयानंतर अल्पावधीत यमुना काठावरील कैरानाच्या (किराणा) पठाणाने घटप्रभा नदीकाठी बेळगावला संगीत विद्यालय सुरू केले (मे १९१०). दोन्हीही विद्यालये

गुरुकुल पद्धतीची, शिष्याला पुत्रवत मानणारी, दोघांनीही लयनीती तयार केली, लिपिबद्ध पुस्तके प्रकाशित केली. दोघांचेही निकटवर्ती व चाहते राजेरजवाडे नव्हते, तर सुशिक्षित समाजधुरीण होते. दोघेही लोकाभिमुख राहिले. तिकिटे लावून दोघांनीही उघडे जलसे एकदम सुरू केले. दोघेही नामजपवादी, अत्यंत धार्मिक, दोघांनीही ईश्वर प्रार्थना करीतच प्राण सोडला.[२९]

अब्दुल करीमखाँ यांच्या संगीतातील योगदानाबाबत अधिक माहिती नंतर दिलेली आहे. मात्र त्यांच्या संगीत शिक्षण प्रसाराचा येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. त्यांनी १० मे १९१० रोजी बेळगावला आर्य संगीत विद्यालय सुरू केले व १९१२ मध्ये ते पुण्यास नेले. आपले शिष्य बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी याना दोन वर्षानंतर म्हणजे ऑक्टो. १९१४ मध्ये बेळगावला सरस्वती संगीत विद्यालय काढण्याची अनुज्ञा दिली. पुढे १९२० मध्ये बाळकृष्णबुवांनी या विद्यालयाचे मुंबईला स्थलांतर केले. एप्रिल १९१८ मध्ये अब्दुल करीमखाँ यांनी उज्वल भवितव्याच्या ध्येयाने आर्य संगीत विद्यालयाचे मुंबईलाच स्थलांतर केले. आजवर सरस्वती विद्यालय मुंबईत व आर्य संगीत विद्यालय पुण्यात कार्यरत आहेत. या काळापासून संगीताची चिकित्सा वाढली. रागदारी संगीताला महाराष्ट्रात अपूर्व प्रतिष्ठा प्राप्त झाली. मुंबई शहर गायक व वादकांचे निवासस्थान बनले. त्याखालोखाल पुणे, नागपूर, कोल्हापूर व अमरावती येथे प्रतिष्ठा व पैसा मिळू लागला. लोकमान्य टिळक, दादासाहेब खापर्डे, बॅ. मुकुंद रामचंद्र जयकर, डॉ. गोपाळराव देशमुख, अवंतिकाबाई गोखले, भुलाभाई देसाई, जमनादास मेहता, तेलंग यांसारख्या मान्यवर पुढाऱ्यांनी अभिजात संगीत कलाकारांचा यथोचित गौरव केला. १९३७ मध्ये बॅ. जयकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईला भारतीय संगीत समिती स्थापन झाली. विष्णू दिगंबरांचे शिष्य आणि अव्वल "त्या" जमान्यातले बा. र. देवधर यांनी मुंबईला चालू केलेले देवधर स्कूल ऑफ इंडियन म्युझिक ही संस्था मागील ७० वर्षांपासून आजपर्यंत सर्व हिंदुस्थानात प्रसिद्ध आहे. या विद्यालयात गायन-वादनाचे शिक्षण घेणे ही अभिमानास्पद गोष्ट मानली जाते. अजुनही इतके सातत्याने चालविलेले आणि मोठे संगीत विद्यालय मुंबईत दुसरे नाही. हे विद्यालय म्हणजे विष्णू दिगंबरांच्या गांधर्व महाविद्यालयाची आधुनिक आवृत्ती होय. संगीताला रसिकांबरोबर लोकमान्य पुढाऱ्यांनीही उचित दाद दिल्याचे पहिले उदाहरण म्हणजे लोकमान्य टिळकांनी नारायण श्रीपाद राजहंस या कोवळ्या गायकास बहाल केलेला "बालगंधर्व" हा पुरस्कार होय (१८९८). त्यानंतरच्या काळात अनेक मान्यवरांनी अनेक कलाकारांना अशा प्रकरचे किताब बहाल केलेत. रवींद्रनाथ टागोरांनी केसरबाईंना बहाल केलेला सुरश्री हा किताब याच प्रवर्गातील होय. भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने देखील कलाकारांना पुरस्कार बहाल करून कलेबद्दलची रसिकता व आस्था दाखविली आहे.

महाराष्ट्रात ग्वाल्हेर व आग्रा घराण्यांची गायनप्रणाली प्रस्थापित झालेली असताना जयपूर गानप्रणाली आली, आणि या पाठोपाठ किराना घराणे आले. किराना घराण्याचे अध्वर्य खाँसाहेब अब्दुल करीमखाँ होत. ते पटवर्धनांच्या मिरजमध्ये १८९८ मध्ये आल्यावर महाराष्ट्राला एका वेगळ्या सुरेल गायकीचा आस्वाद मिळू लागला. अलादियाखाँ यांचे प्रतिस्पर्धी आणि त्यांच्यापेक्षा तसूभरही कमी नसलेले खाँसाहेब अब्दूल करीमखाँ हे कोल्हापूरचे सरदार बाळासाहेब गायकवाड यांच्याकडे काही काळ राहिले. शाहू राजांनी देखील त्यांचा यथोचित मानसन्मान केला. खरे तर केसरबाई केरकर यांनी प्रारंभीचे संगीत शिक्षण करीमखाँ साहेबांकडूनच घेतले. विश्वनाथ जाधव हे करीमखाँ यांचे एक शिष्य बनले. त्यांनी कोल्हापूरमध्ये शारदा संगीत विद्यालयाची स्थापना करून किराना घराण्याच्या गायकीचा प्रसार केला. कालांतराने करीमखाँ मिरज संस्थांच्या पटवर्धनांचे आवडते तरीही स्वतंत्र गायक म्हणून रसिकप्रिय झाले.[३०] संस्थानिकांची कृपादृष्टी असूनही ते लोकाभिमुख राहिले. समाजातील मान्यवर व सुशिक्षित लोक त्यांचे चाहते बनले. महाराष्ट्राप्रमाणेच कर्नाटक, म्हैसूर, हैदराबाद व मद्रास प्रांतांमध्ये त्यांचा मोठा चाहता वर्ग होता.

"It is all too easy for musicians to die from a surfeit of reputation. There comes a point, after a generation or more of reverence, when half the population would not listen to a classical musician on the assumption that the classics are boring. Then there are the arch–enemies of classical music. Nevertheless Ustad Aladiya Khan and Ustad Karim Khan both hold their place in our culture, not because so many listened to them, but because everyone thinks that he ought to have listened their music. It is perfectly true to say that very few before could match them, and none since has any merit that does not incorporte their technical and a aesthetic discoveries. There are indeed few musicians in the repertory of Indian music better able to survive on their own merits. Aladiya Khan and Karim Khan are amongst these few. Both emulated each other, tried to excel one over the other, but both were equals in virtuousity." (इंग्रजी आवृत्तीवरून). अब्दुल करीमखाँ (जन्म ११ नोव्हेंबर १८७२) किराना

घराण्याचे प्रवर्तक असून पानिपत परिसरातील किराना (कुरुक्षेत्र) या त्यांच्या मूळ गावावरून या गायकीला "किराना गायकी" असे नाव प्राप्त झाले. बडोदा संस्थानात दोन-तीन वर्ष दरबार गायक राहिल्यानंतर ते मिरज येथे १८९८ च्या सुमारास आले. त्या वेळेला बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर, विष्णू दिगंबर पलुसकर हे मिरज संस्थानचे दरबार गायक असून तेथे आपल्या शिष्यांसह राहत होते. विशेष म्हणजे मिरजपासून केवळ ४८ कि. मी. वर असलेल्या कोल्हापुरात अलादियाखाँ विराजमान झालेले होते. याचा अर्थ असा की, या ४८ कि. मी. च्या परिसरात चार बुजुर्ग कलाकार वास्तव्य करीत असून, तीन प्रकारच्या विभिन्न हिंदुस्थानी गानप्रणालींचा उत्तम आविष्कार करीत होते. हा परिसर अभिजात संगीताच्या गुंजनाने पुलकित झालेला होता.

Indeed Karim Khan's *gayaki* disregarded the established conventions of aesthetic design and structure, the *laya* element and rhythmic complexity of Agra, and the mode of *tan–phirat* of Aladiya Khan. He accentuated and embellished the *swara* by making it pointed, a style essentially his own. Karim Khan was an innovator in so far as the chastity, softness and accuracy of *swara* intonation was concerned. He cultivated the *swara* intonation as a prized possession and the essence of his *gayaki*. In doing so, he accorded a subordinate position to the *laya* element and *tan–phirat.* It seems that he had pledged himself to unfold the inner beauty of the *swara* element in the true sense. The revered Ustad and his disciples unsderrated many musical elements, except the purity and accuracy of *swara*, and carried it to such an extreme stage that it became the very essence of their musicial art. They proudly argued that, if one misses the *swara* he misses the head; but if one misses the *tala* he misses only an hair. The Kirana tone is so delicate and tender that it resembles a soft silken thread and possesses a sharp point. The purity of *swara* and its subtle shades crerate a deep emotionalism and impulsiveness.The listeners were bewitched by the magical charm and paragoric voice and *swara* of Karim Khan to such an extent that they became oblivious to the principle of aesthetic form. Of course critics did level a charge against his style that it lacked imaginative design and rhythmic complexity. Nevertheless even his lop–sided *gayaki* became phenomenally popular with listeners. He not merely gathered around him a large band of followers, but in the course of time he attained the dignity of a creator of a distinctly great ideology. This was not acknowledged by many in the Ustad's own lifetime. Never a modest man , he knew exactly what he was doing. He knew too that he was pioneering a novel musical form, and he was not reticent about the difficulties he faced. He would have been forgotten by all except scholars, had it not been for the beauty and harmony of his creation and perception.

The open secret about the purity and penetrating character of Ustad Karin Khan's *swara* was that it bore an impress of the *swara* of the string instrument *Been*. The *swra* and *jhankar* (the sund produced by strumming of the string of this musical instrument) are accurate but elastic, and they have a longer range than the vocal tunes of a singer. Karim Khan was himself an excellent *Been* reciter, and hence, his mode of vocal recital was steeped in the hue of the *swara* and *jhankar* of the *Been*.

अब्दुल करीमखाँ यांच्या आवाजात अतुलनीय गोडवा व माधुर्य होते. गाताना आवाज लावण्याची त्यांची रीतीही "खास त्यांचीच" होती. छातीच्या पटलापासून (diaphragm) वर दाब देत देत ते कंठातून आवाजाची फेक (throw) करीत. आणि ती फेकही विलक्षण गोंडस व कलापूर्ण असे. स्वरविलासातून रागविलास, आणि त्यातून रंजक भावोत्पत्ती करण्याकडे त्यांचा कटाक्ष होता. म्हणून या रीतीला पोषक ठरणारे राग सादर करण्यावर त्यांचा भर होता. असंख्य राग व चिजांचा त्यांच्याजवळ संग्रह होता. तथापि आपल्या रीतीला पोषक असे कल्याण, पूरिया, यमन,

बिहाग, दरबारी कानडा, जोगिया, आसावरी, भैरव, रामकली, भूप, देशकार, तोडी, बिलासखानी तोडी, मुलतानी, शंकरा, गारा, बिहागडा, सरपरदा, खमाज, मालकंस, अभोगी कानडा,गुजरी तोडी, बिहाग, मारबा, तिलंग, चंद्रकंस, बसंत हे राग गाण्यावर त्यांचा अधिक भर होता.[३१] या रागांमधील काही उपलब्ध असलेल्या त्यांच्या ध्वनिमुद्रिका वार्धक्यातील असल्या तरी खाँसाहेबांच्या थोरवीची साक्ष पटवितात. उपरोक्त पैकी बहुसंख्य राग खाँसाहेबांच्या नंतर दुसऱ्या कोणाही गायकाने किंवा गायिकेने तितके उत्तम म्हटले नाही, असे मानणारे काही जाणकार रसिक प्रस्तुत लेखकास भेटले. "सरगम" करण्याचे त्यांचे कसब अजोड होते, असे म्हणताना हेही मान्य करायला हवे की, किराना घराण्याची शिकवणच मूळी सरगमने होई.

कंठ संगीतावर प्रभुत्व मिळविताना खाँसाहेबांनी तंबोरा, बीन, तबला व पखवाज यांसारख्या वाद्यांची मापे, बनावट, कारागिरी व बनविण्याच्या साहित्याचाही सूक्ष्म अभ्यास केला. पारंपरिक बनावटीमध्ये सुधारणा करण्यास्तव त्यांनी मिरजेचे वाद्ये बनविणारे फरिदसाहेब, अब्दुल करीम वगैरे कारागिरांना सूचना दिल्या.

मिरजेच्या संगीत वाद्ये निर्मितीच्या हस्तकलेचाही येथे उल्लेख करणे आवश्यक आहे. भारतात अगदीच थोड्या ठिकाणी वाद्यांची निर्मिती होते, आणि सर्व प्रकारची वाद्ये तयार करण्याची ठिकाणे तर त्याहीपेक्षा कमी आहेत. मिरजेला मात्र अदमासे सहा पिढ्यांपासून वाद्य निर्मितीची अखंड परंपरा चालू आहे. फरिजसाहेब नामक कलाकाराने हा व्यवसाय येथे सुरू केल्यावर त्यात बरीच वाढ झाली. मिरजेची अदमासे १०० कुटुंबे वंशपरंपरेने वाद्ये तयार करण्यात गुंतलेली असून ५०० कारागिर या व्यवसायावर अवलंबून आहेत. अदमासे २२ घटक या व्यवसायात आहेत. करीमखाँ साहेबांकडून येथील कारागिरांना उत्तेजन मिळाल्याचे जाणकार लोक सांगतात. येथील कारागिरांनी सहकारी संस्था स्थापन केल्याचेही प्रस्तुत लेखकाने मिरजेला १९६६ मध्ये केलेल्या समक्ष सर्वेक्षणात आढळले होते. येथे तयार झालेली सितार, तानपुरा, सारंगी, दिलरुबा, वीणा, हार्मोनियम, इत्यादी वाद्यांना देशातच नव्हे तर विदेशातही चांगली मागणी आहे.[३२]

करीमखाँ साहेबांनी आपल्या विलक्षण सुरेल व स्वरप्रधान गायकीने महाराष्ट्रातील रसिकांना अक्षरशः मोहित केले. रसिकांव्यतिरिक्त संगीताची जाण नसलेल्या श्रोत्यांमध्ये देखील स्वरांबद्दलचे आकर्षण निर्माण केले. कृष्णाजीराव देवल आणि न्यायमूर्ती इ. क्लेमन्टस यांच्या संगीतामधील श्रुति-संशोधनाच्या कामाला करीमखाँ साहेबांनी गायनाच्या प्रात्यक्षिकांद्वारे मदत केली. तथापि करीमखाँ यांनी हिंदुस्थानी संगीताला जे सर्वात महत्त्वाचे योगदान दिले, ते म्हणजे भारतभर ज्यांचा उत्तम गायक म्हणून लौकिक पसरला अशा कलाकारांची मोठी अखंड परंपरा त्यांनी निर्माण केली. या परंपरेतील सातत्य गेली सुमारे एक शतक टिकून राहिले, हे किराना गायकीचे आणखी एक वैशिष्ट आहे. शिष्य परंपरा सुव्यवस्थित करण्याकरिता त्यांनी शिष्यांना काही सुविधा दिल्या, आपल्या गायकीवर इतर गायकींचा संकर होऊ नये यासाठी कडक शिस्त लावून दिली आणि ठराविक रागांची कसून मेहनत करून घेतली.

हातात दर्भ व समिधा घेऊन अभ्यास करण्यासारखे कितीतरी अब्दुल करीमखाँमध्ये आहे ! त्यांनी तयार केलेला श्रुतिसिद्धान्त म्हणजे एक महत्कार्य होय. या सिद्धान्ताचे महत्त्व साऱ्या संगीत विश्वात असाधारण आहे. त्यांच्या सिद्धान्ताचा अभ्यास केल्यावर मान्य करावेच लागेल की, जगात हे कुणीही केलेले नाही.[३३] त्यांच्या "खलिफा" म्हणजे उत्तराधिकारी बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांनी खाँसाहेबांच्या श्रुति सिद्धांतावर आधारित **श्रुतिदर्शन** हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाने संगीताच्या ज्ञानात मोलाची भर घातलेली आहे. तरी देखील खाँसाहेबांना अभिप्रेत असलेला संपूर्ण सिद्धांत त्यात स्पष्टपणे मांडला गेला आहे असे मानता येणार नाही.

उस्ताद अब्दुल करीमखाँ यांच्या हयातीतच त्यांचे सर्व शिष्य मोठे गायक म्हणून प्रसिद्धी पावले होते. त्यांच्या पट्टशिष्यांमध्ये रामचंद्र गणाप्पा कुलकर्णी वुंदगोळकर तथा रामभाऊ वुंदगोळकर, गणपतबुवा बेहेरे, बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी आणि रोशन आरा बेगम या चार महान कलाकारांचा समावेश होतो. या शिवाय सुपुत्र सुरेशबाबू माने, आणि विश्वनाथबुवा जाधव हे देखील करीमखाँ यांच्याकडून गाणे शिकले. रामभाऊ वुंदगोळकरांनी शालेय शिक्षणाचा त्याग करून इ. स. १९०० मध्ये खाँसाहेबांचे शिष्यत्व प्राप्त केले. पुढील वर्षी खाँसाहेबांचा विधिवत गंडा बांधून पहिल्या सात वर्षात किराना गायकीचे अध्ययन केले. मात्र पैसा आणि प्रसिद्धीच्या आमिषाला बळी पडून रामभाऊ गायक नट म्हणून मराठी रंगभूमीवर गेले. खाँसाहेबांची तालीम पूर्ण न करताच व त्यांची अनुज्ञा न घेता ते रंगभूमीवर गेल्यामुळे खाँसाहेबांना फार दुःख झाले होते. घराण्याची शिस्त मोडून त्यांनी दुसऱ्या गुरुजनांकडून नंतरच्या काळात शिक्षण घेतले. रामभाऊ वुंदगोळकरांना संगीत रंगभूमीवर इतके यश आले की, लोकमान्य टिळकांनी नारायण राजहंस यांना जशी बालगंधर्व ही पदवी बहाल केली होती, तशीच गणेश श्रीकृष्ण खापर्डे यांनी रामभाऊंना नागपूर येथे सवाई गंधर्व ही पदवी दिली. रामभाऊंनी १९१३ मध्ये भारत नाट्यकला नावाची संगीत नाटक कंपनी काढली. ही कंपनी मोडीत निघाल्यानंतर त्यांनी नूतन संगीत मंडळी ही नवीन कंपनी काढली. रंगभूमीवर बरीच वर्षे राहिल्यावर पश्चाताप होऊन त्यांनी १९३२ मध्ये नागपूरला शपथ घेऊन नाटक सोडले व ते पुण्याला स्थायिक झाले. एक काळ असा होता की,

महाराष्ट्रीय गायकांच्या समकालीन पिढीत सवाई गंधर्व अत्युच्च स्थानी होते. मूळचे धारवाड-हुबळीचे रामभाऊ वुंदगोळकर महाराष्ट्रात केवळ वास्तव्यच करून राहिले नाहीत, तर महाराष्ट्राने त्यांना पूर्णपणे आपले मानले. सवाई गंधर्वांनी गंगूबाई हनगल याना प्रदीर्घ काळ तालीम दिली, तसेच भीमसेन गुरुराम जोशी आणि फिरोज दस्तूर यांना देखील दोन वर्षे किराना घराण्याची गायकी शिकविली. मात्र फिरोज दस्तूर यांनी पुढे बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांच्याकडून तालीम घेतली.[३४]

बाळकृष्णबुवांनी काही दिवस बेळगावला राहून तेथे १९१४ मध्ये सरस्वती संगीत विद्यालय सुरू केले. पुढे १९२० मध्ये बाळकृष्णबुवांनी या विद्यालयाचे मुंबईला स्थलांतर केले आणि संगीत शिक्षणाचे कार्य अव्याहत चालू ठेवले. त्यांनी लिहिलेल्या **श्रुतिदर्शन** या ग्रंथाचा उल्लेख वर आलेला आहेच. विशेष म्हणजे १९३० मध्ये अब्दुल करीमखाँ यांनी बाळकृष्णबुवांना 'खिलाफत' देऊन आपला उत्तराधिकारी म्हणून नियुक्त केले. यावरूनही त्यांच्या संगीत साधनेची कल्पना येते. फिरोज दस्तूर यांच्या व्यतिरिक्त बाळकृष्णबुवांनी आपले सुपुत्र चंद्रकांत कपिलेश्वरी, जयंतिलाल जरीवाला, यशवंतराव पुरोहित आणि कन्या शैला (कल्याणी पुराणिक) यांना संगीताची तालीम दिली. गुरुभक्ती व साधना यांस वाहून घेण्यासाठी बुवांनी आयुष्याच्या मध्यान्हापर्यंत विवाह केला नाही. सर्व कपिलेश्वरी परिवारच संगीत क्षेत्रात कार्यरत आहे, खाँसाहेबांचे कार्य चालू ठेवित आहे. मात्र संगीत संशोधनातील बुवांचे काम महान असल्याने त्यांचा पुढे स्वतंत्र उल्लेख करण्यात येईल.

गणपतबुवा बेहेरे मूळचे कोकणातले. त्यांची शिष्य परंपरा टिकली नसली, तरी ते तेव्हाचे एक चांगले गवई होते. विविध संगीत समारोह आणि आकाशवाणीवरून त्यांचे गायन प्रसारित होत असे. करीमखाँची चुलत पुतणी व आवडती शिष्या रोशन आरा बेगम अत्यंत तडफदार, चौमुखी, महत्वाकांक्षी गायिका होती. तानेपर्यंत बहुतांशी करीमखाँच्या ढंगाने गाऊन झाल्यावर पुढे त्या आपल्या मुलायम लवचिक आवाजाला अनुरूप अशा ताना घेत. त्यांचे जोरकस व पल्लेदार गाणे आजही बुजुर्ग रसिकांच्या स्मरणात आहे. दुर्दैवाने हिंदुस्थानच्या फाळणीनंतर रोशन आरा बेगम याना आपल्या पतिसमवेत पाकिस्तानात जावे लागले. मात्र तेथेही त्यांनी करीमखाँ यांच्या किराना गायकीचा सुंदर आविष्कार करून दाखविला. उस्ताद करीमखाँच्या पुण्यतिथी निमित्ताने मिरजेला आयोजिलेल्या संगीत महोत्सवात त्या मधून मधून हजेरी लावत. तेव्हा त्यांच्या रंगतदार गाण्याची भारतीय रसिक आतुरतेने वाट पाहत. सुरेशबाबू माने यांनी आपल्या अल्पायुष्यात करीमखाँ साहेबांची मूळ गायकी आत्मसात केली, आणि आपल्या दोघी भगीनी हिराबाई बडोदेकर व सरस्वती राणे यांना किराना गायकीची तालीम दिली. याशिवाय प्रभा अत्रे व माणिक वर्मा यांनाही त्यांनी अल्पावधीसाठी तालीम दिली.

संगीताच्या अध्ययनामध्ये 'घराण्याची' शिस्त आणि गुरु-शिष्य परंपरा याबाबतचे नियम दुसऱ्या महायुद्धापर्यंत फार कडक होते. गुरू आपल्या शिष्याला पुत्रवत मानत असे. त्याला वयपरत्वे आणि विद्यापरत्वे मुलाप्रमाणे मान मिळे. त्याला गुरूची सेवा करावी लागे. शिष्यत्व प्राप्तीचा विधी म्हणजछ "गंडा" बांधणे हा मुंजीसारखा लहानसा पवित्र सोहळा असे. त्यासाठी गुरुदक्षिणा द्यावी लागे. मुलींना सहसा संगीत शिकवित नसत. सासऱ्याकडून विद्या मागणे उचित समजत नसत. आपल्यापेक्षा वरचढ किंवा कमी प्रतिच्या घराण्याकडून विद्या प्राप्त करीत नसत. प्रत्येक संगीत घराण्याचा प्रमुख असायचाच व तोच सर्वाधिकारी मानला जाई. खलिफा म्हणजे घराण्याच्या प्रमुखाचा उत्तराधिकारी होय. बहुधा मुलगाच खलिफा होत असे. मुलगा नसला किंवा संगीतात त्याला गती नसली, तर चांगल्या शिष्याला खलिफा करण्याचा प्रघात होता. खलिफाचा म्हणजे पगडी बांधण्याचा खास विधी करण्यात येई. विधीच्या वेळी नियोजित उत्तराधिकाऱ्याने गुरूची विद्या व प्रतिष्ठा यांचे जतन करून विद्या पुढे शिष्याच्या हवाली करण्याची शपथ घ्यावयाची असे. खलिफाचा दौरा कोणत्याही गावी होताच सर्व स्थानिक घराणेदारांनी त्याच्याकडे जाऊन "नजरनिछावर" करणे बंधनकारक होते. विहित कुलाचार पाळणा-यांचाच खानदानात म्हणजे घराण्यात समावेश होई.घराणे हे जणु काय कुटुंबसंस्था व विद्यापीठ होते. मात्र मागील ५० वर्षात घराण्याची शिस्त आणि गुरु-शिष्य परंपरेचे नियम शिथिल झालेले आहेत. ही शिस्त व नियम यांचे भवितव्य धोक्यात आलेले आहे, असे दिसते.

सन १९२०-२१ चे ब्रिटिशविरोधी असहयोग आंदोलन व सभाबंदीच्या सरकारी दडपणामुळे संगीत क्षेत्रास थोडीशी तात्पुरती झळ लागली. तथापि त्यानंतर मात्र संगीताला अधिक लोकाश्रय मिळू लागला. या सुमारास रागदारी संगीतास महाराष्ट्रात अपूर्व प्रतिष्ठा प्राप्त झाली व ती चांगली रुजली. दक्षिणेकडील काही राज्ये वगळता हिंदुस्थानातील कोणत्याही राज्यात रागदारीला महाराष्ट्रातल्या सारखी प्रतिष्ठा नव्हती. पिढीजात संगीतकारांच्या दृष्टीने काळ बदललेला होता. रागदारी म्हणजे अभिजात ख्याल गायन असे रसिकांनी समीकरण तयार केले होते. संगीत आवडणे व शक्य असल्यास समजणे या बाबी बहुश्रुतपणाची लक्षणे मानली जाऊ लागली. संगीताची मैफल किंवा निदान संगीत नाटक पाहावयास जाणे हे मध्यम वर्गामध्ये भूषणावह वाटू लागले. तिकीट विकत घेऊन रागदारी संगीताच्या मैफलीतून संगीताचा आस्वाद घेणे सुलभ झाले. अभिजात संगीताला एवढा मोठा लोकाश्रय देशातील फार थोड्या ठिकाणी होता. विष्णू दिगंबर पलुसकर, अब्दुल करीमखाँ, विष्णू नारायण भातखंडे, रामकृष्णबुवा वझे, भास्करबुवा बखले, बालगंधर्व,

अलादियाखॉं, केसरबाई, मोगूबाई, अंजनीबाई मालपेकर यांनी संगीत क्षेत्रासाठी केलेल्या कार्याची ती फलनिष्पत्ती होती.

महाराष्ट्रातील रसिकतेचा लाभ हिंदुस्थानभरच्या ख्याल गायकांना झाला. म्हणूनच मुंबई महानगर ख्याल गायकांचे यात्रास्थान व निवासस्थान बनले. परप्रांतीय गायक व वादक पुणे-मुंबईच्या समाजात प्रतिष्ठित झाले, व रसिकांच्या अपेक्षेचाही त्यांना अंदाज आला. बहुसंख्य कलाकारांना मराठी भाषा अवगत झाली. त्या बरोबर मुसलमान गायकही महाराष्ट्रात लोकप्रिय झालेली मराठी नाटकांमधील निमशास्त्रीय पदेही गाऊ लागले.

अच्युत बळवंत कोल्हटकर (१८७९-१९३१) यांच्यासारखे पत्रकार संगीत व नाटककलेला वर्तमानपत्रांतून प्रसिद्धी व उत्तेजन देऊ लागले. मराठी वाचकवर्गात कोल्हटकरांनी केलेले प्रसिद्धी कार्य फार मोलाचे मानावे लागले. कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर आणि वीर वामनराव जोशी यांनी देखील वर्तमानपत्रांद्वारे या कलांना प्रसिद्धी देऊन समाजात मानाचे स्थान प्राप्त करून देण्यासाठी चांगले कार्य केले.

महान परंपरा निर्माण करणाऱ्या किराना घराण्याच्या पुढील पिढीतील कलाकारांच्या कार्याचे मूल्यमापन करण्याआधी कृष्णराव गणेश फुलंब्रीकर यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कृष्णराव तथा मास्टर कृष्णा हे भास्करबुवा बखलेंचे पुत्रसमान पट्टशिष्य होते. तीन पिढ्यांच्या तरुणांवर त्यांच्या गायनाचे जे खोल संस्कार झाले, त्यांचा परिणाम म्हणून आज बऱ्याच मराठी गायकांवर मास्टर कृष्णांच्या गायकीचा काहीना काही ठसा उमटलेला दिसतो. मात्र याला अपवाद आहेत भीमसेन जोशी, कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, फिरोज दस्तूर व गंगूबाई हनगल. गायनाव्यतिरिक्त गीतांना चाली लावण्यातही मास्टर कृष्णांचे कसब दिसून येत असे. १९३७ मध्ये प्रांतिक स्वायत्तेच्या तत्त्वानुसार पहिले कॉंग्रेस मंत्रिमंडळ अधिकारारूढ झाल्यावर राष्ट्रगीत "वंदे मातरम्" याची चाल नव्याने लावण्याचा प्रश्न उपस्थित झाला. मूळची बंगाली चाल स्वीकृत करण्यास अनेक अडचणी होत्या. तसेच विष्णू दिगंबर पलुसकर यांनी बसविलेली चाल संगीताच्या दृष्टीने उत्तम असली, तरी सामूहिक राष्ट्रगीत गायनास योग्य नव्हती. म्हणून मुंबईचे प्रधानमंत्री बाळ गंगाधर खेर यांनी आपल्या मंत्रिमंडळातील सर्व सभासदांना तसेच बॅ. जयकर, जमनादास मेहता, वालचंद हिराचंद, इत्यादींच्या उपस्थितीत मुंबईच्या कॉंग्रेस हाऊसमध्ये मास्टर कृष्णा याना बोलावून घेतले. या प्रसंगी कृष्णरावानी सुयोग्य चाल बसविली व मुलांना जमवून "वंदे मातरम्" चे गायन करून दाखविले. सर्वांनाच झिंझोटी रागातील ही चाल आवडल्यामुळे हिचा स्वीकार करण्यात आला. ही चाल महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू व अलादियाखाँ यांनाही आवडली. मास्टर कृष्णा यांचे दुसरे प्रसिद्ध स्फूर्तिदायक राष्ट्रवादी गीत म्हणजच "हिंदुस्थान हमारा" हे होय. दिनांक ७ ऑगस्ट १९४२ रोजी गोवालिया टँक येथे काँग्रेसचे सुप्रसिद्ध अधिवेशन भरलेले असताना मास्टर कृष्णा यांनी हे गीत व्यासपीठावरून म्हटले होते. अल्पावधीत मुंबईला स्थापन झालेल्या काँग्रेसच्या भूमिगत रेडिओ स्टेशनवरून मास्टर कृष्णांच्या गाण्याची ध्वनिमुद्रिका आवर्जून मधून मधून वाजविण्यात येई. ही इतिहासात नोंद घेण्याजोगी बाब होती.[३५]

प्रत्येक संगीत रसिकाने हिराबाई बडोदेकरांचे मनोभावे कौतुक केले, अनभिज्ञ आस्वादक श्रोत्यांनी देखील. किंबहुना तो त्यांचा हक्कच होता. त्यांच्या अष्टपैलू गानकर्तृत्वाचा एक खास ठसा उमटून गेला. त्यांचे सारे व्यक्तिमत्त्वच संगीतमय होते. त्यांचा अलंकृत षड्ज विलक्षण सुरेल मानला जाई. विशेष म्हणजे हिराबाईंचा षड्ज कंठातून अलगद उगवत असे, लावला जात नसे. षड्जाकडे जाणे, जवळ जाणे, परत येणे, पुन्हा अलगद जाणे व बिलगणे यात त्यांचे कसब होते. त्यांच्या स्वरमालिका नाजुक व भावपूर्ण असत. काही क्षणातच रसिक मंत्रमुग्ध होत असे. त्यांची साधना व सिद्धी तर अफाट. नियतीचा संकेत की काय, पण आपले वडील उस्ताद अब्दुल करीमखाँ यांचेकडूनही हक्काचे अत्युत्कृष्ट दर्जाचे संगीत शिक्षण मिळण्याच्या कामी हिराबाईंचे पूर्वसंचित आड आले. रूढीबंधन आड आले. खाँसाहेबांनी त्याना संगीत शिकविले, पण शिष्या म्हणून नव्हे. त्यास्तव अब्दुल वहीदखाँची तालीम मिळण्यासाठी गळ घालावी लागली. तथापि त्याभारी कडक माणसालाही या शिष्येने डोलावयास लावले. खरे तर पुढील संगीत साधना त्यांनी केली आपल्या भावाकडून, सुरेशबाबू मानेंकडून. मात्र हा गुरूही नियतीने अकालीच हिरावून नेला. अशा दैवदुर्विलासातून मार्ग काढून या योगिनी गायिकेने आपली साधना पूर्णत्वाला नेली, इतकेच नव्हे तर संगीत कला सामान्य माणसापर्यन्त पोहोचविली. शास्त्रशुद्धता, सहजता आणि कंठमाधुर्य हे हिराबाईच्या गायनाचे गुणविशेष होत. त्यांच्या कंठावर तसेच शैलीवर प्रभाव होता खाँसाहेबांचा. आर्यभूषण थिएटरमध्ये १९२५ मध्ये तिकीट लावून संगीताची मैफल करून त्यांनी जाहीर मैफलीत पदार्पण केले. समकालीन संकेतानुसार हे केवळ त्यांचेच धारिष्ट नव्हते, तर रसिकांचे देखील होते. महिला गायिकेच्या मैफलीस जाणे तेव्हा समाजमान्य नव्हते. अर्थातच आर्यभूषणमधील मैफलीतीत उपस्थिती अल्प होती. त्या काळी रूढीबंधनानुसार सभ्य घरंदाज गायिका खुल्या मैफलीत गात नसत. गाणे हा अकुलिनांचा व्यवसाय आहे, अशी सामाजिक धारणा असल्याने कुलीन महिला मैफलीत गात नसत, गाणे ऐकण्यासाठी जातही नसत. घरंदाज पुरुष रसिकही गायिकेच्या मैफलीत जाण्यास धजावत नसत. तथापि हिराबाईंनी हे धारिष्ट करून पांढरपेशा व उच्चभ्रू समाजातील संगीत आस्वादकांना आपल्या कलापूर्ण मैफलींकडे आकर्षित केले. त्यांच्या गायनाने, तद्वतच शालिनतेने संतुष्ट होऊन मुंबईतील रसिकांची गर्दी त्यांच्याभोवती जमू

लागली. खचितच हे हिराबाईंचे सांगीतिक व सामाजिक क्षेत्राला महान योगदान होते. कारण त्यांच्यामुळे महिलांचा मैफलीतील प्रवेश शिष्टसम्मत झाला, आणि गायिकांच्या व्यवसायावरील कलंक (stigma) पुसला गेला. घरंदाज गायिकांनी मैफलीच्या आसनावर तसेच रंगभूमीवर येण्याचा मार्ग मोकळा झाला. गायिकांना पांढरपेशा सभ्य समाजात प्रतिष्ठा मिळवून देणाऱ्या पहिल्या हिराबाईच. रसिकांचे अपार प्रेम त्यांच्या गायनावर, तसेच सोज्वळतेवरही. कलकत्त्याच्या म्युझिक कॉंफरन्समध्ये (जानेवारी १९४१) हिराबाईंना सर्वाधिक म्हणजे पाच सुवर्ण पदके मिळालीत, हे उगीचच नव्हे. याच कॉंफरन्समध्ये ओंकारनाथ ठाकूर आणि मेनकाबाईंना प्रत्येकी दोन, तर सरस्वती राणेंना एक सुवर्ण पदक मिळाले होते. त्यावरूनही हिराबाईंची थोरवी कळावी.[३६] हिराबाई-पूर्व काळात पंडित पलुसकरांनी पुरुष गायकांचे आचरण सुधारण्याचे व प्रतिमा उजळविण्याचे कार्य केले होते, तथापि गायिकांना प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या कामी खास काही घडविले नव्हते. हिराबाईंच्या पूर्वी श्रोते, निदान त्यातील एक वर्ग तरी, गायिकेकडे शृंगारिक दृष्टीने, थिल्लरपणेच पाहात असे. म्हणून सभ्य, शालिन गायिका मैफलीत पदार्पण करीत नसत. हिराबाईंच्या प्रेरणेने सभ्य गायिका संगीताच्या सभागारात प्रवेश करू लागल्या, उदयोन्मुख तरुण गायिका पुढे आल्या. सामाजिक व सांस्कृतिक आसमंतामधील हे हिराबाईंनी घडवून आणलेले परिवर्तन महान होय.

किराना घराण्याने विलक्षण प्रतिभेच्या कलाकारांची दुसरी पिढी निर्माण करून या गानप्रणालीची परंपरा अखंडित ठेवली. घराण्याच्या मूळ पुरुषाच्या म्हणजे खाँसाहेबांच्या पावलावर पाऊल ठेवून दुसऱ्या पिढीतील कलाकारांनी देखील चहुकडे किराना गायकी सादर केली, आणि अभिजात संगीताचे अधिकाधिक आस्वादक निर्माण केले. त्यांच्या चाहत्यांचा एक खास वर्ग "तयार" झाला, आपण या घराण्याचे आस्वादक असल्याचे अभिमानाने सांगू लागला. कंठ संगीताच्या क्षेत्रात किराना प्रणाली दुसऱ्या प्रणालींपेक्षा अधिक प्रभावी बनल्याचे चित्र दिसू लागले. किराना घराण्याच्या दुसऱ्या पिढीतील वारसदारांनी पुढील म्हणजे तिसरी पिढी घडविण्यातही खंड पडू दिला नाही. यशस्वी गायक म्हणून त्यांचा लौकिक झाल्यामुळे किराना गायकी आत्मसात करण्यासाठी व तिच्या अध्ययनासाठी अनेक महत्त्वाकांक्षी उदयोन्मुख कलाकार त्यांच्याकडे आकर्षित झालेत.

महाराष्ट्रातील अभिजात शास्त्रोक्त संगीताची सांप्रत काळातील अवस्था, या कलेतील संकेत, दिशा आणि नवनवीन प्रयोग हा स्वतंत्र अभ्यासाचा एक मोठा विषय आहे. त्यामुळे त्याविषयी येथे फार काही लिहिणे शक्य नाही.

इतके मात्र म्हणावेच लागेल की, संगीताला खचितच अधिकाधिक रसिकाश्रय आणि शिष्टसम्मती लाभत आहे. मैफलींची वाढती संख्या, त्यातील रसिकांची वाढती उपस्थिती आणि तिकिटांचे दर यावरून हे स्पष्ट दिसते. संगीताला अपूर्व प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. मात्र येथे नमूद करावेसे वाटते की, घराणदार गायकीच्या पूर्वापार शिस्तीप्रमाणे सखोल तालीम घेतल्यावर देखील गायक नवनवीन आविष्कार रीती, रंग व ढंग उत्क्रान्त करीत आहेत. इतर घराण्यांचे गुणविशेष आत्मसात करण्याचे प्रयोग करीत आहेत. इतरांच्या गुणविशेषांवर आपली प्रतिमा व घराणदार गायकीचे संस्करण करून, गायकीला आपल्या आवाजाला अनुरूप असे वळण देत आहेत. आणि त्याद्वारे नवीन संमिश्र अशी निर्मिती करण्याचे प्रयत्न करीत आहेत. हा नवीन आचारविचार प्रवाह १९५० पासून सुरू झाल्याचे प्रकर्षाने दिसते. आश्चर्य म्हणजे विशिष्ट घराण्याचे काही वारसदार देखील याचा पुरस्कार करीत आहेत. याबाबतचे उदाहरण म्हणून किराना घराण्याच्या आजच्या तीन प्रमुख कलाकारांचा म्हणजे भीमसेन जोशी, गंगूबाई हनगल व प्रभा अत्रे यांच्या कामगिरीचा उल्लेख करता येईल.

हिंदुस्थानी संगीताच्या विशाल आणि विविधांगी विश्वातील मागील पाच दशकांच्या इतिहासात भीमसेन जोशींचे नाव भारदस्त मानले जाते. किराना घराण्याचा तेजस्वी तारा म्हणून मान्यता पावलेले भीमसेन यांनी देखील असामान्य स्वप्रतिभेच्या जोरावर किराना गायकीच्या परंपरेला नवीन दिशा दिलेली आहे. करीमखाँ साहेबांचे संमोहनकारी, दुःखशमन करणारे आणि सोंदर्यलक्ष्मी असे गाणे तसेच सवाई गंधर्वाचे मधुर गायन लहान वयातच (१९३२) ऐकल्यापासून युवावस्थेतील भीमसेनची संगीत अध्ययनाची व गुरू मिळविण्याची तृष्णा जागृत झाली. गुरू प्राप्तीसाठी सुरू केलेल्या बिकट वाटचालीत ते प्रथम पुण्याला आलेत. मात्र येथे निराशाच पदरी पडल्याने ते ग्वाल्हेरला गेले. सरोद वादनपटू हफिझ अली खान (उस्ताद अमझाद अलींचे वडील) यांच्या कृपेने भीमसेन जोशींना ग्वाल्हेरच्या सांगीतिक परिसरात आश्रय लाभला. मूळचे महाराष्ट्रीय असलेले राजाभय्या पूछवाले आणि कृष्णराव शंकर पंडित या ग्वाल्हेर घराण्याच्या बुजुर्ग गायकांकडून त्याना शिक्षण मिळू लागले. भीमसेनच्या प्रारंभीच्या जडणघडणीवर या बुजुर्ग गुरूंचा सखोल परिणाम होणे अपरिहार्यच होते. खुद्द हफिझ अली खान यांच्याकडूनही भीमसेनला ज्ञानप्राप्ती झाली. भीमसेन जोशीच्या बऱ्याच खयालांवर आणि विशेषतः मारवा आणि पूरिया रागांवर हफिझ अलींचा प्रभाव असल्याचे काही रसिक मानतात. स्वतः हफिझ अलींना आपले आजोबा गुलाम अली खान यांचेकडून विपुल, समृद्ध वारसा प्राप्त झालेला होता. तथापि गुरु-शिष्य परंपरेनुसार अध्ययन करण्यासाठी तळमळणाऱ्या भीमसेनला ग्वाल्हेरला प्रचलित असलेली संगीत वर्ग शिक्षण पद्धती (class room teaching) संतुष्ट करू शकली नाही. म्हणून खरगपूरचे केशव मुकुंद लुखे आणि कलकत्त्याचे भीष्मदेव चॅटर्जी यांचेकडे विद्याप्राप्तीसाठी जाऊन त्यांनी नशीबाची परीक्षा घेतली. तद्नंतर ते हिंदुस्थानी

संगीताचे एक आघाडीचे वेंग्द्र असलेल्या जलदंरला गेले. तथापि तेथे शिकविल्या जाणाऱ्या एकमेव धृपद धमार गायकीच्या अध्ययनावरच त्याना समाधान मानावे लागले. कारण जलंदरच्या आर्य संगीत विद्यालयात फक्त धृपद धमारचे शिक्षण दिले जाई. इतके भ्रमण झाल्यावर जोशींनी पुण्याला परत येऊन सवाई गंधर्वांचे शिष्यत्व पत्करले (१९३५-३६). क्लेशदायक अशा तपश्चर्येनंतर त्यांनी आवाज परिष्करण (voice refinement) क्रियेने प्रारंभ केला, आणि पाच वर्षांच्या कालावधीत केवळ तोडी, मुलतानी आणि पूरिया या तीन रागांचेच ज्ञान, अर्थात सखोल, मिळविले. तथापि या अध्ययन काळात त्याना आपल्या गुरूचे मैफलीतील गायन आणि गंगुबाई हनगल व फिरोझ दस्तूर या गुरुबंधू-भगिनीला सवाई गंधर्वांनी शिकविलेले गाणे यातून शिकण्याची संधी प्राप्त झाली. नियतीच्या संकेतानुसार सवाई गंधर्वांचे शिष्यत्व अचानक संपुष्टात आल्यावर मात्र त्याना ज्ञानप्राप्तीसाठी धरणी व आकाश हलवून ज्ञानलालसा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करावी लागली. विविध राग आणि बंदिशींचा आपला संग्रह समृद्ध करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. एक वर्षाच्या सातत्यपूर्ण रियाझनंतर अधिक विद्यार्जनासाठी ते पुन्हा गुरूच्या शोधात निघाले. या प्रयत्नात भीमसेन जोशींना रामपूर घराण्याचे सुप्रसिद्ध मुश्ताक हुसेन खान यांचे शिष्यत्व सहा महिन्यांसाठी लाभले.

स्वाभाविकपणे भीमसेन जोशींच्या गायकीमध्ये उपरोक्त विविध शैलींच्या गानप्रणालींचे बेमालूम संमिश्रण आणि स्वरूपान्तर (rare amalgam and metamorphosis) झालेले आढळते. त्यांच्या विलंबित खयालावर इंदूरच्या उस्ताद अमीर खान यांचा प्रभाव पडलेला दिसतो, तर द्रूत बंदिशीत विविध शैलींचे संमिश्रण (blending) झाल्याचे दिसते. "Consequently his recital has now become ornamental and virile, and lively and sprightful". (इंग्रजी आवृत्तीवरून). जरी अब्दुल करीमखाँ आणि सवाई गंधर्व यांचेकडून स्फुर्ती घेतलेली असली तरी कालांतराने ते गुरु-शिष्य प्रणालीचे अनाठायी अथवा आत्यंतिक पुरस्कर्ते राहिले नाहीत. स्वप्रतिभा आणि संकल्पना यांना अनुरूप असे गुणविशेष त्यांनी विविध गायकींकडून आत्मसात केलेले आहेत. "Indeed there is in him a marked transition from the traditiional to the eclectic. His personal contribution to the enrichment of the Kirana Gayaki distinguishes him from contemporary musicians, althogh the connoisseurs identify him as an exponent of the gharana along with his living co–disciples Gangubai and Phiroze Dastur. Bhimsen's rich ornate voice, scintillating articulation of *swara*, the *taankari* and *alapi* in his khayal and Thumri singing have gained him a spectacular popularity. He is virtually a leading exponent of the Kirana Thumri, which is acclaimed to be a distinct genre in classical music." (इंग्रजी आवृत्तीवरून). महाराष्ट्राच्या सांगीतिक विश्वाला भीमसेन जोशींनी दिलेली आणखी एक देणगी म्हणजे निमशास्त्रीय संगीताच्या माध्यमातून त्यांनी गायिलेले ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ यांचे अभंग व संत पुरंदरदासाच्या भक्तिरचना. या प्रकारालाच "भीमसेनची अभंगवाणी" अशी संज्ञा प्राप्त झाली.

भीमसेन जोशींची गुरुभगिनी गंगूबाई हनगल या तर एक भव्य सांगीतिक व्यक्तिमत्त्व असून सांप्रतच्या सर्वश्रेष्ठ अशा अभिजात हिंदुस्थानी गायकांमध्ये त्यांचा समावेश होतो. हे दोघेही कलाकार तुल्यबळ प्रतिस्पर्धी आहेत, दोघेही किराना घराण्याचे अलौकिक प्रतिभावान असे लोकोत्तर कलाकार आहेत. खरे तर गंगूबाईंना आपले गुरू सवाई गंधर्व यांचेकडून अधिक प्रदीर्घ काळ व सातत्याने मूळ किराना गायकी शिकण्याची संधी लाभली. इतर गुरुबंधूंपेक्षा त्याना गुरु-शिष्य परंपरेचा अधिक लाभ हण्येाचे भाग्य मिळाले. आणि म्हणूनच सवाई गंधर्वांना अभिप्रेत असलेल्या किराना गायकीचा वारसा आपल्याकडे आलेला आहे असा त्यांचा दावा आहे. किराना गानप्रणाली पूर्णपणे आत्मसात करून गंगूबाईंनी आपले खास संगीतिक व्यक्तिमत्त्व घडविलि. त्यांचा भव्य, निनादी आणि पल्लेदार आवाज, अचूक स्वरावरील प्रभुत्व, तद्वतच स्पष्टोच्चारक स्वरनियमन (articulate modulation) या गुणविशेषांच्या आधारे त्यांनी देशोंविदेशातील जाणकार संगीत आस्वादकांच्या मनात स्वतःची प्रतिमा तयार केलेली आहे. ही निगर्वी व सोज्वल महिला म्हणजे स्वराचे वरदान मिळालेली गायिका असून, तिने मागील अदमासे ५० वर्षांच्या काळात अनेक संगीत परिषदा व महोत्सवांमध्ये आपले श्रेष्ठत्व सिद्ध केलेले आहे. आपल्या गुरुबंधूप्रमाणेच गंगूबाईंनी देखील नवनवीन राग निर्माण करण्यापेक्षा सर्जनशील प्रतिभानुसार (creative genius) किराना गायकीलाच कला सौंदर्याचा साज चढविण्यावरच भर दिलेला दिसतो. पल्लेदार आलाप आणि तानांवर त्यांचा कटाक्ष असतो. आपल्या गुरुबंधूंप्रमाणे गंगूबाई देखील घराण्याच्या संचयगारातील विशिष्ट राग गाताना दिसतात.

किराना घराण्याच्या सांप्रतच्या आणखी एक सुप्रसिद्ध गायिका डॉ. प्रभा अत्रे यांनी बरेच संशोधन करून कंठ संगीतात नवनवीन प्रयोग केलेले आहेत. संशोधन तसेच सर्जनशील स्वप्रतिभेनुसार त्यांनीही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व घडविले. सुरेशबाबू माने यांचेकडून प्रारंभीचे शिक्षण घेतल्यावर प्रभाताईंनी हिराबाई बडोदेकरांकडून तालीम घेतली. याचा अर्थ असा की, अध्वर्य खाँसाहेब अब्दुल करीमखाँ यांचे सुपुत्र तद्वतच कन्येकडून प्रभाताईंना किराना गायकीचा

वारसा लाभला. नंतरच्या काळात त्यांनी संशोधक वृत्ती अनुरूप स्वतंत्र संकल्पन केले आणि स्वरनियमनाचे तंत्र तयार केले, गायकीची गुणवत्ता व सैंदर्यवत्ता आणखी वाढविली. स्वतःचा ठसा निर्माण करून संगीत विश्वात प्रतिष्ठा प्राप्त केली.

अब्दुल करीमखाँ यांचे नैसर्गिक वारस सुरेशबाबू माने (ताराबाईंचे सुपुत्र) यांनी तर खुद्द खाँसाहेबांकडूनच अस्सल किराना गायकी आत्मसात केली होती. विशेष म्हणजे खाँसाहेबांच्या गायनातील आणि आवाजातील बऱ्याच गुणविशेषांची सुरेशबाबूंच्या कंठातून अभिव्यक्ती झाली. या प्रतिभावंत कलाकाराने आपल्या भगिनी हिराबाई बडोदेकर व सरस्वती राणे आणि नंतर प्रभा अत्रेंना किराना गानप्रणाली शिकवून घराणदार गायकांची पुढील पिढी घडविण्याचे कामी मोठे योगदान दिले. अभिजात संगीताबरोबर मराठी नाट्य संगीतालाही त्यांच्या प्रतिभेचा लाभ झाला, हे मान्य करावे लागते. मात्र दैवदुर्विलास असा की, या तडफदार गायक आणि संगीत शिक्षकाला नियतीने वयाच्या ३२-३३ च्या सुमारास हिरावून नेले. आणि किराना घराण्यांचेच नव्हे, तर अभिजात संगीताचे बरेचं नुकसान झाले.

किराना घराण्याच्या तेजोमालिकेतील (galaxy) फिरोझ दस्तूर हे देखील सांप्रत काळातील प्रतिभासंपन्न नामांकित गायक होते. प्रथम सवाई गंधर्वांकडून सुमारे दोन वर्षे अध्ययन केल्यावर, फिरोझ दस्तुरांनी मुंबईत बाळकृष्णबुवा कपिलेश्वरींकडून किराना गायकी आत्मसात केली. याचा अर्थ असा की, भारतीय संगीत शास्त्रामधील "श्रुति, स्वर, ग्राम, मूर्च्छना" इत्यादिकांचा सखोल अभ्यास असलेल्या कपिलेश्वरींकडून, तसेच करीमखाँ साहेबांच्या या दोन शिष्यवरांकडून दस्तुरांना किराना गानप्रणाली लाभली. मूळ गायकीचे चिंतन व मनन करून त्यांनी त्यात स्वप्रतिभा ओतली, आणि आपला खास ठसा निर्माण केला. मधुर आवाज, स्वरांचे अलंकरण व अस्सल स्वरसाधना या जोरावर फिरोझ दस्तुरांनी अखिल भारत तसेच संपूर्ण संगीत प्रेमी जगतात मोठी कीर्ती संपादन केली आहे. बसवराज राजगुरू आणि संगमेश्वर गुरव या दोन्ही गायकांनी सुद्धा किरानागान प्रणालीच्या घराणदार परंपरेच्या लौकिकात भर घातली. दोघांनाही भारतभर प्रसिद्धी लाभली. बाळकृष्णबुवांचे सुपुत्र चंद्रकांत कपिलेश्वरी (जन्म १९३६) याना श्रेष्ठ दर्जाच्या संगीताचा वारसा वडिलांकडून लाभला. बाळकृष्णबुवांकडून सखोल तालीम घेत असताना चंद्रकांत कपिलेश्वरींना त्यांच्या मैफलींमधूनही शिकण्याची संधी प्राप्त झाली. त्या आधारे त्यांनी गायन कलेत आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. वडिलांनी पारंपरिक संगीताचा वारसा अखंड हिंदुस्थानात प्रसारित करण्याचे कार्य केले, तर त्यांचे हे सुपुत्र गुरूच्या पुढे पाऊल ठेवून घराण्याची शैली विदेशांमध्ये प्रसारित करीत आहेत. पाश्चिमात्य देशांमधील संगीत रसिकांना हिंदुस्थानी संगीताद्वारे रिझवून ते तिकडे उत्तरोत्तर प्रसिद्धी मिळवित आहेत. कॅनडातील एडमन्टन येथे त्यांनी किराना म्युझिक ॲकॅडमी स्थापन करून त्याद्वारे ते स्वराचा स्पष्टोच्चार, लयीचा आकृतिबंध अणि संगीतातील भावमयतेचा पुरस्कार करीत आहेत.

भित्तीवरचा आलेख स्पष्ट दिसतो आहे की, कोणत्याही घराण्याच्या गायकीतील पूर्वीची परंपरावादी शिस्त फार काळ टिकून राहणार नाही. याची कारणे आहेत :- व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभाव, रूढीची बंधने झुगारून नवनवीन संकल्पनांचा पुरस्कार आणि आपले स्वतःचे काही तरी करून दाखविण्याची महत्त्वाकांक्षा. या कारणांमुळे घराणदार गानप्रणालीची शिस्त फार काळ टिकून राहणार नाही. कोणतेही घराणे मानावयाचे नाही, अशी एक प्रतिक्रिया आजच्या बऱ्याच अभिजात कलाकारांमध्ये आढळत आहे. किंबहुना घराना ही संकल्पनाच काही कलाकार स्वीकृत करीत नाहीत. बरेच गायक व गायिका रूढीची बंधने झुगारून नवनवीन संकल्पनांनुसार नवनिर्मिती करण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. बरेच कलाकार असे आहेत की, ज्यांनी विशिष्ट घराण्याची अथवा विशिष्ट गुरूची विद्या प्राप्त करून घेतल्यावरही स्वप्रतिभा आणि संकल्पन या आधारे नवनिर्मिती करण्यात यशस्वी झालेले आहेत. त्यांत शिवपुत्र सिद्धरामय्या कोमकली तथा कुमार गंधर्व, किशोरी आमोणकर, जितेंद्र अभिषेकी, वसंतराव देशपांडे, सी. आर. व्यास, पद्मावती गोखले शाळिग्राम इत्यादी कलांकारांची साधना लक्षणी आहे. हिंदुंस्थानी संगीतातील विविध गानप्रणालींचा अभ्यास करून त्यांनी नवनिर्मिती करून दाखविली हे मान्यच करावे लागते. "After all a gharana implies only some positive law of the cultivation of voice, articulation of *swara*, some definite aesthetic concept and some order and method of presentation of a raga. But a closer scrutiny of the history of music reveals that such things had happened also in the past ever since the changes in the *Prabandha* style of music, the evolution of Khayal as a new genre and the emergence of gharanas. The only remarkable thing about the contemporary scenario is that the spirit of new creation is more marked and fast now than before." (इंग्रजी आवृत्तीवरून). उपरोक्त उदाहरणापैकी जितेंद्र अभिषेकी यांनी जगन्नाथबुवा पुरोहित यांचेकडून आग्रा गायकी शिकून घेतल्यावर इतर गानप्रणालींमधील काही गुणविशेष निवडले. त्यातून त्यांनी संमिश्रण ह्लंत्ऽह्ग्हङ्घ्ष्ठ करून स्वतःचा निराळा ढंग उत्क्रांत केला. मात्र हेही मान्य करावेच लागते की, त्यांची नवनिर्मिती देखील परंपरेच्या रूपरेखांमध्येच (parameters) समावलेली आहे. तद्वतच सी. आर. व्यास यांनी जगन्नाथबुवा पुरोहित यांचेकडूनच आग्रा

घराण्याचे अध्ययन केले, आणि त्यांनीही आपली खास शैली आचरणात आणलेली आहे. जगन्नाथबुवांचे गुणदर्शक उपनाव गुणीदास यांच्या नावाने ते प्रतिवर्षी गुणीदास संगीत समारोह आयोजित करीत असतात. विशेष म्हणजे पं. व्यासांचे सर्व कुटुंब संगीत कलेची सेवा करीत आहे.

किशोरी आमोणकर यांनी तर जयपूर गायकीच्या बुजुर्ग पुरस्कर्त्या अशा आपल्या मातोश्री मोगूबाई कुर्डीकर यांच्याकडून गानविद्या आत्मसात केली. म्हणूनच त्यांचा जयपूर गानप्रणालीचा वारसा, आणि विशेषतः अलादियाखाँ यांच्या गानशैलीचा वारसा केवळ स्वाभाविकच नव्हे, तर तर्कशुद्ध देखील आहे. तरी देखील किशोरी आमोणकरांनी जयपूर घराण्याचा अभिनिवेश बाळगला नाही, ज्या गायकीचा वारसा मिळविला तिच्याशी त्यांनी बांधिलकी (commitment) पत्करली नाही. आपला असामान्य बहुश्रुतपणा आणि प्रतिभा या आधारे परंपरागत जयपूर गायकीला अगदी नवीन दिशा प्रात करून दिली.वास्तविकपणे पाहाता त्यांनी स्वप्रज्ञेनुसार आपली खास नवीन रीती निर्माण केली. त्यांचे गायन विलक्षण गोड, प्रत्ययकारी, निकोप आणि आत्मानुभव आणून देणारे असते. "In fact we can see in her a marked transition from the traditional to the electic. Her resonant voice, the depth of perception and an exquisite presentation of a raga have earned her an outstanding reputation in India as well as abroad. This author has seen the audiences lifting her up in a wave of adulation. Instead of discussing the various aspects of her recital, suffice it to say that her Khayal or *bhajan* recital is absorbingly fascinating, empathetic, flawless and effective. To be sure, she is an impeccable soprano." (इंग्रजी आवृत्तीवरून)

स्वप्रज्ञा आणि सर्जनशील प्रतिभा यांच्या आधारे नवनिर्मिती करण्यात यशस्वी झालेल्या अलीकडील गायकांमध्ये कुमार गंधर्व याना उच्चस्थान लाभले आहे. ग्वाल्हेर घराण्याचे प्रा.बा. र. देवधर यांच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी प्रथम मुंबईत ग्वाल्हेर गायकी आत्मसात केली. त्यानंतर त्यांनी आग्रा, जयपूर व भेंडीबाजार घराण्यांच्या गानप्रणालींचा अभ्यास केला. देवासला असताना त्यांनी माळवा प्रदेशातील लोकगीतांमधील संगीत विषयक गुणांचे सूक्ष्म अवलोकन केले. त्यातून माळवा लोकसंगीतामध्ये अभिजात संगीतातील राग कल्पनांचे बीज असल्याचे त्यांच्या शोधक बुद्धीला जाणवले. त्यातून अधिक अभ्यास करण्याचा त्यांनी ध्यास घेतला. लोकसंगीतातील सांगीतिक गुणविशेषांचा अभिजात संगीतामधील रागांच्या बंदिशी बांधण्यासाठीही उपयोग करता येईल अशी त्याना स्फूर्ती झाली. तसेच प्रचलित रागांच्या स्वरकल्पनांवरून लोकगीतांमधील सांगीतिकतेला कलात्मक स्वरूप देण्याचीही त्याना प्रेरणा झाली. हिंदुस्थानी संगीताला त्यांनी दिलेले हे योगदान होय. कुमार गंधर्वांनी कोणत्याही घराण्याचा अभिनिवेश बाळगला नाही, किंवा आपल्या शैलीचा कोणत्याही पूर्वासुरीशी संबंध जोडला नाही. खरे तर सांप्रतच्या संगीतातील प्रवाहांचे त्यांनी संश्लेषण (synthesis) केले, आणि सर्जनशील प्रतिभेनुसार स्वतःचे संगीत एका वेगळ्या स्तरावर नेऊन ठेवले. वस्तुतः त्यांची सर्जनशीलता आणि आविष्कार पद्धती या दोनही बाबी सांप्रतच्या हिंदुस्थानी संगीतातील एक गूढ, कुतूहल बनून राहिले आहे. कुमारांची गायकी स्वतंत्रपणे उदयास आली किंवा तिच्यात फार मोठे सौंदर्य आणि गोडवा आहे, असे बऱ्याच जाणकार रसिकांना मान्य नाही. पुष्कळ आस्वादक प्रतिपादन करतात की, राग विस्तारातील शास्त्रशुद्ध संकेत झुगारून कुमार गंधर्व भावनात्मकता आणि आवेगी (impulsive) वृत्तीचा अवलंब करतात. यामुळे खयालाचे सौंदर्य, सघनता आणि प्रसन्नता यांना बाधा येते. तरी देखील अवलोकन, संकल्पन आणि स्वप्रज्ञेने त्यांनी जे निर्माण केले, ते अभिनव म्हणून सर्वमान्य झालेले आहे. लोकगीतांमधील स्वरांचा उपयोग करून त्यांनी नवीन राग निर्माण केले. वर्षा, हेमंत आणि वसंत या तीन ऋतूंमधील निर्सगातील आवेगी भाव आणि वातावरण त्यांनी लोकगीतांच्या आधाराने स्वरबद्ध केले. या नवनिर्मितीमुळे त्याना केवळ प्रसिद्धी मिळाली इतकेच नव्हे, तर संगीतात निसर्गाची भावमयता व प्रेरणा आणण्याचा नवविचार मांडला गेला. अशीच त्यांची आणखी एक देणगी म्हणजे सुरदास, कबीर आणि मीरा या संतांची भजने रागदारीच्या शिस्तीत बसविली. तसेच बालगंधर्वांच्या नाट्य संगीताचा नवा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला.[३७] कुमारांनी बरेच अप्रचलित आणि अनवट राग प्रचारात आणलेत, आणि संजारी, मालवती, बिहड भैरव, सहेली तोडी, गांधी मल्हार, सोहोनी भटियार असे नवीन राग प्रसवले.[३८]

पटियाला घराण्याचे खयाल तद्वतच ठुमरी पटू उस्ताद बडे गुलाम अलीखाँ यांनी देखील मुंबई महानगराचा सांगीतिक आसमंत सुशोभित केला. अतुलनीय आवाज, विस्तृत पल्ला, आविष्कारातील सहजता, विलक्षण माधुर्य आणि सहजसुंदर बढत, या गुणांची ईश्वरी देणगी लाभलेला हा कलाकार होता. त्यांच्या गायनात अशी प्रसादिकता होती की, जी "प्रसाद" या संस्कृत शब्दातूनच व्यक्त होऊ शकते. उच्चारातील सुस्पष्टता आणि स्वर व व्यंजनांच्या शब्दोच्चारातील धीमेपणा यामुळे त्यांच्या गाण्याला भव्यता प्राप्त झालेली होती. "What was more amazing was his ability to maintain the same quality even when words were pitched on high notes".[३९] उस्ताद बडे गुलाम अलींनी ठुमरी गानप्रणाली इतकी समृद्ध केली की, पूर्वीचे आणि आताचे

देखील संगीत रसिक त्याना खयाल गायकापेक्षा ठुमरी गायक म्हणून अधिक वरचा दर्जा देतात. सन १९४०-५० च्या दशकात प्रस्थापित झालेली बनारस घराना ठुमरी, लखनौ घराना शैली तसेच किराना ठुमरी यांच्याहून बडे गुलाम अलीखाँ यांची ठुमरी अगदी भिन्न होती. त्यांनी आपल्या ठुमरीला टप्प्याचे वळण देऊन तिचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व राखले. कदाचित असेही असावे की, आपली ठुमरी म्हणजे एक अस्सल योगदान ठरेल असे गुलाम अलींना वाटले असावे. खरे पाहिल्यास त्यांची ठुमरी तद्वतच खयालावर जसा टप्प्याचा प्रभाव पडला, तसा ठुमरीने त्यांच्या खयालावर देखील प्रभाव पाडला. "सबरंग" या टोपण नावाखाली त्यांनी बऱ्याच बंदिशी रचून हिंदुस्थानी संगीताच्या विपूल भांडारात भर घातली.

डागर घराना, बेटिया येथील मिश्र मंडळी आणि दरभंग्याचे मलिक यांनी धृपद हा आदिम भारतीय गानप्रकार जिवंत ठेवण्याचे मौलिक कार्य केलेले आहे. थोड्याच जाणकारांना ज्ञात असावे की, संगीत क्षेत्रातील विभूती मानला गेलेला तानसेन खरे तर धृपदिया होता, आणि त्याचा गुरू स्वामी हरिदास डागुर हा तर सांप्रतच्या डागर मंडळींचा पूर्वज होता. आणखीच थोड्यांना ज्ञात असावे की, धृपद परंपरेच्या मौल्यवान काव्य भांडारात शहाजहान आणि औरंगजेब या मुघल बादशहांनी रचलेल्या कविताही समाविष्ट आहेत. धृपद शैलीला वाहून घेतलेल्या काही डागर मंडळींना मुंबई महानगराने आकर्षित केले. या ऐतिहासिक घराण्यातील उस्ताद झियाउद्दिन डागर, रहिमुद्दिन डागर, झिया मोहिउद्दिन डागर, झिया फरिदुद्दिन, बहा-उद्-दिन, सईद-उद्-दिन आणि इतर घराणदारांनी महाराष्ट्रात केव्हा ना केव्हा तरी वास्तव्य केलेले आहे. "डागर बंध" या नावाने विख्यात असलेल्या या घराण्यात महान धृपद गायक तसेच बीन, रुद्र वीणा, सितार आणि सूरबहार वादक कलाकारांची परंपरा आहे. झिया मोहिउद्दिन यांनी आपले वडिल झियाउद्दिन डागर यांच्या स्मरणार्थ उस्ताद झियाउद्दिन डागर मेमोरिअल ट्रस्ट १९८८ मध्ये स्थापन केला, आणि त्या विद्यमाने धृपदाची प्राचीन सांगीतिक परंपरा जतन करून ठेवण्याचा प्रयास हाती घेतला आहे. या संस्थेने धृपद गायकीच्या शिक्षणासाठी पनवेल जवळील पळसपे येथे धृपद गुरुकूल नावाचा आश्रम उभारलेला आहे. तेथे गुरु-शिष्य परंपरेनुसार धृपद गानप्रणाली व वाद्य संगीताचे अध्यापन केले जाते.

मुंबईत चांगले आश्रयस्थान लाभलेले पंडित जसराज म्हणजे आणखी एक तेजस्वी तारा होय. सुप्रसिद्ध गायक पं. मोतिरामजी यांचे सुपुत्र जसराज यांनी सर्वोत्कृष्ट रीती, पक्का स्वर आणि लयीवरील प्रभुत्व या गुणांमुळे प्रचंड ख्याती प्राप्त केलेली आहे. मूळात नामांकित मेवती घराण्याचा वारसा लाभलेला असला तरी, असामान्य प्रज्ञा व स्वप्रतिभेच्या आधारे त्यांनी मेवती परंपरेला नवीन दिशा प्राप्त करून दिलेल्या आहेत. आपल्या गायनातील संवेदनशीलता आणि समर्पण भावना यामुळे जसराज यांचा एक खास ठसा उमटलेला दिसतो. हिंदुस्थानी संगीताला त्यांनी दिलेल्या विपुल योगदानापैकी जुगलबंदीचे अभिनव संकल्पन याचा खास उल्लेख करण्याजोगा आहे. अलंकृत आणि निनादी अशा आवाजाची देणगी लाभल्यामुळे गायनाच्या प्रारंभीच्या भरारीतच ते श्रोत्यांना संमोहित करतात. हा अष्टपैलू गायक धृपद, खयाल आणि तराना यांपासून कीर्तन आणि भजनापर्यंतच्या विविध गानप्रकारांमध्ये सारखीच कुशलता आणि कल्पकता आविष्कृत करू शकतो. उत्कट भावनात्मकतेची अभिव्यक्ती करण्याची क्षमता असलेल्या त्यांच्या आवाजामुळे त्यांच्या गायनात भक्तिभाव अधिकच प्रभावी होतो. त्यांच्या गायनातून इंद्रिय संवेदनांपेक्षा उत्कट भावनांचा प्रत्यय येतो. याचे वर्णन करण्यापेक्षा त्याचा अनुभव घेणे हा एक वेगळा आनंद असतो.

निश्चितपणे म्हणता येते की, महाराष्ट्रात जन्मलेली किराना ठुमरी हा एक स्वतंत्र गानप्रकार होय. या शतकाच्या प्रातःकाली उस्ताद अब्दुल करीमखाँ यांनी ठुमरीचे स्वरूपांतर घडवून आणले. मुख्यत्वे उत्तर हिंदुस्थानामध्ये प्रचलित असलेली काहीशी इंदियसंवेद्य आणि विलासी स्वरूपाची पूरब ठुमरी हीच्यापासून किराना ठुमरी अगदी भिन्न आहे. या शतकाच्या पूर्वार्धात कीर्ती प्राप्त केलेल्या पूरब शैलीच्या गायक-गायिकांमध्ये गोहरजान, मलकाजान, जोहराबाई, मौजूद्दिन खान, रसूलनबाई, सिद्धेश्वरी देवी, बेगम अख्तर, मेनकाबाई शिरोडकर आणि केसरबाई केरकर यांचा प्रामुख्याने समावेश केला जातो. किराना घराण्याने ठुमरी गायनात अभिप्रेत असलेली इंद्रियजन्य सुखलालसा, विरहाच्या वेदना आणि प्रियकर भेटीची उत्कंठा या भावनांचे उच्चाटन केले. त्याऐवजी किराना घराण्याने नवी ठुमरी उत्क्रांत केली. तिच्यात मुख्यतः सहानुकंपेचा (empathy) आशय, करुणा आणि दुःखशमन करून दयाळुपणासाठी परमेश्वराकडे करावयाची प्रार्थना अभिव्यक्त झाली. किराना गायकांनी ठुमरीला अभिजात सूरेलपणाचे स्वरूप देऊन खयालाच्या निकट नेऊन बसविली. हिंदुस्थानी संगीताच्या संपन्न कला भांडारात ही ठुमरी स्वतंत्र गानप्रकार म्हणून विराजमान होऊन अधिकच लोकप्रिय झाली. किराना घराण्याचे सर्वच गायक व गायिका, विशेषतः अब्दुल करीमखाँ, सवाई गंधर्व, गणपतबुवा बेहरे, सुरेशबाबू माने, हिराबाई बडोदेकर, गंगूबाई हनगल, भीमसेन जोशी, प्रभा अत्रे, फिरोझ दस्तूर, संगमेश्वर गुरव, यांनी ठुमरी गायनास उच्च प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. अखिल हिंदुस्थान तसेच परदेशीच्या संगीत रसिकांनी किराना ठुमरीची वाहवा केली, तिचा आस्वाद घेतला.[४०]

महाराष्ट्रातील कंठ संगीत जसे परप्रांताच्या संपर्कातून संपन्न आणि समृद्ध झाले, तसेच वाद्य संगीताच्या बाबतीत देखील घडले. भारतातील इतर प्रदेश आणि विशेषतः उत्तर हिंदुस्थानाशी जो संस्कृति-संपर्क घडून आला, त्यातूनच

येथील वाद्य संगीत संपन्न झाले. मात्र असे असले तरी वाकाटक कालीन महाराष्ट्रातील संगीत आणि नृत्याची शिल्पे आणि भित्तिचित्रे यांत बरीच संगीतवाद्ये चित्रित केलेली आढळतात. वाकाटक कालीन ग्रंथांमध्ये संगीतवाद्यांचे तात, आनद्ध, सुषिर आणि घन वाद्ये अशा चार प्रवर्गांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. तंतू (तात) वाद्यांच्या विपुल संचयागारामध्ये वीणा सर्वाधिक लोकप्रिय असल्याचे दिसते, आणि वीणेचे सर्वच प्रकार लक्षणीय होत. डॉ. मधुकर केशव ढवळीकर यांनी म्हटल्याप्रमाणे वाकाटक काळातील अनेक शिल्पे आणि रंगचित्रांमध्ये एकतंत्री वीणा चित्रित केलेली असून ती सांप्रतच्या एकतारी सारखी होती. सात तारा असलेली म्हणून "सप्ततंत्री" या नावाने ओळखली जाणारी धनुष्याकृती वीणा ही निश्चितच भारतीय होय. इ. स. च्या पहिल्या-दुसऱ्या शतकांमध्ये या वीणेचा मध्य आशियात प्रसार झाला, आणि पुढील काळात ती आग्नेय आशियात, आणि विशेषतः ब्रह्मदेशात प्रचलित झाली. आजही ब्रह्मदेशात सप्ततंत्री वीणा "सौन" (saun) या नावाने ओळखली जाते. वीणेचा हा प्रकार गुप्त कालखंडात संपूर्ण भारतीय उपखंडात प्रचलित होता. मात्र तद्नंतरच्या काळात ही वीणा भारतातून अदृश्य होऊन आता केवळ वस्तुसंग्रहालयांमध्ये प्रदर्शित केलेली दिसते.

सांप्रतच्या युरोपियन गिटारप्रमाणे भासणारी एक अभिनव वीणा वाकाटक-गुप्त कालखंडात भारतात लोकप्रिय झाली. या वाद्याला चार किंवा पाच तारा असून त्या भोपळ्याला आवळून बांधलेल्या असत. गुप्त सम्राटांच्या काही नाण्यांवर या वीणेचा ठसा आढळतो. कदाचित प्राचीन "कच्छपी" वीणा आणि तिचे स्वरूपांतर होऊन बनविण्यात आलेले सूरबहार हे वाद्य या प्रवर्गातीलच असावे. ही कच्छपी वीणा बलुचिस्तान आणि वायव्य सीमा प्रांतात "चिकारा" अथवा "रबाब" (rabaab, rabahb) या नावांनी ओळखली जात असून आजही वाजविली जात आहे. बहुधा दोन पोकळ भोपळे जोडून या प्रकारची वीणा कालांतराने परिष्कृत (refine) s करण्यात आली असावी. ही संस्कारित वीणा नवव्योंदहाव्या शतकातील वेरूळच्या लेण्यांमध्ये चित्रांकित केलेली असून, ती मध्ययुगीन काळात अधिक लोकप्रिय झाली. गौतम बुद्धाचा जन्म शिल्पांकित केलेल्या वेरूळच्या लेण्यातील एका प्रसंगात एक त्रिकोणी तंतू वाद्य दाखविलेले असून तसेच एक शिल्प तक्षशीला येथेही आढळून आले आहे. याच प्रकारचे वाद्य सातव्या शतकातील इराणमधील तक्-इ-बुस्तान (Tak–i–Bustan) येथील शिल्पातही दाखविण्यात आलेले आढळते. बहुतेक करून या वाद्याचा जन्म भारतातच झालेला असून त्याचे सांप्रतच्या स्वरमंडलाशी साधर्म्य दिसते.

अजिंठ्याचे लेणे क्रमांक सतरा आणि चारमध्ये सारंगी समान भासणारे एक प्रकृष्ट (sophisticated) वाद्य शिल्पांकित केलेले आहे. त्याच्या तारा आवळून बांधलेल्या असून एक अनुचर गजाच्या (bow) सहाय्याने ते वाजवित असल्याचे दिसते. काही संगीततज्ञांच्या मते सारंगी वाजविण्याचा गज प्रथमच आठव्या-नवव्या शतकांमध्ये अस्तित्वात आला असावा. तथापि अजिंठ्याला प्राप्त झालेल्या पुराव्यांनुसार पाचव्या शतकात देखील गजाचा उपयोग करीत असत, हे सिद्ध झाले आहे. म्हणून गृहित धरण्यास हरकत नसावी की, गजाचा उपयोग प्रथम भारतात करण्यात आला असून, येथून त्याचा प्रचार पुढे श्रीलंकेमध्ये झाला.

आनद्ध वाद्य प्रवर्गात तीन प्रकारचे मृदंग समाविष्ट असून त्यांना आंक्य, आंलिग्य आणि ऊर्ध्वक मृदंग अशा संज्ञा आहेत. आंक्य मृदंग समोर ठेऊन वाजविण्यात येतो. आलिंग्य मृदंग बगलांमध्ये धरून, तर ऊर्ध्वक मृदंग जमिनीवर ठेऊन वाजविण्यात येतो. आनद्ध प्रकारातील संगीत वाद्यांमध्ये पखवाज, संबळ, चौघडा, ताशा, ढोल, डफ, तबला यांचा समावेश होऊ शकतो. अर्थात यातील काही वाद्ये नंतरच्या ऐतिहासिक काळात निर्माण करण्यात आली होती. दुंदुभी हे वाद्य विशेषतः समरप्रसंगी वाजविण्यात येत असे. सुषिर प्रवर्गातील वेणू आणि तुतारी ही वाद्ये देखील अजिंठ्याच्या भित्तिचित्रांमध्ये चित्रित केलेली आहेत. टाळ आणि झांज यांचा घन वाद्य प्रकारात समावेश केलेला असून, अजिंठा येथील कलाकृतींमध्ये त्यांची विपुल चित्रे रंगविण्यात आलेली आढळतात.[४१] जवाहरलाल नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे अजिंठा आपणास दूरच्या, स्वप्नवत, तरी देखील विलक्षण वास्तव विश्वात घेऊन जाते.

महाराष्ट्रातील कंठ संगीत निश्चितपणे अधिक संपन्न असले, तरी महाराष्ट्राचे वाद्य संगीतातील योगदान सुद्धा कमी नाही. वाद्य संगीतातील महाराष्ट्राच्या योगदानाबाबत प्रचलित असलेली काही समज वस्तुस्थितीवर आधारित दिसत नाहीत. उपरोक्त ऐतिहासिक संदर्भांवरून याची सहज प्रचिती यावी. **गाथासप्तशती,** अजिंठा व वेरूळची लेणी, खिद्रापूरचे कोप्पेश्वर मंदिर, यवतचे भुलेश्वर मंदिर, गुरसाळे येथील रामलिंग मंदिर, मार्वंडी मंदिर समूह, **अभिलषितार्थचिंतामणि** आणि **संगीतरत्नाकर** यांतील पुराव्यांच्या आधारे यापूर्वीच जे वर्णन केलेले आहे त्यावरून सिद्ध होते की, महाराष्ट्रातील वाद्य संगीताने फार मोठी साधना आणि संचित करून ठेवले. अगदी पेशवा काळात देखील महनीय संगीत वादकांना राजाश्रय लाभला होता. उदाहरणार्थ, बाळाजी बाजीराव पेशव्याच्या दरबारात नारो अप्पाजी भावे नावाच्या सुप्रसिद्ध सितार वादकाला राजाश्रय प्राप्त झालेला होता. दुसरा एक सुप्रसिद्ध सितारपटू बाळाजीपंत हा तर रघुनाथराव पेशव्याकडे होता. शेवटचा पेशवा बाजीराव दुसरा याच्या दरबारात देखील देविदास नामक सुप्रसिद्ध सितार वादक, बहिरजी आणि नागू गुरव हे पखवाज वादक, तसेच तानसेनच्या घराण्यातील नामांकित गायक बिलासबरस खान या कलाकारांना आश्रय लाभलेला होता. इतिहासात नोंद घेणे आवश्यक आहे की, १८८० नंतरच्या दशकात पुणे गायन

समाजाच्या विद्यमाने भव्य संगीत महोत्सव आयोजित करण्यात येत असत. या महोत्सवांमध्ये सितार, पखवाज, सारंगी, जलतरंग, सूर-शृंगार आणि व्हायोलिनच्या एकल वादनास मानाचे स्थान देण्यात येई. सदर संस्थेने असाच एक महोत्सव प्रिन्स ऑफ वेल्स आणि ड्युक ऑफ एडिम्बरो यांच्या सन्मानार्थ २ ऑक्टोबर १८८३ रोजी आयोजित केला होता. बाळकोबा नाटेकर (सितार) आणि मुरारबुवा (सूर-शृंगार) हे तर या काळातील विख्यात वादक कलाकार होत. आपल्या कंठ संगीताच्या मैफलीला जोडून पंडित पलुसकर नेहमीच एकल वाद्य संगीताचा, आणि विशेषतः मृदंग, संवादिनी (पेटी) तसेच वाद्यवृंदाचे कार्यक्रम आयोजित करीत असत. विलक्षण अभिनव अशा तबलोंतरंगाचा परिचय करून देण्याचे श्रेय पलुसकांना देण्यात येते हे उल्लेखनीय होय. विख्यात कीर्तनकार पंडित काशिकरबुवा १८८५ च्या सुमारास पायपेटीचा भरघोस वापर करीत असत. त्यानंतरच्या कालावधीत तर अनेक महाराष्ट्रीय वादकांनी गायनाला साथसंगत तसेच एकल वादनात आपले श्रेष्ठत्व प्रस्थापित केले.

कोल्हापूर दरबारातील एक रत्न गोविंद सदाशिव टेंबे (१८८१-१९५५) यांनी हार्मोनियम वादनाची एक स्वतंत्र शैली निर्माण करून भारतीय संगीताच्या विश्वात नाव अजरामर करून ठेवले आहे. खरे तर गोविंदराव आणि हार्मोनियम या संज्ञा समानार्थक (synonymous) मानता येतील. पाश्चिमात्य हार्मोनियममधील सांगीतिक ध्वनींना त्यांनी हिंदुस्थानी स्वराभिमुख अशा गुणविशेषांनी अलंकृत करून ठेवले. या वाद्याला भारतीय संगीतात मानाचे स्थान प्राप्त करून देणारे पहिले तेच होत. खुद्द उस्ताद अलादियाखाँ यांचे शिष्य असल्याकारणाने त्यांच्या हार्मोनियम वादनावर जयपूर गानप्रणालीचा प्रभाव पडणे अगदी स्वाभाविक होते, आणि जयपूर अंगानेच त्यांचे वादन उमलून पूर्णत्व पावले. त्यांनी या वाद्याला हिंदुस्थानी कला संगीतातील सूरेलपणाचे स्वरून देऊन वेगळी प्रतिष्ठा मिळवून दिली. ते चांगल्यापैकी गायक नट आणि संगीत दिग्दर्शकही होते. गोविंदराव टेंबे यांच्यानंतर बेळगावच्या विठ्ठलराव कोरगावकरांनी किराना घराण्याच्या स्वरप्रधान गायकीचे बहुतांश गुणविशेष हार्मोनियममधून रसिकांच्या प्रत्ययाला आणून दिले. एकल वादनाद्वारे हार्मोनियम लोकप्रिय करण्याचे आणि तिला सामाजिक मान्यता मिळवून देण्याचे श्रेय कोरगावकरांकडे निश्चितच जाते. साधारणपणे १८८२ च्या सुमारास नाट्य संगीताला साथसंगतीचे वाद्य म्हणून पायपेटीला (pedal harmonium) फार मोठे महत्त्व प्राप्त झाले. सन १९०९-१० च्या सुमारास बालगंधर्व आणि इतर गायक नटांनी खास खरज स्वरांच्या जिव्हाळ्या (special bass reeds) असलेली पायपेटी प्रथमच उपयोगात आणली. नवीन स्वरूप धारण केलेल्या या वाद्याच्या घनगंभीर निनादामुळे त्याला ऑर्गन हे नाव प्राप्त झाले. वस्तुतः कांबळी आणि वामनराव देशपांडे यांच्या सारख्या विलक्षण कुशल ऑर्गन वादकांनी बालगंधर्वांच्या गाण्याला भव्यता व माधुर्य प्राप्त करून देण्यात बराच हातभार लावला. महाराष्ट्रातील कुशल हार्मोनियम वादकांमध्ये डॉ. पाबळकर, मधुकर पेडणेकर, अप्पा जळगावकर, गोविंदराव पटवर्धन यांचीही नावे खुलून दिसणारी आहेत. वर कथन केल्याप्रमाणे बहुतांश सर्वच भारतीय संगीत वाद्ये बनविण्याची मिरजेला प्रदीर्घ परंपरा आहे. भारतातच नव्हे तर परदेशातही मिरजेच्या वाद्यांना फार मोठी मागणी आहे. डिसेंबर १९६२ च्या सुमारास मिरजचे सितार बनविणारे कलाकार अब्दुल करीम व त्यांचे सुपुत्र यांनी बाळकृष्णबुवा कपिलेश्वरींच्या मार्गदर्शनाखाली एक नवीन प्रकारची वीणा तयार केली. "नवतंत्री" या नावाने ओळखल्या जाणाऱ्या या वीणेवर "श्रृतिस्वरसंवादाची सिद्धता" कशी त्वरित पटते हे बाळकृष्णबुवांनी मिरज, पुणे, मुंबई, बडोदा, अजमीर, जयपूर, दिल्ली, आग्रा इत्यादी ठिकाणी पटवून दिले.[४२]

काही वर्षांपूर्वी हैदरबक्ष आणि कादरबक्ष यांची नावे सारंगीशी समानार्थक मानली जात असत. आज मात्र सारंगीशी नाव जोडले जाते राम नारायण यांचे. वर कथन केल्याप्रमाणे हैदरबक्ष हे कोल्हापूर दरबारातील एक नामांकित सारंगी वादक होऊन गेलेत. तद्वतच गंधर्व संगीत मंडळीमध्ये विराजमान झालेले कादरबक्ष हेही एक लोकोत्तर सारंगी वादक होते. कादरबक्ष साहेबांनी केलेल्या सारंगी साथसंगतीने बालगंधर्वांच्या निमशास्त्रीय नाट्य संगीताच्या सौंदर्यात बरीच भर घातली. त्याना योग्य ते श्रेय देणे आवश्यक आहे. राजस्थानातून मुंबईला स्थलांतर केलेल्या राम नारायण यांनी सारंगीला नवीन दिशा प्राप्त करून दिल्या, आणि या वाद्याला सामाजिक मान्यता मिळवून दिली. विख्यात सारंगी वादक उस्ताद बुंदू खान आणि उस्ताद गुलाम साबीर यांच्याकडून त्याना प्रेरणा लाभली. तसेच ओंकारनाथ ठाकूर आणि कृष्णराव शंकर या बुजुर्ग गायकांनी देखील त्याना उत्तेजन दिले. आज सारंगी वादक म्हणून राम नारायण यांचे नाव अढळ असून, त्यांनी अखिल भारतात तसेच परदेशातही वाहवा मिळविली आहे. महाराष्ट्रातील अत्यल्प सारंगी वादकांमध्ये माजिद खान वय मेहबूब खान हे देखील प्रसिद्धी पावले.

उस्ताद अब्दुल करीमखाँ हे या भूमीवरील एक उत्तम बीन वादक होते. त्यांनी बीन वाद्याचे स्वर व झंकारांच्याद्वारे स्वराची शुद्धता आणि अचुकपणा या किराना गानप्रणालीच्या ध्येयधारणेचा पाया घातला. करीमखाँ यांचे समकालीन पंडित कृष्णराव मुळे हे देखील विख्यात बीन वादक होऊन गेलेत. यावरून आपणास महाराष्ट्राशी बराच काळ निगडित असलेल्या डागर घराण्यातील बीन आणि रुद्र वीणा वादकांच्या परंपरेचे स्मरण होते.

धृपद गानप्रणालीच्या डागर घराण्यातील नामांकित कलाकार उस्ताद झियाउद्दिन डागर हे तर लोकोत्तर बीन वादक होते. त्यांची बरोबरी करू शकणारे अत्यल्प. मैफलीतील एक प्रभावी वाद्य म्हणून त्यांनी रुद्र वीणेचे पुनरुज्जीवन केले.

"This seminal figure of Hindusthani music modified this ancient instrument to enhance its tonal quality, resonance and sound sustainance to make it ideally suited for the subtle and intensively expressive nature of the Dhrupad genre of the pristine form of classical music." (इंग्रजी आवृत्तीवरून). उस्ताद मोहिउद्दिन यांच्या ज्ञानदानानुसार त्यांचे सुपुत्र बहाउद्दिन डागर आणि या घराण्याच्या इतर बीनकारांनी भारतभर फार मोठी प्रसिद्धी मिळविली. धृपद शैलीच्या आविष्काराला सुयोग्य अशा सूरबहार वादनाचीही परंपरा डागर घराण्याने प्रस्थापित केलेली आहे. मोहिउद्दिन डागर यांचे शिष्य चंद्रशेखर नारिंग्रेकर हे अलीकडील काळात सूरबहार वादक म्हणून पुढे आलेले आहेत.

व्हायोलिन हे चार तारा असलेले युरोपियन संगीत वाद्य गजाच्या सहाय्याने वाजविले जाते. हिंदुस्थानी तसेच कर्नाटिक या दोन्ही परंपरांमधील वादकांनी या वाद्यातून भारतीय शास्त्रोक्त संगीताचे स्वर प्रकट करण्याच्या अंगभूत गुणवत्तेचा (inherent quality) न्दाज घेतला. आणि व्हायोलिनला भारतीय संगीत वाद्यांमध्ये स्थान प्राप्त करून दिले. गजाननराव जोशी (१९१०-१९८७) यांनी १९२६ पासून धडाक्याने व्हायोलिन वादन सुरू करून त्याला मैफलीत आणले. त्यानंतर मात्र या वाद्याने मैफलीतील वाद्य म्हणून प्रतिष्ठा प्राप्त केली. गजाननरावांच्या नंतर श्रीधर पार्सेकर, व्ही.जी. जोग, गजानन कर्नाड, पुष्पलता कुलकर्णी आणि डी.के. दातार या सर्वांनी हिंदुस्थानी संगीत परंपरेतील प्रमुख व्हायोलियन वादक म्हणून कीर्ती मिळविली.

एका कथेनुसार सितार शोधून काढण्याचे श्रेय अमीर खुस्रोला दिले जात असले, तरी स्वतः त्याने किंवा इतिहासकार अबुल फझल याने देखीत तसे कोठेच नमूद केलेले नाही. खरे तर आठव्या शतकातील एका संदर्भामध्ये सितारचा "निबद्ध तंबुरा" असा उल्लेख केलेला असून तो पश्चिम आशियामध्ये प्रचारात असलेल्या सितार सारखा होता. कदाचित सात तारा असलेल्या वीणेचे सितार हे परिवर्तित स्वरूप असावे. वर कथन केल्याप्रमाणे विख्यात सितार वादक नारो अप्पाजी भावे, बाळाजीपंत आणि देविदास हे सुप्रसिद्ध कलाकार बाळाजी बाजीराव, रघुनाथराव आणि दुसरा बाजीराव पेशव्यांच्या दरबारात विराजमान झालेले होते. यावरून अनुमान काढणे स्वाभाविक आहे की, महाराष्ट्रात किमान बाळाजी बाजीरावाच्या कारकिर्दीपासून म्हणजेच १७४०-१७६१ पासून सितार हे मैफलीतील वाद्य म्हणून प्रचारात होते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या चतुर्थकात सितारला पूर्वीपेक्षा अधिक प्रतिष्ठा प्राप्त झाली. बाळकोबाजी नाटेकर याना प्रिन्स ऑफ वेल्स ड्यूक ऑफ एडिम्बरो यांच्या सन्मानार्थ पुण्याला आयोजित केलेल्या मैफलीत एकलवादन करण्यासाठी निमंत्रित करून सन्मानित करण्यात आले होते.

सितार हे हिंदुस्थानी अभिजात संगीतातील सर्वाधिक लोकप्रिय वाद्य होय. अमीर खुस्रो सितारचा संशोधक आहे अथवा कसे याबाबत जरी वाद असला, तरी पंडित रवी शंकर म्हणतात त्याप्रमाणे अमीर खुस्रोने तत्कालीन त्रितंत्री वीणा अथवा परवादीनी यासारख्या कोणत्या तरी वीणेच्या बांधणीत बदल करून तिला सितारचे रूप दिलेले असावे. नंतर सितार वादनामधील विविध शैलींचे बाज निरनिराळ्या घराण्यांनुसार प्रचलित झाले. कर्मठ सितार वादक आपापली वैशिष्ट्यपूर्ण शैली वाजवून त्यापलीकडे मर्यादातिक्रमण करीत नसे. तथापि रवी शंकर आणि विलायत खान या दोघांनी सितार वादनाच्या कक्षा (spectrum) विस्तारित केल्या. तिसरे घराणदार सितार वादक अब्दुल हलम जाफर खान यांनी पारंपरिक वादन शैलीत प्रभुत्व प्राप्त करून संगीत रसिकांमध्ये लोकोत्तर अशी लोकप्रियता प्राप्त केली. संगीत जगतातील अलौकिक प्रतिभाशाली (prodigy) असे अब्दुल हलीम जाफर खान यांचा जन्म मध्यप्रदेशातील जवरा येथे १९२९ मध्ये झाला, आणि लवकरच आपल्या वडिलांसह ते मुंबईत दाखल झाल्यापासून या महानगराच्या संगीत विश्वात त्यांनी रंग भरला. बिनकार आणि इंदूरच्या बंदे अलीखाँ घराण्याचे सितार वादक असलेले त्यांचे पिताजी उस्ताद जाफर खान यांच्याकडून त्यांनी विद्या प्राप्त केली.

अनेक वर्षांची तपश्चर्या आणि अलौकिक स्वप्रज्ञेच्या जोरावर हलीमभाईंनी सितारवर तसेच संगीत विद्येवर प्रभुत्व मिळविले. स्वरांचे माधुर्य बोटांतून व्यक्त करण्याची क्षमता असलेले हलीमभाई अत्यंत उत्साहाने संकल्पन करून, कंठ संगीत आणि बीन या वाद्यातील गुणविशेषांचे सितार वादनात संमिश्रण करतात. मसितखानी आणि रझाखानी शैलींमध्ये प्राविण्य मिळविल्यावर हलीमभाईंनी अभिनव प्रयोग करून आपला स्वतंत्र असा जाफरखानी बाज निर्माण केला. सितार वादनातील ही जणु काय एक क्रांतीच होती. जाफरखानी बाजाच्या अनेक विशेषता असून त्याद्वारे सितारीचे बोल विलक्षण मनोहारी वाटतात. हलीम जाफर खान यानी चंपाकली, अरज, श्यामकेदार, बसंत मुखारी, राजेश्वरी यासारखे अत्यंत सुंदर असलेले तथापि काळाच्या ओघात अप्रचलित झालेले राग पुन्हा प्रचारात आणून संगीत जगताची हानी भरून काढली आहे. तद्वतच उत्तर भारतीय संगीत प्रेमींना त्यांनी कर्नाटिक रागांचा परिचय करून दिला. भारतीयच नव्हे तर संपूर्ण जगताची संगीतात भर घालण्यासाठी म्हणून की काय, त्यांनी बऱ्याच रचना करून ठेवलेल्या आहेत.

देशातच नव्हे तर सर्व जगतात प्रतिभावान सितार वादक म्हणून त्यांनी कीर्ती प्राप्त केलेली आहे. त्यांच्या सितार वादनातून रसिकाला वेगळ्याच स्तरावरील शुद्ध भावमयतेचा अनुभव येतो. त्यांचे हस्तकौशल्य तर अद्वितीयच होय.

त्यातून ते सितारमधील अंगभूत अशा सांगीतिक गुणधर्मांचा आविष्कार करून दाखवितात. प्रसन्न व्यक्तिमत्त्व असलेले खानसाहेब मुसलमान असूनही त्यांच्या आचरणातून हिंदू देवदेवतांबाबत विलक्षण भक्तिभाव व्यक्त होतो. त्यांना संस्कृत श्लोक आणि मंत्र मुखोद्‌गत असून शुद्ध वाणीतून ते म्हणून दाखविताना त्यांच्यातील लौकिकतेचा (secularism) प्रत्यय येतो.

कालांतराने मुंबईतील एक उद्योगपती अरविंद पारेख हे नामांकित सितार वादक उस्ताद विलायत खान यांचे शिष्य म्हणून उदयास आलेत. मुंबईमध्ये काही वर्षे वास्तव्य असलेल्या विलायत खान साहेबांच्या सितारच्या चित्तवेधक आणि संमोहनकारी स्वरांनी महाराष्ट्रातीलच नव्हे, तर अखिल विश्वातील संगीत रसिकांना भुरळ पाडली. उस्ताद विलायत खान आणि पंडित रवी शंकर या दोघांना मुंबई व पुण्यातील श्रोतृवृंदाने अक्षरशः भारून टाकल्याचे प्रस्तुत लेखकाने पाहिले आहे. मुंबईत काही वर्षे निवास केलेल्या अलौकिक रवी शंकर यांनी पौर्वात्य तसेच पाश्चिमात्य संगीत जगतात अद्वितीय स्थान प्राप्त केलेले आहे. या अष्टपैलू सितार वादकाने जगभरातील मैफलींच्या सर्व सभागृहांमध्ये आस्वादक तसेच टीकात्मक दृष्टी असलेल्या श्रोतृवृंदांपुढे सितार वादन केलेले आहे. लोकोत्तर असे उस्ताद अलाउद्दिनखाँ यांचे शिष्य असलेल्या रवी शंकरांनी सितार वादन, अध्यापन तसेच सितारची लोकप्रियता वृद्धिंगत करण्याचे कामी प्रचंड कामगिरी केलेली आहे. या सर्व पृथ्वीतलावर संपन्न भारतीय संगीताचा वारसा प्रसारित करण्याचे कार्य करून त्यांनी या कलेतील सौंदर्य जगाला उलगडून दाखविले. भारतीय अभिजात संगीताचा विपुल वारसा या माध्यमातून आंतरराष्ट्रीय सलोखा आणि बंधुभाव निर्माण करण्यासाठी ते प्रयत्न करीत आहेत. लॉर्ड ॲटनबरो यांच्या "गांधी" या चित्रपटाला रवी शंकरांनी नाट्य विषयाला अनुरूप असे उत्तम संगीत दिल्याकारणाने त्याना १९८२ चा ऑस्कर पुरस्कार लाभला. सरोद पटू उस्ताद अली अकबर खान हे देखील रवी शंकर यांच्यासह भारतीय संगीताद्वारे आंतरराष्ट्रीय सद्‌भाव निर्माण करण्याच्या महत्कार्यात सहभागी झालेले आहेत. उस्ताद अलाउद्दिन खान यांचे सुपुत्र आणि पंडित रवी शंकरांचे गुरुबंधू असलेले अली अकबर यांनी देखील काही काळ मुंबईत वास्तव्य करून सरोद वादनात विलक्षण उंची गाठली. तथापि लोकविलक्षण अशी लोकप्रियता लाभल्यानंतर रवी शंकर, विलायत खान तसेच अली अकबर खान यांनी मुंबईतून स्थलांतर केले. सरोद वादनातील आणखी एक मोठे व्यक्तिमत्व म्हणून मान्यता पावलेल्या झरीन दारूवाला याही मूळच्या मुंबईच्याच. यांच्या सरोदच्या उदात्त आणि अलंकृत स्वरांनी महाराष्ट्रातच नव्हे, तर संपूर्ण भारतीय संगीत विश्वात कीर्ती मिळविली.

केवळ लोकसंगीताशी निगडित असलेली प्राचीन वेणू तथा बासरीला मैफलीतील संगीत वाद्याचा दर्जा प्राप्त करून दिला पन्नालाल घोष (१९११-१९६०) या प्रतिभावान बासरी वादकाने वेणू, मुरली, पावा, बासरी ही नावे असलेल्या मूळच्या बासरीची ध्वनी लहरी निर्माण करण्याची क्षमता मर्यादित होती. शंख प्रवर्गातील या शुद्ध भारतीय लोकवाद्याच्या रचनेत पन्नाबाबूंनी परिवर्तन करून सात छिद्रांची मोठी व लांब अशी बासरी घडविली, भारतीय शास्त्रोक्त संगीताला सुयोग्य अशा ध्वनी लहरी आणि स्वरनिर्मितीची क्षमता बासरीमध्ये आणून दिली. पन्नाबाबूंनी नवीन बासरी प्रचारात आणल्यानंतर पूर्वीची उभी बासरी मैफलीतून अदृश्य झाली, मात्र ती अद्याप अज्ञातवासात गेलेली नाही. उभ्या बासरीच्या उच्च स्वरस्तरामुळे (high pitch) अद्याप ती वाद्यवृंदामध्ये उपयोगात आणली जाते. तथापि सध्याची आडवी बासरी लोकप्रिय करण्याचे श्रेय पन्नाबाबूंकडेच जाते. आवश्यक सांगीतिक क्षमता असलेल्या नव्या बासरीला पन्नाबाबूंनी मैफलीतील एकल वाद्य म्हणून अभूतपूर्व वैभव आणि प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. या प्रतिभावान व परिपूर्णतावादी कलाकाराने आपल्या बासरीद्वारे संगीत जगताला थक्क करून सोडले. त्यांच्यानंतर उत्कृष्ट बासरी वादक म्हणून मैहर घराण्याच्या हरीप्रसाद चौरसिया यांचा उदय झाला. त्यांनीही सर्व जगभर कीर्ती संपादन केली. "Chaurasia is at once a traditionalist and an innovator, making his performances a study of fascinating contrasts. He is among the few Indian classicists, who have made efforts to enlarge the audience for classical music". (इंग्रजी आवृत्तीवरून). पारंपरिक गुरुकुल प्रणालीनुसार संगीताचे अध्यापन करण्यासाठी मुंबईत एक आश्रम काढण्याचे त्यांचे प्रयत्न गौरवास्पद होत. बनारसला जन्मलेले परंतु मुंबईत राहणारे रोणू मजुमदार हे मैहर घराण्याचे आणखी एक बासरी वादक उदयास येत आहेत. मुंबईतील रसिकांच्या आश्रयामुळे त्याना येथे स्थायिक होण्याची प्रेरणा मिळाली. शंकरराव गायकवाड, बाबुराव देवळणकर, बाबुराव खळदकर, सिदराम जाधव यांसारख्या मराठी कलाकार वादकांनी प्राचीन सनई वादनाला मंदिर आणि उत्सवातून मुक्त करून मैफलीत आणले आहे.[४३]

खयाल गायकीप्रमाणेच शास्त्रोक्त तबला वादन परप्रांतातून आणि विशेषतः उत्तरेकडून महाराष्ट्रात अवतरले. तबल्यातील कलात्मकतेची खास ओळख महाराष्ट्राला करून दिली अहमदजान थिरकवा या अतुलनीय कलाकाराने. तबला वादन किती चित्तवेधक आणि संमोहनकारी असू शकते याचा नवा अनुभव थिरकवा साहेबांनी दिला. नमूद करण्यासारखे असे की, लहानपणीच तबल्यावर "थिर्र थिर्र" असे बोल काढण्यात पटाईत म्हणून त्यांना थिरकू, थिरकवा अशी नावे मिळाली. उत्तर प्रदेशातील अज्राडा गावच्या थिरकवा (जन्म १८८०)[४४] यांनी बालगंधर्वांना

साथसंगत करून तबला काय चीज आहे, याचा मराठी रसिकांना प्रत्यय आणून दिला. आणि म्हणूनच महाराष्ट्राने अनेक कारणास्तव थिरकवा यांना आपले भूमिपुत्र मानले. इंदूरचे जहांगीरखाँ, मुंबईचे अमीर हुसेनखाँ, मुनिर खान, अलादिया खान (१८८०-१९३९), मेहबूब खान मिरजकर, बाळुभाई रुकडीकर, गुरुदेवजी पटवर्धन, उस्ताद अलारखाँ यांच्या प्रेरणेने आणि शिकवणुकीने महाराष्ट्रातील तबला वादनातील कलात्मकतेची जोपासना होत गेली, आणि तबला वादनात नवनवीन कलाकार उदयास आले. कालांतराने महाराष्ट्रात तबला वादन चांगलेच प्रस्थापित झाले. आणि विशेष म्हणजे तबला वादनातील एका घराण्याला "मुंबई घराणे" असे नाव प्राप्त झाले. तद्वतच महाराष्ट्रात आकार घेतलेल्या एका पखवाज वादन शैलीला "भजनी बाज" असे नाव प्राप्त झाले. विख्यात पखवाज वादक पानसे हे जरी इंदुरला स्थायिक झाले असले तरी महाराष्ट्रातील अनेक पखवाज वादक पानसे घराण्याचे कलाकार मानले जातात. गुरुदेव पटवर्धन, माखनजी, शंकरभय्या आणि मन्याबापू कोडीतकर यांनी पखवाज वादक म्हणून बरीच कीर्ती मिळवली. शिवरामबुवा शाळिग्राम हे अलादियाखाँ साहेबांना पखवाज साथ करीत, तर साधलेबुवा पखवाजी हे प्रसिद्ध कुदेसिंग घराण्याच्या परंपरेतील कलाकार कोल्हापूरला होते. उस्ताद अलारखाँ यांचे तेजस्वी सुपुत्र उस्ताद झाकिर हुसेन खान आणि नयन घोष हे महाराष्ट्रातील दोन गुणसंपन्न तबला वादक अलीकडील काळात खूप प्रसिद्व झालेले आहेत. आपल्या वडिलांप्रमाणेच झाकिर हुसेन हे देखील तबला वादनाचे ईश्वरी वरदान लाभलेले कलाकार असून त्यांनी हिंदुस्थानातील आघाडीच्या सर्व गायक-वादकांना साथसंगत केली आहे व करीत आहेत. सुप्रसिद्ध गिटार वादक John McLaughlin यांना तबल्याची साथसंगत करण्याचा बहुमान उस्ताद झाकिरांना लाभलेला आहे. "He has indeed reached heights of unsurpassed excellence with his superb drumming technique and innate sense of rhythm". महाराष्ट्रातील तबला पटूंमध्ये शमसुद्दिनखाँ, घम्मणखाँ व राजाभाऊ अर्काटकर या गेल्या पिढीतील आणि डी.आर. नेरुरकर, लालजी गोखले, चंद्रकांत कामत, वसंतराव आचरेकर, पंडित नागेशकर, सुरेश तळवलकर, आत्माराम कुमठेकर, सदाशिव पवार, निझामउद्दिनखाँ इत्यादी अलीकडील तबला नवाजांचाही उल्लेख करावा लागतो.

प्राचीन काळी संतूरला शततंत्री वीणा ही संज्ञा तिच्या शंभर तारांवरून पडली होती. ही जगातील निरनिराळ्या भागांमध्ये निरनिराळ्या स्वरूपात आढळते. पूर्व युरोप खंडात तिला सिम्बॅलोम (cymbalom) तर तुर्कस्तानमध्ये कनून (kanoon) अशी नावे आहेत. संगीतातील विभूतिवत अशा शिवकुमार शर्मा यांनी काश्मिर आणि अफगाणिस्तानात प्रचलित असलेल्या लोकवाद्याचे स्वरूपांतर करून त्याला संगीत जगतात विलक्षण मोठे स्थान प्राप्त करून दिले. हिंदुस्थानी अभिजात वाद्यांमध्ये संतूरला आज जे मानाचे स्थान प्राप्त झालेले आहे, त्यामागे शिवकुमार शर्मांची प्रज्ञा व प्रतिभा आहे. प्रारंभी आपले वडील पंडित उमादत्त शर्मा यांच्याकडून संतूरचे शिक्षण घेतल्यावर शिवकुमारजींनी सातत्याने विविध प्रयोग केले आणि मूळच्या लोक वाद्यातील सांगीतिक क्षमता वृद्धिंगत करून जणु काय नवीनच वाद्य निर्माण केले. म्हणूनच त्यांच्या संतूर वादनात केवळ असामान्य अष्टपैलूपणाच नव्हे, तर रसिकांना संमोहित करून टाकण्याची गुणवत्ता प्राप्त झालेली आहे. त्यांच्या संतूरने अखिल जगतात लोकप्रियता प्राप्त केलेली आहे. संतूरच्या शंभर तारांमधून ते विशाल कक्षा असलेले आविष्करण करीत असतात, तसेच मुलायम संवेदनांपासून निनादी उत्कटतेपर्यंतचे उत्तम प्रकटीकरणही करून दाखवितात.

कंठ संगीत तसेच वाद्य संगीत या दोन्हीही कलाविष्कारांमध्ये महाराष्ट्राचे योगदान इतके मोठे आहे की, या संक्षिप्त इतिहासात प्रत्येक कलाकाराच्या कलोपासनेचा आढावा घेणे शक्यच नाही. शिवाय कला आणि संस्कृती विषयक या अभ्यासाच्या संकल्प कक्षांच्या ते बाहेरचे होईल. म्हणूनच या विषयाचा समारोप करताना वर उल्लेख न केलेल्या कलाकारांपैकी काही निवडक नावांचाच उल्लेख करणे आवश्यक होय. यांत भेंडीबाजार घराण्याचे बुजुर्ग गायक पं.टी. डी.जानोरीकर यांचा नामोल्लेख करणे उचित. विस्मरणात गेलेल्या भेंडीबाजार गायकीची सधनता व विशेषतांचे जानोरीकरांनी पुनरुज्जीवन केले आहे. याच घराण्याचे उस्ताद अमन अली या कीर्तिमान गायकाचेही महाराष्ट्रात वास्तव्य होते. देवास घराण्याचे अमानत खान यांनीही महाराष्ट्रात राहून आपल्या घराना गायकीची लिज्जत येथील आस्वादकांना दाखवून दिली. मुंबईच्या रूपायतन ॲकॅडमी ऑफ म्युझिकचे प्राचार्य माणिकबुवा ठाकुरदास यांना त्यांचे वडील यशवंतबुवा ठाकुरदास यांचेकडून विद्या प्राप्त झाली. यशवंतबुवा हे तर भास्करबुवा बखलेंचे पट्टशिष्य होऊन गेलेत. वडिलांच्या निधनानंतर माणिकबुवांनी मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांचेकडून तालीम घेतली. सुविख्यात रामपूर-साहसवन घराण्याचा ऋणानुबंध तानसेनच्या परंपरेशी आहे. उस्ताद हफीझ अहमद खान हे या घराण्याचे महाराष्ट्रातील प्रमुख कलाकार म्हणून मान्यता पावले. रामपूर-साहसवन घराण्याच्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध कलाकारांमध्ये मुश्ताक हुसेन खान, निसार हुसेन खान आणि गुलाम मुस्तफा खान यांचा समावेश करता येईल.

महाराष्ट्र भूमीने आपले कला जगत फुलविण्यास व समृद्ध करण्यास ज्या कलाकारांना जन्म दिला अथवा निवासासाठी आकर्षित करून घेतले, त्यांत दशरथबुवा मुळे, शंकरराव कपिलेश्वरी, बन्नूबाई लाटकर, शंकरराव सरनाईक व सरस्वती राणे (किराना घराना), ब्रिज नारायण, दिनकर कैकिणी, श्रुती सडोलीकर (जयपूर घराण्याचे वामनराव सडोलीकर यांच्या सुकन्या), जोत्सना भोळे, वसंतराव देशपांडे, शोभा गुर्टू, वीणा सहस्त्रबुद्धे, के.जी. गिंडे,

वि.रा. आठवले, एस.एन. रातंजनकर, राम मराठे, माणिक वर्मा, अरविंद मंग्रुळकर, शरदचंद्र आरोळकर, पद्मावती गोखले शाळिग्राम, यशवंतबुवा जोशी, मालिनी राजूरकर, वसंतराव राजोपाध्ये, पद्मा तळवलकर, शालिनी नार्वेकर, कृष्णा हनगल इत्यादींचाही समावेश होतो.

वस्तुतः अभिजात संगीत हा अखंड हिंदुस्थानचा उदात्त वारसा (sublime heritage) असून मागील २००० वर्षांतील अनेक पिढ्यांनी तो समृद्ध केला, त्याची गुणसंपन्नता वृद्धिंगत केली. वीस शतकांतील अभिजाततेच्या परंपरेने आम्हा भारतीयांनाच नव्हे, तर अखिल मानव जातीला विविधांगी नटलेले हे मोठे वरदान दिलेले आहे. मात्र हे देखील मान्य करावेच लागते की, हिंदुस्थानी कला संगीताचा महाराष्ट्रातील रसिकांनी जितका स्वीकार केला, आस्वाद घेतला, तितका इतर भारतीयांनी घेतला नाही. कोणत्याही एका प्रांताने संगीताला महाराष्ट्राइतके योगदान दिलेले नाही. हे खरे की, या भूमीतील कलाकारांनी संगीत कला परप्रांतीयांकडून आत्मसात केली, आणि या कलेत प्राविण्य मिळविले. तथापि ही कला त्यांनी येथूनच वृद्धिंगत केली. कलेचे वरदान लाभलेल्या येथील असंख्य संगीतकारांनी भारतीय उपखंडातच नव्हे, तर पाचही खंडांमध्ये कीर्ती मिळविली. जगभर त्यांचे संगीत जलसे होत आहेत. महाराष्ट्राने जसा शेकडो विख्यात संगीतकारांना जन्म दिला, तसा या राज्याने शेकडो परप्रांतीय कलाकारांना देखील उदार लोकाश्रय दिला. काश्मिर-पेशावर पासून अगदी कन्याकुमारीपर्यन्त आणि ढाका-गुवाहाटीपासून मुंबई पर्यन्तच्या विशाल भूभागातील गायक व वादक महाराष्ट्राकडे आकर्षित झालेत. त्याची कारणे आहेत :- येथील आस्वादकतेची परंपरा, जाणकार संगीतप्रेमी, पलुसकर आणि बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर यांच्यासारख्या आद्यप्रवर्तकांनी केलेले कला विषयक प्रवर्तन, संगीत अध्ययनाच्या सुविधा, नागरीकरण व औद्योगीकरणाने आलेली सुबकत्ता, आणि सामाजिक सहिष्णुता. अन्य प्रांतांमधील राजाश्रय संपुष्टात आल्यावर तेथील कलाकार रसिकांच्या आश्रयार्थ येथे स्थलांतरित झालेत, स्थायिक झालेत. असे शेकडो मूळचे परप्रांतीय कलाकार येथे राहून गेलेत. आजही राहत आहेत. त्याला कारण आहे रसिकांचा आश्रय. विविध संगीत घराण्यांची गानशैली अथवा वादन प्रणाली येथे स्वरूपसंपन्न झाली. अनेक नामवंतांच्या कलाविष्काराचे वर्णन वर दिलेले आहेच. तरी देखील महाराष्ट्रात आणि विशेषतः मुंबईत होऊन गेलेल्या अथवा आजही वास्तव्य करीत असलेल्या महनीयांचा पुढे उल्लेख करणे उचित वाटते. तथापि इतके स्पष्ट केले पाहिजे की, ही श्रेय नामावली केवळ प्रतीकात्मक असून परिपूर्ण नाही : खाँसाहेब नथ्थनखाँ, उस्ताद अलादियाखाँ, उस्ताद करीमखाँ, विलायत हुसेन खान, हैदरखाँ, भूर्जीखाँ, मंजीखाँ, नथ्थन खान (अलादियाखाँ यांचे पुतणे), उस्ताद निसार हुसेन खान, छोटे महम्मद खान, वझिर खान, युसुफ खान, वलीबक्ष, रजब अली खान, वहीद खान, अली हुसेन खान, उस्ताद विलायत हुसेन, महम्मद अली खान, रहिमत खान, रोशन आरा बेगम, उस्ताद नझिर खान, उस्ताद बडे गुलाम अली खान, उस्ताद अहमदजान थिरकवा, कामता प्रसाद, हैदरबक्ष, कादरबक्ष, गायिका साहेबजान व सोपीजान, खादिम हुसेन खान, उस्ताद जाफर खान व त्यांचे सुपुत्र उस्ताद हलीम जाफर खान, रहिमुद्दिन डागर, झियाउद्दिन डागर, झिया मोहिउद्दिन डागर, फरिदुद्दिन डागर व बरेच डागर बंधू व सुपुत्र, उस्ताद हफीझ अहमद खान, मुश्ताक हुसेन खान, निसार हुसेनखाँ, गुलाम मुस्तफा खान, अमानत खान, उस्ताद अमन अली, गामे खान, उस्ताद अलारखान, शिवकुमार शर्मा, हरी प्रसाद चौरासिया, पन्नालाल घोष, निखिल घोष, राम नारायण, पंडित जसराज, रवी शंकर, विलायत खान, देवेंद्र मुरडेश्वर, अली अकबर खान, निझामुद्दिन खान, माजिद खान, मेहबूब खान, गजानन कर्नाड, मौजुद्दिन खान, विजय राघवराव, रोणू मजुमदार, इत्यादी.

निश्चितपणे पंडित पलुसकर आणि बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर हे महाराष्ट्रातील संगीत अध्यापन आणि संशोधनाचे आद्यप्रवर्तक होत. याबाबत वर विवेचन केलेले आहेच. ज्या काळी संगीत अध्ययनासाठी संस्था स्वरूपात अजिबात सुविधा नव्हती, त्या काळी पलुसकरांनी लाहोरला संगीत महाविद्यालय स्थापन केले. थोड्याच वर्षात मुंबई, पुणे, नागपूर, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी महाविद्यालयाच्या शाखा कार्यरत केल्या. पलूसकरांनी धर्मशीलतेने संगीत प्रसाराचे आद्यकार्य केले. देऊळ आणि दरबार यापेक्षा निराळे एक पीठ तयार करून, तेथे गायकाची स्थापना झाली पाहिजे, हा फार मोठा विचार त्यांनी आणला. त्यासाठी सारे आयुष्य वेचले. या महान भारतीय कलेला लोकाश्रय प्राप्त करण्यासाठी कल्पकतापूर्ण मार्गांचा अवलंब केला. १८९७ मध्ये खुला संगीत समारोह आयोजित करून व त्यास यथोचित प्रसिद्धी देऊन त्यांनी तिकीट विकण्याची प्रथा प्रथमच सुरू केली. सामुदायिक आवाहनासारखी प्रार्थना, एकल वाद्य संगीत, मृदंग आणि हार्मोनियम वादन, वाद्यवृंद, **रामायणा** वरील प्रवचन अशा लोकप्रिय प्रकारांची संगीत मैफलींना जोड देऊन त्यांनी मैफलीसाठी श्रोतृवर्ग जमविण्याची कल्पकता योजली. त्यामुळे सामान्य जन देखील तिकीट काढून संगीत समारोहाला येऊ लागले. कला संगीत लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी संगीत परिषदांचा उपक्रम सुरू केला. तिकीट विकून आज मोठ्या प्रमाणात संपन्न होत असलेल्या संगीत परिषदांचे पूर्वप्रवर्तक विष्णू दिगंबरच होत. अशा समारोहांमध्ये राग आळवण्याचा कालावधी मर्यादित करून, राग संगीत सामान्य रसिकालाही रोचक वाटेल असे शिस्तबद्ध केले. तिकीट विक्रीव्यतिरिक्त देणग्या मिळविण्याचीही प्रथा पाडण्यात आली. विष्णू दिगंबरांनी संगीत शिक्षण व प्रसाराला अगदी अभिनव स्वरूप देऊन संगीताची अभूतपूर्व सेवा केली. म्हणूनच "महाराष्ट्राचे संगीताचार्य" या नामाभिधानास ते पात्र ठरलेत. संगीत जगतातील अनेक उपक्रमांचे ते आद्यप्रवर्तक होते हेच खरे.

संगीत प्रसाराचे दुसरे आद्यप्रवर्तक विष्णू नारायण भातखंडे (१८६०-१९३६) यांनी देखील संगीत सम्मेलनाचे रूपाने भव्य समारोह आणि उत्सव आयोजित करण्यात पुढाकार घेतला. १९१८-१९२२ दरम्यान पलुसकरांनी भारतात पाच संगीत परिषदा आयोजित केल्या, तर भातखंडेंनी १९१६-१९३० दरम्यान आठ संम्मेलने संपन्न केलीत. भातखंडे बुवांनी अनेक दुर्मिळ चिजा आणि अप्रचलित राग संकलित करून स्वतःच्या नोटेशन पद्धती अनुसार लेखन केले. कष्टाने संपादन केलेल्या साधनसामग्रीचा अभ्यासकांना उपयोग व्हावा म्हणून **हिंदुस्थानी संगीत पद्धती** हा उत्तम ग्रंथ लिहिला. संगीत विषयावर त्यांनी मौलिक लेखन करून हा ज्ञानाचा ठेवा जतन करून ठेवला. स्वाभाविकपणे त्यांचे हे कार्य अजरामर मानले जाते.

तथापि भातखंडे यांच्या विवेचनातील दोषांचा शास्त्रीय दृष्टीने ऊहापोह करणारे साहित्य अगदी थोडेच. त्यामुळे वादही उपस्थित झालेत. भारतीय संगीत शास्त्रामधील श्रुति, स्वर, ग्राम, मूर्च्छना इत्यादी संकल्पनांचा अर्थ लावण्याचे बाबतीत पुष्कळ वर्षे वाद उपस्थित झालेत. शास्त्रीय संगीतात हार्मोनियम शिरल्यानंतर प्राचीन भारतीय संगीताबाबत गैरसमज निर्माण झाले. आणि परिणामतः श्रुति आहेत किंवा नाहीत, असल्यास त्यांची संख्या किती, स्वरसप्तकाचे स्वरूप काय, आदि प्रश्नांचा उकल करण्यासाठी करीमखाँ साहेबांनी आपल्या हयातीत खूप प्रयत्न केलेत. विशेष म्हणजे अब्दुल करीमखाँ मुसलमान असूनही शुद्ध भारतीय संगीत शास्त्रातील सिद्धांतांचाच पुरस्कार करणारे होते. या संगीत शास्त्राबद्दल त्यांना विलक्षण अभिमान होता. श्रुति हा भ्रम नसून संगीत आविष्कारातील वस्तुस्थिती असल्याचे पटवून देण्यासाठी खाँसाहेबांनी हयातभर निरलसपणे उपक्रम केला. कृष्णाजी बळवंत देवल आणि क्लेमेंट्स यांच्या संगीत शास्त्रातील संशोधन कार्याचे आधारस्तंभ तर करीमखाँ साहेबच होते. खाँसाहेबांनी शास्त्रीय विवेचनाला प्रात्यक्षिकांची जोड देऊन आपला श्रुति विषयक निर्वाळा (निर्णय) ज्ञात्यांना आणि जिज्ञासूंना पटवून देण्याचा प्रयत्न जन्मभर केला. त्यांनी केलेले हे कार्य अतुलनीय असल्याचे वरही प्रतिपादन केलेले आहे. मात्र तरी देखील हे प्रश्न पुन्हा पुन्हा उपस्थित करण्यात आलेत. श्रुति विषयीचा वाद तर अधिकच तीव्र झाल्याचे दिसते. या वादाचा सोक्षमोक्ष करण्यास्तव करीमखाँ यांचे खलिफा बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांनी करीमखाँच्या सिद्धान्ताचा अभ्यास केला, आणि **श्रुतिदर्शन** हा ग्रंथ लिहिला (१९६३). संगीत शास्त्रात या ग्रंथाने फार मोलाची भर घातली आहे, हे मान्यच करायला हवे. विषयाचे मूळ स्वरूप व त्यावर वादाच्या निमित्ताने चढलेले विकृत सावट या दोन महत्त्वाच्या गोष्टी जिज्ञांसूच्या निदर्शनास आणून देण्याची कामगिरी कपिलेश्वरी बुवांनी या ग्रंथाच्या रूपाने परिश्रमपूर्वक करून दाखविलेली आहे. शिवाय या विषयावर अधिक प्रकाश टाकण्यासाठी त्यांनी प्रात्यक्षिके, भाषणे व चर्चा याद्वारे बरेच प्रयत्न केलेत. बुवांनी विरोधी मतांचे सप्रयोग खंडन करून श्रुतिसंवादाबाबत वस्तुनिष्ठ ज्ञानाचा प्रसार करण्याचे मोठे कार्य केलेले आहे.[४५]

संगीताचा प्रसार आणि रसिकांना गायन ऐकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी म्युझिक सर्कल अथवा क्लब नामक संघटित संस्था उदयास आल्यात. या क्षेत्रातील मुंबईची गायनो-तेजक मंडळी, पुणे गायन समाज, पुण्याचा भारत गायन समाज, कोल्हापूर देवल क्लब, धारवाड गायन समाज, मुंबईचा सारस्वत गायन समाज आणि ट्रिनिटी क्लब, कल्याण गायन समाज, महाराष्ट्र संगीत समिती (हिंदुस्तानी संगीत परिषद), मुंबईतील बॉम्बे म्युझिक सर्कल, गंधर्व म्युझिक सर्कल, पारले म्युझिक सर्कल, अब्दुल करीमखाँ संगीत प्रचार मंडळ, आर्य संगीत विद्यालय, सरस्वती संगीत विद्यालय, दादर-माटुंगा, कल्चरल सेंटर, बॉम्बे कर्नाटक संघ, शारदा संगीत विद्यालय, पुण्याचे आर्य संगीत प्रसारक मंडळ इत्यादी संघटना चटकन नजरेत भरतात.

सांप्रतच्या महाराष्ट्रात धृपद धमार, ग्वाल्हेर गानप्रणाली, आग्रा गायकी, जयपूर गायकी, किराना गायकी, रामपूर-साहसवन घराना, इंदूर घराना, मेवती घराना, मैहर घराना, पटियाला गायकी, भेंडीबाजार घराना इत्यादी सर्वच घराण्यांचे गायक व वादक आपली कला पेश करीत आहेत. महाराष्ट्रातील रसिकांनी या सर्वच घराण्यांना लोकाश्रय दिलेला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संगीताला राजाश्रय राहिलेला नाही, हे खरे. तथापि लोकाश्रय मात्र फार मोठ्या प्रमाणावर लाभलेला आहे. अलीकडील काळात मुंबई, पुणे, नागपूर, डोंबिवली, ठाणे, औंध, मिरज इत्यादी ठिकाणी मोठेमोठे संगीत समारोह आयोजित केले जात आहेत. समारोह आयोजित करण्यासाठी बऱ्याच नोंदणीकृत संस्था देखील उदयास आलेल्या आहेत. या संस्थांद्वारे देशभरातील गायक व वादक कलाकारांना निमंत्रित करून तीन-चार दिवसांचे संगीत महोत्सव संपन्न केले जातात. अशा महोत्सवांमध्ये हजारांनी आस्वादक उपस्थित असतात. महोत्सवांद्वारे विविध कलाकारांच्या कलेचा आस्वाद घेणे शक्य असल्याने रसिक आवर्जून तिकीट विकत घेऊन महोत्सवात सामील होत असतात. पुण्याचा सवाई गंधर्व संगीत महोत्सव (डिसेंबर) हा सर्वात मोठा महोत्सव असून, तीन दिवसांच्या या समारोह प्रसंगी प्रत्येक रात्री बारा-तेरा हजार रसिक उपस्थित असतात. मुंबईतील इंडियन म्यूझिक ग्रूप, गुणीदास संगीत समारोह, सुरेशबाबू-हिराबाई बडोदेकर संगीत समारोह, सूरशृंगार संसद, घराना संम्मेलन, देवधर स्कूल ऑफ म्युझिक, झियाउद्दिन मेमोरिअल ट्रस्टचा "बर्सी धृपद महोत्सव" इत्यादी सोहळ्यामध्ये हजारो रसिक उपस्थित असतात. नागपूरला देखील असेच समारोह संपन्न होतात. मिरज येथील अब्दुल करीमखाँ संगीत समारोहाने स्वतंत्र इतिहास निर्माण केलेला आहे. गुरूला श्रद्धांजली वाहण्याच्या निमित्ताने रोशन आरा बेगम प्रतिवर्षी

पाकिस्तानातून मिरजेला येत, आणि संगीताची मेजवानी देत असत. औंधसारख्या लहान गावात संपन्न होणारा समारोह म्हणजे तेथील संस्थानिकांनी पाडलेला उत्तम पायंडा होय. हलीम जाफर खान यांची हलीम जाफर ॲकॅडमी वार्षिक महोत्सवाद्वारे रसिकांचे रंजन करते. मुंबई आणि पुण्यात वर्षभर संगीताच्या मैफली संपन्न होत असतात. अनेक संघटना व व्यापारी कंपन्या देखील महोत्सव आयोजित करतात. मोठमोठी सभागृहे देखील अपुरी पडत असल्याकारणाने संगीताचे कार्यक्रम खुल्या पटांगणावर शामियान्यांमध्ये सादर करण्याची प्रथा लोकप्रिय झालेली आहे. किंबहुना खुल्या पटांगणावरील कार्यक्रम ही काळाची गरज झालेली आहे. अनेक कलाकारांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मोठमोठ्या मैफलींचे आयोजन केले जाते. त्यासाठी अनेक संस्था व रसिकांचे गट उदयास येत आहेत. संगीत संयोजक म्हणूनही काही रसिकांनी आणि संस्थांनी आपली नावे प्रस्थापित केली आहेत. या सर्व संगीत मैफलींमधून अभिजात हिंदुस्थानी ख्याल गायकी व्यतिरिक्त ठुमरी, धृपद धमार, संत कवींची पदे, भक्तिसंगीत आणि "अभंगवाणी" सादर करण्यात येते. भीमसेन जोशींच्या अभंगवाणीने आपला एक खास चाहता वर्ग निर्माण केलेला आहे. याशिवाय महाराष्ट्रात अत्यंत लोकप्रिय असलेल्या नाट्य संगीतातील एखादे पद मैफलीमध्ये म्हणण्यासाठी रसिकांकडून आग्रह केला जातो. अमराठी गायक देखील लोकाग्रहामुळे मराठी नाट्य संगीतातील एखादे तरी पद म्हणतात. संगीताला प्राप्त झालेल्या लोकाश्रयावरून प्रतिपादन करणे शक्य झाले आहे की, महाराष्ट्रात संगीताचे भवितव्य उज्वल आहे.

अदमासे १९६४-६५ पासून राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने रसिकांना संगीताचा आस्वाद देण्यासाठी आणि कलाकारांना राजाश्रय देऊन उत्तेजन देण्यास्तव अभिनव उपक्रम सुरू केला. शासनाच्या रिक्रिएशन कमिटीने देशभरातील महान कलाकारांच्या गायन-वादनाची मेजवानी देण्यासाठी मोठमोठे संगीत समारोह आयोजित केले. या कमिटीच्या कार्याची व्याप्ती वाढल्यावर तिचे कला संचालनालयात रूपांतर करण्यात आले. प्रारंभीच्या काळात संचालनालयाने अभिजात कला संगीत सामान्य आर्थिक स्थितीच्या रसिकांपर्यंत पोहोचविले. रसिकांची अभिरुची संपन्न करण्याचे दृष्टीने हा उपक्रम फार उपयुक्त ठरला.तथापि कालांतराने या कार्यक्रमातील हिंदुस्थानी शास्त्रोक्त संगीताची जागा लोकनाट्याने घेतली. मात्र शासनाच्या पर्यटन विकास महामंडळाने, महाराष्ट्राला शिल्पकला आणि भित्तिचित्रांचा जो महान, उदात्त वारसा लाभलेला आहे, त्याविषयी जागृतता जोपासण्याच्या उपक्रमाबरोबरच संगीत महोत्सव सुरू केले आहेत. अजिंठा, वेरूळ, पितळखोरा, एलिफंटा येथील प्राचीन कलाकृतींकडे अधिकाधिक पर्यटक आकर्षित करण्यासाठी महामंडळाने संगीत आणि नृत्याचे माध्यम निवडले आहे. त्या अनुसार एलिफंटा महोत्सव, अजिंठा-एलोरा महोत्सव, बाणगंगा महोत्सव आयोजित करून मोठे गायक-वादक आणि अभिजात भारतीय नृत्याचे कार्यक्रम सादर करण्यात येतात.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अभिजात कलांना आणि कलाकारांना उत्तेजन देण्यासाठी भारत सरकारने संगीत नाटक ॲकॅडमी स्थापन केली. या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेतर्फे १९५२ पासून गुणी कलाकारांचा गौरव करून त्यांना पुरस्कार दिले जात आहेत. हिंदुस्थानी कला संगीत, लोकसंगीत, नाट्य संगीत, रंगभूमी कलाकार, नाटक दिग्दर्शक, सिनेगीत गायक, इत्यादी प्रवर्गांमधील कलाकारांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे महाराष्ट्र शासनाने १९५२ पासून नोव्हेंबर १९९० पर्यंत वेंद्र सरकार गौरवप्राप्त कलाकारांचा पुन्हा गौरव करण्यासाठी "महाराष्ट्र गौरव पुरस्कार" व प्रत्येकी एकेक लाखाचे पारितोषिक दिले.[४६] यावरून स्पष्ट होते की, कलाकारांचा गौरव करून उत्तेजन देण्याची सरकारला जाणीव आहे. शिवाय राजाश्रय संपला तरी राज्याश्रय असल्याचे दाखविण्याचा हा प्रयत्न आहे.

मात्र कोणाच्याही आश्रयापेक्षा खरा कलाकार रसिकालाच आपले दैवत मानतो. बालगंधर्व श्रोतृवर्गाला उगीचच 'देवा' असे आर्त स्वरात संबोधत नसत ! प्रत्येक भारतीय कलाकार रसिकवृंदास विलक्षण विनम्रभावे अभिवादन करतो, वंदितो. कितीही मोठा गायक किंवा वादक असला तरी तो व्यासपीठावरील आसनावर बसण्यापूर्वी व्यासपीठाला नमस्कार करून श्रोतृसमुदायाला भक्तिभावपूर्वक नमस्कार करतो. प्रत्येक "चीज" संपल्यावर आणि परफॉर्मन्स संपन्न झाल्यावर पुन्हा वाकून नतमस्तक होतो. श्रोते तर अत्यंत भावुकपणे कलाकाराचे कौतुक करून आपणास लाभलेल्या संगीतानुभवाची पोच देतात. हा आनंद सोहळा वर्णन करण्यापेक्षा अनुभवण्याजोगा असतो. एखाद्या प्रसंगी कलाकाराचा मूड न लागल्यामुळे अपेक्षापूर्ती झाली नाही, तरी रसिक त्याच्याकडे भक्तिभावानेच पाहतो. संगीत हाच एक प्रांत आहे की, जेथे भाषा, जात आणि धर्मांचे बंध अदृश्य होतात. कलाकार आणि रसिकांमध्ये अद्वैताचे नाते जडते. ही खरी भारतीय संस्कृती !

संगीत क्षेत्रातील काही संकल्पना आणि शब्दप्रयोगांमधून सांस्कृतिक संदर्भ व्यक्त होतात. गंधर्व, गुरुकुल पद्धती, गुरु-शिष्य परंपरा, घराना, गंडाबंधन, खलिफा, मैफल, कीर्तन,धृपद इत्यादी शब्दांमधून भारतीय संस्कृतीच्या स्वरूपावर प्रकाश पडतो, काही सांस्कृतिक अंगे स्पष्ट होतात.

मराठी रंगभूमि

(**मराठी रंगभूमी** यावरील लेखन डॉ. कि. का. चौधरी यांनी केलेले आहे.)

मराठी रंगभूमी ही महाराष्ट्राची विलक्षण आवडती संस्था असून मागील दीडशे वर्षात तिची लोकप्रियता कमी झालेली नाही. मराठी माणूस तर नाट्य वेडा, नाट्य प्रेमी. इतकेच नव्हे तर रंगभूमी ही संस्था महाराष्ट्राच्या संस्कृतीचा एक घटक होऊन बसली आहे. आज वर्तमानपत्रांतून नाटकाला चांगली प्रसिद्धी मिळते, आणि राष्ट्रीय पातळीवरील मानसन्मानात तसेच सांस्कृतिक सम्मेलनांमध्ये मोठी प्रतिष्ठा लाभते. आज नटाला सामाजिक उपेक्षेची भीती तर नाहीच, पण त्याचा सन्मान होतो. शासनाकडून गौरव व पुरस्कार लाभत असतात. स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय चळवळीत तसेच समाजसुधारणा प्रक्रियेत, तद्वतच सांप्रतच्या सामाजिक आणि सांस्कृतिक चळवळीत रंगभूमीला मानाचे, आदराचे स्थान लाभले. नॅशनल संगीत नाटक ॲकॅडमी आणि राज्य शासनाकडून यथोचित उत्तेजन लाभत असते. कलाकारांना मानधन, निर्वाह वेतन, मदत आणि खास आरक्षणाचा लाभही देण्यात येतो. मोठमोठे नाट्य महोत्सव होतात. तथापि रंगभूमीच्या प्रातःकाली तिला मानमान्यता अथवा सामाजिक प्रतिष्ठा होती असे नव्हे. नटाविषयी आदरभाव होता असेही नव्हे. नटाच्या तुलनेने गायकाला अधिक मानमान्यता, गायक हा पुरोहितासारखा देवाचा माननीय सेवेकरी मानला जाई. गायन हा दरबारा इतकाच मंदिरात मानमान्यता पावलेला कला प्रकार होता. गायिकांना सामाजिक प्रतिष्ठा नसली, तरी बुवा कलाकारांविषयी आदर असे. मात्र. नट किंवा नाटक्या या शब्दांभोवती तुच्छतेचे वलय असे.

मराठी रंगभूमीचे पितृत्व विष्णुदास अमृत भावे यांच्याकडे जाते. नाटकाचा त्यांच्या व्यासंग खरोखरीच त्या काळी महाराष्ट्रातच नव्हे तर समग्र भारतात एक अभूतपूर्व असा सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रम ठरला. सांगलीचे गुणग्राही व रसिक राजे चिंतामणराव अप्पासाहेब पटवर्धन यांच्या प्रेरणेने याचा शुभारंभ झाला. सांगलीत आलेल्या कर्नाटकातील "भागवत" मंडळीची कलाहीन आणि धांगडधिंगा स्वरूपाची नाटके पाहून त्यांनी भावेंना उत्तम मनोरंजनाचे माध्यम होईल अशी सदाचार प्रवर्तक पौराणिक कथानकाची नाटके सादर करण्यास सांगितले. त्या अनुसार नाट्य प्रयोगाची विशिष्ट पद्धती निर्माण करून भावेंनी रंगभूमीचा उदय केला. पटवर्धनांच्या प्रोत्साहनानुसार भावेंनी सांगलीत ५ नोव्हेंबर १८४३ रोजी **सीतास्वयंवर** या स्वलिखित नाटकाचा पहिला प्रयोग रंगभूमीवर सादर केला.[४७] म्हणूनच मराठी रंगभूमीच्या इतिहासाचा प्रारंभ त्या दिनांकापासून झाला, असे मान्य करण्यात आलेले आहे. मराठी रंगभूमीचा शतकमहोत्सव ५ नोव्हेंबर १९४३ पासून दहा-बारा दिवस मुंबईच्या चौपाटीवर तसेच पुणे, सांगली, नागपूर, अमरावती, जळगाव, भुसावळ इत्यादी शहरांमध्ये मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. तेव्हापासून ५ नोव्हेंबर हा दिवस "मराठी रंगभूमी दिन" म्हणून साजरा करण्याची प्रथा पडली.

प्रारंभीची बरीच वर्षे नाटक व्यवसाय आणि रंगभूमीकडे केवळ करमणुकीचे एक साधन म्हणून सर्वसाधारण समाज पहात असे. सर्व नाटके पौराणिक कथानकांवर असून त्यांत सामाजिक आशय नव्हता. **सीतास्वयंवर** खेरीज बरीच नाटके भावेंनी रंगभूमीवर आणली आणि खऱ्या अर्थाने नाट्य व्यवसाय सुरू केला.

अप्पासाहेब पटवर्धनांनी आपल्या हयातभर भावेंना मदत केली खरी, तथापि त्यांच्या निधनानंतर (१८५१) भावेंना राजाश्रय राहिला नाही. त्यामुळे आपण निर्माण केलेल्या रंगभूमीचे अस्तित्व टिकविण्यासाठी त्याना फिरस्ती करून इतरत्र नाट्य प्रयोग सादर करावे लागले. स्वतः भावे आणि त्यांच्या कलापथकातील (troupe) बहुतेक नट सांगलीचे कोकणस्थ ब्राह्मण होते. त्यांचे कलापथक ठिकठिकाणी दौरे करीत असताना फिरता (touring) नाटक व्यवसाय उदयास आला. विशेष म्हणजे त्यांच्या मूळ कलापथकातील काही नटांनी कालांतराने स्वतंत्र नाट्य संस्था स्थापन केल्या.

दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, कुरुंदवाड, औंध आणि जमखिंडी संस्थानांचे अधिपती, तसेच बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, इंदूरचे शिवाजीराव आणि सवाई तुकोजीराव होळकर आणि ग्वाल्हेरचे माधवराव शिंदे यांच्या दातृत्वाचा लाभ काही नाट्य पथकांना झाला हे खरे. तथापि लोकाश्रय हाच रंगभूमीचा आधार होता. व्यवसायातील नुकसानीचा फटका बसत असे संस्थेच्या मालकाला, राजाचा हातभार अत्यल्प. म्हणूच मालकांना गावोगाव नाटके करण्याचा फिरता व्यवसाय करणे अपरिहार्य होते. काही वर्षांमध्ये भावेंकडून स्फूर्ती घेऊन महाराष्ट्रात अनेक नाटक कंपन्या निघाल्या आणि रंगभूमीचा विकास सुरू झाला.

मात्र याच कालावधीत मुंबईत सर्वप्रथम आधुनिकता अवतरली. मुंबई हे जगातील एक प्रागतिक आणि विकसनशील आधुनिक महानगर म्हणून उदयास आले. बहुविध सर्वांगीण विकास, शैक्षणिक जागृती, प्रबुद्ध पत्रकारिता, न्यायदान

प्रशासन, पाश्चात्य विद्या, तद्वतच संपन्न असे इंग्रजी वाङ्मय आणि कला या कारणांमुळे मुंबईत प्रबोधनाचे युग (renaisance era) अवतीर्ण झाले. या अभूतपूर्व प्रबोधनाचे आद्यप्रवर्तक होते जगन्नाथ शंकरशेट, बाळशास्त्री जांभेकर, आत्माराम पांडुरंग परमानंद, विश्वनाथ नारायण मंडलिक, सर जमशेटजी जीजीभॉय बाटलीवाला, डॉ. जॉन विल्सन, मुहम्मद इब्राहिम मकबा, महमद अली रोघे. या प्रक्रियेत एल्फिन्स्टन कॉलेज (१८२७), ग्रान्ट मेडिकल कॉलेजठ कॉलेज (१८४५), विल्सन कॉलेज (१८६१), बॉम्बे युनिव्हर्सिटी (१८५७) आणि सेंट झेविअर्स कॉलेज (१८६९) या आंग्ल विद्यांच्या ज्ञानपीठांनी बहुमोल भर घातली. मुंबई विद्यापीठाचे पहिले चार पदवीधर - महादेव गोविंद रानडे, रामकृष्ण गोपाळ भांडारकर, बाळ मंगल वागळे आणि वामन आबाजी मोडक या विख्यात तेजस्वी युवकांच्या पाठोपाठ फिरोझशहा मेहता, काशिनाथ त्रिंबक तेलंग व रहिमतुल्ला मुहम्मद सयानी यांनी प्रबोधन कार्यासाठी वाहून घेतले. तो काळ कसा होता हे मननीय आहे. बाळशास्त्री जांभेकर, नवरोजी फर्दूनजी, दादाभाई नौरोजी हे विद्याविभूषित पुरुष एल्फिन्स्टन महाविद्यालयात प्राध्यापकाच्या व्यासपीठावरून प्रबोधन करण्यास्तव उभे. अल्पावधीत महादेव गोविंद रानडे इंग्रजी वाङ्मयाचे तर डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर पौर्वात्य भाषांचे प्राध्यापक म्हणून एल्फिन्स्टनमध्ये दाखल झाले. बाळ मंगेश वागळे पूना कॉलेजमध्ये (आताचे डेक्कन कॉलेज ॲण्ड पोस्ट ग्रॅज्युएट रिसर्च इंस्टिट्यूट) प्राध्यापक पद भूषवित होते. मराठी पत्रकारितेचे आद्यप्रवर्तक जांभेकर आणि विश्वनाथ नारायण मंडलिक वृत्तपत्रांद्वारे प्रबोधन कार्य करीत. जगन्नाथ शंकरशेट पौर्वात्य आणि पाश्चिमात्य (oriental and occidental) विद्यांच्या संश्लेषणाचा (synthesis) पुरस्कार करून भारतीय विद्या अधिकाधिक संपन्न करण्याकरिता कटिबद्ध होते.[४८]

या महानीयांच्या उपक्रमांना केवळ प्रतिसादच नव्हे तर उत्तेजन लाभत होते. सर अलेक्झांडर ग्रान्ट, डॉ. जॉन विल्सन, जस्टिस जेम्स गिब्ज, सर रेमण्ड वेस्ट, डॉ. मॅकिचन, प्रा. विल्यम वर्डस्वर्थ या इंग्रज साहित्य प्रेमी विचारवंतांचे.[४९] या काळात पाश्चात्य विद्याविभूषितांची ध्येयवादी, पण साहित्य प्रेमी पिढी उदयास आली. शेक्सपिअर, मोलिअर वगैरेंची महान वाङ्मयीन मूल्ये असलेली प्रत्ययकारी नाटके इकडे आलीत. रंगभूमीवर त्यांचे प्रयोगही सादर झाले. पाश्चात्य काव्य, कादंबरी, साहित्य समीक्षा आली. विचार आला व आचाराला नवीन दिशा मिळाली. मुंबईतील हे प्रबोधन पुण्याला पोहोचले, नंतर नागपूर, अमरावती आणि कोल्हापूरला. मुंबई महानगरातील नवीन जाणिवा तिकडे प्रसृत झाल्या.

या प्रबोधनाचे परिणाम मराठी नाटक व साहित्यावर होणे स्वाभाविकच होते.पाश्चात्य पद्धतीचा स्वीकार करताना आपल्या कला, रंगभूमी आणि वाङ्मयात परिवर्तन व्हावे, असे नवशिक्षितांना प्रकर्षाने जाणवले. रंगभूमीच्या अंतःसामर्थ्याची आणि प्रभावी माध्यमाची त्याना जाणीव झाली. मराठी नाटकामध्ये वाङ्मयीन मूल्यांव्यतिरिक्त सामाजिक आशय यावा, असा विचार व्यक्त होऊ लागला. मुंबईच्या महाविद्यालयांमधील प्राध्यापकांनी युवकांना त्या दृष्टीने प्रोत्साहन दिले. याचा परिणाम असा झाला की, मुंबई आणि पुण्याचे विचारवंत रंगभूमीकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहू लागले. अनेक कलांची अभिव्यक्ती करू शकणाऱ्या नाटक कलेच्या विकासासाठी नाटक व्यावसायिकांना सर्वतोपरी मदत करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मानणारे जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी लाड आणि सर जमशेटजी जीजीभॉय यांचेसारखे मुंबईच्या सार्वजनिक जीवनाचे पुढारी विष्णुदास भावेंच्या मुंबईतील पहिल्याच मुक्कामात त्यांचे मित्र आणि पुरस्कर्ते बनले.

सन १८५३ ते १८६२ या कालखंडात भावेंच्या नाट्य संचाचा मुंबईत चार वेळा मुक्काम असताना, त्यांच्या नाटक प्रयोगांची तिकीट विक्री करण्यासाठी भाऊ दाजींसारखा प्राच्य विद्या विशारद आणि राष्ट्रवादी पुढारी बसत असे. प्रत्येक प्रयोगासाठी केलेला खर्च आणि उत्पन्नाचे हिशेबही भाऊ दाजी ठेवित.[५०] त्यांच्यासारखी महनीय व्यक्ती तिकीट विकण्यासाठी आणि रंगभूमीला प्रोत्साहन देण्यासाठी झटत असल्याचे पाहून इतरांवर त्याचा इष्ट परिणाम झाल्याविना राहिला नाही. त्या अनुसार अनेकांनी या क्षेत्राला महत्त्व दिले, मदत केली.

लोकमान्य टिळकांचा उदय झाल्यावर त्यांनी रंगभूमीचे महत्त्व ओळखले. रंगभूमी ही अनेक कलांचा संगम घडविणारी एक महान कला असल्याचे ते मानत व प्रतिपादन करीत. जनमानसात राष्ट्रवादी विचारसरणी रुजावी आणि इंग्रजांविरूद्ध असंतोष (unrest) निर्माण व्हावा, यासाठी रूपकात्मक नाटके रंगभूमीवर यावीत असा त्यांनी विचार मांडला. त्या दृष्टीने टिळकांनी खूप प्रयत्न केले. नाटकाचा विषय पौराणिक अथवा ऐतिहासिक असला, तरी त्यात राष्ट्रवादी आशय असावा असे त्यांचे मत होते. करमणूक करता करता राष्ट्रवादाची शिकवणूक व्हावी, असा हेतू होता. त्यास अनुसार कालांतराने मराठी नाटकांमध्ये करमणुकीबरोबर राजकीय आशय येऊ लागला. या व्यतिरिक्त सामाजिक रूढींचे प्रहसन, कर्मठपणावर घणाघाती टीका आणि अनिष्ट चालीरीतींचा धिःकार नाटकात येऊ लागला. नाटकाचे पुस्तक वाचताना अशा प्रकारचा आशय सामान्य वाचकाच्या लक्षात येत नसे. तथापि रंगभूमीवरील साभिनय संवाद ऐकताना अनुस्युत (implied) अथवा दडलेला आशय श्रोत्यांच्या लक्षात आल्यावाचून राहत नसे. विद्वान

आणि विचारवंतांच्या प्रोत्साहनामुळे मराठी रंगभूमीला स्वाभाविकपणे प्रतिष्ठा लाभली आणि नाटकांमध्ये आशयप्रधानता येऊ लागली. सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रवादी विचारसरणीच्या आगमनाबरोबरच वास्तविक नाट्य मूल्य (intrinsic dramatic) असलेली नाटके रंगभूमीवर येण्यास प्रारंभ झाला.

रंगभूमीचा आढावा घेताना विष्णुदास भावेंच्या पूर्वकालाकडेही जायला हवे. त्यांच्या पूर्वी ६७ वर्षे आधीपासून म्हणजे १७७६ पासून बॉम्बे अमॅच्युअर थिएटरमध्ये लंडनमधील इंग्रजी नाटकांच्या धर्तीवर इंग्लिश नाटके सादर करण्यात येत. स्वभाषेतील नाटके पाहण्याची इंग्रजांची तृष्णा भागविण्यासाठी हा उपक्रम सुरू झालेला होता. **बॉम्बे कुरीअर, बॉम्बे गॅझेट, इरिस** या समकालीन वृत्तपत्रांमधील समालोचनांवरून इंग्रजी रंगभूमीच्या स्वरूपाची कल्पना येते. इंग्रज अंमलदारांनी पिकॅडलीच्या धर्तीवर मुंबईत प्ले हाऊस, रिपन थिएटर, व्हिक्टोरिया थिएटर आणि नंतर ऑपेरा हाऊस उभे करण्यात पुढाकार घेतला. त्यात इंग्लिश कंपन्या नाटके करीत. सुशिक्षित भारतीय प्रेक्षक ती नाटके पाहू लागला. इंग्रजी रंगभूमीच्या ढंगाची पारशी रंगभूमी ही पहिली आधुनिक भारतीय रंगभूमी होय. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून मुंबईत संस्कृत, गुजराती व मराठी नाटके रंगभूमीवर येण्यास प्रारंभ झाला. मुंबईत १८७५-१८८५ दरम्यान स्थापन झालेल्या नाट्यकला पथकांमध्ये "नीती दर्शक" (गुजराती), "हिंदुस्थानी" आणि पारशी नाटक मंडळी या कंपन्या अधिक लोकप्रिय झाल्या. याच सुमारास हार्मोनियम ऐवजी सारंगी या वाद्याचा साथसंगतीसाठी उपयोग करण्यास प्रारंभ झाला.[५१]

भाऊ दाजी लाड तिकीट विक्री करीत या पाठीमागे विचार होता की, इंग्रज नट मंडळीप्रमाणे आपल्याही नटांना सामाजिक प्रतिष्ठा लाभली पाहिजे. इंग्रजी नाटकांच्या परिचयामुळे प्रबुद्ध मराठी पुढारी आणि रसिकांचे लक्ष नाटकाच्या वाङ्मयीन व कलात्मक गुणविशेषांकडे तसेच आशयाकडे वेधले गेले. या काळात (१८६२) इचलकरंजीकर नाटक मंडळीने विनायक जनार्दन कीर्तने यांचे **थोरले माधवराव पेशवे** हे नाटक रंगभूमीवर आणले. लिखित संवाद असलेले आणि संगीत नसलेले हे मराठी रंगभूमीवरील पहिलेच नाटक होय. प्रदीर्घ काळ म्हणजे अदमासे ४० वर्षे नाटके करणाऱ्या कंपनीला कृष्णशास्त्री चिपळूणकर यांचेसारखे विचारवंत शिक्षक आणि मार्गदर्शक लाभले होते, हे विचार करण्याजोगे आहे. गोविंद बल्लाळ देवल, शंकरराव पाटकर व वामन भावे यांनी पुण्यात १८८० मध्ये काढलेली "आर्योद्धारक नाटक मंडळी" म्हणजे सुशिक्षितांच्या नाट्य विषयक चळवळीचे परिणत स्वरूपच मानले पाहिजे. इंग्रजी व संस्कृत नाटकांच्या अभिजात स्वरूपाचा प्रेक्षकांना परिचय करून देण्याची बहुमोल कामगिरी तिने केली.

मराठी संगीत रंगभूमीची महान कलात्मक परंपरा निर्माण केली बळवंत पांडुरंग किर्लोस्कर यांनी. अण्णासाहेबांनी एका रात्रीत मराठी रंगभूमीचे स्वरूप बदलून टाकले, आणि मराठी रंगभूमीच्या इतिहासात मोठी क्रांती घडवून आणली. पारशी नाटक मंडळीचे **इंद्रसभा** पाहिल्यावर त्याना गद्य-पद्य मिश्रित नाटक सादर करण्याची प्रेरणा झाली. **अभिज्ञान शावुंग्तलम्** या कालिदासाच्या भारतीय वाङ्मयातील सर्वोत्तम नाटकाचा त्यांनी मराठी अनुवाद केला आणि स्वतः स्थापन केलेल्या किर्लोस्कर नाटक मंडळीने ३१ ऑक्टोबर १८८० रोजी संगीत **शावुंग्तल** रंगभूमीवर सादर केले. **शावुंग्तल** नाटकापासून मराठीतील संगीत नाटकांच्या परंपरेचा प्रारंभ झाल्याकारणाने अण्णासाहेब किर्लोस्करांना संगीत रंगभूमीचे जनक मानण्यात आले. अभिजातता, रसिकता आणि सुरेलपणा या कलात्मक गुणांची देणगी रंगभूमीला किर्लोस्कर आणि त्यांचेच शिष्य गोविंद बल्लाळ देवल यांनी दिली हे निर्विवाद होय. **शावुंग्तल** पाहून मराठी रसिक तर मंत्रमुग्ध झालेच, शिवाय जनरल हेवेट्ट सारखे अनेक इंग्रज सेनाधिकारी देखील त्यांची मुक्तकंठाने प्रशंसा करू लागले.

शावुंग्तल नाटकाच्या अभूतपूर्व लोकप्रियतेने अण्णासाहेबांचा आत्मविश्वास वाढणे स्वाभाविकच होते. त्या अनुसार स्वतंत्र संगीत नाटक लिहून ते रंगभूमीवर आणण्याचा त्यांनी निर्धार केला. ही नवनिर्मिती म्हणजे संगीत **सौभद्र** होय. **शावुंग्तल** आणि **सौभद्र** ही नावे एकसारखीच. कालिदासाच्या नाटकांतील रीतीने अण्णासाहेब किती प्रभावित झालेले होते, हे या नाटकांच्या शीर्षकांवरून देखील नजरेत भरते. **सौभद्र** चा पहिला प्रयोग मुंबईत करण्याची मूळ योजना होती. तथापि पुण्यातील रसिकांना नाटक पसंत पडल्याशिवाय त्याचा प्रयोग मुंबईत करू नये, असा सल्ला सुप्रसिद्ध हायकोर्ट वकील महादेव चिमणाजी आपटे यांनी किर्लोस्करांना दिला. **शावुंग्तल** च्या यशामुळे संगीत रंगभूमीकडे आकर्षित झालेल्या इतर नाटककारांची नाटके अयशस्वी ठरलेली पाहिल्याने आपटेंनी हा इशारा दिला होता. **शावुंग्तल** मधील विविध रसांचा परिपोष, मनोवेधक कथानक, चांगली पदे व प्रभावी गायक नटांमुळे ते यशस्वी झालेले होते. तथापि मूळ **सौभद्र** मध्ये फक्त विरहजन्य शोकरसच प्रभावी. रसवैचित्र्याशिवाय नाटकाचे यश हमखास म्हणता येणार नाही. म्हणून आपटेंनी किर्लोस्करांना पुष्कळ फेरबदल करण्यास सुचविले. मुंबईत रसिक होतेच, तथापि त्यातून पुणेकर आणि इतर दक्षिण महाराष्ट्रीय लोक वगळल्यास उर्वरित रसिकांची संख्या कमीच होती. म्हणून मूळ लेखनात बदल करून नाटकाचा प्रयोग प्रथम पुण्याला करावा असा सल्ला दिला. कोणत्याही प्रयोगाची कीर्ती पुण्याहून मुंबईस येणे हितावह होते. मुंबईपेक्षा पुण्यात रसिक प्रेक्षक संख्येने अधिक होते. शिवाय पुण्यातील रसिकवृंद एकसंध ब्राह्मण जातीतील होता. हा वर्ग सरस्वतीचा उपासक असल्याने आणि विद्येचा वारसा प्राप्त केलेला असल्याने, त्याच्याकडूनच

अधिक पाठिंबा मिळण्याची शक्यता होती. म्हणून पुण्यात नाटक यशस्वी झाल्यावरच मुंबईत आणि इतरत्र महाराष्ट्रात प्रयोग करणे हितावह होते. अण्णासाहेबांनी सर्वांच्या सूचना लक्षात घेऊन **सौभद्र** च्या लेखनात बदल केला आणि त्याच्या पहिल्या तीन अंकांचा प्रयोग १८ नोव्हेंबर १८८२ रोजी पुण्यात केला. पाच अंकी संपूर्ण **सौभद्र** मार्च १८८३ मध्ये पुण्यातच रंगभूमीवर आणले. मात्र प्रारंभापासूनच हे नाटक **शावुंग्तल** पेक्षाही अधिक लोकप्रिय झाले. त्याची लोकप्रियता ११२ वर्षांत कमी झालेली नाही. **सौभद्र** हे एकच असे नाटक आहे की, ज्यात मराठी रंगभूमीवरील प्रत्येक पिढीतील प्रत्येक नामवंत नटाने भूमिका केली.

किर्लोस्करांनी रंगभूमीवर आणलेल्या अभिजात नाट्यकलेच्या स्वरूपाकडे आणि कला गुणांकडे समाजाचे लक्ष वेधले जावे, अशी लोकमान्य टिळकांची इच्छा होती. म्हणूनच किर्लोस्कर नाटक मंडळीच्या हस्तपत्रकांवर (hands–bills) लोकमान्य टिळक आणि प्रा. केरूनाना छत्रे वगैरे मान्यवरांच्या स्वाक्षऱ्या असत. टिळकांची नाटक व रंगभूमीशी असलेली बांधीलकी त्यांनी देवल आणि शंकरराव पाटकर यांच्या आर्योद्धारक मंडळीचा जो पुरस्कार केला, यावरून देखील स्पष्ट होते. या मंडळीच्या **ऑथेल्लो** (मार्च १८८१) च्या एका प्रयोगाचे व्यवस्थापन टिळकांनी भूषविले होते. पुणे सार्वजनिक सभा नामक प्रमुख राष्ट्रवादी संघटनेचे तेव्हाचे अध्वर्यू महादेव गोविंद रानडे देखील रंगभूमी व मराठी साहित्य या बाबींमध्ये सखोल लक्ष घालीत. सार्वजनिक सभेच्या कार्यालयात मराठी ग्रंथकारांची पहिली सभा भरविण्यात आली होती (२४ मे १८८५). या बैठकीत साहित्याविषयीच्या आस्था व अपेक्षा प्रकट करण्यात आल्या होत्या. या प्रसंगी रानडेंव्यतिरिक्त गोपाळ गणेश आगरकर, महादेव मोरेश्वर कुंटे, नीलकंठ जनार्दन कीर्तने वगैरे मान्यवर उपस्थित होते. यावरून स्पष्ट दिसते की, रंगभूमी आणि वाङ्मय हे जनजागरणाचे माध्यम म्हणून त्याचे महत्त्व ओळखून समाजधुरीण या कार्याला प्रोत्साहन देत होते. (मात्र या अभूतपूर्व प्रसंगी किर्लोस्कर नागपूरला असल्याने उपस्थित नव्हते).

किलोस्कर स्वतः सुशिक्षित नट आणि नाटककार असून, त्याना संगीताची अभिरुची आणि जाण होती. कला संगीताचे रंगभूमीवर प्रवर्तन करताना ते नाटकाच्या उत्कर्षाला पोषक होईल अशी त्यांनी दक्षता घेतली. तसे करण्यासाठी त्यांनी बाळकोबा नाटेकर, मोरोबा वाघोलीकर आणि लक्ष्मण बापुजी तथा भाऊराव कोल्हटकर यांची गायक नट म्हणून निवड केली. नाटेकर हे तर अभिजात गायक व सितार वादक होते. वाघोलीकरांच्या गाण्यात लावणीचा ढंग होता. भाऊराव कोल्हटकरांनी मात्र रागबंधने विशेष न पाळता गायकीमधील अनेक प्रकार उपयोजून आपले गाणे रंजक, आकर्षक आणि परिणामकारक केले. कोल्हटकरांच्या गायन शैलीचे अनुकरण पुढील पिढ्यांमधील श्रेष्ठ नटांनी देखील केले. दत्तात्रय वैवुंठ देशपांडे (दत्तोपंत हल्ल्याळकर) यासारख्या श्रेष्ठ कलाकाराने देखील भाऊरावांचे अनुकरण करण्यात धन्यता मानली हे विशेष.[५२]

शावुंग्तल, सौभद्र, रामराज्यवियोग यामधील पदे छोटा ख्याल, कीर्तन, लावणी, दादरा, टप्पा यावर आधारित होती. संगीताच्या या आविष्कारात सुसंस्कृत लोकांनी विशेष रस घेतला. टिळक, रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्या. काशिनाथराव तेलंग, सर महादेव चौबळ, सर रामकृष्ण भांडारकर आणि डॉ. भालचंद्र भाटवडेकर यांसारख्या राजकारणी, विधिज्ञ आणि विद्याविभूषितांचाही त्यांच्यात समावेश होता.

किर्लोस्करांनी निर्माण केलेल्या संगीत रंगभूमीला चिरस्थायी करण्याचे कार्य भाऊराव कोल्हटकर (भावड्या) या स्वरूप सुंदर व ओजस्वी गायक नटाने केले. शवुंग्तला आणि सुभद्रेची त्यांची भूमिका अखिल महाराष्ट्रात लोकप्रिय झाली. नाट्य व्यवसायाकडे धंदा म्हणून पाहण्याची तेव्हा वृत्ती नव्हती. अभिजात कलावंत व्यवहारचतुर नव्हते. त्यांच्यात शिस्त व सातत्य राहत नसे. बऱ्याच कलावंतांना व्यवहारी कला साधलीच नाही. त्यामुळे व्यवसायात शाश्वती नव्हती. **मात्र शावुंग्तल** आणि **सौभद्र** च्या प्रयोगांना चांगली प्राप्ती होत असे. (तथापि तिही ३००/३५० रुपयांपर्यंतच). अण्णासाहेबांच्या निधनानंतर (२ नोव्हेंबर १८८५) किर्लोस्कर नाटक मंडळीची मालकी भाऊराव, मोरोबा आणि रामभाऊ किंजवडेकर यांचेकडे आली. देवल हे या मंडळीचे नाटककार आणि नाट्य शिक्षक होते. किंबहुना मराठी रंगभूमीच्या इतिहासातील पहिले प्रभावी नाट्य शिक्षक म्हणून देवलांना मान दिला पाहिजे. त्यांनी स्वतःची खास परंपरा निर्माण केली. साधारणपणे १८८२-१९०० हा किर्लोस्कर मंडळी आणि देवल आणि भाऊराव कोल्हटकरांचा कालखंड मानता येईल. देवलांनी या मंडळीसाठी **विक्रमोर्वशीय** (१८८९), **शापसंभ्रम** (१८९४) आणि **शारदा** (१८९९) ही नवीन नाटके लिहिली, आणि त्यांचेच **मृच्छकटिक** याच कालखंडात किर्लोस्कर मंडळीने रंगभूमीवर सादर केले.

कलात्मकतेव्यतिरिक्त महान सामाजिक आशय असलेले पहिले प्रभावी नाटक म्हणून **शारदा** ला बहुमान द्यावा लागतो. या आशयप्रधान नाटकात बालिका-जरठ विवाहासारख्या निंद्य प्रथेवर प्रकाश टाकून बालिका वधूचे चित्तविदारक दृश्य त्यात चित्रित केलेले आहे. समाजातील ढोंगी प्रवृत्ती, गरिबीमुळे येणारी लाचारी, जरठांची निलाजरी कामुकता यांचे हे चित्र हेलावून टाकते. या प्रथेविरुद्ध सामाजिक लढा देण्यासाठी महादेव गोविंद रानडे, गोपाळ गणेश आगरकर हे विचारवंत पुढे आले. त्या काळात विवाहाचे वय व संमती वयाचा कायदा या विषयांवर खाजगी चर्चा, जाहीर व्यासपीठ आणि वृत्तपत्रे या माध्यमांद्वारे अत्यंत तिखट प्रतिक्रिया व्यक्त झाल्यात. शिवाय हा विषय

विधिमंडळामध्येही फार गाजला. शारदेच्या करूण व्याकुळतेने, अगतिकतेने महाराष्ट्रातील लक्षावेधी अंतःकरणे द्रवलीत. पुढच्या पिढीतील राम गणेश गडकरी आणि भार्गवराम विठ्ठल वरेरकर या नाटककारांनी शारदेतून प्रेरणा घेतल्या असाव्यात असे प्रस्तुत लेखकास वाटते.

त्या काळात सामाजिक बंधनांमुळे आणि महिलांकडे पाहण्याच्या विकृत दृष्टिकोनामुळे महिला रंगभूमीवर येत नसत आपद्धर्म म्हणून पुरुषांना स्त्री भूमिका कराव्या लागत. शंकरराव मुजुमदारांनी न गाणा-या शकुंतलेची भुमिका केल्यावर भाऊराव कोल्हटकर सुस्वरूप व गाणारी शकुंतला म्हणून रंगभूमीवर आलेत, आणि शकुंतलेनंतर सुभद्रा. मंथरा (रामराज्यवियोग) ऊर्वशी (विक्रमोर्वशीय), शारदा म्हणून. मात्र पुढील काळात आपण स्त्रीभूमिकेत शोभत नसल्याचे मान्य करून ते पुरुष भुमिका करू लागले. त्यांची जागा घेतली कृष्णराव गोरे, चिंतोपंत गुरव, रामभाऊ डवरी यांनी.[५३] मात्र स्त्रीभूमिकांमध्येही पुढे विलक्षण शोभून दिसले बालगंधर्व, दीनानाथ मंगेशकर.

भाऊरावांचे समकालीन व नंतरही तितक्याच असामान्य तेजाने तळपत असलेले गणपतराव जोशी गद्य नायकांच्या भूमिका करण्यात अग्रेसर होते. त्यांनी १८८१ च्या सुमारास शाहूनगरवासी नाटक मंडळी स्थापन केली. १८९१ पासून गणपतरावांनी शेक्सपिअरच्या नाटकांच्या मराठी रूपांतरांमध्ये नायकांच्या प्रभावी भूमिका करण्यास प्रारंभ केला. शेक्सपिअरच्या मराठी अवताराने मराठी नाटकाला वेगळी उंची मिळवून दिली. आणि नाट्य विषयाच्या कक्षा विस्तारित केल्या. गोपाळ गणेश आगरकरांचे **विकारविलसित** (Hamlet), श्रीपाद कृष्ण कोल्हाटकरांचे **मतिविकार** (Hamlet), देवलांचे **झुंझारराव** (Othello), शिवराम महादेव परांजपे यांचे **मानाजीराव** (Macbeth), वासुदेवराव केळकरांचे **त्राटिका** (Taming of the Shrew) या नाटकांनी शेक्सपिअरच्या नाट्यसृष्टीचे मराठी वाचक आणि प्रेक्षकांना दर्शन घडविले. शेक्सपिअरने केलेले मानवी मनाचे विश्लेषण, माणसाच्या भावविश्वाचा घेतलेला ठाव, जीवनतत्वाचे काव्यात्म रूप, मनोविकार तसेच उदात्तता या बाबींचे घडविलेले दर्शन महाराष्ट्राला या नाटकांनी घडवून दिले. अन्यथा इंग्रजी नाटके समजण्याची क्षमता असलेल्या केवळ मूठभर महाराष्ट्रीयांनाच हा लाभ झाला असता. या रूपांतरित नाटकांमधील नायक म्हणून गणपतराव अगदी अविस्मरणीय झाले. शिवाय आपल्या भूमिकेचा आशय पल्लेदार व गोळीबंद आवाजाच्या फेकीतून व्यक्त करण्याची नवीन रीती उदयास आली. त्यांच्यानंतर मात्र अशी परिणामकारक आवाजी असलेले नट फारच थोडे निर्माण झाले.

दरम्यानच्या काळात स्थापन झालेल्या डोंगरे संगीत मंडळीच्या (१८८१) नाटकांमधील पदांना चाली देण्याचे कार्य बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांनी केले.या महान ख्याल गायकाने राग संगीतावर आधारित अशा दिलेल्या पदांच्या चाली अत्यंत लोकप्रिय झाल्या. नाट्य संगीताला प्रतिष्ठा प्राप्त झाली.

समाजप्रबोधनाचे माध्यम म्हणून नाटक व रंगभूमीचे स्थान उच्च व्हावे, हे डॉ. भाऊ दाजी लाड यांच्याप्रमाणेच काशिनाथ त्रिंबक तेलंग देखील प्रतिपादन करीत. युरोपात लोकसुधारणेच्या कामी नाटकाचा उपायेाग होत असे. तसा या देशातही व्हावा यासाठी तेलंग आवाहन करीत की, समाजप्रबोधनाचे माध्यम म्हणून प्रस्थापित होण्याकरिता प्रथम नाटकांविषयीचा लोकांच्या मनातील अनादर नष्ट झाला पाहिजे. नाटकापासून उपयुक्त ज्ञान आणि बोध मिळण्याचा संभव असल्याचे लोकांना पटवले पाहिजे. कालिदासाच्या उक्तीचा लोकांना प्रत्यय आला पाहिजे.[५४] या दृष्टीने देवलांच्या **शारदा** नाटकाने सामाजिकतेचा प्रवाह अगदी सहजगत्या किर्लोस्करी संगीत परंपरेशी एकजीव केला. शारदा ही ललित नाट्यकृती असली, तरी बालिका-जरठ विवाह या घृणास्पद प्रकारावर प्रकाश टाकणारे त्यातील कथानक समकालीन समाजस्थितीशी निगडित असल्याने ऐतिहासिक महत्त्वाचे ठरले. कथानकाचा काही भाग केवळ तत्कालीन प्रश्नांशीच निगडित नव्हता, तर भविष्य काळाशी अनुबंध जोडणारा आहे. सामाजिक प्रबोधनाचा हा अभिनव प्रयत्न देवल यांच्यानंतर कोणीही इतका यशस्वी केलेला दिसत नाही.[५५] गोपाळ गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे, बेहरामजी एम. मलबारी यांचेसारखे समाजसुधारक बालविवाह, विधवाविवाह, शारीरिक समागमाचे वय, बालविधवांची दुःस्थिती या ज्वलंत समस्यांविरुद्ध सामाजिक लढा देत असतानाच्या त्या काळात देवलांच्या लेखणीतून **शारदा** उतरले व संगीत रंगभूमीवर आले, हे सामाजिक इतिहासाच्या दृष्टीनेही महत्त्वाचे होय. पूर्ण शारीरिक वाढ न झालेल्या वधूशी समागम करण्याच्या पुरुषांच्या अधिकारामुळे बालवधूंना इजा होत असे. या स्थितीत आळा घालण्यासाठी १८९१ मध्ये "एज ऑफ कन्सेन्ट ॲक्ट " बेहरामजी मलबारींच्या प्रयत्नांमुळे पास झालेला होता. त्या अनुसार १२ वर्षांखालील वधूशी समागम करण्यास पतीला कायद्याने बंदी घालण्यात आली. हे विधेयक पास होण्यापूर्वी आणि नंतरही या विषयावर महाराष्ट्रात आणि विशेषतः पुणे व मुंबईत उलटसुलट प्रतिक्रिया आणि वादंग झाले होते. या पार्श्वभूमीवर **शारदा** मधील सामाजिक आशय विलक्षण महत्त्वपूर्ण होता. हृदयस्पर्शी होता.[५६]

देवलांची **शारदा, संशयकल्लोळ** आणि **मृच्छकटिक** ही नाटके संगीत परंपरा चालविणारी असली, तरी त्यांनी संगीत आणि नाट्यवस्तूचा एकजिनसीपणा सांभाळला. पुढे श्रीपाद कृष्ण कोल्हटकर (१८७१-१९३४) यांनी तर कथासूत्राशी साक्षात संबंध नसलेली पदे नाटकांमध्ये घालून संगीताला खास महत्त्व दिले. विविध रागदारी चिजांवर आधारित पदे

घालण्यास प्रारंभ केला. त्यांनी पौराणिक कथानक वर्ज्य केले, आणि संस्कृत विदग्ध साहित्यातील विरह आणि प्रणयाचे संकेत झुगारून लावले. उर्दू नाटकांच्या धर्तीवरील अद्‌भूत कल्पनारम्य नाटके लिहिताना त्यांनी कोटिबाज आणि कल्पक संवाद लिहिले. विनोदासाठी मुद्दाम पात्रनिर्मिती केली. स्वप्नरंजनात्मक (romantic) कथानकांमधून सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकण्याचा कोल्हटकरांचा प्रयत्न सांस्कृतिक संदर्भात (cultural context) महत्त्वाचा होता. त्यांची **सहचारिणी, परिवर्तन** आणि **प्रेमशोधन** ही नाटके रंगभूमीवर एके काळी गाजली.

लोकमान्य टिळकांनी रंगभूमीचे जे महत्त्व ओळखले, त्याचे आणखी एक उदाहरण म्हणजे आपल्या लॉ क्लासमध्ये शिकत असलेल्या नारायण तथा नानासाहेब जोगळेकरांना टिळकांनी कायद्याचा अभ्यास करण्यापेक्षा किर्लोस्कर मंडळीत जाण्याचा उपदेश केला, हे होय. त्या अनुसार जोगळेकरांनी नाट्य व्यवसायात पदार्पण केले. दुसरे उदाहरण, टिळकांनी नारायण श्रीपाद राजहंस या गुणी युवकास "बालगंधर्व" हा किताब बहाल करून किर्लोस्कर मंडळीत प्रवेश देवविला (१९०४ ची गुरुद्वादशी). बालगंधर्वाला देवलांनी शिकविलेली शकुंतलेची पहिलीच भूमिका मिरजेला रंगभूमीवर पाहून प्रेक्षक जणु काय मंत्रमुग्ध झाले (१९०४). टिळकांचे समविचारी, सामाजिक व राजकीय पुढारी असलेले सहकारी प्रा. चिंतामण गंगाधर भानू हे महाराष्ट्र नाटक मंडळीचे मार्गदर्शक होते. याच गद्य नाटक संस्थेने १९०४ पासून १९१० पर्यंत कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांची **कांचनगडची मोहना** (१९०४), **सवाई माधवरावांचा मृत्यु** (१९०६), **कीचकवध** (१९०७), **बायकांचे बंड** (१९०७) आणि **भाऊबंदकी** (१९०९) ही नाटके रंगभूमीवर आणली. खाडिलकरांबाबत सूचक मर्म (significance) असे की, ते टिळकांचे क्रमांक दोनचे लेफ्टनन्ट आणि **केसरी** वर्तमानपत्राचे उपसंपादक होते. म्हणूनही त्याना महान प्रतिष्ठा तर होतीच, शिवाय ते टिळकांचे भाष्यकार (interpreter) होते.

कृष्णाजी प्रभाकर खाडिलकरांची (१८७२-१९४८) गद्य नाटके ही शेक्सपिरियन तंत्रानुसारी असून नाट्यबांधणीचा एक आदर्श त्यांनी त्या काळात निर्माण केला. ध्येयवादी तत्त्वप्रणाली आणि नाट्य दृष्टी यामुळे ती रंगमंचावर अतिशय प्रभावी ठरली. **सवाई माधवरावांचा मृत्यु** या नाटकामधून आपणास शेक्सपिअरचा हॅम्लेट आणि आयगो यांचा प्रत्यय येतो. **भाऊबंदकी** तून मॅक्बेथचा अस्पष्ट प्रतिध्वनी ऐकू येतो. **कीचकवध** (१९०७) मधील कीचकाच्या रूपाने व्हाईसरॉय लॉर्ड कर्झन, तर भीमाच्या रूपाने लोकमान्य टिळक दिसतात. (काहींना कीचकामध्ये जॅक्सनचे रूप दिसले.) या नाटकाचा पहिला प्रयोग मार्च-एप्रिल १९०७ मध्ये झाल्यापासूनच नाटक विलक्षण लोकप्रिय झाले. या नाटकाशिवाय दुसरा विषयच पुण्यात नाही, असे एका पोलीस अधिकाऱ्यानेही मान्य केले होते. एका प्रतिष्ठित इसमाने तर हे नाटक पाहताच सरकारी अधिकाऱ्यांचा खून करावा, असे वाटल्याचे खुद्द पोलिसांनाच कळविले. सुरतला भरलेली काँग्रेस उधळून मंडळी परत आली, तेव्हा टिळक, अरविंदबाबू आणि बरोबरच्या मंडळीने मुंबईत हे नाटक पाहिले. नंतर पंजाब फंडासाठी हे नाटक लावले असता तो प्रयोग लाला लजपतराय यांनीही पाहिला.[५७]

कीचकवध म्हणून खाडिलकरांची नाट्य प्रतिभा, आवेश आणि ओजस्विता स्पष्ट दिसून आली. या पौराणिक कथानकामध्ये राष्ट्रवादी आशय होताच. नाशिकच्या नाट्यगृहात झालेल्या जॅक्सनच्या खूनानंतर या नाटकाला तुफान गर्दी होई, आणि प्रेक्षकांना कीचकाच्या जागी जॅक्सन दिसू लागला होता. जॅक्सन प्रकरण, व्हाईसरॉय लॉर्ड मिंटोवर बॉम्ब टाकण्याचा झालेला प्रयत्न आणि टिळकांना झालेली सहा वर्षांची शिक्षा या पार्श्वभूमीवर हे नाटक विलक्षण लोकप्रिय झाले नसते तरच नवल. जॅक्सनचे मित्र चार्लस किंकेड (जिल्हा सत्र न्यायाधीश) यांनीही हे नाटक पाहिले होते. रजा घेऊन इंग्लंडला गेल्यावर त्यांनी लंडनच्या **टाइम्स** मध्ये लिहिलेल्या चार लेखांमध्ये निर्वाळा दिला की, **कीचकवध** हे नाटक लॉर्ड कर्झनच्या कारकिर्दीवरील रूपक आहे. कीचकाची कृत्ये रंगमंचावर पाहताना चिडलेल्या मराठी माणसांचे क्रुद्ध चेहरे आणि द्रौपदीच्या विनवण्या ऐकताना नाट्यगृहातील महिलांचे पाणावलेले डोळे या बाबी नाटकाचा प्रयोग पाहणाऱ्या कोणत्याही इंग्रजास आयुषभर आठवत राहतील. हिंदुस्थानातील इंग्रज अधिकाऱ्यांचे प्राण वाचविण्यासाठी पौर्वात्य देशातील परिस्थिती लक्षात घेऊन मुस्कटदाबीचे कायदे करणे आवश्यक आहे, असेही किंकेडने लिहिले. त्याने खाडिलकरांची "टॅलेन्टेड" नाटककार अशी स्तुती करून नाटक भयंकर राजद्रोही असल्याचा निर्वाळा दिला. किंकेडप्रमाणेच विल्यम लीवार्नर आणि व्हॅलेन्टाईन चिरोल देखील दडपशाहीच्या सरकारी धोरणाची मागणी करीत होते. गव्हर्नरने हे नाटक मराठीच्या तज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठविले. ते तज्ञ कोण हा मुद्दा मात्र निराळा. निमित्त काहीही असो, पण वर्तमानपत्रे आणि राष्ट्रवादी आशय असलेले सर्व साहित्य यांची मुस्कटदाबी करणारा फेब्रुवारी १९१० चा प्रेस ॲक्ट सरकारने अंमलात आणला आणि त्यानुसार **कीचकवध** नाटक व त्याच्या प्रयोगांवर प्रतिबंध लादण्यात आला. तेव्हा बडोद्याच्या राजेंच्या निमंत्रणावरून नाटक कंपनी बडोद्याला गेलेली होती. मात्र नाट्य प्रयोगांवर प्रतिबंध असल्यामुळे नाटक होऊ शकले नाही. नाटकाबरोबरच खाडिलकरांविषयी लिहिलेल्या सरकारी अहवालात त्यांचा "मोस्ट रॅबिड ऑफ एक्स्ट्रिमिस्टस" अशा शब्दात उल्लेख करण्यात आला. पुढे सरकारचा टिळकांवरील राग कमी झाल्यावर मध्यप्रांत सरकारने नेमलेल्या समितीपुढे हे नाटक करून दाखविल्यानंतरच **कीचकवध** अमरावतीला मुक्त झाले.[५८]

आशयप्रधान नाटके लिहिण्याच्या निर्धारानुसार खाडिलकरांनी टिळकांच्या शिक्षेच्या पार्श्वभूमीवर **भाऊबंदकी** (१९०९) नाटक लिहून रामशास्त्री हे प्रभावी पात्र रंगविले. तथापि प्रतिपक्षावर टीका करण्याची टिळक पक्षाला सवय असल्याचे लिहून **ज्ञानप्रकाश** नियतकालिकाने **भाऊबंदकी** वर टीका केली. त्यामुळे प्रतिपक्ष म्हणजे सरकार असे समीकरण करून जिल्हा दंडाधिकाऱ्याने १९१० च्या अखेरीला **भाऊबंदकी** आक्षिप्त ठरवले.[५९]

खाडिलकरांच्या उत्तरकालीन नाटकांच्या पौराणिक कथानकांमध्ये राष्ट्रवादी आशय असला तरी तो पुसट झाला. तरी देखील नाटककाराला अभिप्रेत असल्यापेक्षा प्रेक्षक अधिकच राजकीय आशय असल्याचे मानत. खाडिलकरांना "नाट्याचार्य" हा किताब प्रामुख्याने **मानापमान, स्वयंवर, कीचकवध, भाऊबंदकी, विद्याहरण** या सरस नाटकांमुळेच मिळाला. **मानापमान, स्वयंवर** आणि **विद्याहरण** यांतील सांगीतिक पदे अजरामर तर झालीच, पण शिवाय अभूतपूर्व होती. त्यानंतरही तशी पदे निर्माण झाली नाहीत. गायकी घराण्यांकडील खानदानी चिजांच्या चाली खाडिलकरांनी आणल्या. इतकेच नव्हे तर बालगंधर्व व केशवराव भोसले यांसारखे गायक नट समोर ठेवूनच त्यांनी पदरचना केली. परिणामी **स्वयंवर, मानापमान, विद्याहरण** ही नाटके म्हणजे संगीताचे जलसेच बनले. **सौभद्रा** नंतर **मानापमाना** इतके (१२ मार्च १९११) लोकप्रिय संगीत नाटक रंगभूमीवर अद्याप आलेले नाही. यातील पदांच्या चाली सुप्रसिद्ध हार्मोनियम वादक गोविंदराव टेंबे यांनी दिल्या होत्या. या चालींमुळे शास्त्रोक्त कला संगीतातील रसपूर्ण संगीत मराठी रंगभूमीवर आले आणि ते विलक्षण लोकप्रिय झाले. थोर संगीतकार भास्करबुवा बखले यांनी बालगंधर्व, मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर, गोविंदराव टेंबे, जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांचेसारखे रंगभूमी गाजविणारे गायक नट घडविले. गंधर्व संगीत मंडळीच्या (स्थापना १९१३) नाटकांमधील पदांना रागदारीवर आधारित सुरेल चाली दिल्या भास्करराव बखलेंनी. **विद्याहरण, स्वयंवर, द्रौपदी** वगैरे नाटकांमधील पदांना रागदारीतील चाली देऊन बखलेंनी क्रांती घडवून आणली. शिवाय कलात्मकता वाढविली, आणि जुन्या सामान्य दर्जाच्या चाली कालबाह्य ठरविल्या. तद्वतच **रामकृष्णबुवा वझे** यांनी ललितकलादर्श (१९०८) आणि बळवंत संगीत मंडळीच्या (१९१८) नाटकांमधील पदांना चाली देऊन महाराष्ट्राच्या संगीत विश्वाला मोठे योगदान दिले. त्यांनी केशवराव भोसले, बापुराव पेंढारकर, हरीभाऊ घांग्रेकर हे कलाकार घडविले. या दोन्ही महनीयांनी अभिजात संगीत सर्वसाधारण समाजापर्यन्त पोचविले, तसेच नाट्य संगीताला अभिजातपणाची पातळी मिळवून दिली.

खाडिलकरांच्या नाटकांचे यश जसे त्यांचे आवेशी आणि कसदार लेखन, बालबंधर्वादि गायक नट व बखलेबुवांचे संगीत यांत होते, तसेच भूमिका समजावून सांगणाऱ्या काकासाहेबांच्या अपूर्व कुशलतेचेही होते. स्वतःच्या नाटकांच्या तालमी ते स्वतःच घेत असत. आपणाला तसेच नानासाहेब जोगळेकरांना खाडिलकरांनी घडविल्याची आठवण खुद्द बालगंधर्वांनी नमूद करून ठेवली आहे.[६०] सन १९२० ते १९३२ या काळातील **द्रौपदी, मेनका, सावित्री, सवतीमत्सर** आणि **त्रिदंडी संन्यास** ही काकासाहेबांची नाटके नाट्यदृष्ट्या प्रभावी नाहीत. त्यात नाट्यबांधणीचा बंदिस्तपणा नाही. कदाचित् बदललेल्या राजकीय आणि सामाजिक जाणिवा, सभोवतालची आर्थिक व सांस्कृतिक परिस्थितीची अस्थिरता, मनातील काहूर यांचाही हा परिणाम असू शकेल. शिवाय **केसरी** सोडावा लागला हेही कारण असू शकेल. तथापि रागदारीवरील गाणी व बालगंधर्व, गोविंदराव टेंबे यांसारख्या नटांमुळे संगीत रसिकांना ही नाटके देखील फारच आवडली.[६१] लोकप्रियतेच्या दृष्टीने मानापमान सर्वोत्तम ठरले, त्याखालोखाल **स्वयंवर** (१९१६) आणि **विद्याहरण** (१६ मे १९१३). अर्थात ही तीनही नाटके काकासाहेबांच्या दुसऱ्या कालखंडातील सांगीतिक आवेशाची फलनिष्पत्ती होती.

नाट्यकला आणि व्यवसायावर विचारविमर्श करण्यासाठी १९०७ मध्ये शंकरराव मुजुमदारांनी **रंगभूमी** मासिक काढले व त्याच्या मुद्रणासाठी एक छोटे मुद्रणालय चालू केले. शिक्षण अर्धवट सोडून नाटकात येणाऱ्या युवकांना शिक्षण देण्यासाठी व्यवस्था म्हणून किर्लोस्कर नाटक मंडळीने राम गणेश गडकरींची शिक्षक म्हणून नियुक्ती केली. हे विद्यादान मुक्त अध्यापन प्रणालीचे होते. मात्र शंकररावांनी वाईट वागणूक दिल्यामुळे गडकरी तेथून निघून गेले. रंगभूमीची गंगोत्री असलेल्या पुण्यातील नाट्यगृहाची उणीव दूर करण्यासाठी, तसेच किर्लोस्करांचे यथोचित स्मारक उभारण्यासाठी कंपनीला एका धनवान सराफाशी भागीदारी करावी लागली. या उपक्रमाचे करारपत्र नरसिंह चिंतामण केळकरांनी तयार केले होते. गृहमंत्री सर मॅकेन्झी मूर यांनी २९ ऑगस्ट १९०९ रोजी या नाट्यगृहाचे उद्घाटन केले, आणि तेथे **शांकुतल** चा प्रयोग संपन्न झाला. यावरून बरेच इंग्रज मान्यवर रंगभूमीमध्ये रस घेत असे नजरेत भरते.

या काळातील अग्रेसर नटांमध्ये बालगंधर्व, केशवराव भोसले, नानासाहेब जोगळेकर, गोविंदराव टेंबे, गणपतराव बोडस, दत्तात्रेय वैकुंठ देशपांडे (हल्ल्याळकर), रामभाऊ कुंदगोळकर, दीनानाथ मंगेशकर हे गायक नट, तर केशवराव दाते, चिंतामणराव कोल्हटकर हे गद्य नट यांचा समावेश होता.

नाट्य संगीतात रंगत भरणाऱ्या पायपेटीचा (pedal harmonium) उपयोग १८८५ पासून होऊ लागला. सन

१९०९-१० च्या सुमारास बालगंधर्वांसारख्या गायक नटांनी खर्जातील स्वरांचे माधुर्य वृद्धिंगत करणारी पायपेटी साथसंगतीला घेऊन अधिकच रंग भरला. त्यांनी काही बदल केलेल्या या वाद्याच्या खोलातून येणाऱ्या स्वरांमुळे त्याला ऑर्गन हे नाव प्राप्त झाले.

किर्लोस्कर नाटक मंडळीमधील मतभेदांमुळे बालगंधर्व, गणपतराव बोडस आणि गोविंदराव टेंबे हे कंपनीतून बाहेर पडले व तिघांनी गंधर्व नाटक मंडळी स्थापन केली (५ जुलै १९१३).या वेळेपासून आणि तत्पूर्वी देखील अनेक मंडळ्या महाराष्ट्रात संचार करीत होत्या. याच काळात दत्तात्रेय देशपांडेंची महालक्ष्मी प्रासादिक नाटक मंडळी कार्यरत होती. लेले बंधू यांच्या नाट्यकला प्रवर्तक मंडळीत किराना घराण्याचे रामभाऊ कुंदगोळकर तथा सवाई गंधर्व सुभद्रा म्हणून अतिशय लोकप्रिय झाले. याच नाटक मंडळीने हरीभाऊ आपटे (कादंबरीकार) यांचे **संत सखू** रंगभूमीवर आणले (१९११). रामभाऊंच्या गाण्याने ते लोकप्रिय झाले. त्यातूनच कृष्ण गणेश फुलंब्रीकर तथा मास्टर कृष्णराव यांचा उदय झाला. जनूभाऊ निमकरांच्या स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीत शारदेची भूमिका करून (१९०२) केशवराव भोसले हा तेजस्वी तरुण गायक नट फारच प्रसिद्ध झाला. केशवरावांनी १९०८ मध्ये स्वतःची ललितकलादर्श नाटक मंडळी स्थापन करून वामन गोपाळ जोशी तथा वीर वामनरावांचे **राक्षसी महत्वाकांक्षा** सादर करून कंपनीचा उत्कर्ष साधला. गद्य नाटक शाखेतील कर्तृत्ववान अशा महाराष्ट्र नाटक मंडळीतील यशवंतराव टिपणीस आणि माधवराव टिपणीसांनी भरत नाटक मंडळी काढून १९१२ मध्ये नरसिंह चिंतामण केळकरांचे **तोतयाचे बंड** रंभूमीवर करून दाखविले. राम गणेश गडकरींचे **प्रेमसंन्यास** हे पहिलेच नाटक १९९२ मध्ये रंगभूमीवर आल्यापासून केशवराव गडकरींचा उदय झाला. चित्ताकर्षक नाटक मंडळी आणि लोकमान्य नाटक मंडळी या गद्य नाटके करणाऱ्या आणखी दोन उल्लेखनीय संस्था.[६२] यांनीच भार्गवराम विठ्ठल वरेरकर यांचे हुंड्याच्या अनिष्ट प्रथेवर जोरदार आघात करणारे **हाच मुलाचा बाप** रंगभूमीवर आणले.

जुलै १९१३ मध्ये गंधर्व नाटक मंडळीची स्थापना झाल्यावर **संशयकल्लोळ, स्वयंवर, मानापमान, विद्याहरण, सौभद्र, शापसंभ्रम, मृच्छकटिक, शाकुंतल**, शारदा, रामराज्यवियोग, मूकनायक, **प्रेमशोधन, एकच प्याला** ही महान नाटके तिच्या रंगमंचावर आली. बालगंधर्वांच्या प्रत्यही वाढणाऱ्या उत्कर्षाचा आणि लोकप्रियतेचा हा काळ होता. त्यांच्या भूमिकांनी रसिकांना मंत्रमुग्ध केलेले होते. भास्करबुवा बखलेंचे दुसरे दोन शिष्य मास्टर कृष्णराव आणि जगन्नाथबुवा पंढरपूरकर हेही या मंडळीतील प्रमुख गायक नट होते. त्यात १९२२ मध्ये विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य विनायकराव पटवर्धन यांची भर पडली. गणपतराव बोडस १९१९ पर्यंत होतेच.

सन १९१५ मध्ये गंधर्व मंडळीतून टेंबे बाहेर पडल्यावर त्यांनी स्वतःची शिवराज नाटक मंडळी स्थापन केली. उस्ताद अब्दुल करीमखाँ यांचे शिष्य असलेले सवाई गंधर्व (१९०० ते १९०७) आणि शंकरराव सरनाईक प्रसिद्धी व द्रव्यलोभाने रंगभूमीवर आलेले होतेच. दादासाहेब खापर्डे यांच्याकडून किताब मिळालेल्या सवाई गंधर्वांनी स्वतःची नूतन संगीत मंडळी स्थापन केली. मात्र रंगभूमीवर आल्याचा, उशीरा का होईना पण पश्चाताप झाल्यावर त्यांनी १९३२ मध्ये नाटक सोडले. हा इतिहास वर दिलेलाच आहे. किर्लोस्कर नाटक मंडळीची दुसरी फाटाफूट होऊन चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ मंगेशकर आणि कृष्णराव कोल्हापुरे यांनी १९१८ मध्ये बलवंत नाटक मंडळी स्थापन केली. त्यांनी **एकच प्याला, भावबंधन, रणदुंदुभी** (१९२७) आणि **संन्यस्त खड्ग** (१९३१) ही नाटके रंगमंचावर आणली. टिपणीसांनी स्थापिलेल्या आर्यावर्त नाटक मंडळीचे **चंद्रग्रहण** (१९१७) हे शिवाजी महाराजांवरील पहिले प्रभावी नाटक मानता येईल. समर्थ नाटक मंडळीने देखील ऐतिहासिक गद्य नाटके सादर करून मराठ्यांच्या इतिहासाविषयी गोडी निर्माण केली.[६३]

मराठी रंगभूमीच्या या सुवर्ण काळात भास्करबुवा बखले, रामकृष्णबुवा वझे, गोविंदराव टेंबे आणि मास्टर कृष्णराव यांचेसारखे श्रेष्ठ संगीतकार संगीत रंगभूमीला चाली पुरवित होते. मुख्य गंधर्व तीनच झालेत- बालगंधर्व, सवाई गंधर्व आणि कुमार गंधर्व. यानंतर जाहिरातींमधून अनेक गंधर्व प्रसवले, पण ते केवळ अनुकरणाने. पहिले दोन्ही गंधर्व या सुवर्ण काळातील होते. खाडिलकर, देवल, गणपतराव बोडस, त्रिंबकराव कारखानीस आणि चिंतामणराव कोल्हटकर यांचे सारखे कुशल मार्गदर्शक नटांना शिकवित होते. केशवराव भोसले यांच्या तेजस्वी गायनामुळे ललितकलेची **सौभद्र, मानापमान** ही नाटके विलक्षण लोकप्रिय झालेली होती. शिवाय **हाच मुलाचा बाप, संन्यासाचा संसार** देखील ललितकलादर्शने खूप लोकप्रिय केले. अशा वातावरणात केशवराव भोसले आणि बालगंधर्व या तोडीस तोड असलेल्या सर्वश्रेष्ठ नटांनी एकत्र येऊन **मानापमान** चा एक तरी प्रयोग करावा अशी हजारो रसिकांची इच्छा होती. ती अखेर सफल होऊन महात्मा गांधी यांनी उभारलेल्या "टिळक स्वराज फंडासाठी"[६४] **मानापमान** नाटकाचा संयुक्त प्रयोग संपन्न झाला. मुंबईतील बालीवाला थिएटरमध्ये गंधर्व आणि ललितकलादर्श या दोन प्रतिस्पर्धी नाट्य संस्थांमधील निवडक नटांनी ८ जुलै १९२१ रोजी "संयुक्त मानापमान" संपन्न केले, आणि मराठी रंगभूमीच्या इतिहासात बहुमोल भर घातली. संगीत रंगभूमीच्या वैभवाचा आणि लोकप्रियतेचा तो परमोच्च बिंदू होता ! हा आनंद

सोहळा पहिलाच, आणि शेवटचाही ! धन्य ती संगीत रंगभूमि, आणि धन्य ते रसिक जे या सोहळ्यात न्हाऊन निघाले.

या अभूतपर्वू, अद्वितीय सोहळ्यास दृष्ट मात्र लागलीच. केशवराव भोसले टायफॉइडने आजारी पडले, आणि ४ ऑक्टोबर १९२१ रोजी हा संगीत सूर्य कायमचा मावळला.

रंगभूमीवरील संगीताच्या साम्राज्याला केवळ बालगंधर्व, केशवराव भोसले यांचेसारखे गायक नटच जबाबदार होते असे नव्हे. खाडिलकर व कोल्हटकर यांचेसारखे नाटककार आणि वाईकर संगीत मंडळीचे पांडुरंग गोपाळ गुरव तथा पांडोबा यवतेश्वरकर यासारखे रागदारी संगीताचा पुरस्कार करणारे देखील जबाबदार होते. नाट्यपदांना शास्त्रीय आणि रागदारीच्या वळणावर आणताना पांडोबांनी भारदस्त रागांच्या गायनात धृपद, तराना, सरगम यांचा अवलंब केला, आणि पदांच्या उठावाकरिता तालाची लय वाढविली.[६५] शिवाय रसिक प्रेक्षकही संगीत प्राबल्यास तितकेच जबाबदार होते. कारण संगीत नाटक म्हणजे संगीताची लयलूट, हे समीकरण मानूनच प्रेक्षक "वन्समोअर" देत. "संयुक्त मानापमान" म्हणजे या संगीत उत्कर्षाचा परमोच्च क्षण ! त्या स्वस्ताईच्या काळी या प्रयोगाला १६,६०० रुपयांचे अभूतपूर्व उत्पन्न मिळाले. यावरून प्रेक्षकांच्या संगीत प्रेमाची कल्पना येऊ शकते.

नाटकातील संगीताचा आविष्कार या विषयाकडून सामाजिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रवादी आशयाकडे पुन्हा वळताना खाडिलकरांनंतरचे नाव नजरेत भरते राम गणेश गडकरी यांचे. त्यांनी खऱ्या अर्थाने शेक्सपिरियन शैलीतील शोकात्मिकेच्या (tragedy) अनेक अंतर्बाह्य विशेषता मराठीत रुजवण्याचा अभिनव प्रयोग केला. शेक्सपिअरच्या तंत्रातील गुणविशेष म्हणजे - नाट्यबांधणीचे तंत्र, संवाद, गांभीर्य व विनोदाची आलटून पालटून योजना, व्यक्तिरेखा आणि स्वगताची (soliloquy) काव्यात्म लय, मानवी जीवनाचे सूक्ष्म अवलोकन, चिंतन, व्यापक जीवन आशय व्यक्त करणारी प्रभावी भाषा - हे सर्व गडकऱ्यांनी आपल्या नाटकांमधून आणलेले आहेत. या बरोबरीनेच भारतीय संस्कृतीचे जीवन संकेत आणि आदर्श यांचीही अभिव्यक्ती केलेली आहे. गडकरी ज्या महाराष्ट्रीय मध्यम वर्गात घडत गेले, त्याची सांस्कृतिक परंपरा त्यांच्या नाटकांत उमटलेली आहेच. मध्यम वर्गाच्या जीवनाचा त्यांनी सखोल वेध घेतला. त्यांच्या **प्रेमसंन्यास** ने साहित्यिक सौंदर्य दाखवून दिले, तर **एकच प्याला** ने एक आदर्श भारतीय पतिव्रता आणि दुःखदंशाला बळी पडणाऱ्या एका मानी बुद्धिवंताची शोकात्मिका दाखविली आहे. शोकात्मिका हा नाट्य प्रकार मराठीत रुजवण्याची प्रक्रिया **एकच प्याला** मुळे सुरू झाली.[६६] तत्कालीन समीक्षकांनी या नाटकाला सर्वथा दारूच्या दुष्परिणामांचे नाटक मानले. तथापि हे खरे नव्हे. माणसाच्या स्वतःच्या अस्तित्वाच्या जाणिवेला आणि अंतर्मनातील अस्मितेला जो जहरी दुःखदंश (tragic sense of existence) होतो, त्याचा गडकऱ्यांनी निर्देश केलेला आहे. त्यांची सिंधू म्हणजे स्वतःचे अस्तित्व देखील नाकारणाऱ्या सुसंस्कारित भारतीय नारीचा आदर्श (an ideal of self–effacement of a highly cultured womanhood) होय. त्यांच्या बहुतांश नायिकांचा हा स्वभावधर्म आहे. अपवाद आहे **भावबंधन** मधील लतिका या स्वच्छंदी आधुनिक युवतीचा (the buoyant modern girl). महाराष्ट्रीय जीवनाचे अवलोकन करून त्याचे विश्लेषणात्मक चित्रण गडकरींपूर्वी कोणाही नाटककाराने केले नव्हते. पुनर्विवाहाच्या समकालीन कल्पना त्यांनी मांडल्या आहेत. त्यांची पात्रे समकालीन समाजाचे प्रतिनिधित्व करणारी असलीत, तरी खास चिरस्थायी बनण्याजोगी आहेत. **पुण्यप्रभाव** आणि **राजसंन्यास** ही दोन्ही नाटके देखील विलक्षण गाजली. खरे तर गडकरींच्या पश्चात रंगभूमीचे एक आकृतिबंध स्वरूप तयार होत गेले व त्यात नवनवीन नाटकांची भर पडली.[६७]

प्रांरभी जहाल क्रांतिकारक, मग टिळकांचे सहकारी आणि नंतर महात्मा गांधींचे अनुयायी बनलेले वामन गोपाळ जोशी तथा वीर वामनराव हे एक प्रभावी नाटककार होऊन गेलेत. त्याच्या जळजळीत देशाभिमानाचा प्रभाव **राक्षसी महात्वाकांक्षा (१९१३), रणदुंदुभी** (१९२७) आणि **धर्मसिंहासन** (१९२९) या तीनही नाटकांमध्ये दिसतो. देशभक्त आणि देशद्रोही स्त्री-पुरुषांच्या जोड्या आणि त्यांच्यातील संघर्ष त्यांनी या नाटकांमधून रंगविलेला आहे. चित्ताकर्षक प्रसंग, देशाभिमान चेतवणारी भाषा आणि रंगभूमीचे यथार्थ आकलन या गुणांमुळे त्यांची पहिली दोन नाटके खूप लोकप्रिय झालीत. **रणदुंदुभीमध्ये** इरसाल स्वार्थीपणा आणि राष्ट्रप्रेम (arrant selfishness and patriotism) यांच्यातील संघर्ष चित्रित केलेला आहे. यास नाटकाने बळवंत नाटक मंडळीची प्रतिमा तेजाळून निघाली. मास्टर दीनानाथ मंगेशकरांची यातील पदे रसिकांच्या ओठाओठांवर घोळत होती. केशवराव भोसलेंनी रंगभूमीवर आणलेले **राक्षसी महत्वाकांक्षा** संगीताच्या बाबतीत ललितकलादर्शचे **स्वयंवर** ठरले. तरी देखील केशवराव, बापुराव आणि दीनानाथरावांच्या गाण्यांपेक्षा वीर वामनरावांच्या तेजस्वी आणि दिपविणाऱ्या व्यक्तिरेखांमुळे (brilliant and dazzling characterisation) त्यांची नाटके प्रभावी ठरली.[६८]

सन १९१४-१९६० या प्रदीर्घ काळात सातत्याने नाटके लिहिणारे भार्गवराम विठ्ठल तथा मामा वरेरकर हे एकमेव मराठी नाटककार होत. त्यांच्यावर जसे प्रार्थना समाजाच्या विचारसरणीचे संस्कार झाले, तसे वेद आणि पुराणांकडे

पाहण्याची नवी दृष्टी त्याना लाभली. बंगाली साहित्य व रंगभूमीच्या अभ्यासातून त्याना आधुनिकतेची (modernity) जाणीव झाली. या संस्कारांमधूनच त्यांनी सामाजिक वास्तववाद हे आपल्या नाटकाचे ध्येय निश्चित केले, आणि मराठी नाटकाला स्वप्नरंजकतेतून (romanticism) बाहेर काढले. समकालीन सामाजिक, राजकीय आणि आर्थिक आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर नाट्य विषयात विविधता आणि विपुलता आणली. आपल्या नाट्य लेखनावर अकलात्मकतेचा दोष ओढवूनही त्यांनी समाजप्रबोधनाचा ध्यास घेतला. हुंड्याच्या समस्येने ग्रासलेल्या स्नेहलता नामक कुमारिकेने १९१४ मध्ये आत्मदहन केले. तेव्हा सर्व भारत प्रक्षुब्ध झाला होता. या सत्य घटनेवर आधारित **हाच मुलाचा बाप** (१९१६) या पहिल्याच नाटकाने हुंडा पद्धतीवर जोरदार आघात केला, आणि वेगळा नाटककार असे आपले स्थान मामांनी निश्चित केले. स्वामी रामतीर्थ आणि स्वामी विवेकानंद यांचेकडून स्फूर्ती घेऊन आणि हिंदू मिशनरी सोसायटीच्या धर्मान्तर विषयक उदात्त कार्यातून प्रेरणा घेऊन मामांनी **संन्याशाचा संसार** (१९१९) उभारले.

वरेरकरांवर गांधीवाद आणि असहयोग आंदोलनाचा प्रभाव स्वाभाविकपणेच पडला. वकिलांनी सरकारी न्यायालयांवर बहिष्कार घालावा असे महात्मा गांधींनी आवाहन केल्यावरही (१९२०) इंग्रजांशी एकनिष्ठ राहिलेला एक वकील मामांनी आपल्या नाटकाचा नायक निवडला. गांधीवाद आणि अस्पृश्योद्धार ही मध्यवर्ती कल्पना असलेले **सत्तेचे गुलाम (१९२७)** हे एक अभिनव नाटक म्हणून विचारवंत तसेच रसिकांनी त्याला डोक्यावर घेतले. रामकृष्णबुवा वझे यांनी चाली दिलेल्या या चटकदार नाटकाने ललितकलादर्शला दोनदा पुनर्जन्म दिला. गांधीवादी प्रचाराचे ध्येय समोर ठेवून मामांनी प्रचलित समस्यांवर नाटके लिहिली ती बहुजनसमाजासाठीच. कामगार-मालक संघर्षावर आधारित **सोन्याचा कळस** (१९३२) या नाटकाच्या रूपाने कामगार वर्गाला मराठी रंगभूमीवर प्रथमच स्थान मिळाले. हे नाटक आणि नंतरचे **जिवाशिवाची भेट** (१९५०) वगैरे मामांच्या नाटकांमधून पुढे कामगार रंगभूमीचा उदय झाला. ही मामांनी महाराष्ट्राला दिलेली देणगी होय. ग्रामीण भागातील वेठबिगारीकडे लक्ष वेधण्यासाठी त्यांनी **स्वयंसेवक** नाटक लिहिले. पहिले काँग्रेस मंत्रिमंडळ १९३७ मध्ये अधिकारारूढ झाल्यावर जे नशाबंदीचे धोरण अमलात आले, त्याच्या प्रचारासाठी व जनजागृतीसाठी वरेरकरांनी **कोरडी करामत** नाटकाला जन्म दिला.

खाडिलकरांनी ऐतिहासिक कथानकांद्वारे रंगभूमीवर इंग्रजांविरुद्धचा विद्रोह आणि राष्ट्रवादी विचार आणला. मामांनी मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर जपानच्या मदतीने हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचे स्वप्न **सिंगापुरातून** (१९४४) मध्ये उभे केले. सुभाषचंद्र बोसांचे आंदोलन आणि तत्कालीन राजकीय वादंगाचे या नाटकात चित्रण आहे. तसेच देशभक्ती जागृत करण्यासाठी **चला लढाईला** मधून आवाहन केले. सीता आणि उर्मिला यांच्या मनाचा शोध घेताघेता वरेरकरांनी **भूमिकन्या सीता** (१९५०) मध्ये महिलांच्या व्यक्तिस्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला, आणि पुरुषांच्या अहंकारावर आघात केला. मामांची स्त्री आक्रस्ताळी व आक्रमक बनली. मराठी रंगभूमीला हा आविष्कार नवीनच होता. मामांवर अकलात्मकतेचा आरोप करण्यात आला खरा. तथापि **उडती पाखरे** (१९४१) आणि **सारस्वत** (१९४२) ही त्यांची वाङ्मयीन श्रेष्ठता सिद्ध करणारी नाटके समीक्षकांच्याही पसंतीस उतरली.[६९] मामांचे **वुंग्जविहारी** (१९०८) देखील एके काळी फार लोकप्रिय झाले होते.

जहाल राष्ट्रवाद आणि समाजसुधारणांचा पुरस्कार करणाऱ्या विनायक दामोदर तथा स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या **उःशाप** (१९२७), **संन्यस्त खड्ग (१९३१)** आणि **उत्तरक्रिया** (१९३३) या नाटकांमधून त्यांच्या ध्येय-धोरणांचेच प्रतिबिंब दिसते. प्रचारकी थाटाच्या **उःशाप** मध्ये समाजातील अनिष्ट समजुती अस्पृश्यता निवारण, धर्मान्तरितांचे शुद्धीकरण, महिलांवरील अन्याय यांचे प्रभावी चित्रण आहे. गौतम बुद्धाच्या अहिंसा व संन्यासप्रवण आचरणाचे अपयश **संन्यस्त खड्ग** मध्ये दाखविले आहे. पानिपतच्या रणांगणावर(१७६१) अपुरे राहिलेले मराठ्यांचे कार्य पूर्ण करण्याचा विचार **उत्तरक्रिया** मध्ये आहे.[७०]

न.चिं. केळकरांची **तोतयाचे बंड, कृष्णार्जुनयुद्ध, चंद्रगुप्त, वीरविडंबन** ही नाटके रंगमंचावर येऊन गेलेली आहेत. **तोतयाचे बंड** मात्र सर्वात गाजले.

मराठी माणसाला रंगभूमी प्रिय असल्याने या व्यवसायास उत्तेजन लाभणे स्वाभाविकच आहे. त्यामुळे उपरोक्त नाटकांव्यतिरिक्त अनेक नाटके रंगमंचावर आलीत. त्यांत वासुदेवशास्त्री खरेंचे **शिवसंभव,** राजापूरकर नाटक मंडळीने केलेले **संत तुकाराम,** आर्यवर्तचे **चंद्रग्रहण,** ललितकलादर्शचे **शहाशिवाजी** नाव मिळवून गेले. माधवराव पाटणकरांनी २४ नाटके लिहिली. त्यातील बरीच रंगमंचावर आलीत. माधव नारायण जोशींचे **म्युनिसिपालिटी** (१९२५) खूप लोकप्रिय झाले. सदाशिव अनंत शुक्ल यांनी **स्वर्गावर स्वारी, साध्वी मीराबाई, साक्षात्कार, सिंहाचा छावा, सत्याग्रही** ही नाटके पौराणिक कथानकांवर असली, तरी त्यातून तत्कालीन राजकीय प्रश्न सूचित झालेले दिसतात. विष्णू हरी औंधकरांची **बेबंदशाही** (१९२४) आणि **आगऱ्याहून सुटका** (१९३१) यांचा रंगभूमीवर गाजलेल्या नाटकांमध्ये आवर्जून उल्लेख करावा लागतो.

रंगभूमीवरून शेक्सपिअरला बाजूला सारून इब्सेनिझम चा प्रभाव पाडणे आणि नार्वेजियन नाटककार इब्सेन याचे

बदलत्या काळाचे आव्हान वैचारिक पातळीवरून पेलण्याचे सामर्थ्य मराठी रंगभूमीवर आणणे, यासाठी सुशिक्षित व्यक्ती पुढे आल्या. त्यांनी १९३३ मध्ये मुंबईत "नाट्यमन्वन्तर" ही संस्था स्थापन केली. "To introduce the modern intellectual play of Europe to marathi theatre" हे या संस्थेचे ध्येय होते. या संघटनेने रंगभूमीवर अंतर्बाह्य क्रांतीच्या आशा खरोखरच निर्माण केल्या होत्या. परंतु पुढच्या नाटकांमधूनही त्या पूर्ण न झाल्याने जेमतेम दोन वर्षात ही संघटना निष्क्रिय झाली. कारण इब्सेनचा तर्कनिष्ठ असा प्रखर बुद्धिवाद आणि सामाजिक सुधारणांचा ध्येयवाद भारतीय प्रेक्षकांना स्वाभाविकच झेपणारा नव्हता. गडकरींच्या परंपरेत तयार झालेल्या रोमँटिक **अभिरुचीला एकदम** तीव्र वास्तववादाचे वजन पेलणे अवघड होते. मात्र नाट्यमन्वन्तरने पुरस्कार केलेले श्रीधर विनायक वर्तकांचे **आंधळ्यांची शाळा** (१९३३) फार गाजले, ते ज्योत्सना भोळे आणि पद्माबाई वर्तकांच्या स्त्री भूमिका आणि केशवराव दातेंच्या प्रभावी कामामुळे. सन १९३३ ते १९४३ हा मराठी रंगभूमीवरील "अत्रे कालखंड" मानला जातो. प्रल्हाद केशव अत्रेंनी **साष्टांग नमस्कार, घराबाहेर, उद्याचा संसार, जग काय म्हणेल, लग्नाची बेडी, भ्रमाचा भोपळा, तो मी नव्हेच** वगैरे नाटके लिहिलीत. ही सर्व नाटके रंगभूमीवर आलीत. **तो मी नव्हेच** तर आजही लोकप्रिय आहे. यानंतरच्या मो.ग.रांगणेकरांनी नाटक कंपनीचे मालक, चालक आणि नाटककार याविविधांगी भूमिका वठवून नाट्य व्यवसायाला व्यवहारीपणाने स्थैर्य आणले. **त्यांचे कुलवधू** रंगमंचावर खूप गाजले, यशस्वी झाले. मात्र नाटकाचे यश वाङ्मयीन नसून प्रयोगाचे देखणेपण, मास्टर कृष्णरावांनी दिलेल्या चटकदार चाली आणि ज्योत्सना भोळेंच्या अत्यंत गोड कंठाचे होते, असे समीक्षक मानतात. शिवाय स्त्रियांच्या भूमिका स्त्रियांनीच कराव्या या नवीन प्रथेला देखील एक अधिष्ठान सहजतेने प्राप्त झाले. कुलवधू ची गाणी चित्रपटाच्या जवळ जाणारी आणि सुगम चालीची असल्यामुळे पारंपरिक नाट्य संगीतापेक्षा वेगळी ठरली.

आगऱ्याहून सुटका शिवाजी महाराजांच्या जीवनावर असल्याने फार लोकप्रिय झाले. मात्र कुमारिका मातृत्वावरील **महारथी कर्ण** (१९३४) इतके गाजले नाही. सदाशिव अनंत शुक्लांची उपरोक्त **स्वर्गावर स्वारी, साध्वी मीराबाई, सत्याग्रही** ही नाटके रंगमंचावर होत असत. सुप्रसिद्ध हार्मोनियम पटू, संगीतकार आणि आघाडीचे गायक नट असलेले गोविंद सदाशिव टेंबे यांनी नाटककार म्हणून देखील कीर्ती मिळविली. संगीत **पटवर्धन, तुलसीदास** आणि **वत्सलाहरण** त्या काळी फार गाजलीत. **पटवर्धन** मध्ये त्यांनी स्वदेशी कापडासाठी उपदेश केला. त्या नाटकांमधील सुस्वर पदांच्या ध्वनिमुद्रिका आजही उपलब्ध आहेत. विश्राम बेडेकरांनी **ब्रह्मकुमारी** मध्ये फसगत झालेल्या आणि समाजाने पतित मानलेल्या कुमारिकांचा कैवार घेतला. पौराणिक कथांमधून सामाजिक समस्यांवर प्रकाश टाकण्याचा बेडेकरांचा प्रयत्न श्रेयस्करच होय. गो.रा. शिरगुप्पीकरांचे **गोकुळचा चोर,** वसंत शांताराम देसाईंचे **विधिलिखित** आणि **अमृतसिद्धी,** ना.वि. कुलकर्णी यांचे **कान्होपात्रा** (१९३१), नागेश जोशींचे **देवमाणूस,** अनंत काणेकरांचे **घरकुल** (इब्सेनच्या Doll's House चा अनुवाद १९४३), वि. वा. शिरवाडकरांचे **दूरचे दिवे** (१९४६), **दुसरा पेशवा** (१९४७) आणि **वैजयंती** (१९५०), माधव मनोहरांचे **सशाची शिंगे,** त्र्यं.सी. कारखानीसांचे **स्वैरिणी** (१९४३), वसंत कानेटकरांचे **रायगडाला जेव्हा जाग येते** आणि **इथे ओशाळला मृत्यू,** ना. धों. ताम्हणकरांचे **गोड गोंधळ** आणि **उसना नवरा,** वा.वा. भोळेंचे **अरूणोदय** आणि **सरलादेवी,** यशवंत नारायण टिपणीसांचे **चंद्रग्रहण, शहाशिवाजी, शिक्काकट्यार** इत्यादी नाटके रंगभूमीवर लोकप्रिय झाली.

प्रत्येक मानवी कृतीप्रमाणे मराठी नाटकालाही भरती आणि ओहोटीच्या सुखदु:खातून जावेच लागले. ओहोटीनंतरच्या पुढील १९५० ते १९७० या काळात मराठी रंगभूमीची लोकप्रियता आणि गौरवशाली परंपरा पुढे चालू ठेवणारे नाटककार आणि नाटके उदयास आली. वि.वा. शिरवाडकर, वसंत कानेटकर, विद्याधर गोखले, पु.ल. देशपांडे, बाळ कोल्हटकर, पुरुषोत्तम दारव्हेकर, मधुकर तोरडमल, पु.भा. भावे, गोपाळकृष्ण भोबे, विजय तेंडुलकर ही त्यांतील काही प्रतिनिधिक नावे होत. या कालावधीत **कौंतेय, महाराणी पद्मिनी, ययाती आणि देवयानी, रायगडाला जेव्हा जाग येते, पंडितराज जगन्नाथ, मत्स्यगंधा, तुझे आहे तुजपाशी, दुरितांचे तिमिर जावो, नटसम्राट, हिमालयाची सावली, जय जय गौरिशंकर, मंदारमाला, मेघमल्हार, कट्यार काळजात घुसरी, वाहतो ही दुर्वांची जुडी, अश्रूंची झाली फुले, इथे ओशाळळा मृत्यू, वऱ्हाडी माणसं, तो मी नव्हेच** इत्यादी नाटके रंगभूमीवर खूप लोकप्रिय झालीत.(उपरोक्त श्रेय नामावली परिपूर्ण नसून केवळ प्रतीकात्मक आहे हे लक्षात घ्यावे.)

उत्तर काळातील मराठी रंगभूमीची रंजकता आणि भरती व ओहोटी यांच्याकडे आता दृष्टिक्षेप टाकणे क्रमप्राप्त आहे. गंधर्व युगाच्या प्रारंभापासून १९३० पर्यंत मराठी "नाटक" नावाचा सोहळा मध्यमवर्गीय महाराष्ट्रीय घरांतून एखाद्या कुलाचारासारखा येऊन बसलेला होता. कारकुनी करणारे लोकही तिकीट काढून, ठेवणीतले कपडे घालून सहकुटुंब नाटकाला जात. "नाटकाला जाणछ" हे सामाजिक प्रतिष्ठेचे एक अंग झालेले होते खरे. तथापि अशा या रंगभूमीची प्रतिष्ठा पुष्कळच वाढलेली असली, तरी घरंदाज आणि गुणी महिलांनी रंगभूमीवर यावे असे कोणालाही वाटत नव्हते. भाऊराव कोल्हटकरांच्या जुन्या काळात शेषासनी नामक स्वरूप सुंदर गायिकेने स्वत:ची नाटक संस्था स्थापन केली होती. तथापि समाजाने तिचे कौतुक न केल्यामुळे तिची रंगभूमीवरील कारकीर्द अल्पायुषी ठरली.

"बेळगांवकर" आणि " मनोहर स्त्री संगीत नाटक मंडळी या महिलांच्या आणखी दोन नाटक संस्था स्थापन झाल्या. विशेष म्हणजे त्यांच्या नाटकांतील पुरुषांच्या भूमिका देखील महिलाच करीत. तथापि कलात्मकता, लोकाश्रय अथवा प्राप्तीच्या दृष्टीने त्या यशस्वी झाल्या नाहीत. महिलांच्या नाटकात महिलाच असाव्या अशी विचारसरणी रूढ असल्याने, त्या काळी मिश्र नाटक कंपन्या अस्तित्वात आल्या नाहीत. म्हणून १८४३ ते १९२९ पर्यंत एक आपद्धर्म म्हणून पुरुष कलाकारांना स्त्री भूमिका कराव्या लागत. त्यांनी त्या विलक्षण कुशलतेने केल्या हा भाग निराळा.

घरंदाज गायिकांनी रंगभूमीवर स्त्री भूमिका करावी या विचारसरणीच्या आद्यप्रवर्तक हिराबाई बडोदेकर होत. ही पुण्यातील किराना घराण्याची गायिका कला संगीताच्या जाहीर मैफलीत निवडक नाट्यपदे म्हणत असे. शास्त्रशुद्धता, सहजता, कंठ माधुर्य हे हिराबाईंचे गुणविशेष होते. नाटकातील संगीताला उत्तेजन देण्यासाठी त्यांनी १९२९ मध्ये आपल्या नूतन संगीत विद्यालयाची स्वतंत्र नाट्यशाखा स्थापन केली. हिराबाई, त्यांचे बंधू सुरेशबाबू माने आणि भगिनी कमलाबाई व सरस्वती राणे यांनी प्रथमच **स्त्री पुरुष मिश्र संशयकल्लोळ** रंगभूमीवर सादर करून नवीन इतिहास घडविला. स्त्री भूमिकांच्या आद्यप्रवर्तक असलेल्या हिराबाईंनी सवाई गंधर्वांचे सहकार्य घेऊन **सौभद्र** देखील बसविले आणि त्यातील सुभद्रा वठवली (१९३०). दर्जेदार गायन आणि सात्विक साहस या गुणांमुळे मुंबईत त्याना विलक्षण लोकप्रियता मिळाली. मिश्र नाटकाचा प्रेक्षक गण वाढला. एक अत्यंत मधुर कंठाची किराना ख्याल गायिका, आणि शिवाय करीमखाँचा संगीत वारसा लाभलेली कलाकार पुरुष नटांबरोबर रंगभूमीवर आल्याने कुलीन महिलांना रंगभूमीवर येण्याचा मार्ग मोकळा झाला.[७१] हिराबाईनंतर ज्योत्सना भोळे यांनी रंगमंचावर पदार्पण केले. नाट्यप्रेमी सुशिक्षितांच्या 'नाट्यमन्वन्तरने' पुरस्कार केलेल्या **आँधळयांची शाळा** नाटकात (१९३३) भोळेबाई आणि पद्माबाई वर्तक यांनी स्त्री भूमिका करून वाहवा मिळविली. ही पहिली सर्वांगसुंदर स्त्री भूमिका केल्याबद्दल ज्योत्सनाबाईंची वाखाणणी करण्यात येते.[७२]

सन १९३१ पासून वाढत्या वयामुळे आपण स्त्री भूमिका करू नये असे बालगंधर्व म्हणू लागले होते. तरी देखील प्रेक्षक त्यांच्या वयाकडे दर्लक्ष करून फक्त कलेकडे लक्ष देत असत. त्यांची लोकप्रियता अद्याप कमी झालेली नव्हती. वयाच्या सत्तेचाळिसाव्या वर्षीसुद्धा त्यांच्या स्त्री भूमिकांच्या मोहिनीतून प्रेक्षक बाहेर पडलेले नव्हते. वयाच्या साठ-पासष्ठ वर्षापर्यंत बालगंधर्व रसिकांच्या आग्रहास्तव स्त्री भूमिका करीत होते. "धर्मात्मा " चित्रपटात पुरुष भूमिका केल्यावरही बालगंधर्व नाटकात पुन्हा स्त्री भूमिका करू लागले. बालगंधर्वांनी स्त्री भूमिकांचे एक स्मारकच उभारले हेच खरे !

स्त्री भूमिका करणाऱ्या पुरुष नटांच्या परंपरेतले अंतिम कुशल नट म्हणून मास्टर नरेशांचा उल्लेख करावा लागतो. ऑगस्ट १९४२ मध्ये **कुलवधू** रंगमंचावर आले आणि ज्योत्सना भोळे विलक्षण लोकप्रिय झाल्या.

मराठी रंगभूमी भरती आणि ओहोटीच्या लाटा अनुभवित असताना नामवंत व गुणी नाटक संस्था उदय पावल्या आणि मावळल्या. सर्वांचा इतिहास देण्याचे हे स्थळ नव्हे. तरी देखील आजही कार्यरत असलेल्या ललितकलादर्शचा ओझरता उल्लेख करावासा वाटतो. केशवराव भोसलेंची ही कंपनी त्यांच्या निधनानंतर (ऑक्टोबर १९२१) विकलावस्थेत आली. तिला पुनर्जन्म दिला रामकृष्णबुवा वझेंनी चाली दिलेल्या **सत्तेचे गुलाम** नाटकाने. त्याबरोबर रंगभूमीवर नवीनतेची आणि वास्तवतेची एक नवीन आकांक्षा निर्माण झाली. व्यंकटेश बलवंत तथा बापुराव पेंढारकर यांच्या निधनानंतर (१९३७) ललितकलादर्श संस्था लुप्त (defunct) झाली. तिला पुन्हा संजीवनी दिली भालचंद्र पेंढारकरांनी सत्तेचे गुलाम मुंबईत सादर करून. या नाटकाच्या प्रयोगांमुळे ललितकलादर्शचे पुनरुत्थान (resurrection) झाले.

पुणे किंवा मुंबईतील नाट्यगृहांत संगीत नाटकाच्या प्रयोगाला १२०० रुपये उत्पन्न झाले म्हणजे उत्तम झाले अशी स्थिती होती. गंधर्व नाटक मंडळीचे उत्पन्न १९२१ पासून दरमहा सुमारे १५,००० होते. इतर कंपन्यांपेक्षा हे उत्पन्न जास्त असले, तरी खर्चाचे प्रमाणही अधिक होते. रंगभूमीला शृंगारण्याची बालगंधर्वांची हौस अजिबात कमी न झाल्याकारणाने त्याना कर्ज झाले. तरी देखील **द्रौपदी** नाटकातील मयसभेच्या दृश्यासाठी त्यांनी अमाप खर्च केला. जुलै १९३१ मधील **विद्याहरण** सारख्या प्रयोगाला केवळ ३५० रुपये उत्पन्न झाले. ही विदारक वस्तुस्थिती. शनिवारच्या प्रयोगाला मुंबईत ४००-५०० रुपये तर इतर दिवशी केवळ ३०० रुपयांच्या आसपास प्राप्ती होई. **कान्होपात्रा** नाटकात पंढरपूरच्या देवालयासारखे हुबेहुब देवालय रंगभूमीच्या सेटवर दिसावे असा बालगंधर्वांचा आग्रह होता. या कला आसक्तीचा परिणाम म्हणजे कर्ज. केवळ कर्जामुळे गंधर्वांनी डिसेंबर १९३४ मध्ये गंधर्व नाटक मंडळी बंद करून उदरनिर्वाहासाठी अगदी अनिच्छेने चित्रपटात पदार्पण केले.[७३]

बालगंधर्वांपूर्वी चित्रपटात गेलेल्या नामवंत रंगभूमी कलाकारांमध्ये पहिले पेंढारकर, केशवराव दाते, सरनाईक, इत्यादी. चित्रपटाच्या लाटेबरोबर गणपतराव बोडस, नाना फाटक, मास्टर दिनकर, गंगाधर मेघश्याम लोंढे, हिराबाई बडोदेकर, ज्योत्सना भोळे, चिंतामणराव कोल्हटकर, मास्टर दीनानाथ मंगेशकर, इत्यादी नामवंत नाटकातून बाहेर

पडले आणि चित्रपटाच्या पडद्यावर आलेत. सन १९३३-३४ पासून बोलपटांच्या प्राणघातक प्रहारामुळे नाटक संस्था लुप्त होऊ लागल्या. नटांप्रमाणेच रसिकांचे सुद्धा रंगभूमीकडील आकर्षण जणु काय नाहीसे झालेले होते. अशा प्रतिकूल वातावरणात प्र.के.अत्रे यांचे **साष्टांग नमस्कार** (१९३३) आले आणि रंगभूमीला पुन्हा चेतना मिळाली. व्ही. शांताराम यांच्या "धर्मात्मा " चित्रपटातील (डिसेंबर १९३५) गंधर्वांच्या पुरुषी भूमिकेने प्रेक्षकांची प्रचंड गर्दी जमविली खरी, परंतु रंगभूमी कलाकार अथवा नाट्य रसिकांना हे स्थानान्तर आवडले नाही. म्हणून बहुतेक कलाकार उद्ध्वस्त झालेल्या रंगमंचाकडे पुन्हा परतू लागले.

अशा अस्थिर स्थितीत गंगाधर मेघश्याम लोंढे या किर्लोस्करी संगीत नाटक परंपरेतील शेवटच्या प्रभावी नटाने धाडस करून नाट्यसंसार पुन्हा उभारला (१९३९). वस्तुतः गंगाधरपंत लोंढे यांच्यानंतर तितका उत्तम आवाज असलेला प्रभावी गायक नट रंगभूमीवर आलाच नाही. हे ही संगीत रंगभूमीचे एक दुर्देव होते. जुन्या नाटकांना उत्पन्न मिळत नसल्याने आणि नवीन प्रभावी नाटक उपलब्ध नसल्याने लोंढेंनी कल्पकतेने **प्रेमसंन्यास नाटकाला** संगीताची जोड देऊन रंगभूमीवर आणले. येथपर्यंत संगीत नसलेले हे गडकरींचे एकमेव नाटक होते. **प्रेमसंन्यास** मधील पदांना मास्टर वृष्णरावांनी चाली दिल्या, लोंढेंनी आणखीही काही नाटकांचे प्रयोग केले. अर्थात रंगभूमीला मिळालेले हे जीवदान अल्पायुषी ठरले. कारण लोंढे (१९४४), दिनकर कामण्णा (१९४४) यांचे निधन झाले.

रंगभूमीचा अपकर्ष १९३१ पासून चालूच असताना १९४३ मध्ये तिच्या वाटचालीचे शतक पूर्ण झाले. म्हणून उत्साही नाट्याभिमानी रसिकांनी शत-सांवत्सरिक महोत्सव साजरा करण्याचा निर्धार केला. रंगभूमीची पडझड झालेली असूनही रसिक संयोजकांचे ठोस प्रयत्न आणि मराठी माणसाचे अलोट प्रेम यामुळे रंगभूमीचे पुनरुत्थान झाले. शताब्दी महोत्सवाचा शुभारंभ सांगलीला म्हणजे मराठी रंगभूमीच्या मूळ जन्मगावी ६ नोव्हेंबर १९४३ रोजी झाला. विविध परंपरेतल्या सुप्रसिद्ध जुन्या नटांनी एकत्र येऊन देवलांच्या **शारदा** चा अविस्मरणीय संयुक्त प्रयोग केला. मुंबईतील शताब्दी महोत्सवाचे संयोजन कुशल आणि निष्ठावंत अशा अमृत नारायण भालेरावांनी केले. अध्यक्षस्थान **भूषविले** बालगंधर्वांनी. **सौभद्र, स्वयंवर, एकच** प्याला, शारदा, मानापमान इत्यादी नाटके बालगंधर्व, हिराबाई बडोदेकर यांसारख्या कलाकारांनी करून तरुण रसिकांना पूर्वीच्या वैभवसंपन्न संगीत रंगभूमीचे दर्शन घडविले. गिरगाव चौपाटीवरच्या विशाल मंडपात सतत दहा दिवस चाललेला हा आनंद सोहळा हजारो प्रेक्षकांनी पाहिला, अनुभवला.[७४] असेच सोहळे महाराष्ट्रभर संपन्न झाले.

"संयुक्त मानापमान" नाटक रंगभूमीच्या लोकप्रियतेचे आणि वैभवाचे उच्चतम शिखर होते, तर सांगलीतील "संयुक्त शारदा" हा रंगभूमीच्या शतकाचा गोड समारोप होता. जुन्या रंगभूमीच्या काही रम्य स्मारकशिल्पांनी आणि सौंदर्य स्थळांनी रसिकांना भूतपूर्व वैभवाचे दर्शन घडविले. तो सूर्यास्तानंतरचा मनमोहक प्रकाश होता ! महोत्सवाच्या वेळी रंगभूमी भोवती जमलेली गर्दी पांगली नाही, ती पुन्हा जमली. जुन्या नटांनी सचेतन केलेला रंगमंच त्यांनी नवीन पर्वातील नट आणि नाटककारांच्या स्वाधीन केला.

रंगभूमीची लोकप्रियता आणि सामाजिक गरज कायम असल्याचे १९४३ च्या महोत्सवाने दाखवून दिले. तरी देखील तिच्या स्वरूपात आणि अभिव्यक्तीत नवीन कालानुरूप बदल होणे अपरिहार्य होते. त्या अनुसार १९५० नंतर रंगभूमीला नवीन वाट सापडली. मध्यंतरी डॉ. अ.ना. भालेरावांच्या पुढाकाराने मुंबई मराठी साहित्य संघाने नाट्यशाखा स्थापन करून नाटकांचे प्रयोग सुरू केले. त्यात चिंतामणराव कोल्हटकर, केशवराव दाते, गणपतराव बोडस, नानासाहेब फाटक, हिराबाई बडोदेकर, मास्टर कृष्णराव, विनायकराव पटवर्धन, बापूराव माने, ज्योत्सना भोळे, चिं.गो. पेंडसे, दुर्गाबाई खोटे या अनुभवी नटांचे मार्गदर्शन नवीन नटांना मिळू लागले. त्यातूनच मिनाक्षी, जयमाला शिलेदार, गोहरबाई, निर्मला गोगटे, राम मराठे, श्रीपादराव नेवरेकर, भालचंद्र पेंढारकर, सौदागर (छोटा गंधर्व), वामनराव सडालीकर, भार्गवराम आचरेकर, अनंत दामले, रघुवीर सावकार, वसंतराव देशपांडे, प्रसाद सावकार, कान्होपात्रा किणीकर, रामदास कामत, कृष्णचंद्र मोरेश्वर तथा दाजी भाटवडेकर, मास्टर विनायक, मास्टर दत्ताराम, जयराम शिलेदार, दत्ता भट, श्रीराम लागू, चितरंजन कोल्हटकर, प्रभाकर पणशीकर इत्यादी कसदार नट निर्माण झाले. (ही श्रेय नामावली केवळ प्रतीकात्मक असल्याने परिपूर्ण नाही.)[७५]

उस्ताद अब्दुल करीमखाँ, अलादियाखाँ, भास्करबुवा बखले आणि रामकृष्णबुवा वझे यांचेसारखे संगीतातील दिग्गज कला संगीत मैफलींमधून देखील नाटकातील एखादे तरी पद म्हणत असत. ती परंपरा अखंडित राहिली. इतकेच नव्हे तर १९७० नंतर जुन्या नाट्य संगीताचे पुनरुज्जीवन झाले. मात्र जुन्या नाटकांचे तसे झाले नाही. तथापि नवीन संगीतप्रेमी पिढीला अचानक त्या जुन्या गाण्यांचे मोल वाटू लागले. सुहासिनी मूळगावकर, कुमार गंधर्व, भीमसेन जोशी, जितेंद्र अभिषेकी यांसारख्या गायकांनी बालगंधर्वाला अभिप्रेत असलेली गाणी पुन्हा उजेडात आणली. अण्णासाहेब किर्लोस्करांच्या काळापासून भारतीय कला संगीताने रंगभूमीवर आपला प्रभाव दाखवून दिला. त्याप्रमाणेच रंगभूमीवरील संगीताने अभिजात कला संगीताला लोकाभिमुख आणि लोकप्रिय करण्याचे मोठे कार्य केले. म्हणूनच

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात या दोन्ही कला आविष्कारांना मानाचे स्थान प्राप्त झाले.

प्रयोगित कला

(या विषयावरील लेखन डॉ. वर्षा शिरगावकर, रुईया महाविद्यालय, यांनी केलेले आहे.)

महाराष्ट्राला अभिजात नृत्याची परंपरा नसली, तरी लोकनृत्य आणि लोककलांच्या बाबतीत महाराष्ट्र समृद्ध आहे. प्राचीन महाराष्ट्राच्या नृत्यनैपुण्याबद्दलची थोडीफार माहिती सातवाहनकाळात लिहिल्या गेलेल्या हाल राजाच्या **गाथासप्तशती** या ग्रंथात मिळते. त्या काळातील कलावंतिणी नृत्य, गायन इत्यादी कलांमध्ये निपुण होत्या असे त्यावरून दिसते. परंतु त्यांच्या शास्त्रीय नृत्यशैलीबद्दल माहिती मिळत नाही. इ.स. पाचव्या-सहाव्या शतकापर्यंतच्या काळाबद्दलची माहिती या ग्रंथामधून मिळू शकते. महाराष्ट्राच्या परंपरेत काही नृत्यनाट्यांचाही समावेश आहे. या नृत्यनाट्यांचेही मूळ कोणत्या ना कोणत्या तरी लोकनृत्यात असावे. प्रथम काही महत्त्वाच्या नृत्यनाट्यांचा परामर्श घेऊ.

दशावतार : विष्णुच्या दहा अवतारांचा आविष्कार या नृत्यनाट्यात पहायला मिळतो. दशावतारास "बोहाडा" असेही नाव आहे. दशावताराचे मूळ कदाचित **गाथासप्तशती** मध्ये असावे, कारण त्या काळात सादर केल्या जाणाऱ्या करमणुकीच्या कार्यक्रमांमध्ये अमृत-मंथन, विष्णु-लक्ष्मी यांच्या कथा, बली-वामन यांचे कथानक इत्यादींचे उल्लेख या ग्रंथात आढळतात.[७६] अनेक शतकांपर्यंत करमणुकीचा हा प्रकार गावांच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक चौकटीत आपले अस्तित्व टिकवून होता असे दिसते. यात नृत्याच्या आविष्काराबरोबरच नाट्यही दिसून येते. यातील सूत्रधार प्रथम गणपती आणि सरस्वती या देवतांना आवाहन करतो आणि नंतर वीररसाने युक्त असे विष्णुचे दहा अवतार सादर केले जातात. गणपती आणि सरस्वती या देवतांचे सादरीकरण हे महाराष्ट्रातील खास वैशिष्ट्य होय. मध्ययुगीन काळात करमणुकीचा हा प्रकार कोकण आणि गोवा भागात प्रचलित होता. संत-कवी रामदासाच्या **दासबोधा** तही दशावताराचा उल्लेख आढळतो. सन १७२८ मध्ये या नृत्यनाट्याचे पहिले औपचारिक प्रात्याक्षिक झाले तेव्हापासून दशावताराची लोकप्रियता वाढली. त्याच्या प्रस्तुतीकरणाचे तंत्र श्यामजी नाईक काळे यानी कर्नाटकातून कोकणात आणले. तेव्हापासून हे नृत्यनाट्य गावाच्या उत्सवाचे एक अविभाज्य अंग बनले. दशावतार सादर करणारे लोक देवळी जातीतील असून त्यांना दशंत्री किंवा खेळ्ये असे म्हटले जाते. दशावतारास मृदंग आणि पेटी यांची साथ असते.

गोंधळ : महाराष्ट्रातील देशस्थ ब्राह्मण तसेच इतर काही जातींमध्ये गोंधळाची परंपरा आढळते. "गोंधळ घालण्याची" परंपरा दहाव्या शतकात पूर्णपणे रूढ झाली असावी. घरातील विवाह इत्यादी सारखे मंगलकार्य निर्विघ्नपणे पार पाडल्याबद्दल देवीची स्तुती व पूजा करण्याचा हा एक प्रकार आहे. गोंधळ घालणाऱ्या लोकांची एक विशिष्ट जात असून ते भवानी किंवा रेणुका या देवतेस मानतात. माहूर आणि तुळजापूर ही त्यांची मूलस्थाने होती. अलीकडच्या काळात त्यांची वस्ती महाराष्ट्र, मध्यप्रदेश आणि आंध्र प्रदेशात आहे. गोंधळ्याचा पोशाख एखाद्या कीर्तनकारासारखा असतो. त्याचे साथीदार हरिदास टाळकरी मृदंगाप्रमाणे संबळ तुणतुण्याचा वापर करतात. गोंधळ घालणारे लोक अपल्या कार्यक्रमासाठी कवड्यांची माळ, मातृवाद्य,टाळ, शंखवाद्य, मृदंग, चिपळी, वीणा इत्यादी वाद्यांचा वापर करतात. कार्यक्रमाच्या वेळी गोंधळी आपल्या हातात सतत दिवटी नाचवत असतात. हा नृत्यनाट्याचा प्रकार रात्री सादर होत असल्यामुळे दिव्यांची शोभा दिसते. आजही गोंधळ ही परंपरा काही कुटुंबांमध्ये आहे. १९८४ मध्ये परभणीचे राजारामभाऊ कदम याना गोंधळ घालण्याच्या कलेबद्दल संगीत नाटक ॲकॅडमी अवॉर्ड देऊन गौरविण्यात आले.

शाहिरी : पोवाडा सादर करणाऱ्यांना "शाहीर " असे म्हटले जाते. शाहिरी परंपरेचा उगम मध्ययुगीन काळामध्ये झाला असे मानण्यात येते. हा शब्द "शायर " या फारसी शब्दापासून निघाला असून त्याचा अर्थ स्तुतिपाठक असा लावता येतो. "शाहीर " हा शब्द प्रथम **महिकावतीची बखर** या ग्रंथात आला. शाहिरांनी आपले कवित्व पोवाड्याच्या रूपाने अनेक वेळा जत्रा, सण व समारभांच्या प्रसंगी सादर केले. पोवाडा हा वीर रसयुक्त असून या काव्याच्या सादरीकरणामार्फत शाहीर तत्कालीन पुढाऱ्यांच्या लष्करातील मर्दुमकीच्या कथा लोकांपुढे मांडत. अर्थात त्यावेळी त्यांचे सादरीकरण केवळ काव्यपठन स्वरूपाचे न राहता काव्याचे नाट्यरूप सादर करणे असे होई. वि.का. राजवाडे यांच्या मते, " पोवाडा हे केवळ श्राव्य काव्य नव्हे, ते दृश्य काव्यही आहे. " त्यात अनेक पात्रे असत. मुख्य शाहीर आणि त्याचा साथीदार हे दोघे पोवाड्यातील व्यक्तींच्या सोंगाची बतावणी करीत. प्रमुख पात्राची बतावणी मुख्य शाहीर करीत असे. याशिवाय तो नाटकातील सूत्रधारासारखेही काम करीत असे. बतावणीचे काम गद्यात करीत असताना वीरश्री संचारून तो पद्यातही भरारी मारत असे. त्यावेळी पोवाड्यातील नाट्यरूप प्रकर्षाने जाणवत असे. शाहीर कलाकार निरनिराळ्या जातींमधील

असत. उदा- ब्राह्मण, गवळी, तेली, तांबोळी, शिंपी, सोनार, कासार, शिकलगार, कोष्टी, साळी, माळी, वंजारी, महार, मांग. मराठेशाहीच्या पूर्वार्धात म्हणजेच शाहूच्या आगमनापर्यंत पोवाडा हा काव्यप्रकार महाराष्ट्रात बराच प्रचलित झालेला होता. हिंदवी स्वराज्याचा संदेश जनमानसात पोचविण्यासाठी पोवाडा या प्रकाराने महत्त्वाची कामगिरी बजावली.

आतापर्यंत प्रसिद्ध झालेल्या पोवाड्यांमध्ये सर्वात जुना पोवाडा शाहीर अग्नीदास किंवा अज्ञानदास याचा होय. तो पुण्याचा रहिवासी असून शिवाजीचा समकालीन होता. त्याच्या पोवाड्याचा कथाविषय अफझलखानाचा वध हा होय. बहुतकरून हा पोवाडा अफझल खानाच्या वधानंतर (१६५९) लगेचच रचला गेला असावा. त्याचे पहिले प्रस्तुतीकरणही तेव्हाच झाले असावे.[७७] तुलसीदास नावाचा आणखी एक शाहीर या काळात होऊन गेला. त्याच्या पोवाड्यामध्ये अज्ञानदासाच्या पोवाड्यापेक्षा जास्त काव्य दिसून येते. अस्थिर राजकीय परिस्थितीत पोवाडा किंवा लावणी यांची निर्मिती होणे किंवा ते सादर होणे ही गोष्ट दुरापास्त होती. याचे कारण म्हणजे अशा परिस्थितीमुळे जी बिकट आर्थिक स्थिती उद्‌भवली त्यामुळे शाहिरांना दरबारचा आश्रय मिळू शकला नाही. म्हणूनच शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतरच्या (१६८०) काळापासून नानासाहेब पेशवा अधिकारारूढ होईपर्यंतच्या (१७४०) काळात विशेष पोवाडे दिसत नाहीत. १७६१ च्या तिसऱ्या पानिपतच्या लढाईवर लिहिल्या गेलेल्या ७-८ पोवाड्यांपैकी "जंग बहादुर" असे शीर्षक असलेला उर्दू पोवाडा सर्वात जुना आहे. हा कादर नावाच्या शाहिराने लिहिला होता. लढाईवरील इतर पोवाडे शिवराम, रामा सटबाजी, रंगराय इत्यादी शाहिरांनी लिहिले. पानिपतच्या लढाईनंतरच्या काळात माधवसुत, लहरी मुकुंद, खंडू संतू आणि जनार्दन या शाहिरांचा उल्लेख करता येतो.

तमाशा आणि मध्ययुगातील नृत्यकलेचा विकास : महाराष्ट्राच्या संगीत-नृत्याच्या परंपरेत तमाशा हा एक महत्त्वाचा प्रकार आहे. "तमाशा" हा शंब्द मूळ अरबी भाषेतील असून त्यातून निरनिराळी करमणुकीची साधने असा अर्थ प्रतीत होतो. साधारणतः सतराव्या शतकाच्या शेवटी तमाशाचा उगम झाला असे मानता येते. मराठ्यांच्या पाडावासाठी शिवाजीच्या मृत्यूनंतर जेव्हा औरंगजेबाने महाराष्ट्रात लष्करी छावण्या उभारल्या तेव्हा छावण्यांमधील करमणुकीच्या कार्यक्रमांमध्ये तमाशाचे बीज पेरले गेले. मुघल सैनिकांना उत्तरेपासूनच आपल्या छावण्यांमध्ये नर्तकी ठेवण्याची सवय जडली होती. सामान्य सैनिकांना नृत्यकलेत तरबेज असलेल्या मुली ठेवणे शक्य नसल्यामुळे त्यांना स्थानिक कलाकारांकडे वळावे लागले. तत्कालीन महाराष्ट्रात असलेले करमणुकीचे प्रकार त्यांच्या करमणुकीच्या चौकटीत बसत नव्हते. त्यामुळे येथील काही भटक्या जाती-जमातींच्या लोकांना नृत्य शिकवून त्यांच्याकडून आपली करमणुकीची गरज भागवून घेणे हा एकच पर्याय मुघल सैनिकांपुढे होता. भटक्या जातीपैकी कोल्हाटी जातीच्या महिला आधीपासूनच महाराष्ट्रातील तरुण पुरुषांच्या चैनीची गरज भागवत होत्या असे दिसते. पुढे याच स्त्रियांनी मुघल सैनिकांची करमणुकीची गरज भागविण्यासाठी काही पदन्यास शिकून घेतले असावेत.

मुघलांच्या नजरकैदेत असलेला संभाजीचा मुलगा शाहू याची सुटका १७०७ मध्ये करण्यात आली. या वर्षी त्याला सातारा येथे राजा म्हणून घोषित करण्यात आले. मुघलांच्या सतत सहवासात राहिल्यामुळे तोही चैनविलास यांपासून वंचित राहिला नव्हता. राजा झाल्यावर त्याने भारताच्या निरनिराळ्या प्रदेशामधून गायक, नट आणि नायकिर्णींना महाराष्ट्रात आणण्यासाठी प्रयत्न सुरू केले. महाराष्ट्रातील बऱ्या दिसणाऱ्या मुलींना नृत्य व गायन शिकवून तरबेज करावे या त्याच्या प्रयत्नास फळ आले नाही. त्यामुळे शाहूनेही मुघलांसारखेच कनिष्ठ जाती-जमातींमधून कलावंत निर्माण करण्यास उत्तेजन दिले. तमाशा ही लोककला फोफावण्यास त्यामुळे मदत झाली.

परंतु महाराष्ट्रातील लोककलेवरच अवलंबून न राहता शाहूने भारताच्या निरनिराळ्या प्रदेशांमधून नर्तक, नर्तकी आणण्याचे प्रयत्न चालू ठेवले. उत्तर भारतात आणि कर्नाटकात जाणाऱ्या आपल्या पेशव्यांना त्याने वारंवार यासंबंधी सूचना दिल्या. इ. स. १७४० मध्ये नारोशंकर या मराठ्यांच्या उत्तरेकडील दिवाणाने सिरोंज येथून पेशव्याकडे तीन नृत्यांगना पाठविल्या.[७८] शाहूचा पेशवा बाजीराव पहिला (१७२०-१७४०) याला बुंदेलखंडचा राजा छत्रसाल बुंदेला याच्याकडून मिळालेल्या मस्तानीचे उदाहरण तर प्रसिद्धच आहे. इ. स. १७२९ मध्ये छत्रसाल याने बाजीरावाला मस्तानी भेट म्हणून दिली होती. बाजीरावाने त्याला मुघलांविरुद्ध जी मदत दिली त्याबद्दल ही भेट होती. **तारीख-इ-मुहम्मदशाही** च्या वर्णनानुसार मस्तानी ही कांचनी असून संगीत, नृत्य, घोडेस्वारी आणि तलवार चालविणे यात प्रवीण होती. अलीकडे झालेल्या एका संशोधनानुसार ती छत्रसाल बुंदेला याची मुलगी होती, असे मत मांडण्यात आले आहे.

शाहूच्या मृत्यूनंतरही नर्तकी ठेवण्याची प्रथा इतर पेशव्यांच्या काळात सुरू राहिली. पहिल्या बाजीरावा नंतर आलेला नानासाहेब पेशवा (१७४०-१७६१) याने आपला दरबारी लेखक लक्ष्मण याला नृत्याचा एक फड पाठविण्याविषयी लिहिले होते. दिनांक २३ एप्रिल १७५२ रोजी मुघल दरबाराचा वझीर सफदर जंग आणि मराठे यांच्यात एक महत्त्वपूर्ण तह झाला. प्रामुख्याने अफगाणिस्तानचा राज्यकर्ता अहमद शहा अबदाली आणि इतर काही अंतर्गत शत्रू यांच्यापासून मुघलांना मराठ्यांनी लष्करी संरक्षण द्यावे यासंबंधीची कलमे या तहात होती.[७९] त्यानिमित्ताने मराठ्यांचे उत्तरेकडे

सतत जाणे-येणे सुरू झाले. त्यांचा मुघल तसेच राजपूत संस्कृतीशी संबंध येऊ लागला. नानासाहेब पेशव्याने आपला धाकटा भाऊ रघुनाथराव याला मोहिमांचे नेतृत्व दिले होते. रघुनाथराव अतिशय रसिक होता. त्याने आपल्या छावण्यांमध्ये मुघलांप्रमाणेच नर्तकी ठेवणे सुरू केले. रघुनाथरावाने उत्तरेतील अनेक नर्तकींना पुण्यात आणून ठेवले. त्यांना सरकारी खजिन्यातून पगार देण्यात येई. एका ऐतिहासिक नोंदीनुसार रघुनाथरावाच्या पदरी असलेल्या नर्तकींचा मासिक पगार याप्रमाणे होता : केशरी चपलेची आई ४५ रुपये, वसंतीची आई ४० रुपये, यमनी ३० रुपये, गहिना ३० रुपये, उमेदा ६ रुपये.[८०]

या नर्तकींच्या देखरेखीचे काम रघुनाथरावाने गुलाबराव खोजाकडे सोपविले होते. इ. स. १७६६ मध्ये रघुनाथरावाच्या कारभाऱ्याने कुवर नावाच्याएका नर्तकीसंबंधी गुलाबराव खोजाला लिहिलेल्या पत्रावरून रघुनाथरावाच्या हौशीबद्दल कल्पना यावी. " तिजला ठेऊन घेणे. खासा स्वारी आनंदवली दुसरे ज्येष्ठ आषाढ मासी येईल. चौदा पंधरा महिन्यांचा अवकाश आहे, तोपर्यंत तिणे गावयास व नाचावयास शिकोन चांगले तरबेज व्हावे की खासा स्वारी आलियावर गाणे नाचणे पाहून मर्जी खूष होय ऐसे करावे.[८१]

पेशवा सवाई माधवरावाच्या काळात तर नाच-गाण्याची परंपरा आणखीच वाढली. नाना फडणीसाच्या सत्तेचाही काळ हाच (१७७५-१७९५). त्याने दिल्ली, लखनऊ, हैदराबाद आणि कर्नाटक येथून उत्कृष्ट स्त्री-कलावंतिणींना पुण्यात घेऊन येण्याविषयी त्या ठिकाणच्या आपल्या अंमलदारांना लिहले होते. सवाई माधवरावाचा हैदराबादच्या निजामाच्या दरबारातील वकील गोविंदराव काळे याने चंद्री नावच्या एका कलावंतिणीबद्दल जे लिहिले होते ते असे, " चंद्री कळवंतीण सांप्रत गाण्यात, नाचण्यात, सुरतीत, हावभाव बतावणीत येथे सर्व दौलतदारांचे पसंतीस आहे. म्हणून तिची चालही उमदीच पडली आहे. " काळे याने चंद्रीला १,००० रुपये मासिक पगारावर पुण्याला पाठविले.[८२] पुढे चंद्री आणि सगुणी या कलावंतिणींसाठी पेशवा बाजीराव दुसरा याच्या अमदानीत पुण्यातील शुक्रवार पेठेत वाडे बांधण्यात आले. त्याच्या काळात वेंकट नरसी आणि धर्मी पारी या आणखी उत्तम नर्तिका नेमण्यात आल्या. इ.स. १८०२ मध्ये वेंकट नरसी हिला सतत तीन रात्री नृत्य केल्याबद्दल बाजीरावाने २६,००० रुपये बक्षीस दिल्याची ऐतिहासिक नोंद सापडते.[८३]

उत्तर पेशवाईच्या काळात सण-समारंभांना विशेष महत्त्व प्राप्त झाले. समारंभाचा एक अविभाज्य भाग म्हणजे नृत्याचे सादरीकरण. पेशव्यांचे महत्त्वाचे दैवत म्हणजे गणपती. त्यामुळे गणेशोत्सव मोठ्या थाटामाटाने साजरा केला जाई. हा उत्सव दहा दिवस चाले. सवाई माधवराव पेशवेपदी असताना उत्सवासाठी उत्कृष्ट नर्तकींना पाचारण केले जाई. इ.स. १७९१ मध्ये कॅप्टन मूर या पुणे येथील ब्रिटिश रेसिडेंटने असे नमूद केले आहे की, शनिवारवाड्यातील गणेश रंगमहालात त्याला आमंत्रित केले असता त्याने शंभर नायकिर्णीचे नृत्य पाहिले. सण-समारंभांच्या वेळी नर्तक-नर्तकींना देण्यात आलेल्या बिदागीवरून आणि उंची कपडे यावरून समारंभांच्या भव्यतेची कल्पना यावी. इ.स. १७९५-९६ मध्ये गायिका आणि नर्तकींना १,७२६ रुपये बिदागी म्हणून दिल्याची नोंद सापडते. त्यावर्षीच्या एकूण ४३ कलावंतिणींसाठी (३५ जुन्या आणि ८ नवीन) ही बिदागी होती.[८४] दसऱ्याच्या वेळीही नृत्य करवून घेतले जाई.

पेशव्यांच्या आधीच्या काळात होळीचा सण महाराष्ट्रात साजरा होत नसे. प्रामुख्याने तो उत्तरेकडचा. पेशव्यांच्या उत्तरेकडील सरदारांना तो इतका आवडला की, त्यांनी तो महाराष्ट्रात आणला. कृष्णाजी विनायक सोहोनी यांच्या **पेशव्यांची** बखर मध्ये महादजी शिंदे याने सवाई माधवरावाच्या दरबारात जयपूर, उदयपूर, मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन या ठिकाणच्या होलिकोत्सवाचे जे वर्णन केलेले आहे त्याचा उल्लेख येतो. हा सण महाराष्ट्रातही साजरा व्हावा यासाठी सवाई माधवरावाने परवानगी दिली. होळी म्हणजे नर्तकींना बिदागी मिळण्याची पर्वणीच. त्यामुळे होळीच्या निमित्ताने अनेक नर्तकी पुण्यास येत.

वरील नोंदींवरून असे अनुमान काढता येईल की, पेशवाईच्या काळात उत्तरेकडचे नृत्यप्रकार महाराष्ट्रात आले. अर्थात खास नृत्ये करणाऱ्या नृत्यांगना केवळ पेशव्यांच्या आणि त्यांच्या कारभाऱ्यांच्या करमणुकीसाठी असत, सामान्य लोकांसाठी नव्हेत. शाहूच्या आधीपासून महाराष्ट्रात सुरू झालेला तमाशा हा करमणुकीचा प्रकार त्याच्या नंतरच्या काळातही आपले अस्तित्व टिकवून होता. अशा रीतीने नृत्याचे दोन प्रवाह पेशवाईच्या काळात दिसतात असे म्हटले तर वावगे ठरू नये.

साधारणतः या काळापासून तमाशात लावणीचा अंतर्भाव झाला. मराठ्यांचा उत्तरेशी सतत संपर्क येऊ लागल्याने कळत नकळत त्यांचे राहणीमान बदलू लागले. त्यांची राहणी, वृत्ती, करमणूक या सर्वांवर चैन, विलास यांची झाक पसरू लागली. त्यामुळे शृंगार हा नवरसांमधील प्रमुख रस लावणीमधून व्यक्त करण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. शृंगाराचा स्पर्श असलेले गाणे त्यापूर्वी नव्हते असे नव्हे. ज्ञानेश्वराच्या काळातही शाहीर अशी गाणी सादर करीत असावेत. परंतु ज्ञानेश्वराच्या काळात काहीसे शृंगारिक, पण भक्तिभावपर गीत या स्वरूपात लावणी प्रचलित होती.

ज्ञानेश्वरीच्या सतराव्या अध्यायात यासंबंधीचे वर्णन येते.[८५]

खरे तर लावणी सुरुवातीपासून शृंगारिक नव्हती. तमाशातील पात्रांचे संवाद कंटाळवाणे होऊ लागल्यास एखादे चटकदार गीत सादर करावे या भूमिकेतून लावणीचा जन्म झाला. पण कालांतराने हे चटकदार गीत शृंगारिक असल्यास त्याला जास्त रंगत येईल म्हणून लावणीला शृंगाराचा साज चढला. सवाई माधवराव आणि दुसरा बाजीराव (१७९५-१८१८) यांनी शाहिरांना राजाश्रय देऊन लावण्या रचण्यासाठी उत्तेजन दिले. एका बाजूला खास नृत्यांगना, कलावंतिणी आणि दुसऱ्या बाजूला सामान्य लोकांचे करमणुकीचे साधन असलेला तमाशा यांना जोडण्याचे काम लावणीने केले असे दिसते. प्रसिद्ध शाहिरांच्या लावण्या कलावंतिणीसुद्धा गाऊ लागल्या. यातूनच "बैठकीची लावणी" हा प्रकार प्रचलित झाला. उपरोक्त दोन पेशव्यांच्या काळात लावण्या लिहिणाऱ्या शाहिरांचा उदय आणि विकास होत गेला. एका संशोधनानुसार या काळात लावण्या लिहिणारे जवळजवळ १२५ शाहीर होते. त्यापैकी गाजलेले लावणीकार होनाजी-बाळा (१७५४-१८४४) परशुराम (१७५४-१८४४), हैबती (१७५६-१८५४), रामजोशी (१७६२-१८१२), प्रभाकर (१७६९-१८४३), अनंत फंदी (१७७४-१८१९) आणि सगनभाऊ (१७७८-१८४०) हे होत.

पेशवेकालीन तमाशाला "ढोलकीचा तमाशा" असे म्हटले जाई. या तमाशाचा संच किंवा फड याप्रमाणे असे : (१) पुढारी किंवा सरदार, (२) ढोलक्या, (३) कडे वाजविणारा, (४) सोंगाड्या, (५) २-४ सुरत्ये किंवा शिलकरी " जी जी " इत्यादी सूर ओढणारे, आणि, (६) गोड आवाजाचा एक सुस्वरूप नाच्या. थेट बापूराव कृष्ण कुलकर्णी किंवा पट्टे बापूराव (१८६६-१९४५) या शाहिराच्या काळापर्यंत लावणीवर नाच करणारा नाच्या पोऱ्या असे. पट्टे बापूरावांच्या फडामध्ये प्रथमच स्त्रीने नाचण्याचा प्रारंभ झाला. पुतळा नावाची पहिली तमाशात नाचणारी स्त्री होय.

तमाशा या नृत्यनाट्यात कलगीवाले आणि तुरेवाले असे दोन गट असतात. कलगीवाले हे माया किंवा शिवाचे अनुयायी, तर तुरेवाले ब्रह्माला किंवा विष्णुला मानणारे. कलगी आणि तुरा हे दोन संप्रदाय आहेत. जेव्हा तमाशातील सवाल-जबाबाच्या स्वरूपात त्यांचे एकमेकांशी सामने होतात, तेव्हा ते आपापल्या डफांवर संप्रदायांचे निषाण लावतात. कलगी ही तुळशीच्या मंजिरीसारखी असते तर तुरा मक्याच्या कणसावर असलेल्या शेंडीसारखा असतो. सवाल-जबाबाच्या सामन्यात जिंकणारा पक्ष प्रतिस्पर्धी पक्षाचे निषाण हिसकावून घेतो.

तमाशाचा मूळ गाभा "वग" होय. तो सन १८६० नंतर उदयास आला. "वग" हा शब्द "ओघ" या शब्दापासून आला असून तमाशा एकदा सुरू झाल्यापासून शेवटपर्यंत ओघवता राहिला पाहिजे या जाणिवेतून वगनाट्य निर्माण झाले. हा तमाशाच्या उत्क्रांतीमधील एक महत्त्वाचा टप्पा होय. तमाशाचा निवेदक आपल्या भाषणाने कथानकातील दुवे जोडत राहतो. त्यालाच वगातील "बतावणी" किंवा सपातनी असे म्हणतात. सन १८६५ मध्ये उमा सावळजकर या तमासगिराने आपला सहकारी बाबा मांग याच्या साहाय्याने "मोहना बटाव" हा पहिला वग रचना. पट्टे बापूराव यांचा मिट्ठाराणी हा वग अतिशय लोकप्रिय झाला. पुढे १९३० च्या सुमारास संगीतबारी हा प्रकार तमाशाला जोडण्यात आला. मुघलांच्या महाराष्ट्रातील छावण्यांमध्ये कोल्हाटी किंवा डोंबारी स्त्रिया जो नाच करीत असत, तोच हा नाच. संगीतबारीतील नावाजलेल्या महिला म्हणजे कौसल्या कोपरगावकर, लीला आणि कला येवलेकर, यमुना वाईकर, हीरा सातारकर, अनूसया कवठेकर इत्यादी. विठाबाई नारायणगावकर यांचा स्वतःचा फड होता, ज्यात त्यांचे अभिनयनैपुण्य दिसून येई. अलीकडेच लक्ष्मीबाई कोल्हापूरकर याना "एक होता विदूषक " या मराठी चित्रपटाच्या नृत्यदिग्दर्शनाबद्दल पुरस्कार मिळाला. प्रथम केवळ ग्रामीण सांस्कृतिक चौकटीत असलेला हा नृत्यनाट्याचा प्रकार थिएटरांच्या स्थापनेनंतर शहरांमधील थिएटरांमध्येही सादर होऊ लागला. एकट्या मुंबई शहरात विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात तमाशाचे १९ थिएटर होते. आता त्यापैकी फक्त एकच शिल्लक आहे. लालबागमधील हनुमान थिएटर हे ते होय. जळगावमध्ये हैदरी थिएटरमध्ये आताआतापर्यंत तमाशा सादर होत असे. अलीकडच्या काळात जो तमाशा सादर केला जातो त्याच्या प्रयोगाची अंगे अशी : (१) गण म्हणजे गणपती स्तवन, (२) गौळण म्हणजे निरनिराळ्या रूपांमधील राधा-कृष्ण, गौळणी व त्यांच्या मैत्रिणी-पेंद्या, मावशीबाई वगैरे पात्रांचा बॅले, (३) लावणी म्हणजे नाचणाऱ्या मुलींचा नाच, (४) भेदिक कवन म्हणजे सवालजबाब, आणि (५) मुजरा.

वाघ्या-मुरळी : खास धार्मिक बाबतीतील आणि महाराष्ट्रातील एका विशिष्ट दैवताशी संबंधित असलेले नृत्य म्हणजे "वाघ्या-मुरळी" हे होय. जेजुरी येथील खंडोबाच्या देवळात काही खालच्या जातीतील मुली "मुरळी" म्हणून प्रदान केल्या जात. या देवळात प्रदान केलेल्या मुलांना "वाघ्या" असे म्हणत. या जाती म्हणजे कुणबी, धनगर, कोळी, नाईक, बेरड, महार, मांग इत्यादी. पुढे मुरळीला देवदासी म्हणून वागणूक मिळून वाघ्याच्या संगतीने तिला खास नृत्य शिकविले जाई. म्हणून यास वाघ्या-मुरळी नृत्य असे म्हटले जाते. मुरळीला शेवटी कोणाची तरी, विशेषतः पुजाऱ्याची आश्रित म्हणून राहावे लागे. काही मुरळ्या कायमच्या जेजुरीला राहत, तर काही वाघ्यांबरोबर सर्व दक्षिण महाराष्ट्रात खंडोबाची गाणी गात फिरत. मुरळीच्या नृत्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे ती एका हाताने घोळ (घंटा) वाजवत नृत्य करत असे. खरे तर खंडोबाच्या या देवदासीला स्वतःचे असे कोणतेच आयुष्य नव्हते. म्हणूनच सुधारकांचे लक्ष या चालीकडे वेधले

गेले. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून ही प्रथा बंद करण्याचा प्रयत्न विठ्ठल रामजी शिंदे यांनी केला. त्यांना महार जातीतील नेते शिवराम कांबळे यांचे सहकार्य लाभले होते. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन ही चाल १५ ऑक्टोबर १९३४ ला मुंबई शासनाने कायद्याने बंद केली. पण तिचे समूळ उच्चाटन होऊ शकले नाही. महार जातीमधून मुलींना मुरळी म्हणून प्रदान करण्याची प्रथा त्यानंतरही सुरूच होती. म्हणूनच पुढे डॉ. आंबेडकर यांनी आपल्या बांधवांना या चालीविरुद्ध अनेक वेळा आवाहन केले. तथापि आजही ही चाल काही प्रमाणात खंडोबाच्या देवळात सुरूच आहे.

कोळी नृत्य : कोकण किनारपट्टीवरील सोनकोळी जो नाच सादर करतात तो कोळी नाच म्हणून प्रचलित झाला. हा नाच त्यांचे सागराशी असलेले जिव्हाळ्याचे नाते दर्शविणारा होय. यामधील वेंगद्रस्थानी असलेल्या व्यक्ती नाखवा आणि कोळीण या होत. त्यांच्या बाजूला दुतर्फा असे इतर नर्तक आणि नर्तकी उभ्या राहून हा नाच सादर होतो. अजूनही हा नाच किनारपट्टीवर पुष्कळ ठिकाणी दिसतो. आपल्या हातांमध्ये छोटी छोटी वल्ही घेऊन शरीराच्या नौकांसारख्या हालचाली करून नर्तक आणि नर्तकी समुद्रावर चालणाऱ्या बोटींचे दृश्य निर्माण करतात. जवळजवळ प्रत्येक नाचात **गोमू** हे स्त्री-पात्र असते जिला उद्देशून अनेक गाणी असतात.

कोळ्यांमध्ये "नकटा" नावाचा आणखी एक नाच असतो. यात तीन पात्र असतात :- कोळी, कोळीण आणि नकट्याचा मुखवटा असलेले आणखी एक पात्र. कोळी आणि कोळीण गाऊन नाच करीत असताना नकटा त्यात सहभागी होतो. तो गाणे म्हणण्यापेक्षा आपल्या हावभावांनी या करमणुकीच्या प्रकारात नाट्य निर्माण करतो. नकट्याचे काम एखाद्या विदुषकासारखे असते. हास्यरस निर्माण करण्यासाठी तो अधिकाधिक गमतीशीर हालचाली करून या नाचात रंग भरतो.

हे नाच नारळी पौर्णिमा, होळी, गौरी-गणपती या दिवशी कोळी सादर करतात. विशेषतः "नकटा" नाच हा होळीच्या प्रसंगी करतात.

कातकरी आणि ठाकुरांचा ढोलाचा नाच : सह्याद्री पर्वताच्या उत्तरेकडील रांगांमध्ये राहणाऱ्या कातकऱ्यांना नृत्य अतिशय प्रिय आहे. त्यांना ठाकूर किंवा ठाकर असेही म्हटले जाते. जेव्हा जेव्हा त्यांना सुबत्ता किंवा दारूचा लाभ होतो तेव्हा ते आपला आनंद नाचातून व्यक्त करतात. कातकऱ्यांच्या नाचात ढोल आणि ढोलक यांचे जास्त महत्त्व असते आणि म्हणूनच त्याला "ढोलाचा नाच " म्हटले जाते. ढोलावरील ठोके वाढत जातात त्या तालावर नाचातील पदन्यासाची गतीही वाढत जाते. एकमेकांच्या खांद्यांवर किंवा कमरेभोवती हात टाकून कातकरी वर्तुळाकार नाच करतात. ढोलाच्या ठोक्यांवर अतिशय द्रुतगतीने ते विविध प्रकारच्या हालचाली करून त्यांच्या गाण्यातील आविष्कार करून दाखवितात. ढोलाखेरीज नाचाच्या वेळी तुमडी नावाचे वाद्यही वाजविले जाते.[८६] दिवाळीत हा नाच मोठ्या प्रमाणात करतात. कधी कधी काही गट पौराणिक पार्श्वभूमी असलेल्या नवीन गाण्यांवरील नाचाच्या स्पर्धा ठेवतात. त्यांना "झेंडा नाच " स्पर्धा म्हटले जाते. कातकरी या स्पर्धेत मोठ्या हिरीरीने उतरतात.

वारलींचे तारपी नृत्य : महाराष्ट्र आणि गुजरातच्या सीमेवर असलेल्या वारली या जमातीच्या निरनिराळ्या नाचांना तारपी नृत्य म्हटले जाते. त्यांच्या नाचासाठी वाजविले जाणारे तारपी हे एक सुषिर वाद्य असून त्याची लांबी २ ते ५ फूट असते. या वाद्याचे तीन भाग असतात. वरील भाग भोपळ्याचा बनलेला असतो; तो जितका मोठा असतो तितके तारपी वाद्य मोठे असते. ते पोकळ असते आणि वाजविणारा आपल्या तोंडाने त्यात सारखी हवा भरत राहतो. नंतर ही हवा वाद्याच्या मध्यभागात शिरते. हा मध्यभाग बांबूच्या दोन पोकळ नळ्यांनी बनलेला असतो. जरी या वाद्याच्या सुरात तोचतोचपणा असला, तरी काही सूर वेगळे असे ओळखता येतात. काही तारपी नाचांची नावे अशी : उडक्याचा नाच, गुंजवायचा नाच, भात भालण्याचा नाच. उडक्याच्या नाचात त्यांची महत्त्वाची हालचाल उडीची असते. गुंजवायचा नाच या प्रकारात ते गुडघ्यात वाकून जमिनीवर पडलेले काहीतरी उचलून ते डोक्यावर घेण्याची हालचाल करतात. भात भालण्याच्या नाचात त्यांची हालचाल, वाऱ्याच्या झुळुकीने भाताचे पीक जसे डोलते तशी असते. ते आपल्या हालचाली मागे, बाजूला आणि पुढे झुकून करतात. या निरनिराळ्या नाचांच्या वेळी तारपी हे वाद्य वाजविणाऱ्या व्यक्तीचेही कौशल्य दिसून येते.

भिल्लांचे नाच : सातपुडा पर्वतात राहणाऱ्या पावरा भिल्लांचे दोन प्रकारचे नाच असतात :- घेराचा नाच आणि रथाचा नाच. या दोन्ही नाचांना ढोल, झांजा आणि बासरीची साथ असते. घेराच्या नाचात कलाकार वर्तुळाकार उभे राहून एकदा उलट बाजूला आणि एकदा सुलट बाजूला अशा हालचाली करतात. तर रथाच्या नाचात एकात एक अशा दोन वर्तुळांमध्ये प्रथम उभे राहून नंतर वर्तुळातील एका गटाने दुसऱ्या गटातील लोकांच्या खांद्यावर उभे राहायचे असते. या सर्व हालचाली ढोलाच्या तालावर असतात. दिवाळी तसेच विवाहासारख्या आनंदाच्याप्रसंगी हा नाच करण्यात येतो. होळीच्या वेळी या नाचांना खरी रंगत येते.

गोंड नृत्य: चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, नागपूर जिल्ह्यांमध्ये विखुरलेल्या गोंडांच्या नाचाचे हिरव्या निसर्गाशी एक खास नाते असते. त्यांच्या नाचातील हालचाली ढोलाच्या तालावर असतात. मध्यप्रदेशामधील डोंगराळ भागात राहणाऱ्या

Maharashtra State Gazetteers

जमातींमध्ये राहून अभ्यास केलेल्या वेरियर एल्विन यानी गोंड नृत्याचे पुढीलप्रमाणे सुंदर वर्णन केले आहे. "मध्यप्रदेशातील आदिवासी जमातींमध्ये नृत्याची तालबद्धता असलेली अनेक गाणी प्रचलीत आहेत. त्यापैकी कर्मा नामक नृत्याची गाणी काव्याच्या दृष्टीने उत्तम आहेत. हा नाच म्हणजे वसंत ऋतूत वनसृष्टीत अवतरणाऱ्या हिरव्या बहराचे प्रतीक होय. कधी कधी गावात एखादे रोपटे लावले जाते आणि त्याभोवती लोक नाचतात. ढोलाच्या तालावर नाचताना पुरुष पुढे तर महिला मागे झुकतात. जमिनीवर वाकून महिला नाचत असताना त्यांची पावले ढोलाच्या आणि गाण्याच्या तालावर अचूक पडतात. नंतर गाणाऱ्यांचा गट जणू काही झाडाच्या शेंड्यांमधून मधून मधून येणाऱ्या मंद वाऱ्याप्रमाणे हळू हळू पुढे येतो. नाचणाऱ्या मुली त्यांना आपल्या हालचालींनी उत्तर देतात. रात्रभर बेभान होऊन नाचताना या जमातीतील लोक आपल्या उत्साहाने विश्व निर्मात्या देवालाही थक्क करतात."[८७]

गोंडांमध्ये नर्तक मुलीला अदृश्य अशा शक्तीवर डोलणाऱ्या सुरेख वृक्षाची उपमा देतात. गोंडांमधील एक कोडे अतिशय गंमतीशीर आहे. हे कोडे असे :-"एक अबोल पक्षी सुरेख वृक्षावर बसला आहे, वृक्ष हलविल्यावर पक्षी जागा होतो आणि गायला लागतो." या कोड्याचे उत्तर असे, "नर्तन करायला जाणाऱ्या मुलीच्या पायातले पैंजण".

गौरी-गणपतीचा नाच : या नाचाला " चेऊली नृत्य " असेही म्हणतात. रायगड जिल्ह्यातील चेऊल येथे हा नाच प्रामुख्याने आढळत असल्याने कदाचित हे नाव पडले असावे. प्रामुख्याने कोकणातील कुणबी लोकांमध्ये हा नाच करण्याची प्रथा आढळून येते. पण या नाचात तेथील शेतीशी संबंधित असलेल्या इतर जातीही सामील होत असल्याने याला "जाखडी नाच" असेही म्हटले जाते. गौरी आणि गणपती या देवतांच्या पुढे हा नाच केला जातो तो देखील गौरी-गणपतीच्या दिवसांमध्ये या नाचास मृदंग आणि झांजा यांची साथ असते. त्यांच्या लयीवर या नाचात वर्तुळाकार उभे राहून किंवा बसून हालचाली केल्या जातात.

उपरोक्त लोकनृत्ये आणि लोकनाट्यां खेरीज लेझीम, मंगळागौरीच्या प्रसंगी खास स्त्रियांचे असलेले नाचाचे प्रकार, फुगडी, नाच-गो-घुमा, आगोटा-पागोटा इत्यादींचा महाराष्ट्राच्या संस्कृतीत अंतर्भाव आहे.

शास्त्रोक्त नृत्यः महाराष्ट्रात अभिजात नृत्याची परंपरा नसली तरी या प्रांतातील काही शहरांनी बाहेरच्या कलाकारांना उत्तेजन देऊन त्यांचे नृत्यप्रकार येथे आणण्यासाठी पोषक वातावरण तयार केले. अभिजात नृत्यशैलीपैकी उत्तर प्रदेशातील कथ्थक नृत्याचाच महाराष्ट्राला प्रथम परिचय झाला असे दिसून येते. मध्ययुगात मराठ्यांचा उत्तर भारताशी जो राजकीय संबंध प्रस्थापित झाला त्याचे हे एक फलित होय. तथापि १९३६ ते १९४७ च्या दरम्यान लीला सोखे (मॅडम मेनका) या सुसंस्कृत नर्तकीने कथ्थक नृत्याच्या साधनेला एक नवे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. लखनौ घराण्याच्या पंडित अच्छनमहाराजांनी तीन-चार वर्षे मुंबईत वास्तव्य केले आणि कथ्थकला लोकप्रियता मिळवून देण्याचा प्रयत्न केला. पंडित लच्छूमहाराज ३३-३४ वर्षे म्हणजे १९७२ पर्यंत मुंबईतच होते. त्यांनी अनेक विद्यार्थींना नृत्याचे शिक्षण दिले. इतर नावाजलेले कथ्थक नर्तक पंडित जयलालजी आणि पंडित सुंदरप्रसादजी हे जयपूर घराण्याचे होते. त्यांचे शिष्य गौरीशंकर, सोहनलाल, मोहनराव कल्याणपूर, पुवय्या भगिनी, सुनालिनीदेवी, रोशन कुमारी यांनी त्यांची परंपरा पुढे सुरू ठेवली. कथ्थक पटू गोपिकृष्ण महाराजांचेही मुंबईत काही काळ वास्तव्य होते. मुंबईला मणिपुरी नृत्याची ओळख बिपिनसिंह यांच्या येथील आगमनामुळे झाली. साधारणतः १९५० च्या सुमारास बिपिनसिंह मुंबईत आले आणि त्यांनी जव्हेरी भगिनींना या नृत्यशैलीचे शिक्षण दिले. नयना, रंजना, दर्शना व सुवर्णा या जव्हेरी भगिनींचे या शैलीतील नृत्य जगप्रसिद्ध असून, त्या मुंबईत मणिपुरी नर्तनालय चालवित आहेत.

मणिपुरी नृत्याच्या पाठोपाठ दक्षिण भारतातील भरतनाट्यम् आणि कथ्थकली हे नृत्यप्रकारही मुंबईत आले. यापैकी भरतनाट्यमने आपल्या मोहक शैलीने आणि आकृतिसौंदर्याने मुंबईत पक्के आसन मांडले. रोहिणी भाटे यांच्या संघटित प्रयत्नांमुळे या नृत्यशैलीतील विविधता आणखी वाढली. टी.के. महालिंगम यांनी भरतनाट्यम् लोकप्रिय केले, तर मिनाक्षी शेषाद्री देखील मुंबईच्या कलादालनात भर घालीत आहेत. ओडिसी, कुचिपुडी आणि मोहिनीअट्टम् या नृत्यशैलींचेही महाराष्ट्रात विशेषतः मुंबईत आगमन झाले. सुप्रस्द्धि ओडिसी नर्तक केलुचरण महापात्रा यांनी ओडिसी नृत्यशैलीस विशिष्ट स्थान देण्याचा प्रयत्न केला, तर मोहिनीअट्टम्च्या विकासासाठी कनक रेळे यांनी बरीच मेहनत घेतली. अर्थात या अभिजात नृत्यशैली बहुतांशी शहरांमध्ये लोकप्रिय बनल्या आहेत. मुंबईतील जुहूच्या नालंदा नृत्य महाविद्यालयाने नर्तन शिक्षणात मौलाची भर घातली आहे. ग्रामीण भागात अजूनही लोकनृत्याची परंपरा तग धरून आहे. महाराष्ट्राने स्वतःची अशी खास नृत्यशैली जन्माला घातली तर ग्रामीण आणि शहरी संस्कृतीतील दरी सांधली जाण्यास मदत होऊ शकेल.[८८]

तळटिपा

[१] **मराठी विश्वकोश**, खंड ३, १९७६, पृ. ३८५.

[२] संभाजी कदम "महाराष्ट्रातील दृश्यकला विश्व", **मराठी जगत,जागतिक** मराठी परिषद, मुंबई, १९८९, पृ. ७२, ७३, ७६.

[३] **औरंगाबाद गॅझेटिअर,** १९७७.

[४] कि. का. चौधरी (संपा.),रायगड **गॅझेटिअर,** १९९३, पृ. ७४५-४६.

[५] जी.बी. देगलुरकर, **टेम्पल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्प्चर ऑफ महाराष्ट्र,** १९७४, पृ. ११९, १२४.

[६] **मराठी विश्वकोश,** खंड ४, १९७६, पृ.३३-३४.

[७] गो. स. सरदेसाई, **मराठी रियासत,** खंड ८, पृ. ५७५.

[८] व्ही. व्ही. मिराशी, " सक्सेसर्स ऑफ सातवाहनाज इन महाराष्ट्र," **हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड,** गॅझेटिअर, १९६७, पृ. १२५, १२८.

[९] ए.एस. आळतेकर, " सातवाहन एम्पायर ॲण्ड इट्स फ्युडेटरीज," कित्ता, पृ. ८९.

[१०] **औरंगाबाद गॅझेटिअर,** १९७७, पृ. ८४५, ८५४, ८५७.

[११] कित्ता, पृ. ९८७, ९८९, १०००, १००३, १००४, १००५.

[१२] एच. डी. सांकलिया, " प्रिहिस्टॉरिक कल्चर ॲण्ड रिमेन्स, " **हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड,** पूर्वोक्त, पृ. २६-२७, २८.

[१३] शांताराम भालचंद्र देव, **मार्कन्डी टेंपल्स,** नागपूर विद्यापीठ, १९७३, पृ. २५, २८, २९, ३३.

[१४] एस. एल. कतरे, " चालुक्याज ॲण्ड दि कलचुरीयाज ऑफ कल्याणी," **हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड, पूर्वोक्त,** पृ. ३३१, ३३४.

[१५] ए. एस. आळतेकर, पूर्वोक्त, पृ. ३६८.

[१६] वामनराव देशपांडे (अनुवाद : श्रीधर हरी देशपांडे), **महाराष्ट्राचे संगीतातील कार्य,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७४, पृ. ५.

[१७] कि. का. चौधरी (संपा.), **वर्धा गॅझेटिअर,** १९९२, पृ. ४८.

[१८] एस. पी. जोशी, **पंजाबातील नामदेव,** कृष्णाजी भिकाजी ढवळे, मुंबई, १९४०, पृ. ८०.

[१९] बी. जी. कुंटे, **हिस्टरी : मेडिव्हल पिरिअड, गॅझेटिअर, १९७२,** पृ. ४०४.

[२०] एच. के. शेरवानी; पी. एम. जोशी (संपा.), **हिस्टरी ऑफ मेडिव्हल डेक्कन,** खंड १, पृ.३९८; खंड २, पृ. ८०, ८१, २०३.

[२१] ह. वि. मोटे (संपा.) **विश्रब्ध शारदा,** खंड २, १९७५, पृ. १४५.

[२२] वामनराव देशपांडे, पूर्वोक्त, पृ. १५-१७.

[२३] काही संकल्पनांचे विश्लेषण करण्यासाठी अशोक रानडे, **कि वर्ड्स ॲण्ड कन्सेप्टस : हिंदूस्तानी क्लासिकल म्युझिक,** १९९० चा उपयोग केला आहे.

२४ वामनराव देशपांडे, **महाराष्ट्राज कॉंट्रिब्यूशन टु म्युझिक,** पृ. २८.

२५ मोटे (संपा.) पूर्वोक्त खंड २, पृ. ३१३.

२७ रवींद्रनाथ टागोरांच्या २३ एप्रिल १९३८ च्या पत्रातील उतारा :

" I consider myself fortunate in securing a change for listening to Kesarbai's singing which is an artistic phenomenon of exquisite perfection. The magic of her voice with the mystery of its varied modulations has repeatedly proved its true significance, not in any pedantic display of technical subtleties mechanically accurate, but in the revelation of the miracle of music only possible for a born genius. Let me offer my thanks and my humble blessings to Kesarbai for allowing me this evening a precious opportunity of experience."

२८ कि. का. चौधरी (संपा.), **कोल्हापूर गॅझेटिअर,** १९८९, पृ.१०९-११, ६३७-४०.

२९ मोटे (संपा.), पूर्वोक्त, पृ. १५२, १६५, १९८, २४५.

३० कि. का. चौधरी (संपा.), **कोल्हापूर गॅझेटिअर,** १९८९, पृ.११०, ६३९.

३१ **मोटे (संपा.),** पूर्वोक्त, पृ. १९४-९८.

३२ **सांगली डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर,** पृ. ३६०-६१. यात समक्ष सर्वेक्षणावर आधारित माहिती दिलेली आहे.

३३ मोटे (संपा.), पूर्वोक्त, पृ. १९७, १९८.

३४ कित्ता, पृ. २०९.

३५ के. के. चौधरी, " क्वीट इंडिया मुव्हमेन्ट इन बॉम्बे सिटी : १९४२-४५" पीएच.डी. थेसिस, मुंबई विद्यापीठ, १९९० (अप्रकाशित).

३६ मोटे (संपा.), पूर्वोक्त, पृ. ६९-७१, २५२-५३.

३७ देशपांडे, **महाराष्ट्राचे संगीतातील कार्य,** पृ. ६३-६५.

३८ अंजली पेंडसे, "कला दर्शन", **महाराष्ट्र दर्शन,** १०, (कृ.पं. देशपांडे, संयोजक), अतुल बुक एजन्सी प्रकाशन, पुणे, १९८६, पृ. १०.

३९ अशोक रानडे, **ऑन म्युझिक ॲण्ड म्युझिशिअन्स ऑफ हिंदूस्तान,** पृ. १९५.

४० **देशपांडे,** पूर्वोक्त, पृ. ६८.

४१ **मधुकर केशव ढवळीकर,** "वाकाटककालीन मराठी संस्कृति", **भारतीय इतिहास आणि संस्कृति,** जानेवारी, १९७०, पृ. २५-२७.

४२ बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, **श्रुतिदर्शन,** १९६३, पृ. ११.

४३ देशपांडे, पूर्वोक्त, पृ. ७३.

४४ मोटे (संपा.) पूर्वोक्त, खंड २, पृ. २६०.

४५ बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, श्रुतिदर्शन, पृ. १८-२०.

४६ भारत सरकारच्या संगीत ॲकॅडमीने कला संगीत निपुणतेसाठी प्रदान केलेल्या पुरस्कार विजेत्यांचा महाराष्ट्र शासनाने गौरव करून त्यांना पारितोषिके दिलीत. नोव्हेंबर १९९० मध्ये हयात असलेल्या अशा पारितोषिक विजेत्यांची

Maharashtra State Gazetteers

नावे पुढे दिली आहेत : **कंठ संगीत** : मोगूबाई कुर्डीकर, भीमसेन जोशी, शरदचंद्र आरोळकर, निवृत्तीबुवा सरनाईक, किशोरी आमोणकर,फिरोज दस्तूर, जितेंद्र अभिषेकी, माणिक वर्मा, सी.आर. व्यास, पंडित जसराज, पद्मावती गोखले शाळिग्राम, खादिम हुसेन खान, के.जी. गिंडे, धोंडूताई कुलकर्णी, शोभा गुर्टू.

वाद्यसंगीत : शिवकुमार शर्मा, राम नारायण, देवेंद्र मुरडेश्वर, हरी प्रसाद चौरासिया, उस्ताद अलारखाँ, झाकिर हुसेन, विजय राघवराव, अब्दुल हलीम जाफर खान, झरिन दारूवाला, मोहिउद्दीन डागर. नोव्हेंबर १९९० पूर्वी निधन झालेल्यांची नावे यात समाविष्ट नाहीत.

४७ **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ४, १९७३, पृ. ३४२, ३४३.

४८ के. के. चौधरी, **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉडर्न पिरिअड,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८७, पृ. १-६.

४९ कित्ता, पृ. ४,५,२२,५२.

५० मोटे (संपा.), पूर्वोक्त, खंड २, पृ. ८-९. दिनांक ९ मार्च १८५३ चा पहिला प्रयोग ग्रान्ट रोड भागातील बादशाही थिएटरात झाला. त्या रात्री **इंद्रजितवध आणि सुलोचना सहगमन आणि लवकुशाख्यान** ही आख्याने भावेंनी करून दाखविली.

५१ के. के. चौधरी (संपा.), **ग्रेटर बॉम्बे गॅझेटिअर**, खंड ३, १९८६, पृ. २९४-९५.

५२ देशपांडे, पूर्वोक्त, पृ. १०१.

५३ मोटे (संपा.), पूर्वोक्त, खंड २, पृ. ३२.

५४ मोटे (संपा.), पूर्वोक्त खंड १, १९७२, पृ. १८१-८२.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितम् नानारसम् दृश्यते ।

नाट्यम् भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकम् समाराधनम् ।।

५५ **मराठी वाङ्मयाचा इतिहास,खंड ६**, भाग १, पृ. १०६, ३०९.

५६ शोकाकूल होऊन विव्हळणारी बालवधू पाहून लाखो प्रेक्षकांचे डोळे पाणावले होते, तर कामातून जर" पतीचा निर्लज्जपणा व द्रव्य लोभाने कन्या विकणारा वधूचा पिता यांच्याविषयी घृणा व्यक्त करीत असत.

५७ **खाडिलकर स्मरणी,** मुंबई, १९४९, पृ. १९८, १९९, २३९.

५८ कित्ता, पृ. २००-०२, २१३. सरकारने नाटकावर खटला भरला तर तो हरण्याची शक्यता होती. पोलिसांनी नाटकाला बंदी घातली तरी प्रचलित कायद्यानुसार पुस्तकाच्या विक्रीवर बंदी घालता येणार नव्हती. म्हणून केवळ प्रयोगाला मनाई केली तर नाटकाच्या पुस्तकाचा खप हजार पटीने वाढेल असा इशारा देऊन किंकेडने प्रयोगाला बंदी घालणे व पुस्तक जप्त करण्यासाठी नवा कायदा करण्याची आवश्यकता सूचित केली होती. हे सर्व सर हरबर्ट रिसले याने सादर केलेल्या विधेयकात समाविष्ट करूनच प्रेस ॲक्ट करण्यात आला होता.

५९ कित्ता, पृ. २१०.

६० कित्ता, पृ. १८४.

६१ **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ६, भाग १, पृ. ३७२.

६२ मोटे (संपा.), पूर्वोक्त, खंड २, पृ. ५०-५१.

६३ कित्ता, पृ. ५२, ५३.

६४ १९२०-१९२२ चे असहयोग आंदोलन यशस्वी करण्यासाठी एक कोट रुपयांचा निधी उभारण्याचा निर्धार करून महात्मा गांधींनी मुंबईसाठी ६० लाख रुपयांचे उद्दिष्ट जाहीर केले होते. या निधीला लोकमान्य टिळकांचे नाव देण्याचा आग्रह महात्माजींचाच होता. तथापि **संयुक्त मानापमानच्या** अद्वितीय सोहळ्यास दृष्ट लागली. केशवराव भोसले अल्पावधीत टायफॉइडने आजारी पडले आणि ४ ऑक्टोबर १९२१ रोजी हा संगीत सूर्य कायमचा मावळला.

Maharashtra State Gazetteers

[६५] पांडुरंग गुरवांनी **द्यूतविनोद** नाटकात जयजयवंती, आरबी, अडाणा, सुहा, परज, बसंतबहार, बिभास, यासारखे अवघड राग घालून कविता, वृत्त , लावणी, स्त्रीगीते या प्रकारांना गौणत्व दिले.

[६६] या नाटकाचे लेखन नोव्हेंबर १९१७ मध्ये पूर्ण झाले, तरी ते ६ फेब्रुवारी १९२२ रोजी रंगभूमीवर आले. अर्थात गडकऱ्यांच्या निधनानंतर.

[६७] **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ६, भाग १, पृ. ३७४-७७.

[६८] कित्ता, पृ. ४७५-७६.

[६९] कित्ता, पृ. ४१०-१८.

[७०] कित्ता, पृ. ४७८-७९.

[७१] मोटे (संपा.), पूर्वोक्त, खंड २, पृ. ६९.

[७२] कित्ता, पृ. ७१.

[७३] कित्ता, पृ. ७२, ७४, ७५, ७८, ८०, ८१.

[७४] कित्ता, पृ. १०१-०२, १०९.

[७५] संगीत नाटक ॲकॅडमीने पुरस्कार दिलेल्या पुढील कलाकारांना शासनाने महाराष्ट्र गौरव पुरस्कार प्रदान केला : दाजी भाटवडेकर, श्रीराम लागू, ज्योत्सना भोळे, छोटा गंधर्व, चिं.गो. पेंडसे, प्रभाकर पणशीकर, सुलभा देशपांडे, भक्ती बर्वे- इनामदार, शाहीर साबळे (लोकसंगीत) आणि लता मंगेशकर (चित्रपटातील गाणी). ही यादी शासनाने नोव्हेंबर १९९० मध्ये केलेल्या यादीनुरूप आहे.

[७६] **गाथासप्तशती** २/१७, २/५१, ५/६, १/३५ परमानन्द शास्त्री, **गाथासप्तशती (शोध-कृती),** प्रकाशन प्रतिष्ठान, मीरत, १९६५, पृ. ६०.

[७७] एच.ए. ॲक्वर्थ, **बॅलड्स ऑफ दि मराठाज,** लाँगमन्स, ग्रीन ॲण्ड कंपनी लंडन, १८९४, पृ. १-१३; वि.ल भावे, **महाराष्ट्र सारस्वत,** ४ थी आवृत्ती, शके १८७६ (१९५४), पृ. ७१२-१९.

[७८] गो.स. सरदेसाई (संपा.), **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,** खंड १८, गव्हर्नमेंट प्रेस, मुंबई, १९३१, पृ. ३७.

[७९] गो.स. सरदेसाई, **मराठी रियासत,** खंड ४, पॉप्युलर प्रकाश्न, १९९०, पृ. ४४६.

[८०] यशवंत न. केळकर, **इतिहासातील सहली,** खंड २, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९६४, पृ. १०८.

[८१] गो. स. सरदेसाई (संपा.), **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद,** खंड ३२, पृ. २८-२९.

[८२] द. ब. पारसनीस, जुन्या ऐतिहासिक गोष्टी , द. ब. पारसनीस (संपा.), **इतिहास संग्रह, पृ. १०-११.**

[८३] वा. वा. खरे (संकलित), **ऐतिहासिक लेख संग्रह,** य.वा. खरे (संपा.), भाग १३, मिरज, १९२६, प. ६८९६.

[८४] रावबहादुर चिमणाजी वाड (संकलित), **सिलेक्शन्स फ्रॉम सातारा राजा ॲण्ड पेशवाज डायरीज,** खंड ८/३, डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, १९११, मुंबई, पृ. ३०९-१०.

[८५] "ओव्या" २९४-९८, अध्याय १७, विनायकबोवा जोशी साखरे (संपा.), **सार्थ ज्ञानेश्वरी,** मुंबई, पृ. ६९२-९४.

[८६] कि. का. चौधरी (संपा.), **रायगड गॅझेटिअर,** १९९३, पृ. २४०.

Maharashtra State Gazetteers

८७ **चंद्रपूर गॅझेटिअर,** १९७३, पृ. १७०.

८८ महाराष्ट्र शासनाने नोव्हेंबर १९९० मध्ये हयात असलेल्या खालील कलावंतांना पुरस्कार देऊन गौरव केला : टी. के. महालिंगम पिल्लाई - भरत नाट्यम्, गौरीशंकर देवीलाल - कथ्थक, रोशन कुमारी - कथ्थक, रोहिणी भाटे- कथ्थक, पार्वती कुमार - नृत्य कोरियाग्राफी, शाहीर साबळे-फोक म्युझिक, सत्यभामाबाई शिंदे पंढरपूरकर- लावणी, राजाराम भाऊ कदम - गोंधळ , अंबूदेवी विभुते - शाहिरी, यमुनाबाई वाईकर - तमाशा, आणि विठाबाई नारायणगावकर - तमाशा.

प्रकरण ९ : उपसंहार

(उपसंहाराचे लेखन डॉ. त्रि.ना. वाळुंजकर यांनी केले आहे.)

महाराष्ट्रातील समाज आणि संस्कृतीचा उद्‌गम, विकास आणि सद्यस्थिती यांचा आढावा वर घेतलेला आहे. त्यामध्ये येथील लोकसंख्येची जडणघडण, सामाजिक संघटना, ग्रामीण व नागरी समूहांची जडणघडण आणि लोकांचा धर्म अशा विविध पैलूंचे वर्णन केले आहे. येथील समाज आणि संस्कृती यांचा भूतकाल वर्तमानकालाशी कशा तऱ्हेने निगडित आहे, आणि वर्तमानाचा त्यांच्या भविष्यावर काय प्रभाव पडत आहे याचे आकलन होण्याच्या दृष्टीने या प्रकरणात आतापर्यंतच्या विवेचनाचा साकल्याने गोषवारा घेण्यात येत आहे.

महाराष्ट्रातील मानवी वसाहतीचा इतिहास हा आपणास इसवी सनपूर्व दीड लाख ते एक लाख वर्षांपूर्वीच्या कालखंडात घेऊन जातो. अश्मयुगीन महाराष्ट्राचे पुराश्मयुग (आद्य पुराश्मयुग, मध्य पुराश्मयुग व उत्तर पुराश्मयग), मध्याश्मयुग आणि नवाश्मयुग असे प्रमुख कालखंड पाडण्यात आलेले आहेत. प्राचीन अश्मयुगीन संस्कृतीच्या समाप्तीनंतर इ. स. पूर्व १५०० च्या सुमारास ताम्रपाषाणयुगीन संस्कृतीची सुरुवात झाली, आणि त्याबरोबरच " झूम " पद्धतीच्या शेतीवर आधारित ग्रामीण समाजजीवन महाराष्ट्रात विकसित झाले. या कालखंडात लोकांना स्थिर समाजजीवन प्राप्त झाले, आणि काही खेड्यांचे मिळून तयार झालेले राजकीय घटक अस्तित्वात आले. या संस्कृतीचा अंत इ. स. पूर्व १००० वर्षाच्या आसपास झाला. त्यामुळे या संस्कृतीचे सातत्य यानंतर आलेल्या महापाषाणयुगीन संस्कृतीशी दिसत नाही. तरीपण महाराष्ट्राच्या वांशिक जडणघडणीमध्ये या सुरुवातीच्या संस्कृतीचे योगदान झाले असावे.

महाराष्ट्रामध्ये इ. स. पूर्व आठव्या-सातव्या शतकांच्या सुमारास ताम्रपाषाणयुगाच्या पाठोपाठ शिळावर्तुळे संस्कृतीस सुरुवात झाली. लोखंड ओतण्याची कला जाणणारे या संस्कृतीचे लोक दक्षिण भारतामधून विदर्भामध्ये प्रथम आले असावेत आणि येथे त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या असाव्यात. या कालखंडात उत्तर हिंदुस्थानमध्ये चंद्रगुप्त मौर्य आणि सम्राट अशोक यांची साम्राज्ये उदयास आली. अशोकाने नेमलेले बौद्ध धर्मप्रसारक या कालात महाराष्ट्रात बौद्ध धर्माचा प्रसार करण्यासाठी आल्याचे दिसते.

सातवाहन घराण्याच्या राजवटीबरोबर महाराष्ट्रातील समाज आणि संस्कृतीचा विकास प्रकर्षाने होऊ लागला. महाराष्ट्रावर सातवाहनांनंतर वाकाटक, चालुक्य, कलचुरी, शिलाहार आणि यादव राजघराण्यांनी राज्य केले. मराठी भाषेचा विकास यादवांच्या राजवटीत झाला. **ज्ञानेश्वरी** हा गीतेवरील टीकात्मक ग्रंथ याच कालखंडात लिहिला गेला. या राजघराण्यांनी महाराष्ट्रात आर्यसंस्कृती आणि संस्कृत भाषेचा प्रसार केला आणि त्याद्वारे अखिल भारतीय वर्णाठामधर्माच्या आर्य परंपरेशी त्याचे ऐक्य साधले. त्याचबरोबर या भूमिशी असलेल्या नात्यामुळे प्रादेशिक भाषा आणि संस्कृतीच्या विकासास या राजघराण्यांनी प्रोत्साहन दिले. परंतु तीव्र आर्थिक आपत्तीने ग्रासलेल्या रामदेवराव यादव याच्या राजवटीच्या अखेरीस ब्राह्मणी संस्कृतीस पुन्हा राजाठाय मिळाल्यामुळे ब्राह्मणांच्या पुराणमतवादाचा उदय झाला. रामदेवरावाच्या दरबारात असलेल्या हेमाद्रीने ब्राह्मणी कर्मकांडाची स्तुती करणाऱ्या **चतुर्वर्गचिंतामणि** या सुप्रसिद्ध ग्रंथाची रचना केली. या कालखंडात महाराष्ट्रातील समाजाच्या प्रमुख संरचनात्मक घटकांना आकार प्राप्त झाला. अनेक जाती अस्तित्वात आल्या. याच काळात महाराष्ट्रात **महानुभाव** व **वीरशैव** या पंथांचा उदय झाला. हा काळ राजकीयदृष्ट्या सामंतशाहीचा तर धार्मिकदृष्ट्या संतांचा होता.

रामदेवराव यादवाच्या अस्तानंतर महाराष्ट्र उत्तरेकडील खलजी, तुघलक आणि दख्खनमधील बहमनी या मुसलमान राजघराण्यांच्या राजवटीखाली आला. मुसलमान राज्यकर्त्यांनी अनेक मराठा जहागीरदारांच्या मदतीने महाराष्ट्रावर आपली राजवट प्रस्थापित केली. या जहागीरदारांनी दख्खनवरील मुसलमानांच्या अधिसत्तेस निमूटपणे मान्यता दिली होती. मुसलमान राज्यकर्त्यांची जीवन पद्धती आणि भाषा यांचे परिणाम जहागीरदारांवर झाल्याशिवाय राहिले नाहीत. इतकेच नव्हे तर प्रजाजनांचे शोषण करण्याच्या राज्यकर्त्यांच्या कृतींना त्यांनी साथ दिली. परिणामतः उदासीनता व दैन्यावस्था निर्मितीची प्रक्रिया चालू राहिली. या कालखंडात मराठा हे नामाभिधान विशिष्ट जातीसाठी वापरात आले. राजकुल आणि घराणी यांच्याशी असलेल्या आपल्या संबंधांच्या आधारावर, त्याचप्रमाणे सैनिकी पेशा स्वीकारून आणि सरदारकी मिळवून मराठा लोक आपणास कुणबी शेतकऱ्यांपासून अलग समजू लागले. मराठा-क्षत्रिय या स्थानास ब्राह्मणांची मान्यता मिळवून त्यांनी महाराष्ट्रावर ब्राह्मण-क्षत्रिय अधिसत्ता स्थापन केली. मुसलमान राज्यकर्ते आणि मराठा जहागीरदार यांच्या अमलाखाली सामान्य जनता भरडून निघत होती. यामुळे सामान्य जनतेचा कैवारी म्हणून शिवाजी महाराजांच्या उदयास आणि स्वराज्याच्या स्थापनेस अनुकूल परिस्थिती निर्माण झाली.

सामान्य जनतेला स्वराज्याच्या आंदोलनात सहभागी करून आणि त्यांचे सेनादल उभारून शिवाजी महाराजांनी मुसलमान सत्ताधीशांना आव्हान दिले. त्यांनी न्यायावर आधारित अधिसत्ता स्थापन करून सामान्य जनतेच्या

पिळवणुकीस पायबंद घातला. वर्णाठामधर्माच्या आदर्शावर हिंदवी राष्ट्राच्या स्थापनेसाठी त्यांनी प्रयत्न केले. सेनादल आणि महसूल या संबंधीच्या त्यांच्या धोरणामुळे कनिष्ठ जातींमध्ये सामाजिक आणि आर्थिक गतिशीलता निर्माण झाली. कनिष्ठ जातींच्या स्तरातून अनेक कर्तृत्ववान व्यक्तींची शिवाजीने सैन्यात भरती केली आणि त्यापैकी काहींनी वरिष्ठ पदेही प्राप्त केली होती. अशाप्रकारे अनेक व्यक्तींचा उच्च जातीच्या मराठा समूहात स्वीकार झाला आणि त्यांचे अनुलोम विवाह पद्धतीद्वारा या स्तरामध्ये सामाजिक एकात्मीकरण झाले. याची सामाजिक परिणती शासनकर्ते मराठा आणि शेती करणारे कुणबी यांच्यामधील सामाजिक अंतर कमी होण्यात झाली. शिवाजीने वर्णाठामधर्माचा स्वीकार केला आणि स्वतःस हिंदूधर्म परंपरेनुसार राज्याभिषेक करवून घेऊन ब्राह्मणांच्या धार्मिक क्षेत्रातील वर्चस्वास मान्यता दिली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर मराठ्यांची सत्ता दुर्बल झाली आणि नंतर छत्रपती शाहूच्या कारकिर्दीत महाराष्ट्रावर पेशव्यांच्या सत्तेचा उदय झाला. मराठा राज्याचा निरनिराळ्या दिशांनी विस्तार करण्यात पेशवे यशस्वी झाले आणि त्यामुळे ब्राह्मणांना, विशेषतः चित्पावन ब्राह्मणांना, सामाजिक आणि आर्थिक उन्नती साधण्याची विविध दालने खुली झाली. पेशव्यांनी अनेक चित्पावन ब्राह्मणांची मामलेदार आणि सुभेदार यासारख्या पदांवर नेमणूक केली आणि त्याद्वारे मराठा पाटील आणि देशमुख यांच्या ग्रामीण समाजातील सत्तेस मुरड घालण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे ब्राह्मण आणि मराठा यांच्यातील परस्पर विद्वेषाच्या वाढीस चालना मिळाली. ब्राह्मणांच्या विविध पोटजातींत जास्त एकात्मता निर्माण झाली आणि त्यामुळे ब्राह्मणेतरांचा शूद्रवर्ग स्पष्टरीत्या तयार झाला. पुराणमतवादी ब्राह्मणांनी समाजातून क्षत्रियांचा अस्त झाल्याची आणि त्यामुळे समाजात फक्त ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण अस्तित्वात असल्याची कल्पित कथा प्रसृत केली. अस्पृश्यांची परिस्थिती दयनीय झाली. शिवाय समतेची शिकवण देणाऱ्या जनसामान्यांच्या वारकरी संप्रदायाची परंपरा क्षीण झाली आणि त्या जागी वर्णाठामधर्माचा पुरस्कार करणाऱ्या ब्राह्मणी परंपरेतील हरिकथेस राजाठाय मिळाला. अंतर्गत संघर्ष, मराठा सरदार व पेशवे यांच्यामधील स्पर्धा, आणि वरचढ असलेल्या ब्रिटिश सत्तेचे आव्हान स्वीकारण्यातील मराठे व पेशवे यांची असमर्थता यामुळे १८१८ साली पेशवाईचा अंत झाला.

महाराष्ट्रावर ब्रिटिश राजवट सुरू होण्याच्या वेळी जाती आणि लिंगभेद यावर आधारलेल्या परकोटीच्या सामाजिक विषमतेचा प्रभाव येथील सामाजिक संरचनेवर दिसत होता. समाजात अस्पृश्यांची होणारी पिळवणूक पराकोटीला पोहोचली होती आणि त्यामुळे त्यांच्यात समाजाविषयी दुराव्याची भावना जोपासली गेली होती. दुसऱ्या बाजीरावाच्या जमीन महसुलाच्या अहितकारक धोरणामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर शोषण चालू होते. सामाजिक आणि आर्थिक जीवनावर ग्राम, जात आणि वतन यांचे नियंत्रण होते आणि शेती व्यवसाय प्रामुख्याने निर्वाहभिमुख होता. काही मराठे आपले सत्तास्थान टिकवून होते. परंतु एकूण ब्राह्मण जातीच्या आणि त्यातल्या त्यात चित्पावन ब्राह्मणांच्या वाढत्या धार्मिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांतील प्रभावाची त्यांना चीड येत होती. समाजात बालविवाह मोठ्या प्रमाणावर होत होते आणि विधवा, विशेषकरून बालविधवा यांचे प्रमाण ब्राह्मण आणि इतर उच्च जातींत लक्षणीय होते. सतीची प्रथा जरी फारशी प्रचलित नसली तरी विधवांचे केशवपन करून घराच्या चार भिंतीच्या आत जवळजवळ गुलामीचे जीवन जगण्याची त्यांच्यावर सक्ती होत होती.

ब्रिटिश राजवटीच्या आगमनाबरोबर महाराष्ट्रात आधुनिकीकरणाचे वारे वाहू लागले आणि त्यामुळे एका वैचारिक क्रांतिकारी युगाची सुरुवात झाली. लोहमार्ग, टपाल आणि तार, छापखाना आणि आधुनिक कारखाने यांची स्थापना ही प्रमुख नवप्रवर्तने होती. पारंपरिक ग्रामप्रधान कृषि अर्थव्यवस्था ही हळूहळू जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग होत होती. त्यामुळे नगदी पिकांची लागवड होऊ लागली होती. महाराष्ट्राच्या मोठ्या भागात रयतवारी जमीन महसूल पद्धती अमलात आणून जमीन महसूल पद्धती मध्येही परिवर्तन घडवून आणले होते. महाराष्ट्र आणि भारताच्या इतर भागांत आधुनिक नोकरशाहीच्या तत्वावर आधारित समान आणि वेंद्रित शासनव्यवस्था स्थापन केली होती. इहवाद, समता, व्यक्तित्व आणि विज्ञान या मूल्यांवर आधारित आधुनिक शिक्षण प्रणालीचा, मुख्यतः शासनाची प्रशिक्षित नोकरवर्गाची गरज भागविण्याच्या उद्देशाने आणि भारतीयांच्यात पाश्चात्य ज्ञानप्रणालीचा प्रसार करण्याच्या दुय्यम उद्देशाने-प्रारंभ झाला. आधुनिक न्यायप्रणाली, कायदा राबविणारी यंत्रणा, कायदा, वैद्यकी, अभियांत्रिकी इत्यादी आधुनिक व्यवसायांचा प्रारंभ यामुळे आधुनिक नागरी समाजाचा महाराष्ट्रात उदय झाला. या उद्दिष्टपूर्तीच्या दृष्टीने जिल्हा मुख्यालये आणि औद्योगिक नगरे यांच्या निर्मितीचे काम हाती घेण्यात आले. आधुनिक सेनादलाची स्थापना झाली आणि त्यामध्ये व्यक्तीचा धर्म आणि जात विचारात न घेता व्यावसायिक प्रवेशाची संधी सर्वांना प्राप्त झाली. या अनेकविध परिवर्तनामुळे महाराष्ट्रातील जनतेला आर्थिक आणि सामाजिक उन्नती प्राप्त करून घेण्याची संधी प्राप्त झाली. अशी संधी प्राप्त करून घेण्याची शक्यता तत्वतः जरी सर्वांना उपलब्ध असली तरी प्रत्यक्ष व्यवहारामध्ये ती विषमतेच्या तत्वावर आधारलेल्या पारंपरिक सामाजिक संरचनेतील व्यक्तीच्या स्थानावर निर्धारित असे. त्यामुळे ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या कालखंडात महाराष्ट्रात जनतेच्या वाढत्या आकांक्षा आणि संधीची विषम संरचना यामध्ये विसंगती निर्माण झाली आणि याचा परिपाक समाजात ताण आणि तणाव निर्माण होण्यात झाला. यामुळे सामाजिक संरचनेत-यामध्ये जातिव्यवस्था, कुटुंबपद्धती आणि ग्रामपद्धती यांचा समावेश आहे-सुधारणा घडवून आणण्याचे उद्दिष्ट असलेली विविध

सामाजिक आंदोलने महाराष्ट्रात निर्माण होऊ लागली.

या आंदोलनांचे दृश्य स्वरूप, त्यांच्या विचारप्रणालीत समाविष्ट असलेले विषय आणि त्यांचे कार्यक्रम यावर ब्रिटिश राजवटीच्या सुरुवातीच्या कालखंडातील जातिव्यवस्थेच्या विषमतेवर आधारलेल्या संरचनेच्या स्वरूपाचा प्रभाव पडला होता. ही संरचना धार्मिक पावित्र्य व आर्थीक आणि राजकीय सत्ता या गुणांवर आधारलेल्या उतरत्या क्रमांकाने मांडलेल्या विविध स्तरांची बनली होती. या संरचनेच्या अग्रभागी ब्राह्मण होते. ब्राह्मणांचे स्थान केवळ धार्मिक क्षेत्रातच श्रेष्ठ होते असे नसून पेशव्यांच्या कारकिर्दीत त्यांच्या हाती मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि राजकीय सत्ता होती. त्यांच्या नंतरचे स्थान महाराष्ट्रातील शासनकर्त्या घराण्यांत जन्मलेल्या तसेच या घराण्यांशी आप्तसंबंध जोडलेल्या मराठा जातीचे होते. वर्णव्यवस्थेत आपले स्थान क्षत्रियांचे आहे असा दावा हा गट करीत होता; परंतु हा दावा ब्राह्मण वर्ग मान्य करीत नव्हता. या गटातील लोकांना त्यांच्या मराठा आणि पेशवे यांच्या सेनादलातील सेवेबद्दल जहागीर म्हणून मुबलक शेतजमीन प्राप्त झाली होती. तिसऱ्या गटात मराठा शेतकरी, कुणबी आणि अन्य समूहांचा अंतर्भाव झाला होता. हे प्रामुख्याने स्वतःची शेती करणारे लहान आणि मध्यम भूधारक शेतकरी होते. धार्मिकदृष्ट्या हा गट आणि अन्य सवर्ण जाती यांची गणना समाजातील शुद्रवर्णात केली जात होती. चौथ्या गटात शेतकरी समाजाला विविध प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या बलुतेदार आणि इतर जातींचा समावेश होता. पाचव्या गटात अस्पृश्य म्हणून मानल्या गेलेल्या जातींचा समावेश होता. या जातींचा व्यवसायामुळे अपवित्र म्हणून मानल्या गेलेल्या वस्तुंशी संपर्क येत असल्यामुळे त्यांना अस्पृश्य म्हणून मानले जात असे. अंतर्गतदृष्ट्या हा गट पारंपरिक जनधर्म आणि व्यवसायातील परंपरांमुळे बहुजिनसी होता. या अस्पृश्य जातींच्या वर्गामध्ये महार ही जात प्रमुख होती. सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात अन्य अस्पृश्य जातींपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत असा दावा महार करीत होते. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, महाराष्ट्रातील समाज हा विभिन्न सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हितसंबंध असणाऱ्या विविध जातींचा बनला होता आणि त्यांना समान आंदोलनात सहभागी करणे ही गोष्ट अनेक अडचणींनी भरलेली, समायोजनाच्या विविध समस्यांनी युक्त आणि परस्पर हितसंबंधींची सांगड घालणे अशा समस्यांनी भरलेली होती.

मानवता, करुणा आणि मानवजातीमधील बंधुत्व या तत्त्वांची शिकवण देणाऱ्या पाश्चात्य सामाजिक आणि धार्मिक विचारप्रणालीस पहिला प्रतिसाद मुंबईतील विविध धर्मांच्या आंग्लविद्याविभूषित मध्यमवर्गीयांच्या लहान गटाकडून मिळाला. सन १८५० मध्ये या लोकांनी परमहंस सभेची स्थापना केली होती. या समाजाने ख्रिश्चन धर्मातील पूजा विधींचा स्वीकार केला होता व मूर्तिपूजा आणि जातिभेद पाळणे यास या सभेचा विरोध होता. विधवाविवाह, स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्यामध्ये शिक्षणप्रसार या गोष्टीस समाजाचा पाठिंबा होता. परंतु या समाजाचे कार्य जनतेपासून गुप्त ठेवण्यात येत होते. या दृष्टीने ही एक गुप्त संघटनाच होती. हिंदूंच्या बरोबर पारसी आणि मुसलमानांनाही यासभेचे सदस्यत्व देण्यात आले होते. उच्चभ्रुपणा आणि अलगत्व या कारणांमुळे १८६० मध्ये परमहंस सभेचा शेवट झाला. या सभेमधून फुटून निघालेल्या काही व्यक्तींनी डॉ. आत्माराम पांडुरंग यांच्या नेतृत्वाखाली १८६७ साली प्रार्थनासमाजाची स्थापना केली.[१]

बंगालमधील ब्राह्मोसमाजाच्या नेत्यांकडून प्रार्थनासमाजास प्रेरणा मिळाली. त्याचे उद्दिष्ट हिंदू धर्मामध्ये सुधारणा करणे आणि महाराष्ट्रातील सामान्य जनतेच्या धार्मिक परंपरांचा समाजात अंतर्भाव करणे हे होते. समाजाच्या प्रार्थना आणि धार्मिक प्रवचनांच्या संग्रहात संत तुकाराम आणि इतर वारकरी पंथातील संतांच्या अभंगांना मानाचे स्थान प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या सुरुवातीच्या कालखंडातील विचारवंतांनी, प्रामुख्याने महादेव गोविंद रानडे आणि रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी प्रार्थनासमाजाची तत्त्वप्रणाली तयार केली. एकेश्वरवाद आणि सर्व धर्मांमधील मूलभूत सत्य या गोष्टींचा या संघटनेने स्वीकार केला. ऐहिक जीवनात संन्यास आणि मूर्तिपूजा या गोष्टीस संघटनेचा विरोध होता आणि ईश्वरभक्तीचे प्रार्थना हे एकमेव साधन आहे असे समाज मानता होता. या प्रार्थनांची निवड संत कबीर, गुरुनानक,तुकाराम आणि भक्तिसंप्रदायाच्या इतर संतांच्या भक्तिकाव्यातून केलेली होती. या संघटनेने तुकारामाला अतिशय आदराचे स्थान दिले होते आणि तुकाराम बीज ही पुण्यतिथी साजरी केली जात असे. प्रार्थनासमाजाने सामाजिक सुधारणेस चालना दिली. समाजातर्फे मुंबईत अनेक शाळा चालविल्या जात असत, त्याचप्रमाणे अनाथालये स्थापण्यात आली होती. जनसामान्यांच्या सामाजिक समस्येविषयी सहानुभूती असली तरी प्रार्थनासमाजाचे आंदोलन हे आंग्लविद्याविभूषित समाजतील उच्चवर्णीय जातींपुरते मर्यादित राहिले आणि त्याला सुधारणा कार्यक्रमात जनसामान्यांना सहभागी करून घेण्यात अपयश आले. मात्र जनसामान्यांना सामाजिक आणि धार्मिक सुधारणेच्या कार्यक्रमांत सहभागी करून घेण्याचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांच्या क्रांतिकारी सामाजिक आणि धार्मिक आंदोलनाचे प्रमुख उद्दिष्ट बनले. या चळवळीची परिणती १८७३ साली सत्यशोधक समाजाच्या स्थापनेत झाली.

सत्यशोधक समाजाची चळवळ ही खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील जनसामान्यांची चळवळ होती. या चळवळीचे संस्थापक जोतिबा फुले यांचे फक्त शालेय शिक्षण झालेले होते. त्याचप्रमाणे या समाजाच्या बहुसंख्य सदस्यांचे शिक्षण शालेय शिक्षणापर्यंतच मर्यादित होते. आधुनिक विज्ञानाशी सुसंवादी अशा बुद्धिनिष्ठ दृष्टिकोनाचा पुरस्कार करून

महाराष्ट्रात फुले यांना सामाजिक क्रांती घडवून आणावयाची होती. हिंदू समाजातील सामाजिक आणि आर्थिक विषमतेच्या मुळाशी असलेल्या आर्यांच्या वैदिक संस्कृतीवर त्यांनी घणाघाती हल्ला चढविला. तसेच त्यांच्या मतानुसार जनतेची परंपरा आणि समतेवर आधारित असणाऱ्या अनार्य परंपरेचा त्यांनी पुरस्कार केला. त्यांनी फक्त जन्माधिष्ठि त जातिसंस्थेचाच धिक्कार केला असे नसून अन्याय, विषमता हे स्वरूप असणाऱ्या संपूर्ण वर्णाश्रम व्यवस्थेचाच धिक्कार केला. जनतेच्या धार्मिकपणाचा गैरफायदा घेऊन त्यांचे शोषण करणाऱ्या पुरोहित वर्गाचाही त्यांनी निषेध केला. किंबहूना धार्मिक आणि आर्थिक क्षेत्रातील सर्वच मध्यस्थांना त्यांचा विरोध होता. या सृष्टीचा कर्ता ईश्वर हा एकच आहे अशी त्यांची श्रद्धा होती व त्याला त्यांनी निर्मिक हे निर्गुण नाव दिले होते. आपल्या जीवनाच्या अखेरीस सत्यशोधक समाजाचे सत्यधर्म समाज असे नाव ठेवण्याची त्यांची इच्छा होती, परंतु ती त्यांच्या १८९० साली झालेल्या मृत्युनंतर एक वर्षाने म्हणजे २४ मे १८९१ रोजी पूर्ण झाली.

सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व ब्राह्मणांसह सर्व जातींना खुले होते. अट फक्त एकच होती, आणि ती म्हणजे त्यांची समाजाच्या मूलभूत तत्त्वावर अढळ श्रद्धा पाहिजे. या संदर्भात फुलेंनी ब्राह्मण आणि ब्राह्मण्य यामध्ये सूक्ष्म फरक केला. त्यांच्या मते ब्राह्मण्य हा लोकांना त्यांच्या जन्मानुसार उच्च अथवा नीच मानण्याचा एक मानसिक दृष्टिकोन आहे आणि अशा तऱ्हेचा दृष्टिकोन हा केवळ ब्राह्मणांच्यामध्येच आढळेल असे नसून तो काही ब्राह्मणेतरांमध्येही आढळू शकतो. अस्पृश्यता, जातिव्यवस्था आणि स्त्री-पुरुषांमधील असमानता नष्ट करण्याच्या दृष्टीने, त्याचप्रमाणे सामान्य जनता, अस्पृश्य आणि स्त्रिया यांच्यामध्ये शैक्षणिक प्रसार करण्याच्या दृष्टीने फुलेंनी कार्य केले. सावकारांकडून आणि कुलकर्ण्यांकडून शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाविरुद्ध सत्यशोधक समाजाने आवाज उठविला. समाजाचा मुख्य भर सामाजिक सुधारणेवर असल्यामुळे त्याने राजकीयदृष्ट्या अलिप्त राहण्याचा दृष्टिकोन स्वीकारला आणि आपले उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारशी सहकार्य केले. समाजाच्या व्यासपीठ ावर राजकीय चर्चा केली जात नसे.

जातिभेद, अस्पृश्यता आणि पुरोहितशाही यांच्या निर्मूलनावर समाजाचा अधिक भर असल्यामुळे समाजाला ग्रामीण तसेच नागरी भागांतून पाठिंबा मिळाला. समाजाच्या अनुयायांमध्ये मुंबई, पुणे यासारख्या शहरांतून राहणारे मध्यमस्तरीय जातीतील ठेकेदार, वकील, डॉक्टर, व्यापारी इत्यादी आधुनिक व्यवसाय करणाऱ्या अनेक व्यक्ती होत्या. त्यांना ब्रिटिशांच्या नव्या आर्थिक धोरणाचा बराच फायदा मिळाला होता. फुले यांच्या जीवन काळात मराठा, कायस्थ,लिंगायत, जैन यासारख्या उच्च जातीय ब्राह्मणेतरांचा सत्यशोधक समाजात सहभाग जवळजवळ नव्हता. परंतु कोल्हापूरच्या शाहू महाराजांच्या नेतृत्वाखालील ब्राह्मणेतर चळवळीत त्यांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढला.

ब्राह्मण्य आणि त्याचे सामाजिक विषमता, अस्पृश्यता, सामान्य जनतेतील शिक्षणाचा अभाव, बालविवाह आणि विधवांना दिली जाणारी गैरवागणूक यासारखे दुष्परिणाम यावर सत्यशोधक समाज चळवळीने उघड हल्ला केला. मागासवर्गीय जाती आणि स्त्रिया यांच्यामध्ये शिक्षण प्रसार करण्याचे कार्य समाजाने प्रत्यक्ष हातात घेतले आणि सामान्य जनतेमध्ये दारू पिण्याच्या दुष्परिणामांबद्दल जाणीव निर्माण केली. सावकार आणि जमीनदार यांच्याविरूद्ध शेतकऱ्यांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. थोडक्यात असे म्हणता येईल की, जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाज चळवळीद्वारा महाराष्ट्रात सांस्कृतिक क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न केला आणि समाजास वैश्विक मानवतेच्या उद्दिष्टाकडे नेण्याचा प्रयत्न केला.

फुले यांच्या मृत्युनंतर सत्यशोधक समाज चळवळ काही काळ मंदावली परंतु शाहू महाराजांनी राजाश्रय देऊन पुनरुज्जीवित केली. या कालखंडात मराठा शिष्टजनांच्या प्रभुत्वात वाढ झाल्याचेही दिसते. शाहू महाराजांच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळीला राजकीय बाजू प्राप्त झाली, जिला फुले यांनी कटाक्षाने दूर ठेवले होते. त्यामुळे ही चळवळ आपल्या सत्यधर्म प्रस्थापित करण्याच्या सांस्कृतिक उद्दिष्टापासून बाजूला जाऊन ती ब्राह्मण-विरोधी चळवळ झाली व ती "ब्राह्मणेतर चळवळ " या नावाने ओळखली जाऊ लागली.

सन १९११ मध्ये महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय पदावर ब्राह्मणेतर चळवळ प्रगट झाली. सत्यशोधक समाजाला फुटलेली ती एक फांदी होती. सत्यशोधक समाजाचे सर्व समकालीन सदस्य जरी ब्राह्मणेतर चळवळीचे अनुयायी झाले, तरी ब्राह्मणेतर चळवळीच्या सर्व अनुयायांचा सत्यशोधक समाजाच्या नैतिक मूल्यावर विश्वास नव्हता. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीने दक्षिणेतील समोद्देशी चळवळींशी घनिष्ठ संबंध ठेवले होते आणि अनेक प्रसंगी समान राजकीय धोरण ठरविले होते. सामान्य जनतेवरील ब्राह्मणी सत्तेचे पुनरुज्जीवन होईल या भीतीने ब्राह्मणेतर चळवळीने लोकमान्य टिळकांच्या होमरूल चळवळीस विरोध केला. मराठा आणि इतर जातींतील लोकांना त्यांचे आर्थिक हितसंबंध जोपासणे ब्रिटिश राजवटीमुळे शक्य हात असल्यामुळे त्यांनी ब्रिटिश सरकारबरोबर सहकार्याच्या धोरणाचा अवलंब केला. वरिष्ठ जातींच्या नेतृत्त्वाच्या प्रभावाखाली असलेला पक्ष म्हणून इंडियन नॅशनल काँग्रेस पार्टीला ब्राह्मणेतरांनी विरोध केला. मराठा आणि इतर मागासवर्गीय जातींसाठी ब्राह्मणेतरांनी कायदेमंडळात जातीनिहाय प्रतिनिधित्वाची मागणी केली. "इलेक्शन " लढविण्याच्या दृष्टीने १९२० मध्ये ब्राह्मणेतर लीगची स्थापना केली. तथापि शेतकऱ्यांचे हितसंबंध साधण्याच्या दृष्टीने राज्यशासनाशी सहकार्य करण्याचे पक्षाचे धोरण १९३० नंतर राष्ट्रीय

स्तरावर होणाऱ्या आर्थिक स्थित्यंतरामुळे उपयोगी पडत नाही असे दिसून आले. त्याचप्रमाणे इंडियन नॅशनल काँग्रेसच्या राजकीय शक्तीबद्दल तसेच शेतकरी आणि दुर्बल घटकांच्या समस्या सोडविण्याच्या पक्षाच्या क्षमतेबद्दल अधिक जाणीव ब्राह्मणेतर पक्षात झाली. या सर्व घटनांमुळे ब्राह्मणेतर चळवळीच्या सदस्यांचे काँग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर आगमन होऊ लागले व त्याचा शेवट १९३९ साली ब्राह्मणेतर पक्षाचे अस्तित्व नाहीसे होण्यात झाला.

ब्राह्मणेतर चळवळीने ज्या गोष्टी साध्य केल्या त्यामध्ये पुढील बाबींचा उल्लेख करता येईल. १९२६ मध्ये जोशी वतन बिल पास झाले. त्यामुळे धार्मिक कार्याच्या प्रसंगी ब्राह्मण पुरोहिताला, त्याचे पौरोहित्य स्वीकारले असो अथवा नसो, एक हक्क म्हणून दक्षिणा देण्याची रूढ प्रथा समाप्त करण्यात आली. जमिनीचे विभाजन आणि जमीन महसुलात वृद्धी करणाऱ्या बिलाला विरोध केला. ब्राह्मणेतर चळवळीने शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यास महत्त्व दिले. सामान्य जनांत शिक्षणाचा प्रसार आणि अंधश्रद्धा निर्मूलन या गोष्टीस चळवळीच्या नेतृत्वाने अग्रक्रम दिला होता.

ब्राह्मणेतर सावकारांकडून होणाऱ्या शेतकऱ्यांच्या पिळवणुकीच्या संबंधी ब्राह्मणेतर चळवळीच्या नेतृत्वाने मवाळ दृष्टिकोन स्वीकारला. त्याचप्रमाणे मराठा संस्थानिकांच्या संस्थानातील गैरकारभाराकडे चळवळीच्या नेतृत्वाने कानाडोळा केला. ब्राह्मणेतर समाजाने हाती घेतलेल्या समाजसुधारणेच्या कार्यक्रमात उदारमतवादी ब्राह्मणांशी देखील सहकार्य करण्याचे नेतृत्वाने नाकारले. ब्राह्मण्य विरोधाऐवजी ब्राह्मण-विरोधी दृष्टिकोन हा त्यांचा विविध प्रश्नांकडे पाहण्याच्या दृष्टिकोनांत प्रतिबिंबित होत होता. यावरून असे दिसते की, ब्राह्मणेतर चळवळ ही जोतिबा फुले यांच्या वैश्विक मानवतावादी उद्दिष्टांपासून बाजूला गेली व ती ब्राह्मण-विरोधी ब्राह्मण्यवादी अथवा क्षत्रियवादी चळवळ झाली. ब्राह्मणेतर चळवळीच्या सुधारणा कार्यक्रमात जातिभेद व अस्पृश्यता निवारण्याच्या कार्यास उच्च प्राधान्य देण्यात आले होते. तरी मराठा, जैन व वरिष्ठ जातींतील चळवळीच्या अनुयायांमध्ये या सामाजिक आदर्शांशी भावनात्मक बांधिलकी नव्हती आणि ते केवळ अशा आदर्शांबद्दल ब्राह्मणांचे वर्चस्व झुगारून देण्यातील एक व्यावहारिक बाब या दृष्टिकोनातून शाब्दिक सहानुभूती दाखवीत होते. चळवळीचे अनेक सदस्य खाजगी जीवनात घरी अस्पृश्यता पाळीत होते आणि कनिष्ठ जातींतील व्यक्तींशी रोटीव्यवहार करण्यास अनुकूल नव्हते. यामुळेच डॉ. आंबेडकरांनी मराठा हे दुय्यम प्रतीचे ब्राह्मण आहेत असे उद्‌गार काढले होते.

या जहाल ब्राह्मणेतर चळवळी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस आणि विसाव्या शतकाच्या प्रारंभी निर्माण झाल्या होत्या. परंतु त्या आधी "वेदोक्त " या नावाने ओळखली जाणारी चळवळ एकोणिसाव्या शतकात सातारा, बडोदा, कोल्हापूर आणि पुणे या शहरांत सुरू झाली होती. या तंट्यात दोन पक्ष गुंतले होते. पहिल्या पक्षात सातारा, कोल्हापूर येथील राजघराणी, तसेच क्षत्रिय मराठा आणि चांद्रसेनीय कायस्थ प्रभू हे एका बाजूला, तर दुसऱ्या बाजूला पुण्यातील कर्म "ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली एकत्रित आलेला ब्राह्मण वर्ग. कर्म " ब्राह्मणांनी पहिल्या पक्षात अंतर्भूत असलेल्या राजघराण्यांना तसेच क्षत्रिय मराठा आणि चांद्रसेनीय कायस्थ प्रभू यांना शूद्र म्हणून मानले होते आणि या कारणास्तव त्यांना वेदोक्त संस्कार करण्याचा अधिकार नाकारला होता. परंतु बदलत्या राजकीय आणि कायदेविषयक परिस्थितीचा पूर्ण फायदा घेऊन आणि हे विधी करण्यासाठी उत्तरेतील आणि दक्षिणेतील ब्राह्मणांना राजघराणी, मराठा-क्षत्रिय आणि प्रभू यांना आमंत्रित करून महाराष्ट्रातील ब्राह्मणांची मक्तेदारी मोडून काढून आपला वेदोक्त विधी करण्याचा अधिकार प्रस्थापित केला. ही घटना राजकीय आधाराच्या अभावी ब्राह्मणांच्या सत्तेचा ऱ्हास झाल्याचे दर्शविते.

वसाहतवादी इंग्रज राजसत्तेच्या सुरुवातीच्या कालखंडात महाराष्ट्रातील दलित जातींच्या नैतिक आणि सामाजिक अधोगतीकडे पुरोगामी विचारसरणीच्या सुधारक, ख्रिश्चन धर्मप्रसारक आणि ब्रिटिश शासनकर्ते यांचे सहानुभूतीयुक्त लक्ष वेधले गेले होते. त्यांच्या प्रयत्नामुळे आणि सहानुभूतीच्या दृष्टिकोनामुळे दलितांमध्ये विशेषतः महारांच्यामध्ये स्वजातीय नेतृत्व पुढे येऊ लागले. या नेतृत्वाने दलित जातींमध्ये सुधारणा घडवून आणण्याची कामगिरी स्वतःकडे घेतली. गोपाळबाबा वलंगकर हे या समूहातून निर्माण झालेले पहिले नेते होते आणि त्यानंतर शिवराम जानबा कांबळे हे नेते म्हणून पुढे आले. विदर्भ भागात किसन फागू बनसोडे, गणेश अकाजी गवई आणि कालीचरण नंदा गवळी हे नेते दलितांना संघटित करण्यात आणि त्यांना हिंदू समाजातील इतर समान हक्क मिळवून देण्याच्या कामी कार्यरत होते. दलित जातींना शापवत् असलेल्या मुरळी प्रथेचा शेवट करण्यात कांबळे यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. त्यांनी सुधारणेच्या कार्यक्रमांत शिक्षणप्रसार आणि व्यसनमुक्ती या गोष्टींना बरेच महत्त्व दिले होते. या सुधारणेच्या कार्यक्रमांचे उद्दिष्ट दलितांना हिंदू समाजात मानाचे जीवन प्राप्त करून देणे हे होते.

या स्वजातीय नेत्यांखेरीज दलितेतर जातीतील महर्षी विट्ठल रामजी शिंदे, कोल्हापूरचे शाहू महाराज, सेनापती बापट आणि श्री. म. माटे यांसारखे उदार मनाचे आणि दलितांविषयी सहानुभूती बाळगणारे नेते दलितांच्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यात प्रयत्नशील होते. शिंदे यांनी १९०६ साली डिप्रेस्ड क्लासेस मिशन ही संस्था स्थापन केली आणि अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यास संघटित रूप दिले. दलितांमध्ये प्राथमिक आणि व्यावसायिक शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी आणि दलित व दलितेतरांमध्ये सद्‌भाव निर्माण करण्याच्या उद्देशाने त्यांनी संमिश्र शाळांची स्थापना केली. शाहू महाराजांनी दलितोद्धाराची बांधिलकी स्वीकारली होती. त्यांनी दलितांच्या

शैक्षणिक विकासासाठी सोई पुरविल्या; एवढेच नसून, त्यांना संस्थानात मोफत शिक्षण मिळण्याची सोय केली, दलितांसाठी स्वतंत्र शाळा उघडल्या, वसतिगृहे बांधण्यास मदत केली आणि त्यांना नोकऱ्या दिल्या. विहिरी, शाळा, महाविद्यालये, सरकारी कार्यालये यासारखी सार्वजनिक ठिकाणे दलितांसाठी खुली केली. त्यांनी दलितांच्या बरोबर सर्वांसमक्ष जेवण घेणे सुरू केले. तरी पण अस्पृश्यता निर्मूलनाच्या कामी हे सर्व प्रयत्न तोकडे पडले आणि या कामी अधिक लढाऊ भूमिका घेण्याची जरुरी १९१९ साली राजकीय पटावर आगमन झालेल्या डॉ. आंबेडकर यांना जाणवली. **मूकनायक, बहिष्कृत भारत, समता** आणि **जनता** यांच्या संपादकीयांद्वारा डॉ. आंबेडकरांनी समाजात दलितांना समान हक्क प्राप्त व्हावा म्हणून लढा दिला. महाड येथे चवदार तळ्याचे आंदोलन, पुणे येथील पर्वती मंदिर प्रवेश आणि नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेशाचे आंदोलन सुरू करून त्यांनी दलितांना त्यांच्या अधिकारांसाठी लढा करण्यास शिकविले. दलित वर्गाच्या स्वतंत्र अस्मितेसाठी व हिंदू आणि मुसलमान यांच्या बरोबरीने राजसत्तेत भागीदारी मिळावी म्हणून त्यांनी लढा दिला. त्यांनी महार वतनाच्या निर्मूलनासाठी विधेयक सादर केले. हे विधेयक १९२८ साली सादर केलेल्या विधेयकाची सुधारित आवृत्ती होती. मंदिर प्रवेशासंबंधी सवर्ण हिंदूनी घेतलेल्या ताठर भूमिकेची शिसारी आल्यामुळे हिंदू धर्माचा त्याग करण्याचा त्यांनी आपला निर्धार १३ ऑक्टोबर १९३५ रोजी जाहीर केला.

डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखाली दलित चळवळीने दलितांमध्ये स्वतःच्या हक्काची जाणीव निर्माण करून त्यांच्या मानसिक दृष्टिकोनातून क्रांतिकारी बदल घडवून आणले आणि त्यांच्यात आत्मसन्मानाची भावना निर्माण केली. तथापि हे खरे असले तरी हे लाभ त्यांचे मोठ्या संख्येने अनुयायी असणाऱ्या महार जातीपुरतेच मर्यादित राहिले. इतर दलित जाती-प्रामुख्याने मांग, चांभार आणि ढोर या चळवळीपासून दूर राहिल्या, याचे प्रमुख कारण म्हणजे दलितांच्या मध्ये संख्येने मोठी असलेली आणि नागरी, औद्योगिक जीवनाचा अधिक अनुभव असलेली महार जात आपल्यावर प्रभुत्व गाजवेल अशी वाटणारी भीती असावी. त्यांनी महात्मा गांधींच्या अस्पृश्यता निर्मूलनाच्या कार्यक्रमास पाठिंबा देणे पसंत केले.

भारतावरील इंग्रजांचा वसाहतवादी अंमल १९४७ साली समाप्त झाला आणि त्याबरोबरच संपूर्ण सामाजिक परिवर्तनाचे ध्येय असलेल्या सामाजिक चळवळीच्या युगाची समाप्ती झाली. या चळवळीमुळे महाराष्ट्राच्या सामाजिक संरचनेत जे महत्त्वपूर्ण बदल घडून आले त्यापैकी काही पुढील प्रमाणे आहेत. महाराष्ट्रातील ब्राह्मणांच्या धार्मिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील वर्चस्वामध्ये लक्षणीय घट झाली. मराठा जातीने समाजातील आपल्या वर्चस्वात विशेषतः राजकीय आणि आर्थिक क्षेत्रात वाढ केली. दलित वर्गात एक स्वतःची जाणीव झालेला आणि आत्मसन्मान राखणारा, समाजामध्ये समान वागणुकीचा हक्क सांगणारा एक समूह या नात्याने महार जात उदयास आली. मात्र संख्येने लहान असलेल्या आणि म्हणून मर्यादित अपेक्षा बाळगणाऱ्या व तसाच दृष्टिकोन ठेवणाऱ्या अन्य दलित जातींनी समाजामध्ये चांगली संधी प्राप्त करून घेण्यासाठी काँग्रेसच्या छत्राखाली राहणे पसंत केले.

राजकीय स्वातंत्र्यप्राप्तीमुळे देशातील जनतेला सामाजिक आणि सांस्कृतिक आकांक्षा पूर्तीची (बराच काळ प्रतीक्षा केलेली) संधी प्राप्त झाली. सुरुवातीच्या पिढीतील समाजसुधारकांना नैतिक आदर्शांच्या प्राप्तीसाठी स्वार्थत्याग करण्याची प्रेरणा या सांस्कृतिक आकांक्षांनीच दिली होती. तरीही स्वातंत्र्योत्तर कालखंडात महाराष्ट्रात समताधिष्ठित सामाजिक मूल्यांपासून हळूहळू दूर जाण्याची आणि राजकीय सत्ता प्राप्त करून घेण्याच्या उद्दिष्टाच्या जवळ जाण्याची प्रक्रिया सुरू झाली, आणि त्यामुळे सामाजिक सुधारणेच्या उद्दिष्टांची पीछेहाट झाली.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत हे सार्वभौम लोकतांत्रिक गणराज्य झाले आणि बहुपक्षी पार्लमेन्टरी पद्धतीची राज्यव्यवस्था स्वीकारली. नवीन राजकीय व्यवस्थेमध्ये जातिव्यवस्थेला नव्याने जीवदान मिळाले. ठराविक कालखंडानंतर शासनाच्या विविध घटकांकरिता होणाऱ्या निवडणुकांमुळे विविध जातींच्या संख्याबलाचे महत्त्व एका नव्या पातळीवर जाऊन पोहोचले, आणि प्रभावी जातींचे राजकीय महत्त्व अस्तित्वात आले. संख्येने लहान असलेल्या जातींना आता प्रभावी जातींबरोबर संलग्न होऊन त्यांच्या सहानुभूतीने, किंवा लहान जातींचा गट तयार करून आपला प्रतिनिधी निवडणे आवश्यक झाले. आणि हे जर घडले नाही तर राजकीयदृष्ट्या अस्तित्वहीनता स्वीकारणे प्राप्त होईल. महाराष्ट्रामध्ये संख्येने लहान असलेल्या जातींना आपल्या राजकीय आकांक्षा प्राप्त करून घेण्यासाठी प्रभावी जातींचा आश्रय स्वीकरण्याचा पहिला पर्याय बऱ्याच काळापर्यंत यशस्वी झाला ही गोष्ट महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाच्या शासनास दीर्घकाळ लाभलेल्या स्थैर्यात दिसून येते. महाराष्ट्रात मराठी-कुणबी जातीला आपले प्रबळ स्थान पक्के करण्यास बरेच घटक कारणीभूत झाले. या संबंधात १९६० साली एक भाषेच्या तत्त्वावर निर्माण झालेल्या महाराष्ट्र राज्य निर्मितीचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. त्या आधीच्या व्यवस्थेत मराठा जातीतील राजकीय शिष्टजनांना गुजरात आणि कर्नाटक यांमधील शिष्टजनांच्या बरोबर राजकीय सत्तेत भागीदारी पत्करावी लागत होती. महाराष्ट्रातील जनतेचे हितसंबंध प्राप्त करण्याच्या कामी राज्यसत्तेच्या वापरावरील ही मर्यादा लक्षात घेऊन महाराष्ट्रातील जनतेची चळवळ असे स्वरूप असलेली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ १९५७ साली सुरू करण्यात आली. याचा परिणाम १ मे १९६०

Maharashtra State Gazetteers

रोजी मराठी भाषिक लोकांचे राज्य या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीत झाला. नव्याने निर्माण झालेल्या मराठी राज्यामधील समाज संरचनेत मराठा-कुणबी जातिसमुच्चयाची लोकसंख्या जवळजवळ निम्मी होती. त्यामध्ये मराठा शिष्टजनांचे प्रमाण १५ ते २० टक्के होते. शासनाच्या विकास योजना मराठा जातीतील शिष्टजन तयार करू लागले आणि या योजनांमुळे बहुतांशी या जातीचे हितसंबंध जोपासले जाऊ लागले. सहकारी संस्था, शैक्षणिक संस्था आणि पंचायत राज यांच्या विस्तारामुळे या जातीचे आर्थिक आणि राजकीय प्रभुत्व मजबूत होण्यास मदत झाली. मराठा जातीच्या नेतृत्वाने संख्येने दुर्बल असणाऱ्या दलितांसह अन्य जातींतील शिष्टजनांच्या आकांक्षाप्रत लवचिक दृष्टिकोन स्वीकारला, आणि या स्तरातून शिष्टजनांना नियंत्रित प्रकारे आपल्या गटात समाविष्ठ करून घेतले. परंतु काही कालानंतर मराठेतर शिष्टजनांना आणि नवशिक्षित तरुण पिढीला चलनशीलता पुरवणारी यंत्रणा मृगजलाप्रमाणे ठरली, आणि त्यामुळे ग्रामीण आणि नागरी विभागात सामाजिक तणाव आणि अस्थिरता निर्माण झाली. या अस्थिरतेचे प्रकट स्वरूप प्रथम मुंबईत आणि त्यानंतर महाराष्ट्राच्या इतर भागात दिसू लागले. विकास प्रक्रियेच्या फलितांविषयी दलित वर्गात निर्माण झालेली निराशा आणि त्यांना ग्रामीण भागात दिली जाणारी वाईट वर्तणूक यामुळे दलित पँथर नामक संघटना प्रथम मुंबईत आणि त्यानंतर महाराष्ट्रातील इतर शहरांत उदयास आली.

शिवसेनेची स्थापना बाळ ठाकरे यांनी १९ जून १९६६ रोजी केली. या संघटनेचा उदय हा महाराष्ट्रातील तरुणांमधील बेकारीच्या समस्येला मिळालेला जहाल प्रतिसाद अशा स्वरूपाचा होता. भूमिपुत्रांना नोकरी हे तत्त्व संघटनेने स्वीकारले आणि मुंबईत नोकऱ्यांच्या क्षेत्रात बहुसंख्येने असणाऱ्या दाक्षिणात्यांविरुद्ध आंदोलन छेडले. भूमिपुत्रांच्या सिद्धांताचाच एक परिपाक म्हणजे शिवसेनेने औद्योगिक क्षेत्रात कम्युनिस्टांच्या विरुद्ध घेतलेली भूमिका आणि त्यातून तिचे वाढलेले राजकीय महत्त्व. हिंदवी राज्य स्थापन केल्याबद्दल शिवसेनेत शिवाजी महाराजांविषयी अतीव आदर असून ती महाराष्ट्राचा सांस्कृतिक आदर्श पुरुष म्हणून त्यांचे अनुकरण करते. अलीकडील काळात या संघटनेने हिंदुत्वाचा पुरस्कार केलेला आहे.

ज्याप्रमाणे शिवसेनेचा जन्म म्हणजे महाराष्ट्रातील तरुणांमधील वाढती बेकारी आणि त्यातून निर्माण झालेल्या निराशेला मिळालेला प्रतिसाद होता. त्याचप्रमाणे मुंबईत १९७० मध्ये निर्माण झालेली दलित पँथर ही संघटना महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील दलितांवर सवर्ण हिंदूंनी केलेल्या अत्याचारांविरुद्ध दलित तरुणांनी उठवलेला आवाज होता. ही परिस्थिती निर्माण होण्यात अन्य घटकांबरोबर दोन प्रमुख घटक जबाबदार होते. पहिला घटक म्हणजे महार जातीने मोठ्या प्रमाणावर बौद्ध धर्मात केलेला प्रवेश, आणि त्यामुळे त्यांनी ग्रामीण भागात मृत जनावरे उचलणे अशा सारखी पारंपरिक कामे करण्यास दिलेला नकार, व यातून झालेल्या सामाजिक तणावात वाढ. दुसरा घटक म्हणजे दलितांमध्ये विशेषकरून नवबौद्धांमध्ये आरक्षणाच्या धोरणाचा परिणाम म्हणून नवीन मध्यम वर्गाची झालेली निर्मिती हा होय. नव्याने प्राप्त झालेल्या सामाजिक व आर्थिक स्थानामुळे दलित तरुणांच्यामध्ये निर्माण झालेली अशांती आणि हा बदल मान्य करून दलितांना समतेची वागणूक देण्यास सवर्ण हिंदूनी दिलेला नकार यांची राजकीय अभिव्यक्ती मुंबईमध्ये दलित पँथर ही संघटना स्थापन करण्यात झाली. राजा ढाले आणि नामदेव ढसाळ हे दलित पँथर चळवळीचे अध्वर्यू होते. दलित चळवळीची व्याप्ती किती असावी याविषयी त्यांच्यामध्ये पुढे तात्विक मतभेद निर्माण झाले. ढाले यांच्या मते बौद्ध धर्म म्हणजे विद्रोही विचारसरणीच आहे, आणि म्हणून बौद्ध हेच नाव त्यांच्या अनुयायांनी स्वीकारले. या उलट ढसाळ यांनी आंबेडकरांची विचारप्रणाली मार्क्सवादाशी मिळती जुळती करण्याचा प्रयत्न केला, आणि जे लोक दबले गेलेले होते त्यांना त्यांच्या जातीचा विचार न करता दलित म्हणून मानले. या चळवळीचा १९८० मध्ये ऱ्हास झाला.[२]

अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्याकरिता वेंग्द्र सरकार आणि राज्य शासनाने अमलात आणलेल्या संरक्षी भेदीकरणाच्या (प्रोटेक्टिव्ह डिस्क्रिमिनेशन) योजनेमुळे या स्तरांतील सुशिक्षित लोकांचा नवा मध्यम वर्ग निर्माण झाला. या बरोबरच समाजामध्ये सामाजिकदृष्ट्या दलितांपेक्षा वरच्या स्तरात असलेल्या परंतु शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या मध्यमस्तरीय जातींचा एक गट होता. त्यामुळे या गटानेही आपल्यला शैक्षणिक संस्था आणि सरकारी नोकऱ्यांमध्ये अशाच तऱ्हेच्या सवलती मिळाव्यात अशी मागणी करण्यास प्रारंभ केला. वेंग्द्र सरकारने नियुक्त केलेल्या मंडल आयोगाच्य शिफारसी मान्य करून आणि त्यांची अंमलबजावणी करून महाराष्ट्र शासनाने समाजाच्या या गटाच्या आकांक्षापूर्तीसाठी एक पाऊल पुढे घेतले आहे. परंतु यामुळे मराठा-कुणबी जातिसमुच्चयाचे ऐक्य आणि अस्मिता यांच्या संदर्भात एक नाजूक प्रश्न निर्माण झाला आहे. मंडल आयोगाने कुणबी गटाचा अंतर्भाव अदर बॅकवर्ड क्लास म्हणजे इतर मागास वर्ग या गटात केला असला तरी मराठा जातीला त्यामधून वगळण्यात आले आहे. यामुळे मराठा जातीपुढे सामाजिक समस्या उभी राहिली आहे, आणि ती म्हणजे विशाल मराठा-कुणबी जातिसमुच्चयाचे ऐक्य आणि अस्मिता-जिच्यामुळे या समुच्चयाचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रातील प्रभुत्व प्रस्थापित झाले होते ती टिकवून ठेवणे. आपल्या कुणबी बांधवांना जातिसमुच्चयाचे अंतर्गत ऐक्य टिकविण्याच्या दृष्टीने आरक्षणाचे फायदे सोडावयास सांगावयाचे का त्यांना इतर मागासवर्गीय असे म्हणवून घेण्यास मुभा देऊन जातिसमुच्चयाच्या भावनात्मक

एकात्मतेस धोका उत्पन्न करावयाचा, हा या जातिसमुच्चयापुढे प्रश्न निर्माण झाला. यामुळे मराठा महासंघाने संरक्षी भेदीकरणाचा म्हणजेच आरक्षणाचा धर्म निरपेक्ष निकष स्वीकारण्यास अनुकूलता दर्शविली.

अण्णासाहेब पाटील या मराठा-कुणबी जातीच्या माथाडी कामगारांच्या नेत्याने मराठा जातीचे हितसंबंधांचे रक्षण करण्याच्या आणि गरीब मराठा लोकांची उन्नती साध्य करण्याच्या प्रकट उद्देशाने मराठा महासंघाची स्थापना केली. मराठा सत्तेस धोका निर्माण करणारा अहवाल असा महासंघाचा मंडल आयोगाकडे बघण्याचा दृष्टिकोन आहे. महासंघाच्या मते दलितांसाठी शासनाने विहित केलेल्या आरक्षणामुळे गरीब मराठा जनतेच्या विकासात अडथळा निर्माण झाला आहे. त्यामुळे महासंघाने आरक्षणाचा निकष धर्म व जाती निरपेक्ष असावा अशी मागणी केली आहे.[३]

ब्रिटिशांच्या आगमनानंतर आणि पुढे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताने पार्लमेन्टरी पद्धतीच्या लोकशाही राज्यव्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर जातिव्यवस्थेमध्ये जे परिवर्तन घडून येत आहे. त्याचे गुंतागुंतीचे आकृतिबंध वरीलप्रमाणे दिसून येत आहेत. जातिव्यवस्थेतील अधिक्रमाच्या धार्मिक बाजूचे महत्त्व कमी झाल्याचे दिसते. ब्राह्मणेतर चळवळीमुळे महाराष्ट्रातील ब्राह्मणांचे धार्मिक महत्त्व खूपच कमी झाले. महाराष्ट्राच्या प्रमुख दैवतांची महापूजा लोकनियुक्त ब्राह्मणेतर नेत्यांच्या हस्ते करण्याचा प्रघात आता रूढ झाला आहे. महाराष्ट्रातील देवळांमध्ये सर्व जातींना आता प्रवेश आहे. तरीपण जातिव्यवस्था आपले आर्थिक आणि राजकीय महत्त्व टिकवून आहे. उत्पादनाच्या साधनांवरील नियंत्रण हे बव्हंशी वरिष्ठ जातींच्या, खास करून मराठा-कुणबी जातीच्या हातात आहे. दलित जातींचा स्तर हा प्रामुख्याने भूमिहीन मजुरांचा स्तर आहे.

आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमुळे अनेक जातींमध्ये अंतर्गत विभेदीकरण झालेे आहे. यामुळे जातींमध्ये वर्ग निर्माण झाले आहेत.

महाराष्ट्रातील राजकीय पक्षांच्या जडणघडणीवर आणि राजकीय प्रक्रियांवर देखील जातिव्यवस्थेचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. काँग्रेस पक्ष आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष हे धर्म निरपेक्षतेचा जाहीर पुरस्कार करणारे असूनही त्यांना खास करून निवडणुकीच्या वेळी जातीची दखल घ्यावी लागत होती. त्याचप्रमाणे शेतकरी कामकरी पक्ष, किंवा शेतकरी संघटना यासारखे धर्मनिरपेक्षता व वैश्विक तत्त्वावर आधारलेले पक्षही प्रामुख्याने काही जातींचे हितसंबंध सांभाळताना दिसतात.

यावरून असे दिसते की, जातिव्यवस्थेच्या अधिक्रमाच्या अथवा असमानतेच्या घडणीत समाविष्ट असलेल्या धार्मिक, आर्थिक आणि राजकीय घटकांमध्ये विभेदीकरणाच्या प्रक्रियेद्वारा महाराष्ट्रातील जातिव्यवस्था ही औद्योगिक नागरी लोकवादी समाजाशी अनुकूलित झाली आहे.

जातिव्यवस्थेच्या धार्मिक निकषाचे महत्त्व जरी कमी झाले असले तरी तिच्या आर्थिक आणि राजकीय बाजूंचे महत्त्व अजून टिकून आहे. ज्यावेळेला विविध जातींची सांस्कृतिक विभिन्नता कमी होईल, आणि त्यांच्यात मोठ्या प्रमाणात समानता निर्माण होईल तेव्हाच या परिस्थितीत फरक पडेल. या कार्यात दूरदर्शनसारख्या आधुनिक संज्ञापन माध्यमांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. यामुळे सध्या अत्यल्प प्रमाणात होत असणाऱ्या आंतरजातीय विवाहांनाही प्रोत्साहन मिळेल. या निष्कर्षातून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महाराष्ट्रातील स्त्रियांच्या बदलत्या स्थितीचा विचार करण्याची आवश्यकता जाणवू लागते.

महिलांचे स्थान : विवाह आणि कुटुंब

पारंपरिक हिंदू धर्म व्यवस्थेमध्ये महिलांचे स्थान काय होते हे मनूच्या "नःस्त्री स्वातंत्र्यमर्हति" या वचनातून स्पष्ट होते. महिलेचे संरक्षण बालवयात तिचा पिता करतो, तरुणपणात विवाहानंतर तिचा पती करतो आणि वृद्धावस्थेत मुलगा तिची काळजी घेतो. आपला पती आणि त्याचे कुटुंब यांची सेवा करणे ही स्त्रीची एकमेव भूमिका समजली जात असे आणि याला धर्माची मान्यताही मिळाली होती. स्त्री ही पतीची मालमत्ता आहे असे मानण्याच्या दृष्टिकोनाबरोबरच सतीच्या प्रथेसही मान्यता प्राप्त होती.

महाराष्ट्रामध्ये सतीच्या प्रथेला धार्मिक आदर्शाचे स्थान जरी प्राप्त झाले होते, तरी ही प्रथा क्वचितच् पाळली जात असे. मराठे आणि पेशवे यांच्या राजवटीत सती जाण्याचे काही तुरळक प्रकार झाले होते. पत्नी सती जाण्याच्या घटनेची शेवटची नोंद पुणे येथे ११ सप्टेंबर १८१९ साली झाली. या घटनेमुळे पुण्याचा डिस्ट्रिक्ट कलेक्टर रॉबर्टसन हिंदू स्त्रीला सती जाण्याचे धार्मिक बंधन आहे का याविषयी शास्त्री पंडितांचे मत आजमावण्यास उद्युक्त झाला होता. धार्मिकदृष्ट्या सती जाणे हे बंधनकारक नसल्याचे मत शास्त्री पंडितांनी दिले. यामुळे हिंदू समाजात कुमारिका आणि स्त्रियांना देण्यात येत असलेल्या अमानुष वागणुकीवर कायदेशीर बंदी घालण्याचा मार्ग खुला झाला. या उपाययोजनेस महाराष्ट्रातील प्रगल्भ सुधारकांचाही पाठिंबा मिळाला. महाराष्ट्रामध्ये स्त्री सुधारणेविषयी अनुकूल मत निर्माण करण्याचे प्रयत्न बाळशास्त्री जांभेकर , लोकहितवादी देशमुख , जोतिबा फुले , गोपाळ गणेश आगरकर , न्या. महादेव गोविंद

रानडे , काशिनाथ त्र्यंबक तेलंग , धोंडो केशव कर्वे , पंडिता रमाबाई आणि इतर अनेकांनी केले. सुधारकांच्या प्रचारामुळे आणि कायदेशीर उपाययोजनांमुळे शतकानुशतके चालत आलेल्या रूढींच्या दास्यातून महिलांची मुक्ती करणे सुलभ झाले.

स्त्रियांची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारने सती प्रथेस कायद्याने बंदी करणारा १८२९ चा कायदा हा सर्व प्रथम केलेला कायदा होय. बालविवाहाची प्रथा महाराष्ट्रात नित्याची बाब होती, आणि त्यामुळे समाजात बालविधवांची समस्या निर्माण झाली होती. १८५६ साली विधवांना पुनर्विवाह करण्यास संमती देणारा कायदा पास झाला. शारीरिकदृष्टया पूर्ण वाढ न झालेल्या वधूशीही समागम करण्यात पतीला अधिकार आहे असे मानले जात असे. यामुळे अनेक बालवधूंना शारीरिक इजा होत असे. या स्थितीस पायबंद बसण्यासाठी १८९१ साली संमतीदर्शक वयाचा कायदा (एज ऑफ कन्सेंट ॲक्ट) बी. एम्. मलबारी या समाजसुधारकाच्या प्रयत्नांमुळे पास झाला आणि त्यामुळे बारा वर्षाखालील वधूशी समागम करण्यास पतीला बंदी करण्यात आली. विवाहाच्या वेळी वधूचे वय कोणते असावे हे निश्चित करणारा शारदा ॲक्ट या नावाने ओळखला गेलेला कायदा १९२९ साली पास झाला. १९३७ साली हिंदू स्त्रिचा संपत्तीवरील अधिकाराचा कायदा (हिंदू विमेन्स राईट टु प्रापर्टी ॲक्ट) पास करण्यात आला. या कायद्यामुळे अविभक्त कुटुंबातील विधवेला तिच्या नव-याच्या संपत्तीचा भाग तिच्या हयातीत मिळण्याचा अधिकार प्राप्त झाला. १९४६ साली द्विभार्या प्रतिबंधक कायदा आणि १९४७ साली विशिष्ट परिस्थितीत घटस्फोट मिळण्याचा कायदा पास झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर या प्रवाहास गती आली , आणि केंद्र सरकार आणि राज्य शासनाने स्त्रियांना घटनेने बहाल केलेले आर्थिक , सामाजिक , आणि राजकीय न्यायाचे अधिकार प्रत्यक्षात अमलात आणण्यासाठी अनेक प्रगतिशील पावले उचलली. महाराष्ट्र शासनाने स्त्रियांना निर्णय घेण्याच्या विविध पातळीवर सहभागी होता येण्याच्या दृष्टीने त्यांच्यासाठी शासकीय सेवेच्या क्षेत्रात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राखीव जागा ठेवून व त्यांना आर्थिकदृष्टया आत्मनिर्भर बनवून सामर्थ्यशाली बनविण्याच्या उद्देशाने जी योजना अलीकडे जाहीर केली त्यामुळे महाराष्ट्रात स्त्रियांच्या स्थानात क्रांतिकारी परिवर्तन घडून येणार आहे.[४]

महिलांची पारंपरिक भूमिका घरकाम आणि बालसंगोपन या बाबींपुरतीच मर्यादित होती. स्वयंपाकघर ही पवित्र जागा मानली असल्यामुळे उच्च जातीतील विधवेला स्वयंपाकघरात प्रवेश करण्यास पात्र होण्याच्या दृष्टीने केशवपण करून धार्मिक दृष्टिने आवश्यक ठरविण्यात आले होते. महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी या प्रथेविरूद्ध आंदोलन उभे केले व त्यामुळे विधवांना या प्रथेविरुद्ध बंड करण्यास धैर्य आणि सामाजिक पाठिंबा प्राप्त झाला. सुप्रसिद्ध समाजसुधारक आणि शिक्षणतज्ञ धोंडो केशव कर्वे यांनी पहिल्या पत्नीच्या निधनानंतर केशवपन केलेल्या गोदूबाई जोशी यांच्याशी पुनर्विवाह केला आणि मुलींकरीता १९०८ साली उच्च माध्यमिक विघालयाची स्थापना केली. घरकामाच्या रगाडयापासून सुटका होण्यासाठी , आणि परंपरेच्या बंधनातून मुक्ती मिळण्यासाठी स्त्रियांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे आवश्यक मानले जात होते.ख्रिस्ती धर्मप्रसारकांनी एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीला या दिशेने सुरुवात केली होती. परंतु आपल्याला खिस्ती करून घेतील या भीतीने फारच थोडया स्त्रिया या शाळांमध्ये जात होत्या. जोतिबा फुले यांनी आपल्या पत्नीस शिक्षित करून १८४८ साली पुण्याला मुलींच्या शाळेची आणि १८७० साली महिलांसाठी अध्यापन महाविद्यालयाची पुण्यात स्थापना केली. १८८०-८१ साली पंडिता रमाबाई यांनी आर्य महिला श्रमाची स्थापना केली. या विद्यालयात आधुनिक कला आणि विज्ञान या विषयांचे महिलांना शिक्षणे देण्यात येत असे. महादेव गोविंद रानडे , रामकृष्ण गोपाळ भांडारकर आणि शंकर पांडुरंग पंडित यांच्या एकत्रित प्रयत्नांतून १८८४ साली भारतीय कन्या उच्च विद्यालयाची स्थापना पुण्यात झाली. ही महाराष्ट्रातील मुलींसाठी असलेली पहिली माध्यामिक शाळा. रमाबाई रानडे यांनी स्त्रियांना सामान्यज्ञान आणि व्यावसायिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने पुणे येथे सेवासदन या संस्थेची स्थापना केली. सेवासदन मध्ये शिवणकाम आणि रुग्ण शुश्रुषा या विषयांचे अभ्यासक्रम सुरू केले. त्यामुळे स्त्रियांना शिक्षिकेखेरीज हे दोन व्यवसाय उपलब्ध झाले. १८७० साली पुण्यामध्ये महिलांसाठी अध्यापन महाविद्यालयाची स्थापना झाल्यामुळे स्त्रियांमध्ये शिक्षण प्रसाराच्या कामास अधिक चालना मिळाली. महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाच्या क्षेत्रात महर्षी कर्वे यानी १९१६ साली पहिले महिला विद्यापीठ स्थापन करून कळस चढविला.[५] ब्रिटिश राजवटीत ज्या स्त्रीशिक्षणाचे स्वरूप एखाद्या निर्झरासारखे होते त्याचे रूपांतर स्वातंत्र्योतर काळात एखाद्या महानदीसारखे झाले. आधुनिक महाराष्ट्रात उच्च शिक्षणाचे असे एकही क्षेत्र नाही, जे स्त्रियांना उपलब्ध नाही. जे व्यवसाय पूर्वी फक्त पुरुषांसाठीच असल्याचे मानले जात असत , अशा सर्व व्यवसायांत आज स्त्रिया दिसून येतात.

गृहिणी आणि शिशुसंगोपन या स्त्रीच्या पारंपरिक भूमिकेपासून व्यावसायिक आणि सार्वजनिक कार्याच्या क्षेत्रातील सहभागिनी असे जे परिवर्तन घडून आले आहे यास तांत्रिकीय क्षेत्रातील दोन महत्वाच्या क्रांत्या जबाबदार आहेत. या क्रांत्या म्हणजे जनन नियंत्रण, आणि महाराष्ट्रातील औद्योगिक-नागरी संस्कृतीचा विकास या होत. कुटुंबनियोजनाच्या चळवळीची सुरुवात स्वातंत्र्यपूर्व काळात प्रथम केल्याचे श्रेय महाराष्ट्राकडे जाते. ज्या काळात लैंगिक विषयांवर काही बोलणे नैतिकदृष्टया निषिद्ध मानले जात असे, अशा काळात प्रा. रघुनाथ धोंडो कर्वे यांनी आपल्या **समाजस्वास्थ्य** या

मराठीत प्रसिद्ध होणा-या मासिकातून कुटुंब नियोजन आणि लैंगिक शिक्षण या विषयावर लोकांच्या टीकेची पर्वा न करता लेख लिहिण्याची मोहीम चालविली. अशा त-हेचे समाज व धर्मनिषिद्ध कार्य करण्याब६ल त्यांना जनतेचा राग सहन करावा लागला आणि महाविद्यालयातील प्राध्यापकाच्या नोकरीसही मुकावे लागले. त्यांच्या मृत्युनंतर त्यांचे कार्य शवुंतला परांजपे यांनी मोठया धैर्याने आणि उत्साहाने पुढे चालविले. स्वातंत्र्योत्तर काळात कुटुंबनियोजनाचा कार्यक्रम लोकप्रिय करण्यात महाराष्ट्र शासनास जे यश प्राप्त झाले , त्याचे बरेचसे श्रेय कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात काम करणाच्या या आद्यकार्यकर्त्यांच्या कार्यास द्यावे लागेल.

ब्रिटिशपूर्व काळात स्त्रियांना कराव्या लागणा-या घरगुती कामाची व्याप्ती आणि त्यातील कष्ट आणि कंटाळवाणेपणा विविध तांत्रिकीय परिवर्तनामुळे कमी झाला. नळाचे पाणी , वीज , पिठाची गिरणी आणि रॉकेलवर चालणारे स्टोव्ह यामुळे घरगुती कामातील कष्ट ब-याच प्रमाणात ब्रिटिश काळात कमी झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या नवीन शोधाच्या आणि उपकरणांच्या यादीत बरीच भर पडली व त्यामुळे घरकाम खूप हलके झाले आहे. कुटुंबातील कामाच्या श्रमविभागणीच्या संबंधीच्या पुरुषांच्या दृष्टिकोनात , खासकरून नागरी विभागातील पुरुषांच्या दृष्टिकोनात , परिवर्तन घडून आले आहे. त्यामुळे घरकामाच्या जबाबदारीतून स्त्रियांना मुक्त करण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. कौटुंबिक जबाबदारीतून स्त्रियांना मुक्त करण्यात महाराष्ट्रातील औद्योगिक नागरीकरणाच्या प्रक्रियेचा फार महत्त्वाचा वाटा आहे. या महाराष्ट्रातील औद्योगिक आणि नागरी विकासाच्या स्वरूपाचे वर्णन थोडक्यात पुढे केले आहे.

महाराष्ट्रातील नागरी आणि औद्योगिक विकास

वसाहतवादी सत्तेच्या पूर्वी महाराट्रातील सामाजिक संरचना प्रामुख्याने ग्रामीण आणि कृषिप्रधान होती. ग्रामीण समाजाच्या सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय गरजा भागविणारी काही औद्योगिकपूर्व नगरे महाराष्ट्रात होती. जवळजवळ नव्वद टक्के लोकसंख्या ब-याच अंशी स्वयंपूर्ण असणा-या खेडयांमध्ये राहत होती. भारतामध्ये ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ झाल्यापासून औद्योगीकरण, लोहमार्गांची व पक्क्या रस्त्यांची निर्मिती, इतर तांत्रिकीय आणि आर्थिक परिवर्तनामुळे हे चित्र झपाटयाने बदलू लागले. महाराष्ट्रातील औद्योगीकरणाचा पाया मुंबई येथे १८५४ च्या सुमारास कापड गिरणीच्या स्थापनेने झाला. या पाठोपाठ नागपूर , पुणे आणि सोलापूर येथे आधुनिक कापड गिरण्या स्थापण्यात आल्या. जसजशी वर्षे जाऊ लागली तसतशी महाराष्ट्रात अनेक औद्योगिक नगरे अस्तिवात येऊ लागली आणि त्यामुळे सामूहिक जीवनात हळूहळू परिवर्तन घडून येऊ लागले. नव्याने उदयास येत असलेल्या औद्योगिक नागरी वसाहतींमध्ये लोकसंख्येचे स्थलांतरण होऊ लागले , आणि त्यामुळे महाराष्ट्रातील नगरे आणि शहरांच्या संख्येत वाढ होऊ लागली.

सन १९०१ मध्ये महाराष्ट्रात फक्त २१९ शहरे होती. ही संख्या १९६१ मध्ये २६६ झाली. महाराष्ट्राच्या नागरी लोकसंख्येत २८.२ टक्के वाढ झाली. हे प्रमाण १९७१ मध्ये ३१.२ , १९८१ मध्ये ३५.०० तर १९९१ मध्ये ३८.७ टक्कयापर्यंत वाढले. ही टक्केवारी १९९१ मध्ये भारतात २५.७ होती. झपाटयाने होणा-या नागरीकरणाच्या प्रक्रियेबरोबरच उद्योगांचा आणि उर्जा निर्मितीचा विकासही राज्यात झाला आहे. १९८२-८३ मध्ये भारतात अस्तित्वात असलेल्या एकूण कारखान्यांपैकी ११.२ टक्के कारखाने महाराष्ट्रात होते. सन १९९० मध्ये महाराष्ट्रात २३,४१० कारखाने होते. भारतामध्ये निर्माण होणा-या एकूण ऊर्जेपैकी महाराष्ट्रात १६.९ टक्के उर्जेची निर्मिती होते. महाराष्ट्रात १९९३-९४ मध्ये विजेचे उत्पादन ४२,२३६ दशलक्ष कि. वॅ. तास होते. पैकी विजेचा औद्योगिक वापर १५,८२४ दशलक्ष कि. वॅ. तास होता.

कृषी उद्योगांच्या-विशेषत : साखर कारखान्यांच्या-विकासामळे महाराष्ट्रातील ग्रामीण जीवन झपाटयाने बदलत आहे. या संबंधात सहकारी संस्था फार महत्त्वाची भूमिका बजावीत आहेत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीने विशेषत : ग्रामीण भागातील जनतेच्या सामाजिक व आर्थिक विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. सुरुवातीला ही चळवळ प्रामुख्याने शेती पतपुरवठयाच्या क्षेत्रापुरतीच मर्यादित होती. त्यानंतर ही चळवळ शेतमाल प्रक्रिया , शेतमाल पणन , उत्पादक संस्था , ग्राहकभांडारे, सामाजिक सेवा इत्यादी क्षेत्रात झपाटयाने पसरली. १९६१ ते १९८७ या कालखंडात सहकारी संस्थांची संख्या अडीच पटीने तर सभासद संख्या पाच पटीने वाढली. १९९४ अखेर राज्यात १,२६,९९४ सहकारी संस्था व ३३१ लाख सभासद होते. त्यापैकी ३१ मार्च ९४ रोजी उत्पादक सहकारी संस्थांची संख्या ३६,८०२ व सदस्य संख्या५२.४५ लाख होती. देशात निर्माण होणा-या एकूण साखरेपैकी ३५ टक्के साखरेची निर्मिती महाराष्ट्रामधील सहकारी क्षेत्रातील ८४ कारखाने करतात. १९९३-९४ मध्ये ९७ साखर कारखान्यांपैकी ९४ कारखाने सहकारी क्षेत्रातील होते. या कारखान्यांनी १९९३-९४ मध्ये २४२ लाख टन उसाचे गाळप करून २९.६८ लाख टन साखरेचे उत्पादन केले. दूध उत्पादनाच्या क्षेत्रातही सहकारी संस्थांनी वाखाणण्यासारखी प्रगती केली आहे. राज्यात १९९३-९४ मध्ये १८,०५३ प्राथमिक दूध संस्था व ६७ दूध संघ होते. आणि त्यांची सदस्य संख्या अनुक्रमे १५.०४ लाख व ३० हजार होती. विक्री केलेल्या दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या विक्रीची एकत्रित किंमत अनुक्रमे ५३६ कोटी आणि ७९३ कोटी रुपये होती. याचवर्षी राज्यात एक मत्स्यव्यवसाय महासंघ , २२ मत्स्यव्यवसाय संघ आणि १,९३४ प्राथमिक मत्स्यव्यवसाय संस्था होत्या. या सर्व संस्थांची सदस्य संख्या २.०८ लाख होती तर मासळी व

त्यापासूनची उत्पादने यांच्या केलेल्या विक्रीची किंमत १२४ कोटी रूपये होती. १९९३-९४ मध्ये राज्यातील ८२८ हातमाग व ९२७ यंत्रमाग संस्थांनी अनुक्रमे ६५.६ कोटी व १३६ कोटी रुपये किंमतीचे कापड उत्पादन केले. तर एकूण १८८ सहकारी सूत गिरण्यांपैकी ४९ सूतगिरण्या उत्पादन करीत होत्या व त्यांनी ४२९ कोटी रुपये किंमतीच्या सुताचे उत्पादन केले.

महाराष्ट्राच्या समाजप्रबोधनात तत्कालीन वृत्तपत्रे व नियतकालिकांचा सिंहाचा वाटा आहे. विशेषत : **लोकहितवादी, ज्ञानप्रकाश, सुधारक, केसरी** व **मराठा** यांनी जनजागरणाचे कार्य केले. आजच्या काळात आकाशवाणी व दूरदर्शन सर्वत्र पोहचल्यामुळे समाजप्रबोधनाच्या कामात उपयुक्त ठरू शकतील.

मुक्त अर्थव्यवस्थेच्या धोरणाचे महाराष्ट्र शासनाने उत्साहाने स्वागत केले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक नागरी विकासाची गती अधिक वाढायाची शक्यता आहे. अधिकाधिक लोक नागरी समुहात सामील होतील. जागतीक बाजारपेठेच्या अर्थव्यवस्थेच्या वातावरणात महाराष्ट्रातील लोकांचा बाहेरील जगाशी अधिकाधिक संबंध येईल. त्यामुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विविधतेत भर पडून लोकांमध्ये धर्मनिरपेक्ष दृष्टिकोणाची वाढ होण्यास प्रोत्साहन मिळेल. या प्रगतीच्या मार्गात खाचखळगे आणि समस्या नाहीत असे नाही. तथापि कालांतराने रानडे , फुले , आंबेडकर आणि विनोबा भावे यांनी पुरस्कारलेल्या वैश्विक , मानवतावादी समाजाच्या ध्येयानजीक महाराष्ट्र येईल.

तळटिपा

[१] य. दि. फडके , **विसाव्या शतकातील महाराष्ट्र,** खंड १ , १९८९.

[२] आर. एस. मोरखंडीकर , " डिलेमाज ऑफ दलित मूव्हमेंट इन महाराष्ट्र" ,युनिटि **मुव्हज ॲण्ड ऑफ्टर इन इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली ,** खंड २५ , नं. १२ , २४ मार्च १९९०.

[३] जयंत लेले ," कास्ट क्लास , ॲण्ड डॉमिनन्स : पोलिटिकल मोबिलायझेशन इन महाराष्ट्र , " **डॉमिनन्स ॲण्ड पोलिटिकल पॉवर इन मॉडर्न इंडिया ,** फ्रॅंकेल फ्रॅन्सिन , एम. एस. ए. राव (संपा.) , १९९०.

[४] गुरू गोपाळ ,"महाराष्ट्राज विमेन्स पॉलिसी-को-ऑपटिंग फेमिनिझम ," **इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली ,** खंड २९ , नं. ३२ , ६ ऑगस्ट १९९४.

[५] मालतीबाई बेडेकर ," विमेन इन महाराष्ट्र ," **महाराष्ट्र: ए प्रोफाइल** , अच्युत केशव भागवत (संपा.) , १९७७.

Maharashtra State Gazetteers

परिशिष्ट क्रमांक १

मध्यप्रांत व बऱ्हाड शासनाच्या शिक्षण विभागाने प्रसारित केलेली विदर्भातील मागासवर्गांची १९४१ ची यादी[1]

अनुसूचित जाती

नागपूर जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंवा चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका
खाटिक
कैकाडी
नागरची
डोहर

वर्धा जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंवा चांभार

वर्धा जिल्हा—चालू

सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
घासीया
कटीया
पंका
खाटिक
परधान
कैकाडी
डोहर

चांदा जिल्हा

बसोर किंवा बुरूड
मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
सतनामी
चमार किंवा चांभार
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया

अनुसूचित जाती

चांदा जिल्हा—चालू

पंका
खाटिक
कैकाडी
डोहर
कोळी

भंडारा जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंवा चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका
खाटिक
कैकाडी
डोहर
कोरी
नागरची
होलीया
ओझा
धोबी
ढीमर
कुम्हार
खानगर

भंडारा जिल्हा—चालू

चादर
जंगम
कोळी

अमरावती जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंवा चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका
खाटिक
कैकाडी
डोहर
बेडर
बहना
कोरी
गोसंगीवार

अकोला जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी

अनुसूचित जाती

अकोला जिल्हा—चालू

डोम
चमार किंवा चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका
खाटिक
कैकाडी
डोहर
बेडर

यवतमाळ जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंव चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका

यवतमाळ जिल्हा—चालू

खाटिक
कैकाडी
डोहर

बुलढाणा जिल्हा

मेहरा किंवा महार
(सोमवंशी मानोपवार)
बसोर किंवा बुरूड
मेहतर किंवा भंगी
डोम
चमार किंवा चांभार
सतनामी
मोची
गंडा
मांग
मादगी
बलाही
परधान
घासीया
कटीया
पंका
खाटिक
कैकाडी
डोहर
बेडर
खंगार
कोरी

नागपूर जिल्हा
तत्सम[१] अनुसूचित जाती

रोहर
होलिया
मांग-गारोडी
पासी

तत्सम अनुसूचित जाती, आदिम व भटक्या जमाती

नागपूर जिल्हा—चालू

आदिम जमाती

बैगा
भारिया-भूमिया
भिल्ल
भुंजिया
बिंझवार
गोंड
हलबा
कवर
कोल
कोलाम
कोळी
कोरकू
मुरिया
नागरची
परधान
सावरा किंवा साओर
ओझा

भटक्या जमाती

पासी
पारधी
कैकाडी
मांग-गारोडी
वडार
कंगार
दखनी मांग

वर्धा जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

निरंक

आदिम जमाती

भिल्ल
भुईनहार
भुंजिया

वर्धा जिल्हा—चालू

आदिम जमाती—चालू

गोंड
हलबा
कवर
कोल
कोलाम
कोळी
कोरकू
परधान

भटक्या जमाती

कांगर बटवाले
वडार
पारधी
मांग-गारोडी
पासी
कोल्हाटी
फकीर बंदरवाला

चांदा जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

बुरूड
ढीमर

आदिम जमाती

आंध
भुंजिया
बिंझवार
गोंड
हलबा
कवर
कोल
कोळी
कोलाम
मारिया
परधान

तत्सम अनुसूचित जाती, आदिम व भटक्या जमाती

चांदा जिल्हा—चालू

भटक्या जमाती

येरकिटवार
टाकनकर
वडार
पारधी
कैकाडी
तीरवाल्ली
माती वडार
कोल्हाटी

भंडारा जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

ढीमर

आदिम जमाती

भैना
भारिया-भुमिया
भिल्ल
बिंझवार
गोंड
हलबा
कोल
कवर
कोळी
कोरकू
मुरिया
नागरची
नगासिया
परधान
गोवारी[१]

भटक्या जमाती

मांग-गारोडी

अमरावती जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

न्हाल
मोची

अमरावती जिल्हा—चालू

आदिम जमाती

आंध
भिल्ल
भुंजिया
बिंझवार
गोंड
हलबा
कवर
कोल
कोलाम
कोरकू
मुरिया
नागरची
परधान
सावरा किंवा सावोर
गवळी

भटक्या जमाती

फांस पारधी
लंगोटी पारधी
चित्ता पारधी
पांगळ-गोपाळ
रेढे मांग
मांग-गारोडी
मांग-म्हशी भादरे
फाडी वडार
कैकाडी
टाकनकर
कांजर
कोल्हाटी
डुकर कोल्हाटी
चरण बंजारा
झिंगा भोई
भामटा
पासी
कोलाम
नायकडा भिल्ल

तत्सम अनुसूचित जाती, आदिम व भटक्या जमाती

अकोला जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

निरंक

आदिम जमाती

आंध
भारिया-भुमिया
भिल्ल
भुंजिया
बिंझवार
गोंड
हलबा
कोल
कोलाम
कोरकू
मुरिया
परधान

भटक्या जमाती

फांस पारधी
लंगोटी पारधी
चित्ता पारधी
पांगळ-गोपाळ
रेढे मांग
मांग-गारोडी
मांग-म्हशी भादरे
फाडी वडार
माती वडार
कैकाडी
टाकनकर
कांजर
कोल्हाटी
डुकर कोल्हाटी
चरण बंजारा
झिंगा भोई
भामटा
कोलाम
नायकडा भिल्ल

यवतमाळ जिल्हा

तत्सम अनुसूचित जाती

गोचाकी
होल्लार

आदिम जमाती

आंध
बैगा
भात्रा
भिल्ल
भुंजिया
बिंझवार
गोंड
हलबा
कोल
कोलाम
मुरिया
परधान
बंजारा

भटक्या जमाती

फांस पारधी
लंगोटी पारधी
चित्ता पारधी
पांगळ-गोपाळ
रेढे मांग
मांग-गारोडी
मांग-म्हशी भादरे
फाडी वडार
कैकाडी
टाकनकर
कांजर
कोल्हाटी
डुकर कोल्हाटी
चरण बंजारा
झिंगा भोई

तत्सम अनुसूचित जाती, आदिम व भटक्या जमाती

यवतमाळ जिल्हा–चालू
भटक्या जमाती–चालू

भामटा
पासी
कोलाम
नायकडा भिल्ल
माथुरा
बंजारा
वडार
माती वडार

बुलढाणा जिल्हा
तत्सम अनुसूचित जाती[1]

ढीमर
धोबी
कुम्हार

आदिम जमाती

आंध
भिल्ल
भुंजिया
धनवर
गोंड
हलबा
कोल
कोरकू

बुलढाणा जिल्हा–चालू
आदिम जमाती–चालू

परधान
सावरा किंवा सावोर
निहाल

भटक्या जमाती

फांस पारधी
लंगोटी पारधी
चित्ता पारधी
पांगळ-गोपाळ
रेढे मांग
मांग-गारोडी
मांग-म्हशी भादरे
फाडी वडार
माती वडार
कैकाडी
टाकनकर
कांजर
कोल्हाटी
डुकर कोल्हाटी
चरण बंजारा
झिंगा भोई
भामटा
पासी
कोलाम
नायकडा भिल्ल

---

[1] नोटिफिकेशन क्रमांक १६१९-एसीडी-एस, दिनांक ४ डिसेंबर १९४१.

[2] गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट (शेड्युल्ड कास्टस्) ऑर्डर १९३६ अंमलात आल्यानंतर शैक्षणिक सवलतीसाठी पात्र असलेल्या जाती.

[3] शिक्षण विभागाची नोटिफिकेशन क्रमांक ४००-१८७०, एकवीस, दिनांक १७-३-१९४५ नुसार समाविष्ट. तसेच ज्ञापन क्रमांक ४५१६/२२१८/एकवीस, दिनांक १६-११-१९४६ नुसार इतरही जिल्ह्यांत शैक्षणिक सवलतीस पात्र ठरविण्याचा शासनाने निर्णय घेतला.

परिशिष्ट क्रमांक २

शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सी. बी. सी. १०९३/७४९२/प्र. क्र. २८/मावक-५, दिनांक ९ ऑगस्ट १९९५ अन्वये ज्या मुस्लिम व इतर जातींचा समावेश इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या यादीत करण्यात आलेला आहे अशा जातींच्या तत्सम जातींचा समावेश खालीलप्रमाणे इतर मागास वर्गीयांच्या प्रवर्गात करण्यात आला आहे.

अनु-क्रमांक	यादीतील क्रमांक	जातीचे नाव	तत्सम जात म्हणून समावेश
(१)	(२)	(३)	(४)
१.	५७-इमाव	जुलाहा	अन्सारी
२.	१९१-इमाव	मोमीन	अन्सारी
३.	९०-इमाव	लडाफ किंवा लड्डाफ	मन्सुरी
४.	१७७-इमाव	पिंजारा, पिंजारी	मन्सुरी
५.	१८२-इमाव	माळी	बागवान
६.	१०८-इमाव	नावी, न्हावी	सलमानी/हजाम
७.	१२-वि. जा.	वडार	संगतरावा/दगडफोडू
८.	१५-इमाव	शिंपी	इद्रिसी/दर्जी
९.	११-इमाव	भिस्ती किंवा पखाली	सक्का
१०.	१२०-इमाव	पखाली	सक्का
११.	३०-इमाव	ढोली	हपमी/डफली
१२.	१९५-इमाव	ताम्बोळी	पानफरोश
१३.	१८७-इमाव	भंडारी	बावर्ची/भटीयारा
१४.	९२-इमाव	लोहार	हडाड/मिस्त्री
१५.	२१-भ. ज.	सिक्कलगर	सेकदलगर
१६.		कसाई/कसाब	कुरेशी

इमाव = इतर मागास वर्ग ; वि. जा. = विमुक्त जाती ; भ. ज. = भटक्या जमाती.

परिशिष्ट क्रमांक ३

विदर्भातील वन्य जमातींची लोकसंख्या* १९११ व १९२१

जिल्ह्याचे नाव	वन्य जमातीचे नाव	१९११		१९२१	
		लोकसंख्या	लोकसंख्येची टक्केवारी	लोकसंख्या	लोकसंख्येची टक्केवारी
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)
चांदा	गोंड	१,१५,७३२	..	१,१०,९७७	१७
	गोवारी	११,२९५	..	११,२३१	२
	परधान	१९,८९०	..	१७,७०८	३
नागपूर	गोंड	४८,९९१	६	४६,२४१	६
	गोवारी	२०,८८६	३	१९,१७६	२
	परधान	६,५००	१	५,५७३	१
भंडारा	गोंड	७५,८७१	..	७३,५४७	१०
	गोवारी	४३,२२५	..	३८,९६८	६
	हलबा	९,८३७	..	१८,२४०	२
वर्धा	गोंड	४०,६९४	..	३७,०७४	८
	गोवारी	१५,८२३	..	१६,४१७	४
	परधान	८,३३०	..	७,५३४	२
अमरावती	गोंड	२४,०९७	..	२१,०१७	३
	गोवारी	१२,३८९	..	११,४५६	१
	कोरकू	३८,८२७	..	३१,७९३	४
	कोळी	८,२११	..	७,९९०	१
यवतमाळ	गोंड	६०,१७८	८	६१,३९७	..
	गोवारी	१४,८४८	२	१६,०६७	..
	कोळी	४,३२७	०.६	..	..
	आंध	२७,७८१	४	..	..
	कोलाम	२१,८८१	३	२२,७०५	..
	परधान	१९,५८९	३	१५,०९९	..
अकोला	गोंड	४,१८७	..	३,२६०	..
	गोवारी	२,१५३	..	२,०७१	..
	हलबा	४०३	..	४६८	..
	परधान	१४९	..	३००	..
बुलढाणा	गोंड	४९७	..	९११	..
	गोवारी	१८०	..	३९६	..
	हलबा	२४	..	२६	..

*सेंट्रल प्राव्हिंसेस डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर्स, चांदा, नागपूर, भंडारा, वर्धा, अमरावती अॅण्ड यवतमाळ डिस्ट्रिक्ट, बी व्हॉल्यूम स्टॅटिस्टिकल्स टेबल्स, १८९१-१९२८ (१९२७ ते १९२९).

संदर्भसूची

अ. अप्रकाशित हस्तलिखिते

चौधरी, के. के. .. **क्वीट इंडिया मुव्हमेंट इन बॉम्बे सिटी : १९४२-४५**, अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, मुंबई विद्यापीठ, १९९०

ढवळीकर, एम. के. .. " मेगालिथिक कल्चर ", **महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड** (अप्रकाशित)

धोंडगे, ज्ञानेश .. **महार-बौद्ध समाजाची धर्मांतरानंतरच्या सामाजिक जीवनाची पहाणी : एक समाजशास्त्रीय अभ्यास**, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८९

पप्पू, आर. एस. .. " स्टोन एज कल्चर ऑफ महाराष्ट्र ", **महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड** (अप्रकाशित)

मायी, सुनील .. **सामाजिक कायद्यांचा मराठवाड्यातील ग्रामीण कुटुंबावर झालेला परिणाम**, अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८३

मोकाशी, पी. आर. .. **सम सोशल आस्पेक्ट ऑफ मॅरेजेस इन पुना डिस्ट्रिक्ट, १९५५-५६**, अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, युनिव्हर्सिटी ऑफ पुना, १९६३

वैद्य, वसंत .. **स्टडी ऑफ वैदू कम्युनिटी फ्रॉम इंटरॲक्शनिस्ट ॲप्रोच**, अप्रकाशित पीएच. डी. शोध प्रबंध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९९०

अ. कार्यालयीन प्रकाशने

औरंगाबाद डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७७

उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान, स्मृतिग्रंथ, जे. के. खानापूरकर, उस्ताद अब्दुल हलीम जाफरखान सत्कार समिती, मुंबई, १९८९

क्रिमिनल क्लासेस इन दि बॉम्बे प्रेसिडेन्सी, बॉम्बे प्रेसिडेन्सी, मुंबई, १९०८

कुलाबा डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६४

कोल्हापूर जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८९

खानसाहीब अब्दुल करीम खान, पुस्तिका

ग्रेटर बॉम्बे डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, ३ खंड, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८६

चंद्रपूर डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७३

जळगाव जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९४

परभणी जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९८८

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मागासवर्गीयांना आरक्षण व इतर सवलती, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२

महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : महाराष्ट्र : लॅण्ड ॲण्ड इटस् पिपल, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६८

महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७

महाराष्ट्र स्टेट गॅझेटिअर : हिस्टरी : मेडिव्हल पिरिअड, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७२

महाराष्ट्राची संक्षिप्त सांख्यिकी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, १९८८

रायगड जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९३

रिपोर्ट ऑफ ऑल इंडिया बंजारा स्टडी टीम, दिल्ली, १९६७, १९६८

वर्धा जिल्हा गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९२

विजयोत्सव, दि हंपी फेस्टिवल, १९९५

सांगली डिस्ट्रिक्ट गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६९

सेन्सस ऑफ इंडिया, १८७२, सेंट्रल प्रॉव्हिन्सेस, तक्ता क्रमांक व्हीबी; स्टेटमेंट ऑफ नॅशनॅलिटी, रेस, ट्राईब्ज ॲण्ड कास्टस्

सेन्सस ऑफ इंडिया, १८९१, खंड १२, भाग-दोन, दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड फ्यूडेटोरीज; बी. राबर्टसन

सेन्सस ऑफ इंडिया, १९११, खंड ७, पार्ट १, बॉम्बे प्रेसिडेन्सी

सेन्सस ऑफ इंडिया, १९११, खंड दहा, भाग-२, दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार

सेन्सस ऑफ इंडिया, १९२१, खंड अकरा, भाग-दोन, दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार

सेन्सस ऑफ इंडिया, १९२१, खंड २१, हैदराबाद स्टेट, पार्ट १, रिपोर्ट

सेन्सस ऑफ इंडिया, १९३१, खंड बारा, भाग-दोन, दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ॲण्ड बेरार

हलीम ॲकॅडेमी ऑफ सितार, एटिन्थ ॲन्यूअल फन्क्शन, ९-११, फेब्रुवारी १९९५, रंग शारदा, मुंबई, १९९५

हलीम ॲकॅडेमी ऑफ सितार, सेव्हंटिन्थ ॲन्यूअल फन्क्शन, १८-२०, फेब्रुवारी १९९४, कर्नाटक संघ, मुंबई, १९९४

क. लेख

अवचल, माधव . . " वास्तुशिल्प ", **अस्मिता महाराष्ट्राची,** मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९७१

आचार्य, हेमलता . . " चेंजिंग रोल ऑफ रिलिजस स्पेशालिस्टस् इन नाशिक : ए पिलिग्रम [illegible]सिटी ", **अर्बन सोशिऑलॉजी इन इंडिया,** ओरिएन्टल लॉगमन लिमिटेड, न्यू दिल्ली, १९७४

आळतेकर, ए. एस. . . " सातवाहन एम्पायर ॲण्ड इटस् फ्युडेटरीज ", **हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७

कतरे, एस. एल. . . " चालुक्याज ॲण्ड दि कलचुरिज ऑफ कल्याणी ", **हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड गॅझेटिअर,** महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७

कदम, संभाजी . . " महाराष्ट्रातील दृश्यकला विश्व ", **मराठी जगत जागतिक मराठी परिषद,** मुंबई, १९८९

कर्वे, इरावती . . " ए इंडियन व्हिलेज ", **रुरल सोशिऑलॉजी इन इंडिया,** तिसरी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१

कोसांबी, मीरा . . " इंडिजिनस ॲण्ड कलोनिअल अर्बन डेव्हलपमेंट इन वेस्टर्न महाराष्ट्र ", **सिटी कंट्रिसाईड ॲण्ड सोसायटी इन महाराष्ट्र,** १९८८

गुंथर, डी. सोंथायमर . . " रुद्र ॲण्ड खंडोबा : कंटीन्युइटी इन फोक रिलिजन ", **रिलिजन ॲण्ड सोसायटी इन महाराष्ट्र,** सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो, १९८७

गोखले, गोविंद बाळकृष्ण . . " सम अर्बन कमर्शिअल सेंटर्स ऑफ दि वेस्टर्न डेक्कन इन दि सेव्हंटिंथ सेंच्युरी ", **इमेजेस ऑफ इंडिया,** कर्झन प्रेस, लंडन, १९८०

गुरू, गोपाळ . . " महाराष्ट्राज विमेन्स पॉलिसी-को-ऑपटिंग ", **इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली,** खंड २९, नं. ३२, १९९४

चौधरी, कि. का. . . " इतिहास : मध्ययुगीन काळ ", **वर्धा जिल्हा गॅझेटिअर,** १९९२

जमादार, हुसेन . . " मुस्लीम महिलांचे ललाटलेख ", **साधना : स्त्री समस्या विशेषांक,** मे, १९९०

जोशी, लक्ष्मणशास्त्री . . " महाराष्ट्रातील धर्म सुधारणेचे आंदोलन ", **अस्मिता महाराष्ट्राची,** मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९७१

ढवळीकर, एम. के. . . " इव्हाल्यूशन ऑफ दि बुद्धिस्ट रॉक कट श्राइन ऑफ वेस्टर्न इंडिया ", **जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे,** व्हा. ४५-४६, मुंबई, १९७४

ढवळीकर, एम. के. . . " दि बिगिनींग ऑफ दि महायान आर्किटेक्चर ऑफ अजंता ", एम. एस. नागराजा राव (संपा.) : मधू—एम. एन. देशपांडे गौरवग्रंथ, दिल्ली, १९८१

ढवळीकर, एम. के. . . " दि ब्लाइन्ड आर्ट ", डॉ. यू. पी. शाह गौरवग्रंथ

ढवळीकर, एम. के. . . " नाशिक—ए यवना सेंटर ", जर्नल ऑफ दि एशियाटिक सोसायटी ऑफ बॉम्बे, भगवानलाल इंद्रजी, विशेषांक

ढवळीकर, एम. के. . . " वाकाटककालीन मराठी संस्कृति ", भारतीय इतिहास आणि संस्कृति, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई, जानेवारी १९७०

देव, एस. बी. . . " एन्शन्ट हिस्टरी ऑफ महाराष्ट्र ", महाराष्ट्र : ए प्रोफाईल, कोल्हापूर, १९७७

देव, एस. बी. . . " दि जेनेसिस ऑफ महाराष्ट्र, हिस्टरी ॲण्ड कल्चर ", बुलेटिन ऑफ दि डेक्कन कॉलेज रिसर्च इन्स्टिट्यूट, खंड ४३, पुणे, १९८४

पारसनीस, द. ब. . . " जुन्या ऐतिहासिक गोष्टी ", इतिहास संग्रह

पेंडसे, अंजली . . " कला दर्शन ", महाराष्ट्र दर्शन, अतुल बुक एजन्सी प्रकाशन, पुणे, १९८२

प्रभु, पी. एन. . . " ए स्टडी ऑन दि सोशल इफेक्टस् ऑफ अर्बनायझेशन ऑन इंडस्ट्रिअल वर्कर्स मायग्रेटिंग फ्रॉम रुरल एरियाज टु दि सिटी ऑफ बॉम्बे ", सोशल इंप्लिकेशन्स ऑफ इंडस्ट्रिअलायझेशन ॲण्ड अर्बनायझेशन, युनेस्को, कलकत्ता, १९५६

पाध्ये, म. द. . . " महाराष्ट्रातील सहकारी चळवळीचे यशापयश ", आजचा महाराष्ट्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८८

बेडेकर, मालतीबाई . . " विमेन इन महाराष्ट्र ", महाराष्ट्र : ए प्रोफाईल, कोल्हापूर, १९७७

बोस, अशिष . . " सिक्स डिकेडस् ऑफ अर्बनायझेशन इन इंडिया ", अर्बन सोशिऑलॉजी इन इंडिया, ओरिएन्टल लॉगमन, न्यू दिल्ली, १९७४

मालवीय, एच. डी. . . " व्हिलेज कम्युनिटिज इन इंडिया : अ हिस्टॉरिकल आऊटलाईन ", रुरल सोशिऑलॉजी इन इंडिया, तिसरी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१

मिराशी, व्ही. व्ही. . . " सक्सेसर्स ऑफ सातवाहनाज इन महाराष्ट्र ", हिस्टरी : एन्शन्ट पिरिअड गॅझेटिअर, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९६७

मोरखंडीकर, आर. एस. . . " डिलेमाज ऑफ दलित मुव्हमेंट इन महाराष्ट्र ", **युनिटी मुव्हज ॲण्ड आफ्टर इन इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटिकल विकली**, खंड २५, नं. १२, २४ मार्च १९९०

लॉरेन्स, डब्ल्यू प्रेस्टन . . " सब- रिजनल रिलिजिअस सेंटर्स ", **दि हिस्टरी ऑफ महाराष्ट्र**, सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो, १९८७

लेले, जयंत . . " कास्ट, क्लास ॲण्ड डॉमिनन्स पोलिटिकल मोबिलायझेशन इन महाराष्ट्र ", **डॉमिनन्स ॲण्ड पोलिटिकल पॉवर इन मॉडर्न इंडिया**, व्हॉल्यूम २, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९९०

वागळे, नरेंद्र . . " ए डिस्प्युट बिटवीन दि पांचाल, दैवज्ञ सोनार ॲण्ड दि ब्राह्मिन ऑफ पुणे रिगार्डींग सोशल रँक ॲण्ड रिच्युअल प्रिव्हिलेजेस : ए केस स्टडी ऑफ दि ब्रिटिश ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दि जाती लॉ इन महाराष्ट्र : १८२२-१८२५ ", **इमेजेस ऑफ महाराष्ट्र : ए रिजनल प्रोफाईल ऑफ इंडिया**, १९८०

वागळे, नरेंद्र . . " रिच्युअल ॲण्ड चेंज इन अर्ली नाईनटिन्थ सेंच्युरी सोसायटी इन महाराष्ट्र : वेंदोक्त डिस्प्युट इन बरोडा, पुणे ॲण्ड सातारा, १८२४-१८३३ ", **रिलिजन ॲण्ड सोसायटी इन महाराष्ट्र**, सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो, १९८७

स्टॅन्ले, जॉन. एम. . . " निष्काम ॲण्ड सकाम भक्ती ", **रिलिजन ॲण्ड सोसायटी इन महाराष्ट्र**, सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज, युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो, १९८७

श्रीनिवास, एम. एन. . . " दि सोशल सिस्टिम ऑफ ए म्हैसूर व्हिलेज ", **व्हिलेज इंडिया**, ॲ. ॲ. मेन्वार, नं. ८७, दि युनिव्हर्सिटी ऑफ शिकागो प्रेस, शिकागो, १९५५

ड. दुय्यम प्रकाशने

अग्निहोत्री, द. ह. . . **महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान**, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, पुणे, १९७७

अटल, योगेश . . **आदिवासी भारत**, १९६५

आत्रे, त्रिं. ना. . . **गावगाडा**, वरदा प्रकाशन, पुणे, १९८९

एन्थोवेन, आर. ई. . . **कास्टस् ॲण्ड ट्राईब्ज ऑफ बॉम्बे स्टेट**, ३ खंड (पुनर्मुद्रित आवृत्ती), कास्मो पब्लिकेशन, दिल्ली, १९७५

अॅक्वर्थ, एच. ए. . . **वॅलड्स ऑफ दि मराठाज,** लाँगमन्स, ग्रीन अॅण्ड कंपनी, लंडन, १८९४

अॅटवूड, डी. डब्ल्यू . . इझरेल मिल्टन, वागळे, एन. के. (संपा.) : **सिटी, कंट्रिसाईड अॅण्ड सोसायटी इन महाराष्ट्र,** १९८८

कपिलेश्वरी, बाळकृष्णबुवा (संपा.) . . **स्वर प्रकाश** (दुसरी आवृत्ती), मुंबई, १९७६

कपिलेश्वरी, बाळकृष्णबुवा . . **श्रुतिदर्शन,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६३

कपिलेश्वरी, बाळकृष्णबुवा . . **संगीतरत्न म. अब्दुल करीम खाँ यांचे जीवनचरित्र.** बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, मुंबई, १९७२

कर्वे, इरावती . . **किनशिप ऑर्गनायझेशन इन इंडिया,** एशिया प्रकाशन, मुंबई, १९६८

कर्वे, इरावती; दांडेकर, व्ही. एम. . . **अॅन्थ्रॉपॉमेट्रिक मेजरमेंटस् ऑफ महाराष्ट्र,** डेक्कन कॉलेज मोनोग्राफ सिरीज, नं. ८, पुणे, १९५१

कर्वे, इरावती . . **मराठी लोकांची संस्कृति,** रा. ज. देशमुख, पुणे, १९६२

कर्वे, इरावती; रणदिवे, जे. एस. . . **दि सोशल डायनॉमिक्स ऑफ अे ग्रोअिंग टाऊन अॅण्ड इटस् सराउंडिंग एरिया,** डेक्कन कॉलेज, पुणे, १९६५

कर्वे, इरावती . . **हिंदू सोसायटी : अॅन इंटरप्रिटेशन,** देशमुख प्रकाशन, पुणे, १९६८

कालेलकर, गो. मं. . . **मुंबई इलाख्यातील जाती,** श्रीनारायण बुक सप्लाईंग कं., मुंबई, १९२८

काळदाते, सुधा . . **भारतीय समाजरचना,** महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, औरंगाबाद, १९७६

कुलकर्णी, एस. जी. . . **भारतीय समाजव्यवस्था,** परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९७५

कुलकर्णी, गो. म. ; कुलकर्णी, व. दि. (संपा.) . . **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ६, मराठी साहित्य परिषद, पुणे, १९८८

कुलकर्णी, भीमराव (संपा.) . . **अस्मिता महाराष्ट्राची,** मराठा मंदिर प्रकाशन, मुंबई, १९७१

कुमार, रविंदर . . **वेस्टर्न इंडिया इन दि नाइनटिन्थ सेंच्युरी, अे स्टडी इन सोशल हिस्टरी ऑफ महाराष्ट्र,** लंडन, १९६८

केनेडी, एम. . . **नोटस् ऑन क्रिमिनल क्लासेस इन बॉम्बे प्रेसिडेन्सी,** गव्हर्नमेंट प्रिंटींग प्रेस, मुंबई, १९०८

केळकर, यशवंत न. . . **इतिहासातील सहली,** खंड २, चित्रशाळा प्रेस, पुणे, १९६४

खरे, ग. ह. . . **महाराष्ट्राची चार दैवते,** भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९५८

खरे, वा. वा. (संकलित) . . **ऐतिहासिक लेख संग्रह,** भाग १३, मिरज, १९२६

खाडिलकर, कृ. प्र. . . **खाडिलकर स्मरणी** (आत्मचरित्र), मुंबई, १९४९

गाडगीळ, डी. आर. . . **पूना-ए-सोशिओ इकॉनॉमिक सर्व्हे,** पार्ट १, गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, पुणे, १९४३

गारे, गोविंद ; लिमये, शिरूभाऊ . . **महाराष्ट्रातील दलित : शोध आणि बोध,** मुंबई, १९७३

गुळवणे, वामन रामचंद्र . . **ब्राह्मण सभेची गेली साठ वर्षे,** मौज प्रकाशन, मुंबई, १९४९

गेल, ऑमवेट . . **कल्चरल रिव्होल्ट इन ए कलोनिअल सोसायटी : दि नॉन-ब्राह्मिन मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया,** सायंटिफीक सोशालिस्ट एज्युकेशन ट्रस्ट, पुणे, १९७६

गोसावी, र. रा. . . **पाच भक्ती संप्रदाय,** मोघे प्रकाशन, पुणे-कोल्हापूर, १९७४

घुर्ये, जी. एस. . . **ॲनॅटमी ऑफ ए रूरबन कम्युनिटी,** पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६३

घुर्ये, जी. एस. . . **कास्ट ॲण्ड रेस इन इंडिया,** ५ वी आवृत्ती, पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९५७

घुर्ये, जी. एस. . . **कास्ट, क्लास ॲण्ड ऑक्युपेशन,** पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९६१

घोरपडे, एकनाथ केशव . . **कोल्हापूरचे शाहू छत्रपती : चरित्र व कार्य,** ग. ल. ठोकळ प्रकाशन, पुणे, १९५९

चव्हाण, रामनाथ . . **भटक्या विमुक्तांचे अंतरंग,** सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९

चौधरी, के. के. . . **हिस्टरी ऑफ बॉम्बे : मॉर्डन पिरिअड,** महाराष्ट्र शासन, १९८७

जरिवाला, जयंतीलाल एस. . . **अब्दुल करीम,** बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी, मुंबई, १९७३

जोग, रा. श्री. (संपा.) . . **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड ३, ४ व ५, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३

जोशी, एस. पी. . . **पंजाबातील नामदेव,** कृष्णाजी भिकाजी ढवळे, मुंबई, १९४०

जोशी, महादेवशास्त्री (संपा.) . . **भारतीय संस्कृतिकोश** (संबंधित खंड), भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

जोशी, लक्ष्मणशास्त्री (संपा.) .. **मराठी विश्वकोश** (संवंधित खंड), महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई

जोशी साखरे ; विनायक बोवा .. **सार्थ ज्ञानेश्वरी**, मुंबई

डुमाँ, लुई .. **होमो हाइरार्किकस**, विकास पब्लिकेशन, न्यु दिल्ली, १९७०

ढवळीकर, एम. के, .. **दि फर्स्ट फार्मर्स ऑफ दि डेक्कन**, रविश पब्लिकेशन, पुणे, १९८८

ढवळीकर, एम. के. .. **न्यू इन्स्क्रिप्शन्स फ्रॉम अजंता**, ऑर्ट ओरियंटलिज, सेवन, १९६८

ढवळीकर, एम. के. .. **लेट हीनयान केव्हज ऑफ वेस्टर्न इंडिया**, डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणे, १९८४

ढेरे, रामचंद्र चिंतामण .. **खंडोबा**, देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६१

ढेरे, रामचंद्र चिंतामण .. **दत्त संप्रदायाचा इतिहास**, नीळकंठ प्रकाशन, पुणे, १९६४

तुळपुळे, शं. गो. (संपा.) .. **मराठी वाङ्मयाचा इतिहास**, खंड १, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८४

देगलुरकर, जी. बी. .. **टेम्पल आर्किटेक्चर ॲण्ड स्कल्पचर ऑफ महाराष्ट्र**, नागपूर युनिव्हर्सिटी, नागपूर, १९७४

देव, एस. बी. .. **मार्कंडी टेम्पल्स**, नागपूर विद्यापीठ, नागपूर, १९७१

देशपांडे, कमलाबाई .. **स्त्रियांच्या कायद्याची वाटचाल**, मनोहर ग्रंथमाला प्रकाशन, पुणे, १९६०

देशपांडे, कृ. पं. (संयोजक). . **महाराष्ट्र दर्शन**, अतुल बुक एजन्सी प्रकाशन, पुणे, १९८२

देशपांडे, पु. ल. .. **गणगोत**, ४ थी आवृत्ती, श्री. पु. भागवत, मौज प्रकाशन, मुंबई, १९८६

देशपांडे, वामनराव .. **महाराष्ट्राचे संगीतातील कार्य**, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७४
(अनुवाद : श्रीधर हरि देशपांडे)

देशपांडे, वामनराव .. **महाराष्ट्राज कॉंट्रिब्युशन टु म्युझिक**, महाराष्ट्र शासन, नवी दिल्ली, १९७२

देसाई, ए. आर. (संपा.) .. **रूरल सोशिऑलॉजी इन इंडिया**, तिसरी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९६१

दोशी, शरयू (संपा.) .. **महाराष्ट्र**, मार्ग पब्लिकेशन्स, मुंबई, १९८५

नरेंद्र .. **रूक्मिणी स्वयंवर**, १२९१, प्राचीन ग्रंथ

नामदेवाचार्य .. **स्मृतिस्थळ**, १३१२, प्राचीन ग्रंथ

पगडी, सेतुमाधवराव . . **श्रीसमर्थ आणि समर्थ संप्रदाय**, १९८५

परमानंद शास्त्री . . **गाथासप्तशती (शोधकृती)**, प्रकाशन प्रतिष्ठान, मीरत, १९६५

पाध्ये, राघवो तथा खळोव्यास . . **सैहाद्र वर्णन**, १३०२

पानसे, मु. ग. . . **यादवकालीन महाराष्ट्र**, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, १९६३

पारसनीस, द. ब. (संपा.) . . **इतिहास संग्रह**

पेंडसे, शं. दा. . . **महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास**, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, १९६५

पंडित, गोपाळ ; बास अनेरज . . **चक्रधर सिद्ध**, १३८१

पंडित, दामोदर . . **वच्छाहरण** १२७८, प्राचीन ग्रंथ

पंडित, नलिनी . . **महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचा विकास**, बांबुळी निवास, मुंबई, १९५५

पंडित, नारायण . . **ऋद्धिपूरवर्णन**, १३६३, प्राचीन ग्रंथ

पंडित, भवानी शंकर . . **महाराष्ट्राच्या जीवनातील स्थित्यंतरे आणि त्यांचा साहित्य व संस्कृतीवर झालेला परिणाम**, पुणे विद्यापीठ, पुणे, १९६८

फडके, य. दि. . . **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, खंड १, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८९

फँकेल, फ्रॅन्सिस; राव, एम. एस. ए. (संपा.) . . **डॉमिनन्स ॲण्ड पॉलिटिकल पॉवर इन मॉडर्न इंडिया**, खंड २

बहिरट, भालचंद्र पंढरीनाथ; भालेराव, ज्ञानेश्वर पद्माकर . . **वारकरी संप्रदाय**, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९७२

बाबर, सरोजिनी . . **आदिवासींचे सण व उत्सव**, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती, पुणे, १९८८

बास, केशराज . . **दृष्टांत पाठ**, १३४८, प्राचीन ग्रंथ

बेली, एफ. जी. . . **कास्ट ॲण्ड इकॉनॉमिक फ्रॉंटिअर**, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९५८

बोरीकर, भास्करभट . . **" उद्धवगीता "** १२७४, प्राचीन ग्रंथ

बोरीकर, भास्करभट . . **शिशुपालवध**, १२७३, प्राचीन ग्रंथ

ब्रह्मे, पद्मजा . . **कुटुंब व समाज**, समाजवादी महिला सभा प्रकाशन, पुणे, १९७८

ब्रह्मे, सुलभा; उपाध्याय, अशोक .. **क्रिटिकल ॲनॉलिसिस ऑफ दि सोशल फॉर्मेशन अँड पेझंट रेझिस्टन्स इन महाराष्ट्र,** खंड ३, पुणे, १९७९

भट, माहिम .. **लीळाचरित्र,** १२७४, प्राचीन ग्रंथ

भागवत, अच्युत केशव (संपा.) .. **महाराष्ट्र : ए प्रोफाईल,** कोल्हापूर, १९७७

भावे, वि. ल. .. **महाराष्ट्र सारस्वत,** ४ थी आवृत्ती, शके १८७६ (१९५४)

मालशे, स. ग. (संपा.) .. **मराठी वाङ्मयाचा इतिहास,** खंड २, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२

मांडे, प्रभाकर .. **गावगाड्याबाहेर,** परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८३

मिल्टन इझरेल; वागळे, एन. के. (संपा.) .. **रिलिजन ॲण्ड सोसायटी इन महाराष्ट्र, सेंटर फॉर साऊथ एशियन स्टडीज,** युनिव्हर्सिटी ऑफ टोरोंटो, १९८७

मजुमदार, आर. सी. (संपा.). . **हिस्टरी ॲण्ड कल्चर ऑफ इंडियन पिपल : दि क्लासिकल एज,** खंड ३, भारतीय विद्या भवन, मुंबई, १९५४

मुळे, सुमती .. **स्टडीज इन हिस्टॉरिकल अँड कल्चरल जिऑग्राफी अँड एथ्नोग्रॅफी ऑफ दि डेक्कन** (बेस्ड् एंटायर्ली ऑन दि इन्स्क्रिप्शन्स ऑफ दि डेक्कन फ्रॉम फर्स्ट टु थर्टिन्थ सेंच्युरी ए. डी.), डेक्कन कॉलेज, पुणे, १९७२

मोकाशी, पी. आर. ; रणदिवे, जे. एस. ; नाईक, आर. डी. .. **मेट सिलेक्शन इन इंटरमॅरेजेस इन बॉम्बे,** कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९८२

मोटे, ह. वि. (संपा.) .. **विश्रब्ध शारदा,** खंड १, १९७२, खंड २, १९७५, ह. वि. मोटे प्रकाशन, मुंबई

मॅकिम मॅरिऑट (संपा.) .. **व्हिलेज इंडिया,** १९५५

रसेल, आर. व्ही. ; पं. हिरालाल .. **ट्राइब्ज ॲण्ड कास्टस इन दि सेंट्रल प्रॉव्हिन्सेस ऑफ इंडिया,** (पुनर्मुद्रित), ४ खंड, १९९३

राठोड, मोतीराज .. **बंजारा संस्कृती,** औरंगाबाद

रानडे, अशोक .. **ऑम म्युझिक अँड म्युझिशिअन्स ऑफ हिंदुस्तान,** प्रोमिला अँड कं., नवी दिल्ली, १९८४

रानडे, अशोक .. **किवर्डस ॲण्ड कन्सेप्टस : हिंदुस्तानी क्लासिकल म्युझिक,** प्रोमिला ॲण्ड कं., नवी दिल्ली, १९९०

रानडे, महादेव गोविंद .. **राईज ऑफ दि मराठा पॉवर,** पब्लिकेशन डिव्हिजन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, १९७४

रामचंद्रन, आर. . . **अर्बनायझेशन अँड अर्बन सिस्टिम्स इन इंडिया**, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९८९

रोझलिंड, ओ. हॅनलॉन . . **कास्ट, कॉंफ्लीक्ट अँड आयडिऑलॉजी**, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, लंडन, १९८५

वागळे, एन. के. (संपा.) . . **अर्बन सोशिऑलॉजी इन इंडिया**, ओरिएन्टल लॉंगमन, न्यू दिल्ली, १९७४

वागळे, नरेंद्र (संपा.) . . **इमेजेस ऑफ महाराष्ट्र : ए रिजनल प्रोफाईल ऑफ इंडिया**, कर्झन प्रेस, लंडन, १९८०

वाड, चिमणाजी . . **सिलेक्शन्स फ्रॉम सातारा राजा ॲण्ड पेशवाज डायरीज**, खंड ८/३ डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रान्सलेशन सोसायटी, मुंबई, १९११

वाळुंजकर, टी. एन. . . **एज्युकेशनल प्रॉब्लेमस् ऑफ दि शेड्युल्ड कास्टस् अँड शेड्युल्ड ट्राईब्ज सेकंडरी स्कूल स्टुडंटस इन महाराष्ट्र**, नागपूर, १९७५ (चक्रमुद्रित)

वाळुंजकर, टी. एन. . . **सोशल ऑर्गनायझेशन, मायग्रेशन अँड चेंज इन ए व्हिलेज कम्युनिटी**, डेक्कन कॉलेज, पुणे, १९६६

शेणोलीकर, ह. श्री. ; देशपांडे, प्र. न. . . **महाराष्ट्र संस्कृती : घडण आणि विकास**, मोघे प्रकाशन, पुणे, १९७२

शेरवानी, एच. के. ; जोशी, पी. एम. (संपा.) . . **हिस्टरी ऑफ मेडिव्हल डेक्कन** (१२९५-१७२४), खंड १ व २, आंध्र प्रदेश शासन, हैदराबाद, १९७३

सईद सिराज उल हसन . . **दि कास्ट अँड ट्राईब्ज ऑफ एच. इ. एच. दि नायझॅम्स डोमिनियन**, एशियन एज्युकेशनल सर्व्हिसेस, खंड १, न्यू दिल्ली, १९२०

सरकार, जदुनाथ . . **शिवाजी ॲण्ड हिज टाईम्स** (६ वी आवृत्ती), कलकत्ता, १९६१

सरदार, गं. बा. . . **संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती**

सरदेसाई, गो. स. (संपा.) . . **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद**, खंड १८, गव्हर्नमेंट प्रेस, मुंबई, १९३१

सरदेसाई, गो. स. (संपा.) . . **पेशवे दप्तरातून निवडलेले कागद**, खंड ३२, गव्हर्नमेंट प्रेस, मुंबई

सरदेसाई, गो. स. . . **मराठी रियासत** (सुधारित आवृत्ती), खंड १, १९८८; खंड २, १९८९; खंड ३, १९८९; खंड ४, १९९०; खंड ५, १९९०; खंड ६, १९९१; खंड ७, १९९१; खंड ८, १९९२, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

सहस्त्रबुद्धे, पु. ग. . . **महाराष्ट्र संस्कृती**, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९७९

सुराणा, पद्मालाल ; बेडकीहाळ, किशोर (संपा.) . . **आजचा महाराष्ट्र,** श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८८

संगवे, विलास आदिनाथ . . **जैन कम्युनिटी : ए सोशल सर्वे,** पॉप्युलर बुक डेपो, मुंबई, १९५९

संगोराम, श्रीरंग . . **वेध : संगीत नाटक आणि नाट्यसंगीत,** प्रोग्रेसिव्ह ग्रॅमॅटिक असोशिएशन, पुणे, १९९३

साळुंखे, पी. बी. ; ठोकळ, ग. ल. ; सूर्यवंशी, कृ. गो. ; भोसले, एस. एस. (संपा.) . . **राजर्षी शाहू गौरव ग्रंथ,** महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९७६

हट्टन, जे. एच. . . **कास्ट इन इंडिया,** ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, मुंबई, १९६३

हर्डीकर, विनय ; दास्ताने . . **महाराष्ट्र, १९८४,** दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८४

श्रीनिवास, एम. एन. . . **रिलिजन अँड सोसायटी अमंग दि कुर्ग्ज ऑफ साऊथ इंडिया,** एशिया पब्लिशिंग हाऊस, मुंबई, १९७८

● ● ●

कार्ले लेणी, मिथुनशिल्प



भाजे चैत्यगृह

कैलास लेणे





कैलास लेणे

सर्वानुभूती यक्ष
जैन गुंफा, वेरूळ

नटराज शिव, घारापुरी



अजिंठा रंगचित्र

प्रवेशद्वार, एक अजिंठा लेणे

भितीवरील शिल्प, अजिंठा

खानसाहेब अब्दुल करीम खान

बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी

रामकृष्णबुवा वझे

नारायण श्रीपाद राजहंस तथा बालगंधर्व

भीमसेन जोशी

पंडित जसराज

केशवराव भोसले

किशोरी आमोणकर

प्रभा अत्रे

Maharashtra State Gazetteers

गंगाधरपंत लोंढे



जितेंद्र अभिषेकी



व्यंकटेश बळवंत तथा बापुराव पेंढारकर

पोवाडा

तमाशा

Maharashtra State Gazetteers

लावणी



तारपा वाद्य



नृत्यांगना शिल्प

दशावतार

Maharashtra State Gazetteers

नृत्यांगना

पावरा नर्तक

गोंधळ

बाबूराव पेंटर, सेल्फ पोर्ट्रेट

आवालाल रहिमान, सेल्फ पोर्ट्रेट

स्त्री (रविंद्र मिस्त्री)

कोळी नृत्य

भवानी देवी व
शिवाजी महाराज

बाल शिवाजी व
जिजामाता

अश्वारूढ शिवाजी महाराज

शिवाजी महाराजांचे रंगचित्र

दरबार, रंगचित्र

लग्नसमारंभ

पालखी

Maharashtra State Gazetteers

आदिवासींचे दागिने

बंजारा पोशाख

प्राण्याचे मुख व दागिने

गणपती उत्सव

Mahara tteers